समग्र केळकर वाङ्मय

८ कादंबरी खंड

मनोहर ग्रंथमाला, प्रकाशन ७ वें

समग्र केळकर-वाङ्मय

८ कादंबरी-खंड

१९३८

प्रकाशक :
मनोहर महादेव केळकर,
घर नं. १९६/३३ सदाशिव पेठ, पुणें.

मुद्रक :
श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
राजगुरु प्रेस, ४०५ नारायण पेठ, पुणें २.

प्रकाशकाचें निवेदन

संकल्पाप्रमाणें 'समग्र केळकर-वाङ्मया'चे हे बारा खंड छापून आज वाचकांच्या हातीं देतां येत आहेत याविषयीं फार आनंद होतो. हें छपाईचें काम अपेक्षेपेक्षां पुष्कळच लवकर पूर्ण करतां आलें याचें श्रेय पुणें शहरांतील अनेक छापखान्यांनीं केलेल्या सहकारितेलाच दिलें पाहिजे.

हें समग्र केळकर-वाङ्मय प्रसिद्ध करण्याची मूळ कल्पना स्वतः केळकरांची नाहीं त्याप्रमाणें ती प्रस्तुत प्रकाशकाचीहि नाहीं. केळकर-वाङ्मयाचा अभ्यास आज सुमारें वीस वर्षें सतत करणाऱ्या एका गुणग्राही वाचकाच्या सहृदय अंतःकरणांत त्या कल्पनेचा उगम झाला. आणि त्याच्याच सक्रिय प्रोत्साहनामुळें त्या कल्पनेला हें दृश्य स्वरूप प्राप्त झालें हें सांगणें आम्ही आमचें कर्तव्य समजतों.

वास्तविक केळकरांचें '**समग्र**' वाङ्मय प्रसिद्ध करण्याची वेळ अजून आलेलीच नाहीं! कारण त्यांची लेखणी अजून थांबलेली नाहीं. आणि त्यांची प्रकृति चांगली राहिली तर यापुढें त्यांनीं निर्माण केलेलें आणखीहि वाङ्मय वाचकांना वाचावयास मिळेल अशी आशा करण्यास जागा आहे. तथापि बारा हजार पृष्ठें भरतील इतकें वाङ्मय आजच सिद्ध असल्यामुळें, हा पहिला मोठा हप्ता छापून मोकळें व्हावें ही गोष्ट सर्वच दृष्टींनीं इष्ट होती. पण यांत आणखी एक सोय विशेष होती ती अशी कीं, केळकरांच्या छापील ग्रंथांशिवाय त्यांनीं वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें यांत लिहिलेले लेख, इतर ग्रंथकारांच्या ग्रंथांना लिहिलेल्या प्रस्तावना, प्रसंगविशेषीं त्यांनीं दिलेल्या व्याख्यानांचे लेखी सारांश, इत्यादि जें अवांतर वाङ्मयहि बरेंच आहे, तें आठवून मिळवून जुळवून युक्तायुक्त पाहून तपासून देणें हें काम इतरांच्या हातून कसें होणार? तें त्यांचें त्यांनींच करणें शक्य. म्हणून त्यांना श्रम देऊनहि पण तें त्यांच्या हातून होण्यासारखें आहे तोंपर्यंत करवून घेण्याशिवाय गत्यंतर नव्हतें.

२

या ग्रंथांतल्या 'वाङ्मय' शब्दाचा अर्थ नेहमीं आपण समजतों त्याहून किंचित् अधिक व्यापक केला पाहिजे. कारण केळकरांच्या लेखांप्रमाणें त्यांनीं दिलेल्या तोंडी व्याख्यानां-भाषणांचाहि समावेश त्यांत केला आहे. पण त्यांपैकीं बरींच, तोंडी बोलून झाल्यावर, स्वतः त्यांचीं त्यांनीं लिहून दिलेलीं आहेत. इतर वार्ताहरांनीं लिहून घेतलेलीं अशीं थोडीं आहेत.

दुसरीहि एक गोष्ट सांगणें अवश्य आहे ती ही कीं, या बारांपैकीं कांहीं थोड्या खंडांत, केळकरांनीं स्वतः लिहिलें नाहीं किंवा ते बोलले नाहींत असेंहि कांहीं 'वाङ्मय' पुरवणी कागदपत्रांच्या रूपानें समाविष्ट केलें आहे. उदाहरणार्थ, टिळकांचीं मृत्युपत्रें, केसरीवरील खटल्यांतील न्यायमूर्तींचे निर्णय, एखाद्या सभेच्या हकीकतींतील प्रास्ताविक किंवा समारोपाचा असा कांहीं त्रोटक मजकूर इत्यादि. पण त्या ठिकाणीं केवळ तो प्रसंग किंवा तो विषय यांची नीट समजूत पटण्याला तो मजकूर साधनभूत असल्यामुळेंच घालावा लागला आहे. उलट कांहीं वाङ्मय केळकरांनीं लिहिलेलें असेंहि खंड-पृष्ठांच्या मर्यादेमुळें वगळावें लागलें.

हें प्रचंड वाङ्मय जवळ जवळ सारख्या पृष्ठसंख्येच्या बारा खंडांत बसवून देणें हें काम सहजच जरासें अडचणीचें झालें. तथापि शक्य तोंवर विषयानुसंधान साधण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे.

—प्रकाशक

नवलपूरचा संस्थानिक

बलिदान

कादंबरी-खंड

— ८ —



श्री. न. चिं. केळकर,
कादंबरीकार (१९३४)

नवलपूरचा संस्थानिक

१ मित्रांच्या जुन्या आठवणी

या नवलपूर नगराला 'नवलपूर' हें नांव मूळ ठेवतांना तें कोणी कोणत्या नवलाला उद्देशून ठेवलें असेल ठाऊक नाही. पण तें ठेवल्यानंतरच्या इतिहासांत एक नवल घडलें खरें. आणि त्या नवलाचीच गोष्ट आम्ही आता वाचकांना सांगणार आहों.

वास्तविक नवल हें दृष्टींत असतें, सृष्टींत नसतें. प्रतिभावान् माणसाला पाहावें तिकडे नवलच दिसेल. नाही तर श्रीकृष्णाने अर्जुनाला दाखविलेलें विश्वरूप पाहूनहि एखादा खमंग दगड म्हणावयाचा " देवा ! हेंच का तुम्ही मोठ्या नवलाचें म्हणून दाखविलें तें ! लहान मुलें अशीं विक्षिप्त चित्रें रोज पाटीवर काढतात ! "

जिची चर्चा झाली नाही अशी गोष्ट जगांत नाही. या नगराच्या नांवा-चीहि चर्चा अलीकडे एकदा झाली तेव्हा एक नागरिक म्हणाला, " आज ओळीने पांच पिढ्यांचा जुलुमी राजसत्तेचा छळ सोसून लोकांनी हें संस्थान कसें उरूं दिलें हें नवल ! " दुसरा म्हणाला, " आज पांच पिढ्यांनी तरी माणुसकीच्या शीलाची आशा दाखविणारा राजा या नगराच्या लोकांना लाभला हेंच नवल " ! नवलपूर नगराभोवतालचें सृष्टिसौंदर्य खरोखरच नवल वाटण्यासारखें होतें. पण नगरच्या लोकांनी केलेली नगराच्या अंतःस्वरूपाची घाण व दुर्दशा हीं देखील नवल करण्यासारखींच होतीं. तथापि असल्या नवलांविषयीं आपण बोलत बसूं तरी कोठवर ! तेव्हा या नगरांत आज काय प्रत्यक्ष घडत होतें तेंच पाहूं या चला !

आमच्या संस्थानिक लोकांची राजधानी म्हटली म्हणजे तिची रचना कोठेहि बहुधा ठरलेलीच असावयाची. राजवाड्याच्या मुख्य दरवाजासमोर

लांबच लांब व खूप रुंद असा एक रस्ता. त्याच्या दोहों अंगांना मधून मधून शहराचे मुख्य मानकरी व शेठ-सावकार यांच्या हवेल्या, त्यांतच एखादें पाण्याचें कारंजें, गांवांतलें मुख्य देऊळ त्यांतच, परका मनुष्य गांवच्या दुसऱ्या टोकाने या रस्त्यांत शिरला, आणि कांही वेळ चालला, म्हणजे त्याला वाटेल, कीं हें केवढें मोठें शहर असलें पाहिजे. पण हा राजरस्ता सोडून तो जरा बाजूला गेला, म्हणजे शहराचें खरें स्वरूप लक्षांत यावयाचें! मुख्य रस्ता पन्नास फूट रुंद असला, तर त्याला येऊन मिळणारे रस्ते पंधरा फुटीहि नसावयाचे. घोड्यांच्या दोन गाड्या एकीजवळून एक जावयाच्या नाहीत. आणि दोन रगेल बैल समोरासमोर आले, कीं बहुधा टक्करच झुंपावयाची! राजरस्ता तेवढा झाडलेला असावयाचा. आडरस्त्यांत कचरा तुडवीत, घाण टाळीत, मोऱ्यांचे ओहोळ ओलांडीत, नाकाला पदर लावून जावयाला पाहिजे. या भागाच्या पलीकडे गेलें म्हणजे तर मुळी रस्तेच नाहीत. नुसते बोळ; वाटेल तशीं वेडीं-वांकडीं बांधलेलीं घरें. त्यांच्या निमुळत्या कोपऱ्यांनी बनलेल्या गुंफांतून किंवा चक्रव्यूहांतून कशी तरी वाट काढावयाची. आणि यांतून बाहेर पडलें, कीं मग निवडुंगच निवडुंग! संस्थानी राजधानीच्या एकाच छोट्या आवारांत विलायतेतली रोल्स रॉइस मोटार, झुलत चालणारा गजराज, सहकुटुंब उकीरडा फुंकणारा डुकर आणि महाराष्ट्राचा आवडता निवडुंग यांचा समावेश कसा बिनबोभाट सुखाने सख्ख्या-चुलतभावंडांप्रमाणें झालेला असतो!

बाहेर नगराच्या पूर्वांगाला मात्र एक रम्य व शोभिवंत अशी विस्तीर्ण उद्यानभूमि होती. तींत दोनहि प्रकार होते. एक गर्द झाडी असलेली राई— हिच्यांत आपोआप उगवलेले अनेक उंच वृक्ष असून भरदोनप्रहरींहि तींत सूर्यकिरणें महत्प्रयासाने शिरत. तसेंच राईच्या पलीकडे कांही अंतरावर एक जंगी सपाट मोकळें मैदान होतें. यांत गांवचीं शेकडो लहानमोठीं मुलें सर्व प्रकारचे खेळ खेळत; व घरचीं घोडीं असलेले तरुण घोडदौडी करीत. राई व मैदान यांच्यामध्ये माळ्याने बनविलेला लहानच पण सुंदर बगीचा असून, त्यांत नवीं जुनीं सर्व प्रकारचीं फुलझाडें लावलीं होतीं, तीं अशा बेताने कीं, कोणत्याहि महिन्यांत सौंदर्य व सुगंध यांची वाण न पडावी. बागेच्या मध्यावर एक जुनाट शंकराचें देऊळ होतें. त्याच्या प्राकारांतील एका बुरुजासारख्या उंच जागेवर चौरस फरसबंद ओटा होता. त्यावर संध्याकाळची हवा घेणारे हौशी लोक बसून गप्पागोष्टी करीत. तात्पर्य, हा दहावीस

बिध्यांचा भूप्रदेश गांवच्या लहानथोर स्त्री-पुरुषांना सर्व दृष्टींनी प्रिय असा होता. यामुळे पहाटेपासून चार-दोन घटका रात्रीपर्यंत या भागाकडे लोकांची रहदारी कायमची टिके.

आज या ओट्यावर बसून दोघे तरुण हलक्या आवाजाने गोष्टी बोलत होते. सूर्य मावळून चंद्रप्रकाश पडूं लागला होता. हवेंत उष्मा बराच होता. तथापि जी एखादी वाऱ्याची झुळूक मधून मधून येई, तिजबरोबर बागेंतल्या निशिगंधाचीं आणि रातराणीचीं नुकतींच उमलणारीं फुलें यांचा मादक सुगंध येऊन मनाला आल्हाद होई. त्या तरुणांपैकीं एकजण म्हणाला—"बन्या, आज तुझी माझी गाठ आपल्या या आवडत्या जागीं पडल्याबरोबर मला बाळपणच आठवलें रे सगळें !"

बन्या—मलाहि पण तेंच आठवलें, शंकरभाऊ ! पण आपली आठवण तेवढी उरली आणि बाळपण गेलें, याचें तुला वाईट नाहीं का वाटत ?

शं. भा.— आठवण मनांत आहे तोंपर्यंत तितक्यापुरतें तें बाळपणच नव्हे का ? हें पाहा, मला या क्षणीं मनश्चक्षूंना असें दिसतें आहे कीं, तूं आणि मी घरच्या देवांना पुडाभर फुलें तोडून नेण्याकरिता असे संध्याकाळीं या शेजारच्या बागेंत आलों आहों.

बन्या— आठवणीच म्हणशील, तर मी तुझ्या जोडीला आणि भरतीला कांहीं सांगूं शकेन. तुझी ऐट नको.

शं. भा.— सांगा बरें.

बन्या— आपण फुलें तोडावयाला आलों आहों, पण फुलें तोडण्याचें दोघांच्याहि वांटणीचें गरीबसें काम मी एकटा करीत असतां, झाडांत दडलेलीं पक्ष्यांचीं गवती घरटीं आणि आंब्यावरच्या कैऱ्या, माळ्याची नजर चुकवून तोडण्याचें धाडसाचें काम दोघांच्या वांटणीचें तूं एकटा करीत आहेस.

शं. भा.— पण त्या तोडून झाल्यावर तुझ्यांतलीं निम्मीं फुलें तूं मला देत आहेस आणि माझ्यांतल्या निम्या कैऱ्या मी तुला देत आहें—

बन्या— आणि माळ्याने संशयाने दटावल्याबरोबर, धीटपणाने तूं त्याच्या अंगावर दुप्पट जोराने ओरडून, "मी खाजगी कारभारीसाहेबांना सांगून तुझी खोड मोडीन" असें तोंडाने म्हणत असतांना, हाताने खिशांतल्या कैऱ्या हळूच चाचपून पाहत आहेस !

शं. भा.— अलबत ! सरकारी बागेंतल्या आंब्याच्या झाडावरच्या कैऱ्या

चोरण्याचा प्रत्येक लहान मुलाला हक्कच असतो. त्या चोरीचें मला आज मोठेपणींहि वाईट वाटत नाही."

बन्या—अरे, पण तेव्हां तरी शेवटीं ती चोरी ठरली कोठे? तुला नाही का आठवत कीं, तूं आणि मी माळ्याबरोबर भांडत-तंडत होतों, इतक्यांत अवचित खरोखरच खासगी कारभारीसाहेब बागेच्या तोंडाशीं आले—

शं. भा.—होय रे होय, आणि त्यांच्याबरोबर खुद्द यजमानसाहेबहि होते! आम्ही त्यांच्या ओळखीचे म्हणून त्या दोघांनीहि आमचें कौतुक केलें.

बन्या—पण गुप्त पोलिसाप्रमाणे 'आज किती कैऱ्या पाडल्या मेहेरबान,' असा नेमका सवालहि तुला-मला त्यांनी केला! मग काय विचारतां? त्या लुच्चा माळ्याने पगडी फिरविली; आणि यजमानसाहेबांना मुजरा करतांना काय म्हणाला, पोराची जात! अजून त्यांचे दांत कैऱ्या खाऊनशेनी आंबत न्हाइतां ना! तवा त्येनीच कैऱ्या कराकरा खाल्ल्या! आणि चोराव्या बी! आमा म्हाताऱ्यास्नी आता कुणी कैऱ्या दिल्या हटकून तरी खावववतात कुठं, सरकार?

शं. भा.—मग ते सर्वजण हसले! आणि आम्हीहि मोठ्या संभावितपणाची ऐट आणून यजमानसाहेबांना नमस्कार करून ते लांब गेल्यावर त्यांना हसत निघून गेलों नव्हे का?

बन्या—अरे हो, बरोबरच आहे. यजमान झाले तरी काय? संभावितपणाची नुसती ऐट आणणारेच होते की नाही? केवढें त्यांचें तें कुंभाराच्या चाकाएवढें भलें मोठें पेशवाई पागोटें—

शं. भा.—कपाळावर केवढा तो गंधाचा टिळा—

बन्या—आणि केवढे ते कल्ले आणि गुलमिशा! अरे बाप रे!

शं. भा.—अरे, तेव्हाचें तें वैभव केशसंवर्धनांत होतें. आता कल्पना पालटल्या हें दे सोडून. हल्लीच्या यजमानांच्या तोंडावर कधीं एक तरी केस दिसतो का? आणि तुझ्या माझ्या तरी?

बन्या—तसाच तो इतर थाट! यजमानसाहेबांच्या पुढे चालणाऱ्या हुजऱ्याच्या कंबरेला खऱ्या जरीचा शेला आणि हातांत रुप्याचीच पण सोन्याच्या मुलाम्याची छडी!—

शं. भा.—आणि उजेडाकरितां आणलेली दिवटी तीहि रुप्याची. तशीच तेलाची बुदली देखील—

बन्या—पण खरेंच सांग हं! आता आपण या दिमाखदार वैभवाची चेष्टा करूं वाटेल तर, पण तेव्हा तें वैभव पाहून आमचे डोळे किती दिपत! आणि आश्चर्याने आमच्या भिवया दोन बोटें कशा वर चढत!

शं. भा.—बाळपणीं दृष्टीचें मापच असें लहान असतें. जो मनुष्य आज आपणाला ठेंगू वाटेल तो तेव्हा दोन पुरुष उंचीचा वाटत असतो.

बन्या—शिवाय राजवैभवाची आपली कल्पनाहि लहानपणीं वेगळी असते.

शं. भा.—अगदी बरोबर! मला तर तेव्हा, संस्थानचा यजमान म्हणजे पुराणांतलें वर्णन ऐकलेला स्वर्गीचा इंद्रच वाटे.

बन्या—आणि आता काय तो पाताळचा राक्षस वाटतो?

शं. भा.—नाही तसेंहि नाही. तो माणसांतला माणूसच–पण तो सामान्य माणसाहून थोडा अधिक वरच्या दर्जाचा माणूस वाटतो यांत मात्र शंका नाही.

बन्या—'ना विष्णुः पृथिवीपतिः' हें वचन तुझ्या डोक्यांतून अजून अगदी पार निघून गेलेसें दिसत नाहीं!

शं. भा.—तें निघून गेलें आहे; पण शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते या वचनावरचा विश्वास सर्वस्वी उडालेला नाही हें मात्र खरें. आपल्या हिंदु तत्त्वज्ञानांतला कर्मविपाकाचा सिद्धान्त मला पुष्कळसा खरा वाटतो. आणि म्हणूनच असेंहि वाटतें कीं, केवळ जन्माने राजपद मिळणें हें पूर्वार्जित सत्कर्मांचें फळ आहे. आणि दत्तक होऊन राजपद मिळणें तर त्याहून अधिक! एरवी जगांत राजपदापेक्षा गरीबांचींच घरटीं हजारो लाखोपटींनी अधिक असतात; आणि 'थिअरी ऑफ चान्स' म्हणजे 'संभवसिद्धान्ता'-प्रमाणे राजपद मिळण्यापेक्षा गरीबाचा वारसा मिळणें हाच संभव हजारो-लाखोपटींनी अधिक प्रबळ ठरत नाही काय?"

बन्या—पण राजपदावरच्या लोकांचीं चरित्रें पाहिलीं म्हणजे, 'योग-भ्रष्ट' हें स्तुतिवचन न वाटतां मला तर तो निंदास्पदच शब्द वाटतो. योग हा पूर्वीचा शब्द विसरून जाऊन भ्रष्ट येवढाच शब्द त्यांच्यासंबंधाने माझ्या लक्षांत राहतो. आणखी असेंहि वाटतें कीं, या भ्रष्टयोग्यांची पुरी दुर्दशा व्हावी म्हणूनच कीं काय, अनेक कुकर्में करण्याची संधि ईश्वर त्यांना राजपदावर बसवून देतो.

शं. भा.—पण त्यांच्या कुकर्मांचा गवगवा व्हावा, निंदा व्हावी, याला फक्त त्यांचें मोठेपण हेंच कारण नव्हे का? संस्थानिकांच्या प्रजाजनांत राजांसारखे दुष्ट-नष्ट कुकर्मी लोक आढळत का नाहीत?

बन्या—पण, आपल्या कुकर्मांवरून लोकांचें लक्ष जावें, म्हणजे सामान्य प्रजाजनासारखीच आपल्या कुकर्मांची उपेक्षा त्यांच्याकडून व्हावी असें जर राजेलोकांना वाटत असेल, तर त्यांनी राजपदाचा त्याग करून सामान्य प्रजाजनांत मिसळावें की! त्यांना नको कोण म्हणतो! राजपदाचा त्याग करावयाला कोणाचा प्रतिबंध आहे! पण राजपद, त्या पदाचें ऐश्वर्य व वैभव हें सर्व लाभावें, आणि फिरून त्याच राजपदामुळे लोकनिंदा मात्र टळावी हीं दोनहि कशीं रे साधतील?"

शं. भा.—पण, बाबा, राजधर्माप्रमाणेच प्रजाधर्म म्हणूनहि कांहीं आहे कीं नाही! स्वतः प्रजा तो पाळील तर मग राजाला नांवें ठेवावयाला प्रजेला अधिकार येईल. धर्म हा दुतर्फी मामला आहे. राजा काय, प्रजा काय, दोनहि एकाच खाणींतली माती नव्हे काय? 'पॉट कॉलिंग धी केटल ब्लॅक' ही म्हण प्रसिद्धच आहे. राजेलोकांना नांवें ठेवणाऱ्या महाशयांपैकीं एखाद्या राजेश्रींना औट घटकेची शिराळशेठी, उसनें राजपद देऊन पाहा. म्हणजे कळेल राजा होणें हें किती अवघड आहे तें.

बन्या—पण राजवैभव भोगणें सोपें व तेवढें काम मात्र राजे लोक चोखपणें बजावतात असेंच ना?

शं. भा.—येऊन जाऊन त्यांच्या वैभवाचा हेवा! हेंच कीं नाही? आपलें वैभव मात्र कोणी सोडावयास तयार नाही. भावी पिढीच्या जिवावर सगळे आर्थिक आणि राजकीय प्रयोग! आपण मेल्यावर जगाचें कांही का होईना! पण आपण जिवंत असूं तोंपर्यंत व्यक्तिशः प्रजाजनांना मात्र आपलें वैभव आणि आपली संपत्ति भोगतां आली म्हणजे झालें!

बन्या—चला की, आपल्याला कशाला राजे लोकांच्या रिकाम्या उठाठेवी? देवानें तुला आणि मला राजा केलें नाही किंवा भोगण्यासारखें वैभवहि दिलें नाही. भाकरी मिळवावी आणि खावी. खरें सुख यांतच आहे!

शं. भा.—ठीक बोललास, मास्तरकी हें राज्य आणि सुटी हा मोक्ष याच मताचा मीहि आहे. आणि तोच मोक्ष भोगायला यंदा गांवीं आलों आहे. असो, चला, यंदा तरी सुटींत तुझी माझी गाठ येथें बरी पडली म्हणावयाची! आणि

त्यालाहि कारण मला वाटतें हेंच कीं, माझ्याप्रमाणे तुलाहि यंदा आपल्या गांवीं सुटी घालविण्याची अभावित इच्छा आज इतक्या वर्षांनी झाली. नेहमीप्रमाणे मला यंदाहि माझ्या शिकवणींतील राजकुमाराबरोबर महाबळेश्वराला जाण्याचें निमंत्रण आलें होतें. पण तें टाकून मला इकडे यावें असें राहून राहून वाटलें. कारण आपल्या जन्मभूमीचा ळळा कांही वेगळाच आहे. महाबळेश्वराच्या शीतळ सुखालाहि तो हार जात नाही!

बन्या— तुला दरवर्षीं महाबळेश्वराला जाण्याचें निमित्त तरी असतें. मला तसलें कांही निमित्त तर नाहीच! इकडे न येण्याला पण उलट हे वर्षा-अखेरचे दिवस मला, केलें तर, भरगच्च घरकामाचे जमिनीच्या. जाळभाजी, उरला सुरला वसूल, नव्या कबुलायती, या सगळ्या कामीं आमच्या वृद्ध काकांना माझी मदत फार हवी असते. पण माझ्या मनाने या शहरीं येण्याची जी लाज अलीकडे घेतली आहे तिजमुळे, घरचें थोडेंबहुत नुकसान झालें, किंवा काकांनी स्वछंदी म्हणून मला बोल लावला, तरी यावेंसें वाटत नाही काय करूं!

शं. भा.— मग यंदाच कसें यावेंसें वाटलें?

बन्या.— तुझ्यासारखेंच जन्मभूमीच्या प्रेमाने हें तर खरेंच, पण शिवाय इकडे येण्याविषयी वाटणारी व मनाला सतत खात राहणारी लाज मला सोडून देईल असा जो कांही प्रयत्न करावा असें नेहमी वाटे, तो यंदा सफळ होण्याचा योग आला असें दिसलें. म्हणून मी आनंदाने आलों.

शं. भा.— याविषयी तूं मला पूर्वी कांहीं सांगितलें होतेंस का रे कधी, बन्या? सांगितलें असलेंस तरी तें आतां चांगलेंसें आठवत नाही. म्हणून विचारावेंसें वाटतें. पण तें सांगण्यासारखें असलें तरच हो! नाही तर माझा कांही आग्रह नाही. तुझ्यासारखीच नवलपूर ही माझीहि जन्मभूमि असली, तरी तुझ्या माझ्यांत फरक आहे. तो असा कीं, जन्मभूमीच्या स्मरणाशिवाय या गांवीं माझ्या मनाला प्रेमबंधन असें कांहीच नाही. तुझें घरदार, गोतावळा सगळें कांही येथे आहे; आणि मनाला लज्जा वाटण्याचें कारण आपले आपण असो, वा इतर कोणी असोत, गोतावळा जेवढा मोठा तेवढा तो स्वाभिमानी मनुष्याला लज्जेच्या दृष्टीने अधिकच अडचणीचा होतो.

बन्या-- शंकरभाऊ, तुला माझें कारण मीं कधी नीट सांगितलेंच नव्हतें, मग तें कसें आठवणार? पण तें न सांगितलें याचा अर्थ, तूं कदाचित् मनांत समजतोस तसा मात्र नव्हे. मला आपल्या गांवीं येण्याची जी लाज वाटते

म्हणून म्हटलें, ती माझ्या कोणा कुटुंबीय स्त्रीपुरुषांच्या दुष्कृत्यामुळे नव्हे; तर स्वतः माझ्याच हातून घडलेल्या कांही दुष्कृत्यांमुळे !

शं. भा.— काय ? तुझ्यासारख्याच्या हातून दुष्कृत्य ? मला तर तें खरेंच वाटत नाही. तूं कांही तरीच सांगतो आहेस झालें !

बन्या— दुष्कृत्यच नव्हे तर काय ! तें मी कोणत्याहि स्वार्थीपणाने केलें नाही. जें काय घडलें तें बालपणीच्या अजाणतेपणानेच ! आणि त्यांतूनहि प्रत्यक्ष माझ्या वडिलांच्याच सांगणीने व आग्रहाने ! हें सर्व खरें. पण त्या माझ्या कृत्याने या नवलपूरच्या एका कुटुंबाचा नाश झाला ! हें मला तेव्हा चांगलेंसें कळत नव्हतें. पण आता मी मोठा झाल्यावर तें चांगलेंच कळतें, मनाला जाणवतें, आणि दुःख देतें. माझें दुष्कृत्य दुसरें-तिसरें कांही नव्हतें, फक्त खोटी साक्ष देण्याचें होतें. आता ती साक्ष मी दिली नसती तरीहि जें व्हावयाचें तें त्या परिस्थितींत झालेंच असतें, राहिलें नसतें. पण मी निमित्त-मात्र तरी झालोंच कीं नाही ? खोटी साक्ष दिल्याने मी तर बदनाम झालोंच, पण माझ्याच वयाचा एक तरुण निरापराधी मुलगा—याच नवलपूरचा एक उमदा नागरिक—न्यायकोर्टांत काळेपाण्याच्या शिक्षेला पात्र झाला. बरींच वर्षें सगळा गांव माझ्याकडे, माझ्या वडिलांकडे, व माझ्या घराकडे निंदा करण्याच्या बुद्धीने बोट दाखवी. त्यांत त्यांच्याकडे तरी काय दोष ? मात्र पुढेपुढे खरा प्रकार सर्वच्या सर्व हळूहळू लोकांना कळून आला ! लोकांनी आमची निंदा करण्याचें सोडलें. माझे वडीलहि निवर्तले. मी बरेच दिवस गांवीं आलों नाही. अशा रीतीने विस्मरणाला मदतच झाली. तथापि जन-निंदा हटली तरी मननिंदा कशी हटणार ?

शं. भा.— कां बरें ? लोकांनी तुला निर्दोषी ठरविलेंच कीं नाही ? त्यांनी तुझ्यावरचा आरोप काढून घेतला ना ? मग ?

बन्या— अरे, लोकांना सत्य कळून आलें तें इतकेंच कीं, माझ्या हातून गोष्ट झाली ती स्वार्थी बुद्धीने झाली नाही. पण जें खोट्या साक्षीचें कृत्य घडलें तें राहिलेंच की नाही ? शिवाय त्याचे दुष्परिणाम दुरुस्त होते तरी मग सर्वच कांही ठीक होतें. पण डबीरांचा प्रभाकर, ज्याला आणि ज्याच्याबरोबर मला दोषी ठरवून कोर्टाने काळेपाण्याची शिक्षा दिली, तो अजून आहेच कीं नाही फरारी ? मला लवकरच माफी देण्यांत येऊन तुरुंगांतून सोडलें; कारण दरबारचा खरा राग प्रभाकरावरच होता. त्याला गुन्हेगार ठरावावयाला कोणा

तरी समवयस्क मुलाची साक्ष सरकारला हवी होती. ती त्यांनी मजकडून घेतली व मला शिक्षा दिल्याचें नाटक करून लवकरच सोडून दिलें. अशा रीतीनें अखेरीस माझें प्रत्यक्ष नुकसान असें कांहीच झालें नाही. पण बिचारा प्रभाकर घरा-दाराला मुकला की नाही? आणि माझ्या साक्षीच्या निदान निमित्ताने!

शं. भा.— बन्या, मला कल्पना नव्हती कधी, कीं असला वाईट प्रसंग तुझ्यावर आला असेल म्हणून!

बन्या— कशाने कल्पना येणार तुला? तूं त्या वेळीं या शहरीं बहुधा नव्हतास; आणि त्यानंतरहि तुझी माझी गाठच आज किती तरी दिवसांनी पडत आहे! बरं, माझी जबानी खोटी होती हें मीं कुणाकडे सांगावें? आणि सांगितलें तर त्याचा उपयोग काय? अशी स्थिति आजवर होती, म्हणून आपल्या मनाशींच दुःख करीत बसलों होतों झालें!

शं. भा.— मग आता यंदा सुटींत नवलपुरला आलास तो कोणत्या आशेवर?

बन्या— आशा हीच, कीं नवे यजमान गादीवर येणार, त्यांना मुखत्यारी मिळणार. तेव्हां संस्थानच्या कारभारांत फेरफार होऊन हा नष्टदुष्ट दिवाण दिवाणपदावरून निघाला म्हणजे कदाचित् नवा मनु अवतरावयाचा! आणि प्रजेला सुखाचे दिवस लाभण्याचा संभव!

शं. भा.— पण तुझ्या जबानीने ज्या खटल्यांत प्रभाकर डबीराला काळे-पाण्याची शिक्षा झाली त्याची कांही दुरुस्ती होईल अशी आशा वाटते का तुला?

बन्या— आज प्रत्यक्ष तशी आशा कांही वाटत नाही हें खरें. कारण तसा कोणताहि प्रयत्न व्हावयाचा म्हटलें तर खुद्द प्रभाकर डबीर जागेवर पाहिजेना? तो तर अजून फरारीच आहे. पण यंदा चारसहा महिन्यांची रजाच काढून आलों आहे घरीं. काका आता अगदी थकले, तेव्हां घरच्या कारभाराची कांही व्यवस्था करीन म्हणतों. आणि नवे यजमान स्थानापन्न झाल्यावर या नाही त्या रीतीने खरी घडलेली हकीकत त्यांच्या कानांवर घालीन! मग त्यांतून कांही निघो वा न निघो. पण तसें करीन तर खास माझ्या मनावरचा भार तरी हलका होऊन मी सुखी होईन! नवे यजमान तुझ्या–माझ्या वयाचे असून, तरतरीत व होतकरू दिसतात. मग पाहावें शेवटी कसे काय निघतात ते म्हणा!

या दोघा मित्रांचें असें बोलणें होतें, तों इतक्यांत एक उमदा घोडा किंकाळत, फुरफुरत देवळाच्या बाहेरच्या दरवाजाशीं आला. त्यावरून नवलपूरचे नवे यजमानच रपेट करून आले होते ते खाली उतरले. जवळच्या एका हुजऱ्याचे हातांत रेशमाची काढणी होती ती त्याने लगामाला लावून घोडा आपल्या हातीं घेतला. दुसऱ्या हुजऱ्याचे हातांत भालेदार काठी व मेणबत्तीचा चौकोनी मोठा कंदील होता, त्याच्या उजेडाने नवे यजमान, घोड्याच्या पाठीवर शाबासकीची थाप मारून, मुजरे व नमस्कार घेत घेत देवदर्शनाकरिता देवळांत शिरले, आणि देवदर्शन व प्रदक्षिणा करून तसेच पायीं राजवाड्याकडे गेले. बन्या व शंकर हे बुरुजाच्या ओट्यावर उभे राहून यजमानसाहेबांच्या या हालचाली पाहत होते. यजमान निघून गेल्यावर शंकरभाऊ म्हणाला—

बन्या कांही म्हण, पण हें नवें पाणी कांही वेगळेंच दिसतें आहे, मग नवलपूर संस्थानच्या प्रजेच्या नशिबांत काय असेल तें असो.

बन्या—मी तरी याच आशेवर आज इतक्या दिवसांनी गांवाचें तोंड पाहायचें धाडस केलें आहे! आता मुखत्यारीचा समारंभ लवकरच होणार. तो झाला, म्हणजे कारस्थानाचीं चाकें हलूंफिरूं लागतील गरगरा. मग माझें प्रकरण कोठे कसें लागतें धसाला तें पाहतां येईल. बिचारा प्रभाकर डबीर जिवंत आहे का मेला त्याचा पत्ताहि नाही. तेव्हां त्याचा न्याय कसा होईल तो होवो. पण माझ्यापुरतें तरी मला पाहतां येईल आणि तें मी पाहणारच. मी माफी मागून तुरुंगांतून सुटलों, पण ती सुटका माझ्या अंगीं कधीच लागली नाहीं. पोटांतला रोग सांभाळून माणसाने बाहेर वागावें; तसें माझें चाललें आहे तेव्हापासून. कटाचा खोटा आरोप माझ्यावर घातल्याने अन्याय झाला तो मला! आणि फिरून माफी मीच मागावयाची! पण प्रभाकराचा बाप तो तसा, आणि माझे वडील हे असे. म्हणजे काय? संस्थानी अधिकाऱ्यांच्या सत्तेने दिपलेले आणि राजनिष्ठेच्या खोट्या कल्पना उराशीं बाळगणारे. असो. चला आता उशीर झाला!

इतकें बोलून बन्या सहज झटक्यानें उठला. त्याबरोबर त्याचा मित्रहि उठला; आणि दोघेहि प्राकाराच्या पायऱ्या उतरून देवळाच्या महाद्वारांतून बाहेर पडले.

---

२ महाराज नवलराय

आम्ही जी गोष्ट लिहीत आहों, तिच्या वेळेच्या सुमारास नवलपूर संस्थानाचें राजकारण शिजून खदखदावयाच्या बेताला आलें होतें. जुने महाराज मृत्यु पावून कांही वर्षें झालीं. त्यांच्या पश्चात् हल्लींच्या महाराजांना दत्तक घेतल्यावर एक वर्षाच्या आंत राणीसाहेबहि वारल्या. नवे महाराज अज्ञान असल्यामुळें राजकुमार कॉलेजांत शिकत होते. अर्थात् सर्व कारभाराची मुखत्यारी दिवाण-साहेबांकडे होती. वर पोलिटिकल एजंटसाहेब सर्वसाधारण देखरेख करीत. पण दिवाणसाहेबांनी आपल्या अधिकाराचा इतका दुरुपयोग चालविला होता कीं, लोक त्रस्त होऊन नवी कारकीर्द केंव्हा सुरू होते याची वाट पाहत होते. पण नव्या राजेसाहेबांचें एकविसावें वर्ष संपून त्याबरोबर राजकुमार कॉलेजां-तील शिक्षणहि संपतांच त्यांनी परदेशचा प्रवास करण्याची परवानगी मागितली आणि चांगला तीन वर्षांचा कार्यक्रम आंखला.

तीन वर्षांनी महाराज प्रवासाहून परत आले. राजकुमार कॉलेजच्या मुख्याध्यापकाचा रिपोर्ट महाराजांचा अभ्यास, हुषारी व वर्तन या सर्वासंबंधाने, फारच स्तुतिपूर्ण होता. यामुळें सरकारने त्यांना कुलमुखत्यारी देण्याला काढली. पण फिरून त्यांनी वर कळविलें कीं, “ आपणाला थोडा कारभाराचा अनुभव मिळाल्यावर मग सोळा आणे पक्की मुखत्यारी घेऊं, तूर्त कच्ची मुखत्यारीच पुरे. मात्र उरलासुरला अधिकार मी मागेन तेंव्हा मला मिळावा अशी तजवीज व्हावी.” तेंव्हा फिरून दिवाणसाहेबांच्या नोकरीची मुदत वाढली व लोकांची निराशा झाली. बरें, “ आता तरी लग्न करणार काय ” अशी विचारणा पो. एजंटाकडून झाली. त्यालाहि महाराजांनीं कळविलें कीं, “आणखी कांही दिवस अविवाहित राहण्याचा माझा विचार आहे.” इतकेंच नव्हे तर नव्या महाराजांची राहणीसुद्धा नेहमीच्या राजे-लोकांसारखी डामडौलाची नाही असेंहि लोकांच्या प्रत्ययाला येऊं लागलें. वास्तविक या साध्या राहणीपासून लोकांना कांहीच त्रास नव्हता. पण जो राजा इतका साधा राहतो, तो वेडसर, विक्षिप्त किंवा फाजील लहरी निघून, फिरून दिवाण व जुनें कारभारीमंडळ यांचीच कारकीर्द चालू राहते कीं काय, व त्यांचे हात खंबीर होतात कीं काय अशी भीति त्यांना वाटूं लागली. लोक म्हणूं लागले कीं, “ पहा ! कुणीकडून झालें

तरीहि प्रजेचें दुर्दैव कांही संपत नाही असें दिसतें. वाईट वाईट म्हणून आणि चांगले चांगले म्हणून!"

संस्थानी प्रजेची मनःस्थिति खालसांतल्या प्रजेला कधीच बरोबर कळावयाची नाही. खालसा रियासत मोठी. पण तींत देशी अधिकारी किंवा प्रजा यांच्या वांट्याला येणाऱ्या सर्व गोष्टी मर्यादित असतात. संस्थानांत त्याच्या उलट प्रकार असतो. कल्पना करा कीं, संस्थानी राज्य हजार-पंधराशें मैल क्षेत्रफळाचें, एक-दोन लक्ष लोकसंख्येचें आणि दहा-पांच लक्ष रुपये उत्पन्नाचें, एवढेंच असलें तरी, कनिष्ठ प्रजाजनांपासून सर्वश्रेष्ठ राजसत्तेपर्यंत सर्व प्रकारचे अधिकार, वैभव व अनुभव यथाप्रमाण, संस्थानाच्या लोकांना भोगतां येतात. पिंड ब्रह्मांडन्यायाचा खरा प्रयोग हिंदुस्थानांत संस्थानी रियासत व खालसा रियासत यांच्या सान्निध्याने चांगलाच दृष्टोत्पत्तीस येतो. ब्रह्मांडांत एका टोकाला घडतें तें दुसऱ्या टोकाला कधी कळतहि नाही. पण लहानशा पिंडांतच जर ब्रह्मांडांतल्या सर्व गोष्टी घडूं लागल्या, तर त्यांचें ज्ञान पिंडांतल्या प्रत्येक कणापरमाणूला सहजच होणार!

संस्थानी राजाला सर्वच बाबतींत ईश्वराखालोखाल कर्तुमकर्तुं सत्ता असते. मनांत आलें तर तो वाटेल त्या प्रजाजनाला एकदम श्रीमंत करील; वाटेल त्या श्रीमंताला एकदम अठरा विश्वे दारिद्र्यांत लोटतील! तो वाटेल त्यावर आपली मुलगी लादून त्याला जावई करील, तर वाटेल त्याची मुलगी पळवून नेऊन लग्न लावून, स्वतः त्याचा जावई होऊन बसेल! केव्हा अन्यायी रीतीने प्रजोत्पादन व प्राणदान करील, तर केव्हा अन्यायी रीतीने प्रजाजनांचे प्राण हरण करील! कोणाहि सावकाराच्या हवेलीवर गाढवाचा नांगर फिरवील, तर बैलांचा नांगर फिरलेल्या कोणाहि शेतकऱ्याने प्राण म्हणून जतन केलेल्या जमिनीचें हरण करून त्यावर आपली हवेली उभारील! वेड्या दिवाण्यावर कृपा झाली तर त्याचा दिवाण करील, आणि दिवाणावर अवकृपा झाली तर त्याला छळून दिवाणा करून सोडतील! तात्पर्य, मुंबईच्या सट्टेबाजारांत एका दिवसांत श्रीमंत व दारिद्र्य यांची जशी अदलाबदल एकसारखी होत असते, त्याप्रमाणे संस्थानी राज्यांत प्रजाजनांच्या सुखदुःखाची अदलाबदल होत असते. ब्रह्मांडांतील घालमेल आणि या पिंडांतील घालमेल हीं एकच स्वरूपाची असते, फक्त तिचें प्रमाण लहान असतें!

अशा लहानशा राज्यांत प्रजाजनांना ज्याप्रमाणे सुख मिळावें अशी इच्छा असते, त्याप्रमाणेच ‘ राजवैभव ’ पाहावयास मिळावें अशीहि इच्छा असते हें मात्र कांही खोटें नाही. वैभव भोगणार राजाच. पण वैभव पाहणाऱ्या प्रजेला तें नुसतें पाहिल्याने आपणहि थोडेसें भोगलें असा भास होत असेल. सणावारीं राजाची थाटाने मिरवणूक निघावी; फाटका का होईना जरीपटका फडफडावा; धार्मिक उत्सवांत राजाने येऊन लोकांबरोबर भाग घ्यावा; दरबार भरून नगारे, चौघडे झडावे व शिंगें वाजावीं; फुसकेच का होईनात पण तोफांचे बार व्हावे; जुनाटच का होईनात पण बंदुकीच्या फैरी झडाव्या; बेगडीच का होईनात पण रंगीबेरंगी पोषाखांत शिपायांच्या कवायती व्हाव्या; हरिदासीच का होईनात पण आयत्या वेळीं सजविलेले चार घोडेस्वार उगीचइकडून तिकड दौडलेले दिसावे; रासवट अन्नाच्याच का होईनात पण गांवजेवणाच्या समाराधना व्हाव्या; म्हाताऱ्या कळवंतिणीचेच का होईनात पण गाण्याबजावण्याचे दरबारी जलसे व्हावे—अशी संस्थानी प्रजेची हौस असते. आणि ती लहानसान संस्थानांतून देखील भागतेहि.

पण खालसा रियासतींत तें कांहीं नाहीं. सर्व रूक्ष कारभार! अधिकारी (म्हणजे अर्थात् सर्वश्रेष्ठ अधिकारी) आधी सहसा प्रजाजनांच्या दृष्टीस पडावयाचे नाहींत. आणि पडले तरी, त्यांच्या अंगाला जुन्या चालीचें वैभव कांहीच चिकटलेलें दिसावयाचें नाहीं. खालसा राज्यकारभाराचाहि संसार आहे; पण तो सारा खरोखरीच ‘ संन्याश्याच्या संसारा’सारखा! प्रजेपुरतें तरी वैभव साहेबांच्या ‘ विभूतीं’चें म्हणजे ‘ पांढुरक्या भस्मा’चें! उलट संस्थानच्या प्रजेला सुख हवें, पण तें राजाच्या हातून मिळालेलें हवें. त्यांना राजाबद्दल आपलेपणा वाटतो तो मनोवासनेंतील संक्रामित वैभवाच्या आपलेपणामुळें वाटतो हें खरें असेल काय?

या दृष्टीने नवलपूरच्या नव्या महाराजांनी प्रजेचा फार विरस केला! राजवाड्याला अंतःपूरच नाहीं. राजवाड्यांत वाटेल तिकडे फेरी मारून येण्याला कुणालाहि प्रतिबंध नाही. आणि फेरी मारणाराला यदाकदाचित् महाराज दृष्टीस पडले तर ते सामान्य माणसापासून वेगळे ओळखून काढतां यावयाचे नाहींत. अंगांत एक साधा धुवट सदरा, डोक्याला एक साधी टोपी किंवा छोटासा फेटा. अंगावर सोनें नाही. जोड्याला कलाबतू नाहीं. तोंडांत विडा नाही. काठीला सोन्यारुप्याची विडी नाही. कोणालाहि अरेतुरे नाही. कोणी एका हाताने मुजरा

केला तर त्याला हे दोन हातांनी नमस्कार करावयाचे. कोणी दोन हात जोडून नमस्कार केला तर त्याला हे मान लववून कोपरापासून नमस्कार करावयाचे. कोणी भेट मागितली तर नकार नाही. भेटीला आलेल्याने आपणच बोलणें पुरें म्हणून उठावें! हे रस्त्याने चालले तर स्त्रियांकडे डोळे उघडून पाहावयाचेहि नाहीत! महाराजांच्या संसाराच्या एका अंगाची ही कथा. आणि लग्न नाही म्हणून दुसऱ्या अंगाबद्दल बोलावयाचेंच कारण उरलें नव्हतें. हा राजवाडा आहे कीं एखादा मठ आहे असें लोकांना चुकल्याचुकल्यासारखें वाटावयाचें! बरें, राज्यकारभारांत लोकोत्तरपणा दिसावा तर अजून मुखत्यारी कच्ची, पुरी पक्की नाहीं! तात्पर्य, नव्या महाराजांना बरें म्हणावें कीं वाईट म्हणावें या शंकेंतच प्रजाजन अजून गर्क होते.

दिवाणसाहेबांची स्थिति तंतोतंत याच्या उलट होती. ज्याला 'राजयोग' म्हणतां येईल तो सगळाच्या सगळा संस्थानाच्या यजमानावरून उठून दिवाण-साहेबांच्या अंगावर चढून बसला होता. ते शरीराने उंच व धिप्पाड होते. वय पंचावन्न वर्षांचेंच असतांहि डोक्याचे व तोंडावरचे सर्व केस पिकलेले होते, पण रोजच्या रोज काळा कलप लावून ते तरतरीत तारुण्याचा आभास उत्पन्न करीत. मिशा मोठ्या व पीळदार असून त्यांनी गालावर कल्ले राखले होते व मानेवर त्यांचा संजाप लोळलेला दिसे. रोज दाढीची हजामत, सुगंधी तेल लावून स्नान, व कपाळावर अधेलीयेवढा केशरी गंधाचा टिळा, कानांत जुन्या चालीची टपोऱ्या दोन मोत्यांची भिगबाळी, डोळ्यांना सोनेरी घराचा चष्मा, सोनेरी सांखळीने खिशांत अडकवलेला! डोक्याला झुळमुळ्यांची लाल रेशमी पगडी, डोळ्यांत सुरमा, कानाच्या पाळींत अत्तराचा फाया, तोंडांत लालभडक विडा, अंगांत रेशमी लांब कोट, वरून बाजीरावकांठी रेशमी उपरणें, हातांत सोनेरी मुठीची काठी, मनगटांत सोनेरी रिस्टवॉच, बोटांत हिऱ्याची आंगठी, पायांत करकरीत हिरव्या रंगाचा दिल्लीशाही चढाव! तात्पर्य, महाराष्ट्रांतील जुन्या खानदानी संस्थानी पद्धतीचें जें जें म्हणून बाह्यवैभव मनाने कल्पितां येईल तें सर्व दिवाणसाहेबांच्या अंगावर दिसून पडे. वैभवांतील एकच गोष्ट आणखी सांगण्याची उरली. ती म्हणजे जिभेवरील अभद्र खांडगाळी शिव्या!

महाराज नवलराय यांना मिळणारी मुखत्यारी कच्ची होती. तरी थाट झाला तो बराचसा पक्क्या मुखत्यारीसारखाच झाला. कारण मुखत्यारी कच्ची असली

तरी राज्यारोहण पक्केंच होतें; आणि नाही नाही म्हटलें तरी राज्यारोहणाला समारंभाचें स्वरूप आल्याशिवाय कसें भागेल? पण या समारंभासंबंधाची हौस म्हणून असली तरी ती स्वतः राजाची नसून इतरेजनांची होती.

या इतरेजनांत पोलिटिकल एजंटसाहेबांच्या मडमसाहेब मिसेस् मॅक्स्विनी या पहिल्या होत्या. साहेबमजकूर कलेक्टराच्या दर्जाचे. आजपर्यंत त्यांना येऊन-जाऊन संस्थान असें हेंच काय तें वहिवाटीला मिळालें होतें हाताखाली. पूर्वी ते नवलपूरला भेट देत, तेव्हां दिवाणसाहेब अर्थातच त्यांचा सत्कार व बडेजाव करीत. कारण दिवाणसाहेबांना तरी विशेष रीतीनें मिरवायला, ख्यालीखुशाली करावयाला, तोच एक उजळ माथ्याचा प्रसंग असे. पण जोंपर्यंत घरचा मालक राजा गादीवर नाही तोंपर्यंत दिवाणसाहेबांनी एजंटसाहेबांचा सत्कार केला तरी, तो धर्मशाळेंतील रखवालदाराने द्रव्यलोभानें एखाद्या मातबर पाहुण्याचा करावा इतकीच त्याची किंमत! शिवाय एजंटसाहेब हे लवकरच जिल्हा व पोलिटिकल एजंटाचे अधिकार सोडून परजिल्ह्यांत बदलून जावयाचे असल्यामुळे, अधिकारदानाचें, राज्यारोहणाचें, शुभ आनंददायक परोपकाराचें काम आपल्या नवऱ्याच्या हातून व्हावें अशी इच्छा मडमसाहेबांना सहजच होती! असल्या समारंभांत कलेक्टरीचा रूक्षपणा सहज सारा झाडून निघावयाचा! खालसा मुलुखांतल्या अधिकाऱ्यांना बसायला हत्ती हवासा वाटला तर तो संस्थानांत मिळावयाचा; आणि शिकारीचा थाटहि संस्थानांतच चांगला होतो.

मडमसाहेबांची दृष्टीहि राजवाड्यांतल्या चारदोन देखण्या वस्तूंवर पूर्वीच्या एका भेटींत पडली होती. त्यांच्याविषयींचें गुणवर्णन त्यांजकडून दिवाणसाहेबांच्या पुढे करून झालें होतें पण फुकट गेलें होतें. कारण त्या वस्तु आपल्या हातानें उचलून नजर करण्याला दिवाणसाहेबांना अधिकार नव्हता. पण स्वत; संस्थानिकच मुखत्यार झाले म्हणजे कच्च्या मुखत्यारींतहि त्यांना राजवाड्यांतली वस्तु आपल्या हातानें उचलून देण्याचा अधिकार पूर्णपणें असतो. अर्थात् आपण व आपला नवरा राज्यारोहणाकरिता, म्हणजे संस्थानिकांवर उपकार करण्याकरिता, गेलों म्हणजे राजेसाहेबांनाहि कांही प्रत्युपकार करण्याची बुद्धि होणारच! आणि त्यांतल्या त्यांत कोणत्या देखण्या वस्तूंविषयी मडमसाहेबांनी गुणग्रहणबुद्धि प्रकट केली होती हें दिवाणसाहेबांकडून यजमानांना कळलें असलें, म्हणजे मग "देणग्या दिल्या" असें न म्हणतांहि त्या

वस्तु प्रत्यक्ष देण्याची क्रिया करण्याचे राजमार्ग मोकळे असतातच. एका भेटींत मडमसाहेबांना दरबारच्या जवाहिरखान्यांतली मोत्यांची एक एकदाणी फारच आवडलेली दिसली होती. दुसऱ्या भेटींत एका हस्तीदंती चवरीची त्यांनी स्तुति केली होती तिसऱ्या भेटींत जडिताचें काम केलेली एक अत्तरदाणी पाहून त्यांनीं तिच्या कारागिरीवर स्तुतिवर्षाव केलेला दिवाणसाहेबांनी हेरून ठेवला होता. तात्पर्य, आपले पतिराज बदलून जाण्यापूर्वी राज्यारोहण-समारंभ व्हावा अशी मडमसाहेबांची तर फारच इच्छा होती.

समारंभावर होणारा खर्च व कार्यक्रम ठरविण्याचा अधिकार एजंटसाहेबांचा. त्यांत यजमानांना कोण विचारतो? कारण मुखत्यारी मिळण्यापूर्वीची ती गोष्ट. पण इतर कार्यक्रमांबरोबर देणग्यांची—देकारांची यादी दिवाणसाहेबांना यजमानापुढेच ठेवावी लागली. कारण तो देकार त्यांच्या मालकीच्या वस्तूंचा व त्यांच्याच हातून व्हावयाचा. यजमानसाहेबांनी प्रत्येक बाबतींत आपलें मत सांगितलें. पण अधिकार गाजविण्याचा तो पहिलाच प्रसंग म्हणून बेतानें घ्यावें याकरिता कोणत्याहि गोष्टींत फारसा आग्रह धरला नाहीं.

त्यांनी मुखत्यारीचा खलिता वाचण्याचा दरबारचा समारंभ कार्यक्रमांत राहूं दिला. पण त्यांतील नायकिणीचें गाणें रद्द करून पुरुष गवयाचें गाणें ठेवलें. या बाबतींत दिवाणसाहेबांनी जुना दाखला सांगितला; व आणखी असेंहि सुचविलें कीं, असले नाच एजंटसाहेब व मडमसाहेब यांना फार आवडतात. त्यावर महाराज म्हणाले, "न आवडतील तर काल झालें? बाजारबसव्यांचा, निदान वंशपरंपरा खानदानीने विश्वयोषितांचा धंदा करणारणींचा, राजदरबारी वर्ग हिंदुस्थानांत आहे हें आयतें विलायतेंत सांगून आम्हां राजेरजवाड्यांची निंदा खुसखुशित करावयाला साहेब लोकांना मिळतें, ती ते का सोडतील? मडमसाहेबांना म्हणा कीं, "खुद्द राजेसाहेबांबरोबर, म्हणजे माझ्याबरोबर, जर बॉलांतल्याप्रमाणे नाचायची आपली तयारी असली तर ती व्यवस्था करवितों. विलायतेंत जाऊन सभ्य स्त्रियांशीं कसें वागतात हें मी शिकून आलों आहें."

तसेंच दरबारानंतर हत्तीवरची मिरवणूकहि महाराजांनी रद्द केली व थट्टेनें म्हणाले, "पुढें माझें लग्न होईल तेव्हां माझ्या वरातीचीच मिरवणूक आपण अधिक थाटानें काढूं. आज माझ्या मिरवणुकींत एजंटसाहेबांना अंबारींत बरोबर घेऊन बसायला मडमसाहेब आहेत. मी पोरकाच कीं नाही बिचारा त्या बाबतींत! मला कोण आहे?" महाराजांनी हा भावी लग्न-वरातीचा

हवाला इतक्या थट्टेने दिला व त्यांत निरपेक्षताहि इतकी दिसून आली कीं, एखाद्याला वाटावें हा तरुण अविवाहित राजा बोलत नसून एखादा संन्याशीच बोलतो आहे कीं काय! दरबारानंतर दारूकाम निघालें त्याविषयीं महाराज म्हणाले, "तोच पैसा जर गोरगरिबांना अन्नदान करण्यावर खर्च कराल तर मला अधिक आवडेल!" यांत एजंटसाहेबांच्या शिफारशीचा प्रश्नच नव्हता.

नंतर देणग्या देकाराचा प्रश्न निघाला, तेव्हां दिवाणसाहेबांनी इकडे तिकडे पहात कानोसा घेतला; आणि तोंडाला पदर लावल्यासारखें करून ते म्हणाले, "तुमच्या यजमानांना मुखत्यारी देण्याचें काम दैवाने लाभलें म्हणून आम्ही दोघे स्वतःला धन्य मानतों असें मडमसाहेब मजजवळ तीन-तीनदां म्हणाल्या!" त्यावर महाराज म्हणाले, "त्यांना असें वाटणें हा त्यांचा थोरपणा आहे. मी त्यांचे अवश्य आभार मानीन. शिवाय प्रत्येक सत्कृत्य ईश्वराघरीं रुजू असतेंच. तेथेहि त्यांच्या नांवाने तें जमा होईलच." पण हा पोकळ परलोकचा हवाला न पटून दिवाणसाहेब अगदी म्हणणार होते कीं, "तरीहि अभिनंदनाची खूण म्हणून त्यांना कांही देणगी द्यावयाची ठरली तर नोंदून ठेवीन आज्ञेप्रमाणे." हे शब्द त्यांच्या जिभेवर आले, पण तसा सरळ सल्ला न देतां दिवाणसाहेब म्हणाले, "मडमसाहेबांनी पूर्वी एक-दोन वेळा सर्व राजवाडा हिंडून पाहिला. तेव्हा जवाहिरखान्यांत त्यांनी एक मोत्यांची एकदाणी आरशापुढे उभ्या राहून गळ्यांत घालून पाहिली; आणि एक हस्तिदंती चवरी आणि रत्नजडित अत्तरदाणी यांच्या कलाकौशल्याची फार तारीफ केली असें मला स्पष्ट दिसलें."

नव.— त्या वस्तूंच्या कारागिरांची त्यांनी फारच वाखाणणी केली म्हणतां?

दिवाण.— होय, सरकार.

नव.— मग असें करा. समारंभाला मडमसाहेब आल्या म्हणजे त्या त्या कारागिरांच्या नांवचें एकेक चांगलेसें सर्टिफिकेट लिहून घ्या त्यांच्या खुद्द हातचें. म्हणजे तें आपण पाठवूं त्या त्या कारागिरांना आपल्या खर्चानें. होईल त्या बिच्याऱ्यांचा भाग्योदय त्या शिफारसीने. माझ्याबरोबर त्यांचेंहि राज्यारोहणच!

दिवाण.— पण गुणवर्णन करतांना त्यांनी एकदाणी गळ्यांत घालून आरशांत पाहून हास्य केलें होतें. चवरीने वारा घेऊन "पलंगावर पडल्या पडल्या या चवरीने माशा चांगल्या वारल्या जातील नव्हे का दिवाणसाहेब?" असें

त्या म्हणाल्या होत्या. आणि ही अत्तरदाणी टेबलावर ठेवण्यासारखी वस्तु आहे असेंहि त्या म्हणाल्या होत्या."

नव.— अस्सें का? बरें आहे! या तीनहि वस्तूंची योग्य किंमत किती होईल असें तुम्हांला वाटतें, दिवाणसाहेब?

दिवाण. — फार कांही नाही, पण होईल सुमारें दहा हजार.

नव.— इतकीच? मग फार थोडी म्हणावयाची?

दिवाणसाहेबांना वाटलें कीं, आतां पुढें महाराज बहुधा म्हणतील कीं, "मग घालून द्या तर या तीन वस्तु देकारांच्या यादींत." पण महाराज तसें न म्हणतां, म्हणाले, "पण मडमसाहेब या वस्तु घ्यायला तयार आहेत कीं नाही, याची केली आहे का कांही चौकशी तुम्हीं?"

दिवाण.— हो! त्या नाही-होय म्हणत म्हणत घेतील की!

नव. —"नाही-होय म्हणण्याचें कारण ह्यांना त्या वस्तूंची किंमत भारी वाटत असेल हेंच की नाही? मग आपण तरी त्या विकायला खुषी नाही असें कां म्हणूं नये? जुलूम नको त्यांच्यावर त्या विकत घेण्याचा!

दिवाण.— मी किंमत घेऊन त्या वस्तु विकत द्यावयाच्या अशा अर्थानें नाही बोललों, महाराज!

नव.–मग कोणत्या अर्थानें तें सरळच सांगाना, दिवाणसाहेब! गूढ कशाला?

दिवाण.— मला वाटलें, कीं साहेब आपल्याला गादी देऊन हातांत मुखत्यारीचा खलिता देणार, आणि आपलें अभिनंदनहि करणार! तेव्हा गोड बोलणारांचें तोंडहि उलट गोड करावें अशी रीत आहे!

नव.— पण आपली उत्तम मिठाई फार गोड म्हणूनच युरोपिअन लोकांना ती आवडत नाही म्हणतात! हें उत्तर ऐकून दिवाणसाहेब फिरून स्तब्ध झाले. महाराज नवलराय म्हणाले, "का हो, असे गप्प कां? तोंड गोड करावें म्हटलेंत, म्हणून मिठाई सुचविली!"

दिवाण.— तें लाक्षणिक अर्थानें म्हटलें थोडेसें, महाराज!

नव.— पण मग तेवढेंहि लाक्षणिक बोलण्याचें सोडून अगदी स्पष्टच का बोलाना? आपण व्यवहार बोलतों आहों, काव्यांतले अर्थालंकार हुडकून काढण्याचे खंडे का लावीत आहों एकमेकांवर?"

दिवाण.— छेः छेः तसें कसें होईल? नाही मीं म्हटलें, या तीन वस्तु साहेबांच्या देकारांत घालाव्या समारंभानिमित्त.

नव.— अस्सं, आतां आलें माझ्या लक्षांत ! पण एजंटसाहेब पडले सरकारी नोकर ! त्यांना देणग्या घेण्याची मनाई असते हें नाही का तुम्हांला माहीत दिवाणसाहेब !

दिवाण.— होय तें माहीत आहे. म्हणूनच त्या वस्तु मडमसाहेबांना द्याव्या. वस्तुहि अशाच आहेत कीं, त्या बायकांना द्यावयालाच शोभतील !

नव.— पण एजंटसाहेब सरकारी नोकर, तशाच मडमसाहेब स्वाभिमानी, संभावित इंग्रज स्त्री ! त्या कशा बरें घेतील अशा देणग्या उघड आमच्याकडून ? शिवाय तुम्हीं किंमत दहा हजारहि कमी म्हटली, पण ती काय थोडी आहे ?

दिवाण.— पण अशा देणग्या, उघड देणग्या म्हणून द्यायच्याच नसतात ! त्या देण्याचे मार्ग आहेत. त्या मार्गानें दिल्या म्हणजे काम होतें.

नव.— मग सांगा पाहूं या देणग्या देण्याचें तुम्हीं कसें काय योजिलें आहे मनांत तें ?

दिवाण.— तें अगदीं सोपें काम आहे ! मडमसाहेबांना मोत्यांची जी एकदाणी माळ द्यायची, ती त्यांच्या गळ्यांत घालायच्या फुलांच्या हारांत बसवावयाची. इकडचा हार तिकडे होऊं नये म्हणून मडमसाहेबांच्या हाराला तांबडी फीत रिबन गांठवावयाची, लहान युरोपियन मुली केसांना बांधतात तशी. हार घालायचें काम कुणाकडे आलें तरी ती खूणच ! मडमसाहेब बंगल्यावर गेल्यावर हटकून हार उलगडून घेतील अशी सूचना मी त्यांना देईन ! आणि मोत्यांची माळ फुलांच्या माळेबरोबर सहज गेली ही चूक त्यांच्या लक्षांत येईल.

नव.— आणि आमच्या चुकीची ते क्षमा करतील ! चूक आमच्या नजरेला आणून आमचा अपमान करणार नाहीत. चूक आमच्या गळ्यांत न बांधतां आपल्याच गळ्यांत बांधून घेतील म्हणतां ? बरें चवरीचें काय ?

दिवाण.— घोड्याच्या गाडींत साहेब मंडळी बसली म्हणजे हस्तिदंती चवरी त्यांचा पट्टेवाला मागे उभा राहील त्याच्या हातांत डोक्यावर वारायला द्यायची आणि त्याला हळूच कानांत सांगायचें कीं, चवरी बंगल्यावरच रहायची आहे, ती ठेव, परत पाठवूं नको.

नव.— बरें, जडावाच्या अत्तरदाणीचें कसें ?

दिवाण.— साहेब लोक अत्तर अंगाला लावूं देत नाहीत! तेव्हां एका रुप्याच्या तबकांत–अर्थात् लहानशा तबकांत–एक रुप्याची गुलाबदाणी आणि ही अत्तरदाणी पुढे केली म्हणजे मडमसाहेब तबकाला हात लावतील. मग तेंच तबक त्यांच्याकडे पाठवून द्यावयाचें.

नव.-- आणि तबकासकटच त्यांनी ते जिन्नस ठेवून घ्यावयाचे असेंच ना? दिवाणसाहेब, अत्तरदाणी तीन हजारांची असली तरी ती घालून देण्याचें रुप्याचें तबक सांगतांना तुम्ही मुद्दाम ‘ अर्थात् लहानशा तबकांत’ म्हटलेंत हें संस्थानाच्या हिताच्या दृष्टीचें काटकसरीचें तुमचें धोरण माझ्या लक्षांत आलें नाही असें नका समजूं! असो, तुमच्या या काटकसरी धोरणाचा सल्ला मलाहि शिकला पाहिजे. म्हणून सांगतों कीं, हें देकाराचें कलमच अजिबात वगळून टाका पाहूं समारंभाच्या यादींतून!

दिवाणसाहेबांना आपले सारे श्रम, सारी मुत्सद्देगिरी, सारें शहाणपण, आणि सारे मनोरथ यांचा व्यूह ढासळल्यासारखा होऊन पाण्यांत ढेकूळ विरघळावें असें झालें. आता मडमसाहेबांना काय वाटेल, याचा बाऊ त्यांच्या डोळ्यांपुढे मूर्तिमंत उभा राहिला. पण करतात काय?

---

३ महाराजांचा मित्रलाभ

ठरल्याप्रमाणे राज्यारोहण-समारंभ पार तर पडला. पण वर दर्शविलेल्या पद्धतीनें! झाला समारंभ तो संस्थानाचा, संस्थानच्या गादीचा, स्वतःच्या व्यक्तीचा नव्हे, अशी एक प्रकारची उदासीन वृत्ति महाराजांनी ठेविली होती.

दरबारांत मुखत्यारीचा खलिता वाचून दाखवून एजंटसाहेबांनी नेहमी-प्रमाणे भाषण केलें. त्याला महाराजांनी उत्तर दिलें तें मात्र नेहमी राजेलोक भाषण करतात तसें नव्हतें. त्यांनी सरकारचे म्हणून आभार मानले ते एका शब्दांत, व अगदी औपचारिक दिसावे असे! एजंटसाहेबांचा व्यक्तिशः उल्लेख त्यांनी भाषणांत मुळीच केला नाहीं. दोन राजांच्या कारकीर्दीच्या दरम्यान दिवाणसाहेबांनी कारभार केला त्यासंबंधानें आभारप्रदर्शक असें तर कांहीच बोलले

नाहीत; उलट सर्वांना सावधगिरीची सूचना द्यावी त्याप्रमाणे असें म्हणाले--"चार्ज देतां-घेतांना खजिन्याची रक्कम मोजून देण्याघेण्याचें काम थोडें व सोपें असतें; आणि तें कारकुनांकडूनहि करवून घेतां येतें. पण कारभार व न्यायदान यांची गोष्ट तशी नाही. म्हणून मीं गेल्या बारा वर्षांतल्या कारभाराची चौकशी सुरू केली आहे ती पुरी करून, दप्तरें तपासून, लोकांच्या तक्रारी, कैफियती काय असतील त्या ऐकून घेऊन, नंतरच मी दिवाणसाहेबांच्याकडून चार्ज घेतला असें समजेन आणि म्हणेन, याकरिताच मी आज फक्त कची मुखत्यारी स्वीकारतों. तसेंच मी पक्की मुखत्यारी हातीं घेईपर्यंत दिवाणसाहेब कामावरच राहतील, व मला मदत करतील. अशा प्रसंगीं देणग्या देण्याची, तुरुंगांतील कैदी बंधमुक्त करण्याची मामुली रीत आहे हें मीहि जाणतों. पण मीं मनांत योजिल्याप्रमाणे जुन्या कारभाराची निरनिराळ्या बाजूंनी छाननी झाली, म्हणजे कोणाचें काय नुकसान झालें, कोणाला काय अन्याय झाला हें समजलें म्हणजे मला देतां येतील त्याच पैशाच्या देणग्या खऱ्या, व मग मी कैदी सोडीन किंवा शिक्षा कमी करीन त्याच न्यायाच्या देणग्या खऱ्या! मी आज चौकशीशिवाय कुणाला बरें म्हणूं इच्छित नाही, व कुणाला वाईट म्हणण्याचेंहि धाडस करीत नाही. मनुष्यमात्र हा चुकीला पात्र आहे असें मी माझ्यासकट सर्वांबद्दलच म्हणतों. पण राज्याधिकाराला खरोखर 'ईश्वरी' म्हणण्याइतकें गंभीर स्वरूप आहे असा माझा दृढ विश्वास आहे. म्हणून मीं वरवर सजविलेले कागदी घोडे नाचवूं इच्छीत नाही इतकेंच काय तें! आणि याबद्दल, वर ब्रिटिश सरकारापासून खाली लहानांत लहान अशा माझ्या नोकरांपर्यंत, व कनिष्ठांतल्या कनिष्ठ प्रजाजनापर्यंत, सर्वजण मला क्षमा करतील अशी आशा आहे."

रात्रीं मेजवानी झाली, तेव्हा एजंटसाहेबांनी महाराजांच्या भाषणाची स्तुति केली. पण त्याच रात्रीं, वरिष्ठ सरकारकडे जें नेहमी खासगी गुप्त पत्र एजंट-लोकांकडून जावयाचें असतें, तें गेलें त्यांत त्यांनी असें लिहिलें--"हा नवल-पूरचा संस्थानिक मला तरी मोठा नवलाचा वाटतो. त्याच्या बरेवाईटपणाची निश्चित दिशा आज नक्की कळत नाही; पण सरकाराला त्याच्या कारभारावर बारीक नजर ठेवून मधून मधून निमताना घेणें जरूर आहे. पौर्वात्य लोकांच्या पुराणांतून व दंतकथांतून अशा गोष्टी ऐकावयाला येतात कीं, एका देशचा जुना राजा मेला; गादीला वारस उरला नाही. तेव्हा हत्तिणीच्या सोंडेंत प्रधान-

मंडळाने माळ दिली व तिला बाहेर पिटाळली. तेव्हा तिला एक प्रकारची दिव्य स्फूर्तिच होऊन, नगराच्या वेशीबाहेरून रगटीं पांघरलेला कोणी एक फकीर येत होता त्याच्या गळ्यांत तिने ती माळ घातली; व प्रधानमंडळाने त्या फकिराला गादीवर बसविलें. पुराणें हा इतिहास नसल्यामुळे या फकिराने राजा या नात्याने पुढे राज्य कसें केलें हें तीं पुराणें लिहीत नाहीत! पण मीं सांगितला इतका चुटका पुरे. नवलपूरचे हल्लीचे राजे उत्तम शिक्षण घेतलेले आहेत. बहुश्रुत दिसतात. मनहि सुसंस्कृत दिसतें. हलक्या किंवा दिखाऊ गोष्टींचा तिरस्कार करतात असा भास होतो. गरीब घराण्यांतून गरीबींतून दत्तक घेतले गेल्यामुळे गर्भ-श्रीमंतीचा रुबाब जसा त्यांचे अंगीं नाही, तसेच गर्भश्रीमंतींत चिकटणारे दुर्गुणहि त्यांच्या अंगीं दिसत नाहीत. सांगण्यासारखी विशेष गोष्ट म्हणजे ही कीं, ते आज लग्न करण्याच्या वयाचे सहज होऊन गेले, तरी लग्नाची गोष्ट निघाल्यास तिला सरळ होकार किंवा रुकार देत नाहीत किंवा सरळ नकारहि देत नाहीत. अर्थात् असा तरुण अविवाहित राजा गादीवर असणें हें नवलपूरच्या उपवर कुमारिकांचें सुदैव फळाला आलें म्हणावें, कीं राज्यांतील एकंदर स्त्रीवर्गाचें दुर्दैव ओढवलें म्हणावें, हें कालांतरानेच कळून येणार आहे! तूर्त सरकाराने यांच्या कारभारासंबंधीं तटस्थ वृत्तीचें धोरण ठेवावें हेंच मला बरें दिसतें."

मडमसाहेबांच्या वृत्तींत मात्र हा तटस्थपणाहि नव्हता. यजमान अविवाहित यामुळे राजवाड्यांत त्यांचा सत्कार अखेर पुरुषांनीच करण्याची पाळी आली होती. आणि युरोपियन स्त्रियांना पुरुषांत मिसळण्याची, बोलण्याचालण्याची संवय असली तरी, कालिदासाने शाकुंतलांत म्हटल्याप्रमाणे "सर्वः संगधेषु विश्वसति" हेंच खरें. इंग्रजी येत असलेली संस्थानी यजमानीण भेटली तर युरोपियन स्त्रियांचें रहस्य चांगलेंच जमतें. पण अशिक्षित यजमानिणीशीं गांठ पडली तर निदान स्वतःची प्रौढी मिरविण्याचें तरी सुख त्यांना लाभतें. देशी यजमानिणीच्या त्या कोपरापर्यंत भरलेल्या बांगड्या; खाली एका दिवसाकरिता पायांत चढविलेले म्हणून न झेपणारे बूट-स्टॉकिंग; तो कुंकवाचा मोठा टिळा; नाकांतली ती मोत्यांची वेसण; न वापरतां येणारे, पण कंबरेला उगीच खोवलेले उंची रंगीबेरंगी हातरुमाल; इंग्रजी येत नसतां विनाकारण एखादा शब्द कळलासा बहाणा करणारें तें अज्ञानाचें भोळें खुळें हास्य; मध्यस्थ दुभाष्या इकडचें भाषांतर तिकडे करून सांगत असतांना चाललेली निरर्थक मानडोल

व हुंकार; टेबलावर बसून चहा घेण्याची वेळ आली असतां धर्मभ्रष्टतेच्या भीतीनें करूं कीं न करूं या भ्रमानें उडालेला गोंधळ;–असलें करमणुकीचें साधन मिळालें, तरी राजवाड्यांत जाणाऱ्या युरोपियन मडमा खूष असतात. कारण मौज तरी पाहावयाला मिळते! पण या मडमसाहेबांना नवलपुरांत हेंहि नाही व तेंहि नाही असें झालें. यामुळे त्यांची महाराज नवलराय यांजवर स्वाभाविक नाखुषी होतीच ती वाढली. आणि दुसरे दिवशीं जेव्हा मोकळ्या रिकाम्या हातांनी मोटारींत बसून परत निघण्याची वेळ आली, तेव्हा तर महाराजांशीं त्यांनी नुसता ओझरता 'शेकहॅन्ड' तरी केला, पण दिवाणसाहेबांकरिता हातहि पुढे केला नाही. आणि त्यांचेकडे रागारागानें पाहत त्या चालत्या झाल्या!

राजधानीच्या लोकांचीहि अशीच निराशा झाली! त्यांच्या मनांत दरबाराची शिळी कुरंवडी होईल! झाला असा समारंभ थोडाच. पण तोहि आणखी कांही दिवस परोपरीनें साजरा करीत बसावें अशी इच्छा त्यांची होती. भात शिळा असला तरी फोडणी घालून तो स्वादिष्ट करता येतो. तसे प्रकार समारंभाचे कांही व्हावे असें त्यांना वाटे. कोणा दरबारी सल्लागारांना राजघराण्यांतल्या कुलाचाराची आठवण झाली. कारण गोंधळाच्या निमित्तानें मुरळ्या नाचवितां येतात. आणि पोवाडे संपले म्हणजे गोड चालीच्या लावण्या म्हणवून घेतां येतात. कोणाला कीर्तनसप्ताह सुचला. कारण ऋणानुबंधी हरिदासाला बिदागी मिळवून देतांना मध्यस्थांचाहि हात थोडाबहुत ओला होऊं शकतो. तसेंच कोणी कुस्त्यांच्या फडाची दंगल सुचविली. पण महाराजांनी सर्व गोष्टींना एकसारखा नकारच दिला. वरती असा हुकूमहि सोडला कीं, "मुखत्यारीच्या समारंभाच्या खाणाखुणांपैकीं एकूणएक पुढच्या चोवीस तासांत नाहीशा झाल्या पाहिजेत!" त्याप्रमाणें अंमलबजावणी होऊन दोन दिवसांत शहराला अगदी मामुली स्वरूप आलें. कित्येकांना असें वाटत होतें कीं, पहिल्या समारंभानंतर लगेच दोन हातांचे चार हात करण्याची कांही योजना असेल. आणि तसें झालें तर समारंभाकरिता उभारलेल्या कमानी व तोरणें हीं आयतींच त्याहि समारंभाला उपयोगी पडतील. पण राजेसाहेबांनी तीहि आशा ठेवली नाही!

कच्च्या मुखत्यारीचा समारंभ झाल्यावर कांही दिवसांनी संध्याकाळीं पांच वाजता एक सरकारी मोटार राजवाड्याच्या दाराशीं येऊन उभी राहिली. तिच्यांतून देशी पद्धतीचा प्रवासी पोषाख केलेला एक तरुण गृहस्थ हातांत काठी

व छोटी बॅग घेऊन खाली उतरला. लगेच एक पहारेवाला हात जोडून त्याला म्हणाला, "महाराजसाहेब वर आपलीच वाट पाहत बसले आहेत मगाचपासून! सामानसुमानाची काळजी आपण कांही एक करूं नका. तें सारें मी आपल्या राहण्याच्या खोलींत व्यवस्थित नेऊन ठेवतों."

पाहुणा व पहारेकरी जिना चढून जातात तों स्वतः महाराज नवलराय हे तेथे उभेच होते. पहारेवाल्याने मुजरा करतांच महाराजांनी त्याला "जा खालीं. यांच्या सामानाची व्यवस्था नीट कर. आणि वर आमचा चहा पाठवून द्यायला सांग" असें म्हणून लावून दिलें; पाहुण्याचा हात धरून त्याला आपल्या दिवाणखान्यांत नेलें; त्याला एकदम कडकडून आलिंगन दिलें; आणि ते सद्गदित कंठाने त्याला म्हणाले, "मनोहर, किती वर्षांनी भेटलास बरें!"

मनो.— झालीं की सुमारें तीन वर्षे.

नव.— माझ्या मुखत्यारीच्या समारंभाला येशील म्हणून किती तरी वाट पाहिली. आणि अखेर आला नाहीस तेव्हा किती वाईट वाटलें म्हणून सांगूं!

मनो.— तें सांगितल्याशिवाय मला कळत का नाही! मलाहि उलट तसेंच वाईट वाटलें. पण करणार काय? तो समारंभ पाहून डोळ्यांचें पारणें फेडायचें माझ्या नशिबांत नसलें, तर मी तरी कसा वेळेवर येणार? पण असो. आता त्या वाईट वाटण्याचें आपण दोघे मिळून चांगलें उट्टें काढूं! यापुढे मुखत्यारीचा नसला तरी इतर अनेक समारंभ होणारच. यजमानसाहेबांचें वैभव आहे! माझे डोळे आहेत! पाहून घेऊं. मी नेहमी नवलपुरासच नसलों तरी जवळच आहे. फार तर एका रात्रीचा प्रवास!

नव.— काय म्हटलेंस? माझें वैभव आणि तुझे डोळे? परदेशीं जाऊन हेंच शहाणपण शिकून आलास वाटतें! तूं माझ्या या समारंभांत मजजवळ नव्हतास त्याचें मला वाईट वाटलें म्हटलें, तें काय माझें वैभव पहाण्याला तुझे दोन डोळे कमी पडले म्हणून कीं काय? माझी ही तूं चांगलीच परीक्षा केली म्हणायची! पण तें असो. मी कोणत्याहि दिखाऊ वैभवाचा कितपत भोक्ता आहें हें वास्तविक तुला माहीतच आहे आणि फाजील दिखाऊ प्रकार, मुखत्यारीच्या समारंभांतूनहि काढून टाकून, मीं शेकडो लोकांचा कसा विरस केला हें तुला कुठे माहीत आहे? मुखत्यारीच्या दिवसापर्यंत मी परावलंबी होतों. म्हणून मी नाही नाही म्हणत असतां, समारंभांत माझ्या अंगावर थोडेंसें वैभव चढलें तें पोलिटिकल

एजंटसाहेबांच्या हुकुमावरून. पण तें आता फिरून कुणाला यापुढे दिसणार नाही हें खास. तुझ्याहि डोळ्यांना गैरहजेरीबद्दल तीच शिक्षा ! शिवाय माझें वैभव पाहायला तुला मिळो वा न मिळो; पण यापुढे एका रात्रीच्या प्रवासाचीहि दगदग तुला उरूं न देण्याचा मी निश्चय केला आहे.

मनो.— वाः ! म्हणजे मला पुनः नवलपूरला यायचें केव्हा आमंत्रणच देणार नाही वाटतें आपण, राजेश्री ?

नव.— तसें नव्हे रे. तर तुला यापुढे या नवलपुरांत माझ्याजवळच नेहमी ठेवून घेईन. मग प्रवास कशाला ? माझें वैभव पाहण्याच्या निराशेचें दुःख भोगीत तुला यापुढे या शहरांतच सर्व आयुष्याचा काळ कंठावा लागणार !

मनो.— म्हणजे याचा अर्थ मी नाही समजलों !

नव.— कृति घडो म्हणजे झालें. अर्थ कळून काय करायचें आहे ?

मनो.— तुमच्या मुखत्यारी-अखत्यारीचा जुलूम करायला तुम्हांला एरवी प्रजा आता काय थोडी लाभली आहे, म्हणून माझ्यावर असा हा जुलूम करणार ?

नव.— वाः ! प्रेमाच्या माणसांवरच जुलूम करण्यात गोडी असते. प्रेमाचीं माणसेंच जुलूम सोसून घेतात. इतर त्याचा गवगवा करतात !

मनो.— पण हा जुलूम सोसून इथे राहून मी काय करणार ?

नव.— आजवर तूं मिळविलेल्या विद्येचा, विशेषतः व्यावहारिक शहाणपणाचा अन् अनुभवाचा फायदा मला आणि माझ्या प्रजेला करून होणार, दुसरें काय ?

मनो.— तो कोणत्या नात्याने बुवा ?

नव.— माझा प्रायव्हेट सेक्रेटरी म्हणून !

मनो.— म्हणजे संस्थानी दरबारांतील सगळ्या कामांत अवघड असें काम तुम्ही मला सांगणार ?

नव.— सगळ्या कामांत हें काम अवघड तें कसें ?

मनो.— तें असें. लोकांनी मनांत समजावें कीं, आपल्या राजाच्या हातून जें जें कांही वाईट काम झालें, त्याचा सल्ला प्रायव्हेट सेक्रेटरीने दिला ! आणि इकडे त्याने जीव तोडून कितीहि चांगला सल्ला दिला, तरी राजाने तो ऐकूं नये !

नव.— लहानपणीं आपण शाळेंत खेळगडी असतांना माझ्या हातून होणाऱ्या सर्व अपराधांचा दोष तूं आपल्यावर घेत होतास, तसेंच आता या कामांतहि कर म्हणजे झालें! तूं लहानाचा मोठा झालास त्याचबरोबर माझ्यावरचें तुझें बंधुप्रेम आणि स्वभावाचा उदारपणा हींहि मोठीं झालीं असतीलच, वाढलीं असतीलच!

मनो.— आणि तुम्ही लहानाचे मोठे झालां त्याबरोबर खोड्या आणि अपराध करण्याचा तुमचा पराक्रमहि वाढला असें मी समजावयाचें कीं काय? आणि तुम्हांला तसें म्हणावयाचें आहे काय?"

महाराज हंसून म्हणाले, "अलबत! राजा व्हावयाचें तें मग एरवी कशाला? आपल्या लहरींची हौस पुरवून घ्यायची तर अशी सोन्यासारखी जागा आणि संधि एरवी कोठे कशी लाभणार?"

मनोहर आठवलेसें करून निःश्वास टाकून म्हणाला, "दिखाऊ वैभवाची हौस तुम्हांला नाही तशीच ती मलाहि नाही हें तुम्हांला ठाऊकच आहे. पण आज जर एक माणूस जिवंत असतें तर तुमचा हा वैभवहीन रूक्ष का होईना, पण मुखत्यारीचा समारंभ पाहून ज्याला मात्र आनंद गाजवायला जग थोडें झालें असतें तें माणूस जिवंत नाही याचें मला वाईट वाटतें."

नव.— तें कोण?

मनो.— माझी आई!

महाराज सद्गदित स्वराने उसळून म्हणाले, "खबरदार 'माझी' असें म्हणशील तर! 'आमची' असें म्हण! मनोहर! तिने तुला जन्म दिला पण खरें पुत्रप्रेम माझ्यावर केलें. तूं आज मुद्दाम तिची आठवण काढलीस तें ठीकच केलेंस. पण तूं आठवण करून देण्यापूर्वी, किंबहुना तूं येण्यापूर्वीच मी 'आमच्या' आईची आठवण निरंतर जागती ठेवण्याकरिता काय केलें आहे हें दाखवितों तुला म्हणजे कळेल."

असें म्हणून नवलरायाने मनोहरचा हात धरून त्याला आपल्या आंतल्या खोलींत नेलें. त्या ठिकाणी रंगीत भिंतीला सुंदर लांकडी चौकट ठोकून तिजमध्यें एकाशेजारी एक असे तीन मोठे फोटोग्राफ टांगले होते. त्यांत मध्यभागीं मनोहरच्या मृत आईचा फोटो असून, शेजारीं एका बाजूला मनोहरचा व एका बाजूला नवलरायाचा असे होते, आणि या मधल्या फोटोवर ताज्या खऱ्याखुऱ्या

फुलांची माळ टांगली होती. त्या फोटोपुढे डोकें टेकून गहिवर येऊन महाराज नवलराय म्हणाले—

"मनोहर, या माऊलीचा आशीर्वादच आजचें माझें स्थान आणि माझें वैभव याचें खरें कारण आहे असें मी तरी समजतों. माझी जनक आई मला स्मरतहि नाही. माझे बाबाहि तिच्या मरणानंतर लागलेच मेले. अशा त्या माझ्या पोरक्या असाहाय्य स्थितींत जिने माझा सांभाळ केला, जेवूं न्हाऊं घातलें, तीच माझी आई आणि अधिष्ठात्री देवता खरी! मी दत्तक होऊन या संस्थानाचा धनी झालों त्याच्या आधल्या दिवशीं, तिचें अंतःकरण भावनेने इतकें कांही उचंबळून गेलें होतें कीं, सारी रात्र ती देवापुढे बसून भजन करीत होती. अशी आनंदाने स्फुंदत होती आणि माझें नशीब उगवलें म्हणून आनंदाने अशी हसत होती, कीं मीं तिच्यापासून कायमचा दूर जाणार म्हणून, दुःखाने रडत होती, हेंच कळेना! मनोहर, त्या माउलीचे उपकार मी कसे फेडूं? माझें भाग्य फुलाफळाला आलेलें पहावयास ती कां बरें जगली नाही? राजपदावर येऊन मीं तिचा त्याग केला म्हणून, ती माझ्यावर रुसून तिने माझा त्याग केला का रे! तिने माझ्यावर असें प्रेम करावें याला ईश्वरी सूत्राशिवाय काय बरें कारण असावें? ती आज जिवंत असती, तर तिला मीं खास तिच्याकरिता लहानसें देऊळ बांधून दिलें असतें, फुलबाग लावून दिली असती, पुराण–पोथीची व्यवस्था करून दिली असती, आणि रोज तिच्या पायावर फूल वाहून मग भोजन केलें असतें. पण ती गेल्यावर तूं तरी हाताला लागलास त्या तुला मी आतां सोडीन असें का वाटतें? तें कांही नाही. तुला यापुढे नवलपुरांतच राहिलें पाहिजे. अगदी माझ्याजवळ. तुझें तरी तुझ्या गांवीं काय ठेवलें आहे? आणि तुला त्या कुग्रामवस्तींत मुळीच करमायचें नाही. बरें, मुंबईसारख्या शहरीं राहून तरी एखादा दवाखानाच काढणार ना? मग तो इथेच कां काढीनास? मी त्याची इथे सगळी तजवीज करून देतों. तुला पोटाकरिता धंदा करण्याचें कारण नाही. लहानपणींच जशी एकच भाकरी आपल्या आईच्या हातची घेऊन मोडून तूं मी दोघांनी मिळून खाल्ली तशीच आताहि खाऊं. परोपकाराचें म्हणशील तर मुंबईच्या लोकांना औषधोपचार केल्यांतच परोपकार आहे असें नाही. बाहेरगांवींदेखील दुःखितांना सुखी केल्यापासून तेंच पुण्य लाभेल. बरें प्रत्यक्ष माझा प्रायव्हेट सेक्रेटरी व्हावयाचें कोणत्याहि कारणाने तुला आवडत नसेल तर नसो. पण खासगी सल्लामसलत देण्याचें जें काम तें

स्वतंत्र लौकिकवान स्नेही डाक्तर म्हणून तुला अधिक चांगलें करतां येईल! मग काय, आहे कबूल? बोल, म्हणजे उद्यापासून वाड्याजवळच पण तुझ्या स्वतंत्र बिऱ्हाडाची सोय करून देतों."

अशा रीतीने जुन्या प्रेमळ आठवणी आळवून, व्यवहाराच्या शंका स्वतःच उत्पन्न करून त्यांचीं उत्तरें मनोहराकरिता नवलरायाने स्वतःच दिल्यावर मग मनोहर तरी काय बोलणार? अशा अस्सल जातिवंत प्रेमाचा पाश मनोहरला तरी तोडावासा कां वाटेल? शेवटी मनोहराने रुकार दिल्यावर, हा प्रश्न समाधानकारक रीतीने सुटल्याची खूण म्हणून, नवलरायाने मनोहरला पुनः एकदां कडकडून आलिंगन दिलें आणि दुसऱ्या दिवसापासून मनोहर स्वतंत्र डाक्तर व नवलरायाचा खासगी सल्लागार व हवा तेव्हा प्रायव्हेट सेक्रेटरी, या नात्याने नवलपूरचा कायम रहिवासी बनला.

या जगांत मित्रलाभ हा कोणाहि मनुष्याला खराच मोठा लाभ होय. पण त्या लाभाची किंमत सामान्य मनुष्यापेक्षा राजे लोकांनाच अधिक पटणारी आहे. मित्राची व्याख्या एका सुभाषितांत अशी केलेली आहे—

'ददाति प्रतिगृह्णाति, गूढमाख्याति पृच्छति
भुंक्ते भोजयते चैव षड्विधं मित्रलक्षणं'

पण या सहांपैकीं किती लक्षणें राजमित्रांची असूं शकतील? तो राजापासून वाटेल तें घेईल किंवा लुबाडीलहि. पण जो स्वतः राजा नाही असा राजमित्र आपल्या मित्रराजाला काय देणार? राजा हा लोकांना आपल्या पंक्तीला रोज जेवायला कसा घेणार? आणि घेईल तेव्हाहि त्याच्या आणि इतर लोकांच्या मानमरातबांतले अंतर न लोपूं देण्याची खबरदारी राजाच्या अभिमानाने त्याचे लोभी परिचारक घेतात. मग स्वतः राजाची इच्छा नसेना का? बरें राजाच्या पंक्तीला जेवणारे लोक राजाला आपल्या घरीं आपल्या पंक्तीला कसे बोलावणार? राजाचा मानमरातब आपल्या घरीं कसा राहील, त्यांत चूकबीक कांही होईल का, या काळजींतच बोलावणारा चूर असतो. जुन्या काळीं राजा कोणाच्या घरीं जेवावयाला जावयाचा झाला, तर स्वयंपाकी, वाढपे, आश्रित हे सगळे खास राजाच्या पदरचे तेथे आगाऊ जात. याचें बाहेरचें दिखाऊ कारण राजाची रोज सेवा करणाराशिवाय इतरांच्या हातून ती बिनचूक होऊं शकत नाही हें असलें, तरी अंतस्थ कारण राजाला विषप्रयोगादिकाची बाधा होऊं नये

हेंच होय, असें जुने लोक सांगतात. आणि बोलावणारालाहि तें बरेंच वाटतें, कारण आपल्या घरीं राजाच्या जेवणांत कांही विषारी किंवा विकारी पदार्थ गेला तर ती गोष्ट चुकून झाली असें न म्हणतां लोक ती जाणूनबुजून केली असाच संशय घ्यावयाचे! आता शेवटीं उरलें मित्रलक्षण. मित्राला विश्वासांत घेऊन गुप्त गोष्टी ऐकण्या–सांगण्याचें. पण राजासंबंधाने ही गोष्टदेखील अडचणीचीच ठरते. राजाने आपल्या विश्वासांत इतरांना घेण्यांत त्याला धोका असतो. कारण त्या विश्वासाचा प्रायः दुरुपयोग होतो. उलट राजाला आपल्या विश्वासांत घेण्यासारखें सामान्य माणसाजवळ काय असणार? आता मनुष्यस्वभावाप्रमाणे राजालाहि आपल्या विश्वासांत कोणी असल्याशिवाय बरें वाटत नाही. म्हणून तो कोणाला विश्वासांत घेतो. पण ते घरचे नोकर लोक, तोंडपुजे, हांजी–हांजीखोर, खुषमस्करे असेच असतात. किंवा राजा व्यसनी असला तर अशा लोकांशिवाय त्याचीं इष्ट कार्यें घडूं शकत नाहीत म्हणून त्यांच्याशिवाय त्याला गतिच नसते. "भूप सखा भूपाचा, धनिकाचा धनिक, चोर चोराचा" अशा मित्रांच्या जोड्या कवि मोरोपंताने लावल्या आहेत खऱ्या. एका राजाला दुसरा राजा नित्याचा मित्र म्हणून कसा लाभणार? दोघांना आपापल्या राज्यांचें बंधन सारखेंच असतें.

महाराज नवलराय यांचे आतापर्यंतचे दिवस राजकुमार कॉलेजांत व परदेशच्या प्रवासांत गेले असल्यामुळे, खऱ्या व योग्य मित्राची गरज भासण्यासारखी जबाबदारी त्यांच्या अंगावर अद्यापि पडली नव्हती. कारण कॉलेजांत जबाबदारी कसली? अभ्यास करावा, त्याला खास ट्यूटर असतो. आणि क्रीडांगणावर खेळणें हाच काय तो महत्त्वाचा विषय! महाराज परदेशच्या प्रवासाला गेले ते अगदी एकटे. तशी त्यांनी मुद्दाम परवानगीच मागितली होती व ती त्यांना देण्यांत आली होती. आणि परदेशांतहि एकाच ठिकाणीं फार दिवस न राहिल्याने, व त्यांची वृत्ति हिंडणें, फिरणें, पाहणें या सर्व गोष्टी स्वतंत्रपणें करण्याची असल्यामुळे, त्यांनी तिकडेहि कोणाला जवळ केलें नव्हतें. परत येऊन नवलपुरास स्थिर झाल्यावर आणि मुखत्यारी मिळाल्यावर त्यांना मित्रसंगतीची गरज भासूं लागली; ती भासूं लागली त्याच वेळीं मनोहर परदेशाहून आल्यामुळे महाराजांना अतिशय आनंद झाला; आणि असा सख्ख्या भावासारखा मिळालेला मित्र हातचा जाऊं नये, म्हणून त्यांनी त्याला, पूर्वी सांगितल्याप्रमाणें, नवलपुरांत आपल्याजवळ कायमचें ठेवून घेतलें.

---

४ टपालवाला कीं गुप्त पोलीस ?

नवलपूर शहरच्या मुख्य रस्त्याच्या मध्यभागीं एक दुचौकी, दुमजली वाड्यांत भाऊसाहेब डबीर राहत. वाडा अगदीं पेटीसरखा बंदिस्त होता. पुढचा दरवाजा एकदा लावून घेतला कीं, मग पहारी चालवून कोणी भिंतीच पाडील तेव्हा घरांत प्रवेश होईल. दिवसादेखील सबंध दरवाजा कधीं उघडा नसावयाचा. एका ठेंगण्या दिंडींतून प्रवेश. आंत जाता-येता मान लववलीच पाहिजे आणि कंबर दुमडलीच पाहिजे. पण आंत गेल्यावर मात्र मन प्रसन्न होऊन दिंडीप्रवेशाचा शीण जाई. कारण जिकडे पाहावें तिकडे स्वच्छता व टापटीप हीं मूर्तिमंत दिसत. प्रत्येक दगड गुळगुळीत आणि लाकडाचा तुकडा तुळतुळीत. जसा कांहीं आताच कोणी तरी फडक्याने पुसून घेतला आहे ! चौकाच्या प्रत्येक खणांत एकेक तारेची कुंडी लोंबकळत असून तिच्यांत निरनिराळ्या फुलांचा एकेक वेल लावून सोडला होता. चौकांत प्रवेश केल्या-बरोबर समोरच दोन मोठ्या तसबिरी टांगलेल्या दिसत. पैकीं एक इंग्लंडच्या विद्यमान राजेबादशहांची, व तिच्या जोडीला नवलपूर संस्थानचे माजी अधिपति राजेसाहेब यांची. तसेंच डोळ्यांना प्रमुखपणें दिसणारी दुसरी गोष्ट म्हणजे कोपऱ्यांत टांगलेली जुन्या काळची पालखी, अबदागिरी, तलवार व बंदुक. वैभवाचीं हीं चिन्हें पाहणाराला नव्या जुन्या काळांची आठवण एकदम होऊन दैवलीलेची कल्पना मनांत चमकून जाई.

सकाळचे आठ वाजले होते. भाऊसाहेब डबीर हे नित्यनियमाप्रमाणे स्नान-संध्या आटोपून, अंगावर शालजोडी घेऊन, माडीच्या दिवाणखान्यांत लोढाला टेकून गादीवर बसले होते. त्यांनी घड्याळाकडे पाहिलें, डोळ्यांना चाळशी चढविली, तोंडांत चिरूट धरून काडी ओढली, इकडे तिकडे नजर फेकून कोणी दिसत नाही असें पाहून ते थोडे चकित झाले. कारण या वेळीं त्यांचा गडी दौलती, गादीवर टपालाचे कागद ठेवून, बाजूला मारुतीरायाप्रमाणे धन्याच्या आज्ञेची वाट पाहात कोपऱ्यांत उभा असावयाचा. पण आज टपालाचे कागद गादीवर नाहींत आणि दौलतीहि कोपऱ्यांत उभा नाही. तेव्हा क्षणभर थांबून उंच आवाज करून भाऊसाहेबांनी गड्याला हाका मारण्याला सुरुवात केली.

भाऊ.—दौलती, ए दौलती, दौल्या, अरे लेका कान फुटले की काय? मी इकडे घसा फोडून ओरडतों आणि तूं तिकडे करतोस तरी काय?

तिसऱ्या हाकेबरोबर दौलती वर आला व हात जोडून कोपऱ्यांत उभा राहिला. त्याला पाहतांच भाऊसाहेब स्वर किंचित् उतरवून, तरी पण मोठ्यानेच म्हणाले—

भाऊ.—दौलती!

दौल.—जी.

भाऊ.—अरे, नुसतें जी काय? तूं काय करीत होतास?

दौल.—पलीकडच्या दालनांतल्या खुर्च्या पुशीत होतो धनीसाब!

भाऊ.—खुर्च्या पुसायला तुला हीच वेळ होती वाटतें. घड्याळाकडे पाहा अन् सांग बरें किती वाजले ते?

दौल.—आठ वाजले जणूं.

भाऊ.—आणि त्याच्यावर सबंध सात मिनिटें झालीं तीं दिसत नाहीत वाटतें तुला?

दौल.—व्हय् धनीसाय्ब. मला काय कळतया गरिबाला घड्याळ! पण व्हय्, जरा वखुत झाला जणूं.

भाऊ.—काय पाहा! हा आपला खुशाल होय म्हणतो! अरे, मीं म्हटलें आठ वाजून आणखी सात मिनिटें वर झालीं, तेव्हा आजचीं ताजीं पत्रें आणि वर्तमानपत्रें कोठे आहेत?

दौल.—वरतमान पतर व्हय्? टपाल न्हायकी आल अजून धनीसाब.

भाऊ.—काय करावें या शिंच्याला? अरे पत्रें आलीं नाहीत तेव्हा टपाल आलें नाही हें कळलें. पण टपाल कां नाही आलें?

दौल.—त्ये मला काय ठाव धनीसाब?

भाऊ.—मग तुला नाही तर काय गांवच्या पाटलाला विचारूं होय? जा जा—चौकांत आधी आणि पाहा फिरून टपाल आलें कीं नाही तें. वेळेची कुणाला म्हणून किंमत असेल तर शपथ—

'जा' या शब्दाबरोबर दौलती आधीच निघून गेला होता. पण भाऊसाहेबांचें भाषण कांही त्याला उद्देशून, कांही आत्मगत असें पुढेंहि सुरूच होतें.

भाऊ.—काय म्हणे इंग्रजी राज्य म्हणजे अगदीं वक्तशीरपणाचा नमुना! होय ना? घ्या म्हणावें नमुना! दहा मिनिटें म्हणजे कांहीच उशीर नाही वाटतें

टपालाला! उगाच यांच्या बढाया. जुन्या काळीं असाच बेतालपणा होता. पण फुकाची ऐट तरी मिरवीत नव्हते! इत्यादि.

भाऊसाहेबांचें आत्मगत भाषण कांही वेळ असेंच चालू होतें. त्यांच्या वेळापत्रकांत या वेळीं टपालचीं पत्रें व वर्तमानपत्रें वाचणें याशिवाय दुसरें कलमच नव्हतें. तेव्हा ते तरी या रिकाम्या वेळाचें दुसरें काय करतील? पण पाण्याच्या प्रवाहाला एकादा खडक आडवा आला, म्हणजे तें आपोआप वेगळें वळण घेतें. त्याप्रमाणे भाऊसाहेबांच्या आत्मगत भाषणाची गोष्ट झाली.

खालून ‘ सुभेदार भेटायला आले आहेत ’ अशी वर वर्दी आली. तिच्या मागोमाग “भाऊसाहेब आहेत का माडीवर! म्हटलें मी येऊं का वर?” अशी मोठ्या मऊ अदबशीर हेल काढलेल्या शब्दांनी स्वतः सुभेदारांनी मारलेली हाक ऐकूं आली आणि हाकेपाठोपाठ, उलट उत्तराची किंवा परवानगीची वाट न पाहता, स्वतः सुभेदारच वर आले. अर्थात् भाऊसाहेबांना ‘त्यांना या बसा’ म्हणणें प्राप्तच झालें. त्यांनी पत्रें व वर्तमानपत्रें यांची आशा सोडून देऊन चाळशी काढून ठेवली. आत्मगत भाषणाच्या जागीं संभाषण सुरू झालें. पण सुभेदारांना भाऊसाहेबांच्या वेळापत्रकाची माहिती असल्यामुळे, भाषणाला प्रारंभ करण्याला कांही तरी निमित्त लागतें म्हणून, टपालाचाच प्रश्न सहजासहजीं त्यांनी काढला. यामुळे भाऊसाहेबांच्या विचारप्रवाहाला फिरून पूर्वीचेंच वळण प्राप्त झालें.

सुभे.—म्हटलें, आज स्वारी निवांतशी दिसते आहे? अजून टपाल नाहीं वाटतें आलें?

कांही कांही भाविक कर्मठ लोकांची रीत अशी असते कीं, स्तोत्रपाठ म्हणतांना कांही व्यत्यय आला, तर खंड पडलेलें स्तोत्र तें पुनः पहिल्यापासून म्हणूं लागतात. भाऊसाहेबांनी फिरून टपाल खात्याच्या अवक्तशीरपणाला शिव्या देण्याला सुरुवात केली.

भाऊ.—हें पाहा सुभेदार, या दिवसांत ताळतंत्र म्हणून कशाला राहिलाच नाही. आठाचे सव्वाआठ झाले! इतका वेळ लागावा ही काय टपालाची रीत झाली?

सुभे.—कसली रीत आणि काय? टपालाचा शिपाई खांद्यावर पिशवी टाकून निघाला असेल मगाशींच, पण वाटेंत बसला असेल कुणाशीं तरी बोलत; त्या लेकाला काय? उशीर झाल्याने इकडे टिपणबाज वक्तशीर वागणाऱ्या

लोकांचीं तंत्रें बिघडतात त्याचें ! कुत्रें काशीला निघालें पण पोचतंय कुठे ? वाटेंत भेटेल त्या कुत्र्याच्या तोंडाशीं तोंड दे, दिसेल त्या चांगल्याशा दगडावर लघुशंका कर ! असे हे आमचे टपालचे शिपाई. मी तर म्हणतों कीं, पिकांत कुळवाला जुंपलेल्या, किंवा खळ्यावर कणसें तुडवायला लावलेल्या, बैलाच्या तोंडाला जसें मुसकें घालतात, तसें या टपालवाल्या शिपायांच्या तोंडाला टपालखात्याच्या साहेबाने मुसकें घातलें पाहिजे. किंवा मी सांगतों, भाऊसाहेब, पोस्टाच्या शिपायाचाहि कांही दोष नसेल बिचाऱ्याचा यांत. अहो ! पोस्टमास्तर तरी लेकाचे काय कमी ? बाहेर टपालाचीं पोतीं येऊन पडलीं यांच्या उरावर तरी यांचें माजघरांतलें काम संपायला पाहिजे ना ? त्यांची चहा ढोसायची वेळ, रडक्या मुलांना खेळवायची वेळ, लाडक्या बायकांशीं गुलगुल गोष्टी बोलण्याची वेळ हीच असते. आंत बिऱ्हाड आणि बाहेर हपीस अशी जोड सोय म्हणून टपालखातें आपणांकडून करतें, त्यानेंच खरो-खर तुमच्या-आमच्यासारख्यांची गैरसोय होते."

फिरून घड्याळाकडे नजर टाकून भाऊसाहेब म्हणाले, "अहो सुभेदार, तसेंहि नसेल. मी सांगतों. आठ वाजून सतरा मिनिटें झालीं. आज टपालाच्या शिपायाचा दोष नाही, पोस्टमास्तराचा दोष नाही, पण कांही तरी अपघात झाला आहे खास. मग वाटेंत टपालची मोटार उलथली असो, कीं टपालावर दरोडा पडला असो, कीं आगगाडीची टक्कर झाली असो. पण प्रकरण कांही सामान्य नाही. आज कांही तरी वेगळें आहे खास. आणि सुभेदार, तुम्हांला सांगतों कीं, चहूंकडेच हा असा बेसुमारपणा वाढला आहे अलीकडे. दिवस सुनका कसा तो जातच नाहीं. जें वर्तमानपत्र उघडावें त्यांतहि आपलें कांही ना कांही अघटितच वाचायला सांपडतें. या जगाचें काय होणार आहे कांही कळत नाही."

सुभे.--पण मला वाटतें--माझी आपली पोरबुद्धि म्हणा हवी तर--वर्तमानपत्रेंच वाचावयाचें सोडून दिलें तर बरें नाहीं का होणार कुणाचेंहि !

भाऊ.—छेः छेः, असें करून कसें चालेल ?

सुभे.—माझेंच पाहा ना. माझ्या वहींत वर्तमानपत्राच्या खातीं एक पै कधी खर्ची पडत असेल तर शपथ.

भाऊ.—स्वतःचे पैसे खर्च केले तरच वर्तमानपत्रें वाचावीं असें शास्त्र थोडेंच आहे ? कोणी आपण विकत घेतलीं नाही तर भिकेच्या हक्काने निर्लज्जपणाने दुसऱ्याच्या घरचीं गोळा करून नेतो. मिळून एकच.

भाऊसाहेब बोलले सहज! पण लोकांचीं वर्तमानपत्रें दडपून गोळा करून नेऊन फुकट वाचावयाची संवय स्वतः सुभेदारांनाच होती. म्हणून भाऊसाहेबांचें बोलणें सुभेदारांच्या मर्मीच लागलें थोडेसें. पण तो कसला वस्ताद गडी, निधड्या छातीचा! तो बाजू अशी अंगावर घेतो?

सुभे.—वाचलींच तर वर्तमानपत्रें फुकट वाचावीं हें तर माझें तत्त्वच ठरून गेलें आहे. वर्तमानपत्रें वाचणें हें की नाही एक प्रकारचें व्यसन आहे.

पण हें बोलणें भाऊसाहेबांना झोंबेल असें लक्षांत येऊन, लगेच जीभ चावून सुभेदार म्हणाले—"आपणासारख्या विद्वान लोकांचें तें एक प्रकारचें व्यसनच आहे. पण व्यसन परस्पर बिनखर्ची भागेल तितक्याचपुरतें तें ठेवलें म्हणजे बेतांत तरी राहतें, असें आपले आमच्यासारखे लोक पाहतात! बोलून चालून रोग, म्हणजे काय, हृद्रोग. मग तो विकत तरी कां घ्या! आपणच आतां म्हटलें ना? कीं जें वर्तमानपत्र उघडावें त्यांत कांही तरी अघटित अनर्थच वाचायला सांपडतो म्हणून!

भाऊ.—होय. तें खरें. पण वर्तमानपत्रें आपण न वाचलीं, किंवा वर्तमानपत्रांनी अनर्थाच्या बातम्या न देण्याचें ठरविलें, तरी अनर्थ चालले आहेत ते तरी होतातच ना? ते कुठे राहिले आहेत व्हावयाचे? म्हणून वर्तमानपत्रांत ते वाचले, म्हणजे आपण जगाबरोबर चाललों आहों थोडे असें तरी वाटतें. जगांत अनर्थ काय थोडे आहेत! कुठे आग, कुठे धरणीकंप, कुठे महापूर—

सुभेदारांनी आपली नाव हळूच या पुरांत ढकलली.

सुभे.—कुठे एखादा खून, एखादा दरोडा——

भाऊ.—कुठे आत्महत्या, कुठे घटस्फोट——

सुभे.—कुठे बंड, कुठे राज्यक्रांति——हें चाललेंच आहे. पण मला वाटतें भाऊसाहेब, आमच्यासारख्या मध्यम वयाच्या लोकांना मनाचे हे आघात एक वेळ सोसवतील, मात्र आपण तरी या वयांत ते सोशीत जाऊं नये. आपलें आता झालें पुरें वय. आता आपण आपल्यापुरतें पाहायला पाहिजे. आणि जगाची काळजी करण्याचें सोडून दिलें पाहिजे, असें मी तरी निदान म्हणतों.

पोटांत शिरून काढलेल्या सुभेदारांच्या या उद्गारांनी भाऊसाहेबांच्या मनावर थोडासा परिणाम झाला. आचळाला हात लावला म्हणजे, गाय जशी पान्हवतें, त्याप्रमाणें कांही लोक ममतेच्या भाषणांनी पान्हवतात. पण कांही गाई पान्हवल्या तरी तहान भागण्याइतकें दूध देत नाहीत. फक्त हाताला

ओलावा लावून दुधाची आशा उत्पन्न करतात, व पुढे ती निष्फळ करतात, हा अनुभव सुभेदारांना लवकरच आला.

भाऊसाहेब म्हणाले--" मीं जगाची काळजी करून काय होणार ? ज्याने जग निर्माण केलें तोच त्याची काळजी करणार ! आणि जगाचीच काय पण माझी मीं काळजी केली तरी माझ्या हातीं काय आहे ? सांगाना बरें ! माझ्या हातीं असतें तर असें कां झालें असतें ?

सुभे.--'हूं. ऊं–' सुभेदारांनी एकदम पडका चेहरा करून वर आकाशाकडे पाहून एक मिनिटभर ओसरावयाला लागेल, इतका दीर्घ सुस्कारा टाकून दुःखप्रदर्शन केलें. उपरण्याचें टोक घेऊन आपले डोळेहि पुसले. डोळ्यांतून पाणी कांही निघालें नाही. पण डोळ्यांत घातलेल्या गहिऱ्या सुरम्याची एक रेघ उपरण्यावर उमटून निघाली ! सुभेदार आपला दीर्घ सुस्कारा बोलका करण्याकरितां म्हणाले—

" मनुष्याच्या हातीं फारसें नाहीं खरें. पण आहे तितकें तरी करावयाला पाहिजे ना ? भाऊसाहेब, आपला कर्तासवरता बरोबरीचा मुलगा बाळ प्रभाकर घरीं असता, तर आपल्याला कशाला घरची काळजी करावयाला लागली असती ? पण दैव देतें आणि कर्म नेतें म्हणतात तेंच खरें ! "

भाऊ.—दैव असो नाही तर कर्म असो. मला तर तो मेला असें समजूनच आता चालणें प्राप्त आहे, नव्हे काय ?

सुभे.—हो हो. आणि तो मेला असें समजून पुढची व्यवस्था करणेंहि प्राप्तच आहे.

भाऊ.—व्यवस्था ती काय करायची आहे म्हणा !

सुभे.—असें कसें बरें बोलतां भाऊसाहेब ? या संस्थानाबरोबरच आपली तैनातहि उत्पन्न झाली, ती गमावून कसें चालेल ? आणि ती राखावयाची तर आपलें नांव पुढे चाललें पाहिजे. आणि नांव पुढे चालायचें तर पुरुषसंतान पाहिजे. आणि औरस नसेल तर दत्तक घेतला पाहिजे. खाजगी संसार वहिनी-साहेब चालवायला समर्थ आहेत; पण दुर्दैवाने स्त्रियांकडे तैनात चालत नाही ! नोकरी पुरुषच करणार. त्याला काय करावें ? संस्थानांतून दिवस मोठे कठीण येत चालले. मागच्या महाराजांपर्यंत तैनाती कशा तरी टिकल्या. पण आता नवे संस्थानिक गादीवर—

भाऊ.—मग ते गादीवर आले म्हणून काय होईल ?

सुभे.—वा ! आपण ऐकलें नाही वाटतें, कीं दत्तकसंस्था बुडविण्याचा त्यांचा विचार आहे. अहो, ते सुधारक आहेत !

भाऊ.—पण ते स्वतःच दत्तक आहेत त्याची वाट !

सुभे.—कुऱ्हाडीचा दांडा गोताला काळ म्हणतात तो हा असाच ! स्वतः दत्तक असणारानेंच दत्तकसंस्था बुडविली नाही तर मग मौज ती काय ? पण त्यांचें स्वतःचें दत्तविधान सशास्त्र होतें कोठे ? सरकारने अधिराजाचा अधिकार चालवून आधी त्यांना गादीवर बसविलें आणि मग जुन्या राणीसाहेबांच्या भोळया समजुतीखातर त्यांना आपलें उगीच नांवाला मांडीवर दिलें ! असो; पण त्यांचें कसें का असेना, भाऊसाहेब, कृपा करा आणि घरचें दत्तविधान एकदाचें उरकून टाका कसें. तुम्हाला तुमच्या घराण्याची काळजी नसली तरी इतरांच्या घराण्यांची काळजी करा. तैनात बुडाल्याचा दाखला पडूं देऊं नका. म्हातारी मेल्याचें दुःख नाही पण काळ सोकावतो. तैनातीची ही गोष्ट झाली. पण आपणाला आपल्या पिंडोदकक्रियेची तरी कांही तजवीज करावयाला नको का ? आपण धर्मनिष्ठ आहां, श्रद्धाळु आहां. निपुत्रिकाला नरकवास घडतो ही गोष्ट मी आपल्याला सांगायला पाहिजे असें नाही. आपण दत्तक घेण्याने स्वार्थ–परार्थ–परमार्थ सर्व कांही गोष्टी साधणाऱ्या आहेत.

भाऊ.—पण मीं दत्तक घेतला तर तैनात चालू होईलच कशावरून ?

सुभे.—त्याचा सगळा बंदोबस्त आहे. आपण काडीचीहि काळजी करूं नका. दिवाणसाहेब तैनात चालू करण्याच्या हुकुमावर सही करायला हातांत लेखणी घेऊन बसले आहेत. दत्तविधान होऊन आपला अर्ज जायचा अवकाश, कीं हुकुमावर सही झालीच म्हणून समजा. आपल्या तैनातीची आपणापेक्षां दिवाणसाहेबांना अधिक काळजी वाटते. ते पडले मुत्सद्दी. प्रजेच्या कल्याणाच्या दृष्टीने त्यांना दूरवर पाहावें लागतें.

भाऊ.—पण मी दत्तविधान करायचें मनांत आणलें, तरी मुलगा ताबडतोब मिळाला पाहिजे ना ? आणि मुहूर्त ?

सुभे.—मुहूर्त मीं पाहून ठेवला आहे. कारण यजमानसाहेबांना पक्की मुखत्यारी मिळण्याच्या आधी हा बार उडाला पाहिजे असें दिवाणसाहेबांनी मला चार चार वेळ बजावून आपणाला मुद्दाम कळवायला सांगितलें आहे. मुलगा आपण वाटेल तो पसंत करा. गोत्रांतला–कुळांतला–असला तर चांगलें हें तर

शास्त्रानेंच सांगितलें आहे. आम्ही व आपण एकाच शाखेचे डबीर ऊर्फ सुभेदार! मुलगा माझ्या बाजीरावासारखा लहान वयाचा असावा हें सांगायलाच नको.

सुभेदार अशा रीतीने खळ पडूं न देतां बोलत होते. बिचाऱ्या भाऊसाहेबांना मधून मधून हुंदका देण्यापलीकडे वावच उरत नव्हता. पण अखेर त्यांची सोडवणूक अकल्पित रीतीने झाली. कारण दौलती टपाल घेऊन वर आला आणि टपाल दिसतांच इतर सर्व विषय भाऊसाहेब विसरून जात. दौलतीने पुढें केलेलें टपाल त्यांनी उतावळेपणाने हातांत घेतलें; पण पत्रावरचीं पाकिटें आणि वर्तमानपत्रांवरच्या पत्त्यांच्या चिठ्ठया फाडण्याला थोडासा वेळ लागला, तेवढ्यांत त्यांनी टपालखात्याची पुन्हा हजेरी घेतली.

भाऊ.—कोण अवक्तशीरपणा हा. काय रे दौलती! काय म्हणाला टपालचा शिपाई ? इतका उशीर कां झाला कांहीं बोलला का ? टपालच्या आगगाडीला अपघात झाला असेल असें मला वाटलें तें खरें का ?

दौल.—टपाल येळेवरच आल म्हणा. पण टपालवाल्याची अन् माझी जरा वाईच चुकामूक झाली धनीसाब. मी त्येला चौकांत पगत व्हतों तवर त्यो इकडच टपाल वाटायला निघाला बी व्हता. आपल्या मागच्या गल्लीनं जातांना त्येनं आमच्या बाईसाहेबांस्नी त्येंच पत्र दिलं, आन् असा पुढच्या रस्त्याला आला तवर मी गांठलाच त्येला आन् आणलं ह्ये टपाल.

हे शब्द ऐकून भाऊसाहेब जवळ जवळ दकचण्याइतके आश्चर्यचकित झाले. टपाल फोडून पत्रांच्या घड्या उकलण्यांत गुंतलेला त्यांचा हात क्षणभर स्तब्ध झाला; व ते दौलतीच्या तोंडाकडे टक लावून भिवया चढवून बसले. त्यांच्या तोंडून क्षणभर एक शब्दहि निघेना. पण शेवटीं चिकित्सेने आश्चर्याला जिंकलें. ते म्हणाले—

"काय म्हणालास दौलती ? मागच्या गल्लीने येऊन टपालवाल्याने कुणाला पत्र दिलें ?"

दौल.—बाइसाबास्नी धनीसाब !

भाऊ.—काय म्हणतोस ? आमच्या घरीं ? आमच्या हिला ? आमच्या हिला पत्र दिलें ? टपालवाल्याने दिलें ? मागच्या गल्लीने आणून दिलें ?

दौल.— व्हय, अक्षी खर धनीसाब.

हें ऐकतांच भाऊसाहेबांचा चेहरा किंचित् लाल झाला. भुवया वर चढलेल्याच होत्या. पण दृष्टि अधिक एकाग्र झाली. सुभेदारांच्या मार्गांत हें अवाचित

विघ्न आलें. म्हणून पुनः घडी बसविण्याच्या हेतूने त्यांनी मध्यें तोंड घातलें. दौलतीने सांगितलेल्या हकीकतीने त्यांनाहि आश्चर्य वाटलेंच होतें, व एक प्रकारची कुत्सित विचारसरणी त्यांच्या मनांत सुरू झाली होती. पण संभावितीचा झोक आणून ते म्हणाले—

"असें केव्हा केव्हा होतच असतें. टपालवाला बिचारा कोणीकडून तरी आपली सोय पाहतो. चार पावलें चालायचें कमी पडलें तर तितकेंच सही. मागची गल्ली काय, पुढचा रस्ता काय? आणि ज्यांचें नांव पत्राच्या पाकिटावर असेल त्यालाच जातीने पत्र द्यावें अशी टपालवाल्यांना साधारण नेहमीची सूचनाच असते म्हणे त्यांच्या वरिष्ठाकडून."

भाऊ.— बायकामाणसांच्या नांवचीं पत्रें असलीं तरी घरच्या पुरुषांच्या टपालाबरोबर द्यायला काय हरकत? कुणी त्यांचीं पत्रें चोरतो की काय? म्हणे वरिष्ठांची सूचनाच असते! टपालाच्या हपीसांत पत्रें असतात तोंपर्यंत वरिष्ठांचा अंमल. पण लोकांच्या घरीं कोण चालूं देईल? घरीं पुरुषच वरिष्ठ, सगळ्या कारभाराचे. घरीं पुरुषांचीच सत्ता. लुच्चा लेकाचा टपालवाला! पाय मोडले असते जसे कांही त्याचे, पुढच्या दाराने टपाल वाटलें असतें तर! पण कुणी सांगावें त्याच्याचकडे सगळा दोष आहे म्हणून!

झालें, सुभेदारांचा सामोपचार फुकट गेला. उघडलेलीं पत्रें वाचण्याकडेहि भाऊसाहेबांचें लक्ष रागामुळे लागेना, मग सुभेदारांनी काढलेल्या दत्तकाच्या आगांतुक विषयाकडे कसें लागणार? ते पत्रें व वर्तमानपत्रें उगीच उलथीं-पालथीं करूं लागले. सुभेदारांनी आता निघून जावें अशा अर्थाची ती त्यांना एक प्रकारची सूचनाच होती; पण अशा नाजूक खुणेवरून बोध घेणारे ते गृहस्थ नव्हते. त्यांनी पुनः एकवार लगट करून पाहिली. ते म्हणाले—

"मग मघाशीं सांगितलेल्या दत्तकाचें काय करावयाचें? मुलगे शोधावयाच्या कामीं मी आपणाला मदत करतों. पण मुहूर्त कांही केल्या टाळा-वयाचा नाही. शोध केला तर मुलगा मिळणारच नाही असें नाही. पण दुसरा नच मिळाला तर मी पोटचा गोळा द्यायला तयार आहें. माझा बाजीराव आहे आपला गरीबाच्याच पोटीं आलेला, एकुलता एक. आणि ईश्वराच्या दयेने त्याला माझ्या घरीं कांही कमी नाही. तरी कुळाचें नांव राखायला हवें असेल, आपला डबीर-सुभेदार घराण्याचा वंश चालवायचा असेल, तैनात राखायची

असेल, तर त्या पोराला आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या ओटींत घालायला हा सुभेदार कधीहि माघार घेणार नाही.

सुभेदारांनी अशी ही चर्पटपंजरी आपणाकडून चालविली होती. पण भाऊसाहेबांचें तिकडे लक्षच नव्हतें. ते विचार करीत तोंडाने आपल्याशींच पुटपुटत होते. आणि हाताने कागदांची उलथापालथ करीत होते. इकडे सुभेदारांनी दत्तकाच्या गोष्टी चालविल्या होत्या, पण भाऊसाहेबांच्या डोळ्यांपुढे त्या टपालवाल्याचेंच चित्र अजून उभें होतें. इतक्यांत एक नवी कल्पना सुचल्यासारखें वाटून ते अर्धवट आपल्याशीं व अर्धवट सुभेदारांना उद्देशून म्हणाले—

“सुभेदार, मला वाटतें तो टपालवाला नसून गुप्त पोलीस असावा—एरवीं लोकांच्या घरच्या मागच्या दारांतून राबता ठेवण्याची बुद्धि त्याला कां व्हावी ? तोच तो ! गुप्त पोलिसच तो ! पण त्याच्याजवळ टपालचीं पत्रें कशीं यावीं ? मला वाटतें टपालवाल्यानांच सरकार गुप्त पोलिसाचें काम सांगत असेल. होऊं नये तें प्रकरण माझ्या मुलाच्या हातून झालें खरें. पण त्याला आता किती तरी दिवस झाले ? असें असून हे गुप्त पोलीस माझ्या घराचा पिच्छा सोडीत नाहीत, काय करावें ?”

सुभेदारांनी पुनः एक प्रयत्न करून पाहिला. ते म्हणाले, “छेः छेः! आपल्याला भलतीच शंका आली. तो गुप्त पोलीस खचित नव्हे, टपालवालाच असावा. त्यांत काय विशेष आहे ?”

पण या आश्वासनाने भाऊसाहेबांच्या कल्पनातरंगांना फिरून पूर्वीचीच दिशा मिळाली. ते हातांतले कागदपत्र खालीं ठेवून उभे राहिले आणि म्हणाले, “तर मग खालीं जाऊन तिलाच पत्राबद्दल विचारावें म्हणजे खुलासा होईल.”

झालें. भाऊसाहेब उठल्यावर सुभेदारांना बसून काय उपयोग ? ते दत्तकासंबंधाने आणखी पुढें बोलणार तों भाऊसाहेबांनी त्यांना नमस्कारसुद्धां केला; व ते मागच्या माडीकडे जायला निघाले. तेव्हा सुभेदारांनीहि त्यांच्या मागोमाग पुढच्या माडीच्या जिन्याची वाट धरली.

५ पत्राने उडविलेला गोंधळ

मागील प्रकरणांतल्या हकीकतीपूर्वी पांच दहा मिनिटें भागीरथीबाइ ऊर्फ माईसाहेब या अंग धुऊन मागील दारीं तुळशीला प्रदक्षिणा घालीत होत्या. इतक्यांत भाऊसाहेबांच्या घराचें मागील दार कोणीसें ठोठावलें. या दाराने ये-जा सहसा नसे. म्हणून त्यांनी प्रथम तिकडे लक्षच दिलें नाही. गल्लींत खेळणाऱ्या एखाद्या मुलाने सहज गमतीने दारावर थाप मारली असेल असेंच त्यांना वाटलें. पण पुनः कोणी तरी दार ठोठावलें, इतकेंच नव्हे तर "दार उघडा दार" अशी मोठ्याने हाकहि मारली, तेव्हा माईसाहेबांनी प्रदक्षिणा थांबविली व गोठ्याकडे कुणबीण काम करीत होती तिला हाक मारून त्या म्हणाल्या, "गहिने, बघ ग दार उघडून कोण हाका मारतें आहे तें!" गहिनीने दार उघडलें तों टपालचा शिपाई आंत आला आणि म्हणाला, "माफ करा हां बाईसाहेब! मी मागच्या गल्लींतलीं पत्रें वांटीत चाललों होतों, त्यांत या घरच्या धनीसाहेबांचें पत्र निघालें. तेव्हा म्हटलें इकडच्या इकडेच देऊन पुढें जावें. म्हणून सहज हाक मारून पाहिली, तों माझें कामच झालें! रावसाहेबांचींहि पत्रें आहेत. पण ही गल्ली संपवून पुढच्या तोंडाला गेलों म्हणजे तीं त्यांना देईनच. होतां होईतों ज्याचें पत्र त्याच्याच हातीं द्यावें असा आम्हांला वरून हुकूम असतो. तसेंहि झालें आयतें. मी घेतों बरें दार ओढून जातांना! माफ करा." इतकें बोलून गहिनीच्या हातांत पत्र टाकून टपालवाला चटदिशीं दाराबाहेर पडला व त्याने दार लोटून घेतलें.

पण त्यामुळे गहिनीचे श्रम थोडेच वांचणार! कारण तिला दारापर्यंत जाऊनच कडी घालावी लागली. परत येऊन ती म्हणाली, "कुठ ठेवूं लखुटा बाईसाब!" माईसाहेबांनी खुणेने तुळशीकट्ट्याचा कोपरा दाखविला, तेथें तिने तें पत्र नीट ठेवलें; व उडून जाऊं नये याकरितां त्यावर एक दगड ठेवला. माईसाहेबांच्या अजून दहा प्रदक्षिणा पुऱ्या व्हावयाच्या होत्या म्हणून त्यांनी तें पत्र उचलून घेतलें नाही. पण त्यांना मनांतून त्या पत्राचें इतकें आश्चर्य वाटत होतें कीं, त्यांची प्रदक्षिणा त्या कोपऱ्यापर्यंत आली म्हणजे, त्या निमिषार्ध थांबून त्याकडे पाहून मगच पुढें जात. प्रदक्षिणा पुऱ्या झाल्याबरोबर मात्र त्यांना राहवलें नाही. त्यांनी चटदिशीं सूर्याला अर्घ्य दिला, फूल वर

उडविलें, आचमन करून डोळयांना पाणी लावलें आणि गडबडीने पूजासाहित्य तबकांत भरून ठेवून आधी पत्र हातांत घेतलें. पत्ता वाचण्यांत त्यांचा थोडासा वेळ गेला. पण प्रत्यक्ष वस्तुज्ञानच जेथें होणारें तेथें तर्क कशाला? असें वाटून त्यांनी उभ्या उभ्या पाकीट फोडलें आणि आंतलें पत्र त्या वाचूं लागल्या. पहिल्या ओळीचा अर्थ नीट लागेना, म्हणून त्यांनी पान उलटून पाहिलें. तेव्हा त्यांच्या सर्व अंगाला धक्का बसल्यासारखा झाला. मग फिरून आंतल्या आणखी दहा पांच ओळी त्यांनी वाचल्या. इतक्यांत भाऊसाहेबांचा आवाज ऐकलासा वाटून त्यांनी तें पत्र ओच्यांत दडविलें, आणि पूजेचें तबक व फुलपात्र घेऊन त्या तडक घरांत निघून गेल्या.

मागोमाग भाऊसाहेब परसांत आले. आधी त्यांनी सैपाकघरांत, माजघरांत कुटुंबाचा शोध केला होता; व तेथें त्या नाहीत असें पाहूनच ते इकडे आले. पण इतक्यांत माईसाहेब दुसऱ्या बाजूने आंत गेल्या! अशी ही पाठशिवणी सुरू झाली. पण अखेर माईसाहेबांची पाठशिवण त्यांच्या खास बसावयाच्या खोलींत भाऊसाहेबांना पुरी करतां आली. एखाद्या गुप्त व आश्चर्यजनक गोष्टींचा स्फोट आपापसांत करावयाचा असतां कोणा दोघांची जी स्थिति होते, तीच भाऊसाहेब आणि माईसाहेब यांची झाली. भाऊसाहेब मनांतून रागावले होते, तरी पत्राबद्दलची माहिती युक्तीयुक्तीने काढून घेण्याची गरज म्हणून त्यांना गोडी-गुलाबीचा आव आणावयाचा होता. माईसाहेबांना आपण निरपराधी आहों अशी पक्की जाणीव होती; पण त्यांना कांही तरी गुपीत राखावयाचें होतें, म्हणून कपटाचा शरमिंधेपणा त्यांच्या तोंडावर आला होता. भाऊसाहेब बायकोच्या बसावयाच्या खोलींत कधी सहसा न यायचे ते आज आले. पण माईसाहेबांना त्यांना बसायला खुर्ची पुढे करवेना. कारण त्यांना बसवून घेण्याची इच्छाच त्यांच्या मनांत या वेळीं नव्हती. तेव्हा भाऊसाहेब आपण होऊनच खुर्ची पुढे ओढून बसले, व संभाषण सुरू झाले.

भाऊ.—झाल्या का तुळशीप्रदक्षिणा पुऱ्या?

माई.—हो, न व्हायला काय झालें?

भाऊ.—नाही, म्हटलें, थोडें विघ्न मध्यें आलें असावें असें वाटलें. म्हणून आपलें विचारलें झालें.

माई.—छे; विघ्न कसलें? आणि प्रदक्षिणा तरी काय अशा शेंपांचशें घालते! येऊन जाऊन पन्नास!

भाऊ.—नाही म्हटलें, दौलती म्हणाला, टपालवाल्याने तुझ्या नांवचें एक पत्र आणून दिलें, म्हणून विचारलें. खरेंच का आलें आहे पत्र? केव्हा आलें? कुठून आलें? कुणाकडून आलें आहे? काय लिहिलें आहे त्यांत?

प्रश्नांच्या या सरबत्तीने ती बिचारी खरोखरच गोंधळली. तिच्या तोंडून कोणतेंहि उत्तर म्हणून निघेना. भाऊसाहेबांनी योजलेला मायावीपणाचा बेतहि क्षणांतच फुकट गेला. ते एकदम रागावून म्हणाले—

"तूं बोलत नाहीस! चमत्कार आहे! मी भिंतीला का विचारतों आहे? मी काय मूर्ख म्हणून विचारतों होय? विचारल्याबद्दल फडाफडा तोंडांत मारून घेतों पाहिजे तर!"

प्रकरण एकदम हातघाईवर आलेलें पाहून, माईसाहेबांनी अगदी मऊपणा पत्करला.

माई.—असें काय करावयाचें तें अगदी? मी सांगत नाही असें का म्हटलें आपल्याला?

भाऊ.—मग सांग तर. कुठलें पत्र आलें? कुणी लिहिलें आहे? काय लिहिलें आहे त्यांत?

फिरून माईसाहेब स्तब्धच. बिचारीने प्रयत्न केला, पण उत्तर कसें तें सुचेचना!

भाऊ.—सांगतें म्हणतेस आणि तें सांगत नाहीस!

माई.—कोण नाहीं सांगत? आणि न सांगायला काय झालें? पण आधीं मला इकडे असें विचारावेसें वाटतें कीं, मला जर चुकून एकादें पत्र आलें, तर लागलीच त्याचा एवढा गवगवा तो कशाला करायला हवा? हें चांगलें दिसतें का?

भाऊ.—हें मात्र चांगलें दिसत नाही, आणि तुला परस्पर पत्रें यावीं आणि तीं तूं मला सांगूं नयेस हें-मी विचारतों—हें मात्र चांगलें दिसतें का?

माई.—इश्श! पत्रें पत्रें तीं किती? साऱ्या जन्मांत एक तर आलें. आणि त्याला तरी येऊन कांही चार दोन दिवस थोडेच झाले, आपणाला सांगितलें नाही असें म्हणावयाला! आतां परस्पर आलें त्याला मी बरें काय करूं? मी का कांहो सांगावयाला गेलें होतें टपालवाल्याला, कीं 'बाबा, इकडे न कळत पत्र आणून मला दे' म्हणून?

भाऊ.—तूं नसशील गेलीस सांगायला; पण तो जो नेहमी पुढच्या दाराने येतो, तो तुझें पत्र देण्यापुरता कां ग आला आज मागच्या दाराने?

माई.—तें मी काय सांगूं बरें ?

भाऊ.—बरें तें कांही असो. पण खरेंच कुणाचें पत्र आलें आहे ? काय लिहिलें आहे त्याने त्यांत ?

माईसाहेब पुनः गोंधळल्या. पण इतक्यांत त्यांना कांही तरी सुचल्यासारखें वाटून त्यांनी चटकन उत्तर दिलें—

" पत्र की नाहीं, माझ्या एका मामेमावसबहिणीकडून, आलें बरें का फार दिवसांनी !

भाऊ.—ही पत्र लिहिणारी कुणी नवीनच दिसते मामेमावसबहीण ?

माई.—नवीनच नाही कांही, पण आपण कधी पाहिली नव्हती एवढें मात्र खरें !

भाऊ.—बरें पण तिने पत्रांत असें लिहिलें तरी काय आहे ? सांग ना ? कधी पत्र न येणारें तुला म्हणूनच आपलें कौतकाने विचारतों जरा. बाकी कांही नाही.

माई.—लिहिली आहेन् खुशालीची बातमी. दुसरें काय ? तिला तिकडे लांब भागानगरला जाऊन पुष्कळ वर्षें झालीं. तेव्हा लिहिली आहेन् झालें सहज इकडची तिकडची हकीकत.

भाऊ.—असें का ? असो. मग कांही विशेष नाही. पण पाहूं दे काय लिहिलें आहे तें तरी ! भागानगर तें ! बोलूनचालून मोगलाईचें राज्य ! तेव्हा हकीकत असेलच बहुधा मनोरंजक.

माई.—इश्श ! ती कसली असणार ? वर्तमानपत्रांतल्या बातम्यांपेक्षां का ती मनोरंजक असणार ? हो खरेंच, आपलीं वर्तमानपत्रें होतीं टपालवाल्याच्या हातांत. मिळालीं का तीं आपल्याला ?

माईसाहेबांना आपल्या नवऱ्याचा वर्तमानपत्रें वाचण्याचा नाद पुरा माहीत होता. त्या ज्ञानाचा त्यांनी उपयोग केला. पण तोच थोडासा अंगावर आला. वर्तमानपत्रांचा उल्लेख करून आपलें मन दुसरीकडे गुंतविण्याचा हा बायकोचा प्रयत्न भाऊसाहेबांच्याहि लक्षांत येऊन, कुणी आपलें एखादें वर्म काढावें त्याप्रमाणे वाटून, भाऊसाहेब चिडले आणि म्हणाले—

" समजलों समजलों. पण असा विषय नको बदलूं. मी किती झालें तरी अनुभविक पेन्शनर आहें ! असा फसायचा नाही म्हटलें तुझ्या झुकांडीने ! हं. हं. दे तें पत्र इकडे. पाहूं दे तरी भागानगरची काय हकीकत आहे ती.

बायका झाल्या तरी वर्णन लिहिण्यांत मोठ्या मार्मिक आणि पटाईत असतात हो!"

भाऊसाहेबांवर उलट रागावण्याची ही संधि माईसाहेबांना आयतीच मिळाली. तिचा त्यांनी बरोबर फायदा घेतला. स्त्रियांच्या शिक्षणाचें व बुद्धिमत्तेचें असलें स्तुतिपर वर्णन कधी नव्हे तें भाऊसाहेबांच्या तोंडून निघणें म्हणजे, स्त्रिया अज्ञानी असतात असें म्हणून त्यांचें वर्म काढणेंच होय हें उभयतांच्या मनाला पूर्णपणें माहीत होतें. म्हणून त्या रागाचा आविर्भाव आणून म्हणाल्या—

"उगाच कांहीं तरी बोलायचें झालें! बायकांच्या लिहिण्यावाचण्याची गोष्ट एरवी केव्हा निघाली म्हणजे मेलें नाही नाही तें वाईटसाईट बोलायचें. सगळा जन्म गेला बायकांच्या शिक्षणाची निंदा करण्यांत. आणि आजच कधी नाही तें कुठलें आलें कौतुक कुणाला ठाऊक? काय म्हणे बायका वर्णन करण्यांत मार्मिक अन् पटाईत! गेला त्यांचा मार्मिकपणा चुलींत!"

भाऊसाहेबांना बाजू अंगावर आलीशी वाटली. तेव्हा त्यांनी फिरून साळसूदपणा स्वीकारला; व नेमक्या मुद्द्यावर येऊन प्रांजलपणाच्या आविर्भावाने ते म्हणाले—

"जाऊं देना तो आपला नेहमीचा वाद. पण खरेंच सांग ना पत्रांत काय–नव्हे काय काय–लिहिलें आहे तें."

माई.—पण मला आधीं आपल्याला विचारावेसें वाटतें कीं, बायकोमाणसाने बायकोमाणसाला लिहिलेलें पत्र. त्यांत पुरुषांनी लक्ष न घातलें तर नाही का मेलें चालणार!

भाऊ.—काय म्हटलेंस? मी लक्ष न घातलें तर नाही का चालणार! हो चालेल, न चालायला काय झालें! पण मीहि उलट विचारतों कीं, मीं लक्ष घातलें तरी कोणी परका का आहें? तूंच सांग बरें. तोंडाने हकीकत सांगतां येत नसेल तर पत्रच दाखीव. मी मजकूर नीट लावून वाचीन.

पत्रांतला मजकूर सांग म्हणतां म्हणतां आतां पत्रच दाखीव असें म्हणण्याची पाळी आली! नवऱ्याचा हा संशयी उतावळेपणा पाहून, माईसाहेबांच्या डोळ्यांपुढें प्राणसंकट उभें राहिलें. अगदी ओच्यांत पत्र! पण तें फाडलें असें म्हणून एकदम मोकळें व्हावें अशी धाडसी कल्पना त्यांना सुचली; आणि प्राणसंकटांत स्त्रिया धाडसी ठरतात, त्याप्रमाणे माईसाहेब धाडस करून

मोकळ्या झाल्या. पण या धाडसाकरितां त्यांना कधीं नव्हे तो पराकाष्ठेचा मायावीपणा अंगीं आणावा लागला. अगदी मऊंतला मऊ, आर्जवींतला आर्जवी, स्वर काढून त्या म्हणाल्या, " असें काय करायचें तें बरें अगदी! कीनहीं, मी तें पत्र वाचून फाडून सुद्धा टाकलें हो! मेली बोटभर चिटी निवळ खुशालीची. ती वाचून झाल्यावर ठेवून काय करायची? खरेंच मी सांगतें, अगदी शपथ घेऊन वाटेल तर सांगतें, कीं पत्रांत भागानगरचें वर्णन असें कांही एक नव्हतें. फार वर्षांत गांठ पडली नव्हती. फार काय पण ती मेल्याची अवाईहि मीं ऐकली होती. ती खोटी आहे आणि लिहिणार जिवंत आहे इतकेंच त्या पत्रावरनं कळण्यासारखें होतें. तें कळलें म्हणून पत्र फाडून टाकलें बरें का? खरंच सांगतें. दुसरें तिसरें कांही नाही. मला काय बरें माहीत, कीं तें पत्र आपल्याला वाचायला हवेंच असेल म्हणून? मग आता तरी झालें ना?"

भाऊ. – असें काय? मला प्रथम आशा दाखवून शेवटी असें खड्डयांत लोटलेंस काय? पत्र फाडून टाकलें असें म्हणून फसवूं पाहतेस का मला? पण बरें नव्हे, मी कोतवालीचें काम केलें आहे. साहेबाचा शिरस्तेदार होतों दहा वर्षें. लपंडावाच्या उत्तरांनी मला फसवायला तूं पाहूं नको. ठीक आहे, पाहून घेईन. या माझ्या उतारवयांत असें कपट करायला लागलीस का माझ्याशीं? बरें आहे, बरें आहे--

इतकें बोलून भाऊसाहेब माईसाहेबांच्या खोलींतून तडक बाहेर पडले. आणि आपल्याशीं पुटपुटत त्यांनी माडीचा जिना गांठला. माईसाहेबांना एका संकटां-तून मुक्त झाल्यासारखें वाटलें. पण संकटांत असल्याच्या वेळेपेक्षां संकटमुक्त झाल्यावरच मनुष्याला रडें कोसळतें. तसेंच त्यांचेंहि झालें. भाऊसाहेब लांब गेले असें पाहून, त्यांनी दार लावून घेतलें. खुर्चीवर बसून ओच्यांतलें पत्र काढून चारचारदा वाचलें. आणि शेवटीं रडें अनावर झाल्यामुळे, तें कोणाला ऐकूं जाऊं नये म्हणून दाराला कडी घालून, पलंगावर आडव्या होऊन, फुगीर उशींत तोंड खुपसून त्यांनी ती उशी आपल्या अश्रूंनी भिजवून सोडली.

आज योगायोगांनी जणूं काय पाठशिवणीचा खेळच आरंभला होता. अश्रूंनी भिजलेलें माईसाहेबांचें तोंड अजून उशींत खुपसलेलेंच होतें, इतक्यांत "माई–अ–अ. ए. माई! आज कुठे दडून बसलीस अशी अंगदी बाजूला? घरभर शोधली कीग माई!" अशा शब्दांनी मारलेली हांक माईसाहेबांच्या

कानीं आली. लगेच त्यांनी पदराने डोळे कोरडे करून तोंड पुसलें. आणि उलट हाक मारून म्हणाल्या, "कोण तें विमल! आलें अं. थांब कडी काढतें."

अशा अवेळीं माईसाहेब बसायच्या खोलींत कडी लावून गुप्त झालेल्या पाहून विमलला आश्चर्य वाटलें होतें, तें त्यांच्या आश्वासनपर हाकेनेंहि कमी झालें नाहीं. दार उघडतांच ती एकदम जाऊन पलंगडीवर बसली, आणि माई-साहेबांचा हात घट्ट धरून, तिने त्यांना अगदी आपल्या शेजारीं बसवून घेतलें. तिची पहिली कल्पना आजारीपणाची. म्हणून ती म्हणाली, "कां? आज पुन्हा घेऱ्या येऊं लागल्या की काय?" पण उत्तर मिळण्यापूर्वीच तिची दृष्टि माईसाहेबांच्या तोंडाकडे गेली. तेव्हा घेऱ्यांचें दुखणें नसून आपल्या आईला रडविण्यासारखा दुसराच कांहीं तरी एखादा प्रकार झाला असावा असें तिने तेव्हाच ताडलें. आणि माईसाहेबांना प्रेमळपणाने मिठी मारून ती म्हणाली, "माई सांग ना, काय झालें तें सगळें नीट. असें ग काय करतेस? रडून रडून तुझा पदर सगळा भिजलेला दिसतो. खचित बाबा तुला कांहीं तरी टाकून बोलले! त्यांनी तुझा अपमान केला असला पाहिजे. होय ना? तुला घेऱ्या आल्या नाहीत, तर बाबांना वेडाची लहर आली! पण त्यांचा स्वभाव तुला माहीत असतां असें कां बरें करतेस? ते काय करतील बिचारे! त्यांना लहर आली म्हणजे आवरतच नाहीं." इतकें बोलून तिने आईला पुनः एकदां घट्ट वेंग मारिली.

क्षणांत माईसाहेबांचें दुःख हलकें झालें; व त्या शांत मनाने बोलूं लागल्या, "बाळ, तूं समजतेस तसेंच कांहीं नाहीं सारें आज. मलाहि स्वभाव माहीत झाला आहे नेहमीचा, म्हणून त्यांचें बोलणें मीं फारसें मनावर घेत नाहीं; पण मला आज रडूं कां आलें याचें कारण हें पहा. आनंद, दुःख आणि चिंता एकदम उत्पन्न करणारें असें हें पत्र पहा म्हणजे तुला सारें कांहीं समजून येईल."

असें म्हणून माईसाहेबांनी पत्र काढून विमलच्या हातीं दिलें. आणि ती तें पत्र वाचीत असतांच त्या पुढें म्हणाल्या—"तूंच सांग बरें, हें पत्र मी तिकड-च्या हातीं एकदम देऊं तरी कसें? आणि न देऊं तरी कसें? एकीकडे आड आणि एकीकडे विहिर म्हणतात ती ही अशी झाली. स्वभावाप्रमाणे तिकडून नाही नाही त्या शंका उत्पन्न करून वाटेल तें बोलणें झालें. पण तो तोंड दाबून मिळालेला बुक्क्यांचा मार मीं मुकाट्याने सहन केला. इतकेंच नव्हे तर कधी नव्हे तें थोडें कपट, थोडी प्रतारणाहि केली. आणि हें सगळें मनाला सोसलें नाहीं म्हणून रडूं

आलें, दुसरें काय ? बरें झालें. पण आतां तूं आलीस. माझें सगळें दुःख हलकें झालें. माझी चिंता संपली. तूं जवळ असल्यावर मग मला कशाचीच चिंता वाटत नाही." विमल आईचें सर्व बोलणें एका कानाने ऐकत होती व स्वतःच मोठ्याने वाचतांना उच्चारलेले पत्रांतील शब्द दुसऱ्या कानाने ऐकत होती. माईसाहेबांचें बोलणें थांबतांच ती म्हणाली, "माई कळलें का तुला हें पत्र कुणी पाठविलें तें ? लक्षांत आलेंच असेल म्हणा तुझ्याहि, पण आपलें उगीच विचारलें."

माई.— होय, लक्षांत बहुतेक आलें; पण तूं होय म्हटलेंस म्हणजे तर्क पक्का खरा ठरेल. वाच ना सगळेंच पत्र एकदां.

इतकें बोलून माईसाहेबांनी दरवाजाची कडी नीट लावली, विमलनेंहि घड्या घातलेल्या पत्राचा कागद साफ केला व तें पत्र ती वाचूं लागली. पत्र असें होतें—

"तो कांही राम नाही; पण त्याने बारा वर्षें वनवास भोगला. तूं कांही कैकेयी नाहीस; पण तुझ्यावर मात्र सावत्रपणाचा खोटा आळ आला. रामचंद्राने वनवासाच्या शेवटीं शत्रूंचें निर्दालन केलें, तसेंच वनवास भोगण्याच्या पुण्याईने इतरांनाहि आता करतां येण्याला काल अनुकूल दिसतो. पांडवांनी तेरा वर्षें घराबाहेर काढलीं त्यापेक्षां बारा कमीच की नाही ? दिसतें आहे बरें ! पण शेवटीं बनेल तें खरें, जिवंत असशील तर दर्शन देशील ! आशीर्वादहि मिळेल. साधू लोक अमावास्येच्या पर्वणीलाच दर्शन देतात. अनुसूयेपुढें जटाधारी दत्तात्रय उभा राहिला, तेव्हा ती कांही त्याला भ्याली नाही."

हें पत्र एकदां वाचून विमलचें समाधान झालें नाही. "माई, ऐकलेंस का" असें आईला म्हणावें, आणि एकदां एक भाग, मग दुसरा भाग असें वाचवाचून तिनें जशीं कांही पत्रांचीं पाठांतरें किंवा गुंडिकाच केल्या. माईसाहेब देखील कुठे कळल्यासारखें कुठे न कळल्यासारखें वाटून ऐकत होत्या. मग विमलनेंच बोलण्याला सुरुवात केली.

विमल— पत्र म्हटलें तर गूढ आहे, म्हटलें तर स्पष्ट आहे. अक्षर कांही माझ्या ओळखीचें दिसत नाही; पण चांगलें वळणदार आहे, नाही ?

माई.— अक्षर तुझ्या ओळखीचें कुठून असणार ? तो नाहीसा झाला तेव्हा तूं लहान होतीस. पण तें अक्षर माझ्या चांगल्या ओळखीचें आहे. कारण मीं हौसेने पण चोरून त्याच्याजवळ लिहावाचायला शिकत होतें. तेव्हा तो

मला हाताने धडे लिहून देई. त्यामुळे मला तें अक्षर अजून डोळ्यांपुढें दिसतें आहे. चांगली तुझ्या आजच्या वयाची मी होतें त्या वेळीं.

विमल—खरेंच माई, मला तुझा हेवा वाटतो. कारण त्याने तुझ्या-बद्दल किती प्रेम दाखविलें आहे या पत्रांत.

माई.—एकाच वयाची आम्हा मायलेकांची जोडी. आणि इकडच्या तऱ्हेवाईक तापट स्वभावामुळें प्रभाकराचा मला मोठाच आधार वाटे!

विमल—तुझ्यावर सावत्रपणाचा खोटा आळ आला असें पत्रांत म्हटलेंन् तें उगीच का?

माई.—तो त्याचाच थोरपणा. कर्त्या होऊं घातलेल्या मुलग्याने सावत्र आईवर सख्ख्या आईसारखें प्रेम करावें हा तिच्यापेक्षां त्याचाच गुण अधिक खरा. तुझ्यावरसुद्धा त्याची फार ममता होती हें मला माहीत आहे. पण त्याचा पुष्कळसा वेळ घरच्यापेक्षां बाहेरच्या लोकांच्या कामांतच जाई. आणि त्यांतल्या त्यांत वृत्ति गंभीर. म्हणून मुलांच्या रीतीने तो फार खेळत नसे. प्रभाकराला तुझी आठवण असली, तरी तसा संबंध कमी आलेला. म्हणून तुझा उल्लेख त्याने पत्रांत केला नसावा. पण आता तर तूं त्याच्यावर कडी केली आहेस. शहाणपणांत, विद्येंत, परोपकारांत, लोकांच्या कारभारांत! उद्यां तो परत आला, आणि बाकी गोष्टी निभावल्या, तर पाहशील तुझें तो किती किती कौतुक करील तें! तुझा त्याला किती पण अभिमान वाटेल! पण मला भीतीच वाटते त्याच्या येण्याची.

विमल—खरेंच माई, आतां आपण पुढच्या तरतुदीला लागलें पाहिजे. तो कदाचित् अमावस्येच्या रात्रीच्या वेळीं येणार असें पत्रावरून दिसतें. कोणत्या वेषाने येणार याची सूचना त्याने केलीच आहे. ठीकच आहे. एकदम कोणी ओळखूं नये याला युक्ति अशीच हवी. पण आल्यावर तो केव्हा तरी लवकरच प्रकट झाल्याशिवाय राहायचा नाही असें दिसतें. वनवासाला कंटाळला आहे. न कंटाळेल तर काय होईल? म्हणून प्रगट होऊन सोक्षमोक्ष काय तो पुरा करून घ्यावा असा त्याने निश्चय केला असावा. त्याचा आत्म-विश्वास खंबीर दिसतो, नाही माई?

माई.—तो होताच—आहेच—तसा मनाचा बळकट. बारा वर्षांपूर्वी प्रक-रण मोठें झालें. प्रभाकर एक दिवस अचानक नाहीसा झाला. मी तर लहान. सारा प्रकार पाहून गोंधळून गेलें. मग एक दिवस ऐकलें कीं, सरकारने त्याला

जन्मठेपीची शिक्षा त्याच्या मागेंच दिली. मला जन्मठेप म्हणजे काय हें देखील कळत नव्हतें. पण प्रभाकर गेला तो आता पुन्हा परत येणार नाही, भेटणार नाही, इतकें कळून मी चार दिवस रात्रंदिवस रडत होतें. पण अगदी चोरून हां! उघडपणें रडायचीहि मला भीति वाटे तेव्हा यांच्यापुढें—

विमल— मग आतां काय अशी मोठी धीट झाली आहेस वाटतें? मी आलें तेव्हा अशीच खोलीला कडी लावून बसली होतीस कीं नाही रडत—बाबांना भिऊन!

माई.—बाळ, अशी भिऊन वागलें आजवर म्हणूनच दिवस निभले अन् अब्रू संभाळली गेली बरें! तुझी गोष्ट वेगळी आहे. तूं आहेस मुलगी आणि मी पडलें बायको! तुझ्यावर त्यांचें प्रेमच आहे तसें. त्यांतून तूं शिकली-सवरलेली. सभेंत जाऊन बोलतीस, भांडतीस, ती घरीं का भिशील हे झाले म्हणून यांना? पण बाळ, मी तुझा नाहीं हो हेवा करीत. देवाने असेंच तुला धैर्य अन् शहाणपण द्यावें, अन् वाढवावेंहि! प्रभाकर गेला, पण तुझ्या आधारावरच मी दिवस काढतें बरें. मला घरचें माहेर नाही. मला तूंच माहेर वाटतेस. आजच पाहा ना! हें प्रभाकराचें पत्र असलें यायला आणि तूं घरीं यायला गाठ पडली ती देवानेंच पाडली! नाही तर बाई मी गोंधळून गेलें असतें आणि रडण्याशिवाय मला कांहीं सुचलें नसतें. पण आतां तूं आलीस तेव्हां सगळें कांही निस्तारशील, संभाळशील.

विमल आईला प्रेमाने घट्ट मिठी मारून म्हणाली, "दादा मला तुझ्या-सारखाच बारा वर्षांनी दिसणार तर! पण तो अजूनहि प्राणसंकटांतच आहे म्हटलें तरी चालेल. आपण बायका माणसें झालों तरी त्याला धीर देऊन बचावाची युक्ति आपणालाहि सुचवितां—सांगतां येईल. आणि तुला वाटतें तसें जर बाबा माझें कांही ऐकण्याचा संभव असेल तर तिकडूनहि कांही करतां आलें तर बरेंच नाही का? चल तर आतां, आपण सहज तिकडे गेल्यासारखं करून परसांत जाऊं. बंगलीच्या तळघराची जागा कशी काय आहे तें पाहून घेऊं. चांगली बंदिस्त आहे. ती नीट झाडवून घेऊन निजाबसावयाची सोय करूं म्हणजे झालें.

दोघीहि बाहेर आल्या, आणि प्रभाकराच्या स्वागताच्या तयारीला लागल्या.

---

६ प्रेमळ बाप-लेकींचें भांडण

असो. मागील प्रकरणांत सांगितलेल्या हकीकतीनंतर विमल आपल्या आईकडून निघाली ती भाऊसाहेबांच्या माडींत आली.

रिकामपण असलें कीं भाऊसाहेब बहुधा चिरूट ओढीत बसायचे. तसेच आताहि ते बसले होते. आणि वाचावयाला वर्तमानपत्रें नसलीं म्हणजे इतर कांही न करतां, नुसता चिरूट ओढीत, तासानुतास त्यांना स्वस्थ लोडाशीं टेकून बसून काढता येत असत. तसेच ते आताहि अगदी स्वस्थ बसले होते. विमल वर आलेली पाहून त्यांना फार आनंद झाला. त्यांनी हातांतला चिरूट टाकून दिला व तिचा हात धरून आपल्याशेजारीं तिला बसवून घेतलें. अगदी वाईट स्वभावाच्या माणसांतहि कांही लोकोत्तर गुण असे असतात कीं, केवळ त्या गुणांखातर त्यांचे सर्व दोष जगाने विसरून जावें आणि त्यांच्यावर प्रेम करावें. भाऊसाहेबांच्या अंगीं आपल्या मुलीवरील प्रेम हा असा गुण होता कीं, त्यामुळे त्यांच्या लोभी, संशयी, भोळ्या पण खाष्ट दुराग्रही स्वभावाची कोणीहि त्यांना क्षमा करावी. त्यांनी, तिची जनक आई मृत्यु पावल्यापासून, मुलगी अगदी सुखांत ठेवली होती. तिने धरलेल्या इच्छा तर त्यांनी पुरावाव्याच, पण आपल्याकडून मुद्दाम आठवून आठवून तिचे लाड सुचवावे व पुरवावे. तिच्या कारणीं पैसा किती खर्च करावा हा हिशेबच त्यांच्याजवळ नव्हता. तिच्या लहानपणीं तिला शिक्षक वगैरे ठेवून तर त्यांनी शिकविलेंच; पण पुढे स्वतःचें शिक्षण टाकून देऊन तिने ‘ शारदा मठ ’ नांवाची मुलींच्या शिक्षणाची संस्था काढायचें ठरविलें, तेव्हा त्यांनी जागा खरेदी करण्यापासून सर्व खर्च स्वतः करून लहानशी इमारत बांधून दिली, सामान खरेदी करून दिलें व शाळा फीशिवाय चालवायची म्हणून शिक्षकांचे पगार देतां येतील येवढी रक्कम बँकेंत व्याजू ठेवली. शिवाय दर सणावारी तिला ते कांही तरी रक्कम देणगीदाखल देतच.

विमल आलेली पाहून त्यांना आनंद झाला व ते तिच्या पाठीवरून हात फिरवून म्हणाले, “बाळ, तूं मुंबईहून केव्हा आलीस ? आणि कळविलें नाहीस आधीं तें ?”

विमल— तुमच्याकडे कोणी लोक येत-जात होते म्हणून आईशींच बोलत बसलें होतें.”

भाऊ.—बरें कसें काय चाललें आहे तुझ्या शारदा मठांतल्या मुलामुलींचें ?

विमल—कसें काय चालायचें ? ठीक आहे, आहे तें. लहान मुलें शिकणार किती आणि काय ? पण शिकण्याइतकीच खेळायचीही सोय केली आहे मीं त्यांची. यामुळे सगळा वेळ त्यांचा आनंदांत जातो, बाबा ! मग शिकणें काय पदरांत पडतें तें देव जाणे ! कळून येईल पुढेमागे ! पण बाबा तुम्ही मला मागे दोनशें रुपये दिलेतना एक रकमेने, त्यांचीं मीं निरनिराळीं गमती-गमतीचीं खेळणीं घेतलीं तेव्हापासून मुलें घरीं जायलाच नाखूष असतात. खूष आहेत अगदी माझ्यावर !

भाऊ.—पुरे पुरे मुलांचें कौतुक. कुठलीं चार घरचीं चार जमविलीं आहेत, आणि बसली आहे त्यांतलीच आपणहि एक होऊन, शिंगें मोडून वासरांत शिरलेल्या गायीसारखी ! मीं दोनशें रुपये तुला खाऊला म्हणून दिले ते असे उधळलेस काय ?

विमल—असें बोलाल तर मीं रागावेन बरें का तुमच्यावर, सांगून ठेवतें. घरोघरीं आनंद काय तो खरा मुलांचाच असतो. आणि इतकीं मुलें मला एक ठिकाणीं करून खेळायला मिळतात, मग माझा आनंद केवढा मोठा असेल बरें ? मी तुम्हांला नेहमी बोलावतें शाळेंत एकदा येऊन जा बघा म्हणून. पण तुम्ही मुळी येतांच कुठे ? तुम्ही मला दोनशें रुपये खाऊला दिले, तीं मी आता खाऊ खायला कुक्कुबाळच असेन कीं नाही ? आणि तीं सगळीं झालीं तरी खाऊ खाऊन किती खातील ? आणले होतेना त्यांतल्या पांच रुपयांचे पेढे आणि ते वाटले त्यांना, आणि मींहि खाल्ले बरें का त्यांच्याबरोबर अगदी पोटभर ! मग म्हटलें उरल्या रुपयांचें काय करूं ? मला दागिन्यांची हौस नाही हें पाहतांच तुम्ही; आणि तुम्ही तरी मला करावयाचा असा एखादा तरी दागिना शिल्लक ठेवला आहेत का ? भरली आहे तिजोरी माझ्या आणि माईच्या दागिन्यांनी. मग मुली-मुलें म्हणालीं, 'बाई, आम्हांला विलायती खेळ आणा कीं हो नवे नवे ?' म्हणून मग तोच विचार कायम केला. कांही परदेशी आणले, आणि कांही गांवच्या कारागिरांकडून करून घेतले. पण बाबा, तुम्हांला विचारूं का हो राग येणार नसेल तर ?

भाऊ.—विचार विचार बाळ. तुझ्यावर मी कधी रागावेन का ?

विमल—मी असें म्हणतें, तुम्हांला मुलींचें शिक्षण आवडत नाही तें कां ? मुलींनी असें काय पाप केलें आहे, कीं त्यांना लिहावाचायचा आनंद मिळूं नये ?

भाऊ.—अगदी खरेंच सांगूं का! आमच्या लहानपणीं ज्या गोष्टी आम्हीं कधी पाहिल्या नाहीत त्या मोठेपणीं दिसल्या कीं सगळ्या भलत्या बेसुमार वाटतात. आणि तूंच सांग बरें, शिकून बायकांना पोटें का भरावयाचीं आहेत?

विमल—वाः! पोटें भरण्याकरिताच काय तें येऊनजाऊन शिकायाचें वाटतें? आनंद नाहीच का मुळी त्यांत? तुम्ही कशाला हो बाबा, इतकी वर्गणी भरून आणून वर्तमानपत्रें वाचतां तीं रोज? तुम्हांला तीं वाचून पोटच भरायचें असेल जसें कांहीं?

भाऊ.—समजलों! समजलों! येऊनजाऊन तुम्हां सर्वांचाच कटाक्ष माझ्या वर्तमानपत्रांवर! अग, तीं वाचलीं म्हणजे आपण जगांत आहों असें वाटतें, दुसरें काय?

विमल—मग आम्ही बायका काय जगाबाहेरच्या आहों किंवा आलों वाटतें? आम्हालाहि जग कसें चाललें आहे हें कळायला नको वाटतें? बरें, बाबा, मग मुलींनी शिकणेंसवरणें हें जर असें वाईट, तर मला कां हो तुम्ही घरच्या घरीं अगदी पगारी मास्तर ठेवून शिकवलेंत,तें? जशी मी तुमची मुलगी तशाच दुसऱ्या दुसऱ्यांच्या! आतां घरीं पगारी मास्तर ठेवून मुलींना शिकवायला त्यांच्याजवळ पैसे नाहीत तें वेगळें. मग हा काय त्या बापांचा किंवा त्या मुलींचा दोष! आपलीं मुलें काय, लोकांचीं काय, एकच! देवदयेने आपल्याजवळ चार पैसे आहेत ते लोकांकरिता खर्च झाले तर त्यांत वाईट काय? आईला शिकवायलाहि तुम्ही मास्तर ठेवायला पाहिजे होता. तिला तरी बिचारीला वेळ जायला वाचण्याशिवाय दुसरी काय करमणूक? आता ती आपली तुम्हांला चोरचोरून माझ्या दादाजवळ शिकली हें निराळें! पण तिच्यावर तुमचा त्याकरिता केवढा राग! मी जशी तुमची मुलगी तशीच ती झाली तरी दुसऱ्या कुणाची मुलगीच कीं नाही?

यावर भाऊसाहेबांना कांहीच उत्तर सुचेना. म्हणून केवळ विषय बदलण्याकरिता ते म्हणाले—

"बरें, इकडची तिकडची कांही बातमी सांगशील कीं नाही?"

या प्रश्नाचा फायदा घेऊन प्रभाकराच्या गोष्टीचें सूतोवाच करावें असें तिच्या मनांत प्रथम आलें. पण तें बोलणें जरा जोखमीचें म्हणून आधी बापाला थोडेसें खुषींत आणून मग तो विषय काढावा असें तिने ठरविलें. आणि म्हणाली—

"हें हो काय, बाबा? मुलांच्या शाळेंत कसल्या बातम्या? वर्तमानपत्रांत खऱ्या. तुम्हींच सांगा ना बातमी! खरेंच सांगा बातमी!"

विमलने खरोखरच थोडेसें लाघवीपणाचें नाटक मुद्दाम केलें. म्हणजे, लहान मुलें 'आम्हांला गोष्ट सांगा, गोष्ट सांगा' असें म्हणून आजाच्यामागे छंद घेऊन लागतात तसाच कांहीसा प्रकार तिने केला. भाऊसाहेबांनाहि आपल्या मनांत डाचणारी गोष्ट बाहेर बोलायला बरी संधि आहे असें वाटून ते म्हणाले—

"नवलाच्या बातम्या वर्तमानपत्रांतच असतात असें नाही कांही! एरवी-सुद्धा ऐकायलाच काय, पण अनुभवालाहि येतात बरें का, विमल!"

विमल— मग अनुभवाला आलेलीच एखादी अद्भुत बातमी सांगणार असलां तरी सांगा!

भाऊ.— अद्भुतच नव्हे तर काय ग? ही घरांत प्रभाकराजवळ चोरून लिहा-वाचायला शिकली असें तूंच मघाशी म्हणालीसना? त्या चोरीकडे मीं तेव्हा कानाडोळा केला. पण त्याचें फळ मिळाल्याशिवाय राहिलें नाही!

विमल— म्हणजे मी नाही समजलें, बाबा, काय तें! चोरी काय म्हणतां तें कळलें. पण फळ काय मिळालें आणि तें कुणाला?

भाऊ.— अग, चोरीकडे कानाडोळा करणारालाच तें बक्षीस मिळायचें हें ठरलेलेंच आहे. मीं तिच्या लिहिण्याच्या चोरीकडे दुर्लक्ष केलें तेव्हां तें बक्षीस मलाच मिळालें!

विमल—असें नका हो, बाबा, कडू कडू बोलूं. सांगा ना सरळ काय तें.

भाऊ.—तिला पत्रें येतात चोरून!

विमल—तिला म्हणजे?

भाऊ.—घरांत तिला! तुझ्या आईला!

विमल—मला वाटतें तुम्ही थट्टा आरंभली आहे. आईला पत्रें कधी आलीं आणि किती?

भाऊ.—अगदी आजचीच गोष्ट! लांबची थोडीच आहे!

विमल—अस्सें. बरें आणखी कधी आलीं?

भाऊ.—आणखी कधी तें नाही आठवत विशेष!

विमल—हात्तेच्या रे! मग आजच्या पत्राची गोष्ट तिने मला सांगितली! आणि म्हणे तुम्हांलाहि तिने सांगितली. नुसतें पत्र आल्याची बातमीच काय पण त्यांत काय मजकूर होता तें सुद्धा. काय बरें होतें असें त्या पत्रांत?

माझ्या मामेमावस मावशीची खुशाली आली होती भागानगराकडून. कुठे भागा-नगर आणि कुठे नवलपूर! मींहि तिला कधी पाहिली नाही. आईनेसुद्धा एक दोनदाच पाहिली लहानपणीं. पण भागानगरांत वाख्याचा उपद्रव मनस्वी झाल्याची बातमी जगभर झाली, म्हणून तिने खुशाली कळविली असेल! जुन्या पिढीच्या बायका साऱ्या जन्मांत असें एखादें पत्रच लिहितात. म्हणून पूर्वी कधी फारसें आलें नसेल, आणि आलें असलें तरी तुम्हांला ती कशी सांगेल? आणि तुमच्या तरी तें असें काय लक्षांत राहील?

भाऊ.—बरें तेंहि असेल, पण पत्र फाडून टाकण्याचें तिला काय कारण? तें काय खायला मागत होतें? आणि सहज मला दाखविलें असतें तर काय बिघडलें असतें?

विमल—बाबा, आता बोलू का थोडें तुम्हाला? तुम्हाला आहे का कधी सवय आईशीं मोकळ्या मनाने बसून बोलाचालायची? तशी असती तर गोष्टीवरनं गोष्ट निघाली असती, आणि हौसेने तें पत्र तिने तुमच्या नजरेला सहजच घातलें असतें. पण व्यवहाराशिवाय तिच्याशीं तुम्ही कधी बोलतां बरें? तिची मामेमावसबहीण खरी; पण तिची खुशाली तुमच्यापर्यंत येण्याचा काय बरें संबंध? शिवाय त्या जुन्या पद्धतीच्या भागानगरी बाईने जन्माच्या कर्मांत तें कितवें पत्र लिहिलें असेल देवाला ठाऊक! कुत्र्या-मांजराचे पाय! आईला तें पत्र तुम्हाला दाखवायला लाजच नाही का वाटायची? बायकांची लाज बायकाच राखूं जाणेत!

भाऊ.—बरें बरें, तिचा कैवार तूं घेणारच! पण खरेंच सांग, या पत्राचें नाही कांही वाटत चमत्कारिक तुला?

विमल—खरेंच नाही बाबा!

भाऊ.—शिक्षणाने तुझी मजल बरीच पुढे गेली आहे म्हणावयाची पोरी!

विमल—तसें नव्हे बाबा! पण संशयाने तुमचीच मजल पुढे गेली असली पाहिजे यांत शंका नाही. या पत्रामुळें तुमच्या मनांत काय काय येऊन गेलें असेल आईविषयीं त्याचा उच्चारसुद्धा करवत नाही मला!

भाऊ.—अग, हें असेंच व्हायचें म्हातारपणीं! मीं कशाला या तिसऱ्या लग्नाच्या भानगडींत पडलों कुणाला ठाऊक! अब्रूंत राहून डोळे मिटले एकदाचे म्हणजे मिळविली.

हे शब्द ऐकतांच विमल ताडकन् उठून दूर गेली. आणि परत येऊन बसली ती बापाच्या हाताजवळ न बसतां तोंडासमोर बसली त्यांच्याकडे भेदक नजर रोखून! तिचा स्वरहि जरा आपोआपच चढला, आणि ती बापाला ठासून म्हणाली—

"शिव शिव शिव. बाबा, तुमच्या तोंडून असले अभद्र शब्द निघतात तरी कसे? मी लहान तोंडीं मोठा घास घेऊं इच्छीत नाही म्हणा; पण आईसारख्या शुद्ध पवित्र स्त्रीसंबंधाने असा संशय घेतां, तेव्हा तुम्हांला काय म्हणावें हेंच कळत नाही."

मुलीचे हे शब्द ऐकून भाऊसाहेब जरा सरदले; आणि जसा कांही कोणी अपराधी आपला अपराध लोकांना कळला असें वाटून केविलपणाने बोलतो तसा स्वर काढून म्हणाले—

"अग, तसें नव्हे ग– अग, तसें नव्हे– पण आपलें म्हटलें." पण विमलने बापाची कींव केली नाही. आईच्या प्रेमाने एखाद्या निष्ठुर न्यायाधिशाच्या आवेशाने खेसकून ती त्यांना म्हणाली:—

"तसें नव्हे तर कसें? बाबा मी तुमची मुलगी आहें आणि नातहि शोभेन. आणि असल्या कामांत तुम्ही मला बिनमुरवतखोर म्हटलेंत तरी चालेल. पण सरळ दिसेल तें बोलल्याशिवाय माझ्याने राहवतच नाही. तुमचा आम्हा बायकांच्या शिकण्यासवरण्यासंबंधाने किती कटाक्ष आहे हें माहीत का नाही मला? माझें आपलें तुम्ही चालूं देतां म्हणजे काय, तें एक माझ्यावरच्या निस्सीम प्रेमामुळे. माझी वेडेपणाची हौस हट्ट म्हणून तो तुम्ही पुरवतां."

हें बोलतांना विमलचा कंठ भरून आला. तिच्याने बोलवेना, व ती आपोआपच प्रेमाच्या उद्वेगाने उठून फिरून बापाच्या बाजूला जाऊन चिकटून बसली आणि म्हणाली––

"पण मी म्हणतें बाबा––मी तुमची मुलगी आणि माझी माई तुमची बायको झाली म्हणून काय झालें? बायकोलाहि वागविण्यांत कांहीं सीमा-मर्यादा आहेच कीं नाही? कीं तिची अब्रू अशी अविचाराच्या केरसुणीने तुम्हीं झाडून टाकावी? मी स्पष्टच म्हणतें, माझ्या माईचें आचरण इतकें पवित्र आहे कीं, तिच्या पायाचें तीर्थ घ्यावें नित्य सकाळीं उठून. पण सत्तेची बायको म्हणून तुम्हाला मात्र तिची किंमत नाही!"

मात्रा चांगलीच लागू पडली. भाऊसाहेब निरुत्तर, इतकेंच नव्हे तर खजीलहि झाले. आतां विमलचें बोलणें थांबतें तरी कसें असें त्यांना झालें. पण म्हाताऱ्याच्या डोक्याला युक्ति सुचली थोडी.

भाऊ.—बरें बरें राहिलें माझें. चुकलें माझें. बाळ, तूं रागावूं नको. तुझ्या शहाणपणाचें मला किती कौतुक वाटतें म्हणून सांगूं? माझी विमल बालिस्टर झाली असती तर साहेबालाहि गप्प बसायला लावती. मग सांग बरें आतां, मी तुम्हा बायकांच्या शिक्षणाचा खरा मनांतून शत्रु का आहे तो! अग, पण आम्ही हीं आपलीं जुन्या पिढीचीं माणसें! कशाबद्दल काय कसें बोलावें हें तरी कळतें कुठें नीट आम्हांला तुमच्यासारखें? बरें तें सर्व राहूं दे. मी तुला बातमी म्हणून सांगायला गेलों त्याचें हें असें रामायण झालें. आतां तुझी बातमी सांग पाहूं!

विमललाहि सूर बदलायला निमित्त हवें होतें. म्हणून वादाचा विषय संपला असें दर्शविण्याकरितां किंचित् हसण्याची प्रस्तावना करून ती खेळीमेळीच्या स्वरानें बापाला म्हणाली—

"तुमच्या बातमीचें झालें रामायण! तसें मीं बातमी सांगितली तर माझ्या बातमीचें भारत न होवो म्हणजे झालें. पण खरेंच गमतीची गोष्ट. सांगतेंच झालें. हें पहा, बाबा, काल पहाटे कीं नाही एक अगदी अद्‌भुत अशी गोष्ट घडली."

भाऊ.—हं! हं! काय काय ती सांग बरें?

विमल—गोष्ट अशी कीं—प्रभाकर—दादा—

भाऊ.—कोण प्रभाकर दादा?

विमल—हें काय बाबा! दादा म्हणजे माझाच दादा? प्रभाकर—तुमचा मुलगा बरें!

भाऊ.—मग—मग त्याचें काय!

विमल—तो—काल—रात्रीं—आला—आणि—माझ्या—समोर—उभा—राहिला—प्रभाकर—दादा—जसा—कांही—एखाद्या मुक्या खांबासारखा!

तिने हे सारे शब्द कसे अगदी सावकाश सावधपणाने उच्चारले. जसा कांही एक एक मणी घेऊन माळ ओवावी. आणि शेवटचे 'जसा कांही' हे शब्द तर तिने असे कांही शिताफीने उच्चारले कीं, ते प्रभाकर या शब्दाला लागावे किंवा आला, समोर उभा राहिला, या शब्दांनाहि लागावे. आधी प्रभाकर येणें

हेंच अद्भुत, आणि तो आला तरी असा समोर उभा राहणें हें अद्‌भुत. मिळून बाप थोडासा घोटाळ्यांत पडावा, आणि प्रभाकरासंबंधाने त्याचे तोंडून स्वाभाविक उद्गार न कळत बाहेर पडावे.

आणि ही युक्ति साधलीहि. कारण प्रभाकर हें नांव फिरून कानीं पडतांच भाऊसाहेब दचकले व अविश्वासदर्शक स्वराने ते म्हणाले—

"काय? म्हणतेस तरी काय? प्रभाकर तुझ्यापुढे येऊन उभा राहिला? खुळी! तुला वेडबिड तर नाही लागलें? हो, वेड नाही तर काय? इतकीं वर्षें नाहीसा झाला, तो म्हणे आला! हिंदुस्थानांतल्या तुरुंगांतहि नसेल तो एखाद्या, कीं उडी मारून पळून येईल! कदाचित् अंदमान बेटांत त्याला सरकारने पाठविला देखील असेल. तो काय तेथून समुद्र पोहून येणार हिंदुस्थानला? म्हणूनच म्हटलें पोरीला वेड लागलें खरेंच!

बाप वेडच लागलें म्हणतो आपल्याला, तर मग त्या वेडांत आणखीहि थोडें पुढें जावें, म्हणजे मग प्रभाकर दादाबद्दल आज तरी बापाला काय वाटतें हें नीट कळेल, या हेतूनें विमलने आपलें अद्भुत पुराण थोडेंसें आणखी वाचलें. ती किंचित् हसून पण खरोखर मनांतून भीत भीत, पुनः एकेक शब्द ओढून उच्चारीत म्हणाली—

"माझें आपलें वेड म्हणा, पण बाबा मी म्हणतें कीं, समजा, तो समुद्र पोहून येवो–नाही तर–आभाळांतून–उडून येवो, मी म्हणतें–आलाच तर—"

भाऊ.—आलाच तर? होय आलाच तरी तो पूर्वीचाच असेल तर मला नको. वर्तनाने पूर्वीसारखाच असेल तर मी त्याला थारा देणार नाही, त्याचें तोंडहि पाहणार नाही.

झालें. विमलची निराशा झाली. तिला डोंगरावरून कोणी खाली फेंकून द्यावें असें भासलें. तिच्याने मनाचा उद्गार दडपून ठेवतां येईना. ती स्फुंदतच म्हणाली—

"हरहर! माझी आशा समूळ खुंटली. बारा वर्षें होत आलीं तरी देखील, बाबा, तुमचा दादावरचा राग कमी होत नाहीना? काय? प्रभाकरदादाचें तोंडहि पाहणार नाही तुम्ही, तो परत आला तरी? असा त्याने तुमचा अपराध तरी काय केला बाबा? सरकारचा एक असेल, पण मी म्हणतें तुमचा अपराध त्याने काय केला?"

भाऊ.—अपराध नव्हे तर काय ग? संस्थानच्या दरबारचा अपराध तोच माझाहि अपराध असें मी समजतों. अग, तूं तेंव्हा लहान होतीस! तुला काय कळत होतें त्यांतलें? आता सांगितलें तर थोडें कळेल, म्हणून सांगतों हवें तर. परोपकाराच्या नसत्या फंदांत पडूं नको म्हणून सांगत होतों कानीं-कपाळीं ओरडून! पण तें न जुमानतां विनाकारण दरबारी राजकारणांत पडला. राजकारणांत फिरून राजद्रोह! आणि केलेंन् काय तर खुद्द दिवाणसाहेबांच्या खुनाचा कट व प्रयत्न! विमले, सांग बरें, तुझ्या बापाने सारा जन्म नोकरींत घालविला, खालसा सरकारची केली, संस्थानी दरबारची केली. राजनिष्ठेचें व्रत घेतलें आणि तें पार पाडलें, सर्टिफिकिटें, पोषाख मानाचे मिळविले, चार पैसेहि देवदयेने मिळाले. अशा स्थितींत माझे काळ्याचे पांढरे होत आले अन् मी पेन्शन घेणार तों याने—माझ्याच प्रत्यक्ष मुलाने—असें राजद्रोही खुनी बनावें हें, विमल, तूंच सांग बरें, केवढें मला लांछन झालें असेल! दिवाणसाहेबांच्या खुनाचा खटला भरण्यापूर्वीच तो पळून गेला म्हणून बरें. नाही तर मला आपण होऊन सरकारच्या स्वाधीन करावा लागला असता त्याला! झालें! खरें काय खोटें काय हें शाबीद करायला तो स्वतः नाही. एक दोन साथी-दारांच्या बरोबर त्याचाहि इनसाफ झाला. त्याच्या गैरहजेरींत त्याला जन्मठेप काळेपाण्याची शिक्षा झाली. तो सांपडेल तेंव्हा चौकशी न करतां त्याला अंदमान बेटांत पाठवावें असा हुकूम झाला आहे सरकारी; आणि कुठे सांपडला असला तर त्याची रवानगीहि झाली असेल.

विमल—पण बाबा, मी विचारतें तें सांगा हं, न रागावतां. दादाने दिवाणसाहेबांच्या खुनाचा प्रयत्न केला असा आरोप असेल; पण तो खरा खोटा याची तुम्ही स्वतः खात्री करून घेतली होती का?

भाऊ.—अग, खात्री काय करायची? तो पळून गेला, फरारी झाला, याहून त्याच्या गुन्ह्याचा वेगळा पुरावा तो काय लागतो? शिवाय त्याचा स्वभाव किती तापट होता, तो कसा अगदी माथेफिरू बनला होता, याची काय कल्पना तुला येणार? तूं विचारतेस कीं, तो आला तर काय कराल म्हणून? काय कराल? जें पूर्वी केलें असतें तेंच आताहि करीन. माझ्या दरबारी अब्रूची किंमत असल्या मुलापेक्षा मला अधिक वाटते, समजलीस? कुसंतानापेक्षां निसंतान पुरवलें!

झालें! कडेलोटच आला! तेव्हा आतां गाडी अशीच पुढें नेण्यांत अर्थ नाही, ती दुसऱ्या रुळावर घेणेंच योग्य, असें ठरवून विमल म्हणाली—

" बरें जाऊं द्या कीं बाबा, उगीच कशाला नसता वाद ? "

पण असले अप्रिय व तीव्रतेला पोंचलेलें संभाषण शेवटीं कांही तरी हास्यविनोदाशिवाय संपवितां कामा नये; तसें झालें नाही तर मनाची रुखरुख जायची नाही व इतर संभाषण पुढें होणें कठीण; म्हणून विमलने थोडी युक्ति केली. पूर्वी रामायण-भारत हे योजलेले अलंकारिक शब्द तिला आठवले. तेव्हा लगेच एक उसासा टाकून चढीभावना ओसरवून ती म्हणाली—

" बाबा, बघाना! मी मघाशीं तुम्हांला म्हटलें तसेंच अगदीं झालें कीं ! "

भाऊ.— तें काय बाळ ?

विमल— तें असें कीं, तुम्ही-आम्ही एकमेकांना कांही तरी अद्भुत बातमी सांगणार होतों. तुम्ही सांगितलीत तिचें रामायण झालें असें तुम्ही म्हणाला. तेव्हां मी माझी बातमी सांगितली तर तिचें महाभारत न होवो असें मीं म्हटलें; पण शेवटीं खरोखर तसेंच झालें कीं नाहीं बाबा ?

भाऊ.— अस्सें. तें कसें बरें ?

विमल— तें असें कीं, प्रभाकर दादा आला, माझ्यापुढे उभा राहिला जसा कांही, इतके शब्द मी बोललें. पण पुढे आणखी शब्द बोलणार इतक्यांत तुम्ही रागावून उसळलां तेव्हा तें तसेंच राहून गेलें.

भाऊ.— ते शब्द कोणतें ?

विमल— दादा येऊन माझ्यापुढे उभा राहिला—जसा—कांही—आणि इतकें पाहून मी जागी झालें! पहाटेचीच वेळ होती. आणि आपलें असलें स्वप्न मला पडलें कीं हो! अद्भुत नव्हे का ? पहाटेचीं स्वप्नें खरीं होतात काहो बाबा ?

भाऊ.— हात्तेच्या रे! एकूण स्वप्नच ना ? चल तर एकूण माझीच बातमी खरी, अन् तुझी खोटी !

असें म्हणून म्हातारा प्रेमळपणाने मुलीच्या पाठीवर हात फिरवून मोठ्याने खो खो हंसला.

---

७ चांडाळचौकडीच्या गुजगोष्टी

आज पो. ए. साहेबांच्या कचेरीच्या मंडळींना दिवाणसाहेबांची मेजवानी होती. ही कचेरी नवलपूर संस्थानाच्या राजधानीला हटकून वर्षातून एकदा यावयाचीच. भेटींत वार्षिक तपासणी हें काम मुख्य. पण त्याच्या अनुषंगाने इतर किती तरी कामांचा उलगडा कांही प्रगट रीतींने, कांही गुप्त रीतींने या भेटींत होत असे. खुद्द खासे यजमान व खासे एजंटसाहेब यांच्या भेटी, परत-भेटी आणि एक बडा दरबार व बडा खाना झाला म्हणजे सरकारी काम जवळ जवळ संपलें. पण निमसरकारी व खासगी व फारच खासगी म्हणजे गुप्त, अशीं कामें अनेक असत, आणि खुद्दांच्या खाशांच्या कामाला एक दिवस पुरला तर अवांतर कामांना दोनतीन दिवस लागत. या कामांची मनांतून ओळख संस्थानिक व पो. ए. या दोघांनाहि असे. पण यांच्यादेखत तीं कामें होण्याला सहजच लाज व चोरी. म्हणून या दोन दिवसांत संस्थानिक व एजंट बाहेर कोठे तरी शिकारीला जावे अशी जुनी रीत असे.

पण नव्या संस्थानिकांनी या रीतींत पुष्कळच फरक केला. त्यांनी भेटी-परत भेटी ठेवल्या; पण दरबार अगदी मामुली केला. खान्याला बाहेरचे दहापांच लोकहि बोलावले नाहीत. भाषणांवर बहिष्कार घालून फक्त रीतीचा तेवढा बादशहाच्या नांवचा एक टोस्ट ठेवला आणि शिकारीला तर अजीबात फाटा दिला. यामुळें पो. एजंट दुसरे दिवशींच परतले. पण शिरस्तेदारांची कचेरी एक दिवस मागे राहिली. अर्थात् दिवाणसाहेबांच्या घरची मेजवानी उकळावयाची राहिली होती. कारकून-पट्टेवाले यांच्या बिदाग्या व बक्षिसं उकळण्याचें काम दिवसभर सुरू होतें. संध्याकाळीं सार्वजनिक मेजवानी व बैठकीचें गाणें झाल्यावर अगदी निवडक शेलकी खाशी चार मंडळी दिवाणसाहेबांच्या तिमजली दालनांत ख्याली-खुशाली करीत होती. खाण्याचे प्रकार खालच्या माडींत होऊन गेले होते. पिण्याचे प्रकार वरच्या दालनांत सुरू होते. यामुळे संभाषण रंगांत आलें असल्यास नवल काय ?

इतक्यांत सुभेदार येऊन दाखल झाले. त्यांना दिवाणसाहेबांच्या अंतरंगांत केव्हाहि प्रवेश असेच. सुभेदारांची डाळ भाऊसाहेबांजवळ फारशी शिजली नव्हती. पण सुभेदारांचा मुलगा भाऊसाहेब डबीरांच्या मांडीवर दत्तक जाण्या-

पासून दिवाणसाहेबांचाहि फायदा होता. म्हणून या कामीं जें जें होईल तें तें त्यांना फुगवून व सजवून कळविलेंच पाहिजे होतें.

दिवाण— का, सुभेदार, तुमची शिकार कोठवर आली ?

सुभे.— शिकार प्रत्यक्ष साधेल तेव्हा खरी. भाऊसाहेबांशीं दत्तकाचें बोलणेंचालणें केलें आहे.

दिवाण— भाऊसाहेब काय म्हणाले ?

सुभे.— माझ्या जिभेची मोहनी कुणावर पडल्याशिवाय राहील असें का वाटतें आपल्याला ? दिवाणसाहेब एक सांगून ठेवतों आपणाला, मनुष्य म्हातारें झालें म्हणजे त्याचें मन भित्रें आणि कमकुवत होतें. आणि तसें झालें म्हणजे त्याला धर्मवेडाने पछाडलेंच म्हणून समजावें.

दिवाण— पण भाऊसाहेब आणि धर्म या दोन शब्दांचा उच्चार तरी एका जिभेने करावा कीं नाही याची शंकाच वाटते मला. अगदीच आतांचें मला फारसें माहीत नाही. पण पूर्वाश्रमीच्या भाऊसाहेबांचें चरित्र ज्यांना माहीत आहे त्यांना हें तुमचें बोलणें कसेंसेंच वाटेल. मला वाटतें कीं, जगांत असें कोणतेंच पातक नसेल कीं जें भाऊसाहेबांच्या हातून घडलेलें नाही.

सुभे.— अहो, पण मनुष्यस्वभावाची गंमतच ही आहे कीं जितकें पूर्वीचें पापाचरण अधिक तितकें त्यावर धर्माचरण अधिकच खुलतें. मी तरी असे एकदोन नव्हे पण दहापांच पेन्शनर पाहिले आहेत कीं तरुणपणीं त्यांनी पूर्वी ज्या गिंडींतून मनसोक्त मद्यप्राशन केलें त्याच गिंडींतलें गंगाजळ हातावर पडल्याशिवाय पुढे ते आपोषणीच घेत नव्हते पानावर ! पूर्वी अमक्ष्यमक्षण करून झालेल्या अजीर्णावर उतारा म्हणून त्यांनी अलीकडे उपोषणावर उपोषणांची झोड उठविली आहे. पेन्शनच्या अर्जावर सही करतांना बोटांतून जें धर्मवेड अंगांत शिरतें तें मग कांही केल्या बाहेर निघतच नाही.

दिवाण— वाः ! तर मग मला आता जपूनच राहायला पाहिजे. कारण पुढच्या वर्षी मी पेन्शन घेणार. आणि आपला तर निश्चय आहे कीं इतर चावट म्हाताऱ्यांसारखा आपण धर्मवेडाला थारा नाहीं देणार.

सुभे.—आपली गोष्ट कशाला ? मी बोललों तर स्तुति होण्याऐवजीं निंदा भासेल. मी सांगतों कीं, धर्माचा प्रत्यक्ष बाप आला तरी त्याचे पाश आपणावर कधीहि पडावयाचे नाहीत. खंबीर कणखर मनाची गोष्टच वेगळी.

दिवाण— बरें, भाऊसाहेब काय म्हणाले हें सांगावयाचें तुमचें राहिलें तसेंच !

सुभे.— हो, भाऊसाहेबांच्या मानसिक दृष्टीपुढें मीं जेव्हा का धर्मशास्त्राची दुर्बिण धरली आणि परलोकांत निपुत्रिकांकरितां वाढून ठेवलेला नरक त्यांना दाखविला, तेव्हा ते लगेच म्हणाले, 'ठीक आहे, करतों विचार.' माझा मुलगा दत्तक घेण्याची कल्पना त्यांना पटलीशी दिसली. अहो, आम्ही एकाच गोत्राचे पडलों ना ! झालें तर ! हें सगळें झालें. पण—

इतकें बोलून आपण कांही अद्भुत गोष्ट सांगणार याचा सुभेदारांनी फारच मजेचा नाटकी आविर्भाव केला. भिवया चढविल्या, अंगाला पिळे दिले, इकडे तिकडे दोन-दोनदा पाहिलें, कानोसा घेतल्यासारखा केला, खाकरवसा काढला, आवंडा गिळला, आवाज खालच्या सप्तकांत नेला. हें पाहून दिवाणसाहेबांना म्हणावेंच लागलें कीं—

दिवाण— पण काय ? मधेंच माशी शिंकली कीं काय ? बरोबरच आहे. म्हाताऱ्या माणसाचें मन जितकें धर्मवेडें असतें तितकेंच चंचलहि असतें !

सुभे.— छेः आपण नाही बुवा भाऊसाहेबांना चंचल म्हणून दोष देणार. कारण मला तशीच घटकाभर आणखी मिळती त्यांच्याशीं तर काम तिथेंच फत्ते झालें असतें. पण इतक्यांत बातमी आली माडीवर कीं खाली घरांत टपालवाल्याने मागील दाराने बाईसाहेबांना एक पत्र आणून दिलें म्हणून ! मग काय विचारतां ? स्वारी एकदम बिथरली आणि मलाहि मग तिथून पाय काढावा लागला.

दिवाण— हंः, आलें लक्षांत. बाईसाहेबांना पत्र आलें ! तर मग तुमच्याहि लक्षांत आलेंच असेल भाऊसाहेब का बिथरले असतील तें ?

अगदी बुद्धिमंदतेचें ढोंग करून सुभेदार शुद्ध नंदीबैलासारखी मान हलवून म्हणाले—

सुभे.— छे, आपल्या नाही बुवा लक्षांत आलें काय तें.

दिवाण— अहो, यजमानसाहेब जाणार लवकरच बाईसाहेबांना सोडून त्यांच्या अशा अल्पवयांत. तेव्हा मागे राहणाऱ्या बाईसाहेबांनाहि नको पहायला आपल्याला एखादा आधार ! त्याचीच असेल ही तयारी ! उगीच भाऊसाहेब बिथरतात वाटतें ? मी म्हणतों, परस्पर पत्रव्यवहार करूनच बाईसाहेब थांबतात. घरीं कोणी स्नेहीसोबती नाही आणीत भाऊसाहेबांच्या देखत हें भाऊसाहेबांचें भाग्यच समजायचें.

फिरून सुभेदारांनी बावळयाचें सोंग आणून म्हटलें—

"छेः छेः, आपण नाही बुवा अशी कोणाची निंदा करणार."

दिवाण—तर तर! तुम्हाला कुणाची निंदा करायची माहीतच नसेल जशी कांही!

सुभे.—पण आपला तर्क काय चालतो तें नाही सांगितलेंत?

दिवाण—तर्क काय सांगायचा? अहो, हें पत्र त्यांच्या कोणा प्रियकराकडून आलें असलें पाहिजे. आणि हा सोदा टपालवाला कुटण्या असून खासगी द्यायचें पत्र टपालांतून आलें असें सांगून बाईसाहेबांना आणून देत असेल. टपालांतून पत्र आलें म्हणजे तें परगांवच्या माणसाचें असणार असें अनुमान सहजच व्हावें आणि पत्राचा संशय न यावा अशी ही बतावणी दिसत सर्व. पण भाऊसाहेबांना याचा चांगला सुगावा असेल आणि म्हणूनच ते असे खवळले असतील! खासा रोजगार. एकंदरीने काय तरी हें मासलेवाईक कुटुंब!

सुभे.—तें कसें काय बुवा!

दिवाण—तें कसें? बापाने नोकरींत लांड्यालबाड्या करून लाच खाऊन लाखो रुपये मिळविले; आणि आता त्याच्या व्याजावर नैवेद्यवैश्वदेव आणि धर्मकृत्यें चालविलीं आहेत. एकुलता एक मुलगा तो निघाला बदमाश-राजद्रोही-गळेकापू! बायकोची हकीकत तर ही आपण आतां बोलतोंच आहों. आणि मुलीने तर आडपडदाहि ठेवला नाही.

सुभे.—तें काय बुवा? तिने असें तें काय केलें?

दिवाण—अहो बायकांची शाळा आणि वसतिगृह काढलेंन् ना! झालें तर. शाळेंत मुलींना लिहायवाचायला शिकवावें, आणि मग त्यांनी त्या लिहिण्याचें चीज काय तें प्रियकरांना पत्रें लिहून करावें हेंच की नाही? या शाळा म्हणजे कुंटणखान्याच्या तालमी असें मी तरी समजतों. एकूण काय! सुभेदार तुमच्या या डबीरांचें घराणें असें सारें किडकेंच आहे, समजलांत?

सुभे.—पण एकच आडनांव अन् गोत्र झालें म्हणून त्यांतलीं सगळीं कुटुंबें सारखींच नसतात कांही. भाऊसाहेबांचें औरस घराणें निर्वंश होऊन जाईल. पण मी माझा मुलगा दत्तक देऊन त्यावर कलम कसें छान बांधतों पहा! माझा बाजीराव कांही भाऊसाहेब डबीरांच्या घराण्याच्या शाखेंत जन्माला आलेला नाही, झालें तर! त्यांच्या घराण्याची कीड मी काढून झाडून टाकणार.

दिवाण--किती परोपकारी तुम्ही सुभेदार! आणि भाऊसाहेबांच्या संग्रहीं असलेल्या लाखों रुपयांचीहि कीड तुम्हीच धुऊन काढणार म्हणायचे!

सुभे.--तें मात्र नाही हां तसें! ती कीड माझ्या एकट्याच्या हातून धुऊन निघायची नाही. त्या कामांत मला आपली मदत लागणार आणि ती मी घेणार! माझा बाजीराव उद्या भाऊसाहेबांचा दत्तक मुलगा तर होऊं द्या, मग पहा कशी पैशाची कीड धुऊन टाकतों ती. त्या पैशाला बाहेरचें उन्ह दिसलें म्हणजे कीड जाईल.

दिवाण – अस्सें. हा इमारतीचा नकाशा तर ठीक झाला. पण तिचा पाया भरण्याची काय व्यवस्था केलीत? कारण तुम्हांला माहीतच आहे कीं, दत्तविधानाला यजमानसाहेब प्रतिकूल आहेत. तैनात चालायची तर दरबारची परवानगी पाहिजे. यजमानसाहेब ती नाही म्हणाले तर वर पोलिटिकल एजंटांकडे जावें लागेल. तिकडे जायचें म्हणजे दरबारखर्च अंतस्थ करायला हवा. शिरस्तेदारसाहेबांना प्रसन्न करून घेतलें पाहिजे. पांच हजारांची तयारी पाहिजे. मारवाडी गांठून ठेवा.

सुभे.--रतनचंदाला गांठून ठेवला आहे. अन् त्याला आपणाकडे पाठविला होता त्याच्या कामानिमित्त. मग तो कांही बोलला का आपणाशीं मला कर्ज देण्यानिमित्त?

दिवाण--बोलला, पण तुम्हांला कर्ज द्यायला कचरतो जरासा. म्हणतो कसा, रक्कम तयार आहे, पण थोडथोडकी नाही. आणि असामी तर म्हणे अशी!

सुभेदारांची अशी परस्पर कुचेष्टा करायला सांपडल्यावर दिवाणसाहेब काय म्हणून सोडतील? सुभेदाराला ती थट्टा झोंबली. पण दिवाणसाहेबांच्याऐवजीं मारवाड्यावरच घसरून त्यांनी आपलें समाधान करून घेतलें. ते रागाचा आवेश आणून म्हणाले—

"असामी तर अशी, असें म्हणतो का हा तीन शेंड्या भामटा? बरें म्हणावें, तर दाखवितोंच तुला ही असामी कशी काय आहे ती?"

पण कुचेष्टेंतून कुचेष्टा काढण्याच्या हेतूने सुभेदार म्हणाले—

"पण मी एक असो; आपली तर भलावणी त्याला पटण्यासारखी आहे ना!"

दिवाण—मी भलावणी देईन, पण ती तोंडीं. मी पडलों दिवाण, मला अशा कामांत लेखाने गुंततां येत नाही हें तुम्ही जाणतांच. मी तोंडीं त्याला काय मागावयाचें तें सांगितलेंच आहे, त्याची नको काळजी!

सुभे.—म्हणजे सावज गांठावें मी अन् शिकारहि मींच करावी?

दिवाण—वा तें काय म्हणून? बंदूक भरून तुमच्या हातांत द्यायला मी सदा तयार आहेच ना? झालें तर. शिवाय मुलगा श्रीमंताच्या घरीं दत्तक जायचा तो तुमचा आहे सुभेदार, माझा नव्हे. औरस मुलगा प्रसवण्याचे श्रम जसे जनक आईला करावे लागतात, तसे औरस मुलगा श्रीमंताच्या घरीं दत्तक द्यायचे श्रम जनक बापाला करावे लागतात; बारशाप्रमाणे दत्तविधानाच्या मेजवानीला हजर राहून लाडू खायचेंच काम तिऱ्हाइतांकडे असतें तें करावयाला मी केव्हां नाही म्हटलें आहे सांगा बरें!

दिवाणसाहेबांनी अगदी काडीनेच काडी झाडल्यासारखें केलेलें पाहून सुभेदारांना मनांतून खूपच राग आला. पण करतात काय? म्हणून तो गिळून त्यांनी लाघवीपणाचा प्रयत्न पुन्हा केला.

सुभे०—दत्तविधान होऊं तर द्या? मग लाडवांना काय कमी? पण सर्वतोपरी कर्तुमकर्तुं आपल्याकडे आहे. मी दुबळा माणूस काय करणार? रतनचंदाला भीड आपणच घातली पाहिजे. आणि सरकारदरबारीं दत्तकाच्या परवानगीचें कामहि आपणच पार पाडूं शकणार पो. एजंटसाहेबापर्यंत. दिवाणसाहेब मी सर्वस्वी तुमचा आहे. पदरांत घ्या!

असें म्हणून सुभेदारांनी दिवाणसाहेबांचे प्रत्यक्ष पायच धरले. मात्र मनांत म्हणाले, 'अडला हरि—गाढवाचे पाय धरी'!

असो. मग इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर संभाषणाची म्हणजे कुत्सित टीकेची संक्रांत खुद्द नव्या महाराजांवरच वळली. शिरस्तेदार म्हणाले, "पण काय हो दिवाणसाहेब! यंदाच्या आमच्या सत्काराचा थाट कांहीं वेगळाच दिसतो तुमच्या संस्थानच्या दरबारीं!"

दिवाण—अहो, इतका तरी थाट आहे हें भाग्य समजा. आहे हाच क्रम पुढे असा चालू राहिला, तर पो.ए. साहेबांची नवलपूरला भेट चटश्राद्धाप्रमाणे तडकाफडकी उरकली जाईल. माझें काय म्हणा! मी एका वर्षाने दिवाण राहतों कुठे! पण तुमची शिरस्तेदारीची अजून पांच तरी वर्षे जायचीं आहेत!

शिरस्तेदार डोळा मिचकावून हलक्या आवाजानें म्हणाले, "तुम्ही जाता कीं तुमचे यजमानसाहेबच जातात, म्हणजे अधिकारभ्रष्ट होतात, हें कुणी सांगावें?"

सुभे.—खरें खरें तें! दिवाणसाहेब या संस्थानाच्या दिवाणगिरीला असे चिकटले आहेत, कीं जसा कांहीं सोन्याला डाकच! ते कसचे निघतात? उलट नवे यजमान मात्र तारेवर कसरत करणाऱ्या डोंबाऱ्यासारखे वाटतात. केव्हा उलथून खाली पडतील याचा नियम नाही.

शिर.—पण नव्या यजमानासंबंधानें गांवांत लोकमत तरी कसें काय आहे?

दिवाण.—तें काय तें सुभेदारच तुम्हाला सांगतील. त्यांना त्याचें चांगलें वर्णन करतां येतें.

शिर.—काय हो सुभेदार, आपले यजमानसाहेब कसे काय आहेत?

सुभे.—अगदी असायचे तसे! नाकडोळे जिथल्या तिथे ठीक आहेत.

शिर.—लोक तर त्यांची स्तुति फार करतात.

सुभे.—करायचेच! तरणें पोर. बरें गोंडस दिसतें. पोषाक साधा पण नीटनेटका करतें. तेव्हां लोक वाखाणणारच!

शिर.—कोणी म्हणतात, नवे यजमानसाहेब फार विद्वान् आहेत!

सुभे.—हो! विद्वान् तर! भोवती पुस्तकांचे डोंगर रचून मध्यें अदृश्य होऊन बसतात खरे. मग काय वाचतात, कीं झोंप घेतात कुणाला ठाऊक?

शिर.—कोणी म्हणतात, नवे यजमानसाहेब फार उद्योगी आहेत!

सुभे.—अहो उद्योगी कसचे? तिडतिडे म्हणा पाहिजे तर! एका ठिकाणीं कधी बूड टिकेल तर शपथ. काबाडकष्ट करून बाळपण गेलें. रिकामें बसवतें कुठे? म्हणून हाताला येईल तो कारभार ओरबाडीत सुटतात झालें!

शिर.—कोणी म्हणतात नवे यजमानसाहेब मोठे मर्यादशील आहेत.

सुभे.—मर्यादशील? हं! शिळपट हवें तर म्हणा! अहो, इंग्रज सरकारच्या कृपेमुळे कुणालाहि संस्थानची गादी मिळेल. पण श्रीमंतीचा थाट व मोठेपणा उपजतच अंगचा असावा लागतो! भिकाऱ्याच्या पोरांनी ऐट आणि उन्मत्त-पणा अंगीं उसना आणायचा म्हटला तरी तो कसा येणार?

शिर.—कोणी म्हणतात, नवे यजमान मोठे उदार आणि खर्चिक, सढळ हाताचे आहेत?

सुभे.—फुकटचा पैसा उधळायला त्यांच्या काकाचें काय जाणार?

शिर.—कोणी म्हणतात, नवे यजमान भिकाऱ्यांचाहि नीट परामर्श घेतात?

सुभे.—होय. सजातीयांवर त्यांचें प्रेम आहेच तसें!

शिर.—म्हणे, कोणाला नाही म्हणून म्हणतच नाहीत!

सुभे.—नाही म्हणायला अंगांत धैर्य लागतें ना?

शिर.—त्यांचा अंमल करडा होणार म्हणे?

या ठिकाणीं मात्र दिवाणसाहेबांना मध्यें तोंड घातल्याशिवाय राहवेना. ते मिशांवर हात फिरवीत म्हणाले—"अरे जा! माझ्यासारखा फर्डा दिवाण असल्यावर करडा अंमल करण्याची गोष्टच बोलायला नको! फारच झालें तर तेरड्याचा रंग तीन दिवस टिकेल. आधाशासारखे हें याचें काम पाहूं, कीं त्याच्या कामाची चौकशी करूं, कीं त्याला शिस्त लावूं, असं चार दिवस करतील. आणि मग सहजच कारभाराचें अजीर्ण होऊन पडतील एखाद्या डोंगरावर जाऊन थंड हवा खात महिन्यान्‌महिने. मग इकडे आम्ही आहों आणि कारभार आहे. पाहून घेऊं. आणि ही तीन दिवस तरी कारभाराची हांव कां तें सांगूं?

शिर.—सांगा पाहूं?

दिवाण—अहो, अद्यापि लग्न झालें नाही म्हणून! लग्न झालेल्या कांही संस्थानिकांना राणीसाहेबांचा समाचार घ्यायला दिवसाचे चोवीस तासहि पुरत नाहीत!

शिर.—मला वाटतें, दिवाणसाहेब, यजमानसाहेबांकरिता एखादी मुलगी पाहा ना चांगलीशी! म्हणजे तुमच्यामागचा हा त्रास चुकेल थोडासा.

सुभे.—अहो शिरस्तेदारसाहेब, यांना मुलींना काय तोटा? पण यजमानसाहेब बाशिंग बांधून घ्यायला तयार व्हायला पाहिजेत ना? आजवर कोणी संस्थानिक इतक्या वयाचा लग्नाशिवाय राहिलेला पाहिला आहांत काय?

शिर.—आमचा एजंटसाहेब तर मनांत आश्चर्यच करून राहिला आहे. मला हळूच एकीकडे तोंड करून काय म्हणतो लेकाचा—काय शिरस्तेदार! हा कोण कॅथॉलिक मंक का पोप तुमच्या नवलपूरच्या गादीवर बसला आहे लग्न न करण्याच्या शपथेने बांधल्यासारखा?

सुभे.—आमच्या इथे तोंडची शपथ घेतलेली दिसत नाही. पण ब्रह्मदेवानेच मुळांत घातलेली असली तर कुणाला ठाऊक? मला वाटतें, यांचा जन्म असाच लग्नाशिवाय जाणार! बरें, यापुढे लग्न करायला निघाले, तर यांच्याजोगी घोडनवरी यांना कुठली मिळणार?

दिवाण—कां बरें? भाऊसाहेब डबीरांची मुलगी विमल आहे ना अजून अविवाहित?

सुभे.—होय बुवा, एखादा आय. सी. एस्. किंवा संस्थानिक मिळावा म्हणून जन्मापासून गौरीहर पूजित बसल्यासारखी दिसते खरी. पण ती शेवटीं लग्न करून आपली स्वतंत्रता गमवायला तयार होईल कीं नाही कुणी सांगावें?

शिर.—आणि झाली म्हणजे मग यजमान विद्वान् आणि यजमानीणबाई विदुषी! मग काय थाट विचारावा? कुठेहि जायचें तर अगदी उघडया गाडींत जोडप्याने. असेंच ना?

दिवाण—अहो, हे कसचे थाट करणार? थाट करणाराचें तोंड आताच दिसतें आहे. मिजास बादशहाची पण नांदणूक कैकाडयाची! अगदी असा प्रकार आहे या आमच्या इथे. थाट पाहावा असा आमच्या जुन्या यजमानांचा! त्यांच्या थाटाची का सर यांच्या थाटाला येणार आहे कधी?

शिर.—मीं नाही पाहिलें कधी तुमचे जुने यजमान! त्यांचा थाट या कामीं कसा काय होता बुवा, सांगा ना?

दिवाण—असें पाहा. नवे यजमानसाहेब येऊन जाऊन एकटी एक यजमानीण मिरवणार अन् नाचविणार जिथे तिथे. पण आमच्या जुन्या यजमानांचा जनानखाना म्हणजे, तो दरबारचा एकोणिसावा कारखानाच होता म्हणा ना? जातील तिथे नवी यजमानीण! त्यांच्या अंतःपुराचें वैभव काय वर्णावें? पोशिंदा अन् भोक्ता खरा! यांच्या नांवाने स्त्रियांनीं कुंकू लावतां लावतां सबंध डबी संपायची एकाच बैठकींत! दसऱ्याच्या सणाला त्यांची स्वारी निघाली म्हणजे हत्ति-हत्तिणींच्यामार्गे जनानखान्यांतल्या पालख्यांची रांग लागायची. ती संपतां संपत नसे. जसा कांही तारकांतून चंद्र चालला आहे! तें इंद्राचें ऐश्वर्य खरें! आमचे नवे यजमान म्हणजे तटाणीवर स्वार झालेले शामभट!

शिर.—बरें, यांनी लग्न न केलें म्हणजे फिरून आली दत्तकाची वेळ. असेंच ना?

दिवाण--पण ऐकतों, कीं यांना दत्तक संस्थाच नापसंत आहे म्हणे! कायदा करणार दत्तकाविरुद्ध!

शिर.—सरकारचें आयतें बरेंच होईल. हे मेल्यावर यांचेंच उदाहरण सांगून यांचाच कायदा दाखवून सरकार म्हणेल करा संस्थान खालसा. आणि यांनी लग्नच न केलें तर दत्तक कुणाच्या मांडीवर द्यायचा, तुमच्या कीं माझ्या? आणि दत्तकाचा अर्ज करणार कोण? संस्थानी प्रजेला कांहीं तो अधिकार पोंचत नाहीं. प्रजेला सरकार सांगेल-"तुमचा बाप गेला. आता त्याचे बाप आम्ही आलों त्याच्या जागेवर. कर भरा. स्वस्थ राहा. राजा कुणी का असे ना? राज्य चालूच आहे!

असो. अशा रीतीने अनेकांची अनेक प्रकारची नालस्ती करून झाल्यावर मंदिरामदाने तिघांनाहि आपल्या ताब्यांत घेतलें व मग त्या स्थितींत त्यांच्या तोंडून काय प्रलाप निघूं लागले व त्यांच्या हातून कशा प्रकारच्या चेष्टा घडूं लागल्या याचें वर्णन न करणेंच बरें! पोटांत कांहीच न ठरण्यासारखी स्थिति प्राप्त झाली म्हणजे सत्यवक्तेपणा, काव्य व वक्तृत्व या गुणांत मद्यपी मनुष्यावर कोणीहि ताण करूं शकत नाहीं!

---

८ भाऊसाहेबांचें भूत-भविष्य

पोस्टांतून आलेल्या पत्राचा सुगावा बायकोने लागूं दिला नाहीं, तें पत्र फाडलें म्हणून मोकळी झाली, ही गोष्ट भाऊसाहेबांच्या मनाला लागून राहिली. भागानगरच्या कोणा मामेमावसबहिणीकडून खुशालीचें पत्र आलें होतें असें सांगितलें, यावर भाऊसाहेबांचा विश्वास न बसावा हें अगदी साहजिक होतें. त्यांचा स्वभाव आधीच संशयी होता. आपल्या बायकोच्या वर्तनांत कधी कांही गैरशिस्त असें त्यांना पूर्वी आढळून आलें नव्हतें तरी, आपल्या स्त्रीच्या चारित्र्याविषयी पुरुषाच्या मनांत केव्हा कसा संशय शिरेल हें सांगवत नाही. नळराजाच्या पायाच्या टांचेंत पाणी न लागलेला राईयेवढा भाग उरला. त्यांतून कलीने त्याच्या अंगांत प्रवेश केला. परीक्षिति सर्पाच्या भयाने पाण्यांत बंगला बांधून राहिला, तरी माळणीच्या पाटींतल्या बोरांतून अळीच्या रूपाने तक्षकाने बंगल्यांत शिरून परीक्षितीला दंश केलाच कीं नाही? स्त्रियांच्या वागणुकी-

संबंधाचा पुरुषांचा संशय हा असाच असतो. कली किंवा तक्षक यांच्यासारखा हा संशय पुरुष द्वेषबुद्धीनें मुद्दाम उत्पन्न करीत नाही हें खरें; पण त्याची भूमिका सहजासहजीच इतकी तयार असते कीं, निमित्त पुरण्याचा अवकाश! त्या पौराणिक अळीप्रमाणे तो संशय विषारी सर्पाचें रूप तेव्हाच धरतो, किंवा कापसाच्या राशीवर पडलेल्या ठिणगीप्रमाणे तो एकदम ज्वाळांच्या रूपानें भडकतो.

मनुष्याला रिकामपण असलें म्हणजे त्याला भ्रमाची बाधा फार होते. भाऊ-साहेबांना वर्तमानपत्रांखेरीज दुसरें कांही एक वाचण्याचा नाद नव्हता. एखादे दिवशीं वर्तमानपत्रें कमी असलीं म्हणजे ते सरकारी नोकरीच्या वेळचे कागद-पत्रच चाळीत बसावयाचे.

आज भाऊसाहेब हेंच कागदपत्र पाहत बसले होते. तों फिरून सुभेदारांची स्वारी आली. दत्तकप्रकरणीं बोलणें पूर्वीं शिल्लक राहिलें तें आज पुढे चालू करावें असा त्यांचा बेत होता. सुभेदार हे भाऊसाहेबांच्याच घराण्यांतले व एक प्रकारें आप्त. यामुळें सुभेदारांशीं तें गप्पागोष्टी बोलत असत. विशेष रहस्य नाही पण विशेष तिरस्कारहि नाही. सुभेदारांच्या लाघवीपणामुळे भाऊसाहेबांच्या तोंडून एखादें काम निघालें कीं लगेच तें सुभेदारांनी उचलावें, करण्याची तयारी दाखवावी, यामुळे तें त्यांच्यावर केव्हा केव्हा सोपविलेंहि जाई. आज कागदपत्र चाळतांना हवें होतें तें पुडकें भाऊसाहेबांना आढळेना म्हणून आयत्याच आलेल्या सुभेदारांना ते म्हणाले--

"सुभेदार, चढा हो त्या स्टुलावर ज़रा, आणि त्या सिसवी फळीवर तांबड्या रेशमाच्या फडक्यांत कागद असतील ते खाली घ्या जरा."

भाऊसाहेबांचें काम करण्याची संधि ही सुभेदारांना पर्वणीच वाटली. त्यांनी 'हो, हो' म्हणून चटदिशी स्टुलावर चढून ते कागद काढले, व भाऊसाहेबां-पुढे ठेवले आणि भाऊसाहेब ते चाळायला सुरुवात करणार तोंच सुभेदार म्हणाले—

"आपण कशाला तसदी घेतां? धुरळ्याचा हात लागून चष्मा खराब व्हायचा. मीच चाळतों आणि सांगतों कसले कसले कागद आहेत ते.

अशा युक्तीने भाऊसाहेबांच्या घरच्या कागदपत्रांत आपला प्रवेश झाला तर तो सहजच सुभेदारांना इष्ट होता. पण सुभेदारांनी जें कारण म्हणून पुढे केलें तेंच विचारें थोडें आडवें आलें. भाऊसाहेबांच्या घरांत! आणि हाताला

लागण्यासारखा कोणत्याहि सामानावर धुरळा! काय बिशाद! हा धुरळा म्हणजे तो सामानावर नव्हे तर आपल्या अब्रूवर उडणारा केर, असें या संसारदक्ष म्हाताऱ्याला वाटत असे; म्हणून त्याच भावनेने तो सुभेदारांना म्हणाला--

"काय म्हटलेंत सुभेदार! माझ्या घरीं सामानावर केर! गोष्ट होणार नाही. पाहा-हात लावून पाहा, पैज लावीन, दंड देईन, धुरळ्याचा एक कणहि मिळेल तर!

सुभेदारांनी त्याच स्वच्छतेच्या कौतुकाचें निमित्त केलें. "वा! याचें नांव स्वच्छता" असें म्हणून ते भराभर कागद चाळूं लागले. पांच-चार कागद होतांच ते म्हणाले-

"हें तर आपल्या सर्टिफिकिटांचें पुडकें आहे!"

भाऊ.--ठीक ठीक. तर मग हवें होतें तेंच पुडकें सांपडलें. आज जरा रिकामपण होतें. तेव्हां सर्टिफिकिटें काढून चाळून निवडून त्यांचें एक छोटेंसें पुस्तक छापावें असें मनांत आलें होतें म्हणून पाहात होतों.

सुभे.--वाः! ही तर फारच चांगली योजना होईल. जुन्या आठवणी, या ज्याच्या त्यालाच काय पण विषयपरत्वें इतरांनाहि मनोरंजक होऊं शकतात. आणि इतिहास बनवितात ते अशाच आठवणींच्या साहाय्याने. आपल्या नोकरीचा अनुभव म्हणजे तो एका काळचा इतिहासच म्हणा ना! मी वाचूं का एकेक सर्टिफिकीट काढून? म्हणजे त्यासंबंधाची अवांतर माहिती आपण मला सांगूं शकाल.

स्तुतीचे शब्द आपले आपण वाचून आनंद होतोच; पण ते दुसऱ्याच्या हातचे तिसऱ्याने वाचून आपणाला ऐकविले तर त्याचें सुख त्रिगुणित होतें! यामुळे सुभेदारांना हवी होती ती परवानगी सहजच मिळाली. त्यांनी एकेक सर्टिफिकीट काढावें व वाचावें असा क्रम सुरू झाला.

सुभे.--हें पहा पहिलें सर्टिफिकीट! खाली अरंडेल कीं एरंडेल अशा सहीचीं अक्षरें दिसतात.

भाऊ.--होय. एरंडेलसाहेबाचें सर्टिफिकीट! एरंडेलसाहेब म्हणजे पराकाष्ठेचा गोड माणूस! काय लिहितो बरें त्यांत?

सुभे.--'भाऊसाहेब डचीर हा माझा शिरस्तेदार होता. तेव्हा दोन गाढवां-वर लादून येणाऱ्या टपालाचा हा एकटा फडशा करी!' भाषा जरा संदिग्ध दिसते नव्हे का?

भाऊ.—छेः छेः ! साहेब लोक शब्द संदिग्ध किंवा वेळी वाईटहि वापरतील, पण त्यांचा हेतु मात्र स्पष्ट व स्तुत्य असतो हो ! तें सर्टिफिकीट छापायचेंच. त्यांत माझ्या कामाच्या तरतरीबद्दलचा, उरकाबद्दचा दाखला आहे. हं बरें तें दुसरें ?

सुभे.—शिवन-श्वान अशा कसल्याशा सहीवर आहे तें.

भाऊ.—आठवलें. आमच्या श्वानसाहेबांसारखा सुस्वभावी अधिकारी मिळायचा नाहीं कुठे. कुत्र्यासारखा वेळीं अंगावर ओरडेल, पण दांत लावायचा नाहीं. काय लिहितो बरें तो त्या कागदांत ?

सुभे.—'आमच्या मडमसाहेब विलायतेला गेल्या, घरीं कोणी पाहणारें नव्हतें. तेव्हा मिस्टर डबीर यांनीं मला कांहीं कमी पडूं दिलें नाही. माझी सर्व प्रकारची सरबराई त्यांनीं अगदी उत्तम प्रकारें ठेवली. सरबराई अशी करावी त्यांनीच.'

भाऊ.—ठीक. हें सर्टिफिकीट मला अगदीं न मागतां दिलें बरें का ? जो स्वतःची किंवा लोकांची सरबराई उत्तम ठेवूं शकत नाही तो अंमलदार कसचा ? ठीक. हें छापायचें. बरें पुढचें ?

सुभे.—तें कोणा फेअरहँडसाहेबाचें दिसतें. अक्षर मात्र किती किचकट आहे हें ! शाळेंत मास्तराने कधी पुस्तीवर—खरड्यावर घातला नव्हता जसा कांही.

भाऊ.—छेः छेः ! साहेब लोकांच्या अक्षराची मौजच अशी असते. किचकट, पण तेंच मोठें वळणदार ! कोणी म्हणेल कुत्र्या-मांजराचे पाय. पण तेच पाय कसे अगदी ठेक्यावर, पाउंडावर पडायचे ! जशी कांही लष्करी जवानांची परेडच. लेफ्ट तर लेफ्ट, राईट तर अगदी राइटच ! दोनदां लेफ्ट किंवा दोनदां राईट एकामागून एक पडायचेंच नाही कसें ते ! हं काय लिहितो आमचा फेअरहँडसाहेब ? सर्टिफिकीट बहुधा शांतापूरच्या दंग्याच्या वेळचें असावें !

सुभे.—'मिस्टर डबीर यांच्यासारखा धोरणी मनुष्य मिळायचाच नाहीं. दुष्काळाच्या सालीं त्याने वाटेल त्या तऱ्हेने धान्य मिळवून चार दिवसपर्यंत स्वस्त दराचें दुकान बाजारांत लावलें त्यामुळे मोठें काम झालें.' काय काम झालें भाऊसाहेब ?

भाऊ.—अहो, काम कसचें ? एका स्वस्त दराच्या दुकानाने का कोठे गांवचा दुष्काळ निभावतो ? पण त्या दुकानचे स्वस्त भाव सहीनिशी लिहून

घेऊन साहेबाला सरकारकडे रिपोर्ट करतां आला कीं, दुष्काळच्या गप्पा बऱ्याच खोटया आहेत म्हणून! झालें. रिपोर्ट टपालांत पडल्याबरोबर ज्या वाण्यांकडून धान्य आणलें होतें त्यांना मीं म्हटलें, "स्वस्त दराचें तुमच्यावरचें संकट टळलें. वर रिपोर्ट केला दुष्काळ नाही म्हणून. आता चालू देत तुमचे जुने महागाईचे दर. फक्त स्वस्त दराचें दुकान लावण्याकरिता तुमच्याकडून धान्य नेलें त्याचे पैसे मात्र मजजवळ मागयचे नाहीत."

सुभे.—अरे, होय कीं! खरें धोरण तें हेंच. आमच्यासारखा माणूस गडबडून जायचा. पण हें सर्टिफिकीटहि छापणारच का?

भाऊ.—कां नाही? खरें धोरण संकटाच्या वेळींच दिसायचें!

सुभे.—हें, हें सर्टिफिकीट निघालें–कुणाचें? 'डफर' अशी सही आहे खाली स्वच्छ.

भाऊ.— वाः! डफर म्हणजे केवढा बुद्धिमान् साहेब होता म्हणतां?

सुभे.—तो लिहितो— 'मिस्टर डबीर कोतवालीचें काम करीत होता. तेव्हां चोऱ्या मनस्वी होत. परंतु फिर्याद म्हणून सहसा पुढे येत नसे. इतका त्याचा अंमल करडा असे.' छेः, भाऊसाहेब. याचा अर्थ लोक नीटसा करणार नाहीत. मला वाटतें हें सर्टिफिकीट छापूं नये.

भाऊ.—अहो, लोकांच्या अर्थाशीं मला काय करायचें आहे! अंमल करडा होता यांत काय ती खरी स्तुति आहे. तें सर्टिफिकीट छापायचेंच.

असो; अशाच रीतीने इतरहि सर्टिफिकिटें वाचून झालीं. पण त्यांतलें एकहि छापण्याच्या दृष्टीनें भाऊसाहेबांनी नापास केलें नाही. रेशमी रुमाल परत बांधून झाल्यावर सुभेदार म्हणाले—

"भाऊसाहेब, आपल्या अंमलदारीची कीर्ति मीं पुष्कळ ऐकली होती. पण हीं सर्टिफिकिटें वाचायला मिळालीं नव्हतीं कधी. हें पाहा, आपलीं हीं सर्टिफिकिटे म्हणजे आपल्या एकट्या व्यक्तीचें भूषण नसून आपल्या डबीर सुभेदार घराण्याचें भूषण आहे. तेव्हा माझी विनंति अशी आहे कीं, हीं सर्टिफिकिटें मी आपल्या खर्चानें सुंदर छापून काढून त्यांचें पुस्तक बनविणार. मला तुमची परवानगी असावी.

भाऊसाहेब खूष झाले. त्यांची कळी उमलली. ते म्हणाले—

"हें पाहा. नोकरपेशाचें खरें बक्षीस म्हणजे सर्टिफिकिटेंच होत. पैसे काय मिळाले आणि खर्च झाले! पण सर्टिफिकिटांतला गौरव हीच काय ती

टिकाऊ वस्तु आणि मौल्यवान् मिळकत असें मी तरी समजतों. मग तुम्हाला काय वाटेल तें वाटो !

सुभेदारांनी या शेवटच्या वाक्याने काळजाला अगदी सर्पदंश झाल्याप्रमाणे उसळी मारली. सात्त्विक रागच तो ! मग उसळी कां न येईल ! सर्टिफिकिटें आपल्या खर्चानें छापण्याचा उदारपणा या महात्म्यानें नुकताच प्रकट केला. आणि असें असून पुन्हा भाऊसाहेब म्हणतातच कीं, "तुम्हाला काय वाटायचें तें वाटो !" काय हा अन्याय किंवा उलटा न्याय ! अगदी दुखवट्याच्या स्वरानें डोळ्यांत अश्रु आणून सुभेदार म्हणाले—

"क्षमा करा भाऊसाहेब. हें बोलणें आपणाला शोभतें का ! आपल्या सर्टिफिकिटांचें मीं यथार्थच वर्णन केलें ना ! मग आपणांला फिरून शंका कां आली, मला त्यांची किंमत वाटण्याची ? ज्या गृहस्थाला अशीं सर्टिफिकिटें लाभलीं, म्हणजे ज्यानें नोकरीसारख्या कठीण कामांत असें यश मिळविलें, म्हणजे ज्याची कर्तव्यबुद्धि इतकी लोकोत्तर आहे, म्हणजे जो बाप म्हणून मुलांच्यापुढे आदर्श असा म्हणून ठेवण्यासारखा आहे, त्याच्या मांडीवर मुलगा दिल्याशिवाय मी राहणार नाही हीच माझी शपथ ! कृपा करा आणि मला दत्तविधानाची तिथि ठरवून सांगा. दत्तविधानाचा ईश्वरी योग असल्याशिवाय कां माझ्या मनांत अशी स्फूर्ति पुनः पुन्हा होत आहे ? आपण व मी दोन असे मी मुळींच मानीत नाही. माझ्या मुलाच्या नशिबांत ; हा योग आहे हें मला ज्योतिषानें सांगितलेंच. मग आपल्याला त्या शास्त्राबद्दल काय वाटत असेल तें वाटो ! आपला प्रभाकर जिवंत असता, तर माझा हा स्वार्थत्याग वांचला असता. असो, तो काळ्यापाण्यावर गेल्याचें आपलें दुःख, आणि माझ्या बाजीरावाला तुमच्या मांडीवर देतांना 'हा यापुढे माझा नाही तुमचाच मुलगा झाला' असें म्हणतांना मला होईल तें दुःख सारखींच समजा !"

इतकें बोलून सफाईदार नटाप्रमाणें सुभेदारांनी आपलें "निष्क्रमण" केलें.

सुभेदार निघून गेल्यावर भाऊसाहेब एकटेच आपल्याशीं विचार करीत बसले होते. हा गृहस्थ कारण नसतां माझीं सर्टिफिकिटें आपल्या खर्चानें छापून सुंदर बुक काढतों म्हणतो. यावरून आपल्यावरचा त्याचा लोभ अगदी उघड दिसतो याविषयीं त्यांना शंका उरली नाही; आणि ते कागद त्याच्या स्वाधीन करण्याच्या निश्चयानें त्यांनी आपल्या गड्याला माडीवर हाक मारली. एक चिठ्ठी लिहिली. आणि त्याबरोबर सर्टिफिकिटांचें पुडकें देऊन, तीं दोनहि

" सुभेदारांच्या जवळ नीट नेऊन देऊन उत्तर आण " असें सांगून त्याची रवानगी केली.

इतक्यांत एक जटाधारीबुवा खाली आल्याची वर्दी वर आली. आणि परवानगी मिळतांच त्या बुवाला आणून पोंचवून गडी सांगितल्या कामाला निघून गेला.

जटाधारी बुवांनी अंगावर फक्त शालजोडी घेतलेली असून खांकेंत एक पोथी, हातांत एक रुद्राक्षांची माळ, कपाळाखाली बनारसी पद्धतीचा शेंदराचा टिळा, असा त्यांचा थाट होता.

या-बसा वगैरे झाल्यावर बुवांनी न बोलतां भाऊसाहेबांकडे बराच वेळ नुसतें रोखून पाहिलें व सामुद्रिक पाहण्याकरिता बेधडकत्यांचा हात मागितला. मागितला काय ? पण जवळ जवळ तो आपणच ओढून हातांत घेतला म्हणावयाला हरकत नाही.

ज्योतिषी व सामुद्रिकवेत्ते यांना अशा प्रकारचा अतिप्रसंग बहुधा क्षम्य असतो. फीचा करार आधी पटेल तेव्हा मग कागदांना हात लावणाऱ्या वकिला-सारखी बुवांची गोष्ट नसते. ब्रह्मचर्य, निःस्पृहता व गूढ विद्येचें ज्ञान यांच्या बळावर जगाला कस्पटाप्रमाणे मानण्याचा हक्क कोणालाहि सहजच येणार! या प्रत्येकांतलें खरें किती याची परीक्षा पुढे काय होईल ती होवो किंवा न होवो; पण डोक्यावरच्या जटा, हातांतली रुद्राक्षांची माळ, अंगावरील शालजोडी आणि कपाळावरची शाक्तपंथी शेंदराची टिकली, ही वरील गुण गृहीत घेऊन चालण्याविषयी, प्राथमिक भलावणी देतात व जामीनकी पटवितात यांत शंका नाही. मौज ही कीं, ज्यांचा ज्योतिषावर विश्वास असतो त्यांचा त्याबरोबर दुसराहि एक विश्वास असतो. तो हा कीं, दैवांत तसा योगच असतो किंवा ईश्वरेच्छेची विशिष्ट प्रेरणाच असते म्हणूनच, ज्योतिष्याला आपल्याकडेच त्याच्या पायांनी, बोलावणें न पाठवितां, चालून येण्याची बुद्धि होते. आणि वरती हें कीं, तो आला असता आपली गांठ पडते! रानांत वाघाची आणि त्याच्या भक्ष्याची गांठ पडण्याचीहि अशींच मीमांसा करतां येणार नाही काय? ज्योतिषी नुसता हातच ओढून घेतो; पण वाघ बैलाचा गळाच पकडतो. कसेंहि असलें तरी, योगायोगाची उपपत्ति एकच! ज्योतिषीबुवांनी हात ओढून घेतांच वाघापुढच्या बैलाप्रमाणे भाऊसाहेब स्तंभितच झाले.

थोड्या वेळाने संभाषण सुरू झालें. " बुवासाहेब कुठून आले ? "

या प्रश्नाला बुवासाहेबांनी उत्तर दिलें तें फक्त एक संस्कृत श्लोक. देव-नमनाचा म्हणून. अर्थ न कळणारा संस्कृत श्लोक म्हणजे भ्रमाचें वातावरण उत्पन्न करण्याला जसा कांहीं देवळाच्या बंद गाभाऱ्यांत घातलेला धूपच !

भाऊ.—काय बुवासाहेब, म्हटलें आपण कुठचे ? आज इकडे कुठून आलां ?

'जरा थांबा' असें म्हणण्याकरिता नुसती मान हंलवून बुवासाहेबांनी आणखी एक संस्कृत श्लोक ठेवून दिला.

भाऊ.—नाहीं, म्हटलें, आपलें कोणत्या शास्त्राचें अध्ययन झालें आहे ?

बुवांनी पाहिलें कीं, श्लोकांच्या तोफांची सरबत्ती पुरेशी झाली. आता लाघवी भाषणाचें पायदळ पुढे ढकलायला हरकत नाहीं.

ज्यो.—कसचें शास्त्र आणि कसचें अध्ययन ? शास्त्र हें मनुष्यजीविता-पेक्षा अधिक मोठें आहे. आणि अध्ययन म्हटलें कीं, त्याला विघ्नें फार. आता विचारतांच तर सांगतों कीं, या ईश्वराधरच्या प्राण्याने ज्योतिषाचा व सामुद्रिकाचा अभ्यास केला आहे थोडासा.

असें म्हणून हात पाहतां पाहतां 'गुरुमाउली, गुरुमाउली' असा मंत्र म्हणण्याचा सपाटा बुवांनी चालविला. सामुद्रिक पाहत असतां जें ज्ञान होत होतें तें बुवांना विस्मयकारक वाटत असावें असें अनेक लक्षणांनी त्यांनी दर्शविलें. केव्हा खेद तर केव्हा आश्चर्य, केव्हा आनंद तर केव्हा दुःख, केव्हा आशा तर केव्हा निराशा ! अशा परस्परविरोधी विकारांचें तुमुल युद्धच त्यांच्या मनोभूमीच्या समरांगणावर चालू असावें ? कांहीं वेळाने सामुद्रिक फलावरून भाऊसाहेबांचें भूत-भविष्य त्यांना सांगण्याचें बाजूला ठेवून बुवांना आपलें आत्मचरित्र भाऊ-साहेबांना सांगण्याची स्फूर्ति झालीशी दिसली.

पण ते ऐकतांना कंटाळून भाऊसाहेब उतावळे झाले व म्हणाले—

" पण आपण माझा हात पाहिला त्याचें सांगायचें राहिलेंच आहे.

ज्यो.—वाः, ते मी कसें विसरेन ? आपणाला कुलदीपक मुलगा लाभणार आहे.

हें ऐकून भाऊसाहेब विचारांत पडले. तें पाहून बुवा म्हणाले,

" महाराज, विचार कसला करतां ? ईश्वराने आपल्या संपत्तीला अमर संततीची जोड दिली नाहीं हें मी जाणत का नाहीं ? आपला औरस पुत्र

असावा, पण त्याचा जन्मभर वियोग व्हावा, असाच उपयोग दिसतो. तसेंच आपल्या पोटीं यापुढे पुत्र संतति नाही हेंहि दिसतेंच आहे.

भाऊ.—हेंहि नाही आणि तेंहि नाही. म्हणून म्हणतो कीं, कुलदीपक पुत्र लाभणार म्हणतां तो कसा हें कळत नाही.

ज्यो.—आपणाला पुत्र लाभणार तो दत्तक घेऊन! आणि त्याचा योगहि शीघ्र दिसतो. मी येऊं आता?

ज्योतिषीबुवा सर्वस्वी निरपेक्ष दिसले, व त्यांना कांही द्यावें असें भाऊ-साहेबांच्याहि मनांत नव्हतें. पण शिष्टाचाराच्या बहाण्याने भाऊसाहेब बुवांना क्षणभर अधिक बसवून घेण्याकरितां म्हणाले—

"बुवासाहेब, मलाहि या तुमच्या शास्त्राचा थोडासा नाद आहे बरें का."

ज्यो.—समजलों समजलों! व्यासंग आहे! योग्यच आहे!

भाऊ.—छेः छेः! व्यासंग कसचा म्हणा. थोडासा नाद आहे आणि तोहि अलीकडेच लागला.

ज्यो.—वृद्धपणीं दृष्टि अंतर्मुख होते. यामुळे अतींद्रिय गोष्टींचें ज्ञान लवकर व बिनचूक होऊं लागतें.

भाऊ.—पेन्शन घेण्यापूर्वीहि मला नाद होता. पण तो वेगळा. तें ज्योतिष थोडें वेगळ्या प्रकारचें होतें.

विश्वास उत्पन्न झाला म्हणजे थोडा विनोद सुचतो. कारण मन खुलें व प्रसन्न होतें.

ज्यो.—तो वेगळ्या प्रकारचा नाद, म्हणजे पण शास्त्राचाच यांत काय शंका?

भाऊ.—म्हणजे असें. तुमच्या ज्योतिषशास्त्राला नऊ ग्रह लागतात. पण मी नोकरींत असेपर्यंत फक्त दोनच ग्रह जाणत होतों.

ज्यो.—ते कोणते?

भाऊ.—सूर्य आणि चंद्र—

ज्यो.—आः! ते तर ज्योतिषशास्त्रांतले मुख्यच ग्रह. त्यांचें ज्ञान अवश्य हवें.

भाऊ.—पण माझा सूर्य कोणता होता हें माहीत आहे का?

ज्यो.—मला गरिबाला काय माहीत?

भाऊ.—माझा सूर्य म्हणजे कचेरींतल्या साहेबाचा चेहरा. त्या चेहऱ्याकडे

पाहून मी शुभाशुभ योग, शकून सगळें कांही ठरवीत होतों. त्याच ग्रहापासून माझ्या संसारसुखाला लागणारी उष्णता मिळत असे. तें तोंड नेहमीसारखें गोरेंगोमटें फटफटीत असलें म्हणजे माझे ग्रह अनुकूल. मग माझ्यावर सौख्य-वृष्टि. पण तो चेहरा रागानें लाल झाला म्हणजे सारे ग्रह बाराव्या स्थानीं! सौख्याचा उन्हाळा! माझें दिनमान आणि ऋतुमान त्या सूर्यावर अवलंबून असे.

ज्यो.—हः हः हः! आपण म्हणतां यांत विनोद आहेच. पण सत्यहि नाही असें नाही. बरें आपला चंद्र कोणता?

भाऊ.—अहो, सरकारी नोकरांचा चंद्र म्हणजे त्यांच्या प्रिय पत्नीचा चेहरा! कचेरींत झालेला सर्व त्रास, पीडा घरीं कुटुंबाच्या चेहऱ्याकडे पाहून निवळायाची, दुसरें साधन काय? बरें, आपणाला थोडे प्रश्न विचारावेसे वाटतात. विचारूं का!

ज्यो.—विचारा विचारा! गुरुस्मरण करून सुचेल तें सांगेन.

पण प्रश्न विचारले जाण्याच्या आधीं आगाऊच थोडी भानगड उत्पन्न करून ठेवावी, म्हणजे उत्तरांत संशयाचा फायदा घेऊन थोडीफार फिरवाफिरव करतां येते. या हेतूने बुवाजी म्हणाले—

"आपला प्रश्न त्रिप्रश्नाधिकारांतला आहे, कीं पंचप्रश्नाधिकारांतला आहे?"

भाऊसाहेबांनी आधीं या प्रश्नाचें उत्तर द्यावें, तेव्हा मग आपला प्रश्न विचारावा! असें झाल्यानें त्यांना मोठी अडचणच पडली. पण अगदी अज्ञान तर दिसूं नये म्हणून, त्रिप्रवर, पंचप्रवर यासारखी दिसणारी ही भानगड टाळण्याकरिता विनय स्वीकारून ते म्हणाले—

"आपल्यासारख्या ज्योतिषापुढें माझा कसला अधिकार? मला ज्योतिषाचा नाद असला, तरी एका प्रश्नांत तीन तीन, पांच पांच प्रश्न विचारण्याइतका माझा अधिकार नाही. म्हणजे माझा तितका अभ्यासच नाही. मला सुचेल तसा एकेरीच प्रश्न विचारीन.

ज्यो.—तरीहि ठीक आहे.

भाऊ.—मला किती भार्यांचा योग आहे?

बुवांनी तर्काच्या गणिताला मनांत सुरुवात केली. समोर भिंतीवर भाऊसाहेब व त्यांचें कुटुंब यांचा फोटो होता. त्यांत भाऊसाहेब उतारवयाचे व कुटुंब

तरुणवयाचें दिसत होतें. तेव्हा द्वितीय कुटुंब सांगून टाकावें असें त्यांनी ठरविलें व म्हणाले--

"आपला हा द्वितीय भार्यायोग असावा असें दिसतें."

भाऊ.—छेः थोडें चुकलें. माझी हल्ली तिसरी बायको आहे !

ज्यो.—बरोबर. मग चुकलें कसें ? आमच्या ज्योतिषशास्त्रांत असा नियमच आहे मुळी कीं, भार्यायोग पाहतांना एक कुटुंब मुळी सोडायचेंच. कारण पुरुषाचें पहिलें लग्न व्हायचेंच ! म्हणून एक भार्यायोग म्हटला म्हणजे दुसरी बायको समजावी, आणि द्विभार्या योग म्हटला म्हणजे तिसरी बायको समजावी ! मीं आपल्याला याच अर्थानें द्विभार्यायोग सांगितला.

इतक्यांत माजघराच्या माडींतून "बाबा, बाबा मीं येऊं का ?" अशी उतावळेपणाची जोराची व थोडीशी रागाचीहि हाक ऐकूं आली. तिला "ये बरं बाळ." असें उत्तर मिळालें. तेव्हा भाऊसाहेब व ज्योतिषीबुवा दोघेहि उठले. बुवांनी घाईघाईनें जिना गाठला, व त्यांना जिन्यापर्यंत पोंचवून भाऊसाहेबहि गादीवर येऊन बसले व त्यांनी चिरूट शिलगावला.

९ विक्रम कीं हरून-अल्-रशीद ?

आज श्रावण वद्य अमावास्या होती. अमावास्या ही काळोख्या रात्रीची परमावधि ! पण तीच एका अर्थानें पुढच्या चांदण्या रात्रीची प्रस्तावना असते. रोग अमावास्येच्या मध्यरात्रीपर्यंत बळावून मृत्यु आणतात. पण त्या मध्यरात्रीपर्यंत जो रोगी वांचला तो तेथपासून पुढे बरा होण्याच्या मार्गाला लागतो म्हणतात. म्हणून अमावास्या हा एका युगांतराचा संधिकाल होय. आमच्या नवलपूरच्या या कथानकांतहि आजची अमावास्या अशीच युगांतर करणारी ठरली.

आज सकाळीं ते दोघे मित्र बोलत बसले असतां महाराज नवलराय मनोहरावर रागावून त्याला म्हणाले--

"मनोहर, मीं तुला पूर्वी पन्नास वेळां सांगितलें असेल तेंच फिरून आज आणखी एक वेळ सांगतों. तुझ्या माझ्यांत कांही फरक मानायचा नाही.

बाळपणचे मित्र हेंच आपलें नातें. मला तूं महाराज म्हणतोस 'अहो, जावो' 'आपण' अशा शब्दांनी बोलतोस तें मला बिलकूल आवडत नाही.

मनो.—नसेल. पण तुमच्या राजपदाची वाट काय ?

नव.—त्या राजपदामुळे प्रेमळ मित्रव्यवहारांचें सुख जर नष्ट होईल, तर तें राजपद सुद्धा सोडून द्यायला मी तयार होईन. केवळ राजा म्हणून मला कुणाशीं मन मोकळें करून बरोबरीच्या नात्याने बोलाचालायला बंदी तर मी आणि माझ्या कैदखान्यांतले बंदीजन दोनहि सारखेच म्हणायचे !

मनो.—राजेसाहेब, भलताच आग्रह धरण्यांत काय अर्थ? तुमच्याशीं लहानपणासारखें अगदीं सलगीने खेळीमेळीने वागावें असें मलाहि नसेल का वाटत ? पण तुमची मर्यादा तुमच्याकरिता नसली तरी लोकांकरिता तरी मला सांभाळलीच पाहिजे. आणि लोकांत असतांना हातून चुकून अमर्यादा होऊं नये, म्हणून खासगी वागणुकींतहि त्या मर्यादेची सवय मला लावून घ्यायला पाहिजे. तुम्ही मनाने कितीहि उदार, आपपर भाव न मानणारे, उच्चनीच भाव न मानणारे असलां, तरी आता राजपदावर आहां. संस्थानिक आहां. तुमची मर्यादा बाळपणाचा मित्र म्हणून मीं न ठेवली तर लोक हसतील ना ? तुम्हाला म्हणतील वेडे आणि मला म्हणतील मूर्ख आणि उन्मत्त. आमच्या आईच्या चित्राची तुम्ही आपल्या खोलींत देवतेसारखी पूजा करतां. कबूल, पण समजा, आई आज जिवंत असती तर ती तरी तुम्हाला चार लोकादेखतां अरे जारे म्हणाली असती काय ? ती व तुम्ही अगदी एकटे असतां तिने कदाचित् तुम्हाला प्रेमाने अरे जारे म्हटलें असतें एखादे वेळीं. नाही, एखादे वेळीं तुमचा कान पिळला असता किंवा गालगुच्चाहि घेतला असता, थट्टेच्या रागाने. पण लोकांत नव्हे ! दुसऱ्या कोणाहि माणसासमोर तिला तुम्हाला महाराज हाच शब्द योजिल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. बहुमान करणें हें व्यक्तीपेक्षां स्थानमहात्म्याकरिता असतें. दिलीप राजाने अजाला आपल्या हाताने सिंहासनावर बसविलें, पण तसें केल्याबरोबर त्याने आपल्या मुलालाच राजा म्हणून नमस्कार केला. शंकराचार्य जेव्हा संन्याशांतला उपसंन्यास घेऊन आपल्या एखाद्या शिष्याला आपल्या जागीं गुरुपीठावर बसवितात, तेव्हा त्या शिष्याला गुरु म्हणून एकवार अभिवादन करतात. राज्य हवें तर महाराज म्हणवून घेतलेंच पाहिजे राजाने प्रत्यक्ष आईकडूनहि. आता याचा सूड म्हणून तुम्ही जर उलट मला नुसतें मनोहर असें न म्हणतां मनोहरपंत म्हटलें तर ती अडचण मीहि सोशीन कशी

तरी. एरवी तुम्हांला आधींच सुधारक असें लोक समजतात असा मला संशय येतो, त्यांतच विक्षिप्त व व्यवहारशून्य या विशेषणांची आणखी भर पडायची! तुमचें दत्तविधान झालें तेव्हा तुम्ही व मी दोघे जाणते असलों तरी राज्य म्हणजे काय हें खरें कळण्याइतके मोठे नव्हतों. पण आतां तुम्हाला भाग्यवान् कां म्हणावें याचें मर्म कळण्याइतका मी मोठा झालों आहे, आणि तें भाग्य कसें हें कळण्याइतकें तुम्ही मोठे झाला आहां. आपली आई कांही ज्योतिषीण नव्हती, पण ती नेहमी म्हणे कीं, नवलरायाच्या डोळयांत मला राजयोग दिसतो.

नव.— पण आजचा माझा वेष आणि वर्तन पाहून ती काय म्हणाली असती मनोहर?

मनो.—तुमचा साधेपणा पाहून तिला वाईट वाटलें असतें असें कां म्हणतां? नाही. पण ती इतकेंच म्हणाली असती "मुलाने आपलें नांव खरें केलें, मुलगा नवलाचा खराच. कारण एवढें राज्य मिळून फिरून तो आपला साधा तो साधाच!

नव.—पण मी यापुढे आणखी ज्या कांही गोष्टी करणार आहे त्या पाहून मात्र तिला असें कौतुक न वाटतां कदाचित् वाईट वाटलें असतें.

मनो.— (आश्चर्याने) म्हणजे असें करण्याचें तरी काय योजलें आहांत महाराज?

नव.—जुन्या पिढीचीं माणसें प्रेमळ आणि उदार मनाचींहि असत; पण राजाने उदारपणा दाखविण्याच्या त्यांच्या कल्पना आणि माझ्यासारख्या नव्या पिढीच्या राजाच्या कल्पना जुळणें कठीण आहे. आपली आई भाविक, धार्मिक स्वभावाची होती. मीं ब्राह्मणभोजनें घातलीं, किंवा रुद्रस्वाहाकार केले, किंवा कोटि लिंगार्चनें करविलीं, आणि त्यांत हजारों रुपये खर्चून दानधर्म करविला तर तो तिला पटला असता; पण माझी राज्य-दान करण्याची कल्पना तिला पटली नसती.

मनो.—आणि ती चांगली कळल्याशिवाय मला तरी ती पटेल असें कशा-वरून? मलाहि ती कल्पना ऐकावीशीच वाटते. सांगा पाहूं.

नव.—जुन्या पिढीच्या लोकांना राज्य हें ज्या अर्थाने आपलें असें वाटत असे तो अर्थ नव्या युगांत टिकणारा नाही. राज्य याचा अर्थ जुन्या काळीं केवळ एकटा राजा असा होता. या नव्या युगांत राज्य याचा अर्थ

राजा व प्रजा दोनहि मिळून असाच होतो. आणि तसा अर्थ जे राजे न मानतील ते लवकरच त्याचें प्रायश्चित्त भोगतील.

मनो.—अहो महाराज, हा समतावाद दिसण्यांत ठीक आहे. पण युरोप-अमेरिकेकडे पाहा. ते लोक स्वतंत्र असतां लोकसत्ता गवसणींत घालायला तयार झाले आहेत. त्या मूर्खांच्या बाजाराचा त्यांना कंटाळा आहे. लंगडीच्या खेळांत पाय दमले म्हणजे आपल्याकरिता धावायला गडी मागून घेतात त्याला 'नवरा' म्हणतात. पाश्चात्य देशांतली दमलीभागलेली लोकशाही डिक्टेक्टर-रूपी नवरा आपल्यावर राज्य करायला मागत आहे. आणि तुम्ही पाहावें तर समानतेचा तंबोरा गवसणींतून काढून लोकशाहीचें रडगाणें गायला सिद्ध झालां आहां! हा उलटा रोजगार नव्हे काय? मुसोलिनी, हिटलर यांना तुरुंगवास सोसून जो अधिकार मिळाला, तो तुम्हाला फक्त या कुशीचे त्या कुशीवर वळून मिळाला. असें असतां त्यांच्याप्रमाणे, अर्थात् राज्याच्या अंतिम हिताकरिता, तो एकतंत्रीपणाने बजावायचा सोडून लोकशाहीच्या नसत्या फंदांत पडायची अवदसा तुम्हाला कां आठवली?

नव.—अरे, पण तुला हें माहीत नाही कीं, मुसोलिनी, हिटलर यांच्या अंगचें बळ हें स्वतः त्यांचें नाही. तें प्रजेचेंच. फक्त त्यांच्या अंगांत संक्रमित झालेलें आहे. हे डिक्टेटर शिकारी कुत्रे, बहिरी चित्ते, टकरी एडके, बकरे यांसारखे बेफाम दिसतात. पण त्यांना बिरडें खोलून सोडणारे, किंवा शिकारीचा खेळ पुरा झाला म्हणजे आवरून मागे घेणारे, शिकारी दुसरेच असतात. जुन्या काळचे जुलमी राजे हेहि एक प्रकारचे डिक्टेटरच होते; पण त्यांचें जुलमी बळ हें केवळ स्वतः त्यांचेंच होतें. देशांतल्या जनतेचा त्यांना पाठिंबा नव्हता, म्हणून पदच्युत झालेल्या सर्व राजांना परदेशांत जाऊन परक्यांच्या आश्रयाला राहावें लागलें. उलट हल्लीचे डिक्टेटर उद्या अधिकार-भ्रष्ट झाले तरी खुशाल स्वदेशांत आपल्या घरीं निर्भय राहतील आणि लोकांना म्हणतील, "अधिकाराचे धनी तुम्ही. दिलात तो अधिकार तुमच्या कल्याणाकरिता गाजविला. आता काढून घेतला तरीहि ठीकच. तो दुसऱ्या कोणालाहि द्या. मी स्वस्थ राहून तुमची गंमत बघत बसेन. तुझ्या मुसो-लिनी-हिटलरसारखें मला माझ्या प्रजेने डिक्टेटर नेमलें तर होईन, कां नाही होणार, त्यांचा मुखत्यार? पण ती मुखत्यारी त्यांनी होऊन मला दिली पाहिजे.

मनो.—युरोप-अमेरिकेचे लोक कुणीकडे आणि संस्थानची प्रजा कुणीकडे? आधीं आपल्या प्रजेची स्थिति नीट पाहा, आणि मग करा विचार त्यांना मोठेपणा देऊन त्यांच्याकडून मुखत्यारी घेण्याचा !

नव.—बरोबर अगदीं, कसें अगदी माझ्या मनचें बोललास. माझ्या प्रजेची स्थिति पाहावी म्हणून मी रात्रीं नगरांत गस्त घालण्याला मधून मधून जाण्याचा बेत केला आहे, आणि आज रात्रींच मीं पहिली गस्त घालणार ! बोल तुझा सल्ला काय आहे तो. ”

मनो.—चांगला मुहूर्त काढलांत कीं अमावास्येचा ! मला विचाराल तर तो बेत तुम्ही सोडून द्यावा हें बरें.

नव.—तें कां ?

मनो.—एक तर शहरच्या रस्त्यांतून अपरात्रीं फिरणें तुम्हांला धोक्याचें आहे. शिवाय अपरात्रीं तुम्हांला कोणी रस्त्यांतून फिरतांना पाहिलें म्हणजे तुमच्यावर भलतेसलते आरोप घ्यायला लोक कमी करणार नाहीत. संस्थानिकांजवळचे लोक मोठे घातक असतात. भोवती त्यांचा गराडा जितका अधिक तितकी संस्थानिकांची बदनामी अधिक !

नव.—पण आपण स्वतः सदाचारी असलों म्हणजे झालें ! लोकापवादाला भिण्याचें काय कारण ?

मनो.—वा, मी तर याच्या उलट म्हणेन राजे लोकांसंबंधाने ! लोकापवाद त्यांनी संभाळला पाहिजे आधीं. मग एक वेळ राजे लोक प्रत्यक्षांत सदाचारी नसले तरी हरकत नाही.

नव.—वा, असें कसें हें उलटें गाडें ?

मनो.—असेंच आहे तें. राजे लोकांचें गाडें हें असें उलटेंच असायचें. पण मला सांगा कीं, गस्तीला जायची तुम्हांला एवढी हौस कां वाटते !

नव.—सांगतों ऐक. नेहमी असें होतें, कीं मी शहरांत अमकीकडे जाणार ही वर्दी मिळाली, कीं तेवढेच रस्ते झाडून साफसूफ करतात !

मनो.—मोठें आश्चर्यच म्हणावयाचें !. तर मग काय राजेसाहेबांची स्वारी जिकडे जायची असें कळेल त्या रस्त्याला सगळ्या गांवचा केर आणून लोकांनीं टाकावा कीं काय ? आणि लोक न टाकतील तर शहर कामगारांनी तशी व्यवस्था मुद्दाम करावी कीं काय ?

नव.—भलतेंच कांही तरी ! तसेंच मी ज्या रस्त्याने हिंडायला निघेन त्या

रस्त्याची रहदारी सगळी बंद करतात. तें पाहून मला वाटतें कीं, मीं काय राजधानींतून चाललों आहे कीं एखाद्या ओसाड रानांतून, कीं स्मशानांतून?

मनो.—वाः, तर मग काय लोकांनी तुमच्या रस्त्यावर खेचून इतकी गर्दी करावी, कीं पायघड्या घातल्याप्रमाणे तुमची गाडी किंवा मोटार अगदी पावला–पावलाने चालावी? आणि चालायला घटका लागायची तिथे तास तास लागावे?

नव.—बोलला फिरून शहाणा! तसेंच रस्त्यांत उगीच कुणावर नजर गेली कीं पुरे, दिसेल त्याने राम राम आणि नमस्कार यांची अशी कांही झोड उठवावी कीं मला उलट राम राम, नमस्कार करतां करतां स्वतःचें नाक खाजवायलाहि उसंत मिळूं नये!

मनो.—खरेंच, लोकांची ही केवढी चूक! रस्त्यांत राजेसाहेब दिसले तरी कोणी प्रजाजनाने त्यांना मुजरा करूं नये, इतकेंच नव्हे, तर स्वतःचें नाक खाजलें तरी खाजवायला हात वर करूं नये! कारण तो तुम्हाला मुजरा वाटायचा! किंवा आपल्या नशिबाला बोल लावण्याकरिता कोणी आपल्या कपाळाला हात लावूं नये! कारण तो तुम्हाला राम राम वाटायचा!

नव.—तूं आपला कांही म्हण, पण माझी तक्रार फिरून सांगतों. माझ्या वाटेवर सगळ्या गांवचा केर येऊन पडावा असें मी म्हणत नाही. पण मीं अमकीकडून जाणार असें कळलें, तर रस्त्यावरून केर स्वाभाविकपणें किती पडलेला असतो गांवांतून जिकडे तिकडे, याची कल्पना मला बरोबर येत नाही. मी येणार म्हणून माझ्या रस्त्यावरची रहदारी बंद व्हावी हा लोकांना अन्याय नव्हे काय? राजरस्ता म्हणजे तो एकट्या राजाकरिता राखून ठेवलेला रस्ता असा अर्थ नव्हे, तर ज्यावरून लोकांबरोबर राजाहि जातो, जाऊं शकतो, असा रस्ता. मला जो भेटेल त्याने सलाम केला तर त्यांत कृत्रिमपणा नाही काय? ज्याच्या मनांत माझ्याविषयी खरा आदर असेल त्याने नमस्कार केला तर तो खरा. तात्पर्य काय, मी राजा या नात्याने दिवसा बाहेर पडतों, गाडी-घोडा, मोटार, शिपाईप्यादा अशा थाटाने हिंडतों फिरतों, यामुळे सगळा नाटकी थाट माझ्या दृष्टीला पडतो. राजनिष्ठेच्या कवायतींचीं हीं छापील चित्रें डोळ्यांना सुख देत नाहीत, मनाला आनंद देत नाहीत, बुद्धीला बोध करूं शकत नाहीत.

मनो.—मग याला युक्ति तरी काय काढली आहे आपण? ज्या गोष्टी

तुम्हाला आवडत नाहीत, त्या लोकांनी करूं नयेत असे खासगी हुकूम द्यावे ? नाही तर उघड जाहिराती लावाव्या.

नव.—त्यांनी उलट गैरसमज होईल आणि भागायचेंहि नाही. कारण दिवसा मी दिसलों कीं लोक मला ओळखणारच—म्हणूनच रात्रीच्या प्रहरीं मधून मधून गस्त घालावी असें मीं योजिलें आहे. त्यांत लोकांच्या संरक्षणापेक्षाहि लोकस्थिति स्वाभाविकपणें असेल तशी दिसावी किंवा ऐकूं यावी असें कांही घडेल. भलत्या लोकांत भलत्या वेळीं वावरलें मधून मधून म्हणजे लोकस्थितीचें खरें चित्र डोळ्यांना दिसेल. जें चित्र अव्याज तेंच खरें मनोहर !

मनो.—मनोहर, असें आपण म्हणालां तें मला उद्देशून कीं चित्राला ! ही कोटी ऐकून राजेसाहेबांना हसूं आलें आणि ते म्हणाले—

" अलबत दोनहि अर्थांनी."

मनो.—मग मी त्याचें उत्तर देतों. ऐका. रात्रीं शहरांत काय मनोहर चित्र तुम्हांला दिसेल तें हा मनोहर तुम्हांला सांगतों. रस्त्यांत बहुधा सर्वत्र अंधार असेल. रोषनाई-कामगारानें तेलाचे पैसे स्वतः खाऊन आपली उपासमार केली म्हणून कंदिलांतील वातीच्या ज्योति दुःखानें कृश व उदास होऊन गेलेल्या असतील. दिवसा रस्त्यांत केर आणि घाण पाणी टाकायची आणि बहिर्दिशेला बसायची लोकांना लाज वाटते ती रात्रीं वाटत नाही. यामुळे तुम्ही जातां तिकडे रस्ते झाडून साफ करतात ही तुमची तक्रार दूर होईल. पण घाणींत पाय भरून चालवें लागेल. रस्ता डोळ्यांना चांगलासा न दिसला म्हणजे तो प्रयत्नानें पाहून तपासून चालावें लागेल. यामुळे उंच-सखलीचा व वळणांचा चांगला परिचय होईल. पण त्यांतच क्वचित् पावलें मुरगाळतील आणि डोक्याला टेंगळें येतील. शांतताप्रिय लोक घरांचे दरवाजे लावून कड्या घालून बसले निजले असतील ते तुम्हांला दिसणार नाहींत. मग ते बिचारे आपले सुखदुःख तुम्हाला कसें सांगणार, कळविणार ? उलट जे लोक रात्रीं अपरात्रीं रस्त्यावर आढळतील ते चंगीभंगी, मगरूर, बदमाष असेच असावयाचे. त्यांची गाठ पडली तर त्यांच्यापासून तुम्हाला काय बोध मिळणार? यथेच्छ दारूपाणी करूनच स्वतःचें दुःख ज्यांना विसरून जावें लागतें, ते तें दुःख तुम्हाला कसें सांगणार ? उलट ही तुमची प्रजा चैनी म्हणून सुखी असाच तुमचा खोटा ग्रह होणार? जे कोणी निशा न करतां शुद्धींत हिंडत असतील यांचेहि विचार लोकांना नसतें दुःख कसें उत्पन्न होईल याविषयी असावयाचे. पण असे लोक तोंडापेक्षा हातावर

भिस्त अधिक ठेवतात. यामुळे त्यांचे विचार तुम्हाला कळावयाचे नाहीत. उलट त्यांच्यासारखाच सावधपणाने रस्त्याने चालणारा मनुष्य हा त्यांना शत्रूसा वाटतो. म्हणून ते नुसत्या कज्जेदलालीला प्रवृत्त होतात! त्यांच्यासारखा आपला जीव राजाने कां धोक्यांत घालावा? येऊन जाऊन उनाड कुत्रीं तुमच्यापुढें तोंड उघडून तुमच्याशीं बोलतील. पण त्यांचें भुंकणें हें देह-स्वभावाचें निदर्शक असतें, इतर कशाचेंहि नसतें. यामुळे त्यांच्यापासूनहि तुम्हाला फारसा बोध होणार नाही. बरें, शहरांत चोऱ्या होताहेत, दरोडे पडताहेत असें कांही असतें तर एक असो; पण हल्ली तसाहि कांही प्रकार घडत असल्याचें ऐकिवांत नाही.

नव.—तूं कितीहि मोडून काढलेंस तरी माझा बेत बदलणार नाही. तूं वर्णन केलेली स्थिति ही मनोहर नसली तरी ती आपल्यापरीने बोधप्रद नाहीं काय? म्हणून ती पाहिलीच पाहिजे.

मनो.—तुमचा बेत मी बोलून बदलूं शकेन अशी उमेद मीं कधीच बाळगली नाही. आपला सल्लाच विचारलात म्हणून सांगितला इतकेंच. पण तो स्नेही म्हणून, प्रायव्हेट सेक्रेटरी म्हणून नव्हे. कारण प्रायव्हेट सेक्रेटरीनें अभिप्राय द्यायचा तो राजेसाहेबांचा कल पाहून तसाच दिला पाहिजे. नाही तर दुसरे दिवशीं चंबुगवाळेंच आवरायला पाहिजे त्याला! असो. खूप केली राजेसाहेब! मला वाटतें बगदादचा बादशहा हरून-अल्-रशीद किंवा अवंतीचा विक्रम राजा यांचें चरित्र वाचून सुचला असला पाहिजे हा बेत आपणाला! आली झालें हुकी त्यांच्या अद्भुतरम्य लीलांचें—लहरींचें अनुकरण करण्याची आपणाला.

असें म्हणून मनोहर हसत हसत जागेवरून उठला आणि नाटकी आविर्भावानें राजेसाहेबांपुढे वांकून मुजरा करून म्हणाला, "बंदगी खलीफ साहेब, बंदगी! आणवा आतां खोट्या दाढ्या, आणि निघूं द्या जुन्या अरेबियन नाइटची नवी आवृत्ति आमच्या या नवलपूर राजधानींत!"

नव.—खोट्या दाढ्या रे कशाला? मी काय चोर आहें?

मनो.—अर्धवटपणा तो यालाच म्हणतात. गस्तीला जायचें तें नेहमीच्या तुमच्या साध्या पोषाखांत कसें होणार? त्याला वेषान्तर अवश्य हवें. हें कसें नाही तुमच्या लक्षांत! मी काय चोर आहें गस्त घालणार? असें विचारतां तर त्याचें उत्तर होय, असेंच मी देतों. प्रजेची स्थिति खरी कळायला

पाहिजे ती चोरूनच पाहिली तर दिसेल. नाही तर तुम्हाला पाहून लोक रस्ते-कसे साफ करतात, गर्दी कशी मोडतात, मुजरे-नमस्कार करून तुम्हाला त्रास कसा देतात याचें वर्णन तुम्ही नुकतेंच केलेंत कीं ! गस्त घालणारा राजा आणि चोरी करणारा चोर यांची रात्रीच्या संचाराची तयारी सारखीच असावी लागते. खोट्या दाढ्या, चोर-कंदील, काळे पोषाख, पंचहत्यारी सरंजाम, सगळे कांही हवें. आणि किल्ल्यांचीं जुडगींहि घ्या कांही बरोबर !

नव.—तीं रे कशाला ?

मनो.—कुलुपें काढायला लोकांच्या घरचीं ! न जाणो, लोकस्थिति पाहायला आपण जाणार आणि ती असली एखाद्या दाराच्या आड लपून तर !

नव.—कर, कर–माझी चेष्टा कर वाटेल तेवढी.

मनो.—यांत चेष्टा कसली ! बरें पण, गस्त घालायला जाणार तर आता मी खऱ्या मनानें विचारतों हां, शिपाई नेणार कीं नाही बरोबर हत्यारबंद ?

नव.—हां असें सरळ बोला, म्हणजे सरळ उत्तर देईन. होय, एखादा हत्यारबंद शिपाई अवश्य बरोबर नेईन, एरवी जाणें धोक्याचें आहे. तसें मी काय म्हणून करीन ?

मनो.—काय म्हणून हें काय ? एकटें गेलें तर धाडस मोठें ! धाडस मोठें तेवढा पुरुषार्थ मोठा ! पुरुषार्थ मोठा तेवढें भूषण मोठें ! भूषण मोठें तितकें राजेसाहेबांचें राजेपण मोठें ! हो, 'रोमान्स'च्या शास्त्राप्रमाणें अशी चढती भांजणी लागावयाची तुमची एखादी. काय नेम त्याचा ?

नव.—ठीक, एकूण तूं मला अगदी लहरी ठरविलेंस !

मनो.—मग त्यांत काय वाईट ? लहरीपणा हा राजे लोकांचा मोठा गुणच आहे आणि तो हक्कहि आहे त्यांचा !

यावर नवलराय हसला व म्हणाला, "राजे लोक लहरी असोत वा नसोत, पण त्यांचें प्रत्येक कृत्य विकृत करून त्यांची निंदा करणारे लोकहि कांही कमी नाहीत.

मनोहराला या गस्तीच्या उपक्रमाची खरोखर मोठी चिंता वाटली. दिवाणसाहेब आधीच वाइटावर. शिवाय शहर म्हटलें म्हणजे रात्रीं रस्त्यावर गल्ली-कुचींतून बदमाष लोकांचा अम्मल. दिवसा महाराज ओळखतां येतात, तेव्हां जो शिष्टाचाराचा फाजील प्रकार होतो म्हणून महाराजांनी तक्रार केली, त्याच्या अगदी उलट प्रकार रात्रीं व्हावयाचा. कारण पाहणारे कोणी नाही. शिवाय

महाराज वेष बदलून हिंडणार. या सर्व गोष्टींचा विचार करून मनोहराने घरीं गेल्यावर पागेंतील विश्वासू रिसालदाराला बोलावून महाराजांच्या गुप्त संरक्षणाची योग्य ती तजवीज केली. मात्र ही तजवीज कळली तर महाराजांना आवडणार नाही. त्यांच्या रोमान्सचा विरस होईल, म्हणून त्या व्यवस्थेचा सुगावा त्यांना लागूं देऊ नको असें त्याला बजावलें.

असो. इकडे याच अमावास्येच्या दिवशीं भाऊसाहेब डबीरांच्याहि घरीं कांहीं विशेष प्रकारची योजना घडत होती व ती काय होती हें पुढील प्रकरणांत कळून येईल.

---

१० डबीरांची विमला

विमलने जोराने व उतावीळपणाने हाक मारली त्याबरोबर भाऊसाहेब व ज्योतिषीबुवा दोघेहि उठले. पैकीं ज्योतिषीबुवा निघून गेले आणि भाऊसाहेब फिरून आपल्या गादीवर स्थानापन्न झाले, तोंच विमल आंत आली. पण तिने हाक मारल्यासारखें कांही बोलणें काढावें तें काढलेंच नाही. ती रागांत तर होतीच; पण नक्की काय बोलावें याविषयींहि कदाचित् तिच्या मनाचा निश्चय होत नसावा.

ती पुढच्या माडीशीं आंतल्या बाजूच्या माडींतून प्रथम वर आली, तेव्हा भाऊसाहेब व सुभेदार यांचें बोलणें चाललें होतें, तें तिने आड उभी राहून बहुतेक सर्व ऐकलें. सुभेदार खाली उतरून जाण्याचे सुमारास पुनः ती आली तेव्हा ज्योतिषीबुवा आले होते. त्यांचेंहि संभाषण तिने आड उभी राहून ऐकलें. हीं दोनहि भाषणें ऐकून तिला फार वाईट वाटलें. आडून ऐकलेल्या दोनहि संभाषणांतून दत्तकाचा विषय तिच्या कानांवर प्रथमच आला यामुळें तिला बरेंच आश्चर्यहि वाटलें. कारण भाऊसाहेब जुन्या विचारपरंपरेचे यामुळे त्यांना दत्तकाची कल्पना सुचणें कदाचित् स्वाभाविक होतें. पण आजपर्यंत ती कल्पना त्यांच्या तोंडून निघालेली तिने कधी ऐकली नव्हती. तशीच माईसाहेबांच्याहि तोंडून.

याचें एक कारण असें असावें कीं, प्रभाकराला जरी जन्मठेपेची शिक्षा झाली असली, तरी जन्मठेपेचे सगळे कैदी कैदेंतच मरतात असें होत नाही.

कांही वर्षें कैद भोगल्यावर प्रभाकर परत येण्याची आशा त्यांनी कां न धरावी ? किंवा राज्यारोहण झालें, राजाला मुलगा झाला अशा आनंदाच्या प्रसंगीं कैदी सुटतात तशाच एखाद्या कारणाने प्रभाकरहि कदाचित् सुटेल असें त्यांना कां न वाटावें? ही विचारसरणी अगदी स्वाभाविक होती. प्रभाकरावर जरी भाऊसाहेबांचा राग होता, तरी तो केव्हाच परत येऊं नये, किंवा फरारीच मरावा, असें वाटण्याइतकी त्या रागाची मजल जाणे शक्य नाही असेंच त्या दोघींना वाटे. पुष्कळ लोकांना दत्तक घ्यावासा वाटला तरी आपला मृत्यु अगदीं जवळ येऊन ठेपेपर्यंत ते त्याचा विचार करीत नाहीत. प्रभाकराबद्दल निराशा झाली होती म्हटलें तरी, भाऊसाहेबांना कुटुंब व मुलगी हे दोन वारस होतेच. आणि मुलीवर तर त्यांचें मुलग्याप्रमाणे प्रेम असे. किंबहुना जास्तीच. यामुळेंहि दत्तकाची कल्पना भाऊसाहेबांच्या मनांत न येणेंहि संभवनीय होतें.

तात्पर्य, कसाहि विचार केला तरी दत्तकाची कल्पना आज कानांवर आली ती नवीन आहे अशी तिची खात्री झाली. शिवाय आड उभी राहून ऐकलेल्या दोनहि भाषणांत या दत्तकाच्या कल्पनेचा पुरस्कार होत होता तो भाऊसाहेबां-कडून नसून, सुभेदार व ज्योतिषीबुवा यांच्याकडूनच झाला, ही गोष्टहि तिच्या लक्षांत आल्याशिवाय राहिली नाही. यामुळे ती खरोखरच मोठ्या विस्मयांत पडली. तिला एक वेळ वाटलें कीं या बाबतींत प्रथम आपल्या आईकडून भाऊसाहेबांशीं बोलवावें. पण थोडया विचाराअंतीं तिला फिरून वाटलें कीं ती गरीब गाय. या विचारांत घेण्याइतकें महत्त्व तिला आपले वडील देतात कुठे ?

तात्पर्य, दत्तकाच्या विषयावर आताच कोणाहिजवळ कांही बोलूं नये अशा विचाराने, तिने बापाशीं उगाच रिकामटेकड्या एकदोन गोष्टींची चौकशी केली. जवळ वर्तमानपत्रें पडलीं होतीं त्यांतलीं एक-दोन चाळल्यासारखें केलें, तुम्हांला कांही दूधबीध आणूं का असें विचारलें व भाऊसाहेबांनी 'नको आता दूध' असें म्हणतांच 'बरं तर' असें ओझरतें म्हणून ती चटकन आंतल्या माडींत निघून गेली. 'इतक्या घाईने हाक मारीत आलीस तर काय काम होतें ?' असें भाऊसाहेबांनीहि तिला विचारलें नाही !

विमल खाली जाते तों माईसाहेब सोमवतीची तयारी करीत होत्या असें तिला दिसलें. त्यांनी ओळखीच्या एका माळ्याकडून एकशेंआठ कमळें आणलीं

होतीं. तीं साफसूफ करून तबकांत रचण्याचें त्यांचें काम सुरू होतें. अर्थातच तीहि बसली व आईला पण मदत करूं लागली.

माईसाहेब सहज म्हणाल्या, "बरा आपला भिवा माळी सांगितल्या कामाला चांगला उपयोगी पडतो. आज सोमवती अमावास्या, त्यांतून श्रावणी सोमवार. म्हणून सहज वाटलें कीं, कमळेंच वाहवीं देवाला. तीं आणून दिलीं त्याने सांगतांक्षणीं." हें ऐकून ओल्या पंचाने कमळें पुशीत पुशीत विमल म्हणाली—

"माई, मला हवें तर तूं नास्तिक म्हण, पण देवाला वाहायला कमळें आणून दे असें म्हणतांच तुला भिवा माळी जसा कामाला आला, तसाच, तूं तीं कमळें अर्पण करून देवाला एखादी प्रार्थना केलीस तर त्यानेहि ती मान्य करावी कीं नाही ग?

माई.—हो. करील कीं! नाही करणार कशावरून? पण ती प्रार्थना भलतीच किंवा आपस्वार्थी असली, नाही तर लोकांना दुःख देण्याची असली तर ती त्याने काय म्हणून मान्य करावी?

विमल—बरोबर आहे. मग सांग बरें, प्रभाकरदादाचें पत्र आल्यानंतर आजची पहिली अमावास्या. त्या पत्रांत दर्शविल्याप्रमाणे तो आज सुखरूप घरीं परत यावा अशी प्रार्थना, कमळें वाहून झाल्यावर, तूं तुझ्या देवाला केलीस तर ती त्याने सफळ करावी कीं नाही? या प्रार्थनेंत कुणा इतराचें कांही तरी नुकसान आहे का? आणि तुझा स्वार्थ असला, तरी त्याच्या मुळाशीं केवळ आईचें प्रेमच नाही काय? शिवाय दादाने झालें तरी बारा वर्षें दुःख सोसलें असेल तें पुरे नाही का? तुझ्यासारख्या पुण्यवान् आत्म्याची निःस्वार्थी प्रार्थना तो न ऐकेल, तर त्याला मी बोल कां लावूं नये?

विमल म्हटलें तर जुन्या स्त्रियांत आणि म्हटलें तर नव्यांत मोडणारी होती. 'पोषाखांत जुन्याकडे आणि विचारांत नव्याकडे' असा तिचा दुहेरी कल असे. चांगला आंगभर पदर काढून ती लुगडें नेसे पण तें उंची असे. आणि नव्या धुलाईची तुकतुकी त्याच्यावर केव्हाहि दिसे. ती चांगला रेशमी पोलका घाली. पण तो लांब पदराने झाकून गेलेला असे व त्याची किनार साधी असे, म्हणजे तिला झालर नसे. ती हातरुमाल बाळगी आणि रबरी चपला घाली; पण केव्हा उघड्या पायाने ती बाहेर पडणारच नाही, कुणाला तशी दिसणारच नाही, असें मात्र नव्हतें. घरापासून कांही अंतरा-

वर देवालय होतें त्याला रोज जातांना ती अनवाणी चाललेली दिसा-
वयाची; पण बाजारांत, मंडईत किंवा दूर हवा खाण्याकरिता हिंडायला
जायचें तर ती बूटहि घाली. तिच्या हातांत सोन्याचे गोट, पाटल्या व बिलवर
घातलेले असत, पण त्याबरोबर बिलोरी बांगड्याहि. कपाळाला कुंकू लावी तें
छानदार मोठ्या चंद्रकोरेसारखें. टिकलीसारखें बारीक नसे. रोज तेल लावल्या-
मुळे तिचे काळेभोर केस नेहमी स्निग्ध तुकतुकीत असत. आणि ते इतके गच्च
व भरदार होते कीं, कपाळावर त्यांचें फारसें आक्रमण होऊं नये म्हणून, ते
चांगले विंचरून दाबून डोक्यावर बसवावे लागत. केस कुरळे नसल्यामुळे
एखादीच वांकडी बट कपाळावर येण्याची, आणि वरचेवर परतविण्याकरिता
हाताला चाळा करण्याची आपत्ति नसे; व तशी येण्याचा ती मुद्दाम प्रयत्नहि
करीत नसे! केसांचा आंबाडा बांधणें हा ब्राह्मणधर्म नव्हे, स्वतः मात्र मोटारीं-
तून बसून हिंडणाऱ्या, शंकराचार्यांचा अप्रयोजक दंडक तिला मान्य नव्हता.
यामुळे ती घाईत असली तर आपल्याच हाताने केस विंचरून, वळवून आंबाडा
बांधी. पण स्वतः तिला वेळ असला आणि आईचा हात मोकळा दिसला तर
ती मुद्दाम आईपुढे जाऊन बसे आणि तिच्या हातची वेणी घालून घेई. त्यांत
तिच्या मनांतलें एक कारण असें असे कीं, वेणी घालण्याच्या वेळीं आई-
बरोबर चार गोष्टी बोलायला सहजच सांपडतात. गृहसर्वस्व अशी ही मुलगी
वेणी घालून घ्यावयाला पुढे बसली म्हणजे आईलाहि प्रेम वाटे; आणि वेणी
घालून संपून शेवटच्या आगवळाला गांठ द्यावयाच्या वेळीं आई मुलीच्या
पाठीवर दोन्ही हातांनी शाबसकीची थाप जोराने मारी ती ऐकूं जाण्यासारखी!
एक दिवस विमल विनोदाने आईला म्हणाली, "कां ग बाई मारतेसशी! मी
काय तुझा गुन्हा केला?" तेव्हा आईहि तिच्यासारखाच हेल काढून म्हणाली,
"वाः गुन्हा नाही तर काय? माझा वेळ मोडलास ना येवढा?" मग विमल
म्हणाली—"वेणी घालण्याची सोडून असा गोष्टी वेल्हाळपणा करीत बसायला
मी नव्हतें कांही सांगितलें तुला." आई म्हणाली, "अग, एरवी कुठली सांपडा-
वयाचीस तूं अशी स्वस्थपणांत? नेहमी धांदलींत! म्हणून लावतें वेणीला जरा
मुद्दाम वेळ. आणखी असे सुंदर केसाचे पेड हातांत आले म्हणजे कुणाला
नाही वाटणार वेणी घालायचें आपलेंहि कौशल्य दाखवावें म्हणून! वेणीच्या
वेणी झाली आणि चार गोष्टींच्या गोष्टीहि झाल्या! वेणी घालणारणीला वेणी
घालून घेणारीने नमस्कार करावयाचा असतो. तो वेणी घालून उठतांना

विमल दुबार करीत तोंडाने म्हणे, 'माई, एक नमस्कार वेणीचा झाला, आणि दुसरा तुझ्या प्रेमाचा बरं का! लक्षांत ठेव!

घरीं ईन मीन माणसें तीन. पैकी वडील आपली माडी, माडीवरची गादी, आणि हातांतला चिरूट कधी सोडायचे नाहीत. आईचा वेळ दिवसा ओवळ्यापेक्षा सोवळ्यांतच अधिक जावयाचा, म्हणून विमल घरीं असली म्हणजे, आल्यागेल्याशीं बोलणेंचालणें करणें, पाहुण्याचा परामर्श घेणें, तसेंच घरीं असेल नसेल तें पाहून बाजारचा जिन्नस आणविणें, गड्या कुणबिणींकडून घर, मागचीं पुढचीं अंगणें, नीट वेळच्या वेळीं झाडून सारवून घेणें, आणि मधून मधून घरांतलें निरनिराळें सामान पुसवून घेणें हें काम विमलकडेच येई; आणि तें सर्व ती मेहनतीने व हौसेने करी. घरांत स्वच्छता ठेवण्याच्या बाबतींत मात्र तिचें आणि तिच्या वडिलांचें मत बरोबर जुळे, व झालाच तर या कामीं आईशींच मतभेद होई. माईसाहेबांची काळजी घेण्याची नजर पोंचे, ती फक्त मागील अंगणांतला तुळशीकट्टा, आणि माजघर आणि स्वयंपाकघर यापर्यंत. आणि तेवढे सगळे जिन्नस मात्र त्या स्वच्छ ठेवीत. तात्पर्य, एक एकाच्या आणि दुसरें दुसऱ्याच्या हौसेने, मिळून या टोकापासून त्या टोकापर्यंत हें घर इतकें स्वच्छ, निर्मळ व प्रसन्न दिसे कीं, त्यासारखें दुसरें घर सगळ्या नवलपुरांत सांपडावयाचें नाही अशी कोणीहि पैज देखील मारली असती!

विमल आपलें लिहिणेंवाचणें तर आपण करीच, पण भाऊसाहेबाची चिठ्ठीचपाटीहि ती पुढे होऊन लिही. आणि ती जें करील तें बिनचूकच असणार अशी तिच्या आईप्रमाणे तिच्या बापाचीहि खात्री असे. दुर्दैवाने विमलचें शहाणपण सर्व कांही उपयोगांत येण्यासारखा घरचा प्रपंच विस्तृत नव्हता. घरचा मुलगा घरीं असता तर एव्हा त्याचें लग्न होऊन दोन मुलेंहि घरीं खेळावयाचीं. पण तो परागंदा! आणि आईबापांना सोडून जावयाचें नाही म्हणून विमलनेहि लग्न केलें नाही. मग संसार वाढणार कसा? पण आहे त्यांतल्या त्यांत घरचा सर्व कारभारीपणा विमलकडेच आला होता व ती तो मोठ्या दक्षतेने करी. घरांत आईने बोडण भरण्याला सवाष्णी बोलावल्या किंवा सत्यनारायण करविला, तर त्याची तयारी करून द्यायला जशी ती तयार, तशीच कोणी सुशिक्षित आप्त नातेवाईक पुरुष पाहुणा घरीं आला तर, त्याच्याशीं मोकळेपणाने बसून बोलून, त्याचें आदरातिथ्य करण्या-

लाहि तिची तयारी असे. तिला पुष्कळ बोलायचालायला हवें असे. यामुळे दुसरें कोणी वेळेवर नाही, तर घरचा म्हातारा गडी व कुणबिणी यांना घेऊन ती गप्पा मारीत बसे आणि त्यांच्याशीं हास्यविनोद करी.

पण उरला वेळ जायचें तिचें मुख्य साधन म्हणजे, तिने स्वतःच काढलेलें लहान मुलांमुलींचें छात्रालय. स्वतःचीं मुलें नसतांहि मुलांचें मानसशास्त्र तिला उपजत बुद्धीनेच जसें कांही कळे. आणि त्यांच्याशीं हसण्याखेळण्यांत खोटें-खोटें भांडण्यांत, त्यांना शिकविण्यांत, जो तिचा वेळ जाई तो फार सत्कारणीं लागला असें तिला वाटे. या कामीं खर्चावयास लागणारा पैसा आपण मिळवीत नाही, तर बापच आपल्याला देतो, ही गोष्ट तिला जाणवत असली तरी तिचें तिला वाईट मात्र वाटत नसे. एखादे वेळीं ती बापाला किंवा आईला थट्टेने भांडून म्हणेहि, "माझें लग्न झालें नाही तोंपर्यंत मी घरचा मुलगा आहे. माझ्या वांट्याचा खर्चाचा पैसा मुलाच्या बरोबरीने मला मिळालाच पाहिजे. मी विलायतेला गेलें असतें शिकायला, तर नसता का पैसा लागला मला दहाबारा हजार? त्याचेंच व्याज मी खर्चतें." तिच्या शाळेंत मुलांमुलींचें शिक्षण होई तें पुस्तकी नव्हतें तर किंडर गार्टन पद्धतीचें खेळण्याचें. आणि या खेळांत करमणूक करण्याचे नवे नवे प्रकारहि तिला सुचत. यामुळे तिला हौस वाटून मुलेंहि मोठ्या आनंदांत असत. मात्र हें छात्रालय तिने अगदी खासगीसारखें ठेवलें होतें. सरकारी संस्थानी अधिकाऱ्याला बोलावणें नाहीच; आणि चहाटळ अशा इतर कोणालाहि तर ती त्याच्या जागेंत पाय घालूं देत नसे.

विमलने मॅट्रिक्युलेशन परीक्षा दिल्यावर तिच्या मनांत कॉलेजांत जावें असें प्रथम आलें. पण तसें केलें तर आईबापापासून सातआठ महिने दरवर्षी दूर राहावें लागणार आणि घरची स्थिति तर ही अशी! यामुळे तिने घरच्याघरीं बसून हायकोर्ट वकिलीचा अभ्यास केला आणि ती परीक्षा पासहि झाली. पण तिने कायद्याचा अभ्यास केला तो वकिलीचा धंदा करण्याच्या दृष्टीने नव्हे, तर केवळ हौसेने. तिला नवलपूर सोडून जावयाचें नव्हतें; आणि संस्थानच्या न्यायाधीशापुढे जाण्याची तिची इच्छा नव्हती. ती परीक्षा पास झाल्यावर भाऊसाहेब एक दिवस तिला म्हणाले, "का विमलताई, आता किती रुपयांची सनद काढावयाची? पांच रुपयांची कीं पांचशेंची? म्हणशील त्याला आपली तयारी आहे."

विमल म्हणाली, "तुमची तयारी असेल बाबा, पण माझी तयारी पाहिजे

ना? मी कोणतीच सनद काढूं इच्छीत नाही. हातांत सनद असणें हें मोहाचें कारण आहे. सनद तयार असली म्हणजे सहज वाटूं लागायचें कीं, बसल्या बसल्या वकिलीचा धंदा करावा. पण या संस्थानी अधिकाऱ्यापुढे जाणें म्हणजे आपल्या हाताने आपला अपमान करून घेणें आहे. शिवाय माझें ध्येय मुलां-मुलींचें शिक्षण हेंच मीं ठेवलें आहे; आणि त्याला तुमची हवी तेवढी पैशाची मदत आहेच!!"

तेव्हा भाऊसाहेब म्हणाले, "मग तुझ्या कायद्याच्या ज्ञानाचा उपयोग काय?"

विमल म्हणाली, वा, उपयोग समोर दिसल्याशिवाय कोणतेंहि ज्ञान मिळवूं नयेच वाटतें? ज्ञानाकरितांच ज्ञान मिळवावें हें अधिक बरें नव्हे का?

भाऊसाहेब म्हणाले, "अग, हे तुझे नव्या युगांतले विचार! आमच्या जुन्या पिढीचा विचार म्हटला म्हणजे, तो असा कीं, एका हातानें ज्ञान मिळवावें आणि दुसऱ्या हातानें त्याचा बाजार करावा. तरी हें बघ, वकिलीच्या ज्ञानाने हवा तर पैसा मिळवूं नये कुणी, पण त्या ज्ञानाने गोरगरिबांचें काम तर व्हावें ना!"

विमल म्हणाली, "हें मात्र अगदी ठीक बोललात बाबा! गोरगरिबांचेंच काय म्हणून? श्रीमंतांचेंहि कां होऊं नये? कायद्याच्या ज्ञानाचा हाच उपयोग, कीं अन्याय होत असेल तर तो वांचवावा. मग श्रीमंतांनाहि होणार! उलट अन्यायाच्या कामीं गरीबालाहि मदत करूं नये!"

या तिच्या मताप्रमाणे तिच्या कायद्याच्या ज्ञानाचा उपयोग होण्याची संधि तिला कधीहि घराबाहेर आली नव्हती. पण बिनसनदी वकिली करण्याचा प्रसंग तिला घरीं पुष्कळ वेळां वाढून ठेवलेला असे. या प्रसंगीं तिचा बाप फिर्यादी व तिची आई आरोपी असा प्रकार होई. माईसाहेबांच्या हातून येवढेंसें कांही चुकलें, मनासारखें झालें नाही, म्हणजे भाऊसाहेब रागावत. तेव्हा आईकडून घडल्या हकीकतीची समजूत घेऊन बापाशीं युक्तिवाद करण्याचें काम विमलकडे येई; व आपल्या व्यवहारचातुर्यात व बुद्धिमत्तेंत प्रेमाच्या जिव्हाळ्याची भर घालून ती आपली वकिली कशी यशस्वी करी हें वाचकांनी पूर्वीच्या एका प्रकरणांत पाहिलेंच आहे.

असो. आज तिसरे प्रहरीं माईसाहेबांच्या खोलींत बसून मायलेकींच्या गुजगोष्टी चालल्या होत्या. भाऊसाहेबांशीं विमलचें बोलणें पूर्वी झालें होतें तें तिने आपल्या आईला फिरून सांगितलें. "खडा टाकून बाबांच्या अंतःकरणाचा

ठाव पाहिला. पण प्रभाकरदादाविषयी त्यांचें मन जें बारा वर्षांपूर्वी एकदा कलुषित झालें तें अजून तसेंच आहे.” असा झालेला आपला ग्रह सांगून, तिनें त्यावर अशी टीका केली कीं, “म्हाताऱ्या माणसाचे ग्रह बदलणें मोठें कठिण! त्यांचें वय होत जातें तसतसा त्यांचा दुराग्रह वाढतो. फेरविचार करायला जी विवेकशक्ति लागते ती त्यांच्या अंगीं नसते.”

माईसाहेबांनाहि हा अनुभव होताच. पण विमलच्या या अभिप्रायाला दुजोरा देण्यापलीकडे जाऊन त्यांना कांहीं करतां येण्यासारखें नव्हतेंच. दोघींनीहि इतकेंच ठरविलें कीं, प्रभाकराच्या निनांवी पत्रांत दर्शविल्याप्रमाणे, आज अमावास्येचा दिवस म्हणून घडतें कीं काय, याची वाट पाहावी. तो न आला तर दुर्दैवाने तूर्त तो प्रश्नच संपला. प्रभाकराने आशा दाखविली, पण खरी केली नाही इतकेंच म्हटलें, आणि सुस्कारा टाकला, म्हणजे काम संपलें. पण तो खरोखरच लिहिल्याप्रमाणे आला, तर पुढे काय करावें हा पेंचच अधिक भारी होता! ‘आशा हेंच दुःख, निराशा हेंच सुख’ म्हणतात तें हें अशा दृष्टीनेहि खरेंच कीं नाही? प्रभाकर परतून यावा ही इच्छा, पण ती सफल झाली म्हणजे पुढची एक अडचण वाढून ठेवलेलीच होती.

अमावास्येचें टिपण दोघींच्याहि मनांत बिंबलें होतें. म्हणून रात्रीं काय करावें याची चर्चा दार लावून घेऊन त्या करीत होत्या. माईसाहेब केव्हा केव्हा खाली विमलच्या खोलींत निजत. तसें झालें म्हणजे मग विमलने एखादें पुस्तक काढून मोठ्याने वाचावें, माईसाहेबांनी तें लक्ष लावून ऐकावें, मधून मधून भोळ्या मनाने, समजूत पडण्यासाठीं एखादुसरा प्रश्न विचारावा, त्याचा आनंद वाटून शिक्षकाने विद्यार्थ्याला शिकवावें त्या थाटाने लेकीने आईला मुद्दा समजावून द्यावा, अवांतर सुखदुःखाच्या गोष्टी व्हाव्या, हलक्या आवाजाने दोघींनीहि जुनी गाणीं म्हणावीं व विमलने नव्या कविता म्हणाव्या, हास्यविनोदहि कांहीं व्हावा, आणि दोघींनी बहिणी-बहिणीप्रमाणे शेजारी शेजारी पलंगड्या जोडून निजावें, अशा रीतीने मायलेकी एकमेकींना सुखी व आनंदित करीत.

त्याप्रमाणे आज रात्रीं दोघीहि एकत्र बसून रात्र काढावी, किंवा आळीपाळीने निजून आळीपाळीने जागावें, असें त्यांनी ठरविलें. कारण प्रभाकर आला तर चोरून व कदाचित् अपरात्रींहि येईल. म्हणून त्याची चाहूल लागतांच, हाक ऐकतांच गुपचूप मागील किंवा पुढील दाराची कडी काढली पाहिजे! या

दोनहि दारांच्या किल्लया माजघरांत खुंटीला टांगलेल्या असावयाच्या. ती जागा आईने मुलीला दाखवून ठेवली.

प्रभाकर आला तर त्याला प्रथम बागेंतल्या तळघरांत ठेवणेंच प्राप्त. पण पुढे तेथेंच ठेवावा कीं नाही याविषयी त्यांनी चर्चा केली. तळघरांत एक सोय तर एक गैरसोय, म्हणून "वाटल्यास शारदामठांत मी व्यवस्था करूं शकेन" असें विमल आईला म्हणाली. पण तिला तिच्या आईने मोडून काढलें. ती म्हणाली, "घरींच काय व्हायचें तें होऊं दे. तुझ्या शारदामठाला उगीच उपद्रव नको. परका पुरुष या घरांत दिसला तर भरलेलें घर कोणाच्या डोळ्यांवर येणार नाही. निदान पाहुणा म्हणून म्हणतील. पण तुझ्या शाळेंत तो दिसला, तर तर्कवितर्काला ना शेंडा ना बुडखा! तेथे तो विनाकारण सहजच एखाद्याच्या नजरेला पडायचा. तें कांही नको. त्याची व्यवस्था आपणच ठेवूं."

विमलने ही गोष्ट कबूल केली. प्रभाकर आल्यावर ज्या कोणत्या रीतीने प्रकट व्हावयाचें ठरेल त्याप्रमाणें तो प्रकट झाला म्हणजे मग इतर काय व्हावयाचें ते होवो, पण त्याला छपविण्याची अडचण तरी संपली. पण तो प्रकट होईपर्यंत एक विशेष अडचण ही कीं, भाऊसाहेबांचें गुप्त पोलिसांच्या संशयाचें वेड अलीकडे वाढत चाललें होतें. त्यामुळे ते कानेकोपरे धुंडाळीत त्याचें काय करावें?

'तें कसें काय? काय करतात बाबा?' असें विमलने विचारलें, तेव्हा माईसाहेब म्हणाल्या—

"सांगतें ऐक एक एक प्रकार. परवा एकदा रात्रीं भटजी आले घरीं श्रावणी केव्हा सुरू करायची म्हणून विचारायला. पाऊस पडत होता म्हणून त्यांनी घेतली होती बनातीची टोपी डोक्यावरून. तर हे त्यांच्याशीं एक शब्दहि बोलेनात. टोपी बाजूला काढून ठेवून अगदी उजेडांत कंदिलापुढे तोंड असें पुढे आणीपर्यंत! तें एक असो. पण एकदा सई कुणबिणीचाच काय संशय आला यांना कुणाला ठाऊक? ती जराशी पाठमोरी बसली होती मर्यादेनें, परसाच्या बोळाच्या तोंडीं. तर हे आपले थेट तिच्यासमोर जाऊन खाली तोंड करून निरखून पाहूं लागले तिच्या तोंडाकडे. ती बिचारी भ्याली! आणि मी घरांत भाजी चिरीत बसलें होतें तिथे येऊन हुंदके दे देऊन रडूं लागली. कारण विचारलें तर, तिला सांगायला किती तरी अवघड झालें. सांगावें तरी कठीण न सांगावें तरी कठीण. शेवटी मी खोदून खोदून विचारलें तेव्हा तिने सर्व

सांगितलें. मीं अंदाजानें ओळखलेंच आणि गुप्त पोलिसाच्या भीतीने संशयानें हे काय काय चाळे मधून मधून करतात तें सांगितलें, तेव्हा तिचा जीव भांड्यांत पडला. क्षणभरानें हे स्वतःच माजघरांतून ओटीवर गेले तेव्हा तोंडानें आपल्या-शीं पण मोठ्यांदा म्हणतच होते.—गुप्त पोलीस ते! काय काय सोंगें घेतील तेवढीं थोडीं. सईने जेव्हा हे शब्द स्वतःच्याच कानांनी ऐकले, तेव्हा मग तिची अगदी खात्रीच झाली. म्हणून म्हणते तीहि एक अडचण लक्षांत घेतली पाहिजे.

मुलगा प्रभाकर फरारी झाल्या दिवसापासून भाऊसाहेब मनानें अस्वस्थ झाले होते खरेच. त्याच्यावर राजद्रोहाचा खटला झाल्यापासून आपल्यामागे गुप्त पोलीस असतात असा भ्रम त्यांच्या डोक्यांत शिरला होता. कारणा-कारणांनी तो मधून मधून बळावत असे. त्या भ्रमामुळे त्यांनी आपल्या वाड्याच्या भिंतीहि पक्क्या संगीन बांधवून मागच्या दाराला अडसर कुलूप यांची व्यवस्था केली होती. आणि पुढच्या दरवाजाची एक फक्त दिंडी तेवढी उघडी राहावी असें ठरविलें होतें. गुप्त पोलिसाच्या जुन्या संशयांत कुटुंबाच्या आचरणाविषयीच्या भ्रमाची भर पडली. एकाच वेळीं डोक्यांत अनेक भ्रम असले तर ते परस्पर नातें जोडतात व त्यापासून संयुक्त भ्रम निर्माण होतो. त्याप्रमाणे भाऊसाहेबांना वाटूं लागलें कीं, गुप्त पोलीसच आपल्या बायकोला वश असावा, आणि पत्रें वाटण्याचें निमित्त उघड माथ्यानें करतां येतें म्हणून फक्त पोस्टमन असल्याचा बहाणा केला म्हणजे झालें! यामुळे भाऊसाहेबांच्या मनांत अशी सांखळी तयार झाली कीं, आपल्या बायकोचा प्रियकर हा खरोखर आपणावर पाळत ठेवणारा गुप्त पोलीस असून, तोच आळीचीं पत्रें वाटणारा पोस्टमन होऊन येत असावा! स्वतः पोलिससाहेबाचे अधिकार नोकरींत त्यांच्याकडे होते त्यामुळे गुप्तपोलिसांचें चरित्र व चमत्कार त्यांना चांगले माहीत होते.

असो; शेवटीं विमल हसून पण निर्धाराचे स्वरांत म्हणाली—

आई, अडचणी तर सगळ्याच आहेत. त्या कधीच संपावयाच्या नाहीत. आणि काळजी करून करून माणूस तीं करणार तरी किती! चला, आपण आता देवाचें नांव घेऊन आपल्या योजनेला लागू.

इतकें म्हणून दोघींनीहि एकवार बागेंतल्या तळघराकडे खेप घातली; आणि परत येऊन आपापल्या इतर कामाला त्या लागल्या.

११ एका बारांतून किती गोळ्या उडाल्या !

रात्रीं बाराचे ठोके पडले. सगळें कांहीं सामसूम होतें. पाऊस किंचित् झिम झिम असा येत होता. मायलेकी खोलींत दिवा हलका करून नुकत्याच अंथरुणावर लवंडल्या होत्या. पण लवकरच दोनतीन गोष्टी अगदी मुद्दाम कोणी घडवाव्या तशाच जणूं कांहीं घडल्या !

प्रथम मागील दारावर एकामागून एक, पण थोड्या अंतराने, अशा दोन तीन थापा पडल्या. आणि दर वेळीं 'समर्थाचिया सेवका वक्र पाहे असा सर्व भूमंडळीं कोण आहे' हा रामदासी श्लोकाचा चरण, मध्यम उंच स्वराने, कुणीसा म्हटलेला स्पष्ट ऐकूं आला. माईसाहेब व विमल जाग्याच होत्या. त्यांना दिवसभर मनांत घोळत असलेल्या विषयाची एकदम आठवण होऊन दोघीहि अंथरुणावरून उठल्या. विमलने माजघरांत जाऊन मागील दाराच्या कुलपाची किल्ली आणली. पण ती घेऊन माईसाहेब एकट्याच मागील दाराचें कुलूप काढण्याला गेल्या. जातांना त्या विमलला म्हणाल्या, "बाळ, तूं बैस इथेच, मींच पुढे होतें, कारण तुझ्यापेक्षा माझा चेहरा प्रभाकराच्या ओळखीचा अधिक आहे. तो मला तेव्हांच ओळखील. पण तुला पाहून एकदम न ओळखल्याने कदाचित् भांबावेल." विमल 'ठीक आहे' असें म्हणून खोलींतच बसून राहिली. मात्र तिचें लक्ष बाहेर मागील दरवाजाकडेच होतें. माईसाहेबांनी दरवाजाचें कुलूप काढलें व कंदील पुढे केला, तों एक जटाधारी दाढीवाला तरुण मनुष्य आंत आला. त्याला पाहतांच "कोण प्रभाकर! आलास एकदांचा सुखरूप" असें म्हणून माईसाहेबांनी ओळख देतांच, त्या मनुष्यानेहि "माई, आलों बरें परत तुझ्या आशीर्वादाने" असें म्हणून तिचे पाय धरले.

त्याच क्षणीं घराच्या एका बाजूच्या बोळांतून भाऊसाहेब हातांत कंदील व काठी घेऊन, गुप्त पोलीस हुडकून काढण्याची अवचित लहर आल्यामुळें, मागील दाराशीं आले. आपली बायको तेथें उभी आहे, मागील दार उघडें आहे, उघडलेल्या दारांतून आलेला कोणी जटाधारी दाढीवाला तरुण मनुष्य तिचे पाय धरीत आहे, तिने आपला हात त्याच्या डोक्याकडे नेला आहे—हें दृश्य पाहतांच त्यांच्या हातांतला कंदील व काठी दोनहि एकदम गळून खाली पडलीं. "घात रे घात. गुप्त पोलीस रे गुप्त पोलीस! काग चांडाळणी! हाच का

तुझा—तो? टपालवाला पत्रें आणून देत होता तीं याचींच बरें, याचींच! नव्हे—नव्हे आपलीं स्वतःचीच! अरेरे, काय करूं—वाटतें कीं, धावून जाऊन ह्याच्या याच्या नरडीचा घोट घ्यावा असें ते मोठमोठ्याने ओरडूं लागले. आणि खरोखरच धावून जाणार तों मेंदूला जबरदस्त धक्का बसून घेरी येऊन ते खाली पडले व एकदमच बेशुद्धच झाले!

ही गडबड ऐकतांच विमल आपल्या खोलींतून धावतच बाहेर आली. बापाच्या हातांतून उपडा पडलेला कंदील उचलून ठेवून, ती त्याच्याजवळ बसली, व तिने त्याच्या मानेखालीं हात दिला. प्रभाकर उठून उभा राहिला; पण तो भाऊसाहेबांपासून मुद्दाम दूरच उभा राहिला. माईसाहेबांना अगदी घेरीच अशी कांही आली नाही, पण एखादें चित्र किंवा पुतळा उभा करावा तशा त्या जागच्या जागीं अगदी खिळल्या जाऊन तटस्थ राहिल्या! पण येवढ्याने भागलें नाही. आणि दैवाने होणार तें असेंच होतें! कारण बरोबर याच क्षणीं मागच्या संडकेने जाणारा एक फेटेवाला दाढीवाला गृहस्थ ही गडबड ऐकून दाराशीं आला. दार उघडेंच होतें. त्याचा एक पाय बाहेर तर एक आंत अशा स्थितींत त्याने आपला चोर-कंदील पुढे करून त्याचा उजेड पाडला. आंतील चार माणसांची चार प्रकारची ही अशी स्थिति दृष्टीस पडल्यावर, तोहि स्तब्ध व तटस्थ झाल्यास नवल काय?

अशा स्थितींत क्षणमात्र गेल्यावर विमलच सर्वांच्या आधी देहभानावर येऊन पुढे झाली. तिला प्रभाकर कोणता हें तेव्हाच अंदाजाने कळलें! अर्थात् दारांत उभा राहिलेला गृहस्थ हाच काय तो येथे खरा परका; बाकी कोणी कोणत्याहि स्थितींत असलीं, तरी तीं घरचींच आहेत; म्हणून प्रथम परक्या माणसाला बाहेर घालवून नंतर दार लावून कडी घातली म्हणजे मग आंतली सर्व व्यवस्था हवी तशी सावकाश करतां येईल, अशा पोक्त विचाराने ती दाराकडे गेली, आणि दारांत उभ्या असलेल्या गृहस्थाला जवळ जवळ दटावल्यासारखें करून म्हणाली, आपण कोण अहां? स्पष्ट सांगा. या घरच्या मागच्या दाराने अशा अवेळीं आमच्या घरांत शिरण्याचा तुम्हाला काय अधिकार? लवकर बाहेर जा कसे. मला दार लावून कडी घालायची आहे!

हे शब्द ऐकून दारांतला तो मनुष्य चकितच झाला. त्याची दृष्टि तिच्या तोंडाकडे खिळली ती निघेचना. तथापि अडखळत अडखळत तो म्हणाला, "मी शहरच्या कोतवालीचा एक अधिकारी आहे. शहरांत गस्त घालायला

निघालों व तुमच्या घराजवळ आलों. तों हा दरवाजा उघडा असल्यामुळे, रस्त्यांतूनच मला कांहीं तरी चमत्कारिक प्रकार दिसला व ऐकूं आला, म्हणून पुढे आलों; आणि खरोखरच येथे कांहीं तरी चमत्कारिक अभावितपणें घडलेलें दिसतें. हे बुवाजी कोण आणि या वृद्ध गृहस्थांना घेरी आलेशी दिसते ती कां? तेव्हा तुम्हाला कांहीं मदत हवी असेल तर मी देईन आनंदाने.

हे शब्द ऐकून विमलने पहिला रागाचा व दटावण्याचा सूर बदलला; आणि ती किंचित् दुःखाच्या स्वराने म्हणाली, आपण गस्तवाले अधिकारीच आहांत तर आपणाला आपलें कर्तव्य केलेंच पाहिजे. पण मी आपणाला निक्षून सांगतें कीं, यापुढे सरकारी कोतवालीच्या अधिकाऱ्याने लक्ष घालण्यासारखें इथल्या प्रकारांत खरोखर कांहीं एक नाहीं. या बुवासुद्धा आम्ही सर्व याच घरचीं माणसें आहों. यांत परकें कोणीच नाही. माझ्या बाबांना घेरी आली आहे खरी; पण आम्हीच त्यांना घरांत घेऊन जात आहों व सगळी व्यवस्था करीत आहों. फक्त आपण बाहेर गेलां म्हणजे दार लावून कडी घालण्याचाच अवकाश आहे आमच्या कामाला लागायला! आपण मदत देऊं केली हा आपला थोरपणा आहे. आम्हीहि त्याबद्दल आपलें आभारी आहों; पण आपणाला तसदी घेण्याचें कांहींच कारण नाही, आणि हें सर्व मी आपणाला खऱ्या मनानेच सांगतें असें समजा!

हा सविस्तर खुलासा ऐकून दारांतील गृहस्थाने चटदिशीं दाराच्या आंत टाकलेला आपला पाय बाहेर घेतला. चोरकंदिलाचें तोंड फिरवून घेतलें, आणि विमल दार लावण्याला पुढे येत होती तिच्या तोंडाकडे पाहत पाहत बाहेर पडून, त्यानेच आपल्या हाताने दार ओढूनहि घेतलें. विमलने चटदिशी दाराला कडी घातली व कुलूप लावून किल्लीची दोरी कडोसरीला खोवली!

आता मात्र बाकीचीं तिघेंहिजण भाऊसाहेबांच्या जवळ येऊन बसलीं. भाऊसाहेब कोसळून पडले होते, तरी त्यांच्या अंगाला कोठे कांहीं लागलें नव्हतें. विमलने त्यांच्या अंगावरून हात फिरवला आणि कानाला तोंड लावून 'बाबा, बाबा, सावध व्हा. येथे गुप्त पोलीस नाही, परकेहि कोणी नाही, आपण सर्व घरचींच माणसें आहों, चलणार ना उठून घरांत?' असें एकदा लहान स्वराने व नंतर थोडें मोठ्याने तिने म्हटलें. पण भाऊसाहेबांना खरोखरच गाढ बेशुद्धि आली होती असें पाहून माईसाहेब म्हणाल्या, 'मला वाटतें आता आपण सर्व घरांतच जाऊं.' लगेच प्रभाकर पुढे झाला. त्याने भाऊसाहेबांना अल्लाद

उचलून आपल्या खांद्यावर आडवें टाकलें. माईसाहेबांनी एक व विमलने दुसरा कंदील घेतला व थोडा मोठा केला; आणि सर्व मंडळी माजघरालगतच्या आजाऱ्याच्या खोलींत गेली. या ठिकाणीं एक पलंग व मच्छरदाणी नेहमीचीच पाहुण्या स्त्रियांकरितां घालून ठेवलेलीं असत. माईसाहेबांनी चटदिशी अंथरूण झटकून एक नवा पलंगपोस वर घातला. प्रभाकराने भाऊसाहेबांना अंथरुणावर निजविलें. विमलने कोलन वॉटरची बाटली आणून हातरुमालाची घडी भिजवून बापाच्या डोक्यावर ठेवली, व आपण त्याच्या शेजारी पलंगावरच बसली. इतर दोघें दोन खुर्च्या जवळ ओढून घेऊन त्यांवर बसलीं. तिघांच्याहि तोंडून एकदम एकच उद्गार निघाला, ‘ कोण हा कठिण प्रसंग ’!

*   *   *

दुसरे दिवशीं, मनोहरपंत आपल्या राजमित्राच्या भेटीला नेहमीप्रमाणे गेला. पण राजेसाहेबांकडून त्यांचें स्वागत नेहमीप्रमाणे झालें नाही. राजेसाहेबांनी दिवाणखान्याच्या खिडकीशीं खुर्ची ओढून घेतलेली असून, तिजवर बसून ते बाहेर दूरवर दिसणाऱ्या देखाव्याकडे पाहत होते.

बाहेर देखावा पाहण्यासारखा होता यांत शंकाच नाही. गांवाभोवती उंच डोंगरांची रांग धनुष्याकार असून, पर्जन्याच्या समृद्धीमुळे तिच्यावर हिरवें चार गवत उगवलें होतें. यामुळे मखमलीने डोंगर झाकून काढले आहेत कीं काय असें वाटे. त्यावरून वाहणारे पाण्याचे शुभ्र प्रवाह चंचल हलणारे खरे; पण इतक्या दुरून त्यांच्या पाण्याची हालचाल कशी दिसणार! यामुळे हत्तीच्या पाठीवरून सोडलेल्या रुप्याच्या सांखळ्यांप्रमाणे ते निश्चल वाटत? त्याच्या अलीकडे पाहावें, तों भाताची हिरवींगार शेतें यांचा जसा कांही अखंड रुजामाच पसरलेला असून, मधून मधून फुललेलीं रंगीबेरंगी झुडपें कुसरीप्रमाणे भासत. आणि त्याच्याहि अलीकडे एक लहानशी पण सुंदर स्वच्छ नदी वळणावळणांनी गांवाला वळसा घालून वाहत होती, व गांवचीं मुलें त्यांत स्वच्छंदाने डुंबत होतीं. त्याअलीकडे, एका बाजूला राजवाड्यांतील बगीचाच्या संरक्षणाकरिता मुद्दाम लावलेलीं कळकाचीं बेटें, आणि त्याशेजारीं आपोआपच उगवलेलीं वड-पिंपळाचीं झाडें, उंच गेलेलीं असून, पलीकडच्या डोंगराच्या उंचीशीं स्पर्धा करताहेतसें वाटे. या झाडांतून पक्ष्यांची थेरझार व किलकिलाट एकसारखा सुरू होता. आणि एखाद दुसरा सुंदर रंगीत पक्षी राजवाड्याच्या तटावर थेट राजेसाहेबांच्या समोर येऊन बसून, आपला धीटपणा प्रकट करी.

खिडकींतून येणारा वारा गार असून, खाली बगीच्यांत थुईथुई उडणाऱ्या कारंज्यांतील फवाऱ्याचा एखादा तुषारहि त्यावरून वाहून त्यांच्या अंगावर येई.

पण केवळ हा सर्व देखावा पाहण्यांतच राजेसाहेब गढून गेले होते असें म्हणावें तर, मनोहरपंत अगदी जवळ आले व त्यांनी 'काय राजेसाहेब' अशी हाकहि पण मारली, तरी राजेसाहेबांची दृष्टि वळली नाही! यावरून त्यांचें मनच आज जाग्यावर नाही, व्यग्र आहे, असा त्यांच्या मित्राने तर्क केला व तोच खरा होता. तेव्हा या वेळीं मित्रत्वाच्या अधिकाराचा भरपूर उपयोग करून मनोहरपंतांनी नवलरायाच्या खांद्यावर हात ठेवला; आणि लहान मुलांचें लक्ष वेधण्याकरिता त्यांच्या कानांत कुर्रर्र करतांत त्याप्रमाणें केलें. तेव्हा नवलराय देहभानावर आला व मग त्या उभयतांचें संभाषण सुरू झालें.

मनो.—कां, आज स्वारीचें लक्ष कुठे आहे? मन कुठे आहे?

नव.—असायचें तिथेच! पण मनाची जागा फक्त शास्त्रज्ञांना माहीत असते. कोणी म्हणतात ती मेंदूंत आहे, कोणी म्हणतात ती हृदयांत आहे, कोणी म्हणतात ती पाठीच्या कण्यांत आहे.

मनो.—पण मनाची जागा कुठेहि असली तरी, घरटें सोडून तो पक्षी बाहेर उनाडावयाला जातो तेव्हा घरटें रिकामेंच नसतें काय? तसेंच मी आलों तेव्हा राजेसाहेबांच्या मनोरूपी पक्ष्याचें झालें होतें खास!

नव.—ठीकच आहे. पक्ष्याचीं अंडीं आणि पिलें चोरावयाला येणारे साप किंवा उनाड पोरें पक्षी घरट्यांत नाही असें पाहूनच, पण चाहूल न लागू देतां फिरत असतात.

मनो.—मी आलों तेव्हा घरट्यांत पिलें दिसत नव्हतीं. म्हणून तीं मला चोरतां आलीं नाहीत आणि आतां पिलांचा किलकिलाट सुरू झालेला ऐकतों, पण पक्षीहि येऊन बसला आहे घरट्यांत. मग तीं पिलें माझ्या हाताला कशी लाभणार?

नव.—पक्षी घरट्यांत येऊन बसला म्हणून हात हालवीत परत जातील अशी बिनपराक्रमी द्वाड मुलें जगांत नाहीतच मुळी! पक्ष्यासकट त्यांचीं पोरें पळवून नेण्याचीच तीं ईर्षा धरतात. शिवाय या माझ्या देहाच्या घरट्यांतला पक्षी तरी, पिलांसकट स्वाधीन होण्याच्या इच्छेने, कोणी द्वाड उनाड मुलगा येतो आहे का अशी वाटच पाहत आज बसला होता!

मनो.—अरेरे, पक्षी कंधी नव्हे तो आज जिकीरीला आलेला दिसतो.

एरवी पिलांच्या आणि आपल्या जिवावर तो असा उदार होता ना ! पक्ष्याला कोणा पारध्याच्या गोफणींतला खडा वर्मीं लागला कीं काय !"

नव.—हो, तसेंहि म्हटलें तरी कांही हरकत नाही. पण थट्टा राहूं दे. तुझीच वाट पाहत होतों मनोहर. तुला कांही सांगायचें योजलें आहे सकाळपासून !

मनो.—तें कशाबद्दल बुवा !

नव.—काल रात्रीं गस्तीला गेलों तेव्हा जें पाहिलें त्याबद्दल !

मनो.—पण तें जें काय पाहिलें त्यानेच जर आज तुमचें मन इतकें उद्विग्न झालें असेल, तर पहिलीच गस्त तुमच्या अंगावर आली म्हणावयाची ! असो. पण ऐकूं या काय आहे तें नीट !

नव.—गस्त अंगावर आली असें कां म्हणतोस ?

मनो.—कारण तिने तुम्हाला कधी नव्हे तें असें चिंतेंत लोटलें म्हणून. आपण प्रजाजनांचें दुःख पाहण्याकरिता गस्तीला गेलां, आणि पहिल्याच गस्तींत पाहिलेल्या दुःखाने स्वतः चिंतासमुद्रांत बुडालां. तेव्हा आता बाकीच्या प्रजाजनांच्या दुःखाची आपण कशी चौकशी करणार !

नव.—थट्टा कसची करतोस रे मनोहर ? मीं पाहिलेला प्रकार तूं आपल्या डोळ्यांनी पाहिला असतास म्हणजे तुलादेखील माझ्यासारखीच हुरहुर लागल्याशिवाय राहिली नसती अशी माझी पक्की खात्री आहे.

मनो.—बरें, पण असा प्रकार तरी काय पाहिलात तें सांगाल कीं नाही !

नव.—ऐक. बारांचा ठोका पडल्यावर मोतीचौक सोडून देऊन उजव्या हाताच्या लहान रस्त्याने मी निघालों.

मनो.—तुम्ही मोठा रस्ता सोडून लहान रस्त्याने चाललां हीच पहिली चूक झाली. राजमान्य गस्त फक्त मोठ्या राजमार्गाने घालावयाची म्हणजे सगळी आबादीआबाद दिसते. दुःख किंवा हलाखी नजरेलाच पडत नाही.

नव.—ऐक आधीं, तुझी टीका राहूं दे, त्या लहान रस्त्याने कांहीसें दूर गेल्यावर एका मोठ्या हवेलीची पिछाडी दिसली.

मनो.—लहान रस्त्याला लागून मोठी हवेली ! कोण हा अप्रयोजकपणा !

नव.—हवेलीच्या बाजूने फिरून एक बोळ होता; आणि बोळाच्या तोंडचें हवेलीचें मागील दार उघडें होतें. त्यांतून प्रथम दुरून पाहिलें तों एखाद्या नाटकांत मुद्दाम दाखवावा तसा देखावा दृष्टीस पडला.

मनो.—ठीक. दिवसा आपण निघतां तेव्हा नाटकी देखावे दिसतात म्हणून रात्रीं हिंडायला निघालां तरी तिथेहि तुमच्या पुढे नाटकी देखावाच वाढून ठेवला होता ना? एकूण या नाटकी देखाव्यांनी तुमची पाठच पुरविली म्हणावयाची. बरें, या देखाव्याचें वर्णन तरी ऐकूं या पुढे.

नव.—या घराच्या पिछाडीचें दार आंतून कोणीसें उघडलें होतें. एक वृद्ध मनुष्य घरांतून हातांत कंदील-काठी घेऊन एका बाजूने आला. त्याच क्षणीं दाढी वाढविलेला एक तरुण मनुष्य दुसऱ्या बाजूने आंत शिरला. त्याला पाहून जवळच उभ्या असलेल्या एका मध्यम वयाच्या स्त्रीने कांही शब्द उच्चारले. त्या दाढीवाल्या तरुणाला पाहतांच तो म्हातारा "अरे चोर रे चोर, गुप्त पोलीस रे गुप्त पोलीस, हाच का तो टपालवाला तुझा! थांब तुझ्या नरडीचा घोट घेतों" असें ओरडून धांवला; पण लगेच बेशुद्ध होऊन खाली पडला. इतक्यांत दुसरी एक स्त्री घरांतून बाहेर आली, आणि त्या सर्वांनी त्या म्हाताऱ्याला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न चालविला.

मनो.—बरें, मग तुम्हीं काय केलें? एवढे गस्तीला गेलां होतां ते!

नव.—हा अकल्पित प्रसंग पाहून मी तर प्रथम गांगरूनच गेलों. पण लवकरच निश्चय करून मदत देण्याला म्हणून मी पुढे होणार तों इतक्यांत मागाहून आलेल्या त्या सुंदर तरुण स्त्रीने पुढे येऊन मोठ्या धीटपणाने पण मर्यादशीलपणाने मला प्रतिबंध केला.

मनो.—हें पाहा! तरुण आणि सुंदर हें या स्त्रीचें वर्णन मुद्द्याला सोडून आहे बरें! ती काय म्हणाली तेवढें सांगा. तेवढेंच पुराव्यांत ग्राह्य होईल.

नव.—ती म्हणाली आपण कोण आहां?

मनो.—मग तुम्हीं काय सांगितलें त्या सुंदर–तरुण–धीट स्त्रीला?

नव.—प्रथम मीं उत्तर देण्याचें टाळलें. पण मग कांही तरी उत्तर द्यायलाच पाहिजे म्हणून म्हणालों कीं, गस्त घालणारा मी एक सरकारी अधिकारी आहें.

मनो.—मग ती काय म्हणाली?

नव.—ती म्हणाली–तुम्ही कोणीहि अधिकारी असा; पण ही आमच्या गृहप्रपंचाची गोष्ट आहे.

मनो.—म्हणजे तुम्ही यांत लक्ष घालूं नका, एकदम चालते व्हा, असा अर्थ! मग तुम्हीं हो काय केलें?

नव.—त्या साध्या पण गंभीर दटावणीमुळे मी मागच्या पायाने परतलों. खचित्, मनोहर, हें कांही तरी भानगडीचें प्रकरण दिसतें आणि काय असेल तें असो, तेंव्हापासून मला अगदी सुचेनासें झालें आहे, तें कां कोणाला ठाऊक !

मनो.—मीं सांगूं त्याचें खरें कारण ?

नव.—सांग पाहूं.

मनो.—सुचेनासें होण्याचें कारण ती भानगड नव्हे, तर त्या ठिकाणीं पाहिलेली स्त्री—म्हणजे तुमच्याच भाषेने बोलावयाचें म्हणजे ती तरुण व सुंदर स्त्री. एरवी तुम्ही असे देहभानावरून गेला नसतां आणि असे सुस्कारेहि टाकले नसते. तुमच्या डोळ्यांवरूनच मी सांगतों कीं, तुम्हाला या भानगडीपेक्षा त्या स्त्रीचीच बाधा अधिक झालेली दिसते. कां? असे मान खाली कां घालतां राजेसाहेब ! ठीक महाराज ! आपली पहिली गस्त भर अवसेच्या पण चांगल्या मुहूर्तावरच निघाली असली पाहिजे.

नव.—भलतेंच बोलतोस मनोहर ! मीं काल पाहिलेली स्त्री काय अविवाहित आहे असें मला माहीत होतें म्हणून माझें लक्ष तिच्याकडे जाईल ?

मनो.—भलतेंच कसें ? दुष्यन्ताने कधी शकुंतलेचा ठावठिकाणा विचारला होता तिच्यावर प्रेम बसण्याच्या आधी ? पण "सतां हि संदेहपदेषु वस्तुषु, प्रमाणमंतःकरणवृत्तयः" या नीतिसूत्रावर त्याने आपलें समर्थन केलें आणि तें साधलेंच कीं नाही शेवटीं ? बाबा, तुम्हा प्रेमी राजे लोकांचा आद्यपूर्वज दुष्यंत घराण्याचें वळण तुम्ही गिरविलें तर तुमची ती चूक कोण म्हणेल ?

नव.—तें जाऊं दे रे तुझें चऱ्हाट ! पण आधी मला सांग कीं, या प्रकरणाचा उलगडा करायला तूं मला मदत काय करणार ?

मनो.—काय म्हणाल ती. प्रथम त्या हवेलीचा पत्ता काढतों आणि मग तुम्हाला दटावणाऱ्या स्त्रीचा. नव्हे, चुकलों—त्या सुंदर व तरुण स्त्रीचा.

नव.—पण एक कर हां मनोहर ! तिने मला दटावलें म्हणून तूंहि नको हां तिला उलट दटावूं अधिकार गाजवून !

मनो.—छे ! गाजवायला अधिकारच नाही मजजवळ कसला. मी तुमचा प्रायव्हेट सेक्रेटरीहि नाही. फक्त खाजगी मित्र. राजाचा मित्र झाला म्हणून

त्याला अधिकार नसतात! शिवाय तिला दटावीन असें कुठे म्हटलें मीं? तुम्हाला एवढ्या धिटाईने दटावणारी तरुण सुंदर स्त्री कोणाची कोण, अविवाहित आहे कीं काय, याचीच चौकशी करतों.

नव.—मनोहर, काय करावें तुला! तूं भलतेंच समजतोस कांही तरी. मला शोध पाहिजे, तो मीं पाहिलेल्या सगळ्याच माणसांचा?

मनो.—होय, पण माणसा-माणसांत फरक असतो ना? खरेंच, पूर्वी गस्तीला जाण्याचा पहिला बेत तुम्हीं केला त्या दिवशीं मीं सहज तुम्हाला खलीफ हरून-अल्-रशीद आणि राजा विक्रम यांची उपमा दिली ती आता सर्वांगांनी खरी ठरूं पाहत आहे कीं हो! खरोखर ती उपमा देण्याची स्फूर्ति मला झाली ती दिव्यच असली पाहिजे! अगदी मंत्रद्रष्ट्या ऋषीच्या स्फूर्तीसारखी! आपल्याच हाताने रोज दाढी तासून तोंड गुळगुळीत करणाऱ्या अस्मादिक सुधारकाचेहि शब्द, दाढीमिशांचें जंगल वाढविणाऱ्या प्राचीन ऋषींच्या तोंडून निघाल्याप्रमाणेच खरे होऊं शकतात तर या कलियुगांतहि! एकूण जुन्या अरेबियन नाइटची नवी आवृत्ति खरीच निघणार! खलीफ गस्तीला गेला तो कोणा तिघा बहिणींच्या घरीं गेला. तिथे त्याने फारच अद्भुत प्रकार पाहिले. त्यांतली एक बहीण जुबैदी इने खलीफाला बजावलें होतें कीं, या ठिकाणीं जो चमत्कार पाहायला सांपडेल त्याच्या चिकित्सेच्या भानगडींत बाहेरच्या माणसाला पडायला मनाई आहे. आणि तुम्ही गस्तींत त्या मोठ्या हवेलीच्या मागच्या दारीं जो प्रकार पाहिला त्यासंबंधानेहि तुमच्या त्या तरुण व सुंदर स्त्रीने तुम्हाला नव्हतें का असेंच बजावलें कीं, "आमच्या गृहप्रपंचांतली ही भानगड, यांत तुम्ही लक्ष घालूं नये तुम्ही कोणीहि असला तरी." पण शेवटीं खलिफाला राहवलें नाहीच, तुम्हाला आज राहवलें नाही तसेंच! त्याने दुसरे दिवशीं भानगडीची चौकशी केलीच, तुम्ही आता मला करायला सांगतां तशी! आणि शेवटीं खलिफाचें आणि तिघींतली एक बहीण जुबैदी यांचें लग्न झालें! तसलें इथें होतें कीं काय हेंच आता पाहावयाचें आहे! विक्रम राजाने गस्तींत शशिकलेने केलेली आपली निंदा ऐकली आणि लगेच दुसऱ्या दिवशीं तिच्या बापाकडे मागणी घातली तिच्याकरिता. मग त्या दाखल्याप्रमाणे तुम्हाला काल दटावणारी स्त्री अविवाहित आहे असें चौकशींत कळलें, तर तुमच्याकरिता तिला मागणी घालण्याचा अधिकार मला देणार कीं नाही या चौकशींत, तेवढें सांगा म्हणजे संपलें.

हें ऐकून राजेसाहेबांना हसूं कोसळलें. त्यांची चिंतामग्न स्थिति होती ती सर्व पालटली, आणि मनोहराला विनोदाचा उलट अहेर करण्याकरिता ते म्हणाले—

"अरे मनोहर, माझें लग्न जेव्हा केव्हा होईल त्या वेळीं माझ्याकडचा मुख्य व्याही तुझ्याशिवाय दुसरा कोण होणार? तेव्हा माझ्या वधूकरिता मागणी घालण्याची वेळ येईल तेव्हा तो मान तुला सोडून मीं दुसऱ्या कोणाला कसा देईन? पण सुंदर आणि तरुण हीं विशेषणें त्या स्त्रीसंबंधाने लावण्याची बुद्धि मला कुठून झाली कुणाला ठाऊक? तीं घेऊन, उगाळून, पालुपदासारखीं नाचवून माझी चेष्टा करण्याचा हा जो चावटपणा तूं मघाचपासून चालविला आहेस तो, भाई आता कृपा करून पुरे कर ना! मीं काल गस्तींत पाहिलेला प्रकार सांगितला त्यांत तुला अद्भुत असें कांहीच वाटत नाही कीं काय? इतका अरसिक केव्हापासून झालास? असो. आता सांगितलेली कामगिरी तरी बजाव कसा! तूं परत येऊन कांही खुलासा सांगेपर्यंत माझ्या मनाला स्वस्थता वाटणार नाही!"

असें म्हणून राजेसाहेबांनी चहा मागविला; आणि दोघांनीहि तो घेतल्यावर प्रेमाचे धक्के मारून राजेसाहेबांनी मनोहरला दिवाणखान्यांतून बाहेर काढून दिला.

---

१२ अज्ञातवासांतलें आत्मचरित्र

अमावास्येच्या रात्रीच्या त्या प्रकारापासून भाऊसाहेब प्रथम बरेचसे बेशुद्धींत होते. तेथून पुढे ते अर्धेमुर्धे शुद्धींत आले. तथापि त्यांना अंथरुणावर उठून बसण्याची शक्ति नव्हती. तसेंच, बेशुद्धि नसली तरी मधून मधून भ्रमाची लहर येई, व त्या लहरींत त्या रात्रीच्या प्रकाराला उद्देशून गुप्त पोलीस आणि आपल्या बायकोचा काल्पनिक प्रियकर यांच्याविषयी ते कांही तरी बडबडत. दुसरें कोणी ज[illegible] बसून बालवूंच लागलें तर त्याच्याशीं तेवढा विषय ते बोलत. पण अगदी एकटे असले म्हणजे भ्रमांतली त्यांची बडबड पुन्हा सुरू होई!

एका दृष्टीने भाऊसाहेबांची ही स्थिति माईसाहेब व विमल यांच्या किंचित् पथ्यावर पडली. भाऊसाहेबांचें घरांतलें व घराभोंवतीचें परिभ्रमण थांबल्यामुळे परसांतील बंगली व तळघर यांच्या आश्रयाने प्रभाकराला निर्वेध राहतां आलें. आणि प्रभाकराने कसें, केव्हा प्रकट व्हावें याचा विचार सावकाशपणें करण्याला

सर्वांना वेळ मिळाला. रात्रीं भाऊसाहेबांना झोप लागली म्हणजे दौलतीला त्यांच्याजवळ बसवून हीं तिघेजणें एकत्र बसून स्वस्थपणें चर्चा करीत.

आज दिवसा झोप फारशी न आल्याने व औषधांत थोडेंसें झोपेचें औषधहि घातल्याने, भाऊसाहेबांना रात्रीं नऊ वाजतांच चांगली गाढ झोप लागली. दौलतीनेहि दाराबाहेर आपली पथारी अंथरली. यामुळे बंगलींत बसून दोघी मायलेकींना प्रभाकराशीं मनमुराद बोलतां आलें. पुष्कळ वर्षांनी भेटल्याचा आनंद खरा; पण ग्रहण लागूनच उगवलेल्या चंद्राप्रमाणे त्या आनंदाला प्रारंभींच चिंतेने ग्रासलें होतें. यामुळे त्या तिघांच्या संभाषणांत एक प्रकारची गंभीरता आली होती.

माई.—प्रभाकर, बाळ कुठे रे होतास इतकीं वर्षें, तूं नाहीसा झालास तो एकदम! आधीं सूचनेचे दोन शब्दहि मला तूं बोलला नाहीस जातांना. त्यामुळे मीं पहिल्या दोन रात्रीं आलोचन जाग्रण करून काढल्या बघ.

प्रभा.—माई, तशी सवड मिळती तर तुझ्या पायांवर डोकें ठेवून, तुझा आशीर्वाद घेतल्याशिवाय मी गेलों असतों का? पण काय करूं, पोलीस अधिकारी जमावाने घराकडे येतांना माडीवरून पाहिल्याबरोबर मी घाईघाईने कपडे घालून मागच्या दाराने बाहेर पडलों. रात्रीं कंकणवाडींत माझ्या एका जिवलग मित्राच्या घरीं लपून राहिलों. तो पोलिसी नोकरींतच होता. त्याने घरीं आल्यावर दरबारांत माझ्याबद्दल काय काय कारवाई चालली याची हकीकत सांगितली. तेव्हा त्याच्याच सल्ल्याने पहाटे उठून मीं थेट मोंगलाईची वाट धरली, आणि त्यानंतर काल पुन्हा घराला माझे पाय लागले!

माई.—तूं चटदिशी निघून गेलास म्हणूनच त्यांना सापडला नाहीस. पोलीस शिपाई जमावाने आले. त्यांनी सगळ्या घराची नाकेबंदी केली. हे घरांतच होते. त्यांनी पोलीस अधिकाऱ्याला खुर्चीवर बसवून हकीकत विचारून घेतली आणि त्याने 'प्रभाकराला सरकारी हुकमाने आम्ही पकडायला आलों आहों' असें सांगितल्यावर यांची अशी कांही घाबरटपणाची स्थिति झाली कीं सांगतां पुरवत नाही. तुला कां पकडायला आले, तूं अपराध कोणता केलास, हें कोणीच नीट खुलासेवार सांगेना; पण शिपाई आले तेव्हा तूं घरीं सापडला नाहीस, आणि त्या रात्रीपासून पुढे घरीं परत आला नाहीस. यामुळे तुझें म्हणणें काय हें कळायलाहि कांही मार्ग उरला नाही. आणि तेव्हापासून

तुझें नांव निघालें कीं, रागावतात, जळफळतात, म्हणतात याने माझ्या तोंडाला काजळ फासलें, माझी सर्वस्वी बेअब्रू केली.

विमल—खरेंच दादा, तूं पळून न जातां सरकारच्या स्वाधीन होऊन आपला बचाव केला असतास तर तें तुला आणि बाबांनाहि नसतें का अधिक बरें झालें, एकंदरीने !

प्रभा.—ताई, माझी तेव्हा पोरबुद्धि होती. शिवाय आधी वार्ता नसतां एकदम धरणें आलें हें पाहून मी घाबरून–गोंधळून गेलों. पण खरें बोलायचें तर, बाबांचा मला खंबीर आधार आहे असा विश्वास मनांतून वाटत असता, तर मी खाचित असा फरारी झालों नसतों; पण हें प्रकरण असें उपस्थित होण्यापूर्वीच बाबांचा व माझा स्वभाव न जुळल्याने आमचे खटके उडत असत.

विमल—ते कशाबद्दल ?

प्रभा.—त्यांना दिवाणसाहेब हे अधिकारी या नात्याने आणि एरवीसुद्धा जें काय करतील तें बरोबरच वाटे आणि मला सर्व प्रकारची जनवार्ता कानांवर येई, लोकमत समजे, यामुळे मी लोकांची बाजू घेऊन दिवाणांना बाबांच्या देखतहि स्नेह्यांसोबत्यांजवळ नांवें ठेवी. याकरिता पुढे पुढे माझ्या मित्रमंडळींनाहि आमच्या घरीं येण्याची बाबांनी बंदी केली. आणि मला म्हणूं लागले कीं, " तुला हे राजकारणाचे आणि राजद्रोहाचे नसते चाळे लागले आहेत आणि तूं माझें न ऐकलेंस याहिउपर, तर तुला घरांतून घालवून देईन. तुझ्या चांगल्या वर्तनाबद्दल उद्या सरकारने जाभिनकी मागितली तर दुसरा कोणी तर उभा राहणार नाहीच; पण मलादेखील जामीनगत पत्करतां येणार नाही. तुझा स्वभाव हा असा तापट उतावळा. तूं केव्हा आपल्या वळणावर जाऊन काय करशील याचा नियम नाही. मग तुझ्याकरिता हजारों रुपयांचा दंड मला सोसावा लागेल ! आणि फार तर हें एखादे वेळ मी करीन आणि सोशीनहि पण वरचेवर तें कसें करणार ? आणि जामीन न मिळाला तर तुरुंगांत राहावें लागेल. तेव्हा आपला विचार काय तो पाहा. एरवीसुद्धा जर अशा गोष्टी होत, तर प्रत्यक्ष पोलीस मला वारंटाने पकडायला आल्यावर बाबांनी माझी संभावना कशी केली असती याची कल्पना तुम्हाला सहजच करतां येईल. खुद्द बाबांच्याच मनांत माझ्याबद्दल संशय, मग माझा बचाव खरा कितपत झाला असता हें तुम्ही पाहतांच ! पण त्याहूनहि मनुष्यस्वभावाची गोष्ट म्हणून सांगतों कीं,

एकदां जें हातून झालें तेंच मनुष्य मग पुढे पुढे करीत जातो. त्याचें पाऊल सहसा मागे पडत नाही. परिणाम काय होणार हें नशिबावर अवलंबून राहतें.

माई.—बाळ, तूं केलेंस तेंच बरोबर. आम्ही तरी तुला दोष कसा द्यावा? तुझ्या घरचीं माणसें ईन मीन तीन. त्यांतले तुझे वडील हेच काय ते तुझ्या संकटांत खरे उपयोगी पडणारे. त्यांची स्थिति तूं तोंडाने वर्णन करून सांगितलीसच; आणि ती खरीच तशी होती. उरलों आम्ही दोघी. पैकीं मी तुझ्याच वयाची आणि तुझ्यापेक्षाहि पोरबुद्धीची आणि विमल तर काय दहा वर्षांची पोर! तिला हें आणि तें कांहीच कळत नव्हतें.

विमल—हें तेव्हांचें झालें. पण मग दादा आतां तुला परत यावें असें वाटायला काय कारण?

प्रभा.—ताई, हें विचारलेंस तें बरें केलेंस. बारा वर्षांनी प्रत्येक गोष्टीची स्थिति बदलते असें म्हणतात. या बारा वर्षांच्या युगांतरावर माझा विश्वास आहे. मग तुम्हाला वाटलें तर मला भोळा म्हणा! पांडवांना शिक्षा बारा वर्षांच्या वनवासाची. रामाचाहि वनवास बारा वर्षेंच टिकला. त्याअखेर त्यांचें सर्व कांही कार्य झालें. पण देवाप्रमाणे माणसांनाहि या बारा वर्षांच्या युगांतराचा अनुभव येतो. माझीं वनवासांतलीं आणि अज्ञातवासांतलीं बारा वर्षें पुरीं होण्याच्या बेताला, "आतां परत जावें; मग काय व्हायचें असेल तें होईल" अशी बुद्धीची प्रेरणाच होऊं लागली! पण आणखीहि एक कारण सांगण्यासारखें घडलें. आपल्या संस्थानच्या गादीवर नवे संस्थानिक बसले, त्यांना कच्ची मुखत्यारी मिळाली, त्या वेळीं त्यांनी जें भाषण केलें तें एका वर्तमानपत्रांत मला सहज वाचायला मिळालें. त्यांत ते असें म्हणाले म्हणे कीं, 'मी दिवाणसाहेबांच्या कारकीर्दींत झालेल्या कारभाराची न्यायबुद्धीने तपासणी करीन, मगच पक्की मुखत्यारी घेईन, तोंपर्यंत दिवाणसाहेब राहतील. कोणाहि संस्थानिकाच्या तोंडून असले शब्द निघतील असें कुणाला तरी वाटलें असतें काय! पण तें वाचून मलाहि वाटलें कीं, बारा वर्षांनी आता तरी आपल्या नवलपूर संस्थानच्या कारभाराचें चक्र बदलणार. या संधीचा फायदा घेऊन मला न्याय मिळाला तर पहावा, फासा फिरून एकदां टाकावा, मग दान काय पडेल तें पडेल, अशा विचाराने परत येण्याचा निश्चय केला. आणि त्याबरोबर माईच्या नांवाने पत्र लिहून टपालांत टाकलें. पत्रांत केला याहून अधिक खुलासा करण्याला भीति वाटली.

कारण न जाणो कुणाच्या हातांत पत्र पडतें कुणाला ठाऊक? म्हणून पत्र असें संदिग्ध लिहिलें कीं, तिऱ्हाइताच्या हातांत तें पडलें तर, कोणा वेड्यापिशानें कांही तरी निनांवी लिहून उगाच पोस्टाचे पैसे खर्च केले असें वाटून तो तें फाडून टाकील. बाबांच्या हातीं तें पडलें तर नक्की काय होईल याचा मनाशीं निश्चय नव्हता. पण माई, तुझ्यापर्यंत पोंचलें म्हणजे तूं मात्र तें बरोबर ओळखशील अशी खात्री होती.

माई.—होय बाळ, तुला हवें होतें तसेंच झालें. म्हणजे तिऱ्हाइताच्या तर हातीं तुझें पत्र पडलेंच नाही, पण यांच्या हातीं तें हटकून जायचेंच नेहमीच्या रीतीने, असें असतां तें कधी न व्हावें त्या रीतीने नेमकें माझ्या हातांत येऊन पडलें.

विमल—पण दादा, तसें तें नेमकें माईच्या हातीं येऊन पडलें यामुळे एक कार्यभाग झाला खरा; पण त्याने आपला एक वेगळा गुण केल्याशिवाय मात्र सोडला नाही.

प्रभा.—तें कसें काय बरें?

विमल—तें असें. माईच्या हातांत परस्पर पत्र पडलें याचें बाबांना इतकें आश्चर्य वाटलें कीं, त्यामुळे त्यांच्या मनांत माईविषयी येऊं नयेत ते संशय आले. त्या संशयामुळे त्यांना अर्धवेड लागलें असेंहि म्हणायला हरकत नाही. तुझ्याबद्दल त्यांना तो तसा संशय आला; आणि माईबद्दल असा आला. आम्ही संसारांत माणसें चार! आणि आमच्या संसारसुखाचें हें चित्र! धन्य आहे कीं नाही आमची!

प्रभा.—ताई, संसार हा असाच आहे इथूनतिथून सगळा. मी बारा वर्षें संसारांतून निघून गेलों होतों, त्यापूर्वी या संसारदुःखाला जें कारण होतें तें तर अजूनहि निघून गेलें नाही. आणि मी परत येण्याच्या सुमाराला माझ्याचमुळे त्या संसारदुःखाला आणखी एक नवें कारण उत्पन्न झालें याबद्दल वाईट वाटतें. पूर्वी मी एकट्या बाबांनाच त्रासदायक होतों, तर आता, माई, तुलाहि त्रासदायक झालों ना! याबद्दल मात्र विशेष वाईट वाटतें ग!

माई.—प्रभाकर, बाळ, शपथ आहे तुला माझ्या गळ्याची असें बोलशील किंवा मनांत आणशील तर पुन्हा! तुझ्या पत्रामुळे इकडे भलता संशय आला खरा, पण खरें तेंच बोलायचें तर, मी आताच नव्हे तर माझें लग्न झाल्यापासून बहुतेक जन्मभर यांच्या अशा संशयांतच काढला आहे, समजलास!

तिसरेपणावर मला आईबापांनी द्यावी हें माझें दैव. त्याला दुसरें कोण काय करणार?

विमल—दादा, माई म्हणते तेंच खरें. तूं आपल्या जिवाला मुळीच कांहीं लावून घेऊं नकोस. आपण तिघें एका जिवाभावाचीं आहों हें सुख का थोडें आहे? या सुखाच्या बळावर आपणाला याहून मोठीं संकटें निभावतां येतील. आम्ही काय इथें सुखांत होतों. तूं मात्र बारा वर्षें वनवासाचें दुःख भोगलेंस, त्यांत तुला कांहीच हातभार लावतां आला नाही याबद्दल मात्र आम्हाला वाईट वाटतें.

प्रभा.—ताई, तुम्ही जशीं दुःखांत सुख मानून घेणारीं आहां तसाच मीहि पण आहे. बारा वर्षांत एक प्रकारचा वनवास होता खरा; पण त्याचें दुःख इतकेंसें वाटलें नाही. अज्ञातवासाचें दुःख मात्र वाटत होतें खरें! ताई, माई, तुम्ही महाभारत वाचलेंच आहे. त्यांत पांडवांना वनवासापेक्षा विराट नगरींतल्या अज्ञातवासाचेच दिवस अधिक जाचले नव्हे का?

माई.—अज्ञातवास दुःखाचा हें तर खरेंच. पण वनवासांत तुला दुःख कसें नव्हतें? तूं काय करीत होतास? कुठें राहात होतास? तुला जेवायखायला कोण घालीत होतें? दुखण्यांत औषधपाणी कोण देत होतें? ती सगळीच मोठी नवलकथा असली पाहिजे. सगळ्यांत आश्चर्य वाटतें तें हें कीं, तूं गेल्यापासून इकडे आम्हाला एकहि कसें पत्र पाठविलें नाहीस?

प्रभा.—तो सर्वस्वी माझा गुन्हा आहे. पण थोडक्यांत सांगायचें म्हणजे, माझ्या वयाचीं भावनावश अशीं तरुण मुलें जीं अलीकडे पाहायला सांपडतात त्यांचाच मी एक अस्सल नमुना आहे म्हणेनास! मी नवलपूरची शीव बारा वर्षांपूर्वी ओलांडली त्या क्षणीं अशी शपथ घेतली कीं, या दुष्ट गांवाचें बारा वर्षें तोंड पाहायचें नाही. संस्थानाला सद्गुणी राजा नाही म्हणून बाप नाही. बरें, मला घरीं बाप आहे पण तोहि माझ्याविषयी अन्यायी! म्हणून हें गांव आणि हें घर दोनहि मी कायमची सोडून द्यायला तयार झालों. आणि ही बारा वर्षांची शपथ घेतली ती पार पाडली. तीं बारा वर्षें पुरीं होण्याला, आणि मघाशीं सांगितलें तें आमच्या नव्या संस्थानिकांचें दरबारांतलें पहिलें भाषण वाचावयास मिळायला एकच गांठ पडली. त्याच पहिल्या क्षणीं परत येण्याचा निश्चय केला; आणि पहिली गोष्ट केली ती माईला पत्र लिहिलें. आतां वनवासांत मला फारसे कष्ट कसे काढावे लागले नाहीत, तें थोडक्यांत सांगतों, ऐका.

मी नवलपूर सोडून मोंगलाईच्या रोखाने जाऊं लागतों तों आडवळणें घेत घेत, गुप्तपणा संभाळीत, पंधरा-वीस दिवसांनी मोंगलाईची शीव गाठली. मग थोडासा निर्धास्त झालें. आत्मरक्षणाचा दुसरा एक उपाय म्हणून मौनव्रत घेतल्याचा बहाणा केला. आधीच तरुणपणाची हौस म्हणून डोक्याला केस राखले होते, ते तेलाचा स्पर्श सुटल्यामुळे जटांचें स्वरूप धारण करूं लागले, आणि दाढीहि हळूहळू वाढली. अशा रीतीने मी बुवा बनलों! आणि तिथून माझें जें एकदा बस्तान बसलें तें परत फिरेपर्यंत. मी इथे घरीं असतांना देखील मला दूध पिण्याची फार आवड होती हें माईला माहीतच आहे. सकाळसंध्याकाळ तालीम करून आलें कीं, माईचें पहिलें काम म्हणजे धारोष्ण दूध, स्वच्छ फडक्याने गाळून, भरून, माझ्याकरिता कपाटांत मुद्दाम ठेवलेली सबंध शेरभर दुधाची चरवी माझ्यापुढे करायची! सुदैवाने मोंगलाइत दूधदुभत्याला कांहीं कमी नाही. आणि मोंगलाईतली प्रजा मागासलेली असली तरी पाहुणचाराच्या कामीं फार अगत्यवादाची. म्हणून मला कोणत्याहि गांवीं रोज दोनअडीच शेर दुधाला कांहीं कमी पडलें नाहीं. मात्र याचें बरेंचसें श्रेय माझ्या बुवागिरीला द्यायला पाहिजे. कांहीं दिवसांनी मी बेदर सुभ्याच्या अरण्यांत शिरून हिंडूं लागलों. तिथे केव्हा गाईचें, तर केव्हा म्हशीचें, तर केव्हा शेळीचें दूध मिळे; पण दुधाला म्हणून ऐनजिनसी कांहीं कधी कमी पडलें नाही. अशा रीतीने एक वर्ष भ्रमण केल्यावर गंगनाथ नांवाच्या पहाडी गांवाजवळ एक जुनें शिवाचें स्थान मला आढळलें आणि मग तिथे जो एकदा मुक्काम कायम केला तो इकडे परत फिरण्याच्या आधी चारसहा महिनेपर्यंत."

विमल—मग दादा, बुवाजींची सगळी जीवनयात्रा बारा वर्षें दुधावरच चालली आणि निभावली का?

प्रभा.—वेडी आहेस झालें तूं! ताई, अग, बुवाजीपणाचें स्तोम अन् वैभव शहर गांवापेक्षा आडगांवीं अन् आडगांवापेक्षाहि आडरानांत फार फुगतें. त्याचा अनुभव घेतल्याशिवाय कळायचेंच नाही तें. हें देवस्थान थोडेसें आडरानांत होतें तरी आसपासच्या पांचपंधरा कोसांतल्या लोकांचें तेंच क्षेत्र होतें. त्यांत गरिबांप्रमाणे श्रीमंत लोकहि असत. माझ्या तुटपुंज्या विद्येच्या बळावर मी त्यांचा गुरु बनलों. माझ्या शरीरसंपत्तीच्या बळावर मी त्यांचा मुख्य पहिलवान व शिपाई बनलों. उपयुक्ततेमुळे त्यांचा आप्त, मित्र व पुढारी बनलों. पवित्र आचरणाने ऋषि बनलों, आणि निःस्वार्थीपणाने त्यांचा देव बनलों.

इकडच्या तालमींतल्या जोरबैठकी सोडून देऊन मी नमस्कार घालूं लागलों. घरींहि मी स्नानसंध्या करीत होतों, तीच तिथे थोडी वाढविली. काम नाही म्हणून जपानुष्ठानालाहि बसें. पोथी बरोबर नव्हती. पुराण मला सांगतां येत नव्हतें; आणि पुराण मीं सांगितलें असतें, तरी तें नीट कळणारे लोक तिथे कितीसे मिळणार ? पण मला गोष्टी चांगल्या सांगतां येतात. त्याचा मला तिथे फार उपयोग झाला. पंधरा कोसांतलीं मुलें मीं चांगलीं तालीमबाज तयार केलीं. पाऊसकाळांत नदींत पोहण्याच्या शर्यती करून बक्षिसें देई. तरुण मुलांना घेऊन लांब अरण्यांत शिकारीला जात असे. भाविक लोक येऊन मला इतकी शिधासामुग्री व मेवामिठाई देत, कीं ती मला इतर लोकांना वाटून टाकतां पुरेवाट होई. तात्पर्य, माझ्या सुखाला तिथे कांही कमी पडलें नाही. मात्र मनाची हुरहुर गेली नाही. ती शमविण्याला मला जपानुष्ठानाच्या एकान्तवासाचा उपयोग करावा लागला. पण घेतलेली शपथ पाळण्यांत मला अभिमान चढे. म्हणून त्या द्वारेंहि मनाला खंबिरी वाटून हुरहुर कमी होई.

विमल—दादा, तुम्हा शपथावाल्या लोकांशीं वागायचें म्हणजे तो कठीण प्रसंगच म्हणावयाचा ! मग आतां परत येतांना नाही ना अशीच कांही एखादी शपथ घेऊन आलास ? नाही तर तुझ्या पुढच्या कार्यक्रमाचा विचार करण्याच्या कामांत आम्हाला लक्ष घालण्याची सोयच नाही उरणार !

प्रभा.—छेः छेः ताई, ती भीति कांहीच नाही. जातांना माईचाहि विचार घ्यायला मला सवड कशी मिळाली नाही हें तुम्हाला मघाशीं सांगितलेंच आणि तूं तर काय तेव्हा अवघी दहा वर्षांचीच होतीस. तुला मी बाहेर जातांना दिसलों असतों म्हणजे माझ्या गळां पडून मोठ्याने रडून 'मला ने कीं रे दादा बरोबर,' असें म्हणत सगळी आळी गोळा केली असतीस. पण आता—

माई.—पण बाळ प्रभाकर, आता नाहीं बरें तो तसला पोरकटपणा ताईजवळ ! तुला काय सांगूं ? आमची ताई म्हणजे आता एक प्रकरण झालें आहे. विद्येंत तुझीहि परीक्षा घेईल. वादांत नवलपुरांतल्या कुणाहि प्रौढ माणसाला हरवील; त्या आता मास्तरीणबाई झाल्या आहेत ! शाळा घातली आहे मुलांमुलींची; आणि कुणाचें दुखलें-खुपलें गांवांत दिवाणसाहेबांच्या हातून, म्हणजे तें मोकळ्या मनानें येऊन सांगायची जागा झाली आहे तुझ्यासारखीच आमची ताई! मला भीति येवढीच वाढते केव्हा केव्हा कीं, असल्या गोष्टींबद्दल

इकडचा राग तुझ्यावर झाला तसा तो या बिचारीवरहि होतो कीं काय एखादा! पण त्या कामांत तिचें नशीब थोर दिसतें. तिला हवे ते अपराध माफ आहेत जसे कांही त्यांच्याकडून.

प्रभा.—अहाहा! ताई, माईच्या तोंडून तुझें हें वर्णन ऐकून मला किती आनंद झाला आहे तें काय सांगूं? ताई, तुला हें सारें शहाणपण कुणी शिकवलें? पण मी किती वेडा! अशा गोष्टी कोणी शिकवून किती शिकवणारे आणि शिकणार! तें अंगचेंच लागतें. असेल ताईवर देवाचीच कृपा! माई, तूं म्हणालीस कीं, बाबा हिला सगळे गुन्हे माफ करतात. पण मला वाटतें, यांत बाबापेक्षा ताईचाच गुण अधिक असेल खचित. तिच्या हातून गुन्हाच घडत नसला तर बाबा तिला माफ ते काय करणार?

माई.—पण प्रभाकर, तुझ्या हातून तरी खरोखर असा काय गुन्हा घडला होता, यांनी तुझ्यावर इतकी आग पाखडायला? बरें, नाही म्हणावें तर तूं दिवाणसाहेबांबद्दल कागाळ्या करीत होतास तशा करायला ही देखील कांही कमी करीत नाही. अगदी सरळ, उघड उघड बोलते, दिवाणसाहेबांविरुद्ध.

प्रभा.—माई, खरोखरच मी भाग्याचा. कारण मी करीत होतों तें सत्कृत्य होतें याचा हा मला अप्रत्यक्ष पुरावाच मिळाला. मीं ताईकडे पाहिलें म्हणजे ती मला सद्गुणाची पुतळीच वाटते. तिच्या डोळ्यांत सत्य, औदार्य आणि धैर्य यांचें तेज भरून वाहतें आहे असें मला दिसतें. वास्तविक आम्ही मुलांनीं आमच्या जनकाचें वैर किंवा शत्रुत्व करण्याला कांहीच कारण नाही. आणि त्यांना आवडत नाही असें आम्ही जें कांही करतों हें देखील त्यांचें शत्रुत्व नाही. पण जगांत सूडाची म्हणून कोणी देवता असावी यांत शंका नाही. म्हणूनच ती बापाच्या हातून होणाऱ्या वाईट गोष्टींचा निषेध प्रत्यक्ष त्याच्या मुलांच्या प्रवृत्तींनी व कृत्यांनी करवते. बाबा माझ्यावर वाटेल तितके रागावोत; पण निदान ताईवर रागावत नाहींत ही त्या देवतेचीच योजना असावी. बाबांचें ताईवरचें प्रेम हें त्यांना सुख देत असलें तरी, तिचीं मतें त्यांना उपेक्षणीय वाटावीं हीच बाबांना ईश्वरी शिक्षा!

विमल—पण दादा! आता या असल्या नसत्या गोष्टी बोलत बसण्याची का वेळ आहे? बाबा आज नाही उद्या शुद्धीवर येतील. तेव्हा, किंवा ते असेंच अर्धवट भ्रमांतच राहिले तरी पुढचा बेत काय ठरला आहे?

प्रभा.—ताई, माझ्यासारख्याचा बेत म्हणजे रानडुकराची मुसंडी. बारा

वर्षांपूर्वी इथे संस्थानच्या अधिकाऱ्यांविरुद्ध चळवळ केली तेव्हा डावी-उजवीकडे पाहिलें नाही. धरणें आलें तेव्हा निघून पळून जायचें ठरविलें. तें इकडे तिकडे न बघतां अंमलांत आणलें. बारा वर्षें या गांवाकडे लक्ष द्यायचें नाही अशी शपथ घेतली. ती कशी पाळली तें पाहिलेंतच. परत यावें असें ठरविलें तों सरळ उठलों आणि येथे येऊन पोंचलों. आता ठरविलें आहे कीं, सरळ प्रकट होऊन नव्या संस्थानिकापुढे जाऊन उभे राहायचें, आणि त्यांना म्हणायचें कीं, माझा न्याय करा! मग जें काय नशिबांत असेल तें होईल. तुम्ही दोघी पाहतांच कीं, मला तुम्हा दोघींशिवाय या जगांत पाश असा कांही एक नाही. डोक्यांत प्रत्येक वेळीं जी कल्पना वावरत असेल ती अनुभवांत आणण्याशिवाय दुसरी हौस नाही. माई, तूं फिरून भेटलीस. ताई लहानाची मोठी झालेली पाहिली. आता मला उद्या कैदेंत जाऊन फिरून तेथून अंदमानला जावें लागलें तरी त्याचें मला वाईट वाटणार नाही. ताई मनाची किती निश्चयी, खंबीर आणि शहाणी आहे हें मला तिचे डोळेच सांगतात. येऊन जाऊन दुःखाला विचाराचा आळा न घालणारी अशी वेडी, माई, तूंच एकटी मला दिसतेस. तुझ्या मनाला कधी दुःखाचा काटा बोचूं नये अशा स्थितींत तुला दैवानें ठेवावी अशी तुझी योग्यता आहे. पण दैव जर इतकें विवेकी व न्यायी असतें तर त्याला जगाने दैव न म्हणतां धर्म म्हटलें असतें! असो, चला, आता उशीर नाही का झाला? जा तुम्ही बाबांकडे पाहा. मी आतां खुशाल झोप घेणार.

विमल--दादा, ठीक आहे. मीहि उद्या याच विचाराला लागतें कीं, तूं केव्हा कुठे प्रकट व्हावें? कारण तूं प्रकट झालास म्हणजे पुढची वाट दिसूं लागेल. हा आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ आता संपविलाच पाहिजे!

---

१३ अन् या कार्ट्याला माझा भाऊ करणार तुम्ही?

तिसरे प्रहरीं भाऊसाहेबांची झोंप झाली असें पाहून विमल त्यांच्या बिछान्याशीं आली आणि म्हणाली, "बाबा, चहा आणूं का थोडा करून? रोजची वेळ झालीच आहे बहुतेक. याला भाऊसाहेबांनी हुंकार दिला. दहा

मिनिटांत चहा येऊन तो घेऊन झाल्यावर, ती म्हणाली, "पलंग थोडासा खिडकीच्या उजेडाशीं सरकवून घेऊं का बाबा, म्हणजे उशीवर डोकें ठेवून तुम्हाला वर्तमानपत्रें चाळतां येतील कांही वेळ ?"

भाऊसाहेबांना ही कल्पना पसंत पडली. दौलती आणि विमल दोघांनी हात लावून पलंग सोईचा करून घेतला. विमलने खाकेंतून वर्तमानपत्रांचा भारा व हातांतून बापाचा चष्मा आणून तो पलंगाशेजारीं एक खुर्ची ओढून तिजवर ठेवला. दौलतीने यजमानांच्या हातांत एक चिरूट देऊन काडी ओढून त्यांच्या तोंडाशीं धरली. भाऊसाहेबांनी तो पेटवून दोन झुरके घेतले व म्हणाले—

"बाळ विमल, माझ्याने नाही वाचवत वर्तमानपत्रें पडून पडून. तूंच माझ्याजवळ बसून चाळ तीं; आणि सांग मला त्यांतलें थोडें थोडें म्हणजे झालें."

विमल—पण बाबा, तुम्हाला आता बरें वाटतें ना पूर्वीपेक्षा ?

भाऊ.—बाळ, मला आता कसचें बरें वाटणार आणि काय ? तुझें बरें असलें म्हणजे झालें.

विमल—कां बरें, बाबा असें बोलतां उदासवाणें ? प्रकृति बिघडली ती कांही माझी नाही बिघडली, तुमची ! म्हणून तसें विचारलें. तर तुम्ही आपलें भलतेंच विचारतां उलट !

भाऊ.—अग, तसें नव्हे. प्रकृति बिघडली माझीच. पण या वयाला येऊन पोंचल्यावर आतां ती बिघडली आणि सुधारली दोनहि सारखींच ! विमल, तुला खरेंच सांगू का ? मी आतां फार दिवस जगत नाही. म्हणून एक गोष्ट तुला विचारावी असें मनांत येतें. विचारूं का ? तें म्हटलें म्हणजे असें, कीं यापुढे तुझें संरक्षण कोण करील ?

विमल—तें कां ? तुम्ही असतांना ती काळजी मला तर नाहीच, पण तुम्हाला तरी कां वाटावी ?

भाऊ.—अग, मी जिवंत आहें तोंपर्यंतचें नाही बोलत; नंतरचेंच बोलतों !

विमल—अस्सें होय ? तरी बरेंच, नंतरचें नंतर पाहून घेऊं.

भाऊ.—पण मला वाटतें, त्या गोष्टीला आता फार दिवस नाहीत. मी दिवसानुदिवस क्षीण होत चाललों आहे. म्हणून वाटतें कीं, माझ्या हाताने तुझें एकदा लग्न करून द्यावें.

भाऊसाहेबांनी हा आज भलताच प्रश्न काढलेला पाहून विमल आश्चर्याने क्षणभर स्तब्धच झाली. पण तेवढ्यांत प्रसंगावधान संभाळून ती म्हणाली—

" बाबा, हा मात्र तुम्ही भलताच विषय काढलात हां! तुम्ही पूर्वी एकदा-दोनदा तो ओझरता काढला होतात तेव्हा तुम्हाला मीं काय म्हणालें तेंच माझें उत्तर आजहि समजा!"

भाऊ.—पूर्वी म्हणालीस? काय बरें? चांगलेंसें आठवत नाही. सांग एकदा पुन्हा काय म्हणालीस तें? अग आतां म्हातारपणीं आमची आठवण म्हणजे नुसता बुरणूस! आंत दाभण खुपसून ठेवलें आहे तितकाच वेळ तें राहावयाचें. तें बाहेर निघाले कीं, जागेची खूण सुद्धा बुजून पार!

विमल—सांगतें हवें तर पुन्हा. माझा निश्चय असा आहे कीं, माझा प्रभाकरदादा माझ्यापेक्षा बारा वर्षांनी वडील आहे. त्याचें लग्न झाल्याशिवाय माझ्या लग्नाची गोष्ट तुम्ही काढूं नये.

भाऊ.—अग, त्याचें लग्न मीं केलें का नसतें? तो इथून निघून गेला तेव्हा चांगला बावीस वर्षांचा होता. तरी पण जेव्हा म्हणून त्याच्या लग्नाच्या गोष्टी आम्ही घरांत बोलाव्या तेव्हा याने हळूच बाजूला तिच्याजवळ म्हणावें कीं, " बाबांना सांग कीं, माझ्या लग्नाचा विचार करूं नका. मला अजून इतर पुष्कळ कामें करायचीं आहेत." आणि कामें काय केलीन् हें दिसतंच आहे. लग्न केलें असतें तर, बायकोच्या प्रेमाने, काळजीने तरी धाडसी कामांत पडता ना, आणि माझ्यावर हा असा प्रसंग येता ना. " आपल्या बापाच्या प्रेमा-खातर किंवा त्याच्या काळजीमुळे असल्या धाडसी कामांत पडता ना" असें मला म्हणतां आलें असतें, तर मला किती बरें वाटलें असतें, पण या नव्या पिढींत असलें सुख कोणत्या बापाला मिळणार? असले हे नव्या पिढीचे मुलगे!

विमल—आणि मुलीहि! असें नाही म्हटलेंत तें कां हें मी समजलें!

भाऊ.—तेंहि मी म्हणेन, पण मुलींच्या प्रेमाचा अनुभव मला जसा आला, तसा मुलग्याच्या प्रेमाचा आला नाही. मग मी दोघांची बरोबरी कशी करूं?

विमल—बाबा, मी तेव्हा दहाच वर्षांची होतें. माझ्या लग्नाचा तेव्हा प्रश्नच नव्हता. पण आता मी त्या वेळच्या दादाच्या वयाची झालें. आणि माझ्या लग्नाची गोष्ट आज तुम्हीं काढली तेव्हा मीहि नाही का म्हटलें कीं, मी आताच लग्न करून घ्यायला तयार नाही म्हणून?

भाऊ.—पण तूं आपल्या भावाच्या लग्नाचें निमित्त तरी सांगितलेंस. त्याला नव्हतें तसलें कांहीं निमित्त!

विमल—पण मग माझें तरी निमित्त बरोबर आहे ना बाबा ?

भाऊ.—वाहवा ग पोरी! मला तूं पकडूं बघतेस का शब्दांत? 'तुला सांगायला निमित्त होतें' इतकेंच मीं म्हटलें. म्हणजे तुझें निमित्त योग्य आहे असें मी कुठे म्हणतों ? तुझ्या दादाला लग्न थांबवायला त्याचा थोरला भाऊ नव्हता एखादा बिनलग्नाचा!

विमल—पण थोरला भाऊ काय आणि हातांत घेतलेलें एखादें आवडतें काम काय, दोहोंवरचें प्रेम सारखेंच कां असणार नाही ? तुम्हाला संस्थानच्या अधिकाऱ्यांचा जीव आणि अब्रू प्रिय वाटत होतीं तशीं प्रभाकरदादाला संस्थानच्या प्रजाजनांचे प्राण व अब्रू प्रिय वाटत होती, इतकाच फरक! जुनी पिढी काय, नवी पिढी काय, प्रत्येकीला अशा प्रेमाचा म्हणून एक एक कांही तरी विषय असतोच!

भाऊ.—बरें तसें का होईना! म्हणजे, तुझ्या भावाला नाही मी दोष देत असें का होईना! पण आता जी गोष्ट हातची नाही ती बाजूला ठेवून, जी हातची आहे तिच्यापुरतेंच बोलूं. प्रभाकर आणि तूं दोघांचेंहि लग्न करून देणें हें माझें कर्तव्य. पण आता त्याची आशा कुठे आहे परत यायची ? म्हणून तूं तरी मला होकार दे, म्हणजे माझ्या कोणा मित्रांना सांगून तुझ्याकरिता स्थळ पाहवून, करून टाकीन तुझें लग्न; आणि होईन म्हणतों तुझ्याबद्दल निष्काळजी!

विमल—बाबा, तुमचें सांगून झालें ना ? आता माझें मीं सांगत्यें तें ऐका. तुमच्या कोणा तरी तिऱ्हाईत स्नेह्यांनी माझ्याकरिता स्थळ पाहायचें असें का आता राहिलें आहे माझें वय लहान! लोकांचीं लग्नें जुळवून देण्याइतकी झालें आहें मी मोठी! तेव्हा आता माझी काळजी सोडून द्या तुम्ही कशी! माझ्यापेक्षा लहान वयाच्या मुली आईबाप मरून पोरक्या होतात. त्यांची काळजी देव करतो तो माझीहि नाही का करणार ? शिवाय मला माझी माई आहे ना देवाच्या खालोखाल ? तुम्हाला न वाटो तिची किंमत; पण मला वाटते खरी! जगाच्या राहाटीप्रमाणे तुमचें माझ्यावरचें छत्र गेलें तरी माझी माई आहे तोंपर्यंत मला कशाचीहि काळजी नाही. तुम्ही अगदी निर्धास्त असा. आणि तिच्यावर नाही नाही ते संशय घेऊन, तिला दुःख देऊन, जीव नकोसा करून टाकत

तेवढें न केलेंत, तर ती बिचारी मला आणखी चार दिवस अधिक लाभेल! उरली गोष्ट दादाची. मागे एकदा तो आल्याचें स्वप्न मला पडल्याचें मीं नाही का सांगितलें बाबा, तुम्हाला?

भाऊ.—होय बाळ, सांगितलेंस. मग त्याचें काय? तूं बोललीसुद्धा असशील त्याच्याशीं?

विमल—हो, बोललें तर! मी म्हणालें, 'दादा, स्वप्नांत असें दर्शन देऊन मायापाशांत घालतोस तो प्रत्यक्षच का येऊन भेटेनास? आणि आम्हा सर्वांची काळजी एकदम दूर करीनास?'

भाऊ.—मग त्यावर तो काय म्हणाला?

विमल—तो म्हणाला, हो येईनहि. पण बाबांचा राग विनाकारण झाला आहे तो जाईल तर! मी आलों आणि बाबा माझ्यावर पूर्वीसारखे रागावले तर मलाहि राग येईल. म्हणून तूंच विचारून घे त्यांना आधी, मी परत आलों तर ते काय करतील तें. नाही तर मी आपला आहें तिथेंच बरा आहे. नव्हे का?

भाऊ.—तो या मृत्युलोकांतून बोलल्यासारखा बोलला, कीं एखाद्या परलोकांतून?

विमल—छेः हो! अगदी मृत्युलोकांतून, फार काय तुम्ही आम्ही आता एकमेकांजवळ बसून बोलत आहों नाही, इतक्याजवळून! मला भास झाला कीं, जसे कांही त्याने माझे हात धरून माझ्या डोळ्यांकडे अगदी निरखून बघितलें. आणि प्रेमाने माझे गालगुच्चेहि घेतलेन्, अगदी लहानपणीं घेत होता तसे! येईल का हो, माझा दादा परतून, बाबा, मला वाटतें, बाबा तुम्हीं प्रयत्न केलात तर तुम्हालाहि तो स्वप्नांत दिसेल.

या प्रेमळ वर्णनाचा परिणाम भाऊसाहेबांच्या कठोर मनावर झाल्याशिवाय राहिला नाही. त्यांना मुलाची आठवण होऊन गहिंवर आलासा दिसला. पण तो आता परत येणें शक्य नाही, म्हणून मुलीचाहि तो लोभ सुटावा या हेतूने विषय निकालांत काढण्याकरिता, किंवा त्याला वेगळें वळण देण्याकरिता, ते म्हणाले—

"बाळ, प्रभाकर परत आला तर तो तुझ्यासारखा मलाहि हवा आहे. पण जन्मठेपेचे कैदी परत येत नाहीत. तेव्हा निपुत्रिकपणाच्या भावनेने मरण्यापेक्षा निदान दत्तक मुलगा घेऊन मग मरावें असें मीं ठरविलें होतें.

सुभेदार आपला मुलगा बाजीराव मला दत्तक द्यायला तयार आहेत. तेव्हा त्यांना आज-उद्या होय म्हणतों आणि दत्तविधान करून टाकतों झालें! तुझें स्वप्न कसलें खरें होणार ? मग तुझी आहे ना संमति निदान याला तरी ? "

हें संभाषण या मुद्द्यावर यायला आणि सुभेदार थेट ओटीवर यायला गांठ पडली. आज त्यांच्याबरोबर त्यांचा मुलगा बाजीराव हाहि होता. ते दोघेहि एकदम भाऊसाहेबांच्या खोलींतच आले. अर्थात् त्यांना खुर्च्या देणें भाग पडलें. त्या दौलतीने आणून दिल्या. ते बसल्यावर भाऊसाहेब त्यांच्याकडे तोंड व्हावें म्हणून कुशीला वळून म्हणाले " आलांत, सुभेदार वेळेवर आलांत."

सुभेदार लाघवीपणाने हसत हसत म्हणाले—

" तें कसें काय साहेब ? एरवी, व्हावयाचें असलें म्हणजे असेच योग जमतात म्हणा ! "

भाऊ.—तुमचा मुलगा दत्तक घ्यावा असा विचार मी हळूहळू मनांत करतोंच आहे. ज्योतिष्याने भविष्य सांगितलेंच आहे. तें खोटें कसें होणार ? आणि मीहि प्रकृतीने क्षीण होत चाललों आहें. पण हें पाहा, आमच्या विमला-ताईला अलीकडे स्वप्नें पडूं लागलीं आहेत म्हणे, कीं आमचा प्रभाकर येणार ! तो येणार असला तर ठीकच आहे. मग दत्तक कशाला?

सुभेदारांच्या कानांवर ही धक्का देणारी गोष्ट आज नव्यानेच आदळली. विमलहि जवळच उभी होती. तेव्हा बापलेकींच्या मनावर एकदमच परिणाम करण्याची संधि साधलीशी वाटून ते वादाला सरसावले व म्हणाले—

" आपले चिरंजीव आले तर देवानेच केली म्हणेन लाख गोष्टींतली गोष्ट ! आम्ही सुद्धा तेंच म्हणतों. ईश्वराजवळ तेंच मागतों. आपण आणि आम्ही एकाच घराण्यांतले ना ! दोन शाखा दोहोंकडे बरोबर वेगळ्या वाढत गेल्या, तर घराण्याचें त्यांत कल्याणच आहे. पण दुर्दैवाने त्यांच्या येण्याला स्वप्नाचाच आधार ! मला आश्चर्य इतकेंच वाटतें कीं, विमलाताईसाहेब इतक्या शिकल्या-सुधारलेल्या, त्यांना स्वप्नें कशीं पडतात ? "

हें बोलणें ऐकून विमलला हसूं आवरेना. ती म्हणाली—

" तरी बरें सुभेदारसाहेब ! असें नाही म्हटलेंत कीं मीं शिकलीसुधारलेली म्हणून मला झोप तरी कशी येते ! पण येते खरी ! आणि स्वप्नेंहि पडतात खरीं ! आणि त्यांत प्रभाकरदादा आला, बोलला, असा स्पष्ट भास होतो खरा. मी बाबांना खोटें कशाला सांगूं ? तुम्हाला स्वप्नें पडलीं तरी त्यांत

माझा दादा तुम्हाला कसा दिसेल? तुम्हाला दिसले तर दिवाणसाहेब, शिरस्ते-दारसाहेब, एजंटसाहेब हे दिसायचे!"

सुभे.—हें पाहा ताई, आपल्या वडिलांचें हित आपणाला कळतें तसें मला कसें कळणार, हें तर उघडच आहे. पण दत्तकाच्या कामांत पाहण्याची दृष्टि पुरुषांची वेगळी व स्त्रियांची वेगळी असते त्याला काय करणार!

विमल.—होय, आणि त्यांतूनहि ज्यांना आपला मुलगा श्रीमंतांच्या मांडी-वर द्यायचा असेल त्या पुरुषांची दृष्टि तर त्याहून वेगळी असणार!

ही निंदा ऐकून स्वाभिमानाला धक्का बसल्याचा आव आणणें सुभेदारांना प्राप्तच होतें. तेव्हा ते मुलग्याचा हात धरून उठूं लागले व म्हणाले, "चला, पोटचा गोळा गमवायला तयार झालों तर ही संभावना! मग इथे कशाला राहा?"

केवळ बापाखातर सुभेदारांचें थोडेंसें समाधान करावें अशा बुद्धीनें विमल म्हणाली—

"अहो सुभेदारसाहेब, मीं म्हटलें तें अगदी तुम्हांला उद्देशून असेंच नव्हे कांही. जगाची रीत सांगितली. श्रीमंतांच्या घरीं दत्तक होऊन मुलगा जात असला तरी केवळ स्वाभिमानामुळे दत्तक न देणारे बाप, आणि दत्तक जात नाही म्हणणारे मुलगे मीं पाहिले आहेत त्यांतलीच तुमची गोष्ट असून केवळ आमच्या कल्याणाकरिता तुम्ही आपला मुलगा द्यायला तयार झाला हें मला नाही का माहीत? दैवांत असेल तर होऊन जाईल दत्तविधान."

इतकें बोलून सुभेदारांची शोभा झालीच. पण आता थोडी त्यांच्या मुला-चीहि शोभा करावी आणि ती भाऊसाहेबांना ऐकवावी या हेतूने विमलने संभाषण मुद्दाम लांबविलें. ती म्हणाली—

"सुभेदारांचा बाजीराव, बाबा, तुम्ही याला पूर्वी पाहिला होतात का? आज आलाच आहे तो. इकडे वळून बघा जरा. पण मला वाटतें, सुभेदारसाहेब! तुमचा बाजीराव आमच्या घरीं पूर्वी एकदा एकटाच आला होतासें वाटतें मला!"

सुभे.—तो केव्हा बरें?

विमल—सुमारें सहा महिने झाले असतील.

सुभे.—अस्सें! तेव्हा बोलला का तो कांही तुमच्याबरोबर?

विमल—हो बोलला कीं! धीट आहे तो. आमच्या घरीं थोडें सुतार-

काम चाललें होतें. सुतारांनी भुसकटाची धुमी लावून ठेवली होती तंबाखू ओढण्याकरितां. धुमींतून धूर उंच आकाशांत जात होता. तें पाहिलें, आणि मला हा काय म्हणतो, " हा येवढ्याशा भुशाचा जर इतका उंच धूर जातो तर तुमचें हें सगळें घर पेटलें आगीनें तर त्याचा धूर किती उंच जाईल ? "

सुभेदारांनी लाजेनें व रागानें ओठ चावला. पण वेळ मारून नेण्यासाठी ते म्हणाले—

" असेल-असेल. तसेंहि म्हणाला असेल हा तुम्हाला. गुलामाला गणिताचा नाद आहे लहानपणापासून ! त्रैराशिकें सोडवितो. देवानें बुद्धि त्याला फार चांगली दिली आहे."

विमल आता स्वतः बाजीरावालाच बोलूं लावण्याच्या हेतूनें बाजीरावाकडे वळून म्हणाली—

" बाळ, काय नांव तुझें ? "

बाजीरावानें तोंड वांकडें करून उत्तर दिलें 'बॅ-बॅ-जीराव.'

विमल—काय शिकत असतोस शाळेंत ?

बाजीराव हेल काढून म्हणाला, " मी नाही कधी शाळेंत ज्ञाणार जा ! "

लगेच सुभेदार मध्यें तोंड घालून म्हणाले—

" खरें बोलतो तो अगदी. परंपरेचा तो अगदी हाडवैरी आहे. उठलें सुटलें मूल आपलें शाळेंत जातें म्हणजे काय ? घरच्या घरीं शिक्षण कसें काय होईल याची कधी कुणी चौकशी केली आहे का ? म्हणून मी त्याला शाळेंत घातला नाही. आणि जा म्हटलें कोणी तर हा स्पष्ट सांगतो त्याला 'मी जात नाही जा' म्हणून ! "

विमल—काय रे बाजीराव, तूं येतोस का आमच्या घरीं राहायला बाबांचा मुलगा होऊन ?

फिरून तोंड वांकडें करून बाजीराव म्हणाला, " नको रे बाबा दोन बाप ! "

लगेच सुभेदारांनी मध्यें तोंड घातलें आणि ते डोळे मिचकावीत म्हणाले—

" येवढेंसें पोर. पण पाहा स्वाभिमान कसा अगदी जळजळीत आहे तो या वयांत ! "

विमल म्हणाली, " अगदी बापापेक्षाहि मुलगा चढ आहे—नुसत्या गणितांतच नव्हे कांही ! "

सुभेदार लगट करण्याच्या हेतूनें म्हणाले, " बाळ, उद्यापासून हे भाऊसाहेबच तुझे बाबा होणार बरें ! "

शहाणा बाजीराव म्हणाला, "मग बाबा, तूं रे कधी मरणार ?"

पण सुभेदारांचें प्रसंगावधान या बिकट प्रसंगालाहि पुरून उरलें. ते लगेच म्हणाले—

" पाहून घ्या याचें तत्त्वज्ञान. या वयांत मरणाची गोष्ट बोलायची झाली तर थोर माणसेंहि भितात कचरतात. पण आमचा बाजीराव लहानपणापासून अगदी धीट. तो पुरुष आहे तरी 'मेल्या' ही शिवी त्याला अगदी बायकां-सारखी आवडती आहे. कारण मरणाची मुळी भीतीच नाही. नाही तर इतर मुलें पाहा. मरण तर राहिलेंच, पण नुसत्या बागुलबुवालाहि भितात, चळ-चळा कापतात."

विमल—मला वाटतें सुभेदारसाहेब, हा इतका धीट आहे तर उद्या मोठा झाला म्हणजे दरोडे खुशाल घालील—नाही म्हटलें देशाकरिता. कारण धीट आहे !

सुभे.—नाहीं तर खूनहि करील, संस्थानच्या प्रजेकरिता—संस्थानी अधि-काऱ्यांचे, प्रभाकराने केलाच तसा, नाही, म्हटलें प्रभाकरावर आरोप आला तसा.

सुभेदार स्वार्थामुळे लघळपणा करीत असले तरी हुषार होते. आपल्या मुलाची कुचेष्टा विमलने आरंभिली, तेव्हा तिचा परत आहेर करण्याची संधि ते कां गमावतील ? त्या भरांत त्यांनी प्रभाकराला पुढे ओढून दरवड्यास खून उभा केला. पण प्रभाकराने केला तो प्रत्यक्ष खून नसून खुनाचा प्रयत्न होता, आणि तोहि पुनः आरोपांतच होता हें चटदिशी लक्षांत येऊन, त्यांनी आपलें उत्तर सावरून घेतलें. पण " तुमच्या पायाखाली काय जळतें आहे तें आधी पाहा, मग माझ्या वाटेला जा असें दर्शविण्याकरिता त्यांनी जो घाव घातला तो विमलच्या वर्मावर बसण्याइतका साधार नव्हता तरी समर्पक होता यांत शंका नाही. पण तो घाव बसलाच नाही असें भासविण्याकरिता ती पुढे म्हणाली—

" बाजीराव, तूं या आजोबाच्या मांडीवर बसतोस का ?"

मुलगा म्हणाला, "मी नाहीं जा. आजोबाच हवें तर बसूं देत माझ्या मांडीवर !"

फिरून सुभेदार म्हणाले, " पाहा-पाहा. याला तर मरणाची भीति वाटत नाही तर लहानथोर हा भेद तरी याच्याजवळ कुठून येणार ? एका धीटपणा-चींच हीं सारीं लक्षणें !"

इकडे हें भाषण सुरू असतां बाजीराव बसल्या जागीं तोंडें वेडींवाकडीं करीत होता. तो कुणाला वेडावून दाखवीत होता असें नव्हे, तर बालग्रहाने

झपाटलेल्या मुलांना तोंडें वेडींवांकडीं करणें, उगीच डोळे मिचकावणें, तोंडांतून जीभ बाहेर काढून डावी-उजवीकडे उगीच फिरविणें, आणि त्या फिरतींत जें काय सांपडेल तें चाटणें, इत्यादि सवयी जडतात, तशाच बाजीरावाला जडल्या होत्या. अपस्माराच्या झटक्यांत त्याच्या तोंडाची जेवणी किंचित् तिरकस झाली होती, आणि लहानपणीं देवी आल्या त्यांचे वण त्याच्या तांबूस चेहऱ्यावर, राजापुरी तांब्याच्या अंगावरच्या ठोक्यांसारखे दिसत असून, शिवाय डाव्या डोळ्यांत देवी उठून फूल पडलें होतें.

विमलने आपल्या चढाईचा हल्ला चालू ठेवून म्हटलें—

" कां हो सुभेदारसाहेब, हा मुलगा अशीं तोंडें वेडींवांकडीं कां करतो ? "

त्यावर सुभेदारांचें उत्तर तयारच होतें. ते म्हणाले—

" फिरून सांगतों ताईसाहेब, हा कुणाकडे पाहून तोंडें वेडींवांकडीं करण्याला भिईल तर ना ! धीटपणा, निःस्पृहता याचें याला जसें कांहीं बाळकडूच मिळालें आहे ! "

बाजीराव आपल्या आंगरख्याच्या बाहीने नाकतोंड पुशीत होता तें पाहून विमल म्हणाली—

" त्याचा हा नवा आंगरखा फार खराब होतो त्याला एखादा हातरुमाल देत जा विजारींत खोवून तोंड पुसायला."

लगेच सुभेदार म्हणाले—

" अहो, हातरुमालांना काय तोटा ? पण आमच्या बाजीरावाला लहानपणापासून छानछोकीचा नटण्यामुरडण्याचा फार तिटकारा म्हणून ! "

पण आता ही अप्रतिष्ठा पुरे झाली असें वाटून प्रसंग आवरता घेण्याकरिता सुभेदार मुलाचा हात धरून उठले आणि म्हणाले, " येतों आता भाऊसाहेब, वेळ बराच झाला. दत्तकाचा मुहूर्त उद्या-परवा आहे हें सांगण्याकरिता आलों होतों सहज. तों ताईसाहेबांचीहि गांठ पडली. चांगलेंच झालें."

पण ताईसाहेबांनी त्याचा पिच्छा अजून सोडला नव्हता. इतक्या अवगुणांच्या भरतीला बाजीरावांत अधाशीपणा, हावरेपणा असणारच या खात्रीने विमल म्हणाली —

" थांबा जरा हां ! येवढा तुमचा सोन्यासारखा मुलगा चालत आमच्या घरीं आला, आणि उद्या-परवा दत्तविधान झालें तर तो माझा भाऊच नाही

का व्हायचा? तेव्हा जरा थांबा, त्याला कांही खाऊ दिल्याशिवाय मी कसा जाऊं देऊं?"

असें म्हणून ती चट्दिशी माजघरांत गेली व फडताळांतून एक साखरेचें गाढवाचें चित्र घेऊन बाहेर आली. पण तें एकदम बाजीरावाच्या हातांत न देतां तें दूर धरून तिने त्याला दाखविलें मात्र, तोंच त्या मुलाने बापाचा हात सोडून चार पावलें धावत जाऊन त्या चित्रावर उडी घातली, आणि तें हिसकावून घेऊन "बाबा गाढव! बाबा गाढव" असें आनंदाने ओरडून त्याने त्या चित्राचा कान तोडून तोंडांत चावला देखील! विमल लगेच हसून म्हणाली--

"सुभेदारसाहेब, तुम्ही मघाशी सांगितलें तेंच खरें. मुलगा अगदी धीट आहे. कशाला भ्यायचा नाही."

मुलाने केलेलें प्रदर्शन पाहून घरांतून बाहेर पडतांना सुभेदार शरमेने मनांत किती चूर झाले असतील याचें वर्णन कोण करील?

भाऊसाहेब हा सर्व प्रकार निमूटपणें पाहात होते. त्यांना उद्देशून विमल जरा रागाने म्हणाली—

"बाबा, अन् या कार्ट्याला का माझा भाऊ करणार तुम्ही?"

१४ प्रभाकराचा नृसिंहावतार

विमलने तीव्र भावनापूर्ण व मर्मभेदक असा जो प्रश्न भाऊसाहेबांना केला त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही. ते म्हणाले—

"बाळ, तूं म्हणतेस तेंच बरोबर आहे. मला तरी दत्तक घेऊन काय करायचें आहे? तूं माझा मुलगाच नव्हे तर काय? आणि खरोखरच, तुझ्या सांगण्याप्रमाणे, आज उद्या प्रभाकराचें चिंतन मनांत करतों. पाहावें मलाहि तुझ्यासारखें त्याचें स्वप्न पडतें का तें?"

हें ऐकून आपण बापाचें मन दोनहि कामांत बरेंच वळविलें असें वाटून विमलला समाधान झालें. पण दुर्दैवाने तें समाधान फार काळ टिकूं शकलें नाही. त्याच रात्रीं दिवाणसाहेबांकडून एक घोडेस्वार तावडतोबीचा म्हणून एक

लखोटा भाऊसाहेबांच्या नांवचा घेऊन आला. अर्थात् तो वाचण्याचें काम विमलकडेच आलें. लखोटा फोडून तिने पत्र काढून मोठ्याने वाचलें.

पत्र वाचून झाल्याबरोबर भाऊसाहेबांच्या मनाने उलट उचल खाल्ली. ते विमलला उद्देशून म्हणाले, "पाहिलेंस ना विमलाताई, दत्तक घेणें किती आवश्यक आहे तें! दिवाणसाहेबांचा स्नेह, सुभेदारांची स्वार्थत्यागाची तयारी, आणि ज्योतिषीबुवांचें भविष्य, सर्वच गोष्टी दत्तकाला अनुकूल आहेत. तेव्हा उद्या संध्याकाळीं दत्तविधानाचा बेत ठरविलाच पाहिजे नव्हे का?"

विमलने मनांत विचार केला आपल्या बापाची दत्तक घेण्याची लहर आता कांही केल्या थांबत नाही, आणि ती थांबवायची तर त्याला एकच उपाय—म्हणजे प्रभाकराने प्रकट होणें. तेव्हा या प्रकट होण्यालाहि ही योग्य संधिच होय. पण ती गोष्ट व्हावयाचीच तर मुळमुळीत गुळमुळीत अशा रीतीने न होतां, चांगली दणदणीत रीतीने तरी कां करूं नये? या गुप्त विचाराने ती बापाला म्हणाली—

"बाबा, मी कांही तुमच्या इच्छेविरुद्ध नाही. प्रभाकरदादा फार तर स्वप्नांत दर्शन देतो, पण प्रत्यक्ष प्रकट होत नाही. तेव्हा घराण्याच्या व तैनातीच्या दृष्टीने तुम्हीं योजलें तें बरोबरच म्हटलें पाहिजे. ठीक आहे, पाठवा निरोप दिवाणसाहेबांना आणि सुभेदारांना, कीं दत्तविधानाचें उद्याचें ठरलें म्हणून!"

इकडे त्या रात्रीं भाऊसाहेबांना झोंप लागल्यावर परसांतल्या बंगलींत प्रभाकर, माईसाहेब व विमल या तिघांचें खलबत सुरू झालें. माईसाहेब अगदी गोंधळून गेल्या. बिचारीच्या डोळ्यांचें पाणी खळेना व काय सल्ला द्यावा हें तिला कळेना. तिच्या दृष्टीने अडचण ही कीं, प्रभाकर प्रकट झाल्याशिवाय दत्तक थांबत नाही; आणि तो प्रकट झाला म्हणजे सरकार त्याला पकडून काळेपाण्यावर पाठविणार! बरें प्रकट न व्हावें तर गुप्त तरी किती दिवस राहतां येईल? फक्त प्रभाकर व विमल या दोघांच्याहि मनांत गोंधळ असा कांहीच नव्हता. प्रकट होऊनच प्रकरणाचा निकाल करून घ्यावयाचा असें दोघांनीहि निश्चयाने ठरविलें होतें. म्हणून दत्तविधान होण्यापूर्वी, पण ती घालमेल चालू असतांच, प्रकट व्हावें म्हणजे त्यांत जरा मौज होईल असेंहि त्यांनी ठरविलें!

पण इतरांना दर्शन देण्यापूर्वी प्रभाकराने शक्य तर आपल्या बापाला एकदा खास दर्शन द्यावें हें बरें नव्हे का? एकदम दर्शन दिल्याने इतरांच्या मनाला

आश्चर्य वाटेल, पण घातक असा धक्का बसणार नाही. भाऊसाहेबांना मात्र तसा धक्का कदाचित् बसेल. म्हणून इतर कांही युक्तीने त्यांचें मन पुत्रदर्शनाला तयार करीत करीत तें दर्शन घडवावें हें बरें म्हणून त्याचाहि विचार झाला.

दुसरे दिवशीं तिसरे प्रहरीं मोठ्या दिवाणखान्यांत दत्तविधानाची तयारी सुरू झाली. या दिवाणखान्यांत मांडण्याकरिता भाऊसाहेबांच्या खोलींतलें कांही सामान न्यावयाचें होतें. त्याकरिता त्यांच्या पलंगाची जागा विमलने अशी बदलली कीं, त्यामुळे बरोबर त्यांच्यासमोर भिंतीला टांगलेला मोठा आरसा आला. आणि नेमकें त्या आरशासमोर पलंगापलीकडे माजघराचें एका कडेचें दार येत होतें, त्या दारावर भाऊसाहेबांना वारा लागूं नये म्हणून पडदा टाकण्यांत आला होता. या दाराकडे उसें करून व आरशाकडे पाठ करून भाऊसाहेब पलंगावर निजले होते. जवळ विमल मधून मधून येऊन बसे व त्या उभयतांचें संभाषण चाले. भाऊसाहेब तोंडांत चिरूट घेऊन जो धूर सोडीत, तो वाटोळ्या गिरक्या घेत घेत वर जाऊन तक्तपोशीला भिडत असे. धूर तोंडांतून निघालेला व आपण लीलेने तो गिरक्या घेत वर चढत चाललेला पाहिल्याशिवाय, तंबाखू ओढणारांना आपण तंबाखू ओढली असें वाटतच नाही. त्या धुरांत त्याना काय दिसतें हें ईश्वराला माहीत. कांहींना त्या धुरांत ईश्वर दिसत असला तर असेलहि! पण ईश्वर ढग व धुकें निर्माण करितो, आणि आपणहि तंबाखूंतून ढग व धुकें निर्माण करितों यामुळे ईश्वराचे आपण प्रतिपक्षी असेंहि तंबाखू ओढणारांनी कां म्हणूं नये? असल्या तत्त्वज्ञानात्मक गूढ विचारांचें मनन तंबाखू ओढणारा प्रायः केव्हा डोळे मिटून तर केव्हा उघडून करीत असतो. भाऊसाहेब डोळे मिटीत तेव्हा त्यांच्या अंतःश्चक्षूंना काय दिसत असेल हें माहीत नाही; पण आज डोळे उघडून त्यांनी समोर पाहिलें म्हणजे त्यांना आपला एक जोडीदार त्यांच्यासारखाच चिरूट ओढीत धूर सोडीत पलंगावर पहुडलेला दिसे येवढें मात्र खरें. आरशांत दिसत असलेल्या या आपल्या प्रतिबिंबाकडे ते पाहत असतां विमल जवळ येऊन बसली तेव्हा तिला ते म्हणाले, " बाळ, काल रात्रीं तुझ्या सांगण्याप्रमाणे प्रभाकर मनांत आणीत होतों; पण तो मला स्वप्नांत कांही दिसला नाही तुला दिसला तसा."

त्यावर विमल म्हणाली—

" स्वप्नें रात्रींचींच पडतात असें नाही. दिवसाहि तीं पडूं शकतात,

बाबा ! आणि तंबाखू न ओढणाऱ्यापेक्षा ओढणाऱ्यालाच दिवसाचीं स्वप्नें पडण्याचा संभव अधिक असतो. धुराच्या जाळ्यांची मदत कल्पनाशक्तीला होत असते म्हणतात तें खरें का हो, बाबा ! ”

असें विचारून ती हसली. पण उत्तराकरिता न थांबतां ती उभ्या उभ्या आंत जाऊन थोड्या वेळाने बाहेर येऊन पुनः बापाशेजारी बसली आणि म्हणाली—

“ बाबा, इतक्या वर्षांनी तुम्हाला प्रभाकरदादाचा चेहरा चांगला आठवतो का हो ? ”

भाऊ.—हो. आठवतो का म्हणजे काय ? प्रत्यक्ष मुलाचा चेहरा कोण विसरेल कितीहि काळ लोटला म्हणून ?

विमल—पण तो येथून गेला तेव्हा प्रभाकरदादाला किंचित् मिसूर फुटलेली असावी. आता तुम्हाला भेटावयाला यायच्या वेळीं त्याच्या जटा वाढल्या असल्या, दाढी वाढली असली, तरी तुम्ही त्याला ओळखाल ?

भाऊ.—हो. म्हणून काय झालें ?

या भाऊसाहेबांच्या उत्तराबरोबर समोरच्या आरशांत भाऊसाहेबांना दिसत असलेला पडदा दूर झाला, व त्या ठिकाणीं एक जटाधारी दाढीवाला तरुण मनुष्य प्रभाकराच्या उंचीचा, आंगलटीचा, ठेवणीचा, माजघराच्या दारांत उभा आहे असें त्यांना दिसलें. भाऊसाहेबांना श्रावणी अमावास्येच्या रात्रीं जी मनुष्याकृति घराच्या मागील दारीं दिसली, तीच ही आता माजघराच्या दारांत त्यांना दिसली. पण द्विरुक्तीने आश्चर्य थोडें कमी होतें म्हणतात. भाऊसाहेबांचेंहि तसेंच झालें. म्हणून ते त्या रात्रीसारखे एकदम ओरडले–किंचाळले नाहीत. पण “ आं ! विमल, हें काय मी बघतों आहे ? ” असें म्हणून ते अंथरुणावरून उठण्याचा प्रयत्न करणार तों ती मनुष्याकृति बाजूला झाली.

विमलहि बापाबरोबरच त्या आरशांत पाहत होती. तिला ती मनुष्याकृति पाहून आश्चर्य तर वाटलेंच नाहीं; पण उलट ती थोडी हसतच होती. ती बापाला म्हणाली—

“ बाबा, अंथरुणावरून असें एकदम उठण्याची घालमेल तुमच्या काळजाला बरी नाहीं असें डॉक्टरांनी तुम्हाला सांगितलें आहे ना ? काय दिसलें तुम्हाला आरशांत, तुम्ही पाहून दचकलां तें ? ”

भाऊ.—अग, माझ्याबरोबर तुलाहि समोरचा आरसा दिसतोच आहे.

आणि त्यांत माझ्या उशाकडून पडणारें सगळें प्रतिबिंब मला दिसलें तें तसें तुलाहि दिसलेंच असेल. मग मला काय विचारतेस काय दिसलें म्हणून ?

विमल—मला काय दिसलें तें मीं ओळखलेंहि. म्हणून मला आश्चर्य वाटलें नाही. पण तुम्हाला काय दिसलें ?

ती आकृति अदृश्य होतांच भाऊसाहेब पुनः पूर्वीसारखे अंथरुणावर पडले. तों पुनः एकदा दारावरचा पडदा बाजूला होऊन तीच आकृति आरशांत भाऊसाहेबांना दिसली.

ही आकृति पाहण्याची त्यांची ही तिसरी खेप ! म्हणून दुसऱ्या खेपेप्रमाणे " आं ! हें काय दिसतें आरशांत " असेहि उद्गार त्यांच्या तोंडून निघाले नाहीत. उठून बसण्याचाहि त्यांनी प्रयत्न केला नाही. पण म्हणाले—

" विमल, बघ ना, बघ नीट. मला मनुष्याकृति दिसते आरशांत. कीं तो माझा भ्रम आहे ? मला एकट्याला दिसत असेल तर तो भ्रम. पण मला आणि तुला दोघांनाहि सारखेंच दिसत असेल तर तो माझा भ्रम नाही. माजघराच्या दारांत खरोखरच्च कोणी तरी उभें आहे."

बापाने निर्भय व्हावें याकरिता विमल त्याला ऐकूं जाईल असें मोठ्यांदा हसूं लागली आणि म्हणाली—

" बाबा, कांही थोड्या वेळापूर्वी तुम्हाला मीं विचारलें तें आठवतें का ? कीं बारा वर्षांनंतर तुम्ही प्रभाकराला ओळखाल का म्हणून ? आणि जटा वाढल्या असल्या तरी ? अन् दाढी वाढली असली तरी ? तुम्ही होय म्हणालां, ओळखीन् म्हणाला, म्हणून तुमची परीक्षा केली. तो दिसला तो कोण ओळखला नाहीत का ? आपला प्रभाकरदादा ! "

भाऊ.—अरे होय कीं ! प्रभाकरासारखाच चेहरा-डोळे आहेत खरे. अग, पण हीच आकृति मला त्या रात्रीं दिसली नव्हती का गेल्या अमावस्येच्या रात्रीं ?

विमल—होय. असें असून तुम्ही उगीच त्याला गुप्त पोलीस म्हटलें आणि माझ्या माईची निंदा करून त्याला आणखीहि जें कांही तुम्हीं म्हटलें त्याचा उच्चारहि नको. पण ही तुमची समजूत अगदी चुकीची होती. ती दूर करण्याचा प्रयत्न आम्ही करणार होतों, तोंच तुम्ही बेशुद्ध पडलां. मग आम्ही काय करणार ?

भाऊ.—मग मला आता तरी सांग ना, कीं मला वाटतो तसा तो प्रभाकर आहे, कीं त्याचें सोंग आहे? कीं वेषांतर केलेला कुणी गुप्त पोलीस आहे?

विमल—मी तुम्हाला कशाला भ्रमांत ठेवूं? आणखी थोड्याच वेळांत आणखी पक्की खूण पटण्यासारखा तो तुम्हाला दिसेल.

हें बोलणें होत आहे तों आरशांत दिसणारी आकृति अदृश्य झाली. विमल म्हणाली, 'मनीं वसे तें स्वप्नीं दिसे.' इतकेंच नव्हे, तर खरोखर प्रत्ययालाहि येतें कित्येक वेळां. आता मी जरा खुलासा करून सांगतें ऐका. कांही दिवसांपूर्वी प्रभाकरदादानेच आईला एक पत्र पाठविलें होतें, इकडे येण्याची सूचना देण्याचें. तें खरोखर नेहमीसारखें आधी तुमच्याच हातीं येऊन पडावयाचें; पण योग असा कीं, त्याच दिवशीं पोस्टाच्या शिपायाला आमच्या घरच्या मागच्या रस्त्याने आधी जाण्याची लहर आली, पत्रें वाटीत! पत्रांत पत्र दिसलें माईच्या नांवचें. तें त्याने तिलाच दिलें. तें सहज तुम्हाला कळलें. त्याचा तुम्ही विनाकारण किती तरी गवगवा केलात. मग अमावस्येच्या रात्रीं पाठोपाठ स्वतः प्रभाकरदादाच आला मागील दाराने घरांत. आम्हीच त्याला तिकडून आंत घेतला. तों फिरून योगायोग असा कीं, तुम्हीहि अवचित तेथेच नेमके आलां त्याच वेळीं कंदील-काठी घेऊन, गुप्त पोलीस शोधावयाला! मिळून दादाने तुम्हाला न कळत घरीं यावयाचें त्याचा हा असा विपरीत प्रकार झाला. तुमचें मन हळूहळू त्याच्याबद्दल शुद्ध व्हावें, आणि मग त्याने तुमच्या नजरेला पडावें असा आमचा बेत होता. त्याची मजल ही येथवर अशी आली. पण आता यापुढे आम्ही लपवालपवी कांहीच करीत नाही. हा पाहा दादाच जशाचा तसा तुमच्या भेटीला आणि तुमचा आशीर्वाद मागण्याला येतो आहे.

त्याप्रमाणे प्रभाकर आंत आला, आणि त्याने आपल्या बापाचे पाय घट्ट धरले. त्याच्या चेहऱ्याकडे पुनः पुन्हा पाहूनहि प्रथम भाऊसाहेबांची खात्री होईना. पण त्याचें रूप आणि त्याचा आवाज यांची ओळख ते कसे विसणार? शिवाय हें स्वप्नप्रदर्शन नव्हतें किंवा आरशांतलेंहि नव्हतें, अगदी प्रत्यक्ष होतें, शेवटीं पितृवात्सल्याचा जोर झाला व प्रभाकराचा हात आपल्या हातांत घेऊन भाऊसाहेब गहिंवरून म्हणाले, "प्रभाकर, हा तुझ्या आईच्या पुण्याईचा आणि तुझ्या बहिणीच्या प्रेमाचा प्रभाव आहे. तूं आलास, ये. मात्र आता तुझें पुढे काय होणार याचीच मला काळजी वाटते. तूं आलास खरा. पण तो कायमचा

घरीं राहावयाला आलास कीं नुसता भेटून चटका लावून जावयाला आलास, कांही कळत नाही! माझें मन पुनः भ्रमाने घेरलें; माझें डोकें इतकें हलकें झालें आहे कीं, थोड्याशा क्षोभानेहि मला घेरी येते.

प्रभा.—बाबा, तुमचा आशीर्वाद असेल तर माझें कसेंहि निभावून जाईल. पण मला प्रथम हें सांगा कीं, माईसंबंधाने तुम्ही जो विनाकारण संशय घेतला तो आता तरी गेला ना तुमच्या मनांतून? मी काय पुरुष मनुष्य आहें. दोन धक्के देईन दोन घेईन. माझें लग्न नाही, संसार नाही. पण आमची माई गरीब गाय आहे, प्रेमळ आहे, पापभीरु आहे. तुम्हाला तिचा संशय आला असें कळल्यापासून ती कशी अगदी मनांत पिचते आहे. बिचारीला अन्न गोड लागत नाही. तिला माझी एक काळजी आहेच अन् शिवाय ही. काय बरें करावें तिने?

हे शब्द ऐकून भाऊसाहेबांना मनांतून फार वाईट वाटलें. प्रेम म्हणतात तें या पतिपत्नींत नव्हतें, तरी तिच्याबद्दल भाऊसाहेबांना आदर असे. म्हणून, तिला आपण इतका धडधडीत अन्याय केला कीं, पूर्वी आपल्या मुलीने आपले कान उपटले, तसे आज मुलगाहि केवळ न्यायबुद्धीने उपटीत आहे; आणि ते उपटून घेण्याइतके आपण अविचारी व नादान ठरलों, या विचाराने त्यांच्या मनाला इतकें वाईट वाटलें कीं, ते स्फुंदून स्फुंदून रडूं लागले, आणि त्या दुःखावेगांतच त्यांना पुनः जोराचा भ्रमाचा झटका आला.

इकडे बाहेर दत्तविधानाच्या तयारीची घालमेल सुरू होती. ही तयारी दिवाणसाहेबांच्या हुकुमाने होत होती. कारण भाऊसाहेबांच्या संमतीच्या पडत्या फळाची आज्ञा घेऊन सुभेदारांनी दत्तविधानाच्या तयारीचें घोडें दामटावयाला सुरुवात केली होती. या तयारीला ताबडतोब मनाई करावी असें एक वेळ विमलच्या मनांत आलें. आणि स्वतः प्रभाकर प्रकट होऊन ओसरीवर उभा राहिला असता, तर आंत परवानगीशिवाय पाऊल घालण्याची कोणाची प्राज्ञा होती? पण प्रकट व्हावयाचें तें जरा मौज करून दणदणीतपणाने व्हावें असें भावा-बहिणींनी ठरविलें होतें. म्हणून ही दत्तकाची तयारी तशीच चालू राहूं देण्यांत मनांतून त्यांना एक प्रकारची गंमतच वाटे.

दत्तविधानाकरिता भाऊसाहेबांच्यातर्फे आमंत्रणें कोणासच केलेलीं नव्हतीं. पण ती सर्व उणीव सुभेदारांनी भरून काढली होती. त्यांनी आपल्या पुठ्यांतले बहुतेक पुंड बोलावले होते. खुद्द दिवाणसाहेबांना अगत्याचें आमंत्रण होतें. ते

येणार म्हणून त्यांच्याकरिता वेगळी लोड-गादी मांडली होती. समारंभाकरिता पानसुपारी, पेढे, फुलें यांची तजवीज भाऊसाहेबांच्या घरून कांहीच झाली नव्हती. ती सर्व सुभेदारांनीच केली. ज्याला दत्तक घ्यावयाचा त्याची तयारी कांहीच नाही, आणि ज्याचा द्यावयाचा त्यानेच ती सगळी संभाळली. याचा अर्थ उघड होता व तो सुभेदाराला लाजिरवाणा असाच होता. पण सुभेदाराच्या स्वार्थाने त्याची लाज मारून टाकली होती. एखाद्याच्या घरीं माणूस मेला असला म्हणजे खुद्द घरचीं माणसें गप्प बसलेलीं असतात, आणि बाहेरचींच घरांत वावरत असतात. तसाच कांहीसा प्रकार आज भाऊसाहेबांच्या घरीं चालू असलेला बाहेरच्या पाहणाराला दिसला. भाऊसाहेब पायावर उभे असते तर ते स्वतः घालमेलींत दिसते किंवा दत्तविधान रहित केलें असा ताठ निरोप पाठवून घरांत कोणाला पाऊल घालूं देते ना. पण आज ते पडले शरपंजरीं व भ्रमाने घेरलेले. दत्तविधान करण्याची सक्ती त्यांच्यावर बाहेरच्या माणसांकडून होत होती. घरचीं माणसें मनांतून नको म्हणत होतीं; पण त्यांना समारंभाची तयारी कांही एका कारणासाठी बाहेरून चालू ठेवावयाची होती!

ठरल्या वेळेच्या आधी सुभेदार आपले गण घेऊन आले. दोन माणसें विड्याचीं तबकें, फुलें घेऊन आलीं. एकाने साखरपुडे करून आणले होते. गांवचा फोटोग्राफर आपलीं सर्व आयुधें घेऊन आला असून त्याने त्यांची मांडामांड सुरू केली. इतक्यांत दिवाणसाहेबांची स्वारीहि गाडींतून आली. त्यांचा सत्कार परस्पर सुभेदारांनीच केला. भाऊसाहेब आजारी म्हणून त्यांना आयत्या वेळीं उठवून बसवावयाचें; त्याप्रमाणे सुभेदारांच्याच माणसांनी उठवून बसविलें. मात्र त्यांना संभाळण्याकरिता म्हणून दौलती तक्या धरून जवळच मागे उभा राहिला. बाहेरच्या बायकांना आमंत्रणें नव्हतींच व घरच्या बायका तरी दिवाणखान्यांत कशाला येतील? एका दाराजवळ एक पडदा टाकून त्या त्यांतून पाहत होत्या.

प्रथम कांही तरी प्रस्तावना हवीच म्हणून दिवाणसाहेबांनी भाऊसाहेबांच्या प्रकृतीची चौकशी केली. त्याला भाऊसाहेब भ्रमिष्ट माणसाप्रमाणे एखादा शब्द सरळ तर एखादा विचूक अशीं उत्तरें देत. तरी दिवाणसाहेबांनी आपणच होऊन दत्तविधानाची उघड प्रस्तावना केली. ते म्हणाले—

"आपणाला मीं पत्रांत लिहिलें तें अगदी मनापासून लिहिलें. आणि तुम्ही त्याला मान देऊन दत्तविधानाचा निश्चय केला हें फार चांगलें झालें.

नव्या कारकीर्दीत दत्तक संस्थेवर कटाक्ष किती आहे हें तुम्हाला माहीत नाही. तथापि हें दत्तविधान प्रत्यक्ष झाल्याचा विश्वसनीय पुरावा असणें इष्ट आहे; म्हणून मी यजमानसाहेबांच्या गैरमर्जीची पर्वा न करतां येथे आलों. तेव्हा आता होऊं द्या समारंभ."

भाऊसाहेबांच्या तोंडून आमिष्टाप्रमाणे एकदा हं एकदां अंहं असे शब्द निघत होते, पण त्याकडे कोणाचें लक्षच नव्हतें. समारंभाला धार्मिक विधीचें स्वरूप नव्हतें. म्हणजे पुण्याहवाचन, होमहवन कांही व्हावयाचें नव्हतें. फक्त मुलगा मांडीवर देण्याचा लौकिक शरीरदान-समारंभ व्हावयाचा होता. सुभेदार उठून उभे राहिले. त्यांनी बाजीरावालाहि हाताला धरून उभें केलें; आणि उपरण्याचा पदर डोळयाला लावून रडूं आल्याचा व कंठ सद्गदित झाल्याचा बहाणा करून म्हणाले--

"येऊन-जाऊन मला या जगांत डबीर घराण्याचें कल्याण पाहायचें. दुसरें कर्तव्य मी ओळखीत नाहीं. भाऊसाहेबांना दुर्दैवाने आता तैनात चालवायाला पुत्र नाही—

असें ऐकतांच भाऊसाहेब हातवारे करून, माना हालवून, त्या शब्दांना नकार देऊं लागले. या नकाराचा अर्थ आपल्याला हवा असाच करून सुभेदार म्हणाले, "पाहा पाहा, भाऊसाहेबहि मी म्हणतों तेंच म्हणत आहेत. तैनात चालवायला पुत्र नाही—"

त्याबरोबर माजघरांतून एका स्त्रीचा आवाज मोठ्याने खणखणीत ऐकूं आला. ती म्हणाली—

"भाऊसाहेबांच्या म्हणण्याचा अर्थ तसा नाही. आपल्याला तैनात चालवायला मुलगा नाही हें जें सुभेदार म्हणतात तें खरें नाही असा त्यांच्या नकाराचा अर्थ आहे, समजलां!"

सुभेदार थोडे दचकले. पण तसेंच पुढें रेटून म्हणाले, "कसेंहि असो. भाऊसाहेबांनी माझा मुलगा बाजीराव आपल्या मांडीवर दत्तक घेण्याला मागितला. तो देण्याचें पूर्वीच कबूल केलें होतें आणि आता हा पाहा सर्वांच्यादेखत मी त्याला भाऊसाहेबांच्या मांडीवर दत्तक म्हणून देत आहे."

असें म्हणून सुभेदारांनी मोठ्याने गळा काढला. तरी पण दुःखाचें असलें तरी आपण करीत आहों तें महत्कर्तव्यच जसें कांही, अशा अर्थाने ते बाजीरावाला उचलून घेऊन भाऊसाहेबांच्या अगदी जवळ गेले; व त्यांनी बाजी-

रावाला भाऊसाहेबांच्या मांडीवर दडपून बसविण्याचा प्रयत्न केला. चट्दिशी उडी मारून मांडीवर जाऊन बसावें इतका बाजीराव चपळ नव्हता. दत्तक होऊन मिळणाऱ्या वैभवाची श्रीमंतीची कल्पना त्याच्या बापाला होती तशी ती स्वतः त्याला नव्हती. त्याची हालचाल बापाच्या हाताच्या सूत्राने चालू होती. बरें, भाऊसाहेबांनी हात किंवा मांडी पुढे करावी ती तेहि पुढे करीनात. त्यांच्या तोंडून शब्द निघत नव्हता, पण नकारदर्शक मान डोलत होती. तेव्हा आंतून एका स्त्रीचा आवाज पुनः ऐकूं आला. ती म्हणाली—

"खबरदार, मुलगा माझ्या बापाच्या मांडीवर घाल तर. माझा भाऊ अजून चांगला जिवंत आहे. तैनातीची तुम्हाला मुळीच काळजी नको. घ्या आपल्या मुलाला मागे बऱ्या बोलाने. भाऊसाहेब भ्रमांत आहेत, म्हणून त्यांच्याकरिता मी त्यांची मुलगी तुम्हाला सांगतें कीं, बाबांना मुलगा दत्तक घ्यावयाचा नाही!"

आता प्रकरण तेजाला आलें. सुभेदार म्हणाले, "या कामांत बायकांनी बोलण्याचा कांही एक अधिकार नाही. त्यांनी माजघरापुरतें पाहावें. भाऊसाहेबांनी मला बाजीराव दत्तक मागितला आहे. मीं त्याचें वाग्दान पूर्वीच केलें आहे. आता हें प्रत्यक्ष शरीरदान करीत आहें; आणि दिवाणसाहेबांसहवर्तमान येथे जमले ते सर्व याचे साक्षीदार आहेत."

असें म्हणून सुभेदारांनी पुनः लगट करून मुलाला भाऊसाहेबांच्या मांडीवर बसविण्याचा प्रयत्न केला. पण एखादी वीज कडकडून आवाज व्हावा तसा कोणा पुरुष मनुष्याच्या रागाच्या आवाजाचा कडकडाट झाला. भाऊसाहेबांनी आपली मांडी मागे ओढून घेतली. त्याबरोबर तिजवर बसूं पाहणारा बाजीराव कोलमडून खाली धाडकन् पडला, आणि दारावरचा पडदा बाजूला सारून प्रभाकर उडी मारून दंड थोपटून जमलेल्या मंडळींत येऊन उभा राहिला आणि म्हणाला—

"सुभेदारसाहेब, एवढा गळा काढून रडतां कां? मुलगा दत्तक द्यावा लागतो असा बहाणा करूनच ना? हा पाहा, तुमचें रडणें थांबविण्याकरिता मी स्वतः आलों अस्मानांतून धांवून! मी प्रभाकर! भाऊसाहेबांचा औरस मुलगा! तैनातीचा धनी! पोटच्या पोराला विकून दुसऱ्याच्या दौलतीचा अभिलाष धरून स्वतःचें पोट जाळण्याची तुम्हाला इच्छा असेल, तर दुसरा एखादा निपुत्रिक श्रीमंत गांठा जा! माझे वडील निपुत्रिक नाहीत! मी कुठे अंदमानांत गेलों नाही किंवा मेलों नाही. तुम्हा सर्वांच्या उरावर नाचण्याकरिता हा परत आलों

आहे. आणि ईश्वराच्या घरीं न्याय असतो कीं नाही हें बारा वर्षांच्या तपश्चर्येनंतर अजूनहि पाहणार आहें. सुभेदारसाहेबांप्रमाणे या दुष्ट हरामखोर दिवाणसाहेबांनाहि मी हेंच बजावतों. चला, माझ्या घरांतून निघून चालते व्हा. न गेला तर शोभा होईल. एकेकाला गचांड्या मारून घालवून देईन."

ही गर्जना ऐकून सभा उठली. सर्व सामान जिथल्या तिथेंच पडलें. दिवाणसाहेबांसह ज्याने त्याने आपापली छत्री-काठी सावरून, बाहेर पडून आपल्या घराची वाट धरली. दिवाणखाना रिकामा होतांच प्रभाकर बापाच्या पायांवर डोकें ठेवून म्हणाला, " बाबा, तुमच्या डोक्याला फार त्रास झाला. मला क्षमा करा!"

१५ न्यायदेवतेचा निद्राभंग

दत्तविधानाला आलेली सर्व मंडळी अशा रीतीने घराबाहेर गेल्यावर प्रभाकर व विमल यांनी माईसाहेबांशीं सहविचार केला. माईसाहेब म्हणाल्या—

" बाळ प्रभाकर, तूं माझ्यावरचें हें दत्तकाचें संकट निस्तरलेंस. पण आता तुझें पुढे कसें होईल?"

प्रभाकर हसून म्हणाला, " दत्तकाचें संकट कसचें टाळलें? आयता तुला बाळंतपणाशिवाय चालताबोलता मुलगा मिळत होता तो मिळूं दिला नाही हा तुझा मीं अपराध केला नाही का ग माई?

विमलहि खो-खो हसली आणि म्हणाली, " होय रे होय! मुलगा चालता होता आणि बोलताहि होता. पण कसा चालत होता आणि कसा बोलत होता तो पाहिलास ना ग माई? जन्मभर तुला मुलग्याचा मुलगा होऊन शिवाय वरती करमणूकहि झाली असती हसायला!"

माई.—हो, मला त्याला हसायला आणि लोकांनी मला हसायला?

विमल—लोकांना हसायला काय झालें? पण मुलगा तर मिळाला ना सई! बिनश्रमाने आणि बिनखर्चाने? आमच्या माईला एक सोडून दोन मुलगे!

माई.—आणि तूं नाही का एक तिसरा! पण आता तुम्ही माझी चेष्टा करीत बसणार कीं पुढचा विचार करणार?

प्रभा.—पुढचा विचार काय उघड आहे. सरकार मला पकडून नेणार हें

मला इकडे येण्यापूर्वीच कळलें होतें. त्यांनी वाटेल तेव्हा पकडून न्यावें. माझी तयारीच आहे.

विमल म्हणाली, "तसें नाही, दादा! सरकार तुला पकडून नेणार हें ठरलेलेंच असलें तरी त्यांनी पकडून नेण्याची वाट तूं पाहूं नये. मला वाटतें, तूं आपण होऊन जावें हें अधिक बरें. त्याला वेगळा अर्थ आहे."

प्रभा.—मग काय दिवाणसाहेबांच्या घरीं जाऊं कीं कोतवालीवर जाऊं म्हणतेस? मला जायला काय? पण त्यांत कमीपणा वाटतो. कोतवालीच्या लोकांची काय योग्यता? आणि दिवाणसाहेब डोळ्यांना दिसले, कीं कदाचित् देहभान विसरून मी त्यांच्या अंगावर हातहि टाकायचा! इतके ते मला नीच, अधम वाटतात.

विमल—तूं आपण होऊन हजर हो. पण दिवाणसाहेबांकडे जाऊं नको आणि कोतवालीवरहि जाऊं नको. पूर्वी मनांत योजल्याप्रमाणे एकदम सरळ उठून राजेसाहेबांच्याकडे जा, आणि म्हण कीं, "मी हा जातीने हजर झालों आहें. माझा न्याय करा. माझा न्याय होईपर्यंत मी अटकेंत राहावयाला तयार आहें."

प्रभा.—हां-हां. ही युक्ति ठीक आहे!

विमल—आणि जाणार तोंहि आताच्या आताच जा. कारण दिवाणसाहेब येथून रागारागाने गेले आहेत तरी ते यजमानसाहेबांकडे जाऊन, त्यांचे कान भरून, त्यांचा हुकूम मिळवून मग तुला धरणें पाठविणार. या गोष्टीला कांही तरी वेळ लागेल. त्याऐवजीं तूं आताच जाऊन राजेसाहेबांपुढे उभा राहिलास तर अधिक बरें नाही काय?

प्रभा.—पसंत! मला हें अगदी पसंत आहे. मीं निघूं तर?

माई.—पण आधी घरांत चल, फराळ कर. असाच्या असा मी तुला जाऊं द्यायची नाही, कांही केल्या! अशा या उतावळ्या स्वभावानेच तुझ्यावर संकटें येतात.

माईसाहेबांची ही सूचना विमललाहि पसंत पडली. ती म्हणाली, "चल घरांत, मलाहि भूक लागली आहे. तूं अन् मी बसून फराळ करूं पोटभर. दत्तविधानाचे पेढे मिळावयाचे सुभेदारसाहेबांकडून ते बुडाले. तेव्हा आता घरचे तरी खाऊन घेऊं!"

इतकें बोलणें झाल्यावर सर्व मंडळी घरांत गेली. कांही वेळाने विमल आणि

प्रभाकर भाऊसाहेबांच्या बिछान्याशीं आलीं. त्यांना झोप लागली होती म्हणून त्यांना उठवूं नये असें ठरलें. फक्त प्रभाकराने पुत्रधर्माला जागून बापाच्या पायाला हात लावून नमस्कार केला आणि " ताई, मी जातों, थेट राजेसाहेबांची गांठ घेतों, मग काय व्हावयाचें तें होवो. तूं आहेसच माईला आणि बाबांना संभाळायला " असें म्हणून तो घराबाहेर पडला.

* * *

राजे नवलराय संध्याकाळचा फेरफटका पुरा करून, कपडे बदलून, बाहेरच्या दालनांत येऊन स्वस्थ बसले होते. तों खालून जमादार सांगत आला कीं, " कोणी एक मनुष्य महाराजांची भेट घेण्याकरिता आला आहे. आज्ञा होईल तर वर पाठवून देतों."

प्रभाकर वर आला तो आंतल्या बाजूला दाराच्याच शेजारीं उभा राहिला. त्याने एकवार लवून नमस्कार केला. तो राजेसाहेबांनी तितकाच लवून घेतला व ते म्हणाले, " असे उभे कां ? पलीकडे ती खुर्ची आहे, तिजवर बसा."

प्रभा.—मला खुर्चीवर बसण्याची परवानगी दिली हा आपला थोरपणा आहे. पण या क्षणीं आपणासमोर खुर्चीवर बसण्याला मी अपात्र आहें असें मला वाटतें.

नव.—तें कां बरें ? उलट, मला कोणी भेटावयाला आला असतां मीं त्याला खुर्ची दिली नाही बसायला, आणि मी मात्र बसून राहिलों, तर मी तो त्याचा अपमान करतों असें मलाहि वाटतें, त्याला काय करावें ? तुम्हीं ' या क्षणीं ' खुर्चीवर बसण्याला मी अपात्र आहें असें म्हणालां, त्याचा अर्थ मी नाही समजलों कांही !

प्रभा.—मी महाराजांपुढे उभा आहें तो सरकारने ज्याच्यावर तोहमत ठेवली आहे असा एक गुन्हेगार– नव्हे, पण आरोपी– आहे.

नव.—याचाहि अर्थ मला नीटसा कळला नाही.

प्रभा.—सरकारच्या दृष्टीने मीं कांही अपराध केलेला आहे. पण माझ्या दृष्टीने मीं तो केलेला नाही.

नव.—मग अशा मतभेदाचा निकाल करण्याकरिता न्यायकचेऱ्या काढलेल्या आहेतच. तो मतभेद घेऊन येऊन मला भेटून तुम्ही काय करणार ?

प्रभा.—न्याय मागणार.

नव.—मग न्यायच मागावयाला आलां आहां तर खुर्चीवर बसावयाला

तुम्हाला कांही एक हरकत नाही. जो स्वतःला निरपराधी समजतो, तो त्या क्षणीं स्वतंत्रच आहे. आणि जो प्रजानन असा स्वतंत्र आहे तो माणुसकीच्या हक्काच्या दृष्टीने राजाच्या बरोबरीचा आहे असें मी मानतों. म्हणून म्हणतों खुर्चीवर बसा, आणि कशा कामीं काय न्याय मागतां तें स्वस्थपणाने सांगा !

इतका स्पष्ट खुलासा झाला तरी प्रभाकर खुर्चीवर बसेना. तेव्हा राजेसाहेब म्हणाले, "तुमचें कर्तव्य खुर्चीवर न बसण्याचें असेल तर मला माझेंहि कर्तव्य केलें पाहिजे. मीहि उभा राहतों, आणि दोघेहि उभ्यानेंच बोलूं."

गोष्ट इतक्या निकरावर आलेली पाहून प्रभाकर खुर्चीवर बसला. मग संभाषण सुरू झालें. प्रभाकर म्हणाला—

"माझी हकीकत थोडक्यांत अशी आहे. मी आपल्या या राजधानीचाच रहिवासी. माझें नांव प्रभाकर. भाऊसाहेब डबीर म्हणून या संस्थानचे एक तैनातदार आहेत. त्यांचा मी मुलगा. बारा वर्षांपूर्वी माझ्यावर सरकारकडून एक खटला भरण्यांत आला होता."

नव.—त्याचें स्वरूप काय होतें ?

प्रभा.—राजद्रोह आणि खुनाचा आरोप असे सजोड आरोप मजवर ठेवण्यांत आले होते म्हणतात.

नव.—राजद्रोहाचें कृत्य कोणतें ?

प्रभा.—संस्थानी सरकार व ब्रिटिश सरकार यांची बदनामी करण्यासारखे जाहीरनामे लिहून भिंतीवरून मीं चिकटविले असें सरकारचें म्हणणें.

नव.—आणि खून कोणाचा ?

प्रभा.—दिवाणसाहेबांचा व कदाचित् पोलिटिकल एजंटाचा.

नव.—आणि हे दोनहि आरोप खोटे होते असें तुमचें म्हणणें ? बरें मग त्या आरोपांचें काय झालें ?

प्रभा.—माझ्या पश्चात् त्या आरोपांची चौकशी झाली व मला जन्मठेपेची शिक्षा झाली.

नव.—चौकशी तुमच्या पश्चात् काय म्हणून ? आणि तुम्हाला जन्मठेपेची शिक्षा होऊन तुम्ही मोकळे कसे ?

प्रभा.—माझ्या पश्चात् इन्साफ होण्याचें कारण मी पकडण्यापूर्वी या राज्यांतून निघून मोंगलाईत गेलों.

नव.—हे गुन्हे केले नाहीत, तुम्ही निर्दोषी होतां, आरोप खोटे होते,

असें तुमचें म्हणणें होतें, तर तुम्ही फरारी कां झाला ? न्यायासनासमोर हजर राहून तुम्ही आपली बाजू कां मांडली नाही ? आपलें समर्थन कां केलें नाही ? फरारी होऊन आपणावरचा वहीम--अंदेशा--तुम्हीं उलट बळकटच केला कीं नाही ?

प्रभा.—तें खरें आहे. पण आपणाला विश्वास पटेल तर सांगतों कीं, त्या न्यायासनाकडून त्या कारकीर्दींत मला न्याय मिळण्याची आशाच वाटत नव्हती. म्हणून कालहरण करण्याकरिता फरारी झालों.

नव.--बरें, तुम्हीं बारा वर्षांपूर्वी फरारी झालां. मग परत यावें असा तुमचा निश्चय केव्हा व कां झाला ?

प्रभा.—मी मोंगलाईत असतांना आपण कची मुखत्यारी घेतांना जें भाषण केलें तें मला वाचावयाला मिळालें त्याच दिवशीं.

नव.—मीं त्या भाषणांत काय म्हटलें होतें ?

प्रभा.—'गेल्या बारा वर्षांतल्या कारभाराची तपासणी करीन' म्हणून !

नव.—मी बोलल्याप्रमाणे या कामीं करीनच असें कशावरून ?

प्रभा.—मनुष्य बोलतो त्यावर प्रथमदर्शनीं विश्वास ठेवणें यांत तरी कांही चूक नाही असें आपणहि कबूल कराल. त्याउपर फसणें ही नशिबाची गोष्ट आहे. आपण संस्थानचे राजे आहां. मर्जीला येईल तसें करा !

नव.--बरें, तुम्ही आपण होऊन हजर झाला हा भलेपणा लक्षांत घेऊन फेरचौकशीच्या भानगडींत न पडतां, मीं जर फिरून तुम्हाला फरारी होण्याची संधि दिली तर ती तुम्हीं घ्यावी हें अधिक बरें नाही काय ?

प्रभा.—मला पकडणें न पकडणें हें जसें आपल्या हातचें आहे, तसेंच यापुढे गुप्त न राहतां प्रकट रीतीने वागणें-वावरणें हें माझ्याहि हातचें आहे. मला फरारीच राहावयाचें असतें तर मी मोंगलाईतून परत तरी कां आलों असतों ? मला न पकडतां मोकळाच राहूं दिलात तरी यापुढे मला त्यापासून सुख लागणार नाहीं ! माझा न्याय होऊन मी निरपराधी होतों असें ठरेल तरच सुख लागेल.

नव.—पण फेरचौकशी न होतां केवळ तुमच्या शब्दांवर विश्वास ठेवून मीं तुम्हाला मोकळा सोडणें, आणि चौकशी होऊन निरपराधी ठरून तुम्ही मोकळे सुटणें, दोहोंची फलश्रुति तुमच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने सारखीच नाही काय ?

प्रभा.—नाही. फेरचौकशी न होतां मी मोकळा झालों तर लोक समजतील कीं, मी दयेची याचना करून माफी मिळवून मोकळा झालों. मला माफी नको, न्याय पाहिजे. आणि न्याय याचा अर्थ मी जसा खरा तसे माझे प्रतिपक्षी दिवाणसाहेब हे खोटे, असें उघड सिद्ध झालें पाहिजे. बारा वर्षांनी परत येऊन मी इन्साफ मागणें हें द्राविडी प्राणायामासारखें दिसतें खरें, पण कोणी सरळ घास घेऊं नच दिला तर द्राविडी प्राणायामाने तो घेतला पाहिजे; त्याला काय करणार? दिवाणसाहेबांसंबंधाने मला किती तरी माहिती आहे, आणि ती ऐकण्याची आपली इच्छा असली तर मी सांगूं शकेन.

नव.—नाही. कोणाहिविरुद्ध एकतर्फी कागाळया ऐकणें हें रास्त नव्हे. तशा मी ऐकत नसतों. शिवाय या प्रकरणांत न्यायदानाचा संबंध आहे, म्हणून मला विशेष जपलें पाहिजे. ठीक आहे. हें तुमचें प्रकरण मी उद्या हातीं घेतों. तुम्हाला बोलावीन तेव्हा फिरून या. प्रकरणाचा अखेर निकाल लागेपर्यंत तुम्ही राजधानी सोडून कोठे बाहेर जाणार नाही याविषयी माझी खात्री आहे. म्हणून तशी सूचना देऊन मी तुमचा अपमान करूं इच्छीत नाही.

इतकें बोलणें होत आहे तोंवर बराच अंधार पडत चालला असें पाहून जमादाराने मोठा प्रकाश देणारा दिवा आणून ठेवला. त्या उजेडाने राजेसाहेब व प्रभाकर हे एकमेकांकडे पाहून दोघेहि आपापल्या ठिकाणीं किंचित् दचकले. प्रभाकर उठून निघाला असें पाहून राजेसाहेब त्याला म्हणाले--

“ थांबा हां जरा दोन मिनिटें. मला तुम्हाला आणखी कांही विचारावयाचें आहे.”

प्रभा.—काय वाटेल तें महाराजांनी अवश्य विचारावें. खरें तेंच सांगेन.

नव.—मला वाटतें, तुम्हाला मीं पूर्वी कोठे तरी पाहिलें असावें, होय का?

प्रभा.—मीं उलट तसें कसें म्हणावें? पण महाराजांनाहि मीं कोठे तरी पूर्वी पाहिलें असावें असें वाटतें. बोलल्याची क्षमा व्हावी.

नव.—पण तुमच्या वेषांत थोडा फरक झाला आहे.

प्रभा.--आणि महाराजांना मीं जेव्हा पाहिलेंसें वाटतें तेव्हा आपलाहि वेष किंचित् वेगळा होता.

नव.—मीं तुम्हाला पाहिलें तेव्हा तुम्हाला दाढी होती.

प्रभा.--होय, पण ती खरी होती. आणि क्षमा असेल तर बोलतों—

नव.—बेलाशक बोला. त्यांत क्षमा कसची ? आपण फार तर एकमेकांना ओळखी पटवितों आहों.

प्रभा.—महाराजांनी मात्र त्या वेळीं दाढी कृत्रिम लावली होती असें वाटतें. म्हणजे महाराजांना त्या रात्रीं पाहिलें तेंच खरें असेल तर! आमच्या घरीं मागील दारीं— ?

नव.—कोणत्या दिवशीं ?

प्रभा.—गेल्या अमावास्येच्याच दिवशीं !

नव.—होय. तुम्हीं दिली ती खूण बरोबर आहे. तो गस्तीला जाण्याचा माझा पहिलाच दिवस होता, म्हणून वेषांतर बरोबर साधलें नसावें. बरें, आता क्षमा करा असें तुम्हाला म्हणण्याची माझी पाळी आली.

प्रभा.—कां बरें ?

नव.—कारण आता तुमच्या घरगुती गोष्टी बोलण्यांत येणार म्हणून ! त्या वेळीं त्या ठिकाणीं जो प्रकार घडला तो जरा चमत्कारिक वाटला. त्या ठिकाणीं एक वृद्ध गृहस्थ आणि दोघी स्त्रिया होत्या—

प्रभा.—होय. ते वृद्ध गृहस्थ माझे वडील आणि त्या स्त्रियांपैकी एकजण तरुण होती ती माझी धाकटी बहीण, व थोडी प्रौढ होती ती माझी सावत्र आई. आपण प्रकार पाहिला तो असा कीं, माझ्या वडिलांना वयामुळे भ्रम झाला आहे. त्यांच्यामागे गुप्त पोलीस लागले आहेत असें त्यांना वाटत असतें आणि त्यांना शोधावयालाच म्हणून त्या दिवशीं, त्या वेळीं माझे वडील कंदील घेऊन परसांत गेले. आणि योग असा कीं, मी बारा वर्षांनी परत घरीं गुप्तपणाने यावयाचें म्हणून आईला कळवून आलों तो नेमका त्याच वेळीं ! बाबांना यांतलें कांहीच ठाऊक नव्हतें; आणि माझा तो तसा बैराग्याचा वेष ! तेव्हा मीच त्यांना गुप्त पोलीस वाटलों. यामुळे मेंदूला धक्का बसून ते बेशुद्ध पडले.

नव.—तुमच्या बहिणीने मात्र त्या वेळीं फार प्रसंगावधान दाखविलें. शाबास आहे तिची ! तिने मला घराबाहेर जावयाला सांगितलें तें योग्य होतें, पण तसें सांगावयाला तिला धैर्य कसें झालें, याचेंच मला आश्चर्य वाटतें. मीं तर त्यांचा रुबाब पाहून थक्कच झालों.

प्रभा.—ती तशी धीटच आहे. शिक्षणाने, सद्‌गुणीपणाने व आत्मविश्वासाने तिला धीट बनविलें आहे. शिवाय न्यायाला व हक्काला ती जपणारी

आहे, कोणाच्याहि ! तिचें नांवच निघालें म्हणून तिचें वर्णन परक्या मनुष्या-पुढेहि केल्याशिवाय माझ्याने राहवत नाही. माझ्या प्रेमामुळे ती आजवर अविवाहित राहिली. माझ्या अभावीं माझी, म्हणजे मुलग्याची जागा घेऊन तिने माझ्या बाबांची वृद्धपणांत सर्व प्रकारची शुश्रूषा केली. पण ती प्रेमळ आहे तितकी स्वाभिमानीहि आहे. तिच्या संमतीनेच मीं आपणाकडे समक्ष येऊन हजर होण्याचें ठरविलें; आणि मला खात्री आहे कीं, मला न्याय मिळण्याच्या कामीं माझ्या वडिलांपेक्षा माझी बहीणच अधिक तजवीज करील.

नव.—असो. तुम्ही आतां जा. योग्य मार्गाने तुम्हाला फेरचौकशीकरिता जो काय अर्ज करावयाचा असेल तो करा. किंवा सरकारी हुकूम होईल तेव्हा त्याप्रमाणे हजर राहा.

इतकें बोलून राजेसाहेबांनी प्रभाकराला निरोप दिला व तोहि लवून नमस्कार करून जिना उतरून निघून गेला.

प्रभाकर गेल्यावर लवकरच मनोहर वर आला. तो आज मोठ्या खुषींत होता. आंत येतांच तो एखादी शिकार मारून आल्याच्या ऐटीने म्हणाला, "तुम्ही परवा मला त्या रात्रीच्या प्रकरणांतली माहिती काढायला सांगितली होती ना? आणि त्या सुंदर तरुण स्त्रीची? ती सर्व माहिती काढून आलों. उगीच नाही म्हटलं 'खासगी' कारभारी.

हें ऐकून महाराजांना हसूं आलें तें कांहीं केल्या थांबेना ! ते म्हणाले, "अरे जा! शेवटीं कारभारी तो कारभारी आणि राजा तो राजा! राजा म्हणजे देवाचा अंश; आणि देव हा सर्वज्ञच असतो. उगीच आपली तुझी परीक्षा पाहावयाला माहिती काढून ये म्हणून सांगितलें होतें झालें! तुझी शिळी माहिती ऐकण्याची आपली तर मुळीच इच्छा नाही.

मनोहर चकित झाला. माहिती शिळी कशी? आपला मित्र उगीच आपली थट्टा करतो आहे असें समजून तो त्या रात्रीच्या प्रसंगाची भाऊसाहेब डबीरां-च्या सर्व कुटुंबाची, प्रभाकराची व विमलची हकीगत सांगूं लागला. पण मनोहराने बोलावें त्याच्यापुढचें स्वतः नवलरायानेच नक्की सांगावें असें होऊं लागलें. शेवटीं मनोहर म्हणाला, "लवकरच हा प्रभाकर तुमच्या दृष्टीस पडेल." तेव्हा नवलरायहि त्याचे पाठीवर थाप मारून हसून म्हणाले, "बाबा मनोहरा, राजे लोकांचें सामर्थ्य तुला कुठे आहे माहीत? ते भविष्यकाळाचा भूतकाळहि करूं शकतात!" मनोहर आश्चर्य वाटून म्हणाला, "म्हणजे काय तें मी नाही

समजलों!" महाराज म्हणाले, "अरे, ज्याच्याविषयी तो माझ्या दृष्टीला लवकरच पडेल असें तूं म्हणालास, तो गुन्हेगार आपल्या पायांनी नुकताच येऊन मला भेटूनहि गेला!

"आणि तो आता कोठे आहे?" मनोहर आश्चर्याने म्हणाला.

नव.—गेला परत आपल्या घरीं!

मनो.—आणि तुम्ही त्याला तसाच मोकळा सोडून दिलात? तो शिक्षा झालेला गुन्हेगार आहे असें कळूनहि?

नव.—कां बरें? जो इतक्या वर्षांनी आपण होऊन परत आला तो काय पुनः फरारी होईल? पळून जाईल? तो बोलला ते सर्व सुसंगत संभावितपणाचें दिसलें म्हणून त्याला मीं जाऊं दिला. विश्वासाने, आपल्या इच्छेने, आपल्या पायांनी मजकडे न्याय मागावयाला जो मनुष्य आला, त्याचा विश्वासघात करून मीं त्याला अटक करावी हें योग्य झालें असतें काय?

मनो.—अटकच काय, पण त्याला पकडून, हातांत बेडया ठोकून, काढण्या लावून, तुरुंगाच्या कोठडींत परस्पर पाठविला असतात तरी योग्य दिसलें असतें इतका त्याचा गुन्हा मोठा आहे. माझ्या दृष्टीने नव्हे, लोकांच्या दृष्टीने.

नव.—हें पाहा, नुसतें गुन्ह्याचें स्वरूपच पाहावयाचें तर हातकडया घातल्यावर लाथाबुक्या मारीत, चाबकाने झोडपीत, असें सुद्धां आणखी कां नाही म्हटलेंस? जनरीतीप्रमाणे, म्हणजे सामान्य सरकारी रीतीप्रमाणे, तें शोभलेंहि असतें. पण त्याला जर पळूनच जावयाचें असेल तर तो स्वतः मजपर्यंत येऊन हकीकत सांगता तरी कां याचा कांही विचार, भल्या गृहस्था!

मनो.—बरें पण, आता यापुढे तरी त्याला अटक करावी याला तुमची हरकत नाही ना!

नव.—माझी हरकत असण्याचें कारण? खुशाल अटक करा. पण जामीन मिळाला तर जामिनावर सोडायला काय हरकत?

मनो.—आहे, त्याला हरकत आहे. मला जी एक भविष्याची दृष्टि लाभली आहे ती तुम्हाला नाही. तेव्हा सर्व गोष्टी यासंबंधांत यापुढे माझ्याच धोरणाने चालूं देत. हा तरुण गुन्हेगार केवळ आपल्या बापाचा मुलगा असता तर त्याला तुम्ही जामिनावर सोडा असें मीं म्हटलें असतें. पण तो आपल्या बहिणीचा भाऊ आहे म्हणूनच अटकेंत राहिला पाहिजे!

नव.--वा:, तूं तर अगदी उखाण्यांनीच बोलतो आहेस आज !

मनो.—उखाण्यांनी मी बोलतों असें तुम्ही माझें वर्णन केलें त्याने माझ्या भविष्यदृष्टीचेंच समर्थन झालें. पुढें होणाऱ्या गोष्टींना आधी वाचा फुटत असते असें म्हणतात तें कांही अगदीच खोटें नसेल यजमानसाहेब ! उखाणे घेण्याचीहि वेळ पुढे येईल कदाचित् याच प्रकरणांतून. पण अलीकडच्या प्रौढ वधू व घोडनवरे यांना उखाणे घेणें तेवढेंसें आवडत नाही म्हणून थोडी पंचाईत.

नव.—हें काय बडबडतो आहेस मनोहर, तें तुझें तुलाच ठाऊक ! भविष्यवाद्यांची भाषा 'बरळणें' हीच असते असें म्हणतातच म्हणा ! पण आतां मुद्दयाचें असें सांग कीं, या तरुण गुन्हेगाराला अटक केव्हा, कशी करावयाची ?

मनो.--तो येथे होता तेव्हाच तुम्ही त्याला अटक केली असती तर उत्तम झालें असतें. पण आता बहुधा दिवाणसाहेबच या प्रकरणीं लक्ष घालूं लागतील, आणि पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट या नात्याने त्यांनीच त्याला अटक करण्याचा हुकूम द्यावा हें बरें. दिवाणसाहेब तुमच्या भेटीला आले तर एक गोष्ट करा. ती ही कीं, प्रभाकर डबीर याला अटक करण्यासंबंधाने दिवाणसाहेब गोष्ट काढतील तेव्हा तो पूर्वी येऊन तुम्हाला भेटल्याचें कांहीच त्यांना दर्शवूं नका. आणि जसें कांही सर्व प्रकरण दिवाणसाहेबच उपस्थित करीत आहेत, आणि तें त्यांचें त्यांनीच सर्व हवें तसें तडीला लावावें, असें बोलण्याचा झोक ठेवा. लक्षांत ठेवा कीं, या प्रकरणीं आता दिवाणसाहेबांचे गुप्त रिपोर्ट तर पो. एजंटसाहेबांकडे जाण्यास सुरुवात होणार. त्यांत तुमच्या बदनामीलाहि सुरुवात होणार आहे. भावी वधूवर लक्ष ठेवून न्यायाच्या कामांत तुम्ही गैरवाका ढवळाढवळ करतां अशी बतावणी व कांगावा वर होण्याचा रंग आहे. म्हणून सावध राहिलें पाहिजे.

नव.--तर मग हीं सगळीं कारस्थानी तंत्रें तुझीं तूंच संभाळ कसा ! दिवाणसाहेब आले म्हणजे तूंच त्यांच्याशीं काय बोलावयाचें तें बोल. मी मधून मधून फक्त हुंकार देत जाईन, लहानपणीं तुझी माझी आई आपणाला गोष्टी सांगत होती तेव्हा देत असे तसा. मग तर झालें ना ?

मनो.--संस्थानिकाला शोभेल असेंच हें वर्तन दिसेल.

नव.-आणि कायद्याचें ज्ञान नसणाऱ्या अज्ञान मनुष्याला असेंहि कां म्हणेनास?

मनो.--तुमची निंदा करण्याकरिता म्हणावयाचें असेल तर तें वर्णन पुरें पडणार नाही. कारण अजून ज्या संस्थानिकाला पक्की मुखत्यारीहि मिळावयाची आहे, त्याला फौजदारी कायद्याचें सर्व ज्ञान कसें असणार? पण हें राहूं दे.

१६ माशाने माणिक गिळलें !

भाऊसाहेबांच्या घरचा दत्तविधानाच्या खेळाचा पट अशा आकस्मिक रीतीने; पण बिनतोड उधळला गेला कीं, दिवाणसाहेब सत्ताधीश होते तरी त्यांना आपला अपमान पदरांत गुंडाळून घेऊनच निघून जावें लागलें. सुभेदार हे प्रसंगावधानी, युक्तिबाज होते, तरी प्रभाकर प्रकट झाल्याने दत्तकाचा व्यूह कायमचा पुरा ढासळला या निराशेने त्यांची सगळी बुद्धि गारठून-थिजून गेली. यामुळे तोंडांत मारल्यासारखें होऊन त्यांनाहि डबीरांच्या वाड्यांतून पाय काढावा लागला. कदाचित् जागच्या जागींच सूड उगवून कांही थैमान घालावयाचें मनांत येतें, तर तें त्यांतल्या त्यांत दिवाणसाहेबांनाच शक्य होतें. कारण ते पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट होते. यामुळे त्यांना प्रभाकराला जागच्या जागीं अटक करतां आली असती. पण प्रभाकर तापट स्वभावाचा व जिवावर उदार झालेला पैलवान गडी! तो आधी दिवाणसाहेबांना लाथा मारून त्यांची बत्तिशीहि रंगवायचा, व मग काय होईल तें पाहूं असें म्हणावयाचा! पापकर्म करणारें मन आधीच आपोआप निमेंअधिक निर्बळ झालेलें असतें. त्यामुळे दिवाणसाहेबांचा राजकीय सत्तेचा अहंकार प्रभाकराच्या तेजापुढे फिकाच पडला. आणि गुन्हेगार म्हणून प्रभाकराला पकडण्याऐवजी, त्यांच्या मनाने स्वतः त्यांनाच गुन्हेगार ठरवून परक्याच्या घरांतून ओढून नेलें! पानविड्याची तयारी करून बरोबर आलेल्या कारकून मंडळींचें मन दिवाणसाहेब किंवा सुभेदार यांच्यापेक्षा अधिक निष्काळजी होतें. ते बोलून चालून तमासगीर! यामुळे कोणी मनांतून दिवाणसाहेबांच्या फजितीची चेष्टा करीत, तर कोणी प्रभाकर प्रकट झाल्याचें आश्चर्य करीत, घरोघर निघून गेले.

सुभेदार स्वतःच्या घरीं परत न जातां दिवाणसाहेबांच्याबरोबर त्यांच्या घरीं गेले. दोघेहि माडीवर जाऊन पुढचा दरवाजा बंद करून आरामखुर्ची-

वर पाय घेऊन अर्धा तास बसले तरी कोणाच्याहि सोडून शब्द निघेना. दोघांचेंहि लक्ष प्रभाकराकडेच लागलें होतें; पण प्रत्येकाचें निरनिराळ्या दृष्टीनें. दिवाणसाहेबांच्या लक्षांत दत्तविधान फिस्कटल्याचा चमत्कार भरून राहण्याचें कांहीच कारण नव्हतें; पण त्यांचें लक्ष प्रभाकर प्रकट झाल्याने, त्याला पुनः पकडून तुरुंगांत कसा डांबावा या विचाराने मग्न झालें होतें. सुभेदारांना प्रभाकर हा राजाचा गुन्हेगार, यापेक्षा आपला वैरी, असाच अधिक भासत होता. शिवाय दत्तविधान फिस्कटलें तर फिस्कटो, पण तें घडवून आणण्याकरिता आपण मारवाड्याकडून प्रॉमिसरी लिहून देऊन, पांच हजार रुपये कर्ज काढून, दिवाणसाहेबांच्या पदरांत ओतले त्याचें काय होणार, हाच विचार सुभेदारांच्या मनांत गोंधळ घालीत होता.

शेवटीं दिवाणसाहेबांनीच प्रथम विचारांना पाट फोडला. स्वतःच्या फजितीचें कांहीच नाही, व सांत्वन करावयाला हवें असेल तर तें सुभेदारांचें, अशा ऐटीने ते म्हणाले, “ जाऊं द्या कीं, सुभेदार ! अहो, विचार कसला करीत बसलां आहां ? धीर सोडूं नका. मी दिवाण आहें तोंपर्यंत तुमचें दत्तविधान केव्हा ना केव्हा तरी घडून येईलच. आता आधी प्रभाकराचा समंध पुनः डोकावूं लागला, त्याला पक्का गाडून टाकण्याच्या मार्गाला लागतों. फक्त त्याची शिक्षा त्याला ऐकवावयाची. पंधरा दिवसांचे आंत प्रभाकर अंदमानाची वाट धरतो कीं नाही पाहा ! आता प्रथम यजमानसाहेबांकडे जाऊन सर्व हकीकत त्यांच्या कानांवर घालतों; आणि पडत्या फळाची आज्ञा घेऊन आधी प्रभाकराला तुरुंगांत पोंचवितों म्हणजे झालें.”

पण या गोष्टीला सुभेदारांकडून चट्दिशी होकार येईना. दिवाणसाहेबांनी योजली ती गोष्ट व्हावी असेंच त्यांचेंहि मत होतें. पण ती गोष्ट होण्यापूर्वी दुसरी एक गोष्ट घडवून आणणें त्यांना अधिक अगत्याचें वाटत होतें. ती म्हणजे दिवाणसाहेबांच्या पदरांत ओतलेले पांच हजार रुपये त्यांजकडून परत घेणें. म्हणून ते म्हणाले, “ होईल कीं, सर्व कांही होईल. आपणासारखे सर्वसत्ताधीश करणार झाल्यावर नाही होणार असें काय आहे ? पण तूर्त तरी दत्तविधान थांबलें हें खरें. म्हणून पुनः तो योग घडून येईपर्यंत सर्वच बाजूंनी पूर्वीची स्थिति प्राप्त झाली आहे असें मानणें योग्य नाही काय ? ”

दिवाण—म्हणजे याचा अर्थ मी नाही समजलों नीट, सुभेदार ?

सुभे.—अर्थ हा कीं, आपण दत्तविधानाकरिता आपल्या वाड्यांतून

बाहेर पडण्यापूर्वी, मी मारवाड्याला प्रॉ. नोट देऊन पांच हजार रुपये आणून आपणाला दिले. ते त्याचे त्याला परत देऊन प्रॉ. नोट सोडवून आणली म्हणजे नाही का पहिली स्थिति होती तशी पुनः आली? प्रभाकर तुरुंगांत पक्का जाईल, मग फिरून भाऊसाहेब शुद्धीवर नीट येतील, मग आपण त्यांना पूर्वीप्रमाणें पत्र लिहून दत्तक घेण्याविषयी त्यांचें मन वळवाल, आणि फिरून त्याचा परिणाम म्हणून त्यांच्या बोलावण्यावरून आपण दत्तविधानाकरिता घरांतून बाहेर पडूं तेव्हा नवी स्थिति उत्पन्न होईल. आणि तेव्हा पूर्वीसारखे पांच हजार रुपये मारवाड्याकडून आणून आपणाला देईनच. पण माझें म्हणणें इतकेंच कीं, झाला हा अध्याय निष्फळ म्हणून पुरा झाला असा शेरा मारूं या."

दिवाण—छेः छेः! सुभेदारसाहेब, ही निराशा तुम्हाला शोभत नाही. तुमच्यासारख्या उमद्या धाडसी स्वभावाच्या माणसाने अशी कच खावी म्हणजे काय?

सुभे.—दिवाणसाहेब, या कामीं आशा धरूनच मी उद्योगाला लागलों होतों. आणि आशा होती म्हणूनच प्रॉ.नोट लिहून देऊन पांच हजार रुपयांना मारवाड्याकडे माझी मान अडकविण्याचें धाडस केलें. आणि पुनः तसाच प्रसंग आला व तशी आशा दिसली, तर तसेंच धाडस करण्याला मागे घेणार नाही. पण आज दत्तविधान संशयित आणि रुपये मात्र गेले असें झालें नाही काय?

दिवाण—दत्तविधान संशयित कां म्हणतां? पुढे ढकललें गेलें इतकेंच म्हणा! आणि रुपये गेले असें तरी कां म्हणतां? त्यांनी आपलें कार्य केलें असेंच म्हणा. भाऊसाहेबांना मीं चांगलें खरमरीत पत्र लिहिलें म्हणून तर ते, प्रभाकर परत आला असतांहि, दत्तक घ्यावयाला तयार झाले. तुमचे रुपये पटण्यापूर्वी मीं तें पत्र त्यांना लिहिलें कीं नाही? आधी रुपये मोजा मग पत्र लिहीन, असें म्हणून मला तुम्हाला अडवितां आलें असतें. पण मीं तसें अडविलें का तुम्हाला सांगा बरें? मी तुमच्यावर तसा विश्वास टाकलाच कीं नाही? मग आता तुम्हीहि माझ्यावर तसा विश्वास कां टाकूं नये? आता पूर्वीसारखें पत्र पुनः लिहावें लागलें, पोलिटिकल एजंटाकडे पुनः पूर्वीसारखी कांही कारवाई करावी लागली, तर त्याकरिता पुनः निराळे पांच हजार रुपये तुमचेजवळ मी मागणार नाही असें वाटेल तर आश्वासन देतों! पण त्या पहिल्या पांच हजार रुपयांचें काम झालें नाही, त्यांचा मोबदला तुम्हाला मिळाला नाही, असें तुम्हाला कसें म्हणतां येईल बरें?

सुभे.—हें काय बरें असें बोलतां दिवाणसाहेब, न समजल्यासारखें ? आपले उपकार मला केव्हांहि मान्यच आहेत. पण आजपासून रुपये परत देण्याचा मारवाड्याचा तगादा माझ्यामागे लागेल. दत्तविधान केल्याबर भाऊसाहेबांच्या घरांत मला वावरावयाला सांपडूं लागेल, आणि मग मी या नाही त्या रीतीने पांच हजार रुपये काढून घेईन, अशी जी आशा वाटत होती, ती आज निष्फळ ठरलीच कीं नाही ? माझी घरची गरिबी तुम्ही जाणतांच. ते पांच हजार रुपये फेडावयाला पांच हजार केसहि नाहीत या माझ्या टक्कल पडलेल्या डोक्यावर ! प्रॉ. नोटीला मुदत नसते. दत्तकाची कारवाई पुनः सजलीच तरी ती पुनः पायावर उभी राहावयाला किती तरी दिवस लागतील ! प्रभाकर तुरुंगांत परत गेला असें घेऊन चाललों तरी प्रत्यक्ष दत्तविधानाला किती दिवस लागतील, कोणाला ठाऊक ? आणि त्याआधीच मारवाड्याने मला तगादा सुरू केला तर माझें कसें होईल ? बरें, आपण म्हणतां त्याप्रमाणे प्रभाकर पंधरा दिवसांत परत तुरुंगांत गेला असें म्हटलें तरी, भाऊसाहेबांच्या जिवाची काय शाश्वती सांगावी ? प्रभाकर तुरुंगांत गेला तरी इतक्या वर्षांनी फिरून तो त्यांच्या नजरेला जिवंत पडला त्यामुळे त्यांची वृत्ति बदलली. आणि आता दत्तक घ्यावयाचाच नाही असें त्यांनी ठरविलें, तर काय करा ? आणि भाऊसाहेब जर मेले, तर मग बोलावयासच नको ! त्यांची बायको सर्वस्वी त्यांच्या जहांबाज मुलीच्या हातांत. ती कसची दत्तक घेऊं देते ? तात्पर्य, राशिचक्र एका घराने बदललें म्हणजे मनुष्याच्या ग्रहांचीं सर्व स्थानें बदलतात, किंवा एखादें मोहरें अभावित पुढे आलें म्हणजे बुद्धिबळाच्या डावांत ज्याप्रमाणे नवी घटना होऊन जुने जोर व मारे ढिले पडतात, त्याप्रमाणे या दत्तकाचें आता होणार असें माझें मन मला सांगतें. म्हणून कृपा करा, आणि ते पांच हजार रुपये अजून आपल्या पेटींतच आहेत तेवढे परत द्या; इतकीच माझी नम्र विनंति आहे आपल्या पायापाशीं.

दिवाण—सुभेदार, तुमच्यासारख्या लोकांना आपला स्वार्थ तेवढा दिसतो. इतरांनी तुमच्याकरिता काय मेहनत केली हें दिसत नाही. तुम्ही मजकडे आणून दिलेल्या पांच हजार रुपयांना, ते आणून देण्यापूर्वीच किती तोंडें फुटलीं होतीं हें तुम्हाला काय माहीत ! ते सर्व पैसे मींच प्रथम आपल्या पदरचे खर्चले. वर पो. एजंटाचे कचेरींत मला दरबारखर्च किती—कसा करावा लागला, हें तुम्हाला माहीत आहे काय ? कोठून असणार ? दरबारखर्चाची रीतच गुप्त असते. फार काय, मारवाड्याने तुमच्याकरिता पांच हजार रुपये

आणून दिले त्याचें कटमितीचें दोन वर्षांचें व्याज आणि कमिशन हीं मीं त्याला माझ्या पदरचीं आधीं रोख दिलीं, तीं मला कोण परत देणार? आणि तुम्ही आपले पांच हजारच्या पांच हजार परत मागतां यांत तुम्हीं थोडा तरी विचार केला काय? शिवाय माझ्या पदवीचा व माझ्या अधिकाराचा मनुष्य! काय अडलें हो माझें तुमचा मुलगा दत्तक न गेला तर? मित्रकार्याला तरी कांही मर्यादा आहेच कीं नाही? मी संस्थान-कचेरींतले कागद तुमच्याकरिता रंगविले, व शेवटीं भाऊसाहेबांना स्वदस्तूरचें पत्र लिहिलें, तें काय तुमचा नोकर म्हणून? आणि दत्तविधान पार पडलें असतें, आणि तुमच्या बाजीरावाचा अन् तुमचा हात भाऊसाहेबांच्या संपत्तींत कोपरापर्यंत घुसला असता--आणि अजूनहि न घुसेल कशावरून--तर मला काय तुम्ही देणार होतां त्यांतलें काढून? तात्पर्य काय कीं, रुपये परत मागण्याच्या भरीला तुम्ही पडूं नये हें चांगलें. फसलेलें दत्तविधान पुनः उभें करण्याला यापुढे जे श्रम आम्हा कुणाला पडतील ते सर्व आम्ही फुकट करूं. त्याकरिता दत्तक होईपर्यंत कांही मागणार नाही. बरें, राहूं द्या ती बाब! तुम्हा-आम्हाला मिळून आता प्रभाकराकडे पाहिलें पाहिजे. हा पाहा, मी चाललों यजमानसाहेबांकडे प्रभाकरला कैद करण्याची परवानगी मागावयाला. परवानगी कसली म्हणा! नुसतें आपलें कानांवर घालावयाचें म्हणजे सुनावणी करावयाची. बाकी यांतला खरा अधिकार माझ्याच हातीं आहे.

दिवाणसाहेबांनी पांच हजारांच्या बाबतींत हायकोर्टाचा निवाडा दिल्यासारखाच निकाल सांगून टाकला. तथापि पुनः एकदा प्रयत्न करून पाहावा म्हणून सुभेदार म्हणाले —

"असें कसें बरें म्हणतां दिवाणसाहेब! मूळची बोली अशी होती कीं दत्तविधान पुरें पार पाडून त्याचा दाखला दरबारी कागदपत्रांत नोंदला गेला म्हणजे मग रक्कम आपल्याला द्यावयाची. पण आपण नाखूष दिसलां, आपला हातपाय हालेना, तेव्हा मीं आगाऊच रक्कम रोख मोजली, हीं माझी चूकच झाली म्हणावयाची! मी गरीब म्हणून माझ्यावर आपण अविश्वास दाखवावा, आणि एवढी रक्कम स्वाधीन करून मीं आपणावर विश्वास टाकला त्याचा आपण असा घात करावा, हें योग्य आहे काय?"

सुभेदारांनी उकरून काढलेला प्रश्न दिवाणसाहेबांना मोठा गैरसोयीचा वाटत होता. तोंडाने जरी ते "पंधरा दिवसांत दत्तविधानाचा योग पुनः जुळवून

आणतों" असें धिटाईने सांगत होते, तरी बदललेल्या परिस्थितींत तें खरोखर कसें अशक्यप्राय आहे हें त्यांचें त्यांना मनांतून कळतच होतें. तेव्हा अंगाला येऊन चिकटणारी ही अडचण कशी तरी झाडून टाकलीच पाहिजे असा निश्चय त्यांनी केला. आणि जालीम हत्यार कोणावर उपसावयाचें तर त्याला आधी तितक्या बेताच्या रागाचा आव आणला पाहिजे, म्हणून दिवाणसाहेब उसळले, आराम-खुर्चीवरून उठून उभे राहिले, व दिवाणखान्यांत फेऱ्याहि घालूं लागले. आणि सुभेदारांच्या अंगावर जाऊन म्हणाले, "तर तर, मीं तुमचा विश्वासघात केला नव्हे का ? अहो, तुमच्यासारख्यांची रीत आम्हाला पुरी माहिती असते, म्हणून अशी ही सावधगिरी ठेवावीच लागते. दत्तविधान होऊन, भाऊसाहेबांचा विश्वास संपादून, त्यांच्या किल्ल्या स्वाधीन करून घेऊन, त्यांच्या पैशाच्या कुरणांत तुम्ही चरूं लागलां असता, म्हणजे मग शिताफीनें कशी पाठ फिरवून मला गुंगारा दिला असता ! मला हें पुरें माहीत होतें म्हणूनच आधी रक्कम वसूल केली. काम नाजूक आणि गुप्त. मी किंवा एजंट-साहेबांचे शिरस्तेदार यांना थोडीच फिर्याद करतां येत होती तुमच्यावर ठर-लेल्या पैशाबद्दल ! वकिलानेहि वकीलपत्राच्या बक्षिसाचा दावा लावणें गैर दिसतें; मग आम्ही तर बोलूनचालून अधिकारी. बरें, रक्कम दिलीत ती तरी मारवाड्याचीच कीं नाही ? घरची काढून थोडीच दिलीत ! आणि घरची काढून द्यावयाला घरावर कौलें तरी आहेत का तुमच्या, पांच हजार ? मार-वाडी रक्कम परत मागावयाला लागला तर तुमच्या कावा आहेतच वर ! तो काय घेणार घेऊन तुमचें ? दिवाणी तुरुंगांत बसविलें तर तुमच्या पोटगीची रक्कम त्यालाच आधी कोर्टांत भरावी लागणार ! नाही तर लाहा घ्याल झालें ! त्यालाहि तुमची तयारी आहेच ! आजवर तुमच्या पायीं थोडे का लोक बुडाले ? दत्तविधानाने मिळणारें मोठें घबाड दिसत होतें तुमच्या डोळ्यांपुढे म्हणून घालीत होतां माझ्या दारीं हेलपाटे. एरवी तुमच्यासारख्याला माझ्या घरीं तरी येण्याचें काय कारण ? तात्पर्य, थोडक्यांत सगळें सांगितलें तुम्हाला. तुमची रक्कम परत मिळणार नाहीं. तुमचा मार्ग तुम्हाला मोकळा आहे."

दिवाणसाहेबांनी केलेली ही निर्भर्त्सना ऐकून सुभेदारांना फार वाईट वाटलें. पण करतो काय बिचारा ? तेव्हा दांत-ओठ चावून अखेरचें अस्त्र म्हणून ते म्हणाले, "दिवाणसाहेब, आपण येथवर मजल न्याल असें वाटलें नव्हतें. असो. आपली मर्जी ! पण याचा परिणाम नीट होणार नाही इतकेंच मी सांगतों."

असली धमकी म्हणजे युद्धाचें तें आव्हानच ! सुभेदारांना तोडून काढावयाला

दिवाणसाहेबांना तें आयतेंच उपयोगीं पडलें. त्याचें निमित्त करून दिवाणसाहेब कडाडून म्हणाले, "बरं ! बरं पाहून घेऊं ! काय परिणामबिरिणाम व्हावयाचे ते ! माझ्यासारख्याला धमकी द्यावयाला तुम्हाला लाज कशी वाटत नाही ? चला निघा पाहूं माझ्या घरांतून आधी ! नाही तर मला पहारेवाल्यालाच बोलवावें लागेल, तुम्हाला धक्के मारून घालवून द्यावयाला !"

बिचारे सुभेदार काय करतात ! त्यांनी आपल्या उपरण्याची चुंबळ सोडली, तें झटकन खांद्यावर टाकलें. कोपऱ्यांत ठेवलेली काठी उचलून घेतली आणि खाली पाहत तडक जिन्याचा रस्ता गांठला !

* * *

सुभेदार गेल्याबरोबर दिवाणसाहेबांनी पोषाक केला व ते महाराज नवलराय यांच्या भेटीला गेले. दिवाणसाहेब वर येतांच महाराजांनीच पहिला नमस्कार केला. उलट दिवाणसाहेबांनी कोपरापासून तर नमस्कार केलाच पण कंबरेपासून सगळें शरीर वांकविलें !

यजमानसाहेबांनी शेजारच्या खुर्चीकडे हात दाखवून बसा, असें म्हटल्यावर सर्वजण आपापल्या खुर्चीवर बसले. दिवाणसाहेब यजमानसाहेबांपासून चार हात लांब होते तरी दरबारी संवयीप्रमाणे ते उपरण्याचा पदर तोंडाजवळ नेऊन हळूच अदबीने म्हणाले, "आज एक चमत्कारिक गोष्ट घडली आहे राजधानींत. ती महाराजांच्या कानांवर घालून हुकूम घेण्याकरिता मुद्दाम येऊन महाराजांना तसदी दिली या वेळीं."

महाराज म्हणाले, "मग त्यांत तसदी कसली ? जरूरीचेंच कांही काम असेल म्हणूनच आला असाल विचारा-सांगावयाला. मनोहरपंत, नीट ऐकून समजून घ्या दिवाणसाहेब काय म्हणतात तें."

इतकें बोलून महाराजांनी दिवाणसाहेब आणि प्रायव्हेट सेक्रेटरीसाहेब यांचीं तोंडें जोडून देऊन, दिवाणसाहेब पुढे काय बोलणार याची कल्पना नसल्यासारखे मोठ्या उत्सुकतेचा आव आणून ते ऐकत बसले.

दिवाणसाहेब म्हणाले, "कैक वर्षांपूर्वी गुन्हा करून फरारी झालेला एक भयंकर गुन्हेगार आज नवलपुरांत प्रकट झाला आहे. त्याच्या गैरहजेरींत त्याचा इन्साफ होऊन त्याला शिक्षाहि फर्माविली गेली. पण तो पळून गेल्यामुळे त्याला तुरुंगांत पाठवितां आलें नाही."

मनो.--मग आतां त्याचें काय करण्याचें योजिलें आहे ?

दिवाण—ताबडतोब त्याला पकडावयाचें आणि तुरुंगांत पाठवावयाचें. त्याला महाराजांची परवानगी—

मनो.—छेः छेः, त्याला महाराजांच्या परवानगीचें काय कारण? आपण पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट आहांच. द्या ताबडतोब हुकूम कोतवालाला गुन्हेगाराला पकडावयाचा; आणि गुन्हेगार जरासा भयंकर स्वरूपाचा दिसतो नाही? तेव्हा त्याला हातकड्या घातल्यात तरी हरकत नाही. आणि त्याला कुठे कैदेंत ठेवणार?

दिवाण—पोलीस हेडक्वार्टराच्या कच्चा कैद्यांच्या कोठडींत.

मनो.—छेः छेः! तेवढें मात्र करूं नका. तुम्हाला माहीतच आहे कीं, त्याचे साथीदार त्याच्यासारखेच मवाली गुंड या शहरांत आहेत. तेव्हा ते रात्रीचा हल्ला करून त्याला एखादे वेळीं सोडवूनहि न्यावयाचे!

दिवाण—मग त्याला कोठे ठेवावा?

मनो.—आपण बसलों आहोंत येथून समोरच सरकारी पागेजवळ जी चिरेबंद बंदिस्त खोली आहे, तींत त्याला ठेवा. कारण पोलीस हेडक्वार्टरपेक्षाहि इथे बंदोबस्ताला जवान अधिक आहेत. जवळच सरकारवाड्याच्या पहाऱ्याचे लोक आहेत. वेळ पडली तर दौडत पाठवायला स्वार हाताशीं आहेत; आणि राजवाड्याच्या नगारखान्याखाली बंदुकांचा गंज आहे.

प्रभाकराला ठेवण्याला ही जागा दिवाणसाहेबांना पसंत नव्हती. कारण तो तुरुंगांत असतां त्याचा छळ करण्याचें मनांत आलें तर पोलीस-कचेरीची जागा अधिक सोयीची होती. जवळ आसपास लोकवस्ती नाही; आणि आरडाओरड झाली तरी ती लोकांना ऐकूं जायची नाही. रात्रीं अपरात्रीं-सुद्धा खुशाल दिवाणसाहेबांच्या हस्तकांना प्रवेश मिळण्यासारखी ती जागा होती. पण मनोहराने उलट दाखविलेले फायदेहि दिवाणसाहेबांना उघड नाक-बूल करवेनात. तेव्हा मनांतून नाखूष असतांहि त्यांना राजवाड्याजवळच्या जागेलाच होकार द्यावा लागला. 'कैद्याला छळायला अधिक सोयीची जागा' यापेक्षा 'संरक्षणाला सरकारला अधिक सोयीची जागा' या मुद्द्याला अधिक महत्त्व सहजच प्राप्त झालें.

मनो.—बरें, गुन्हेगाराला अटकेंत ठेवल्यावर मग काय करायचें योजिलें आहे, दिवाणसाहेब?

दिवाण—पुढचें काम अगदीच सोपें आहे. न्यायकोर्टानें त्याला दिलेली

शिक्षा वाचून दाखवावयाची आणि तुरुंगवॉरंट देऊन बंदोबस्ताने त्याला खालसांतल्या मॅजिस्ट्रेटाकडे रवाना करावयाचा. म्हणजे चालला मुंबईला आणि तिथून अंदमानाला !

मनो.—आहे, मार्ग सरळ दिसतो ! त्याचें पाहूं मागाहून. कायदा असेल तसें होईलच. तूर्त त्याला पकडून ठरल्या जागीं तुरुंगांतील कच्च्या कैद्या-सारखा ठेवा म्हणजे झालें.

"पण भयंकर गुन्हेगाराने गुन्हा कोणता केला होता याची कांही माहिती कळेल का !" असें महाराजांनी अगदी सहज विचारल्यासारखा प्रश्न मध्येच टाकला.

"पण त्याने दिवाणसाहेब थोडे चमकल्यासारखे झाले. गुन्हेगार भयंकर म्हणूं म्हटलें तर त्याच्या गुन्ह्याचें वर्णन भय वाटण्यासारखें असें थोडें तरी करतां आलें पाहिजे. पण राजद्रोहाहून अधिक भयंकर असें काय असणार ? या समजुतीने दिवाणसाहेब अगदी खोल गंभीर आवाज काढून म्हणाले, "प्रत्यक्ष राजद्रोह आणि खुनाचा कट ! जाहिरनाम्यांत क्रांतिकारक मतांचाच पुरस्कार होता."

नव.—आणि खून करण्याचा प्रयत्न कुणासंबंधाने ?

दिवाण—खून माझा आणि माझ्या पाठीमागे सत्ताधारी असलेल्या पोलि-टिकल एजंटसाहेबांचा.

नव.—जाहिरनाम्यांत तुमचा खून कां करावा याचीं कांही कारणें सांगितलीं होतीं का दिवाणसाहेब ?

दिवाण—माझ्यावर पुष्कळसे खोटे आरोप केले होते त्या जाहिरनाम्यांत.

नव.—पण ते आरोप खरे असल्याचा पुरावा काय दिलान् गुन्हेगाराने ?

दिवाण—पुरावा कसचा देतो ? खटला भरून आम्ही त्याला पकडायला वॉरंट पाठविलें तेव्हा शिपाई दिसतांच मागच्या दाराने पळून जाऊन फरारी होऊन बसला.

नव.—मिळून काय ? त्याने तुमच्यावर केलेल्या आरोपाची चौकशी झाली नाही, आणि तुम्हीं त्याच्यावर केलेल्या आरोपांची चौकशी झाली नाही ?

दिवाण—त्याच्यावरच्या आरोपांची चौकशी झाली होती. त्याच्या साथी-दार गुन्हेगाराची कबुलीजबाबवजा साक्ष होऊन, कोर्टाने खुनाच्या कटाचा गुन्हा शाबीत धरला आणि दोघांनाहि शिक्षा दिली.

नव.—बरें, तो साथीदार गुन्हेगार अजून तुरुंगांत असेलच, आपल्या किंवा ब्रिटिश सरकारच्या ?

दिवाण—नाही. कांही दिवस कैद भोगल्यावर साथीदाराने माफी मागितली, त्यावरून त्याला सोडून देण्यांत आलें.

नव.—मिळून तुमच्या या गुन्हेगाराचा फरारीपणा हीच एक मुळांत गोष्ट खरी! आणि पक्की चौकशी अशी कशाचीच झाली नाही! तें कांहीं असो. दिवाण-साहेब गुन्हेगाराला अटक करण्याची परवानगी मागायला आले आहेत ती त्यांना मागण्याचें कारणच नाही. कां कीं, ते सर्व अधिकार त्यांना आहेतच. तथापि मीहि सांगतों कीं, त्यांनी गुन्हेगाराला ताबडतोब अटक करावी, आणि मनोहर-पंत, तुम्ही सुचविल्याप्रमाणे या वाड्यासमोरच्या कोठींत आणून बंदींत ठेवावा. दिवाणसाहेब, जा लवकर वॉरंट लिहून ताबडतोब पाठवा, आणि फौजदारांना दवडा.

दिवाण—गुन्हेगार या गांवचाच रहिवासी आणि तैनातदार भाऊसाहेब डबीर यांचा मुलगा आहे हें महाराजांना—दिवाणसाहेबांना ही माहिती आपण होऊन कां द्यावीशी वाटली ठाऊक नाही; पण ती गोष्ट काढतांच महा-राज घाईने म्हणाले, "दिवाणसाहेब कशाला सांगतां ही माहिती आताच! गुन्हेगार तो गुन्हेगार मग तो कोणीहि कोणाचाहि असो. आपण आता वेळ गमावूं नका. त्याला फिरून पळून जाण्याची बुद्धि झाली तर! न्यायाच्या कामांत दिरंगाई नको." असें म्हणून महाराज स्वतःच उठले. त्याबरोबर मनोहर व दिवाणसाहेब हेहि उठले.

दिवाणसाहेबांना थोडा अधिक पाल्हाळ करून तो भयंकर गुन्हेगार आणि त्याच्या गुन्ह्याचा भयंकरपणा या दोहोंचें वर्णन करावें अशी मनांतून इच्छा होती. पण महाराजांनी निरोपच दिला तेव्हा ते नमस्कार करून निघाले आणि बाहेर पडतांच त्यांनी फौजदारांना घरीं येऊन भेटण्याबद्दल निरोप पाठविला.

---

१७ भावाच्या सुटकेचा उद्योग

रात्रीं सुमारें नऊ वाजतां शहरचा कोतवाल बरोबर पांच पोलीस जवानांची तुकडी घेऊन भाऊसाहेबांच्या घरीं आला; आणि त्याने जरा चढ्या आवाजाने "प्रभाकरपंत डबीर आहेत का घरांत?" असा जाहीर सवाल केला. महाराज नवलराय यांना भेटून प्रभाकर घरीं आला व तेथे झालेलें त्यांचें

बोलणें त्याने आपल्या बहिणीला सांगितलें. तेव्हा लवकरच दिवाणसाहेबांकडून पकडवारंट येणार असा अंदाज त्यांनी ठरविलाच होता. यामुळे फौजदार-साहेबांच्या सवालाला जबाब मिळण्याला उशीर लागला नाही. प्रभाकर माज-घरांतून बाहेर ओटीवर आला तो हातांत आपलें कपड्यांचें गांठोडें घेऊनच आला, आणि म्हणाला, "हा मी प्रभाकर डबीर येथें हजर आहें. तुमचा काय हुकूम असेल तो लेखी दाखवा." फौजदारांनी वारंट दाखविलें आणि शिपा-यांना प्रभाकराला पकडण्याविषयी खूण केली. त्यांनी पुढे होऊन प्रभाकराचा हात धरला आणि बरोबर आणलेल्या हातकड्या पुढे केल्या. त्याबरोबर प्रभाकर ओरडून म्हणाला, "काय हो फौजदारसाहेब, मी काय चोर, दरोडेखोर आहें म्हणून हातकड्या घालतां? मी पूर्वी फरारी झालों, तो तुमच्या देवालाहि सांपडलों नाही, व पुढेहि सापडलों नसतों. पण न्याय मिळविण्याकरिता मी आपण होऊन हजर झालों तो काय पुन्हा फरारी होण्याकरिता?" त्यावर फौजदार जरा गुर्मीतच म्हणाले, "खबरदार! जास्त बोलण्याचें कारण नाही. आमचा हुकूम आम्हाला बजावलाच पाहिजे. तुम्हाला काय तक्रार वगैरे करावयाची असेल तर ती वर दिवाणसाहेबांकडे खुशाल करा. तूर्त आम्ही सांगूं तसें तुम्हाला वागायला पाहिजे."

"पण हातकड्या घालाव्या असें वॉरंटांत लिहिलेलें नाही?"

"पण आम्हाला दिवाणसाहेबांचा तसा तोंडी हुकूम आहे. तो आम्ही बजावणारच."

इतक्यांत विमल बाहेर आली होती, ती पुढे होऊन म्हणाली, "दादा, उगीच कशाला यांच्या तोंडाला लागतोस? ते पांच जवान सशस्त्र. तूं एकटा एक निःशस्त्र. असें असतां त्या इतक्यांना तूं एकटा भारी आहेस असें वाटत असेल, म्हणून ठेवीत असतील ते अशी सावधगिरी! त्यांना त्यांचा हुकूम कळतो तसा मलाहि थोडाबहुत कायदा कळतो. लवकरच होईल त्याची शहानिशा. तूं कांही न बोलतां त्यांच्या स्वाधीन हो कसा! उगीच बाबांच्या कानांवर यांतले कांही शब्द गेले तर आणखी जोराचा झटका त्यांना यावयाचा!"

विमल बोलली त्याचा परिणाम होऊन पुढे पोलीसहि कांही बोलले नाहीत; व प्रभाकरहि शांत होऊन आपल्याशीं हसत व पोलिसांना तुच्छपणें लेखून हात पुढे करून गप्प राहिला. विमलचें वजन नवलपुरांत किती होतें हें फौजदार-साहेबांना माहीत असल्याने तिच्या भाषणावर त्यांनी कांहीच प्रत्युत्तर केलें

नाही. हातकड्या घालून होतात, तोंच माईसाहेब माजघरांतून ओटीवर आल्या. त्यांच्याकडे पाहून कड्या घातलेला हात वर उचलून प्रभाकराने नमस्कार केला, आणि तो म्हणाला, "माई, तूं कांही एक काळजी करूं नकोस. थोडेच दिवसांत मी सुटून परत येईन तुझ्या भेटीला. मी सोक्षमोक्ष करून घेण्याकरिताच आलों हें तुला माहीत आहे ना? तो लवकरच होईल. कारण माझी साडेसाती संपली, आणि ती दिवाणसाहेबांच्या मागे लागली असें समज." असें बोलून तो आपण होऊन दरवाजाकडे निघाला. तेव्हा पोलीस शिपाई व फौजदारहि त्याच्याबरोबर निघाले.

प्रभाकराने कितीहि धैर्याने व आश्वासनपूर्वक आईला हा धीर दिला तरी हातकड्या घातलेल्या हातांनी मुलाने नमस्कार केलेला पाहून तिला गहिंवर आवरेना. ती स्फुंदून स्फुंदून रडूं लागली. पण विमलने तिचा हात धरून तिला घरांत नेलें व म्हणाली, "माई, तूं अगदी काळजी करूं नको. दादा खास सुटून लवकर परत येणार! तो येईपर्यंत कोणीकडून तरी बाबांच्या प्रकृतीला आपणाला जपलें पाहिजे. तें काम तुलाच आता अधिक अंगावर घेऊन केलें पाहिजे. कारण यापुढे दादाच्या बचावाची तजवीज करायला मला लागलें पाहिजे.

* * *

रात्रीं सुमारें दहा वाजतां सरकारवाड्यांतला एक शिपाई एक मोहोरबंद पत्र घेऊन भाऊसाहेबांच्या वाड्यांत आला व तें त्याने विमलच्या स्वाधीन केलें. पत्रांत खालीलप्रमाणे मजकूर होता—

"श्री. विमलाबाई डबीर यांस—सा. न. वि. वि. आपल्या बंधूंना कांही वेळापूर्वी दिवाणसाहेबांच्या वारंटावरून अटक करण्यांत आली आहे. त्यांची चौकशी इन्साफ काय व्हावयाचा तो पुढे सरकारी रीतीप्रमाणे होईलच. पण तूर्त आपल्या बंधूंविषयी आपणास इतर रीतीने तरी काळजी वाटूं नये, म्हणून मी खासगी रीतीने आपणास इतकेंच कळवितों कीं, त्यांना सरकारवाड्यासमोरच्याच खास पागेनजीक एका चांगल्या कोठडींत बंदोबस्ताने ठेवण्यांत आलें आहे. त्यांस आपणांला भेटावयाचें असल्यास माझे परवानगीने उद्या सकाळीं नऊ वाजतां भेटतां येईल. तूर्त बंधूंकरिता आपणास कांही कपडे वगैरे देण्याचे असल्यास या शिपायाजवळ द्यावे म्हणजे ते त्यांस पोचते होतील. त्यांचेकरिता लांकडी चारपाई (पलंग) व बिछाना यांची व्यवस्था इकडेच करण्यांत आली

आहे. ती करण्याचें आपणास कारण नाही. इतर जिन्नस काय लागतील ते त्यांस आपण उद्या सकाळच्या भेटींत समक्ष विचारावें. कळावें.

मनोहर कृष्ण उकिडवे,

[नि॥ श्रीमंत सरकार नवलराय, संस्थानाधिपति,
संस्थान नवलपूर]

ता. क.—हें पत्र मीं आपणास खासगी नात्यानेंच लिहिलें आहे असें समजावें व तें कोणास कळवूं नये. सहीखाली मीं माझा हुद्दा लिहिला तो केवळ आपणांस मी माहीत नसल्याने, मी कोण हें कळविण्याकरिताच लिहिला आहे. तथापि आपणाला आणखी कांही माहिती वगैरे लागल्यास ती मला विचारावी; कळविण्यासारखी असेल ती कळवीन.

म. कृ. उ.

या पत्राने विमलला फारच बरें वाटलें. कारण वेळ रात्रीची. फौजदार प्रभाकराला कोठें नेऊन ठेवणार वगैरेची कांही माहिती नाही; व अशा अवेळीं सरकारी रीत्या कोणास विचारण्याची सोय नाही. पण या पत्राने ती सर्व काळजी परस्पर दूर झाली. इतकेंच नव्हे तर पुढील खटपटीचाहि मार्ग सहजासहजीं कळला. लगेच विमलने तें पत्र आंत नेऊन आईला वाचून दाखविलें. एक रजई व फिलटरचें पाणी भरलेला एक तांब्या तिने पत्र आणणाऱ्या शिपायाजवळ दिला, आणि मनोहरपंत दुसरे दिवशीं सकाळीं कोठें, केव्हा भेटतील याची माहिती विचारून घेऊन तिने शिपायाची रवानगी केली.

सकाळीं आठ वाजतां स्नान वगैरे करून घरचा तांगा जोडून एक छत्री व पत्रव्यवहाराची कातडी पिशवी घेऊन विमल मनोहरपंतांच्या घरीं गेली व त्यांना भेटली. तेव्हा त्यांचें खालीलप्रमाणे संभाषण झालें—

विमल—आपण काल रात्रीं आपण होऊन चिठ्ठी पाठविली व माझे भावाविषयी जरूर ती माहिती दिली, यामुळे आमची केवढी काळजी दूर झाली याची कल्पना आपणाला नसेल. म्हणून मी त्याबद्दल प्रथम आपले आभार मानतें.

मनो.—कल्पना नसेल असें कां म्हणतां? ती कल्पना मला करतां न आली तर मला मनुष्यस्वभावाचें सामान्यहि ज्ञान नाही असेंच ठरणार नाही काय? असो. मी चिठी पाठविली याबद्दल आभार मानण्याचें कांहीच कारण नाही. तूर्त माझें कर्तव्य मीं केलें. न्यायमनसुफी काय असेल ती रीतीप्रमाणे

होईलच. त्यांत माझा कांहीच संबंध येऊं शकत नाही. त्याची माहिती किंवा अंदाज मजपेक्षा आपणालाच अधिक असणार. आपण हायकोर्ट वकिलीची परीक्षा पास झालां आहां असें मीं ऐकलें तें खरें काय ?

विमल हसून म्हणाली, " होय तें खरें आहे. पण मीं सनद काढली नाही, व अजून कोर्टाचें एकहि काम कधी चालविलें नाहीं. मग माझ्या भावाच्याच खटल्यांत माझें पहिलेंच वकील-पत्र दाखल व्हावें असा ईश्वरी योग असला तर तसेंहि होईल."

मनो.— आपण सनद काढली नाही तर ती एखाददुसऱ्या दिवसांत कशी मिळणार ? शिवाय इतर कोणी वकील आपणाला मिळतीलच. येवढ्याकरिता सनद काढण्याचें तरी काय कारण ?

विमल.— कारण हेंच कीं, नवलपूर संस्थानचा एकहि वकील माझ्या भावाचें वकीलपत्र घेईल असें मला वाटत नाही. या खटल्याला राजद्रोहाचें स्वरूप, आणि प्रतिपक्षी या नात्याचा प्रत्यक्ष दिवाणसाहेबांचा संबंध ! संस्थानचे वकील म्हणजे दिवाणसाहेबांच्या ताटाखालचीं मांजरें. ताटाबाहेर पडेल तें शीत खाऊन आशाळभूतपणानें दुसऱ्या शिताकरिता जेवणाराच्या तोंडाकडे पाहायचीं. आतां मीं सनद काढायची तर वास्तविक ती मला आजच्या आजहि मिळाली पाहिजे. कारण प्लॅटफॉर्म तिकिटाच्या यंत्राच्या तोंडांत आणेली टाकली, कीं तिकीट तयार ! तसें मीं पांचशें रुपये भरले, कीं दिवाणसाहेबांनी मला बसल्या बैठकीला तांबडा चांद लावून सहीशिक्का करून सनदेचा कागद माझ्या स्वाधीन करायला पाहिजे. पण प्रत्यक्ष काय होतें तें पाहावयाचेंच आहे. या खटल्याच्या कामांत दिवाणसाहेबांच्या सरळ स्वभावाची परीक्षाच आहे.

हें ऐकून मनोहरपंताच्या मनांत कसला तरी एक विचार येऊन त्यानें न कळत आपले दोन्ही ओठ आंत घेऊन दाबले व म्हणाला, " पण दिवाणसाहेबांनी बेकायदा वर्तन केलें तर खुद्द यजमानसाहेब आहेतच कीं वर अपिलाला ! "

विमल किंचित् हसून म्हणाली, " होय, पण वर सरकार पक्की मुखत्यारी द्यायला तयार असतां यांनी मुद्दाम कच्ची मागून घेतली. तेव्हा यांच्या अधिकाराची मर्यादा तरी किती आहे हें लोकांना नक्की काय कळणार ? "

तिला यापेक्षा थोडी अधिक टीका करतां आली असती. पण हा प्रसंग

नव्हे असें जाणून तिनेहि मुद्दाम जीभ आवरली, आणि संभाषण संपविण्या-करिता पुन: एक वेळ आभार मानून उभी राहून नमस्कार करून जाऊं लागली. तेव्हा मनोहर म्हणाला, "आपण माझे आभार मानण्याचें खरोखरच कारण नाही. मीं फक्त आपलें कर्तव्य केलें व पुढेहि करणार आहे. तें असें कीं, मीं डॉक्टर म्हणून संस्थानांतील कच्च्या पक्क्या सर्व तुरुंगांच्या जेलरचा वैद्य-कीय अधिकार यजमानसाहेबांनी मला दिला आहे; मात्र कालच्या पत्रांत मीं तो आपणाला कळविला नाही. कारण तो अधिकार या नात्याची जाणीव मनांत ठेवली असतां मला आपण होऊन तुम्हाला तसें पत्र लिहितां आलें नसतें. पण राजाचा मित्र म्हटला म्हणजे, त्याला सर्व सरकारी काम करूनच्या करून पुन्हा खासगीच्या खासगी म्हणतां येतें."

तेव्हा विमल उघडपणें हसून म्हणाली, "तरी काय झालें? माझें आभारहि खासगी समजा म्हणजे झालें. शिवाय, मग आपणाला आणखी विनंति करावीशी वाटते ती अशी कीं, या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत आपण तुरुंगाचे डॉक्टर या नात्यानेहि माझ्याशीं वागा. म्हणजे मी नागरिक स्त्री किंवा वकील कोण-त्याहि नात्याने आपणाला मला माझ्या भावाविषयी हक्काने व उघड सल्ला-मसलत विचारतां येईल. तथापि केवळ न्यायाच्या बुद्धीनेच आपणाला काय मदत देतां येईल ती द्यावी."

"ठीक आहे." असें म्हणून मनोहर विमलबरोबरच पायऱ्या उतरून दर-वाजापर्यंत तिला पोंचवायला गेला. ती बाहेर पडतांना तिला नमस्कार करून तो परतला. पण परत फिरतांना त्याने खिशांतून एक पाकीट काढून तिला दिलें; त्यांत प्रभाकराला भेटण्याची परवानगी, कोठीच्या दारावर दाखविण्याची होती.

"अगबाई, होय कीं," विमल खजिल होऊन म्हणाली, "मी आपणाशीं बोलण्यांत मुद्द्याची गोष्ट विसरून गेले! मग आता पाहा बरें! आपण घेतां या काळजीबद्दल आपले मी आभार मानणेंच योग्य आहे कीं नाही!" इतकें बोलून ती टांग्यांत बसली व "थेट सरकारी खास पागेकडे चल" असें तिने टांगेवाल्याला सांगितलें.

विमलला कोठींत जातांच प्रभाकराला भेटण्याची परवानगी मिळाली. इतकेंच नव्हे, तर आपण नऊ वाजतां येणार अशा आगाऊ झालेल्या एखाद्या सूचनेवरून, पहारेकरी आपली वाटच पाहात बसला होता कीं काय, असाहि

तिला भास झाला. आंत गेली तों प्रभाकर तोंड धुऊन स्वस्थ मांडी घालून बसला होता. त्याला काय हवें काय नको तें तिने विचारून घेतलें; आणि म्हणाली, "दादा, मी आता तुझ्या बचावाच्या कामाला लागणार तेव्हा तुला काय सूचना वगैरे करावयाच्या असल्या तर कर !"

पण प्रभाकर सूचना काय करणार? खरें बोलावयाचें म्हणजे तो कायद्याच्या दरबारच्या व्यवहारांत नुसता ठोंब्या होता. त्याच्या मनाची जात विमलच्या मनासारखीच शुद्ध व उमदी. पण त्याची निमी अधिक बुद्धि काढून घेऊन देवाने ती त्याच्या पाठच्या बहिणीच्या बुद्धीच्या भरीलाच जणूं घातली होती. म्हणून तो तिला म्हणाला, "ताई, सरकारी काम कशाशीं खातात हें मला माहीत नाहीं. तूं आहेस म्हणे बारिस्टर. मग मला काय विचारतीस? वकीलपत्र पुढे आण, एक सोडून चार सह्या देतों. दिवाणसाहेब समोर आले तर एक सोडून चार वेळा त्यांच्या श्रीमुखांत भडकावतों व त्यांना लबाड म्हणतों. जबाबाला उभा कर कोणाच्याहि पुढे, तेथे कोणाच्या बापाला न भितां खरें तेंच एक सोडून चार वेळ सांगतों. आणि याहि उपर अन्यायाने मी शिक्षा भोगावी असेंच ईश्वराच्या मनांत असलें तर एकदां सोडून चारदां फांशीं जातों."

अशा आडमुठ्याशीं विमल काय बोलणार? त्याला हां हां म्हणतांच तिला पुरेवाट झाली. तो बचावाची म्हणून कांही युक्ति सांगेल ही आशा व्यर्थ होती. पण जवळपास आपलें भाषण ऐकायला कोणी नाही असें पाहून विमलने त्याची म्हणून हकीकत होती ती पुनः सर्व ऐकून घेतली आणि म्हणाली, "धैर्य धर म्हणून तुला कोणी शिकवायला नकोच म्हणा. पण सरकारतर्फे कोणी जबानी वगैरे घ्यायला आलें, किंवा इतर रीतीने कोणी कांही माहिती काढून घेण्याचा प्रयत्न केला तर कोणाशीं कांहीच बोलूं नको. मला काय सांगावयाचें तें मी कोर्टातच सांगेन असें उत्तर दे. येवढी खबरदारी अवश्य घे" इतकें सांगून व तें त्याला पुनः पुनः बजावून विमल आपल्या भावाचा निरोप घेऊन बाहेर पडली.

दोन प्रहरीं दिवाणसाहेब कचेरींत आल्यावर ती कचेरीला गेली. तिने आपल्या नांवाचें कार्ड आंत पाठविलें. आंतून बराच वेळ उत्तर आलें नाही. तेव्हा तिने फिरून आठवणीकरिता म्हणून दुसरें कार्ड पाठविलें. तेव्हा तिला आंत बोलावण्यांत आलें. ती जाऊन बेलाशक खुर्चीवर बसली. तरी दिवाणसाहेब वर मान करून बघेनात. मात्र हातांतील कागद चाळतां चाळतां, चोरून पाहावें त्याप्रमाणे ते मधूनमधून तिच्या तोंडाकडे पाहात होते. या गोष्टीचा राग येऊन ती म्हणाली,

"मी सरकारी कामाकरिता आपणालाच भेटायला आलें आहें."

दिवाण—काय ? सरकारी काम ? मजकडे काम ? तुमचें काम ?

विमल—होय. मला वकिलीच्या सनदेचा अर्ज करावयाचा आहे आणि वरिष्ठ कोर्टाच्या सनदेकरिता लागणारे फीचे रुपये पांचशे मीं बरोबर आणले आहेत. तेव्हा रुपये जमा करून घेऊन, ताबडतोब मला सनद देण्याचा हुकूम व्हावा.

पण विमल बोलली तो मजकूर लक्षांतच भरत नाही अशा थाटाने दिवाण-साहेब म्हणाले, "काय, वकिलीची सनद ? आणि स्त्रियांना ?"

विमल—कां बरें ? मी वकिलीची परीक्षा पास झालें आहे.

दिवाण—या संस्थानची परीक्षा ?

विमल—या संस्थानांत वकिलीची परीक्षा नाही हें आपणाला माहीतच आहे. मीं खालसा हायकोर्टाची परीक्षा दिली आहे.

दिवाण—मग खालसा हायकोर्टाची सनद मिळेल ती घ्या.

विमल—पण त्याच परीक्षेवर संस्थानची सनदहि मिळूं शकते.

दिवाण—होय, दिली तर मिळते कीं !

विमल—मग मला ती देण्याला अडचण कोणती ?

दिवाण—तुम्ही स्त्री आहां आणि हें संस्थान आहे ही !

विमल—मग संस्थानांतल्या स्त्रिया आणि खालसांतल्या स्त्रिया या काय वेगवेगळ्या जातीच्या असतात वाटतें ?

दिवाण—अहो, स्त्रीजात येथून तेथून सारी एकच—

विमल—म्हणजे फक्त 'हराम' येवढा शेवटचा शब्द मात्र आपण उच्चारला नाही. बाकी झोक—

दिवाण—छेः छेः ! स्त्रियांच्या तोंडावर तसें कसें म्हणावें ?

विमल—म्हणजे मागें म्हणायला हरकत नाही असेंच ना ? पण स्त्रीजाती-बद्दल आपणाला कांहीहि वाटो, माझ्या सनदेच्या अर्जाचें काय ?

दिवाण—तेंच मी बोलून पुरें करणार होतों. इतक्यांत तुम्ही बोलला ! स्त्रिया येथून तेथून एकच, पण संस्थानांत स्त्रियांना वकिलीची सनद मिळ-ण्याला अजून चारदोन पिढ्या गेल्या पाहिजेत !

विमल—पण देऊं नये असा नियम तर या पिढींत नाही ना ?

दिवाण—नियम—हं ! 'नियम'! संस्थानांत नियम नसतात, फक्त अधिकारी असतात !

विमल—म्हणून अशा एका अधिकाऱ्याकडेच मी सनद मागायला आलें आहे!

दिवाण—पण त्याला वाटलें तर तो देईल! स्त्रियांना न्यायाच्या कामांत लुडबुड करायला देऊन संस्थानी प्रजेच्या न्यायाच्या ताटांत माती कालवावी कीं काय?

विमल—ती माती कालविण्याचा मक्ता फक्त पुरुषांकरिताच राखून ठेवावा असें आपलें मत दिसतें! असो. लहान मुलांना मातीचा खेळ आवडतो. पण त्यांनाहि तो किती करूं द्यावयाचा याला सीमा असणारच! आपण मला सनद देत नसाल तर नका देऊं. पण माझ्या अर्जावर तसा शेरा तरी—?

दिवाण—एखादी गोष्ट नाही म्हणण्याच्या अधिकारांत तसें उत्तर लिहून न देण्याचाहि अधिकार येतोच!

विमल—समजलें मी, ठीक आहे. असें बोलून फणफणूनच विमल उठली.

घरीं येऊन विमलने मनोहरपंतांना खालीलप्रमाणे पत्र पाठविलें—

सा. न. वि. वि.—

आपल्या भेटींत अंदाज करून बोलल्याप्रमाणे दिवाणसाहेबांच्या सरळ-स्वभावाची परीक्षा व्हावयाची ती झाली. सनदेची फी रु. पांचशें घेऊन गेलें असतां, मी स्त्री म्हणून मला सनद देतां येत नाही असें त्यांनी सांगितलें. अर्थात् वरिष्ठ अधिकारी या नात्याने मला खुद्द यजमानसाहेबांची भेट घ्यावयाची आहे. तरी त्यांना भेटण्याची परवानगी मिळवून भेटीची वेळहि ठरवून मला कळविण्याची कृपा करावी. सकाळच्या भेटींत आपण सांगितल्यावरून हें पत्र खासगी नात्यानेच आपणास लिहिलें आहे. कळावें.

पत्रास उत्तर सुमारें दीड तासाने खालीलप्रमाणे आलें. "उद्या सकाळीं नऊ वाजतां सरकारवाड्यांत श्रीमंत यजमानसाहेब आपली गांठ घेऊं शकतील."

त्याप्रमाणे दुसरे दिवशी सकाळीं विमल आपला नेहमीचा फिरावयास जाण्याच्या वेळचा साधा पोषाख करून राजवाड्याकडे निघाली.

* * *

विमल ही नवलपूरच्या राजधानीच्या शहरांत आज इतकीं वर्षें राहिलेली. पण जाणतेपणीं अशी ती राजवाड्यांत आज प्रथमच जाणार होती. लहानपणीं ती आपल्या वडिलांबरोबर राजवाड्यांत पोलिटिकल एजंटसाहेबांच्या गार्डन-

पार्टीच्या वेळीं किंवा इतर मुलांमुलींबरोबर एखाद्या बक्षीससमारंभाला गेली असेल. पण जुने महाराज जिवंत असेपर्यंत राजवाड्यांत जाऊन स्त्रियांनी महाराजांच्या नजरेस पडणें सुरक्षित नाही म्हणून, आणि ते वारल्यानंतर राजवाड्यांत राणीवशांत कोणी स्त्री नाही, स्त्रियांचा खास दरबार नाही, धार्मिक समारंभ किंवा हळदकुंकू नाही म्हणून प्रौढ मुलींपासून वर कोणाहि स्त्रियांना राजवाड्याकडे जाण्याचें कारणच उरलें नव्हतें. आता दिवाणसाहेबच केव्हा केव्हा, नागरिक स्त्रियांचा घोळका जमवून दृष्टीस पडण्याच्या हेतूने निमित्त काढून, सरकारी खर्चाने एखादा मिश्र समारंभ करीत. पण आपल्या घरच्या बायका समारंभाला न नेल्या म्हणून दिवाणसाहेबांची जी इतराजी होणार तिला भिणाऱ्या कांही भ्याड सरकारी नोकरांखेरीज, इतर कोणीहि आपल्या बायका अशा समारंभाला होतां होईतों पाठवीत नसत. कारण अशा समारंभाचे वेळीं माऱ्याच्या जागीं बसून हातांत बायनॉक्युलर घेऊन दिवाणसाहेब येणाऱ्या जाणाऱ्या स्त्रियांचे चेहरे न्याहाळीत बसत, ही गोष्ट लोकांना माहीत झाली होती; आणि गांवच्या स्त्रियांची अब्रू वांचविण्याचें वकील-पत्र प्रभाकर डबीर व त्याचे एकदोन समवयस्क मित्र यांनी आपणाकडे घेतलें असल्यामुळे, त्यांनी चारदोन वेळ ही गोष्ट दिवाणसाहेबांना जाणवून उघडकीला आणली होती.

त्यांनी असें करावें कीं, शेजारच्या वाड्याच्या उंच गच्चीवर बसावें, जवळ खडे जमवून ठेवावे, आणि दिवाणसाहेबांनी हातांत बायनॉक्युलर घेतली कीं, त्यांच्या अंगावर अचूक खडा फेकावा. प्रथम प्रथम दिवाणसाहेबांना मुलांची शंका आली नाही. गच्चीवरच्या भिंतीवर बसलेल्या पारव्यांच्या हालचालीनें खडे पडत असतील असें त्यांना वाटलें. पण पुढे पुढे आपण हातांत बायनॉक्युलर घेऊन स्त्रियांवर रोखून पाहण्याकरिता ती सरसावणें, आणि पटकन एकदोन खडे अंगावर पडणें, यांच्या अचूक साहचर्याकडे त्यांचें लक्ष वेधलें. अंदाजाने चौकशी करतां हीं मुलें शेजारच्या वाड्यांत जमून ही गोष्ट करतात हें त्यांना समजलें. पण परक्याच्या घरांत त्यांना बंदी करतां येईना. तेव्हा त्यांनी आपलीच माऱ्याची जागा बदलली.

असो. संस्थानच्या गादीवरचा राजा सद्गुणी आहे, विवाहित आहे, फिरून त्याची स्त्री सद्गुणी व हौशी आहे, असा सुंदर योग जमून आला म्हणजे राजधानीच्या स्त्रियांना राजवाडा हें आपलें माहेरघर वाटतें. आणि वाड्यांत जाण्यायेण्याची रीत व रीघ पडून, दरबारचें गृहस्थाश्रमी सौभाग्यसंपन्न स्वरूप

सार्थ होतें. जुन्या काळीं खरोखरच कांहीं संस्थानी दरबारांतून राजसत्तेच्या जोडीला गृहस्थाश्रमाचें स्वरूप आणून देणारे संस्थानिक होऊन गेले. गृहस्थाश्रमाचीं मुख्य कर्तव्यें व भूषणें दोन. एक अतिथिसत्कार व पाहुणचार; आणि दुसरें आपणाहून गरीब स्थितींतील आप्तांचा व नागरिकांचा परामर्श. हीं कर्तव्यें जाणणाऱ्या व तीं हौसेने पाळणाऱ्या संस्थानिकांच्या वाडयांत कुटुंबवत्सल गरीब स्त्री-पुरुषांचें कांहीं ना कांहीं निमित्ताने जाणें येणें घडे. वर्षांतून सणावारीं पंक्तींचीं जेवणें, सरकारी श्रावण्या, उत्सव या प्रसंगीं प्रजाजनांतील लोकांना पाहून पाहून निमंत्रणें होत. प्रजाजनांच्या घरीं कार्य निघालें म्हणजे, सरकारी अहेर जात, राजघराण्यांत लग्नें-मुंजी निघाल्या म्हणजे त्याबरोबर अनेक प्रजाजनांच्या घरचीं असलीं कार्यें सरकारी खर्चानें होत. राजस्त्रियाहि या कामीं आपल्या प्रेमळ दाक्षिण्यबुद्धीची हौस अशीच पुरवून घेत. पण तसा प्रकार नवलपुरांत आज कैक वर्षांपासून दुर्दैवाने बंद पडला होता. आणि विमलहि आज राजवाडयाकडे निघाली ती केवळ सरकारी कामाच्या निमित्ताने; अविवाहित अशा संस्थानिकाकडे; वकिलीच्या सनदेकरिता अपील अर्ज घेऊन !

---

१८ मनोहराची नाजुक कारवाई

ज्या दिवशीं महाराज नवलराय यांनी गस्तींत पाहिलेला प्रकार मनोहराला कळवून, त्या म्हणजे भाऊसाहेबांच्या घरच्या मंडळीबद्दल चौकशी करावयाला सांगितलें, त्या दिवशीं प्रथमच मनोहराला अशी शंका आली कीं, त्या घरांत पाहिलेल्या धीट तरुण स्त्रीने आपल्या राजमित्राचें मन आकर्षित करून घेतलें असावें. फोटोची छाया एकदा क्षणार्धांत काचेवर पडली, कीं ती जशी तेथे कायम चिकटून बसते, त्याप्रमाणे मनुष्यमात्राच्या परस्पर चित्ताकर्षणासंबंधानेहि असतें. पहिला आघात किंवा हल्ला ही निम्मी लढाई, आणि पहिली लढाई, हें निम्में युद्ध, अशी जी इंग्रजींत एक म्हण आहे, तीच लाक्षणिक अर्थाने, मनुष्यांच्या परस्पराविषयींच्या ग्रहाला लागू पडते. नवलरायाला श्रावण वद्य अमावास्येच्या रात्रीं कंदिलांच्या अंधुक प्रकाशांत, दुरून विमलचें दर्शन दोन-तीन मिनिटेंच काय घडलें तेवढें ! त्या अल्प कालांत आणखी इतर तीन मनुष्येंहि वेगवेगळया कारणांनी चित्ताला आकर्षक होणारीं अशीं त्यांच्या

डोळ्यांपुढे नव्हतीं का ? तथापि वीज चमकल्यासारखें विमलचें दर्शन, आणि विशेषतः तिने नवलरायाला दटावून पण मोठ्या सभ्य व गंभीरपणाने उच्चारलेले चारच शब्द, यांनी मिळून त्याच्या मनावर विमलचें जें चित्र उमटविलें, तेंच इतकें पक्कें झालें होतें कीं, तें पाहण्याकरिता तेव्हापासून त्याची दृष्टि मधून मधून अंतर्मुख होई.

मनोहराने ही गोष्ट पहिल्या झटक्याला ताडली व तिला उद्देशून त्याने आपल्या मित्राची थोडी थट्टाहि केली, हें पूर्वी एके ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे. आणि तेव्हापासून या दोघाहि मित्रांच्या मनांत विमलची मूर्ति खेळूं लागली; पण ती निरनिराळ्या नात्यांनी. त्या पहिल्याच भेटींत जसा विमलच्या दर्शनाने व बुद्धिप्रभावाने नवलरायाच्या मनावर प्रेमाचा प्रहार न कळत केला, तसाच त्याच्याशीं झालेल्या या विषयावरील पहिल्याच भाषणांत मनोहरच्याहि मनांत अशा कल्पनेची स्फूर्ति झाली कीं, नवलरायाचें प्रेम त्याने वर्णन केलेल्या मुलीवर बसलें आहे. आणि पुढील चौकशींत त्याचा ग्रह पक्का झाला कीं, या स्त्रीशींच नवलरायाचें लग्न होणें इष्ट आहे. इतकेंच नव्हे तर, शुद्ध मनःस्फूर्तीच्या आधारावर त्याला असेंहि वाटूं लागलें कीं, योगहि तसाच दिसतो. योग म्हणजे तो योगच, आणि स्फूर्ति म्हणजे ती स्फूर्तीच ! योग आणि स्फूर्ति या गोष्टी स्वतःप्रमाणेच असतात. म्हणजे त्यासंबंधाने जर कोणी कां असा प्रश्न केला तर फक्त 'म्हणून' याखेरीज त्याला दुसरें कांही उत्तर देतां येत नाही.

नवलराय हा मोठा सावध असल्यामुळे आपल्या मनांत झांकलेली प्रेमजन्याची गोष्ट जिवाच्या स्नेह्याजवळहि बाहेर काढून बोलत नसे. तथापि नवलराय याच्या मनांतील विमलविषयक गुप्त प्रेमाचें स्पंदन, आणि मनोहराच्या मनांतील नवलरायाविषयक मित्रप्रेमाचें स्पंदन, हीं अगदी एकाच अस्सल जातीचीं व तुल्यसमान गुणांचीं असल्यामुळे, विद्युत्संदेशाप्रमाणे या दोहोंचा जाब न कळत एकमेकांना मिळत असे.

मनोहराने जी गोष्ट इष्ट म्हणून मनाने ठरविली तिला तोंड कसें पडेल याची त्याला प्रथम कांही कल्पना होईना. पण लवकरच त्याच्या लक्षांत हें आलें कीं, विमलचा भाऊ फरारी होता तो परत येऊन हजर झाला त्या अर्थी त्याच्या प्रकरणाचा कांही तरी सोक्षमोक्ष आतां झालाच पाहिजे. आणि त्या प्रकरणाच्या वाढींत तिचा संबंध अधिक येणारच. कारण त्या भाऊसाहेबांच्या

घरांत सुशिक्षित, समंजस, व बुद्धिमान अशी एक विमलच दिसत होती. हा अंदाज लवकर खरा ठरला. आणि जेव्हा विमल त्याला अभावितपणें समक्ष भेटण्यालाच आली तेव्हा आपला सर्व कयास बरोबर ठरणार असें वाटून त्याच्या मनाने त्याला शाबासकीहि दिली. गोष्टीमागून गोष्टी जुळतच चालल्या. कारण विमलला सनद न देण्याची बुद्धि दिवाणसाहेबांना कां व्हावी? ती झाली तेव्हा अर्थात् विमलला नवलराय महाराजांची गांठ घेणें प्राप्तच झालें. आणि महाराजांच्या भेटीची परवानगी काढून वेळ कळवा अशी चिठी जेव्हा विमलकडून त्याला आली, तेव्हा सहजच मनोहराला आनंदाचें भरतें आलें.

त्याने बहुधा ब्रह्मदेवाला नवसहि केला असेल मनांत कीं, "देवा, तूं आपल्या जागीं बसल्याबसल्या सगळ्या जगांतील तरुण स्त्रीपुरुषांच्या (आणि पुनर्विवाहाची चाल पाडल्यापासून प्रौढहि स्त्रीपुरुषांच्या) नांवाच्या गवताच्या जुड्या बांधून टाकतोस, आणि त्यांच्या लग्नचिठ्या लिहितोस, तशीच एक जुडी नवलराय आणि विमल यांच्या नांवची बांधून टाकशील, आणि त्यांच्या नांवाची लग्नचिठी तुझ्या विश्वकर्मा नांवाच्या छापखान्यांत छापशील तर मी–" पण ब्रह्मदेवाला काय पदार्थ आवडतो याची पक्की माहिती आम्हाला नसल्याने, त्याने ब्रह्मदेवाला नवसफेड कोणत्या रीतीने कबूल केली हें सांगतां येत नाही. मात्र मित्रप्रेमाकरिता त्याने स्वतः आपल्या अंगचें चार तोळे मांसहि काढून दिलें असतें यांत शंका नाही!

असो. उद्या सकाळीं आपला मित्र नवलराय, आणि आपण आपल्या मनाने त्याजकरिता नियोजित केलेली वधू विमल, यांची गांठ पडणार, आणि त्या प्रसंगीं आपणाला हजर राहावयास सापडणार, या आनंदाने मनोहराला रात्रीं झोपहि आली नाही. दुसरे दिवशीं सकाळीं आठाच्या ठोक्याबरोबर नवलराय घोडदौड करून परत येतो तोंच, मनोहराची स्वारी राजवाड्यांत जाऊन बसली आणि त्याने नवलरायांचें स्वागत नेहमीहून थोड्या अधिक उत्साहपूर्ण शब्दांनी केलें. तसेंच त्या रात्रीं दर्शन घडलेली स्त्री आज एका अकल्पित रीतीने आपल्याच वाड्यांत येऊन आपणाला भेटणार ही माहिती मनोहराकडून समजल्यामुळे, नवलरायाच्या मनांतहि आदल्या रात्रीं झोप लागण्यापूर्वी काय काय विचार आले असतील याची कल्पना वाचकांना सहजच करतां येईल.

इतकें निश्चित वाटतें कीं, संधिप्रकाशांत फोटो काढल्याप्रमाणे कंदिलाच्या

अंधुक उजेडांत विमलचें जें छायाचित्र त्याच्या मनावर त्या अमावास्येच्या काळोख्या रात्रीं पडलें, त्या छायाचित्राला अधिक उठाव व स्पष्टता यावी याकरिता, तो आपल्या स्मृतींत भावना मिसळून त्यांच्या रसायनानें मनाच्या ' फोटोग्राफिक प्लेट'ला वरचेवर डूब देत होता. आणि सकाळीं उठून घोडदौड घेत असतां त्याबरोबरच त्याचा अमूर्त मनोरथहि दौडत असावा यांत काय संशय !

घोडदौडीहून परत आल्यावर, कपडे बदलून क्षणभर विश्रांति घेऊन बाहेर दिवाणखान्यांत येऊन बसेपर्यंतच्या थोडया अवधींत, नवलरायाच्या अंतरंगांतलीं त्याचींच दोन मनें एकमेकांशीं खालीलप्रमाणें संभाषण करीत होतीं—

१ मन—जो तो आपल्या घरचा शेर म्हणजे सिंह किंवा राजा असतो. तिने त्या रात्रीं दटावून मला बिनमुरवतखोरपणानें मागच्या पायीं परतविलें त्याचा मोबदला आज मीं घेतला तर? ती आज आली म्हणजे भेटायला वेळ नाही असें सांगून परत पाठविली तर ?

२ मन—काय बिशाद तुझी ! ती आपल्याच काय पण तुझ्याहि घरीं शेरच ठरेल. ती होऊन परत जाऊं लागली तर युक्त्या-प्रयुक्त्या करून तूंच तिला थांबवून घेशील.

१ मन—बरें, आली तर घेईन भेट. पण सनद न देऊन तिचा पाणउतारा केला तर ?

२ मन—तो अन्याय होईल. ती फुकट सनद नाही मागत. रक्ताचें पाणी करून बुद्धिबळावर वकिलीची परीक्षा पास झाली. घसघशीत पांचशे रुपये टिचून सनद मागणार ! आणि संकटांत पडलेल्या भावाच्या बचावाकरिता ! तूं कोणत्या तोंडाने सनद नाकारशील ?

१ मन—ती येऊन बसली तरी मीं तिच्याकडे वर डोळे करून न बघितलें म्हणजे झालें.

२ मन—वधू-वरपरीक्षेच्या भेटींत खाली मान घालून बसेल, वर डोळे करून न पाहील, ती वधू ! हाच का तुझा पुरुषार्थ ? देव आपल्या पायांनी भेटीला आला तर, अभाग्या, डोळे भरून दर्शन घेण्याचें सोडून तूं काय मिळविणार ? विनयालाहि कांहीं मर्यादा हवी !

१ मन—बरें, असेंच तर ! तिच्याशीं बोलणें-चालणें हाच संभावितपणा ! हेंच दाक्षिण्य ! मग तिला मनमुराद बोलवूनच घेतों तर !

२ मन--विण्याच्या जोडतारा अशाच जुळतां जुळतां एकरूप होतात, सुरेल लागतात. बाबा, ही देवाची घटना आहे. आणि खुळ्या त्यांत तुझें जन्माचें कल्याण आहे.--

पण आंतल्या गांठीचे लोक, कांही कांही तरुणसुद्धा, आपल्या मनाचा ठाव बाहेर दुसऱ्याला फारसा देत नसतात. म्हणून मनोहराने केलेलें उत्साहपूर्ण स्वागत सहेतुक आहे असें ओळखून नवलरायानेहि नेहमीपेक्षा अधिक साधेपणाने व उपेक्षेच्या स्वरानेच त्याला उत्तर दिलें.

नंतर चहा वर आला तेव्हा बोलण्यांत बोलणें काढून तें आपल्या वळणावर कसें आणावें याचा विचार करीत असतां मनोहर म्हणाला--

" काय राजेसाहेब, केवळ नोकरांच्या हातचा चहा पिण्याचें आमच्यावरचें हें संकट केव्हा नाहीसें होणार कांही सांगाल का ? "

नव.— काय, नोकरांच्या हातचा चहा पिण्याला संकट म्हणतोस मनोहर ?

मनो.—होय तर काय ? त्या चहांत दूध-साखरेबरोबर आणखी जें काय पडायचें असतें तें नोकराने केलेल्या चहांत पडत नाही, नवलराय !

नवलराय वेड पांघरून म्हणाला, " म्हणजे चुलीवरचीं जळमटें वाटतें ! लेकुरवाळी लग्नाची बायको घरीं असल्याशिवाय, तीं जळमटें चहांत कशीं पडणार ! तिने चहा चुलीवर ठेवावा पण एका मुलाचें रडणें थांबविण्यांत चहावर झांकण ठेवायचें विसरावें ! आणि दुसऱ्या मुलाचें रडणें थांबविण्याच्या गर्दींत तिने चहा गाळण्यांतून ओतायलाच विसरावें ! असें झालें म्हणजे दूध-साखरेशिवाय चहांत आणखी काय पडायचें तें आपोआपच पडतें कीं, मनोहर ! बिचारे नोकर ! त्यांना चहा करायचा म्हणजे चहाच करायचा ! याहून दुसरें व्यवधान नसल्याने, त्यांनी केलेल्या चहांत कुठून चुलीवरचीं जळमटें मिळणार ? बरें चुकून एखादे वेळीं ती पडलेलीं आढळलीं, तर त्याचें त्यालाच मरणप्राय दुःख होऊन तोच आपण होऊन ताबडतोब दुसरा चहा करून देतो. मिळून नोकराच्या हातून चहांत चुलीवरचीं जळमटें मिळण्याची निराशाच म्हणेनास ? पण मनोहर, तुझें जर त्याशिवाय चालतच नसलें, म्हणजे तुझ्या डाक्तरी चहाच्या प्रिस्क्रिप्शनमधे चुलीवरचीं जळमटें अवश्य असलीं—तर बाबा, आपलें लग्न लवकर करून टाकून लेकुरवाळाहि हो कसा ! "

मनोहराने अधिक स्पष्टपणा स्वीकारला.

मनो.—राजेसाहेब, चहांत जळमटें पडलेलीं मलाहि आवडत नाहीत तुमच्याप्रमाणेच. पण पुरुषाच्या हातचा चहा तुम्ही किती दिवस घेणार म्हणतों ?

नव.— वा:, वाड्यांतले पुरुष नोकर टाकून मुद्दाम स्वयंपाकिणीला वर बोलावून चहा करून वर आणून द्यायला सांगूं म्हणतोस ! ठीक ! मी असें केलें तर ते नोकर लोकच मनांत मला काय म्हणतील; याचा कांही विचार ? आणि तूंहि ?

मनोहराने आता आंगलगट करूनच हल्ला चढविला.

मनो.—स्वयंपाकिणीच्या हातच्या चहाचें मीं नाही बोललों, महाराज ! आम्हाला खास आमच्या वहिनीसाहेबांच्या हातचा चहा प्यावा अशी इच्छा उत्पन्न होऊं लागली आहे.

नव.—अस्सं ! सरळ वाटेवर येऊन बोल ! पण तुझी वहिनी म्हणजे बाबा, ती या संस्थानाची राणी ! ती इतक्या लवकर उठून चहा करून आणून देणार ? आणि तो करून आणून दिलाच, तर ती मला एकट्याला देईल. राजाची राणी ही पडदानशीन सनातनी स्त्री असावी लागते ! तिने आपलें दर्शन लोकांना–तुझ्यासारख्या माझ्या मित्रालाहि देऊन पड्याबाहेर आपली अब्रू घालवावी कीं काय ? मग ती पड्याच्या आंत कांहीहि करो ! आम्हा राजमित्रांचीं लग्नें करून देऊन "वहिनी"च्या हातचा चहा पिण्याची आकांक्षा तुमची फोलच ठरणार ! तुम्ही गरीब लोक. तुमच्यासारख्या ब्रह्मचाऱ्यांनी लग्नें केलीं तर वहिनींच्या हातचा चहा पिण्याची आमच्यासारख्या संस्थानिकाची हौस फिटेल कदाचित्. मग आहे का कांही विचार तसा यंदाच्या लग्नसराईत ? शिवाय श्रीमंत-गरीब, संस्थानिक-नागरिक हें तुझें-माझें नातें सोडलें तर, तूं माझा वडील भाऊ, मी धाकटा भाऊ. आपली आई असती तर तिने कुणाचें लग्न आधी केलें असतें सांग पाहूं ?

मनो.—आईची गोष्ट काढलीस म्हणून सांगतोंच, कीं मी वडील असलों तरी तिने माझ्या आधी तुझेंच लग्न करण्याचा आग्रह धरला असता ! कां म्हणशील, तर तुला राजपद मिळाल्यामुळे तुझ्यामाझ्यामधलें वडीलकीचें नातें उलट झालें आहे. आता तूंच वडील भाऊ, मी धाकटा भाऊ ! तें कांही नाही. मला वाटतें यजमानसाहेब, आपली आता पहिली गोष्ट म्हटली म्हणजे आपला विवाह उरकून घ्यावा म्हणजे तें सर्वांनाच बरें !

नव.— सर्वांना म्हणजे कोणा-कोणाला तें सांग ना ? माझी समजूत होती

कीं, माझा विवाह होणें ही फक्त माझ्याच सुखाची गोष्ट असणार. त्यांत लोकांचा काय संबंध !

मनो.—कां नाही संबंध ? क्रमानें घ्या सांगतों. ज्या गृहस्थाची मुलगी तुमची बायको होणार तो एक बाप तरी आनंदसमुद्रांत—

नव.—किंवा दुःखसमुद्रांत बुडणार ? कीं गटकळ्या खाणार ? कीं पोहणार कीं तीरावर स्नान करणार ? तें नाही सांगितलेंस, तें सांगायला हवें ! कारण मुलगी संस्थानची राणी झाली म्हणजे बापाला या साऱ्याहि गोष्टी संभवत असतील ! आणि न्यायशास्त्रानेच बोलावयाचें तर प्रकरणपूर्ततेकरिता आणखी एक पांचवा प्रकार उरला तोहि सांगतों.

मनो.—तो कोणता ?

नव.—राजमाताचा संबंध हा समुद्राच्या पाण्याप्रमाणे कडू, खारट, म्हणून तो सोडून देऊन स्नानहि नाही तर फक्त दुरून नमस्कार करावयाचा ! ज्या बापांनी आजवर आपल्या मुली संस्थानिकांना दिल्या त्यांना हे सगळे प्रकार अनुभवाला आलेले आहेत. कोणाला जन्माचें दारिद्र्य फिटल्याचा आनंद लाभला, तर कोणाला जन्माची जिवंत बेअब्रू गळीं पडली म्हणून दुःखाने देशत्याग करावा लागला.

मनो.—पण तुमच्याशीं सासऱ्याचा संबंध येणाऱ्या सुदैवी गृहस्थाला आनंद व सुखच जन्मभर लाभणार, अशी माझी खात्री आहे आणि म्हणूनच बोलतों.

नव.—माझ्या स्नेह्याने मला भलेपणाचें सर्टिफिकीट न द्यावें तर दुसरा कोण देणार ? पण माझी बायको कशी निघेल याची खातरजमा माझा मित्र झाला तरी कशी करणार ? ती चांगली निघाली तर ठीकच. नाही तर ? मग मी स्वभावाने मूळचा कितीहि चांगला असलों तरी मला वाईट व्हावें लागणार नाही कशावरून ? सासरा आला तर काय दोन दिवसांचा पाहुणा आणि तो कधी न आला तरी तें भागण्यासारखेंहि आहे. पण माझी बायकोच वाईट स्वभावाची किंवा दुर्गुणी निघाली तर ? मग तुला माहीतच असेल संस्थानी नवरा-बायकोंत काय प्रकार होतात ते !

मनो.—काय तें सांगा ना तुम्हीच !

नव.—बाहेरून देखावा राजाराणीच्या खबुतरी जोड्याचा ! पण आंत प्रकार कैकाडयांच्या जोडाजोडीचा ! सार्वजनिक समारंभाला सजोड आमंत्रण

असलें म्हणजे नाइलाजच! म्हणून मग आगाशींत मोटार आली कीं, एका दालनांतून राजेसाहेब, दुसऱ्यांतून राणीसाहेब नटूनथटून रंगभूमीवर सूत्रधार-नटीसारखा प्रवेश करून शेजारीं शेजारीं बसायच्चीं! समारंभांतील भाषणांत 'मी व आमच्या राणीसाहेब' 'मी व आमच्या राणीसाहेब' असे राजेसाहेबांच्या तोंडून हटकून मुद्दाम चारदोन वेळां उद्गार निघावयाचेच. पण परत आगाशींत मोटार थांबवून वेगळ्या 'कुंइंगांतून पडद्यांत' 'निष्क्रमण' झालें उभयतांचें, म्हणजे फिरून तसला दुसरा योग येईपर्यंत गांठ पडते आहे कशाला एकमेकांची!

मनो.—हा झाला एक प्रकार. पण त्यांत बाहेरून उभय पक्षीं जाहीर अब्रू संभाळण्याचा प्रयत्न तरी आहे!

नव.—पण व्यक्तिशः सुख! राणीसाहेब कधी आवडीचे दोन जिन्नस करून राजेसाहेबांना आग्रहाने खाऊं घालीत आहेत, कीं पंक्तीला दोघे बसून हास्य-विनोद करीत जेवीत आहेत, कीं सुखदुःखाच्या गोष्टी एकत्र बसून बोलत, कीं राज्यप्रपंचांत लक्ष घालीत आहेत—नांव नाही अगदीं त्याचें! आधी एकमेकांकडचा राबताच एकमेकांना बंद! चुकून गांठ पडलीच तर एकमेकांवर खेकसावें, उणेंदुणें काढावें, स्वतः रडावें नाही तर दुसऱ्याला रडवावें. आणि तें पाहून नोकरांनी बाजूला जाऊन तोंड दाबून फिदीफिदी हसावें! आपला दिवाणखाना हा आपला किल्ला बनवून त्यांत राणीसाहेबांनी आपल्या प्रेमाचे भिक्षुक, नाही तर आवडते हुजऱ्ये, नाही तर प्रेमाचे डॉक्टर, नाही तर गाणार वाजविणार साजिंदे घेऊन बसावें! आणि राजेसाहेबांनीहि आपल्या दालनांत प्रेमाचे स्त्रीपुरुष संवगडी घेऊन मौजेने काळ काढावा! राजाराणींच्या दरम्यान केवळ जिभाच नाहीत, तर चाबूकहि कडाडतील! आणि लाल दारूच्या ग्लासाप्रमाणे रक्ताळलेल्या जखमाहि वाहवतील! प्रेमळ, सद्गुणी राजाराणींची गांठ पडणें म्हणजे तो एक अपूर्व योग आहे. तेव्हा माझी स्तुति तूं मित्र म्हणून कितीहि केलीस तरी तशीच स्तुति करण्याला पात्र अशी माझी वधू तुला हटकून कशी मिळणार? म्हणून लग्नच न केलेलें बरें नव्हे का?

मनो.—काय हें विक्षिप्तपणाचें बोलणें? 'कां न सदन बांधावें कीं त्यांत पुढें बिळें करिल घूस?' हा मोरोपंती आर्याचरण तूं मी मिळून लहानपणीं शाळेंत पाठ केला तो महाराज, आपणाला आठवतो ना?

नव.—होय, आणि त्या प्रश्नाचें उत्तर म्हणून तेव्हाच गमतीने मी एक

आर्या रचली होती तीहि तुला आठवत असेल!

मनोहर हसून म्हणाला, "ती मी कशी विसरेन? तुमची ती आर्या अशी होती—"चार चरण तीक्ष्ण नखें तरि कितिशी काढि मृत्तिका घूस!"

"संसाराची माती करि दुचरण गृहिणिचीच धुसफूस!"

दोघेहि खो-खो करून मुरकुंडी वळेपर्यंत हसले!

नव.—मग झालें तर! राज्य संभाळूं, कीं बायको संभाळूं असें व्हायची वेळ आली म्हणजे मग एकहि संभाळवत नाही. याकरिता दोनहि सोडून देऊन तपश्चर्येकरिता क्षेत्राकडे धाव घ्यावी लागणार. त्यापेक्षा स्वतःच्या व्यक्तीचें सुख सोडून देऊन राज्य संभाळावें, व होईल तितकें सुख प्रजेलाच द्यावें हें बरें नाही का?

मनो.—अहो, पण विवाहाच्या कारभारांत यश लाभणें हें जसें दैवाधीन; तसेंच संस्थानाच्या राज्यकारभारांत यश लाभणें हेंहि दैवाधीनच नाही काय? नवरा दुर्गुणी किंवा मेषपात्र म्हणूनच का राजांच्या राण्या बिघडतात? नाही, मुळीच नाही! मीं असे राजे पाहिले आहेत सद्गुणी व पुरुषार्थसंपन्न कीं, अशा नरांच्या जोडीला संस्थानी श्रीमंतीची जोड मिळूनहि त्यांच्या पदरीं कुलक्षण कुलटा पडाव्या. यावरून ईश्वराच्या घरीं न्याय नाही असें म्हणावेसें वाटतें. पण जसें बायकोचें तसेंच राज्यकारभाराचें. राजा कितीहि न्यायबुद्धीने किंवा निःस्वार्थीपणाने वागला तरी त्याच्या राज्यकारभाराला नांव ठेवणारे लोक नेहमी तयारच असतात. तुम्हाला अजून भ्रम आहे कीं, संस्थानिक मनाने चांगला असला म्हणजे त्याचा राज्यकारभारहि चांगला अशी कीर्ति त्याला हटकून लाभेल म्हणून! "यथा स्त्रीणां तथा वाचां साधुत्वे दुर्जनो जनः" हा न्यायच आहे. म्हणजे तात्पर्य काय? प्रवृत्तिपर राहणें हाच पुरुषार्थ. सद्भार्या आणि सत्कीर्ति हीं दोनहि मिळविण्याची उमेद व आशा तुम्ही न धराल तर तुमचा जन्म व्यर्थ असें मी म्हणेन. स्त्रीजातीला अन्याय आणि त्याबरोबर स्वतःलाहि अन्याय असा तुम्ही सजोड अन्याय करतां असें मी तरी म्हणेन.

नव.— बरें बाबा, तूं म्हणशील तें खरें; पण कच्च्या मुखत्यारीचा संस्थानिक मी म्हणजे गादीवरचा पोरका पोर! माझी वधू पसंत करायचा अधिकार मला नाही असें वरून पोलिटिकल एजंटाकडून लिहून यायचें. आम्ही राजे लोक संस्थानिक पडलों. आमच्या लग्नाला नाही म्हटलें, तरी राजकीय स्वरूप असा-

यचेंच. उद्या एखाद्या गरीबाची, संस्थानच्या शत्रूची, ब्रिटिश इलाख्यांत तीव्र राजकीय चळवळ करणाऱ्या देशभक्ताची मुलगी, तिच्या गुणाकरिता मला पसंत झाली तरी काय उपयोग? पो. एजंट त्याला खो घालणार! मी उद्या लग्नाला तयार झालों तर देवक ठेवण्याची सुपारी एजंटसाहेबांनी दिली पाहिजे! आणि कच्च्या मुखत्यारींत लग्नखर्चहि त्यांनीच मंजूर केला पाहिजे! असलें आमचें हें संस्थानिकांचें परतंत्र जिणें! म्हणून म्हणतों या लग्नाच्या भानगडींतच न पडलेलें बरें नव्हे काय?

मनो.—भलतेंच कांही तरी! ज्या संस्थानिकाचें लग्न तो अल्पवयी म्हणजे अठरा वर्षांच्या आंत व मुखत्यारी मिळण्याच्या आधी होतें त्याच्या लग्नाला या अडचणी येतात खऱ्या. पण तुमच्या लग्नाला त्या कांही खास येणाऱ्या नाहींत. उगीच कां मला इकडून तिकडून अडवीत बसलां आहां?

नव.—बरें राहिलें. पण वधूला अजून ठिकाणा नाही. मी किंवा तूं कोणीच माझ्याकरिता अद्यापि एखादीहि वधू पाहिली नाही; आणि उगीच आधी हा वाद कां?

मनो.—तसें असल्याशिवाय उगीच लग्नाची गोष्ट काढून तुमच्याशीं वाद घालून वेळ दवडायला मी काय वेडा आहे? तुमची भावी वधू मी तर पाहिलीच आहे, पण माझ्याहि आधी तिला तुम्हीं पाहिली आहे. लक्षांत ठेवा!

नव.—अरे कधीं? आणि ती कोण?—

इतक्यांत खालून पहारेवाल्याने एक छापील व्हिजिटिंग कार्ड रुप्याच्या छोट्या तबकांत घालून वर आणून महाराजांच्या पुढे केलें व तो त्याच पावलीं मागे गेला. तें कार्ड त्यांनी हातांत घेतांच समोरच्या घड्याळांत घण घण असे नवाचे ठोके पडले. ती संधि साधून मनोहर जागचा उठून उसळून म्हणाला, "सत्य, सत्य, त्रिवार सत्य! नव्हे तीन त्रिवार सत्य! महाराजसाहेब, आपल्या प्रश्नांचें उत्तर त्या व्हिजिटिंग कार्डांत आहे म्हटलें!"

"काय आहेस रे तूं! महाराज मनोहराच्या पाठीवर थाप मारून म्हणाले.

मनो.—मूर्ख कीं शहाणा म्हणायचें बाकी ठेवलेंत तेंच बरें केलेंत. कारण तें लवकरच ठरेल.

मनोहराने या प्रकरणीं खरोखरीचा एखाद्या हिप्नोटायझरप्रमाणे आत्मविश्वास दाखविला. विमल ही आपल्या राजमित्राला सर्वस्वी योग्य वधू आहे या कल्पनेने त्याच्या मनांत जें एकदा ठाणें धरलें तें कांही केल्या हलेचना. उलट तें

दृढच होत गेलें. मित्रामित्रांत लग्नाविषयी अशा गोष्टी नेहमीच बोलल्या जातात, त्यांत कांही विशेष नाही. पण मनोहर बोलत होता तें कांही विनोदाच्या वाऱ्यावर उडविण्याकरिता बोलत नव्हता. मनांतली खरी इच्छा आणि संभवनीयतेवर दृढ विश्वास, यांच्या दुहेरी बळावरच तो आपल्या मित्राला ती कल्पना सुचवीत होता. हिप्नोटायझर हा आपल्यासमोरील वशीभूत माणसाला प्रथम चाचपडत, अडखळत पण मागाहून ठासून व आज्ञा केल्याप्रमाणे "तूं अमुक आहेस" व "तूं अमुक करशील किंवा कर" असेंहि सांगतो; त्याप्रमाणे मनोहर हळूहळू बोलूं लागला होता; व त्याच क्रमानें महाराज नवलराय यांच्या मनाची कमान ढिली होत चालली होती. मात्र प्रयोगाचा शेवट अद्यापि दिसावयाचा होता.

१९ आता कथानक धावूं लागलें !

महाराज नवलराय व विमल यांची ही गाठ कांही सहज व कांही मनोहराच्या प्रयत्नाने पडली. तींत या तिघांची दृष्टि परस्पर कशी होती हें वाचकांना न सांगतांहि समजण्यासारखें आहे. स्वतः विमलच्या मनांत, राजेसाहेब हे आपल्या सनदेच्या अर्जाला मंजुरी देणारे वरिष्ठ अधिकारी, याहून, या क्षणीं त्यांच्याविषयी दुसरी कांहीच भावना नव्हती. श्रावणी अमावास्येच्या दिवशीं घराच्या मागील दारीं वेषांतराने आलेली व आपण दटावून मागे परतविलेली, ती हीच व्यक्ति अशी ओळख तिला नवलरायाकडे पाहून बहुधा पटली नसावी. प्रभाकराला जी पटली ती तरी नवलरायांनीच त्या दिवसाची आठवण करून ओळख दिल्याने झाली की नाही? या वेळीं नवलरायाशीं झालेलें विमलचें संभाषण अगदीं जुजबी होतें, तसेंच स्त्रीसहजधर्मामुळे विमलने नवलरायाच्या चेहऱ्याकडे प्रभाकराइतकेंहि न्याहाळून पाहणें शक्य नव्हतें.

उलट नवलराय याच्या मनाची स्थिति मात्र वेगळी होती. विमलचें वेषांतर नसल्यामुळे तिच्या चेहऱ्याची ओळख त्याला पक्की होती. प्रथम पाहिल्यापासून तो चेहरा त्याच्या मनश्चक्षूंपुढे किती तरी वेळा येऊन गेला होता. आणि त्याच्या मनांत तिजविषयी कोणत्या भावना प्रकट झाल्या होत्या याचें दिग्दर्शन आम्हीं पूर्वी केलेंच आहे. परंतु आधीच सावध व प्रसंग पाहून वागणारा असाच

तो असल्यामुळे, आपल्या भेटीला आलेल्या विमलकडे आपण एका अर्जदाराकडे, फारच तर स्त्री-अर्जदाराकडे, पण सभ्य अधिकाऱ्याच्या दृष्टीने पाहत आहों याहून नवलरायाने अधिक कांही दिसूं दिलें नाही.

मनोहराच्या मनांत मात्र त्याचें नाजुक मित्रविषयक कारस्थान सुरूच होतें. विमल ही वकिली सनदेचा अपील अर्ज घेऊन आली होती, हा विषय माहीत असतांहि, तो तें विसरून गेला होता; आणि आपल्या मित्रप्रेमाचे मनोरथ सफळ होतील काय या आशेने तो त्या दोघांच्या हालचालींकडे व चेहऱ्यांकडे कौतुकाने पाहत होता! पण त्या दोघांपैकी एकाचें मन शुद्ध व दुसऱ्याचें सावध असें असल्यामुळे, त्या दोघांकडून मनोरथाला विशेष वाढती गति मिळेल अशी मदत त्याला या प्रसंगीं झाली नाही. तथापि चित्रकार हा आपण चित्रांत रंगविलेल्या निरनिराळ्या आकृतींकडे सापेक्ष दृष्टीने पाहत असतो; किंवा शिल्पकार हा आपण तयार केलेल्या सुंदर इमारतीच्या लाकडी नमुन्याचे तुकडे एकमेकांना जोडून पाहून आनंद मानीत असतो; त्याप्रमाणें, शरीराने दूर असलेल्या या तरुण स्त्रीपुरुषांना आपल्या मनाच्या बैठकीवर किंवा सिंहासनावर बसवून मनोहर हा "त्यांचें विवाहमंगलच जणूं काय आपण पाहत आहों" अशा रीतीने मनांत गर्क झाला होता. जुन्या बालविवाहाच्या काळीं, लग्न म्हणजे काय हें न कळणारीं बाल-वधूवरें एकत्र आणून, स्वतः त्यांचें त्यांना न वाटणारें कौतुक हें, एक प्रकारची आत्मौपम्य बुद्धि स्वतःची भरीला घालून, प्रौढ लोक अनुभवीत. तसाच कांहीसा प्रकार मनोहराचा या वेळीं झाला होता. म्हणून एका दृष्टीने त्याला वाटे कीं, वकिलीच्या सनदेचा विषय संभाषण लांबविण्याला अपुरा पडला, तर आणखी अवांतर विषय काढून तें लांबवावें!

पण भूमिकेनुरूप शिष्टाचार हा प्रत्येकाला पाळावाच लागतो. यामुळे ही वरील प्रकारची ब्रह्मदेवाची, किंवा हौशी सनातनी वऱ्हाड्यांची भूमिका टाकून देऊन चाणाक्ष व समयज्ञ अशा खासगी कारभाऱ्याची किंवा प्रायव्हेट सेक्रेटरीची भूमिकाच या वेळीं मनोहराला अधिक संभाळावी लागली. ही भूमिका म्हणजे अशी—"यजमानांना कोणीहि भेटावयाला आला असतां ती भेट संपविण्याचा इशारा तातडीने द्यावा! यजमानांना दुसरें कांही काम नसेना का, पण ते भेटीस आलेल्या मनुष्याशीं इतका वेळ बोलले, हाच मोठा उपकार झाला! या संभाषणाच्या वेळेंत त्यांचीं इतर महत्त्वाचीं कामें बिघडण्याचा काय घातपात झाला असेल तो सोसूं झालें! पण आता तरी तो थांबविलाच पाहिजे!

आपले यजमान उदार मनाचे असले तरी वेळ खर्चण्याच्या औदार्याला कांही सीमा हवीच कीं नाही? आणि भिडस्तपणा मोडण्याचें पाप त्याला करवत नसेल तर तें करण्याचें आपल्या नशिबीं प्रायव्हेट सेक्रेटरी झालों तेव्हाच आलें?" अशा जाणिवेच्या थाटाने यजमानाला वेळेचें अतिक्रमण झाल्याचा इशारा द्यावा हें एक नोकराचें ठरीव काम असतें. आंतून नवलरायाशीं आपले संबंध मित्राचे किंवा भावाचे असले, तरी बाहेर आपणाला नोकर या नात्यानेच वागणें योग्य, हें तो किती जाणून होता, हें आम्ही एका प्रकरणांत वाचकांस सांगितलेंच आहे. म्हणून त्याच भावनेने, मित्रप्रेमापेक्षा दरबारी रीत हीच त्याने या वेळीं अधिक प्रभावी होऊं दिली. आणि सनदेचें व इकडलें तिकडलें थोडेंसें संभाषण होतांच, तें आता पुरें असें जाणविण्याकरिता, सुमारें दहा मिनिटांतच तो स्वतःच्या खुर्चीवरून उठला.

या दहा मिनिटांत काय संभाषण झालें हें सर्व आम्ही सांगत बसत नाही. इतकेंच सांगतों कीं, विमल आंत आल्याबरोबर मनोहर उठून बाहेर जाऊं लागला, तेव्हा तिनेच त्याला बसण्याची व आपल्या कामांत मदत करण्याची सूचना केली. मनोहर म्हणाला, "वकिलाला पडवकील कशाला?" विमल म्हणाली, "आधी वकील तर होऊं द्या, मग पडवकील हा शब्द खरा होईल." मग वकिलीची परीक्षा, सनदेची वहिवाट वगैरेबद्दल चार शब्द झाले. त्यांत संस्थानी कारभार हा खालसांतील कारभारापेक्षा अधिक ढिला व जुलमी हें दर्शविणें विमलला ओघानेच प्राप्त झालें मग आजवर सनद कां काढली नाही असा मुद्दा निघाला. तेव्हा आपणाला आई-बापाच्या सेवेकरिता गांवांतच राहावयाचें, पुण्या-मुंबईसारख्या ठिकाणीं जावयाचें नाही, ज्ञानाकरिता, हौसेकरिता परीक्षा दिली, द्रव्यलोभाने नाही, व आजहि सनद घेण्याचें कारण तरी भावावर आलेला प्रसंग—या गोष्टी विमलला सांगाव्या लागल्या. त्याचा परिणाम, तिच्या चारित्र्याच्या दृष्टीने, नवलरायाच्या मनावर काय झाला असेल हें वाचकांनी आपल्याच मनाने ठरवावें. असो. दरबारी रीतीप्रमाणे अर्जदाराला अर्ज बहाल करावयाचा असला, तरी समक्ष भेटींत तसें सांगत नाहीत, जणूं काय अर्जदार हर्षवायु होऊन तेथेच पायाशीं पडून मेला तर? म्हणून 'मागाहून कळवूं' असें म्हणतात. तेंच उत्तर नवलरायाने विमलला दिलें व त्याला मनोहरने नुसता होकार भरला. मग अवांतर एखादा विषय अगदीच न बोलणें हें स्त्रीदाक्षिण्याला शोभत नाही म्हणून, नवलरायाने सहज

प्रश्न केला कीं, " तुमचा वकिलीचा अभ्यास किती दिवसांत झाला!" त्यावर तिने " अवघ्या एक वर्षांत " असें म्हटल्याबरोबर, आपणा स्वतःहून अधिक बुद्धिवान् अशा स्त्रीशीं बोलत आहों ही खात्री पटून तो मनांत चूरच झाला. कारण पूर्वी राजकुमार कॉलेजांत असतांना कायद्याचा अभ्यास किती कठीण असतो हें नवलरायाला कळून आलेंच होतें! मग 'नेहमी उद्योग काय करतां?' असा प्रश्न सहजच आला. तेव्हा तिकडूनहि विमलच्या मनाची सुसंस्कृति, शिक्षणप्रेम, आणि परोपकारबुद्धि हीं न सांगतां समजून आलीं. तेव्हा सहज नवलरायाच्या तोंडून शब्द गेले कीं, " या गांवचीं लहान मुलें मोठीं भाग्याचीं दिसतात!" हें ऐकतांच मनोहराचें मन हसून त्याला म्हणालें, " पाहा, तुझ्या गळाच्या तोंडाशीं मासा खेळूं लागला रे लागला!" या विचाराने उमटणारें हास्य लपविण्याकरिता खिडकीशीं जाऊन कांही तरी पाहण्याचा बहाणा करून त्याला परत येऊन बसावें लागलें. मग विमलच्या शिक्षणसंस्थेला संस्थानी सरकारकडून कांही मदत मिळते का? असे नवलरायाने विचारलें तेव्हा तिने सांगितलें कीं, " स्त्रीशिक्षणाच्या संस्थेला सरकारी मदत म्हणजे सुशील शिक्षकिणीवर ती एक आपत्तिच होय.मात्र हीं लहान मुलें मी माझीं म्हणतें ती संस्थानी सरकारनेहि आपलीं म्हटलीं तर मला त्यांत आनंदच होईल." पण हें बोलत असतां तीं दोघें एकमेकांकडे पाहत आहेत, याचा फायदा घेऊन मनोहर म्हणाला, " आपलेपणाचे डोळे दोन,पण दृष्टि एक होईल तेव्हाच तें घडावयाचें!" पण लगेच या कोटींतील गर्भित नाजूकपणा छपविण्याकरिता तो अडखळत भिस्कीलपणाने म्हणाला, " मौज हीच वाटते कीं, मुलांची काळजी लेकुरवाळ्या आईबापांपेक्षा कित्येक वेळा अविवाहितांनाच ती अधिक वाटते!" पण मनोहराचें हें बोलणें उगीच कांही तरी आहे असें भासविण्याकरिता नवलराय म्हणाले, अविवाहितांच्या मनांत मुलांच्या शिक्षणाविषयीचें जें प्रेम असतें तें विवाहितांच्या मनांतील अपत्यप्रेमाहून अधिक असेल तर तसें घडेलहि!"

मग आपण फजीत झालों नाही हें दाखविण्याकरिता मनोहराने एक नवाच प्रश्न काढला. तो म्हणाला, " आमच्या गांवांत मुलींची एक शाळा आहे; पण बरेच दिवस ती ओसाड पडलेली पाहतों. मग काय शिक्षकिणी मिळत नाहींत म्हणून? संस्थानच्या बजेटांत मास्तरणींच्या पगारावर रक्कम तर टाकलेली दिसते! किंवा असेंहि कदाचित् असेल कीं, मास्तरणी पगार घेत असतील पण इतरच कांही उद्योग करीत असतील." विमलला मनोहराचें हें बोलणें आवडलें

नाहीं. ती म्हणाली, "याचें खरें कारण सांगावयाला मला संकोच वाटतो. पण योग्य पगार दिला असतां शिक्षकिणी मिळत नाहीत, किंवा पगार तेवढा घेऊन बेमानीपणाने त्या इतर काम करतात, हे दोनहि आरोप खरे नाहीत. मास्तरिणी न टिकण्याचें कारण दुसरेंच आहे. लागोपाठ पूर्वीच्या दोन मास्तरिणी, संध्याकाळीं रजेचा जरूरीचा रिपोर्ट पाठवून आपली अब्रू बचावण्याकरिता रातोरात गांव सोडून निघून गेल्या; आणि तिकडून त्यांनी राजीनामेच पाठविले ! आणि रिकामी जागा भरण्याकरिता परवा शिक्षणाधिकाऱ्यांनी वर्तमानपत्रांत जाहिरात दिली तींत असें लिहिलें होतें कीं, "अर्जाबरोबर अर्जदारणीने आपला पत्ता व फोटो पाठवावा." मी बोललें यांत अतिप्रसंग असेल; पण गरीब सुशील मास्तरिणींवर यांनी केले ते भलते आरोप मी कसे ऐकून घेऊं ?"

झालें! मनोहराने मध्यें तोंड घातलें तों त्याच्या तोंडांत बरोबर चपराक बसली ! मनोहर सहज म्हणून बोलावयास गेला पण त्यामुळे विमलचे अंगीं असलेला स्त्रीजातीविषयीचा अभिमान सहज प्रज्वलित झाला आणि मग या तेजांत ते दोघेहि दिपून गेल्यामुळे बोलणें थांबलें व विमलहि 'मी येतें तर' असें म्हणून उभी राहिली, आणि नमस्कार झाल्यावर मनोहर तिला पोंचविण्याकरिता जिना उतरून गेला.

हा लहानसा संभाषणाचा प्रसंग; पण तेवढ्यांत विमलच्या अंगचे अनेक गुण नवलरायाच्या अनुभवाला इतके आले कीं, तिच्याविषयीच्या प्रेमभावनेंत आदरबुद्धीची भर पडून, त्याला आपण संस्थानिक असलों तरी मनुष्य या नात्याने तिच्याहून किती कमी योग्यतेचे आहों, हें मनावर बिंबलें ! मनोहर खालून वर येईपर्यंत तो बसल्या जागीं खिळून राहिला व दिवाणखान्याच्या तक्तपोशीवर त्याची दृष्टि खिळून राहिली. मग तेथे कोणतीं चित्रें त्याला दिसत होतीं हें कोणी सांगावें ?

त्या दिवशीं तिसरे प्रहरीं संस्थानच्या वकिलीची सनद एका मोहोरबंद पाकिटांत घातलेली विमलकडे तिच्या घरीं रवाना झाली. यापूर्वी दिवाणसाहेब रीतीप्रमाणे प्रकरणाची सुनावणी करण्याला राजवाड्यांत गेले, तेव्हा सनदेच्या विषयाची चर्चा ते व यजमानसाहेब यांच्या दरम्यान झाली हें सांगावयास नकोच. दिवाणसाहेबांनी कायद्याची भाषा काढली, तेव्हा "स्त्रियांना सनद देण्याची वहिवाट नसली, तरी ती देऊं नये असा कायदा आहे काय ?" असें विचारून नवलरायाने त्यांना मोडून काढलें, तरी दिवाणसाहेब म्हणालेच

"स्त्रिया वकिली करूं लागल्या म्हणजे न्यायाचें खोबरें झाल्याशिवाय राहावयाचें नाही." त्यावर महाराज म्हणाले, न्यायकोर्टांत स्त्रिया वकील म्हणून न आल्या तरी साक्षीदार म्हणून येऊं शकतील कीं नाही ? आणि स्त्रीदर्शनाने मोहून जाऊन स्त्री-साक्षीदाराची जबानी खरी, असे न्यायाधीश म्हणेल असें मानलें तर पंचाईत होईल ! पण त्याहून अधिक पंचाईत दोन स्त्रिया परस्परविरुद्ध साक्ष देणाऱ्या आल्या, तर होणार नाही काय ? तसेंच वादी व प्रतिवादी या स्त्रिया असल्या तरीहि तीच गोष्ट व्हावयाची. कारण जी स्त्री अधिक सुरूप व लोभवश होण्यासारखी तिच्याच बाजूचा न्याय व्हावयाचा !" या समर्पक युक्तिवादाला दिवाणसाहेब कसें उत्तर देणार ? महाराज असेंहि म्हणाले कीं, "अन्याय व्हावयाचाच तर स्त्रीदर्शनाइतकीच लांचलुचपत, मित्रांची भीड, आप्तांचा ऋणानुबंध हीं प्रभावी मोहनास्त्रें नाहीत काय ?" ते म्हणाले, "मला न्यायदानाचा अजून अनुभव नाही म्हणून तुम्हाला विचारलें." त्याचा सरळच रोख असा होता कीं, "या मोहनास्त्रांचा प्रभाव तुमच्यावर अनेक वेळां झालेला असेल, मग येऊन जाऊन स्त्रिया वकील होण्यावरच उगीच येवढा कटाक्ष कां ?" पण महत्त्वाचीं कारणें आधी सांगून, क्षुल्लक कारणें शेवटीं सांगून, जणूं कांही आपण त्यावर भर देतों असा बहाणा करणें, हा थट्टेचा एक प्रकार असतो. त्याप्रमाणें महाराजांनी शेवटीं दोन कारणें सांगितलीं. ते म्हणाले, "ज्या स्त्रीला खालसांतील हायकोर्ट सनद देतें, तिला संस्थानी दरबारने सनद देत नाही म्हणणें हा ब्रिटिश सरकारचा अपमान होईल कीं नाही सांगा ?" हें कारण महाराजांनी खऱ्या मनानें पुढे आणलें नसलें तरी दिवाणसाहेबांच्या मनावर मात्र त्याचा फार परिणाम झाला. आणि सर्वांच्या शेवटीं जशी कांही टवाळी करावी अशा स्वराने महाराज म्हणाले, "अहो, सनदेचे पांचशें रुपये मिळतात ते उगीच कां बुडवा ?" संस्थानाचें उत्पन्न बुडूं नये अशाविषयी दिवाणसाहेब फार दक्ष असतात असा टोला पूर्वी एकदा महाराजांनी त्यांना दिला होता. दहा हजारांचा ऐवज पोलिटिकल एजंटाच्या मडमेला द्यायला काढला; पण जिन्नस घालून रुप्याचें तबक द्यावयाचें तें अगदी लहान असावें अशी दिवाणसाहेबांची सूचना आधारभूत घेऊन, रुप्याच्या तबकासकट सगळा अहेराचा ऐवज देण्याचें रहित करून, त्यांनी दिवाणसाहेबांची थट्टा पूर्वी केली होती, हें एका प्रकरणांत वाचकांनी वाचलेंच आहे. विमल स्त्री म्हणून तिला सनद देऊं नये

या दिवाणसाहेबांच्या मोठ्या मुत्सद्देगिरीच्या धोरणाची फजिती या वेळीं त्यांनी पांचशे रुपयांचें आमिष दाखवून केली !

प्रभाकराला कोणत्या जागीं केंद्रांत ठेवावें येथपासून मतभेदाला सुरुवात झाली होती. वकिलीची सनद ही त्याचीच दुसरी पायरी. पण दैवयोगानें तिसरी पायरी देखील आजच रचली जाण्याचा योग आला, तो असा—

दत्तविधान उधळलें त्या क्षणापासून प्रभाकर परत आल्याचा बोभाटा गांवभर झाला. दिवाणसाहेब दत्तविधानाला निघाले तेव्हाच, आज कांही अपूर्व आहे असें लोकांना वाटलेंच होतें. एक वेळ गळ्यांत घंटा घातलेला हत्ती रस्त्यांतून न कळत जाऊं शकेल; पण दिवाणसाहेबांची स्वारी निघाली कीं तो रस्ता गजबजून जावयाचा. दत्तविधानाच्या वेळीं डबीरांच्या घराबाहेर बरीच गर्दी झाली होती. आणि प्रभाकरानें शेवटीं येवढा उंच स्वर काढून सर्वांना चालते व्हा म्हणून सांगितलें, तें या जमावानें ऐकलें. आणि त्या पाठोपाठ तोंडें खाली घालून गेलेले दिवाणासुद्धा सर्व लोक त्यांनी पाहिले. अर्ध्या घटकेंत गांवभर पुकारा झाला, त्यांत दत्तक फसला हा थट्टेचा म्हणून विषय झाला तरी, प्रभाकर परत आल्याच्या बातमीनें सगळ्या गांवाला आनंद झाला. कारण तो तसाच लोकप्रिय होता. तो गुंड असला तरी परोपकारी गुंड, सत्प्रवृत्तीचा गुंड, न्यायाला मदत करणारा गुंड, अधिकाऱ्यांचीं बिंगें उघडीं करणारा गुंड, आणि सर्वांत मोठी गोष्ट ही कीं, गांवच्या पोरीबाळींची अब्रू वांचविणारा गुंड अशी त्याची ख्याति होती. त्याची स्वारी रस्त्यांतून निघाली म्हणजे चार संवगडी बरोबर असावयाचेच. सर्वांच्या अंगांत तालमीच्या मातीनें रंगलेले मुंडेछाट सदरे, डोक्यांवर ठेवून दिलेल्या वाकड्या टोप्या, हातांत छड्या, आणि पिंढऱ्या उघड्या पडतील इतके उंच मारलेले धोतराचे काचे, असें हें टोळकें रस्त्यांतून निघालें म्हणजे सर्व लोक आदरानें त्यांच्याकडे पाहात व अधिकाऱ्यांना नाहींत इतके मुजरे त्यांना झडत. बँड वाजवीत व बूट खडखडावीत पोलिसांची सबंध तुकडी रस्त्यांतून चालली तरी तिचा दरारा लोकांना जितका वाटे त्याहून प्रभाकर व त्याची तालीमबाज चौकडी यांचा अधिक वाटे. तो फरारी झाला तेव्हा प्रथम चार दिवस अज्ञानानें लोकमत त्याविषयीं किंचित् कलुषित झालें होतें, पण लवकरच तें निवळलें. पहिली चौकशी झाली ती प्रभाकराच्या गैरहजेरींत आणि गुळाचा गणपति गुळाचा नैवेद्य अशी. पण पुढे साथीदार म्हणून शिक्षा केलेला विनायक लोंढे

हा माफी मागून सुटून बाहेर आला, तेव्हा खरी हकीकत आपोआप बाहेर पडूं लागली. तेव्हापासून लोक प्रभाकराची मोठ्या उत्कंठेने वाट पाहत राहिले होते. आणि आता तो अशा अभावित रीतीने फारा दिवसांनी प्रकटच झाल्यामुळे त्याच्या प्रेमाने लोक बेहोष झाले. त्याचें आता काय होणार हाच विषय ज्याच्या त्याच्या तोंडीं. विनायक लोंढे हा अलीकडे नवलपूरला येऊं लागल्यापासून त्याच्या पश्चात्तापाचा हृद्रोग बळावला होता. म्हणून प्रभाकर परत आला व त्याला फिरून अटक होऊन कैदेंत गेला, हें कळतांच त्याने या कामीं न्याय मिळविण्याचा निश्चयच केला! न्यायमुनसफीचें काम हवें तसें कांही व्हावयाचें तर खुद्द संस्थानिकाची गांठ घेणें अवश्य. पण बऱ्या (म्हणजे विनायक लोंढे) याला दरबारांत कोण विचारणार? म्हणून त्याने खालसांतील शिकलेल्या मतप्रचाराच्या साधनाचा उपयोग करून ताबडतोब दौंडी पिटवून जाहीर सभा भरविली. नगरशेठ धीरजलाल यांना अध्यक्ष केलें. आपल्या खोट्या साक्षीचा पाढा सभेंत सर्व वाचून दाखविला, आणि महाराजांकडे शिष्टमंडळ नेण्याचा ठराव करून घेतला.

विमलच्या सनदेसंबंधाने महाराज व दिवाणसाहेब यांचें संभाषण होत आहे याच सुमाराला हें शिष्टमंडळ भेटीला आल्याची वर वर्दी गेली. अर्थात् पहिलें प्रकरण संपलें तरी याकरताहि दिवाणसाहेबांना थांबवून घ्यावयाला हवेंच होतें. शिष्टमंडळ वर आल्यावर नगरशेठ धीरजलाल यांनी सभेचा ठराव वाचून दाखविला आणि तोंडी विनंति केली कीं, प्रभाकराचें हें प्रकरण जुनें शिळें झालें आहे, तेव्हां तें सर्व मिटवून मूठमाती देऊन टाकावें, म्हणजे शहरच्या लोकांना फार बरें वाटेल. ज्यांना कायद्याचें ज्ञान नसतें त्यांना कोणतीहि विनंति करणें लोकांना अवघड वाटत नाहीं. आणि कायदा झाला तरी असा कोणता कीं जो संस्थानिक राजी झाला तर दडपून टाकूं शकत नाही? अशीच साऱ्या संस्थानी प्रजेची समजूत असते. पण महाराजांची भावना तशी नव्हती. म्हणून त्यांनी थोडा वेळ, हें प्रकरण माहीत नाही अशा झोकाने दिवाणसाहेबांकडून लोकांसमक्ष समजावून घेतलें. त्यामुळे दिवाणसाहेबांना हुरूप येऊन ते आपण होऊन म्हणाले, " इन्साफ एक वेळ झाला, तो पुनः होत नसतो; आणि न्यायाचीं प्रकरणें अशीं दडपून संपवून टाकतां येत नाहीत. त्याबरोबर विनायक गरम होऊन म्हणाला, झाला तो इन्साफ कसला? ती न्यायाची थट्टा! न्यायदेवतेची विटंबना! तेव्हा महाराजांनी सहजच विचारलें कीं, " हे

गृहस्थ कोण?" तेंव्हा तोच "साथी म्हणून शिक्षा झालेला साक्षीदार व माफीच्या निमित्ताने बंधमुक्त झालेला कैदी" अशी माहिती देण्यांत आली. महाराज म्हणाले, "मग काय? ज्या एका साक्षीवर विश्वास ठेवून डबीरांना शिक्षा झाली ती साक्षच खोटी व बनावट होती? आणि स्वतः साक्षीदारच मीं खोटी साक्ष दिली असें आपल्या तोंडाने सांगतो?" विनायक म्हणाला, "होय महाराज, दुर्दैवाने तशी वस्तुस्थिति आहे खरी!" महाराज म्हणाले, "मग तुम्ही कटाच्या खटल्यांतून माफी मागून सुटलां तरी आता खोटी साक्ष दिल्याबद्दल तुमच्यावर खटला होईल त्याची वाट?" विनायक म्हणाला, "खोट्या साक्षीचा खटला होऊन शिक्षा होईल तर तेंच माझें खरें प्रायश्चित्त. पण प्रभाकराची सुटका झाली पाहिजे."

नंतर गुन्हेगाराच्या, म्हणजे ज्याच्यावर फौजदारी फिर्याद झाली त्याच्या, गैरहजेरींत इन्साफ होऊंच शकत नाही असा मुद्दा विनायकाने मांडला. कारण त्याने बी.ए. झाल्यानंतर कायद्याचा थोडा तरी अभ्यास केला होता. पण दिवाणसाहेब पडले अनुभविक न्यायाधीश! त्यांनी आपल्या 'मतलबसिंधू'तील उलट आधार सांगितला. पण अशा भानगडीच्या प्रकरणाचा निर्णय अशा खासगी बैठकींत करतां किंवा सांगतां येत नाही, म्हणून शेवटीं महाराजांनी आपल्या 'अज्ञानसिंधू'चा आधार देऊन "ठीक आहे, मी करतों विचार." असें थाटाचें पण पोकळ उत्तर देऊन नगरशेठ व इतर मंडळी यांना लावून दिलें. मग ते दिवाणसाहेबांना म्हणाले, "काय हो दिवाणसाहेब! तुम्ही तर या खटल्यांतील फिर्यादीच. मला न्यायकोर्टांत अधिकार असला तरी कायद्याचें ज्ञान नाही. आणि हें प्रकरण तर असें दिसतें कीं, यांत सगळ्या गांवाचा जिव्हाळ्याचा संबंध. तेंव्हा उत्तम मार्ग म्हटला म्हणजे वर पोलिटिकल एजंट साहेबाला लिहून खालसांतील एकादा चांगला वकीलच स्पेशल पब्लिक प्रॉसिक्यूटर म्हणून बोलवावा. त्याने झाला इन्साफ हाच पुरें असें सांगितलें तर कामच झालें! आणि नवा इन्साफ होणें जरूर असा सल्ला त्याने दिला तर तिकडूनच एखादा स्पेशल न्यायाधीश बोलावूं म्हणजे झालें!"

कायद्याच्या प्रश्नावर असा स्वतंत्र सल्ला घेण्याचा बूट महाराजांनी काढतांच दिवाणसाहेबांच्या मनाने कच खाल्ली, व त्यांना दहशत बसली. पण महाराज बोलले तें रीतीचेंच असल्यामुळे 'जसें आपल्या मर्जीस येईल तसें करावें' इतकेंच म्हणून ते दुर्मुखलेले असे जिना उतरले.

घरीं येतांच त्यांनी ताबडतोब एक लांबलचक पत्र पोलिटिकल एजंट-साहेबांच्या शिरस्तेदाराच्या नांवाने स्वहस्तें लिहिलें; आणि लगेच आपल्या विश्वासू जमादाराला हाक मारून तें मोहरबंद करून आपल्या टेबलाच्या कुलपी-खणांत ठेवून दिलें. मग जमादाराला तोंडी हुकूम दिला कीं, "जिल्ह्याचे गांवीं उद्या सकाळच्या दहाच्या गाडीने तुला शिरस्तेदारांच्या नांवचें एक पत्र घेऊन जावयाचें आहे, त्याची तयारी करून ठेव."

पण पत्रें लिहिलीं म्हणून तीं सर्व त्यांच्या मुक्कामाला पोंचतातच असें कुठे आहे? सरकारी टपालखात्याने 'डेडलेटर ऑफिस' म्हणून एक कचेरी ठेवली आहे. त्यांत 'मृत' पत्रें जाऊन पडतात व तेथून त्यांचा बटवडा होतो किंवा शेवटीं नाश होतो. या कचेरीचा व्यवहार पाहावयास सापडणारे लोक असें सांगतात कीं, 'डेडलेटरा'चा म्हणजे 'मृतपत्रा'चा इतिहास फार मनोरंजक असतो. पत्रालाहि मृत्यु असतो! आणि त्याचीं कारणें सांगावयाचीं तर मनुष्य-मात्राच्या अनवधानतेचे, गाफीलपणाचे, मूर्खपणाचे, भोळया समजुतीचे, खोट्या अहंकाराचे, व शेवटीं अज्ञानाचे जितके म्हणून प्रकार असूं शकतात त्या सर्वांची जंत्रीच करून मांडावी लागेल. या सर्व उपाधी असून त्या पत्ररूपी जीवाला त्याचा इष्ट मोक्ष मिळण्याच्या आड येतात. चौऱ्यायशी जन्म फिरल्यानंतर तरी जीवाला मनुष्यजन्म हटकून मिळतो. पण चौऱ्यायशी ठिकाणीं पत्ते बदलून व निराशा आणि अस्वीकाराचा अपमान यांच्या दुःखाचे छाप व ठसे अंगभर सोसून, जेव्हा दमून भागून पत्र 'मृतपत्रां'च्या कचेरींत जातें, तेव्हा तें मृतप्राय होतें, आणि ठराविक अवधीनंतर तें आता पूर्ण मेलें असें समजून जिवंतपणींच त्याचा दहनविधि होतो! [मुसलमानांनी मुसलमानांना ऊर्दू लिपींत लिहि-लेल्या पत्रांचा दहनविधि हा धर्मविरुद्ध असल्यामुळे त्यांचा दफनविधि करण्यांत यावा असा ठराव असेंब्लींत येणार आहे म्हणतात. पण तूर्त तरी त्यांचाहि दहनविधि होतो.] किंवा एखाद्या कागद तयार करण्याच्या कारखान्यांत तें पत्र गेल्यास त्यावर समंत्रक शुद्धोदकाचें सिंचन होऊन त्याला देहांतर करतां येतें.

असो. अशा रीतीने कांही पत्रांना रीतसर यथाकाल मृत्यु येतो, तथापि कांहीं पत्रांना मृत्यु न येतां कांही तरी अपघात होतो. त्याचा एक प्रकार असा कीं, मालकाचा पत्ता लिहून प्रवासाला पाठविलेलें पत्र, वाटेवर कोणत्या मधल्याहि ठराविक मुक्कामाला न पोंचतां, तिसऱ्याच्याच हातीं लागतें! आणि अपमृत्यु टळला म्हणजे जीवाला अधिक आयुष्य लाभतें असें म्हणतात त्याप्रमाणे, अशा

रीतीने भलत्याच्याच हातांत पडलेलें एखादें पत्र विशेष काळजीने संभाळलें जातें. त्याला ठेवणीच्या दप्तरांत किंवा खासगी कपाटाच्या चोरखणांत सुरक्षित जागा मिळते ! आणि पुढे केव्हा त्याचा कोणी अपहार करील किंवा नाश होईल म्हणून त्याच्या लिंगदेहाचें सूक्ष्म शरीराचें छायाचित्र घेऊन संभाळण्यांत येतें. बिचाऱ्या पत्राचीं अशीं उलटसुलट केवढीं तरी स्थित्यंतरें !

---

२० माशाचें पोट चिरणारी सुरी !

असो, दिवाणसाहेबांनी पो. एजंटसाहेबांच्या शिरस्तेदाराला जें पत्र पाठविण्याकरिता खास जासुदाच्या हातीं दिलें म्हणून मागील प्रकरणांत सांगितलें त्याला असाच अपघात झाला. त्याचा प्रकार असा—या जासुदाला वाटखर्ची देऊन दिवाणसाहेबांनी "पत्र नीट सांभाळ आणि शिरस्तेदार-साहेबांच्या हातीं दे" असें बजावून रवानः केलें. तें पत्र त्याने आपल्या बंडीच्या खिशांत नीट ठेवलें. आणि प्रवास पुरा करून यायला दोनतीन दिवस लागणार म्हणून थोडे खाण्याचे पदार्थ आणि धोतर-पांघरूण घेण्याकरिता तो आपल्या घरीं निघाला. वाटेवर सुभेदारसाहेबांचें घर लागलें. त्याच्या दारांत सुभेदारसाहेबच स्वतः उभे ! त्यांना पाहून जासुदाने रामराम केला. सुभेदार हे दिवाणसाहेबांच्या घरीं दिवसांतून एकदोनदा तरी जाणारे, त्यांच्या घरीं खाणारे-पिणारे, ख्यालीखुशालींत सामील होणारे जिवलग दोस्त ! आपणाला धन्याने मोठ्या महत्त्वाच्या व विश्वासाच्या कामगिरीवर धाडलें आहे याविषयीं वाटणारा गर्व बोलून दाखवायला, त्याला घरच्यासारख्या मनुष्य व दिवाण-साहेबांचा परममित्र भेटल्यामुळे, उभें राहून त्याच्याशीं दोन शब्द बोलावे असें त्याला सहजच वाटलें.

सुभेदारांनी त्याला सहज म्हटलें, "पण काय रे, तूं कुठं चालला आहेस, सुभान्या ! जरा गर्दीत दिसलास म्हणून विचारलें."

सुभान्या म्हणाला, "लई जोखीमदारीच्या कामावर ! ह्ये पत्रावरची मोहोरा बगा. जाड लाखेन केल्याती ! ताबडतोब जिल्ह्याला जायचा आणि एजंटसाहे-बांच्या शिरस्तेदारसाहेबांना हें पतर द्यायचा हुकूम झालाया मला धनीसाबांचा !"

असें म्हणून जासुदाने आपण होऊन बंडीच्या खिशांतलें मोहोरबंद पत्र,

काढलें आणि सुभेदारसाहेबांच्या हातीं दिलें. तें क्षणभर उलथून–पालथून पाहिल्यावर सुभेदारांच्या मनांत कसलीशी कल्पना आली, व ती अकल्पित रीतीने आल्यामुळे त्यांना विजेचा धक्का बसावा असा बसून शरीर खरोखरच हललें. तो लखोटा तसाच हातांत धरून ते म्हणाले, “पण काय रे, आगगाडीच्या टेमाला अजून किती तरी उशीर आहे? मलाहि पण जिल्ह्यालाच जायचें आहे पुढच्या गाडीने, डि. कोर्टांतल्या कांही कामाकरिता. काम दोन पैसे मिळण्याचें आहे. एका श्रीमंत पक्षकाराची व एका मोठ्या वकिलांची गाठ घालून देऊन शिफारस करायचें काम आलें आहे माझ्याकडे. तूं माझ्याबरोबरच येत असलास तर माझ्या सेकंड क्लासच्या तिकिटाबरोबर तुझेंहि नोकराचें म्हणून तिकीट काढीन. सहजासहजीं बरेंच झालें नाही का? तुला गरीबाला दोन रुपये मिळाले तर! तुझी राहण्याजेवणाचीसुद्धा सोय मला करतां येईल!”

जासुदाच्या तोंडाला पाणी सुटलें. सुभेदार फुकट तिकीट काढतील तर दिवाणसाहेबांनी दिलेल्या वाटखर्चीच्या रकमेंतले दोन रुपये उरतील, ते सहज न कळत खिशांत टाकतां येतील. या विचाराने तो आनंदून म्हणाला, “जशी आपली मर्जी, सुभेदारसाब. आपण माझ्या गरीबाच्या हिताला सदा जपतांच नव्ह का? पण घरीं जाऊन बेगी बेगी येऊं म्हणतां! जातों, दोन घास खाऊन कांबरून घेऊनशान येतों बगा याच पावलीं.”

“अरे, दोन घासच खायचे तर घरींच कशाला जायला पाहिजे! मी आता बसणारच आहें जेवायला. तुझेंहि पान सांगेन घालायला बाहेर पडवींत माझ्याबरोबर. म्हणजे गाडी बोलावली आहे त्यांतूनच जाऊं दोघे मिळून स्टेशनावर.”

“जेवलों बी असतों हतच. पण दोन दिवस परगांवला जायचं तवा कारभारणीला सांगाया होव. आणि कांबरून धोतर बी घ्याया होव. मिळून काय जाया होवच, तवा दोन घास बी खाऊन घेईन. आपलं जेवाण व्हत तवर आलोंच बगा मी बिगी बिगी!”

असें म्हणून सुभेदारसाहेबांच्या हातांत दिलेलें पत्र परत घेण्याकरिता त्याने दोन हातांची ओंजळ पसरली. पण सुभेदारांच्या मनांत तें पत्र त्याला परत देण्याचें नव्हतें. म्हणून त्यांनी तें त्याच्यादेखत आपल्या शॉर्ट कोटाच्या खिशांत घातलें, आणि त्याला म्हणाले, “काय वेडा आहेस रे, सुभान्या!

असलें महत्त्वाचें पत्र अशा घाईत घरीं कशाला नेतोस ? घरीं मुलेंबिलें खिशांत हात घालून खेळायला घेऊन फाडायचीं, तांबड्या लाखेचा चांद पाहून! निदान तें घाण तरी व्हायचेंच. राहूंदे तें मजजवळच. आगगाडींतून जिल्ह्याला उतरलों म्हणजे आधी तुला तांग्यांतून शिरस्तेदारसाहेबांच्या घरीं पोचवीन आणि मग पुढे जाईन. नाही तर या खेपेला मीहि त्यांच्याकडे उतरेन. मला कायमचें पाहुणचाराचें आमंत्रण आहे त्यांचें." इतकेंच बोलून ते इकडे तिकडे कानोसा घेतल्यासारखें करून हलक्या गुप्त गोष्टी बोलण्याच्या आवाजांत म्हणाले, " अरे, हें पत्र माझ्याच कामाचें आहे समजलास ! तें दत्तविधान त्या दिवशीं उधळलें, त्याच्याच बाबतींतलें आहे हें पत्र शिरस्तेदारसाहेबांना. आणि त्यांतलेंच थोडेसें काम माझेंहि आहे जिल्ह्याला. हें पत्र अगदी प्रवासी ट्रंकेच्या कुलपाच्या खणांत गेलें म्हणून समज. जा, लवकर जा, आणि जेवून धोतर–बितर काय घेऊन यायचें असेल तें घेऊन ये. तांगा तयार आहे. उगीच उशीर मात्र करूं नको हां ! गाडी चुकेल." असें बोलून उत्तराची वाट न बघतां ते तडक घरांत निघून गेलेहि. बिचारा जासूद ! एवढया मातबर माणसावर, त्यांतूनहि आपल्या धन्याच्या जिगरदोस्तावर व रोज हाताळण्याच्या त्यांच्या हस्तकावर, तो बिचारा अविश्वास कसा दाखविणार ? सुभेदारांच्या कृपेने दोन रुपये मिळण्याचा योग त्याच्या डोक्यांत होता तोच बळावून तो तसाच मागे वळला आणि जेवून घेऊन कारभारणीचा निरोप घेण्याकरिता आपल्या घराकडे निघाला.

सुभेदार चाणाक्ष होता. त्याच्या लक्षांत हें तेव्हाच आलें कीं या मोहोरबंद पाकिटांत फार महत्त्वाचा असा कांही तरी मजकूर असणारच. तो दत्तक-प्रकरणीं किंवा प्रभाकर--प्रकरणीं किंवा दोनहि प्रकरणीं असेल. तरी तो काय तो अवश्य पाहावा. मोहोर फोडून पाकीट उघडावें, आणि फिरून वेगळ्या पाकिटांत घालून त्यावर आपल्या हाताने दिवाणसाहेबांसारखें अक्षर काढून भली थोरली लाखेची चकती लावून तें स्वतःच नेऊन शिरस्तेदारांना पोंचवावें. दिवाणसाहेबांचा व आपला स्नेह किती दाट आहे हें शिरस्तेदारांना माहीतच आहे. सगळेच आपण एका बैठकीला बसणारे; तेव्हा त्यांना संशय येणार नाही. आणि घाईने पत्र देऊन आपणाला दिवाणसाहेबांनी मुद्दाम रवाना केलें, व बरोबर त्यांनी आपला खास पट्टेवाला दिला अशी थाप मारली म्हणजे सगळें कांही संपादून जाईल. असा विचार करून

त्यांनी आपली ट्रंक भरली, व बिछाना बांधला. घरांत जेवण्याच्या तयारीची गोष्ट त्यांनी पट्टेवाल्याला सांगितली ती निवळ थाप होती. पण असल्या घाईचें काम जेवणाकरिता थांबून बिघडविणाराही तो गृहस्थ नव्हता. त्याने घरच्या कुणबिणीला चौकांतून तांगा आणावयाला सांगितलें, व खिशांतलें पाकीट हाताळीत तो माडीवर गेला.

तांग्यांत बसायला सुमारें अर्धा तास होता. त्याने माडीवरचें दार बंद केलें. एक कोरें पाकीट, लाख, सील, मेणबत्तीचा दिवा इतकें सामान त्याने आणून जवळ ठेवलें. आणि कातरी घेऊन पाकिटाची एका बाजूची शीर बरोबर नाजूक हाताने कापून त्याने आंतलें पत्र काढलें व वाचलें. तें वाचून तो क्षणभर स्तंभितच झाला. विशेषतः त्यांतला पांच हजार रुपयांचा उल्लेख वाचून, आणि आपल्याला शिवी देऊन तुच्छतेने उल्लेख केलेला पाहून त्याला सहजच फार राग आला. लगेच स्वार्थस्फूर्तीनें व सुडाच्या भावनेनें त्याच्या तोंडून खालील स्वगत भाषण केल्यासारखे उद्गार निघाले. "दत्तक फिसकटला हें माझें दुर्दैव खरेंच. पण याचें दुःख या चांडाळाला कांहीच नाही. आणि आपल्या बापाचा माल म्हणून येवढी पांच हजारांची रक्कम मात्र गडप करायची याची तयारी! उद्या मारवाडी माझ्या बोकांडी बसणार! ठीक आहे. दत्तक हुकला तर हुकूं दे. पण या पत्राच्या बळावर म्हणावें लेका आता तुला ते हरामाचे पांच हजार ओकायला न लावीन तर नांवाचा सुभेदारच नव्हे."

इकडून तांगा व तिकडून जासूद एकदमच दाराशीं आले. तेव्हा सुभेदारांनी आपलें सामान खाली आणवून तांग्यांत ठेवून ते स्वतः मागच्या बाजूला चढून बसले व पुढच्या बाजूला त्यांनी जासुदाला बसवून घेतलें. स्टेशनावर बुकिंग ऑफिसशीं जाऊन त्यांनी आपल्याकरिता अवघ्या चार मैलावरच्या पुढच्या स्टेशनचें दुसऱ्या वर्गाचें तिकीट काढलें. आणि जासुदाकरिता जिल्ह्याचें तिसऱ्या वर्गाचें तिकीट काढलें.त्याच्याच हातून आपलें सामान प्लॅटफॉर्मवर नेऊन सगळ्या पुढच्या सेकंड क्लासाच्या डब्यांत नेऊन ठेवलें. आणि ऐसपैस जागेचें निमित्त करून त्यांनी जासुदाला सगळ्यांत मागच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत बसविलें, आणि "आता खुशाल झोप घे, आणि मीहि पण झोप घेतों माझ्या डब्यांत" असें सांगून निघून गेले. नंतर गाडी सुटण्याला तीन मिनिटें आहेत तों हळूच हमालाकडून आपलें सामान उतरवून, पुढे पाठवून इंजिनाच्या बाजूने प्लॅटफॉर्मच्या एका फाटकांतून बाहेर पडले. व गाडी सुटण्याची

वाट भिंतीआडून पाहात उभे राहिले. गाडी सुटली व शेवटच्या डब्यांत जासूद खिडकीकडे पाठ वळवून चंची सोडून तंबाखू खात बसला आहे असें पाहून ते आपल्याशीं मोठ्याने हसले आणि टांग्यांत सामान घालून परत घरीं निघून गेले.

घरीं तासभर स्वस्थ बसून सुभेदारांनी मनाशीं कयास केला आणि निश्चय ठरल्याबरोबर ते उठून पोषाक करून खिशांत पत्र घालून प्रायव्हेट सेक्रेटरी मनोहरपंत यांच्या घरीं गेले. मनोहरपंत वाड्यांत जाण्याच्या बेतांत होते; परंतु सुभेदार आलेच म्हणून मनोहरपंतांनी त्यांना वर बोलावलें. दोघांची ही प्रत्यक्ष अशी पहिलीच भेट होती. सुभेदारांनी वांकून जमिनीला हात लावून, नमस्कार केला आणि डोळ्यांत अश्रू आणून ते म्हणाले, "कृतकर्मांचा पश्चात्ताप झालेला हा एक मनुष्य आपल्यापुढे उभा आहे. याला आपण पदरांत घ्यावें."

मनो.—तुमचें दुःख वर्णन करण्यापूर्वी तुम्ही आपलें नांव मला सांगितलें असतें तर बरें होतें. हकीकत मागाहून कळो; पण मनुष्य कोण हें तरी आधी कळलें पाहिजे ना !

सुभे.—होय, ती माझी चूक आहे. माझ्या भावनेच्या भरांत मी शिष्टाचार विसरलों खरा. मला सुभेदार म्हणतात. मी या गांवचाच रहिवाशी आणि संस्थानच्या तैनातदार डबीर घराण्यांतला एक गोत्रज आहें. माझें नांव आपल्या कानांवर कदाचित् आलें असेल.

दत्तकाची हकीकत सगळ्या गांवभर झालेली. तेव्हा मनोहरपंताला ती कळली असल्यास आणि तिच्यांतील मुख्य व्यक्ति म्हणून सुभेदार यांचें नांवहि त्याला कळलें असल्यास काय नवल? ती हकीकत किंवा तें नांव हीं भलेपणाचीं नव्हतीं;पण या विशेष ज्ञानाची ओळख न देतां पण किंचित् हसून मनोहरपंत म्हणाले, "अस्सें अस्सें, एकूण सुभेदार ते तुम्हीच! पण तुम्ही दुष्कर्म म्हणालां तें काय? व तुम्हाला पदरांत घेणारा मी कोण! व कशाकरिता? याचा मला कांहीच बोध झाला नाही. तरी तें थोडें समजावून सांगाल तर बरें."

सुभेदार म्हणाले, "भाऊसाहेब डबीर यांना मुलगा दत्तक देण्याची बुद्धि मला झाली. पण तसें करणें एकंदरीने ईश्वराच्या घरीं रुजू नव्हतें."

मनो.—कां बरें? हिंदुधर्मशास्त्राप्रमाणे दत्तक देणें-घेणें ही गोष्ट सद्धर्माचीच नव्हे काय? सद्धर्माची गोष्ट ईश्वराच्या घरीं रुजू कां नसावी?

सुभे.—इतक्याचकरिता कीं, भाऊसाहेबांचा मुलगा जिवंत असतां दत्तक देण्याची खटपट माझे हातून झाली.

मनो.—मीं ती हकीकत थोडी परस्पर ऐकिली आहे; पण हेंहि ऐकिलें आहे कीं, मुलगा दत्तक म्हणून मांडीवर देण्याकरिता उचलून उभा करीपर्यंत भाऊसाहेबांचा मुलगा जिवंत होता किंवा परतून येण्यासारखा होता ही गोष्ट तुम्हाला कांही माहीत नव्हती.

सुभे.—होय. स्वतः प्रभाकरपंत माजघरांतून ओटीवर येईपर्यंत तो कोठे आहे याची मला कल्पनाच नव्हती हें खरें आहे. तरी पण न मेलेल्या माणसाविषयी तो मेला किंवा घराला जन्मभर मुकला अशी अज्ञानाने चुकून कल्पना झाली तरी तोहि हातून गुन्हाच झाला असें वाटतें. कारण तो मेला अशी कल्पना करण्यापेक्षा तो जिवंत आहे अशीच कल्पना करून तो केव्हा तरी परत येऊन घरचा धनी होईल म्हणून दत्तकाची खटपट करू नये अशी कल्पना मनाला सुचविणें हें माणुसकीला अधिक शोभणारें नव्हतें काय ? पण देवाने माझी चूक मला लाजविण्यासारख्या रीतीने बिनतोड गळयांत घातली. म्हणूनच वाटतें कीं, ईश्वराच्या घरीं माझा दत्तकाचा प्रयत्न रुजू नव्हता. शिवाय या खटपटींत माझे हकनाक पांच हजार रुपये बुडाले. हा ईश्वराने मला दंडच केला.

मनो.—ते कसे बुडाले ?

सुभे.—दत्तक घेण्याविषयी भाऊसाहेबांचें मन वळविण्याकरिता आणि या खटपटींत पोलिटिकल एजंटसाहेबांचे शिरस्तेदार सामील करून घेण्याकरिता फी म्हणून दिवाणसाहेबांनी ती रक्कम मजकडून आगाऊ घेतली.

मनो.—मग आता दत्तक फिसकटल्यावर तरी तुमची हानि लक्षांत घेऊन ते पैसे त्यांनी तुम्हाला परत द्यावे.

सुभे.—माशाने गिळलेलें माणिक हातीं कसें लागणार ?

मनो.—हो. तेंहि खरेंच. पण माणिक गिळणारा मासा स्वतःच धीवराच्या जाळ्यांत केव्हा केव्हा सांपडतो आणि तो चिरला गेला म्हणजे माणिक परत मिळतें.

सुभे.—आपण बोललां तें जगांतील सर्वसामान्य न्यायाचें म्हणूनहि बोललां असाल, पण या घटकेला तें ईश्वराच्या स्फूर्तीनेच बोललां असाल असेंच वाटतें. मासा चिरला म्हणजे पोटांतून माणिक निघेल. पण मोठा मासा जाळ्यांत धरून वर काढावयाचा तर दोहोंऐवजी चार हात तरी लागतात. तरी आपलीहि मला थोडी मदत होईल तर माणिक परत मिळवावयास मला थोडा धीर येईल. "मासा पकडण्याचें जाळें आणि त्याचें पोट चिरण्याची सुरी हीं दोनहि

या लहानशा पाकिटांत आहेत. कशीं तीं आपण पाहा. म्हणजे हा धीवराचा धंदा माझ्याबरोबर करण्याला आपणालाहि हौस वाटेल." असें म्हणून सुभेदारांनी खिशांतील पत्र काढून तें मनोहरपंतांच्या हातांत टाकलें. त्यांना प्रथम कांही कल्पना होईना. पत्र उलथें करून पाहिलें तों पाकिटावर पत्त्यादाखल शिरस्तेदारांचें नांव आणि पाठविणार म्हणून दिवाणसाहेबांचें नांव! म्हणून तें आश्चर्यानें सुभेदाराला म्हणाले, 'हें पत्र माझें नाही. तें मी घेऊन काय करूं? आणि सगळया गोष्टींतली गोष्ट, हें पत्र तुमच्या हातीं कसें आलें?"

सुभे.—तें मीच कशाला सांगूं? तोंड चिरलेल्या पाकिटांत पत्र आहे तें काढून वाचा, म्हणजे सर्व मजकूर आपल्या लक्षांत येईलच.

मनोहरपंतांनी पाकीट फोडून सर्व पत्र सावकाश आपल्या मनाशीं वाचलें. पत्र खालीलप्रमाणें होतें:—

"सा. न. वि. वि. आपण नवलपुरास येऊन गेलां. त्यानंतर अनेक अकल्पित व उद्वेगकारक प्रकार घडले व आणखी घडण्याचा बराच संभव दिसतो. नवीन महाराजांनी आपल्या कच्च्या मुखत्यारीचा दुरुपयोग करण्याला प्रारंभ केला आहे. भाऊसाहेबांच्या मांडीवर सुभेदारांचा मुलगा दत्तक देण्याचें ठरवून दत्तविधान आता प्रत्यक्ष होणार इतक्यांत काय झालें असें तुम्हाला वाटतें? स्वतः प्रभाकर अवचित पुढे आला व त्याने तुमच्या-माझ्यासकट सर्वांना वाटेल त्या शिव्या देऊन दत्तविधान उधळून लावलें. आणि आता सुभेदार पांच हजार रुपये मला परत मागूं लागले आहेत. ते आता परत देणें शक्य आहे काय? याचा आपणच विचार करा! दत्तविधानाचा, म्हणजे तें यापुढे संस्थानांत बेकायदा ठरविण्याचा कायदा, नवे यजमानसाहेब करण्याच्या विचारांत असल्याचें आपणास माहीत आहेच. त्यापूर्वी हें दत्तविधान उकरण्याकरिता मी व आपण किती खटपट केली हें आपण जाणतच आहां. पण त्या लेका सुभेदाराचें नशीबच फुटलें त्याला काय करणार? आता तर प्रभाकर डबीर प्रकट झाला! इतकेंच नव्हे तर त्याचा खटला फिरून उघड चालावा अशी खटपट सुरू झाली आहे. प्रभाकराला मी पकडून तुरुंगांत ठेवलाच आहे. आणि नुसतें तुरुंगवॉरंट देऊन त्याला जिल्हा तुरुंगांत व तेथून मुंबईहून सरळ अंदमानाकडे पाठवावा असा माझा विचार होता. पणपूर्वीच्या खटल्यांतला समाईक आरोपी व साक्षीदार बन्या हा आता उलटला असून पूर्वीचे सगळे बनावट प्रकार तो छातीठोकपणें उघडकीला आणणार असें दिसतें.

" ही नवी बनावट सर्व अकल्पित एकदम झाली ती कशी म्हणाल तर मी स्पष्ट सांगतों कीं, हा सर्व कोणी तरी डोकें खाजवून, बुद्धि चालवून, केलेला कट आहे. एरवीं प्रभाकराला दत्तविधानाची बातमी वेळेवर समजावी कशी ? आणि इतकीं वर्षें फरारी होता तो जमिनींतून वर आल्यासारखा आयत्या वेळीं प्रकट व्हावा कसा ? हा सर्व कट त्या नव्या आलेल्या प्रायव्हेट सेक्रेटरीचा आहे. महाराज व तो लहानपणाचे 'लंगोट मित्र' आहेत म्हणतात. त्याच्या आईची म्हणे होती खासगी झाकली खाणावळ! आणि आमचे महारज होते तींत फुकट जेवून उष्टीं काढण्याची नोकरी करीत ! मग वाढप्या जर संस्थानिक झाला तर त्याचा यजमान हा निदान त्याचा प्रायव्हेट सेक्रेटरी तरी झालाच पाहिजे ! उद्या माझ्या जागीं तो दिवाणहि होण्याचा संभव आहे ! पण तूर्त अंतर्खासगीचा मालक खरा. तो महाराजांना हातांतल्या बाहुलीसारखा खेळवतो. पण दुसरी एक चालती-बोलती, खरीखुरी, जिवंत बाहुली या प्रकरणाच्या मुळाशीं आहे. ती म्हणजे प्रभाकर डबीराची बहीण विमलाबाई. तुम्ही मागे आमच्या घरीं मेजवानीला आलां होतां तेव्हा, येवढ्या वयापर्यंत अविवाहित राहिलेले आमचे यजमान व ही घोडनवरी यांचा जोडा आम्ही तोंडानें जमवून दिला होता हें तुम्हाला स्मरतच असेल, पण तेंच आता खरें ठरण्याचा योग दिसतो ! पण महाराज व प्राय. सेक्रेटरीसाहेब दोघेहि तरुण पिढीचे सुधारक वीर ! इंग्लंड-अमेरिकेला जाऊन नव्या कल्पना घेऊन आलेले ! तेव्हा लग्नविधि व एकपतित्व ही चाल वेडगळ, बिलकुल हिंदु व रानटी ! म्हणून विमलाबाईशीं समाईक लग्नाच्या करारानें उभयतांनी राहण्याचें ठरविलें असण्याचाहि संभव आहे ! विमलाबाई वकिलीची परीक्षा पास झाल्या आहेत. त्यांना वकिलीची सनद देऊन महाराजांनी संस्थानांत नवा प्रघात पाडलाच. त्या म्हणे आपल्या भावाचा मुकदमा आरोपीतर्फें चालविणार! मग फक्त एकच गोष्ट उरली. प्रायव्हेट सेक्रेटरीसाहेबांना या मुकदम्यांत सरकारी वकील नेमणें ही. ते डाक्तरी विद्या शिकून आलेले आहेत म्हणतात; पण असें कोणतें काम सरकारी आहे—निदान संस्थानांत तरी—कीं जें कोणताहि मनुष्य करूं शकणार नाही ? किंवा कामावरच नेमलें तर तें करण्याचा आव आणणार नाही ? आपल्या इकडील एका मोठ्या संस्थानांत परदेशाहून जाऊन—शिकून आलेल्या असें नाही हो म्हटलें—साहेबी टोपी घालणाऱ्या इसमांना मोठ्या नोकरीच्या जागा देण्याचें वेड, कसें किती आहे हें प्रसिद्धच आहे. आणि दुसऱ्या एका

मोठ्या संस्थानांत पदवीधर डाक्तर अकाउंटंट जनरलचें काम करीत आहेत! तात्पर्य, डाक्तर मनोहरपंत उक्किडवे प्राय. सेक्रेटरी हे सरकारी वकीलहि कां न व्हावे? मग प्रभाकरावरील खटल्याला कौटुंबिक स्वरूप कसें सुंदर येईल आणि न्याय घरगुती कसा होईल तें पाहालच! एक प्रेमपात्र न्यायाधीश, दुसरें प्रेमपात्र सरकारी वकील, व तिसरें प्रेमपात्र आरोपीचा वकील, आणि राजशालक आरोपी! प्रभाकर ज्या दिवशीं कैदेंतून मोकळा होईल त्या रात्रीं मला नवलपुरांतून पाय काढावा लागेल हें निश्चित आहे. संस्थान व संस्थानिक मरोत वा वाटेल तो गोंधळ घालोत; मला आपल्या प्राणरक्षणापुरतें पाहिलें पाहिजे.

"तेव्हा आता मुद्दा असा कीं, तुमची शिरस्तेदारीची सारी बुद्धि, सारी पुण्याई या अवघड प्रसंगांत माझें रक्षण करण्यास धाव घेणार कीं नाही? पोलिटिकल एजंटसाहेब आहेत आयरिशमन म्हणून लहरी आणि त्यांच्या मडमसाहेब आहेत इंग्रज म्हणून कावेबाज! एजंटसाहेबांच्या मनावर यजमानसाहेबांच्या एक प्रकारच्या दिलदारीचा ग्रह फार चांगला झालेला आहे. आणि मडमसाहेब मजवर अशाकरिता रागावल्या आहेत कीं, कच्च्या मुखत्यारीचा एवढा समारंभ त्यांच्या नवऱ्याच्या हातून झाला त्याचें स्मृतिचिन्ह म्हणून, त्यांचें मन जडलेल्या कोणत्याच वस्तु त्यांना नजर करविण्याची करामत मला साधली नाही! तात्पर्य, सर्वच बाजूंनी दिवाणगिरीची इमारत माझ्या अंगावर कोसळून पडण्याचा रंग दिसतो. एजंटसाहेब बदलून जावयाचे ते जाऊन नवे आले असते, तर अधिक बरें झालें असतें. पण त्यालाहि माशी शिंकली. खटला चालावयाचेंच ठरलें तर स्पेशल न्यायाधीश नेमण्याचा तरी आग्रह धरा; व सरकारची बाजू घेण्याकरिता ज्याच्यावर डोळे मिटून विश्वास टाकावा अशा एखाद्या उत्कर्षेच्छु महत्त्वाकांक्षी भेषपात्र न्यायाधिशाचें नांव आठवून सुचवा. मी आपल्या स्वार्थाने लावून बोलतों असें नव्हे; पण शिरस्तेदार म्हणजेच एजंट असा जो आजवरचा आपला लौकिक आहे तो या वेळीं खरा करून दाखवा. इतकीच संकटांत सांपडलेल्या या दासाची आपल्या चरणाशीं विनंति आहे."

हें पत्र वाचून होत असतां मनोहरला वाटणारें आश्चर्य त्याच्या डोळ्यांत व भिवयांच्या हालचालीवरून सहज दिसून येत होतें, व तें वाचून संपतांच

"कोण हा अधम मनुष्य, नव्हे राक्षस!" असे उद्गार त्याच्या तोंडांतून एकदम बाहेर पडले. नंतर सुभेदारांना उद्देशून तो म्हणाला —

"सुभेदार, तुम्ही हें पत्र कसें मिळविलें?"

त्यावर सुभेदारांनी सर्व हकीकत सांगितली. तेव्हा मनोहरपंत म्हणाले, "ठीकच आहे. मनुष्यें संकटांत सांपडलीं म्हणजे कित्येकांची मति मूढ होते तर कित्येकांची मति स्फूर्ति पावते. तुमचा प्रकार दुसरा दिसतो. असो. आता या पत्राचें तुम्ही काय करणार?"

"जसें आपण सांगाल तसें."

मनोहरपंतांनी क्षणभर विचार केला व म्हणाले, "पत्राचा फोटो घेण्याला अजून चांगला प्रकाश आहे. मी याचा फोटो काढतों. तोंवर तुम्ही बसा" असें म्हणून त्यांनी गच्चीवर जाऊन कॅमेरा उभा केला; पत्र समोर फळ्यावर लावून त्याचा फोटो घेतला, पाठोपाठ कांचेला रसायनाची डूब देऊन त्याची एक प्रतहि काढली. ती सुभेदारांचे हातीं दिली व म्हणाले, "सुभेदार माशाचें पोट चिरून माणिक बाहेर काढायला तुम्हाला सुरी हवी होती ती ही खरीच मिळाली. मात्र प्रातीचा अर्धा वांटा म्हणून अस्सल पत्र मी ठेवून घेतों, आणि फोटोची प्रत तुम्ही ठेवून घ्या. ही प्रत दाखवून धमकी दिलीत कीं, तुमचे पांच हजार रुपये दिवाण-साहेबांच्या पेटींतून उडी मारून बाहेर पडलेच समजा. पत्रांत तुमच्याप्रमाणेच आमच्या संबंधीहि मजकूर आहे तो तुम्ही वाचलाच. तेव्हा हें अस्सल पत्र मी ठेवून घेतों. आणि चला आता दोघे मिळूनच माशाचें पोट चिरावयाला जाऊं."

२१ मेरीचा सुव–र–राज्याला विरोध !

दिवाणसाहेबांनी शिरस्तेदारसाहेबांना पाठविलेल्या पत्राची काय वाट लागली हें पूर्वी सांगून झालें. पण सगळ्याच पत्रांना असे अपघात होत नसतात. कारण महाराज नवलराय यांनी खुद्द पोलिटिकल एजंट (रॉबर्ट मॅक्स्विनी) साहेबांना जें पत्र पाठविलें तें त्यांना नेमकें पोंचलें व त्याचा योग्य तो परिणामहि झाला. हें पत्र खाली लिहिल्याप्रमाणे होतें:—

"सलाम दिगर, माझ्या संस्थानांत एक जुनें प्रकरण नव्या रूपाने पुढे आलें आहे. त्याला राजद्रोह आणि खुनाच्या कटाचा प्रयत्न असें सजोड

स्वरूप आहे. सुमारें १२ वर्षांपूर्वी माझे दत्तक वडील यांचे कारकीर्दींत हें प्रकरण उद्भवलें. हल्लींचे दिवाणसाहेब हेच त्या वेळीं दिवाणपदावर होते. प्रकरण थोडक्यांत असें होतें कीं, माझ्या राजधानींतील एक तरुण, प्रभाकर डबीर या नांवाचा, याने संस्थानाविरुद्ध राजद्रोही जाहीरनामे लिहून लावले आणि दिवाणसाहेबांच्या खुनाचा कट केला असा त्याजवर आरोप होता. परंतु तो पकडण्याच्या आधी फरारी झाला, आणि त्याच्या एका साथीदाराने आपला गुन्हा कबूल करून कोर्टांत तशी जबानी दिली. तिजवरून न्यायकोर्टानें खटला शाबीत धरून दोघांनाहि बारा वर्षे काळेपाण्याची शिक्षा दिली. पण मुख्य आरोपीच्या गैरहजेरींतच हा खटला चालला यामुळे त्याला समक्ष शिक्षा सांगून काळे पाण्यावर पाठवितां आलें नाही. दुसऱ्या आरोपीला शिक्षा काळेपाण्याची झाली तरी कांहीं काळ त्याला संस्थानाच्या तुरुंगांतच ठेवण्यांत आलें, व पुढे त्याची माफी लिहून घेऊन त्याला सोडून देण्यांत आलें. अशा रीतीनें हें प्रकरण त्या वेळीं संपवून सर्व कागद दप्तरांत दाखल झाले. पण सदर मुख्य आरोपी प्रभाकर डबीर, हा नुकताच आपल्या आपण नवलपुरांत प्रकट झाला. तेव्हा रीतीप्रमाणे वारंट काढून त्याला पकडून हल्लीं कच्च्या कैदेंत ठेवलेला आहे. त्याचा इन्साफ कोणत्या रीतीनें व्हावयाचा हा प्रश्न उपस्थित झालेला असून कायद्याच्या दृष्टीनें तो बराचसा विवादितसा दिसतो. मला स्वतः सेशन जज्जाचा अधिकार आहे, तथापि या खटल्यांत विशेष कारणाकरिता मी न्यायाधीश म्हणून बसूं इच्छीत नाही. तरी आपणाला अशी विनंति आहे कीं, आपण ब्रिटिश मुलखांतील एखादा न्यायाधीश, ज्याची कायद्याचे ज्ञानाबद्दल व निःपक्षपातीपणाबद्दल प्रसिद्धि असेल असा, सरकारची परवानगी घेऊन पाठवावा. त्याला सेशन जज्जाचे अधिकार मी येथील नेमणुकीने देईन. आपण शिफारस कराल तो पगारहि देईन. तसेंच त्याच्याआधी सरकारतर्फे एखादा हुशार वकीलहि पाठवावा. संस्थानांत सरकारी वकील आहे. परंतु या कामीं तो फारसा उपयोगी पडणार नाही. निदान माझ्या सांगीने किंवा भिडेने त्याने कांहीं केलें किंवा कांहीं न केलें असा संशय कोणाला येऊं नये, याकरिता खालसांतील स्वतंत्र वकीलहि मला हवा आहे; तरी या वेळीं न्यायाच्या कामीं हें साहाय्य मला आपण कराल अशी आशा आहे.

“ कच्च्या मुखत्यारीच्या वेळीं ज्या चौकशी वगैरेकरिता मी पक्की मुखत्यारी स्वीकारली नाही, ती आता बहुधा संपली आहे. तरी यापुढे मी आपणाला

लिहितांच आपण पक्क्या मुखत्यारीचा औपचारिक खलिता माझे नांवें पाठवावा. त्या मुखत्यारीचाहि लहानसा समारंभ रीतीप्रमाणे होईल व पूर्वीच्या प्रसंगाप्रमाणे याहि वेळीं आपण येथे येण्याची कृपा कराल अशी मला आशा आहे. आपली जिल्ह्यांतून बदली व्हावयाची होती ती आज इतके दिवस लांबली हाहि एक प्रकारचा योगच दिसतो. म्हणून माझीं वरील कार्यें आपल्या हातून पार पडेपर्यंत आणखीहिं ती मुदत लांबेल अशी आशा मी कां करूं नये ? ”

हें पत्र वाचून एजंटसाहेबांना आश्चर्य वाटलें. एक तर या जुन्या खटल्याची त्याला मुळीच दाद नव्हती. दुसरें असें कीं, स्वतःला सेशन्स जज्जाचा अधिकार असतां तो उपयोगांत न आणतां स्वतंत्र न्यायाधीश व सरकारतर्फे फिर्यादीचें काम चालविणारा वकील यांची मागणी संस्थानिक करतो ही गोष्ट तर विशेष आश्चर्यकारक होती! महाराज नवलराय यांच्यासंबंधाने एजंटसाहेबांचा ग्रह अनुकूल पण सावधगिरीचा होता हें पूर्वीच्या एका प्रकरणांत त्याने सरकारकडे लिहिलेलें पत्र दिलें आहे त्यावरून कळून आलेंच असेल. पण आताच्या या नवलरायाच्या वागणुकीने एजंटसाहेबांचा ग्रह अधिकच अनुकूल झाला. हातीं अधिकार असतां तो न्यायाच्या बुद्धीने न चालविणें यांत सात्त्विक आत्मनियमन उघडच दिसतें. शिवाय एजंटसाहेब हा आयरिशमन असल्यामुळे राजकीय काविळीचा रोग त्याच्या डोळ्याला झालेला नव्हता. त्याला सरळ गोष्टी सरळ दिसत. त्याने, ही सर्व बातमी नवलाची वाटून, आपल्या मडमेला आंतून हाक मारून आणलें, व तिला ही सर्व हकीकत सांगून आमच्या शिरस्तेदारसाहेबांच्या स्वभावाचा आणखी एक मासला तुला दाखवितों, इथेंच कांही वेळ बैस, असें म्हणून शिपाया हातीं निरोप पाठवून त्यांनी शिरस्तेदारांना बोलावून आणलें. तेव्हा त्या दोघांमध्यें खालील आशयाचें संभाषण झालें.

पो. ए.—शिरस्तेदार, नवलपूरच्या महाराजांचें हें पत्र पाहिलेंत काय? यावर तुमचा सल्ला काय आहे ?

शिर.—आपल्या मर्जीला येईल त्याप्रमाणे खुशाल करावें.

पो. ए.—मी तुम्हाला सल्ला विचारला. परवानगी विचारलेली नाही. संस्थानिकाचा हा कांही तरी कपटाचा डाव असावा. एरवी त्याचा अधिकार त्याने चालविण्याला कोणती हरकत ?

शिर.—मलाहि तसेंच वाटतें. कदाचित् स्वतःचें कायद्याचें अज्ञान झाकण्याचा संस्थानिकाचा हा प्रयत्न असेल. तरी सरकारी न्यायाधीश देऊं

नये. म्हणजे यांना कायद्याचें ज्ञान किती अल्प आहे हें कळून येईल व पक्की मुखत्यारी मागतील त्या वेळीं त्या गोष्टीचा विचार करण्यास बरें पडेल.

पो. ए.—पण तुम्हाला असें नाही का वाटत कीं, हातीं अधिकार असतां तो न चालविणारा असा हा बहुधा पहिलाच संस्थानिक असावा ?

शिर.—तेंहि खरेंच आहे. उलट नसलेले अधिकार गाजवून त्याचें पुढे काय करावें अशी अडचण सरकारला उत्पन्न करणारे संस्थानिक पुष्कळच आहेत !

पो. ए.—हातचा अधिकार न चालविणें हें तुम्ही कशाचें लक्षण समजतां?

शिर.—भ्याडपणाचें, अज्ञानाचें किंवा कपटाचें !

पो. ए.—केवळ न्यायबुद्धीच्या विशेष प्रेमामुळे अशी गोष्ट होणारच नाही असें तुम्हाला वाटतें ?

शिर.—संस्थानें व न्यायबुद्धि या दोन गोष्टी कोणी कधी एकत्र पाहिल्या किंवा ऐकल्या आहेत काय ?

पो. ए. —पण काय हो, जर हा खटला स्वतः चालविण्याला संस्थानिक नाखूष असले, तर सेशन जज्जाचा अधिकार दिवाणसाहेबांनाच देण्याला काय हरकत ? त्यांना कायदा चांगला कळतो.

शिर.—होय, ही योजना फार चांगली होईल.

पो. ए.—आणि ते न्यायाचें कामहि चांगलें करतील ?

शिर.—यांत काय संशय !

पो. ए.—पण त्यांच्या हातून झालें तरी न्याय कसा होणार ? संस्थानें व न्याय यांची जोडी कधीच जमत नाही असें तुम्ही नुकतेंच म्हणाला ना ?

शिरस्तेदारानी तोंडांतल्या तोंडांत आपली जीभ चावली. पण म्हणाले, "हां, असें तर खरेंच ! पण मी बोललों तें संस्थानांतल्या संस्थानिकासंबंधाने.

पो. ए.—मग संस्थानांतले संस्थानिक तेवढे वाईट आणि दिवाण तेवढे चांगले असतात असें का तुमचें म्हणणें ?

शिर.—हो, माणसावर कोठेहि थोडेंसें अवलंबून असतेंच.

पो. ए.—म्हणजे दिवाण हीं माणसें आणि संस्थानिक हे कोण ? नवलपूरच्या हल्लीच्या संस्थानिकांच्या हातून अन्याय झाल्याचा बोभाटा आपणाकडे कधी आल्याचें तुम्हाला स्मरतें काय ?

शिर.—संस्थानची प्रजाच भित्री असते. तिच्या हातून वरपर्यंत बोभाटा कसला पोंचविला जातो ? ते असेच अन्यायांत खितपत राहावयाचे.

हें उत्तर ऐकून एजंटसाहेब मोठ्याने हसले, व त्यांनी आपल्या टेबलाच्या उजव्या खणाचें कुलूप काढून त्याच्यावर 'गुप्त माहितीकरिता' अशी चिठी चिकटवली होती ती फाईल काढून शिरस्तेदारांचे हातीं दिली, आणि त्यांना म्हणाले, "यांत एकजात दिवाणसाहेबांविरुद्ध सर्व तऱ्हेच्या आरोपांचे नवलपूरच्या प्रजेकडून आलेले पंचवीस अर्ज आहेत. त्यांचें काय करावयाचें ?"

फिरून शिरस्तेदारसाहेबांना तोंडांत जीभ चावावी लागली. पण ते म्हणाले, "संस्थानी प्रजा, जो दिवाण येतो त्याच्या जाण्याची किंवा मरण्याची, जशी कांही घटका घालून बसलेली असते !"

पो. ए.—पण तुम्ही आता इतक्यांतच संस्थानी प्रजा भित्री असते असें म्हणालां ना ?

फिरून शिरस्तेदारांना जीभ चावावी लागली. पण ते म्हणाले, "संस्थानी प्रजा भित्री काय अन् धीट काय, मूर्ख एवढें खरें; पण दिवाणसाहेब आज दिवाणगिरीवर चौदा वर्षें आहेतच कीं नाही ? ते भले असल्याशिवाय इतकीं वर्षें या कामावर कसे टिकतील ?"

पो. ए.—पण या चौदा वर्षांत पहिलीं दोन वर्षें जुने महाराज सर्व कामांत त्यांचे बडे दोस्त होते; आणि पुढे बारा वर्षें संस्थानच्या गादीवर कोणी राजा म्हणजे धनीच नव्हता. बरें, पण काय हो शिरस्तेदारसाहेब, दिवाणसाहेबांचा व तुमचा स्नेह कसा काय आहे ?

शिर.—आमचा कसचा स्नेह ? संस्थानच्या वार्षिक भेटीला या कचेरीच्या स्वारीबरोबर वर्षातून एखाद दुसरा दिवस नवलपूरला जातो, तितकाच काय तो संबंध.

पो. ए.—पण नवलपूरांत नुकतेंच दत्तक प्रकरण झालें त्यांत दिवाणसाहेबांबरोबर तुमचाहि कांही संबंध आला होता म्हणतात ?

असें म्हणून एजंटसाहेबांनी त्या फाइलींतला शेवटचा अर्ज शिरस्तेदारांना दाखविला. तो पाहून शिरस्तेदारसाहेबांनी मान खाली घातली. तेव्हा एजंटसाहेब म्हणाले, "दिवाणसाहेबांबरोबर तुमचीहि बडतर्फीची पाळी न आली म्हणजे तुम्ही मिळविली असें समजा, मी तर महाराज नवलराय यांनी मागितल्याप्रमाणे यांना स्वतंत्र न्यायाधीश व वकील देतोंच; पण या एकंदर प्रकरणांत काय काय बाहेर निघतें त्याकडेहि माझें लक्ष राहील. तुमचा सल्ला समजला. जा आता" असें म्हणून त्यांनी शिरस्तेदारांना रजा दिली.

हा सर्व प्रकार चालला असतांना साहेबाची मडम (मेरी मॅक्स्विनी), आपण या दोघांचें संभाषण ऐकत नाहीं, आपल्याच कामांत आपलें लक्ष गुंतलें आहे, असा बहाणा करून लोकरींच्या सुताचा चेंडू आणि हस्तींदंती सुया घेऊन पायमोजे विणीत बसली होती. शिरस्तेदार जातांच एजंटसाहेबांनी मडमसाहेबांना हाक मारली; व त्या खुर्ची ओढून घेऊन जवळ येऊन बसल्यावर ते त्यांना म्हणाले, "ऐकलस का मेरी, कसा आमचा शिरस्तेदार बोलत होता राघूसारखा तें!"

मेरी—छे रे, मला कांहीच ऐकूं आलें नाही, रॉबी!

पो. ए.— तर तर! दोन्ही कान उघडे ठेवून शिवाय शरिरांतून आणखी दोन कान उसने घेऊन तूं आमचें सर्व बोलणें ऐकत होतीस हें काय मला माहीत नाही? अन् न ऐकल्याचा बहाणा मात्र खूप केलास!

मेरी—मग तुझ्यासारख्या पोलिटिकल एजंटाची बायको होऊन इतकें साधेंहि कपट करावयाला मी न शिकावें म्हणतोस कीं काय!

पो. ए.—बरें ऐकलेंस तर ऐकलेंस, पण या कामीं तूं सल्ला काय देतेस?

मेरी—मी काय तुझी पगारी शिरस्तेदार आहें वाटतें, सत्तेचा सल्ला विचारायला? तो न जुमानायला? आणि वरती असें बोलून घ्यायला?

पो. ए.—अग, त्याला बोललों तें उगीच नव्हे. अशा माणसाच्या सल्ल्यावर मी अवलंबून राहीन असें वाटतें का तुला? पण नवलपुरांत नुकत्याच घडलेल्या दत्तकप्रकरणांत त्याने दिवाणसाहेबांबरोबर लांच खाल्ली हें त्याला जाणवावयाचें होतें माझ्या मनांत. म्हणूनच बोलावला व त्याची एक नवी गम्मत तुला दाखविली! दिवाणसाहेब कसे आहेत तें तुला माहीतच आहे!

मेरी—त्याचें नांवहि काढूं नको माझ्याजवळ! तो पुरा नादान दिवाण आहे हें मला पक्कें माहीत आहे मागच्या समारंभापासून.

पो. ए.—आता राहिला स्वतः संस्थानिक. त्याच्याबद्दल तुझें मत काय आहे?

मेरी—पण तुझें तर ऐकूं दे मत आधी!

पो. ए.—त्याच्याविषयी माझ्या मनांत फार चांगला ग्रह झाला आहे. तो किती न्यायी व सरळ मनाचा आहे, हें या फौजदारी प्रकरणांत उघड झालें

आहे, आणि लवकरच तो आपल्या प्रजेला स्वराज्याचे हक्क देणार आहे अशी बातमी मला कळली आहे. हिंदुस्थानच्या संस्थानी राजकारणांत स्वराज्याचा हा नवा मनूच अवतरणार, असें म्हटलें पाहिजे नव्हे का?

मेरी तुच्छतेने हसून म्हणाली, "काय म्हटलेंस रॉबी! स्व–राज्य र–र राज्य? होय होय 'सुवर' राज्य खरेंच! मागे मुखत्यारीच्या प्र... नवलपूरला गेलों, तेव्हा आमच्या मोटारीपुढे शहरच्या तोंडाशीं दोन तीन सुवर आले होते ना मरायला! तुझ्या चातुर्यामुळे थोडक्यांत बचावले बिचारे! सुवर–र–र– राज्य म्हणजेहि या संस्थानी प्रजारूपी सुवरांचें मरणच! म्हणून मला वाटतें कीं, या सुवरांना त्या सुवर राज्यापासूनहि तूं तसेंच बचावावेंस!"

पो. ए.—मेरी जें अन्न माणूस खातें त्याचें नांव त्याच्या तोंडाला यावें हें ठीकच आहे. म्हणूनच तूं स्वराज्य शब्दाची अशी थट्टा केलीस! पण मला तर संस्थानी प्रजेला– संस्थानी प्रजेलाचसें काय एकंदर हिंदी प्रजेला– स्वराज्याचे हक्क मिळणें हा देखावा मोठा अद्भुतरम्य वाटतो. स्वातंत्र्य म्हटलें कीं, माझ्या अंतरंगांतून आनंदाच्या लहरी येतात.

मेरी मोठ्याने हसून म्हणाली, "ठीकच आहे. कां न येतील बाबा आनंदाच्या लहरी तुला!"

पो. ए.—असे कां म्हणतेस? मला कांही तरी लावून बोलायचें दिसतें आहे तुझ्या मनांत!

मेरी—तूं पडलास आयर्लंडचा सुपुत्र! तुला ब्रिटिश साम्राज्यविध्वंसक स्वातंत्र्यच स्वप्नांतहि दिसावयाचें! मला तर सुवर राज्याचें नांव ऐकून रागच येतो.

पो. ए.—ठीकच आहे! कां न येईल राग, बाई, तुला!

मेरी—असें कां म्हणतोस? तुलाहि कांही लावून बोलायचें आहे मला असें दिसतें. मग बोल ना!

पो. ए.—अग, स्वातंत्र्याचा तुला राग यायचाच. कारण तूं पडलीस इंग्लंडची सुपुत्री! साम्राज्याच्या तंबूची मेख! साम्राज्याच्या प्रजेला स्वराज्य देण्याची गोष्ट निघाली कीं, तुम्हा अस्सल निळ्या रक्ताच्या इंग्रजांचा प्राण निघतो बाहेर जायला जसा कांही शरीरांतून!

मेरी—कां न निघेल? आम्हा इंग्रजांना साम्राज्य स्थापायला किती

पैसा खर्च करावा लागला आणि किती प्राण खर्ची घालावे लागले आहेत, आहे का ठाऊक ?

पो. ए.—आहे ठाऊक सर्व कांही ! साम्राज्यस्थापनेच्या लढ्यांत इंग्रजापेक्षा आयरिश शिपायांचेच प्राण अधिक खर्ची पडले आहेत, आणि खर्चाचें म्हणशील तर येवढें हिंदुस्थान तुम्हा इंग्रजांनी आपल्या हाताखाली घातलें, त्या उलाढालीचा खर्च सगळा हिंदुस्थानवरच नाहीं का बसविलांत ? ज्याला गोळी घालून मारायचें त्याच्याच हातून त्याला पुरण्याकरिता आधीं खड्डा खणवून घ्यायचा, ही तुम्हा इंग्रजांची साम्राज्यनीति ! तुम्हा इंग्रजांची आणि आम्हा आयरिशांची साम्राज्यांतली कामगिरी कशी झाली तें सांगूं कां मेरी ?

मेरी—सांग ना, रॉबी.

पो. ए.—ऐक तर. "हिंदुस्थानांत झालेल्या जुन्या काळच्या एका युद्धांत एक बळकट किल्ला हल्ला करून घेण्याचा सेनापतीकडून हुकूम झाला. हल्ला करणाऱ्या पलटणींत इंग्रज, स्कॉच व आयरिश अशा तीन कंपन्या होत्या. पैकी आयरिश कंपनीने पुढे होऊन तटाला भोक पाडून आंत प्रवेश केला, तेंव्हा कंपनींतला एकूण एक शिपाई गारद झाला ! पण त्यामुळे स्कॉच कंपनीला आंत प्रवेश मिळून तिने किल्ल्याचें रक्षण करणारे सर्व लोक पकडून कैदी केले. मागाहून इंग्रज कंपनी आंत शिरली. तिच्यांतील शिपायांनी या कैद केलेल्या व मरून पडलेल्या लोकांचे खिसे ना खिसे चाचपून त्यांतला सर्व ऐवज लांबवून त्यांचें ओझें हलकें केलें ! आपल्या जातीचें हें वर्णन ऐकून मेरीने रागावल्याचा बहाणा केला." नवऱ्याच्या तोंडावर हातांतला पंखा मारून त्याची जळती सिगारेट खालीं पाडली !

भांडण तेजाला आलें. पण तें प्रेमळ नवराबायकोचें होतें ! हिंदुस्थानामध्यें नोकरींत ज्यांना जन्म घालवावा लागतो त्या युरोपियन लोकांना, वयाने बरोबरीच्या व सुशिक्षित हौशी गृहिणी स्त्रिया, या भूलोकावरच्या देवदूतांसारख्या वाटतात. उजाड रानांतला तो शाखापल्लवयुक्त आम्रवृक्षच ! एकलकोंडेपणांतला तो नित्य जागता प्रतिध्वनिच ! रिकामपणींच चार गोष्टी काढून चर्चा करायला, हास्यविनोद व करमणूक करायला दोघांनाहि सारखेंच हवें असतें. या गरजेमुळे व प्रेमामुळे एकमेकांना टाकून बोलूनहि न रागवायला तीं दोघें शिकलेलींच असतात. असो. प्रेमकलह चालविण्याच्या उद्देशाने मेरी पुढे म्हणाली,

"आमच्यासारख्या स्थितप्रज्ञ शांत विचारी इंग्रजांच्या हातीं साम्राज्य आलें म्हणून तर तें इतके दिवस टिकलें आहे ! पाऱ्यासारख्या चंचल भावनांच्या तुम्हा आयरिश लोकांच्या हातीं तें असतें, तर केव्हाच सांडून लवंडून गेलें असतें ! पण, रॉबी, तूं आयरिश असलास तरी इंग्रजी साम्राज्याचा, म्हणजे पर्यायाने निळया रक्ताच्या खानदानी कॉन्झरवेटिव्ह इंग्रजांचा पगारी 'नोकर' आहेस हें नीट लक्षांत ठेव.

पो. ए.—माय् डार्लिंग. हें तूं मला असें बजावावयाला का हवें ? तुझ्या अंगच्या पारदर्शक श्वेतवर्णामधून, तुझ्या नसांतून खेळणाऱ्या निळ्या सुंदर रसप्रवाहाला मोहून जाऊन तुझ्याशीं मीं लग्न केलें, तेव्हाच तुझा आणि तुझ्या साम्राज्याचा दास झालों !

मेरी—झालें तर मग, प्रजास्वातंत्र्याची गोष्ट सुद्धा तुला बोलतां कामा नये. त्यांतूनहि हिंदुस्थानांत ! आणि त्यांतूनहि संस्थानी प्रजेबद्दल !

पो. ए.—पण आता ही सुधारलेल्या जगांतली गुलामगिरी आहे ! म्हणजे ईश्वरनियतींत जसें मनुष्याला इच्छास्वातंत्र्य म्हणून कांही असतेंच, त्याप्रमाणे साम्राज्यशाहीच्या धोरणांतच आम्हा सिव्हिल सर्वंटांना आजकाल बुद्धिस्वातंत्र्य मिळालें आहे. हिंदुस्थानच्या लोकांना स्वराज्य देण्याची जी भाषा आज प्रचलित आहे, ती आम्ही सिव्हिल सर्वंटांनी बोलणें, हें साम्राज्य सरकारच्या धोरणाशीं आता विसंगत नाही, आणि विसंगत असलें तरी तें दासधर्माचें उल्लंघन मानलें जात नाही.

मेरी—आहे अजून शुद्धीवर राहून बोलतो आहेस म्हणून बरें ! पण स्वराज्य देण्याची "भाषा बोलण्या"पर्यंतच ती मजल जावयाची आहे हें लक्षांत राहूं दे ! नवलपूरच्या संस्थानिकाने वाटेल तर प्रजेला स्वराज्य देण्याची भाषा बोलावी–खुशाल भाषा बोलावी !

पो. ए.—पण नवलपूरचा संस्थानिक तुझ्या इंग्रज लोकांसारखा कपटी, भोंदू, मानभावी दिसत नाही. तो बोलेल तें खरें करील अशी त्याची वृत्ति दिसते !

मेरी—तसें असेल तर त्याला आळा घालून ताळ्यावर आणणें हें पो.एजंट म्हणून तुझें कर्तव्य नाही काय ? ज्या संस्थानावर आपल्या भावी हिंदी राज्यघटनेच्या सुरक्षिततेची सर्व भिस्त, त्यांत अशी ढिलाई-उदार मतांचा असा गोंधळ–माजूं दिला, कीं संपलेंच ! संस्थानांतलें मोहक स्वराज्याचें चित्र पाहि-

त्यानंतर आमच्या कृपण राज्यावर ब्रिटिश प्रजा कशी संतुष्ट राहील? त्या संस्थानी अंधारला तो बाऊ, त्या जादूच्या कपाटांतल्या तो प्रेताच्या हाडांचा सांगाडा, आहे तसाच जतन करून ठेवला पाहिजे? आज संस्थानें आहेत, म्हणून तुम्हा सिव्हिल सर्वंटांना, सरकारी शिस्तीच्या कोटा-पाटलोणींतले हातपाय पसरायला थोडी तरी मोकळी जागा सांपडते! विलायतेहून बडा पाहुणा आला घरीं पाहुणचार भोगावयाला, तर तो परस्पर भागवून घ्यावयाला सोय आहे. ती घालवून तुम्ही उद्या काय करणार रे? तुमच्या शिकारीची हौस मग कोण पुरवील? बिचारे वाघ अजून संस्थानी जंगलांत अधिक पैदा होतात, आणि संस्थानी प्रजेच्या रक्तावर चांगले पोसले जातात. एखाद्या संस्थानांत जातिवंत जंगल नसलें, तरी शिकारखान्यांतले पाळीव वाघ तरी वेळेवर रानांत तेवढ्यापुरते सोडून देतां येतात! आणि जशी तुम्हा साहेब व्यक्तींची सर्व प्रकारची नड संस्थानिक काढून देतात तशीच साम्राज्यसरकारची! उद्या संस्थानांत स्वराज्य झालें, तर रंगरूटभरती कुठून कराल? तुमचें कर्ज कोण लाखांनी कोटींनी खरेदी करील! कायदे कौन्सिलांत लोकमतावर दडपण टाकून तुमची फत्ते कोण करील? तुमच्या एक दिवसाच्या भेटीकरिता संस्थानिक लाखों रुपये खर्चून मयसभा व इंद्रलोक निर्माण करतात तें मग होईल काय? तुमच्या सत्काराकरिता आजच्यासारखे हत्तीच्या ओझ्याचे पुष्पहार तर राहोतच पण वाळल्या फुलाचें थोडुकहि मिळणार नाही.

पो. ए.—आम्हा पुरुषांच्या हानीचीं उदाहरणें दिलीस मेरी, पण तुम्हा मडमांचीहि तशीच हानि होणारी आहे नाही का? संस्थानांत स्वराज्य अवतरलें, म्हणजे तुझें हें भयप्रद संकटांचें वर्णन पुरे कर! आम्हा सिव्हिल सर्वंटांना निदान आमच्यापैकी कांही थोड्यांना तरी-नवें जग दिसूं लागलें आहे. तुम्हा इंग्रजांचें साम्राज्य चार दिवस अधिक जगायला पाहिजे असेल, तें कोयत्याने कापून किंवा हातोड्याने फुटून जायला नको असेल, तर निदान अंतर्गत स्वराज्यदानासारखा खरा उपाय दुसरा नाही. हिंदुस्थानांतलीं सहा-सातशें संस्थानें बेजबाबदार राज्यपद्धतीने गांजली आहेत! या देशाच्या सुंदर शरीरावर ही जुलमी संस्थानें फोड्यांच्या वणाप्रमाणे खळग्याप्रमाणे वाईट दिसतात. प्रजेला स्वराज्य देऊन तीं सुधारलीं पाहिजेत, आणि ही कुरूपता काढून टाकली पाहिजे!

मेरी— तूं उपमा दिलीस तीच तुला बाधक होते आहे. फोड्यांचे वण व

खळगे कधीं बुजून जाऊं शकतात का वेड्या ? आणि हे कुरूप संस्थानी वण आहेत म्हणून, त्यांच्या तुलनेने, आमच्या खालसांतल्या राजकारभाराची सुरूपता प्रकट होते. काय बिशाद आहे संस्थानिक लोक आमच्या मर्जीविरुद्ध आपल्या प्रजेला स्वराज्य देतील !

पो. ए.—तें काय म्हणून ? त्यांना त्या बाबतींत तहांनी स्वातंत्र्य आहे !

मेरी—कशाला बोलतोस तहाच्या गोष्टी ! तह म्हणजे कागदाचे कपटे ! टेबलावर पडलेलें तें ए. पी. निकलसनचें ताजें पुस्तक 'Scrapes of Paper' हें वाच ! इंग्लंडच्या राणीची झाली बादशाहीण ! पण संस्थानांसंबंधीं Dynasty (राजघराणें) हा शब्द जाऊन त्याचे जागीं Family (कुटुंब) हा शब्द आला ! असेंच बाकी सर्व समज.

असें म्हणून दोघेंहि हसत उठलीं. मेरी म्हणाली, 'जाऊं दे ना ! लोकांचें भांडण भांडून आपणाला काय करावयाचें आहे ? मला आता टेनिस खेळायला क्लबांत जायचें आहे. तेव्हा माझे बूट, माझी शाल, माझी बॅट, आणि माझी स्मेलिंग सॉल्टची बाटली घेऊन चल मजबरोबर ! अजून इंग्रज साम्राज्यशाही नष्ट झाली नाहीं, तोंवर माझ्या आयरिश प्रजाजनाला राबवून तरी घेऊं !'

पोलिटिकल एजंट म्हणाला, "ठीकच आहे. जन्माची चूक जन्मांतच निस्तरावी लागते. घेतों आपलें सामान. चलावें बाईसाहेब, आस्ते कदम !"

२२ न्हाव्याच्या धोकटींतील शकुनवंती !

मनोहरपंताने सुभेदारांना घेऊन एकदम दिवाणसाहेबांचें घर गांठलें. माडीवर दिवाणसाहेब एकटेच बसलेले पाहून, आणि "बरें झालें आपणाला आता एकान्त मिळेल !" असें म्हणून त्याने पहारेवाल्याला हाक मारली. आणि तो त्याला म्हणाला, " दिवाणसाहेब महत्त्वाच्या कामांत आहेत ! आम्ही खाली येईपर्यंत खबरदार कुणाला वर सोडशील तर."

ही शिरजोरी पाहून दिवाणसाहेब रागाने म्हणाले, "काय हो, माझ्या घरीं येऊन माझ्या नोकरांना हुकूम सोडतां याचा काय अर्थ ? मनोहर म्हणाला, "लवकरच अर्थ कळेल. सोक्षमोक्षाच्या प्रसंगीं शिष्टाचार कोण पाळतो ?"

दिवाण-- सोक्षमोक्ष कसला ?

मनो.—तुमच्या कारकीर्दीचा आणि प्रजाजनांच्या दुःखाचा! हं इकडे पाहा, हे सुभेदारसाहेब आपले जिगरदोस्त; त्यांच्याकडून पांच हजार रुपये हरामाचे घेतलेस, ते त्यांचे त्यांना या क्षणीं परत द्या पाहूं?

दिवाण—कोण म्हणतो पांच हजार रुपये घेतले म्हणून?

लगेच मनोहराने फोटोचे कागद पुढे करून दिवाणसाहेबांना दाखविले व म्हणाला, "हे तुमचेच शब्द आणि हें तुमचेंच अक्षर!"

शिरस्तेदारांना आपण लिहिलेलें हें पत्र पाहतांच दिवाणसाहेब काळे ठिक्कर पडले! पंण वेगळी ऐट आणून म्हणाले, "मी व सुभेदार काय तें पाहून घेऊं. त्यांत तुमचा काय संबंध?"

मनो.—माझा संबंध इतकाच कीं, या क्षणीं पांच हजार रुपये परत झाले नाहीत, तर लांचलुचपत केल्याची तुमच्यावरची फौजदारीची सरकारी फिर्याद माझ्या खिशांत आहे; आणि त्याबरोबर महाराजांच्या सहीचें बिनजामिनाचें वॉरंट! हातकड्या पडतील, शोभा होईल!

दिवाणसाहेब गांगरले, स्तंभित झाले. लगेच त्यांनी किल्ली लावून सेफ उघडली आणि पांच हजारांच्या नोटा काढून सुभेदारांच्या हातांत टाकल्या! त्याबरोबर मनोहर म्हणाला, "काय सुभेदार? माशाने गिळलेलें माणिक तुमचें तुम्हाला परत मिळालें कीं नाही?" नंतर दिवाणसाहेबांकडे वळून तो म्हणाला, "आतां दुसरें प्रकरण. या पत्रांत तुम्ही महाराजांची व माझी बद-नामी केली आहे त्याचें काय करणार?"

दिवाण—माझें पत्र खासगी होतें. तें तुम्ही चोरलें व फोडलें. त्यांतील मजकुराने बदनामी झाली तर तिला तुमचे तुम्हीच जबाबदार आहां!

हे शब्द ऐकतांच मनोहराने खिशांतून सहाबारी पिस्तुल काढलें व दर-डावून म्हणाला, "ठीक आहे, अधमपणा करूनच्या करून वर शिरजोरी! दिवाणसाहेब, ऐका तर, मी जबाबदारी कशी पार पाडतों ती. महाराजांच्या अपमानाचा सूड खुनाने केला तरी तें योग्यच होईल. पण महाराज सज्जन आहेत, दयाळु आहेत, म्हणून मी या क्षणीं त्यांना स्मरून हात आवरता घेतों. पण सांगतों त्याप्रमाणे न कराल तर मात्र परिणाम वाईट होईल."

मनोहराचे दरडावणीचे शब्द आणि टेबलावर ठेवलेलें प्रत्यक्ष पिस्तुल पाहून, दिवाणसाहेबांनी नांगी टाकली, व भेदरून जाऊन हात जोडून ते

म्हणाले, "आपण सांगाल तें करीन." मनोहर म्हणाला, "ठीक आहे, महाराजांच्या वतीने माझा तुम्हाला हुकूम आहे तो ऐका. आताच्या आता दिवाणगिरीचा राजीनामा सही करून माझ्या हातांत टाका. आज रात्रीच्या गाडीने अंगावरच्या वस्त्रानिशीं तुम्हाला नवलपूर सोडून मोंगलाईत निघून गेलें पाहिजे. तुमच्या घरांतील सर्व चीजवस्त सरकारजमा झाली आहे. आज रात्रींच घरावर सरकारी पाहरा गुप्त रीतीने बसणार आहे, आणि तुम्ही इकडे तिकडे कांही कराल तर तें टेबलावरचें पिस्तुल आपलें काम करील. तुमच्या बारा वर्षांच्या जुलमी कारभाराचें याच रीतीने प्रायश्चित देण्याचें ठरलें आहे. तुम्हाला घरांतून बाहेर काढीन तेव्हाच मी घरांतून बाहेर पडेन!"

दुसरे दिवशीं, दिवाणसाहेबांच्या घराला मोठें थोरलें कुलूप पडलें आहे, व दारापुढे संगीनीचा पाहरा उभा आहे, हें पाहून नगरचे लोक आश्चर्यचकित झाले! जो तो वाटेल तो तर्क करूं लागला. पण लोकांचे सर्व गैरसमज दूर व्हावे याकरिता, राजीनामा देऊन दिवाणसाहेब फरारी झाल्याची तेवढी बातमी लिहून त्याचीं हस्तपत्रकें मनोहराने गांवभर वांटविलीं.

झाल्या प्रकारचा खुलासा महाराजांजवळ करण्यांत मनोहरला मुळीच श्रम पडले नाहीत. दिवाणसाहेब खटल्याला भिऊन आपखुषीने राजीनामा देऊन फरारी झाले, व स्पेशल प्रॉसिक्यूटर किंवा स्पेशल न्यायाधीश पाठविण्याचें कारण नाही, याविषयीची तार पो. एजंटाकडे ताबडतोब धाडण्यांत आली. दिवाणसाहेबांच्या घरांतील सर्व मिळकत सरकारी कचेरींत नेऊन पक्की जमा करण्यांत आली, आणि प्रभाकराची बंधमुक्तता करण्यांत आली!

महाराज मनोहरला इतकेंच म्हणाले, "मनोहर, तूं अमेरिकेंतील धाडसी प्रकार चांगलेच शिकून आलास म्हणावयाचा?" त्यावर मनोहर इतकेंच म्हणाला, "मनुष्याला अपमानाच्या प्रतिकाराची बुद्धि सर्व कांही शिकविते. त्याला अमेरिकेलाच जावें लागत नाही. झाल्या प्रकारांत कांही अमेरिकन असेल तर तें फक्त माझें 'सहाबारी पिस्तुल'. जसा देव तशी त्याची पूजा आणि त्याला नैवेद्य. माझ्या पिस्तुलांत गोळ्यादेखील भरलेल्या नव्हत्या! पण नुसत्या दहशतीने आपलें काम केलें. केवळ कागद रंगवून व चिताड करून दिवाणसाहेबांना घालवावयाला तुम्हाला सहा महिनेहि पुरले नसते. तें काम मी नुसत्या तोंडच्या फुंकराने दहा मिनिटांत केलें ना?"

विजेच्या दोन तारा जोडल्याबरोबर हाताला धक्का बसतो त्याचप्रमाणे

'दिवाणसाहेब' आणि 'पळून गेले' हे शब्द एकत्र केले असतां कोणत्याहि संस्थानी प्रजाजनाच्या मनाला आश्चर्याचा धक्का बसल्याशिवाय राहणें शक्य नाही. 'दिवाणसाहेब' हा शब्दच अशा दुर्दम संस्कारांनी निगडित होऊन राहिलेला आहे. गादीवरचा राजा अधिकारसंपन्न पण मूर्ख असला तर हा त्याची खुषमस्करी करून प्रजेला छळतो. तो अज्ञान असला तर पो. एजंट-साहेबाची खुषमस्करी करून त्याला व प्रजेला दोघांनाहि छळतो. तो सज्ञान व मुखत्यार असून स्वतंत्र बुद्धीचा असला तर त्याच्या खोट्या चहाड्या सरकार-कडे कळवून मुख्यतः राजाला छळतो आणि हें सर्व करीत असतां स्वतःचा मानमरातब व मोठा पगार यांची चैन चालवितो. सर्वांची सत्ता बळकावणें सोपें पण सर्वांचीं मनें सांभाळून त्यांचें हित करणें व निःस्वार्थी रहाणें कठीण!

नवलपूरचे दिवाणसाहेब हे एखाद्या वृक्षावरच्या समंधासारखे प्रजेला झाले होते! मग, एखाद्या वडा-पिंपळावरचा समंध एखाद्या रात्रीं अवचित निघून गेला, किंवा त्याने गति घेतली, असें गांवच्या लोकांना अनुभवाला आलें तर त्यांना किती आनंद होईल? समंधाने कांही न केलें तरी त्या वृक्षाच्या आस-पासच्या आवारांत फिरकण्याला लोक भितात. त्याला ठरलेला नैवेद्य दिलाच पाहिजे. तें चुकलें कीं तावडींत सांपडेल त्याच्या मानगुटीला तो बसावयाचा! पण नित्य नैवेद्य खाणाऱ्या समंधाने आवारांतील प्रजेचें कोणत्याहि संकटापासून रक्षण केलें, किंवा रोगराई थांबविली, किंवा दरोडा परतविला, असें कोणी ऐकलें आहे काय? तीच गोष्ट संस्थानांतील दिवाणांची!

असो. बारा वर्षांनी संसारांतलीं युगें बदलतात. नवलपुरांत बारा वर्षांपूर्वी प्रभाकर फरारी होऊन जें उदासपणाचें व भीतीचें युग अवतरलें होतें, तें दिवाणसाहेबांच्या फरारीपणाने संपून, त्याच्या जागीं आशा व उल्हास यांचें युग अवतरलें; दिवाणसाहेबांनी आपलें तोंड काळें केल्यामुळे संस्थानच्या लोकांचें तोंड उजळ व प्रसन्न झालें. शेतांतून बुजगावण्याच्या रूपाने ठेवलेलें, पांढरा रंग दिलेलें, काळें मडकें काढून टाकलें म्हणजे पाखरें उडून येऊन जव-ळच्या झाडावर बसतात, भेटी-परतभेटी देतात, निर्भयपणें खाली उतरून उन्हांत बागडतात आणि आनंदाने गाणीं गातात त्याप्रमाणे दिवाणसाहेबांचें अभद्र बुजगावणें नाहीसें झाल्यामुळे प्रजेला आपण फार दिवसांनी एकदम निर्भय झालों असें वाटलें. यांतच नव्या यजमानसाहेबांविषयी वाटणाऱ्या अन-नुभूत प्रेमामुळे उल्हासाची भर पडली. नगरांत नवचैतन्य नांदूं लागलें.

दुसरे दिवशीं नवलपुरांत सगळ्यांच्या तोंडीं तोच विषय! या समंधाला गाडणारा मांत्रिक कोण असावा याविषयीं जो तो आपापल्या बुद्धीप्रमाणे तर्क करूं लागला! कोणी तें श्रेय नवलराय महाराजांना दिलें, कोणी तें प्रभाकराला दिलें. पण उद्या उभा राहणारा प्रभाकराचा खटला, त्यांत होणारी आपली साक्ष व तींत होणारी आपली बेअब्रू, हेंच दिवाणसाहेबांना पळून जाण्याला खरें कारण होतें असाहि कांहीं थोड्या जाणत्या लोकांचा तर्क झाला असल्यास नवल नाहीं.

कसेंही असलें तरी शाळेंत गेलेल्या मुलांना अवचित सुटी मिळावी म्हणजे त्यांचा आनंद दुणावतो, त्याप्रमाणे नवलपूरच्या प्रजेला आनंदाचें भरतें आलें. जीव गुदमरविणारा तोंडावरचा हात एकदम निघावा त्याप्रमाणे हें झालें. साऱ्या प्रजेनें मोकळ्या हवेचा श्वास जोराने आंत घेतला व तिच्या तोंडावर प्रसन्नता आली.

पण सुख हेंहि दुःखाप्रमाणे एकटें कधींच येत नाहीं. बरोबर जिवलग स्नेही-सोबती घेऊन येतें.

राजेसाहेबांनी पक्की मुखत्यारी घेण्याचें ठरविलें. मात्र ही मुखत्यारी जशी एकीकडे सरकारकडून आपणाला घ्यावयाची त्याचप्रमाणे दुसरीकडे ती आपल्या प्रजेला द्यावयाची असा 'पक्की मुखत्यारी' याचा त्यांचा अर्थ होता. राज्याचे सर्व अधिकार प्रजेचे. तिने त्यांतील वाटतील ते आपणाकडे ठेवावे, वाटतील ते संस्थानिकाकडे द्यावे व ते संस्थानिकाने प्रजाप्रतिनिधी म्हणून चालवावे, अशी नवलराय यांची उपपत्ति होती; आणि हा कार्यक्रम कसा पार पाडावयाचा याविषयीं मनोहरचा सल्ला घेण्याकरिता त्याला बोलावणें पाठवून त्याची वाट पाहात महाराज मागच्या गच्चीवर बसले होते.

आज स्वस्थपणामुळे महाराजांना श्मश्रू करवून घेण्याची इच्छा झाली. महाराज नवलराय हे स्वतःची नोकरी होईल तेवढी स्वतःच करावी या मताचे होते. विलायतेहून परत येतांना त्यांनी श्मश्रू करण्याचें सर्व साहित्य विकत आणलें होतें. ते आपल्या हाताने दाढी तर करीतच, पण मागेपुढे आरसे ठेवून पोलादी कैचीने आपले केस आपणच कापीत. अगदीच जरूर पडेल तेव्हा न्हाव्याला बोलावीत. कच्च्या मुखत्यारीपासून तो योग आला नव्हता. पण आज त्यांच्या तळहाताला फोड झाल्यामुळे आपली श्मश्रू आपल्या हाताने करतां येणें त्यांना शक्य नव्हतें. म्हणून त्यांनी न्हाव्याला बोलावणें पाठविलें. तो आला तेव्हा,

संस्थानांतील भावी नियोजित राजकीय सुधारणांच्या गोष्टी मनोहराशीं महाराज बोलत होते. न्हावी आल्याने त्याला खळ पडला. शिवाय नामु न्हावी आज नेहमीहून वेगळा दिसत होता. यामुळे दोघांचेंहि लक्ष त्याच्याकडेच गेलें. प्रत्येक संस्थानिकाच्या नोकरीला तैनातदार न्हावी असतातच. नामु तैनातदारच होता. पण महाराजांच्या कच्च्या मुखत्यारीपूर्वी तो जो साध्या पोशाखाने हजामत करावयास येई तो तसा आज न येतां तैनातदारीचा पोशाख घालून मातबर सरंजाम घेऊन आला होता! पूर्वी त्याची कारागिरीची पेटी साधी होती, पण आज तिजवर जरतारी आच्छादन चढविलें होतें. त्याने पाण्याची वाटी काढली, ती जुनाट पण चांदीची निघाली. महाराजांच्या अंगावर केस न पडण्याकरिता त्याने झगा टाकला तो रेशमी किरमिजी रंगाचा जुनाट होता. आणि त्याने नेहमीच्या एका मुजऱ्याऐवजी आज महाराजांना तीन मुजरे केले!

महाराजांना या गोष्टीचें थोडें नवल वाटलें. म्हणून ते त्याला म्हणाले, 'काय नामूबुवा! आज तुमचें नांव तरी नामूच आहे कीं दुसरें कांही?'

नामू म्हणाला, 'त्ये कस म्हटल सरकार?' नवलराय म्हणाले, "नाही म्हटलें, तुम्ही आज हजामतीचा सरंजाम आणला तो सगळा नवाच दिसतो, म्हणून विचारलें."

नामू म्हणाला, "सरकार, सरंजाम नवा त्योच जुना. त्येची आज तिसरी पिढी तरी असल बघा. अन् नाव बदलायच म्हणाला तर त्येच अस. येवढी राज्याची मुखत्यारी दिली आपणाला साहेबान, पण म्हाराजांचं नांव दुसरं न्हाइ ठेवल? मग मज गरीबाच नांव दुसर कोण ठेवणार? म्हंजी जुन्यां तैनातीची नोकरी करणारच! जसं आपल राज्य अखंड तशीच माझी तैनात! डोईबदल कोणाचा बी होवो, यजमानाचा न्हाई तर तैनातदाराचा, राज्य ते राज्य अन् तैनात ती तैनात!"

नवलराय म्हणाले, "पण तुम्ही आणलेला हजामतीचा सरंजाम नवा दिसला म्हणून विचारलें."

नामू—न्हाइ सरकार. आज त्यो आणला म्हून नवा, पण त्यो जुनाच हाय. ह्ये सायमान या गादीच्या जुन्या महाराजांच्या येळी व्हत त्ये म्या तसच जतन करून ठयेवल व्हत सरकार तवापासून. आपणाला नुस्त गादीवर बसवल तवाची मी त्ये नाही बाहेर काढल आपल्या हजामतीला. पण

आपणाला कधी मुखत्यारी मिळाली नव्ह, तवापासून आज सरकारांनी पाह्‌यानदाच मला गादीच्याला हटकल हजामत कराया. आपणास्नी मुखत्यारी मिळाली तवा आता त्ये जुन सामान काढाया व्हावे.”

नव.—अरे मग तुझे वस्तारेहि असतील तेच जुने! पण ते गंजले बिंजलेले नाहीत ना? नाही तर माझी हनुवटी खरवडून रक्त काढशील. माझ्या मुखत्यारीच्या समारंभांत तोंडाला गुलाल लागला नव्हता तो आज रक्ताच्या रूपाने लागावयाचा!

नामू—अस कस व्हइल सरकार? मी ह्ये जुन वस्तार काढून मधून मधून त्येंना धार लावून त्येल चोपडून ठेवीत व्हतोना, आपल्या मुखत्यारीची वाट बघत!

नव.—पण काय हो नामुबुवा! वस्तऱ्याचें पातें धार लावून लावून केव्हा तरी झिजून जात असेल ना सगळेच्या सगळें?

नामू—हां सरकार. त्ये एक झिजल कंजी फेकून घेतों उकिरड्यावर, अन् नव पात इकत घेऊन बसवतों—पण जुन्याच मुठींत.

नव. - म्हणजे तैनातदार बाप न्हावी जाऊन मुलगा हजामत करायला लागला तर जुनी तैनातदार मूठ कायमच, असेंच ना?

नामू हसून म्हणाला, “व्हय सरकार, माझ्या बासारखा अन् माझ्यासारखा आमचा वस्ताराबी हयेच ना तैनातदार! संस्थानचा गादीचा नोकर! अन् आमच्या घराण्याचा देव! वहातो ना मी त्येच्यावर गंध-फूल दसऱ्याच्या दिवशीं.

नव.—पण वस्तऱ्याच्या एका पात्यांतून दुसरें पातें कांहीं निघत नाहीं आपोआपच. म्हणून दत्तक घेऊन बसवावें लागतें म्हणावयाचें बाहेरचें, तेंहि निपुत्रिक राजाच्या दत्तकासारखें, आणि नामुबुवा, स्वतः तुमच्या तैनातदार न्हाव्याच्या घराण्यांतहि असाच दत्तक घ्यावा लागत असेल नाहीं केव्हा केव्हा औरस मुलगा नसला म्हणजे?

नामू—छेः सरकार, गरीबांना पोटच्या पोरांना न्हाई पडत तोटा. गरीबालाच खंडीभर लेकरं. देवाच्या घरीं न्यायच हाये तसा सरकार. त्यो अस ना अस देतोच ज्याला त्याला. शिरीमंताची गोष्ट न्यारी सरकार! त्ये दत्तक बित्तक त्येनाच घ्यावे लागतात. अन् त्येबी रास्तच हाय सरकार. नवलराय कौतुकाने हसून म्हणाले, तें कस कस सांगा पाहूं, नामूबुवा!

नामू—म्हंजे त्ये अस बघा, सरकार, शिरिमंतांना सदाच पोटचीं पोरं होत गेलीं तर मग त्येंची श्रीमंती सदा त्येंच्या घराण्यांत न्हाती नव्ह ! मग तीं गरीबांना कधी बी न्हाई मिळायची. म्हनूनशेनी शिरिमंतांना देव पोटचीं पोरं न्हाईं द्येत बिनखोट. तवा चट्ट घ्येत्यात गरीबाची मुलं दत्तक. 'परक्याचं पोर आलं भरी, पण घर तर न्हायल घरच्या घरीं' अस म्हणतात नां सरकार ?

नामू न्हावी अशा रीतीने हजामत करतां करतां दत्तकमीमांसाहि करीत होता. पण त्या भोळ्याच्या लक्षांत हें आलें नाही कीं, ज्याची हजामत आपण करतों आहों तो आपला नवा धनीदेखील असाच, म्हणजे गरीब परक्याचा पोर ! संस्थानच्या 'भरी' येऊन फुकट्या श्रीमंतीचा मालक झाला आहे ! पण ही मीमांसा करतांना गरीबाचा उणेपणा काढण्यापेक्षा देवाच्या न्यायबुद्धीचें कौतुक करण्याचाच नामू न्हाव्याचा खरा इरादा होता. जगांत, निदान हिंदु समाजांत, श्रीमंतगरीबांत संपत्तीची यथान्याय वांटणी विभागणी, एकाच कुळांत का होईना, होण्याचा एक मार्ग दत्तक संस्था होऊं शकते, हा अर्थशास्त्रीय सिद्धान्त अडाणी नामू न्हावी न जाणता प्रतिपादीत होता.

असो. हजामत करतांना न्हावी हे गोष्टीवेल्हाळ होतात हा सगळ्या देशांतला अनुभव आहे; पण सगळ्या देशांतल्या लोकांचा असाहि अनुभव आहे कीं, हजामत होत असतां वर्तमानपत्रें वाचण्यापेक्षा हजामाशीं गप्पा मारण्यांत, त्यांच्या गप्पा ऐकण्यांत, अधिक करमणूक असते. अरेबियन नाइटमधील एक न्हावी हजामत मध्येंच थांबवून आपलें यंत्र उभें करून सूर्याचा वेध घेत असे हें, वाचक हो, तुम्ही वाचलेंच असेल. बिचारा नामू न्हावी इतका शास्त्रकोविद किंवा आंबटशोकी नव्हता. पण न कळतां तत्त्वज्ञानी होता खरा. नामू न्हाव्याचा गोष्टीवेल्हाळपणा पाहून त्याला बोलायला लावलें तर तो वाटेल तें सांगेल, बोलेल, असें दिसल्यावरून मनोहर नवलरायला हळूच इंग्रजींत म्हणाला—

"अरे, त्याला जुन्या कारकीर्दींतल्या बऱ्याच गमती माहीत असतील. विचारना कांही." तेव्हा नवलरायांनी नामू न्हाव्याला विचारण्याचें ठरविलें.

महाराज म्हणाले, "नामूबुवा, तुम्ही आमच्या वडिलाचे मोठे आवडते न्हावी होता म्हणे."

नामू—त्ये म्यां काय सांगावं सरकार आपल्या तोंडानं ? महाराजांनींच

काय पण दिवाणसाहेबांनीहि एक दिवस बी माझ्याशिवाय कुणा दुसऱ्याकडून हजामत करून घेतली नाही. आपल्या हातानं आपली हजामत करून शिरिमंतांनी गरीब न्हाव्यांच्या पोटावर पाय आणण्याचे वंगाळ दिस अलीकडच आल सरकार.

नामू बोलला सगळ्या नव्या युगाला उद्देशून. पण तें अप्रत्यक्ष लागत होतें नवलराय व मनोहर या दोघांनाहि. हें जाणून थट्टेच्या स्वराने मनोहर म्हणाला, "अहो नामूबुवा! नव्या सुधारल्या श्रीमंतांनी आपली हजामत आपल्या हाताने केली तरी तुमच्या तैनातीची रक्कम तर कांही कमी होत नाही? जुन्या काळचे यजमान तीच तैनात देऊन रोज तुम्हाला राबवीत होते ना? नुसती हजामतच नव्हे तर अंगभर मालीस करवून? आणि फिरून राजाच्या न्हाव्याने इतर लोकांची हजामत करावयाची नाही असाहि निर्बंध होता! तुम्ही आता मोकळ्या वेळांत वाटेल त्याच्या हजामती करावयाला सलून उघडा, म्हणजे तैनात राहून वर आणखी मिळकत होईल. आणि आमचे महाराजहि इतक्या थोर मनाचे आहेत कीं, राजा व प्रजा हा भेद करण्याची त्यांची इच्छा नाही. तुम्ही सलून काढून खासगी हजामती करण्याला आमचे महाराज तुम्हाला बंदी करणार नाहीत. एकच वस्तारा राजाच्या व प्रजेच्या डोक्यावरून फिरला म्हणजे राजा व प्रजा यांच्यांत खरी समता आली, असेंहि आमचे महाराज म्हणतील! पण तुम्हा तैनातदार न्हाव्याचा तैनाती वस्तारा राजघराण्याच्या डोक्यावर तेवढा फिरावयाचा असें तुम्हीच बंधन घालणार म्हणून इलाज नाही!" मनोहर हें जें बोलला त्याचें मर्म नामू न्हाव्याला कळण्यासारखें नव्हतें.

असो. नामू न्हाव्याला गोष्टीवेल्हाळ बनविल्यावर त्याने जुन्या राजवटींतल्या अनुभवाच्या गोष्टी सांगितल्या. त्या ऐकून नवलराय व मनोहर दोघेहि खूप हसत होते. नामू न्हावी भोळा होता. आपण गोष्टी सांगतों यांत जुने महाराज, दिवाणसाहेब व त्यांचा परिवार, त्यांचीं अमानुष कृत्यें, त्यांचीं व्यसनें, यासंबंधीं कांही कांही गुप्त गोष्टींचा सुगावा आपण न कळत कसा लावून देत आहों हें त्याच्या लक्षांत येत नव्हतें. आपण बोलतों त्यांत इतरांचा कमीपणा नसून आपली तेवढी प्रौढी आहे अशा भावनेने तो बोलत होता. पण ऐकणारे अधिक मर्मज्ञ होते. कांही वेळाने या गोष्टी पुऱ्या झाल्यावर नामू न्हाव्याने हजामतीकरिता मांडलेल्या सगळ्या वस्तू जेथल्या तेथे परत ठेवल्या. श्रीमंतांच्या घरच्या उपाध्यांना होमहवन पुण्याहवाचन वगैरे प्रसंगीं मांडामांड करण्याची जितकी याता-

यात पडते, तितकी संस्थानिकांची हजामत करण्याच्या प्रसंगीं त्यांच्या न्हाव्यांनाहि पडते.

नामू न्हावी आपली धोकटी घेऊन तीन मुजरे करून खाली निघून गेल्यावर हातरुमालाने अंगावर पडलेले केस झटकून काढीत असतां महाराज म्हणाले, "मनोहर, पाहिलास का माझ्या संस्थानांतला दरबारी न्हावी कसा आहे तो ? इतिहास, अर्थशास्त्र, सगळें कांही त्याला येतें.

मनो.—मग त्याला आपला दिवाण नेमायचा विचार करा ना ? जुने दिवाणसाहेब नुकतेच जाऊन जागा आयती मोकळीच झाली आहे, आणि दिवाण नाही तरी निदान माझ्या जागीं प्रायव्हेट सेक्रेटरी ! "

मनोहरच्या विनोदमिश्रित गंभीरपणाचीच ऐट आणून महाराज म्हणाले, " हां, दिवाण कांही नाही म्हणा, पण कदाचित् प्रायव्हेट सेक्रेटरी नेमण्याला हरकत नाही ? "

मनो.—ती कशी ?

नव.—ती अशी. तूं माझा प्रायव्हेट सेक्रेटरी झाल्यापासून माझीं विक्षिप्तपणाचीं म्हणून जीं मतें तुला वाटतात त्यावर टीका करण्याच्या रूपाने तूं माझी उलटीसुलटी हजामतच चालविली आहेस कीं नाही ? फरक असेल तर इतकाच कीं, तूं माझ्या डोक्याच्या आंतल्या अंगाची हजामत करतोस. ती तो डोक्याच्या बाहेरच्या अंगाची करतो.

मनो.—अस्सें, मघाशीं बोलतांना तुमच्या समतेच्या वेडावर टीका केली त्याकरिता मला हजाम बनवून बदला घेतलात असें दिसतें ! पण खरेंच सांगतों, नामू न्हाव्याच्या वस्तारा-पुराणाने तुमच्या वरच्या माझ्या अलीकडच्या टीकेचें समर्थनच झालें.

नव.—राहूंद्या म्हटलं त्या गप्पा ! मला नामू न्हाव्याच्या धोकटींत राजकारणांतली शकुनवंतीच मिळाली.

मनो.—ती कशी ?

नव.—वस्ताऱ्याचें पातें झिजून गेलें म्हणजे तें फेकून देऊन नवें घ्यावें लागतें, असें नाही का नामू म्हणाला ? झालें तर. संस्थानी राज्यकारभाराची पद्धत जुनी निरुपयोगी झाली म्हणजे, तीहि तशीच फेकून देऊन तिच्या जागीं नवी अमलांत आणली पाहिजे, असें मी जें तुला नेहमी म्हणतों तेंच नामू न्हाव्याने सांगितलें.

मनो.—पण तुमच्याप्रमाणे मलाहि त्या न्हाव्याच्या धोकटींतल्या शकुनवंतीनें माझ्या प्रश्नाचें उत्तर मिळालें.

नव.—तें कसें ?

मनो.—राज्यपद्धति बदलवयाची म्हणजे राजपदाचा नायनाट करावयाला हवा असें तुम्ही म्हणतां; पण राजपदाला कायम ठेवावें आणि फक्त कारभार सुधारावा असें मी म्हणतों नव्हे का ? नामू न्हावी वस्ताऱ्याचें पातें बदलतो पण मूठ कायम ठेवतो, असें म्हणाला तें ऐकलेंत ना ? झालें तर, राजपद ही तैनातदार राजनापिताच्या वस्ताऱ्याची मूठ, आणि कारभाराची पद्धति किंवा व्यक्तिशः कारभारी हीं त्या मुठींत बसविण्याचीं पातीं.

याप्रमाणे त्या दोघांचें बराच वेळ उलटसुलट बोलणें झाल्यावर असें ठरविण्यांत आलें कीं, स्वराज्यदानाच्या हेतूला उद्देशून महाराजांनी एक जाहीरनामा प्रसिद्ध करावा. त्यानंतर प्रजाप्रतिनिधींची सभा भरवून सर्वांचें म्हणणें व सूचना ऐकून घ्याव्या आणि शेंवटीं महाराजांनी नव्या राज्यघटनेची योजना निश्चित करून ती अमलांत आणावी.

मनोहर अमेरिकेंतील लोकशाहीचा कारभार पाहून विटून आला होता. नवलराय संस्थानिकांचीं चरित्रें पाहून व ऐकून विटला होता. तथापि प्रजेचें हित व्हावें अशीच दोघांनाहि खरी इच्छा असल्यामुळे आपण तो हेतु सिद्धीस जाण्यासारखीच कांही तरी योजना तयार करूं असा दोघांनाहि विश्वास वाटत होता.

२३ नवलरायाचा नवलकारक जाहीरनामा

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणे मनाशीं योजना ठरवून महाराज नवलराय यांनी जाहीरनामा प्रसिद्ध केला तो खालीलप्रमाणे होता.

"परम प्रिय नागरिक प्रजाजनबंधु यांस—

"तुम्हाला माहीत आहेच कीं, कांही दिवसांपूर्वी ब्रिटिश सरकारने मला मुखत्यारी दिली. ती घेतांना मीं होऊनच या मुखत्यारीचें वर्णन 'कच्ची' या शब्दाने केलें होतें. हल्ली मीं 'पक्की' मुखत्यारी घेण्याचा विचार केला आहे. पण ती मला साम्राज्य-सरकाराकडून मिळवायची नाही; तर माझ्या राज्यां-

तल्या जनतेकडूनच मिळावयाची आहे. या राज्याचा जो खरा धनी तोच ती मुखत्यारी मला देऊं शकेल. त्यांत साम्राज्य-सरकारचा कांही संबंध येऊं शकत नाही आणि मी राज्यांतील जनतेकडून ती मागावी या गोष्टीला सरकारची कांही हरकत नाही असें पोलिटिकल एजंटसाहेबांकडून लिहूनहि आलें आहे.

" ज्या मूळ संपादकाने हें राज्य मिळविलें, त्याने तें कोणताहि पराक्रम करून मिळविलेलें नव्हतें. तर आपणाहून वरिष्ठ अशा तत्कालीन राजांची खुषमस्करी करून व त्यांच्या व्यसनांत सामील होऊन व मदत करून! ती व्यसनपरंपरा गत महाराजांपर्यंत अखंड चालू होती आणि गेल्या सात पिढ्यांत या राज्यांतील किती घराण्यांतील स्त्रियांची अब्रू राजपुरुषांकडून मलीन केली गेली असेल, हें मनांत आणतांना मला पराकाष्ठेचें दुःख होतें. मी अज्ञानदशेंत असतांना, केवळ एक सगोत्र म्हणून, मला गादीवर बसविण्यांत आलें. त्यांत दत्तविधानाचा कांही एक संबंध नव्हता. कारण माझे जनक आईबाप दोघेंहि मृत असल्यामुळें मला कायदेशीर दत्तक देण्यास कोणीच नव्हता. झालें तें दत्तविधान केवळ औपचारिक होतें. पण अज्ञानदशेंतील इतरांची चूक आता सज्ञान झाल्यावर दुरुस्त करण्याचें मीं मनांत आणलें आहे. ही दुरुस्ती करावयाची म्हणजे, सर्व राजसत्ता जनतेला अर्पण करून, ती मला जे अधिकार आपल्या इच्छेने देईल तेच तेवढे स्वीकारणें हें होय.

" जुन्या काळीं राज्य हें देवाब्राह्मणांचें असें म्हणण्याची रीत होती. त्याचा खरा अर्थ न लक्षांत घेतल्याने अनेक विपरीत सिद्धान्त निर्माण झाले. ' राज्य देवाचें ' हें खरें; पण या अर्थानें कीं, त्याची उत्पत्ति, स्थिति व लय हीं तीनहि देवाधीन अशीं मानावीं. राजाने सुविनीत राहावें आणि राज्याच्या उत्पन्नांतला यथान्याय कांही अंश धर्मतत्त्वें व नीति यांच्या रक्षणाकडे व शिक्षणाकडे नियमितपणे खर्च करीत जावा. ' राज्य ब्राह्मणांचें ' याचा अर्थ इतकाच कीं, राज्यांतले निःस्वार्थी व ज्ञानी लोक यांची सल्लामसलत घेऊन राजाने आपला राज्यकारभार करावा. या खऱ्या अर्थानेच मीहि हें राज्य देवाब्राह्मणांचें आहे असें समजतों.

" राज्य देवाचें म्हटलें तरी, तो कांही त्याचा प्रत्यक्ष उपभोग घेत नाही. साधा नैवेद्यसुद्धा जो देव आपला आपण खात नाही तो राज्य कसें घेणार व भोगणार? नैवेद्य देवाचा पण उपभोग भक्तांचा! देवाला मधाचा

अभिषेक केला तर आपल्याच तोंडांत पडणारें तीर्थ गोड होतें! देवाला वाहिलेल्या फुलांचा वास देव घेत नाहीं तो आपणच घेतों! त्याच रीतीने देवाचें म्हणून देवाला राज्य वाहिलें तर त्याचा उपभोग जनताच घेणार. ब्राह्मणांचें राज्य म्हटलें तरी तेंच. आधी ब्राह्मणाला देण्याचीं दानें म्हणून धर्मग्रंथांत सांगितलीं आहेत. त्यांत राज्य हें सांगितलेलें नाही आणि असलें दान देणारानें दिलें तर तें दान घेणाऱ्या ब्राह्मणाला पाप लागावयाचें! शिवाजीमहाराजांनी राज्याची सनद रामदासांच्या झोळींत टाकली व रामदासांनी प्रसाद म्हणून तीच सनद परत शिवाजीच्या हातांत दिली! देवाब्राह्मणांचें राज्य हें राज्यांतल्या प्रजेनेच उपभोगावयाचें आहे. तो उपभोग तिला मिळेल याविषयी जो जामीन त्याचें नांव राजा.

"राजधर्म व प्रजाधर्म यांचें समीकरण अबाधित आहे. पण आजवर या राज्यांत प्रजाधर्म याचा अर्थ प्रजेने एकांतिक राजनिष्ठा ठेवावी आणि राजधर्म याचा अर्थ राजाने स्वतःला ईश्वराचा प्रतिनिधि समजून स्वेच्छेनें अनियंत्रित अधिकाराने राज्यसुख भोगावें असा केला जात असे. तो अर्थ आजपासून मी बदलणार.

"स्वतः मीं संस्थानाच्या राजघराण्याच्या कुलगोत्रांत जन्मलों याहून संस्थानाचा राजा होण्याला मला अधिक हक्क पोंचत नाही. माझे आईबाप अत्यंत धर्मनिष्ठ व सच्छील होते. त्यांनी अत्यंत गरीब स्थितींत पण मोठ्या अब्रूने जन्म घालविला. त्यांचा वारस म्हणून मी त्यांच्या गुणांच्या बरोबर त्यांच्या निर्धनतेचाहि स्वीकार केला पाहिजे. म्हणून यापुढे राज्यांतील जनता जो खर्च आपल्या इच्छेने मला तोडून देईल, त्यांत मी समाधान मानीन; आणि माझ्या बुद्धियोगाला योग्य असें राज्यकारभाराचें काम करून त्याचा मोबदला देऊन त्यांचा अनृणी होईन.

"म्हणून माझी जनतेला या जाहीरनाम्याच्या द्वारें अशी प्रार्थना आहे कीं, मी एक दरबार भरविणार आहें, त्यांत हजर राहण्याकरिता जनतेने आपल्या पसंतीचे प्रतिनिधि निश्चित करून, त्यांच्या द्वारें माझ्या मुखत्यारीचीं कलमें काय तीं मला कळविण्यांत यावीं, म्हणजे त्याप्रमाणे यापुढे मी कारभार करीन."

* * *

हा जाहीरनामा सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखा होता असें अलंकारिक भाषेने

तर म्हणतां येईलच; पण महाराजांच्या आज्ञेवरून खरोखरच तो सोनेरी शाई-नेच छापून वाटण्यांत आला होता.

हा अपूर्व जाहीरनामा वाचून प्रजाजनांना फारच विस्मय वाटला. स्वराज्य काय व कसें हवें तें सुचविण्याचें, इतकेंच नव्हे तर तें प्रत्यक्ष स्वाधीन करून घेण्याच्या तयारीचें, निमंत्रण प्रजेला खुद्द राजाकडून !

श्रीगुरुचरित्रांत असें सांगितलें आहे कीं, दत्तमहाराजांच्या कृपेने एका साठ वर्षांच्या वृद्ध स्त्रीला गर्भ राहिला ! बिचारी मोठ्या घोटाळ्यांत पडली. तिने गर्भिणीचें चरित्र इतर स्त्रियांसंबंधाने पाहिलें होतें. तथापि आपण स्वतः गर्भवतीच आहों, किंवा कांही रोग आपणाला झाला आहे, हें तिला नीट कळेना. इतर कोणा मैत्रिणींना विचारण्याची तिला लाज वाटूं लागली. कारण त्यांनी सल्ला देण्याचें बाजूलाच राहील, पण आधी त्यांच्यापैकी कोणी थट्टा करूनच जीव खातील, तर कोणी म्हातारी कपटाने ढोंग करते असें म्हणून निंदा करूं लागतील ही भीति ! साठ वर्षांचें वय झालें, म्हणून स्त्रीचा पुत्रवती होण्याचा जन्मसिद्ध हक्क कसा जातो ? पण कोणतीहि चांगलीदेखील गोष्ट होण्याला योग्य उचित असा कांही काळ असतो. तो निघून गेल्यावर अवेळीं ती गोष्ट घडली म्हणजे तिचें कौतुक होण्यापेक्षा थट्टा होण्याचाच संभव अधिक. 'म्हातारी'ला डोहाळे लागून ओकारी सुरू झाली, तर तिला औषधपाणी देतांना तिने पोटावर घड्याबिडया घातल्या आहेत कीं काय, हें मैत्रिणी सहज हळूच चाचपून पाहावयाच्या !

नवलपूरच्या महाराजांनी प्रसिद्ध केलेला जाहीरनामा वाचून कांही सरळ वृत्तीच्या ध्येयवादी लोकांना फार आनंद झाला. पण सर्वांचेंच मन असें नसतें. संशयी लोकांना पहिली शंका ही आली कीं, महाराजांच्या मनांत प्रजेला खरोखरच स्वराज्यदान करावयाचें आहे, कीं त्यांनी प्रजेची ही थट्टा आरंभली आहे ? आणि दुसरी शंका अशी कीं, प्रजेला स्वराज्य हवें असें महाराजांनी जें गृहीत धरलेलें दिसतें तें तरी कशावरून? म्हणून रस्त्यावरून कोणी कोणाला भेटला, कीं खालील प्रकारचे उलटसुलट उद्गार संभाषणांतून ऐकूं येऊं लागले.

म्हणे प्रजेला स्वराज्य देणार ! उद्या सकाळीं सूर्य उगवतो का हे दिसायला पश्चिमेकडे तोंड करा !

न घडणारी गोष्ट खरी; पण ती कधी घडूंच नये असें तरी काय म्हणून मानावें ?

का हो! स्वराज्याचा दगड स्वाधीन करून घ्यायला केळींच्या पानाच्या पिशव्या झाल्या का शिवून तयार ?

केळीच्या पिशव्या काय म्हणून, लोखंडी पेट्या तयार आहेत. स्वराज्य आलें कीं, एकदम सेफमध्यें दाखल. मग कोण हिसकावून घेतो पाहूं.

किती धुतलें तरी गाढवाचें घोडें होऊं शकेल काय? अहो, प्रजा ती प्रजा आणि राजा तो राजा.

काय सांगतां! विनायक आणि वानर हे मुळांत मळलेल्या शाडूच्या एकाच ढिगांतले दोन गोळे! त्यांतलें हवें तें एक चित्र गरजेप्रमाणें मोडून त्यांतूनच दुसरें करतां येतें.

स्वराज्याचे अधिकार राजा एक वेळ देईल पण ते बजावावयाला प्रजेंत ज्ञान, निःस्वार्थी उद्योग व उत्साह लागतो तो कोठून आणावा ?

गरजेने सर्व कांही येतें. सकाळीं उठल्यावर शुचिर्भूत होण्याला जे अनेक विधि करावयाचे असतात ते आपले आपण करतों कीं राजाचे अधिकारी? माझे दांत घासायला जर राजाचा अधिकारी हात पुढे करील तर त्याचे दांत पाडायला माझा हात पुढे नाही का होणार? करायला मर्यादा नसेल, पण करवून घ्यायला मर्यादा आहेच! इत्यादि इत्यादि.

बन्या ऊर्फ विनायक लोंढे याने आपली रजा फुकट न घालवितां, संस्थानाच्या प्रजेच्या हिताचें कांहीं काम करावें असें ठरविलें होतें. पण काम करण्याचा विचार मनांत येतांच त्याला पहिली अडचण ही दिसली कीं, या प्रजेला आपलें हित कशांत आहे हें स्पष्ट कळत नाही. आणि कळलें तरी तें बोलून दाखविण्याचें तिला धैर्य नाही. राजनिष्ठेच्या प्राचीन परंपरागत अतिशयोक्तीच्या उज्ज्वल कल्पनेपासून तों तात्पुरत्या क्षुद्र लाभाला बळी पडणाऱ्या हीन स्वार्थबुद्धीपर्यंत; सर्वच आपल्या परीनें प्रगतीला वैरी! संस्थानसुधारणा करण्याच्या दृष्टीने लोकमत अजमावण्याकरिता बन्या जेव्हा आपल्या ओळखीच्या अशा जुन्या पिढींतील लोकांकडे जाऊन बोलूं लागला, तेव्हा त्याला या वैऱ्यांचे मासलेवाईक नमुने पाहावयास सांपडले. आणि नवीन पिढीच्या लोकांकडे जाऊन जेव्हा तो बोलूं लागला तेव्हा संस्थानसुधारणेला घातक असा दुसराच एक नमुना त्याला दिसून आला तो, कम्युनिझमचें एखादें चोपडें वाचल्याने ज्याला तांबड्याशिवाय जगांत दुसरा रंगच दिसत नाही अशा माथेफिरू तरुणांचा. जुन्या पिढीला

फाजील राजनिष्ठेमुळे सुधारणा नको! आणि नव्या पिढीला राजाच नको, संस्थानच्च नको, म्हणून सुधारणाहि नको.

जुन्या पिढीला वाटे कीं, "राज्यकारभारांत सुधारणा सुचविणें हें देवघरांत जोडे घालून जाण्यासारखें उन्मत्तपणाचें होईल. राजाने राजधर्म कसा पाळावा याची प्रेरणा देवाकडूनच्च झाली पाहिजे. गंगोत्रीच्या कुंडांतून आपोआप पाणी वाहून येईल तीच गंगा! यात्रेकरूंना तीर्थाचा तुटवडा पडतो, म्हणून तेथे पंप लावून का कोणी पाण्याचा पुरवठा करण्याचें मनांत आणील? तान्ह्या मुलाला भूक लागली हें आईने ओळखण्याचें आहे. मुलाने सांगण्याचें कारण नाही. संस्थानाच्या राजाला मुळांत प्रजेने कांहीं राजा केलेलें नाही; तो आपल्या पराक्रमाने राजा झाला, आणि पराक्रम यशस्वी होणें हें देवाच्या मर्जीवर अवलंबून असल्यामुळे, तें राजपद त्याला देवाने दिलें असेंच्च म्हणावें लागतें. म्हणून प्रजेने कारभाराचे अधिकार हक्काने मागणें म्हणजे तें राजाच्या हक्कांचा अपहार करण्याची बुद्धि धरणें ठरेल. राजाला जर प्रजेला अधिकार द्यावेसे वाटले तर तें मात्र सात्त्विक दान ठरेल, व त्या योगाने त्याला पुण्यहि लागेल. पण दान हें दात्याने आत्मस्फूर्तीने द्यावयाचें असतें. आपण होऊन त्याची याचना करील तो भिकारी, आणि बळजबरीने हरण करूं पाहील तो चोर–दरवडेखोर! खरा प्रजाधर्म म्हणजे प्रजेचें कल्याण करण्याची बुद्धि राजाला व्हावी, म्हणजे ईश्वराने द्यावी, अशी प्रार्थना करीत बसणें हाच होय!"

दुसरे पक्षीं बन्याची गांठ एका नवजवानाशीं पडली तेव्हा त्यानेहि आपलें मत संस्थानांत सुधारणा होण्याविरुद्ध दिलें. याचें नांव कॉम्रेड डंखी. हें नांव पडण्याचें कारण असें कीं, त्याच्या भाषणांत नेहमी असें येई कीं, जुनीं राज्यें, रिसायती, जमीनदाऱ्या, सावकार व श्रीमान लोक हे एका झडपेच्या पेचांत, कुस्तींतील डंखी मारल्याप्रमाणे, उखडून टाकले पाहिजेत. कोणी डंखी म्हणजे विंचवाची नांगी असाहि अर्थ करीत. हा भाई नवलपूरचा रहिवाशीहि नव्हता मग प्रजाजन कोठून असणार? वॉंडरिंग ज्यूप्रमाणे तो एक फिरता नागरिक होता. याच्या अंगावरील पोषाख मातबर लोकरी परदेशी कापडाचा असून, डोक्यावरील कोल्ह्याच्या कापडाची टोपी लष्करी टोपीप्रमाणे तिरकस ठेविलेली असे. ह्याला चुकून कोणी श्रीमंताचा उनाड पोरगा म्हणण्याचाहि संभव होता. रशियन कम्युनिझमचें चिन्ह किंवा विरुद्ध जें लाल निशाण तें एखाद्या शोभिवंत पदकाप्रमाणे त्याने टांचणीने आपल्या छातीवर चिकटविलें होतें. त्याच्या तोंडां-

तील सिगारेटने ओठांशीं काटकोन न करतां पंचेचाळीस अंशांचा कोन केला होता. तिच्यांतून निघणारा धूर कानाच्या बाजूने वर कुरळत जाऊन वाट काढी. कॉ. डंखी याचें बिऱ्हाड विंचवाच्या बिऱ्हाडासारखें, त्याच्या पाठी-वर अगदीं चुटपुटतें होतें.

असो. दरबार भरावयाचा त्यांत महाराजांनी हजर राहावें कीं नाही हा प्रश्न निघाला. या सभेला स्वतः महाराजांनी हजर राहूं नये असें मनोहराचें म्हणणें होतें. पण महाराज म्हणाले, "तें काय म्हणून? सभेंत भाग घेण्याचा हक्क प्रजाजनांना आहे; तो स्वतः राजाला मात्र नाही? नसावा?"

मनो.—तुम्हाला हक्क नाही कोणी म्हटलें! पण तुमच्या भिडेमुळे सभेंत लोकांना मन मोकळें करून बोलतां येणार नाही, तुमच्यादेखत!

नव.—ज्यांना राजादेखतां मन मोकळें करून बोलतां येत नाही, त्यांनी राजाचें राज्य म्हणजे स्वराज्य मिळविण्याची महत्त्वाकांक्षा कां धरावी?

मनो.—वाः, तुमची बेअदबी होऊं नये अशीच त्यांना इच्छा आहे. तुम्ही समक्ष असलां तर कदाचित् ती व्हावयाची!

नव.—इच्छा आहे तर बेअदबी करूं नये म्हणजे झालें.

मनो.—पण ते सर्वच तुमच्या आमच्यासारखे सुशिक्षित नाहीत.

नव.—अदबी संभाळणें, बेअदबी न करणें, याला शिक्षण लागत नाही, सौजन्य लागतें. घरीं सासऱ्याची किंवा नवऱ्याची बेअदबी न करतां जन्म घालविणाऱ्या स्त्रिया सर्व सुशिक्षितच असतात वाटतें? उलट सुशिक्षित झाले म्हणून लोक एकमेकांची किती अदबी संभाळतात हें आपणाला, हल्ली कित्येक वर्तमानपत्रांत, वाचायाला मिळतेंच! दुसरें असें कीं, माझ्या पश्चात् मात्र त्यांनी माझी बेअदबी करावी हें बरें का? अप्रिय बोलण्याची मनांत इच्छा आहे, त्याविषयी कदर वाटत नाही; पण तसें बोलण्याला मात्र अंगीं धैर्य नाही असें लोक स्वराज्य कसें मिळविणार व चालविणार? हल्ली संस्थानी राज-कारणांत रूढ झालेला "मुलभूत हक्क" हा शब्द तूं ऐकलाच आहेस! न्याय मागण्याचा मूलभूत हक्क जसा प्रजेला आहे, तसाच प्रजेकडून बेअदबी न व्हावी हा मूलभूत हक्क राजालाहि आहेच! अर्थात् सत्य बोलावें, अवश्य तर अप्रियहि बोलावें, पण कोणाची बेअदबी न करतां बोलावें, औचित्य आणि सदभिरुचि यांच्या योग्य मर्यादा संभाळून बोलावें, हेंच तर माणसाने प्रथम शिकलें पाहिजे. तें मूलभूत कर्तव्य. आमचे

दिवाणसाहेब माझ्यापासून चार हात अंतरावरून बोलत असले तरी तोंडाला पदर लावून बोलत ! माहीत आहे ना ?

मनो.—पण तसें बोलतांना त्यांच्या मनांत तुमच्याविषयी द्वेष कसा जळत असें हेंहि माहीत आहे ना ?

नव.—होय. म्हणूनच मी म्हणतों कीं, मनांत द्वेष नसावा, आणि थुंकी न उडावी या मिषाने तोंडाला पदर लावून मर्यादा संभाळण्याचा बहाणाहि कोणी करूं नये ? प्रजेला जें कांही माझ्या तोंडावर बोलून मागतां येणार नाही तें मी तिला कधीहि देणार नाही.

या उत्तराने मनोहर कुंठित झाला, पण इतकी थट्टा करून झाल्यावर महाराजांनी त्याला असें आश्वासन दिलें कीं, 'मी दरबारांत प्रास्ताविक भाषण करीन व नंतर निघून जाईन. मागे तुमची सभा तुम्हीं चालवावी."

ठरल्याप्रमाणे सभा भरली. मोठ्या दिवाणखान्यांत चौफेर शुभ्र एकरंगी बैठक अंथरली होती. महाराजांकरिता वेगळी गादी व लोडतक्ये ठेवले होते. नेहमीच्या नियमाविरुद्ध, महाराजांच्या डाव्या अंगाला दरबारचे मुख्य मुख्य अधिकारी, तैनातदार, नोकर, सनदी वकील हे बसले होते. आणि उजव्या अंगाला प्रजाजनांच्या सभेंत निवडलेले प्रतिनिधि बसले होते; नेहमीच्या क्रमाची ही उलटापालट महाजांच्या आज्ञेने मुद्दाम करण्यांत आली होती. मेळयांत अग्रस्थानीं नवलपूरचे नगरशेठ हे बसले असून जवळच पण एका स्वतंत्र जागीं विमलहि बसली होती. सभेंत इतर स्त्रिया कोणी नव्हत्या. प्रभाकरालाहि लोकांनी निवडलें होतें, पण तो दरबारच्या वेळीं आंबराईजवळच्या तालमींत आपले मित्र घेऊन हास्यविनोद करीत, व तांबड्या मातीने मळलेल्या एकमेकांच्या पाठी चोळीत बसला होता, "दादा, चलतोस का सभेला ?" असें घरून निघतांना विमलने त्याला विचारलें. पण तो म्हणाला, "ती सभाबिभा काय ती तुझी तूंच संभाळ कशी ती ! मी पडलों रानटी माणूस. सभेंत कसें बोलावें हें जसें मला कळत नाही तसेच सभेंत न बोलतां गप्प कसें बसावें हेंहि मला कळत नाही. आपली बजरंगबलीची सेवा हीच आमची सभा आणि हेंच माझें स्वराज्य. मला कोणी राज्य दिलें तरी नको. मी फक्त प्रजेचा बिनपगारी कोतवाल होऊं इच्छितों. राजाच्या पगारी कोतवालाच्या हातून ज्या अन्यायाचा प्रतिकार होत नाही त्याचा प्रतिकार करणें हें माझें जन्माचें काम म्हणून मी ठरवून घेतलें आहे. तें मी आणि

माझे संवगडी करीत राहणार! तूं सभेला जा आणि प्रजेची वकिली करायची ती कर! नव्या कारकीर्दीत माझ्या कोतवालीचें काम न पडलें तर मला देवच पावला!"

सभेच्या कामाला सुरुवात करतांना महाराजांनी उभे राहून खालील भाषण तोंडी केलें. ते म्हणाले, "सज्जन प्रजाजन हो, माझ्या कच्च्या मुखत्यारीचा समारंभ पूर्वी झाला तो आपण पाहिलाच. आज माझ्या पक्क्या मुखत्यारीचा समारंभ आहे असेंच मी समजतों, पण माझी पक्की मुखत्यारी म्हणजे संस्थानाच्या प्रजेला स्वराज्यदान त्याची तयारी मनानें करूनच आज ही सभा भरवली आहे. आपण योग्य वाटेल तें मागावें व मला योग्य वाटेल तें मीं द्यावें असा अधिकारनिर्देश केला तरी, या मागण्यांत व या देण्यांत फारशी तफावत पडूं नये अशी माझी इच्छा आहे. माझ्या प्रजेच्या शहाणपणावर व सौजन्यावर माझा विश्वास आहे!"

इतकें बोलून महाराज निघून गेले व पुढें चर्चा सुरू झाली. विमललाच सर्वांनी एकमतानें अध्यक्षस्थान दिलें. स्वराज्य हवें म्हणजे काय व कसें हवें हें सांगण्याचा पहिला मान नगरशेठना सहजच मिळाला. ते म्हणाले, "आहे तें आपलेंच राज्य आहे नव्हे का? सुखानें ज्यानें त्यानें आपला धंदा करावा. आणि राजेसाहेबांना आयुष्य चिंतावें अन् दुसरें काय? दिवाणसाहेबांच्या कारकीर्दीत दुकानपट्टी बसली ती उठवावी. दुकानदार लोक आपल्या दुकानापुढें पडव्या काढतात, मालाची गर्दी झाली म्हणजे चार हमालांना बसायला सावलीची जागा होते त्यांत! त्या काढायचा हुकूम झाला आहे तो रद्द व्हावा. तसेंच आमच्यासारखे चार लोक सोन्या-रुप्याचा व्यापार करतात, त्यानें गांव श्रीमंत होतो परस्पर. तेव्हां त्या जिनसांवरची जकात उठवावी, आणि ती हिशेबी वसूल करायला कठिणहि नाही का जात? आणखी एकच. म्हणजे कोडतांत हुकूमनामे मिळतात त्यांची अंमलबजावणी जरा लवकर व्हावी हेंच स्वराज्य. आहे काय अन् नाही काय?"

लगेच कॉ. डंखी हे कडकडून उठले. त्यांनी आपले खिशांतले हात बाहेर काढून, हातवारे करून, वरच्या तिसऱ्या सप्तकांत बोलायला सुरुवात केली. ते म्हणाले, "हा कसला दरबार आणि ही कसली सभा? स्वराज्याच्या चर्चेचा हा नुसता पोरखेळ आहे, नाटक आहे, थट्टा आहे. गरीब दरिद्री दुबळ्या प्रजाजनांच्या काळजांतील रक्ताच्या पुरानें न्हालेल्या या नरकमय पापभूमींतून, श्रीमंती

भांडवलशाहीच्या या मूळपीठाच्या म्हणजे राजधानीच्या हद्दींतून, बाहेर चला आणि स्वराज्याची चर्चा करायची तर ज्या शेतजमिनींत पावसाच्या बरोबरीने शेतकऱ्यांच्या अंगांतला घाम आणि डोळ्यांतले अश्रु सांडून जमीन भिजली आहे तींत बसा, आणि तोंड उघडा. म्हणजे त्या अभागी भूमींतून उष्ण वाफा निघतील. त्या तुमच्या तोंडून स्वराज्याचा खरा अर्थ बाहेर काढतील. शेतकऱ्यांचा नांगर, जो आज नापिकी कोरड्या जमिनींत फिरून सावकार–इनामदारांकरिता कडब्याची काडी उगवतो, तो या नगरशेठजींच्या हवेलीवर आणि राजेसाहेबांच्या सिंहासनाच्या जागेवरून फिरेल, तेव्हाच खरें स्वराज्य लाभेल. कोणा बापजाद्याने राज्य मिळविलें, आणि तें म्हणे पिढ्यान् पिढ्या त्याच्या आयदी वंशजांनी नुसत्या टिवल्याभावल्या करीत, माणुसकीचा खून होण्यासारखे प्रजेवर अन्याय करीत, सुखानें खात बसावें! तुमची राजभक्ति,म्हणजे तो नुसता नागडा स्वार्थ आहे. तुमच्या डोळ्यांत राजपदावर चैनींत लोळणाऱ्या एका व्यक्तीची बाहुली नाचते. पण दुसरीकडे उपाशी मरणाऱ्या, पाठपोट एक झालेल्या, गोठ्यांतल्या गुरांच्या दावणीला आपली मान गुंतवणाऱ्या, सहस्त्रावधि लोकांकडे पाहावयाचें झालें म्हणजे तुमचे डोळे फुटतात! राजासकट राजनिष्ठ भाटांची आणि कोयत्याहातोड्याची गांठ पडेल तेव्हाच खरें स्वराज्य लाभेल!" इतकें बोलून त्याचा घसा बसला व खोकला आवरेना म्हणून कॉम्रेड डंखी यांनी आपल्या खिशांतून रुप्याची सिगारेट केस काढून तिच्यांतली एक सिगारेट घेऊन काडी ओढून ती जागच्या जागेवर शिलगावलीहि!

या अद्‌भुत तांडवनृत्याने सगळी सभा हदरली. जो तो एकमेकांच्या तोंडाकडे पाहूं लागला. दक्षयज्ञाचा विध्वंस करणारा वीरभद्र आज नवलपुरांत अवतरला असें पुराण ऐकलेल्या भाविक लोकांना वाटलें. कांहींनी दांतओठ चावले. कांहींच्या हाताच्या आपोआप मुठी वळल्या! अस्फुट अशा शब्दांची गलबल माजली. पण लगेच विमल उठून उभी राहिली आणि शांत गंभीर आवाजाने म्हणाली, "आता जे गृहस्थ बोलले त्यांनी आधी आपली सिगारेट विझवून खिशांत घालावी. तरच सभेचें काम पुढे चालू होईल."

पण नुसत्या भाषणांत अशा रीतीने वेळ घालवूं नये. म्हणून मनोहर पुढे येऊन महाराजांतर्फे एकेक सूचना सभेच्या पसंतीकरिता मांडूं लागला.

मनो.—महाराजांचें म्हणणें असें आहे कीं, "मी लवकरच नदीकांठच्या

आंबराईतील उंचवट्यावर बांधलेल्या झोपडीवजा सुंदर घरांत जाऊन राहणार आहे. म्हणून हा राजवाडा प्रजाजनांनी आपल्या ताब्यांत घ्यावा, व त्याचें काय वाटेल तें करावें.

डंखी— तो पाडून जमीनदोस्त करावा तरच गरीबांच्या डोळ्यांचें समाधान होईल. त्यावर गाढवाचा नांगर फिरवावा !

बन्या—तो फिरवायचा होईल तेव्हा आपण फिरवा म्हणजे चांगला फिरेल व गाढवाचा फिरविल्याचें श्रेय येईल. तोंपर्यंत वाडा आहे तसाच ठेवावा व त्यास दरसाल रंगसफेती हल्लीसारखी द्यावी. 'राजाचा त्याग तोच प्रजेचा भोग' या न्यायानें, वाडा प्रजेच्या उपयोगी पडावा म्हणजे झालें. आणि तो उपयोग असा कीं, वाड्यांत जुन्या नव्या पिढ्यांच्या मोठेपणाच्या ज्या खुणा जुन्या असतील किंवा नव्या बनवितां येतील त्यांचें संग्रहालय करावें. आणि महाराजांनी दर आठवड्यांतून एक दिवस दरबारच्या दिवाणखान्यांत प्रजाप्रतिनिधींसह बसून प्रजेचीं सुखदुःखें ऐकत जावीं.

इतकें झाल्यावर त्या वेळचें सभेचें काम दोन प्रहरपर्यंत तहकूब करण्यांत आलें.

---

२४ स्वराज्यदानाचा नजराणा

दोन प्रहरीं फिरून दरबार आणि संस्थानसुधारणेची चर्चा सुरू झाली. दरबारांत स्वतः महाराज नाहीत यामुळे दरबारी सभाजनांची संख्या बरीच घटली होती. तथापि कागदावर मांडलेला कार्यक्रम पुरा करणें अवश्यच होतें; म्हणून मनोहर हातांत टिपणें घेऊन विमलच्या परवानगीने बोलूं लागला.

मनो.— महाराजांचें म्हणणें असें आहे कीं, राजवाड्यांतील सर्व जवाहीर व राजभोगोपयोगी वस्तु या जाहीर लिलावाने विकून, येईल ती रक्कम व्याजीं लावून, व्याजाचा उपयोग स्त्रियांकरितां शिक्षणगृहें, आरोग्यगृहें व प्रसूतिगृहें यांकडे करण्यांत यावा.

नगरशेठ—जवाहीर लिलावानें विकावयाचें तर दोन अटी घालाव्या. संस्थानाबाहेरच्या कोणाहि मनुष्याला लिलावांत बोलण्याची परवानगी देऊं

नये, आणि संस्थानांतल्या गिऱ्हाइकांकडून जी चढांत चढी मागणी होईल ती मंजूर व्हावी. तीनवार बसल्या बैठकीला व्हावे.

बन्या—माझी या सूचनेला हरकत आहे. संस्थानच्या बाहेरच्या लोकांना लिलावांत बोलूं दिलेंच पाहिजे. तरच किंमत जास्त येईल, नाही तर ती सगळी नगरशेठजींचीच धन थोड्या किंमतींत होईल.

डंखी—जवाहिराचा लिलाव करून निरनिराळीं गृहें स्त्रियांच्या उपयोगाकरिता काढून चालवावीं. पण त्यांत श्रीमंत व पांढरपेशे यांच्या स्त्रियांना मज्जाव असावा.

बन्या—जवाहीर विकून व्यवस्था महाराजांनी सुचविल्याप्रमाणे करावी. पण श्रीमंत किंवा पांढरपेशे यांच्या स्त्रियांना मज्जाव न ठेवतां इतकाच निर्बंध ठेवावा कीं, असेल ती जागा आधी गरीब स्त्रियांना द्यावी व मग उरेल ती इतरांना.

मनो.—महाराजांची अशी सूचना आहे कीं, राजवाड्यांतल्या देवांचें दर्शन सभामंडपांत थोड्या अंतरावरून सर्व जातीच्या लोकांना समान हक्काने घडावें. कथाकीर्तनांतहि असेंच असावें. पण प्रत्यक्ष देवघराच्या गाभाऱ्यांत अधिकृत व शुचिर्भूत पुजाऱ्याखेरीज कोणीच प्रवेश करूं नये. देवाला पुष्पादि भोग चढवावयाचे ते पुजाऱ्याच्या हातून चढवावे.

डंखी—देव उचलून नदींत फेकून द्यावे व देवघर जमीनदोस्त करून धर्मोपासनेची खूणहि तेथें राहूं देऊं नये. धर्म हा समाजाला कलंक आहे. गरीबांना धर्मच नाडतो.

नगरशेठ—देव, देवघर आणि नित्यनैमित्तिक सर्व पूर्वीसारखें चाललें पाहिजे. अस्पृश्यांवरचा बहिष्कार आहे तसाच राहावा. महाराजांना होत नसेल तर मी देवस्थान संभाळून त्याचा खर्च चालवायला तयार आहे.

बन्या—नगरशेठजींचा थोडा गैरसमज आहे. महाराजांकडून संस्थानच्या पैशांतून देवस्थानचा खर्च चालण्याला हरकत नाही. फक्त स्पृश्यास्पृश्यभेदाला त्यांची हरकत आहे.

मनो.—महाराजांचें म्हणणें असें आहे कीं, संस्थानाच्या घराण्यांतील कोणाहि पूर्वजाच्या श्राद्धपक्षाला किंवा उत्सवाला फाजील खर्च होऊं नये.

डंखी—उत्तम, बहुत उत्तम! सर्व जुन्या पिढ्यांचे लोक गाढव होते. कारण ते भांडवलशाहीचे उपासक होते.

बन्या—मग गाढवापासून डंखीसारख्या प्रजेचा जन्म व्हावा हें आश्चर्य नव्हे काय ?

विमल—हीं उत्तरें-प्रत्युत्तरें सभ्यतेला सोडून आहेत. महाराजांची सूचना तत्त्वतः ठीक आहे. पण मला वाटतें कीं, राजघराणें व प्रजाजन यांच्या जुन्या पिढ्यांपैकी जे लोक चांगले व चिरस्मरणीय होऊन गेले, त्या सर्वांचें स्मरण करण्याकरिता वर्षांतून एक दिवस ठरवून, त्यांच्या उत्सवाकरिता संस्थानचा खर्चहि ठरवून द्यावा. मनुष्यमात्रांतला मोठेपणा हा केव्हाहि कोठेहि उपासनीयच होय. फक्त हा मोठेपणा श्रीमंतांप्रमाणे गरीबांतहि असतो हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. संस्थानसंरक्षणाच्या कामीं राजघराण्याच्या पुरुषाप्रमाणे प्रजाजनांतले शूर वीर मुत्सद्दी हेहि उपयोगी पडले असतीलच.

मनो.—महाराजांचें म्हणणें असें आहे कीं, मला स्वतःला तनखा द्यावयाचा तो प्रजेने ठरवून द्यावा. जो ठरेल त्याकरिता इतर नोकरांप्रमाणे दिवसाच्या कामाचा सर्व वेळ मी कारभार पाहण्याला खर्च करीन.

नगरशेठ—घरच्या मालकाला तनखा ठरवून द्यावा म्हणजे काय हें कांही आपणाला कळतच नाही ! मी घरीं पावशेराचाहि भात खात नाही. डोक्यावरच्या चिंधीला जरतारीचा स्पर्श कधी करूं दिला नाही. पण मला अमूक खर्च तोडून घे असें कोण म्हणणार ?

डंखी—कोण म्हणणार ? प्रजा म्हणणार. चुकलों, प्रजा नव्हे लोकशाही म्हणणार. जुन्या अन्यायांची भरपाई व्हावयाची तर महाराजांनीहि स्वतः हातांत कुदळ-फावडें घेऊन मजुरी करायला बाहेर पडलें पाहिजे.

बन्या—ओहो ! काय अक्कल पण ! स्वतः डंखी यांचे हात पहा ! त्या हातांना कुदळफावडें तर राहोच, पण लेखणीनेहि घट्टा पडलेला दिसत नाही. हात पाहून तो बांगड्या भरण्याला किती नाजूक, चांगला आहे असें वाटून कासार मात्र बहुत खूष होईल.

विमल—फिरून ही भाषाहि असभ्यच. प्रश्न इतकाच आहे कीं, राजेसाहेब तनखा ठरवून मागतात तो किती द्यावयाचा ?

या प्रश्नावर कोणाचेंच मत कोणाशीं जुळेना. एकाने महाराजांना घोड्याचे दोनतीन रथ द्यावे असें म्हटलें, त्यावर कॉ. डंखी यांचा एक सोबती ओरडून म्हणाला, "तें काय नाय ! महाराजांना मोटारच द्याया व्होवी. न्हाई तर सत्याग्रह कराया अमी लोक मोटारपुढें कसे आडवे पडणार ?"

"शेवटीं आंकडा ठरलाच नाही. तेव्हा विमल म्हणाली, ज्यांनी आपण होऊन राजवाडा टाकून आमराईतली झोपडी हें आपलें घर म्हणून ठरविलें, ज्यांनी राजवाड्यांतलें जवाहिर विकायला काढलें, त्यांच्या सुजाणपणावर आपण ही गोष्ट सोपविली तर योग्य तो तनखा तेच ठरवून घेणार नाहीत काय?"

मनो.—महाराजांचें असें म्हणणें आहे कीं, प्रजाजनांनी परस्पर नीट वागण्याचें ठरविल्यास पोलीस खर्च बराच वांचवितां येईल.

पण पोलीस कमी केले तर आपलें संरक्षण कसें होणार या भीतीनें सर्वांनी गिल्ला करून सांगितलें कीं, हा खर्च मुळीच कमी करूं नये.

मग प्रश्न निघाला खातेवार कारभाराचा. तेव्हा बन्या म्हणाला, "महाराजांचें उदार धोरण आमच्या लक्षांत आलें. प्रजा तयार असेल तर तिने आपल्या पसंतीप्रमाणे खातेवार मुखत्यार नेमून त्यांच्याकडून कारभार घ्यावा आणि ते नापसंत ठरतील तेव्हा त्यांना कामावरून दूर करावें. याहून अधिक काय कोणाला देतां किंवा कोणाला मागतां येणार? पण या संस्थानच्या प्रजेला आजवर असें जुलमाने ताब्यांत ठेवून वागविण्यांत आलें आहे कीं, राज्यकारभार म्हणजे काय आणि तो कशाशीं खातात याची कल्पनाहि त्यांना नाही. तेव्हा खातेवार कारभार करायला हरघडीं मुखत्यार नेमणें व तो काढून टाकणें हा अधिकार प्रजेला दिला तरी तो तिला वापरतां येणार नाही."

मनो.—मग अधिकारीवर्ग प्रजेला बेजबाबदारच राहावा तर?

बन्या—तें काय म्हणून? राजपदावर असणाऱ्या राजारूपी कुलमुखत्याराला हे अधिकारी नेमतां व काढतां यावे म्हणजे झालें. आधुनिक काळीं लोकसत्ताक राज्यपद्धतींत जिला "प्रधान-मंडळाची जबाबदारी" म्हणतात ती फुकट आहे! प्रधानपद ज्याला मिळतें त्याला तो एक हंगामी मक्ता असें वाटतें. या मक्त्याच्या मुदतींत त्याने आपला नादानपणा कितीहि सिद्ध केला, सरकारचा व प्रजेचा पैसा हस्तें परहस्तें कितीहि लुबाडला, तरी त्याला ठरल्या मुदतींत काढावयाला कोण महत्प्रयास पडतात! आणि काढलाच तर तो म्हणतो, "मग त्यांत काय झालें; माझा व इतराचा फार तर मतभेद झाला असें म्हणतां येईल." या मतभेदाच्या पारिभाषिक नांवाखालीं त्याला आपल्या बडतर्फीला सौम्य स्वरूप देतां येतें. केव्हा तरी कमी होणारच असें समजून, अधिकाराच्या साधेल त्या मुदतींत, तो

पगार लांचलुचपत इत्यादि मार्गांनी इतका पैसा मिळवितो कीं, पुढे जन्मभर त्यावर त्याला सुखांत लोळतांच न आलें तरी, स्वतंत्रपणें वाटेल तर दुसरा एखादा धंदा करून जगतां येतें. ही कसली जबाबदारी ? नांव मोठें पण दर्शन खोटें."

विमल—मग जबाबदारी अंगीं लावली जाण्याचा दुसरा एखादा मार्ग तुम्ही सुचवितां काय ?

बन्या—मला एक मार्ग सुचतो तो सांगतों. केवळ अधिकाऱ्यांचें धोरण प्रजेला नापसंत झालें, किंवा तें खरोखरच प्रामाणिकपणाच्या चुकीचें ठरलें तर त्याला कांही शासन होऊं नये हें ठीक आहे. पण कारभाराच्या धोरणाची सूक्ष्म चौकशी केली तर तींत प्रधानादि अधिकाऱ्यांचें व्यक्तिमनोगत नैतिक दोष आढळून येऊं शकतात. कोणाचें धोरण द्रव्यलोभाने, कोणाचें द्वेषाने, कोणाचें जातिमत्सराने, कोणाचें स्त्री-प्रेमाने बनलेलें हें तर आढळतेंच. पण फाजील अहंकाराचा, गर्वाचा, नैतिक दोषहि त्या धोरणाच्या मुळाशीं आढळून येऊं शकेल. या दोषाने केललें अपकृत्य हा जर सामान्य प्रजाजनामध्ये गुन्हा ठरतो व तो फौजदारी न्यायमुनसफीला पात्र होतो, तर अशा गुन्ह्याबद्दल अधिकारी– कोणताहि अधिकारी– मग तो राजाने नेमलेला असो, लोकनियुक्त असो– गुन्हेगार म्हणून चौकशीला पात्र ठरला पाहिजे. आज अधिकाऱ्यांना ही दहशत मुळीच नाही. अधिकार म्हणजे तें एक वज्रकवच असें ठरतें. वास्तविक हातीं अधिकार म्हणून त्याची दहशत जशी लोकांना, तशी लोकांची दहशत अधिकाऱ्यालाहि पाहिजे. खालसांत अधिकारी फार तर बडतर्फ होतात; पण नैतिक दोषांचीं अपकृत्यें घडणाऱ्या व तीं करणाऱ्या, किती अधिकाऱ्यांचा इनसाफ आजवर झाला आहे ? एका अधिकाऱ्याला तुरुंगवास घडेल तर बाकीचे दहा सावध होतील. अधिकारी हा प्रजेच्या मताने नेमला जाण्याचा किंवा बडतर्फ होण्याच्या हक्कापेक्षा, प्रजाजनाच्या साध्या फिर्यादीनेहि अधिकाऱ्याच्या कृत्यांचा इन्साफ व्हावा हा अधिकार किंवा हक्क मी अधिक महत्त्वाचा मानतों. आमच्या माजी दिवाणांना बडतर्फी ही शिक्षा कसली ? ते पळून गेले नसते तरी त्यांचें काय झालें असतें ? जुन्या इतिहासांत राजे लोक स्वतः जुलमी व स्वतंत्र असले तरी त्यांच्या प्रधानांवर फौजदारी खटले होत व त्यांना शिरच्छेदाइतक्या प्रखर शिक्षा देत. आज सोव्हिएट रशियांत तोच प्रकार दिसतो व तोच बरोबर आहे.

बन्याचें हें बोलणें कॉमरेड डखी याला फारच पटलें. तो ओरडून म्हणाला—" बस-बस, अगदी बरोबर ! या शतकांतल्या रशियाने अठराव्या शतकांतल्या फ्रेंच राज्यक्रांतीचें अनुकरण करून रक्ताच्या नद्या वाहविल्या व तोडलेल्या डोक्यांचे ढीग रचले; म्हणूनच सोव्हिएटला आपलें बस्तान बसवितां आलें. नाही तर आपल्या फ्रेंच लोकशाहींतली प्रधानमंडळाची जबाबदारी पाहा ! दगडावर टेकलेल्या लांब फळीच्या दोन टोकांवर बसून 'मी खाली तूं वर, तूं खाली मी वर' असा खेळ खेळत रमणाऱ्या पोरांप्रमाणे फ्रेंच लोकसभेंतून प्रधानकीचा खेळ आज चालतो !

पण दरबारची ही नवलकथा यापुढे लांबविण्याचें कारण नाही. आणखी कांहीं वेळ अशीच चर्चा चालून सभा संपली. तात्पर्य, " माझ्या औदार्याच्या तोडीला तोड देणारें स्वराज्याचें ज्ञान प्रजाजन दाखवितील " ही नवलरायाची अपेक्षा फसली. दरबारी चर्चेला अवघ्या दोनतीन माणसांच्या संभाषणाचें स्वरूप आलें. पण त्यांत आश्चर्य कसलें ! आमच्या सर्वपक्षीय परिषदा किंवा मोठमोठीं संमेलनें पाहिलीं तरी त्यांतहि असा कांहीसा प्रकार दिसून येतोच कीं नाही ? योजना व वादविवाद यांची तालीम पांचपन्नास वर्षें केलेल्या खालसा प्रजाजनांतहि खऱ्या तज्ज्ञांची वाण जर इतकी भासते, तर आमच्या बिचाऱ्या नवलपूर संस्थानांत ती भासल्यास काय नवल ? महाराजांची म्हणून योजना मनोहराने पुढे मांडावी, तिला नकार कोणीच देऊं नये, फक्त एकट्या बन्याने कांही सुलट व एकट्या कॉ. डखीने कांही उलट बोलावें, असें होऊन चर्चेच्या सूचनांची यादी लवकरच खलास झाली. तेव्हा किल्ली संपलेल्या फोनोग्राफसारखी दरबारची स्थिति पाहून विमलनें शहाणपणाने कार्यक्रम संपवून सभा बरखास्त केली.

महाराजांचें गुणवर्णन यथेच्छ करीत लोक आपापल्या घरीं गेले. पण झाल्या चर्चेतून काय निष्पन्न झालें याची नक्की कल्पना येण्याइतके राजकारणज्ञ लोक संस्थानांत कितीसे असणार ? परसांतल्या विहिरीचें घाणेरडें पाणी काटवटींत घेऊन चुळक्यानें स्नान करणाऱ्या चांडाळाला, एकदम हरिद्वाराच्या गंगाप्रवाहांत नेऊन बसविलें तर कसें वाटेल ? आजवर संस्थानिकांच्या ऐश्वर्याचा सत्तामदाचा व सुखोपभोगाचा रणगाडा ओढीत राहण्याचें दुःखच ज्या प्रजाजनांनीं भोगलें, त्यांना केवळ मानेवरचें जूं निघाल्याचाहि आनंद इतका अपूर्व होता कीं, त्याच्या भरांत, यापुढे मिळणाऱ्या स्वराज्यरूपी

स्वातंत्र्याच्या कोणत्या कुरणांत जाऊन चरावें याचा निर्णय त्यांना लवकर करतां येईना!

सभेचा वृत्तान्त सांगण्याकरिता मनोहर महाराजांकडे गेला. तो हसतोसा पाहून महाराज म्हणाले, "का रे बाबा, हसतोससा?"

मनो.—हसूं नको तर काय करूं? कागदी घोडा थयथय नाचलेला पाहिला म्हणजे हसूं येणारच कोणालाहि! दरबार भरवून तुम्हाला काय मिळालें? तुम्ही संपूर्ण स्वराज्य द्यायला काढलेंत, सही केलेला कोरा चेक प्रजाजनांनीं आपल्या हाताने भरण्याकरिता त्यांच्यापुढें टाकलात, पण त्यांना चेक हाताने कसा भरावा हें तर माहीत नाहीच, पण त्यांत भरण्याच्या इष्टांकाचा उच्चारहि त्यांच्या तोंडून निघेना. संस्थानी प्रजेचें अज्ञान उघडें करून तुम्हीं त्यांची फुकट फजिती मात्र केलीत. वर देणारा ईश्वर सिद्ध झाला तरी "वरहि वरावयास पाहिजे समज!" तो समज कोठला आणावयाचा? स्वराज्य देण्याच्या आधी स्वराज्य कसें व काय मागावयाचें हें शिकविण्याची शाळा घातली पाहिजे या देशांत. तें न करतां एकदम स्वराज्य द्यायला काढलेंत, तें घेणारानें कसें घ्यावें? भूक लागण्याच्या आधी कोणालाहि पानावर बसविलें म्हणजे असेंच व्हावयाचें."

नव.—स्वातंत्र्याची भूक मनुष्यमात्राच्या पोटांत नेहमीच जागृत असते!

मनो.—ठीक आहे. मग फार तर त्यांच्यापुढे पान वाढून ठेवावें. पण कांटे, चमचे, सुऱ्या ठेवल्या कीं तो गोंधळूनच जाणार! चमचा घशांत जायचा, कांट्याने जीभ चिरायची, आणि सुरीनें ओठ कापायचे. हाताने पोटभर जेवणें हें सुराज्य. तसेंच जेवणाच्या पदार्थासंबंधानें, पाहुण्याला तर राहोच, पण घरच्या यजमानालाहि आज काय पदार्थ करूं असें कोणी विचारीत नाही; मग कसा करूं हें तर नाहीच नाही.

नव.—पण इच्छाभोजन ही गोष्टच जगांत नाही म्हणतोस कीं काय?

मनो.—इच्छाभोजन देणें हा आढ्यतेचा, संपन्नतेच्या गर्वाचा, एक लहरी प्रकार आहे इतकेंच. उलट यजमानाच्या पोटच्या पोराचें मांस रांधून मागण्यापर्यंत इच्छाभोजनाची मागणी केलेली शिवलीलामृतांत आपण वाचतों-च ना? 'माझ्यासारखा दाता जगांत झाला नाही' या गर्वाच्या भावनेने इच्छाभोजन देणारा जगाला आव्हान करतो आणि खादाडपणांतले जे कसलेले

पैलवान मल्ल असतात तेच त्या आव्हानाचा स्वीकार करतात. तात्पर्य, या अहंकाराच्या युद्धांत सात्त्विक भावनाच नाही. तुम्ही स्वराज्याचे अधिकार काय हवे ते मागा, हें तुम्ही जाहीरनाम्यांत प्रजेला केलेलें आव्हान कांहीसें असेंच नव्हतें काय? तें करतांना तुम्हीं प्रजेची सत्पात्रता काय पाहिली? आपणास योग्य असे अधिकार काय हवे हें मागण्याचें ज्ञान तुमच्या प्रजाजनांना नाही हें सिद्ध झालेंच. उलट कॉमरेड डंखी याचे प्रलाप तुम्हीं ऐकलेत तर स्वराज्याच्या इच्छाभोजनाचें आव्हान परत घ्यावें असें तुम्हांलाहि वाटलें असतें. तात्पर्य, आपला हा लहरीपणा पुरे झाला महाराज!

नव.--असो. लहरीपणा हा सौम्य शब्द वापरूनच माझी निंदा थांबवितोस हें माझें भाग्यच म्हणावयाचें. पण मनोहर, धन्य आहे तुम्हा लोकांची! मी इतका जपून वागतों तरी माझ्यावर लहरीपणाचा आक्षेप आपला ठेवलेलाच! सांग बरें, मीं आतापर्यंत काय लहरीपणा केला तो? मी स्वतः लग्न केलें नसेल अजून; पण मीं कांही विजातीय पशुपक्ष्यांचीं लग्नें लावून मिश्र प्रजा बनविण्याचे प्रयोग सुरू केले नाहीत! मी स्वतः साधा पोशाख करीत असेन; पण गाढवांच्या गळ्यांत रत्नांच्या माळा आणि पाठीवर जरतारी झुली घालून, त्यांवर अंतःपुरांतल्या राजस्त्रिया उघड्यानागड्या बसवून, त्यांची मिरवणूक राजधानींतून काढलेली नाही! मी दिवाणसाहेबांना लवून नमस्कार करीत असेन; पण माझ्या खुषमस्कऱ्यांकडून माझ्या समक्ष त्यांची आईमाई उद्धरून त्यांच्या बदनामीच्या लावण्या म्हणविल्या नाहींत! मी कोणाच्या अंगावर रागावून जात नाही हें राजाला न शोभण्यासारखें असेल खरें, पण दिवाणखान्याच्या बैठकीवर चावरें कुत्रें किंवा वाघाचीं पिलें बसवून कोणी भेटायला आला तर त्यांच्याकडून त्याला ओरबाडवीत तरी नाही! मी स्वतः परस्त्रीकडे पाहत नाही हें माझ्या राजेपणाला शोभत नसेल कदाचित्; पण मी मोटारींतून गुंड बसवून त्यांच्याकरवीं रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या सुंदर स्त्रिया जबरीने पळवून त्या भ्रष्ट करून रानांत सोडून तरी देत नाही! मीं स्वतःवर प्रजेचा पैसा फार खर्चीत नसेन; पण कबुतरांचीं लग्नें लावण्याला लाखों रुपये तरी उधळीत नाही. मीं स्वतः केव्हा केव्हा उपोषणें करो; पण सज्जन शाकाहारी पाहुण्यांना जेवायला बोलावून त्यांना न कळेल अशा रीतीने गोमांस खायला घालून दुष्टपणाने तें उघडकीस आणून वरती बेशरमपणें खो खो करून हसत तरी नाही! माझ्याकरिता नोकरानेहि श्रम केले तर त्याला मोबदला न द्यावा तो देत

असेन; पण मी त्याची बायको पळवून गवगवा झाला म्हणजे 'तिची किंमत किती पाठवूं' म्हणून अपमानकारक निरोप तरी त्याला धाडीत नाही!

"लहरीपणाच्या माझ्यावरील आरोपाला हें उत्तर पुरें होईल. असो. माझ्या प्रजाजनांना स्वराज्य कसें हवें तें सांगतां न आलें म्हणून मी त्यांना दोष देत नाही; पण त्यांना तें विचारण्याबद्दल तूं मलाहि लहरी म्हणूं नको. त्यांचें अज्ञान प्रकट करण्याचा किंवा त्यांना लाजविण्याचा माझा हेतु नव्हता. उलट 'हवें तें मागा' असें आव्हान करण्यांत माझा अहंकार किंवा आढ्यता हीं कारणीभूत होतीं हेंहि तुझें म्हणणें बरोबर नाही. कारण राज्यावरील स्वत्व-बुद्धीचा निवृत्तीचा पुरावा मला एरवीं कसा देतां आला असता? कोणीहि सत्ताधारी या स्वत्वनिवृत्तीला मनांतून खरा तयार झाला म्हणजे त्याचें कर्तव्य संपतें. राजेलोक, संस्थानिक याना हें कळत नाही कीं, प्रजेला स्वराज्य देण्याला तयार होणें हीच पदभ्रष्ट न होण्याची उत्तम जामिनकी आहे. मीं तर बोलूनचालून राजपद बुडवायलाहि तयार आहें हें तूं जाणतोसच. राज्य देऊन टाकण्यापेक्षा तें घेऊन चांगलें चालविणें हेंच कठीण आहे. स्वराज्य नाही तोंपर्यंत तें मिळविण्याला जितके श्रम खर्चीं पडतात, तितके श्रम तें मिळाल्यावर त्याचें सुराज्य करण्याकरिता लोक खर्चतील तर पृथ्वीचें नंदनवन होईल. पण नाही त्याची हाव धरणें हा जसा प्रजेंतील मनुष्यधर्म आहे, त्याचप्रमाणे स्वार्थ सिद्ध असतां त्याच्या त्यागाला तयार होणें हाच मी राजधर्म समजतों.

आपण होऊन आरंभिलेलें सत्कार्य शेवटास नेऊन फलद्रूप करणें महाराजांना प्राप्तच नव्हे तर हौस वाटण्यासारखेंहि होतें. प्रजाजनाने नजराणा पुढे करावा, राजाने त्याला फक्त हस्तस्पर्श करून नजराणा करणाराला देणगी म्हणून तोच परत करावा, याच्या उलट प्रकार या दरबारांत घडला. प्रजेला राजा मानून तिला महाराजांनी स्वराज्याचा नजराणा दिला, पण तिने तो राजालाच परत केला! अर्थात् काय द्यावें काय राखून ठेवावें, याचा निर्णय करण्याची जबाब-दारी फिरून महाराजांवरच पडली. तो निर्णय करण्याकरितां त्यांनी मनोहराला बोलावून घेतलें होतें. पण तो म्हणाला, "या निर्णयाचें काम करण्याला सभेच्या अध्यक्षीणबाई अवश्य हव्या." ही परस्पर झालेली, पण मनांतून प्रिय असलेली, सूचना महाराजांनी तत्काल मान्य केली. आणि 'उद्या सकाळीं नऊ वाजतां प्रभाकरासह विमलाबाईसाहेबांना राजवाड्यांत घेऊन येण्याकरितां तूं स्वतः माझा खास रथ घेऊन जा' असें सांगून महाराजांनी त्याची रवानगी केली.

मनोहर दुसरे दिवशीं सकाळीं भाऊसाहेबांच्या घरीं जातो तों भाऊसाहेब अंथरुणावर उठून बसले होते. उजव्या बाजूला विमल संत्र्याच्या फोडी सोलून त्यांचे हातांत देत होती, डाव्या बाजूला प्रभाकर पडलेंसवरलें पुसून काढायला हातरुमाल घेऊन सज्ज बसला होता. आणि माईसाहेबहि सोवळ्यांत म्हणून बैठक सोडून दूर--अर्ध्या दाराच्या आड, अर्ध्या दाराच्या बाहेर– अशा पतिराजाचें कुटुंबवत्सलतेचें हें अभिनव कुतूहल पाहत उभ्या होत्या.

मनोहरपंत आत जातांच हा सुंदर चित्रपट अर्थातच थोडा गुंडाळून घ्यावा लागला. माईसाहेब आंत गेल्या, विमल व प्रभाकर दोघेंहि उठून उभीं राहिलीं, आणि 'इथेंच बसून क्षणभर बोलूं' असें मनोहरानें म्हटल्यामुळे त्यांनी खुर्ची ओढून पुढे ठेवली. तिजवर बसल्यावर विमलनें मनोहरांची ओळख भाऊसाहेबांना करून दिली. प्रभाकर खरोखरच निरपराधी, त्याला निर्दोषी म्हणून कायमचा बंधमुक्त करण्यांत आलें होतें व चौकशीला भिऊन दिवाणसाहेबांनी रात्रीं तोंड काळें करून पलायन केलें, या गोष्टी यापूर्वी परोपरीने विमलच्या प्रेमळ भाषणांनी ऐकून म्हातारा निम्मा-अधिक बरा झालाच होता आणि या सगळ्या गोष्टीला थोडेबहुत कारणीभूत आपल्या भेटीला आलेले मनोहरपंत हे होते, ही माहिती मिळाल्यामुळे भाऊसाहेब प्रसन्नमुख होऊन त्यांनी दोन दोन वेळां वर हात उचलून त्यांना नमस्कार केला.

मनो.--भाऊसाहेब, आपण भाग्यवान् आहा. प्रभाकरपंत व विमलाबाई अशीं अलौकिक दोन रत्नें आपल्या पोटीं आलीं, तेव्हा आपण धन्य आहां.

भाऊ.—खरें आहे. पण रत्नें जींत निपजतात, त्या मातीवाळूच्या खाणीला स्वतःला त्याची जाणीव कोठे असते ! रत्नांचा शोध दुसऱ्यांनीच करावा लागतो. त्यांचें तेज दुसऱ्यांनीच प्रकट करावें लागतें.

" आणि मग त्या तरी खाणीची कीर्ति 'हिऱ्यांची खाण' म्हणून जी होते ती यथार्थ असते ना ? " मनोहर म्हणाला.

मनोहराच्या या स्तुतिपाठाला लाजून विमल म्हणाली, " बाबा, हे दरबारी लोक. लोकांना हरभऱ्याच्या झाडावर चढविण्याच्या कामीं मोठे कुशल असतात." आणि आपली स्तुति कानांनी ऐकली तिचें हें असें निराकरण करून विषयच बदलावा म्हणून ती म्हणाली, " पण प्रायव्हेट सेक्रेटरीसाहेबांनी कां येणें केलें तें कळलें नाही अजून."

मनो.—निरोप्याने निरोप न सांगून कसें चालेल? मला महाराजांनीच इकडे आपणा उभयतांना राजवाड्यांत बोलवायला रथ देऊन पाठविलें आहे.

"कशाला?" विमलने खऱ्याखुऱ्या आश्चर्याने विचारलें.

मनोहर म्हणाला, "प्रभाकरपंताना अशाकरिता कीं, त्यांच्या संबंधाच्या बारा वर्षांतल्या, इथून जाण्यापूर्वीपासून परत येईपर्यंतच्या सर्व अद्भुत गोष्टी महाराजांना स्वस्थपणें सविस्तर ऐकायच्या आहेत; आणि आपणाला अशाकरिता कीं, सभेंत झालेल्या भाषणांच्या सूचनांचा निष्कर्ष काढून पुढील राज्यपद्धतीची कांही रूपरेखा आपल्या सल्ल्याने आखावी अशी महाराजांची इच्छा आहे."

दोन्ही हेतु सरळ, स्पष्ट व स्वाभाविक यामुळे कोणालाच आढेवेढे घेतां येईनात. मग मनोहर नको नको म्हणत असतां त्याला चहा देऊन झाल्यावर तीं तिघें रथांत बसून राजवाड्याकडे निघालीं.

---

२५ पाळीव पोपटाला स्वातंत्र्यदान

दरबार संपला त्या रात्रीं बराच पाऊस पडून हवा थंडगार झाली. दुसरे दिवशीं सकाळीं पाहावें तिकडे रम्य प्रसन्नता खेळत होती. निरभ्र आभाळांतील बालरवीचें सौम्य तेज प्राणिमात्राला सुखवीत व आनंदवीत होतें. राजवाड्याभोवतालच्या बागेंत, वृक्षांच्या राईतून व वेलींच्या गुंफांतून, पक्षी मनःपूत संचार करीत होते. त्यांचीं अस्फुट संभाषणें व प्रश्नोत्तरें परस्पर सुरू असून, प्रेमपाशांत सांपडलेले त्यांतले कोणी भावगीतें, व एकाकी वृत्तीचे कोणी स्वातंत्र्यगीतें, गात असावें असें वाटे!

आठ सवाआठ वाजण्याची वेळ. नवलराय आपल्या खासगी दिवाणखान्यांत येरझारा घालीत होता. मधून मधून कांही सुचल्या आठवल्यासारखें करून तो इकडची वस्तु तिकडे, तिकडची इकडे करून ठेवी. दिवाणखान्यांतल्या समग्र मांडणावळीकडे, एकदा दालनाच्या या टोकाशीं उभा राहून तर एकदा त्या टोकाशीं उभा राहून पाही. पण तो हें स्वतःच्या हौसेकरिता पाहत नसून, त्याच्या त्या कोणा पाहणाराच्या डोळ्यांना देखावा कसा दिसेल याविषयी त्याचे विचार चालू असावे. तो वांकडी मान करून पाही, पण ती

दुसऱ्या कोणाच्या चौकस दृष्टीने. स्वतःच्या अभिरुचीनें मांडणावळ मांडणें सोपें. पण दुसऱ्याच्या अभिरुचीची कल्पना मनाने करून, तिला अनुसरून मांडणावळ झाली आहे कीं नाही, याची कल्पना करावयाची हें काम जरा कठिणच नव्हे काय? असो. अखेर झाली ती मांडणावळ अशी होती—

दालनाच्या मध्यभागीं एक वाटोळें शिसवी टेबल. त्यावर बारीक कशिदा काढलेली तलम चादर. ती सरकूं नये म्हणून त्याच्या चारहि टोंकांना लटकावलेले जड शोभिवंत काचेचे गोळे. टेबलाच्या एका अंगाला रुप्याचें उंची कारागिरीचें पुडेदार कलमदान. जवळ सर्व प्रकारचें लिहिण्याचें सामान. सोनेरी चौकटींत घातलेलें सचित्र कॅलेंडर. टेबलावरच्या मध्यभागीं सुगंधी ताज्या सोनचाफ्याच्या फुलांचा गुच्छ खोवलेलें जुनाट जड चिनी फ्लॉवरपॉट. टेबलासमोर एका अंगच्या भिंतीच्या मध्यभागीं टांगलेल्या 'आई'च्या तसबिरीवर देशी गुलाबांच्या फुलांचा पायघोळ हार. तसबिरीच्या पायाशीं चंदनी लाकडाच्या चौपाईवर सोनेरी मुलाम्याच्या कमळाच्या छिद्रांतून शिलगावून ठेवलेल्या हातभर लांब लोंबत्या सुगंधी उदबत्त्या. वाटोळ्या टेबलाभोवती मांडलेल्या मखमली गादीच्या पांच खुर्च्या. दालनाच्या दोहो अंगच्या खिडक्या उघड्या असल्याने त्यांतून वाहणारा शितळ वारा आणि खिडक्याशीं येऊन भिडल्याप्रमाणें आंतील मनुष्याला बसल्या ठिकाणीं दर्शन देणारें सुंदर सृष्टिसौंदर्य.

या पांच खुर्च्यांपैकीं, आता एकीवर, मग दुसरीवर, याप्रमाणे आळीपाळीने पांचहि खुर्च्यांवर, एकएकदा बसून नवलरायाने समोरचा देखावा कसा काय दिसतो तें नीट पाहिलें. कदाचित् या खुर्च्यांवर बसणारीं इतर माणसें आल्यावर कोणाला कोठे बसवावें याचा विचार तो मनाशीं करीत असावा. आधी सामानावर धुरळा नव्हताच म्हणा, तरी मुद्दाम गड्याला हाक मारून त्याने त्याला सर्व सामान पुनः एकवार चट्दिशी पुसून घ्यावयाला सांगितलें. त्याला पोषाखाच्या छानछोकीचा किंवा आरशांत वरचेवर आपलें तोंड पाहून साफ करण्याचा नाद नव्हता. पण आज इकडे तिकडे न्याहाळून अंगांतील सदरा झटकून, डोक्यावरील टोपी नीट करून, त्याने एकवार ओझरतें आरशांत डोकावलेंहि!

आज नवलरायाच्या भेटीला कोण येणार होतें याची कल्पना वाचकांना आलेलीच आहे. पूर्वी एकदा विमल येऊन बाहेरच्या दालनांत त्याला भेटली

होती. पण सनद मागण्याकरिता आलेली अर्जदारीण म्हणून ! मध्यंतरी किती तरी गोष्टी घडल्या, व आज फिरून ती जी भेटीला येणार तिचा दर्जा व मान किती तरी वाढला होता ! अर्जदारीण कोणीकडे व प्रजापरिषदेच्या अध्यक्षीणबाई कोणीकडे ? महाराजांच्या बरोबरीचा तिचा मान ! अनेक कामांत विमलचें बुद्धितेज प्रकट होऊन तिची छाप नवलरायाला गांगरून टाकण्याइतकी त्याच्यावर पडली होती.

स्वाभिमानाला योग्य इतका अहंकार त्याच्यामध्येंहि होता; पण प्रेमाचें बीज मनांत रुजलें म्हणजे, मग वाढत्या प्रेमवृक्षाचीं मुळें त्या अहंकाराचा सर्व ओलावा हळूहळू शोषून घेतात. त्याप्रमाणे विमलसंबंधाने तरी नवलरायाचा अहंकार किंबहुना स्वाभिमानहि, नष्ट होऊन तो मनाने तिच्या अधीन झाला होता. अशी ती आपली प्रणयदेवता घरीं भेटीला येणार यामुळे त्या भेटींत तिच्याशीं काय बोलावें, कसें बोलावें, या विचाराने तो सहजच गोंधळून गेला होता.

पण भेटींत बोलण्याचा मुख्य विषय ठरलेलाच होता, फक्त त्या विषयाला काय फाटे फोडतां येतील हें वेगळें. म्हणून पावणेनऊ वाजले असें पाहून नवलरायाने प्रजापरिषदेच्या हकीकतीचे कागद हातांत घेतले व ते चाळीत टेबलाजवळच्या एका खुर्चीवर तो बसला. पण त्याचें सर्व लक्ष कागदांतील शब्दांपेक्षा विमल ज्या आपल्या रथांत बसून येणार त्याच्या चाकांच्या शब्दांकडेच अधिक होतें. नवाच्या ठोक्याबरोबर सरकारी रथ आगाशींत येऊन थांबला. त्यांतून मनोहर, विमल व प्रभाकर हीं उतरून जिना चढून वर आलीं. नवलराय उठून उभा राहिला व त्याने सर्वांचें स्वागत केलें. खुर्च्यांवर बसतांना नवलरायासमोर विमल आणि मनोहरसमोर प्रभाकर बसावे अशी योजना मनोहराने, चपळतेने पण कोणाच्या लक्षांत न येऊं देतां केली.

आज नवलरायानेच आपण होऊन बोलण्यास सुरुवात केली. तो म्हणाला, "विमलाबाई, प्रभाकरपंत, तुमच्याशीं मला पूर्वी जें मोकळ्या मनाने बोलतां येत नव्हतें तें आज बोलतां येणें शक्य झाले याबद्दल मला फार फार आनंद होतो. पूर्वी न्यायविषयक राजकर्तव्याने माझी दातखिळी बसली होती असें म्हटलें तरी चालेल ! मीं आपल्या रीतीने गुप्त चौकशी केली, तींत प्रभाकरपंत, तुमच्यावरचे सर्व आरोप खोटे बनावट असल्याचें मला कळलेंच होतें. पण या प्रकरणाला जें तोंड पाडायला पाहिजे होतें तें तुम्ही धैर्याने नवलपुराला परत आल्यानेच पडलें. तुम्हाला तुरुंगांत ठेवण्याचा शिष्टाचार मला कायद्याच्या

दृष्टीनें अपरिहार्य होता. आणि फेरचौकशीचा आग्रह तर नुसता न्यायाचाच होता असें नाहीं; तर दिवाणसाहेबांनी कोर्टांत फिर्यादी साक्षीदार म्हणून तोंड उघडतांच त्यांचे दांत त्यांच्या घशांत पडण्याचा त्यांत योग होता; यामुळे तुमचा तुरुंगवास चार दिवस लांबला तरी चालेल असें मीं मनानें ठरविलें. पण हें अग्नि-दिव्य करण्याला दिवाणसाहेब थांबले नाहीत, पळून गेले, मोंगलाईंत गेले. यामुळें न्यायाचा खरा प्रकार काय होता याविषयीं तुमच्या माझ्या शत्रूलाहि शंका घेण्याला जागा उरली नाही. आज स्वतंत्र नागरिक या नात्यानें मी तुमचें स्वागत तर करतोंच पण माजी कारकीर्दीच्या बिकट प्रसंगीं तुम्ही नागर स्त्रियांच्या अब्रूरक्षणाचें काम हातावर शीर घेऊन केलें याबद्दल मीं धन्यवाद द्यावे तितके थोडेच होतील."

नंतर प्रथम प्रभाकराची हकिकत मूळपासून विचारून घेण्याला नवलरायानें सुरुवात केली. ती सांगतांना फटकळ तोंडाच्या व मनाच्या प्रभाकरानें जुन्या कारकीर्दीतील दुष्कृत्यांचें असें शब्दचित्र रंगविलें कीं, मधून मधून नवल-रायाला उद्वेगानें व विमलला स्त्रीलज्जेनें खाली मान घालवी लागली; पण फरारी झाल्यानंतर मोंगलाईंतले आपले अनुभव प्रभाकरानें सांगितले तेव्हा अद्भुतरस चांगलाच रंगला आणि नवलराय व मनोहर यांचेबरोबर विमलहि मोकळ्या मनानें मोठ्यानें हसत होती.

प्रभाकराची हकीकत सांगून संपल्यावर मग महाराज जागचे उठून प्रभाकर-जवळ गेले, व त्याचे खांद्यावर हात ठेवून म्हणाले, "राजसत्तेला आधारस्तंभ वाटेल तितके मिळतात. केवळ पैसाहि तें काम करतो. पण प्रजाजनांची अब्रू राजाविरुद्ध त्याला प्रतिकार करून सांभाळण्याचें काम आत्मस्फूर्तीनें व धडा-डीनें अंगावर घेणारे तुमच्यासारखे लोक यांना जनतेनें बक्षीस काय द्यावें?"

"बक्षीस!" प्रभाकर हसून म्हणाला "हंः बक्षीस कोण लेक मागतो? पण माझ्यासारखा एखादा परका मनुष्य केवळ या आपल्या नागरिक-भगिनी म्हणून त्यांची अब्रू संभाळण्याकरिता जितका स्वार्थत्याग करण्याला तयार होतो, तितका स्वतःच्या मुलीबाळींकरिता करण्याला प्रतिष्ठित म्हणविणारे नागरिक तयार होत नाहीत हें आश्चर्य नव्हे काय? माझ्यावर आरोप आणण्यांत आला तो अर्थातच खोटा होता. पण महाराज, मी असा वाईट माणूस आहे कीं, जर का एखाद्या कुलस्त्रीची अब्रू

घेतांना एखादा राजाधिकारी मला दिसला, तर त्याचा खून माझ्या हातून होणार नाहींच असें मात्र मला सांगवत नाही."

शेवटीं प्रभाकराने तालमीची वेळ झाली म्हणून जाण्याविषयी परवानगी मागितली. पण महाराजांनी ती दिली नाही. महाराज म्हणाले, "मग स्वराज्य-घटनेच्या कामीं आम्हाला तुम्ही कांहींच मदत करणार नाही तर ?"

प्रभाकर हसून म्हणाला—

"ती घटनाबिटना कांही आपल्याला कळत नाही, तें सगळें इकडे विचारा !!" असें म्हणून त्याने आपल्या बहिणीकडे बोट केलें आणि पुढें तो म्हणाला, "हिला पुरुष बनवून एखादें राज्य तिच्या हातीं देवाने दिलें असतें तर तिने स्वराज्यच्या स्वराज्य आणि सुराज्यच्या सुराज्य दोनहि खाशीं संभाळलीं असतीं."

मनोहर असली संधि दवडणार ? तो म्हणाला, "राज्यकारभार हातीं यायला कोणाला पुरुषाचा जन्मच कशाला हवा ? आजपर्यंत स्त्रियांनीहि राज्यें चालवून कीर्ति मिळविलेली आहे. आता त्यांत आपलपोटेपणा आहे असें वाटलेंच, तर त्यांनी त्या कीर्तीचा लाभ देऊन कोणा भाग्यवान पुरुषांना सहकारी अंशभागी करावें म्हणजे झालें." नाजुकपणाकडे झुकणाऱ्या या संभाषणाचें मर्म लक्षांत येण्याइतका आपला भाऊ मार्मिक नाही हें ध्यानांत आणून विमल किंचित् विरमली !

महाराज पुढे कांही तरी बोलावें म्हणून म्हणाले, "विमलाबाई, प्रभाकर-पंतासारखा भाऊ तुम्हाला लाभला या तुमच्या सद्भाग्याची वाखाणणी कोण किती करील ? अशा रीतीने सुशिक्षण, चारित्र्य, मातृपितृप्रेम, बंधुप्रेम या सर्व गुणांनी आमच्यापेक्षा वरिष्ठ अशा तुम्हाशी यापूर्वी अधिक मोकळेपणाने मला बोलतां न येण्याला, हें न्यायदानाचें प्रकरण कारण झालें त्याबद्दल मला क्षमा कराल ना ?

या विनयाने विमल भारून जाऊन तिला काय उत्तर द्यावें हें सुचेना. ती इतकेंच म्हणाली कीं, "त्यांत क्षमा कशाबद्दल ? मोठेपणाच्या अडचणी गैरसोयी कोणाला कधी चुकल्या आहेत ? "जया अंगीं मोठेपण तया यातना कठीण" असें तुकारामाने म्हटलेंच आहे. "तेव्हा मनोहर म्हणाला, "आणि शेक्स्पिअरहि तेंच म्हणतो, 'Uneasy lies the head that wears a crown.' तरी, आमच्या महाराजांनी संस्थानच्या तिजोरींतला

राजमुकुट डोक्यावर कधी घातला नाही ! इतकेंच काय पण तो बाहेरहि कधी दृष्टीसमोर काढूं दिला नाही."

नव.—आणि आज तुम्हा दोघांनी माझी स्वराज्यदानाची योजना मंजूर केली म्हणजे तो मुकुट कायमचा बाहेर काढून जवाहिऱ्यांकडे मोडीलाच घालणार आहें मी ! तो नुसत्या आपल्या वजनानेंहि डोकें दुखायला लावण्याइतका जड आहे. मग आपल्या राजकीय पापाच्या व्याधीने तो शहाण्या राजाला वेडहि लावायचा !

मनो.—पण महाराज, बर्कची कोटी आठवते आपणाला ?

नव.—ती कोणती ?

मनो.—What is majesty but a jest when deprived of its externals. Majesty या शब्दांतली M and Y हीं आद्यंत अक्षरें काढून घेतलीं म्हणजे राजपद ही निवळ थट्टा उरते !

नव.—बर्कचें म्हणणें बरोबर आहे. पण जे राजे तसे असतील त्यांच्या पुरतें. मी नांवाने राजा असलों तरी केवळ त्या पदाच्या जोरावर विभूतिमत्वाचा हक्क सांगणारा नाही. उलट माझ्या अंगीं जर कांही खरेंच मोठेपण असेल तर तें राजमुकुट फेकून देऊनहि दिसून येईल ?

विमल—महाराजांनी राजमुकुट जवाहिऱ्यांकडे मोडीला घालण्याचा हेतु दरबारांत जाहीर करविला तेव्हाच तें दिसून आलें आहेच कीं ! बर्कचें सुभाषित महाराजांनी आधींच खोटें पाडलें आहे ! राजाच्या मुकुटापेक्षा त्याच्या मेंदूचेंच मूल्य अधिक असावें. नेपोलियन बोनापार्टचा राजमुकुट लाथाडणाऱ्या त्याच्या शत्रूंनी, त्याचा मेंदु काढून घेऊन ती एक अद्भुत वस्तु म्हणून अजबखान्यांत ठेवली असें मीं नुकतेंच कोठें वाचलें आहे !

मनो.—पण राजमुकुट हें राजचिन्ह आहे तें मोडीला घालणें म्हणजे राजपदाचा उघड नाश करणें नव्हे काय ?

नव.—पण तितकी मोठी मनाची तयारी झाल्याशिवाय प्रजा मागेल तें देण्याची माझी जाहीरनाम्यांतली प्रतिज्ञा कशी सफळ होणार ?

विमल—महाराज म्हणतात तेंच बरोबर आहे. आमच्या स्वयंपाकघरांतला बायकी न्यायहि असाच आहे.

मनो.—तो कसा ?

विमल—पाहुणा जेवायला बोलावला तर तो पुरे म्हणेपर्यंत वाढण्याची

सुगृहिणीची तयारी हवी. तो बहुधा चार घांसांइतकें पानांत पडतांच पुरेपुरे म्हणतो हें निराळें; पण वाढणारणीचें ताट पूर्ण भरलेलें असेंच स्वयंपाकघांतून बाहेर यायला पाहिजे. "आणखी थोडें वाढा" हे शब्द पाहुण्याला उच्चारायला लावणारी ती गृहिणी कसली? ती खाणावळीणच म्हणावी!

मनो.—पण राजपदाचा नाश करण्याचा राजालाहि अधिकार नाही, त्याचें काय?

नव.—तें काय म्हणून? मिळकतीचा नाश करण्याच्या हक्काशिवाय तिच्यावरील स्वामित्वाच्या हक्काची पूर्णताच होत नाही?

मनो.—पण राजपद हें दुलग आहे. प्रजेला तें राखायचें असेल तर, तें बुडविण्याचा राजालाहि अधिकार नाही!

नव.—तें पण प्रजेने वाटेल तर खुशाल राखावें. पण मग मला राजा निवडण्याचा हक्क आपणाकडे घ्यावा.

मनो.—असो. काय चाखावें अन् काय राखावें याचें शहाणपण स्त्रियां-इतकें पुरुषांना असत नाही हें मला मान्य आहे. जेवणाराची तृप्ति करून शिवाय भरलेलें ताट परत स्वयंपाकघरांत नेणाऱ्या गृहिणीप्रमाणे, प्रजेला काय द्यावें व राजाकडे काय ठेवावें याचा निर्णय आता विमलाबाईनीच करावा! सभेच्या अध्यक्षीणबाई या नात्याने प्रजेचें मुख होण्याचा मान त्यांना लाभलाच आहे आणि महाराजांनीहि आपलें मुख त्यांना अर्पण केलें— अर्थात् आपल्यातर्फे बोलण्याचा अधिकार त्यांना दिला— म्हणजे दोन पक्षांची तोंडमिळवणी कशी करावी हें त्याच उत्तम रीतीने ठरवितील.

नव.—पसंत आहे कल्पना मला. या प्रजाजनांच्या मुखाप्रमाणे माझेंहि मुख, म्हणजे प्रतिनिधि, विमलाबाई होतील तर तो अधिकार मी त्यांना आनं-दाने देईल. शिवाय आणखीहि एक औचित्य आहे त्यांत.

मनो.—तें काय बुवा? आज आपणाला बऱ्याच गोष्टी आठवूं लागल्या तर?

नव.—स्वराज्यप्राप्तीच्या दृष्टीने माझ्या राज्यांतल्या प्रजेला आज हा वसंतागमच होय आणि वसंत प्राप्त झाला म्हणजे अरुणोदय जाहीर कर-ण्याची कामगिरी कोंबड्याकडून जाऊन ती कोकिळांकडे येते हें प्रसिद्धच आहे नव्हे का.

मनो.—भले! जाहीरनाम्याप्रमाणे सर्वस्व देण्याचा उदारपणा सर्व तुमचा;

आणि उद्या योजनेंत दिसून येणारा राखून ठेवण्याचा कृपणपणा सर्व विमलाबाईंचा, असा स्वार्थी धूर्त डाव दिसतो महाराज आपला ? ”

नव.—मनोहर, मला कोणी उदार न म्हटलें तरी चालेल, पण उदारपणाचा आव आणणारा कृपण म्हणजे ढोंगी अप्रमाणिक असें मला कोणी म्हणूं नये, इतकीच माझी आकांक्षा आहे. माझ्या त्यागाची परीक्षा घेण्याला कोणी सिद्ध होईल तर मी ती देऊं शकेन. राजमुकुट मोडीला घालायला तयार असल्याचें आताच मी बोललों. या बसल्या बैठकीला, मनोहर, तूं किंवा विमलाबाई, स्वराज्यदानाची जी कोणती योजना प्रजेच्या इच्छेनुरूप कागदावर लिहितील तिजवर मी सही करीन. पैकी तूं मनोहर, कृपणांतला कृपण! तेव्हा तूं कांही न देतां सगळेंच राखून ठेवशील हें दिसतंच आहे. विमलाबाई तुझ्यापेक्षा पुष्कळच अधिक उदार आहेत. त्या प्रजेला कांही तरी हक्क खास देतील. तुमची भीति मला वाटते, म्हणूनच! एरवी स्वराज्याची योजना कागदावर मांडायला तुम्ही दोघे मोकळ्या मनानें संमति द्याल तर, माझ्या मनांत प्रजेला किती काय द्यावयाचें आहे हें तुम्हाला बसल्या बैठकीला कळेल; आणि त्याची थोडीशी लाक्षणिक पण दृश्य कल्पना तुम्हाला यावी म्हणून—

इतकें म्हणून महाराज खुर्चीवरून उठले, खिडकीशीं टांगलेल्या पितळी पिंजऱ्याचें दार त्यांनी उघडून वर उचललें, त्यांतील पंचरंगी पोपट काढून हातावर घेतला, हार घातलेल्या ‘आई’च्या तसबिरीकडे एकवार पाहिलें आणि पोपटाला मुठींत धरून त्यांनी खिडकींतून बाहेर उडून जाण्याकरिता फेकून दिलें.

सर्व गोष्टी अभावितपणें एका क्षणांत घडल्यामुळे, इतर मंडळींना कौतुकास्पद नजरेने नवलरायाकडे पाहण्याशिवाय दुसरें काय करतां येणार होतें!

पण प्रभाकराला इतक्या वेळांत या क्षणीं मात्र वाचा फुटली. तो आपल्या उजव्या हातानें डाव्या हातावर मोठ्यानें टाळी वाजवून आनंदाची गर्जना करून म्हणाला, “ वाहवा, बहाद्दर, महाराज आपलें अंतःकरण खऱ्या राजाला शोभेल असें आहे. स्वराज्यदानाच्या वल्गना करतांना शेजारीं पिंजऱ्यांत आवडता म्हणून पोपट कोंडून ठेवणें हा ढोंगीपणाचा पुरावाच ठरला असता. जो यःकश्चित् पोपटाला स्वातंत्र्य देत नाही तो प्रजेला काय देणार हें दिसतेंच आहे, असें मीं तरी मनांत म्हटलें असतें.

मनोहर म्हणाला, “ विमलाबाई, आमच्या महाराजांना त्यांच्या स्वातंत्र्यप्रियतेंत तुमचा भाऊ हा चांगलाच जोडीदार शोभतो खरा! ” महाराज

म्हणाले, 'विक्षिप्तपणांत' असें तुला मनांतून म्हणायचें असेल; पण बोलण्याला थोडी मुरड घातलीस इतकीच कृपा आम्हां दोघांवर!

पण दोघांहि मित्रांना सावरून घ्यावें म्हणून विमल म्हणाली, असा स्वभावभेद मित्रामित्रांमध्यें चांगला शोभतो. माझ्या दादाला कोणी विक्षिप्त म्हटलें, म्हणजे मी त्याचा अर्थ लोकोत्तर असाच करतें. लोकोत्तर अशीं मोठीं कार्यें हातून व्हावयाचीं तर स्वभावांत असा थोडासा विक्षिप्तपणा असल्याशिवाय चालत नाहीं. अगदी सरळ रेषेपेक्षा किंचित् वक्ररेषा (कर्व्ह) हीच सौंदर्य प्रकट करावयाला अधिक उपयोगी पडते म्हणतात!

मनोहर किंचित् खेददर्शक स्वरानें म्हणाला, आपल्या आईने फार दिवस संभाळून तुमच्या स्वाधीन केलेला पोपट, महाराज, तुम्ही असा सोडून द्याल असें मला वाटलें नव्हतें.

नव.—अरे, मनोहर, प्रेमाचा मोह म्हणतात तो हाच. आजपर्यंत त्या पोपटाकडे पाहून मला आपल्या आईचें स्मरण होई म्हणून तो मीं ठेवला होता हें खरें. पण आजच सकाळीं मनांत असें आलें कीं, बंद केलेल्या पिंजऱ्यांतील पोपटाकडे पाहून मला जशी आईची आठवण होऊं शकेल, तशीच पिंजरा रिकामा पाहूनहि कां न व्हावी? भोगाप्रमाणे त्यागहि जर सत्स्फूर्तीच्या कामीं उपयोगी पडण्यासारखा असला, तर त्यांतल्या त्यांत त्यागाचा अवलंब करणेंच अधिक श्रेयस्कर नाही काय? आमच्या आईचें पोपटावर प्रेम नव्हतें असें मी कसें म्हणूं! त्याला दाणापाणी घातल्याशिवाय तिने स्वतः अन्नग्रहण कधीहि केलें नाही हें मला माहीत आहे. पण तिनें त्याजवरील आपल्या प्रेमाचा मोबदला त्याच्या बंदिवासाने घेतलाच कीं नाही? पाळीव प्राण्यावर प्रेम करावें व आपण तें करतोंहि. पण त्या प्राण्याप्राण्यांत फरक असतो कीं नाही? पायानें लाथाडलें तरी मांजर दूर होत नाही. अशा कोडग्याला पिंजरा कोण करील? तो प्रेमाचा विषय पळून जाण्याची भीति नाही; पण पोपट हाहि प्रेमाचा विषय असला तरी तो पळून जातो. आपल्या प्रेमापेक्षा त्याला त्याचें स्वातंत्र्य अधिक प्रिय असतें, म्हणून आपण त्याला बंदिवान करून ठेवतों ना? पण हा काय न्याय झाला?

इतक्यांत अशी मौज झाली कीं, नवलरायाने बाहेर सोडून दिलेला पोपट खिडकींतून परत आंत आला; मात्र तो पुन्हा पिंजऱ्यांत न शिरतां फुलाचा हार घातलेल्या तसबिरीच्या चौकटीवर येऊन बसला. आणि 'नवल नवल'

असा शब्द करूं लागला. सर्व मंडळी आश्चर्यचकित झाली. पोपट उडून प्रथम दूरच्या झाडावर जाऊन पुढे आणखी कोठे तरी निघून जाईल, पण फिरून परत येणार नाही, अशी त्यांची खात्री मनांतून होती. म्हणून झाला प्रकार पाहतां त्याचा अर्थ काय करावा हें त्यांना समजेना. तेव्हा प्रचीतीच पाहावी म्हणून नवलरायाने तसबिरीशीं जाऊन पोपटाला हातावर ठेवलें, व त्याला कुरवाळून त्याचें चुंबन घेतलें. मग उघड्या दारांतून त्याला पिंजऱ्यांत कोंडला तर तो जातो कीं काय हें पाहावें म्हणून नवलराय पिंजऱ्याशीं गेला. पण पोपटाने सर्कशींतील श्वापदाप्रमाणे आंत प्रवेश केला तर नाहींच, पण आपले पंख जोराने फडफडीत चोचीने नवलरायांचे हाताला घट्ट धरलें, मात्र कडकडून चावा घेतला नाही. हें पाहून सर्वजण कौतुकाने हसूं लागले. प्रभाकर उसळून टाळी वाजवून म्हणाला, “ जीते रहो पठ्ठे ! स्वातंत्र्यप्रेम, ऋणानुबंध आणि कृतज्ञता यांचा तूं चांगलाच मेळ घातलास.” मनोहर हसून म्हणाला, “ पण त्याला मनुष्याचा सहवास प्रिय असेल तर त्याने पिंजऱ्यांतच राहणें इष्ट रे बाबा ! नाही तर मांजर मटकावील त्याची वाट काय ? पिंजऱ्यांत पोपटाला ठेवणें ही कैदशी दिसते, पण खरोखर तें त्याचें प्रेमपूर्वक संरक्षणच होय.”

इतक्यांत खरोखरच अशी मौज झाली कीं, नवलरायाच्या सवयीचें पाळीव मांजर दिवाणखान्यांत आलें. त्याबरोबर पोपटाला पाहून मांजर व मांजराला पाहून पोपट दोघेंहि कावरींबावरीं झालीं ! आता पुढे काय प्रकार होतो हें पाहण्याला सर्वजण उत्सुक होऊन तटस्थ बसले. कधी हातीं न लागणारा मांसाचा गोळा पाहून मांजराने नवलरायाच्या हाताकडे उडी घेण्याची तयारी केली; पण तें पाहून पोपटहि हातावरून उडून दिवाणखान्यांतल्या उंच आढ्यावर जाऊन बसला व ‘नवल नवल’ असा शब्द करूं लागला. कोणाला वाटेल, आपण कशी मांजराची फजिती केली या जाणिवेने तो आनंदला असावा ! मांजर फजीत व हताश होऊन नवलरायाच्या तोंडाकडे पाहूं लागलें. त्याबरोबर नवलरायाने उठून तो पितळी पिंजराच कडींतून काढून, खिडकीशीं जाऊन, बाहेर फेकून दिला आणि तो म्हणाला, “ मनोहर, पूर्वी मीं पोपटाला बाहेर सोडून दिलें असतां फिरून तो आंत आला असें पाहून त्याला स्वातंत्र्य आवडतच नाही अशी खोटी कल्पना मीं केली आणि फिरून कोंडण्याकरिता त्याला पिंजऱ्याच्या दाराशीं नेण्याचा मोह मला झाला. आता पिंजराच हा असा फेकून दिल्याने त्याच्या व माझ्या मोहाला जागाच उरली नाही ना ! बोल, आता संस्थानी प्रजेला स्वातंत्र्य देण्याची माझी भाषा ही खरी मनापासून आहे कीं वरपांगी ढोंगीपणाची आहे ? ” मनोहर निरुत्तरच झाला.

२६ ‘सत्य संकल्पाचा दाता भगवान्!’

महाराज विमलला उद्देशून म्हणाले, “विमलाबाई, आमच्या मनोहराला असें वाटतें कीं, स्वराज्यदानाचा जाहीरनामा मीं काढला, स्वराज्यनिर्णयाकरिता दरबार भरविला, आणि सभेच्या रीतीने राजकीय सुधारणांची चर्चा करविली, हा सगळा शुद्ध लहरीपणाचा खेळ मीं केला! कपट किंवा ढोंग इतकें कठोर नांव त्याला तो देत नाही हा त्याचा माझ्यावर फक्त मित्रप्रेमामुळे उपकार आहे इतकेंच. पण तुम्हाला तरी तसें वाटत नाही ना! या कामीं मीं तुमच्या प्रेमळ—नव्हे चुकलों—प्रांजळ उद्गाराचा भुकेला आहे.” मनोहर म्हणाला, “कां बरें मीं तसें म्हणूं नये? या बसल्या बैठकीलाच पाहा ना, प्रांजळ अन् प्रेमळ या शब्दांची अदलाबदल, महाराज, तुम्हीं कशी शिताफीने केली ती! तुम्हा राजे लोकांच्या भाषेवर कोणी विश्वास ठेवावा?” विमल प्रौढपणाने हसून म्हणाली, “मनोहरपंतांच्याहि प्रेमळपणामुळेच त्यांच्या शब्दांत प्रांजळपणा नसतो.”

इतक्यांत प्रभाकराला जांभई आली. ती आपणाला समजली असें भासविण्याकरिता मनोहराने हाताने चिटकी वाजवून तोंडाने मोठ्याने कृष्ण कृष्ण असें म्हटलें! आणि प्रभाकराला उद्देशून तो म्हणाला, “प्रभाकरपंत, तुम्हीं तालमीकडे जाण्याची परवानगी मघाशींच मागितली होती. चला, मीच तुम्हाला पोंचवून येतों. महाराज राज्याचे धनी; ते प्रजेला राज्य वाटून देणार, आणि विमलाताई प्रजाप्रतिनिधि म्हणून त्या तें वांटून घेणार! यांत तुमचा आमचा काय संबंध? प्रजेची कोतवाली प्रेमाखातर करणारे तुम्ही ‘फुकट फौजदार,’ आणि राजमित्राची खासगी चिटणिशी प्रेमाखातर करणारा मी ‘फुकट प्रायव्हेट सेक्रेटरी’! आपल्याला प्रेमाच्या आनंदाखेरीज या राज्याच्या वांटणींत दुसरा कांही स्वार्थ नाही म्हणून लाभहि नाही. चला तर आपण आपला वेळ या रूक्ष कारभारांत फुकट कां दवडा? तुम्हाला तालमीकडे पोंचवीन, आणि परत येतांना तसाच तार ऑफिसांत जाऊन एक जरूरीची तार करावयाची आहे पो. एजंटसाहेबांना, तीहि करून येईन म्हणतों.

असें म्हणून स्वतः मनोहर व त्याच्या सूचनेवरून प्रभाकर दोघेहि उठले, व जिन्याकडे जाऊं लागले. महाराज हसून म्हणाले, “आयत्या वेळीं दगा देणें हेंच प्रायव्हेट सेक्रेटरीचें ब्रीद. तें तूं न पाळशील तर प्रा. सेक्रेटरी कसला? येथे

बसून आम्हाला चर्चेंत मदत करावयाचें सोडून चाललास कोठें? मनोहर तोंड मागे फिरवून हसून म्हणाला, " ज्याचें काम त्यालाच कळतें. माझें काम मी करतों. आपलें आपण करा. मी योग्य वेळेवर पुन्हा हजर होईनच."

कोण द्वाड खट्याळ माणूस तरी, हा मनोहर! नवलराय व विमल या दोघांनाच एकत्र बसलेलीं सोडून, प्रभाकरालाहि बरोबर घेऊन, निघून गेला; आणि निदान पाऊण तास तरी तो परत येण्याचा संभव नाही. कारण तार ऑफिस साडेदहा वाजल्याशिवाय उघडत नसतें म्हणे! बरें तर बरें, उरल्या दोघांना भरपूर बोलावयाला संस्थानी प्रजेला स्वराज्यदान हा व्यापक विषय होता. नाही तर त्या बिचाऱ्यांनी काय करावें? एकमेकांविषयीं आदरबुद्धीने मनें इतकीं काठोकाठ भरून गेलेलीं कीं, किंचित् बेसावधपणा झाला तर प्रणयभावनेने आर्द्र झालेला एखादा उद्‌गार किंवा शब्द तोंडांतून निघून जावयाचा आणि या सावधपणाने खरोखरच त्या दोघांमध्ये प्रथम कांही वेळ अबोलेपणाचें स्वरूप आलें होतें. बरें, न बोलतां त्या दोघांनी एकमेकांकडे पाहावें तरी पंचाईत; न पाहावें तरी पंचाईतच! पाहावें तर डोळे जिभेपेक्षा अधिक बोलतात; न पाहावें तर मुद्दाम नजर चुकविल्यासारखें होतें. वर पाहावें तर अंतःकरण उघडें पडतें; खाली मान घालावी तर भित्रेपणा प्रकट होतो. टेबलावरच्या पदार्थांतहि असें कांही नव्हते कीं, त्यांचा चाळा हाताने करून तो पाहण्याच्या निमित्ताने डोळे खाली करतां येतील व लक्ष दुसरीकडे गुंतलें आहे असें भासवितां येईल. प्रत्येकाची इच्छा हीच कीं, दुसरा आधी कांही बोलेल. मग आपण बोलावें; पण दोनच माणसें हजर असतां दोघांनीहि हाच एक विचार केला तर संभाषण सुरू कसें होणार? शेवटीं विमलला बोलावणें पाठवून आपण आणविलें, तेव्हा अडचणी सोसून, सर्व चुका पदरांत घेऊनहि, संभाषणाला प्रारंभ आपणच केला पाहिजे असें ध्यानांत येऊन नवलराय म्हणाला, " विमलाबाई, मग तुम्ही आता आपला सल्ला देणार ना?"

विमल—मला सुचेल तें मी सांगतें. पण राजकारणाचा अनुभव मला नाही. यामुळे मी सुचवीन तें बरोबर असेल कीं नाही, याविषयीचा आत्मविश्वास वाटत नाही. आपली गोष्ट किती झाली तरी वेगळी आहे.

नव.—ती वेगळी कशी?

विमल—कांही नाही तरी माझ्यापेक्षा चारदोन पावसाळे आपण जास्त पाहिले आहेत.

नव.—शहाणपण वयावर अवलंबून असतें, तर वयाचीं वर्षें व शहाणपण यांचें कोष्टकच मुलांच्या उजळणींत घालण्यांत आलें असतें.

विमल—पण वय सोडून दिलें तरी राजपदाचे अधिकार या नात्यानें माझ्यापेक्षा आपला अनुभव अधिक आहे कीं नाहीं ?

नव.—तेंहि मला मान्य नाहीं. कारण राजपदावरील जीवन हें चौकटींत बसविलेल्या चित्राप्रमाणें आहे. त्याला चौफेर इतके तणावे असतात कीं, त्याची चलनवलनाची सर्व शक्ति नष्ट होते. उलट, विमलाबाई, तुमच्यासारख्या स्त्रीचें जीवन सुपीक जमिनींत स्वतंत्रपणें वाढणाऱ्या लतावृक्षांसारखें आहे. आंत जिकडे बुद्धीला व भावनेला जीवनाचा ओलावा मिळेल तिकडे तुमच्या अंतःकरणाच्या मुळ्या वाट काढतील; आणि बाहेर जिकडे निरोगी उन्हाची ऊब मिळेल तिकडे तुमच्या सत्प्रवृत्तीचे अंकुर धाव घेऊ शकतील. मी तुमच्या घरगुती गोष्टींचा उल्लेख करूं नये, पण तुमचे आईबाप व भाऊ या तीन स्वभावाच्या तीन माणसांच्या कुटुंबांत तुम्ही जो सुंदर मेळ यशस्वी रीतीनें घातला त्यावरून एखादें राज्य चालवून त्यांतील अनेक विरोधी वर्गांच्या हितांची तोंडमिळवणी करण्याची मुत्सद्देगिरी तुमच्या अंगीं आहे असें कोणीहि म्हणेल.

विमल—इतर कोणी तसें म्हणो बिचारे; पण श्रेयाचा तेवढा मोठा वांटा आपणाकडे घेण्याला मी तयार झालें पाहिजे ना ? कारण माझ्या कुटुंबांतील तीन माणसांचे स्वभाव तीन प्रकारचे असले तरी, तीं माझ्यावर आपापल्या परीनें किती प्रेम करतात याची पूर्ण कल्पना आपणाला कदाचित् नसेल. या प्रेमामुळेंच त्यांचे मधुर मीलन मला करतां येतें. आणि आपणापुढे असलेल्या राजकारणी विषयांत झालें तरी तेंच एक मर्म आहे. आपल्या प्रजेंतील सर्व वर्गांचें प्रेम आपणावर आज पूर्ण आहे. उलट त्यांच्याकरिता सर्व त्यागाकरितां आपणहि तयार आहां. अशी तयारी दोहों अंगें आहे ती टिकली तर, आपल्या नवलपूर संस्थानांत स्वराज्य व सुराज्य यांचा सुंदर मेळ पडेल. राज्यघटनेंत काय आहे ? स्निग्ध, सुगंधी मेणाचा गोळा हाताशीं तयार असल्यावर निरनिराळ्या छापांतून निरनिराळीं चित्रें बनविणें हें सोपें काम आहे. रुचिवैचित्र्याच्या समाधानाकरिताच निरनिराळे छाप करावयाचे म्हणून ते वरचेवर बदलूंहि शकतात !

नवल.—मग आजच्या ताज्या व्यवहाराकरिता आपण स्वराज्यदानाच्या कोणत्या नमुन्याची शिफारस मला लिहून देता ?

विमल --या नमुन्याचीं दहापांचच अंगें आहेत, व तीं मी डोळे मिटून तोंडानेहि आपणाला सांगू शकेन.

"मग सांगा तर पाहूं" असें नवलरायाने म्हटल्यामुळे, विमल डोळयांवर हात ठेवून तोंडाने बोलूं लागली. तें नवलराय एका कागदावर टिपूनच घेऊं लागला. पूर्वी प्रज्ञा-प्रतिभामंडित व्यासापुढे गणपति हा लघुलेखकाचें काम करण्याला बसल्याचें आपण पुराणांत वाचतों. पण आज सरस्वतीच्या मुखकमलांतून बाहेर पडणारे उद्गार गण-पति (राजा) लघुलेखक म्हणून टिपून घेत होता असें म्हणावेंसें वाटणार नाही काय ? आणि खरोखरच महत्त्वाचा मजकूर आठवून जुळवून, सांगावयाचा असतो तेव्हा सांगणारापेक्षा लिहिणाराचें काम अधिक लवकर उरकतें. अर्थात् हा जो वेळ मधून मधून मिळे त्यांत विमलच्या मिटलेल्या डोळयांचा फायदा घेऊन, नवलरायाला तिच्या चेहऱ्याकडे स्वस्थपणें पाहतां येई. आणि हें करीत असतां तिच्या बुद्धिमत्तेचें कौतुक अधिक करावें कीं तिच्या चित्ताकर्षक रूपाचें कौतुक अधिक करावें, असा विचार त्याच्या मनांत प्रतिक्षणीं येत होता. असो; सर्व मुद्दे टिपून झाल्यावर नवलरायाने तो कागद तिला वाचून दाखविला. ती सुमारें वीस कलमांची यादी होती. हीं कलमें सांगून झाल्यावर विमलने डोळयांवरचा हात काढला, पण आता नवलरायाने मात्र तिच्या तोंडाकडे लावलेली दृष्टि खाली केली नाही. त्याच्या तोंडावरील आश्चर्याचें स्मित प्रांजलपणाने प्रकट करण्याला तो किंचित् लडिवाळपणाने म्हणाला, "देवाला माहीत तुम्हाला हें सारें कसें सुचलें व एकामागून जुळून सांगायलाहि सुचलें तें." पण सकारणता हें आश्चर्यावर, अद्भुततेच्या बुद्धीवर, रामबाण औषध ठरतें हें माहीत असल्याने विमलहि किंचित् लडिवाळपणाणें म्हणाली, "इश्श्, यांत देव तो कशाला यावयाला पाहिजे ? त्याचा कांही यांत मला आयत्या वेळीं संदेश आला नाही, किंवा दिव्य प्रेरणा झाली नाही. वाचून थोडेंबहुत लक्षांत होतें तेंच इकडून तिकडून जरा जुळवून सांगितलें झालें. पण म्हणतें, आपल्या राजकुमार कॉलेजाच्या अभ्यासक्रमांतहि असला विषय असेलच ठेवलेला ?"

"विमलाबाई," नवलराय खेददर्शक स्वराने म्हणाला, "काय सांगूं तुम्हाला ? राजकुमार कॉलेजांत राजकारण शिकवितात, पण त्याच्या अभ्यासाचा

मूर्धाभिषिक्त ग्रंथ मॅकिॅव्हेलीचा 'प्रिन्स'! साम्राज्यशाहीच्या शाळेंत पढविलेलीं आम्ही मुलें म्हणजे राजकुमार! आम्हाला खरा राजधर्म, खरें प्रजावात्सल्य कोण व कां शिकविणार? तुमची गोष्ट वेगळी. तुम्ही राजकारण वाचलें तें स्वतःच्या आवडीने, स्वतंत्र बुद्धीने. लोकांविषयी तुमच्या मनांत उपजत औदार्य! 'प्रजे'विषयी स्त्रियांच्या हृदयांत नैसर्गिकच वात्सल्य असतें. म्हणून तुम्ही प्रजेच्या कल्याणाच्या दृष्टीने विचार केला, आणि वाचलें त्यांतून प्रजाहितपर अशाच योग्य राजधर्माची कल्पना मनाशीं बांधली. मात्र तुम्हीं राज्यघटनेचीं जीं कलमें सांगितलीं, तो "लोकशाहीचा विजय" असा शेरा त्यावर कोणी आधुनिक नवजवान मारणार नाही हें मात्र ध्यानांत ठेवा."

विमल म्हणाली, "आहे माहीत मला नवजवानांची विचारसरणी! त्यांचे एक प्रतिनिधि कॉ. डंखी हे होते ना दरबारच्याच सभेंत! आणि तेथे ते काय तारे तोडीत हात हें आलें असेलच आपल्या कानांवर. अविचाराने वाटेल तें भलतें बोलण्याची सवयच पडली आहे या नवजवानांना! त्यांच्या मानसिक औदार्याची झडप, त्यांचा धीटपणा, यांचें मी कौतुकच करितें; पण ते जरा सबुरीने घेतील तर लोकांवर उपकार करतील. सद्भावनेच्या दारूचा स्फोट मनांत झाल्यासारखें ते बोलतात हें खरें, पण दारूच्या गुत्त्यांतून बाहेर पडून बोलावें असेच शब्द त्यांच्या तोंडून निघतात हेंहि खरें. प्रतिभेचें रत्न झालें तरी तें प्रज्ञेच्या सहाणेवर घासून काढावें तेव्हाच त्यांत रम्य तेज भरतें हें नवजवानांच्या लक्षांत येईल तर बरें होईल. राजांचा नादानपणा त्यांना दिसतो आणि तो खराहि आहे. पण लोकशाहीनेहि आपला नादानपणा युरोप-अमेरिकेंत इतका जगजाहीर केला आहे कीं, हा घातक खेळ आता पुरे करावा, निदान त्याला आळा घालावा असें तिकडच्या शहाण्या लोकांना वाटूं लागलें आहे. मी सांगून आपण उतरून घेतलेल्या कलमांत लोकशाहीचें उत्तान व आजकालचें 'पेटंट' ठराविक स्वरूप नसेल; पण राजधर्माचा व प्रजाहिताचा त्यांत उत्तम मेळ आहे असें माझ्या तरी अल्पबुद्धीला वाटतें."

नवलराय म्हणाला, "मग मला तरी आणखी अधिक काय हवें आहे? असो, तर आता माझ्या संस्थानच्या प्रजेच्या अधिकृत प्रतिनिधि म्हणून या मसुद्यावर सहीदाखल आपण आपलें नांव लिहा ना!"

"हो, त्याला काय हरकत?" असें म्हणून विमलने तो कागद नवलरायाचे हातून घेऊन त्यावर सही केली. लगेच नवलरायानेहि तो परत घेऊन त्या

सहीशेजारी आपली सही घातली ! आता नवलरायाचा हर्ष तोंडावर दिसूं लागला. त्याच भरांत तो म्हणाला, "पण हीं तहाचीं कलमें अमलांत येण्याला आता तुम्ही आम्ही मिळूनच व्यक्तिशः परस्पर जामीन ठरतों! तेव्हा या कागदावरील सह्यांप्रमाणे तुमचें आमचें साहचर्यहि अखंड राहिलें पाहिजे नव्हे का? मी संस्थानिकच, प्रजेचा कारभारी, म्हणून नवलपूर सोडून जाऊंच शकत नाही. पण यापुढे तुम्हालाहि तेंच बंधन पाळलें पाहिजे बरें, ध्यानांत ठेवा. जामीन लायक, पण हजर नसेल तर जामीनकी कशी उगवावयाची ! मी यापुढे राजवाडा सोडून नदीकांठच्या आमराईत बांधलेल्या झोपडींत जाऊन राहणार आहें. त्याशेजारी तुम्हालाहि वाटेल तर तशीच एक झोपडी बांधून देतां येईल."

आता मात्र विमलला नवलरायाच्या अंतस्थ गूढ भावनेचें प्रथमच ओझरतें दर्शन झालें. पण खरेंच बोलावयाचें तर, राजपदस्थ, सुंदर, उदार, सुविचारी, सुशिक्षित, असा हा तरुण पुरुष पाहून विमलच्याहि मनांत तशाच प्रकारची भावना जन्मली नसेल असें तरी कोणी कां समजावें ?

श्रीमंती किंवा राजपद यांनी मोहून लोभावून जाणारी ती प्राकृत स्त्री नव्हती. पण अलीकडील प्रभाकर-प्रकरण सुरू झाल्यापासून नवलरायाचें जें उमदें चारित्र्य, विशेषतः राजपद लाभलें असतांहि त्याच्या त्यागाची तयारी, तिने पाहिली; त्याने तिच्या मनाचें आकर्षण केलें असल्यास काय नवल ? विमल मर्यादशील असली तरी सौभाग्याकांक्षिणी होती.

प्रणयभावना लपविण्यांत स्त्रियांना कोणीहि हार जाऊं शकणार नाही त्याप्रमाणे, आमराईतील झोपडीशेजारी दुसरी झोपडी बांधून देण्याच्या नाजूक कल्पनेचा हल्ला नवलरायावर परतविण्याकरिता, ती हसून म्हणाली, "आपली कल्पना थोडी चुकली बरं का ! परराष्ट्रीय वकिलांच्या नात्यानेच आपण या तहावर सह्या केल्या. मग परराष्ट्रीय वकील कोठे तरी असे एकमेकांच्या शेजाराला राहतात का ? मित्र म्हणविणारीं राष्ट्रेंहि मनांतून शत्रु, निदान साशंक व सावध, असतात. एका राष्ट्राच्या वकिलाच्या गोटांत चाललेली कारवाई दुसऱ्याच्या नजरेस न पडावी याकरिता वकिलातींचे गोट दूरदूरच बांधतात व पाहरेहि ठेवून संभाळतात नाही का ?"

या उत्तराने नवलराय किंचित् घोटाळला. पण आता तो थोडाथोडा धीट होऊं लागला होता. यामुळे विमलची कोटी परतविण्याकरिता तो म्हणाला, "छेः छेः, तुम्हाला परराष्ट्रीय राजकारणाचें खरें रहस्य ठाऊक नाही !

मनांतून सावधपणा असला तरी, आपलें शत्रुत्व तर नाहींच नाही पण साशंकताहि नाही असा बहाणा पुरा पाडण्याकरिता, कित्येक ठिकाणीं राष्ट्राचे वकील, अँबॅसेडर, कौन्सल, दोन वेगळ्या वकिलातीच्या इमारतींत न राहतां, एकाच इमारतींत राहून एकत्र जेवणखाणाहि करतात. म्हणून झोपडीशेजारी दुसरी झोपडी बांधण्याची सूचना हवी तर परत घेतों आणि एकाच झोपडीचा आश्रय आपण दोघां वकिलांनी करावा असेंच सुचवितों. राष्ट्राराष्ट्रांत झालें तरी विश्वासानेच विश्वास, स्नेहानेच स्नेह, व प्रेमानेच प्रेम वाढतें कीं नाही! नवलपूर संस्थानची प्रजा व राजा यांच्या तहाचीं कलमें अबाधितपणें अमलांत यावीं, परस्पर जामीन वेळेवर हाताला यावे, याकरिता मीं सुचविलें हें इष्ट नाहीं काय? माझ्या नशिबांत लिहिलें आहे तेंच अकल्पित रीतीने, ईश्वरा, घडून येणार काय?"

विमलला यावर उत्तर सुचेना? प्रथम तिने स्त्रीधर्मानुरूप लाजून खाली मान घातली; पण तिचाहि बुद्धियोग जबरदस्त होता. म्हणून नवलरायाच्या शेवटच्या शब्दांतूनच उलट प्रश्नाची उपज घेऊन ती किंचित् आश्चर्य दर्शवून म्हणाली, "महाराज, आपण म्हणाला त्याप्रमाणे खरोखरच का आपला नशिबावर विश्वास आहे? आणि आपल्या नशिबांत काय लिहिलें आहे हें तरी ऐकूं द्या! संस्थानिकाचा नवलाचा नमुना अशी आपली कीर्ति होण्याचें जर आपल्या पत्रिकेंत लिहिलें असेल, तर तें मात्र खरें झाल्याचा योग दिसतो. कारण प्रजाप्रेमाच्या दृष्टीने खरोखरच आपण नवलाचे वाटतां. या शहराचें नांव नवलपूर हें मुळांत कोणी कां ठेवलें माहीत नाही, पण कित्येक वेळां मनुष्याच्या मोठेपणीं प्रकट होणारे गुण, आणि त्यांचा मागमूस नसतां केवळ आवडीने पाळण्यांतील मूल म्हणून ठेवलेलें त्याचें नांव, यांचा नवलकारक मेळ पडतो. तसेंच या शहराचें होणार!"

नवलराय मोठ्या उत्साहाने म्हणाला, "विमलाबाई, जन्मपत्रिकेंत शाब्दिक कोट्या नसतात, पण योग लिहिलेले असतात. माझ्या पत्रिकेंत लिहिलेल्या योगांपैकी दोन तर इतके तंतोतंत अनुभवाला आले कीं, इजा, बिजा, तिजा या ग्राम्य न्यायाप्रमाणे का होईना, त्यांत लिहिलेला तिसराहि योग खरा ठरणार असें वाटत होतें. तो कसा अनुभवास येणार याची कल्पना मला परवापर्यंत नव्हती. पण तुमचे प्रभाकरपंत तुमच्या घरीं गुप्त वेषाने प्रवेश करीत होते त्याच ठिकाणीं, त्याच क्षणीं, मीहि गुप्तपणाने,

वेषांतराने, तुमचें प्रथम दर्शन घेतलें. तेव्हां ताबडतोब निघून जा म्हणून तम्ही मला दटावून मागितलें तें आठवतें ना? तुमच्या प्रथम दर्शनाने व तेजस्वी वर्तनाने पत्रिकेंतील तिसराहि योग घडून येणार असें माझें मन मला सांगूं लागलें. हें पाहा, दाखवितोंच तुम्हाला माझी पत्रिका, म्हणजे नशिबावरील माझा विश्वास योग्य कीं अयोग्य हें कळून येईल." असें म्हणून नवलरायाने उठून, कपाटाचें कुलूप काढून त्यांतून आपली पत्रिका आणून ती विमलपुढे उघडून ठेवली. ती वाचावी कीं न वाचावी असा संशय तिला पडला. पण न वाचणें हें उद्दामपणाचें दिसेल म्हणून व थोड्याशा कौतुकबुद्धीनेहि, तिने ती वाचली. पत्रिकेंतील मजकूर असा होता— बाळपणीं मातृवियोग घडेल; पण तें दुःख एका मातृतुल्य स्त्रीमुळे भरून निघेल. रंकाचा राव होईल असा वरिष्ठ राजयोग; पण भोगापेक्षा त्यागाचीच वृत्ति अधिक प्रबळ. मातृपितृप्रेमी विमल चारित्र्याच्या विदुषी स्त्रीशीं अद्भुत रीतीने भेटीचा योग येऊन तिच्याशीं विवाह होईल व जन्मभर तिजकडून उत्तम सौख्य मिळून अंगीकृत कार्यांत साहाय्य लाभेल."

पत्रिकेंतला हा शेरा विशेषतः विमल हा शब्द वाचून खरोखरच विमल चपापली. शाई-कागदावरून पाहतां पंचवीस वर्षांपूर्वी लिहिल्यासारखी पत्रिका जुनी दिसतच होती. आजच्या अकल्पित प्रसंगाकरिता ती मुद्दाम खोटी बनावट केली असें मानण्याचें कांहीच कारण नव्हतें. बरें पत्रिका खरी म्हणावी, तर त्यांतला उल्लेख (नांव सोडून दिलें तरी) वर्णन व परिस्थिति यांच्यामुळे आपणाला चिटकावयाला येऊं पाहता! तो झाडून टाकतां आला तर पाहावा म्हणून विमल हसून मुद्दाम किंचित् नाक मुरडल्या-सारखें करून म्हणाली, "लाक्षणिक, दुटप्पी भाषा योजणें हीच ज्योतिष्यांची खरी विद्या आहे. फलज्योतिषाच्या लोकभ्रमाची बाधा मी आपणाला सहसा होऊं देत नाही. तरी पण विषय निघालाच म्हणून मी एक गोष्ट विचारतें हो!"

नवलराय उत्सुकतेने म्हणाला, "अवश्य विचारा. मीहि प्रायः तर्कबुद्धीलाच ज्योतिषापेक्षा अधिक मानतों. पण न्यायाधीशाला आपणापुढे आलेल्या सर्व पुराव्याचा विचार करावाच लागतो नव्हे का ?"

विमल म्हणाली, "मला विचारावयाचें तें इतकेंच कीं, रंकाचा राव होईल असा बलिष्ठ राजयोग पण भोगापेक्षा त्यागाची वृत्ति प्रबल." हें ज्योतिषाचें भाकीत आपल्यासंबंधांत खरें ठरल्याचें सर्टिफिकीट मीं खऱ्या

मानाने देईन. पण मातृवियोग घडेल, आणि तें दुःख एका मातृतुल्य स्त्रीमुळे भरून निघेल, या भविष्याचें काय झालें? हा पुष्पहार घातलेली तसबीर मागच्या बाजूस दिसते ही कुणाची ! आपल्या जनकआईची ? कीं तिची जागा केवळ प्रेमाने घेणाऱ्या त्या दुसऱ्या स्त्रीची ? या तसबिरींतील चेहऱ्यांत खरोखरच तेजस्वीपणाची व सद्गुणांची जादू ओतप्रोत भरली आहे !"

हा प्रश्न ऐकून त्याचें उत्तर देण्याला ‹. लरायाला जणूं काय स्फुरणच चढलें. विमलनें तसबिरीवर दृष्टि ठेवलेली असत. ‹. नवलराय त्या तसबिरीपुढे जाऊन उभा राहिला. तसबिरीच्या चौकटीच्या खालच्या टोकावर डोकें ठेवून तीन वार प्रणाम करून, विमलकडे तोंड फिरवून तो म्हणाला, "विमलाबाई, पत्रिकेंतील माझ्या राजयोगाप्रमाणेच मातृसुखाचेंहि भविष्य शब्दशः खरें ठरलें. माझी जन्मदात्री आई माझ्या बाळपणांत वारली. तिची मला आठवण आहे, ती फार अभिमानाची आहे. पण लवकरच तिला मृत्यूनें गांठलें तेव्हा तिनें मला या तसबिरींतील माझ्या दुसऱ्या आईच्या ओटींत घातलें. तेथपासून या माउलीने माझें नुसतें मुलासारखे पालनपोषण केलें इतकेंच नव्हे, तर माझ्या भावी राजपदाचें तिला आगाऊ स्वप्न पडावें त्याप्रमाणे थोरपणा, स्वाभिमान, श्रीमंतीचा त्याग-मिश्रित उपभोग या सर्व गुणांचें शिक्षण तिनें मला अगदी आस्थापूर्वक दिलें. माझें खरें राजकुमार कॉलेज म्हणजे या महानुभाव स्त्रीच्या घरीं घालविलेले दिवस. हीच मनोहराची जन्मदात्री; आणि बाहेरून तो माझ्याशीं प्रायव्हेट सेक्रेटरीचें नातें ठेवतो, तरी मनोमन तो माझा वडील भाऊ आहे. जन्मदात्री नसलेल्या स्त्रीवरहि प्रत्यक्ष आईप्रमाणे प्रेम कसें करतां येतें याचा अनुभव, विमलाबाई, जो स्वतः तम्हाला आहे तोच मला आहे. तुम्ही व मी सहानुभवी आहों म्हणून जन्मभर असे सहानुभवीच राहावें अशी माझी इच्छा आहे."

इतकें बोलून नवलराय फिरून विमलसमोरच्या खुर्चीवर' पूर्वीच्या जागीं येऊन बसला. टेबलावर दृष्टीसमोर नवलरायाची पत्रिका मांडून तिजवर हात ठेवून विमल पुनः पुन्हा ती मनांत वाचीत होती. असें पाहून नवलराय तिला म्हणाला, "विमलाबाई, बोला ना आता! पत्रिकेंतलीं दोन भविष्यें खरीं झाल्यावर आता तिसरेंहि होईल कीं नाही ? आणि तें करणें तुमच्या हातीं आहे. मनुष्यामध्ये उपजत विश्वासाच्या अशा कांही कांही गोष्टी असतात. माझा जन्मापासून असा विश्वासच आहे कीं, माझ्या आयुष्याची होडी, कोणा तरी सत्प्रवृत्त, निःस्वार्थी, प्रेमळ अशा स्त्रीच्या स्फूर्तीच्या अनुकूल वाऱ्यावरच चालायची

आहे. आयुष्याच्या पूर्वभागांत त्या माउलीने तो माझा विश्वास खरा केला. आणि–" इतकें बोलतांच नवलरायाच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. त्याच भावनेच्या उद्वेगांत त्याने आपलें डोकें विमलच्या उपड्या हातांवर टेकलें आणि त्याच्या डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रूंनी तिचे हात व त्याखाली पत्रिकेच्या कागदाचा कोपरा ओला केला.

प्रेमळ कृतज्ञतेचा हा देखावा पाहून विमलचें अंतःकरण उचंबळून आलें. तिच्याहि डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. तिने नवलरायाच्या मस्तका-खालून आपले हात हळूच काढून घेतले व म्हणाली— "महाराज, पत्रिका भिजेल ना?" नवलराय मान वर उचलून म्हणाला, "माझ्या पत्रिकापूजनाला याहून अधिक मंगल असा अभिषेक दुसरा कोणता मी करणार?" आणि तिच्याहि गालावरील अश्रूंचे ओघळ पाहून म्हणाला, "पण तुमच्याहि डोळ्यांतून पत्रिकेवर मंगल अभिषेकाचे चार थेंब पडलेलेच दिसतात. एकूण माझ्या अंतःकरणाने आपला गुप्त संदेश तुम्हाला कळविला आणि पटविलाहि असें दिसतें. माझें तिसरेंहि भविष्य खरें ठरणार तर! आता मात्र मी धन्य झालों खरा!"

हें शेवटचें संभाषण सुरू असतांच मनोहर केव्हा वर आला तें या दोघांना कळलेंहि नाही. विमलच्या हातावर नवलरायाचें डोकें टेकलेलें पाहून तो किंचित् आड झाला, पण नवलरायाच्या धन्यतेच्या उद्गारांनी संभाषण संपलें असें वाटून तो पुढे आला, आणि टाळी वाजवून म्हणाला, "काय, महाराज, आता मुखत्यारी कच्ची कीं पक्की?"

या प्रश्नाचें मर्म नवलराय व विमल दोघांनाहि कळलें. विमल सहजच थोडी लाजली. नवलराय म्हणाला, "बाबा, ही सर्व प्रायव्हेट सेक्रेटरीची कारवाई! वडील भावाने धाकट्याचें हित किती, कसें पाहावें याला सीमा कशी असणार!"

२७ संस्थानी स्वराज्याची पहिली मजल

विमलसंबंधीची प्रेमाकांक्षा सफळ झाल्यामुळे नवलरायाने तर स्वतःविषयी धन्यतेचे उद्गार काढलेच; पण मनोहरालाहि वेगळ्या दृष्टीने तितक्याच यथार्थतेने ते स्वतःविषयी काढतां आले असते. कारण संसारांत धन्यता वाटण्यासारख्या ज्या कांही गोष्टी असतात त्यांत, स्वतःला अनुरूप अशी वधू मिळणें याबरोबरीनेच, तुल्यगुण अशा इतर वधूवरांचीं लग्नें जुळवून आणण्याचें श्रेय लाभणें याचाहि समावेश करतां येईल. 'समानयन् तुल्यगुणं वधूवरं चिरस्य देवाच्यं न गतः प्रजापतिः' असें कालिदासाने म्हटलेंच आहे. हें काम ब्रह्म-देवालाहि अवघड मग माणसांचा काय पाड? असो. नवलरायाने प्रजेला स्वराज्यदान देण्याची तयारी केली त्याच्या तोलाचा मोबदला, आपणहि त्याला विमलसारखी वधू मिळवून देऊन, दिला असें मनोहराला वाटलें. पण ही जाणीव दिसूं न देतां तो नवलरायाला म्हणाला, "महाराज, माझ्या बंधुप्रेमाची स्तुति तुम्ही आता कां न कराल? पण ती सर्वस्वी स्वार्थमूलक आहे. पण तुम्ही प्रजाप्रेमाची योजना पक्की करणार होता तिचें काय झालें? का तिचा स्वतःच्या कार्यसाधनांत विसर पडला?"

नवल.—वः, वः! तें काय म्हणून? ती योजना मीं आपल्या हाताने कागदावर प्रत्यक्ष लिहिली आहे तीच पाहा म्हणजे कळेल. आणि फिरून ती इतकी पक्की कीं, तिच्यावर मीं राजा म्हणून व विमलाबाई प्रजाप्रतिनिधि म्हणून, आम्हीं दोघांनी त्या कागदावर आपल्या सह्या केल्या आहेत. तूं वाच ना तो कागद एकदा सर्व, म्हणजे तुलाहि आमची योजना कळेल.

असें म्हणून नवलरायाने कागद मनोहराच्या हातांत दिला. तो मनोहराने मोठ्याने वाचला. कागदांत लिहिलेल्या राज्यघटनेचीं कलमें खालीलप्रमाणे होतीं:—

कलम—"(१) संस्थानसंरक्षणाची जबाबदारी अखेर मुख्यतः राजावर असते त्या अर्थी, जोखमीच्या कामांत अखेरची हुकमतहि राजाकडेच राहिली पाहिजे. याच्या उलट इतर कामांत ती राजाने वरिष्ठ प्रजाप्रतिनिधींच्या अंगावरच टाकली पाहिजे.

(२) हे प्रतिनिधि राजानेच आपल्या पसंतीने नेमावे, मात्र ते राज्य-

कारभारांत कार्यकुशल असे पाहून नेमावे. पण वरील गुणापेक्षाहि त्यांच्या निःस्वार्थीपणालाच केव्हाहि अधिक महत्त्व द्यावें.

(३) हे प्रतिनिधि प्रथम बिनपगारी नेमावे, व त्यांना मोबदला द्यावयाचा तर ते सेवानिवृत्त होतांना, त्यांची कामगिरी व त्यांजविषयी लोकमत पाहून, मग बक्षीस म्हणून तो द्यावा.

(४) प्रजाजनांपैकी जो कोणी एखादें राज्यकारभाराचें काम अंगावर घेऊन करून दाखवूं म्हणेल त्याला तें करण्याला केव्हाहि अवश्य संधि द्यावी. मात्र हें काम निर्वेतन करणें ही त्याच्या सार्वजनिक हितबुद्धीची कसोटी समजावी.

(५) प्रत्येक खात्यांतील कारकूनफंडांत तज्ज्ञ, अनुभवी अशीं मुख्य दोनतीन माणसें तरी नित्याचा कार्यव्यवहार संभाळण्याला ठेवावीं.

(६) लाचलुचपत व जुलूमजबरदस्ती यांची चौकशी साध्या फिर्यादीवरहि करावी आणि गुन्हेगारास त्याला आठवण राहील व लोकांना दहशत बसेल असें, कडक शासन करावें.

(७) न्यायदानाचे कामीं अखेर निकाल राजाने आपल्या हातीं ठेवावा. पण खालचे अधिकारी आपापले अधिकार बजावीत असतां त्यांत यत्किंचित्‌हि ढवळाढवळ करूं नये.

(८) दर तीन महिन्यांनी चार दिवस दरबार भरवून, राजाने जाहीर निमंत्रणाने ज्या कोणास कांही तक्रार सांगावयाची असेल ती सांगण्याकरिता बोलवावें; आणि खातेवार अधिकारी हजर ठेवून त्यांच्या समक्ष कागदपत्र पाहून चौकशी करावी.

(९) कायद्याच्या आधाराशिवाय कोणाचेंहि व्यक्तिस्वातंत्र्य, धर्म, रूढि, खासगी व्यवहार, मालमत्ता यांजमध्ये राजाने हात घालूं नये.

(१०) कायदा करणें किंवा कर बसविणें हें लोकमत अजमावल्याशिवाय करूं नये.

(११) पंचायतपद्धतीने निकालांत काढतां येईल तितका सर्व कारभार त्या पद्धतीनेच करावा.

(१२) सरकारी पैशांतून कोणत्याहि धर्मकृत्याला किंवा देवस्थानाला किंवा उत्सवांना मदत करूं नये. शक्य असेल तितका पैसा लोकशिक्षणावर खर्चावा.

(१३) दर तीन वर्षांनी राज्याबाहेरचा एखादा तज्ज्ञ विद्वान् हिशेबी

अनुभवी मनुष्य आणवून त्याजकडून सरकारी हिशेब, जमाखर्च व कारभार यांची चांचणी घ्यावी व तपासणी करवावी.

(१४) राजाने स्वतःला संस्थानाचा नोकरच समजून खर्चाकरितां तनखा ठरवून घ्यावा; व त्यांतच आपल्या कुटुंबाचा खर्च व नैमित्तिक खर्च चालवावे.

(१५) राजाच्या वडील मुलाखेरीज राजघराण्यांतल्या इतर कोणालाहि वेगळा तनखा ठरवून देऊं नये.

(१६) दरबार किंवा संस्थान हें राजव्यक्तीहून वेगळें असें मानून त्याच्या संरक्षणाकरिता, मामुली राज्यकारभाराकरिता, व योग्य इतमामाकरिता खर्च ठरवून द्यावा.

(१७) राजाने दर पांच वर्षांनी राजपदाचा राजीनामा द्यावा, व प्रजेने पुन्हा त्याची अगर इतर कोणाची नेमणूक त्याचे जागीं करावी.

(१८) ही निवडणूक करण्याकरिता राज्यांतील फक्त पन्नास संभावित लोकांची यादी पंचायतीमार्फत आणवून ठेवलेली असावी.

(१९) या पन्नास लोकांनाच लोकमत प्रकट करण्याचा अधिकार असावा. नवीन कायदे, करपट्टी, लोकहिताच्या योजना यांजविषयी वर्षांतून एकदा या मंडळाच्या द्वारें लोकमत अजमावावें.

(२०) राजाने राजपदावर असतां खासगी व्यापारधंदा किंवा द्रव्योत्पादनाचा इतर कोणताहि उद्योग करूं नये. तसेंच लोकसभेच्या संमतीशिवाय संस्थानाच्या हद्दीच्या बाहेर खासगी स्वतःची अशी कोणत्याहि प्रकारची मिळकत संस्थानिकाने संपादूं नये.

योजना वाचून मनोहराने मान डोलविली आणि म्हणाला, "आहे, योजना तुमच्या संकल्पानुरूप उदार अशीच आहे! प्रार्थना इतकीच कीं, ही योजना अमलांत आणवून घेऊन सुराज्य भोगण्याची अक्कल व पात्रता मात्र ईश्वर या संस्थानच्या प्रजेला देवो!"

नव.—मनोहर, प्रजेच्या पात्रतेसंबंधी तूं नेहमी असा साशंक दिसतोस तो कां?

मनो.—युरोप अमेरिकेंत तसा अनुभव आलेला दिसतो म्हणून. महाराज, तुम्ही स्वतःच्यापुरता निःस्वार्थीपणाचा निर्वाळा द्याल, पण समजा, उद्या तुमचा मुलगा राजा झाला तर त्याच्या निःस्वार्थीपणाचा निर्वाळा तुम्ही द्याल काय? तसेंच प्रजेचेंहि आहे. कोणत्याहि राष्ट्रांतील प्रजेची स्वराज्याची मागणी

स्वार्थपर असते. स्वराज्य मोक्षाकरिता मिळवावयाचें नसतें हें कबूल; तें इह-लौकिक अभ्युदयाकरिता–उत्कर्षाकरिताच मिळवावयाचें असतें. पण राजसत्ता जी थोडी कोणाच्या हातीं येईल ती आपण एखादा राजा असल्यासारखीच, सामान्य प्रजाजन स्वार्थी बुद्धीने उपभोगतो व जुलूम करून वापरतो. स्वार्थ व लोभ हा राजाच्या रूपाने फक्त एका तोंडाने खातो, तर प्रजेच्या म्हणजे लोकांच्या तोंडाने तो शेकडो मुखांनी खातो. म्हणून वाटतें एक तोंड खातें तेंच बरें.

नव.––नाही, मला नाही तसें वाटत. जनतेने शंभर तोंडांनी खाल्लें तरी, स्वतः जें धन उत्पन्न करून कराच्या रूपाने राजाला देते, त्यांतलेंच ती खाते. उलट राजा हा आपल्या श्रमाने कितीसें धन उत्पन्न करतो? करपट्टी देण्याच्या पात्रतेवरच जर मतदारी अवलंबून ठेवली, तर मला वाटतें राजाचें नांव मतदाराच्या पटांत दाखलसुद्धा होणार नाही! तात्पर्य, माझें म्हणणें इतकेंच कीं, प्रजेने सर्व मिळवावें आणि राजा होऊन बसणाराने तें सर्व आपल्या एकट्याच्या इच्छेने खर्च करावें किंवा खावें, हा श्रमविभाग अन्यायाचाच नव्हे का?

विमल––एकट्याची इच्छासुद्धा न्यायाची होईल. पण तो एकटा स्वतःच्या व्यक्तीच्या दृष्टीने निःस्वार्थी असला पाहिजे. चूक ही मनुष्याच्या हातून होणारच. राजशाहींत राजांच्या हातून चुका होतात तशा लोकशाहींत लोक-प्रतिनिधींच्याहि हातून होतील. पण केव्हाहि स्वार्थानेच कारभार खरा बिन-सतो तसा अज्ञानाने नाही. आजपर्यंत राजांना संधि मिळाली तशी लोकांनाहि मिळाली पाहिजे नव्हे का? स्वार्थविरहित स्वामित्व राजे लोक संभाळतील तर लोक तें त्यांना खुषीने देतील. राज्यकारभाराची रिकामी दगदग खरोखर कोणाला हवी? निःस्वार्थी कर्तव्यनिष्ठ अशा आगगाडीच्या ड्रायव्हरावर किंवा आगबोटीच्या कप्तानावर भरंवसा टाकून हजारो लोक आनंदाने खेळ खेळत प्रवास करतात. तो निःस्वार्थीपणा व ती कर्तव्यनिष्ठा राजे लोकांनी आजवर दाखविली असती तर लोकशाहीचा बंडखोर झेंडा कधीच उभारला गेला नसता! पण महाराजांनी निःस्वार्थीपणा स्वीकारल्यामुळे मी या राज्यघटनेंत पूर्ण सर्वांगीण लोकशाही निर्माण न करतां, मर्यादित राजसत्तेची योजना ठेवली आहे. लोकशाहीसंबंधाने महाराजांइतका दुर्दम विश्वास माझ्या मनांत नसला तरी, मनोहरपंत, तुमच्याइतका अविश्वासहि पण नाही.

मनो.—म्हणजे तुम्हां दोघांची जोडी या राज्याच्या कारभाराला बळकट

ब्रेक असलेल्या मोटारीसारखी होणार तर ! चला, मोटारींत बसून स्वस्थ झोप घेण्याची आपली आयती सोय झाली!

नव.—तर तर ! तुला मी गप्प बसूं देईन तेव्हा मग झोंप ! दिवाणपद रिकामें झालें आहे तें यापुढे तुलाच संभाळलें पाहिजे. आम्हा दोघांनी घटना निर्माण करण्याचे श्रम घेतले तिची अंमलबजावणी करण्याचे श्रम तुला घेतले पाहिजेत. बारा वर्षांच्या जुलमानंतर मीं नेमलेला नवा दिवाण कसा भला आहे हें लोकांना दिसून तरी येईल. पण मनोहर, तूं पगार किती घेणार ?

मनो.—ज्या मानाने राजाला तनखा त्या मानाने दिवाणाला ! राजा फकीर मग दिवाणाला पगाराची कां फिकीर ? तरी तुम्ही लग्न करून संसार थाटणार म्हणून तुम्हाला कांही तरी लागेल. मी आजन्म अविवाहित राहण्याचा निश्चय केलेला असल्यामुळें मला एकट्याला काय लागणार ? वहिनीच्या हातचा सुग्रासच रोज खाऊं म्हणजे झालें ! मला भाऊ म्हणणारे महाराज, आणि भाऊजी म्हणणाऱ्या राणीसाहेब, यांची कृपा आणि त्यांचें प्रेम हाच पगार मला अखंड मिळाला म्हणजे मी खुषीने दिवाणगिरी करीन. मात्र मलाहि एक खास मदतनीस हवा. तो विनायकराव लोंढे यालाच नेमण्याची परवानगी द्या म्हणजे झालें. त्यानेहि आपलें जनताप्रेम चांगलेंच प्रकट केलें आहे. तो घरचा सुखवस्तु आहे. तो प्रजेचें काम फुकट व मोठ्या हौसेने करील. दिवाणाला फौजदार तसाच लागतो. त्याला आपले बलभीमसेवक प्रभाकरपंत ठीक आहेत. येऊन जाऊन सुभेदाराचें काय करावयाचें इतकाच प्रश्न उरला.

त्यावर विमल हसून म्हणाली, "बिच्याऱ्याची दत्तकाच्या प्रकरणांत फजिती झाली. निराशा झाली. तेव्हा पळून गेलेल्या माजी दिवाणसाहेबांची दहा-पंधरा हजारांची मिळकत ट्रंकापेट्या भरून राजवाड्याच्या पहाऱ्यांत आणून ठेवली आहे, ती तशीच सुभेदारांना द्यावी म्हणजे झालें. मात्र माणूस लफंग्या व बखेडेखोर आहे म्हणून त्याला या संस्थानांतून निघून कांही दिवस बाहेर जाण्याचा कानमंत्र सांगावा म्हणजे झालें. तो सुखानें निघून जाईल." इतकें बोलून विमल हसून म्हणाली, "सुभेदारसाहेब माझे नातेवाईक आहेत. तेव्हा त्यांच्या हिताला मला जपलेंच पाहिजे !"

"नाही" मनोहर म्हणाला, "तेवढेंच नाही कांही ! दिवाणसाहेबांनी शिरस्तेदारांना लिहिलेलें पत्र वाटेंत पकडून, सुभेदारांनी अकलेची हुषारी दाखविली खरी. त्या पत्राने आपणाकडून, बरेंच काम केलें. परक्याने तोंडीं केलेल्या शेकडो आरोपा-

पेक्षा मनुष्याने आपल्या हाताने लिहिलेलें अक्षरच त्याला खरें मारतें. मीं दिवाणसाहेबांना दशहत घातली ती घातली नसती तरी तें पत्र पाहून त्या रात्रीं त्यांनी आपण होऊनच पोबारा केला असता."

"असो" महाराज म्हणाले, "मनोहर, सर्व कांही आता ज्याच्या त्याच्या मनासारखें झालें."

मनो.—पण, महाराज, आपल्या या नव्या घटनेला आणि योजनेला, खालसातींतले व इतर संस्थानांतले बुढ्ढे लब्धप्रतिष्ठित लोक, काय नांव देतील हें आहे का माहीत?

नव.—त्यांनी ठेवलेल्या नांवाशीं आपल्याला काय कर्तव्य आहे? पण त्याविषयी तुझी कल्पना तरी काय आहे तें ऐकूं दे.

मनो.—ते नांव देतील तें नवलकारकच असेल. म्हणतील, हा एक नवलपुरांतला गद्धेपंचविशीचा खेळ आहे!

नव.—म्हणजे काय बुवा?

मनो.—नवे संस्थानिक, नव्या राणीसाहेब, नवे दिवाण, नवे नायब दिवाण, नवे पोलिससाहेब, सगळेच तिशी-पंचविशींतले नवजवान 'उल्लूमशालजी.' त्यांनी केलेला हा लोकशाहीचा खेळ! पंचविशीच्या भरांत केलेलीं कृत्यें गाढवपणाचींच असावयाचीं! म्हणूनच गद्धेपंचविशी ही म्हण पडली.

नव.—तरी तूं एक गाढव आमच्या सर्वांच्या जोडीला आहेस म्हणून बरें. पण भल्या माणसा, आमचा बचाव तूं करावा तें सोडून निंदकाचें समर्थन केल्यासारखें बोलतोस, आश्चर्य म्हणावयाचें! असो. वाढलेल्या दाढींतच राजकारणी शहाणपणा असेल, तर मी खोटी पांढरी दाढी लावून दरबारांत बसत जाईन म्हणजे झालें.

मनो.—पण पांढरी दाढी म्हातारपणची खूण, म्हणून शेजारी बसणाऱ्या राणीसाहेबांना आवडणार नाही त्याची वाट? कदाचित् काळी चालेल. पण ती लावून नगरांत गस्त घालण्याची लहर तुम्हाला येऊं लागली म्हणजे राणीमागून राणी पटकावून घरीं आणाल! तें तर आद्य राणीसाहेबांना मुळीच आवडणार नाही! तात्पर्य, आपण या दाढीच्या भानगडींत मुळीच पडूं नये हें बरें. तरुणांना नांवें ठेवण्याचा जन्मसिद्ध हक्क वृद्धांना असतो, तो त्यांचा काढून घेऊन त्यांना दुःखी कां करा? म्हणोत बिचारे संस्थानी स्वराज्याला गद्धेपंचविशीचा खेळ! आपण योजलेला स्वराज्यदानाचा खेळ कदाचित् फसण्याचा

संभव असला तरी तो उमदा आहे, तुम्हा आम्हा सर्वांना भूषणास्पद आहे, हें मीहि प्रांजलपणें कबूल करतों. तेव्हा होऊंच द्या त्याला सुरुवात !

नव.—मी तरी तेंच म्हणतों. तेव्हा प्रथम तूं ही नवी राज्यघटना जाहीरनाम्याच्या रूपाने ताबडतोब प्रसिद्ध कर. मी लवकरच माझ्या नव्या खासगी घरांत जाऊन राहणार हें लोकांना कळलेंच आहे. आणि मी स्वतःला किती अल्प तनखा ठरवून घेतला हेंहि प्रजाजनांना लवकरच कळेल. माझी स्वराज्य-दानाची कल्पना यशस्वी करण्याला तूं आणि विमलाबाई यांची मदत झाली याबद्दल खरोखरच मी ऋणी आहें.

इतकें बोलणें झाल्यावर महाराजांनी विमलला निरोप दिला व तिला घरापर्यंत रथांतून पोंचविण्याबद्दल मनोहरला सुचविलें. तीहि महाराजांना वांकड्या नजरेचा एक नमस्कार करून जिना उतरूं लागली !

दुसरे दिवशीं सकाळीं मनोहर भाऊसाहेबांच्या घरीं गेला. त्यांची प्रकृति आणखीहि थोडी सुधारून ते चांगले बोलूं लागले होते. मनोहरपंत आले म्हणून भाऊसाहेबांनी प्रभाकराला आणि विमलला जवळ येऊन बसण्याला हाक मारली. पैकी प्रभाकर आला, पण विमल मात्र आली नाही. कांही वेळ थांबून मनोहराने बोलणें काढलें. तो म्हणाला, “ भाऊसाहेब, आज मी आपणाकडे एका महत्त्वाच्या कामाकरिता आलों आहें.”

भाऊ.—तें काय ?

मनो.—प्रथम आपल्या परवानगीने आपणाला एक प्रश्न विचारतों. विचारूं का ?

भाऊ.—हो हो, अवश्य विचारा. त्याला परवानगी कशाला ?

मनो.—संस्थानचे अत्यंत राजनिष्ठ प्रजाजन अशी आपली ख्याती आहे !

भाऊ.—ख्याती कसली ! पण माझ्या मनाने मी अत्यंत राजनिष्ठ आहें असें मला वाटतें खरें !

मनो.—जुने दिवाणसाहेब व जुने राजेसाहेब यांची कोणतीहि आज्ञा, केवळ राजनिष्ठेच्या भावनेने, आपण वंद्य मानीत होतां असें लोक सांगतात तें खरें का ? राजनिष्ठा हा गुण भूषणास्पद यांत शंकाच नाही. आणि मी विचारतों तेंहि खऱ्या मनानेच किंबहुना कौतुकबुद्धीने असेंहि समजा.

भाऊ.—त्यांतलें खरें असें आहे मनोहरपंत, आम्ही जुन्या काळची

माणसें! धोपट मार्गी! राजा म्हटला म्हणजे तो आम्हाला देवासारखा वाटावयाचा आणि दिवाणसाहेब हे उपदेव पण देवाच्याच कोटींतले. तेव्हा त्यांचे हुकूम निष्ठापूर्वक पाळणें हें कर्तव्यच असें आम्हीं मानावें हें स्वाभाविक नव्हे का?

मनो.—मी त्याबद्दल आपणाला मुळीच दोष देत नाही. पण आणखी एक प्रश्न असा आला कीं, आपली राजनिष्ठा केवल व्यक्तिगत नसून तत्त्वतः गादीसंबंधीची अधिकारासंबंधाची असते असेंच समजावयाचें ना?

भाऊसाहेब मोठ्याने हसून म्हणाले, "अहो, हें सांगायला कशाला पाहिजे? गादीवर विद्यमान असेल तो राजा! एक राजव्यक्ति गत झाली तर गादी जशी बुडत नाही तशीच आमची राजनिष्ठा!"

मनो.—तर मग नवलपूर संस्थानाच्या जुन्या महाराजांच्या आज्ञेला आपण मान देत होतां तोच आताच्या नव्या नवलराय महाराजांच्या आज्ञेलाहि द्यालच!

भाऊसाहेब मनापासून अगत्यवाद दर्शवून म्हणाले, "हो! हो! हो! तें सांगायला कशाला पाहिजे?"

मनो.—तर मग नव्या महाराजांनीं नेमलेला नवा दिवाण या नात्याने महाराजांची आज्ञा नव्हे, पण नम्र विनंति म्हणून आपणाला कळवितों कीं, राजपदाचा अर्धा हिस्सा महाराजांनी, आपली सुरूप, सद्‌गुणसंपन्न कन्या विमलाबाई यांना, देण्याचें ठरविलें आहे त्याला आपण मान्यता द्यावी.

म्हातारा गोंधळांत पडला. हा कूट प्रश्न त्याच्या मठ्ठ मेंदूत एकदम शिरेना. तो म्हणाला, "मनोहरपंत, क्षमा करा, पण आणखी समजावून सांगाल तर या जरठावर कृपा होईल!"

मनो.—ठीक आहे. सरळच सांगतों. महाराजांनी आपला विवाह करण्याचें योजिलें असून विमलाबाईंना राज्ञीपद द्यावें असेंहि आणखी योजिलें आहे. आता मुलीला मागणी घालण्याची रीत आपणांत नाही. उलट आपली मुलगी राजाला देऊं करणें हें साहसाचें व पायरीला पाय लावण्यासारखें दिसावयाचें. पण या दोनहि अडचणी सक्तपणें संभाळल्या गेल्या, तर राजे लोकांना अविवाहित राहण्याचा प्रसंग यावयाचा! म्हणून ही रूढि मोडण्याचा विचार करूनच महाराजांनी मला आपणाकडे पाठविलें आहे. विमलाबाईंचे वडील या नात्याने, त्यांना राणीपद मिळण्याहून अधिक सद्भाग्य आणखी कोणतें,

आपण झाले तरी, मनाने चिंताल ? म्हणून आपण होकार दिला म्हणजे झालें. बाकीची सर्व सिद्धता आहेच.

म्हाताऱ्याला राजाज्ञेचा अर्थ आता चांगलाच कळला. त्याची राजनिष्ठा चांगलीच फळाला आली! त्याचें हृदय उचंबळून आलें. त्याने एकदम मोठ्याने विमलला हाक मारली. आजपर्यंत बापाची हाक ऐकून तिजबरोबर तिने ओ दिली नाही असा बहुधा हा आजचाच पहिला प्रसंग होता. पण ती एकदम बाहेर कशी येणार ? मनोहरपंतांनी येणें केलें असें पाहतांच, त्याचा अर्थ समजून, ती घरांत गेली आणि माईसाहेबांच्या गळां पडून गहिंवरली. " विमल, बाळ, काय झालं ग ? डोळयांतून अश्रु ढाळतांना मी तुला आज पहिल्यानेच पाहतें." असे माईसाहेबांनी विचारलें.

मुलीला आपल्या दुःखाप्रमाणे आपलें सुखहि मोकळ्या मनाने सांगण्याचें जगांत एकच स्थान म्हणजे ती आई. यामुळे विमलने राजवाड्यांत घडलेला सर्व वृत्तांत माईसाहेबांना सांगितला. तो ऐकून त्यांनाहि भरतें येऊन त्यांच्या डोळयांतून आनंदाश्रु वाहूं लागले. त्यांनी सनातनी स्त्रीबुद्धीप्रमाणें, मुलीच्या डोक्यावर बोटें मोडून 'इडापिडा टळो' असे उद्गार काढले आणि खरोखरच मीठमिरच्या आणून विमलवरून उतरून त्या चुलींत टाकून तिची दृष्टिहि काढली.

इतक्यांत भाऊसाहेबांनी तिला पुनः हाक मारली, व तिला बोलावण्याकरिता प्रभाकरहि माजघरांत आला. तेव्हां विमल व माईसाहेब दोघीजणी बाहेर आल्या. भाऊसाहेबांनीं विमलला जवळ बोलावून घेऊन आपल्या शेजारी बसवून घेतलें व तिच्या पाठीवरून हात फिरवून ते म्हणाले, " बाळ, तुला न विचारतां गोष्ट केली अशी आजच पहिली बरं का ? "

विमल म्हणाली, "म्हणजे ? ती काय केलीत बाबा ?" भाऊसाहेब म्हणाले, " म्हातारपणीं वरशोधनाची उठाठेव करण्याचें माझें श्रम आयते वांचले. स्वतः महाराजांनीच तुला या राज्याची अर्धी मालकीण करावयाचें योजून मला तशी आज्ञा केली आणि मीं तुला न विचारतां त्यांना होय म्हटलें. तुझा रुकार मिळतांच महाराजांना निरोप कळवीन, म्हणजे तेच आपल्या घरीं चहा घ्यायला येतील. माझा सर्वतोपरी साहाय्यकारी होण्याचेंच इश्वराने ठरविलें असावें असें दिसतें."

इतकें बोलून भाऊसाहेब माईसाहेबांना उद्देशून म्हणाले, " ऐकलं का, आपल्या मुलीला आपली संमति हवी असेल म्हणून ती बोलत नाही ? "

इतक्या प्रेमाचा शब्द नवऱ्याचे तोंडून फार दिवसांनी ऐकायला सांपडला यामुळे माईसाहेबांनी सदरेवर मोठ्याने न बोलण्याची मर्यादा जन्मांत आज प्रथमच उल्लंघिली. आणि सर्वांना ऐकूं जाईल अशा आवाजाने त्या म्हणाल्या, " आपण दिली तीच माझी आणि तिचीहि संमति बरं का ? तिचे गुण आहेतच तसे. ती राजाची राणी होणार असें भाकीत मीं मनाने पूर्वीच करून ठेवलें होतें."

भाऊसाहेब हसून म्हणाले, " मोठी ज्योतिषीणच पडलीस कीं नाही तुझें भाकीत खरें ठरायला ! "

माईसाहेब किंचित् थट्टेच्या स्वरानें म्हणाल्या, " मी कशीहि वेडी-वांकडी ज्योतिषीण असलें तरी आपणाला दत्तकाचें भविष्य सांगणाऱ्या ज्योतिष्यापेक्षा पुष्कळ बरी ! पण आता उगीच वेळ गमावूं नये. महाराजांना घरीं आणण्याला स्वतः प्रभाकरलाच राजवाड्यांत पाठवावा."

प्रभाकरहि आनंदाने कपडे घालून मनोहरपंतांबरोबर महाराजांना बोलावण्या-करिता निघून गेला. ते गेल्यावर घरांत काय धांदल उडाली असेल तिचें वर्णन कोण करूं शकेल? भाऊसाहेब तर अंथरुणावरच बसून होते. पण माईसाहेबांनी गड्या-कुणबिणींना हाका मारून बैठकी ठाकठीक केल्या, लोढ-तक्ये ठेवले, टेबलांवरून रुमाल पसरले, तसबिरींवरून, कपाटांच्या भिंगांवरून फडकीं फिर-विलीं, उदबत्त्या लावून ठेवल्या. विमल फारशी हालचाल करीत नव्हती. उलट ती आपल्या आईला म्हणाली, "माई, कशाला घेतेस इतके श्रम ? त्यांना छान-छुकीची फारशी हौस मनांतून नाही. बाबा, अन् तूं नेहमीच घर साफसूफ ठेवतां तितकें पाहूनच ते वाखाणणी करतील कीं नाही पाहा तरी ! "

माईसाहेबांनी हळूच विमलचा गालगुचा घेतला आणि म्हणाल्या, " बरं, बरं. लागलीस का इतक्यांतच जावयांची शिफ़ारस करायला ? तुला बाई सगळं कांही माफ होईल. पण सासुरवाडीच्या इतर माणसांची खोड काढण्या-कडेच जावयांची बारीक नजर नेहमी जाते. चल जाऊं दे मला. ते आत्ता येतील. राजेसाहेबांच्या चहापाण्याची व्यवस्था मला करूं दे कशी."

भाऊसाहेबांनी बसल्या बसल्या कपडे बदलले, व अंगावर शाल घेतली. विमलने बाहेरून साफसुफीची उपेक्षाबुद्धि दाखविली खरी; परंतु तीहि चटकन मागील दारीं गेली, व अंग धुऊन घेऊन, नवें लुगडें नेसून, केस साफ करून, रेखीव कुंकू लावून, धुवट हातरुमाल कंबरेला खोवून, व गळ्यांतील एकदाणी

ठाकठीक करून, वर्तमानपत्र डोळयांपुढे धरून खुर्चीवर बसली. मग ती काय वाचीत होती, कीं मानसिक गौरीहराची पूजा करीत होती, तें देव जाणे!

सुमारें अर्ध्या तासाने दाराशीं रथ आला. त्यांतून उतरून महाराज, मनोहर व प्रभाकर सर्वजण आंत आले. सर्वजण भाऊसाहेबांच्या पलंगासमोर खुर्च्यांवर बसले. विमल पलंगाच्या बाजूला खेटून खुर्चीवर बसली. माईसाहेब आपल्या ठरीव जागेवर म्हणजे माजघराच्या दारांत उभ्या होत्या.

भाऊसाहेब म्हणाले, "मला उठून उभा राहून महाराजांचें स्वागत करतां आलें नाही याबद्दल क्षमा व्हावी."

नव.—त्यांत क्षमा कसली? आपण फार आजारी होतां म्हणे. उठून बसतां आलें ही तरी प्रकृतींत सुधारणाच म्हणावयाची!

इतकें बोलून नवलराय गुण घेण्याच्या नजरेने चोहोंकडे पाहूं लागला. आणि घरांतील नीटनेटकेपणा व स्वच्छता पाहून त्याच्या मनावर अनुकूल झालेला ग्रह तोंडावर स्पष्टपणें दिसून येऊं लागला.

ती संधि साधून मनोहर म्हणाला, "महाराजांनी या वाडयाचा पुढचा हा भाग कधी पाहिलाच नव्हता. मागील बागेचा दरवाजा व त्यांतून मागील दारचें तुळशीकट्टयाचें अंगण येवढींच मात्र एक वेळ पाहिलीं होतीं."

हें ऐकून भाऊसाहेबांखेरीज सर्वजण हसूं लागलीं. कारण श्रावण वद्य अमावास्येच्या रात्रीचा सर्व प्रकार या इतर सर्वांना तपशीलवार कळला होता. म्हणून भाऊसाहेब गोंधळून जाऊन म्हणाले,

"माझ्या नाही लक्षांत हें कसें केव्हा घडलें तें." तेव्हा प्रभाकर पुढे होऊन त्याने त्या रात्रीची सर्व अद्भुत हकीकत उच्चारली.

भाऊसाहेब म्हणाले, "अस्सें! वेषांतर करून आलेल्या महाराजांना मीं तेव्हा ओळखलें नाही हा कांही खरा दोष माझा नाही. पण त्याहिबद्दल महाराजांनी मला क्षमा केली पाहिजे!"

मनोहर हसून म्हणाला, "बरोबरच आहे. तांब्याचें भांडें आणि मातीचें भांडें हीं एकमेकांवर आपटलीं तर मातीच्याच भांडयाने फुटलें पाहिजे! एक सासरा होणें म्हणजे न केलेल्या शंभर चुका पदरांत घेण्यास तयार होणें आहे. पण हें अप्रिय बोलणें राहूं द्या. प्रभाकरपंत, आता चहाच्या मधुपर्काची तयारी होऊं द्या ना!"

भाऊसाहेब म्हणाले, "काय, नुसत्या चहाचाच मधुपर्क?"

मनोहर म्हणाला, " या नव्या युगांतल्या जावयांना त्या मधुपर्काशिवाय दुसरा कोणताच गोड लागत नाही त्याला काय करणार? असो. अहो, आज पुढच्या दाराने दिवसा आले म्हणून भावी जावयांना हा चहाचा तरी मधुपर्क मिळाला. पण त्या रात्रीं प्रभाकरपंत घरांत आल्यावर त्यांची व वेषांतरित महाराजांची अवचित गांठ पडली असती, तर कोणता मधुपर्क मिळाला असता कोणी सांगावें? पण साहसाशिवाय श्री नाही हें ठरलेलेंच आहे म्हणा! यापुढे मात्र महाराज वेषांतर करून रात्रीं अपरात्रीं नगरांत संचाराला जाणार नाहीत याविषयी विमलाबाई सावधगिरी घेतीलच. तें आपण कशाला बोला!"

"ठीकच" आहे. महाराज म्हणाले, " आता स्वराज्यदान देऊन लोकसभा मीं निर्माण केली तेव्हा प्रजेचीं सुखदुःखें उघड्या सभेंत भरदिवसा मला कळतील. मग रात्रीं गस्तीला जाण्याचें काय कारण? त्या दिवशींहि तसला चमत्कारिक प्रसंग यायला कदाचित् अमावास्येचा मुहूर्त कारण झाला असेल कोणी सांगावें!"

" झालें यावरून पाहतां मी तर त्या अमावास्येच्या मुहूर्ताला नांवें ठेवणार नाही. मनोहर एखाद्या तत्त्ववेत्त्याचा आव आणून म्हणाला, " पौर्णिमेपेक्षा अमावास्येलाच समुद्राला भरतीची जोरगत येते म्हणतात. अमावास्येलाच सूर्यचंद्रांचें समुद्रावरील आकर्षणबळ परमोच्च कोटीला जातें."

विमलने या वावदुकांचीं तोंडें बंद करण्याकरिताच कीं काय चटदिशी पुढे होऊन चहादाणींतून चहा ओतून सर्वांपुढे ठेवला. माईसाहेबांनीहि इतर पदार्थांच्या बशा आणून पुढे केल्या. खाऊनपिऊन झाल्यावर अत्तरगुलाब होतो इतक्यांत महाराजांच्या नांवची एक तार शिपायाने आणून दिली. ती फोडून पाहतां मि. मॅक्स्विनी पो. एजंट यांची होती. तींत असे शब्द होतेः—

(" Congratulations to you on your double success. Wonder Prince must indeed be called the firet Indian Raja who nobly conceived and courageously carried out the plan of giving an honest constitution to the government of his state people. God's blessings on your chosen partner, who will remain, I hope, a perpetual inspiration for good to you throughout your self-denying administration.")

" आपल्या दुहेरी विजयाबद्दल आपलें अभिनंदन करतों. आपल्या संस्थानां-

तील प्रजेला उदार मनाने राज्यघटना बहाल करून, ती धैर्याने अमलांत आणणारे तुम्ही पहिलेच हिंदी संस्थानिक मला दिसतां; तेव्हा तुम्हाला नवलराय हें नांव शोभतें खरेंच. तुमच्या नियोजित सहधर्मचारिणीला ईश्वराचे शतशः धन्यवाद असोत. त्यांच्याकडून, तुमच्या निःस्वार्थी कारभारांत निरंतर अशीच सन्मार्गाची प्रेरणा होत जावो!"

मनोहर म्हणाला, "पो. एजंटाच्या आशीर्वादाने महाराजांचें स्वराज्यदान शास्त्रोक्त झालें. आतां, भाऊसाहेब, आपलें कन्यादान तेवढें वेदोक्त आशीर्वादाने सशास्त्र होण्याचें उरलें."

भाऊसाहेब म्हणाले, "ईश्वराच्या कृपेने तेंहि लवकरच होऊन जाईल. देवाला महापूजेकरितां 'भोग' चढविणाऱ्या उपासकाला परत प्रसाद म्हणून कांही तरी मिळतोच. नव्या महाराजांनी संस्थानी प्रजेला जनताजनार्दन मानून स्वराज्याचा मौल्यवान भोग अर्पण केला. त्याकरिताच उलट त्याच जनताजनार्दनाचा प्रसाद म्हणून, माझी प्रिय कन्या विमल ही महाराजांना मी आनंदाने अर्पण करतों. देव दोघांनाहि कीर्ति, यश व उदंड आयुष्य देवो!"

— समाप्त. —

ब लि दा न

ब लि दा न

प्रकरण पहिलें

नंदा अन् नीला

भैरवपुरांतील (यालाच नवलपूर असंहि दुसरं नांव होतं. चित्रा नदीच्या कांठीं उंच दरडीच्या डोक्यावर चिंचेच्या झाडांचं एक भलं मोठं बन होतं. त्याच्या टोकाला नंदा गौळणीचा गौळवाडा होता. वाडा म्हणजे काय ? एकासमोर एक अशा दोन झोपड्या; आणि दोहोंला लागून गायींचा गोठा.

खाली खडकावरून वाहणाऱ्या नदीचा मंजुळ खळखळाट, गायींचं खोल हंबरणं आणि गळ्यांतल्या पंचरसी घंटांचा सुस्वर नाद यांनी नंदा गौळणीचे कान नेहमी भरलेले असत.

म्हातारी तोंडानं कुणाशीं फार बोलत नसे. मात्र तिचा हात कधींच रिकामा नसायचा. दूधदुभत्याच्या घेवाऱ्यांशींदेखील विशेष न बोलतां तिचा व्यवहार चाले. पण स्वभाव रागीट, म्हणून म्हातारी एखाद्याच्या अंगावर केव्हा खेकसेल याचा मात्र नेम नव्हता ! तिच्या मुक्या बोलानं म्हणजे नुसत्या धाकानंच नोकर लोक बिनबोभाट काम करीत.

संध्याकाळ झाली म्हणजे ' आतां मी कुणाचं काय लागतें ? ' अशा झोकानं ती काम टाकून देई. दोन्ही झोपड्यांच्या मधे उघड्या जागीं दोन ओट्यांवर टेकलेली एक लांब-रुंद फळी होती. तिच्यावर बसून, हातांत जपाची माळ घेऊन, ती नदीकडे डोळे लावून ध्यान करी.

नंदेच्या जपाला खळ पाडणारी अशी एकच व्यक्ति तिची मोठी आवडती अशी होती. ती नारायणी. तिला नीला असंहि नांव होतं. बाहेरचा संचार संपवून नीला जवळ येऊन बसली म्हणजे नंदा माळेचे मणी ओढण्याचं थांबवी; आणि

नीलेच्या डोक्यावर डावा हात प्रेमानं फिरवीत गुजगोष्टी करी, तेव्हा मात्र तिचा प्रेमळपणा खरा प्रकट होई. सर्व दिवसांत तिला हास्यविनोद सुचावयाचा तो याच वेळीं.

आज चैत्री पौर्णिमा. चांदणं पिठासारखं पडलेलं. पण ऊष्मा फार. क्वचित् नदीवरून येणारी वाऱ्याची झुळूक फारच सुख देई. नंदेच्या पायाशीं नीला चिकटून बसली होती. गवताची एक स्वच्छ काडी उजव्या हातांत घेऊन, उगाच रिकामा चाळा म्हणून, ती आपले शुभ्र दांत कोरीत होती; आणि जवळच विश्रांतीला बसलेल्या कपिला कालवडीच्या डोक्यावर कुरवाळण्याकरिता थापट्या मारीत होती.

नंदेप्रमाणं नीलेचंहि तोंड नदीकडच होतं. पण नंदा जर नदीच्या पात्रावरून पलीकड दूर दिसणाऱ्या शिवमंदिराकड पाहात होती, तर नीला नदीच्या पात्राअलीकडे स्मशानांत पेटत असलेल्या चितेकड ध्यान देऊन बसली होती.

स्मशानाकडच पाहात बसण्याचा नीलेचा हा छंद नंदेच्या ध्यानांत बरेच दिवस आला होता. ह्या छंदाचं कारण काय असावं बरं ? हें हुडकून काढावं असं नंदेच्या मनांत नेहमी येई. तीच इच्छा आज अनावर झाली. पण तिच्या नित्य नेमाप्रमाणं नीलेला गायीचं दूध पिण्याला द्यावयाचं अजून राहिलं आहे हें ध्यानांत येऊन नंदा उठली. झोपडींत जाऊन निरशा दुधाची लोटी घेऊन आली आणि नीलेपुढं करून म्हणाली—

“ बाळ, मी तुला दूध द्यायला विसरलें आज. देव मला क्षमा करो. पण मी विसरलें, तर पोरी तूं मागून घ्यावं की नाही ? असा परका भाव माझ्याशीं धरशील तर म्हातारी वेडीवर रागावेल बरं ! ”

एक म्हातारी अन् एक वेडी ! दोघींची जोडी किती विजोड ! म्हाताऱ्या वेडसर असतात, पण नंदा तशी नव्हती. गौळण खरी, पण अगदी हिशोबी. मोठी दक्ष. आपल्या घरांत बसून सगळं जग धुंडाळणारी, न्याहाळणारी ! तिचा प्रेमळ म्हातारा नुकताच निवर्तला होता. त्यांना मूलबाळ केव्हाच झालं नाही. तरी एकलकोंडेपणा जाणवून घेणाऱ्यांपैकी नंदा नव्हती. दिवसभर पुरण्याइतका घरकामाचा व्याप. हिशोबीपणाइतकाच दानधर्माचा—परोपकाराचा हव्यास. आणि उरला सुरला वेळ ईश्वरध्यान भजन ! ऋणानुबंधी बायाबापडया कोणी ताकपाणी मागण्याला, कोणी मुलांच्या औषधाला, कोणी उगीच

बापडया कोणी ताकपाणी मागण्याला, कोणी मुलांच्या औषधाला, कोणी उगीच

बसायला तिजकडे येत. पण तिच्या गौळवाड्यांत गावकुटाळकीचा, परनिंदेचा किंवा शिवीचा शब्द कधी कोणाच्या कानावर पडला नाही.

नंदा म्हातारी असून वेडी नव्हती, पण नीला तरुण असतांच 'वेडी' या नांवाला पात्र झाली होती. हा काय दैवयोग? नंदेचं वय पन्नास-पंचावन्न वर्षांचं तर नीलेचं पंचवीसहि नव्हतं. असं असतां विरक्तपणांत नीलेची नंदेवर ताण! नंदेचा सर्व व्यवहार अन् भाषण हीं सुसंबद्ध, मार्मिक असत; पण नीलेला व्यवहार असा कांहींच नव्हता. आणि तिच्या भाषणांत जरी मार्मिकपणा पुष्कळ, तरी त्यावर क्वचित् असंबद्धतेची झाक येई. सूक्ष्म नजरेनं पाहाणाऱ्या-ऐकणाऱ्याला तरी ती दिसे. अंगभर वस्त्र आहे-आहे, नाही-नाही! शोभेकरिता नव्हे, तर केवळ लहर म्हणून ती डोक्यांत–पदरांत फुलांचे तुरे खोवी, आणि कारण नसतांना ही हसते असं लोकांना वाटे!

आज नीला आपला संचार संपवून गौळवाड्यांत परत आली तों नंदा गौळण फळीवर जप करीत होती. तिच्या जपाला व्यत्यय येऊं नये म्हणून नीला हळूच, पाय न वाजवितां, नंदेच्या पायाशीं येऊन बसली. पण थोड्याच वेळांत नंदेचं लक्ष नीलेकडे गेलं. आणि पाहते तों नीला नदीकांठच्या स्मशानांतल्या चितेकडे ध्यान लावून बसली आहे!

वर सांगितल्याप्रमाणं 'म्हातारी वेडीवर रागावेल बरं!' असं नंदेनं म्हणतांच नीला मोठ्यानं हसली. नंदेनं आंत जाऊन दूध आणलं तें ती गटगटा प्याली आणि म्हणाली, "माझ्या म्हातारीला रागावूं देऊं नये इतकं शहाणपण वेडीच्या अंगीं आहे बरं का नंदामाई! तुला म्हातारीलाच शहाणपणाचा सगळा मक्ता देवानं दिला असं समजूं नको."

नंदा म्हणाली, "नवलंच आहे म्हणायचं! अग मी म्हातारी असलें म्हणून शहाणीहि आहें असं मी कधी तरी म्हणेन का? तुला जग वेडी म्हणतं म्हणून मीहि आपली प्रेमानं म्हणतें झालं! एरवी तुझे गुण माझ्या लक्षांत का नाहीत? पण खरं सांगूं का? तुझं हें वैराग्याचं तेज पाहून मी बाई दिपून जातें. जगाला वाटतं कीं आपला व्यवहार ज्यानं त्यानं सरळ केला म्हणजे तेंच शहाणपण! पण तूं या तरुण वयांत सगळाच व्यवहार टाकून दिलास. मला म्हातारीलाहि तूं लाजवलंस. मी वेडीला इतकी भितें कीं तुला एखादा प्रश्न, खोदून–खोलांत जाऊन, विचारावासा वाटला तरी तो मी मागं घेतें."

"बरी सापडलीस मला आता, नंदामाई, तुझ्याच शब्दांत." नीला खद-खदा हसून म्हणाली. "मघाशीं तूं मला म्हणालीस नव्हे का, तेंच मीहि आता तुला सांगतें. असा परका भाव माझ्याशीं धरशील तर उलट वेडीच म्हातारीवर रागवेल बरं? तुझं दूध मी प्यालें ना? विचार आता या तुझ्या वेड्या मुलीला काय पाहिजे तो प्रश्न. अगदी खोदून खोलांत जाऊन विचार! तुझ्यापासून लपून राहील असा कोणताच विचार या अंतःकरणांत नाही. मला परकी मानतेस असं ठरलं तर धावत खाली जाऊन नदींत जीव देईन. नाही तर स्मशानांत ती चिता पेटली आहे तींत उडी घेईन!"

नंदा म्हणाली, "देव जाणे तुझ्या या द्वाड जिभेनं असे शब्द कसे निघतात ते! तुझ्या तोंडीं स्मशान. तूं खाली नदीकड पाहतेस तें स्मशानाकड. तूं ध्यान करतेस तेंहि स्मशानाचं! या स्मशानानं तुला असं काय वेड लावलं आहे? आणि तें कां? हेंच मी तुला विचारणार होतें, वेडे, आज पुष्कळ दिवस. मग आता गोष्ट निघाली सहज. तर आता सांगच ना मला."

नीला म्हणाली, "अहाहा! नंदामाई, किती सुंदर प्रश्न विचारलास तूं. मला या जगांत आता स्मशानाशिवाय काय बरं उरलं आहे! तुझ्या या गौळवाड्यांत राहिलें ती रोज स्मशानाचं दर्शन होईल ही सोय पाहूनच बरं का? मीं इथं मुक्काम तेवढ्याचकरिता कायम केला. नाही तर मला राहायला गावांत घरं काय थोडीं आहेत? ती भवानी माझ्यासारखीच वेडी आहे. तिचं वेड पुत्रप्राप्तीचं का असेना! माझ्यासारखं स्मशान-प्रेमाचं का नसेना! पण वेडच. ती वेडी माझ्यामागं जशी कांही हात धुऊन लागली आहे. म्हणते माझ्या घरीं येऊन राहा. पण तिथं राहिलं तर मला स्मशानाचं दर्शन कसं घडणार, नंदामाई?"

"पण मुली, तूं अजून माझ्या प्रश्नाचं सरळ उत्तर नाहीच दिलंस?" नंदा उत्सुकतेनं म्हणाली.

"उत्तर! उत्तर तें काय असणार?" नीला वर मान करून उसासा टाकून म्हणाली. "त्या दिवसापासून या माझ्या शरिरांतला आत्मा नष्ट झाला. उरलं तें कलेवर—मृत शरीर. तें मला स्मशानांत लवकरच पोंचविलं पाहिजे! नाही तर कुजायचं नाही का, नंदा माई? पण आता फार उशीर लागणार नाही बरं का तसं करायला! आजच पाहिला त्याला नगरांत.

स्मशानांत जायच्या माझ्या सोबत्याला. सोबतीशिवाय स्मशानांत एकटं जायला भीति नाही का ग वाटत, नंदामाई ? ”

असं म्हणून नीलेनं मोठ्यानं विकट हास्य केलं. ती टाळ्या वाजवूं लागली. “ आला ग आला. काम झालं. चला. ‘स्मशानाचे धनी । उणा नाही कोणी’ कुजक्या शरीराची दुर्गंधी घेत फार वेळ कोणीं बसावं, नंदा माई ? असं म्हणून नीलेनं नंदेच्या पायांना घट्ट वेंग मारली अन् कांहीशी ती बेहोश झाली.

नंदेला तिच्या प्रश्नाचं उत्तर पुरं मिळालं नाहीच. उलट ती अधिक बुचकळ्यांतच पडली. भ्यालीहि. पण वेडं माणूस बडबडूं लागलं म्हणजे त्याला अधिक बोलवूं नये, या विचारानं तिनं अर्धवट बेशुद्ध झालेल्या नीलेला उचलून वर घेतलं आणि कवटाळून आपल्या उराशीं धरलं. लवकरच नीला शुद्धीवर आली, शांत झाली आणि म्हणाली, “ नंदामाई, क्षमा कर. क्षणभर झटका आला त्यामुळं तुझ्या प्रश्नाचं उत्तर द्यायचं तसंच राहिलं. तुझ्यासारख्या मातामाउलीपुढं मन मोकळं करूं नये तर कुणापुढं ? तुला सगळं सांगितल्यानं मनाचं ओझं तितकं हलकंच होईल. ऐक तर माझ्या जन्माची कहाणी. मला स्मशान कां आवडतं आणि माझा स्मशानाचा सोबती कोण हेंहि कळून येईल तुला ! ”

इतकं बोलून नीला उठली. नंदेच्या शेजारीं त्याच फळीवर अंग सावरून बसली, आणि म्हणाली, “ ऐकतेस ना, नंदामाई ! नीट लक्ष देऊन ऐक या तुझ्या हातभागी मुलीची करुण कहाणी.”

प्रकरण दुसरें

नीलेची करुण कहाणी

यावर नंदा काय बोलणार ? तिनं होऊनच हा अवघड प्रश्न काढला. तेव्हा नीलेची कहाणी दुःखकारक आहे असं दिसत असलं तरी ती ऐकून घेणं तिला प्राप्तच होतं. तसंच हुंकाराचा प्रतिध्वनि उमटविल्यानं बोलणाऱ्याच्या दुःखाचा उद्गार हलका होतो हेंहि तिला माहीत होतं. तिनं इतकंच केलं कीं नीलेकड सरकून तिच्या अंगाशीं चिकटून बसून तिच्या कमरे-

भोवती प्रेमानं हाताचा विळखा घातला. तिच्या केसावरन हात फिरवला आणि गहिवर गिळून साफ आवाजानं म्हणाली, " बाळ, जग कसं असतं हें मला थोडंबहुत माहीत आहे बरं का! पण तुझ्या तोंडचे शब्द ऐकावेसेच वाटतात. मी ते ऐकायला मन घट्ट केलं आहे. तर सांग आता तुझ्या जन्माची कहाणी!"

नीला म्हणाली, " ऐक नंदामाई लक्ष लावून!"

* * *

" माझं राहण्याचं गांव धनकोटी."

" जिथं शाक्तपंथाचं एक देवस्थान आहे तेंच ना? भद्रा नदीकांठचं?" नंदामाईनं विचारलं.

" होय तेंच तें अभद्र गांव. आता त्या गांवचं आणि त्या देवस्थानाचं तोंडहि फिरून पाहणार नाही, नंदामाई."

" बिचाऱ्या गावानं काय केलं तुझं? आणि देवस्थानानं तरी?"

" मग केलं तें कुणी केलं, माझ्या जन्माचं स्मशान?"

" बाळ, बरं वाईट करतं तें माणूस करतं आणि तेंहि त्याची बुद्धि. फक्त ती बुद्धि मनुष्याला देव देतो."

" झालं तर! माझ्या बाबांना आणि त्या दुसऱ्या चंडाळाला वाईट बुद्धि दिली ती त्या देवस्थानांतल्या देवानं आणि त्या देवस्थानाला आश्रय दिला त्या गावानं."

" वेडे, अशा परंपरेनं सर्व जग वाईट ठरवितां येईल की! पण तें राहो, तुझी कहाणी पुढं चालूं दे."

नीला म्हणाली, " त्या देवस्थानाचं पुजारीपण आमच्या घराण्यांत पिढीजात होतं. माझे बाबा मोठे भाविक पुजारी, स्वभावानं अगदी भोळे होते. माझी माई लहानपणींच वारली. बाबांनीच मला लहानाची मोठी केली. त्यांचं माझ्या-वरचं प्रेम पाहून, त्यांनी कधीहि दुःखी होऊं नये असा प्रयत्न मी करीं. पण ईश्वरानं धर्माच्या कामांत मला त्यांच्यापेक्षा वेगळी भावना दिली, त्याला मी तरी काय करूं?"

" बरं मग त्यांत तुला कुणी नांवं ठेवलीं? देव बुद्धि देतो तसंच माणसानं वागावं धर्माच्या कामांतहि."

" होय ना? पण बाबा पडले कर्मठ शाक्तपंथी आणि मला तर त्यांच्या देवीचा, तिच्या पूजाविधीचा आणि विशेष तर तिच्यापुढच्या बलिदानाचा

मनापासून वीट येई ! यामुळं ते माझ्यावर रागावत. म्हणत, 'कार्टे, तुला नरकाला जाण्याची बुद्धि कां होते? आपण लोकांपेक्षा भाग्यवान म्हणून देवीनं आपल्या घराण्याला हा पुजारीपणाचा अधिकार दिला. त्याचा उपयोग करून आपलं अन् लोकांचं कल्याण करावं तें सोडून तूं अशी धर्माच्या जिवावर उठलीस ती काय म्हणून?' "

" मग मीहि त्यांना म्हणें की, 'बाबा, आमच्या घराण्यावर जर देवीची येवढी कृपा, तर तिनं कां हो माझ्या आईला अकालीं मृत्यु दिला? आणि तुमचं घर ओसाड केलं? आणि तुम्ही आम्ही दोघंच दोघं जिवाभावाचीं उरलों ? आणि त्यानं मला तुमच्याहून अशी वेगळी आवडनावड कां दिली?' पण बाबांना वाटे की पुरुषांची बुद्धि तेवढीच देवी देते ! "

" आणि बायकांची बुद्धि ? " नंदा हंसून म्हणाली.

" छेः ! बायकांना ती बुद्धि कसली ? आणि कशाला ? लहानपणीं बापाच्या आणि तरुणपणीं नवऱ्याच्या आज्ञेंत राहिलं म्हणजे झालं बायकांचं इतिकर्तव्य! बाप-नवरा हेंच त्यांचं दैवत. आज्ञा पाळणाराला बुद्धि लागतच नाही. उलट ती असली तर आज्ञाधारकपणाला आड येते. बाबा मला म्हणत, ' उद्या लग्न होऊन नवऱ्याच्या घरीं गेलीस, तरी आमची ही कुळस्वामिनीच तुझी पाठराखणी होऊन तुझ्याबरोबर यायची आहे.' मग मी रागाने म्हणे, ' असली नको द्वाड पाठराखीण मला. जिच्या तोंडाकड पाहून दिवसादेखील मला भय वाटतं, ती बया राहू दे इथल्या इथंच तुमच्या देवळांत. स्वतःच माझी पाठ राखावयाला मी चांगली खंबीर आहे.' नंदामाई, खरं सांगायचं तर देवीच्या नुसत्या पूजेला, म्हणजे बाबांच्या प्रेमाखातर तिच्यावर लांबून चार फुलं उधळायला, मीं खळखळ केली नव्हती. पण तिचा नैवेद्य पाहिला म्हणजे मला भोवळच येई. हें ओळखून मला नैवेद्यापासून, बलिदानापासून, होतां होईतों बाबा दूर ठेवीत. पण बळी द्यायला आणलेल्या पशूचं पाऊल देवळांत पडल्यापासून, आपलं मरण डोळ्यांनी पाहून तो जो केविलवाणा आक्रोश करूं लागे, तो ऐकून मला बसल्या जागीं घेरी येई आणि मग नैवेद्याकड लागूं की मुलीला सावध करूं असं बाबांचं मन द्विधा होई.

" पण माझ्याकरिता वडिलार्जित पुजाऱ्याची वृत्ति घालवायला बाबा तयार नव्हते. म्हणून उद्या हिचं लग्न व्हायचं तें आजच करूं म्हणजे बरं असं त्यांना वाटूं लागलं. मी रूपानं चांगली होतें. पण माझा हा स्वभाव माझ्या

दुष्कीर्तीला कारण झाला. बळी दिलेला पाहून घेरी येणारी ती शाक्ताची मुलगीच नव्हे! असली सून करून घेऊन घरच्या कुलाचाराला खो कोणी घालावा? असं जो तो म्हणे. मी वयांत येऊं लागलें तशी बाबांची चिंता अधिकच वाढली. उपवर मुलगी ही बापाच्या उरावरची शेगडी ही म्हण बाबांना पटूं लागली.

"देवळांतच आमचं राहतं घर. यामुळं देवळांत येणाऱ्या प्रत्येक पुरुषाच्या नजरेला मी हटकून पडावयाचीच आणि देवीच्या दर्शनाला येणारा खऱ्या भावनेचा कोण आणि कामुक गहिऱ्या नजरेचा कोण हें भोळ्या बाबांनाहि थोडसं कळूं लागलं. पण भाविकपणाच्या आहारीं शेवटीं सर्वच भावना जातात!"

"तें कसं काय?" नंदा आश्चर्यानं म्हणाली.

"तें असं." नीला पुढं बोलूं लागली.. "एके दिवशीं एक तरुण देवीभक्त देवळांत आला. तो रूपानं इतका सुंदर होता की साऱ्या धनकोटी गांवांत तसा दुसरा सापडला नसता. लिंबासारखी त्याची कांति होती. विंचवाच्या नांगीसारख्या होत्या त्याच्या आकडेबाज बारीक काळ्या मिशा. पुढं खरो-खरच त्या नांगीसारख्या अनेक तरुणींना घातक ठरल्या. त्याच्या हनुवटीवर उगवलेली होती दाट काळी कुळकुळीत दाढी. त्याच्या पापी शीलाहून ती फारच कमी काळी असं पुढं ठरलं; पण प्रथम ती अनेक तरुणींना आपल्या डोळ्यांत घालण्याच्या काजळासारखी मोहक वाटली. तो तरुण भिवयांमधें शेंदुराचा टिळा इतका सुबक रेखीव लावी, की तसा कुशल चित्रकारालाहि साधणं कठीण. कावेनं दाट रंगविलेल्या त्याच्या रेशीमकाठी कडकडीत छाट्या, तो चालतांना, आवाज करी. त्याच्या हातांतल्या लखलखीत पितळी भिक्षापात्रांत प्रतिबिंब पडणाऱ्या तरुणींना तो अन्नभिक्षा न मागतां प्रेमभिक्षेची याचना करतो असं वाटे!

"पण त्याच्या रूपापेक्षाहि त्याची कीर्ति, पुरुषांप्रमाणं स्त्रियांनाहि, मोहक वाटे. बारा वर्षे पर्वतावरील विंध्यवासिनी देवीपुढं बसून त्यानं उग्र तपश्चर्या केली होती म्हणे! 'शेवटीं स्वतः देवीच्या हातचा प्रसाद मीं एका गुप्त खड्गाच्या रूपानं मिळविला' असं तो लोकांना सांगे. शाक्त धर्माची अवनति होत आहे असं पाहून, देवीनंच त्याला आपला आवडता दूत म्हणून संचारा-ला पाठविला असं लोक म्हणूं लागले. तो जातो तिथं बौद्ध धर्माचं नास्तिक नवमताचं खंडण करण्यांत यश मिळवितो, असा त्याचा हातखंडा होऊन

बसला आहे असं म्हणत! त्याच्यापुढं मोठमोठे पंडित वादांत हार जाऊन त्याला अजिंक्यपत्र देतात! कोणी त्याचे शिष्य बनून ठिकठिकाणीं त्याच्या नांवाचे मठ स्थापतात. शिष्यिणींनाहि तो गुरूपदेश देऊन धर्मकार्याला लावतो. एक ना दोन--आग लागो नंदामाई, त्या धर्मकार्याला! वरदहस्तानं तो रोग बरे करतो अशीहि आवई उठली; आणि आपले रोग बरे झाल्याच्या भ्रमानं कांही बौद्धभिक्षु परत धर्मांतर करून शाक्त बनले! अशी झगझगीत कीर्ति कोणाला भुरळ घालणार नाहीं? आणि माझे बाबा भाविक भोळे होते हें तर, नंदामाई, मीं तुला प्रथमच सांगितलं."

"होय मुली, तें माझ्या चांगलं लक्षांत आहे. माणूस दिलाचा कच्चा कीं पक्का यावर तर सगळं कांही आहे या जगांत. बरं मग तुझ्या बाबांनी काय केलं?"

हा प्रश्न विचारतांना नंदा नीलेच्या कहाणींत बरीच रंगून गेली होती.

नीला म्हणाली, "माझ्या बाबांना तो स्वर्गांतून उतरलेला देवच वाटला. त्यांनी आग्रह करकरून त्याला देवळांतच ठेवून घेतला. त्याचं बिऱ्हाड चांगलं थाटून दिलं. देवीपुढं त्याचीं प्रवचनं होऊं लागलीं. स्त्री-पुरुषांची गर्दी त्याच्या दर्शनाला लोटूं लागली. त्याचं जेवण पुष्कळ वेळ घरींच पडे; तेव्हा त्याला वाढायसवरायला मला त्याच्यापुढं जावं लागे. त्याच्या डोळ्यांतून त्याच्या अंतःकरणाचा ठाव मीं घेतला तेव्हा मला त्याचं काळीज उलटं चिकटलं असावं असं वाटलं! ती रेखीव नजर, ती लाघवी भाषण करण्याची आवड, स्त्रियांशीं बोलण्याचालण्याचे प्रसंग मुद्दाम घडवून आणण्याचे त्याचे ते प्रयत्न, धर्माचरणाचं तें नुसतं अवडंबर, शाक्त धर्म पुनः प्रस्थापित करण्याच्या त्या बढाईखोर प्रतिज्ञा– हें सर्व पाहून माझ्या तर मनांतनं तो केव्हाच उतरला. त्याच्यापुढं जाण्याचाहि मला तिटकारा येऊं लागला, भय वाटूं लागलं. पण माझ्या भोळ्या बाबांना त्यानं असं कांही भारून टाकलं कीं, त्याच्या तोंडचा प्रत्येक शब्द देवीनं दिलेल्या कौलाच्या फुलासारखा ते झेलूं लागले. त्याला जावई करण्यासंबंधानं त्याचं अन् बाबांचं कांही खासगी बोलणं झालं की काय माहीत नाही. पण मला त्याच्यापुढं जावं लागणार असे प्रसंग बाबा मुद्दाम घडवून आणीत, असा मला पुढंपुढं संशय आला.

"मग एक दिवस देवळांत विशेष कोणी नाही, बाबाहि बाहेर गेलेले, असं पाहून तो तरुण घरांत आला आणि म्हणाला, "नीले, तूं माझ्याशीं परका भाव किती दिवस ठेवणार? मी सर्व जगाचा मित्र; तसा तूं मला कां मानीत

नाहीस? देवीच्याच कृपेनं माझे पाय या घराला लागले, असं मी समजतों आणि ते तिथंच कायम व्हावे अशी माझी फार इच्छा आहे."

"हा लघळपणा पाहून मला रागच आला. मी तुसडेपणानं त्याची निर्भर्त्सना करण्याकरता हसून म्हणाले, 'कां? माझ्या बाबांकड घरजावई व्हायचं आमंत्रण लावलं आहेत वाटतं? तुमचं पाऊल घरांत पडलं ते मला घराबाहेर पाडण्याला असंच मी समजतें. तुमची चालचलणूक मीं सगळी हेरून ठेविली आहे. इतर बायकांशीं तुम्ही काय चाळे करतां, ते मी नजरेनं पाहतें. पण संभाळा बरं! ही नीला अशी तशी नाही. तुमच्या नांवाचा डांगोरा गावभर पिटून तुमची अपकीर्ति करीन. तुमची ती देवी, तुमचा तो दुष्ट शाक्त धर्म, तुम्हाला लखलाभ असो. मला त्याच्याशीं कांही करायचं नाही. तुम्ही आंत आला त्याच पांवलीं तडक घराबाहेर चालते व्हा कसे? नाही तर ओरडा करून, चार लोक बोलावून आणून तुमची फटफजिती करीन, लक्षांत ठेवा. आता बाबा बाहेरून आले म्हणजे त्यांच्याजवळ हट्ट धरून तुमचं बिऱ्हाड देवळाबाहेर काढतें. निर्लज्ज कुठले!' पण असं बोलून त्याच्या आधी मीच घराच्या बाहेर आलें. माझ्या मनाची त्याला कल्पना नव्हती. माझं उग्र रूप पाहून तो वरमला आणि तेव्हा अधिक न बोलतां निघून गेला. जातांना फक्त इतकंच म्हणाला, 'ठीक आहे. चारचौघे लोक घरीं बोलावून आणण्याची हौस आहे नाही का तुला! ती लवकरच फिटेल.'

"आणि तो दुष्ट दीर्घ मतलबी ठरला खरा. सुमारे चार दिवसांनी देवळांत नेहमीपेक्षां कांही विशेष गडबड दिसूं लागली. बाबांनी देवीचीं महापूजा बांधली. नेहमी देवळांत न येणारे असेहि लोक जमूं लागले. मी बाबांना याचं कारण विचारलं तेव्हा ते म्हणाले, 'आज देवीच्या समोर आपल्या धर्मांतला 'श्रीचक्रसमारंभ' आहे.' मला त्याचा अर्थ कळेना. पण आज नेहमीपेक्षा अधिक पशु देवीला बळी दिले खरे. मद्याचे घडे भरून देवळांत येऊं लागले. फुला-फळांचे हारे जमा झाले. सभामंडपांत चित्रविचित्र पोषाख केलेल्या शाक्तांनीं घेर धरला. झांजा वाजवून देवीच्या नांवानं ते मोठमोठ्यानं जयघोष करूं लागले.

"'जय माते! जय चंडिके! जय भवानी! जय दुर्गे!' अशा आरोळ्यांनी सभामंडप दणाणून गेला. मी घाबरून जाऊन बाबांचा आश्रय घेण्याकरिता घरांत शिरलें; आणि पाहतें तों स्वतः बाबा मद्यपानाने बेहोष, बेशुद्ध पडलेले!

त्यांच्या जवळ बसून मी त्यांना सावध करीन म्हणतें तोंच तो तरुण इतर दोन लोक घेऊन आंत आला, आणि ' ही पाहा आजच्या श्रीचक्रसमारंभांत पूजावयाची दिव्य कन्यका ! ' असं म्हणून त्यानं माझा हात धरला. दुसऱ्या दोघांनी माझ्या तोंडापुढं सुवासिक मद्याचे पेले धरले. मी तें पीत नाहीं असं पाहून त्या तरुणाच्या आज्ञेनं त्यांनी मला तें बळजबरीनं पाजलं. पण त्यांत नुसतं मद्य नसून गुंगीचंहि कांही औषध असावं. कारण थोड्याच वेळांत मी बेशुद्ध होत चाललें. त्या अर्धवट स्थितींत त्यांनी मला बाहेर सभामंडपांत नेऊन एका उंच आसनावर बसविलं. एकदोघांनीं माझी देवीसारखी पूजा आरंभली. माझ्या कपाळाला शेंदूर फासला. गळ्यांत तांबड्या फुलांच्या माळा घातल्या. तोंडांत बोटं घालून मध चाटविला. फेर धरणारे भगत देवीची स्तोत्रं म्हणून भजन करूं लागले. शेवटीं 'जय कालिके !' अशी सर्वांनी मिळून मोठी गर्जना केल्यावर त्या तरुणानं मला उचलून, आपल्या खांद्यावर टाकून, घरांतल्या एका खोलींत नेऊन निजविलं. प्रथम मला रागानं हातपाय झाडण्याची आणि मनानं देवाचा धावा करण्याइतकी तरी शुद्ध होती. पण मी बाबांना आणि देवाला आपणाकडून हाक मारी तो जिभेनं बाहेर उमटविण्याची शक्ति उरली नव्हती...थोड्या वेळानं मला मनांत देवाचं स्मरण करण्याइतकीहि शुद्ध राहिली नाही......मग शरीराची शुद्ध कुठची ! पण तो देव तर त्यानं माझ्या अब्रूचं रक्षण करावं कीं नाही...? नंदामाई, त्याच दिवशीं माझ्या मनांतला देव कायमचा मेला......

" मी शुद्धीवर आलें तों फिरून सभामंडपांत देवीसमोर ! मला वेताच्या आसनावर लोकरी वस्त्रावर निजविली असून उशाशीं शुद्धीवर आलेले बाबा, बाजूला तो तरुण, आणि पायांकडे गांवचा एक शाक्त भिक्षुक असे बसले होते. तिघे मिळून हातांत तीर्थाचे कलश घेऊन बेलाच्या त्रिदळांनी माझ्या अंगावर शिंतोडा उडवून तोंडानं कांही मंत्र म्हणत अभिषेक करीत होते. मी शुद्धीवर येऊन अंगावरचं वस्त्र सावरूं लागलें, तों बाबा म्हणाले, ' बाळ, भिऊं नको. श्रीचक्रसमारंभ संपला. देवीची कृपा आज तुझ्यावर झाली. उठून बैस आणि देवीला नमस्कार कर.' हे शब्द ऐकतांच माझी पायाची तिडीक डोक्याला गेली. मी वाघिणीसारखी त्या सर्वांच्या अंगावर चवताळून गेलें, आणि म्हणालें, ' आग लागो या तुमच्या शाक्तांच्या देवीला आणि धर्माला ! बाबा, तुमच्या बेअकली धर्मभोळेपणाचा कळस झाला. मी आजपासून तुम्हाला मेलें आणि

तुम्ही मला मेलां. स्वतः देवानं माझ्या अब्रूचं रक्षण केलं नाही. मग तुम्ही कुठून करणार? ही पहा मी स्मशानाचीच वाट धरली—'

"इतकं बोलून मी अंगावरच्या त्या एका अपवित्र वस्त्रानिशीं ताडकन घराबाहेर पडलें आणि त्या घराकडून एकदा जें तोंड फिरविलं तें आजवर! मला त्या क्षणींच स्मशान हवं होतं. पण माझ्या गावचं स्मशान देखील, खाईत उडी घ्यावयाला, मला लाजिरवाणं वाटूं लागलं. मग मी या गावीं आलें, स्मशानहि गांठलं. पण मनांत विचार आला की मला भ्रष्ट करणाऱ्या त्या नराधमाला आधी स्मशानांत पोंचवावा आणि मग आपण जावं! त्याची वाट इतके दिवस पाहतां पाहतां आज मला तो या नगरांत अवचित दिसला की ग नंदामाई!"

इतकं बोलून नीला नंदामाईच्या खांद्यावर डोकं टेकून ढसढसा रडूं लागली, व म्हणाली, "म्हातारे, सांग बरं, मला वेड न लागावं तर काय होईल? मला आता स्मशानाखेरीज काय उरलं आहे? या गौळवाड्यांत तूं, त्या गावांत ती भवानी आणि तिचा तो गोड पोरगा मुरारी, एवढाच माझा विसावा. पण तो नराधम आज दृष्टीस पडल्यापासून हा विसावा टाकून देऊन, त्याला अन् मला दोघांनाहि स्मशानांत पोंचविण्याच्या तयारीला लागावं असं वाटूं लागलं आहे."

हे शब्द बोलून होतांच नीलेचं सगळं अंग थरथरूं लागलं. इतकं की त्याचे धक्के नंदेच्या अंगाला बसूं लागले. नीलेच्या तोंडाला फेस आला आणि ती नंदेच्या अंगावर कलंडून निपचित पडली. तिला आडवी करून ठेवून नंदेनं उठून जाऊन झोपडींतून पाणी आणलं, नीलेच्या डोक्यावर शिंपडलं, तोंडांत घातलं आणि पदरानं वारा घालीत हातानं तिचं डोकं थापटीत म्हणाली, "नीले बाळ, उगी, सावध हो. गोष्टी एकेकदाच घडतात. तूं खंती करूं नको. झालं ते सगळं विसरून जा. जो देव तुला विसरला म्हणतेस त्याच्याच करणीनं माणसाला एकाच जन्मांत अनेक जन्म लाभतात. तूं घर सोडून दिलंस, जगांत एकटा आधार अशा बापाचा त्याग करून आलीस, त्यानं तुझ्या देहाची अपवित्रता गेली. त्याग हेंच खरं स्मशान. त्याच्या ज्वाळेनं तूं शुद्ध झालीस. धनकोटींतली नीला नारायणी जी कोणी ती तूं आता उरली नाहीस. ऊठ, ऊठ, सावध हो."

या उपचारांनी थोडया वेळांत नीला सावध होऊन उठून बसली. तें पाहून नंदेला बरं वाटलं आणि ती म्हणाली, "पण ज्यानं तुझ्या जन्माचा असा

सत्यानाश केला आणि जो तुला या गावांत नुकताच दिसला म्हणतोस त्याचं नांव काय ?"

"त्याचं नांव रुद्रभट." नीलेनं तिरस्कारानं उत्तर दिलं. इतक्या तिरस्कारानं की तें उच्चारलं या पापाकरिता ती जीभ कापून टाकावी असं तिला वाटत असावं.

इतकं बोलणं होतं आहे तोंच तिकडून दोन व्यक्ति गौळवाड्याच्या रोखानं हळूहळू चालत आलेल्या दिसल्या. त्यांतला एक पुरुष आणि एक स्त्री होती. तथापि दोघांच्याहि अंगावर एकाच पिवळ्या रंगाचीं साधीं वस्त्रं असून तीं दोघं हातांत हात घालून एकमेकांशीं आनंदानं हळूहळू कुजबुजत होतीं. नंदेच्या ओळखीचींच तीं होतीं. म्हणून तिच्या हाकेच्या टप्प्यांत तीं येतांच नंदेनं त्यांना हटकलं अन् म्हणाली, "या या, शमधन, मृणालिनीबाई, या ! आळश्यावर गंगा लोटली. तुम्हाला भेटवावं असं आणखी एक मनुष्य आज या ठिकाणीं सुदैवानं आहे. त्याची तुमची ओळख करून देतें."

नीलेला अनोळखी अशीं हीं दोन माणसं या वेळीं तिथं अवचित आलीं हें नंदेला फार सोईचं वाटलं. त्यांच्या येण्यानं नीलेच्या दुःखप्रद कहाणीला खळ पडेल तो बराच. एकदम लक्ष दुसरीकड गेल्यानं दुःखी मनुष्य दुःख विसरतो. त्याच्या विचारांना वेगळी दिशा लागते. बोलण्याला विषय वेगळा निघतो. या गोष्टीचा आयता उपयोग करावा या हेतूनं त्या येणाऱ्या दोघां स्त्री-पुरुषांना नंदेनं, एरवीहून मुद्दाम विशेष अगत्यानं, हाक मारून बोलावलं.

तीं आल्यावर नंदा व नीला दोघीहि उठून उभ्या राहिल्या आणि फळीवर बसायला सर्वांना जागा नाही म्हणून चौघेहि त्या स्वच्छ सारवलेल्या अंगणांत भुईवरच बसलीं.

नंदा म्हणाली, "नीले बाळ, पाहिलींस का हीं दोन तरुण माणसं ? आपल्या नगराला नव्यानं आलीं आहेत. इकड केव्हा तरी अशींच फिरावयाला येतात म्हणून माझी ओळख झाली. तुझीहि आज करून देतें. त्यांना पाहिलं म्हणजे माझं मन कसं प्रसन्न होतं. हे शमधन, या मृणालिनीबाई. पाहा त्यांचे हे वेष. त्यांचं कुळ केवढं थोर. त्यांच्या घरची केवढी संपत्ति आणि सुखवस्तुपणा ! हीं त्यांच्या मुखांवरच दिसून येतात नव्हे का ? पण त्यांनी त्या सुखाचा त्याग केला अन् हातांत हात घालून बौद्ध धर्मप्रचाराचं आवडतं

काम अंगावर घेऊन तीं विदेशी झालीं आहेत. त्यांच्याकड पाहिलं म्हणजे मला तुझ्याकड पाहिल्यासारखंच सुख होतं. बोल, त्यांच्याशीं दोन शब्द, बोल."

अनोळखी माणसं ओळखीच्या माणसांसारखीं एकदम एकमेकांशीं बोलूं शकत नाहीत हें नंदेला माहीत का नव्हतं ? नीलेची दुःखी उदासी वृत्ति पार बदलून जाऊन ती फिरून नव्या मानावर यावी येवढ्याकरिताच केवळ तिनं हा अप्रयोजकपणा पत्करला. पण एकदम मन मोकळं करून त्यांच्याशीं बोलण्याइतकी नीला मनांत अजून प्रसन्न झालीच नव्हती. उलट तरुण अन् तरुणी धर्मप्रचाराचं काम करावयाला 'हातांत हात घालून' जुटीनं निघालेलीं हें त्यांचं वर्णन ऐकून अविश्वासानं—संशयी वृत्तीनंच ती त्या दोघांकडं आलटूनपालटून रोखून पाहूं लागली.

नंदेच्या लक्षांत ही गोष्ट येऊन तिनं होऊनच बोलणं सुरू केलं. प्रथम तिनं त्या दोघांना थोडं गाईचं दूध पिण्याचा आग्रह केला; पण मृणालिनी म्हणाली, "सूर्यास्तानंतर आम्ही तोंडांत पाणीहि घालीत नाही ! आश्रमविहाराचे नियम आम्ही सर्वत्र पाळीत असतों. बरं पण नंदाभाई, तुम्ही आम्हाला या बाईची ओळख करून द्या ना, त्यांच्याकड पाहून आम्हाला त्यांची ओळख करून घ्यावी, त्यांच्याशीं बोलावं असंच वाटतं."

नंदा म्हणाली, "होय. या माझ्या वेड्या मुलीची अन् तुमची ओळख करून द्यावी असं मनांत आलं म्हणूनच तर तुम्हाला वाकडी वाट करून इकड यावयाला मीं बोलावलं. ही माझी मुलगी म्हटलं, पण धर्माची मुलगी आहे हो ! ती शाक्तधर्मी आई-बापांच्या पोटीं आली, पण त्या धर्मावर तिची अवकृपा झाली आहे. यामुळं तुमचं आणि हिचं गोत्र जुळण्यासारखंच आहे. हीच नीला नारायणी."

नीलेचं हें वर्णन ऐकून मृणालिनीला फार हर्ष झाला. नव्या धर्माचा स्वीकार करणाराच्या अंगीं जो विशेष कडवेपणा व भावनेची जी विशेष तीव्रता येते ती तिच्या अंगीं आलेली होती. 'शाक्तधर्मावर अवकृपा करणारी' एवढें वर्णन ऐकतांच नीलेविषयी एक प्रकारचं भगिनीप्रेम बौद्ध भिक्षुणी मृणालिनी-च्या मनांत स्फुरण पावलं आणि तिचा स्वभावहि बोलतांना किंचित् वाहव-णारा—उतू येणारा असल्यामुळं, ती आपण होऊन पुढं बोलूं लागली. शमधन मात्र तटस्थ वृत्तीनं नीलेकड कुतूहलानं टक लावून पाहत होता.

मृणालिनी म्हणाली, " वाहवा ! भगवान् बुद्धाचीच कृपा म्हणावयाची कीं सहानुभवी अशा या बाईंची अन् आमची आज गाठ पडली. मग ह्या आमचा नवा धर्मच सत्वर कां स्वीकारीत नाहीत ? आमच्या भिक्षुणीसंघाला त्यांची मोठीच जोड लाभेल. आम्ही शाक्तधर्माच्या उच्छेदाचं कार्य हातांत हात घालून करूं. पुरुषांपेक्षां स्त्रियांनीच हें नवीन धर्माच्या प्रसाराचं कार्य अधिक यशस्वी करावं अशी भगवान् बुद्धाची इच्छा दिसते. म्हणूनच आमच्या संघांत पुरुषांपेक्षा स्त्री-भिक्षुणीच अधिक आहेत. (हें म्हणतांना तिनं शमधनाकड कटाक्षयुक्त दृष्टीनं पाहिलं.) या आम्हाला येऊन मिळाल्या तर माताजी अवलोकिताबाईंना फार आनंद होईल. आम्हाला या कृतार्थ करतील का ? "

मृणालिनीनं प्रश्नच केला आणि नीला तर उत्तर देण्याचा रंग दिसेना म्हणून नंदाच म्हणाली, " हो. ही मुलगी तुमच्या आश्रमविहारांत राहण्याला सर्वतोपरी योग्य आहे. तुमच्यासारखीच ती त्यागी वृत्तीची आहे. पण—"

नंदेच्या उत्तरांत मनाचा संकोच दिसला. मनमोकळं उत्तर न देण्यासारखा अवघड प्रश्न मृणालिनीनं केला हें बरं न वाटून शमधन तिचा निषेध करण्याकरिता, पण तिलाहि वाईट न वाटावं म्हणून, किंचित् विनोदी स्वरानं म्हणाला, " आमची मृणा की नाही, शिकारिणीच्याच जन्माला यायची नंदामाई. पण थोडक्यांत चुकलं. चांगलंसं माणूस दिसलं म्हणजे तें आपल्या जाळ्यांत पकडावं अशी अनिवार इच्छा तिला होते."

नंदा म्हणाली, " मग स्वतः तुमचीहि शिकार बहुधा तिनंच केली असावी ! मृणालिनीबाईंना चांगल्या माणसांची परीक्षा बिनचूक दिसते."

नंदा हें सहज बोलून गेली, पण त्यानं न कळत मर्माला हात घातला. कारण तें ऐकून शमधन अन् मृणालिनी दोघंहि एकमेकांकड पाहून मोठ्यानं हसली अन् किंचित् लाजलीहि !

संभाषणाला मिळालेल्या ह्या अभावित वळणानं नीलेचं तोंड उघडलं. धर्मप्रसाराचं काम खरं, पण तें इतकी सलगी ठेवणाऱ्या स्त्री-पुरुषांनी मिळून जिथं केलं जातं तिथं धर्मप्रसारकार्यापेक्षा आणखी कांही तरी वेगळ्या प्रकारचा जिव्हाळा असतो, आणि या दोन तरुण धर्मप्रचारकांत तो असलाच पाहिजे, अशी नीलेची थोड्याशा अवलोकनानं खात्री झाली. म्हणून ती म्हणाली, " नंदामाई, मी यांच्या धर्मपंथाला जाऊन मिळेन आणि आश्रमविहारांत जाऊन

राहीनहि. पण दुर्दैवानं मृणालिनीबाईसारखा मला जोडीदार कुठं आहे? तसा जोडीदार मिळवावा तेव्हा यांच्या संघांत शिरावं. धर्मचारांत मला पुरुषसहवासाचा अनुभव आला तेवढा पुरे. तो माझ्या जन्माला पुरून उरण्याइतका आहे. माझ्या जोडीदारानं मला स्मशानांत पोंचविलं. आश्रमांतून व मठांतून स्त्री-पुरुषांनी एकत्र राहणं मला मुळीच आवडत नाही. या एकत्र राहण्यानं धर्मसाधनाबरोबर अधर्मसाधनहि होत राहायचं."

नीलेनं संभाषणांत भाग घेतला, पण त्यानं तिच्या मनांतली दुःखाची छटाच व्यक्त झाली. शिवाय आपण हाक मारून बोलावलेल्या पाहुण्यांच्या धर्मप्रसारपद्धतीवर नीलेकडून अप्रिय वाटण्यासारखी टीका झाली, हें लक्षांत येऊन नंदेनं संभाषण आवरतं घेतलं. ती म्हणाली, "मृणालिनीबाई, या माझ्या वेडया मुलीचं बोलणं तुम्ही मनावर घेऊं नका हां! ती आपल्या एका विशेष दुःखानं होरपळलेली आहे. यामुळं तिच्या तोंडून कांही उद्गार निघाला तरी त्याची उष्ण वाफ ऐकणाराला चटका लावल्याशिवाय राहत नाही. तिला शाक्तधर्माचा वीट आला असला तरी. माझ्यासारखंच तिला धर्मांतर करणं हें आवडत नाहीं, 'मी अमुक एका धर्मांतली' आहे असं नांव घेऊन निर्देश न करतांहि मनुष्याला ईश्वरप्राप्ति करून घेतां येतेच की नाही? शाक्त म्हटलं काय, बौद्ध म्हटलं काय, सनातनी म्हटलं काय, मन शुद्ध ठेवील त्याला सर्व एकच. माझ्या गोठ्यांत पांढऱ्या शुभ्र रंगाची अन् काळया कुळकुळीत रंगाची एकेक गाय आहे. त्यांच्यावर माझं सारखंच प्रेम आहे. उलट त्या दोघी मला सारखंच गोड दूध देतात!'

नंदेच्या या समारोपानं संभाषण जवळ जवळ थांबल्यासारखंच झालं आणि संध्याकाळ होऊन अंधारहि पडत चालला, असं पाहून शमधन म्हणाला, "चल मृणा, उशीर नाही का झाला? माता अवलोकिताबाई तुझी वाट पाहत बसल्या असतील नव्हे का?" आणि तो उठून चालूंहि लागला.

"अरे होय की, मी नंदामाईच्या भेटीला आलें म्हणजे वेळेचं भान विसरून जातें. पण आज इथं थोडा उशीर झाला तरी उलट लाभहि विशेष नाही का झाला? मी पुन्हा येणार लवकरच नीलाबाईची आणखी ओळख करून घ्यायला, बरं का नंदामाई!" असं म्हणून मृणालिनी उठली. चटदिशी चार पावलं टाकून तिनं शमधनाला गाठून त्याचा हात धरला, आणि दोघंहि

आल्यावेळेसारखीं हलक्या आवाजानं आपआपसांत बोलत आश्रम-विहाराकड निघालीं.

नीला नंदेला म्हणाली, "बघ, नंदामाई, चाललीं फिरून दोघं हातांत हात घालून. हेंच त्यांचं खरं धर्मकार्य !"

नंदा किंचित् निषेधदर्शक स्वरांत म्हणाली, वेडी कुठची! आहेत बाळपणीची खेळगडी म्हणून घालतात हातांत हात! पण त्यांनीहि तुझ्यासारखाच गृहत्याग केला आहे की नाही? त्यागी की भोगी यावरूनच माणसाची वृत्ति ओळखावी बाळ! चल, आता मला देवाची आरती करूं दे."

प्रकरण तिसरें

शमधन आणि मृणालिनी

वाट चालतांना शमधन म्हणाला, "हात टेकावे तुझ्यापुढं मृणा. अग धर्मप्रसारकार्याचा उत्साह झाला म्हणून, त्याला कांही मर्यादा असावी की नाहीं!"

मृणा आश्चर्य प्रदर्शित करून म्हणाली, "मर्यादा सुटली असं काय रे शमू मीं केलं? ती नवी बाई तोंडावरनं अगदी उदास, दुःखी वाटली. आमच्यासारखाच तिलाहि शाक्त धर्म नावडता आहे, मग तिला धर्मांतर कर म्हणाले यांत काय चुकलं? तुलासुद्धा भिक्षुदीक्षा घेण्याचा मीं आग्रह केला तेव्हाच तूं ती घेतलीस ना? धर्मकार्यसाधकानं आपलं तोंड नेहमी उघडं ठेवावं. तरच मतप्रसार होतो."

शमधन हसून म्हणाला, "तोंड उघडं ठेवावं; पण आंतली वाफ फुकट बाहेर दवडूं नये, अन् बाहेरचे कृमिकीटक आंत येऊं देऊं नयेत, इतका तरी सावधपणा धर्मप्रचारकानंहि ठेवावा बरं का!"

असो. मृणा व शमधन हीं स्वतःच भिक्षुदीक्षा घेऊन बौद्ध-संघांत कशीं आलीं हें ऐकण्याची इच्छा वाचकांना असणार म्हणून तें सांगतों.

* * *

मृणालिनी व शमधन दोघेहि हेमकुटिर या गांवचे रहिवासी. दोघांचीं घराणीं पिढीजात श्रीमंत. मृणालिनीच्या बापाचा धंदा गंगेतून फिरणाऱ्या

व्यापारी गलबतांच्या होता, तर शमधनाचं घराणं सावकारीवर, जमिनदारीवर श्रीमंत झालं होतं. प्रस्तुत कथानकाच्या प्रारंभापूर्वी सुमारे दोन-तीन वर्षं या तरुण कुमार-कुमारिकांचा विवाह अगदी मुहूर्तनिश्चयापर्यंत येऊन ठेपला होता. पण मृणालिनीचा बाप ज्योतिषावर विश्वास ठेवणारा असल्यामुळं, त्यानं ग्रहानुकूलता हवी तशी लाभण्याकरिता प्रत्यक्ष लग्नतिथि चार महिने पुढं लांबविली. मृणालिनी अन् शमधन या दोघांनाहि ती गोष्ट न आवडल्यामुळं तीं मनांतून खिन्न झालीं. दोघांच्या घराण्याचा ऋणानुबंध अति दाट. इतकंच नव्हे तर, या दोघां तरुणांची वधू व वर या नात्याची योजना बालपणापासून ठरलेली असल्यामुळं नित्य गांठी-भेटी पडल्यानं त्यांचं परस्परांवर प्रेमहि अतिशय बसलं होतं. म्हणून पूर्वी ठरलेल्या लग्नदिवसाची मार्गप्रतीक्षा तीं दोघं उत्कंठेनं करीत होतीं. ज्योतिषीबुवांनी मधेंच उत्पन्न केलेल्या या अडचणीनं दोघांचाहि फार विरस झाला. पण तीं मर्यादशील असल्यामुळं त्यांना वडिलांच्या निश्चयाविरुद्ध कांहीच करतां येईना. अशा त्या अडचणीच्या स्थितींत अकस्मात् एक वेगळीच गोष्ट अशी कांही घडून आली की, तिच्या योगानं तें लग्न चार महिन्यांचं चार वर्षांवर गेलं, आणि पुढंहि केव्हा होइल की नाही याविषयी त्यांच्या आईबापांना चिंता वाटूं लागली.

वर सांगितल्याप्रमाणं लग्नतिथि लांबल्यानंतर सुमारे एक-दोन महिन्यांनीं एक दिवस बौद्ध भिक्षूंचा एक मोठा फिरता संघ हेमकुटिर नगरांत धर्मसाधनार्थ संचार करीत करीत आला. अशा संघाची या भागांत ही पहिलीच खेप असल्याकारणानं, लोकांमधे कुतूहलबुद्धि सहजच जाग्रत झाली. संघाचा तळ नगराबाहेरच्या रम्य आमराईत पडला होता. तिकडे सांजसकाळ नगरवासी जनांच्या येरझारा सुरू झाल्या. अर्थातच त्यांत स्त्रिया व मुलं यांचीच गर्दी अधिक असे. आणि हे भावनाप्रधान भोळे प्रेक्षकजन संघाचं दर्शन घेऊन परत येतांना इतके मोहून गेलेले आढळत की, आजच्यापेक्षा उद्या, व उद्याच्यापेक्षा परवा, संघाच्या दर्शनाला लोटणारी गर्दी अधिक, अशा क्रमाने ती वाढूं लागली.

आम्ही स्वतः लहानपणीं, अपरिचित लोकांच्या प्रथम-दर्शनाचा परिणाम गावच्या मुलांवर, स्त्रियांवर कसा होतो हें पाहिलं आहे. आम्ही तेव्हा पाहिलेले लोक म्हणजे काबुली बलुची लोकांची ती एक फिरती टोळी होती. या टोळींत धिप्पाड बांध्याचे दाढी-मिशावाले पुरुष, विचित्र पोषाखाच्या स्त्रिया, निर्भयपणं

संचार करणारीं व्रात्य मुलं, बिनखोगिराची दंगेखोर तट्टं, उग्रदर्शन असे कुत्रे, आणि या सर्वांच्या फिरत्या निवासाचं स्थान अशा चार-दोन बैठ्या राहुट्या—असा सरंजाम होता. दोनप्रहरीं किंचित् उन्हं परतलीं; अन् दारावरचे खरेदी विक्रीचे व्यवहार करण्याला घरच्या बायका रिकाम्या झाल्या, म्हणजे हे काबुली स्त्री-पुरुष आपल्या मुलांसह विकाऊ जिन्नस घेऊन गावांतून फिरत. या जिनसांत बोथट चाकूकात्र्या, चमकणाऱ्या मण्यांचे सर, सुंदर दगड, रंगीत चष्मे, सुकल्यामुळें आंतील बिया खुळखुळ वाजणारीं फळं; गांठी मारलेले रेशमी गोफ, बजरबट्टू, हेच मुख्यतः असत.

फेरीवाल्यांचा क्रम असा असे की, कोणी एखादा जिन्नस पाहायला मागितला की तो द्यावयाचा. आणि 'किंमत किती' असं नुसतं विचारलं की तोंडाला येईल ती सांगून सौदा पटला असा बहाणा करावयाचा. गिऱ्हाईकानं तो जिन्नस महाग म्हणून नको असं म्हटलं की रागावून, शिवी देऊन, हात धरून 'टाक पैसा' असं म्हणावयाचं! कोणी तक्रार केली तर कमरेचा सुरा उपसून त्याचे अंगावर उगारावयाचा. हा सर्व प्रकार दिसत असला तरी काबुली फेरीवाल्यांना पाहण्याला घरांतून बाहेर पडणारांची संख्या कमी होत नसे. शेवटीं रक्तपाताचे चार-दोन प्रसंग घडल्यावर संस्थानिकाला त्यांत लक्ष घालावं लागलं. आणि त्यांनी हत्यारबंद पोलिसांकरवीं या टोळीला हाकून गावापासून एक कोसभर पिटाळून घातलं, तेव्हा गावकऱ्यांच्या मागचा त्रास चुकला.

वरील अनुभव सांगण्याचा हेतु हाच की, भयंकर उपद्रवकारक अशाहि लोकांचं कौतुक, त्यांच्या केवळ अपरिचितपणामुळं, स्त्रिया व मुलं यांना इतकं वेड लावतं, तर बौद्धसंघाच्या मोहक दर्शनानं हेमकुटिर नगराच्या लोकांना किती वेड लावलं असेल याची कल्पनाच करावी. या संघाजवळ, वर सांगितलेल्या काबुली फेरीवाल्याप्रमाणं कौतुकास्पद विकाऊ पदार्थ नव्हते हें खरं. तथापि संघांतील भिक्षुभिक्षुणींचे साधे पिवळे पोषाक, विनयशील वर्तन, उदार धर्मतत्त्वांचा उपदेश, निर्लोभ वृत्ति, विशेषतः सनातनी समाजांत दिसून न येणारी अशी पुरुषांमधे, अन् पुरुषांच्या बरोबरीनं वागण्याची स्त्रियांची रीत, हीं सर्व तितकींच अपूर्व कुतूहलकारक होतीं. भिक्षुसंघ उपद्रवकारक तर नव्हताच, पण उलट लाघवी असे. त्यांतील तेजस्वी तरुण स्त्री-पुरुष भिक्षापात्रं

हातीं घेऊन धर्मसाधन करीत फिरतांना पाहून कोणाला आश्चर्य वाटल्याशिवाय राहिलं असतं !

पण या सर्वांहून प्रेक्षकांच्या मनावर अधिक मोहनी पाडणारी एक गोष्ट होती ती अशी की, या संघाचं नेतृत्व अवलोकिता नामक एका प्रौढ वयस्क, सुंदर, सतेज, रुबाबदार यतिवेषधारी विधवा स्त्रीकडे असून, तिच्या आज्ञेत पुरुषहि, आज्ञाकारक शिष्य किंवा सेवक यांच्या रीतीनं वर्तत आहेत असं दिसे. भगवान् बुद्धाची कीर्ति या भागांत हळुहळू पसरूं लागली होतीच, पण त्याचं नांव घेऊन त्याच्या धर्मतत्त्वांचा उपदेश करीत फिरणारा हा संघ पाहून, खरोखर कांहीं नवीन मन्वन्तर ईश्वराच्याच आज्ञेनं प्रवर्तित होत आहे की काय असं लोकांना वाटूं लागलं.

मन खिन्न असलं म्हणजे त्याला यत्किंचित्हि आनंदित किंवा जागृत करण्याला जें कांहीं भेटेल त्याचं महत्त्व फार वाटतं. मृणालिनी अन् शमधन दोघेंहि अशाच खिन्न मनःस्थितींत असल्यामुळं त्यांना भिक्षुसंघाचं हें दर्शन उपकारक झालं. एके दिवशीं भिक्षुणी अवलोकितेचं नित्य संध्याकाळीं होणारं प्रवचन ऐकण्याला तीं दोघं स्वतंत्र रीतीनं गेलीं असतां, तिथं त्यांची अवचित गांठ पडली. प्रवचन समाप्त झाल्यावर शमधन मृणालिनीपाशीं गेला व म्हणाला " मृणा, आज रोजच्याहून थोडा अधिक उशीरच झाला नाही का प्रवचनसमाप्तीला ? अंधारहि पडूं लागला आहे. तर चल मी तुला सोबत करून घरापर्यंत पोंचवितों. मृणालिनी 'बरं आहे' असं म्हणून त्याच्या संगतीनं वाट चालूं लागली. पण बराच वेळ झाला तरी ती कांहींच बोलेना असं पाहून शमधन म्हणाला, " मृणा, मला वाटतं आज संघाच्या मठांतून येतांना तूं आपलं मन परत बरोबर आणलं नाहीस. तें मागं अवलोकिताबाईजवळ ठेवून आली आहेस; म्हणूनच तूं माझ्याशीं एक अक्षरहि बोलत नाहीस ! "

हें ऐकून मृणालिनीनं एक दीर्घ सुस्कारा टाकला, आणि " तसंहि असेल कदाचित् " इतकंच म्हणून पूर्वीप्रमाणं खाली मान घालून ती वाट चालूं लागली.

कांहीं वेळ थांबून शमधन पुनः म्हणाला, " खरोखरच तूं आपलं मन मागं ठेवून आली आहेस. पण तें उद्या प्रवचनाला जाऊन परत मिळवीपर्यंत घरच्या लोकांशींहि असाच का अबोला धरणार ? "

घरच्या लोकांचा उल्लेख झाल्यामुळंच की काय, मृणालिनीला कांही एक आठवण होऊन ती म्हणाली, " शमधना, आपलं लग्न लांबणीवर टाकल्याबद्दल मी बाबांवर रागावलें होतें; पण त्या रागावण्याबद्दल खरोखर मीं स्वतःवरच रागावलं पाहिजे असं, माताजी अवलोकितेचीं प्रवचनं ऐकल्यापासून, मला वाटूं लागलं आहे."

शमधन म्हणाला, " एकूण तूं आपलं मन आपल्या ठिकाणीं परत आणलं आहेस तर मग!"

" होय. पण त्याबरोबर माताजीचा उपदेशहि."

" त्या उपदेशापैकी विशेष असा भाग कोणता ?"

" वासना हेंच या जगांत दुःखाचं मूळ आहे. आणि वासना निर्मूल करणं हेंच अंतिम सुख आहे. तुझं-माझं लग्न होईल; आणि आपण दोघं मिळून संसारसुख भोगूं, अशी वासना मीं धरली हीच मुळांत चूक झाली."

" पण तुझ्या-माझ्या लग्नाची वासना नुसती तूं व मीच नव्हे, तर त्यापूर्वीपासून तुझ्या-माझ्या वडील माणसांनीहि धरली होती ना ? आणि तुझ्या पित्यानं लग्न लांबणीवर टाकलं तें दुःखानं, पण ज्योतिषावर विश्वास असल्यानं ? म्हणजे पतिपत्नी या नात्याच्या तुझ्या व माझ्या भावी सुखाकरिता आणि कल्याणाकरताच नव्हे का ?"

" आमच्या दुःखाचं कारण तें त्यांच्या दुःखाचंहि कारण हें मला कबूलच आहे. पण त्या दुःखाचा निरास होण्याला त्यांनीहि, तुझ्या-माझ्या लग्नाची इच्छा धरली ती सोडून द्यावी, असंच मी आता माझ्या वडिलांना घरीं गेल्यावर सांगणार आहें."

हें ऐकून शमधन अंगावर वीज पडल्याप्रमाणं स्तंभित झाला. तो म्हणाला—
" मृणालिनी, अवलोकितेच्या आजच्या प्रवचनाचा असा विपरीत बोध तुझ्या मनावर कसा झाला याचं मला आश्चर्य वाटतं. 'दुःखमूल वासना' याचा अर्थ 'आसक्ति' असाच केवळ तिनं स्पष्ट करून सांगितला नाही का ? आसक्तीच्या मर्यादेपर्यंत जी वासना जाऊन पोंचली नाही ती स्वाभाविक म्हणून क्षम्य आहे. तिला दुःखमूल म्हणतां येत नाही. तिचाहि त्याग केला तर संसार किंवा जगाची राहटी कशी चालेल, असंहि ती म्हणाली ना ?"

" शमधना, युक्तिवादाच्या सुरीच्या तीक्ष्ण धारेनं मनांतील विचारांचे सूक्ष्म पापुद्रे सोडविणं तुझ्यासारखं मला साधत नाही. ईश्वरानं माझ्यापेक्षा तुला स्वरूपादि सर्वच गोष्टी अधिक चांगल्या दिल्या आहेत, त्यांत बुद्धीहि. पण खरंच सांग बरं, आपलं लग्न चार महिने पुढं ढकललं असं समजल्यापासून तुझ्या आणि माझ्या मनाला जें दुःख झालं, त्याचं कारण सुखाची वासना, म्हणजे नुसती वासना नव्हे तर आसक्ति, हेंच होतं की नाही ? सांग बरं, की आपली सुखवासना नित्याच्या बसण्या-उठण्याच्या, खाण्यापिण्याच्या सारखीच साधी होती ? की त्याहून विशेष प्रकारची होती ? "

" पण वासनाक्षय हेंच जर दुःख निर्मूल करण्याचं साधन असलं तर तो क्षय आपण आजवर केलाच की नाही ? वडिलांचा निर्णय आपण मान्य केलाच की नाही ? आपली वासना ही आसक्तिरूप अनिवार असती, तर आपण वडिलांची अवज्ञा करून दुसराच एखादा मार्ग नसता का स्वीकारला ? वासना बाळगणं, पण ती स्वाधीन ठेवणं, हाच खरा वासनाक्षय होय. या आपल्या आत्मसंयमाचं फळ आता लवकरच आपणाला मिळणार आहे— तुझा माझा विवाह होऊन. आणि 'मुलं शहाणी समंजस आहेत' अशी शाबासकीहि वरती आपले वडील तुला मला देतील याविषयी मला शंका वाटत नाही."

" पाहा-पाहा, अजूनहि तुझं मन भावी आनंदाच्या आशेंत गुरफटलेलं दिसतं, आणि तीच वासना हें आपल्या पूर्वीच्या दुःखाचं कारण होतं. जो वासनाक्षय आपण इतके दिवस केला तो भावी सुखाच्या आशेवर केला ! तो खरा वासनाक्षय म्हणून नव्हताच ! "

" तर मग काय आपल्या विवाहाची आशा मी कायमचीच सोडूं ? आणि तसं केल्यानंच मला खरा आनंद लाभेल असं का तुझं म्हणणं ? "

" विवाहाचीच काय, पण इतर कोणतीहि तीव्र वासना टाकून दिल्यानं, दुःख नाही अन् सुख नाहीं किंवा आनंदहि नाही अशी जी मध्यम स्थिति लाभेल तेंच खरं मानवी ध्येय होय. या ध्येयाचाच उपदेश माताजींनी भगवान् बुद्धाच्या आज्ञेनुसार चालविला आहे की नाही ? शमधना, तुझं माझ्यावर आणि माझं तुझ्यावर प्रेम असलं तरी त्याला विवाहाचंच स्वरूप यावं हें काय म्हणून ? उद्या आपला विवाह झाला म्हणजे पुत्रसंतानाची वासना नाही का त्यापुढं आणखी वाढून ठेवलेली ? आणि पुत्र झाला म्हणजे फिरून त्या पुत्रा-

च्या सुखाची वासना ? मग हें असं गाडं कोठपर्यंत चालू ठेवावयाचं ? स्वतः भगवान् बुद्धच घे ना ? ज्या मनुष्यांवर तो प्रेम करतो त्या सर्वांशीं, म्हणजे त्यांतल्या सर्व स्त्रियांशीं, तो विवाहच करतो काय ? फार काय, उलट ज्या पत्नीशीं तो आनंदानं नांदत होता, जिच्यावर त्याचं प्राणापलीकड प्रेम होतं, त्या स्त्रीचा त्याग त्यानं आपण होऊन केला की नाही ?"

"पण या त्याच्या निष्ठुर कृत्याबद्दल जगानं त्याला दोषच दिला की नाही ? त्या बिचारीला अशी शिक्षा करण्यासारखा तिनं कोणाचा काय अपराध केला होता ? मृणालिनी, मला वाटतं नीतीमधे न्यायबुद्धीचा समावेश प्रथम स्थानीं केला पाहिजे !"

"होय, शमधना; पण न्याय म्हणजे तरी खरोखर काय हें नाही सांगितलंस ? भगवान् बुद्धानं प्रेमाच्या स्त्रीबरोबर कांही दिवस संसार केला अन् तिला पुत्रदानहि दिलं. पण जन्मभर या स्त्रीपुत्राच्या प्रेमपाशांत सापडून तो जर जगाला विसरता तर त्यानं न्याय केला असं कोण म्हणालं असतं ! न्याय म्हणजे ज्याचं जें देणं तें त्याला देऊन टाकणं. ऋणानुबंधाचं योग्य परिपालन हाच खरा न्याय नव्हे काय ? भगवान् बुद्धानं स्त्रीचं ऋण जसं थोडं तरी फेडलं, तसंच मृत्यूपूर्वी जगाचंहि ऋण त्यानं थोडबहुत फेडणं हें त्याचं कर्तव्य नव्हतं काय ?"

"ठीक आहे. सर्व गोष्टी पायरी-पायरीनं व्हाव्या हेंच योग्य आहे. पण आज या तरुण वयांत तुझ्या मनांत जी विरक्तता उत्पन्न झालेली दिसते तिचं समर्थन तूं कसं करणार ? तूं गौतम बुद्धाच्या स्त्रीपेक्षा अधिक विचारी आहेस. म्हणून आपल्या विवाहानंतर यथाकाल तूंहि विश्वकर्तव्यदीक्षा घेण्याला तयार होशील; आणि मी जरी गौतम बुद्धाइतका कर्तव्यकठोर नसलों तरी, तुला दुःखी करण्याचं कारण मलाहि उरणार नाही. पण गौतम बुद्धाप्रमाणं माताजी अवलोकितादेखील प्रथम विवाहितच होती ना ? ठीक आहे. आपणहि प्रथम विवाहबद्ध होऊं या; आणि नंतर यथाकाल तूं व मी दोघंहि विश्वकर्तव्यदीक्षा घेऊन धर्मसाधनाला बाहेर पडूं."

या युक्तिवादाच्या पेचांतून बाहेर पडणं मृणालिनीला सहजच प्रथम कठिण गेलं. यामुळं ती कांही न बोलतां तशीच पांच-पंचवीस पावलं चालून गेली. अर्थात् आपल्या युक्तिवादाचा जय झालेला पाहून शमधन मनांत आनंदला. पण उताराच्या वाटेला लागलेलं पाणी, वाटेंत एखादा बांध आडवा आला

असतां, कांही वेळ थांबलं थबकलं तरी, मूळचा झरा कायम जिवंत असेल तर, लवकरच त्या बांधापर्यंत वर भरून येतं अन् त्यावरून वाहून जाऊन पुनः तें आपला मार्ग काढतं. त्याप्रमाणं मृणालिनीच्या विरागबुद्धीनं केलं.

ती म्हणाली "शमधना, सर्व गोष्टी पायरी-पायरीनं व्हाव्या असं तूं म्हणालास तें मला मान्य नाही. चांगली गोष्ट करण्याला कधीच विलंब करूं नये असं नीतिवचनच आहे. किंबहुना जें चांगलं काम उद्या करावयाचं तें आजच करून टाकावं असंहि वचन आहे. एकदम वर उडी न मारतां येणाराकरिताच पायऱ्या असतात. पण चपळ मनुष्य पायऱ्यांवर पाय न टेकतां एकदम वर उडी मारून जातातच की नाही? धर्मसाधनाच्या हवाशीर सुखप्रद उंचवट्यावर चढण्याला संसाराच्या पायऱ्या चढल्याच पाहिजेत असं बंधन कां असावं? पक्षी कोणत्या शिडीच्या पायऱ्यांवरून आकाशांत चढतात? आपल्या पंखांच्या बळावरच ते वर जातात ना?"

"पक्ष्यांकरिता अंतराळांत पायऱ्या बांधलेल्या न दिसल्या म्हणून काय झालं? पण त्यांनाहि क्रम सुटत नाही. गरुड पक्षीहि जात-जातच वर जातो. क्रमाच्या उल्लंघनाचं प्रायश्चित्त सर्वांनाच घ्यावं लागतं. चपळ मनुष्याला एखाद-दुसरी पायरी उडून जातां आलं तरी, सर्वच पायऱ्या त्याला उडून जातां येणं शक्य नाहीं आणि आपल्या चपळतेवर किंवा शरीरबळावर फाजील विश्वास टाकून उड्या मारणारे अधीर लोक शेवटीं पालथे पडून दांत पाडून घेतात असं नाही का घडत? धर्मसाधनाची वासना मोहक आहे. पण ती सफळ करावयाची तर क्रमानंच केली पाहिजे. तसं नसतं तर मनुष्याच्या मागं ईश्वरानं बालपण, तरुणपण, प्रौढपण आणि वृद्धपण असा क्रम कां लावून दिला असता? आपली सनातन आश्रमव्यवस्था काय सांगते--शिकवते? कौमार्यावस्थेंतून तापसावस्थेंत एकदम उडी मारणाऱ्या किती तरी लोकांनी आपल्या कार्याचा नाश आणि जगाचं हसं करून घेतलं आहे सांग बरं!"

फिरून मृणालिनी कुंठित झाली. पण तिच्या दुर्दम ध्येयवासनेनं तिला फिरून एक निराळाच युक्तिवाद शिकविला. ती म्हणाली, "शमधना, तूं म्हणतोस तेंहि खरं आहे. पण आपल्या चपळतेवर विश्वास ठेवणाराला त्याचा तोल संभाळणारा कोणी सांगाती मिळाला तर मग तरी त्यानं तो प्रयत्न करावा की नाही?"

शमधनानं मृणालिनीच्या बोलण्याचं मर्म हेरलं. पण तिच्या तोंडूनच तें स्पष्ट वदवायला लावलं तर कदाचित् तिचा ध्येयवाद किंचित् सौम्य होईल, अशी आशा वाटून तो म्हणाला, "दुसऱ्याच्या बळावर तोल संभाळण्याची आशा धरणारानं मुळीं पायऱ्या वलांडून उडी मारण्याची हावच सोडलेली बरी नव्हे काय? कारण तो कदाचित् आपल्याबरोबर तोल संभाळणाऱ्याचेहि दांत विनाकारण पाडावयाचा! पण मृणालिनी, कृपा करून ही गूढ भाषा आता सोडून दे आणि मला स्पष्ट करूनच सांग कशी की, तूं कोणता पराक्रम करण्याचं योजिलं आहेस? आणि या धर्मकार्यांतला तुझ्या मनांतला तुझा जोडीदार कोण आहे?"

मृणालिनी हसून म्हणाली, "शमधना, कृपा करून तूं माझ्यावर रागावूं नकोस. मनानं तूं अन् मी जन्माचीं एकच झालों आहों नाही काय? तेव्हा माझा जोडीदार कोण म्हणून मला विचारतोस हें तुला शोभतं का? तसंच माझ्या वांछिताला 'पराक्रम' हें नांव देऊन त्याची तूं अशी थट्टा करावी हें तरी तुला शोभतं का? माताजींचीं प्रवचनं मी ऐकत असतां तूं माझ्याजवळ बसला आहेस असंच मला वाटे आणि तीं ऐकून माझ्या मनांत जे विचार येऊं लागले ते तुझ्याहि मनांत येऊं लागले असंच मला भासलं! काल परवा तूं प्रवचन ऐकणारांत कुठं बसला होतास तो मला दिसला नाहीस, पण आज तुला त्या मेळ्यांत बसलेला पाहून माताजींचा उपदेश मी एकाच मनानं पण चार कानांनी ऐकत आहें असं मला वाटत होतं! तर आता चल, तूं आणि मी दोघंहि आपल्या लग्नाच्या विचाराला तूर्त रजा देऊं आणि दोघंहि घर-संसार सोडून देऊन माताजींकडून दीक्षा घेऊन या संघांत प्रवेश करूं."

इतकं बोलून लडिवाळपणं—लाडिकपणं शमधनाच्या खांद्यावर हात ठेवून मृणालिनी म्हणाली, "आपलं लग्न झाल्यावर माझे सर्व प्रकारचे मनोरथ तूंच पुरविणार होतास ना! मग लग्न न झालं तरी ते तूं कां पुरवूं नयेस? मला संघांत शिरून धर्मसाधन करण्याची खरोखर अनिवार इच्छा उत्पन्न झाली आहे आणि माझ्याशिवाय संसारकृत्यांत तुझं तरी मन कसं रमणार? माझं वेड असो, माझा हट्ट असो, माझा पराक्रम ठरो—नाही तर पराभव होवो, त्या सर्वांत मला आधार शमधना तूं. त्या सर्वांचं श्रेय तुला. त्या सर्वांत माझी लाज तुझ्या हातीं! तूं संघांत असलास म्हणजे मला संसारांत असल्यासारखंच वाटेल. धर्मसाधनाच्या मार्गांत इतरांना आपल्याच एकट्या एक मनाच्या

मशालीचा प्रकाश लाभतो. तो तुला मला दोन मशालींचा प्रकाश एकत्र मिळेल, मग माझ्या मनासारखं तूं करणार ना ?"

असं म्हणून मृणालिनीनं अगदी जवळ जाऊन शमधनाच्या खांद्यावर मान टाकली, तेव्हा त्याच्या शरीरावर रोमांच उभे राहिले. त्यानं तिच्या कानाशीं तोंड नेलं. मात्र "मृणाणिनी मी हीन आहे. तूं मात्र धन्य आहेस !" याहून अधिक शब्द त्याच्यानं बोलवेनात. शेवटीं गहिवरांतूनच मार्ग काढून तिनं त्याच्या अंतःकरणांत प्रवेश केला, तेव्हा तिला असं आढळलं की, आपल्या मनोरथाची सर्व सिद्धता तिथं होऊन राहिली आहे !

लवकरच तीं दोघं मृणालिनीच्या घरापाशीं येऊन पोंचलीं. तेव्हा "मीं येऊं आता ?" असं म्हणून शमधन आपल्या घराकडे गेला. यानंतर पुढं कांही दिवस नित्यनेमानं माताजी अवलोकितेचीं प्रवचनं ऐकावयाला तीं दोघं नियमानं जाऊं लागलीं. मात्र येतांना त्या प्रवचनांतील विषयांचीच चर्चा त्यांच्या भाषणांत चाले. अत्याचारी शाक्त धर्मपंथाचा त्या दोघांनाहि सारखा-च कंटाळा आला होता. यामुळं त्या प्रवचनांची गोडी त्यांतील नवविचारां-मुळं दोघांनाहि सारखीच वाटे. शाक्त धर्मांत सुधारणा झाली पाहिजे हें दोघांनाहि पटलं होतं आणि भगवान् बुद्धाच्या उपदेशांतल्या कोणत्या भागाची जोड आपल्या धर्माला करून दिली पाहिजे याविषयींहि त्यांचीं मतं जुळत.

पण मृणालिनी अधिक भावनावश, यामुळं ती नवमतांची स्तुति व शाक्त धर्माची निंदा करतांना अधिक उचंबळून येई. शमधन अधिक विवेकी व स्थितप्रज्ञ. यामुळं त्याच्या तोंडून ही स्तुति किंवा ही निंदा यांपैकी कोणावरहि भर न पडतां, ग्राह्याग्राह्यतेविषयींचे त्याचे सिद्धान्त मोठ्या समतोल भाषेने मांडले जात. नवमताचे गुण त्याला पटत असले तरी त्यांतील दोषहि त्याला दिसत. धर्मसुधारणा हें पुण्यकृत्य असलं तरी कोणीहि आपणापुरतं धर्मांतर करून त्याचा लाभ केवळ आपल्यापुरता घेऊं नये, तर आपल्या सर्व शाक्त-धर्मीय समाजालाहि तो द्यावा असं त्याला वाटत असल्यामुळं, त्याचं हितगुज चाले तें या पाहुण्यासंघांतील लोकांशीं चालण्यापेक्षा स्वतःच्या समाजांतील लोकांशींच अधिक चाले. तात्पर्य, स्वतः होऊन संघांत जाऊन सामील व्हावं व भिक्षुदीक्षा घ्यावी, अशी इच्छा त्याला एरवीं कधीं झाली नसती. पण मृणालिनीच्या प्रेमानं त्याला लोहचुंबकासारखं ओढून घेतलं असल्यामुळं, आणि

संसारांतली आर्थिक महत्त्वाकांक्षा अशी त्याला नसल्यामुळं, त्यानं तिजबरोबर संघांत शिरण्याचं ठरविलं.

आपल्या प्रियकरानं आपला शब्द मानून आपणाबरोबर भिक्षु होऊन संघांत शिरण्याचं कबूल केलं, हें पाहून मृणालिनीला स्वर्गप्राप्तीचा आनंद झाला. पूर्वी आपल्या लग्नाचा निश्चय आपल्या वडिलांनी केल्याचं ऐकून जी धन्यता तिला वाटली, त्याहून अधिक धन्यता आज तिला लग्नाचा बेत स्वतःच रहित करण्यानं वाटली. आणि उद्या गर्भधारणेनं जें तेज तिच्या तोंडावर चमकूं लागलं असतं, तेंच आज ध्येयधारणेनं चमकूं लागलं. गर्भधारणेचा परिणाम आणि ध्येयधारणेचा परिणाम स्त्रियांवर एकच होण्याचं कारण असं की, दोन्हींच्या योगानं एक अपूर्व अशी त्यांच्या मनोरथांची सुखप्रद परंपरा सुरू होते, अभिनव उत्साह उत्पन्न होतो आणि उत्साहाचं तेज बाहेर प्रकट झाल्याशिवाय राहत नाही.

गर्भधारणा होतांच तो पुत्र असावा हीच कल्पना स्त्रीचं मन घेतं आणि पुत्र झाला म्हणजे तो स्वतः काय काय करील, आपण त्याकरिता काय काय करूं, आणि या दोहोंपासून आपणाला काय काय सुख होईल, कसकशी कृतार्थता लाभेल, याचा संकल्पित भविष्यपट तयार होऊन तिच्या मनश्चक्षूंपुढून जात असतो.

मृणालिनी ही ध्येयवादी असल्यामुळं आपल्या भावी आयुष्यक्रमाचा चित्रपट मनानं रंगवीत होती. शमधन मात्र असल्या उद्योगांत पडला नाही. तो सर्वस्वी अनुभववादी असल्यामुळं मनचं करण्याचा यत्न तर करावाच, पण उगीच चित्रं काढण्याचा पोरखेळ करून रंगांमधे हात बुडाविण्यापेक्षा, जें जें होईल तें तें पाहावं आणि अनुभवाच्या झोळींत टाकावं, अशा वृत्तीचा तो होता. भिक्षु होण्याच्या कल्पनेंत जो आनंद त्याला झाला तो मुख्यतः मृणालिनीच्या सान्निध्यांत राहण्याला सापडेल या कल्पनेचा होता! 'मृणालिनी भावनाप्रधान आहे, यामुळं सत्प्रवृत्तींच्या भरांत ती उतावळेपणानं काय करील याचा नेम नाही. ती नसतीं संकटंहि आपणावर ओढून घेईल. म्हणून आपणासारखा तिच्यावर देखरेख ठेवणारा प्रेमाचा, पण सावधपणा राखून वागणारा, मनुष्य सदा सिद्ध असलेला बरा,' या विचारानंहि त्यानं संघांत शिरण्याचं स्वीकारलं होतं.

असो. घरीं कोणालाहि आपल्या बेताची वार्ता न लागूं देतां प्रथम दीक्षा घेऊन भिक्षुवेष धारण करावा आणि त्या वेषांत दर्शन देऊन मगच आपल्या आईबापांना आपला धर्मांतराचा निश्चय कळवावा, असं दोघांनीहि ठरवलं. त्याप्रमाणं चार दिवसांनी तीं दोघं माताजी अवलोकितेसमोर उभीं राहिलीं आणि आपणाला भिक्षु करून घेण्याविषयी त्यांनी विनंति केली. भिक्षु करून घेण्याचं माताजींचं काम या नगरांत थोडंथोडं सुरू होतंच. पण मृणालिनी आणि शमधन यांच्यासारखीं दोन देखणीं सतेज तरुण मुलं जोडीनं धर्मदीक्षेची याचना करण्याला, तिजपुढं या मुक्कामांत पूर्वी आलीं नसल्यानं तिला आज फार विस्मय वाटला !

आनंदानं क्षणभर ती त्यांच्या चेहऱ्याकड निरखून पाहतच राहिली. कांही वेळानं ती त्यांना म्हणाली, " बाळांनो, तुमची धर्मदीक्षेची याचना ऐकून मी कृतार्थ झालें. पण आधी मला सांगा की, तुम्ही जे जोडीनंच या कार्याला मजकडं आलां ते बहीण-भाऊ का आहां ? "

या प्रश्नाला दोघांनीहि चटदिशी प्रत्यक्ष शब्दानंच 'नाही' असं उत्तर दिलं.

मग अवलोकितेनं विचारलं " तर मग बाळांनो, " तुम्ही पति-पत्नी आहां काय ? "

या प्रश्नाला उत्तर देतांना दोघंहि अडखळलीं. त्यांना 'होय' म्हणावं हें कळेना, 'नाही' म्हणावं हें कळेना. मनानं 'होय' पण कृतीनं 'नाही' हा, गुंतागुंतीचा विचार शरीराची कोणती एकच क्रिया व्यक्त करूं शकणार ?

मृणालिनी हजरजबाबी; पण ती लाजेच्या गुलाबी रंगानं आपले गोरे गाल रंगवून खाली मान घालून स्तब्ध राहिली. शमधन सावध, पण तोच या वेळीं हजरजबाबी ठरला. तो किंचित् हसून म्हणाला, " माताजी, अद्यापि पति-पत्नी या नात्यानं आम्ही बांधले गेलेलों नाही. पण प्रेमधारणा हाच जर विवाहाचा खरा धर्मविधि असेल तर आम्ही तसे आहों असं म्हणण्यालाहि प्रत्यवाय नाही."

हें मार्मिक सत्यकथन ऐकून सहृदय अवलोकिता हसली आणि म्हणाली, " बाळा, या एका उत्तरानंच तूं आपली सूक्ष्म बुद्धि प्रकट केलीस. धर्मनिर्णयाला असली सूक्ष्म बुद्धिच अवश्य लागते. मग मृणालिनीकड वळून ती म्हणाली, "बाळे तूं बोलतांना स्तब्ध राहिलीस यांत तुजकडून असत्यकथन झालं नाही. प्रेमी स्त्रीनं आपल्या कोणत्याहि अडचणीचा परिहार आपल्यावर प्रेम करणाऱ्या

पुरुषावर असाच विश्वासानं सोपविला पाहिजे. ठीक आहे. भगवान् बुद्धाच्या कार्यसिद्धीला तुमच्यासारख्या प्रेमळ मनांची अपेक्षा आहेच. पण तुम्ही दीक्षा घेण्यांत उतावळेपणा किंवा अविचार तर करीत नाही ना? मी काय कोणालाहि दीक्षा देऊन संघांत घेण्याला सिद्ध होऊन बसलेंच आहे. पण ही भिक्षूची दीक्षा कोणाच्याहि गळयांत त्याच्या अविचारानं पडूं नये अशी सावधगिरी मला सांभाळावी लागते. तर आज घरीं जा आणि पुनः उद्या याच वेळीं मजकड या म्हणजे मी तुम्हाला भिक्षु करून घेईन. मी काय नुसतं "यहि भिक्षु" असं म्हणून तुम्हाला हाक मारली, आणि तुम्ही येऊन हीं दीक्षावस्त्र घेतलीं, की तुम्ही भिक्षु झालांच. पण पश्चात्तापापेक्षा पूर्व सुविचार बरा, असा अनुभव मला अनेकांसंबंधानं आजवर आलेला आहे म्हणूनच हें सांगतें. तुमची अवज्ञा करण्याकरिता नव्हे."

असं बोलून अवलोकिता उठली. मृणालिनी व शमधन त्या दिवशीं घरीं गेलीं. पण त्यांचा निश्चय पुरा झालेला असल्यामुळं पुनः दुसऱ्या दिवशीं तीं संघभूमीकड आलीं. त्यांनी भिक्षूची दीक्षा यथाविधि घेतली. पण पिवळीं वस्त्रं नेसून घरीं जाऊन त्या वेषांत त्यांनी आपल्या आईबापांना दर्शन दिलं, तेव्हा दोन्ही घरांत काय आकांत झाला असेल याची कल्पना करण्याचं काम आम्ही वाचकांवरच सोपवितों.

प्रकरण चवथें

भैरवपुरांतला बौद्धांचा आश्रम

अशा रीतीनं मृणा अन् शमधन दोघंहि बौद्ध संघांत प्रविष्ट झालीं; परंतु दोघांच्याहि वृत्ति वेगवेगळ्या होत्या. मृणा उत्साहमूर्ति तर शमधन केवळ कर्तव्यपालन म्हणून भिक्षुधर्म आचरणारा. मृणेनं फार थोड्या काळांत अवलोकिता माताजींचा पूर्ण विश्वास संपादन केला आणि तिचा उजवा हात बनली. हौसेनं अन् महत्त्वाकांक्षेनं आश्रमांतला सर्व कारभार तिनं एकामागून एक झपाट्यानं हातीं घेतला आणि तो चांगला करून दाखवून मुख्यमंत्रि किंवा सर्वाधिकारी हें पद प्राप्त करून घेतलं. अनुज्ञा माताजीची पण आज्ञा

मृणालिनीची असा नियमच होऊन राहिला! सर्व भिक्षु-भिक्षुणी तिच्या कृपेची अपेक्षा धरूं लागल्या. आश्रमव्यवस्था अन् नियमपालन यांविषयी तिची मोठी करडी नजर असल्यानं, फार थोडे आश्रमवासी तिच्या न्यायदंडाचे तडाखे चुकवूं शकत! तिची कृपा संपादण्यांत यश लाभणारे तर फारच थोडे. कांही तर तिच्या जाचाला कंटाळून मनांतून तिचा द्वेषहि करीत.

याच्या उलट शमधन आपण आखून घेतलेल्या कार्यापलीकड जाऊन इतर कशांतहि लक्ष घालावयाचा नाही. तो कधीच माताजींच्या पुढं पुढं करीत नसे. त्याच्या सूक्ष्म अवलोकनामुळं त्याला, या नवधर्म पंथाचरणांतील दोष आणि भिक्षुकगणांचं ढोंगी कपटाचरण हीं दिसल्यावांचून राहत नसत आणि वेळ प्रसंग पडल्यास तो माताजींसमोर स्पष्टोक्तीची टीका करण्यालाहि माघार घेत नसे. दया, शांति यांच्या नांवाखाली झांकला जाणारा भिक्षुलोकांचा दुर्बळपणा, लिबलिबितपणा पाहून तो हसे. कारण तो स्वतः मनानं धैर्यशील क्षात्रवृत्तीचा होता. तात्पर्य, सुईमागून दोरा या न्यायानं मृणालिनीच्या प्रेमामुळं तो भिक्षु-संघांत आला होता आणि आपल्या प्रियकरणीचा पाठीराखा याहून फारसं वेगळं काम आश्रमांत त्याच्या मनानं स्वीकारलं नव्हतं.

रोज प्रातःकाळीं आपल्या झोपडीच्या बाहेरच्या अंगाला घटकाभर बसून अवलोकिता आश्रमव्यवस्थेच्या कामाची योजना सांगत असे. आज्ञेशिवाय इतरांनी येऊं जाऊं नये म्हणून एखादा भिक्षु सेवक जवळ उभा करी. त्या-प्रमाणं ती आजहि बसली होती. तिच्या उजव्या हाताला मृणालिनी असून डाव्या हाताला शमधन बसला होता. आश्रमव्यवस्थेचा नित्यक्रम म्हटला म्हणजे पहिलं काम त्या वेळेपर्यंतच्या फिर्यादी, तक्रारी, कागाळ्या यांचा निकाल करणं हें असे. वास्तविक भिक्षूंचा किंवा संन्याशांचा आश्रम म्हणजे विरागी, विरक्त लोकांचा तो संसार. असं असतां उलटसुलट कागाळ्यांशिवाय एकहि दिवस जात नसे. कारण एक तर आश्रमांत वागण्याचे विधि, नियम बरेच कडक असत. यामुळं ते सर्वच्या सर्व बिनचूक पाळणें हें कठीण होऊन बसे. शिवाय असले आश्रम कांही प्रकारच्या लोकांना फार सोयीचे असतात. एक भिक्षूचा वेष घेतला म्हणजे इतर पुष्कळ गोष्टी माफ होतात. कांही न करतांहि मोठे-पणा अन् सहानुभूति लाभतात. पोट भरण्याचे श्रमहि एरवीपेक्षा कमी पडतात. आणि शेवटचं कारण म्हणजे मनुष्यस्वभाव. तो असा की, विरक्त माणसंच प्रायः संसारी माणसांपेक्षा अधिक तापट, लहरी असहिष्णु असतात.

अवलोकिता स्थानापन्न झाल्यावर मृणालिनीनं न्यायसभेचं काम सुरू केलं. तेव्हा प्रथम प्रत्येक भिक्षूनं येऊन आपल्या दिनचर्येची टिप्पणी लिहिलेली दाखवून तिजवर मृणालिनीची सही घेतली. ज्यांच्या दिनचर्यालेखांत आश्रमाचे नियम मोडल्याची कबुली दिली होती, त्यांना सहजच बाजूला उभे करण्यांत आलं. पण ज्यांनी तशी कबुली दिली नव्हती त्यांच्यावर मृणालिनीनं तोंडी सरसकट शेरा मारला की, 'लेखांत लिहिलं नाही म्हणून कोणी अपराध किंवा नियमभंग केलाच नाही असं होत नाही हें पक्कं लक्षांत ठेवावं! जे अपराधांची कबुली देतात त्यांचा गुन्हा एका अर्थानं थोडा व त्यांना शिक्षाहि थोडी. त्यांच्या मनाच्या पश्चात्तापानं झालेली ही शिक्षाच होय. ती जमेला धरावी लागते. पण जे अपराध लपवितात त्यांचा अपराध जर उघडकीला आला, तर त्यांना आश्रमांतून कपाळावर डाग देऊन घालविण्यांत येईल हें लक्षांत ठेवावं! हा शेरा मृणालिनीच्या तोंडांतून निघतांच कित्येक भिक्षूंचा हात न कळत आपल्या कपाळाकड गेला.

पण ज्यांनी दिनचर्येच्या लेखांत आपला अपराध कबूल केला होता तेहि मृणालिनीच्या तडाख्यांतून सुटले नाहीत! ती म्हणाली, "एखाद्या लहान-सान अपराधाची नोंद बुद्ध्या (म्हणजे तो न करतांहि) दिनचर्या-लेखांत केली म्हणजे प्रांजलपणा दिसून येतो, आणि अशा 'प्रामाणिक' व्यक्तींवर आश्रमदेवतेची विशेष कृपा होते, अशा समजुतीनं कित्येक भिक्षु खोटे दिन-चर्या-लेख लिहितात हें देवतेच्या लक्षांत आहे.' असे शेरे देऊन म्हणजे मृदंगा-वर दोन्ही बाजूला थाप मारून, भिक्षूंना घालवून दिल्यावर दिनचर्या तपास-ण्याचं काम संपलं, तेव्हा जवळ कोणी नाही असं पाहून अवलोकिता हसून मृणालिनीला म्हणाली,

"काय ग! बराच आहे की तुझा न्याय! दिनचर्यालेखांत नियमभंग केल्याचं लिहिलं तर तुझा त्यांच्यावर दोषारोप आहेच आणि न लिहिलं तरी आहेच आहे. मग माणसानं करावं तरी काय?"

मृणालिनी म्हणाली, "माझ्या धाकांत राहावं इतकंच!" आणि आश्रम-विहारांत सर्वांना मृणालिनीचाच धाक असे. शाक्त धर्माचा पाडाव होण्या-विषयी तिचा उतावळेपणा इतका होता की, तिला 'हां-हां' म्हणून ओढून थबकवून धरतां धरतां अवलोकितेला पुरे वाट होई. पण भिक्षुसंघांतहि अनिष्ट

असे लोक शिरत आणि आपल्या हीन चारिन्यानं बौद्ध धर्माला, विशेषतः संघाला, काळिमा लावीत. यामुळं मृणालिनीला यालाहि जपावं लागे.

असो. दिनचर्यावरील शेरे संपल्यावर तक्रारी व कागाळ्या यांची तपासणी व्हावयाची. त्याप्रमाणं भिक्षूंची दुसरी तुकडी, आणि तपासणीचं काम सुरू झालं.

पंडुकावर अशी फिर्याद होती की, "त्याच्या खोलींत, भिक्षेच्या वेळीं गावांतून चोरी करून आणलेला कांही माल सापडला." याबद्दल त्याला विचारलं तेव्हां तो म्हणाला, "मी खरं तें सांगतों, मीं चोरी केली नाही. पण भिक्षा घेत घेत जात असतां माझ्या चेहऱ्याकड पाहून एक शाक्त तरुणी नेहमी हसते, आणि मला न कळत झोळींत असलं कांही टाकते, त्याला मी काय करूं?"

लोहितकावर अशी फिर्याद होती की, "याच्या खोलींत चोरीचीं हत्यारं सापडलीं आणि कित्येक वेळां हा रात्रीं झुकांडी देऊन आश्रमांतून बाहेर जातो." यावर त्यानं सरळ उत्तर केलं. तो म्हणाला, "मी भिक्षुसंघांत येण्यापूर्वी सधन नामांकित दरोडेखोर होतों. मीं पूर्वी अनेक दरोडे घातले अन् खूनहि केले. पुढं मला उपरति झाली ही बुद्ध भगवानाची कृपा. पण देह-स्वभाव अजून सोडीत नाही; समंधासारखा मधून मधून डोकावतो त्याला काय करूं? कोणतंहि व्यसन एकदम न सोडतां, सोडीत सोडीत सोडावं म्हणजेच पक्कं सुटतं. वृत्ति गप्पच बसूं देत नाही, तेव्हा एखादे वेळीं तिचे लाड थोडे पुरवितों; पण ते जाणूनबुजून हो! शिवाय त्या अविहित कर्माच्या फलाचा अभिलाष धरीत नाही. लूट मिळाली तर मला त्यांतलं कांही न ठेवतां अनेक सोबत्यांना तें वाटून देतों. अलीकड मी रात्रीं घरफोडी केली तरी कुणावर हत्यार चालवीत नाही आणि भिंतीला भोक पाडायचं तर तें चोरीच्या सोयीनं न पाडतां कौशल्याच्या अभिमानानं पाडतों. परवांच एक ठिकाणीं मी असं सुंदर भोक भिंतीला पाडलं की, चोरीचा तपास करण्याला आलेले राजदूत, तपास करण्याचं काम सोडून देऊन, त्या रम्य शिल्पकामाची चित्रंच काढून घेण्यांत गुंग झाले."

अस्सजी आणि पुनर्वसु यांच्यावर गाणंबजावणं केल्याची तक्रार होती. ते म्हणाले, "आमचे गळे ईश्वरानं गोड केले आहेत आणि आम्हाला वाद्य वाजवायलाच काय, पण नाचायलाहि येतं. आम्ही पूर्वी गावोगाव सोंगांचे

मेळे घेऊन शिवपार्वतीचीं पदं व कवनं म्हणत हिंडत होतों; त्या ओळखी आमच्या अजून राहिल्या आहेत. आपल्या या संघांत नांवाखातर नुकत्याच शिरलेल्या चित्रा नायकिणीची मोठी हवेली नगरामधे आहे. तिथं पूर्वी ती आपल्या घरीं येणाऱ्या यजमानांची करमणूक करण्याकरिता आमच्याकडून गाणीं अन् कवनं गाववून मैफली करवी. तिनं आपला धंदा सोडला, तेव्हा आम्हीहि आपला धंदा सोडला. पण अंगची विद्या अंगाला चिकटून बसते जन्मभर, त्याला काय करावं? तरी हल्ली आम्ही असं करतोंच की त्या कवनांत आणि गाण्यांत मधून मधून बुद्धभगवानाचं नांव शंकराऐवजी कसं तरी आणतों."

मृणालिनी रागावून म्हणाली, "ऐकणारांचे कान फुटले आहेत वाटतं? पदांत, कवनांत एकंदरीनं वर्णन आहे; तें शंकराचं की शक्तीचं की भगवान् बुद्धाचं आहे तें त्यांना समजत नाही?"

पुनर्वसु—ईश्वरविषयक गाणीं अशींच असतात कित्येक. "नाथो यदूनां अथवा रघूणां" असा एक मूळ संस्कृत श्लोक आहे. तो सगळाच्या सगळा श्रीराम व श्रीकृष्ण या दोघांना एकसारखाच तंतोतंत लागतो, या दोन्ही देवांच्या भक्तांच्या घरापुढं आम्ही तेंच पद शब्दशः म्हणतों. तरी दोघेहि आम्हाला सारखीच भिक्षा घालतात. श्रीशंकर आणि बुद्ध भगवान् यांचंहि असंच एक दुहेरी अर्थाचं पद आम्हीं केलं आहे.

मृणालिनी—अशी गोष्टच व्हावयाची नाही कांही केल्या. एकीच्या हातची बांगडी दुसरीच्या हाताला चढत नाही. मग एका देवाचं वर्णन दुसऱ्या देवावर कसं चढेल?

अस्सजी—कां बरं, म्हणून दाखवितों. ऐका!

अवलोकिता हसून म्हणाली, "अग, पण त्यांची परीक्षा घेतां घेतां आश्रमांत गाण्यावाजविण्याची मैफल उभी करावयाची की काय? कांही नको पद म्हणावयाला!

पुनर्वसु—लोक देवाचीं गाणीं ऐकतात तीं त्यांच्या चटकदार चालीकरिता किंवा गाणाऱ्याच्या गोड आवाजाकरिता. त्यांतल्या अर्थाकरिता नाहीच मुळी.

अस्सजी—आणि पदाच्या शेवटीं आम्ही मोठ्यानं "नमो बुद्धाय! बुद्धं शरणं गच्छामि! धर्मं शरणं गच्छामि! संघं शरणं गच्छामि!" असं म्हणतों—जिथं भगवान बुद्धाचे भक्त दिसतील तिथं.

अशा रीतीनं या दोघांचा खुलासा झाला तो स्वीकारण्यांत आला. नंतर रैवत आणि सुमन यांना पुढं उभं करण्यांत आलं. त्यांच्यावर आश्रमांत द्यूत खेळल्याचा आरोप होता. उत्तराकरिता रैवत म्हणाला, "आम्ही आश्रम-विहारास येऊन संघाला मिळालों तेव्हाच द्यूत टाकून दिलं. पण गावांत भिक्षेला गेलों म्हणजे कोणी पाऊस केव्हा पडेल असं विचारतात, कोणी आपणाला मुलगा केव्हा होईल असं विचारतात, तसंच कोणी पतीचं प्रेम कव्हा बसेल याविषयी, कोणी द्रव्यलाभ केव्हा होईल याविषयी, कोणी राज्य-क्रांति कधी होईल याविषयी असे प्रश्न विचारतात. ते आम्ही टिपून घेतों आणि आश्रमांत स्वस्थपणीं फांसे टाकून किंवा बुद्ध भगवानाच्या नामाक्षरांच्या चिठ्या टाकून उचलून उत्तर येईल तें भविष्य असं समजून दुसरे दिवशीं तें धर्मबांधवांना सांगतों आणि पैसे–नाही–चुकलों, भिक्षा घेतों."

मृणालिनी—मग तुम्ही भविष्यज्ञानाची विक्री करतां म्हणावयाची. तुम्हाला भविष्य वर्तविण्याची मनाई आहे ना?

सुमन—तें खरं. पण भविष्यं आम्ही वर्तवितों तीं आमच्या स्वतःच्या लाभाकरिता नाही किंवा हानिपरिहाराकरिताहि नाही; आणि भिक्षा घेतों ती धर्मसाधन म्हणूनच. असं असलं तरी, भिक्षा झोळींत पडतांच ती घालणारावर कांही तरी प्रत्युपकार करावा अशी आंतून बुद्धिच होते, त्याला काय करावं!

मृणालिनी—पण तुम्हाला खरोखरीचीं भाविष्यं वर्तवितां येत नाहीत ना?

रैवत—मुळीच नाही; आणि आम्ही लोकांना तसं सांगतोंहि. पण लोकांचं समाधान होतच नाही कांही केल्या. काय करावं? आमच्या मुंडणाची आणि पिवळ्या वस्त्रांची मोहनीच अशी कांही लोकांवर पडते की, जो कोणी बौद्ध भिक्षु दिसेल त्याला इतरांना नित्य सुख मिळवून देण्याची, दुःखपरिहार करण्याची, निर्वाण मिळवून देण्याची गुरुकिल्ली लाभलेली आहेच असं ते मानतात.

अवलोकिता—मृणालिनी दे सोडून तो विषय. कशाला उगाच छेडतेस! लोकांवर उपकार करण्याला भविष्य सांगण्याचा हा नुसता बहाणा आहे. खरी मौज आहे ती फांसे टाकून द्यूत खेळण्यांतच आहे. पण काय रे सुमन, फांसे टाकून उत्तरें मिळावीं म्हणून प्रथम गडी वाटून घेत असाल?

सुमन—होय.

अवलोकिता—आणि अमुक दान पडेल अशी एका बाजूचे गडी प्रतिज्ञा करतात ना ?

सुमन—होय.

अवलोकिता—आणि ज्यानं म्हटलेलं दान पडतं त्याला दुसऱ्या बाजूचे गडी मिळून ठरीव द्रव्य देतात ना ?

सुमन—होय.

अवलोकिता—आणि हें द्रव्य घेऊन जिंकणारे गडी मिळून गावांत धर्म-साधनाला जातात ना ?

सुमन —होय.

अवलोकिता—आणि आदल्या दिवशीं भविष्य सांगतों असं म्हणून ज्यांच्याकडून गावांतून पैसे आपले त्यांना आयत्या वेळीं सुचेल तें भविष्य म्हणून सांगता ना ?

सुमन—हो. कारण भविष्याची भूक लागलेल्यांना उपाशी कसं ठेवायचं ?

अव.—धर्मसाधनाचे हे संवगडी, एखाद्या खाण्याच्या पदार्थांच्या दुकान-दारावर परोपकार करण्याकरिता, त्याच्या दुकानाचा पदार्थ भविष्यकथनाच्या पैशानं घेऊन खातां ना ?

सुमन.—होय. मात्र तो पैसा तेव्हा भिक्षेचा असं आम्ही मानीत नाही.

तें ऐकून अवलोकिता म्हणाली, "आला विषय ध्यानांत. जा व्हा बाजूला !"

यानंतर एका भिक्षूनं अशी तक्रार आणली की दुसरा कोणी भिक्षु सुवासिक पदार्थ जवळ बाळगतो. त्यावर तो दुसरा म्हणाला, "यानं स्वतः काल फुलांची शय्या केली. तें मी आपणाला सांगेन म्हणून ही यानं माझ्यावर आगाऊच तक्रार उठविली आहे. अत्तराचा फाया असला तर तो माझ्या कानांत. त्याचा वास फार तर मला येईल. इतरांना त्याचा वास येऊन उपद्रव कसा होईल ? पण यानं मात्र शय्येवर फुलं इतकीं रचलीं होतीं की, चार खोल्यांपलीकडहि त्यांचा वास दरवळत, घमघमत होता."

मृणालिनी—मग त्यानं तुम्हाला दुःख झालं असेल ?

भिक्षु—होय. त्यानं नियम मोडल्याचं दुःख झालं. बाकी माणसाचं नाक काय ? बोलूनचालून इंद्रियच. त्याला वास येत होता तो तें घेत होतं झालं, बिचारं !"

तात्पर्य, अशा रीतीनं नियमाच्या उल्लंघनाच्या चौकशीचं हें प्रकरण संपलं. नंतर आदल्या दिवशीं कांही देणग्या कोणाकडून आल्या होत्या त्यांचा विचार झाला. त्यांत एक देणगी शंभर मोहोरांची एका संस्थानिकाकडची होती. ती पाठवितांना राजमंत्र्यानं कळविलं होतं की, "महाराजांना दोन प्रहरीं वामकुक्षी करीत असतां दुःस्वप्न पडलं. त्याच्या परिहारार्थ ही देणगी पाठविली तरी तिचा स्वीकार व्हावा." दुसरी देणगी आम्रवनाशेजारच्या एका जमिनीच्या तुकड्याची होती. ही देणगी पाठविणारा धनी हा त्या भागांत नांवाजलेला व दरारा बसविलेला मोठा दरोडेखोर होता. तो स्वतः दरोडे घालावयाला बाहेर जात नसे; पण पदरीं पगारी चोर बाळगून तो त्यांच्याकडून चोऱ्यावाटमाऱ्या करवी, किंवा कोणा चोरानं स्वतंत्र रीतीनं माल चोरून आणला असला तर तो थोड्या किंमतीला विकत घेऊन त्याची मोकळीक करी. आम्रवनाच्या शेजारची देणगी देण्याला त्यानं काढलेली ही जमीन माळरानासारखी वाईट होती; पण आश्रमविहाराच्या देणगीदारांत आपलं नांव समाविष्ट झालं म्हणजे नांव राजापर्यंत जाईल, आपण बौद्ध धर्माचे पुरस्कर्ते अशी कीर्ति होईल, आणि त्याचा वचपा इतर रीतीनं काढून घेतां येईल असं त्यानं योजिलं होतं.

त्यानंतरची देणगी उत्पली नामक एका वारयोषितेची होती. तिला आपल्या हीन कुलाचाराबद्दल अलीकड उपरति झाली होती. म्हणून तिनं एका बौद्धाशीं गुप्त विवाह केला होता, आणि विवाहापूर्वी पांच वर्षांत आपल्या धंद्यावर जो पैसा मिळाला होता तो हप्त्याहप्त्यानं दरवर्षीं या विहाराश्रमाला देऊन पावन व्हावं असं ठरविलं होतं.

असो. शेवटीं चार-दोन नवीन भिक्षू संघांत सामील होण्याकरिता आले होते, त्यांनी आपणाबरोबर शिफारसपत्रंहि आणलीं होतीं. त्यांना संघांत दाखल करण्यांत आलं. संघांत दाखल करून घेण्याचा विधि सोपा होता. आश्रमाच्या अधिपतीनं भिक्षूला दाखल करून घेण्याचं ठरविलं म्हणजे त्यानं दूर जाऊन हात जोडून उभं राहावयाचं व अधिपतीनं 'एहि भिक्खु' असं म्हटलं म्हणजे त्यानं येऊन पूर्वी दाखल झालेल्या भिक्षूंच्या रांगेंत उभं राहावयाचं!

अशा रीतीनं रोज सकाळचा कार्यक्रम असे. तो आजच्यापुरता संपल्यावर अवलोकिता व मृणालिनी या दोघी उठल्या. मृणालिनीनं आज अमुक दिशेला भिक्षेला जावयाचं असं ठरविलं होतं तिकड एकेका तुकडीनं प्रयाण केलं. ज्या

ी पाळी त्या दिवशीं भिक्षेला जाण्याची नव्हती, ते इतर नेमलेल्या याला लागले. या दोन्ही कार्यांच्या सुरुवातीची खूण म्हणून मैदानांत ी मोठी घंटा वाजविण्यांत आली.

वपुरांतल्या शाक्त महाकालीच्या मंदिरांतील सकाळच्या पूजेची बलि- ी घंटा आणि वेळूवन व आम्रवन येथील बौद्ध विहारांतील अहिंसाधर्म ाणाऱ्या भिक्षूंनीं धर्मसाधनाकरिता बाहेर पडण्याची घंटा, बहुधा एक- ाजत !

प्रकरण पांचवें

अग्निवर्ण आणि रुद्रभट

पूर फार जुनं नगर. पण त्यांतूनहि त्यातलं कालिकामंदिर. मग काय, ाधी देऊळ होतं; आणि नंतर नगर त्याभोवती वेढा देऊन वसलं? होय, यांत आश्चर्य कसलं? मोठमोठ्या क्षेत्रांची आणि देवळांची गोष्ट अशीच नसते काय? मनुष्यवस्ती सोडून दूर जंगलांत राहायची भीति तर वाटतच नाही म्हणा; पण त्याला देवत्व आणून देणारा पहिला बहुधा एकांतप्रियच असतो. कदाचित् त्या देवाहून त्या भक्तालाच चा कंटाळा जास्त असतो म्हणा ना! तो देवाला हुडकून काढून , " देवा! पुरा कंटाळा आला या संसारी माणसांचा. तुझा तूं आणि मी असेच दोघे राहूं या कसे इथं ! "

भक्तीचा सुगंध, फुलांच्या सुगंधासारखा, तेव्हाच दूर पसरतो. कांहीं लोकांना वाटूं लागतं की, " हा आपल्या गांवचा मनुष्य रानांत दूर , देव मानून दगडाची संगत करून राहिला; तेव्हा वैराग्याचं का , सुख मिळवून देण्याची शक्ति त्या देवाच्या अंगीं आहे खरी ! चला हे जाऊन पाहूं, हा देव त्यांतलं थोडंसं सुख आपणाला देतो का ते त्याकडे जाऊं लागतात. इतर कित्येकांना वैराग्यसुखाची इच्छा

नसते, संसारसुखाची असते. पण त्यांना वाटतं की "वैराग्यसुखासारखी दुर्लभ वस्तु जो देव मिळवून देतो तो संसारसुखहि कां न मिळवून देईल ?" मग तेहि त्या देवाकड जाऊन आशेनं भजनपूजन करूं लागतात.

शेवटीं सगुण पूजेचे थाट सजूं लागले म्हणजे तदुपयोगी पदार्थांचा बाजार त्यामागून आपोआप आलाच ! कायमच्या बाजारामागून राहातीं घरं ! अशा रीतीनं या कालिका देवीला मनुष्यवस्तीचा वेढा पडून तिथं नगरच वसलं आणि नगरांत राजा राहूं लागली म्हणजे झाली तीच राजधानी ! बुद्ध निर्वाणाच्या आधी बरींच वर्षं भैरवपूरहि अशीच ऐका शाक्तपंथी राजाची राजधानी होऊन बसली होती.

कालिका देवीच्या परिवाराची जशी ही उत्क्रांति झाली तशीच तिच्या स्वरूपाची. देवीचं रूप लाभलेल्या त्या दगडांत पहिल्या भक्ताला कांही विशेष वाटलं असो नसो, पण इतरांना हळूहळू त्यांत देवीचं सर्व रूप स्वयंभू प्रकट झालं असं वाटूं लागलं ! टाकीनं घडलेल्या दगडाला देवाचं रूप देऊन मनुष्य त्याची पूजा करतो; पण ज्या दगडांत देव स्वतः होऊनच स्व-स्वरूप धारण करून प्रकट होतो, त्याला 'स्वयंभू' देवस्थान म्हणतात ! आणि कृत्रिम मूर्तीपेक्षा स्वयंभू मूर्तीची प्रतिष्ठा अधिक वाटावी हें स्वाभाविक होय. तसंच या कालिका मूर्तीचं झालं.

कल्पनेनं मनुष्याला ढगांत काय वाटेल तें चित्र दिसतं. ओबडधोबड अस्ताव्यस्त अंगविभाग पसरलेल्या खडकांतहि भाविक डोळ्यांना अशींच रेखीव चित्रं दिसूं शकतात. त्याप्रमाणं कालिकेला अंगभूत झालेल्या या खडकांत प्रथम तिचं मस्तक, नंतर तिचे हातपाय, नंतर तिचे अलंकार, सर्व कांही दिसूं लागलं. इतकंच काय, पण कांही भाविकांना देवीच्या सुप्रसिद्ध पराक्रमकथेंतील तो महिषासुर तिच्या पायापाशी मरून पडलेला दिसूं लागला ! त्याबरोबर रक्तप्राशनेच्छु अशा देवीची लांबलचक जीभ तोंडांतून बाहेर पडून महिषासुराच्या तोडलेल्या मस्तकापर्यंत जाऊन भिडलेली दिसूं लागली आणि भावनादृष्टीचा कळस म्हणूनच की काय, कित्येकांना देवीच्या मूर्तीभोवती दिव्य वर्णमालेची अक्षरलिपी, आणि त्या लिपींत लिहिलेलं महिषासुरमर्दिनीचं पौराणिक आख्यान, वाचतां येऊं लागलं ! अशा रीतीनं देवता व देवतेचे उपासक यांचं महत्त्व वृद्धिंगत होत राहिलं.

थोड्याच काळांत देवीभोवती वतनदार पुजाऱ्यांचा घोळका जमूं लागला. देवीपुढचं उत्पन्न कोणी, कसं वाटून घ्यावं याविषयी त्यांच्यांत स्पर्धा सुरू झाली. देवीला निष्काम बुद्धीनं अर्पण केलेल्या द्रव्याच्याच जर लहान लहान राशी पडूं लागल्या, तर नवसफेडीमुळं त्या राशी किती मोठ्या पडूं लागल्या असतील, याची कल्पना करा. देवीला राजाचे भोग आणि उपचार सुरू झाले. कालिका स्त्री असली तरी शिवाचं अर्धांग. विशेषतः पुरुष-पराक्रमी. यामुळं स्त्रिया-पुरुष या दोघांचंहि समान दैवत ती बनून, दोघांनी घालण्याचे दागिने, वस्त्रं तिलाच अर्पण करण्यांत येऊं लागलीं. तिला हत्ती, घोडे, नगारे, चौघडे, पालखी, अबदागिरी सर्व सरंजाम प्राप्त झाला आणि नगरच्या राजाचं खास कुलदैवत झाल्यामुळं देवस्थानच्या वैभवाची सीमा झाली! तिच्यापुढं नरबलिदानंहि होऊं लागलीं आणि स्वर्ग व भूलोक यांची सांगड कालिकामंदिरानं घातली! पण राजवैभवाप्रमाणं देवस्थान-वैभवहि नाशवंतच असतं. कारण चंचल मानवी मनावरच त्याचं सर्व अधिष्ठान!

यापुढच्या काळांत गौतम बुद्धानं शाक्त धर्मावर मोठाच आघात केला. यज्ञादि वैदिक धर्मांची निंदा करून, त्यानं आपल्या उपदेशानं आर्य लोकांचीं मनं त्या धर्मांपासून विन्मुख केलीं. नीति हेंच पुण्य आणि शांति हाच मोक्ष असं मनाला पटल्यावर तीर्थं, क्षेत्रं, देवोपासना, भोग, बलिदान यांची उठाठेव कोण करितो? कालीमातेनं मारलेला महिषासुर खरोखर त्याच्या मृत्यूपूर्वी इतकासा प्रसिद्ध नव्हता; पण तो स्वतःच्या मृत्यूमुळं, मृत्यूनंतरच फार प्रसिद्धीस पावला! त्यालाच अनुसरून गौतमबुद्ध हाहि मृत्यूनंतर 'भगवान्' पद पावला. त्याच्या प्रेमानं हिंसाधर्माची बरीच नाकेबंदी केली. हिंसेला राजाज्ञेनं प्रतिबंध केला होता असं नाहीं; पण लोकांची मनंच बदलत चाललीं म्हणजे मग पूर्वीचा धर्म तोच अधर्मसा वाटूं लागतो. यामुळं कालिकामंदिरांतील पशुवध दिवसेंदिवस कमी होत चालला. किंबहुना त्या हिंसाप्रिय देवतेविषयी अनेकांची अप्रीति होऊं लागल्यामुळं मंदिराभोवतालचा बाजार रोडावूं लागला होता.

कालिकामंदिराची बांधणी अगदी जुन्या पद्धतीची होती. म्हणजे मोठाले माठीव दगड नुसते एकमेकांवर ठेवून, मधे चुना किंवा चिकट चिखल न घालतां, तें बांधलं होतं. ज्या प्रचंड खडकांत देवीची मूर्ति स्वयंभू प्रकट झाली होती त्याची पाठ हीच आंतील गाभाऱ्याची एक बाजू बनलेली असून,

उरल्या तीन बाजूंनी वरीलप्रमाणं कृत्रिम रीतीनं दगडी भिंती बांधल्या होत्या. गाभाऱ्याचा डोक्यावर दगडी घुमटी असून, आंत अंधार उत्तम साधेल अशा बेतानं फक्त दोन तीनच झरोके, पण तेहि वाकडे-तिकडे ठेवलेले. गाभाऱ्या-बाहेरचा सभामंडप थोडा मोठा, पण त्यांतहि तोंडास तोंड दिसेल न दिसेल इतका अंधार!

जुन्याकाळीं इमारती, प्राकार, भिंती यांची प्रसन्नता राखण्याची काय युक्ति करीत असतील बरं? आजच्याप्रमाणं तेंव्हा भिंतींना चुनासफेतीचे हात देत काय? पण सफेतीच्या प्रसन्नतेपेक्षा मलीनत्वानं येणारा उदासपण हाच प्राचीन मानलेल्या देवस्थानाला अधिक श्रेयस्कर ठरे! अलीकडं या देवळाच्या पटांगणांत पायरव कमी झाल्यानं झाडं-झुडपं आडवीं-तिडवीं उगवलीं होतीं. तटाची दुरुस्ती नसल्यानं, त्यांत रुजून फोंफावलेल्या झाडांनी कुठंकुठं भगदाडं पाडलीं होतीं, तर कुठं तटाचेच कांही भाग कोसळून खाली पडले होते.

सभामंडपांत दिवा कधीच लागत नसावा; आणि गाभाऱ्यांतहि फक्त एकच दिवा रातदिवस मिणमिण करी. यामुळं त्यांत एकदम शिरल्यास साप चावेल की काय अशी भीति वाटे. आणि कोणी शिरूं लागलं तर, आंत घर करून राहिलेलं जें एखादं खबूतर भीतीनं बाहेर पडे त्याच्या पंखाची चपराक प्रवेश करणाराच्या तोंडांत थाडकन बसे.

देवळांत भक्तभजकांची गर्दी थोडीशी होई ती फक्त सकाळीं चार आठ घटका. जवळच्या नदीचं स्नान, देवीचं दर्शन, पूजन, बलिदान यांना हीच वेळ सोयीची असे. दर्शनपूजनापेक्षाहि बलिदान-विधि हाच महत्त्वाचा भाग खरा. हा विधि करण्याकरिता सभामंडपालगत देवळाच्या पटांगणांत दोन बाजूला दोन वधस्तंभ उभारलेले होते. हे वधस्तंभ दुबेळक्यासारखे असून, धाकट्यांत बकऱ्याची व मोठ्यांत रेड्याचीहि मान बसेल आणि वरून तर-वारीचा घाव घालून ती तोडून बाजूला पाडतां येईल, अशी योजना केली होती. कोणी बलिदानाला पशु आणला तर त्याचा खोळंबा होऊं नये म्हणून देवीचा वतनदार खाटीक हातांत धार लावलेली तरवार घेऊन नेहमी उभा असे. आणि फिरून त्याचाहि खोळंबा होऊं नये म्हणून खाटिकाची सहधर्मचारिणी दुसऱ्या एका तरवारीला कुरुंदाच्या सहाणेवर धार पाजळीत बसलेली दिसे.

कालिका देवी ही अघाशी नव्हती. बळी दिलेल्या पशूच्या रक्ताचा प्रत्यक्ष थोडासा अभिषेक आणि त्याच्या मांसाचा दुरून नैवेद्य देवीला मिळाला की,

बलि अर्पण करणाऱ्या भक्तानं पशूचा वाटेल तेवढा भाग नैवेद्य म्हणून झोळींत घालून नेण्याला तिची अनुज्ञा असे. पण भक्तहि देवीइतकाच अल्प संतुष्ट! तो नैवेद्याचा कांही भाग घरीं नेण्याकरिता ठेवी; पण उरला भाग खाटिकाला उदारपणं देई. बरं, खाटीक तरी रोज मांस किती खाणार? म्हणून तोहि आपणाला नको असेल तो भाग खाली फरशीवर, एखाद्या दुकानांत विकाऊ पदार्थ मांडतात त्या चित्ताकर्षक रीतीनं, ओळीनं मांडून ठेवी.

लांबून पाहणाऱ्याला तरी, तोडलेल्या मानेच्या ठिकाणीं बाहेर आलेलें मांस एखाद्या जासवंदीच्या फुलासारखं दिसे. दोन प्रहरपर्यंत हीं बलिपशूंचीं शवं विकलीं न गेलीं तर तो खाटीक जवळच असलेल्या 'अग्निवर्ण उद्यानां'तील पाण्याच्या पाटावर बसून तीं धुऊन सोली, आणि त्यांतील मांसल भाग तेवढा कांपून घेऊन बाकी सर्व उद्यानाच्या कोपऱ्यांत असलेल्या खाचेंत टाकून जाई. हें खत उद्यानांतील झाडांना घालण्यांत येई. त्यामुळं झाडं चांगलीं पोसत आणि फुलं, फळं धरीत.

या फळाफुलांची विक्री हें उद्यानाचा मालक अग्निवर्ण याच्या फायद्याचं एक कलम असे. मात्र कोणाचं कांही फुकट घेऊं नये या सात्त्विक बुद्धीनं देवीच्या पूजेकरिता रोज बागेंतील फुलांचा एक हार द्यावा असा करार त्यानं देवस्थानाशीं केला होता! वैश्याची धार्मिक भावना ही अशी हिशेबी असते! बलिदान झालेला हा पशु अर्थात्च स्वर्गाला जाई. 'मला स्वर्ग मिळाला नाही' अशी साक्ष कोणत्याच मृत पशूनं परत भूलोकाला येऊन दिलेली नाही. तो अर्पण करणारा धनी व तो मारणारा खाटीक दोघेहि, आपल्या हातून हें, म्हणजे पशूला आपणां सर्वांच्या आधी स्वर्ग मिळवून देण्याचं पुण्यकर्म, घडलं म्हणून मनांत संतुष्ट असत! ज्यांना बलिदानाकरिता पशु खरेदी करण्याची ऐपत नसे त्यांना मात्र, या पुण्यकर्मांत अंशभागी होऊन आपल्याकरिता किंवा पशूकरिता स्वर्गसाधक पुण्य जोडतां येत नाही या विचारानं मनांतून मोठा खेद होई. पण वाहत्या गंगेंत निदान हात धुऊन घ्यावे त्याप्रमाणं हे इतर लोक त्या वधस्तंभाला गुढगे टेकून प्रणाम करीत आणि या नमस्काराच्या वेळीं मारल्या जाणाऱ्या पशूच्या रक्ताचे शिंतोडे अंगावर उडले, तर देवीप्रमाणं आपणालाहि पुण्यकारक अभिषेक झाला अशा विचारानं ते स्वतःला धन्य मानीत. मंदिरांत प्रवेश करणाऱ्या प्रत्येक शाक्ताच्या भिवयांमधें शेंदराचा लाल

टिळा असेच. पण तो मंदिरांतून बाहेर पडतांना त्याच्या जोडीला कपाळावर बलिदानांतील रक्ताचा एक टिळा तो हटकून लावी.

अशा रीतीनं या प्राचीन कालिकामंदिरांत बलिदानाच्या द्वारें घडणाऱ्या पुण्याचा संचय शेकडो वर्षे चालू होता. बलि दिलेल्या पशूंची तक्रार त्याविरुद्ध कधींच ऐकूं आली नाहीं. मानेवर तरवारीचा वार होत असतां पशु ओरडतांना ऐकूं येत; पण ती दुःखाची किंचाळी, की स्वर्गाला निघण्याकरिता ठेवल्या जाणाऱ्या प्रस्थानाविषयी आनंदाचा घोष हें कोणी सांगावं? शाक्त लोक तरी हा दुसराच अर्थ खरा मानीत.

असं सर्व यथास्थित चालू असतां, भगवान् बुद्धाच्या अनुयायांनी हिंसेविरुद्ध विनाकारण खेळखंडोबा सुरू केला होता! अलीकड कांहीं दिवस तर अहिंसेचा उपदेश इतका परिणामकारक होऊं लागला की, कालीमातेच्या पुजाऱ्यांना व वतनदार खाटकांना मधून मधून उपास पडत. अग्निवर्ण-उद्यानांतल्या झाडांच्या मुळांत खत कमी पडूं लागलं, तींतील फळाफुलांची विक्री कमी होऊं लागली आणि उद्यानाचा मालक मोठा हिशेबी करार उगवून घेणारा असल्यामुळं, त्याजकडून देवीला रोज येणारा हार मिळण्यांत मधून मधून खंड पडूं लागला!

आज अष्टमीचा दिवस. आज बलिदान अधिक व्हावयाचं आणि तो पुण्यप्रसंग पाहूं इच्छिणाऱ्या भाविक डोळ्यांचं पारण फिटावयाचं. सकाळीं दिवस उगवल्यापासून महाकालीच्या पटांगणांतील मोठी घंटा घणघण वाजत होती. कोणी शाक्त, कोणी शैव, जवळच्या नदीचं स्नान करून देवीच्या दर्शनाला येत. ज्यांना बलिदानाची अनुकूलता नव्हती ते दाराशीं बसलेल्या माळणीकडून तांबड्या रंगाचीं फुलं विकत घेत आणि तीं समर्पण करण्याला, बलिदान करणारांच्या मागून का होईना, पण जी संधि मिळे ती घेण्याकरिता पाळींतली आपली जागा सांभाळून उभे राहात. सभामंडपांत आसनं मांडून बसलेले कांही ब्राह्मण देवीचीं स्तोत्रं मोठमोठ्यानं घडघड म्हणत होते. मधून मधून एखाद्या बलीचं ओरडणं कानावर पडे, व खाटिकानं सफाईच्या हातानं मारलेल्या तरवारीच्या पशूच्या मानेवर झालेला 'खप'कन आवाजहि ऐकूं येई. पण 'जय जगदंबे', 'जय भवानी', 'जय दुर्गे', 'जय चंडी', 'जय माते' या भक्तिप्रेरित उत्साही घोषणांनी ते आवाज लगेच बुजविले जात.

महापूजेच्या दोन तीन घटकांत मंदिराच्या पायऱ्यांवर रक्ताचा सडाच सडा पडलेला असून, त्यावरून चटचट चालत जाणाऱ्या भक्तांच्या पायांचे ठसे अंगणांतील प्रदक्षिणेच्या वाटोळया वाटेवर व महाद्वारापर्यंतच्या सरळ मार्गांवर गर्दीनें उमटले होते. आजचा दिवस भैरवपुरांतील शाक्त लोकांचा सणाचाच; पण इतर नागरिकहि नेहमीपेक्षा अधिक उल्हासी दिसत होते.

पण ते पाहा! हा उत्साह ज्यांच्या तोंडावर दिसत नाही असे दोन शाक्तपंथी गृहस्थ महाकालीमंदिराच्या महाद्वाराकडे येत आहेत. त्यांची दृष्टि खाली पायांकड आणि त्यांची चाल धीमेपणाची असून, ते गंभीर मुद्रेनें आपआपसांत कांही कुजबूज करीत आहेत. मधून मधून आजूबाजूला पाहतां दिसून येणाऱ्या प्रकारावरून त्यांची मुद्रा अधिकच खेदाची होत आहे. महाद्वाराशीं येऊन पोंहोचेपर्यंत त्यांच्या आपापसांतील संभाषणाला खळ पडला नव्हता. पण तेथे उभ्या असलेल्या एका विशिष्ट व्यक्तीकडे त्यांचे डोळे जातांच दोघेहि उसळल्यासारखे झाले.

ही व्यक्ति उभ्या राहिलेल्या जागीं निश्चल होती. तिचं नांव जीर्णमन्यु. तिनं आपले अर्धे मिटलेले डोळे ध्यानांत एकाग्र करावे तसे केले होते. फक्त स्त्रिया आल्या की डोळे उघडून तो त्यांकड टक लावून पाही! त्यानं कोपरांपासून हात जोडलेले ठेवून अखंड प्रार्थनेचा आविर्भाव दाखविला होता. अंगावर दोन आखुड पिवळीं वस्त्रं धारण केलेलीं असून, त्याच्या मानेपासून कपाळापर्यंत श्मश्रु केलेला डोक्याचा गोटा उन्हांत चकाकत होता. त्यानं चालविलेली प्रार्थना कोणा अमुक एकाची नसून त्या बाजूनं जो जो कोणी या कालिकामंदिरांत प्रवेश करी त्या सर्वांना उद्देशून, संगीतांत रचलेली एक प्रार्थना तो खालीलप्रमाणं म्हणत होताः--

प्रार्थना

धर्ममूल होय दया सत्य वचन हें माना
दीन निरागस पशुच्या कां कापितसां माना ॥ ध्रु० ॥
शक्तिपंथ हा न बरा सोडुनियां जन त्यातें
भक्ति वरा बुद्धाची मुक्त करिल तुम्हांतें १
वाम मार्ग शाक्त धर्म निंदिति बुधजन सारे
अश्रद्धा सद्धर्मीं पसरावितां अविचारें २

धर्माधर्मविचारा हृदयिं न तुमच्या थारा
पशुबलिनें स्वर्ग मिळे मिथ्या भ्रम हा सारा ३
सर्वां भूतांठायीं प्राण एक वावरतो
जो जगवी मनुजातें जगवी कृमि-कीटां तो ४
अणुरेणुहि चैतन्यें भरला फळ जेवि रसें
तेणें हें तेज ओज विश्वमुखीं या विलसे ५
संसारीं क्रोध काम हे बलिदानीय खरे
त्यांसि वधा सरसावुनि शमदम-शस्त्रें प्रखरें ६
वांछा हें दुःखमूल नाश तिचा जो केला
तोचि मोक्ष स्वर्ग तोच इतर नसे जीवाला ७
एक शक्ति जगिं भरली तद्रूपें विविध जरी
चालवि जग सारें ती आदिमाय तीच खरी ८
हीन दीन अंध-पंगु बांधव जन जे अपुले
जन्मा ये सार्थकता सुखि त्यांतें जरि केलें ९
प्रेमानें जग जिंकुनि त्यावरि अधिराज्य करा
जो सेवक जनतेचा तोच महा-राज खरा १०

गाणाराचा गळा गोड असल्यामुळं येणारा-जाणाराला ती प्रार्थना ऐकण्याकरिता त्याच्यासमोर कांही वेळ तरी उभं राहण्याचा मोह हटकून होई. वर सांगितलेल्या दोघां शाक्त गृहस्थांनाहि तो मोह क्षणभर झाल्याशिवाय राहिला नाही. पण एखाद्या तीव्र विकारानं मन भरलं असलं म्हणजे मग मनुष्याला गाणंहि गोड लागत नाही. या गाण्यांत हिंसेची निंदा, अहिंसेचा उपदेश व भगवान् बुद्धाची स्तुति असल्यामुळं, गाण्याच्या सुरेलपणाच्या मोहांतून त्या दोघांचं मन क्षणार्धांत मोकळं झालं. त्या व्यक्तीला रागाचे अभद्र शब्द बोलण्यापर्यंत पाळी आली. रस्ता सार्वजनिक यामुळं या दोघा शाक्त गृहस्थांना त्या बौद्ध भिक्षूच्या अंगावर एकदम हात टाकवेना. अद्वातद्वा बोलूनच त्यांना आपला राग शांत करावा लागला.

शेवटीं आपलं मुख्य काम हें नव्हे, दुसरंच आहे, अशा उपेक्षेच्या आविर्भावानं ते महाद्वारांतून मंदिराच्या पटांगणांत शिरून सभामंडपाकडे निघाले. त्यांनी दोन्ही वधस्तंभांजवळ कांही वेळ उभे राहून, वतनदार खाटिकाशीं बोलून, आतापर्यंत बळी किती आले यावरून पुढं किती येतील याचा अंदाज

केला. त्या अंदाजानं त्यांच्या कपाळावर पडलेल्या खिन्नतेच्या आठ्या कमी न होतां उलट अधिक खोलच झाल्या. शेवटीं विकाराच्या वेगानं तोंड उघडून ते एकमेकांशीं मोठ्यानं बोलूं लागले.

या दोन गृहस्थांपैकी एकाचं नांव अग्निवर्ण. हा वयानं चाळिशीच्या घराला आला होता. त्याच्या पोषाकावरून तो मोठा श्रीमान् असावा असं वाटे आणि खरोखरच तो भैरवपूरचा नगरशेठ असून, त्याच्याइतका श्रीमान् जमीनदार व्यापारी दुसरा कोणीच त्या साऱ्या राजधानींत नव्हता. वर सांगितलेलं 'अग्निवर्णउद्यान' हें त्यानं कालिका-मंदिराला लागून आपल्या नांवानं नवं बनविलेलं असून, त्या उद्यानांतील फळाफुलांच्या उत्पन्नाचा आणि महा-कालीच्या मंदिरांत होणाऱ्या पशुवधाचा आर्थिक संबंध काय होता हें वर सांगण्यांत आलंच आहे. अग्निवर्ण या नांवाप्रमाणं त्याचं दर्शन मात्र भयप्रद किंवा प्रखर नसून, तो शरीरानं स्थूल, स्वभावानं सौम्य, कांहीसा प्रेमळ, बराचसा भिडस्त, व परक्यांच्या अनुसंधानानं चालणारा असावा असं त्याच्या चेहऱ्यावरून व डोळ्यांवरून दिसे. तो अलंकारांचा शौकी होता. त्याच्या पांचहि बोटांतील हिऱ्याच्या तेजस्वी अंगठ्या हाताच्या प्रत्येक हालचालीबरोबर विजेच्या लोळाप्रमाणं चमकून जात. आणि कानाच्या पाळींत करांगुलि घालून अत्तराचा स्पर्श करून, मधून मधून सुवास हुंगण्याची-हि त्याला संवय असे.

दुसरा गृहस्थ रुद्रभट हा मध्यम वयाचा, पातळ अंगाचा, किंचित् उंच, फारच देखणा पण तामसी उग्रदर्शन असा होता. त्याच्या साध्या काषाय वस्त्रां-वरून तो गृहस्थाश्रमी की संन्यासी हें ओळखणं थोडं कठीणच होतं. त्याच्या डोळ्यांतल्या बाहुल्या फारच चंचल असून, प्रत्येक हालचालीबरोबर याच्या मनांत कांही तरी नवाच विचार आला आहे असं पाहणाराला वाटे. अग्निवर्ण हा जसा भैरवपुरांत पहिल्या दर्जाचा नागरिक त्याचप्रमाणं रुद्रभटहि होता. कारण शाक्तपंथीय स्थानिक धर्माधिकारी मंडळाचा अध्यक्ष म्हणून ह्याची नेमणूक अलीकड नुकतीच झाली होती.

या अधिकारांत ज्या अनेक गोष्टींचा समावेश होई त्यांपैकी कालिकामंदिरा-च्या व्यवस्थेवर देखरेख ठेवणं ही एक होती. या देखरेखींत त्याला असं दिसून आलं होतं कीं, मंदिरांत होणारं बलिदान घटत चाललं असून त्या मानानं देवस्थानचं उत्पन्नहि कमी होईल, आणि फिरून त्या मानानं देव-

स्थानचं महत्त्व कमी असं आपोआपच ठरेल. वास्तविक नगरांत शाक्त धर्म हाच मुख्य प्रचलित धर्म होता. आणि त्या धर्माचं दुसरं एखादं प्रतिपक्षी देवस्थान नगरांत निर्माण झाल्यानं कालिकामंदिराचं उत्पन्न घटलं होतं असंहि नव्हे. पण धर्मादायाच्या झऱ्याला दुसरंच एक तोंड अलीकड फुटलं होतं. अशानं एक पाणी दोन ठिकाणीं सहजच व्हावयाचं! हें दुसरं तोंड बौद्ध-धर्मीय संघानं फोडलं होतं. याबद्दल रुद्रभटाचा जळफळाट होत असे. शाक्त धर्मावर बौद्ध धर्माकडून होणारं हें अतिक्रमण कसं थांबवावं याचा विचार त्याच्या मनांत हल्लीं रात्रंदिवस घोळत होता.

आज सणाच्या दिवशीं अग्निवर्ण हा देवीच्या दर्शनाला निघाला तों रुद्रभट-हि कालिकामंदिराकड निघाला असल्यानं दोघेहि मिळून मंदिराकडच चालले आणि बौद्ध धर्माचं अतिक्रमण हा एकच विषय दोघांच्या तोंडून चर्चेत निघत होता.

रुद्रभट म्हणाला, "पाहिलंस, अग्निवर्णा! आज अष्टमी. आज कालिका-मंदिरांत रीघ मिळावयाची मारामार असावयाची. असं असतां मंदिरांत जाणारा येणाराचं अंगाला अंग तरी लागतं आहे का पाहा! दोन्हींपैकी मोठा वधस्तंभ तर आज अगदीच कोरा राहिला आहे. आणि धाकट्याच्या खाटका-ला मधून मधून गांवांतून फेरी मारून येण्याइतकी फुरसत मिळते. याचा अर्थ नगरच्या लोकांत नास्तिकपणा वाढूं लागला आहे, असाच नाही काय? धर्माची घडी पुन्हा कशी बसेल या विचारानं अलीकड मला रात्रीं झोप येत नाहीशी झाली आहे. पण अग्निवर्णा, सुदैवानं तूं या धर्मविवंचनेपासून मोकळा असतां तूंहि माझ्यासारखाच चिंताग्रस्त दिसतोस याचं कारण काय? नित्या-प्रमाणं देवदर्शन घेऊन, एव्हाना आपल्या व्यापारी पेढीचं काम पाहावयाला तुझी सुरुवात व्हावयाची! पण आज तूं अजून याच बाजूला रेंगाळतो आहेस! देवस्थानाच्या देखरेखीचं माझं तर कामच आहे. पण तूं नगरशेठ, सर्व व्यापाऱ्यांचा पुढारी, सगळ्या धनिकांचा धनिक, असं असतां तूं एखाद्या निरुद्योगी माणसाप्रमाणं इकड भटकूं लागलेला कोणी पाहिला तर तो काय म्हणेल? व्यापारांत तुला अभावितपणं कुठं ठोकर बसली की काय? पण व्यापारांतल्या तोट्यानं असा हताश होणारा तूं नाहीस म्हणून विचारलं."

अग्निवर्ण म्हणाला, "तुझा तर्क बरोबर आहे. नगरांतला मुख्य धर्माध्यक्ष तूं विद्यमान असतां धर्मावरील संकटाची चिंता मी कशाला करूं? आणि

व्यापारासंबंधी म्हणशील तर, सुदैवानं आजच्याइतकं माझं बस्तान पूर्वी केव्हाहि बसलं नव्हतं. देवस्थानांतील बलिदान कमी झाल्यानं माझ्या बागेचं उत्पन्न थोडंसं घटलं हें खरं, तरी पण खिसा झाडून पडणाऱ्या केराइतकंहि तें माझ्या खिसगणतींत नाही."

"आणि असं असून तूं इतका चिंतामग्न दिसतोस की, तुझी रडायचीच तेवढी बाकी उरली आहे असं, तुझ्या चेहऱ्याकडे पाहून कोणीहि म्हणेल. तर मग आणखी एक तर्क उरला."

"तो कोणता ?"

"घरीं भवानी बाईसाहेबांचा राग तुझ्यावर झाला असला पाहिजे. गावचा सारा व्यापार तुझ्या मुठींत, पण तूं आपल्या बायकोच्या मुठींत, हें सगळा गाव जाणतो ! आज वहिनीसाहेबांनी तुझे कान माजघरच्या अंधारांत उपटले वाटतं ? की एखाद्या अपराधाची शिक्षा म्हणून त्यांनी तुझ्या सकाळच्या फराळाची वेळेवर तयारी ठेविली नाही ? व्यापारांतल्या बुद्धीपेक्षा पत्नीप्रेमांतली तेढ तुझ्यासारख्याला अधिक जाणवावयाची !"

"रुद्रभटा, त्या बिचारीला तूं उगीच अन्याय करतोस. ती जितकी प्रेमळ तितकीच विनयशील आणि आज्ञाधारक आहे. आधी माझ्यावर कधीहि रागावत नाही; आणि रागावली तरी माझ्या सेवेंत ती कधीहि अंतर पडूं द्यावयाची नाही. उभ्या जन्मांत तिनं माझी अवज्ञा किंवा अपमान कधीहि केला नाही. पण ती अशी आहे म्हणूनच तिचं दुःख पाहून माझा जीव तिळ-तिळ तुटतो."

"नाही. तिचं दुःख सर्वस्वी मानसिक आहे."

"मग त्याचा परिहार करण्याचा कांही उपाय पाहशील की नाही ?"

"तो उपाय मला सुचत नाहीं म्हणून तुझा सल्ला घेण्याचा शेवटीं निश्चय करून घराबाहेर पडलों, आणि देवीचं दर्शन घेऊन तुझ्या भेटीला यावं म्हटलं तों तूंच वाटेवर भेटलास !"

"ठीक आहे. चल तर, देवीचं दर्शन करून आपण तुझ्या घरीं जाऊन स्वस्थपणं बोलूं."

दोघेहि सभामंडपांतून देवीच्या गाभाऱ्यांत गेले. इतक्यांत अग्निवर्णाचा एक सेवक पुढं आला होता त्यानं, बाहेरच्या वधस्तंभावर मारविलेल्या बकऱ्याचं मुंडकं रेशमी झोळींत घालून आणलेलं अग्निवर्णाच्या हातीं दिलं. तशीच कांही

फुलं-पत्री आणि दक्षिणेकरिता एक सोन्याची मोहोरहि. अग्निवर्णानं प्रथम रक्तस्राव करणारं तें मुंडकं देवीवर धरून थोडा अभिषेक केल्यावर, त्या रक्ताचं एक बोट घेऊन त्याचा टिळा आपल्या कपाळावर लावला, फुलं-पत्री वाहिली, दक्षिणेची मोहोर देवीसमोरच्या ताटांत टाकली. मग दोघेहि फिरून देवीला नमस्कार करून देवळाच्या दक्षिणद्वारांतून बाहेर पडले. देवळाचा मुख्य व्यवस्थापक म्हणून तेथील सेवेकरी परिचारक यांना रुद्रभटानं मोठ्या ऐटीनं जातां जातां कांही हुकूम सोडला. दोघेहि देवळाच्या प्राकाराबाहेर पडले आणि अग्निवर्णाच्या घराकड निघाले.

प्रकरण सहावें

कलहबीज

ते दोघे घरीं पोंचण्याच्या सुमाराला अग्निवर्णाची स्त्री भवानी आणि नीला या दोघी पुढच्या अंगणांत एका झाडाखाली बसून बोलत होत्या. बाळ मुरारी दोघींच्या बोलण्यांत अडथळा करून स्वतःची करमणूक करून घेत होता.

रुद्रभट व अग्निवर्ण कालीमातेच्या देवळांत गांठ पडून घरीं आले त्याच दिवशीं सकाळीं नीलाहि अग्निवर्णाच्या घरीं असण्याचा योग होता. तिचा नेहमीचा कार्यक्रम असा होता—

भल्या पहाटे उठून ती आपल्या आवडत्या म्हणून राखून ठेवलेल्या एकदोन गाईंचा गोठा करी. नंतर नदीवर जाऊन, डोक्यावरून स्नान करून, दिवसभर पिण्याकरिता पुरेल इतकं घडाभर पाणी वस्त्रगाळ भरून घेऊन येई. झोपडींतल्या देवघरांत बसून भजनपूजन करी; आणि मग सकाळीं प्रहरभर संचाराला निघे. तिची फेरी कधी कुठं जाईल याची वर्दी कुणालाच लागायची नाही. पण संध्याकाळीं पक्षी घरट्याकड येतात त्या वेळीं तीहि गौळवाड्यांत परत विश्रांतीला येई. नीलेचा मुक्काम कधीमधी रात्रींहि आपल्या घराबाहेर पडेल असं एकच घर नवलपुरांत होतं. तें नगरशेठ अग्निवर्ण याचं. अग्निवर्णाची स्त्री भवानी इच्याशीं तिची मैत्री प्रथम अगदी अकारण जडली, पण

पुढं ती सकारण कायम झाली. थोडक्यांत सांगावयाचं तर तें कारण असं— थोड्या काळापूर्वी नीलेनं एक लहान मुलगा नदीच्या पुरांतून वाचविला होता. त्याचं नांव मुरारी असं तिनं ठेवलं. अग्निवर्णाची बायको भवानी इच्या पदरांत नीलेनं या मुलाला टाकला होता. त्या घरांत तो औरस मुलग्यासारखा वाढत अन् नांदत होता. त्याच्या दर्शनाकरिता नीला अग्निवर्णाच्या घरीं गेली नाहीं, असा एकाहि दिवस जायचा नाहीं. मग एखाद दिवशीं भवानी सहजच नीलेला आग्रह करून जेवायला ठेवून घेई. एखाद दिवशीं मुरारीला नीलेच्याच कुशींत निजण्याची हुक्की येई; आणि मग त्याच्या प्रेमाखातर ती रात्रीचा मुक्काम भवानीच्या घरीं करी. तसाच आदल्या रात्रीं पडल्यामुळं दुसरे दिवशीं सकाळीं रुद्रभट व अग्निवर्ण देवळांतून घरीं परत आले तेव्हा ती घरांतच होती.

रुद्रभट आणि अग्निवर्ण दुरून दिसतांच त्या दोघी उठून मुरारीला घेऊन लगबगीनं घरांत गेल्या. ते दोघे तडक माडीवरच्या दिवाणखान्यांत जाऊन बसले. त्यांनी दार ओढून घेतलं आणि आपणाला आता एकान्त आहे अशा समजुतीनं ते बोलूं लागले, पण त्यांच्या लक्षांत आलं नाहीं की मुरारीला गड्याबरोबर खेळायला बाहेर दूर पाठवून, भवानी आणि नीला दोघी केव्हाच दुसऱ्या जिन्यानं चोरपावलांनी वर येऊन मागच्या माडींत त्या दोघां पुरुषांचं चाललेलं बोलणं कान लावून ऐकत बसल्या होत्या.

रुद्रभटानं बोलणं सुरू केलं. तो म्हणाला, “ मीं येवढा तुझा मित्र असतांना तूं असं निमूटपणं दुःख सोसतोस हें तुला मला दोघांनाहि बरं नव्हे. तुझं सुकलेलं तोंड पाहून माझ्या पोटांत भडभडून येतं. एकमेकांची काळजी दूर करणं हेंच खऱ्या मित्रांचं कर्तव्य. नाहीं तर स्नेह घेऊन काय हंतरायचा की पांघरायचा ? मन मोकळं कर अन् सर्व कांहीं सांग.”

अग्निवर्ण म्हणाला, “ ऐक तर. आज कैक महिने झाले. रोज सकाळीं दारांतून तोंड बाहेर काढावं तों काय! हल्लीं गावांत बोकाळणाऱ्या बौद्ध भिक्षूंचं दर्शन मला आणि माझ्या बायकोला हटकून ठेवल्यासारखं घडूं लागलं आहे; आणि त्या चांडाळांचं अभद्र दर्शन झालं, की माझा सगळा दिवस हुरहुरींत जातो.”

रुद्र.—बौद्ध भिक्षूंचं दर्शन अमंगळ तर खरंच; पण हुरहुर कशाबद्दल ?

अग्नि.—तुला माहीतच आहे! पोटीं पुत्रसंतान नाहीं म्हणून माझ्या बायकोनं जवळ जवळ अंथरूणच धरलं आहे. आदिमाये ! आदिशक्ति ! माता

भवानी! तुझ्या प्रसादानं पोटीं पुत्र होऊं दे असं म्हणून नित्य कांही तरी नवा नेमधर्म करण्याचा तिचा विचार असतो. पण सकाळीं उठतांच बौद्ध भिक्षूंच्या दर्शनाचा अशुभ शकुन झाला म्हणजे तिला नेमधर्मांचा सगळा विचार बाजूला ठेवावा लागतो. तिच्या समाधानाकरिता युक्तिप्रयुक्तीची नवी इमारत मी रोज उभारतों; पण ती या बौद्ध भिक्षूंच्या दर्शनानं रोज ढासळून जाते. बौद्ध भिक्षूंना पाहतांच माझ्या बायकोला शक्तिपातच होतो जसा कांही. मग सगळा दिवस ती दुःखी आणि मी उदास होतों. काय करावं कांही सुचत नाही.

रुद्र.—अग्निवर्मा, आपलाच दाम खोटा, मग दुसऱ्याला बोल लावून काय उपयोग?

अग्नि.—तो कसा?

रुद्र.—आमच्या धर्मध्वज महाराजांना आता लागला आहे म्हातारचळ! या बौद्धांना आधार देऊन आपल्या या सनातन वैदिक शाक्त धर्मांचा उच्छेद करण्याचा विडाच जसा कांही त्यांनी उचललेला आहे. पूर्वीच्या कारकीर्दींत या नगरांत बौद्ध भिक्षूंचा प्रवेश होण्याचीहि राजाज्ञेनं बंदी होती; पण आता पाहावं तों या नीचांनी आपलें हें भैरवपूर आंतून बाहेरून कसं वेढून–पोखरून सोडलं आहे. 'राजा कालस्य कारणं' म्हणतात तें कांही खोटं नाही.

अग्नि.—पण नुसता राजाला बोल लावून आपलं दुःख नाहीसं कसं होणार? मित्रा, रुद्रभटा, कांही तरी तोड सांग गड्या.

रुद्र.—तोड? तोड आहे, आणि तीहि तुझ्या एकट्याकरिता सांगत नाही. सगळ्या शाक्त पंथाकरिताच मी तोड योजिली आहे. अरे, माझ्यासारखा शाक्त पंथाचा कट्टा अभिमानी आपल्या धर्मांची अशी दुर्दशा पाहून कसा स्वस्थ बसेल? आज प्रसंगच आला म्हणून तुला सांगतों. या बौद्ध धर्मांचा पाडाव करण्याचा मींहि विडा उचलला आहे. फक्त मला तुझीच मदत पाहिजे.

अग्नि.—पण धर्मध्वज महाराजापुढं आपलं काय चालणार?

रुद्र.—नांव धर्मध्वज; पण बौद्ध धर्माला पक्षपात दाखवून आणि सनातन शाक्त धर्माला प्रतिकूलता दाखवून, या अ-धर्मध्वज राजानं सर्व नगरभर शत्रूच शत्रु स्वतःला निर्माण केले आहेत हें त्याला कुठं आहे माहीत?

अग्नि.—पण शत्रु झाले तरी ते राजाच काय करणार?

रुद्र.—महाराजांनी बऱ्या बोलानं हा चाळा न सोडला तर ते शत्रु राज्य-क्रांति करणार!

अग्निवर्ण भिऊन म्हणाला, "काय राज्यक्रांति?"

रुद्र.—होय राज्यक्रांति. त्यांत भीति कसली! बस्. माझा तर निश्चय ठरला. तुला दररोज अभद्र दर्शन देणाऱ्या बौद्ध भिक्षूंना शिक्षा करण्यापासूनच मी या महत्कार्याला सुरुवात करणार! बौद्ध लोकांनी आमच्या शाक्त धर्मावरच काय, पण एकंदर वैदिक ब्राह्मण धर्मावर, घाला घातला आहे. त्याचं निवारण आदिमाया चंडिका काय करील तें करो; पण आम्हीं माणसांनी प्रयत्न केल्याशिवाय देवता तरी आम्हाला कशा साहाय्य करणार? मनुष्य हा हस्तक होईल तर देवता त्याला आपला वरदहस्त देतील. पण ब्राह्मण धर्मातच आता कांही राहिलं नाही. याला कारण आमचे आम्हीच आहों. शाक्त पंथाच्या ग्रंथांतून मोठमोठ्या आचार्यांनीं जे आचारविधि सांगितले, ते आपण हल्ली कुठं पाळतों? यज्ञसंस्था जवळ जवळ नष्ट झाली. पूर्वी नरबलिदान सुद्धा होत असे, यामुळं मनुष्याची धर्मभावना किती तीक्ष्ण आहे याची परीक्षा देवतांना कांही तरी मिळे. आता दयाधर्माचा बहाणा आमच्या धर्मशत्रूंनी सुरू केला आहे. आणि आमच्या धर्मातलेच लोक या मृदु उप-देशाच्या मोहाला बळी पडून, बलिदान न करतां त्याऐवजी कांही तोडगे करून देवतांना फसवूं लागले आहेत. कोणी पिठाचा पशु करतो, तर कोणी खऱ्या पशूच्या मानेला शस्त्र लावलंसं करून त्याला सोडून देतो. अशानं देवतांच समाधान कसं होईल? बलिदानाचा नैवेद्य देवतांना स्वतःला थोडाच खावयाचा असतो? पण पशुवध काय, नरवध काय, हा वैदिक यज्ञ म्हणून करावयाचा, आणि देवतांना आपल्या स्वार्थत्यागाची तयारी पटवून द्यावयाची इतकाच त्याचा अर्थ असतो. शिवाय ज्याचं बलिदान होतं त्याला तर तो मंगळ प्रसंगच! कारण परलोकीं त्याच्या आत्म्याला उत्तम गति मिळते, आणि पुन-र्जन्म घ्यावयाचा तर तो निदान तुझ्यासारख्या श्रीमंताच्या घरीं जन्माला येतो. अशा रीतीनं सर्वांचीच कार्यं साधतात. देवता संतुष्ट होतात, बलिदान करणाऱ्यांना पुण्य लाभतं आणि बलि दिलेल्या देहांतील आत्म्यांना स्वर्गलाभ होतो. अशी ही सुंदर दुहेरी व्यवस्था वेदकालापासून चालत आलेली आम्हीं शाक्त लोकांनीच काय ती अजून जिवंत ठेविली होती. इतरांची धर्मभावना शिथिल होऊन त्यांनी ती टाकून दिली; आणि आता शाक्त पंथाचा राजाच स्वतः

बौद्ध धर्मावर प्रेम करूं लागल्यामुळं, इतर लोकहि आपले धर्माचार सोडूं लागले आहेत. आपल्या महाकालीच्या मंदिरांत वर्षांतून जे थोडेबहुत बळी दिले जातात ते तुमच्या-आमच्यासारखे मध्यमवर्गाचे लोकच देतात. गरिबांना दारिद्र्यामुळं बळी देण्याला पशु मिळत नाहीत; आणि श्रीमंतांजवळ पैसा आहे पण त्यांना धर्मबुद्धि नाही. मिळून दोहो तोंडी धर्माची उपासमार होते. बळी देण्याचं द्रव्यसाधन आणि खरी धर्मबुद्धि हीं दोन्ही, अग्निवर्णा, तुझ्यासारख्या एखाद्याजवळच मला एकत्र दिसतात. आणि तुझं दैव मोठं की, तुझी बायको देखील तुझ्यासारखीच अत्यंत धर्मनिष्ठ आहे. ईश्वराच्या घरची तरी मौज अशी की, तुम्ही दोघं इतकीं धर्मनिष्ठ, सद्धर्माचं आचरण करणारीं असतां, तुमचं मात्र निःसंतान व्हावं, आणि इतर धर्मभ्रष्ट लोकांच्या घरीं पोरांची वीण पोसली जावी!"

हें बोलणं होतं आहे इतक्यांत अग्निवर्णाच्या घरापलीकडे थोड्या अंतरावर, धर्मसाधनाला निघालेल्या बौद्ध भिक्षूंच्या एका टोळीची उंच स्वराची हाक ऐकूं आली. ती ऐकतांच अग्निवर्ण व रुद्रभट हे दोघेहि खाली जाऊन दाराशीं उभे राहिले. राजरस्त्याच्या मागच्या चौकांत भिक्षूंच्या टोळीची वाटणी होऊन, दोघा तरुण भिक्षूंची एक जोडी थेट या दारापुढं आली.

बौद्ध भिक्षूंच्या धर्मसाधनाची रीत अशी असे की, भिक्षूंनी आपली पिवळीं वस्त्रं धारण करून, हातांत झोळया घेऊन, मंदगतीनं, हातांत हात घालून, बरोबर ठेक्यानं, रस्त्याच्या मध्यभागावरून चालावं. प्रत्येक घराच्या दारासमोर येतांच उभं राहावं, आणि "नमो बुद्धाय, नमो बुद्धाय! बुद्धं शरणं गच्छामि! धर्मं शरणं गच्छामि!" असं मोठ्यानं त्रिवार उच्च स्वरानं म्हणावं, क्षणभर वाट पाहावी, कोणी भिक्षा आणली व 'ही घ्या भिक्षा' असं म्हटलं तरच झोळी पुढं करावी. पण कोणी भिक्षा न घातली तरी कोणाला हाक मारूं नये. फार काय पण घराच्या दाराकड पाहूंहि नये. सरळ आपल्यासमोर दृष्टि लावावी; आणि फिरून मंदगतीनं पुढं चालूं लागावं. या थाटदार भिक्षापद्धतीचा लोकांवर सहजच परिणाम होई. भिक्षा मागून न मागण्याचा तो एक प्रतिष्ठित प्रकार होता. 'अमुक भिक्षा घाला' असं तर म्हणावयाचं नाहीच; फार काय पण 'भिक्षा घाला' असंहि म्हणावयाचं नाही. झोळींत भिक्षा पडतांना तिजकड पाहावयाचंहि नाही. ही निरिच्छ वृत्ति पाहणाराला सहजच मोहून टाकते.

आज हे जे दोन तरुण भिक्षु आपल्या धर्मसाधनाच्या क्रमांत अग्निवर्णांच्या घरापुढं येऊन उभे राहिले. ते वयानं व वेषानं सारखेच असले तरी अंग-लटीनं वेगळे होते. त्यांच्या चेहऱ्यांवरून त्यांचे स्वभावहि वेगवेगळे आहेत असं वाटल्याशिवाय राहात नसे. एकाच्या (याचं नांव जीर्णमन्यु असं होतं) तोंडावर यत्किंचितहि तेज नसून पांडुरकीची छटा होती. त्याचे डोळे स्थिर राहात नसत. तरुण वयाच्या मानानं त्याच्या अंगीं जो ताठरपणा असावा तो नसून त्याची पाठ किंचित् वांकल्यासारखीहि वाटे. दुसरा भिक्षु हा वाचकांच्या परिचयाचा झालेला शमधनच होता. मात्र याचा प्रकार अगदीं उलट होता. तो अंगापिंडानं सुदृढ आणि त्याच्या अंगाची काठी ताठ दिसे. त्याचे डोळे प्रशांत व स्थिर असे वाटत. त्याच्या तोंडावर निश्चयीपणाची छटा व अन्तः-शुद्धीचं तेज लकाकत असे. खरोखरच त्याच्याकड पाहणाराला एका अर्थानं वाईट वाटे. कारण हा असा तरुण भर उमेदींतला तेजस्वी कर्तृत्ववान पुरुष, सर्वसंग-परित्याग करून, संन्यासी वृत्तीनं भिक्षु होऊन धर्मसाधन करीत निघाला, तेंव्हा आता देशाची, राष्ट्राची व समाजाची काळजी तरी कोणी करावी ? आणि प्रवृत्तिमार्गाच्या द्वारं त्याचा उत्कर्ष तरी कसा व्हावा ? असं त्याजकडे पाहून कोणालाहि वाटलं असतं.

प्रकरण सातवें

कलह

—:०:—

असो. हे दोघे भिक्षु दारापुढं आल्याबरोबर रुद्रभट त्यांच्यापुढं जाऊन त्यांना अडवून उभा राहिला आणि म्हणाला, “ का रे, भिक्षेकऱ्यांनो ! हें काय तुम्हीं चालविलं आहे ? या नगरांत येऊन तुम्ही कां वावरतां ? ”

तेंव्हा त्यांपैकी पहिला, जीर्णमन्यु, म्हणाला, “ वाः, आम्ही काय भिक्षेकरी आहों ? सद्धर्मप्रचारक आहों ! तुमच्यासारखे अधर्मरत असे शाक्त लोक जे या नगरांत आहेत, त्यांना सन्मार्ग दाखविण्याची ईश्वरी प्रेरणा आम्हाला झाली आहे. ज्या धर्मतत्त्वांचा प्रकाश आमच्या मनावर पडला आहे, तो

ईश्वरानं तुम्हा शाक्त लोकांना दिला नाही या विचारानं आम्हाला तुमची कीव येते रे बाबांनो ! ”

पण हें त्याचं बोलणं मधेच थांबवून दुसरा भिक्षु, शमधन, हा जीर्णमन्यूला म्हणाला, “ धर्मबंधो ! नगरच्या लोकांशीं आपण असं उद्दाम वृत्तीनं बोलूं नये. ही प्रभातकालची रम्य व शांत वेळ आपल्याला मन शांत आणि प्रसन्न ठेवण्याचाच उपदेश करीत नाही काय ? प्रत्येकाला आपापल्या परीची धर्मबुद्धि ईश्वरानं दिलेलीच आहे. आमची जशी आम्हाला तशी त्यांची त्यांना. ईश्वरानं आमच्यावर कृपा केली तशी एक दिवस तो त्यांच्यावरहि कां न करील ? जो धर्मोपदेश आपणाला योग्य वाटतो तो करणं एवढंच आपलं कर्तव्य आहे. तें करतांना लोकांना नांवं ठेवून त्यांना कमीपणा आणून भलतंसलतं बोलून आपण मनाचं समाधान कां ढळूं द्यावं ? कालच माताजी अवलोकिता यांनी याविषयी उपदेश केला तो तूं ऐकला नाहीस काय ? ”

जीर्णमन्यु म्हणाला, “ ऐकला तर काय झालं; पण जें वाईट दिसतं तें वाईट म्हणण्याची चोरी कां असावी ? या नगरांत जीवदया म्हणून लोकांना कशी ती माहीतच नाही ! ते बलिदान काय करतात ! अघोरी आचार काय आचरतात ! हा विचार मनांत आला म्हणजे राग येतो असा कांही.”

शमधन म्हणाला, “ गड्या, ज्याची भिक्षा आपण घेतों त्याला अशीं निषेधपर दुरुत्तरं उलट बोलूं नये. ‘खऱ्या शांतीलाहि मौन हेंच अधिक शोभतं.”

जीर्ण.—वा, वा ! हें भलतंच काय बोलतोस ? या अधर्मरत लोकांचा त्यांच्या तोंडावर निषेध केल्याशिवाय त्यांच्या मनावर सद्धर्माचा प्रकाश पडणार नाहीं. माताजी अवलोकिता कांहीहि म्हणोत. आपल्या संघाच्या नियमांनी भिक्षा ‘मागूं’ नये—म्हणजे ‘भिक्षा घाला’ असं म्हणूं नये, इतकीच त्यांनी बंदी केली आहे. पण धर्मोपदेश सुचेल तसा करण्याला कांही बंदी केलेली नाही.

हे शब्द ऐकतांच रुद्रभट अंगावरचं वस्त्र सावरून पुढं झाला आणि म्हणाला, “ कांय रे ए, दुष्ट भोंदू जोगड्यांनो ! कोणाला रे तुम्ही अधर्मरत म्हणतां ? ज्यांच्याकड भिक्षा मागतां त्यांचीच निंदा करतां काय ? ”

शम.—उपासका बाबा, असा रागावतोस कां ? आम्ही व्यक्तिशः तुला कांही म्हटलं काय ?

अग्नि.—त्याला म्हटलं काय, मला म्हटलं काय, किंवा आमच्या एकंदर धर्मबांधवांना म्हटलं काय, सर्व एकच. जी इतरांची निंदा, तीच आमची. जें इतर करतात तेंच आम्ही करतों. तेव्हा ते वाईट, तर आम्हीहि वाईटच ठरलों.

रुद्र.—आम्हाला कांही म्हटलं नाही! आमच्या धर्मबांधवांनाहि कांही म्हटलं नाही! बरं हो—उगाच वाटच्या वाटसराला म्हटलं तरी काय झालं? लोकांना नांवं ठेवणारे तुम्ही कोण रे? तुम्ही हे पिवळ्या पोषाकाचे क्षौरी खाडू लोक फार माजलां आहां. तुम्हाला वाटतं की, मिशा आणि डोकं भादरून अंगावर पिवळी झूल घातली, म्हणजे सगळ्या जगाला नांवं ठेवण्याचा अधिकारच जसा कांही तुम्हाला आला. फिरून जर कोणाला असं बोललां, तर दांतच पाडून हातावर देईन. संभाळा, सांगून ठेवतों.

शम.—अरे बाबा! असा दरडावतोस कां? जीर्णमन्यूनं तुम्हाला असं टाकून बोलावयाचं नव्हतं. त्याच्या चुकीबद्दल वाटेल तर मी तुमची क्षमा मागतों.

जीर्ण.—तूं काय म्हणून क्षमा मागतोस, शमधना? लाकूड आधी जेव्हा चांगलं साफ घासावं, रंधावं तेव्हाच त्याच्यावर रंगाचं पुट चांगलं घट्ट बसतं. या शाक्त लोकांशीं गोड मऊ बोलून, त्यांच्या मनावर आमचा धर्मोपदेश कसा नीट बसणार व टिकणार? योग्य त्या शब्दांनी त्यांना दूषण दिलंच पाहिजे. मी खरं तेंच बोललों. यांत मीं काय केलं?

रुद्र.—काय केलं? हं:! काय करायचं आता बाकी राहिलं आहे? आमचा सनातन असा जो शाक्त धर्म त्याच्या जिवावर उठलां आहां तुम्ही हे संघवाले! आमच्या तरुण मुलांची धर्मश्रद्धा तुम्ही ढासळतां आहां. आमच्या नगराजवळ तुम्ही फुकटच्या चांगल्या जागा बळकावून बसलां, त्यावर आपले मठ स्थापिले. आमच्यांतल्या श्रीमंत लोकांकडून देणग्या मिळविण्याचा सपाटा लावला. आमच्या राजाच्या मनावर भुरळ घातली. भोळ्याबापड्या लोकांवर तुम्ही आपले प्रेमपाश—प्रेमपाश कसले—मोहपाश टाकले! संघांतल्या उनाड तरुण मुली गांवांतून भिरवून तुम्ही आमचे तरुण नागरिक त्यांच्या नादीं लावतां. आमच्या धर्मप्रसारार्थ नाकेबंदी करून तुम्ही आपल्या धर्माच्या प्रसाराचं काम मात्र मोठ्या जोरानं चालविलं आहे. तेव्हा तुम्ही या सर्व कृत्यांनी आमच्या धर्माच्या काळजालाच हात घातलां की नाही? आणि त्या

तुमच्या अपराधाबद्दल आम्हीं शाक्त लोकांनीं तुम्हा बौद्ध लोकांच्याहि काळजाला हात कां घालू नये? तुमचे अपराध यापुढं किती सहन करावे?

अग्नि.—यांचे हे अपराध यापुढं सहन करणं म्हणजे आमच्या सर्व संसार-सुखावर पाणी सोडायला तयार होणं. तें आम्ही तरी कां करूं?

रुद्र.—मित्रा अग्निवर्णा, यांच्याशीं तोंडानं नुसता वाद करण्यांत काय अर्थ? या नवीन बंडखोर धर्मपंथाचा उच्छेद करायला ही पाहा आजपासून मीं कंबरच बांधली. बरी ही चांडाळांची एक जोडी आपल्या हातीं आज आयतीच सापडली आहे. तेव्हा त्यांचा समाचार घेऊनच मी आपल्या धर्मकार्याला प्रारंभ करणार!

असं म्हणून रुद्रभटानं उजव्या हातानं शमधनाचा आणि डाव्या हातानं जीर्णमन्यूचा हात धरला. तेव्हा शमधन शांत स्वरानं म्हणाला, "उपासका बाबा! असं विनाकारण हातघाईवर येणं चांगलं का? आमच्या अमक्या एका कृत्यापासून तुम्हाला त्रास होतो असं आम्हांला नीट समजावून सांगा, म्हणजे आम्हीहि तें करायचं टाकून देऊं. दुसऱ्याला पीडा करूं नये, त्रास देऊं नये, असंच आमचा धर्म आम्हाला सांगतो. असं विनाकारण वर्दळीवर कां येतां?

हें ऐकून अग्निवर्ण पुढं होऊन म्हणाला, "होय, मी सांगतों तुम्हाला, तुम्हीं काय करायचं सोडून द्यावं तें. प्रथम असं करा की, तुम्ही बौद्ध भिक्षु या माझ्या घरच्या पुढील रस्त्यानं हिंडत जाऊं नका. इथं तुम्हाला भिक्षा कधीच मिळायची नाही."

शम.–आम्हांला तुम्ही भिक्षा घालूं नका. आम्ही तुम्हाला मागतहि नाही. पण आमच्या धर्मसाधनाच्या शास्त्रांत हातांत झोळी घेऊन प्रत्येक घरापुढं क्षणभर उभं राहून पुढं जावं असा नियम आहे. घर वगळल्यानं पक्षपात होतो. तो आमच्या शास्त्रानं निषिद्ध मानला आहे.

अग्नि.—पण तुमच्यासारख्या क्षौरी बाडग्या संन्याशांचीं तोंडं सकाळीं पाहाणं हें आमच्याहि धर्मानं निषिद्ध ठरवलं आहे त्याची वाट काय? आम्ही होऊन तुमच्या वेळूवनांत किंवा विहाराकडे येऊन तुमचं दर्शन कधी घेतों का? मग आमच्या घरापुढून मुद्दाम जाऊन आम्हाला अभद्र दर्शन देण्याचा तुमचा आमच्यावर जुलूम काय म्हणून? तुमचं हें अशुभ, अभद्र दर्शन मला आणि माझ्या बायकोला खपत नाही, समजलां? आम्ही वर्दळीवर येऊं नये

असं तुम्हाला पाहिजे असेल तर उद्यापासून या रस्त्यानं जाण्याचं तुम्ही बंद करा पाहूं.

जीर्ण.—पाहा! पाहा! कसं हें अन्यायाचं यांचं बोलणं! आम्ही काय तुमच्या घरांत शिरतों वाटतं? आपल्या पायांखाली पाहात सरळ राजमार्गानं धर्मसाधन करीत जातों. राजमार्ग सर्वांचाच नाही काय?

रुद्र.—पाहा पाहा, मित्रा अग्निवर्णा, राजाश्रयानं उन्मत्त झालेल्या या नीचांशीं असं सामोपचारानं बोलत बसणं हा आमचाच मूर्खपणा नव्हे काय? चांभाराच्या देवाला कुठं फुलं का कोणी वाहिलीं आहेत? त्याला खेटराचीच पूजा आवडणार! त्याच पूजेनं तो प्रसन्न व्हावयाचा! ठीक आहे. हा राजमार्ग आहे नव्हे, तुमच्या बापानं बांधून ठेविलेला? या नगरचा राजा जसा आमचा, तसा हा राजमार्गहि आमचा आणि आमच्याकरिताच आहे. त्यावर अतिक्रमण करून, उजळ माथ्यानं हिंडून, उलट आमची निंदा करणाऱ्या बौद्ध भिक्षूंची ही पाहा यापुढं अशी संभावना होणार.

इतकं बोलून रुद्रभटानं शमधनाचा धरलेला हात सोडला आणि उजव्या हाताची मूठ वळून तो जीर्णमन्यूच्या पाठीवर मुष्टिप्रहार करूं लागला. तेव्हा जीर्णमन्यूहि दर प्रहाराबरोबर हात वर करून "नमो बुद्धाय! बुद्धं शरणं गच्छामि, धर्मं शरणं गच्छामि, संघं शरणं गच्छामि!" असं ओरडून जणू काय या मुष्टिप्रहारांना तालच देऊं लागला!

अग्निवर्ण पुढं झाला नाही, पण आपल्याच जागीं उभा राहून 'ठीक केलंस–रुद्रभटा, ठीक केलंस!' असं म्हणून त्याला उत्तेजन देत होता.

शमधनानं शांत वृत्तीनं पुनः एकवार विनवणी करून रुद्रभटाला म्हटलं, 'धर्मबांधवा, सोडून दे जीर्णमन्यूचे हात.' हें ऐकून रुद्रभट आणखीच उसळला आणि म्हणाला, "खबरदार, मला धर्मबंधु म्हणशील तर! मी कांहीं तुझा धर्मबंधु नाही. हा दुसरा कोडगा असेल तुझा धर्मबंधु."

शम.—बरं, मी आपला शब्द परत घेतों. तुम्ही नव्हे माझे धर्मबंधु आणि मी तुमचा पण कोणी. एकमेकांचे धर्मबंधु नसले म्हणून त्यांनीं वर्दळीवर येऊन मारामारी करण्याचं काय कारण?"

तथापि रुद्रभटाचं जीर्णमन्यूला तडाखे देण्याचं काम सुरूच होतं तें थांबेना; आणि जीर्णमन्यु 'नमो बुद्धाय' एवढंच म्हणून इतर कांहीं प्रतिकार न करतां आपल्या दुबळेपणाचं प्रदर्शन करणंहि थांबवीना. तेव्हा शमधनानं पुढं होऊन

रुद्रभटाचे दोनीहि हात आपल्या एकाच डाव्या हातानं घट्ट आवळून धरले, आणि अशा रीतीनं जीर्णमन्यूची मोकळीक करून त्याला म्हटलं, "जा रे जा, तूं तरी आता मोकळा झालास. मी पाहतों हा तुला यापुढं कसा मारतो तो! किंवा मलाहि कसा अडवितो तो! तूं याच रस्त्यानं पुढं हो आणि आपलं धर्मसाधनाचं काम खुशाल कर. थोड्या वेळांत मीहि तुझ्यामागून येतों. जा—नीघ कसा."

जीर्णमन्यूला आपली सुटका झालेली पाहून आनंद झाला व तो पुढं चालला. मात्र त्याच्या मनांतली भीति अजून पुरी गेली नव्हती, म्हणून तो मागंपुढं पाहत चालला होता.

शमधनानं रुद्रभटाचे हात प्रथमच घट्ट धरून ठेवले होते, ते असे की, त्याला ते सोडवून घेऊन जीर्णमन्यूच्या मागून त्याचा पाठलाग करीत जातां येऊं नये. पण रुद्रभट जेव्हा आपले हात सोडवून घेण्याचा प्रयत्न करूं लागला तेव्हा शमधनानं ते आणखी इतक्या जोरानं दाबून धरले की, सुटका तर होईनाच, पण रुद्रभटाच्या हातांना चांगलीच रग लागली. त्याचे पाय मोकळे होते, पण लाथा झाडण्याचं धाडस त्याच्यानं करवेना. कारण ज्यानं आपल्या एका हातानं दुसऱ्याचे दोन हात धरून एखाद्या गावींत पकडल्याप्रमाणं, त्यांना रग लावली, तो एका लाथेनं आपणाला जमीनदोस्त करूं शकेल, अशी भीति रुद्रभटाला सहजच वाटली. त्याचं तोंड तेवढं मोकळं होतं म्हणून त्याचाच उपयोग करून तो अग्निवर्णावर ओरडून म्हणाला, "अरे भ्रमिष्टा! तूं बघतोस काय? यानं माझे दोनहि हात धरून ठेवले आहेत, पण तुझे तर अजून मोकळे आहेत ना! मला येऊन मदत कर, नाही तर निदान त्या दुसऱ्या चांडाळाच्या मागं धावत जा आणि त्याला अंगभर मार देऊन लोळीव कसा."

अग्निवर्णानं पाहिलं की जवळचा प्रतिस्पर्धी बराच भक्कम दिसतो. तेव्हा रुद्रभटाला सोडवण्याचा प्रयत्न करण्यांत फारसा अर्थ नाही. त्यानं त्याचे फक्त हातच धरून ठेवलेले आहेत. तेव्हा तो राहीना का तसाच! तो दुसरा प्रतिपक्षी अगदीच दुबळा दिसतो. तेव्हा त्याच्यामागं जावं आणि इकडचा सूड तिकडं काढावा. असं म्हणून तो जीर्णमन्यूच्या मागं धावला व त्याला त्यानं घट्ट धरून ठेवलं; पण प्रथमच एकदम हात उचलला नाही.

हें पाहून रुद्रभट ओरडून म्हणाला, "ठीक आहे, ठेव त्याला निदान तसाच. मी या चांडाळाला पाहून घेतों."

शमधन हसून म्हणाला, " हा मूर्खा ! तूं मला पाहून घेणार काय ? तूं कसा पाहून घेणार तें दिसतच आहे. खबरदार अधिक बोललास तर! हे हात मी असेच आणखी जोरानं दाबून धरले म्हणजे त्यांच्या शिरा फुगून तुझं रक्तहि बाहेर पडेल, पण मला तें कर्तव्य नाही. तुला वाटत असेल की, आम्हा बौद्ध लोकांच्या अंगांत सामर्थ्य नाही म्हणून आम्ही शांतिप्रिय असतों; पण तुमची ही समजूत चुकीची आहे. लक्षांत ठेवा की, आम्ही बौद्ध भिक्षु शरीरानं दुर्बल म्हणून शांत नाही, तर मनानं सात्त्विक म्हणून शरीरानं शांत असतो, हें आता तरी तुला पुरतं कळून आलं की नाही ?"

इतक्यांत तिकड अग्निवर्णाला चेव आला. जीर्णमन्यूनं प्रतिकार होत नाही तर गप्प तरी बसावं तें न बसतां, तोंडानं अग्निवर्णाचीच काय पण विनाकारण सगळ्या शाक्तधर्माची निंदा चालविली. तेव्हा अग्निवर्णानंहि रुद्रभटाप्रमाणंच त्याला गुद्दे मारण्याला सुरुवात केली; आणि फिरून जीर्णमन्यूनंहि पूर्वीप्रमाणंच " नमो बुद्धाय ! बुद्धं शरणं गच्छमि, धर्मं शरणं गच्छमि; संघं शरणं गच्छामि ! " असं ओरडून आपल्या निलाजरेपणाचं आणि दुर्बळतेचं प्रदर्शन सुरू केलं !

तें पाहून शमधन आपल्या जाग्यावरून मोठ्या आवाजानं म्हणाला, " धर्मबंधो ! काय करावं तुला ! आपल्या दुर्बळतेचं असं प्रदर्शन करीत, आणि त्याबरोबर भगवान् बुद्धगुरूच्या नांवाचं हसं करीत माझ्या डोळ्यां-समोर तरी राहूं नको. तुला हात नसले तरी पाय आहेत. त्यांचा तरी उपयोग करून माझ्या दृष्टिआड जा कसा ! मला तूं नेभळेपणा प्रकट केलेला पाहवत नाही. हें पाहा. मी एका हातानं, आणि तेंहि डाव्या हातानं, या ब्राह्मणाचे दोन्ही हात धरून, त्याला हालतां येऊं नये, चालतां येऊं नये असं करून टाकलं आहे, आणि वरती माझ्या मनाची शांतता ढळली नाही, मला त्याचा राग आलेला नाही, असंहि मीं त्याच्या प्रत्ययाला आणून दिलं आहे."

तें ऐकून रुद्रभट म्हणाला, " अहाहा ! काय पण बळ आणि काय पण शांतता ! कां नसेल तुझ्या अंगांत बळ ? सगळ्या गावाला बुडवून सुग्रास भिक्षेनं झोळ्या भरून, तुम्ही बौद्ध भिक्षु गिळीत बसतां. तुम्हाला नाही उद्योग, ना धंदा, ना धर्म ! देवाळा वाहून सोडलेल्या चवाठ्यावरील पोसलेल्या तुंदिल वळू बैलाप्रमाणं तुम्ही बौद्ध भिक्षु माजलां तर काय नवल ? तो पाहा दुसरा लोधी, तडातड तडाखे खातो आहे, पण लागेल तर शपथ ! अंगांत मांस ठेचून

भरून ठेवलेलं! कशानं लागणार! म्हणून मार खातों आणि बुद्धाच्या नांवानं त्या माराला जसा कांही तालच देतो."

शमधन म्हणाला मार खाऊन अंगाला लागत नाही अशी तुझी तक्रार असेल, तर मार खाल्ल्यानं कसं लागतं हें मीं तुला आताच दाखविलं असतं. माझा उजवा हात मोकळा आहे हें तूं पाहतोसच. माझा एकच बुक्कीचा प्रहार तुला व्याकुळ करून पाणी मागायला लावील. पण आम्ही लोक मनानं सात्त्विक आहोंत; आणि आम्हीं सात्त्विक राहावं असाच आमच्या धर्मगुरूचा आम्हाला उपदेश आहे. म्हणून आम्ही आत्मसंरक्षण करावयाचं झालं तरी जरूरीपेक्षा आपल्या बळाचा अधिक उपयोग कधींहि करीत नाही. म्हणूनच तूं आज वाचलास हें ध्यानांत ठेव! तूं तोंडानं आम्हा बौद्धांना वाटेल तितक्या शिव्या दे. कोणत्याहि शिव्या सोसण्याइतकी शांति आमच्या अंगीं आहे. मारणाराला वाटेल तर उलट मारण्याइतकं बळहि आमच्या अंगांत आहे; पण ग्राम्य मनुष्यासारखी मारामारी करणं हा आम्ही कमीपणा समजतों."

आपला प्रतिपक्षी मोठेपणाच्या भावनेंत गुंग होण्यासारखा दिसतो, असं पाहून रुद्रभट आपल्याकडून मोठी युक्ति करून म्हणाला, "लोकांचे असे हात धरून ठेवून, त्यांना रग लावून, दुःख देणं ही मारामारीच नव्हे तर काय? हा सात्त्विकपणा वाटतं? ही शांति वाटतं? तुला एवढा आपल्या शांतिब्रह्म धर्मगुरूचा अभिमान वाटतो, तर कशाला धरलेस माझे असे हात, प्राणांतिक वेदना होईपर्यंत?"

शमधन हसून म्हणाला, "तुझा कावा मी चांगला समजतों. तुझ्या झुकांडीनं मी असा फसणारा नाही. शांतता आणि सात्त्विकपणा यांच्या मर्यादा आमच्या धर्मगुरूनं आम्हाला चांगल्या शिकविल्या आहेत; आणि त्या लक्षांत ठेवूनच मीं तुझे हात धरले, पण उलट मारलं नाही यावरून काय तें ओळख. सूडाच्या बुद्धीनं आम्ही कोणालाहि शासन करीत नाही. पण दुसऱ्याच्या अन्यायी अत्याचाराला प्रतिबंध करणं याला आमचा धर्म प्रतिबंध करीत नाही. मला तुला नुसता प्रतिबंधच करावयाचा होता. मी तुझे हात धरतांच माझा हेतु ओळखून तूं गप्प उभा राहतास, तर मीं तुझे हात असे घट्ट धरले नसते, आणि मग तुझ्या हाताला रगहि लागली नसती. म्हणून तुला जर वेदना होत असतील, दुःख होत असेल, तर ह्याला कारण तूंच आहेस, मी नाही. माझी धर्मबुद्धि विवेकाला धरून आहे. तसंच माझं आचरण. आमच्या शांतीचं सत्त्व

पाहणारानं तें पाहूं नये. बरं झालं तूं असा तावडींत सापडलास ! बुद्ध धर्मानं सांगितलेल्या शांतीच्या मर्यादा कोणत्या, याचं शिक्षण तरी मला आज तुला देतां आलं. शांततेच्या उपदेशाचा भलता अर्थ करून जर आम्ही मूर्खपणाचं आचरण करूं आणि आमच्या शत्रूंना रान मोकळं सोडूं, तर उद्या तुम्ही आमच्या आश्रमावर—विहारावर छापे घालून काय अनर्थ कराल हें दिसतंच आहे. म्हणून आत्मरक्षणाकरिता शरीरशक्तीचा योग्य तो उपयोग, पण तो तितकाच, आम्ही करतों."

इतकं बोलून, आणि जीर्णमन्यु अग्निवर्णाच्या हातून कशी तरी सुटका करून घेऊन पळून गेला असं पाहून, शमधनानं रुद्रभटाचे धरलेले हात सोडून दिले आणि फिरून अगदी पहिल्याप्रमाणं डोळ्यांसमोर पाहून, भेटेल त्या घरासमोर क्षणभर उभा राहून "नमो बुद्धाय ! बुद्धं शरणं गच्छामि, धर्मं शरणं गच्छामि, संघं शरणं गच्छामि !" असं शांतपणानं म्हणत तो धर्मसाधन करीत पुढं चालला.

जीर्णमन्यु पळून गेल्यानं आणि रुद्रभट मोकळा झाल्यानं हा कलह संपला. पण आतां शमधन एकटा सापडला असं पाहून अग्निवर्ण व रुद्रभट या दोघांनी मिळून शमधनावर ह्ला करावा की नाही ? पण ते कसचे करणार ! त्यांनी शमधनाचं बळ चांगलंच अनुभवलं होतं. म्हणून शमधन दूर गेला असं पाहून, त्याच्याकड वेडींवाकडीं तोंड करून व हातवारे करून, डोळे वटारून पाहून, मिशांना पीळ भरून, या शाक्यांच्या जोडीला आपलं समाधान करून घ्यावं लागलं.

शमधन दृष्टिआड झाल्यावर हे दोघे अग्निवर्णाच्या घरांत शिरले. पाहतात तों भवानी सचिन्त जागच्या जागीं बसली होती. आज तिला बौद्ध भिक्षूंचं दर्शन तर घडलंच, पण ही बोलाचाली आणि मारामारी पाहून ती भ्याली; आणि जवळच लहान मुलगा मुरारी बाहेरून येऊन बसला होता, त्यानं दारांत किंवा रस्त्यांत जाऊं नये म्हणून त्याला दडपून मांडीवर बसवून, ती उजव्या तळहातावर गाल टेकून नवरा घरांत सुखरूप परत येण्याची वाट पाहत होती. बौद्ध भिक्षु हे इतर कितीहि रीतींनं अप्रिय असले तरी ते उन्मत्त, दंगेखोर, अत्याचारी असे तरी नसतात, अशी कल्पना यांच्यासंबंधी लोकांत होतीच. यामुळं नवऱ्याच्या सुरक्षिततेबद्दल तिला फारशी काळजी वाटण्याचं कारण नव्हतं म्हणा; पण त्याच्याबरोबर रुद्रभटासारखा तामसी मनुष्य

असल्यामुळं वेळीं काय होईल, काय नाही, अशी काळजी तिला सहजच वाटत होती.

अग्निवर्ण व रुद्रभट घरांत परत आले, तेव्हा रुद्रभटानं आपलं तोंड पुनः सोडलं. त्यानं नव्या बौद्ध धर्माची सपाटून निंदा केली. त्यांच्या आचारावर शिव्याशापांचा वर्षाव केला. पण शेवटीं आपलाच दाम खोटा मग दुसऱ्याला बोल लावून काय उपयोग ! असल्या तत्त्वज्ञानाच्या समाधानावर तो येऊन ठेपला; आणि शाक्त लोक पूर्वीप्रमाणं देवीची उपासना मनापासून करीत नाहीत, यज्ञयाग करीत नाहीत, पशुवध फार थोडा करतात, आणि नरबलि देण्याला तर ते फारच मागं घेतात, अशी परोपरीनं शाक्तांच्या अनाचाराची त्यानं चिकित्सा केली; आणि जणूं कांही ईश्वरी स्फूर्ति व्हावी त्याप्रमाणं वर डोळे चढवून आणि हात उंच करून तो मोठ्यानं ओरडून म्हणाला--
" ठीक आहे. या रुद्रभटानं शाक्त धर्माच्या पुनःसंस्थापनेचं कंकणच आज हातीं बांधलं आहे असं समजा. कालीमाता प्रसन्न करण्याकरिता, ती आज्ञा करील ते सर्व उपाय मी करीन, ती मागेल ते बळी देईन आणि त्यानंहि ती प्रसन्न न झाली तर स्वतःचा बळी देण्यालाहि मी मागं पुढं पाहाणार नाही."

ही घोषणा ऐकून, भवानी एका दृष्टीनं आनंदित झाली खरी; पण तशीच घाबरलीहि. रुद्रभटाच्या ओरडण्यानं मुरारी दचकला. त्यानं भवानीच्या गळ्याला मिठी घातली. तेव्हा तिनं त्याला अधिकच उराशीं धरून पाठीवरून हात फिरविला व 'बाळ, भिऊं नको' असं ती त्याला म्हणाली.

अग्निवर्णाला वाटलं कीं, आजच्या या प्रसंगांत शाक्तांनाच थोडीशी हार खावी लागली तरी, बौद्ध भिक्षु भांडण करणारे नसून भांडण टाळणारे आहेत, म्हणून कदाचित् उद्यापासून या मार्गानं जाणार नाहींत. तेव्हा आपल्या बायकोची एक चिंता टळेल. पण तिचीं मुलं वांचत नाहीत तीं कशीं वांचावीं हा प्रश्न शिल्लकच होता. तोच फिरून भवानीच्या देखत अग्निवर्णानं काढला. तेव्हा रुद्रभट किंचित् डोळे मिटून, ध्यान केल्यासारखं दाखवून म्हणाला, " धर्मावर श्रद्धा ठेवणाऱ्या लोकांचं असं कोणतं संकट असतं, की त्याचा कालीमाता परिहार करूं शकणार नाही ? पण त्यासंबंधानं मी आता या वेळीं कांहीच बोलूं इच्छीत नाही. अग्निवर्णा, तुला ईश्वरानं मोठी धर्मशील पत्नी दिली आहे यांविषयी मीं काल तुला सांगितलंच. कदाचित् भवानी-बाईची परीक्षा कालीमातेला पाहावयाची होती ती पाहून झाली असेल.

म्हणून तिचं कल्याण यापुढं तरी व्हावं, अशी प्रेरणा माता मला, तुला किंवा तिला कां करणार नाही ? ”

इतकं बोलून आणि लाल भंडाऱ्याचा पेला कोनाड्यांत होता त्यांतून थोडा घेऊन 'जय कालीमाते' असं म्हणून कपाळाला लावूनच तो बाहेर पडला.

रुद्रभट आज सकाळीं अग्निवर्णाच्या घरीं आला तेव्हा त्याला दुरून पाहून नीला कडेवर असलेल्या मुरारीला घेऊन चटकन आंत निघून गेली होती. रुद्रभट व अग्निवर्ण हे बौद्ध भिक्षूंशीं भांडण्याकरिता घराबाहेर पडले तेव्हा ती मुरारीला घेऊन आली व तिनं मुलाला भवानीच्या स्वाधीन केला. पण भिक्षूंशीं भांडण करून रुद्रभट परत अग्निवर्णाबरोबर घरांत शिरतांना पाहून फिरून ती तोंडावरचा पदर चटकन पुढं ओढून घरांतील मागच्या बाजूला निघून गेली. दोनहि वेळां रुद्रभटाला पाहून ती दचकली, व त्याला न दिसण्याकरिता म्हणा किंवा त्याचं दर्शन टाळण्याकरिता म्हणा, कुशलतेनं निघून गेली खरी !

प्रकरण आठवें

मुरारीची गोष्ट

अग्निवर्णाच्या घरापुढं शाक्त आणि बौद्ध भिक्षु यांची बाचाबाची झाली ती त्या दिवसापुरतीच झाली. कारण शमधनानं आपलं सामर्थ्य दाखविल्यापासून रुद्रभट पुन्हा त्यांच्या वाटेला गेला नाही. मारामारीच करावयाची तर अग्निवर्णाच्या पदरीं लाठीयाळ नोकर पुष्कळ होते. पण त्या दिवशीची बाचाबाची झाल्याचा बराच बोभाटा नगरांत झाला; आणि राजरस्त्यानं जाणारे बौद्ध भिक्षु अप्रिय असले तरी त्यांना तिकडून जाण्याची मनाई करणं गैरशिस्त आहे अशी सल्ला अग्निवर्णाला त्याच्या मित्रांकडून मिळाली. शिवाय नगरच्या महाराजांचा ओढा दिवसेंदिवस बौद्धधर्माकड जात आहे यामुळं संघाच्या लोकांना गैरशिस्त हरकत किंवा इजा केल्यास ती करणारावर महाराजांचा राग होण्याचा संभव उघड होता. या सर्व कारणांनी त्या दिवसाचं प्रकरण तितकंच थांबलं. बौद्ध भिक्षु पुन्हा पूर्वीप्रमाणं अग्निवर्णाच्या दारावरून धर्मसाधन

करीत जाऊं लागले. फिरून भवानीचा कपाळशूळ त्यांना पाहून उठूं लागला व शक्तिपात होऊं लागला; आणि फिरून अग्निवर्ण तिच्या तोंडाकड पाहून उदास वृत्तीनं दिवस काढूं लागला.

रुद्रभट नगरांत आलेला पाहिल्यापासून नीलेनं आपला इतर स्वैरसंचार टाकून गुप्तपणानं ती त्याची पाळत ठेवून त्याच्या मागोमाग हिंडूं लागली. रुद्रभटाला अग्निवर्णाच्या घरीं पाहून तर तिला फार काळजी वाटूं लागली. शेवटीं बौद्ध भिक्षु व हे शाक्त पुढारी यांच्यांतील कलह पाहून, आणि बौद्ध धर्मविध्वंसाची रुद्रभटाची प्रतिज्ञा ऐकून, हा उत्पाती आता कुठं कुठं आगी लावणार याविषयी तिच्या मनांत धडकी भरली.

पुष्कळ वेळां एकदम रुद्रभटाला कुठं तरी गाठून त्याच्या पोटांत कट्यार खुपसून आपल्या सर्वनाशाचा सूड घ्यावा अशी इच्छा तिला होऊं लागली. परंतु ज्याचा सूड घ्यावयाचा निश्चय झाला, त्याचे चाळे व अपराध जितके अधिकाअधिक दृष्टीस पडतील तितकी सूडाच्या बुद्धीची तीव्रता वाढते; म्हणून ते पाहावे अशी सूड घेणाराला इच्छा होते आणि तो सूड घेण्याचं काम सूड घेणारा लांबणीवर टाकतो असा मानसशास्त्राचा नियमच आहे. नीलेचंहि तसंच झालं.

एक दिवस नीलेनं नंदेजवळ आपल्या मनचं भयंकर हितगुज मोकळ्या मनानं सांगितलं तेव्हा नंदामाई म्हणाली, “ बाळ, तूं रुद्रभटाचा वध करून त्याचा सूड घेतलास तर तें न्यायाचंच होईल; पण स्वतःच्या अपराधापेक्षा दुसऱ्या कुणाचा अक्षम्य अपराध त्यानं केला असं तुला दिसून आलं, आणि त्याकरता तूं त्याला देहान्त प्रायश्चित्त दिलंस, तर तुझं कृत्य निःस्वार्थी म्हणतील; आणि त्याच्या वधाचा तुझा दोष कमी होईल. तुला भ्रष्ट करणारा हा अधम माझ्या हातीं सापडला; तर मीहि त्याचा गळा दाबून प्राण घेण्याला कमी करणार नाही, मग तुझी गोष्ट कशाला ? पण प्रत्येक गोष्टींत खोल विचार हा असतोच.”

रुद्रभटासारख्या अधमाची छाया ज्या ज्या जीवनलतेवर पडेल ती ती करपून गेल्याशिवाय राहणार नाही अशा खात्रीनं नीला, स्वतःच्या प्राणाप्रमाणं प्रिय असणाऱ्या भवानीच्या घरीं, अधिकाधिक जाऊं लागली; आणि आवडता मुरारी तर रुद्रभटाच्या दृष्टीसहि पडूं नये अशी सावधगिरी ठेवण्याची इच्छा तिला मनांतून अधिकाधिक होऊं लागली. नीला वरचवर घरीं येऊं

लागली या गोष्टीमुळं भवानीला बरंच वाटूं लागलं; आणि मुरारीला तर काय नीला आलेली पाहून आनंदाचं आणि खेळकरपणाचं जसं कांही भरतंच येई.

आज नीला घरीं आली असं पाहतांच मुरारी तिच्याकड धावत गेला. त्यानं तिला दोन्ही हातांनी धरून घरांत नेली आणि भवानीजवळ बसविली. नीलेची हनुवटी धरून तो म्हणाला, "ए दाई, आई, आज तुम्ही मला गोष्ट सांगितली पाहिजे छानदारशी."

भवानीचं मन व्यग्र होतं. तिला गोष्ट कुठून सुचणार? तिनं गावांत चाललेल्या बौद्ध अन् शाक्त यांच्या कलहाच्या गोष्टीच नीलेपाशी काढल्या. ती धर्मनिष्ठ पण तशीच मृदु स्वभावाची असल्यामुळं तिला देखील भांडणं अन् या मारामाऱ्या अप्रिय होत्या. पण स्वकीयांचा पक्षपात सर्वांनाच असतो. म्हणून भवानी कलहाचा सगळा दोष बौद्ध भिक्षूंकड देऊन रुद्रभटाच्या धर्मरक्षणाच्या उत्साहाची स्तुति करूं लागली. तेव्हा नीला मनांतून बिथरली. तिचं तोंड गोरंमोरं झालं. ती म्हणाली, "आग लागो त्या धर्मरक्षणाला! भवानी, तुझ्या घरांत साप शिरला आहे; त्याची काळजी तूं आधीं घे. धर्मरक्षण राहूं दे बाजूला."

भवानीला याचा अर्थ कळेना. तेव्हा नीलेनं तिला तो अधिक स्पष्ट करून सांगितला. ती म्हणाली, "भवानी, काय सांगूं तुला? या रुद्रभटाचं पाऊल तुझ्या घरांत पडलेलं पाहून मनानं माझा थरकाप झाला आहे."

"हें काय? त्याला गावच्या शाक्त लोकांनी मुख्य देवस्थानचा अधिकारी नेमला आहे इकडच्यांच्याबरोबर! आपल्या धर्मपंथाची घडी बिघडली आहे ती तो आपल्या पुण्याईच्या—तपःसामर्थ्याच्या बळावर पुन्हा नीट बसविणार अशी सगळ्यांची खात्री झाली आहे. माझ्या दुःखाचा परिहार करण्याची चिंता त्याला कां वाटावी? पण त्याकरिताहि तो धर्मग्रंथ चाळीत असतो. अन् लवकरच तो त्याचा कांही तरी उपाय शोधून काढून त्यांना अन् मला सांगणार आहे असं परवा मला त्यांनी सांगून माझं समाधान केलं. असं असून तूं म्हणतेस की, त्याचं पाऊल या घरांत पडलेल पाहून तुझ्या मनाचा थरकाप झाला. आश्चर्यच म्हणायचं!"

नीला म्हणाली, "बाई, सापाचं विष ज्याला माहीत नाही त्याला साप असाच मोहक वाटतो. त्याची कांती किती सतेज! त्याचा रंग किती सुंदर! वळणावळणानं सरपटतांना तो किती विवेकी विनयी दिसतो! पण त्याच्या

जवळ जाईल त्याचं मरण वाढून ठेवलेलं असतं. तुझ्या घरांत पायरव सुरू करणाऱ्या या दुष्टाला तुम्हीं नवराबायकोंनी थारा दिलात तर तुमचा सर्वनाश जवळ आला असं समजा."

"वा ग!" भवानी म्हणाली, "तूं तर रुद्रभटांची पुरी खाजगी माहिती असल्यासारखीच बोलतेस! मग सांग तरी काय आहे ती, म्हणजे कळेल. तुझ्या वेडाच्या लहरींची संक्रान्त आज या बिचाऱ्या धर्मगुरूवर वळलेली दिसते!"

"धर्मगुरु! खराच धर्मगुरु!" हें शब्द उच्चारतांना नीलेनं तीव्र तिरस्कार-दर्शक हास्य केलं आणि म्हणाली, "तो देव आणि ती देवी यांनी डोळे मिटले असले पाहिजेत अशा चांडाळाकडन धर्माची सेवा घ्यायला! भवानी, तुला या रुद्रभटाचं चरित्र कळायला पाहिजे होय? आहे माहीत मला तें सारं. सांगेन तुला स्वस्थपणं केव्हा तरी. अन् तुलाहि त्याचा अनुभव आल्याशिवाय राहायचा नाही लवकरच. तुमचं नशीबच जर ओढवलं असलं, तर माझ्या बोलण्यावर तुझा विश्वास तरी कसा बसावा?"

"अग, तसं नव्हे ग," भवानी किंचित् नमतं घेऊन म्हणाली. "पण अनुभवाशिवाय माणसानं काय कसं समजावं?"

"अनुभव!–सांगूंच का अनुभव?" असं म्हणून नीला पुढं हा विषय बोलूं लागणार तों इतक्यांत मुरारी अगदीं वर्दळीवर आला. गोष्ट सांग म्हटलं तें आपलं म्हणणं नीला मनावर न घेतां भलतंच बोलणं काढते असं पाहून त्याला राग आला. तो नीला आणि भवानी दोघींच्याहि पाठींत आपल्या चिमुकल्या हातानं धपाटे घालूं लागला आणि लटकं तक्रारखोर रडणंहि त्यानं उकरून काढलं. 'मला गोष्ट सांग, मला गोष्ट सांग' असा टाहो फोडण्याला त्यानं प्रारंभ केला.

आपला आणि नीलेचा वाद संपविण्याला भवानीला ही संधि आयती बरी वाटली. प्रेमाचीं माणसं आपापसांतला अप्रिय वाद वाढून विकोपाला जाऊं नये अशीच सावधगिरी ठेवीत असतात. म्हणून भवानी म्हणाली, "वेडे, सांगून टाक ना त्याला गोष्ट. एरवी तो तुला मला क्षणभर चैन पडूं देणार नाही."

भवानीनं आपलं म्हणणं उचलून धरलं हें पाहून मुरारीला हर्ष झाला. गोष्ट तर ऐकायला मिळणारच पण ती ऐकतांना कुणाच्या मांडीवर बसावं या विचारानं तो गोंधळून गेला.

शेवटीं त्या दोघी मांडीला मांडी लावून बसल्या आहेत असं पाहून तो दोघींच्या मांडीवर मिळून बसला. त्यानं एक हात नीलेच्या गळ्याभोवती, दुसरा भवानीच्या गळ्याभोवती घातला आणि अरतूनपरतून आपला एक गाल एकीच्या अन दुसरा दुसरीच्या गालाला लावून. पुढं गोष्ट ऐकवणार त्याचं बक्षीस म्हणून त्यानं आगाऊच दोघींना एक एक गोड मुका दिला.

भवानी म्हणाली, "बरं झालं, त्याच्या निमित्तानं मलाहि तुझ्या तोंडची गोष्ट ऐकायला मिळेल."

"पण आज मी त्याला सांगणार ती गोष्ट तुला माहीतच आहे म्हणा." असं नीला म्हणाली, पण तिनं एखादी अद्‌भुत कहाणी सांगण्याच्या तयारीचा बहाणा केला. ती म्हणाली, ऐक हां बाळा, नीट ऐक. मधे बोलायचं नाही मुळीच. अन् मला मधून मधून हं हं म्हटलं पाहिजे. नाही तर गोष्ट थांबवीन.'

मुरारीनं तहाच्या सर्व अटी मान्य केल्या. जसा कांही आपमतलबी मानभावी साळसूद परराष्ट्रीय वकीलच तह करायला बसला आहे.

पण प्रथम थोडी कुचेष्टा करावीसं मनांत आलं म्हणून नीलाहि, तह करणाऱ्या वकिलानं तह मोडावयाच्या हेतूनें भलती फिरकोळ गोष्ट नसतं महत्त्व देऊन पुढं मांडावी त्या थाटानं म्हणाली—

"पण मी नाही जा तुला गोष्ट सांगत. तूं मला नेहमी दाई कां म्हणतोस?"

"तर मग काय म्हणूं तुला?"

"मला आई म्हटलं पाहिजे तर गोष्ट सांगेन."

"वाहवा ग! मुलाला कुठं दोन दोन आया असतात वाटतं? तुला आई म्हटलं तर मग आईला काय म्हणूं?" असं म्हणून त्यानं भवानीला लडिवाळपणानं वेंग मारली.

"तिलाच वाटलं तर दाई म्हण; पण मला आई म्हटलं पाहिजे."

"बरं तर तूं आणि आई पलीकडच्या अंधारांत जा अन् हातावर हात घालून, चकून नांव बदलून या. म्हणजे मग तुला आई म्हणेन आणि आईला दाई म्हणेन. पण असं ग काय करतेस, सांग ना गोष्ट मला!"

"बरं बाळ, तुला कसली गोष्ट आवडते?"

"मला होय. मला छान छान गोष्ट आवडते; आणि खरीहि आवडते. खरी सांगेन म्हणालीस अं! खरी सांग."

" बरं सांगतें हं. एका लहान मुलाची ?"

" अगदी माझ्याएवढ्या लहान मुलाची ना ?"

" काय पाहा ! तुझ्याएवढया लहान मुलाची गोष्ट सांगितली म्हणजे तो जसा कांही तुझ्याबरोबर आता इथं खेळायलाच येणार आहे ! बरं, माझं काय जातं ? अगदी तुझ्याएवढया मुलाची गोष्ट सांगेन, आणि खरी. अगदी तुझीच म्हणेनास घटकाभर."

हें ऐकून मुरारी टाळयाच पिटूं लागला आणि बसला होता तो उभा राहून म्हणाला, " माझीच गोष्ट मला सांगणार ! कशी पण मौज आहे "!

नीला म्हणाली, " ऐक तर. आजचा योग मोठा चांगला दिसतो. सांगतें हं तुझी गोष्ट."

" अगदी आपल्याच गावासारखं एक मोठं गाव होतं."

" अगदी मोठं आपल्या घराएवढं ?"

" बरं. आपल्या घराएवढं. एवढंच नव्हे तर, इथून लांब दिसतात ना तुला, त्या सगळया घराएवढं. त्या गावांत की नाही एक मोठा माणूस राहात होता.

" मोठा म्हणजे किती उंच ? आपल्या माडीइतका ?"

"मोठा माणूस म्हणजे आपल्या माडीइतका उंच असं नव्हे. त्याचं घर खूप मोठं होतं असा. त्याला की नाही एक लहान मुलगा होता. अगदी तुझ्यासारखा छान छान ! एक दिवस काय झालं; वारा सुटला, ढग आले, अंधार झाला, विजा चमकूं लागल्या ! आभाळ गडगडूं लागलं आणि धो धो पाऊस आला."

पावसाचं नांव ऐकतांच मुरारीचं लक्ष गोष्टीकडून क्षणभर निघून, तो टाळ्या पिटून म्हणूं लागला, ' ये रे ये रे पावसा तुला देतो पैसा, पैसा झाला खोटा, पाऊस आला मोठा.'

" काय पण वेडा मुलगा ! पाऊस यायला पैसा नको होता तेव्हा द्यायला; तर पाऊस थांबायला ! बरं. असा असा पाऊस पडला की कांही केल्या थांबेचना."

" कसा कसा पडला ? अगदी चिमणीचं घरसुद्धा वाहून जाण्याइतका ?"

" अरे, चिमणीचंच काय पण आपल्या घरासारखीं मोठीं घरंहि वाहून जाण्या सारखा. मग त्या गावांत नदी फुटून जिकड तिकड पाणीच पाणी होऊन गेलं बघ."

" मग मुलांनी त्यांत छान छान कागदांच्या नावा खेळवल्या असतील नाही ग ? "

" वेडा कुठचा ! अरे, कागदाच्याच काय पण मोठमोठ्या लाकडाच्या खऱ्या-खुऱ्या नावा इथून तिथून खेळूं लागल्या. मोठ्या मोठ्या घरांतनं पाणी झालं. लहान-सहान घरं वाहून जाऊं लागलीं."

" आणि वाहून जाऊन मग परत आलीं ना ग ? "

"अगदी खुळा रे खुळा ! पुरांत घरं वाहून गेलीं म्हणजे परत येत नसतात."

" आणि त्या माझ्याएवढ्या मुलाचंसुद्धा घर वाहून गेलं ? "

" होय रे बाळ ! त्या मुलाचं सगळं घर कांही वाहून गेलं नाही; पण बागेशेजारच्या खोलींत त्याची आई त्या मुलाला पाळण्यांत घालून ओव्या म्हणत होती. इतक्यांत खोलीची बागेकडची भिंत कोसळली. नदीच्या पुराचा लोंढा आंत आला आणि त्याबरोबर ती आई, तो पाळणा, आणि तें मूल सगळीं वाहून गेलीं ! थोडा वेळ बरोबर वाहिल्यावर ती आई एकीकड झाली आणि पाळणा दुसरीकड होऊन वाहूं लागला. शेवटीं आई पुराबरोबर वाहून गेलीच. मात्र तो पाळणा आणि त्या पाळण्यांतलं मूल अशीं वाहात वाहात लांब पलीकडच्या गावाजवळ एका झाडाला टांगून राहिलीं."

" मग त्या पाळण्यांतल्या मुलाला कोण ओव्या म्हणत होतं बरं ? "

" मग त्या बिचाऱ्याला ओव्या कोण म्हणणार ? रात्रभर तें मूल नदीच्या कांठाला थंडीवाऱ्यांत कुडकुडत राहिलं."

मुरारीनं थोडं रागानं विचारलं, " मग थंडी होती तर त्याला त्याच्या आईनं कुशींत कां ग घेतलं नाही ? पांघरूण कां ग घातलं नाही ? "

" अगदी वेडा आहेस तूं. आई वाहून गेली आणि मेली सुद्धा. "

" मेली म्हणजे काय ग ? "

" मेली म्हणजे मुलाला सोडून वर देवबाप्पाकड गेली."

" मग ती नाही का खाली येऊन आपल्या मुलाला पुन्हा भेटायची ? "

" फिरून तेंच. अरे देवबाप्पाकड, माणसं गेलीं म्हणजे परत आपल्याकड येत नाहीत. बरं, पुढं तर ऐक गोष्ट. दुसरे दिवशीं एका कोळ्याला..."

" भिंतीवरच्या कोळ्याला ? "

" नव्हे, नदींत जाळीं टाकून मासे धरतात ना त्या कोळ्याला—तें मूल सांपडलं. त्यानं तें या गावांत आणलं. मूठभर रुपये घेऊन त्यानं तें मला विकत दिलं आणि तें मग मी तुझ्या आईला दिलं."

" मग तूं त्या मुलाची पहिली आई झालीस ना ग ? "

" होय बाळ. पण तें मूल मला आई म्हणेना. माझ्यासारखीच तुझ्या आईची त्याच्यावर माया बसली आणि मग तीच त्याला आपला मुलगा म्हणूं लागली, आणि भरवूं लागली, आणि निजायला कुशींत घेऊं लागली."

" मग तुला काय मिळालं ? तूं तिच्याबरोबर भांडून मुलाला कां नाहीं घेतलंस, आई होतीस तर ? "

" देवानं माझी कुठं अशी स्थिति ठेवली होती की मी त्या मुलाला आपल्या जवळ ठेवून कौतुक करावं ! त्याचा संभाळ करावा, मला घर नाहींसं झालं, माझं होतं तरी ! मला पदरीं पैसा नाहीसा झाला, घरीं होता तरी ! मीच अनाथ झालें. मग मी दुसऱ्या अनाथाचं कसं रक्षण करूं ? म्हणून तें मूल मीं तुझ्या आईला दिलं."

" आणि मग तूं काय केलंस ? त्या मुलाला सोडून गेलीस, त्या मुलाला विकून ? "

" मीं त्याला विकलं की काय केलं, हें तुला कसं कळेल ? तें देवालाच माहीत. होय; पण मीं त्याला विकलंच खरं. कारण मी त्याच्या आईकडून असं मागून घेतलं की, मला तिनं आपल्या घरीं ठेवून घ्यावं, थारा द्यावा आणि तूं मोठा होईपर्यंत मी दाई म्हणून तुझंच कामधाम करावं. मी त्याला दिवसा खेळवतें म्हणून मी त्याची दाई झालें आणि तुझी आई त्याला रात्रीं जवळ कुशींत घेऊन निजूं लागली, म्हणून ती त्याची आई झाली."

" मग तूं तिच्याशीं भांडून, त्याला कां नाहीं घेतलंस ? "

हें प्रेमळपणाचं संभाषण चालू असतां प्रथम नव्हे, पण पुढं पुढं भवानी व नीला दोघींहि गहिंवरल्या. त्यांच्या डोळ्यांतून पाणी वाहूं लागलं. भवानी तर डोळ्यांना पदर लावून रडत गप्पच बसली. तिच्या तोंडून शब्द निघत नव्हता. नीलेचीहि अवस्था जवळ जवळ अशीच झाली. पण तिला गोष्ट पुरी करणं होतं म्हणून थांबून थांबून, रडं आवरून, एक एक शब्द पुनः पुन्हा उच्चारून तिनं ती गोष्ट कशी तरी एकदाची पुरी केली.

मग मुरारी म्हणाला, "दाई! आईचं तें छान छान मूल दाखवशील का ग?"

"दाखवीन. पण तूं त्याला ओळखशील का?"

"हो. दाखव म्हणजे ओळखीन."

"हें बघ तर, तें मूल कसं दिसतं तें!" असं म्हणून नीलेनं मुरारीला चटदिशी उचलून, भिंतीला टांगलेल्या मोठ्या आरशांत त्याचं प्रतिबिंब दाखवलं. तेव्हा मुरारी तक्रार करून म्हणाला, "हें ग काय दाई, अशी थट्टा करतेस माझी? तूं मला त्या मुलाची गोष्ट सांगणार होतीस ना? तो कुठं आहे? आरशांत मी आहें आणि तूं आहेस."

"मग त्याची गोष्ट तीच तुझी गोष्ट आणि तीच तुला मीं सांगितली. तूंच त्या गोष्टींतला मुलगा."

"मग मला नाहीं ग आठवत मी नदींत वाहून गेलों तें?"

"हा वेड्या, तुला तें कसं आठवेल? तेव्हा तूं पाळण्यांत होतास, आता मोठा झालास."

तें ऐकून मुरारी रागावला आणि म्हणाला, "खोटी खोटी गोष्ट तूं मला सांगतेस का खरी म्हणून? थांब, आईला सांगतों आणि तुला मार देतों."

"ठीक. सांग आईला. जवळच बसली आहे. पण आईच कशाला मला मार द्यायला? तूंच का तो देईनास? तुझा मार की नाही मला गोड लागतो."

मुरारीला आरशापुढं धरून तोच तूं असं नीलेनं सांगितल्यापासून त्या दोघींच्या मनाला किंचित् वेगळं वळण लागलं. त्यांचं रडणं थांबून त्यांना थोडं हसूंहि आलं. मग भवानी नीलेला म्हणाली, "एवढ्याकरिता का म्हणालीस गोष्ट ऐकायला बसा म्हणून? मला रडवून तुला काय मिळालं? तो तुला आई म्हणत नाही, दाई म्हणतो, त्याला मी काय करूं? बोलायला प्रथम लागण्याच्या वेळीं मुलं ज्याचें नांव जें ऐकतात, तें त्याला म्हणूं लागतात. तूंच नाही का त्याला मला आई म्हणायला शिकवलंस? ती तुझी चूक; आणि त्याच्यादेखतां मी तुला दाई म्हणत होतें ही माझी चूक. पण माझ्या गळ्याचीच तुला शपथ आहे, पुन्हा हा दाई–आईचा वाद उकरून काढशील तर. तूं त्या कोळ्याकडून त्याला विकत घेतला नसतास, तर तो मला कसा मिळाला असता? आणि मी त्याला घेतला नसता तर तूं माझ्या घरीं कशी येऊन राहिली असतीस? तेव्हा त्याची खरी आई तूंच. कारण त्याला तुझेच हात पहिल्यांदा लागले; आणि

अजून झालं तरी काय त्याचा बहुतेक सगळा वेळ तुझ्या मांडीवरच जातो ना? माझ्या घरीं आहेस ती त्याची आईच म्हणून आहेस असं मी समजतें आणि तूंहि समज. उद्यापासून बाळानं दाई म्हणून हाक मारली म्हणजे त्याला मी 'ओ' देत जाईन; आणि त्यानं आई म्हणून हाक मारली म्हणजे तूं 'ओ' देत जा. म्हणजे झालं ना? आणि फिरून जर, गोष्ट सांगतांना म्हणालीस, तसं त्याला केव्हा म्हणालीस, की माझ्या घरीं तूं कामाला राहिली आहेस तर मात्र घालवून देईन, संभाळ! मुरारी हा जसा माझा, तशीच आणि तितकीच तूंहि पण माझी आहेस. एका नांवाच्या हाकेला कोणी दोघांनी 'ओ' दिली म्हणजे गोंधळ होतो म्हणूनच तूं दाई आणि मी आई. एरवी सांग बरं ईश्वराला स्मरून, तुझ्या-माझ्या आणि त्याच्या प्रेमांत कांही तरी केसाइतकीहि जागा आहे का? नीले, ईश्वराची करणी कशी असते ती पाहा! दोन स्त्रियांच्या पोटीं एकच मुलगा कधी येऊं शकतो का? पण आम्हां दोघींच्या-हि पोटीं मुरारी आला नसतां, दोघींनाहि तो अगदी आपल्या पोटच्या मुला-सारखा वाटतोच की नाही?"

गोष्ट सांगून होतांच मुरारी 'इटकुली मिटकुली चिटकुली गोष्ट' असं म्हणून उठून टाळ्या वाजवीत दुसरीकडे खेळायला निघून गेला. लहान मुलांची आणि फुलपाखरांची जात एकच. फुलपाखरू एखाद्या फुलाभोंवती घिरट्या घालूं लागलं की पाहणाराला वाटतं याचा सर्व जीव या फुलावरच आहे. पण क्षणा-र्धांत तें उठून आपले गोजिरवाणे रंगीबेरंगी पंख फडफडवीत दुसरीकडे निघून गेलं म्हणजे मग फुलपाखराच्या 'निष्ठावंत' पणाची खरी कल्पना येते!

मुरारी निघून जातांच भवानी नीलेला म्हणाली, "काय ग वेडे, आज मुरारीला ही त्याचीच गोष्ट सांगायची लहर तुला कां आली? ती पूर्वी त्याला कधी सांगितली होतीस का?"

"कधीच नाही. मलाहि नवल वाटलं की आज हीच गोष्ट मला कां सुचली? कदाचित् असं असेल की, रुद्रभटाची पायरव तुझ्या घराकडे चालू झाल्या-पासून मला मुरारीची चिंता वाटूं लागली आहे, पूर्वी कधी नव्हती इतकी."

"वेडी खरीच. मुरारीचा अन् रुद्रभटाचा काय संबंध?"

"संबंध वाईट दृष्टीचा. कांही माणसांची दृष्टि अशीच वाईट असते. तिला चांगलं असं कांहीच पाहवत नाही. ती झाडावर पडली तर झाड जळतं. गुरावर पडली तर गुरू मरतं, भांड्यावर पडली तर भांडं फुटतं, अन्नाचं विष होतं. तीच

माणसाची गोष्ट. तूं ऐक माझं. आज संध्याकाळीं मीठ-मिरच्या घेऊन त्याची दृष्ट काढ आणि खरोखरच 'इडा पिडा टळो अमंगळ पळो' असं म्हण."

"काढीन की दृष्ट, तुला बरं वाटत असेल तर. त्यांत काय एवढं? बरं, पण आज तूं इथंच राहीनास? माझ्या मनाला काय झालं कुणास ठाऊक, पण हुरहुर लागून राहिली आहे खरी."

नीला म्हणाली, "कसं अगदी माझ्या मनचंच बोललीस. आजच कां? उद्या-परवांच कां? राहीनं इथंच, नेहमी तुझ्या अन् माझ्या मनाची हुरहुर जाईपर्यंत. तिकड नंदेच्या गौळवाड्यांत तरी माझं काय ठेवलं आहे? म्हातारीला भेटावंसं वाटलं तर फेरी मारून येत जाईन मधून मधून एखादी."

प्रकरण नववें

भवानीवरील संकट

यानंतर कांहीं दिवसांनी अग्निवर्ण व्यापारी मालाच्या खरेदीला वाराणसीला गेला. अग्निवर्णाच्या घरीं देवतापूजन जोरांत सुरू होतं. अशा वेळीं भवानी मुरारीला घेऊन एके दिवशीं संध्याकाळीं सचिंत बसली होती. तिचा पांचवा मुलगा चार महिन्यांचा होऊन मरण पावल्याला फार थोडे दिवस झाले होते आणि अशा संकटांचा परिहार होण्याचा उपाय कोणीच कांहीं तिला सांगेना. तेव्हा तिला काय करावं हें सुचेनासं झालं होतं. उद्या अष्टमी आणि शुक्रवार, यामुळं घरीं देवतापूजेचं विशेष आन्हिक कसं काय करावयाचं हें सांगून ती विश्रांति घेत स्वस्थ बसली होती. पण ती आपल्याशीं पुष्कळसं बोलत नाही असं पाहून मुरारी इकडून तिकडून तिला हसविण्याचा, बोलविण्याचा प्रयत्न करीत होता. शेवटीं तिची हनुवटी धरून तो तिला म्हणाला, "आई, ए आई, तूं आज अशी ग काय करतेस? हसत नाहीस, बोलत नाहीस, माझ्याशीं खेळत नाहीस, गोष्टी सांगत नाहीस? तूं का रागावलीस होय माझ्यावर?" तेव्हा भवानीला त्याच्याशीं बोलणं भाग पडलं. ती म्हणाली, "नाही रे बाळ, नाही, मी तुझ्यावर रागावले नाही, रुसलें नाही कांहीं नाही. तूं काय केलं आहेस मी तुझ्यावर रुसायला-रागवायला?"

" माझ्यावर नसलीस तर दुसऱ्या कोणावर रागावली असशील. होय ना? आई, सांग तुला कोणी काय केलं तें?"

" तुला तें सांगून काय कळणार? तूं आपला खेळ जा बाहेर. माझं की नाही आज फार डोकं दुखतं आहे; म्हणून मी बसलें आहें उगीच. जा बाहेर हं, बघ काय मौज आली आहे दारांत ती आपली; आणि कांही मौज आली असली तर मला येऊन सांग! सांगशील ना?"

" हो सांगेन, पण मी फार वेळ जावयाचा नाही हो बाहेर. तुझं डोकं दुखायचं तूं अगदी लवकर थांबवायला पाहिजेस मी बाहेरून मौज पाहून आलें म्हणजे तुला नाहीं सोडायचा, सांगून ठेवतों."

मुरारी बाहेर गेल्यावर ती एकटीच विचार करीत बसली. आदल्याच दिवशीं तिच्या दुःखावर डाग देण्यासारखा प्रकार घडला होता. एक जटाधारी बैरागी घरीं भिक्षा मागायला आला, तो अगदी सनातनी होता, म्हणून भवानी स्वतःच त्याला भिक्षा वाढायला पुढं गेली. तों तो बैरागी भवानीच्या तोंडा-कड पाहून आपल्या तोंडांतल्या तोंडांत कांही पुटपुटला. कांहीं वेळ त्यानं भवानीच्या तोंडाकड असं कांही टक लावून पाहिलं, की जणूं कांहीं तो तिच्या कपाळावरच्या रेघाच वाचीत आहे व त्याला त्या वाचतांहि येत आहेत! 'भिक्षा घ्या' म्हणतांच त्यानं झोळी मागं केली आणि तो म्हणाला, " माई, माई, तुझ्या हातची भिक्षा! घेऊं तरी कसा व न घेऊं तरी कसा? ती पवित्र आहे पण अपवित्रहि आहे."

'महाराज, असं कां बरं म्हणतां?' असा प्रश्न तिनं केला तेव्हा तो म्हणाला, " याचा मला थोडा विचार केला पाहिजे. पवित्र धर्मग्रंथ पुनः रात्रीं एक वेळ पाहून थोडं ध्यान करतों आणि उद्या पुनः याच वेळीं येईन तेव्हा तुझ्या प्रश्नाचं उत्तर देईन. आज मात्र तुझी भिक्षा घेतल्याशिवाय परत जावं लागतं याबद्दल क्षमा कर."

असं म्हणून तो चटदिशी घराबाहेर पडला. पण त्यानं 'उद्या पुनः येईन' असं आश्वासन दिलं होतं तें खोटं होणार नाही, आज तो फिरून येईल तेव्हा काही तरी स्पष्टीकरण होईल, या आशेनं आज ती त्या बैराग्याची वाट पाहातच बसली होती.

इतक्यांत मुरारी धावत धावत परत आला आणि कांही भीतीनं, कांहीं लडिवाळपणानं तिच्या गळ्याला विळखा घालून स्वर हलका हळू ओढून तो

म्हणाला, " ए आई, आई, बाहेर कसली गम्मत आली आहे बघ छान छान."

" कसली रे वेड्या गम्मत आली आहे? इतक्यांत तुला लवकर परत यायला कांही तरी कारण पाहिजे होतं, दुसरं काय? जा पुनः बाहेर, माझं डोकं दुखायचं अजून नीट थांबलं नाही. जा बाहेर."

" तसं नव्हे ग आई, खरोखर गंमत आली आहे. दाराशीं एक बुवा आला आहे, दाढीवाला अगदी! त्याच्या गळ्यांत रुद्राक्षाच्या माळाच किती तरी आहेत. मला वाटलं हा कुणी तरी फेरीवाला आला आहे रुद्राक्षांच्या माळा विकायला. म्हणून मी त्याला म्हटलं, मला देतोस का रुद्राक्षाच्या माळा विकत? तेव्हा तो म्हणाला 'वः-वः! तुला काय मुलाला रुद्राक्षाच्या माळा मागावयाला? मला त्या माळा प्राणापेक्षाहि अधिक आवडतात. मी तुला माझे रुद्राक्ष दिले, तर तूं देशील का आपले प्राण मला?' मी म्हणालों, 'थांब, माझ्या आईला विचारून येतों हं!' पण तो किनई थांबला नाही, माझ्या मागोमाग घरांत आला, म्हणून मी सांगायला आलों आंत धावत! बघ, बघ, आलाच तो बुवा!"

मुरारी इतकं बोलतो तों खरोखरच एक दाढीवाला बैरागी त्याच्या पाठोपाठ घरांत आला आणि थेट भवानी बसली होती तिकडे निघाला. तिला भेटायला कुठं जायचं हें त्याला चांगलंच माहीत असावं असं दिसलं. भवानीहि त्याचीच वाट पाहात बसली होती. तो दिसतांच ती त्याला लवून नमस्कार करून म्हणाली, " या महाराज, मी आपलीच वाट पाहात बसलें होतें."

बैरागी म्हणाला, " मी आज फिरून येईन असं काल म्हटलं त्यावर तुझा विश्वास होता तर!"

" कां नसेल, आपण मला खोटं आश्वासन कां द्याल? शिवाय आपण काल तसे भिक्षा न घेतां गेला ते पुनः यावे अशीच माझीहि इच्छा होती. ती आपण सफल कराल असं माझं मन मला सांगत होतं. आपणासारखे परोपकारी साधु भाविक मनुष्यांची कामना पूर्ण केल्याशिवाय कसे राहतील?"

" भवानी, कामना सफल होते ती ज्याच्या त्याच्या उद्योगानंच होते. पुढें काय होणार हें ईश्वर आमच्यासारख्यांना निमित्तमात्र करून वदवीत असतो, इतकंच."

"पण पुढं काय होणार हें आधी आपणांसारख्यांच्याकडून कळतं म्हणूनच ना माणसाची प्रवृत्ति तिकड वळते?"

"होय, भवानी, पण पुढं काय होणार हें कळलं तरी सर्वांचीच प्रवृत्ति तिकड होते असंच कांही म्हणतां येत नाही. मोक्षमार्ग दिसत असला तरी सर्वच कुठं त्या मार्गानं जातात? नदीपलीकडच्या बौद्ध विहारांत ते चांडाळ बोकाळत आहेतच की नाही! त्यांतले कांही सद्गुरु म्हणवतात, कांही सत्-शिष्य म्हणवतात आणि सगळेच इतरांना कुमार्गाला लावतात. सत्कर्म केलं तर स्वर्ग मिळूं शकतो, धर्मानं सांगितल्याप्रमाणं वागलं तर कामना सफल होतात, हें सर्व समजतं; आणि सत्कर्म कोणतं, धर्माचार कोणता हेंहि माणसाला माहीत असतं. पण ईश्वरी कृपा असल्याशिवाय मनुष्याचा पाय खऱ्या मार्गाकड उचलत नाही. भविष्य काय ज्याच्या त्याच्या कपाळावर लिहिलेलंच आहे आणि ईश्वरकृपेनं माझ्यासारख्या कांही लोकांना तें वाचतांहि येतं; पण तें प्रायः सांगून फुकट जातं. म्हणून कोणी भविष्य विचारलं, आणि पुढं काय होणार आणि काय करावं हें मला कळत असलं, तरी तें कोणाला सांगूं नये असंच मला वाटूं लागलं आहे दिवसेदिवस! ढळढळीत खडक पुढं दिसतो. मग त्याच्यावर बीं काय म्हणून पेरावं? आमच्यासारख्यांचं अतींद्रिय ज्ञान असं काय अगदी वाटेवर पडलं आहे की लोकांनी तें येतांजातां खुशाल लुटावं! आणि फिरून स्वतः कांही न करतां भविष्य सांगणाराला बट्टा लावावा!"

"लोकांचं असेल तें असो. पण आपण मला लोकांसारखी समजूं नका. मनांत असेल तें मला सांगाच. काल आपल्या मनांत मला कांही तरी सांगायाचं वरचेवर येत होतं. असं असतां तें आपण मुद्दाम ओठाबाहेर पडूं दिलं नाही, प्रयत्न कर करून आवरलं. आज असं करूं नका."

"भवानी, दुसऱ्याच्या मनांतले विचार ओळखण्याइतकी तूं चाणाक्ष आहेस, पण माझ्या मनांतलं तुला कळलं तरी त्याचा काय उपयोग?"

"महाराज, माझी परीक्षा तर पाहा. मी आपल्या विश्वासाला अपात्र ठरलें तर मग माझं कांहींच म्हणणं नाही. पण मी आपणापुढं आणलेली भिक्षा न घेतां काल तसेच कां गेला, मला एवढं तरी सांगाल काय? आपण भिक्षा न घेतल्यानं मी मेल्याहून मेल्यासारखी झालें. माझं दुःख मी काय सांगूं? पण कोणी माझ्या हातची भिक्षाहि घेऊं नये इतकी का मी पापी झालें?"

"भवानी, तुला पापी म्हणेल त्याची जीभच झडेल. पण आमच्या आश्रमाचे नेम फार कडक आहेत त्याला काय करावं? त्या नेमांपैकी एक नेम असा आहे की, निपुत्रिक स्त्रीच्या हातून आम्ही भिक्षा घेऊं नये. हें बोलायला देखील माझ्या जिवावर येतं, पण केवळ तूं विचारलंस म्हणून सांगितलं. आमचे नेम-धर्म आम्हीं न पाळले तर ते आम्हाला बाधतात. तसंच एरवी आमच्या तपः-सामर्थ्यानं आमच्या हातून इतरांचा जो उपयोग व्हावयाचा तोहि होत नाही. आम्हाला झाला तरी नेमधर्मांचा तोंड धरून बुक्क्यांचा मार कसा आहे तें पाहा! निपुत्रिक स्त्रीच्या हातची भिक्षा घेऊं नये हा जसा एक निर्बंध आमच्यावर आहे, तसाच हें भिक्षा न घेण्याचं कारण आम्ही त्या स्त्रीला सांगू नये असाहि आणखी एक निर्बंध आहे. आम्हा साधूंचं जिणं मोठं कठीण, तरवारीच्या धारेसारखं आहे. भवानी, त्या नेमनियमांना दया नाही, माया नाही. एरवी तूं निपुत्रिक म्हणून तुला आठवण करून दुःख द्यावयाचं, आणि निपुत्रिक म्हणून भिक्षा न घेतां निघून जावयाचं, हें दुःखावर डाग देण्यासारखंच नाही काय?"

हें ऐकून भवानी उभी होती ती कोसळूनच खाली पडली. ती म्हणाली—

"हाय! हाय! मी निपुत्रिक खरी. आपण म्हणतां तें खरं आहे. पण मी तरी काय करूं? मला एकामागून एक पांच मुलगे झाले, पण त्यांतला एकहि वांचूं नये असं माझ्या प्राक्तनांतच लिहिलं होतं त्याला मी काय करणार?"

"भवानी, तूं दुःख करूं नको. या गोष्टी आपल्या आधीन का कुठं असतात? तुझी सात्त्विक वृत्ति आणि तुझं धर्मप्रेम पाहून काल एक वेळ असंहि मनांत आलं की जिचं दुसऱ्या एखाद्या मुलावर का होईना, पोटच्या मुला-सारखं प्रेम आहे, तिला निपुत्रिक तरी कसं म्हणावं? घ्यावी तुझ्या हातची भिक्षा, करावं नियमांचं उल्लंघन–निदान त्यांच्या अर्थाची ओढाताण! असं वाटलं. पण तें केलं नाही तेंच बरोबर होतं. कारण आज आता तूंच निवाडा केलास आपल्या तोंडानं."

"तो कसा, महाराज?"

"तुला औरस संतति नाही, पण या कोमल गोड बालकावर तुझं मुला-सारखं प्रेम आहे हें तुला माहित असतां तूंच म्हणालीस ना 'मी निपुत्रिक खरी.' आपण म्हणतां तें खरं आहे." मग तूंच स्वतःला निपुत्रिक म्हटल्यावर

मी नियमांच्या अर्थांची ओढाताण करून तुला पुत्रवती म्हणून काय होणार ?"

"महाराज, निपुत्रिकांवर धर्माचा इतका कटाक्ष कां असावा ? आपण जी सवलत देण्याची मनांत आणली तीसुद्धा धर्म देऊं शकत नाही ना ? तो इतका निष्ठुर कसा ?"

"भवानी ! धर्म निष्ठुरच राहतो. कोणा व्यक्तीच्या सुखदुःखाकड पाहून तो आपलं मन मवाळ करीत नाही. म्हणूनच त्याचं तेज कांहीं तरी राहिलं आहे. धर्म हा स्वतः मनुष्य नाही म्हणूनच वांचला असं म्हण. तो माझ्यासारखा कोमल मनाचा मनुष्य असता तर पाहावयाला नको होतं."

"पण महाराज, धर्म हा निपुत्रिकांच्या दुःखाचं–अपमानाचं मूळच खणून काढण्याकरिता माझ्यासारख्या स्त्रियांना कांही साधन किंवा बिनचूक उपाय कां सांगत नाही ? मी धर्माला बोल लावतें असं नाही; पण महाराज, ज्या गोष्टी मनुष्याच्या हातीं नाहीत त्याकरिता धर्मानं मनुष्याला पतित काय म्हणून ठरवावं ? हाहि तोंड दाबून बुक्क्यांचा मारच नव्हे काय ? ईश्वरानं ठरवून दिल्या तशाच जर सर्व गोष्टी व्हावयाच्या असतील तर मग धर्माचं कारण तरी काय ? धर्माप्रमाणं वागून व न वागून तरी फरक काय पडणार ? मुळांत घडी बिघडली असली तरी, मनुष्याच्या प्रयत्नानं आणि धर्माच्या साहाय्यानं ती पुनः नीट बसवून घ्यावी असं मनुष्याला वाटणार नाही काय ? आणि ती तशी बसवून घेण्याकरिता धर्म सांगेल तें करीन अशी मनुष्याची उमेद असली तरी ती त्याची इच्छा फुकटच जावी हा न्याय कसा म्हणावा ? धर्म सांगेल तें मनुष्यानं न केलं तर दोष त्याचा खरा; पण तें करण्याला तो तयार असेल तर मग तो दोष कुणाचा ? महाराज, मनांत कढ आला म्हणूनच बोललें. त्यांत अतिप्रसंग नाही ना झाला ?"

"मुळीच नाही. भवानी, जगांतल्या सर्व स्त्रिया तुझ्याइतक्या शहाण्या आणि निश्चयी झाल्या तर धर्माला तरी कुठं नको आहे ? तुझंच उदाहरण आपण घेऊं. तुझा विवेक मोठा. धर्मानं तुझ्या जन्माची घडी नीट बसावी याकरिता तुला काय करावयाला सांगावं असं तुझं म्हणणं ?"

"मी पुत्रवती व्हावयाला, यापुढं तरी मला पुत्र होऊन ते जगायला, धर्मांत जो कांही आचार, जें कांही व्रत, जो कांही नेमधर्म, जें कांही दान, जो कांही यज्ञ सांगितला असेल तो आपण मला सांगावा."

" भवानी! होय, मी तें साधन सांगेन. पण जें साधन सांगेन तें असून नसल्यासारखंच आहे म्हणेनास! तें साधन इतकं कठीण आहे की तूं त्याचा विचार सोडून द्यावा हेंच बरं. भलत्याकरिता भलतं करूं नये. समज, माझ्यासारख्या एखाद्या विक्षित जोगड्यानं तुझ्या हातची भिक्षा घेतली नाही म्हणून तुझं एरवी कुठं अडलं आहे; आणि तें कां अडावं? आणि तूं त्याचं इतकं वाइट कां वाटून घ्यावंस? भिक्षा घालणं हा कांही धर्माचरणाचा एकच मार्ग नाही. परोपकाराचे इतरहि मार्ग धर्मानं दाखवून दिलेले आहेत. त्यांतलाच एखाद दुसरा स्वीकार. मी येतों आतां."

असं म्हणून बैरागी उठून दाराकड जाऊं लागला. हें पाहून भवानीहि उठली आणि तिनं त्याचे पाय घट्ट धरले. ते ती कांही केल्या सोडी ना! ती स्फुंदत म्हणाली—

" नाही, महाराज, मी आपले पाय सोडायची नाही. पुत्रप्राप्तीची आकांक्षा सफळ होण्याच्या सुखाचं द्वार किंचित् उघड करून आपण जो मार्ग मला दुरून दाखविला, त्याच्या कडेला नेऊन पोंचविण्याला आपणच समर्थ आहां. महाराज, पुत्रवती होण्याचं धर्मसाधन आपण मला सांगा. तें कितीहि दुर्घट असलं तरी मी पार पाडीन."

" तूं पार पाडशील हें मी खरं कशावरून समजूं?"

" मी आपल्या समक्ष शपथ घेतें. मग तरी झालं ना!"

बैरागी हसून म्हणाला, " छेः छेः छेः! भवानी, तूं शपथ घेण्याची अशी घाई करूं नको. ती पुढं पश्चात्तापाला कारण होते. हें पाहा, मी तुला एक विचारतों. 'हें सुंदर गोजिरवाणं बालक तुझ्यापुढं बसलं होतं त्याच्यावर तुझं प्रेम आहे ना?'

" होय महाराज. मुरारी माझ्या पोटीं आला नाही तरी अगदी पोटच्या पोराप्रमाणं माझं त्याच्यावर प्रेम आहे. आणि तोहि गुलाम माझ्यावर अगदी आईसारखीच माया करतो. पोर किती तरी लाघवी आहे म्हणून सांगूं! त्याची जनक आई त्याला आठवतहि नाही. म्हणून त्याची मी आई व माझा तो मुलगा या विचारांत द्वैत कसं तें येतच नाही."

" हा मुलगा तुझ्या पोटीं आला नाही; मग तो तुझ्या हातीं कसा आला?"

" आमच्या या भैरवपूरच्या नदीला एकदा महापूर येऊन अनर्थ गुदरला. त्यांत अनेक मुलं-माणसं वाहून गेलीं. त्यांत हाहि कोणाच्या तरी घरांतून वाहून

गेला. पूर ओसरल्यावर कांही कोसांवरच्या एका कोळ्यानं हा मुलगा शहरांत आणला. मला मुलांची फार हौस; म्हणून त्या कोळ्याला पैसे देऊन मी तो माझ्या सखीकडून विकत घेतला आणि आजपर्यंत ही गोष्ट कोणालाहि कळूं दिली नाही."

" आणि आजपर्यंत या मुलाकरिता तुझ्याकड कुणीहि मागणी केली नाही म्हणतेस ? "

" नाही. आपलं मूल तें हें असं कुणाला कळलं तर तो मागणी करणार ! "

" झालं तर ? भवानी हा मुलगा आता सर्वस्वी तुझाच झाला नव्हे काय ? तो फक्त तुझ्या पोटीं जन्माला आला नाही इतकंच काय तें."

" पण महाराज, तेवढ्यानंच किती बिघडलं ? येऊन जाऊन धर्माचाराची नेमधर्माची बाब ! तींत मनुष्याला सवलत देऊन, त्याला निपुत्रिक असं म्हटलं तर आपल्यासारख्या साधूंच कांही बिघडेल का ? असं आसतां मीं निपुत्रिक म्हणून आपण माझ्या हातची भिक्षासुद्धा घेत नाही. मग मी तर बोलून चालून अज्ञानी, मोहग्रस्त, मायेनं पछाडलेली स्त्री! माझ्या मनाचं समाधान कसं होईल ? मुरारी हा माझ्या पोटीं जन्माला याव म्हणून, मला आपलं पोट चिरून तो पोटांत घेतां आला तरी घेईन, पण तें कसं घडणार ! आणि माझी कूस वांझोटी या विचाराचं माझं दुःख कसं शमणार ? मुरारीवर माझं इतकं प्रेम आहे की, मला औरस मुलगा असतां आणि याचं त्याचं भांडण झालं असतं तर औरस मुलाला बाजूला सारून मी याला जवळ केला असता. पण इतकं प्रेम असूनहि त्याच्यामुळं माझ्या कुशीची आग शमत नाही. मुलं झालीं आणि तीं मेलीं म्हणजे न झालीं असंच वाटतं. आम्ही स्त्रिया वेड्या म्हणा, मूर्ख म्हणा, पण पुत्रसंतानाचं आमचं वेड ईश्वरालाहि दाद देणार नाही. ईश्वर आमच्या-पुढं उभा राहून त्यानं आपल्या हातानं आम्हाला मोक्ष देऊं केला तरी आम्ही त्याला म्हणूं 'देवा, पोटीं पुत्रसंतान होऊं दे व तें जगूंवाचूं दे. आधी पुत्रमुख न्याहाळूं आणि मग मोक्षाकड पाहूं.' महाराज, पुत्रसुख हाच स्त्रियांचा मोक्ष!"

" शाबास! भवानी, पुत्रप्रेमाची तूं जागती ज्योत आहेस. आम्हा पुरुषांना प्रेमाची कल्पना करतां येत नाही, असं नाही. पण आमचं पुत्रप्रेम आणि स्त्रियांचं पुत्रप्रेम यांत जमीनअस्मानाचं अंतर असतं. पण तें कसंहि असलं तरी, भवानी, तूं शहाणी आहेस, तूं मुलगे जगून पुत्रवती होण्याची इच्छा सोडून दे."

" कां बरं ? "

" कारण मी जें साधन तुला सांगेन तें तुझ्या हातून होणार नाही."

" महाराज, सांगा, जें काय साधन असेल तें सांगा. आपला उपदेश मी फुकट घालविणार नाही."

" भवानी, माझा उपदेश फुकट गेल्याचं मला दुःख नाही, पण तें साधन न झाल्यानं तुला मात्र निराशेचं दुःख अनिवार होईल याची मला फार भीति वाटते."

" नाही महाराज, जें काय तें साधन सांगाच, मी आपल्या पाया पडतें."

" ठीक आहे. तुझा निश्चयच असेल तर सांगतों ऐक. भवानी, तुला हें माहीतच आहे ना की, या अखिल विश्वांत सगळा व्यवहार देण्या-घेण्याचाच आहे ! मनुष्याविषयी तर बोलावयालाच नको. पण भूमि ही तरी सर्व भूतमात्राची जननीच ना ? ती त्यांच्याशीं मातेप्रमाणं वागते. पण भूमि झाली तरी काय झालं ? तींत धान्य पेरावं, तिला बीजदान करावं, तेव्हाच ती धान्य देते. बीजाचं बलिदान झाल्याशिवाय गवताची काडीहि उगवत नाही. आणि देवादिकांची तर यज्ञाशिवाय कशानंच तृप्ति होत नाही, हें तूं ऐकलं असशीलच."

" होय महाराज. ऐकलं आहे. मग सांगा देवांच्या समाधानाकरिता मी कोणता यज्ञ करूं ? "

हें सर्व बोलणं चाललं असतांना मुरारी तें लक्ष लावून ऐकत होता. त्यांतलं त्याला कांही कळत होतं असं नव्हे; पण दाढीवाला बुवा जवळ असतां उठून आईजवळून निघून जावं इतकं धैर्य त्याला होईना. बरं, मुलाचा स्वभाव. फार वेळ बोलल्याशिवाय त्याच्या हातून गप्पहि बसवेना. इतक्या वेळच्या परिचयानं स्वतः एखादा शब्द मधे बोलण्याइतका धीट मात्र तो झाला. तो म्हणाला—

" अहो बुवा, माझ्या आईचं डोकं फार दुखतं आहे. तिला औषध सांगा हो कांही तरी ! "

मुरारीच्या बोलण्याचंच निमित्त करून बैरागी म्हणाला—

" अहाहा ! हा मुलगा, भवानी, तुझ्या दुःखाचा परिहार करण्याला योग्य दिसतो. तें करण्याकरिताच याची व तुझी गांठ ईश्वरानं घातली. तुझ्या पोटीं मुलगे होऊन मरावे आणि उलट याच्या आईबापांची व याची ताटातूट होऊन तो तुझ्या हातीं लागावा यांत मला ईश्वरी संकेतच दिसतो."

" तो कसा ? स्पष्ट करून सांगा ना ? "

गोसाव्यानं दिव्य स्फूर्ति झाल्यासारखा बहाणा केला. त्यानं डोळे मिटून एक वेळ वर पाहिलं आणि हातावर हात घट्ट चोळून तो चढ्या आवाजानं सावकाश म्हणाला —

" सांगूंच तर? भवानी, ऐकण्याला तयार हो. तुला पुत्रवती होण्याला म्हणजे यापुढं पुत्र होऊन तो जगण्याला तुला नरयज्ञ केला पाहिजे. शाक्त कुळांतच तुझं सासर आणि माहेर आहे. शाक्त पंथाचा धर्माचार हाच तुला विहित असा धर्माचार म्हणून नरबलिदानाशिवाय दुसरं कोणतंहि दान देवी तुझ्या हातून स्वीकारणार नाही. नरयज्ञाशिवाय तिची तृप्ति होणार नाही आणि नरयज्ञाशिवाय तूंहि पुत्रवती होणार नाहीस."

हे शब्द ऐकतांच भवानी दचकली आणि म्हणाली, " किती भयंकर ! माझ्या हातून नरयज्ञ कसा होईल ? "

हे शब्द ऐकतांच बैरागी रागाचा आवेश आणून ताडकन् उभा राहिला, आणि पाय आपटून म्हणाला—

" हेंच तें– हेंच तें. अरेरे ! मीं तोंडाची वाफ व्यर्थ दवडली. भवानी, पुत्रप्राप्तीचं खरं साधन मी तुला सांगितलं तें जर तुला करण्याची शक्ति नव्हती तर मला साधनाविषयी प्रश्न विचालास कां ? आणि मी नाही नाही म्हणत असतां मला उत्तर देण्याचा आग्रह केलास कां ? देवी, चामुंडे, अशा या चंचल मनाच्या नादान स्त्रीवर उपदेशाची कृपा करण्याची कुबुद्धि तूं मला कां दिलीस ? ठीक आहे, भवानी, हा पाहा मी चाललों."

बैराग्याचं हें उग्र रूप पाहून भवानी भिऊन गेली. ती फिरून त्याच्या पाया पडून म्हणाली, " महाराज, नका–नका, असें रागावूं नका. मी चुकलें. नरयज्ञाची कल्पना मला क्षणभर भयंकर वाटली खरी, पण मी स्त्रीजात, मनानं दुबळी म्हणून तसं झालं. त्याची क्षमा करा."

हें ऐकून बैराग्यानं आणखी अधिकच रागावल्याचा बहाणा केला. तो निंदाव्यंजक हास्य करून म्हणाला, " भवानी, तूं स्त्री म्हणून यज्ञाची कल्पना तुला भयंकर वाटली, आणि मी पुरुष कठीण काळजाचा, उलट्या काळजाचा मांग, म्हणून ती मला गोड वाटली असंच ना तुझं म्हणणं ! तूं मात्र मायाळु देवता आणि मी मात्र रक्तमांसाला हपापलेला वेताळ किंवा राक्षस ! अरेरे, या स्त्रीवर दया करण्याची बुद्धि मला कोठून झाली कुणाला ठाऊक ! कोण ही

निंदा! कोण हा अपमान! अरेरे, मी रागाच्या स्पर्शानं विटाळलों. माझा चित्तक्षोभ शांत व्हायला मला आता एक सप्ताहपर्यंत एकांतांत योगसमाधि लावून बसलं पाहिजे."

भवानी म्हणाली, "फिरून सांगतें महाराज, मी चुकलें. आपण कठोर मनाचे असं म्हणण्याचा माझा हेतु नव्हता. आपली निंदा मी जाणूनबुजून कशी करीन? आपल्यासारख्या तपस्व्याची निंदा केली तर माझी जीभ झडून नाही का जाणार? मी नरयज्ञ करायला तयार आहें; पण कोणाचा करूं? माझ्या हातून देवीला कोणत्या प्रकारच्या मनुष्याचा बळी आवडेल?"

"भवानी, मला प्रश्न विचारून संकटांत घालण्याची तुझी इच्छा अजून तृप्त होत नाही काय? फिरून तूं मला प्रश्न विचारलासच आणि मी दिलेलं उत्तर आवडलं नाही म्हणजे फिरून तू मला क्रूर–अधम ठरविणार!"

भवानी कापऱ्या स्वरानं म्हणाली, "नाही महाराज, ती चूक माझ्या हातून पुन्हा होणार नाही. आपल्या ध्यानांत येईल तें सरळ स्पष्ट सांगा."

पश्चात्तापानं भवानी पूर्णपणें आपल्या कह्यांत आली असं पाहून बैरागी म्हणाला, "भवानी, ती चूक तुझ्या हातून आता न होवो किंवा शंभर वेळा होवो. मला आता त्याची मुळीच पर्वा नाही. नुसत्या नरयज्ञाची कल्पना तुला भयंकर वाटली! पण याहून भयंकर तें पुढंच आहे. तें ऐकायला सिद्ध हो. तुला पुत्रवती व्हावयाचं असेल तर प्राणांहून प्रिय अशा मनुष्याचा बळी तुला द्यायला पाहिजे."

"काय? प्राणाहून प्रिय अशा मनुष्याचा बळी?"

"होय, मी बोललों तेंच अगदीं बरोबर. माझा वाग्बाण सुटला तो आता परत येणार नाही. भवानी, ऐक, अगदी कान उघडे ठेवून ऐक. तुला मुलगाच पाहिजे तर मुलासमान मानलेल्या या मुरारीचाच बळी तुला द्यायला पाहिजे."

भवानी संतापाचा झटका येऊन म्हणाली, "काय! माझ्या मुरारीचा बळी? आपण काय बोलतां महाराज? असलं क्रूर कृत्य करण्यापेक्षा मला यापुढं मुलगा न झाला किंवा होऊन मेला तरी चालेल. आपणासारख्यांनी माझ्या हातची भिक्षा न घेतली तरी चालेल."

"पाहा-पाहा! स्त्रीजात गेलीच आपल्या वळणावर शेवटीं. काय म्हणे क्रूर कृत्य! होय. हेंच काय पण अशीं आणखी दहा क्रूर कृत्यें, भवानी, तूंच आपल्या हातानं करशील. मला मुलगा न झाला, न वांचला तरी पुरवलं, असं

तूं तोंडानं म्हणालीस खरी, पण तुझ्या मनांत पुत्रसुखाची इच्छा प्रदीप्त झाली ती किती प्रबळ आहे हें तुझं तुला कुठं आहे ठाऊक? स्त्रीजात कोवळ्या मनाची असा तूं वाटेल तितका बहाणा कर पण तसं खरंच असतं तर स्त्रियांना साहसी हें नांवच मिळालं नसतं जगाकडून. तूं निपुत्रिक राहूं म्हणशील पण तें आता तुझ्या हातीं राहिलं आहे कुठं! तुझ्या इच्छेला अंकुर फुटतांच तें काम आतां देवांनीच आपल्या हातीं घेतलं आहे. तुझ्या मनांत नसलं तरी तूं आता नरयज्ञ करशील आणि तूं मुरारीला बळी देशील, हेंच माझं भविष्य! आणि भवानी, तीच देवीची तुला आज्ञा!"

अशा प्रकारं वीज कडाडल्याप्रमाणं निष्ठुरपणानं बोलून बैरागी एकदम घरांतून बाहेर पडला. भवानीनं मुरारीला पुढं ओढला, मांडीवर घेतला, त्याचं वरचेवर चुंबन घेतलं आणि आपल्या अश्रूंनी आपले व त्याचे गाल भिजवीत म्हणाली, "काय, पुत्रप्राप्तीकरिता नरयज्ञ! आणि मुरारीचा बळी! अहाहा, हा प्रेमाचा ठेवा मला पुरेसा नाही का? मुरारी, बाळ मुरारी, कुठून त्या बैराग्याबरोबर बोलण्याची इच्छा झाली मला!"

मुरारी भवानीच्या तोंडाशीं तोंड नेऊन म्हणाला, "हें काय ग असं करतेस आई? मी तर इथं तुझ्या मांडीवरच बसलों आहें आणि तूं हाका कुणाला मारतेस?"

"बाळ, आता मी कुणाला हाक मारूं? आणि मला ओ कोण देणार? माझं दुःख निवारण करायला धावून येईल असा तरी कोण आहे? माझं कपाळ फुटलं रे, मुरारी."

"तुझं कपाळ दुखत होतं तें राहिलं नाही वाटतं दुखायचं अजून! थांब मीच आपल्या हातानं तें चेपतों हां, म्हणजे होईल बरं!"

"नको नको, बाळ, तुझे हात दुखतील. माझं कपाळ कधीच दुखायचं राहाणार नाही यापुढं. मुरारी, माझं कपाळ फुटलं रे!"

असं म्हणून ती कपाळावर हात मारून घेऊन ओक्साबोक्शी रडूं लागली. मुरारी गोंधळून म्हणाला, "पण आताच तो रुद्राक्षाच्या माळा घातलेला बुवा आला होता. त्याला तूं कपाळ दुखायचं औषध मागितलं होतंस आणि तें त्यानं दिलं ना तुला! मग तेंच औषध कां नाहीस करीत?"

मुरारीचे हे शब्द ऐकून भवानीला अधिकच मोठा हुंदका आला. ती म्हणाली, " हाय हाय ! याचं बोलणं किती तरी गोड आणि अज्ञान तरी किती मोहक आहे ! देवा, कां नाही दिलंस त्याच्याचसारखं अज्ञान मला ! या तपस्वी बुवानं मला सांगितलं त्यांतलं एकहि अक्षर कळलं नाही याला. तसं तें मलाहि न कळतं तर किती बरं झालं असतं ! तो काय बरं म्हणाला जातांना ! ' हेंच माझं भविष्य ' असंच नाही का तो म्हणाला ? होऊं दे. खुशाल निष्फळ होऊं दे त्याचं भविष्य. मला पुत्रसुखाची इच्छाच राहिली नाही यापुढं ! ती पार आटून गेली. माझा मुरारीच मला जन्मभर लाभो म्हणजे पुरे. त्याच्यावर जर माझं खरं प्रेम असेल, तर त्याच प्रेमाच्या पुण्याईनं साधुलोक माझ्या हातची भिक्षा घेतीलच, आज नाही तर उद्या तरी. जळो तें मेल्याचं द्वाड भविष्य !

पण इतकं बोलून होतांच ती दचकली आणि म्हणाली, " पण तींच देवतांची आज्ञा असंहि तो तपस्वी म्हणाला नव्हे काय ? मी देवतांची आज्ञा मोडून त्यांचा क्षोभ कसा करूं ? तपस्वीबुवाच्या तोंडून झालं तरी देवीच बोलली ना ! "

असं म्हणून भवानीनं मुरारीला कुरवाळून म्हटलं, " मुरारी, तूं माझाच मुलगा ना ! "

मुरारीला याचा अर्थ कळेना. त्याला थोडा रागहि आला. तो आईच्या गालावर लडिवाळपणानं चापट मारून म्हणाला, " तूं मला, असं रोज म्हणत नाहीस, आणि आजच कां ग म्हणतेस ? मला नको जा ही असली रडवी वेडी आई ! "

" मुरारी, तूं खरं तेंच बोलतोस. तुझ्यासारख्या आनंदी, प्रेमळ, खेळकर मुलाला मी ही अशी दुःखी, वेडी, रडवी, निर्दय आई कशी शोभेन ? मुरारी मी रडवी झालें खरीच ! पण आता हें माझं रडणं जन्मभरहि थांबणार नाही, मुरारी. तूं मला वेडी म्हणालास– खरोखर माझं वेड आता जन्मभर जाणार नाही. मुरारी, तूं माझा मुलगा ना ? मग तूं माझ्याच पोटीं एकदम जन्माला कां नाही आलास ! ही पापी, अधम, इच्या पोटीं येऊन आपला देह कां विटाळावा, असं तुला वाटून का रे तूं दुसऱ्याच्या पोटीं जन्म घेतलास ? "

मुरारीला पोटीं जन्म घेणं याचा अर्थ काय कळणार ? त्याला वाटलं आपल्या आईचं पोट दुखूं लागलं म्हणूनच ती पोटाचं कांही तरी बोलते आहे.

तो म्हणाला, "इतका वेळ तुझं डोकं दुखत होतं, तें आता पोटांत दुखूं लागलं होय?"

असं म्हणून मुरारी भवानीचं पोट चेपण्याकरिता पुढं झाला. परंतु भवानी त्याला कांहीच उत्तर देऊं शकली नाही. दुःखावेग असह्य होऊन ती बेशुद्धच पडली.

प्रकरण १० वें

मुरारीचें स्थलांतर

सुमारे दोन-अडीच प्रहर रात्र झाली होती. अग्निवर्णाच्या माडीवरच्या निजण्याच्या जागीं एका कोपऱ्यांत दिवा चांगला ढणढणीत जळत होता. या दिवाणखान्याच्या खिडक्या सर्व लावून घेतलेल्या असून त्याचं प्रवेशद्वार तेवढं उघडं होतं. दिव्यापासून दूर असलेल्या भिंतीलगत एक मोठा दुहेरी छपरपलंग होता. त्यावर भवानी मुरारीला पुढं घेऊन निजली होती. तिला त्या रात्रीं कांही केल्या झोप येईना, व मुरारीच्या अंगावरचा तिचा हात कांही केल्या निघेना. फिरून दचकावं, फिरून छताकड दृष्टि द्यावी, फिरून मुरारी-कडून दुसऱ्या बाजूला तोंड वळवून हुंदका येऊन हळूहळू रडावं आणि फिरून मुरारीकड वळून त्याला अधिकच घट्ट कुशींत घ्यावं, असा तिचा क्रम सुरू होता.

नित्याप्रमाणं नीला भवानीच्या पायथ्याशीं बसून तिचे पाय चेपीत इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलत होती. पण त्याकड भवानीचं दुर्लक्ष असल्यामुळं, गोष्टी ऐकणारानं गोष्टी सांगणाराला जो कर म्हणजे हुंकार द्यावयाचा तोहि तिच्या तोंडून आज निघत नव्हता.

आणि तसं म्हटलं तर नीलेचं तरी लक्ष आज नेहमीप्रमाणं गोष्टी सांगण्यांत कुठं रमत होतं? दोघीहि आपापल्या विचारांत स्वतंत्र रीतीनें गढल्या होत्या. दोघींच्याहि मनावर उदासपणा आलेला असून नेहमीचा एक-मेकींशीं मन मोकळं करून बोलण्याचा प्रकार आज कांहीच नव्हता. दोघींनाहि

हें कळत होतं आणि प्रेमळपणानं गुज-गोष्टी सांगण्या-ऐकण्याचा आपला नेहमीचा आनंद आज आपणाला लाभत नाही हें दोघींनाहि जाणवत होतं.

पण दोघींपैकी कुणालाहि दुसरीला 'आज असं कां ?' म्हणून विचारावयाचं धैर्यच होत नव्हतं. दोघींच्या मनांत विषय एकच. पण त्या विषयाच्या चिंतनाचे प्रकार व दिशा दोघींच्याहि आज वेगवेगळ्या होत्या. दोघींचंहि मनोगत एकमेकींना कळत असलं तरी तें एकमेकींना कळलं आहे असं न समजल्याचा बहाणाच दोघींकडून सुरू होता !

कांही वेळानं भवानी म्हणाली, " नीले, रात्र कितीशी झाली असेल बरं ? "

नीला म्हणाली, " आणखी कांही वेळानं विचारलं असतंस तर रात्र किती झाली असं विचारण्यापेक्षा रात्र किती उरली असं विचारणंच बरोबर झालं असतं. पण गडे, रात्र किती झाली म्हणून कां विचारतेस ? "

भवानी म्हणाली, " मला आज झोपच येत नाही कशी ती."

आपल्या मैत्रिणीला झोप कां येत नाही हें नीलेला पुरतं माहीत होतं. पण ती उगीच प्रश्न विचारावा म्हणून म्हणाली, " कां बरं बाई ! असं एकाएकी काय झालं तुला झोप न यायला ? "

" देवीला ठाऊक काय झालं तें ! "

" मुरारी रडतबिडत तर नव्हता मी येण्यापूर्वी ? "

" नाही-नाही ! तो माझ्या गळ्याला मिठी मारून जो एकदा निजला अवशीच्या प्रहरीं, तो नेहमीसारखा खुशाल घोरतो आहे. पण—"

" पण काय ? "

" पण त्याच्या घोरण्याचा आवाज ऐकूनच मी भितें."

" असा तो नेहमीच घोरतो ना ? मग आजच कां बरं भितेस ? "

" तें देवीला माहीत. मी काय सांगूं ? "

असं म्हणून भवानी रडूं लागली. कोणताहि प्रश्न विचारणं किंवा प्रश्नाचं उत्तर देणं या तिच्या गोष्टी गहिवरून डोळ्यांना पाणी आल्याशिवाय होत नाहीशा झाल्या होत्या. या रडण्यांतच नीलेच्या प्रश्नाला समर्पक उत्तर मिळालं आणि भवानीजवळ देण्याला उत्तरच नव्हतं हें नीलेला माहीत होतं, म्हणून फिरून एखादा प्रश्न असा न विचारतां ती भवानीला म्हणाली—

" होतच असतं असं एखादे वेळीं कांही तरी. मी तुला प्रश्न विचारणारीच वेडी खरी ! तूं तरी उत्तर काय देशील ? आता असं कर कीं, सगळ्या गोष्टी

मनांतून काढून टाक. मी तुझे पाय दाबतें आणि तूंहि डोळे मिटून झोप घेण्याचा प्रयत्न कर. तुझी झोप मोडेल असं कांहीं होणार नाहीं मी असे तोंपर्यंत. मला जाग्रणाची चांगली सवय आहे. तुझ्या आणि मुरारीच्या तोंडाकड पाहात बसलं म्हणजे वेळ जायला मला दुसरं कांहींच करावं लागत नाही. पण दिवा किंचित् मोठा जळतो आहे, तो मी थोडा हलका करतें हं. म्हणजे तुला उजेडाचा त्रास होणार नाहीं आणि झोंप येईल. तुझ्या डोक्यावर गार पाण्याची घडी ठेवूं का ? किंवा मुरारीच्या घोरण्यानंच तुझी झोपमोड होत असेल तर त्याला दे ना इकडे! मी घेऊन जातें त्याला आपल्याजवळ निजायला कांही वेळ बाहेरच्या बाजूला."

पण भवानीला ती गोष्ट मुळींच पटली नाही. तीं म्हणाली--

"त्याला मी आपल्याजवळून मुळींच हलूं द्यायची नाही. ही पाहा त्यानं मला अधिकच घट्ट मिठी मारली आणि तो कुशीला पुरा वळल्यामुळं त्याचं घोरणंहि थांबतं आहे. तेव्हा आता मला चांगली झोप येईल असं वाटतं. वाटलं तर तूंहि नीज जा कशी!"

हे शब्द बोलून होतात तोंच भवानीला डुलकी लागली. पण नीला जागेवरून उठली नाही. तिच्या मनांत वेगळेच विचार चालू होते—

"भवानीच्या कुशींतच मुरारी आहे म्हणून तिला थोडीशी तरी झोप लागली. पण मला कशी लागणार? ईश्वर करो आणि हिला चांगलीच गाढ झोप लागो! आजच्या रात्रीं माझ्या कामाला जी संधि मिळेल तीच खरी. ती घालवून मी काय करूं? मला असंच जागून आणखी कांही वेळ पहारा केला पाहिजे. मला हवी ती संधी न मिळतां आजची रात्र अशीच संपली, म्हणजे अग्निवर्ण परत घरीं आल्यावर उद्या मुरारीचंहि आयुष्य संपणार ना? रात्र संपूं न देणं हें कांही माझ्या हातचं नाही; पण देवदयेनं भवानीला अशीच आणखी थोडा वेळ गाढ झोप लागेल तर मुरारीचं आयुष्य न संपूं देण्याचा प्रयत्न मला खचित करतां येईल. मग त्याला यश काय यायचं तें येवो. अहाहा! ही पाहा भवानी, मुरारीला कुशींत घेऊन निजण्याइतकी सुखी आहे. पण आज तिच्या दुःखाला पारावार नाही! तिच्या हिरव्या लुगड्याच्या पदरांत गुरफटलेल्या या बालकाकडं पाहिलं म्हणजे, कोंवळ्या पानांच्या वेष्टनांत उमललेल्या गुलाबाच्या फुलाचा भास होतो. पण गुलाबाचं फूल झाडावर फार वेळ कोण टिकूं देतो? भवानी, तूं माझ्यासारखाच त्या बैराग्याचा वृत्तान्त गुप्त

ठेवला असतास तर मुरारीवरचं संकट आणखी कांही वेळ टळलं असतं. पण भोळी, रे भोळी! अग्निवर्णाला बातमी कळून, किंचित् सुगावा लागून, त्यानं विचारावं मात्र, की गोसाव्याच्या भेटीचा सगळा प्रकार हिला त्याला सांगून टाकावा लागेल. झालं! बलिदानाची दुष्ट कल्पना, मऊ जमिनींत फिरूं लागणाऱ्या भोवऱ्याप्रमाणं, दोघांच्याहि मनांत घर करूं लागेल. हातचा बाण निघून गेला आणि संजीवनीचा मंत्र षट्कर्णी झाला म्हणजे दोन्ही निष्फळ होतात असं पुराणान्तरीं सांगतात. पण या शाक्तांच्या नगरींत कोणी कोणाला बलिदानाचा उपदेश केल्याचा मंत्र षट्कर्णी झाला म्हणजे त्या मंत्राला सिद्धि ठेवलेलीच. कारण ज्याला उपदेश केला तोहि राहील वेळीं बाजूला. परंतु उपदेशाप्रमाणं बळी देणं हें धर्माचं काम—म्हणजे धर्मपंथांतल्या वाटेल त्या दुष्ट मनुष्याचं काम–होऊन बसतं. भवानी, तुझ्या तोंडून गोसाव्याच्या भेटीचा वृत्तान्त बाहेर पडला तेव्हाच सारं संपलं! आज तूं या गुलाबाच्या फुलाचं रक्षण करते आहेस खरी, पण उद्याचा दिवस उजाडला म्हणजे तुझ्या हातीं कांहीच राहणार नाही आणि उद्या संध्याकाळच्या भयंकर वेळीं मुरारीचा चेंदा–मेंदा होईल हें तुझ्या स्वप्नांत तरी येत असेल काय? छेः, पण मी चुकलें. तूं स्वतः तरी धर्मभोळेपणाचा अवतार कुठं नाहीस? तुझी तरी बुद्धि न फिरेल कशावरून? तेव्हा मला कोणाचंहि न ऐकतां आपलं कर्तव्य केलंच पाहिजे."

इतक्यांत भवानी झोपेंतून चावळली. ती स्वप्नांत कोणाशीं बोलत असल्याप्रमाणं म्हणाली, "नका हो महाराज, असे निष्ठुर होऊं नका. मी माझ्या बाळाला तुमच्या हातीं कधीहि देणार नाही. मीच ना सगळ्या दुःखाचं मूळ? मग मलाच बळी द्या म्हणजे माझं दुःख संपेल आणि तुमचंहि धर्मकार्य होईल. नाही, माझा प्राण जाईल तेव्हाच मुरारी तुमच्या हातीं लागेल!"

हे शब्द तिनं भ्रमिष्टाप्रमाणं बरळत—अडखळत उच्चारले. पण तिच्या मनाची भावना शब्दानुरूप अशी पक्की जागृत झाली होती. कारण हें पाहा, मुरारीला झोपेंतच तिनं आणखी कुशींत ओढलं!

नीला मनांत म्हणाली, "तो पाहा! मुरारीला बळी द्यायला ओढून नेत असल्याचा देखावा हिला स्पष्ट दिसत असावा. म्हणूनच ही इतक्या काकुळतीला येऊन गयावया करीत आहे."

इतक्यांत भवानी पुन्हा झोपेंत म्हणाली, "आली. तुम्हाला माझी दया आली तर! या गोड बाळकाची दया तुम्हाला आली. माझ्यावर तुमचे उपकार झाले." असं म्हणून ती एक दीर्घ सुस्कारा सोडून घोरूं लागली.

नीला मनाशीं म्हणाली, "वेडे, त्या अधमांनी या बाळावर दया केली हें तूं नुसतं स्वप्नांत पाहिलंस. जागेपणीं तुला याच्या उलट प्रकार पाहावा लागेल. पण तूं तरी त्याला काय करणार ?"

नीलेच्या तोंडून हे शब्द निघतात न निघतात तोंच भवानी फिरून झोपेंत चावळली आणि बोलूं लागली—

"नाही महाराज, असे रागावूं नका. तुम्ही माझ्या हिताचीच म्हणून गोष्ट सांगितलीत ना ? स्वतः तुमच्यासारख्या तपस्व्याला त्यापासून काय लाभ होणार होता ? पण पाहा बरं. मी मुरारीचा बळी देण्याला कबूल झालें, तर तो फिरून लवकरच माझ्या पोटीं जन्माला येईल हें आपलं आश्वासन खरं ना ? आणि तो मला जन्मभर पुत्रसुख देण्याला जगेल ना ? पूर्वीच्या माझ्या पांच मुलांसारखी त्याची गत होणार नाही ना ? आपलं तसं आश्वासन असेल तर मी तरी पतीची आज्ञा कशाला मोडूं ? आणि तुमचं भविष्य कशाला विफल करूं ? आणि देवतेच्या आज्ञेचं उल्लंघन करण्याचं पाप कशाला आचरूं ?"

हे शब्द ऐकतांच नीला दुःखावेगानं एकदम उठून उभी राहिली व आपल्याशीं म्हणाली, "पाहा, मी मघाशीं म्हटलं तेंच खरं झालं. देवा, आता तूंच या बाळाला वांचविणार."

इतक्यांत जणुं कांही झोपेमधे पाहिलेल्या बैराग्याला नमस्कार करण्याकरिता भवानीनं आपले दोनहि हात वर उचलले. त्याकरिता तिला मुरारीच्या अंगावरचाहि हात काढून घ्यावा लागला. हें पाहतांच नीलेनं चटकन आपला पदर कंबरेला खोवला. हळूच पुढं होऊन तिनं मुरारीला सोडवून घेऊन उचलून आपल्या खांद्यावर टाकला आणि तशीच पाय न वाजवितां दारांतून बाहेर पडली.

काय मनोमन साक्ष असेल ती खरी; पण मुरारीलाहि स्वप्नांत त्याच वेळीं तोच गोसावी दिसत होता की काय कोणास ठाऊक! कारण आपल्या खांद्यावर तोंड ठेवल्या ठेवल्या मुरारीनं खालील शब्द स्पष्ट म्हटल्याचं नीलेला ऐकूं आलं. "ए गोसावीबुवा, मला रुद्राक्ष देतोस का विकत ? तुझ्या अंगावरचे रुद्राक्ष ? काय म्हटलंस ? रुद्राक्ष विकत घ्यायला तूं मला आपले प्राण देशील का ? हो, मी आईला विचारून तुला माझे प्राणहि देईन, पण मला रुद्राक्ष दे."

नीला म्हणाली; "समजलं तूं काय कोणाला म्हणालास तें. पण तुझे प्राण तेच माझे प्राण. मी बरी देऊं देईन ते दुसऱ्याला !"

* * *

मुरारीला खांद्यावर टाकून नीलेनं नंदा गौळणीच्या गौळवाड्याची तडक वाट धरली. भैरवपुरांत रात्रीं गस्त घालण्याची पद्धत नव्हती आणि इतर रहदारी बंदच. यामुळं तिला वाटेंत कोणीच हटकलं नसतं. तथापि आपण जें कार्य आरंभलं त्याच्या मार्गांत व्यत्यय येण्याचा फार संभव. वाईट व्हाव-याचं असलं म्हणजे योगहि तसेच घडून येतात. अशा विचारानं ती सर्व वाट-भर कावऱ्याबावऱ्या पाहत चालली होती. मुरारी झोपेंतून कदाचित् जागा होईल आणि सहजच मोठ्यानं बोलूं लागेल, प्रश्न विचारूं लागेल, याचीहि भीति तिला मनांतून वाटत होती; परंतु सुदैवानं तसं कांही घडलं नाही. तिनं त्याला पांघरुणांत चांगलं गुरफटलं होतं आणि तिच्या खांद्यावर मान ठेवल्यानं ती त्याला उशीसारखीच वाटत असेल.

गौळवाड्यांत नंदेच्या झोपडीशीं आल्यावर नीलेनं कवाडावर हळून टिचक्या वाजवल्या. म्हातारी झोपेची मोठी सावध. तिनं लगेच 'कोण आहे' असं दर-डावून विचारलं. पण 'मी नीला, आधी दार उघड कसंहि करून' असे शब्द ऐकतांच, तिनं उठून नंदादीपाची वात थोडी सारून दिवा मोठा केला, आणि नीला आंत येतांच कवाड फिरून नीट लावून घेतलं.

नीलेनं खांद्यावर ओझ्यासारखं कांही घेतलं आहे तें काय याविषयी तिचा तर्क एकदम कशानं चालणार! पण तिला भीति वाटण्याचंहि कांही कारण नव्हतं म्हणून ती विनोदानं नीलेला म्हणाली, "वेडे तुला आज कोणाच्या घरीं चोरी करण्याची लहर आली की काय? आणि हें ओझं त्या चोरीच्या मालाचंच वाटतं?"

नीला म्हणाली, "होय. चोरीच खरी. कारण दुसऱ्याजवळचा माल त्याला न सांगतां नेणं म्हणजे ती चोरीच होते. पण तसंच पाहायला गेलं तर मीं चोरी करून आणलेला माल केवळ दुसऱ्याच्या स्वाधीन असला तरी, ममत्वामुळं माझंहि स्वामित्व त्यावर अगदीच नाही असं नाही. हा पाहा माझ्या चोरीचा माल!" असं म्हणून तिनं दिव्याशीं बसून मुरारीला मांडीवर आडवा घेऊन हळूच त्याच्या तोंडावरील पांघरूण काढलं.

मुलाला पाहून नंदा आश्चर्यचकित झाली.

नीला म्हणाली, "म्हातारे, आता तुला विनोद सुचूं देऊं नको. मी तर वेडी, म्हणून तूं आपलं सगळं शहाणपण एकवटून मला मार्ग दाखीव."

नंदेच्या मनांत एक अभावित शंका येऊन ती म्हणाली, "या मुलाला मी जरी पूर्वी फारसं पाहिलेलं नाही तरी तो कोण असावा तें आलं माझ्या ध्यानांत. अशा अपरात्रीं तूं त्याला त्याच्या घरांतून घेऊन आलीस. तेव्हा त्याच्या आईला कांही अपघात झाला की काय? तिच्या घराला आगबिग लागली की काय?"

नीला चरफडत म्हणाली, "मुरारीला मी इकड आणल्यावर आता तिकडं, तूं म्हणालीस त्या दोन्ही गोष्टी झाल्या तरी मला त्याची पर्वा नाही. भवानी म्हणजे माझा दुसरा प्राणच नव्हे का? पण आता या दोन प्राणांची सदैव ताटातूट व्हावी असं ईश्वराच्याच मनांत आलेलं दिसतं. भवानीला मृत्यु यावा असं मी कसं चिंतीन? पण तिच्यापुढं वाढून ठेवलेल्या दुःखानं ती उद्या खचित वेडी होईल आणि मनुष्याला वेड लागण्यापेक्षा त्याला मरण आलेलं बरं असं नाही का ग वाटत तुला नंदामाई?"

"पण वेड लागण्यासारखं भवानीवर आलेलं असं संकट तरी कोणतं?" असं नंदेनं विचारलं. तेव्हा रुद्रभटानं गोसाव्याच्या रूपानं भवानीला भेटून, धर्मोद्धाराकरिता आणि तिला पुत्रलाभ होण्याकरिता, मुरारीचा बळी देण्याची कल्पना भवानीच्या मनांत कशी भरवून दिली; गोसाव्याच्या मुखानं झालेली ती देवीचीच आज्ञा असं तिच्या मनानं कसं घेतलं; उद्या अग्निवर्ण वाराणशीहून परत आला म्हणजे तो बलिदान पुरं करण्याचा आग्रह धरून तो कसा पार पडणार; ती स्वतःहि देवभोळी भावनावश असल्यानं, 'मुरारीचं प्रेम तर तुटत नाही आणि देवीची आज्ञा तर मोडवत नाही' हा विरोध दुःसह होऊन तिचं माथं कसं एकदम फिरेल;—तात्पर्य, मुरारीला तिच्यापासून दूर करणं हा एकच मार्ग कसा उरला—हें सर्व नीलेनं नंदेला समजावून सांगितलं.

या सर्वांला कारण रुद्रभटच हें आता चटकन् ध्यानांत येऊन नंदामाई वैतागानं कपाळावर हात मारून घेऊन म्हणाली, "बाळ नीले, परवा तूं म्हणालीस की त्या चांडाळाला कुठं तरी गाठून त्याच्या पोटांत कट्यार खुपसावी असं वाटतं, मग तें यापूर्वीच कां नाही केलंस? म्हणजे भवानीवर आणि या मुरारीवर हें संकट तरी यायचं टळलं असतं."

नीला म्हणाली, "पण तूंच नाही का तेव्हा म्हणालीस की, शिक्षा म्हणून कोणाचा वध करायचा तर तोहि आपल्या स्वतःच्या अपराधाकरता करूं नये. त्यांत निःस्वार्थीपणा राहत नाही. म्हणूनच मी हात आखडला."

नंदा म्हणाली, "पण मी तुला म्हणालें तें खरंच आहे. तूं त्याला मारा-

यची थांबलीस हा त्यांतला पहिला भाग झाला. पण आता मात्र तूं वाटेल तें करण्याला मोकळी आहेस. या नगरांत धर्मोद्धाराच्या नांवानं रुद्रभट एरवीचा गोंधळ घालतो, हा कांही मोठा अपराध मीं मानला नसता; पण अशा मुलाचा बळी देऊन देव संतुष्ट होण्यापेक्षा तो देव मेलेलाच बरा नव्हे का? पण देव कुठं मरत का असतो? मरण्याचा अधिकार आम्हा माणसांचाच! असो. रुद्रभटाच्या पापाचे घडे आता भरले. पण तूं येऊन जाऊन एक अबला स्त्री. तुझ्या हातून देव त्याचं पारिपत्य कसं यशस्वी करील याचीच जरा शंका वाटते."

नीला उतावळेपणानं नंदेच्या तोंडावर हात ठेवून म्हणाली, "पुरे कर हा तुझा वेदान्त. माझं मी तें सारं पाहून घेईन. अबला स्त्री असलें तरी पण रुद्रभटाला मारण्यापेक्षा मुरारीला वाचविणं हेंच काम या क्षणीं मला अधिक दुर्घट वाटतं. पहिली गोष्ट मीं ही केली की, भवानी झोपेंत आहे असं पाहून तिच्या कुशींतून काढून याला पळवून तर आणला. आणि आधी या गौळवाड्याशिवाय त्याला मी दुसरं कुठं नेणार?"

नंदा म्हणाली, "इथं प्रथम आणलास तेंच बरोबर. पण आता पुढं काय? या गौळवाड्यांत आम्ही त्याला किती दिवस लपवून ठेवूं शकूं?"

नीला म्हणाली, "मग मी त्याला घेऊन एखाद्या दुसऱ्या गावीं पळून जाऊं का!"

"पण तूं आणि मुरारी एकदमच नाहीशीं झाला म्हणजे अग्निवर्णाला पत्ता-मुद्दा बरोबरच लागला असं होईल. आपले पांचपंचवीस दूत तो एकदम चहूं-कड पाठवील. त्यांच्या जाळ्यांतून तूं कशी निसटणार? पण तूं जर पुन्हा उद्या सकाळीं नेहमीप्रमाणं भवानीच्या घरींच सांपडलीस, तर मुलाच्या शोधाचं त्याचं काम दुप्पट अवघड होईल; कारण तूं कानांवर हात ठेवून त्यांना गोंध-ळांत पाडूं शकशील आणि रुद्रभटाचा समाचार घेण्याला मोकळी राहशील."

"पण मग तूं या बाळाला इथंच ठेवून घेऊन संभाळशील का?"

"नाही. मला एक युक्ति सहज सुचली ती सांगतें. ती मात्र यशस्वी होईल."

"ती कोणती?"

"तूं बौद्ध भिक्षूंच्या अवलोकिताश्रमाकड याला घेऊन जा आणि मुरारीला अवलोकितेच्या पायांवर घाल."

"तें केल्यानं काय होईल?"

" निःसंशय मुरारीचं रक्षण होईल. त्याच्याकरिता सगळे भिक्षु तिच्या आज्ञेनं सत्याग्रह करण्याला सिद्ध होतील. तसंच स्वतः महाराजांची कृपा या बौद्धांवर असल्यामुळं राजबळहि या बाळाच्या संरक्षणाला उभं राहील."

ही युक्ति ऐकतांच नीलेला ती इतकी पटली की, ती आनंदानं टाळ्या वाजवूं लागली आणि म्हणाली—

" मग बोल हें केव्हा करायचं ? "

" नंदा म्हणाली, " आताच्या आता. एक क्षणहि गमवावयाचा नाही. चल ऊठ. मघाचसारखा त्याला खांद्यावर टाक. मी तुझ्या सोबतीला बरोबर येतें आश्रमाच्या दारापर्यंत. अशा वेळीं एकाऐवजीं दोन असलेलीं बरीं."

" चल तर मग " असं म्हणून नीला पुन्हा मुरारीला खांद्यावर टाकून उठली. नंदाहि उठली. दोघी बाहेर पडतांच नंदेनं हळूच झोपडीचं फाटक लावून घेतलं आणि पुढं एक शब्दहि न बोलतां त्या दोघी आश्रमाची वाट चालूं लागल्या.

प्रकरण ११ वें

नीला कृतकृत्य झाली !

मध्यरात्रीनंतर वेळूवनाच्या आश्रमांतील सर्व रहदारी बंद झाली होती. आश्रम बोलूनचालून भिक्षूंचा. त्यांत चोराला शिरून काय मिळणार ? यामुळं पहारा किंवा बंदोबस्त तर नव्हताच; पण सार्वजनिक जागीं दिवेहि लावलेले नव्हते. तथापि एखाद्या झोपडींतून दिवा चुकून राहिलेला किंवा ठेवलेला लुकलुकतांना दिसे.

अशा झोपड्यांपैकी एका झोपडींत जीर्णमन्यु व शमधन हे दिवा ठेवून त्याच्या शेजारी, अवलोकिताबाईंनी लिहिलेली, व विहारांतील सर्व भिक्षूंना पाठ करावयास दिलेली, पोथी वाचीत बसले होते.

कांही वेळानं जीर्णमन्यूला जांभया येऊं लागल्या, तो चुटक्या वाजवूं लागला, अंगाला अळेपिळे देऊं लागला आणि गयावया करून शमधनाला म्हणाला, " पुरे झाली रे बाबा ही पोथी. मला तर आता झोंप येऊं लागली आहे."

शमधन हसून म्हणाला, "झोप येऊं लागली? हें तूं कुणाला सांगतोस? आणि तुला आज झोप घेऊं देतो कोण? धर्मपाठाचं जागरण आज आम्ही करतों असं माताजींना मुद्दाम होऊन सांगायला तुझ्यावर कोणी रे बळजबरी केली होती?"

"त्यांचा तसा आग्रह दिसला म्हणून कबूल केलं. त्यांची आज्ञा कशी मोडावी?"

"खोटी गोष्ट! त्या कुणाला असा आग्रह करीतच नाहीत, आणि तूं म्हणतोस तशी आज्ञाहि त्यांनी केली नाही. तूं होऊन ही गोष्ट अंगावर घेत-लीस. माताजी काय, मृणालिनी काय, यांच्या पुढंपुढं करावं, तोंड देखलं बोलावं, असं करण्याची तुला सवयच लागून गेली आहे. नव्या पोथीचा सबंध पाठ उद्या सकाळपर्यंत करतों असं सांगून, इतर भिक्षूंपेक्षा आपल्यावर त्यांची कृपा अधिक वळवून घेण्याची हाव धरलीस, तर बैस आता पोथी घोकीत. सगळे अध्याय पुरे केल्याशिवाय मी तुला सोडणारच नाही. तुझ्याकडून हें काम पुरं करवून घेण्याचं माताजींनी मला सांगितलं आहे!"

असं म्हणून जीर्णमन्यूच्या हाताला हिसका देऊन शमधनानं त्याला खेचून खाली बसविलं आणि त्याची मान धरून पोथीकड वळविली. जीर्णमन्यु त्रासून म्हणाला, "घे बाबा बसवून हवं तर मला; पण पोथींतील एक अक्षरहि याच्यापुढं डोक्यांत शिरेल तर शपथ! पण कृपा कर आणि आधी मानेवरचा हात काढ. ती तूं सहज धरलीस त्यानंच मला किती तरी रग लागली. मग त्या दिवशीं त्या शाक्याचे हात तूं मुद्दाम जोरानं धरून ठेवलेस तेव्हा त्याला किती रग लागली असेल याची आता मला कल्पना होते."

"तुला ही अशीच शिक्षा केली पाहिजे. माताजींचा आवडता शिष्य म्हण-वून घेऊन तुला सर्व आश्रमभर दिमाख मिरवायला पाहिजे नव्हे का? घे तर त्याचं प्रायश्चित्त. पोथीतलं अक्षर तुझ्या डोक्यांत न का शिरेना? त्याशीं मला काय करायचं आहे? त्याचं उत्तर तुला स्वतः माताजीच उद्या विचारतील. पण आज सबंध रात्रींत तुझं डोकं जमिनीला लागूं द्यायचं नाही येवढं मी माझं काम समजतों आणि तें मी करणार!"

झालं! जीर्णमन्यु शमधनापुढं काय करणार? त्यानं पोथीचा पाठ पुन्हा सुरू केला. पण जांभया येणाऱ्या त्याच्या तोंडांतून शब्दच बाहेर पडेना.

दुसरा कांही उद्योग नाही म्हणून शमधन स्वतः बुद्धासन घालून ध्यान करीत बसला.

इतक्यांत आश्रमाच्या बाहेरचा दरवाजा कोणी हळूच ठोठावल्यासारखा आवाज झाला. तो ऐकून जीर्णमन्यु दचकला व घाबऱ्या स्वरानं म्हणाला, " ऐक ऐक, शमधना, बाहेरचं दार कोणी तरी ठोठावतं आहेसं वाटतं."

पण शमधनानं तिकडं दुर्लक्ष केलं. तो म्हणाला, " पोथीकडं लक्ष नसलं म्हणजे असेच आवाज ऐकूं यावयाचे ! दिवसा प्रचंड गलबल्यालाहि मनुष्य जितका भीत नाहीं तितका लहानशा आवाजानं मनुष्य रात्रीं भितो. तूं आपली पोथी वाच म्हणजे तुला बाहेरचे आवाज ऐकूं येणार नाहीत."

इतक्यांत दरवाजावर पुन्हा कोणी तरी थाप मारली आणि " दार उघडा हो दार " अशी बारीक आवाजानं मारलेली हाकहि ऐकूं आली. तेव्हां तर जीर्णमन्यूचं धाबंच दणाणलं. तो म्हणाला, " शमधना, अशा अपरात्रीं दार उघडा म्हणून कोण म्हणतंय्? आणि आवाज देखील पुरुषाच्या आवाजासारखा भासत नाही !

" यंव रे शूर ! माताजींनी तुम्हा शिष्यांना हीच निर्भयता शिकविली वाटतं? आणि हाक मारणाराचा आवाज पुरुषाचा नसून बायकोचा आहे यामुळंच तुला अधिक भीति वाटते ना ? "

" तसं नव्हे रे शमधना ! डाकिनी-हडळी रात्रीं फिरत असतात, म्हणून भीति वाटली."

" कोणी डाकीण नाही अन् हडळहि नाही. आश्रमांतलीच कोणी धर्मभगिनी हाक मारीत असेल. तर ऊठ जा आणि काढ कडी."

" छे बुवा, मी नाही जाणार ! मला तर फारच आश्चर्य अन् भीति वाटते."

" येवढ्या रात्रीं एखादी स्त्री आश्रमाबाहेर राहिली म्हणून आश्चर्य वाटो, पण भीति रे कसली ? "

" भीति अशाकरता की, हाक मारणारी खरी हडळ किंवा डाकीण नसली तर एखादा दांडगा पुंड शाक्त आला असेल आम्हांला मार द्यायला आणि त्याला फसून आम्ही आंत घ्यावं म्हणून त्यानं स्त्रीसारखा नाजूक आवाज काढला असेल. हें पाहा, परवा त्या शाक्तांनी भर रस्त्यांत केलेला दंगा अजून माझ्या डोळ्यांपुढं उभा आहे आणि त्यांतल्या एकानं मला मार दिला त्यानं अजून कसं अंग ठणकतं आहे. न जाणो, तूं मधे पडलास म्हणून त्या दिवशीं

मला द्यायचा मार उरला तो पुरा करायला तोच धटिंगण रात्रीची संधि साधून आश्रमांत येत नसेल कशावरून ?"

"मग त्या दिवशीचा मार जर मी जवळ होतों म्हणून चुकला तर आताहि मीच नाही का तुझ्या सोबतीला ? विहारांत येऊन आम्हा भिक्षूंना मार देऊं म्हणणाराचं तोंड बघ ! तो द्यायला शाक्त तयार होतील, पण घेणारानं तो घेतला पाहिजे ना ? चेष्टा नाही लागली. परवा त्याचे हात मी जोरानं नुसते धरले तों त्याला प्राणांतिक वेदना झाली. येऊं दे कोण तुझा शाक्त तो. त्याचे हात मुरगाळून लोंबायलाच लावीन."

इतक्यांत दरवाजावर पुन्हा थाप पडली, आणि स्त्रीच्या आवाजानं मारलेली तीच हाक ऐकूं आली. तेव्हां शमधन फिरून जीर्णमन्यूला म्हणाला, "तूं इतका कसा भित्रा रे ? जा कडी काढ आणि बाहेर कोण असेल त्याला आंत घे. स्त्री असो नाही तर स्त्रीच्या आवाजासारखा आवाज काढणारा पुरुष असो. काय ? तूं नाही जात ? हा भागूबाई ! तुझ्यासारखे भित्रे लोकच आम्हा बौद्ध भिक्षूंची बेअब्रू करणार, भ्याड म्हणवून घेऊन."

"अरे तसं नव्हे रे ! मी मारामारीला भितों असं नाही. माझी हरकत केवळ धर्मबुद्धीच्या मुद्द्यावर आहे. मारामारींत एकमेकांच्या अंगावरचे कृमि-कीटक मरत नाहीत काय ? मग 'अहिंसा परमोधर्मः' हें तत्त्व कुठं राहिलं !"

पण जीर्णमन्यूचं हें धर्मपुराण ऐकायला शमधन जाग्यावर राहिला नाही. तो म्हणाला, "ठीक, ठीक. कळली तुझी अक्कल, मीच जाऊन कडी काढतों."

तरीहि जीर्णमन्यूला बसल्या जागीं भीति वाटतच होती. शमधनानं जाऊन दार उघडलं तर काय संकट येईल कुणाला ठाऊक ! या विचारानं दुसरी कांही सबब सांगून शमधनालाहि थांबवून धरावा या हेतूनं जीर्णमन्यु म्हणाला, "अरे मित्रा, चाललास कुठं ? पाठाचा शेवटचा अध्याय तुझाहि पुरा व्हावयाचाच आहे. मरे ना का दाराबाहेर कोण असेल तें ? शिवाय इतक्या रात्रीं आश्रमाचा दरवाजा उघडायला माताजींची नको का आज्ञा घ्यायला ?"

इतक्यांत फिरून दारावर मारलेली हाक ऐकून जीर्णमन्यु म्हणाला, "हे स्त्रीचेच शब्द. कांही तरी कपट आहे खास. इतक्या रात्रीं आश्रमाकड कशाला येणार कोण स्त्री ?"

पण त्याला उत्तर द्यायला शमधन थांबला नाही. त्यानं एकदम जाऊन आश्रमाचं दार उघडलं आणि पाहतो तों तोंडावर पदर ओढलेली एक स्त्री

मागेंपुढें पाहात भीत भीत दरवाजाच्या आडोशाला उभी आहे आणि तिच्या खांद्यावर कांहीं तरी टाकलेलं आहे.

दरवाजा उघडलेला पाहतांच आंत जाण्याच्या परवानगीची वाट न पाहतां ती स्त्री एकदम आंत शिरली आणि भीतीनं म्हणाली, "घ्या! घ्या! आधी दरवाजा लावून घ्या. कृपा करा, दरवाजा उघडा ठेवूं नका!"

शमधन म्हणाला, "हा पाहा मीं दरवाजा लावला. तूं भिऊं नको. बाई, तूं कोण आहेस."

ती स्त्री म्हणाली, "तुम्ही दरवाजा पक्का लावा म्हणजे मग सर्व सांगतें."

तें ऐकून जीर्णमन्यु भीतीनं ओरडून म्हणाला, "मित्रा, दरवाजा लावून घेऊं नकोस! इतका वेळ ती दरवाजा उघडायला सांगत होती, तीच आता दरवाजा लावायचा आग्रह करते. कपट आहे, विश्वासघात होईल, सांभाळ."

पण शमधनानं तें मनावर घेतलं नाहीं. तो हसून जीर्णमन्यूला म्हणाला, "बरोबर आहे. तूंहि मघाशी दरवाजा उघडूं नको म्हणत होतास आणि आता लावूं नको म्हणतोस पण दोन्हीहि एकाच भीतीमुळं."

शमधनानं दरवाजा पक्का लावल्यावर ती स्त्री त्याच्यामागून शमधनाच्या व जीर्णमन्यूच्या खोलीपर्यंत आली व म्हणाली, "मी तुम्हाला संशयांत ठेवूं इच्छीत नाहीं. पण आधी तुम्ही तुमच्या माताजींना उठवा."

फिरून जीर्णमन्यु घाबरून म्हणाला, "पाहा-पाहा, ही आंत तर आलीच आणि आता माताजींनाच उठवा म्हणते. कांहीं तरी मोठा खोल कट दिसतो. हे शाक्त लोक काय करतील आणि काय नाहीं याचा नेमच नाहीं!"

इतकं बोलून धैर्याचा उसना आव आणून जीर्णमन्यु म्हणाला, "माताजींना तरी उठवून संकटांत घालूं नको. आमचं दोघांचंच इथं काय व्हायचं असेल तें होऊं दे."

पण त्याला झिडकारून शमधन म्हणाला, "मूर्ख आहेस तूं. आम्हाला कांहीं होत नाहीं. आणि माताजींनाहि पण कांहीं होत नाहीं, झोपीं गेलेलं एक लहान बालक खांद्यावर टाकून ही एक दुःखी स्त्री आपल्या विहारांत संरक्षणाकरिता आली हें तुला दिसत नाहीं का? तिचं तुला भय कसलं वाटतं?"

"शमधना, अरे बाबा, नको–नको या फंदांत पडूं. हे शाक्त कोणत्या रूपानं येतील व कसा घात करतील याचा नेम नाहीं. ही स्त्री दिसते पण ती स्त्री नसेल, आणि तिच्या खांद्यावर मूल दिसतं तें मूलहि नसेल!"

पण शमधनानं तुच्छतेनंच त्याला झिडकारलं व तो नीलेला म्हणाला, "बाई, मी माताजींना हाक मारायला जातों. पण त्यांची झोप मोडावी इतकं नडीचं जर तुमचं काम असेल तरच ती मोडावी हें बरं नव्हे का ?"

नीला म्हणाली, "मी कशाला त्यांची झोप मोडण्याचा आग्रह धरूं ? माझं काम तुमच्या हातून झालं तरी चालेल."

"काय आहे तुझं काम ?"

उत्तर देण्यापूर्वी नीला खाली बसली. तिनं मुरारीला उराशीं घट्ट धरलं व म्हणाली, "माझं काम दुसरं तिसरं कांही नाही. केवळ या मुलाचे प्राण कोणी-कडून तरी वांचवा म्हणजे झालं."

"काय ? या मुलाचे प्राण वांचवूं ? पण त्याचे प्राण कोण घेऊं पाहातो ?"

"ते शाक्त लोक ! तो अग्निवर्ण ! तो रुद्रभट !"

जीर्णमन्यु म्हणाला, "मित्रा, ऐकलीस का हीं नांवं ? त्या दिवशीं ज्यांनी मला मारलं तीच ही मंडळी. पाहा-पाहा, मी सांगितलं नव्हतं तुला की, शाक्तांचंच हें कांही तरी लचांड असेल म्हणून ? बघ बरं, तुझ्यापेक्षा मला अधिक कळतं का नाही ?"

शमधन तिरस्कारानं म्हणाला, "बरं-बरं, पाहिलं-पाहिलं, पण बाई, हे शाक्त या मुलाचा प्राण काय म्हणून घेणार ?"

"देवीला बळी देण्याकरिता. पण नका हो, वेळ गमावूं नका. झोप मोडल्याबद्दल माताजींची मी एक वेळ सोडून दहा वेळ क्षमा मागेन; पण त्यांना तुम्ही जाग्या कराच. या मुलाचं रक्षण माझ्यासारख्या दुबळ्या स्त्रीच्या हातून कसं होणार ? तें माताजीच करूं जाणत. मी त्यांच्या ओटींत हा मलगा घालण्याचा निश्चय करून आलें आहे. तेवढं मला करूंच द्या," असं म्हणून ती रडूं लागली.

तेव्हा शमधन म्हणाला, "बाई, तूं रडूं नको. मला आता सगळं समजलं. तुझ्या संकटापुढं माताजींच्या झोपेची कांहीच किंमत नाही. हा पाहा मी त्यांना एका क्षणांत घेऊन येतों."

जीर्णमन्यु म्हणाला, "मित्रा थांब, मीहि येतों तुझ्याबरोबर."

"तें कशाला ? तूं इथंच राहीनास ? मी येईपर्यंत दोन शब्द बोलून या बाईचं समाधान कर. ती किती दुःखांत आहे पाहिलंस ना ?"

जीर्णमन्यु म्हणाला, "या शाक्त बाईच्या तोंडाला मला एकट्याला देऊन जातोस का? मी कांही भीत नाही म्हणा, पण तूं आणि मी दोघांनी मिळून माताजींना हाका मारल्या म्हणजे त्या लवकर उठतील नव्हे का?"

त्याच्या बोलण्याकड लक्ष न देतां शमधन उठून आंत निघून गेला व त्याच्या मागोमाग जीर्णमन्युहि गेला!

इतकें झाल्यावर नीलेच्या जिवांत जीव आला. तिला अशी भीति वाटत होती की, तिकड कदाचित् भवानी जागी होऊन, जवळ मुलगा नाही असं पाहून, आरडाओरड करील आणि मी जवळ नाही असं पाहून माझा संशय घेऊन नोकर माझा पाठलाग करतील. पण ती तिची भीति आता संपली. तिला आशा आली.

मुरारीच्या तोंडावरून हात फिरवून ती म्हणाली, "बाळा, आता वाचतील ना रे तुझे प्राण? तुझ्यासारखं मलाहि अग्निवर्णाचं घर सोडावं लागलं तरी तें मी सुखानं सोडीन. भवानीशिवाय या जगांत मला प्रेमाचा आधार दुसरा कुठंच नाही. पण स्वप्नांत का होईना, तुझा बळी देऊन देवीला संतुष्ट करण्याची कल्पना तिच्या मनांत आली तेव्हा तिच्यावर तरी माझं प्रेम पूर्वीसारखं कसं राहील?"

इतक्यांत अवलोकिता मृणालिनीला बरोबर घेऊन बाहेर आली. शमधन व जीर्णमन्यु हेहि बरोबरच होते. नीलेला उद्देशून अवलोकिता म्हणाली, "हीच का ती बाई? आणि हाच तिच्या जवळचा मुलगा? जीर्णमन्यु, जा आणि पुढच्या थोरल्या दाराचं रक्षण करीत बैस. मला विचारल्याशिवाय कुणालाहि आंत सोडूं नको."

जीर्णमन्यूच्या मनांत भीति वाटली की या बाईच्या मागोमाग कोणी तरी शाक्त लोक आश्रमविहारावर चाल करून येत असावे. म्हणून आपली बुद्धि चालविल्यासारखं दाखवून तो म्हणाला, "नाही, कांही हरकत नाही, दरवाजा उघडा राहिला तरी कांही हरकत नाही."

अवलोकितेनं यांतलं मर्म ओळखलं व ती म्हणाली, "या भ्याडाच्या हातून तें काम कसलं होणार? शमधना तूंच जा." मग नीलेकडे वळून ती म्हणाली, "बाई, या मुलाला शाक्तांनी बळी द्यायला काढलं असं म्हणतेस?"

"होय माताजी."

मृणालिनी मधेच उसळून म्हणाली, "कोण दुष्टपणा हा!"

अव.—बळी द्यायचा, पण कुणाला ? कशाकरिता ?

नीला.—या भैरवपुरांत भवानी म्हणून एक निपुत्रिक स्त्री आहे तिला पुत्र होऊन तो जगावा म्हणून.

मृणा.—कोण हा अत्याचार ! कोण हा अधर्म ! किती अधम आहेत हे शाक्त लोक !

अव.—मृणालिनी, असं एकदम उतूं येऊं नये परक्या माणसादेखत. काय म्हणतेस बाई, भवानी स्वतःचा मुलगा बळी देणार ?

नीला.—हा मुलगा तिच्या पोटचा नाही माताजी ! तिनं प्रेमानं पाळलेला आहे. तिचं याच्यावर फार प्रेमहि आहे; पण कोणा दुष्टानं तिच्या भोळ्या मनांत ही दुष्ट कल्पना भरवून दिली आहे. त्यानं तिच्या नवऱ्याला वश करून घेतलं आहे आणि तिची इच्छा नसतांनासुद्धा या मुलाला बळी दिल्याशिवाय तो राहायचा नाही.

अव.—मग मी काय करूं म्हणतेस ?

नीला.—याला तुम्ही वांचवा, दुसरं काय ? हा मुलगा तुमच्या ओटींत घालावा म्हणून आणला आहे.

जीर्ण.—माताजी, नका नका, तेवढं करूं नका. कुठून तरी आमच्या विहाराश्रमांत प्रवेश व्हायला पाहिजे म्हणून शाक्तांनी ही कांही तरी युक्ति योजली असेल असं मला वाटतं.

मृणा.—मग त्यांत कसली भीति ? माताजी, घ्या हो हा मुलगा. आपण त्याचं रक्षण करूं.

अव.—तुम्ही दोघांहि न बोलाल तर फार बरं होईल. बाई हा मुलगा तुझा कोण ?

नीला.—मी त्याची दाई आहे, माताजी.

अव.—मग तुम्हा दोघींच्या मनांत त्याला वांचवायचं आलं तर वांचवितां येणार नाही काय ?

नीला.—आम्हा बायकांचं पुरुषांपुढं काय चालणार ? ते या मुलाला डोळा चुकवून केव्हाच उचलून नेऊन परस्पर बळी देतील. कळणार सुद्धा नाही; आणि त्यांनी उघड बळजबरी केली आमच्यावर तरी त्यांचा हात कोण धरणार ?

अव.—पण हा घात थांबवायला गावांतले कोणीच लोक मदत करणार नाहीत काय ?

नीला.—नाही. माताजी, त्याची आशा नाही. हा गावच मुळी शाक्तांचा आणि त्यांतूनहि शाक्तधर्म मलिन झाला तो बलिदानानं ताजा सतेज करायचं खूळ त्यांच्या डोक्यानं घेतलं आहे.

अव.—मग मी तरी याचं रक्षण कसं करणार म्हणतेस ?

नीला.—तुम्ही काय वाटेल तें कराल पण याला वांचवाल अशी मला खात्री वाटली म्हणूनच मी इकडं आलें. मग मला असला प्रश्न कां विचारतां ? तुम्ही जर याला थारा दिला नाहीत तर याचे प्राण खचित वांचत नाहीत. असं म्हणून ती रडूं लागली व म्हणाली, " घ्याच याला आपल्या पदरांत."

अवलोकितेनं नम्रभावानं हात जोडून वर आकाशाकड पाहिलं अन् म्हणाली, " नमो बुद्धाय, नमो बुद्धाय. आण तो इकड मुलगा. मी करतें त्याचं रक्षण."

हें पाहून जीर्णमन्यूच्यानं गप्प बसवलं नाही. तो हलक्या आवाजानं पुटपुटला, " माताजी हें नसतं पाप कशाला गळ्यांत घेताहेत कुणाला ठाऊक ! माताजी, तो मुलगाच आहे ना हें तरी नीट पाहून घ्या."

अव.—काय मूर्ख आहेस रे तूं ! बाई, हा पाहा तुमचा मुलगा मी मांडीवर घेतला. बरं, तुमचं नांव काय ?

नीला.—मला नीला म्हणतात. काळभैरवाच्या चौकाजवळ अग्निवर्णाच्या घरींच मी या मुलाची दाई म्हणून राहातें.

मृणालिनी म्हणाली, " आहे ही बाई माहीत मला. तिची माझी परवाच नंदामाईच्या घरीं ओळख झाली."

अव.—नीलाबाई, तूं स्वतः कोणत्या धर्माची आहेस ?

नीला.—मीहि शाक्तधर्माचीच आहें, माताजी

अव.—मग बळी देणं हें धर्मकृत्य आहे असं तुला नाही का वाटत ?

नीला कानांवर हात ठेवून म्हणाली, " नाही, माताजी नाही. बलिदानाशिवाय ईश्वराला प्रसन्न करण्याचे मार्ग काय थोडे आहेत ? "

अव.—पाहून घे मृणालिनी. मी तुला उतावळी उगीच म्हटलं नाही. नांवानं शाक्त झाले म्हणून सर्वच का स्त्रीपुरुष अविचारी आणि निर्दय असतील ?

मृणा.—असं एखादं दुसरं उदाहरण असलं म्हणून तेवढ्यानं काय झालं ?

अव.—पण पक्षपातानं अंधळ्या झालेल्या तुझ्या डोळ्यांना या नगराच्या शाक्त लोकांत आजवर एक तरी चांगलं माणूस कुठं दिसत होतं ? असो, नीलाबाई, तूं या मुलाची आतां काळजी करूं नकोस.

नीलेला हवं होतं तें सगळं मिळाल्यावर आता तिला खरोखर कसलीच काळजी उरली नव्हती. पण फिरून तिला हें वाटूं लागलं की आता मुरारी आपणाला तूर्त तरी अंतरणार ! त्याला अंगाखांद्यावर घेतल्याशिवाय, खेळविल्याशिवाय, हसल्याखिदळल्याशिवाय, कुचेष्टा केल्याशिवाय, त्याच्या त्या नाजूक हाताचा गोड मार खाल्ल्याशिवाय तिचा एक दिवसहि जात नव्हता. तें सुख यापुढं तिला कांही काळ अंतरणार याचंच तिला वाईट वाटूं लागलं. मुलगा दुसऱ्याच्या स्वाधीन तर करायला हवाच, पण तो केल्यानं अंतरतो, हीं दोनहि कशीं साधावीं ? पण प्रेमाला असा विवेक राहात नाही, म्हणूनच मुलीचं लग्न हौसेनं करून कन्यादानाच्या वेळीं आईबाप रडतात. तीच गति नीलेची आता झाली. ती जरा भीतभीत अवलोकितेला म्हणाली—

“ माताजी, मधून मधून याची आठवण झाली म्हणजे इकड येऊन मला त्याला डोळे भरून पाहूं द्याल ना ? आणि त्याला कडेवर घेऊन बोलूं द्याल ना ? ”

असं म्हणून नीलेनं पुढं होऊन अवलोकितेच्या मांडीवर निजलेल्या मुरारीचे मुके घेतले. अवलोकिता बोलूनचालून गोसावीण बनलेली, तिनं संसाराचा त्याग केलेला, तथापि तिलाहि हें वात्सल्यप्रेम पाहून रडूं आलं. ती म्हणाली—

“ नीलाबाई, धन्य आहे ! हा मूल खचित भाग्याचा होईल. नाही तर आधी अशा अपघातांतून वांचून, तुझ्या आणि भवानीसारख्या प्रेमळ स्त्रियांच्या हातीं तो लागता ना. बाई, तुला इथं येऊन या बाळाला भेटायला परवानगी कशाला हवी ? आणि हा मुलगा मी कडीकुलुपांत का ठेवणार आहें ? येवढंच काय, पण मुलाबरोबर इथं राहण्याची तुझी इच्छा असली तर तूंहि खुशाल राहा. हा आश्रम हें सर्वांचंच घर आहे. हें भगवान् बुद्धाचं घर आहे. हा निराश्रितांचा आश्रय आहे. भीतीचं अभयस्थान आहे.”

नीला म्हणाली, “ धन्य माउली तुझी. पण मला इथं राहतां येत नाही. आताच्या आता परत भवानीच्या घरीं गेलं पाहिजे. उद्या सकाळीं मुरारी

नाहींसा झाला असा बोभाटा झाला म्हणजे गोंधळ माजेल. तेव्हा मला तिथं हजर राहिलंच पाहिजे. भवानीचीहि काळजी मला घेतली पाहिजे. मी जातें आता ?"

असं म्हणून ती अवलोकितेला नमस्कार करून तडक आश्रमाच्या बाहेर पडली व लवकरच अंधारांत दिसेनाशी झाली. ती बाहेर पडतांच शमधन आश्रमाचं दार लावून घेऊन परत अवलोकितेकडे आला.

अवलोकितेनं मुरारीच्या पाठीवरून, तोंडावरून किती वेळां तरी हात फिरविला तरी तिला पुरेच होईना. ती म्हणाली, "लहान मूल म्हणजे सगळ्या जगाचं आनंदनिधान आणि सर्व सोडून याच्या जिवावर घाला! असो, मृणालिनी, आंत जा आणि माझ्या निजण्याच्या आसनाजवळ याच्याकरिता लहानसं मऊमऊ अंथरूण घाल."

मृणालिनी आंत गेल्यावर अवलोकिता शमधनाला म्हणाली, "धर्मबंधो, मृणालिनी उतावळेपणानं शाक्त लोकांवर रागावते तें कांही उगाच नाही. तरी पण खोट्या धर्माच्या कल्पनेनं ज्यांच्या मनाला पिढ्यान्‌पिढ्या पछाडलं त्यांना योग्यमार्गावर आणण्याचं काम एकदम का कुठं होतं ? परवा शाक्तांनी तुझ्याशीं आणि जीर्णमन्यूशीं मारामारी केली म्हणून ऐकलं तें खरं ना ?"

शमधन म्हणाला, "ते कसची मारामारी करतात ? मी त्यांपैकी एकाचे हात नुसते धरले तर त्याला ते सोडवून घेतां आले नाहीत. पण हा जीर्णमन्यु आपल्या दुबळेपणाचं प्रदर्शन जिथंतिथं करतो तें पाहून मात्र लाज वाटते. माताजी, त्याला तुम्ही गावांत धर्मसाधनाला पाठवीतच जाऊं नका. तसंच ही मृणालिनीदेखील या धर्मसंघाला आपल्या फाजील उत्साहानं केव्हा तरी संकटांत आणील अशी मला भीति वाटते. हा जीर्णमन्यु भ्याडपणामुळं नगरांत जायला भितो, तर ती वेळीं अवेळीं वाटेल तिथं एकटी दुकटी जाते, आणि शाक्त लोकांशी वाद घालीत बसते !"

जीर्णमन्यूला मधे तोंड घालावयाला आयती संधि मिळाली. तो म्हणाला, "मी सुद्धा तिला किती वेळा सांगतों की, त्या भैरवचौकांत जात जाऊं नको म्हणून; पण ती ऐकतच नाही माझं."

अवलोकिता म्हणाली, "शमधना तूं म्हणतोस तें खरं आहे. या दोघांचीहि निरनिराळ्या कारणांकरिता मला काळजी घेतलीच पाहिजे. उद्यापासून

जीर्णमन्यूला मठांतल्या बागेचंच काम सांगतें. त्याचं धर्मसाधन पुरें झालं आणि मृणालिनीबरोबर तूंच जात जा धर्मसाधनाला."

इतक्यांत आंतून मुरारीचं अंथरूण घालून झाल्याचा निरोप आला तेंव्हा अवलोकिता मुलाला घेऊन आंत गेली; आणि जीर्णमन्यु व शमधन आपल्या खोलीकडे निघून गेले.

मुरारीला अवलोकितेनं स्वाधीन करून घेतलं त्यामुळं नीलेच्या डोक्यावरचा काळजीचा भार बहुतेक सर्व उतरला. अवलोकिता ही स्त्री असली तरी अबला नाही. काय वाटेल तें करील, पण मुरारी परत शाक्तांच्या हातीं जाऊं देणार नाही, अशी तिची खात्री होती. तिला आता चिंता उरली होती ती इतकीच की, भवानीचं काय करावयाचं? भवानीला चोहीकडूनहि दुःखच. इकडे मुरारी हातचा जाणार म्हणून. बरं त्याचा वियोग झाला तरी त्याचा बळी दिला जात नाही, याची निश्चिति झाली म्हणजे मग वियोगाचं दुःख नाही. कुठंहि सुखी असला तर केंव्हा तरी भेटेल. पण तो सुरक्षित राहील याची खात्री काय? पण दुसरा विरोधी विचार असा की मुरारी बळी गेल्यानं भवानीचा नवरा अग्निवर्ण याच्या तरी मनासारखं होईल. पण तसं न झालं तर पतिद्रोह होतो! आणि नवरा जर धर्मभोळेपणामुळं सदा दुःखांत राहिला तर घरीं संसारांत तिला तरी सुख काय? आणखी एक गोष्ट. भवानीची मुरारीवर ममता खरी, पण ती तरी स्वतः कांही कमी देवभोळी नव्हती. देवीची आज्ञा म्हटल्यावर ती मोडण्याचं धैर्य कोणत्या देवभोळ्या शाक्ताला होणार? आणि भवानीच्या मनांत तर असं भरवून दिलेलं, की मुरारीला बळी दिला तर तोच आपल्या पोटीं जन्माला येणार असं देवीचं आश्वासन! एतावता मुरारीला बळी दिल्यानं आपणा पतिपत्नीला पुत्रलाभ आणि वरती धर्मनिष्ठा पाळल्याचं सुखसमाधान! या ब्रह्मघोटाळ्यांतून भवानी बाहेर कशी पडते याची कल्पना नीलेला करतांच येईना. पण ती मनाशीं म्हणाली, "मुरारी सुरक्षित राहणं हें माझं पहिलं काम. मग भवानीचं कांही कां होईना! तिच्याजवळ राहून हरतऱ्हांनी मी तिचं सांत्वन करीन, पण न झालं तर तिचं दैव आणि ती. मला त्याशीं काय करावयाचं?"

नीला विहाराकडे मुरारीला घेऊन गेली त्यापेक्षां ती हलक्या पावलांनी निश्चिंत मनानं परत आली.

प्रकरण बारावें

मुरारीच्या गळयांतला ताईत

उजाडलं. अंगाणांतल्या बागेमधे चिमण्या चिंव चिंव करूं लागल्या. त्यांतली एकादी अग्निवर्णाच्या निद्रागृहांतहि प्रवेश करूं लागली. पिंजऱ्यांतील पोपट 'बाळ ऊठ' 'बाळ ऊठ', असे शब्द एकेरी आवाजानं बोलूं लागला. तरीहि कधी नव्हे ती आज भवानी पलंगावरील अंथरुणावरून उठली नव्हती. तिला साखरझोप चांगलीच लागली असावी. पलीकड नीला भुईवर अंथरलेल्या चटईवर निजूनच होती. मग या दोघींनीहि 'दुसरीनंच आधी उठावं मग मी उठेन की!' अशी थट्टेनं चढाओढच लावली होती जशी कांही! पैकी भवानी मात्र खरी झोपच अनुभवीत होती. कारण तिच्या पांघरुणाखालून एकाद वेळीं घोरण्याचा अर्धवट सूक्ष्म आवाज ऐकूं येई. पण नीला ही भवानी आपणाला दिसेल अशा बेतानं तोंड फिरवून कुशीवर पडलेली असून, डोळे किलकिले उघडे राहातील अशा रीतीनं तिनं आपल्या तोंडावरून पांघरूण व्यवस्थितपणें घेतलं होतं. भवानीचा एकादा अवयव तरी मधून मधून चाळवे. पण नीला मात्र कोंडीवर ठेवलेल्या लाकडाच्या ओंडक्यासारखी कुशीवर अगदी निश्चल होती. झोपी गेल्याचं सोंग झोपी गेलेल्या माणसापेक्षा जाग्या माणसालाच अधिक चांगलं वठवितां येतं नव्हे का?

असो. शेवटीं भवानी जागी होऊन तिनं आपल्या अंगावरचं पांघरूण काढलं तोंच नीलेच्या पांघरुणाखालून घोरल्यासारखा पण बारीक आवाज ऐकूं आला! म्हणून भवानी पलंगावरून खाली उतरून नीलेपाशी आली आणि तिला हालवून म्हणाली, "वेडे, आज उठायचं नाही काय?"

नीला एकदम जागं व्हावं त्याप्रमाणं दचकून म्हणाली, "होय की पहाटची झोप लागली खरी आज अधिक. पण भवानी, तूंहि आताच पलंगावरन उठल्यासारखी दिसते आहेस, तुलाहि पहाटचीच झोप चांगली लागली म्हणावयाची."

असं म्हणून नीला उठून अंगाला आळेपिळे देत चटईवर बसली. भवानी जांभया देत म्हणाली, "रात्री किती तरी वेळ मला झोपच आली नाही."

" आणि जशी कांही मला मात्र आली ! तूं अन् मी बोलतच नव्हतों का दोघींना झोप लागेपर्यंत ! शेवटीं झोपेच्या गुंगींत तूं काय बोलत होतीस हें तुला अन् मी काय बोलत होतें हें मला कळत नाहीसं झालं होतं. मुरारीला मात्र देवाचं देणं चांगलंच आहे. अवशी पांच घटका रात्रीं निजला तो अजून उठेल तर शपथ ! "

मुरारीचं नांव निघतांच भवानी चटकन् वळून जोड पलंगावर मुरारीच्या निजण्याच्या जागीं पांघरुणाची लांबट जाड घडी होती तिकडे गेली, आणि पांघरुणाला हालवून 'ऊठ की आता, किती निजशील' असं म्हणाली. इतक्यांत तिच्या हाताला तें पांघरूण पोकळ लागलं. म्हणून तिनं तें उघडलं तों त्याखाली मुरारी नाही ! हें पाहून ती प्रथम थोडी चपापली; पण लगेच कांही सुचून समाधान झाल्यासारखं वाटून ती म्हणाली—

" तसाच आहे तो मुलगा. जागा झाल्यावर कुणाची वाट का पाहायचा आहे ? का हाक मारायचा आहे ? रडणं, अडून बसणं हें तर त्याच्या गावींहि नाही. पाहा की, आपल्या पायानं पलंगावरून उतरून खाली जाऊन आपल्या हातांनी तोंड धुऊन गोठ्यांतल्या गाईवासरांशीं खेळायलाहि लागला असेल."

नीला म्हणाली, " तसाच आहे तो. आपल्या अंगाला उगीच कुणाचा हात सहसा लावून घ्यावयाचा नाही. आपली सेवा आपणच करणारा स्वावलंबी गडी आहे तो."

दोघी जिना उतरून खाली गेल्या. थोडया वेळानं मुरारीला हाका मारल्याचा भवानीचा आवाज ऐकूं आला. तेव्हा नीला खालून फुलाची करंडी घेऊन बुद्धया वर येऊन खिडकीशीं बसून त्याच्या माळा गुंफूं लागली.

आणखी कांहीं वेळ गेल्यावर भवानी दडदड जिना चढत वर आली आणि म्हणाली, " नीले, बाई मुरारी कुठं दिसत नाही तो ! मी पुष्कळ हाका मारल्या, पण ओ देत नाही. मी त्याचा पानगा भाजून तयार केला; आणि त्याला खाऊ घालीन, दूध पाजीन म्हटलं, पण तो कुठं आहे ? जा बरं तूं जरा इकड तिकडं गोठयांत बागेंत हिंडून हुडक. गड्याबायकांना विचार. मी माजघरांत बसतें वाट पाहात."

" ठीक आहे, पाहून येतें बरं मी त्याला." असं म्हणून नीलेनं फुलांची करंडी तिथंच ठेवली आणि ती बागेंत गेली. आणखी एक घटका गेली.

मुरारीचा शोध लागेना. आता स्वतः भवानी आणि नीला दोघीहि सैरावैरा हिंडूं लागल्या, हाका मारूं लागल्या.

जें कोण भेटेल त्याला " मुरारी कुठं दिसतो का ग ? मुरारी कुठं आहे तो बघून आण जा बरं!" असं त्या दोघी म्हणूं लागल्या. शेवटीं थकून दोघीहि माजघरांत आल्या, आणि एकमेकींशीं बोलूं लागल्या.

भवानी म्हणाली, " रात्रीं मला झोप फार उशिरा लागली. तोंपर्यंत मुरारी माझ्या कुशींत होता. नव्हे का ? "

नीला म्हणाली, " हें काय विचारतेस ? . तो तुझ्या कुशींत असायचा तसाच होता. "

भवानी—तसं नव्हे ग. मला असं स्मरल्यासारखं वाटत की त्याला कांही वेळ माझ्या कुशींत दे आणि तुला झोप येतें का पाहा, असं तूं म्हणालीस. तेव्हा त्याला उचलून मीं तुझ्याजवळ दिला !

नीला–भलतंच कांही तरी ! त्या मुलाला मऊ बिछान्यावर निजायची सवय. माझ्या या चटईवर तो कसा निजेल ? आणि मऊ बिछाना घातल्याशिवाय मी तरी त्या नाजूक बाळाला जमिनीवर कसा निजवीन ? तसंच हें माझं पांघरूण धड माझ्या पायापर्यंतहि पुरत नाही. त्याला सतरा भोकं. माझा वनवास मला पुरे झाला. त्या बिचाऱ्याला उगीच का मी तो सोसायला लावीन ! तूं आता काय म्हणालीस तें आपणाशींच झोपेंत बोलली असशील, किंवा ऐकलं असशील. तुला चांगली गाढ झोप लागत नव्हती हें मी माझ्या जागेवरून पाहात होतें. पण मुरारीला उचलून घ्यायला मी तुझ्या पलंगाकड गेलेंच नाही मुळी.

एकामागून एक गडी, दासी येऊन सांगूं लागल्या की मुरारीला शोधला पण तो सापडत नाही. कोणी त्याला सगळ्या बागेंत शोधला, कोणी गोठ्यांत शोधला, कोणी त्याला आसपासच्या घरांत शोधला, कोणी तळघरं शोधलीं, कोणी वर जाऊन गच्च्या पाहिल्या, पण सगळ्यांचे श्रम फुकट गेले.

फिरून आणखी एक चाकरांची तुकडी मुरारीच्या शोधाला पाठविण्यांत आली, तिला पूर्वीपेक्षा दूरच्या व निराळ्या वाटांनी शोध करा म्हणून सांगण्यांत आलं.

अग्निवर्ण वाराणसीहून परत येण्याची आज सकाळचीच वाट होती. भवानी त्याचीच प्रतीक्षा करीत होती. तिला वाटे की तो आला म्हणजे

मुरारीच्या शोधाचं काम यशस्वी होईल. म्हणून ती उदास पण फार न बोलतां गप्प बसली होती. पण नीलेला तो येण्याच्या आंतच आपलं कांही काम करून टाकायचं होतं म्हणून तिनंच बोलणं काढलं.

तिनं आधी भवानीपेक्षाहि अधिक रडून घेतलं आणि खाली घातलेली मान झाकून जाईल, तोंड दिसणार नाही, अशा बेतानं डोक्यावर पदर ओढून घेऊन हातानं फुलांच्या माळा गुंफीत ती म्हणाली—

"गडे, मुरारी नाहीसा झाला याविषयी तुझी काय कल्पना होते?"

भवानी म्हणाली, "मला तर कांहीच कल्पना होत नाही. तुलाच कांही होत असली तर सांग ना?"

नीला—त्याच्या मूळच्या आईबापांनी त्याला पळवून नेला असेल.

भवानी—वा ग वा! त्याची आई नदीच्या पुरांतच वाहवली अन् मेली म्हणून तर तो एकटा पडला.

नीला—त्याच्या आईनं नसलं तर बापानं नेलं असेल.

भवानी—त्याला याचा शोध लागला असता तर पूर्वीच नसती का त्यानं मागणी केली? आणि आम्हीहि नसता का त्याला दिला आनंदानं? खऱ्या बापाला आपला मुलगा न्यायला अशी रात्रीच्या वेळीं चोरी करण्याचं काय कारण?

नीला—बरं, मुरारीला कुशींत घेऊन निजलेली तुला पाहून मी निजलें. पण तूं अर्धवट झोपेंत बडबडत होतीस तें काय हें तुला आठवतं का?

भवानी—चांगलसं नाही आठवत.

नीला—बडबडणं न आठवो. पण स्वप्न तरी?

भवानी—स्वप्न मात्र थोडं आठवतं खरं.

नीला—तें काय होतं?

भवानी—स्वप्नांत मला तो जटाधारी बुवा दिसत होता.

नीला—तो काय म्हणत होता?

भवानी—तो म्हणे मुरारीला बळी द्यावयाचा आहे तेव्हा तो माझ्या स्वाधीन कर.

नीला—मग तूं काय म्हणालीस?

भवानी—प्रथम मी म्हणालें देत नाही आणि मग त्यानं देवीची आज्ञा सांगून शपथ घातली तेव्हा होय म्हटलं!

नीला—झालं तर! त्या गोसाव्यानंच पळवून नेला बरं मुरारी बळी द्यायला.

भवानी—मग मला नाही कुठं जाणवलं तें, त्याला माझ्या कुशींतून काढून नेतांना?

नीला—अग त्यांत काय आहे! या गोसाव्यांना देवीचं वरदान असतं. त्यांना माणसांची नजरबंदी करतां येते. तशीच यानं काल रात्रीं केली असली पाहिजे. नाही तर तुला नसती का चाहूल लागली? पण तुझीचशी काय, माझीहि नजरबंदी केली त्यानं. एरवी मला चाहूल कशी न लागती? तुझ्याहिपेक्षा माझी झोप सावध आहे बरं का?

भवानी—मग चल आपण त्या गोसाव्याचा शोध काढूं आणि मुरारीला परत आणूं.

नीला—अग, तो देवीचा दूत! तो घर करून थोडाच राहतो पृथ्वीवर! आकाशांतून संचार करायचीहि त्यांना शक्ति असते!

भवानी—पण माझ्या कुशींतला अंगाला विळखा घालून निजलेला बाळ मी काढून घेऊं दिल्याशिवाय त्याला कसा नेतां येईल ग?

नीला—मी तरी कुठं म्हणतें की तूं त्याला काढून उचलून आपल्या हातानं दिला नाहीस म्हणून? हें सारं स्वप्नांतच झालं असेल. पण स्वप्नांत मना-बरोबर शरीरहि काम करतंच.

इतकं बोलून एखादा निर्णय पूर्ण विचार करून द्यावा त्याप्रमाणं नीला म्हणाली 'झालं. संपलं. कळलं सगळं!' आणि—एखादं मनुष्य मृताबद्दल शोक करीत हेल काढून विव्हळतं, रडतं, तसा स्वर ओढीत नीला पुटपुटूं लागली.

"बर—झालं—बाई, तुझ्या जन्माचं—सार्थक झालं. तुझ्यावर—देवीची कृपा झाली. तुला—मोक्ष मिळाला. बिचारी—मी मात्र हतभागी! आता तुला मुलं होतील—वांचतील—सारं कांही होईल. मुरारी गेला—आता मीहि पण जातें. आता मला काय काम उरलं तुझ्या घरीं राहायचं?"

हें ऐकून भवानी नीलेजवळ गेली आणि तिचे हात आपल्या हातांत घेऊन म्हणाली, "गडे, असं कसं बोलवतं तुला? मी मुरारीला आपण होऊन कशी देईन देवीला किंवा त्याच्या दूताला, बळी द्यायला? तूं असं निष्ठुरपणानं बोलून माझ्या काळजाला घरे पाडूं नको; दुःखावर डाग देऊं नको. तूं इथून

गेलीस तर मी आपलं दुःख कुणापुढं सांगू? पण याचा कांहीच उलगडा होत नाही कसा?"

भवानीच्या या दुःखमूढ स्थितीचा फायदा घेऊन नीला म्हणाली, "तुला उलगडा होत नसेल तर मीं सांगतें ऐक.'

भवानी—सांग ना काय तें?

नीला—अगदी मनचं अन् निश्चित सांगतें ऐक. तुझे यजमान आणि रुद्रभट यांनीच कांही तरी कपट करून, तुला मला झोप लागली असं पाहून, मुरारीला उचलून नेला. माणसं झोपेंत मग्न असतात तेव्हाच कोणत्याहि चोऱ्या होतात. पण चोर चोरी कबूल करतात का कुठं? ते दोघे पाहा आता आले म्हणजे कसं नाटक करतील तें! तुझ्यावर अन् देवीवर मिळून सगळं घालतील. अन् स्वतः करूनच्या करून फिरून नामानिराळे राहतील. त्यांचं तर काम झालं ना? मग तुझं कांही होवो! पुरुषांची जात आधीच निष्ठुर. तुझे यजमान स्वतः कांही निष्ठुर नाहीत तितकेसे. पण तो आहे ना कलिपुरुष त्यांच्यामागं लागलेला! त्याला करायचा आहे शाक्त धर्माचा उद्धार! या नगरांत मिळवायचं आहे ना त्याला धर्मगुरूचं स्थान! मग त्याकरता कोणाचे किती बळी गेले त्याचं त्याला काय? बघच आता, ते आले म्हणजे कसं नाटक करतील तें!

कर्मधर्मसंयोगानं नीला म्हणाली त्याप्रमाणं याच वेळीं अग्निवर्ण वाराणसीहून परत आला. बरोबर रुद्रभट होताच. वाराणसीहून आणलेल्या व्यापारी मालाचे गाडे घराच्या मागच्या बाजूला चाकरांकडून नेवविल्यावर अग्निवर्ण घरांत आला असं पाहून भवानी उठून त्याच्याकडं गेली. घरांत घडलेली अपूर्व गोष्ट नवऱ्यांना सांगायला स्त्रिया किती तत्पर असतात तें प्रसिद्धच आहे. त्याप्रमाणं रात्रीं मुरारी घरांतून नाहीसा झाला असं तिनं सांगतांच ते दोघेहि आश्चर्यचकित झाले! आणि मग त्या उभयतांचं भाषण आपसांत सुरू झालं. प्रथम मिळेल तितका वृत्तांत नीलेकडून समजावून घेतल्यावर अग्निवर्ण म्हणाला, "रुद्रभट! तुम्ही चिंता करूं नका. मुलगा प्रत्यक्ष देवीनंच उचलून नेला असेल तर गोष्ट निराळी. एरवी माझ्याजवळ पांच-पन्नास माणसं आहेत त्याचा शोध काढायला. इतक्या थोड्या अवधींत तो कांही फारसा दूर गेला नसेल. तो हातीं लागूं द्या की आजच्या आजच बलिदानाचं धर्मकार्य उरकून टाकूं."

पण रुद्रभट अधिक धूर्त. तो देवीचा महान् भक्त असला तरी देवीनंच आपल्या हातानं आपला बळी उचलून नेला असेल या कल्पनेचा मनानं त्यानं धिक्कारच केला. त्याला भवानीचं मुरारीवर असलेलं प्रेम माहीत होतं आणि स्त्रिया कपटी असतात हेंहि तो जाणून होता. म्हणून कांही आडपडदा न ठेवतां तो म्हणाला—

" अग्निवर्णा, तुला आणि तुझ्या बायकोला हें बलिदान करायचं नसेल तर करूं नको. मला मात्र प्रथम लोभ व आशा दाखवून तूं फशीं पाडलंस येवढं खरं. मला तरी या बलिदानावांचून काय अडलं आहे? शाक्त धर्मांचा उद्धार काय व्हावयाचा न व्हावयाचा तो होईल. पण तूं आपल्या बायकोचं ऐकून जर गप्प बसलास तर जग मात्र तुला बाईलबुद्ध्या म्हणेल याची कांही लाज धर. स्त्रियांचं कपट त्यांच्या पतींनी निश्चयीपणा थोडासा दाखवल्याबरोबर लयाला जातं. या वेळीं तूं स्त्रीविषयी माया दाखवून तिच्या आहारीं गेलास तर तुझा मात्र अधःपात झाला असं समज. हें बलिदान फसलं तरी धर्मोद्धाराचे इतर मार्ग मला चांगले माहीत आहेत. मी त्यांच्याच मागं लागेन. धर्मांच्या अवनतीची वेळ आली, तेव्हा राजापासून रंकापर्यंत सर्वांनाच कुबुद्धि सुचावी यांत काय आश्चर्य?"

असं म्हणून रागानं हातपाय आपटीत आणि दांतओठ खात रुद्रभट निघून गेला. नीला दूर जाऊन, किलकिल्या दारांतून, रुद्रभटाच्या दृष्टीला न पडतां, हा प्रकार पाहून तोंडाला पदर लावून हसत होती.

कोणीहि नवरा पत्नीवर प्रेम करणारा असला तरी त्याला बाईलबुद्ध्या म्हणवून घेणं आवडत नाही. रुद्रभटानं दिलेली ही शिवी त्याच्या वर्मी लागली. पति हा प्रथम पुरुष असतो आणि नंतर पति असतो. अग्निवर्णाचा पुरुषी अहंकार आता बळावला; आणि भवानीसमोर उभा राहून, तिनंच मुरारीला लपवून ठेवला असेल असा निर्णय मनाशीं करून तो तिला म्हणाला—

" बऱ्या बोलानं मुरारी कुठं लपवून ठेवलास तें सांग. नाही तर आज तुझी अन् माझी धडगत नाही."

भवानी रडत रडत म्हणाली, " हें काय बरं असं करायचं तें! मी मुरारीला लपवून कशाला ठेवीन? आणि वरती हुडकीत बसेन? तो एक क्षणभरहि माझ्या दृष्टिआड झालेला मला खपत नाही."

अग्नि.—कशाला म्हणजे? बलिदानातन वांचवायला! आपण लपवून ठेवून आपणच हुडकीत बसलं म्हणजे आपल्यावरचा संशय जातो.

भवानी—म्हणजे मी तुमच्याशीं कपटाचा खेळ खेळत आहें असं का तुम्हाला वाटतं?

अग्नि.--मग यांत काय संशय?

मुरारी जाऊनच्या जाऊन, वरती नवऱ्याकडन असला आरोप आपल्यावर आलेला पाहून, जखमेवर निखारा ठेवावा असं त्या कोमल मनाच्या साध्वी स्त्रीला झालं. तेव्हा नीला भवानीची कड घेऊन म्हणाली, "अग, पुरुषांचं हें असंच असतं. स्वतः करूनच्या करून नामानिराळे होतात. तुला सांगूं का गडे, यांनीच काल रात्रीं आपल्या हस्तकाकडून मुरारीला तुझ्या कुशींतून उचलून नेला असला पाहिजे. काल झोपेंत मला कोणी तरी बाहेरून तुझ्या खोलींत प्रवेश केल्याचा भास झालाच. दिवाणखान्याचं दार उघडंच नव्हतं का? हे तुझे यजमान त्या अधमाच्या रुद्रभटाच्या–आहारीं गेले आहेत. त्यांना तुला फसवून मुरारीला बळी द्यायचा आहे!"

अग्नि.--पण मी काल रात्रीं या गावींच नव्हतों तो इच्या खोलींत शिरून मुलगा कसा पळवीन? आणि मला त्याला न्यायचाच झाला तर चोरून काय म्हणून? भरदिवसा उघडाउघडी घेऊन जाईन की! मला प्रतिबंध करण्याची इची किंवा कुणाची काय बिशाद? किंवा कुणाला अधिकार?

नीला—तर मग खोलींत आला तो रुद्रभटच असेल. तोच तो दुष्ट.

अग्नि.—जीभ संभाळून बोल. रुद्रभट माझा धर्मगुरु आहे. त्याला टाकून बोलणारी कोण ग तूं? भिकारणीसारखे आमच्या घरीं येऊन चार तुकडे खातेस, आणि टाकून दिलेलं फाटकं वस्त्र नेसतेस, त्या तुला मी माझ्या धर्मगुरूची निंदा करूं देईन काय? चल माझ्या घरांतून चालती हो. नाही तर धक्के मारून घालवीन.

हें ऐकून भवानी कावरीबावरी झाली. पण स्वतः नीला मोठ्यामोठ्यानं हसूं लागली, टाळ्या पिटूं लागली आणि म्हणाली—

"धर्मगुरु धर्मगुरु! गुरू कापून त्याचीं आंतडीं लोळवतात तशीं मीहि या रुद्रभटाचीं आंतडीं लोळवीन तेव्हा कळेल. मी या घरीं चार तुकडे कधी खाल्ले असले तर ते या माझ्या सोबतिणीच्या प्रेमाखातर, भुकेखातर नव्हे. जिचं शरीर मनानं केव्हाच स्मशानांतल्या सरणांत जाऊन पडलं आहे तिला भूक कुठली? मला भूक आहे ती वेगळीच आहे. मला भ्रष्ट करणाऱ्या त्या चांडाळाच्या सूडाची मला रात्रंदिवस भूक लागून गेलेली असते खरी. केव्हा

भागेल ती भागेल! मोठा आला महात्मा धर्मोद्धार करायला शाक्तधर्माचा. आणि तो उद्धार म्हणे ईश्वराचीं आवडतीं मुलं बळी देऊन होणार! मीहि पाहते माझा आणि भवानीचा बाळ कसा बळी जातो तो!"

नीलेला उगीच वेडी म्हणत नसत! तिच्या मेंदूवर किंचित् ताण पडला म्हणजे लगेच ती बहुभाष होई, रडे, ओरडे, डोळ्यांतन पाणी काढी आणि नाचूंहि लागे. तसंच तिनं या प्रसंगीं केलं. आणि शेवटीं एक उडी मारल्यासारखं करून निघाली ती तडक घराबाहेर पडली अन् तिनं नंदेच्या गौळवाड्याचा मार्ग धरला. मागं भवानी आणि अग्निवर्ण यांच्यामधे काय काय प्रकार घडले असतील याची वाचकांना कल्पना करता येईल. त्या प्रत्येकाला वाटे की दुसऱ्यानंच कपट करून मुलगा पळविला. मात्र एकाला तो बळी द्यायला हवा म्हणून, अन् दुसऱ्याला तो बलिदानांतून वांचवितां यावा म्हणून!

नीला नंदेच्या घरीं जाते तों नंदा तिची वाटच पाहात बसली होती. जातांच आपलं कपट कसं बेमालूम पार पडलं, आणि त्यांतून गोंधळाशिवाय कांही एक निष्पन्न होणार नाहीं असा कलह लावून आपण नामानिराळे कसे झालों, याची मनोरंजक हकीकत नीलेनं नंदेला सांगितली. पण नंदेला नीला भेटावयाला पाहिजे होती ती वेगळ्याच कारणाकरिता. म्हणून नंदा म्हणाली, "वेडे, लवकरच परत आलीस, बरं झालं. कारण हें पाहिलंस का काय तें!" असं म्हणून तिनं आपल्या कनवटींतून एक सोन्याचा दोऱ्यांत ओवलेला ताईत बाहेर काढला आणि म्हणाली, "ओळखलंस का हें काय आहे तें?" नीलेनं त्या ताईतावर झडप घालून तो आपल्या हातांत घेतला आणि म्हणाली, "वः! काय म्हणून काय विचारतीस? मुरारी माझ्या मांडीवर बसला म्हणजे ज्याच्यावर हात फिरविण्याचा चाळा मला रोज लागे तो हा त्याच्याच गळ्यांतला ताईत मी कसा विसरेन?"

नंदा—तो इथं कसा आला?

नीला—काल रात्रीं त्याला मी इथं आणला, मांडीवर ठेवला, उचलला, खांद्यावर टाकला, त्या हालचालींत हा ताईत त्याच्या गळ्यांतन खाली पडला असावा. वाहवा, फार चांगलं झालं. माझ्या बाळाची आठवण राहायला मला हें साधनच झालं एक.

ताइताचं एक टोक बाहेर आल्यासारखं झालं होतं तें पाहून नीलेनं तो दाबून नीट करण्याचा प्रयत्न केला. पण तिच्या हातांतून उलट तो खाली पडून त्याचे

पत्रे विसकटले, आणि ताईतांतून सोन्याच्या शाईनं बारीक अक्षरांनी लिहि-लेला एक पातळ कागद बाहेर पडला. तो उलगडून पाहण्याची इच्छा नीला आणि नंदा दोघींनाहि झाली. नीलेनं तो कागद उलगडून वाचला तों त्यांत खालील अक्षरं होतीं.

श्रीभवानी प्रसन्न

राजअमात्य चंडमति आणि त्याची स्त्री चंडिका यांचा मुलगा
चंडभानु याला महाकाली महाशक्ति चिरायु करो.

नीला म्हणाली, " आज इतके दिवस या ताइतांत काय आहे हें पाहण्याची मला कधी बुद्धि झाली नाही. आणि आज आपोआपच आपलं कवच फाडून त्यानं आपलं गुपीत तुला मला सांगितलं, हा खचित कांहीं ईश्वरी योगायोगच असला पाहिजे. एकूण मुरारी असं ज्याचं नांव मी ठेवलं त्याचं पाळण्यांतलं नांव चंडभानु होतं तर! ईश्वर करो, अन् जशी एका ऐवजी दोन नांवं त्याला लाभली तसं एकाच्या दुप्पट आयुष्यहि त्याला मिळो. महाकाली महाशक्ति याला चिरायु करो असं लिहिलं आहे, तो शुभ शकुनच या शकुन-वंतींतन निघाला म्हणायचा ! मला शेवटच्या क्षणीं जी स्फूर्ति झाली, त्याला भवानीच्या कुशींतन उचलून पळवून आणायची, ती या महाकालीनंच दिली म्हणावयाची. कसंहि असो, हा ताईत ठाकठीक करून मी आता आपल्या गळ्यांतच वागविणार. मुरारी दूर झाला असं तरी त्यामुळं वाटणार नाहीं."

प्रकरण तेरावें

शाक्तांचें कपटनाटक

आज कांहीं कारणानं मृणालिनीच्या दिमतीला जीर्णमन्यूची योजना झाली होती. दोघेंहि प्रातःकाळचं धर्मसाधन करण्याला बाहेर पडलीं. चालतां चालतां संचाराची वाट अग्निवर्णाच्या वाड्याकड वळते असें पाहून जीर्ण-मन्यु म्हणाला, " मृणालिनीबाई, आपण ती वाट सोडून देऊं आणि या उजव्या हाताच्या रस्त्यानं जाऊं या."

मृणा.—तें कां बरं? जी योजना आज अवलोकिताबाईंनी ठरवून दिली तींत माझ्या तुझ्याकरता ठरलेला मार्ग तो हाच ना, आपण चाललों आहों तो?

जीर्ण.—होय. पण आज या नगराचा एखादा नवा भाग पाहावासा वाटूं लागलं आहे. कोणत्याहि रस्त्यानं गेलं तरी धर्मसाधन तेंच नव्हे का?

मृणा.—त्या दुसऱ्या भागाची पाळी पुढं केव्हा तरी येईलच, तेव्हा नगरचा तो भाग पाहा! आजच काय त्याची घाई आहे? आज या ठरलेल्या मार्गानंच जायचं. दुसरं तिसरं कांही कारण असलं तर सांग.

असं म्हणून मृणालिनी कुत्सितपणानं हसली. तिला शमधनानं अग्निवर्णाच्या घरापुढं झालेला प्रकार सांगितला होता. पण हें खरं कारण जीर्णमन्यूच्या तोंडूनच वदवून त्याची कुचेष्टा करावी म्हणून मुद्दामच तिनं वेड पांघरलं होतं. ती आणखी म्हणाली, ज्या रस्त्यानं तूं धर्मसाधन करायला पूर्वी कधी गेला असशील त्या रस्त्यावरच्या घरांतले लोक तूं धर्मसाधनाला फिरून येण्याची वाट बघत बसले असावे. तुला एकदा पाहिल्यावर तुझी आठवण कोणालाहि राहिलीच पाहिजे असा तुझा वेष अन् तुझी मुद्रा आहे. असला मोहरा एकदोन वेळां पाहून नगरच्या या रस्त्यावरच्या लोकांचं समाधान होणार नाही. ते तुझं धर्मसाधन पूर्ण करून देण्याकरिता तुझी वाटच पाहात बसले असतील. त्यांची निराशा करणं बरं नव्हे.

असं म्हणून मृणालिनी अग्निवर्णाच्या घराकडून जाणाऱ्या रस्त्याला लागली. तेव्हा आतां आपल्या मनांतली भीति तिला सरळ सांगून, व शक्य तर तिलाहि भिववून हा रस्ता सोडून देववावा या विचारानं जीर्णमन्यु म्हणाला—

जीर्ण.—मृणा, बस्स झाला या रस्त्यावरच्या लोकांना धर्मोपदेश. मलाच त्यांतल्या कांही दुष्ट लोकांच्या हातून मोक्ष मिळण्याची वेळ आली होती.

मृणालिनी हसून व खोटं आश्चर्य दाखवून म्हणाली, "म्हणजे असं झालं तरी काय जीर्णमन्यु?"

जीर्ण.—अग, काय सांगूं आपलं कपाळ? हे शाक्त लोक महातामसी आहेत. कुणाच्याहि अंगावर हात उचलायला कमी करायचे नाहीत. मला आपला जीव बचावण्याला फार परिश्रम पडले.

मृणा.—कां? त्यांनी तुझ्या अंगावर हात टाकला की काय?

जीर्ण.—टाकला म्हणजे, मला चांगलंच बडिवलं की?

मृणा.—आणि शमधनालाहि ?

जीर्ण.—नाही. तो बचावला मार खाल्ल्याशिवाय. त्याला मी भगवान् बुद्धाचं नांव मोठमोठ्यानं घेऊन धीर देत होतों.

मृणा.—छेः ! भररस्त्यांत तूं इतका मार खाल्लास हें मला मुळी खरंच वाटत नाही.

जीर्ण.—अग, अगदी खरं आहे. त्यांत काडीइतकंहि खोटं नाही. मी इतका मार खाऊन वरती माझंच म्हणणं खोटं ?

मृणा.—खोटं वाटण्याचं कारण तूं कांही कमी पोसलेला नाहीस. चांगला गलेलठ्ठ आहेस. चांगला तुंदिल आहेस. त्यांनी तुझ्या अंगावर हात टाकून मार दिला; पण तो तूं खाल्लास कां ? तुझे हात काय करीत होते ?

जीर्ण.—वः ! म्हणे मार खाल्लास कां ? शाक्त लोकांनी आपली मनःशांति सोडली तशी मींहि सोडावी होती म्हणतेस की काय ? मनाची शांतता सोडूं नये, तामसी बनूं नये, असा शहरांत धर्मसाधनाला बाहेर पडतांना अवलोकिताबाई उपदेश करतात तो ऐकून फुकट घालवूं की काय ?

मृणा.—पण आपणाला विनाकारणच दुसरा कोणी मारूं लागला तरी त्याला प्रतिकार करूं नये असं कांही माताजी सांगत नाहीत आपणाला ! आपला धर्महि तसं सांगत नाही. बरं, तूं आपल्या हाताचा उपयोग केला नाहीस आणि ते तर तुला बदडीत होते; मग तुझी सुटका कशी झाली ?

जीर्ण.—तें काम शमधनानं केलं. माझ्या अंगावर बसणाऱ्या प्रत्येक गुद्द्या-बरोबर ‘ नमो बुद्धाय ’ असं मी खूप जोरानं ओरडत होतों. यामुळं शमधनाला उत्तेजन येऊन त्यानं पुढं होऊन मारणाराचे हात धरले. माझ्या प्रार्थना-घोषणानं त्याच्या हातांत अकल्पित सामर्थ्य आलं यामुळं मारणाराला आपले हात त्याच्या हातांतून सोडवून घेतां आले नाहीत.

मृणा.—पण दुसराहि एक शाक्त होता तिथं. त्याची वाट ? त्यानं तुला तडाखे दिले असतील !

जीर्ण.—नाही. त्या कामीं मी दुसऱ्या एका धर्मवचनाचा उपयोग केला. ‘धर्मस्य त्वरिता गतिः’ हें वचन आठवल्यामुळं मी त्या दुसऱ्याच्या हातीं न लागतां पळून गेलों.

मृणा.—असो. तुझा तर जीव शमधनानं वांचविलाच; पण त्यानं आपल्या सामर्थ्यांचा उपयोग केला हें त्याच्या हातून थोडंसं धर्मविरुद्धच आचरण घडलं, नव्हे का? ज्याचे हात शमधनानं धरले त्याला थोडीशी रग लागली असेल. म्हणजे तें दुःखच दिलं असं झालं नव्हे का? तें पाप त्यानं आपण होऊन आपल्या दिनचर्येंत लिहून माताजींच्या जवळ कबूल केलं पाहिजे.

जीर्ण.—हो असं तर खरंच. त्याच्या त्या पापाची क्षमा करण्याबद्दल मी व तूंहि माताजीजवळ विनंति करूं बरं का? हो, त्या बिचाऱ्याला उगीच शांतिभंगाचं हिंसेचं पाप न लागावं. बाकी मृणालिनीबाई, खरंच सांगूं का, आपल्या धर्मांतला शांतीचा उपदेश शमधनाच्याच काय पण तुझ्याहि मनांत अजून चांगला बिंबला नाहीं असं मला वाटतं.

जीर्णमन्यूनं असे तारे तोडलेले पाहून मात्र मृणालिनीला खरोखरच राग आला. तिनं आपला थट्टेचा स्वर बदलला व रागानं म्हणाली—

“आग लाव तुझ्या त्या शांतीला, जीर्णमन्यु! तुझ्यासारखी जर का मी पुरुष असतें तर विनाकारण अन्यायानं वर्दळीला येणाऱ्या या उर्मट शाक्तांची रग पण खूपच जिरविली असती. शाक्त झाले म्हणून ते कांहीं राक्षस नव्हेत, आणि आम्ही बौद्धधर्मी झालों म्हणून मनुष्यं नव्हेत असंहि नाहीं. दुसऱ्यावर अत्याचार करूं नये, निष्कारण कुणाला पीडा करूं नये, इतकंच आपला धर्म आपणाला सांगतो. मी तुझ्याबरोबर असायला पाहिजे होतें, म्हणजे नुसत्या डोळ्याच्या धाकानं त्या शाक्तांना परतविलं असतं!”

हें आवेशयुक्त भाषण ऐकून जीर्णमन्यूनं कानांत बोटं घातलीं. तो म्हणाला,

“खरोखर मीच पुरुष नसून स्त्री झालों असतों तर फार चांगलं झालं असतं. कारण पुरुष असल्यामुळं मनाची शांति ढळण्याची भीति एखाद वेळ तरी वाटते, ती टळली असती. मी स्त्री असतों तर, मृणालिनी, स्त्रियांचा आचारधर्म कसा असतो तो मीं बरोबर दाखविला असता.”

असल्या त्या निर्लज्जपणाच्या बोलण्यापुढं मृणालिनी काय करणार? मनाला अतिशय विषाद वाटून तिनं तो विषयच टाकून दिला. ती इतकंच म्हणाली—

“जीर्णमन्यु, तूं आता आपल्या मार्गानं जा. मीहि मला जायचं आहे तिकडं जातें. का माझ्याबरोबर येतोस?

जीर्ण.—कुणीकड जाणार तुम्ही?

मृणा.—काळभैरवाच्या चौकांत.

या चौकाचं नांव ऐकतांच जीर्णमन्यु घाबरला. कारण तो शाक्त लोकांच्या दाट वस्तीचा मुख्य भाग होता. आणि अलीकड त्या चौकाच्या आसपास बौद्ध भिक्षूंवर शाक्तांतील लोकांकडून वरचेवर हल्ले होत असत.

जीर्ण.—सहचारिणी, माझं ऐक, तूं एकटी या चौकांत जाऊं नको. तो चौक फार भयंकर. त्या चौकांत पाऊल घालायची माझी तरी छाती होत नाही!

मृणा.—काय भेकड आहेस जीर्णमन्यु! कोण तुला खायला लागलं आहे या चौकांत?

जीर्ण.—परवा शमधन हा पुरुष तरी माझ्याबरोबर होता. आज तूं तर काय स्त्री! परवा मीं एकट्यानं मार खाल्ला. आज दोघंहि खाऊं झालं. नाही तर कोणी शाक्त येऊन त्यांनी तुला मला उचलून बळी दिलं नाही म्हणजे मिळविली!

मृणा.—समजलं समजलं तुझं धैर्य. तुला माझ्याबरोबर चौकांत यायचं नसलं तर बरंच झालं. मीहि माझ्या योजलेल्या कामाला एकटीच गेलेली बरी.

जीर्णमन्यु हा काळभैरवाच्या चौकांत जाण्याला मनांतून भीतच होता; पण मृणालिनी स्त्री होऊन शाक्तांच्या वस्तींत निर्भयतेनं जात असतां आपण भ्यालों असं दाखविण्याची त्याला मनांतून लाज वाटली. पण मृणालिनीसारखी धीट स्त्री बरोबर असल्यानं आपणाला सोबत चांगली होईल, कोणी शाक्तानं आगळीक केली तर ती आपणा दोघांचं संरक्षण करण्यास समर्थ आहे, या विचारानं तो बाहेरूनं तरी धीट बनला. पण त्यानं बहाणा मात्र असा केला की, जणूं काय मृणालिनीला सोबत करून राखेपणच तिची पाठ राखीत आहों. आणि या पाठीराखेपणाच्या ढोंगानं मृणालिनीच्या अंगाशीं लगट करून चालण्याची संधि मिळाली तिचा मात्र तो भरपूर उपयोग करून घेत होता. मृणालिनी मनांतून निष्पाप म्हणून मधून मधून जीर्णमन्यूच्या होणाऱ्या अंगस्पर्शाचं तिला भानहि नसे. पण जीर्णमन्यूचं मन पापी यामुळं तिच्या अंगाशीं खेटून चालण्यांत तो कामुकवृत्तीचा आनंद मानी. आपण मृणालिनीचं संरक्षण करीत आहों ही जाणीव तिला भासविण्याकरिता तो म्हणाला, “मृणा, तूं माझं ऐकत नाहीस तर नको ऐकूं; पण मला तुझ्या सोबतीला आलंच पाहिजे. हे शाक्त लोक तुला एकटीला पाहून वेळीं तुझा अपमानहि करावयाचे. मी बरोबर असलों तर तितके ते दबतील तरी.”

आपलं संरक्षण करण्याची जीर्णमन्यूची बढाई मृणालिनीला आवडली नाही. ती तिरस्कारानं म्हणाली, "आहे ठाऊक भित्री भागूबाई! तूं मला सोबत करणार? तोंड पहा सोबत करणाऱ्याचं! पण बरोबर आलाच आहेस तर चल, मी नेतें. या शाक्तांची गंमत तुलाहि पाहावयाला मिळेल. पण तिथं गेल्यावर आपला भित्रेपणा प्रकट करून माझी बेअब्रू मात्र करूं नको. या शाक्त लोकांचे वेष भयंकर दिसतात, पण त्यांच्यांत खरं पाणी कांही नाही. त्यांचे ते पिंजारलेले केस, शेंदराचे टिळे, दाढ्यामिशांचे झुबके, आणि अंगावरचीं लाल वस्त्रं नुसतीं पाहून घ्यावीं. पण ते तुझ्याइतकेच भित्रे आहेत."

"वा ग मृणा! मला भित्रा म्हणतेस काय?" असं म्हणून जीर्णमन्यूनं मृणालिनीचा हात धरला. तिच्याशीं लाड करण्याला हें त्यानं निमित्त केलं, पण तिनं तो हात झटक्यानं झिडकारून टाकला व पुढं चालली. रागावून त्याच्याकड पाहण्याचीहि त्याची योग्यता तिला वाटली नाही. सुमारे दोन चौक ओलांडून गेल्यावर एक मोठी हवेली लागली. तिला मलिन व उदास असं स्वरूप आलं होतं. बाहेरच्या भिंतींना शेणामातीचे डाग तर होतेच, पण तिजवर रक्ताचेहि डाग पडलेले दिसत. हवेलीसमोर बोळाच्या दुसऱ्या बाजूला एक ओबडधोबड लहानसं कालिकामंदिर होतं त्यांतील देवीला बळी देण्याचे पशु त्या हवेलीच्या भिंतीशीं मारले जात असावे.

मृणालिनी अदमासानं शोध काढीत या हवेलीपाशी आली. तिला पाहून देवडीकर बसलेला शाक्त उठून उभा राहिला आणि मोठ्या अदबीनं नमस्कार करून म्हणाला, "आपलंच नांव मृणालिनी काय?" तिनं मानेनं होय अशी खूण करतांच, जोडलेल्या हातांनीच वाट दाखवीत तो म्हणाला, "आपण इकडून यावं. आंत मंडळी आपलीच वाट पाहात बसली आहेत."

मृणालिनीनं प्रवेश केला तें दालन बरंच लांबरुंद असून, घराचा धनी श्रीमान् असल्यामुळं दालनांत बैठकीची व्यवस्था फार चांगली केलेली होती. बहुतेक आसनं कमावलेल्या कातड्याचीं असून कांही वेताचींहि होतीं. मध्यभागीं एक जुनाट पण उंची गालीचा पसरलेला असून त्यावरील तक्क्याला टेकलेले दोघे शाक्त वृद्धासारखे दिसत होते. थोड्या अंतरावर सहा-सात तरुण शाक्त बसले होते. वृद्धांच्या मोठ्या पण तरुणांच्याहि लहान दाढ्या होत्याच. त्या इतक्या लवकर कशा उगवल्या असंच पाहाणाराला वाटलं असतं. सर्वांनी आपल्या कपाळाला शेंदराचे टिळे लावलेले होते. मृणालिनीला पाहतांच त्या

वृद्धांसह सर्व मंडळी उठून उभी राहिली व एका स्वतंत्र आसनावर बसण्याची त्यांनी तिला विनंति केली.

प्रथम सामोपचाराचीं चारदोन प्रश्नोत्तरं झाल्यावर त्यांतील वृद्ध शाक्त म्हणाला, "खरोखर आपल्या आगमनानं आम्ही आज कृतकृत्य झालों. आपण ज्या नवीन धर्माचं कार्य करीत आहां त्याची कीर्ति आम्हीं अलीकड बरीच एकली आहे. आणि आपल्या मठांत व विहारांत जाऊन आपल्या धर्माचरणाचे अनेक उद्योग डोळयांनी पाहावे असं अनेकदा मनांत येतं, परंतु करणार काय? शाक्तधर्मपरंपरेचा एवढा जोर आहे की, त्या विहारमठाकड कोणा शाक्ताला इतर शाक्तांनी हिंडतांना पाहिलं तर, लगेच दुसरे दिवशीं हा धर्मद्रोही म्हणून ठरविण्यांत येईल व त्यावर सामाजिक बहिष्कार पडेल. म्हणून आम्हांला तिकडे येण्याचं धैर्य होत नाही; आणि त्याच कारणाकरिता तुम्हाला इकड येण्याचे श्रम आम्हीं दिले."

मृणालिनी म्हणाली, "तुम्ही मला इकड येण्याचे श्रम दिले याबद्दल मला कांहीच वाईट वाटत नाही. शाक्त धर्माविषयी मला आदर नसला तरी आमच्या नव्या बौद्ध धर्माचा उपदेश करण्याकरिता सर्वत्र संचार करणं हें आम्हा भिक्षुभिक्षुणींचं कामच आहे. शिवाय हा उपदेश करतांना त्याबरोबर शाक्त समाजाची अंतःस्थिति पाहावयाला सापडल्यानं ज्ञानांत भरच पडते."

वृद्ध शाक्त म्हणाला, "आमच्या या जीर्ण धर्मपंथाची व समाजाची स्थिति पाहून तुमच्या ज्ञानांत भर ती काय पडणार? पण लहानाला मोठेपण आणि वाइटाला चांगलेपण देऊन गौरविणं हें थोरांना भूषणास्पदच आहे. शाक्त धर्माविषयी मनांतून असंतोष पावलेले असेंच आम्ही कांही थोडे लोक आहों. पण आम्हाला तसं उघड म्हणतां येत नाही, आणि तुमच्यासारख्या नव्या उज्ज्वल धर्माचा परिचय करून घ्यावयाचा तरी देखील तो उजळमाथ्यानं करून घेण्याचं धैर्य आम्हाला होत नाही. मग धर्मांतर करण्याचं धैर्य कुठून होणार? पण सुदैवानं या भैरवपूरचे महाराज तुमच्या धर्माला अनुकूल होत चालले आहेत. तुमच्या विहाराच्या अध्यक्षीण अवलोकिताबाई यांनी जर महाराजांकड अधिक कसून प्रयत्न केला तर ते स्वतः कदाचित् नव्या धर्माची दीक्षाहि घेतील, किंवा निदान राज्यांत धर्मस्वातंत्र्य पुकारून आमच्यासारख्या कुचंबणाऱ्या लोकांची अडचण दूर करतील."

मृणा.—आमच्या अवलोकिताबाईंचा विचार तोच आहे, पण त्यांना शाक्त धर्माच्या अंतरंगाची माहिती जितकी अधिक होईल तितकं आपलं प्रचारकार्य करावयाला सहायच होईल.

वृद्ध शाक्त—आमच्या धर्माची माहिती म्हणजे त्याच्या हीन अंगाची माहितीच, दुसरं काय? आमच्या तोंडानं ती पुरविण्याला आम्हाला लाज वाटते. परंतु आमच्या या द्रोहामुळं शेवटीं आमच्या समाजाचं पारमार्थिक कल्याण होणार असेल तर त्या द्रोहाचं पातक आम्ही आनंदानं स्वीकारूं.

असं म्हणून त्यानं एका तांबड्या आसनांत गुंडाळलेली पोथी काढली, आणि तिच्यांतील वचनं वाचून दाखवून, त्यांच्या योगानं शाक्त पंथांत दुष्ट व अनीतिकारक आचार पसरण्याला मदत कशी होते याचं तिखटमीठ लावून वर्णन केलं.

मृणालिनी ही संस्कृत शिकलेली नसल्यामुळं तिला वाचून दाखविलेल्या पोथीविषयी, ती मुळांत खरी की बनावट याचं ज्ञान तिला कांहीच नव्हतं. पण ती भोळी आणि नावं दुसऱ्यावर विश्वास टाकणारी होती यामुळं तो वृद्ध शाक्त सांगतो तें सर्व खरं आहे, त्यांत कपट नाही असं तिला वाटलं.

पोथींतील वचनांचा अर्थ ऐकत असतां तिच्या कपाळावर निषेधाच्या, नापसंतीच्या आठ्या पडत होत्या आणि त्या निषेधांत आपणहि अंशभागी आहों असं दर्शविण्याकरिता जवळ बसलेले दुसरे शाक्त मधून मधून उद्वेग-दर्शक उद्गार काढीत होते.

नंतर कांही वेळानं पोथी बजूला ठेवून तो वृद्ध शाक्त म्हणाला, "मृणालिनी-बाई, तुम्ही जर शाक्त धर्मातील दुराचाराचं यथार्थ ज्ञान करून घेण्याची इतकी इच्छा धरतां, तर धर्माच्या नांवाखाली चालणारीं शाक्तांचीं दुष्कृत्यं प्रत्यक्ष पाहण्याची एक सोन्यासारखी संधि लवकरच येणार आहे, तीं साधणार असाल तर आम्ही तुम्हाला त्या कामीं साहाय्य करूं."

जवळ बसलेला एक तरुण शाक्त म्हणाला, "म्हणजे नगरांत लवकरच होऊं घातलेल्या श्रीचक्रसमारंभाविषयीच बोलता ना?"

वृद्धानं होय असं मानेनं दर्शविलं.

त्यावर तरुण शाक्त म्हणाला, "तो पाहावयाला सापडण्याला मृणालिनी-बाईंना दुहेरी अडचण दिसते. एक तर शाक्त नाही अशा कोणालाहि तिथं येण्याला अधिकार नसतो; आणि त्यांतूनहि मृणालिनीबाई गुप्त वेषांत आल्या

व त्यांना तिथं कोणी ओळखलं म्हणजे अनर्थ होईल. कारण श्रीचक्रसमारंभ गुप्त ठेवण्याविषयीं फार काळजी घेतली जाते.

जवळ बसलेला दुसरा शाक्त म्हणाला, "उघडच आहे. तिथं होणारीं कृत्यं कोणी परक्यानं पाहूं नयेत अशीं लाजिरवाणींच असतात."

मृणालिनी म्हणाली, "असं असेल तर तीं मला अवश्य पाहिलींच पाहिजेत, कारण त्यांवरून शाक्त धर्माच्या हीनतेची मला खात्री पटून तो धर्म सुधारण्याचे प्रयत्न करण्याविषयीं आमच्या अवलोकिताबाईंना व मला दुप्पट बळ येईल."

वृद्ध शाक्त म्हणाला, "अशा समाजांत एखादाच मनुष्य गुप्त वेषानं आला तर खपून जाईल, पण अनेक आले तर कपट उघडकीला येईल. म्हणून तुम्हाला येता श्रीचक्रसमारंभ पाहावयाचा तर तुम्ही एकट्यानंच गुप्त वेषानं आलं पाहिजे. नित्य धर्मसाधनाकरिता व भिक्षेकरिता तुम्ही बौद्ध भिक्षु-भिक्षुणी जमावानं जातां तसं चालणार नाही. मग अशा एकट्या येण्याचं धैर्य तुम्हाला होईल काय?"

मृणालिनी उत्साहानं म्हणाली, "बुद्धदेवाच्या कृपेनं मी भीति हा पदार्थ जाणतच नाही. कोणाहि नवधर्मप्रचारकाला निर्भय वृत्तीनंच वागावं लागतं."

यावर दुसरा वृद्ध शाक्त म्हणाला, "स्वतःच्या निर्भयवृत्तीचं ठीक आहे. पण गुप्त वेषानं दुसऱ्याच्या गुप्त समाजांत समारंभांत शिरणं हें कपट होत नाही काय?"

हा प्रश्न ऐकून मृणालिनी क्षणभर थबकली; पण लगेच निश्चयानं म्हणाली, "हां, यांत थोडासा कपटाचरणाचा दोष येतो खरा; परंतु पुष्कळ चांगल्याकरिता थोडं वाईट पत्करलंच पाहिजे. तुम्ही सांगतां त्यावरून श्रीचक्रसमारंभांत होणाऱ्या दुराचारांच्या पापांच्या मानानं माझ्या कपटाचं पाप कांहीच नाही. हेतु चांगला असला म्हणजे मनुष्यानं साधनं कोणतींहि योजावीं. त्यांत त्याला दोष लागत नाहीं."

हें ऐकून पहिला वृद्ध शाक्त म्हणाला, "वाहवा, वाहवा! इतक्या लहान वयांत इतके पोक्त विचार शिकविणाऱ्या तुमच्या नवीन धर्मपंथावर व धर्मगुरूवर ईश्वराचीच कृपा असली पाहिजे. प्रतिकाराकरिता कुकर्म करण्याच्या सिद्धांताचं तुम्हीं समर्थन केलं, त्यानं आमच्या डोक्यांत चांगलाच प्रकाश

पडला. या तुमच्या उपदेशाचा योग्य उपयोग करून घेण्याची संधि आम्ही सहसा दवडणार नाही."

नंतर येता श्रीचक्रसमारंभ कुठं, केव्हा घडून येणार यासंबंधी बोलणं झाल्यावर, अधम शाक्तपंथाच्या गाभ्याला हात घालण्याचा सुप्रसंग आपणाला लाभणार, आपल्या तुलनात्मक ज्ञानांत मोठी भर पडणार, आणि नवधर्मप्रसाराला मोठी मदत होणार, या विचारानं मृणालिनीच्या तोंडावर उल्हास चमकूं लागला. आपल्याला विश्वासांत घेऊन स्वकीयांविरुद्ध इतकी गुप्त माहिती दिल्याबद्दल तिनं त्या शाक्त मंडळींचे आभार मानले, व म्हणाली, "शुद्ध नवधर्माचा प्रसार व्हावा अशी ईश्वराचीच योजना दिसते. म्हणूनच तुम्हाला येऊन भेटण्याची मला बुद्धि झाली आणि मन मोकळं करून बोलण्याची तुम्हालाहि बुद्धि झाली. सत्कार्यांत प्रतिपक्षीहि वश व साहाय्यभूत होतात तें कसं हें मला आज कळून आलं. बुद्धदेव तुमचं कल्याण करो."

असं म्हणून मृणालिनी उठली, तेव्हा इतर शाक्तहि उठले. नंतर त्यांनी त्या वाड्यांतील इतर दालनं मृणालिनीला हिंडून दाखविलीं. त्यांतहि शाक्त पंथाच्या निंद्य धर्माचाराचा पुरावा तिला आढळून आला. जिकड जावं तिकड शाक्त पंथाच्या संहितेंतील 'म'कारपंचकांपैकी कोणत्या ना कोणत्याचा पुरावा आढळून येत होता. तो पाहात असतां तिच्या मुखावर येणारी खिन्नता पाहून, ते वृद्ध शाक्तहि हताश झाल्याचा बहाणा करून दीर्घ श्वास टाकून म्हणाले, "मृणालिनीबाई, आमची ही अशी लाजिरवाणी स्थिति आहे खरी! त्यांतून आमची सुटका होईल तेव्हा होवो."

वाड्याच्या मुख्य दरवाजाशीं परत आल्यावर मृणालिनी म्हणाली, "प्रयत्नानं सर्व कांही साध्य होतं. भगवान् बुद्धाचं चिंतन मनांत करा म्हणजे तो तुमचं संकट दूर करील." असं म्हणून ती व जीर्णमन्यु दोघं बाहेर पडलीं.

मृणालिनीला दूरवर पोंचविण्यासाठी पाठविलेला दूत परत येतो तों तिचा सत्कार करण्याला जमलेल्या शाक्त-मंडळाचं रूप अगदीच पालटून गेलं होतं. तेथील गंभीर वातावरण जाऊन ख्यालीखुशालीचं आलं होतं. पूर्वी हीनदीनपणाची छटा आलेल्या तोंडांवर आता थट्टा व विजय यांच्या भावनेचं तेज चमकूं लागलं होतं. एवढंच नव्हे तर कांही चेहऱ्यांवर उग्रपणा आणणाऱ्या पूर्वीच्या दाढ्याहि तेथून निघून गेल्या होत्या! बिचाऱ्या मृणालिनीला कपटाच्या जाळ्यांत ओढणाऱ्या नाटकाची रंगीत तालीम संपली होती आणि

रंगपटाला वेगळं स्वरूप आलं होतं. आता वृद्ध व तरुण हा भेद जाऊन मद्याने भरलेले पेले एकाकडून दुसरा घेऊं लागला होता; आणि गुप्त संभाषणाचं कारण संपल्यामुळं ते सर्व खुल्या मनानं एकमेकांशीं मोठ्यानं बोलत होते.

"कांही म्हणा, पोरगी तरुण असून मोठी धीट आणि बोलण्यांत चतुर आहे की नाही!"

"आमच्या या शाक्तांच्या मेळयांत, अशा आडवळणी जागेंत, अंधाऱ्या वाड्यांत एकटा येऊन बसण्याची पुरुषाची छाती होणार नाही; पण ही वीस-बावीस वर्षांची तरुण मुलगी तुमच्या शब्दावर विश्वास ठेवून खुशाल एकटी आली की!"

"पण म्हणावं कपटाचा खेळ हा उभयपक्षींहि खेळतां येतो. तिच्या कपटाची जाणीव मीं करून दिली तेव्हा ती किंचित् गडबडली. तेव्हा मलाहि प्रथम वाटलं हिचं मन निष्पाप व शुद्ध आहे. म्हणून मला तिची कीव आली, पण लगेच तिनं आपले हेतु शुद्ध आहेत आणि आपलं कार्य सद्धर्माचं आहे अशी बतावणी करून आपल्या कपटाची संपादणी केली व त्याला सदाचाराचं बेमालूम पांघरूण घातलं, तेव्हा मला कळून आलं की ही स्त्री कांही कीव करण्यासारखी नाही. कपटाला कपट लढवून आम्ही तिला पराभूत करूं शकलों तर तें आमचं कृत्य समर्थनीयच ठरेल."

"ती नवधर्माचा प्रसार करणं याला सत्कार्य म्हणते तर आमच्याहि धर्माचा जीर्णोद्धार करणं हें सत्कार्यच होत नाही काय?"

"होऊं द्याच तर आता श्रीचक्रसमारंभानं शाक्त धर्माच्या जीर्णोद्धाराच्या कार्याला प्रारंभ."

"अशा समारंभांत पूजा करण्याला अशी कुमारिका क्वचितच लाभावयाची!"

"अहाहा! काय वेडा आहे हा! मृणालिनी ही आजवर कुमारिका असेल अशी शंका तरी याला कशी येते कुणाला ठाऊक!"

"इतकी तरुण, इतकी सुस्वरूप मुलगी! भोवती तरुण भिक्षूंचा घोळका रात्रंदिवस. स्त्रियांना विहार मठांत स्वातंत्र्य भरपूर. किंबहुना पुरुष भिक्षूंवरहि तिची कदर! अवलोकिताबाईचा उजवा हातच आहे म्हणे ही मृणालिनी! पण हा गोंडस हात किती तरुण भिक्षूंनी आपल्या हातांत घेतला असेल याची कल्पना करणं कठीण आहे काय?"

"तूं वाटेल ती कल्पना चालीव; पण ती अजून अविवाहित या अर्थानं कुमारिकाच आहे की नाही? झालं तर! आमच्या श्रीचक्रसमारंभाला असली कुमारिका चालेल; निदान आपल्या गुणांनी ती चालवून घेण्यासारखी आहे."

"ते कोणते रे गुण?"

"एक तर ती रूपसुंदर आहे. शिवाय ती शत्रुपक्षाची पुढारी आहे. आमच्या बौद्ध शत्रूवर सूड घेण्याच्या कामीं हिला भ्रष्ट करण्याहून अधिक सुयश कोणतं लाभणार? नुसतं नाक कापलं की सगळं तोंड विद्रूप होतं. त्या रीतीनं ही एक तरुण भिक्षुणी आमच्या श्रीचक्रसमारंभाला लाभली तर कामच झालं."

"पण या सर्व गोष्टी थोड्या दूरच्या नाहीत का? आमचा श्रीचक्रसमारंभ होणार, त्याला ती येणार व योजनेप्रमाणं आम्हाला तिची पूजा बांधतां येणार, हें सर्व घडून येईल तेव्हा खरं! शक्तिमातेची कृपा असेल तरच हें सर्व घडून येईल."

बेत कसले चाललेले! आणि त्यांचा समारोप देवीचं नांव घेऊन हा असा! धर्मा, तुझी लीला अगाध आहे!

प्रकरण चौदावें

अमात्य चंडमति

अमात्य चंडमति आपल्या वाड्यांत सुखशय्येवर लोळत पहुडला होता.

अमात्य चंडमति याच्या दैवांत गृहसौख्य नव्हतं. कांहीं वर्षांमागं महापुरांत त्याची आवडती बायको आणि मुलगा हीं वाहून गेलीं. लगेच त्यानं दुसरं लग्न केलं. ती बायको दुसऱ्या एका अपघातानं वारली. लगेच त्यानं तिसरं लग्न केलं, पण ती नांदायला घरीं येईच ना. अमात्य हा मदिरापानानं सदा धुंद होऊन राहावयाचा आणि त्या भरांत तो जे अत्याचार करी त्यांनी तिच्या मनांत विद्वेष उत्पन्न होऊन ती वाराणसीला आपल्या बापाच्या घरीं जाऊन राहिली ती कांहीं केल्या परत येईच ना. असे तीन लग्नांचे तीन अनुभव आल्यामुळं अमात्यानं आपल्या दैवांत कुटुंबसुख लिहिलेलं नाहीं असं समजून त्यापुढं लग्नाचा नाद सोडला.

पण वृक्षाची एक फांदी वठली म्हणजे त्याचा जीवनरस इतर एखादी फांदी पुष्ट करतो; त्याप्रमाणं अमात्याच्या भावनेचं झालं. कुटुंबसौख्याच्या निराशेनं त्याचा जीवनरस महत्त्वाकांक्षेकड वळला आणि ती शाखा तिनं हळूहळू इतकी पुष्ट केली की, अमात्याच्या ध्यानींमनीं अहोरात्र आपण राजपद कां न मिळवावं याशिवाय दुसरा विचारच येत नाहीसा झाला. नगरच्या महाराजांचा द्वेष तो मनांतून करूं लागला आणि आपणाला राजपद लाभल्यास केवढं ऐश्वर्य प्राप्त होईल याचे मनोरे तो मनांत उठवूं लागला. महाराजांचं लक्ष राज्यकारभारांत नाही, पहावं तेव्हा ते तत्त्वज्ञानचिंतनांत मग्न असतात. संसारसुख त्यांना वावडं वाटूं लागलं. आपण निपुत्रिक आहों याचं त्यांना वाईट न वाटतां उलट आनंदच वाटूं लागला. यामुळं महाराजांच्या पश्चात् राज्याला धनी कोण होणार याची चिंता राजपरिवारांतील सर्व लोक व्यक्त करूं लागले आणि अमात्य हा महाराजांच्याच घराण्यांतला असल्यामुळं महाराज असेच निपुत्रिक वारले तर अमात्य हाच राजपदावर येणार, असं वाटून त्या भावनेनं ते अमात्याकड पाहूं लागले. यामुळं अमात्याच्या महत्त्वाकांक्षेला बाहेरूनहि उद्दीपन मिळूं लागलं.

राजकीय महत्त्वाकांक्षेच्या या तंद्रींत तो अलीकड रात्रीच्या रात्री घालवी. आजहि तो अशाच तंद्रींत सुखशय्येवर पडला होता.

इतक्यांत त्याला दारावर 'नमो बुद्धाय, नमो बुद्धाय' अशी घोषणा ऐकूं आल्याचा भास झाला. ती ऐकून अमात्य दचकला, आणि बाहेर कोण आहे तें पाहा अशी त्यानं द्वारपालाला आज्ञा केली. पण इतक्यांत रुद्रभट आपण होऊनच आंत आला; आणि नेहमीच्या सलगीनं अमात्याजवळच्या एका आसनावर हसत हसत बसला. तेव्हा त्या उभयतांचं खालीलप्रमाणं संभाषण सुरू झालं.

"अरे वा! धर्मगुरु? तुम्ही ही बौद्ध धर्माची दीक्षा कधीपासून घेतली?"

"काय, मी? आणि बौद्ध धर्माची दीक्षा? अजून पृथ्वी बुडाली नाही! सूर्यचंद्र निजधामाला गेले नाहीत! आधी माझी जिव्हा तुटेल तेव्हाच त्या परधर्मी चांडाळाचं नांव माझ्या तोंडीं येईल."

"मग 'नमो बुद्धाय' असं कोणी म्हटलं?"

"अमात्यांच्या कानाला कांही विकार झाला असेल. नाही तर ह्या नगरांत

स्वतः राजाधिकारी असतां ज्या अमंगळ शब्दांची घोषणा तुम्ही खुशाल चालू देतां त्यांचाच प्रतिध्वनि तुमच्या कानांत उठला असेल."

"मग आंत येतांना तुम्ही काय म्हणालां?"

"'नमो बुद्धाय' असं मीं कधी म्हटलं? त्या 'उ'काराचा उच्छेद या नगरांतून मीं केव्हाच केला असता. पण राजाधिकार माझ्या हातीं कुठं आहे? आणि तो ज्यांच्या हातीं आहे ते तर शांतिसागर; आणि सहिष्णुतेचे अवतार ठरूं पाहतात! मी फक्त 'नमो बद्धाय' असं म्हटलं!"

"अस्सं! पण 'नमो बद्धाय' ही तरी प्रणामाची घोषणा तुम्ही आज नवीनच काय काढलीत माझ्याकरिता? 'नमो बद्धाय' हाहि प्रयोग व्याकरणशुद्ध आहे; पण त्याचा अर्थ काय? बद्ध म्हणजे कोण? आणि मी बद्ध कसा?"

रुद्रभट पुन्हा हसून म्हणाला, "ठीकच आहे. स्वस्वरूप कळलं म्हणजे मग मोक्ष दूर नाही! पण बद्धाचं लक्षणच हें की, त्याला स्वस्वरूपाचं ज्ञान होत नाही."

"फिरून तुम्ही वेदान्तांत शिरला रुद्रभट! तुम्हा धर्ममार्तंडांना पंडितांना, वेळीं अवेळीं पंडितगिरी गाजविण्याची खोडच असते म्हणा. पण मला रूक्ष राज्यकारभाराशिवाय दुसरं कांहीच कळत नाही. म्हणून हात जोडून म्हणतों की, मी बद्ध कसा, याचा खुलासा कराल तर या अज्ञजनावर कृपा होईल!"

रुद्रभट म्हणाला, "राजभक्तीच्या अतिरेकानं, अफूच्या मादामुळं गुंगी यावी त्याप्रमाणं, अमात्यराजांच्या बुद्धीवर भूल पडलेली आहे. त्यांना एक राजभक्ति, राजनिष्ठा तेवढी दिसते. पण स्वतःचं व्यक्तिहित आणि जनतेचं हित याकड आपलं इतकं दुर्लक्ष कसं झालं आहे, याच सर्वचजण आश्चर्य करीत आहेत!"

राजनिष्ठेपुढं व्यक्तिहितानं नमतं घेतलंच पाहिजे. पण जनतेच्या हिताला मी अंध झालों हा आक्षेप मात्र मनाला बोचतो खरा. कारण आमच्या महाराजांइतकीच या राज्यांतील जनतेवर माझी निष्ठा आहे असा अभिमान मी बाळगतों."

"अभिमानाला साजेशी कृति हातून घडली तरच तो अभिमान शोभतो. पोकळ अभिमानाचं काय भूषण?"

" मग त्या अभिमानाला दूषण येईल असं तरी माझ्या हातून काय घडलं तें सांगाल की नाही ? "

" तुमच्या राजनीतिशास्त्राप्रमाणंहि अमात्य हाच राजाच्या हातून घडणाऱ्या चांगल्या-वाइटाचा धनी ठरतो की नाही ? "

" तो कसा ? "

" राजा हा ईश्वराचा अंश आणि ईश्वर कुणाचं चांगलं करीत नाही किंवा वाईटहि करीत नाही. पण प्रधान, मंत्री, अमात्य यांना राजाला सल्ला देण्याचा अधिकार. राजाच्या हातून चांगलं करविण्याचा आणि त्याच्या हातून वाईट होईल त्याला प्रतिबंध करण्याचा अधिकार, ईश्वर देतो. तो न बजावला तर त्याला इतका पगार इतक्या मोठ्या जहागिरी, इतके मोठे मानमरातब कशाला द्यावयाचे ? आपलं कर्तव्य योग्य तऱ्हेनं हातून घडेल तर अमात्यपदावर राहावं, नाही तर तें सोडून द्यावं. नाही तर--"

" काय ? याहून आणखी तिसरा प्रकार आहे ? "

" होय. तिसराहि एक प्रकार आहे. तो म्हणजे राजाला राजपदावरून दूर करणं व स्वतः राजा होणं. जनतेविषयी असलेली अमात्यांची निष्ठा एरवी कशी सिद्ध होणार ? स्वतः मंत्रिपदाचा त्याग करणं हा दुर्बळांचा मार्ग. राजाला आपलं कर्तव्य करावयाला लावणं हा बळवानांचा मार्ग; आणि तो तें करणार नाही तर त्याला पदच्युत करणं हा बलिष्ठांचा मार्ग. यांपैकी अमात्यांना कोणता पटतो तो त्यांनी सांगावा.

ही राजनीतिमीमांसा ऐकून अमात्याचं अंतरंग स्फुरण पावलं. आपल्या महत्त्वाकांक्षेला लोकमत कितपत अनुकूल आहे, हें अमात्याला अजमवावयाचंच होतं. म्हणून त्याचा उद्गार आपोआप परस्पर रुद्रभटाचा तोंडून निघालेला पाहून त्याला बरंच वाटलं. पण आपल्या मित्राच्या मनाचा आणखी थोडा ठाव घ्यावा म्हणून अमात्य म्हणाला, " मित्रवर्य, अमात्य, मंत्री, सचिव, प्रधान यांच्या कर्तव्यांचे तीन प्रकार तुम्हीं सांगितले ते सनातनच आहेत. पण मी त्यांतून कोणता पत्करावा याविषयी मला आजच निश्चयपूर्वक कांही सांगतां येत नाही. अधिकारपदाचा संन्यास करणं ही गोष्ट माझ्या हातची आहे. ती करून मी केव्हाहि आपली कर्तव्यनिष्ठा प्रकट करण्यास तयार आहेच. पण यापुढील दोन मार्ग अनुसरावयाचे तर मला खुद्द जनतेकडून कितपत साहाय्य मिळणार याचा अंदाज आधी लागणं अवश्य आहे. महाराजांना

सन्मार्गवर्ती करणं म्हणजे ताळ्यावर आणणं याला लोकमत नुसतं खवळलेलं दिसलं तरी कदाचित् पुरे होईल; पण प्रत्यक्ष राज्यक्रांति करावयाची तर तर त्याला युद्धाचीच तयारी हवी. जनतेचं साहाय्य मिळण्याची आशा असली तर मी हे दोनहि मार्ग क्रमानं अनुसरण्याला तयार आहें."

"नगरांत क्रांतीची सर्व सिद्धता आहे. अमात्य आपल्या सामर्थ्याची उपेक्षा किती दिवस करणार? नगरच्या सिंहासनाला लागलेलं धर्मशत्रुत्वाचं लांछन किती वेळ टिकूं देणार? आणि त्याबरोबर शाक्तधर्मीयांचा प्रत्यहीं होणारा नवा छळ?"

"नवा छळ काय झाला? मीं ऐकला नाही!"

"देवीच्या आज्ञेनं नगरश्रेष्ठी, अग्निवर्ण, घरचा मुलगा बळी देण्यास सिद्ध झाला होता. तो कोणा तरी शाक्त धर्माच्या शत्रूनं पळविला. मला बळकट संशय येतो की, त्या उनाड बौद्ध भिक्षूंपैकीच कोणाचं तरी हें काम असावं. या एका बलिदानानं आज पांचपंचवीस वर्षांत आमच्या सनातनी पण मलिन झालेल्या धर्माला पूर्वी मिळाला नाही असा उठाव मिळाला असतां प्रत्यक्ष देवीच्या आज्ञेनं झालेलं एक धर्मकार्य हजारो लोकांच्या स्वतंत्र धर्माचारापेक्षा फलप्रद झालं असतं."

"काय काय म्हणतां? अग्निवर्ण आणि त्याची बायको हीं आपला मुलगा बळी द्यावयाला सिद्ध झालीं?"

"होय, तो त्यांचा औरस मुलगा नव्हता. पाळलेलाच होता; पण त्याच्यावर त्यांचं, निदान भवानी देवीचं, पोटच्या मुलाप्रमाणं प्रेम होतं. हा मुलगा त्यांना गेल्या महापुरांत वाहून गेलेला मिळाला म्हणे!"

"हा मुलगा बळी द्यावा अशी स्वतः देवीची आज्ञा झाली होती म्हणतां?"

"होय, यांत तिळमात्र शंका नाहीं."

"देवीचीच आज्ञा झाल्यावर मग पाळलेला मुलगाच काय पण पोटचा मुलगाहि बळी द्यायला तीं नवराबायको मागं घ्यायची नाहीत असा माझा भरंवसा आहे. देवीची आज्ञा सृष्टिदेखील पाळते, मग मनुष्यानं न पाळून कसं होईल? महापुरांत माझी पत्नी आणि मुलगा हीं दोन्ही वाहून गेलीं तो महापूर देवीच्याच आज्ञेनं—हवं तर तिच्या रागानं म्हणा—आला असाहि माझा विश्वास आहे. धर्माचारांत शिथिलता आली म्हणजे देव-

देवता अशाच कांहीं अद्भुत प्रसंगानं त्यांना कर्तव्याची जागृति आणून देतात."

"आज मी अमात्याकड आलों त्यांत हाहि एक हेतु होता. या मुलाचा शोध लावण्याला आम्हांला राजदूतांचं साहाय्य हवं आहे, आणि तो मुलगा कोणा बौद्धानं लपवून ठेवला असला तर, महाराजांची आज्ञा मोडूनहि, तो बलिदानाला आमच्या स्वाधीन व्हावा ह्याहि कामीं आपलं साहाय्य आम्हाला पाहिजे."

"गोष्टी ह्या थराला आल्या तर तें तुम्हाला मिळेलच. पण नगरांत क्रांतीची सिद्धता आहे असं कायसं आताच तुम्ही म्हणाला तें नीटसं कळलं नाहीं."

"बौद्ध धर्माचा ह्या नगरांत तरी उच्छेद करण्याची प्रतिज्ञा केलेला, बद्ध-कंकण झालेला, हा रुद्रभट स्वस्थ बसला असेल असं का तुम्हाला वाटतं ? तसंच, राजपद मिळण्याची उत्कंठा स्वतः अमात्यांना आहे त्याहून आम्हाला ती अधिक आहे हें त्यांनी ध्यानांत ठेवावं."

"मग त्याचं बाह्यचिन्ह मला तर कुठं दिसत नाही तें !"

"बाह्यचिन्ह दिसायला केवळ अमात्यांच्या अनुज्ञेची आणि सम्मतीचीच वाट आम्ही पाहतों आहों. माझ्या पदरीं किंवा माझ्या अनुयायांच्या पदरीं सैन्य नाहीं. पण मी मनांत आणीन तर सिंहासन रिकामं पाडण्याचं काम माझ्या एखाद्या यःकश्चित् सच्छिष्याकडून सहज करवीन."

"तें कसं ?"

"नगरचे महाराज जिवावर उदार झाल्यासारखे निर्भय होऊन कसे वागतात हें अमात्यांना माहीतच आहे. ते आपणाजवळ एकहि परिचारक राहूं देत नाहींत. कदाचित् लवकरच बुद्धसंघांत जाऊन मिळण्याची उत्कंठा महाराजांना लागली असेल. म्हणूनच जणू काय वैराग्याचं हें शिक्षण महाराज अनुभवांत आणीत असावे! बलिदानांत निष्णात झालेला माझा एखादा शिष्य तरवारीच्या एका हातानं महाराजांना नाहीसे करून अमात्यांचे पाय सिंहा-सनाला लावील."

"छे, छे! बोलूं सुद्धां नका. राजहत्येचं हें हत्यार दुधारी असतं. राजा कितीहि वाईट असला तरी प्रजेला राजवध मानवत नाहीं. मात्र राज्यक्रांतीची गोष्ट वेगळी आहे."

" ठीक आहे. अमात्यांना राजवध मान्य नसेल तर नगरांतील राज्यक्रांतीला आम्हीं तोंड कसं फोडावं याविषयी तरी राजकारणधुरंधर अमात्यांनी कांही उपाय सांगावा. मी सगळं नगर पोखरून ठेवलं आहे. क्रांति करून उठायचं झालं तर नगरांतील एकहि शाक्त मागं घेणार नाही. याचा अनुभव मी अनुयायांच्या ज्या गुप्त सभा भरवितो त्यांत मला दिसून आला आहे."

इतकी खातरमजा झाल्यावर, विश्वास पटल्यावर, अंतरंगांत शिरून आपल्या मनांतले गुप्त विचार बाहेर काढण्याला अमात्यालाहि स्फुरण यावं यांत काय आश्चर्य ?

अमात्य म्हणाला, " गुप्त सभा आणि मंडळ्या यांचे गुण वेगळे; आणि प्रसिद्ध रीतीनं भरविलेल्या महासभा, महापरिषदा, महासंमेलनं यांचे गुण निराळे. गुप्त सभांतील कुजबुज कोणाला ऐकूं जाणार नाही इतकी हळू चालवयाची असतां धैर्य व धाडस कुणी हवं तितकं दाखवावं. पण सभा समेलनांतून जें बोललं गेलं तें वज्रलेप झालं. तें कोणालाहि परत घेतां येत नाहीं. कारण तें परत घेण्याची लाज वाटते आणि लोक छीःथूः करतात. म्हणून बोलणारा जपूनच बोलतो. तसंच गुप्त मंडळामधें फार थोड्या लोकांचा संबंध एकत्र येतो, यामुळं कोणाच्या मनांत कपट करून दुसऱ्याला फसविण्याचं आलं तर तें साधून जातं. सभासंमेलनांतून असं कपट करतां येत नाही. कपट करणाऱ्याला ओळखणारा कोणी ना कोणी तरी सभेंत भेटतोच. आणि त्याचं कपट बाहेर काढतो. तसंच सभासंमेलनांतून हजारो लोकांचा समुदाय जमलेला पाहिला म्हणजे कोणाच्याहि अंगांतलं बळ आणि धैर्य शतगुणित वाढतं. तुमच्या गुप्त सभा–मंडळ्या काय करतात, काय बोलतात, हें मला ठाऊक नाही असं समजतां काय ? माझे हेर तुमच्याहिभोवती फिरत असतात. पण तुम्हाला सांगतों की, तुमच्या गुप्त सभांतून लांब जिभा काढून जे बोलले त्यांतले तुम्हाला वेळीं फारसे उपयोगी पडावयाचे नाहीत. तेव्हा तुम्ही प्रसिद्धपणं शाक्त धर्माच्या अनुयायांची सभा, परिषद व संमेलन भरवा. त्याला अधिकांत अधिक जितके लोक येतील तितके यावे असं करा; आणि त्या ठिकाणीं महाराजांच्या परधार्जिण्या धर्ममताचा उघड गवगवा आणि निंदाहि करा. म्हणजे पाहा चमत्कार काय होतो तो ! हे बौद्ध लोक आपल्या महासभा केवढ्या मोठ्या भरवितात तें पाहा. बौद्धसंघ लहान आहेत तरी केवळ आपल्या उघड्या

मतप्रचारानं त्यांचं कार्य दशगुणित—शतगुणित आहे त्याहून मोठं आहे असं जगाला भासतं. अशी एखादी महासभा भरवून तिचं एकादं शिष्टमंडळ महाराजांकड पाठवायचं ठरवा. मग मी तिथंच आहे. काय करावयाचं, महाराजांना काय सांगावयाचं, किंवा आंतून सूत्रं कशीं चालवावयाचीं, दान खोटं कसं पडेल आणि द्यूत कसं जिंकलं जाईल हें सगळं मी पाहतों. माझ्यावर सोपवा."

पण यावर रुद्रभटानं अशी एक शंका पुढं मांडली की, "बौद्धसंघ लहान पण फारच संघटित, यामुळं बलवान. त्यांच्या ऐक्यांत बाहेरून कोणीहि बिघाड करूं शकत नाही. त्यांचीं धर्मतत्त्वं नवीं आणि स्वतंत्र बुद्धीचीं यामुळं तीं पसरण्याला प्रतिबंध होत नाही. झाडाच्या शाखा वर अंतराळांत हव्या तितक्या हव्या तिकड वाढूं शकतात; पण भूमींत खडक किंवा दलदल असे प्रतिबन्ध आले म्हणजे मुळ्या वाढूं शकत नाहीत. आमचा हा शाक्तधर्म आहे सनातन, पण त्याचं सनातनत्वच त्याला नडतं. एकाचं एकाला पटत नाही. जो तो नुसता आत्मसंतुष्टच राहतो. इतकंच नव्हे तर दुसऱ्याच्या पदरीं कमीपणा बांधण्याचा हरप्रयत्न करतो."

अमात्य म्हणाला, "तें सर्व मला माहीत आहे. आहे काय त्याविषयी मी बोललों नाही. करावयाला पाहिजे काय एवढंच मीं सांगितलं. तुम्ही पुढारीपण घ्या, आणि महासभा भरवा. तुमच्या प्रज्वलित तेजानं नगरचे लोक आधीच दिपून गेले आहेत; आणि ही महासभा तुमचं तेज अधिक उज्ज्वल होण्याला उपयोगी पडेल. माझं पाहणं एवढंच आहे की, कसं का होईना, खवळलेलं लोकमत महाराजांनी पाहिलं म्हणजे एक तर त्यांनी नमतं घेतल्यामुळं आपलं इष्ट कार्य साधेल; नाही तर राज्यक्रांतीच्या मार्गाला लागायला आम्हांला हवं तें निमित्त सापडेल."

प्रकरण पंधरावें

शाक्त-परिषदेची तयारी

महापरिषद् भरवायची असेल तर ती बौद्धांच्या संघ-परिषदेसारखी प्रचंड भरली पाहिजे असा सल्ला अमात्यांनी दिला तो रुद्रभटालाहि पटला. लौकिक व्यवहारांत संख्याबळ हें केव्हाहि पाहिलं असतंच. ज्याच्या जन्माला फार तर पांचपंचवीस वर्षं झालीं त्या धर्मपंथाच्या नांवानं भरविलेल्या परिषदांना दूरदूरहून हजारो लोक यावेत ! आणि हजारों वर्षांच्या जुन्या सनातन वैदिक धर्माची परिषद नगरांतल्या नगरांत भरावयाची असतां तिला जर फार थोडे लोक आले, तर त्या प्राचीन धर्माचा कमकुवतपणा दिसून येणार ! ही आपत्ति नव्या उपक्रमावर उघड येणारी होती. बौद्ध धर्म संघटित. त्याला अजून फाटे फुटले नव्हते. उलट वैदिक धर्मात फाटाफूट फार. बौद्धधर्माला अनेक ठिकाणांहून राजाश्रय मिळे. शाक्त धर्माची त्याच्या खुद्द राजधानींतच उपेक्षा !

ही संख्याबलाची अडचण त्यानं अमात्यापुढें मांडली. तेव्हा अमात्य म्हणाला—

" मित्रवर्य, परिषदेचं संख्याबळ वाढवायचं तर तिची व्याप्ति संकुचित म्हणजे केवळ शाक्त लोकांपुरती ठेवून चालावयाचं नाही."

" मग ती कशी वाढावयाची ? "

" बौद्ध धर्माचे सर्व प्रतिपक्षी एकत्र करून. जो जो म्हणून कोणी आपल्या शत्रूचं शत्रुत्व करतो तो तो प्रसंगानुसार आपला मित्र समजावा. या नगरांत शाक्त धर्म हा मुख्य असला तरी इतर उपधर्मपंथाचे अनुयायीहि कांही थोडे नाहीत."

" पण ते एका परिषदेंत समाविष्ट करावयाचे कसे ? त्यांचीं उपास्यदैवतं वेगळीं, त्यांचीं धर्मतत्त्वं व धर्माचार वेगळे. शिवाय सर्वांचा परस्परांशीं द्वेष. तेव्हा ही आवळ्याची मोट बांधावी कशी ? "

" यांतच तर घटनाचातुर्य आहे. हे सर्व धर्मपंथी परस्परांचा द्वेष करोत,

पण ते सर्व मिळून बौद्ध धर्माचा द्वेष करणारे आहेत ना ? झालं तर. हें एक वस्त्र घ्या आधी ही आवळ्याची मोट बांधायला."

"पण ही मोट बांधून झाल्यावर तिच्यावर सर्वांना लागणारं, लागू पडणारं असं कांही तरी एकच नांव नको का ? 'बौद्धद्वेष्टे' हें खरं असलं तरी तें मिरवायला कमीपणाच वाटणार ! मनांतून द्वेष जळत असला तरी बाहेर प्रकट न व्हावा, तो सहज झाकला जावा, असं दाक्षिण्यसूचक सौम्य व सार्थ असं एकादं नांव सुचतं का पाहा !"

"वा ! असं नांव मजजवळ तयार आहे. बौद्ध धर्माचा द्वेष आपण सर्व— आम्ही व ते—करतों त्याचं कारण सांगा पाहूं ?"

"त्या नव्या धर्मानं जुन्या वैदिक धर्मावर आघात केला हें."

"झालं तर. बौद्ध हे वैदिक धर्माचा द्वेष करीत असतां त्यांनी वैदिक धर्म-द्वेष्टे असं नांव न घेतां बौद्ध म्हणजे बुद्धानुयायी असं नांव घेतलं, त्याप्रमाणं आपण सर्वांनी बौद्धद्वेष्टे अशा अर्थाचं नांव न घेतां वैदिक धर्मानुयायी असं नांव घ्यावं. ही होणारी परिषद 'वैदिक परिषद' म्हणा म्हणजे झालं. या मोठ्या नांवांत सर्व लहान नांवांचा समावेश बिनबोभाट होईल."

"ठीक. ही युक्ति बरी दिसते. आतां असं करण्यांत शाक्त या नांवाचं महत्त्व थोडं कमी होतं—"

"मोठं कार्य साधावयाचं तर क्षणभर आपल्या स्वतःच्या नांवाचा अभिमान आवरून धरावा लागतो. त्याला काय करणार ! पण परिषद बोलावण्यांत पुढारी, आणि परिषदेच्या कार्यक्रमाचे चालकहि, आपणच असल्यामुळं अखेर परिषदेंतून कार्यनिष्पत्ति होईल ती खास शाक्तपंथाच्या लाभाचीच होईल. त्याविषयी शंका नको. समजा ! या परिषदेंतून राज्यक्रांति निघाली तर नवा राजा होईल तो कोणत्याहि बारीकसारीक रोडक्या वैदिक धर्म-पंथाचा होणार नाही तर शाक्तांचाच होईल. नव्या राजाकडून उत्तेजन व राजाश्रय मिळेल तो शाक्तपंथालाच मिळेल."

"आणि मग या इतरांना वैषम्य वाटेल त्याची वाट ? आम्हीं परिषदेंत सहकार्य केलं, क्रांतिकारकांना होणाऱ्या दंडांना पात्र करून घेतलं, आणि शेवटीं तोंड व माथा उजळ झाला तो दुसऱ्याचाच, किंबहुना आपल्याच एका उपप्रतिपक्षाचा, असं नाही का त्यांना वाटणार ?"

"वाटेल. पण तसं वाटून काय उपयोग? लहानांनी, दुर्बलांनी मोठ्यांशीं, बलवानांशीं सहकार्य करतांना हें ध्यानांत ठेवावंच लागतं की, या सहकार्यांत आपणाला स्वाभिमानाच्या दृष्टीनं मोठा लाभ होणार आहे असं नाही. तर आपल्या द्वेषबुद्धीचा उपशम होईल हें काय थोडं झालं? मनुष्य अंग खाजिवतो तो स्पर्शसुखासाठी नव्हे तर कंडूच्या शमनार्थ. साप मनुष्याला चावतो तो रक्त पिण्याकरिता नव्हे तर शेपटीवर पाय देणाऱ्याचा द्वेष उगविण्याकरिता."

"पण आतां हे वैदिक धर्मानुयायी नगरांत हुडकून काढावयाचेच कसे?"

जो अजून बौद्धधर्मानुयायी झाला नाही त्याला आपलाच समजून भेटावं. त्याच्या धर्मपंथाची स्तुति करावी; पण त्याबरोबर आपलं नातं जोडण्याकरिता तुम्ही आम्ही कांही झालं तरी मूळ वैदिकच असं बजावून सांगावं. त्यांच्या उपास्यदेवतेचं वर्णन करणारी एखादी वेदांतली ऋचा म्हणावी. न आठवली तर पदरची रचावी. कारण त्याचं झालं तरी अज्ञान आपल्यासारखंच असणार; आणि तो जाणता असल्यानं त्याला ती ऋचा न पटून जर तो म्हणाला की 'ही ऋचा वेदांत नाही' तर म्हणावं की वेद अनंत आहेत त्यांचा पार कोणाला लागला आहे? पण ऋचेंत वैदिक देवतेचं वर्णन तर आहे ना? तोच तिच्या खरेपणाचा पुरावा. वेद हे स्वतःप्रमाण असतात. त्याला म्हणावं की बाबा रे, तुम्ही आम्ही समदुःखी आहों. म्हणून सर्व वैदिकांनीं मिळूनच या अवैदिक धर्माचा पाडाव करायला पाहिजे. हें त्याला पटेल व तो परिषदेच्या तयारीला लागेल की नाही पाहा!"

मग परिषदेला राजाश्रय मिळवून देण्यासंबंधानं रुद्रभटानं गोष्ट काढली तेव्हां अमात्य म्हणाला, "मी गोष्ट काढतों, पण राजाश्रय कसला मिळणार? उलट परिषद्बंदीची राजाज्ञा न निघो म्हणजे मिळविली. पण एवी तेवी आपणाला महाराजांचा चित्तक्षोभ घडवून आणावयाचाच आहे, त्याचं कार्य होईल. कलहाला एका हाताची टाळी उपयोगी पडत नाही. हातावर हात पडावा लागतो. असो. तें काय कसं करावयाचं तें मी पाहून घेईन. तुम्ही तर आपल्या उद्योगाला लागा."

अशा रीतीनं अमात्यानं समजूत पटविल्यावर रुद्रभट उत्साहभरित होऊन घरीं गेला. आणि दुसरे दिवसापासून आपले हस्तक गोळा करून त्यानं

नगरांतील शाक्तांशिवाय इतर वैदिकपंथी लोकंहि हुडकून काढण्याला सुरुवात केली.

* * *

परिषदेला राजाश्रय नाही म्हणून तो आश्रय देण्याचं काम नगरशेठजीवर ओघानं येतं असं रुद्रभटानं अग्निवर्णाला सांगितलं. तें त्याला पटलंहि. नगरशेठ म्हणजे नगरांतला पहिला नागरिक. तो मान काय सुखसुखी कोणी कोणाला देतो? किंवा भोगणारानं तसा भोगावा? मानाकरिता झीज सोसलीच पाहिजे. एका स्वार्थाकरिता दुसऱ्या स्वार्थाचा त्याग केलाच पाहिजे. आणि राजाच्या हातून होण्याच्या योग्यतेचं काम ज्याला करावयाला कोणी सांगितलं, त्यानं त्याला राजाचा म्हणजे नगरशेठच्याहि वरच्या प्रतीचा मान दिला की नाही? आणि सर्वांत मोठी गोष्ट ही की, ही परिषद भरून शाक्त धर्माच्या उन्नतीचं जें कार्य बलिदानानं सुरू होणार त्याचं पहिलं फळ म्हणजे अग्निवर्णाच्या स्त्रीला पुत्रलाभ होऊन तिच्याबरोबर अग्निवर्ण पुन्हा आनंद-समुद्रांत पोहूं लागणार! अशा रीतीनं सर्व निरनिराळ्या युक्तिवादांचं तात्पर्य एकच निघत होतं.

स्वार्थ-परार्थ-परमार्थ यांचा त्रिवेणीसंगम या परिषदेंत होणारा यामुळं अग्निवर्णानं आपल्या पिशवीचं तोंड अगदी सैल सोडलं. या कार्याला दोन हजार सुवर्णमुद्रा लागतील असं रुद्रभटानं सांगितलं. त्याप्रमाणं ती रक्कम त्याच्या स्वाधीन करण्यांत आली. परिषद महाकालीमंदिराच्या भव्य पटांगणांत भरविण्याची योजना झाली. सगळीकड साफसुफी करण्यांत येऊन प्रचंड मंडप उभारला. प्राकाराबाहेरच्या वृक्षछायेखाली प्रतिनिधींकरिता तात्पुरती निवास-मंदिरं व आरामगृहं उभारण्यांत आलीं. पटांगणातले पूर्वीचे दोन वधस्तंभ ठाकठीक करण्यांत येऊन शिवाय बाहेर दोन नवे वधस्तंभ उभारले. न जाणो बाहेरगांवचे शाक्त येतील त्यांना देवीला महानैवेद्य अर्पण करण्याची इच्छा झाली तर पशुवधाची तयारी असावी; खोळंबा व गर्दी होऊं नये! ही तयारी होऊं लागली तसतसं महाकालीच्या मूर्तीच्या तोंडावरील तेज अधिकाधिक चमकूं लागलं असं अनेक शाक्तांना प्रत्यक्ष दिसलं!

परिषदेच्या ठरल्या दिवसाआधी दोनतीन दिवस महाकालीमंदिराचं आवार नेहमीपेक्षा पुष्कळच अधिक गजबजूं व गजूं लागलं होतं. एकाच देवतेला किती निरनिराळीं नांवं आहेत या दृष्टीनं संशोधनपूर्वक विचार केला तर

असं आढळेल की याविषयी शक्तिदेवीचं ऐश्वर्य सर्वोत्तम ठरेल. शिवसहस्रनाम हा शब्द आम्हीं ऐकलेला नाही. विष्णूला सहस्र नांवाचं ऐश्वर्य आहे. पण कदाचित् शक्तीच्या ऐश्वर्याचा हेवा वाटूनहि कदाचित् तें कोणी रचिलं असेल. कसंहि असो. वर सांगितलेल्या काळांत कालीमातेच्या आवारांत इतर आवाजांच्या गजबजींत देवीच्या निरनिराळ्या नांवांचा उच्चार मिसळून गेला होता. विद्यार्थि शब्दांच्या किंवा कविताच्या भेंड्या लावतात त्याप्रमाणं हीं देवीचीं नांवं उच्चारतांना, पूर्वी दुसऱ्यानं उच्चारलेलं नांव उष्टं म्हणून आपण न उच्चारतां दुसरंच एखादं घ्यावं, या ईर्षेनं अनेक प्रसिद्धांबरोबर अप्रसिद्ध नांवांचाहि उच्चार ऐकूं येई.

देवीनामाच्या या गर्दीमधे इतर देवतांचीं नांवं सहजच लुप्त झालीं. वैदिक परिषदेला आलेल्या सभासदांचीं दैवतं अनेक होतीं; पण परिषदेचा सर्व कारभार कालीमातेच्या सान्निध्यांत असल्यामुळं तिच्या नांवालाच तेवढं महत्त्व यावं हें स्वाभाविक होतं. सभासद कालिकामंदिरासन्निध येतांच आंत जाऊन देवीचं दर्शन घ्यावं असं त्यांना सहजच वाटे. देवीपुढं प्रत्यक्ष उभं राहिलं म्हणजे तिचंच नांव तोंडाला यावं हें स्वाभाविक आहे. दुसऱ्या कोणाचं कसं येणार? आवारांत प्रदक्षिणा करतांना इतर देवतेचं नांव घेणं विसंगत दिसतं म्हणून, आणि कोणी शाक्त समोर उभा असतां इतर देवतेचं नांव उच्चारणं हें त्याचा अपमान केलासा होईल या भीतीनं, आणि एकंदरीनं मंदिराच्या आसपास तिचीच सत्ता, या जाणीवेनं—म्हणजे दाक्षिण्य किंवा न्यायबुद्धि यांच्यामुळं, अशा अनेक कारणांनी घोष ऐकूं येई तो फक्त कालीदेवीच्या नांवाचाच ऐकूं येई.

पण परिषदेच्या मंडपाशेजारच्या एका लहानशा उपमंडपांत जेव्हा परिषदेच्या नांवाची कसून चर्चा सुरू झाली, तेव्हा तींत मात्र इतर देवतांचीं नांवं मोठमोठ्यानं उच्चारलेलीं ऐकूं येत. याचं कारण असं. परिषद एकंदरीनं वैदिक देवतानुयायांची खरी, पण परिषदेचं नामाभिधान हें वादग्रस्त ठरलं. वैदिक परिषदेला म्हणून लोकांना बोलावणं करण्यांत आलं. यामुळं वैदिक हें एकच नांव लावून परिषदेचा सर्व व्यवहार करावा, अशी बाहेरगांवांच्या एका प्रतिनिधीनं सूचना केली. पण ती बोलावणारे पडले शाक्त; तिजमधे प्रमुखपणं वावरणारे शाक्त; तिचा खर्च करणारे शाक्त; नगरचा राजा अजून तरी सनातन शाक्तधर्मी; आवार शाक्त देवीचं. तात्पर्य चोहों बाजूंनी शाक्तांचंच

महत्त्व प्रतीत होत असल्यामुळं शाक्त-परिषद असं नांव द्यावं असंच एका ज्वलज्जहाल शाक्तानं उलट सुचविलं. मग काय विचारतां ? कडाक्याचा वाद-विवाद सुरू झाला.

"ज्या नांवानं परिषदेला आमंत्रण केलंत तें नांव खरं करा. एका मिषानं बोलावणं करून दुसरं कार्य करणं हें अन्यायाचं ! आणि त्यांतूनहि बोलावणारांनीं आपलंच कार्य साधूं पाहाणं हें तर अक्षमपणाचं ठरेल."

"बोलावणं केव्हाहि स्थूल नांवानंच होतं, पण पुढं प्रत्यक्ष परिषदेपूर्वी सूक्ष्म छाननी केल्याशिवाय कसं भागेल ? हा साधा परिषदेचा नित्य व्यवहार समजण्याला फारसं शहाणपण लागत नाही. तें अंगीं नसणारांनीं परिषदांना उपस्थित होऊन स्वतःचं हसं करून घेऊं नये हें बरं नव्हे काय ?"

"आहे माहीत शाक्तांचं महत्त्व ! आतां तें बौद्धांनीं उरूं दिलं आहे कुठं ? तें असतं तर आम्हासारख्या इतर पंथानुयायांची मदत घ्यावी लागली नसती ! लंगडयांनी गावदरींत चरावं ! आपला दिमाख दाखवायला बाहेरच्या लोकांना असं आमंत्रण करावंच कशाला ? अशा परिषदा, म्हटलं आम्हींहि भरविल्या आहेत. त्यांचा व्यवहार आम्हाला चांगला कळतो."

वाद वाढतोसा पाहून एकानं असं सामोपचारार्थ सुचविलं की, नुसतं शाक्त किंवा नुसतं वैदिक असं एकच विशेषण परिषदेला न लावतां तीं दोनहि लावावीं म्हणजे झालं. ही कल्पना कित्येकांना एका दृष्टीनं पसंत पडली; पण दुसरे कित्येक म्हणाले, "वैदिक हें कबूल; पण त्याच्या जोडीला शाक्त हें विशेषण जोडल्यानं फक्त एका उपपंथाला महत्त्व येतं. मग आम्हा बाकीच्यांचे वैदिक पंथ म्हणजे पंथ नव्हेत की काय ? शाक्त याबरोबर आणखी कांही पंथांचीं नांवं वैदिक या विशेषणाच्या जोडीला घालावीं."

पण आपला पंथ मोठा किंवा खरा असं प्रतिपादणाऱ्या पंथांचीं अनेक नांवं घालायचीं तर परिषदेचं सबंध नांव उच्चारून संपणंच अशक्य होईल. राजा दरबारांत चालत येऊं लागला म्हणजे त्याचा झगा त्याच्यामागं दहा पावलं लोळत येतो, व तो उचलून धरायला मांडलिक राजकुमार असतात तसं या परिषदेच्या नांवाचं करून कसं होईल ? म्हणून मतं मोजतां वैदिक व शाक्त हीं दोनच विशेषणं परिषदेला लावावीं असं ठरलं.

पण फिरून वाद सुरू झाला. 'वैदिक' व 'शाक्त' या दोन शब्दांपैकी आधी कोणता लावावा व नंतर कोणता लावावा याचा निर्णय होईना. त्याच्या

निर्णयाकरिता निःपक्षपाती वैयाकरण बोलावून आणावे लागले आणि "वैदिक शाक्त परिषद" आणि "शाक्त वैदिक परिषद" या शब्दप्रयोगांत वैदिक व शाक्त या शब्दांना कसकसं कमीअधिक महत्त्व येतं याचा वाद चालू झाला!

हा वाद म्हणजे, नामामागं विशेषण लावलं असतां नामाचं महत्त्व विशेषणाला गुंडाळून घेतं, की विशेषणामुळं नामाचं महत्त्व मर्यादित होतं अशा प्रकारचा होता. शाक्त हें विशेषण वैदिक या शब्दाच्या आधी लावलं तर शाक्त असतील अशाच वैदिकांची ही परिषद असं ठरणार, म्हणून तें पद आधी घालण्याला इतर वैदिकांनी आक्षेप घेतला. तर मग, आधी वैदिक हा शब्द घालून मग शाक्त हा शब्द घाला, आम्हांला चालेल, अशी सूचना एका धूर्त शाक्तानं केली. ती वैदिक लोकांना मान्य होणार असं पाहून एक धूर्त वैदिक म्हणाला, "अरे ही तर गव्हाची कणीक करून तुम्ही देता. वैदिक का असत ना! पण परिषद शाक्तांची असाच नाही का याचा अर्थ होत? वैदिकांची सभा असाच शब्दप्रयोग घातला पाहिजे. मग त्याकरिता आम्हाला कोणी शाक्त म्हटलं तरी चालेल." तिऱ्हाइतासारखा दिसणारा एकजण म्हणाला, "विशेषण आणि नाम हीं, मधे कांही अव्यय घातल्याशिवाय जोडलीं गेलीं म्हणजे दोघांचंहि कार्य साधत नाही. म्हणून 'वैदिक आणि शाक्त परिषद' असं परिषदेला नांव द्या म्हणजे झालं."

"हा हा! ही तोड ठीक आहे." असा संमतिदर्शक उद्गार पुष्कळांच्या तोंडून एकदम निघाला. पण त्यावर लगेच दुसरा एकजण ओरडून म्हणाला, "या सूचनेनं कांहीच साधत नाही. कारण तसं केल्यानं वैदिक आणि शाक्त हे परस्परांहून अगदी भिन्न आहेत असंच नाही का ठरत?" वैदिक हे शाक्त नसतात किंवा शाक्त हे वैदिक नसतात असं थोडंच आहे. मग या दोघांना नामनिर्देशानं वेगळे कां करतां? तुम्ही जूट करायला हीं परिषद भरवितां की फूट करायला?"

परिषदेला नांव काय द्यावं याविषयीचा वाद आठ प्रहर चालला. चर्चा करणारांचे घसे बसले. हातघाईचे प्रसंग अनेक आले. कित्येकांचीं डोकीं फुटलीं. शेवटीं 'समस्त वैदिक परिषद' असं नांव देण्याच्या सूचनेवर एकमत होऊन परिषदेची वेळ आणि कार्यक्रम निश्चित करण्यांत आला. हा निर्णय अमात्यांनी सुचविला असं आधारपूर्वक सांगण्यांत आलं तेव्हाच हा तंटा मिटला.

प्रकरण सोळावें

'समस्त' वैदिक परिषद

वैदिक परिषदेला सुरुवात होण्याच्या सुमाराला वैदिक पंथांतलि निरनिराळ्या उपपक्षांचे पुढारी आपापलीं विशिष्ट चिन्हं व पोषाख धारण करून येऊं लागले. त्यांना पाहून अग्निवर्णाला मोठं समाधान वाटलं. हे सर्व लोक या परिषदेकरिता मुद्दाम येत आहेत. ही परिषद वैदिक धर्माच्या पुनःसंस्थापने-करिता भरत आहे. तिजमधे इतर पंथांवर शाक्त पंथाचं वर्चस्व स्थापलं जाणार आहे. तसं झालं म्हणजे देवीला बलिदान करण्याच्या धर्माचाराला तेज चढणार आहे. तें तेज चढलं म्हणजे मुरारीला बळी देण्याच्या कामीं राजालाहि हरकत घेतां येणार नाहीं आणि अशी हरकत न येतां मुरारीचा बळी दिला म्हणजे आपल्या बायकोला मुलगे होऊन ते जगण्याच्या मार्गांत येणारं विघ्न दूर होईल. तसं झालं म्हणजे ती व तिज-बरोबर आपणहि सुखी व आनंदी होऊं. तात्पर्य, एका कामांत अनेक कामं साधून व्यक्तिशः स्वतःचेहि चारी पुरुषार्थ साधणार; आणि त्याबरोबर आपल्या समाजाचं धर्मकार्य होणार. आणि हें सर्व घडवून आणण्याला कारण आपला मित्र रुद्रभट याचं मित्रप्रेम, धर्मनिष्ठा व व्यवहारकुशलता. या गोष्टी लक्षांत घेऊन अग्निवर्णाला कृतज्ञतेचं भरतं आलं, "वैश्य बच्चा हा कितीहि श्रेष्ठ व श्रीमंत असला तरी आपलं मोठेपण येऊन जाऊन व्यापार व उदीम यांतच. धर्माच्या कामांत जे पडतात ते सर्व आपणापेक्षा श्रेष्ठ होत. तो अधिकार ब्राह्मणांचा. त्या कामीं श्रेष्ठता त्यांचीच." या विचाराने दडपून जाऊन अग्नि-वर्ण सभामंडपाच्या द्वारांत हात जोडून खाली मान घालून नम्रपणें उभा होता.

अग्निवर्णाच्या मनावर या प्रसंगानं आणखी छाप पाडावी या हेतूनं रुद्रभट म्हणाला, "अग्निवर्णा, माझ्या निमंत्रणानं आलेले वैदिक पक्षाच्या सैन्याचे पुढारी तुला पाहावयाचे होते ना? पाहा. आता तुला ते हळूहळू दिसूं लागतील. केवळ तुझ्या हिताकरिता हे सर्व धर्मगुरु आपापल्या पंथाचा अभिमान सोडण्याला तयार झाले आहेत. केवढं तुझं भाग्य!"

उपकाराच्या बुद्धीनं दडपून गेलेला अग्निवर्ण भरून आलेल्या कंठानं हलक्या

आवाजानं म्हणाला, " मित्रा हे सर्व तुझेच उपकार! मी तोंडानं किती कसे कसे बोलून दाखवूं ! "

असो. सर्वांच्या आधी येऊन मुख्य स्थान पटकावण्याच्या इच्छेनं एक अगडबंब महाशैव आंत आला. या महाशैवाबरोबर त्याचे कांही अनुयायी आले. तेहि आपआपल्या लहानशा पक्षाचे पुढारीच होते. ते असे. आद्यशैव-त्यांच्या दोहों हातांवर तप्त मुद्रांकित चिन्हं होतीं. रुद्रशैव—यांच्या कपाळावर त्रिशूळ छापलेला होता. अग्रशैव-यांच्या दोन्ही हातांवर डमरु रंगविला होता. भट्टशैव—यांच्या कपाळावर लिंगप्रतिमा होती. जंगमशैव—यांनी लिंगप्रतिमा गळ्यांत धारण केली होती. पाशुपतशैव—यांनी लिंगदर्शक मुद्रा कपाळ, छाती, बेंबी व हात यांजवर उठविल्या होत्या. याशिवाय दहा प्रकारचे दंड धारण करणारे दशनामीहि होते. पहिले सहा प्रकारचे शैव सांगितले त्यांचं कोणाला भय वाटण्यासारखं नव्हतं. कारण त्यांच्या तप्तमुद्रा अंगावर घेतांना त्यांचंच अंग काय भाजलं असेल तेवढं. पण त्या मुद्रा पाहाणाराला भय न वाटतां ते अलंकारच वाटत. दशदंडी पाहून मात्र किंचित् भीति वाटण्यासारखी होती. कारण राग आला असतां, ते आपले दंड केव्हा उगारतील व कोणाच्या डोक्यांत घालतील याचा नेम काय सांगणार ?

ऊर्ध्वबाहु व आकाशमुखी या नांवाच्या पंथाचेहि कांही आले होते. त्यांच्या दर्शनानं भीति न वाटतां फक्त एक प्रकारचा उद्वेग वाटे. ऊर्ध्वबाहु यांनी आपले दोनहि हात उचलून धरण्याची सवय केली होती व ते वरच्यावर वाळविले होते. ते हात जहाजाच्या कायमच्या उभ्या डोलकाठ्यांसारखे वाटत. आकाशमुखी हे फक्त सूर्य असेल त्या दिशेला तोंड करून उभे राहावयाचे. सभा पूर्व दिशेला असली व त्या वेळीं सूर्य पश्चिमेकड वळला असला तर हे सभेकड पाठ फिरवून पण तिला उद्देशून भाषण करावयाचे. त्या जुन्या काळीं सूर्य रात्रीं आपल्या पायातळीं—पाताळीं दुसऱ्या गोलार्धासन्मुख असतो हें शास्त्रीय ज्ञान नव्हतं. त्यांच्या मतं सूर्य रात्रीं अदृश्यरूपानं उलटा वाट चालून आभाळांतून परत पूर्वेला सूर्योदयकालाच्या टिपणाला क्षितिजावर येऊन बसतो. (जसा कांही रात्रीं आईबाप झोपी गेल्यावर हळूच उठून नाटक पाहून परत गुपचूप आपल्या अंथरुणावर रोजच्यासारखा सकाळीं पहुडणारा आज्ञाधारक मुलगाच !) अशी कल्पना असल्यामुळं हे आकाश-मुखी लोक रात्रीं सूर्य असेल त्या दिशेला अदमासानं तोंड करून राहात.

पण महाशैवांच्या अनुयायांपैकी अघोरपंथी व कापालिक हे मात्र असे होते की, त्यांच्याकड पाहून भीतिच वाटावी. अघोरी व कापालिक हे शिवापेक्षा शक्तीचेच आपण खास अनुचर अशा भावनेनं तिच्या वेषभूषेचंच अनुकरण अधिक करीत. म्हणजे ते केशकलाप मोकळे सोडून कपाळभर शेंदूर तर चर्चीतच पण कित्येकजण अर्भकांच्या कपाळांच्या कवट्या माळेच्या रूपानं गळयांत घालून भरसभेंत येत. आणि प्रतिष्ठित लोक सभागृहांत डबी काढून तपकीर ओढतात त्याप्रमाणं हे झोळींतून एखादा नरमांसाचा तुकडा काढून चावीत. किंवा वाळल्या बेलफळांतून चिताभस्माची चिमूट हातावर घेऊन अंगाला फाशीत. इतर कित्येकजण हातांतली रुद्राक्षाची माळ जपीत, तर कित्येक बिल्वपत्राचा डहाळा चवरीसारखा आपल्याभोवती वारीत. एकानं डोक्यावर चंद्रकोर लावली होती; आणि शिव व शक्ति हीं दोघ अखंड रूप आहेत अशी आपली भावना प्रकट करण्याकरिता एकजण अर्धनारी नटेशाचा पोषाख करून आला होता!

शैवांमागून वैदिक महावैष्णव आपले अनुयायी घेऊन आला. या अनुयायांमधे शैव व शाक्त यांच्याइतकं पोषाखाचं वैचित्र्य नव्हतं. होतं त्यांतहि अद्भुतपणा फार थोडा होता. विष्णु हें दैवत सौम्य; त्याप्रमाणं वैष्णवांचं रूपहि सौम्य. वैचित्र्य होतं तें इतकंच की, श्रीविष्णूचे अवतार निरनिराळे त्यामुळं कोणी कोणी त्या त्या अवतारांचं दर्शक असं एखादं चिन्ह अंगावर कुठं तरी धारण केलं होतं. माशाच्या, कासवाच्या आकाराचं गंध कपाळावर लावणारा एखादा होता, तर कोणी गदा, परशु, कोणी धनुष्य अशीं आयुधं धारण केलीं होतीं. एकानं आपल्या अंगरख्याच्या दोन हातोप्यांवर दुसरे दोन हात लावून चार असल्याचा आभास निर्माण केला होता. शंख, चक्र व पद्म या खुणांच्या पांढऱ्या स्वच्छ गंध-मुद्रा कोणी धारण केल्या होत्या; आणि गंधाचा नाम नाकावर यावा की भिवया सोडून वर असावा याविषयी कांहीं कांहींनीं बरीच खबरदारी घेतली होती.

याशिवाय सौर, गाणपत्य इत्यादि अनेक पंथांचे अनुयायी आलेले असून त्यांनी आपापल्या दैवतांचं वैशिष्ट्य दर्शविणारीं चिन्हं शरीरावर किंवा पोषाखावर धारण केलीं होतीं. कोणी अग्निज्वाला, कोणी शुंडादंड, कोणी झगझगीत सूर्यबिंब, कोणी चंद्रकोर, कोणी नक्षत्रपुंज, कोणी अश्वत्थाची डहाळी, कोणी आम्र-मंजिरी, कोणी सर्पवलय अशा रीतीनं तोंपर्यंत परिणत

झालेल्या बहुतेक सर्व वैदिक धर्मपंथांचीं प्रतीकं या परिषदेंत दिसत होतीं. नगरांत मुख्य वस्ती शाक्तांची असल्यामुळं परिषदेंत पुष्कळशी संख्या त्यांचीच होती. पण अमात्यांच्या सूचनेवरून रुद्रभटानं वैदिकधर्मी इतर सर्व लोकांना आठवून, हुडकून मोठ्या अगत्यानं आमंत्रणं दिलीं होतीं. हें आमंत्रण अवाचित आल्यानं कित्येकांना आपापले गणवेष नवे बनवायला किंवा एरवी बाजूला टाकलेले जुने साफसूफ करायला थोडी धांदलच झाली. पण वैदिक धर्मीयांची महापरिषद भरणार, तींत गैरहजर राहून कसं चालणार!

असो. यानंतर लंबोदरबोवा यांनी सभामंडपांत प्रवेश केला. जय गणराज, जय गणराज, याशिवाय त्यांच्या तोंडून शब्द निघत नव्हता. गणपतीच्या मुखाची आकृति असलेल्या स्फटिकाच्या माळेचे मणी ते हळूहळू ओढीत होते.

रुद्रभट म्हणाला, "कसं काय? ठीक आहे ना?" लंबोदरबुवांनी उत्तर केलं, "होय. श्रीगणराजाच्या कृपेनं सर्व ठीक आहे." लंबोदरबुवा प्रथमच आल्यामुळं ते थेट जाऊन सर्वांतील उच्चासनावर बसले असं पाहून रुद्रभट किंचित् आपल्या ठिकाणीं चुळबुळ करूं लागला. कोणाला कुठं बसवावं हें त्यानं आधी योजून ठेवलेलं नव्हतं आणि प्रथम आलेल्या दोघां चौघांनी उच्चासनं अडविलीं म्हणजे उशीरा येणाराचा अपमान होण्याचा संभव; पण तो तरी काय करणार! होईल तें पाहावं आणि होईल तितकं संभाळून घ्यावं या विचारावरच संतुष्ट राहाणं त्याला भाग होतं.

लंबोदरबुवा स्थानापन्न होताहेत तोंच सौरपंथाचे धर्मगुरु आले व ते दुसऱ्या एका उच्चासनावर जाऊन बसले. त्यांची ओळख करून देण्याचं कारण नव्हतं. कारण त्यांनी किरणमंडित अशा प्रभातसूर्यांचीं रक्तवर्ण चित्रं ज्यावर काढलीं आहेत असा झगाच घातला होता. पण शिष्टाचार म्हणून रुद्रभट सौरीबुवांची ओळख गाणपत्य लंबोदरबुवांना करून देण्याकरिता म्हणाला, "हे पाहा सौरपंथाचे धर्मगुरु. यांच्या आगमनानं आपण कृतार्थ आहोंत." सौरीबुवा म्हणाले,: "उत्तम आहे. देव सविता सूर्यनारायण सर्वांचं कल्याण करीत असतो. तो सर्व तेजांचं अधिकरण, सर्व चैतन्याचं अधिष्ठान."

अग्नि.—ठीकच आहे. म्हणूनच लोक सूर्यनारायणाला आदिदैवत असं मानतात.

हें ऐकून गाणपत्य लंबोदरबुवा उसळून म्हणाले, "नाहीं, तें मी कधींहि कबूल करणार नाही. श्रीगणपतीहून श्रेष्ठ असा देवमंडळांत कोणीच नाही.

सर्व देवगणांचा पति म्हणूनच त्याला गणपति म्हणतात. आता श्रीगणपति झाला तरी महादेव शंकराचा पुत्र. म्हणून फार झालं तर आम्ही शंकराला गणपतीहून श्रेष्ठ मानूं."

सौर.—तें मी कबूल करणार नाही. सूर्यनारायणापुढं स्वतः शंकराचीहि योग्यता नाही; मग गणपतीला कोण विचारतो ? वेदांत सविता सूर्य याचा उल्लेख आहे, महादेवाचा व गणपतीचा नाही. तो पुढं एखाद्या गौण उपवेदांत किंवा पुराणांत आढळेल. उगवत्या सूर्यालाच ब्रह्मा म्हणूं लागले. मावळता सूर्य हाच विष्णु आणि मध्यान्हीचा सूर्य हाच शिव. वैष्णव असो वा शैव असो, गायत्री मंत्र म्हणून त्यालाहि सूर्योपस्थान करावंच लागतं.

इतक्यांत आणखी एक शैव धर्मगुरु येण्याला गांठ पडली. त्यानं पूर्वीचं संभाषण ओझरतं ऐकलं त्यामुळं क्रोधाविष्ट होऊन तो म्हणाला, "काय, या ठिकाणीं श्रीशंकराची निंदा ! सांभाळून राहा. कोणी माझ्या उपास्यदेवतेची निंदा कराल तर ! आदिदैवत असल्याशिवाय शंकराला महादेव हें नांव मिळालं असतं काय ?"

सौर--मध्यान्हीच्या सूर्यालाच त्याच्या प्रखरपणामुळं शिव म्हणतात ही खरी गोष्ट आहे. यांत निंदा कसली ?

शैव—नाही ! पुराणं काढून पाहा म्हणजे कळेल नीट. शिवाच्या अष्ट-तनूंपैकीं सूर्य ही केवळ एक तनू आहे समजलास ! तुम्हाला अंगांगी-भावसुद्धा कळत नाही.

इतक्यांत जवळच्च वैदिक परिषदेची व्यवस्था ठेवणारांपैकी रुद्रभटाचा एक हस्तक उभा होता त्याला राहावलं नाही. गणपति, सूर्य, शिव, महादेव यांच्या-पैकींच कोणी तरी एक मुख्य दैवत ठरणार या भीतीनं तो स्वयंसेवक मधेच तोंड घालून म्हणाला, "तुम्हा तिघांचंहि म्हणणं खरं नाही. मी या परिषदेंत स्वयंसेवक असलों तरी मला माझ्या उपास्यदेवताचा अभिमान कधीहि सोडतां येणार नाही ! गणपतीहून शंकर हा श्रेष्ठ हें कबुलीनंच ठरलं आणि सूर्यापेक्षा शिव किंवा शिवापेक्षा सूर्य श्रेष्ठ असेल; पण आदिमाता दुर्गा ही मूळ शक्ति असल्यामुळं ती इतर कोणत्याहि देवांहून श्रेष्ठ आहे आणि म्हणूनच आम्हा शाक्तांचा पंथ सर्वश्रेष्ठ असून या वैदिक भूमींत या राज्यांत आजवर टिकला."

हें ऐकून शैवगुरु मोठ्यानें हसून म्हणाला, " झाला, तुझ्याच तोंडून न्याय झाला. शक्तिदेवी ही झाली तरी ती अर्धांगी आहे, आणि अंगहि फिरून डावं म्हणजे दुबंल. अंगांगीभावसंबंध जर कुणाला कळत नसेल तर तो तुम्हालाच!

यावर शाक्तानं उत्तर केलं, " यांत कसला आला आहे अंगांगीसंबंध? या शैव बच्चानं शक्तीचं ध्यान कधी पाहिलेलं दिसत नाही. शक्तिदेवी ही आपल्या पतीच्या डाव्या दुर्बळ मांडीवर बसलेली नसून त्याच्या वक्षःस्थळावर नाचत असते. मग कोण श्रेष्ठ? शिव की शक्ति? आणि अशा रीतीनं शिव-दैवतहि गौण ठरलं तर सूर्य व गणपति यांचा काय पाड?

इतक्यांत एक शुभ्रवस्त्रधारी पुढं येऊन म्हणाला, " तुम्ही सर्वच बाजूला बसा. वेद नीट वाचा म्हणजे कळेल की द्यौ हाच वैदिक देव सर्वश्रेष्ठ आहे. तो सर्व देवांचा बाप आहे!"

अहाहा! पण सत्ता इतकी की, या देवबाप्पांची खुद्द पत्नी जी पृथ्वी ती स्वतंत्र होऊन खाली येऊन राहिली, याची मुलगी उषा ती नृत्यांगना बनली आणि अग्नि, सूर्य, आदित्य, मरुत् हे मुलगे यांनी स्वतंत्र राज्यं स्थापलीं, म्हणून आता म्हातारपणीं तो बैलासारखा ओरडत बसला आहे. म्हातारपण म्हणजे मोठाच गुण म्हणायचा की नाही! मुलगे कर्ते झाले म्हणजे बापानं स्वस्थ बसावं; राज्य हाकण्याचा हव्यास धरूं नये, समजला! तें कांही नाही या देवतेला अग्रपूजेचा मान आम्ही देणार नाही!

तेव्हा एक तांबूस वस्त्र परिधान केलेला पुढं आला. त्याच्या कपाळावर एक तेजस्वी तारकेसारखा लोलक लटकावलेला होता. तो म्हणाला, " उगाच कां भांडता? मी करतों त्याचा निर्णय. शिव, शक्ति, गणपति, सूर्य हीं सर्वच उपदैवतं आहेत. त्यांतलीं कांही अनार्य–अवैदिक आहेत. पाहा की, अरुणाच्या उदयानंच सूर्य उगवतो. सूर्य उगवल्यावरच देवतापूजनं सुरू होतात. म्हणून तो मान अरुण-संप्रदायाला द्यावा. अरुण हा जल व औषधी यांचा राजा आहे. तो आपल्या सुंदर रथांत बसून सर्व मनुष्यजातीवर देखरेख करतो."

पण ती देखरेख ज्या डोळ्यानं करतो तो सूर्य आहे म्हटलं महाराज! तो डोळा काढून घेतला म्हणजे अंधळे अरुण महाराज पृथ्वीचं शासन कसं काय करतील हें दिसतंच आहे. तें कांही नाही. अग्रपूजेचा मान सूर्यालाच मिळाला पाहिजे.

" पण अरुणाला राजा सम्राट् म्हणतात ? "

" ती पदवी अग्नि व इंद्र यांनाहि आहे ! मित्राचे सहकारित्व असेल तेव्हाच अरुणाला कोणी मानतात."

" पण अरुणाजवळ मायाशक्ति अशी आहे की, ती दुसऱ्या कोणत्याहि देवाजवळ नाही. "

" पण ही मायाशक्ति हें आसुरी लक्षण होय. तें दैवी संपदेचं लक्षण नव्हे. म्हणून अथर्व वेदानं अरुणाचं आधिपत्य काढून टाकलं आहे. नुसतं स्वर्गात आमचं घर म्हणून सांगितल्यानं पृथ्वीवर कोण अरुणाला मोठेपणा देणार ? पुराणांतरीं इंद्राची स्तुति व कर्तबगारी ऐकूं येते तशी अरुणाची येते काय ? बसा म्हणावं आपला सोन्याचा रथ घेऊन लहान मुलं खेळण्याशीं खेळत बसतात तसं."

संधि साधून रुद्रभटानं उच्चासनं म्हणून दिसत होतीं तीं बरींच हळूहळू काढून टाकून बैठक सारखी केली. नंतर अशाच रीतीनं इतर पक्षांचे धर्मगुरु आले, त्यांचींहि भांडणं सुरू झालीं. सर्व सभामंडप गजबजून गेला. प्रकरण वर्दळीवर, हातघाईवर येणार असंहि वाटूं लागलं. इतक्यांत अमात्यराज आले. त्यांना पाहून हे धर्मगुरु आपल्या उपास्यदेवतांच्या श्रेष्ठपणाचं भांडण बाजूला ठेवून अमात्यांविषयी आदरबुद्धि अधिक कोण दाखवितो याविषयी स्पर्धा करूं लागले. अग्निवर्ण हा वैश्य. धर्मगुरूंच्या आदरानं तो दडपून गेला. पण अमात्य म्हणजे प्रत्यक्ष राजप्रतिनिधि; आणि राजतेज सर्व तेजांहून अधिक श्रेष्ठ असं लौकिक व्यवहारांत तरी ठरतं. धर्मगुरु झाले तरी ते देवतांचे उपासक; आणि राजा म्हणजे स्वतः जिवंत दैवतच ! आणि जो अधिकार राजाचा तोच राजाच्या अभावीं राजप्रतिनिधीचा. तात्पर्य, अमात्यांच्या आगमनानं धर्मगुरूंचं भांडणं थोडं शमलंसं पाहून रुद्रभटानं अमात्यांजवळ जाऊन त्यांच्या कानांत कांही मंत्र सांगितला. तेव्हा अमात्यांनी सरळ जाऊन सर्वांत उच्च दिसणारं असं आसन मंडित केलं व सर्वांना उद्देशून ते म्हणाले, " अहो, हें काय ? भांडण कसलं चाललं आहे तुमचं ? "

रुद्रभट म्हणाला, " अमात्यराज अगदी वेळेवर आले म्हणायचे. नाही तर हें भांडण मला आवरतां येणं कठिण होतं."

अमात्य— पण तुम्ही सर्व आपापसांत भांडायला या ठिकाणीं आलां आहां की सर्व मिळून आपल्या शत्रूशीं युद्ध करण्याचं ठरविण्याला आलां ?

गाणपत्य—तें कसंहि असलं तरी आमच्या उपास्यदेवतेची निंदा आम्ही कधीहि ऐकून घेणार नाही.

सौर—धर्मकार्यांत साहाय्य करावं म्हणून आलों त्याचं हें बक्षिस की काय ?

शैव—शक्ति ही जर शिवापेक्षा श्रेष्ठ तर शाक्तांनीच आपली परिषद भरवावयाची होती व आपलं संकट निवारण करावयाचं होतं. आम्हा शैवांना आधी बोलवावं कां आणि बोलावल्यावर शिवापेक्षा शक्ति श्रेष्ठ म्हणून प्रतिपादावं कां ?

त्यावर अमात्य मोठा आवाज काढून म्हणाले, "मित्रांनो, तुम्हा सर्वांचा आपापल्या देवतांविषयींचा अभिमान पाहून मला फार आनंद होतो. पण–पण वाईट इतकंच वाटतं की, आपापल्या उपास्यदेवतांचा अभिमान धरून कलह केव्हा करावा आणि केव्हा न करावा याचं ज्ञान मात्र तुम्हाला नाही. मित्र हो, तुम्हा सर्वांचे धर्मपंथ वेगळे आहेत—

गाणपत्य—होय आहेत; आणि असणारच.

अमात्य—तुमचीं उपास्यदैवतं वेगळीं आहेत—

सौर—म्हणूनच तर हा येवढा वाद.

अमात्य—आणि अभिमानास्पद परंपरापुनीत अशीं तुमचीं पंथांचीं नावंहि वेगवेगळीं आहेत.

शैव—होय, आम्हाला आपल्या नांवांचाहि अभिमान धरलाच पाहिजे.

अमात्यानं पंथोपपंथांतील भेदांची स्तुति केल्याप्रमाणं त्यांना महत्त्व दिलेलं पाहून रुद्रभट चकितच झाला. आणि पुढं काय होणार याविषयी त्याच्या तोंडावर चिंता उत्पन्न होऊन तो अमात्याच्या कानाशीं लागणार, इतक्यांत सर्व गोष्टी आपल्या ध्यानांत आहेत, तूं घाबरूं नको अशा अर्थाची खूण म्हणून अमात्यानं रुद्रभटाचा हात दाबला आणि म्हणाला, "तुम्ही सर्व वेगळे आहां हें कबूल. परंतु तसे वेगळे असूनहि अखेर एकच आहां हें तुमच्या ध्यानांत वागावं तितकं वागत नाही असं दिसतं !"

या शेवटच्या उद्गारानं हवं तें आश्वासन मिळाल्यामुळं रुद्रभट म्हणाला, "अमात्यराज म्हणतात तेंच खरं. आपण वेगळे आहों व वेगळेपणाचा अभिमान धरतों हें योग्यच आहे, पण वेगळे असूनहि मुळांत एकच आहों हें न

उमजल्यानं तर आजवर सगळा घात झाला; आणि वैदिक पंथ नष्ट होण्याच्या बेताला आला."

अमात्याच्या बोलण्यांतील विरोध हा केवळ विरोधाभास आहे असें लक्षांत न आल्यामुळं जडबुद्धि शैव म्हणाला, "आम्ही भिन्न असून फिरून एकच कसे आहों हें ध्यानांत आलं नाही."

अमात्य म्हणाला, "मित्र हो, हें कळायला फारसं कठिण नाहीं. सांगतो ऐका."

हे शेवटचेच शब्द घेऊन रुद्रभट मोठ्या उत्साहानं सर्वांना उद्देशून म्हणाला, "सभासद हो, ऐका, सर्व नीट ऐका, या कलहप्रसंगामुळं तरी आज अमात्य-राजांच्या तोंडून एखाद्या नवीन धर्मतत्त्वाचा बोध लाभण्याचा सुप्रसंग सुदैवानं आलेला दिसतो. तर ऐका. नीट ऐका, लक्ष देऊन ऐका."

अमात्य—तुम्हांपैकी कोणी गाणपत्य, कोणी सौर, कोणी वैष्णव, कोणी शैव आणि कोणी शाक्त आहां हें खरं. पण तुम्ही सर्वजण वस्तुतः एकच नाहीं काय ?

अमात्यांनी अशा झोकानं प्रश्न विचारला की, त्यांना हवं तें उत्तर सर्व सभासदांनी एकदम एकमुखानं द्यावं. पण जमलेल्या धर्मगुरूंची बुद्धि जड होती म्हणा, किंवा बुद्धि तेजस्वी असूनहि तिजवर अभिमानाचं—अहंकाराचं दाट आवरण आलं होतं म्हणा, त्यांना अमात्यांनी विचारलेल्या प्रश्नाचा उमजच पडला नाही. हे भेद मूलग्राही व प्रचंड यांचा समन्वय कसा होणार ? अशा बावळट वेंधळ्या भावनेनं ते स्वतः आपणाकडं व एकमेकांकड व अमात्यांकड शून्य दृष्टीनं पाहूं लागले.

तेव्हा अमात्यानं बोलणं पुढं चालूं केलं. गोंधळलेला प्रतिपक्षी हे वावदुकाला सोप्या शिकारीचं सावजच वाटतं. म्हणून सभासदांवर परिणाम करण्याच्या ईर्षेनं अमात्य म्हणाला, "मित्र हो, तुम्हांपैकी कोणी कोणत्याहि पंथाचे असा, पण तुमचे सर्व धर्मपंथ एकाच उगमांतून निघालेले नाहीत काय ? गणपति, सूर्य, विष्णु, शिव, शक्ति या सर्व वैदिक देवताच नव्हेत काय ? एकाच आईबापापासून झालेले भाऊ भाऊ संसारांत आपापसांत भाऊबंदकी करून वैर वाढवोत; पण परमार्थांत तरी याहून अधिक व्यापक दृष्टि असावी. एकाच वैदिक वृक्षमूलापासून निघालेल्या धर्मशाखांनी परस्परांना निवारा निर्माण करून द्यावा. तो न देतां त्या परस्परांवर घर्षण करूं लागतील तर दावाग्नि

उत्पन्न होऊन सर्वांनाच दग्ध व्हावं लागेल हें तुम्ही विसरतां. काय म्हणावं! तुम्हाला शत्रु नसता तर मग एक वेळ आपापसांतलं श्रेष्ठत्व ठरविण्याचा वाद तुम्ही घालीत बसलां असतां तर तें क्षम्य झालं असतं. पण या बौद्ध लोकांनी एकंदर वैदिक धर्मावरच घाला घालण्याचा विचार केला आहे हें तुम्हाला कसं कळत नाही? बौद्ध हे वेदनिंदक आहेत ना? आणि एका वेदाची निंदा म्हणजे पर्यायानं तुमच्या आमच्या सर्व धर्मपंथांची निंदा नव्हे काय?"

लंबोदर—अरे होय की! हें नव्हतं आलं आमच्या लक्षांत!

सौर—खरंच! बौद्ध हेच आमचे शत्रु खरे.

अमात्य—बौद्धांच्या शत्रुत्वामुळं आम्हा वदिकांपैकी कोणाहि एकावर जर संकट आलं तर तें तुम्हां सर्वांवर आलं असंच तुम्हाला मानायला नको काय?

शैव—हो, हो, यांत काय संशय?

सौर—पण असं संकट आज कोणतं? आणि कुणावर आलं आहे?

रुद्रभट—आम्हावर, आम्हा शाक्त लोकांवर. आम्ही आपल्या धर्माप्रमाणं वागत असतां आमच्या धर्माचरणावर घाला घालण्याचा प्रसंग या बौद्धांनी आणला आहे.

लंबोदर—तो कसा?

रुद्रभट—आमचा शाक्तपंथ आम्हाला देवीला बळी द्यावयाला सांगतो. आणि तो आम्ही द्यावयाला लागलों तर हे बौद्ध त्याच्या विरुद्ध थेट महाराजांपर्यंत जाऊन गवगवा आणि चळवळ करतात.

सौर—तुम्ही कसला बळी द्यायला काढला होता?

रुद्रभट—अहो, कसला म्हणून काय विचारतां? बळी म्हणजे बळी. धर्मगुरु सांगेल तो बळी, देवी मागेल तो बळी. समजा, आम्हीं नरबलिदान करायचं मनांत आणलं तरी काय झालं? आमच्या देवीच्या गळ्यांत बकऱ्यांच्या गळ्यांच्या माळा नसतात, तर नर-कपालांच्या माळा असतात.

नरबलिदानाची गोष्ट निघतांच गाणपत्य, सौर, शैव, हे गोंधळून जाऊन एकमेकांकडे पाहूं लागले.

सौर म्हणाला, "मनुष्याशिवाय इतर प्राण्यांना बळी देतात हें आम्हाला माहीत आहे. पण—"

शैव—जुन्या वैदिक काळीं नरबली देण्याची चाल कदाचित् असेल, पण—

या अर्धवट कबुलीचा फायदा घेऊन रुद्रभट म्हणाला, "अहो, असेल काय म्हणता, होतीच तशी चाल. ऐतरेय ब्राह्मणांतली नरबलिदानाची कथा तुम्हाला ठाऊक नाही काय? आपली पोटदुखी थांबावी म्हणून बापानं नरबलिदानाचा नवस केला आणि प्रत्यक्ष मुलाला मारायला काढलं. आमचा मित्र अग्निवर्ण हा बलिदान करणार होता तो तर स्वतःच्या मुलाचाहि नव्हता.

सौर—पण त्या जुन्या काळच्या गोष्टी जुन्या काळाला शोभल्या; पण आतां फिरून त्याच कराव्या का?

रुद्रभट—जुन्या चाली फिरून अमलांत आणल्या तरच क्षीण झालेला धर्म पुन्हा तेजस्वी होतो. शाक्त धर्माचं पुनरुज्जीवन करावयाचं तर नरबलिदानाचं पुनरुज्जीवनहि करावयाला नको काय?

रुद्रभटाच्या या युक्तिवादानं सभासदांचं समाधान होत नाहीसं पाहून अमात्यांनी फिरून संभाषण आपल्या हातीं घेतलं आणि नरबलिदानाच्या विषयाला बगल देऊन तो म्हणाला, "सभासद हो, बलिदान कोणी करो न करो, त्याला विरोध झाला तर ज्याचा तो पाहून घेईल. पण इतर अनेक बाजूंनीहि बौद्ध धर्माचा आमच्या वैदिक धर्मावर घाला पडूं लागला आहे हें खरं आहे की नाही? आज बौद्ध धर्मानं समाजांतील धर्मादायाचा ओघ आपल्याकड वळविला यामुळं आपणा गाणपत्य, शैव, सौर इत्यादि पंथांच्या देवस्थानांची उपासमार होऊं लागली आहे की नाही? राजमंडळाकडून आज देणग्या वैदिक धर्माला मिळतात की बौद्ध धर्माला मिळतात?"

द्रव्यलाभाचा हा गळ अमात्यांनी खाली सोडतांच वैदिक धर्मीयांचे मासे त्याला लागले आणि ते सर्व एका आवाजानं म्हणाले, "खरी आहे, गोष्ट खरी आहे; आमचा घास काढून दुसरा कोणी घेईल तर तें आम्हाला कसं खपेल?"

अमात्य—पण तुम्ही सर्व मिळून कंबर बांधून याला विरोध करायला तयार व्हाल आणि आपल्या विरोधाचा बांध धर्मादायाच्या या गैरवाटेनं जाणाऱ्या या प्रवाहाला घालाल तरच तो प्रवाह फिरून वैदिक धर्माकड वळेल. तुमचीं देवालयं जीर्ण झालीं त्यांचा उद्धार कोणी करीत नाही; आणि या

धर्मभ्रष्ट बौद्धांचे विहार आणि मठ कसे सजत आहेत, शोभिवंत होत आहेत हें पाहतां ना ?

सर्वजण--हो, हो, पाहतों म्हणजे काय ?

अमात्य--धर्माच्या उच्छेदाची ही गोष्ट तर झालींच पण नीतींचाहि उच्छेद त्याचबरोबर होत आहे हें तुम्ही पाहतां ना ?

पण या प्रश्नाचं उत्तर न सुचल्यामुळं फिरून वैदिक सभासद गोंधळांत पडले. तेव्हा रुद्रभट पुढं होऊन म्हणाला, "आपल्या भैरवपूरच्या जवळचा मोठा विहार घ्या ना ! त्यांत जितके पुरुष भिक्षु तितक्याच स्त्री भिक्षुणी आहेत ना ? आणि विहाराची मुख्य अधिकारी स्त्रीच आहे ना ? आणि तिच्या हस्तक म्हणून काम करणाऱ्या तरुण अविवाहित स्त्रियाच्च आहेत ना ! स्त्रियांनी प्रत्यक्ष संन्यासदीक्षा घ्यावी असं वैदिक धर्मानं कुठं सांगितलं आहे काय ? आणि स्त्रीपुरुषांचा असा मेळा एकत्र राहून नांदूं लागला म्हणजे तिथं किती अनीति माजत असेल याची तुम्हाला कल्पना नाही काय ?"

रुद्रभटाच्या या प्रत्येक प्रश्नागणिक सभासदांकडून मान्यतादर्शक वाढता हुंकार प्रकट होऊं लागला. तेव्हां या संमतीचा फायदा घेऊन रुद्रभटानं हळूच प्रश्न टाकला आणि तो म्हणाला, "आणि या सर्व बखेड्याला आपल्या भैरवपूरचे महाराज संमति देत आहेत हें उचित आहे काय ?"

महाराजांचं नांव निघतांच अमात्य उभे राहून म्हणाले, "हां, या सभेंत मी महाराजांविरुद्ध कांही बोलूं देणार नाही. महाराजांचं नांवहि काढूं देणार नाही. तो राजद्रोह होईल; आणि मी महाराजांचा अमात्य तो कसा चालूं देईन ? महाराज सर्वज्ञ आहेत. कोणताहि राजा म्हटला म्हणजे तो सर्वज्ञच असावयाचा. राजा कधीहि चूक करीत नाही. मग महाराजांचं नांव कां काढतां ? तुम्ही वैदिक धर्माभिमानी लोक आपल्या प्रतिस्पर्धी बौद्ध धर्माविरुद्ध वाटेल तें बोलाल किंवा वाटेल तें कराल तें सर्व क्षम्य होईल. त्या कामीं मला तुमचा साथीदार होतां येईल व तुम्हाला साहाय्यहि करतां येईल. आता महाराजांविषयी म्हणाल तर तुम्ही राजनिष्ठापूर्वक महाराजांकडे शिष्टमंडळ नेऊन आपलं गाऱ्हाणं नम्रतापूर्वक त्यांच्या कानांवर घालाल तर, महाराजांनी मला आज्ञा केल्यास, तुमच्या बाजूनं मी दोन शब्द अनुकूल असे सांगूं शकेन. आपण कोणता धर्म पाळावा वा न पाळावा याविषयी महाराज स्वतंत्र आहेत. पण मी तरी आपला वैदिक धर्म अजून सोडला नाही, व

माझ्या धर्मावर कोणी घाला घातला तर त्याला विरोध करण्याला माझा सेवा-धर्म आड येणार नाहीं. महाराजहि सहिष्णु आहेत. धर्माच्या बाबतींत जें स्वातंत्र्य ते स्वतःला घेतात तेंच ते आपल्या सेवकांनाहि देतात."

अमात्यांच्या वरील भाषणानं वैदिक सभासदांना फार बरं वाटलं, व त्या भाषणांतील महाराजांकडं शिष्टमंडळ नेण्याची सूचना पसंत पडून तें महाराजांकड नेण्याचं सर्वांनी ठरविलं. पण अशा मिळमिळीत सौम्य रीतीनं सभेचा शेवट झाल्यानं बौद्धांविरुद्ध हत्यार धरण्याला पुरेसा उत्साह उत्पन्न होणार नाहीं, असं पाहून रुद्रभटानं समारोपाचं भाषण करण्याचं काम आपणांकड घेतलं, आणि शिरा ताणून गर्जना करून बौद्ध धर्माची जितकी निंदा त्याला सुचली तितकी त्यानं केली, वैदिक धर्माचे गोडवे गाइले, वैदिक धर्मपंथांतील भेदभावांमुळं होणाऱ्या दुष्ट परिणामांचं भेसूर चित्र त्यानं रंगविलं. नरबलि-दानाचा हक्क पुन्हा प्रस्थापित करून वैदिक शाक्त धर्माला पूर्वीचं तेज प्राप्त करून कसं देतां येईल हें सांगितलं आणि बौद्ध धर्माचा उच्छेद करण्याकरिता सर्व वैदिक धर्मानुयायांना कंबर बांधण्याची विनंति करून अमात्यराजांनी स्वतः येऊन सभा पार पाडल्याबद्दल त्यांचे आभार मानून आपलं भाषण संपविलं.

सभा संपली असं सांगतांच लंबोदरबुवांनी जय गणराज असे शब्द उच्चारले. त्याबरोबर शैवांनी 'जय शंकर, जय शंकर' असे शब्द जोरानं उच्चारले. सौर गुरूंनी 'जय सविता सूर्यनारायण' अशी गर्जना केली आणि शैवांनी शिवाच्या देवळांत तोंडानं डमरू वाजवितात तसा मोठ्यानं वाजविला. परंतु यामुळं निरनिराळ्या धर्मपंथांच्या अनुयायांचा अभिमान पुन्हा एकवार पेटला, आणि ज्या देवतेच्या नांवाचा जयजयकार अधिक जोरानं होईल त्याचा सभेंत विजय झाला अशा भावनेनं जयजयकाराची स्पर्धा सुरू झाली. तेव्हा अमात्यराजाला आपलं बुद्धिचातुर्य खर्च करावं लागलं, तो हात वर करून म्हणाला—" सर्व वैदिक धर्मबंधूंनो ! आपले पंथ व आपलीं दैवतं वेगळीं असलीं तरी तीं सर्व वेदांतर्गतच आहेत ना ? मग म्हणा तर सर्व एका आवाजानं " जय वैदिक धर्म की जय!" तेव्हा सभासद आपला अविचार लक्षांत येऊन किंचित् खजिल झाले, आणि "जय वैदिक धर्म की जय" असं म्हणून सभागृहांतून बाहेर पडले.

प्रकरण सतरावें

राजदरबारांत काय घडलें ?

परिषदेच्या समातीनंतर अमात्य रुद्रभट आणि शिष्टमंडळाकरिता निवडलेली मंडळी खाजगी विचाराकरता म्हणून एका बाजूस जाऊन गुत खलबत करीत बसली. रुद्रभट म्हणाला, "परिषदेंत अमात्यराजांनी राजद्रोहाची भाषा काढली ती ऐकून मी तर मनांत गडबडून गेलों. खुद्द महाराजांनीच जर बौद्ध धर्माचा पुरस्कार करण्याचं काम अंगावर घेतलं आहे तर त्याविषयी नापसंती दर्शविल्याशिवाय लोकांत उत्साह कसा भरणार ? अमात्यांनी राजद्रोहाची सूचना दिली ती ऐकून परिषदेचा शेवट कसा होणार याची मला चिंताच पडली."

हें ऐकून अमात्य मोठ्यानं हसून म्हणाला, "तर मग माझा बेत चांगलाच सिद्धीस गेला असं म्हणायला पाहिजे."

"तो कसा? परिषद् निष्फळ व्हावी असा तर तुमचा बेत खचित नव्हता!"

"तसा बेत नव्हता हें खरं; पण मला जोंपर्यंत अमात्य-पदावर राहावयाचं आहे तोंपर्यंत मला उघडपणं राजद्रोहांत सामील कसं होतां येईल?"

रुद्रभट मिस्किलपणानं हसून म्हणाला, "पण तुम्ही स्वतः सामील न होतां राजद्रोह झाला तर मग त्याला तुमची हरकत नाही म्हणायची ?"

अमात्य—परस्पर कोणी राजद्रोह केला तर त्याला मी काय करणार, किंवा नको कां म्हणूं ? आणि जो राजद्रोह करील तो कोणी सुखासुखी, कारणाशिवाय का करील ? पोटांत दुखल्याशिवाय कोणी ओवा खात नसतो. शिवाय मी अमात्य म्हणजे राजाच्या पदरचा सेवक पडलों. राजाच्या वर्तनाचा निषेध करण्याचा अधिकार स्वतंत्र प्रजेला आहे तसा मला कुठं आहे ? राजाची पोळी जोंपर्यंत खायची आहे तोंपर्यंत मी फार तर टाळी न वाजविली तर, आमचे महाराज सौम्य स्वभावाचे असल्यामुळं सोसून घेतील. परंतु टाळी न वाजविणारा हात जर मी त्यांच्यावर उगारला तर तो मजकडून अक्षम्य अपराध होईल. मग महाराज मला शिक्षा करोत वा न करोत. प्रजेची गोष्ट मात्र तशी नाही. प्रजाधर्म आणि राजधर्म यांचे दांते चक्रासारखे एकांत एक असे बसले

आहेत की, राजधर्म किंचित् शिथिल झाला असता, प्रजेची राजभक्तिहि तितक्या प्रमाणानं शिथिल होणारच.

रुद्रभट—हें सामान्य तत्त्व माझ्या लक्षांत आलं. पण उद्या राजदरबारीं शिष्टमंडळ गेलं, आणि तिथं महाराजांनी आमच्या म्हणण्यामागणीला योग्य मान दिला नाहीं, तर आम्हीं काय करावं याचं थोडं अधिक स्पष्टीकरण कराल तर शिष्टमंडळांतील माझ्या बंधूंना साहाय्य होईल.

फिरून थोडं हसून अमात्य म्हणाला, "मी बोललों त्यांतच स्पष्टीकरण आलं असं मी तरी समजलों होतों. पण नसेल तर फिरून सांगतों तें असं की दरबारांत शिष्टमंडळ महाराजांची भेट घेईल तेव्हा मला तुमच्या बाजूनं उघड कांहीं बोलतां येणार नाही. उलट महाराजांनी मला अभिप्राय विचारला तर तो तुमच्याविरुद्ध द्यावा लागेल. कारण महाराजांच्या मनाचा कल बौद्धांकड वळत असून शाक्तांना प्रतिकूल आहे हें दिसतंच आहे पण मीं प्रतिकूल अभिप्राय दिला यानं भिऊन गांगरून न जातां, महाराज व मी या दोघांवरचा राग तुम्ही एकट्या महाराजांवरच काढा ! महाराजांचा स्वभाव सौम्य आहे यामुळं, तुम्ही कितीहि टाकून बोलला तरी, ते उलट तुम्हाला टाकून बोलणार नाहीत. पण तुम्ही टाकून बोललांत तर या प्रकरणाला चढावा तसा रंग चढणार नाही, आणि चळवळ किंवा बंड करण्याला शाक्त लोकांना यावा तितका उत्साह येणार नाही !"

रुद्रभट--आता मात्र हें स्पष्टीकरण हवं तसं झालं. पण आम्हीं बंड केलं तर तें मोडण्याचं स्वामिकार्य अमात्य म्हणून तुमच्याकडे येणार ! आणि दरबारांत आम्हाला प्रतिकूल अभिप्राय तोंडानं तुम्ही देणार त्याप्रमाणं आमचं बंड मोडण्याकरिता आमच्यावर सैन्य पाठविणार ! पण प्रत्यक्ष युद्धांत तोंड-देखलेपणा कसा राहील ? मग त्याची वाट काय ?

अमात्य--त्याची तुम्हीं काळजी करूं नका. स्वतः सेनापति मनांतून विश्वासघाताला तयार झाला तर सैन्याची भीति तुम्ही कां बाळगावी ? सशस्त्र सैन्यानं तुमच्यावर हल्ला करून तुमचा पराभव करण्यापेक्षा स्वतःच माघार घेणं ही गोष्ट अधिक कठिण आहे हें मी जाणतों. परंतु रणांगणावर मी काय करतों हें पाहायला महाराज थोडेच येणार ? दरबारांत तुम्हाला अनुकूल बोलण्यापेक्षा, तेथपर्यंत मजल आलीच तर, रणांगणावर तुम्हाला अनुकूल वागणं हेंच मला अधिक सोपं आहे असं समजा ना ! पण या माझ्या आश्वा-

सनानं शिथिल न होतां तुम्हीं बंडाची व प्रजापक्षीय सैन्याची तयारी जोरानं केली पाहिजे. कारण शाक्त धर्मावर प्रेम असणारे माझ्यासारखेच इतर सर्व सरदार दरबारांत नाहीत. शिवाय कांही सरदार तर कडवे राजभक्त आहेत. म्हणून माझ्यापुरतं मीं सांगितलं तरी, इतरांना तोंड देण्याकरिता तुमची युद्धाची तयारी हवी. महाराज मनानं बौद्ध धर्माच्या आहारीं इतके गेले आहेत की, प्रजाजनाशीं होणाऱ्या कटकटीला कंटाळूनच कदाचित् ते सिंहासनाचा त्याग करून बौद्ध भिक्षूची दीक्षा घेतील. पण तसं होईल या विश्वासावर न राहतां तुम्हाला आपणाकडून बंडाची स्वतंत्र तयारी केली पाहिजे हें नीट ध्यानांत ठेवा.

हा खुलासा ऐकून रुद्रभटाचं पूर्ण समाधान झालं, आणि तो अग्निवर्ण व शिष्टमंडळ यांच्याकडे पाहून म्हणाला—

" पाहा, पाहा आम्हा शाक्त लोकांचे ग्रह, आणि अग्निवर्णा, तुझेहि ग्रह किती उच्चीचे येत आहेत ते. आता मात्र शाक्त धर्माचं पुनरुज्जीवन खचित होणार ! आणि अग्निवर्णा, त्या पुनरुज्जीवनाचा प्रारंभ तुला पुत्रजन्म होण्याच्या शुभमुहूर्तावर होणार ! "

अग्निवर्णानं कृतज्ञतेनं हात जोडून नमस्कार केला व म्हणाला, " खरं मित्रप्रेम हें असंच असतं."

शिष्टमंडळाच्या सभासदांसंबंधानं मात्र थोडंसं सांगितलं पाहिजे. तें असं की, या सर्व नाटकाचा उमज त्याला फारसा पडला नव्हता. हे लोक वैदिक परिषदेला आले ते खरोखर जुलमानं व भिडेनं. बैलाची शेपटी पिरगाळून त्याला चालायला लावावं त्याप्रमाणं, वैदिक धर्माच्या यांचा अभिमान तात्पुरता जागृत करण्यांत आला होता; पण तें सर्व उसनं अवसान होतं. परिषदेमधे त्यांनी शाक्त धर्मातर्फे एकहि शब्द उच्चारला नाही. फक्त 'तुम्ही वैदिक धर्माचे आहांना' असं मोठं नांव घेऊन त्यांना अमात्य विचारी तेव्हा ते हो हो म्हणून नंदीबैलासारखी मान हलवीत ! स्वतःच्या स्फूर्तीनं या परिषदेंत त्यांनी जर कांही केलं असेल तर तें आपआपल्या उपास्यदेवतेच्या अभिमानानं वर्दळीवर येणं इतकंच ! ते आपापल्या घरीं बसून आपापल्या उपास्यदेवतेचं पूजन करून त्यांतच सर्व परमार्थ आला असं मानून संतुष्ट व निष्क्रिय राहणारे होते. ते कसले शाक्त धर्माची कड घेऊन चळवळ करणार; किंवा राजद्रोह व बंड करण्याला प्रवृत्त होणार ? पण ज्यांची आत्मस्फूर्ती

जातिवंत नसते त्यांच्यामधे दुसरा एक गुण खचित असतो. तो म्हणजे मेंगेपणानं दुसऱ्याच्या मागून जाणं ! अफूची गोळी घेतलेला मनुष्य गुंगी चढत असतां दुसरा कोण काय बोलेल त्याला नुसतं हूं हूं म्हणत असतो. त्याप्रमाणं रुद्रभट हा धर्माच्या नांवानं कांही तरी उद्योग करतो आहे म्हणून तो म्हणेल त्याला हूं हूं म्हणत जावं इतकंच आपलं काम असं त्यांना वाटत होतं. म्हणून परिषदेला या म्हटलं आले, शिष्टमंडळांत या म्हटलं निघाले, राजदर्शनाला चला म्हटलं चालूं लागले, असं वर्तन त्यांच्याकडून सहजच झालं. समजा, उद्या राजद्रोह व प्रत्यक्ष बंड येथपर्यंत पाळी आली तर ते काय करणार होते त्याची कल्पना रुद्रभटाला थोडी होती; पण तो खरा चळवळ्या असल्यामुळं, रानांतून जातांना दोन्ही हातांनी आग लावीत जावं, मग त्यांत पेटेल तें पेटेल, विझेल ते विझेल, असं म्हणणारा तो होता.

तें कसंहि असो; इतका खुलासा गुप्तपणें रुद्रभट व अमात्य यांच्यामधे झाल्यामुळं पुढच्या उद्योगाला लागायला रुद्रभटाला जोर आला हें सांगावयास नकोच.

* * * *

आजच्यासारखा दिवस भैरवपूरच्या इतिहासांत पूर्वी केव्हाहि उगवला नव्हता, कारण आज महाराजांकडे तक्रारी शिष्टमंडळ जायचं होतं. राजाच्या कृत्यांविरुद्ध तक्रार ही गोष्ट अपूर्वच होती ! कारण राजाविरुद्ध तक्रार म्हणजे प्रत्यक्ष देवाविरुद्ध तक्रार ! पण प्रत्येक नवा अवतार होण्याच्या वेळीं श्रीविष्णूकडहि देव-देवतांचं शिष्टमंडळ जाऊन आपलीं गाऱ्हाणीं सांगत नव्हतं का ? कांही म्हटलं तरी महाराजांच्या सात्त्विक सहिष्णुतेमुळेंच तक्रारी शिष्टमंडळाची कल्पना शाक्त प्रजाजनांच्या मनांत येऊं शकली ! नाही तर जुन्या जमान्याप्रमाणं पाहिलं असतां, असल्या शिष्टमंडळाला राजद्रोही हें विशेषण लावून फासावर चढविण्यांत आलं असतं.

समस्त वैदिक परिषद पार पडल्यापासून भैरवपूर नगरांत नवचैतन्य जागृत झालं होतं. महाराजांकड जाऊन प्रत्यक्ष काय मागावयाचं याची कल्पना कोणासच नव्हती ! पण नुसती हुल्लड कोणालाहि करतां येत होती. उगाच चार लोक जमून दंगल करूं लागले म्हणजे पांचव्यालाहि ती करावीशी वाटते आणि असं करण्याबद्दल कोणी मोठेपणा दिला, उत्तेजन दिलं, म्हणजे तर बोलावयालाच नको !

सगळा गांव घरांतून उठून राजवाड्याकड चालला. आज नेहमीप्रमाणंच दरबार भरला होता तरी त्यांत कांही विशेष प्रकार घडणार अशी कुणकूण होती. यामुळं दरबारांत काम नसलेले लोकहि दरबारच्या दालनाभोवतीं उगीच इकड तिकड हिंडत होते. राजाकड शाक्तधर्म पुनरुज्जीवनाकरिता शिष्टमंडळ पाठविण्याचा विचार ठरल्याचं गावभर झालं होतं. दरबारांत काय घडतं, राजा शिष्टमंडळाला काय उत्तर देतो, याकड लोकांचं लक्ष लागलं होतं. राजाचा स्वभाव शांत, सहिष्णु व सौम्य असल्यामुळं दरबारचा प्रसंग हा लोकांना गंभीर वाटत असला तरी तिथं जाण्याला कोणाला भीति वाटत नव्हती. शाक्त धर्माबद्दल भैरवपूरच्या लोकांना आज मोठी आस्था वाटत होती असं नाही. कित्येक तर हळूहळू बौद्ध धर्मानुयायी बनले होते. पण चळवळ म्हटली म्हणजे सहजच लोक कान टवकारतात आणि तिच्या यशापयशाविषयी तर्कवितर्क करीत बसणं हा त्यांना एक आवडीचा खेळ होऊन बसतो. रुद्रभटाविषयी लोकमत फारसं चांगलं नव्हतं. पण मनुष्य जहाल व चळवळ्या असला म्हणजे तो लोकांना, आपल्या चारित्र्याकड डोळेझाक करून, केवळ पराक्रमाकड त्यांचें लक्ष वेधून घेऊं शकतो. यामुळं एरवी रुद्रभटाबद्दल निंदास्पद उद्गार काढणारे लोकहि, त्यानं शाक्त पंथाच्या पुनरुज्जीवनाची चळवळ हातीं घेतलेली पाहून, त्याच्या शीलाकडे कांही वेळ दुर्लक्ष करावयाला तयार झाले होते आणि नुकतीच भरलेली वैदिक परिषद हें त्याच्या प्रयत्नाचं फळ असं वाटून या चळवळींतून शाक्त पंथाच्या हिताची कांही तरी गोष्ट तो काढील असं त्यांना वाटत होतं.

* * *

चोपदारांच्या ललकाऱ्या होऊन महाराज दरबारांत येऊन सिंहासनावर चढले हें पाहूनच सर्व सभा एकदम चकित झाली. कारण ज्या पोषाकांत महाराज आज दिसले तसे पूर्वी लोकांनी त्यांना केव्हाच पाहिलं नव्हतं. नेहमीच्या मौल्यवान् जरतारी राजवस्त्रांऐवजी आज त्यांनी एक साधी पैरण अंगांत घातली होती. त्यावर किंचित् शालीसारखं दिसणारं, पण अगदी साध्या कापडाचं, पिवळ्या रंगाचं एक उपरणं निष्काळजीपणानं इकडून तिकड टाकलं होतं. आज विशेष समारंभाचा किंवा कार्याचा दिवस म्हणून डोक्यावर राजमुकुट असावयाचा तो तर नव्हताच, पण ते हौसेखातर मधून मधून डोक्यावर घालीत तें हलकंसं रेशमी शिरोभूषणहि नव्हतं. ते एखाद्या यती-

प्रमाणं अगदी उघड्या डोक्यानं आले होते. राजाचीं हीं वैराग्यचिन्हं पाहून त्याच्यापुढं ललकाऱ्या देत येणाऱ्या, सोन्यारुप्याचे दंड हातीं धारण करणाऱ्या, भालदार-चोपदारांनाहि मनांतून चमत्कारिक वाटत असावं. महाराज पुढंमागं बौद्ध भिक्षूची दीक्षा घेणार अशी कुजबूज आज कांही दिवस लोकांत सुरू होती तिला आजच्या त्यांच्या या वेषानं बळकटीच आली. कांहीजण एक-मेकांत म्हणालेहि की, " महाराजांनी बौद्धधर्माची दीक्षा घेऊन टाकली यांत शंकाच नाही आणि आता या यतिवेषानं सिंहासनावर बसून नगरांत बौद्ध धर्म सुरू झाला अशी राजाज्ञेची घोषणाच करणार की काय ?" त्यावर दुसरे म्हणाले, " तसंहि संभवतं. आम्ही कधी नव्हे तें शिष्टमंडळ घेऊन आलों ही महाराजांची एक प्रकारची अवज्ञाच नव्हे तर काय ? आणि तिला आधीच आपलं उत्तर देऊन टाकावं म्हणून त्यांनी असं हें वेषांतर आक्रमण बुद्धीनं केलं असावं."

धर्मांतराची गोष्ट वास्तविक अजून कोणाजवळ खासगी बोलण्यांतहि महा-राजांनी काढली नव्हती. पण अलीकड त्यांच्या हातून बौद्धविहाराला ज्या देणग्या मिळाल्या, आणि नगरांत भिक्षुभिक्षुणींना बौद्ध धर्मप्रसाराची जी मोकळीक मिळाली होती, तिजवरून लोकांनी तसं अनुमान बांधलं होतं. याशिवाय या अनुमानाला दुसरं एक कारण होतं तें मनुष्यस्वभावाच्या ज्ञाना-वरून. झाडाला बांधलेला दोला किंवा झोपा एका टोकाहून निघाला की तो उलटं दुसरं टोक गांठल्याशिवाय राहात नाही हें कोणीहि सांगू शकतो. महा-राजांच्या स्वभावांतहि असंच अंतर पडत चाललेले लोक पाहात होते. तरुण वयांत महाराज हे अत्यंत दुर्वर्तनी व क्रूर असत. त्यांनी प्रत्यक्ष आपल्या बापाचा वध करवून राजपदस्थ होण्याची आकांक्षा सफळ केली होती. गादी-वर आल्यानंतरहि कित्येक दिवसपर्यंत, रागाच्या आवेशांत, त्यांनी लहान, साध्या दोषांकरितांहि अपराध्यांना देहान्तप्रायश्चित्त देण्याचा सपाटा सुरू ठेविला होता. सर्व प्रजा त्यांच्याकड पाहून चळचळ कापत असे. ते शिकारीला गेले म्हणजे पशु व पक्षी यांची हत्या किती करावी याला सुमार नव्हता. रानंच्या रानं रक्ताचा सडा पडून लाल होत. पण ईश्वराची करणी अशी की, त्यांचा त्यांनाच आपल्या पापाचा व क्रूरपणाचा इतका विषाद वाटूं लागला की, पुढं पुढं ते नेहमी सचिंत, उद्विग्न किंवा कांहीसे भ्रमिष्ट असे दिसूं लागले. त्यांनी शस्त्राचा त्याग केला. दानधर्म करण्यास सुरुवात केली. अनाथ

दुःखितांकरिता धर्मार्थ निवासस्थानं व अन्नछत्रं घातलीं. राजवैद्यांना कामाला लावून घरच्या घरीं रोगपीडितांना शुश्रूषेचे उपचार मिळतील अशी व्यवस्था केली. राजवाड्यांतील देवीपुढचा नित्य पशु–बलिदानाचा विधि बंद केला. ध्यानस्थ होऊन धर्मचिंतन करण्यांत ते वेळ घालवूं लागले. जुनीं पापं निस्तरण्याचं हातचं एक हुकमी साधन म्हणून उपासतापासानं देह-दंडन आरंभिलं. मुखावरील व मस्तकावरील केशकलाप सर्व काढून टाकला. आणि भूषणाचं किंवा सौंदर्याचं चिन्ह अंगावर कांही ठेवावयाचं नाही असा क्रम त्यांनी आरंभिला.

हें होण्याला, आणि अवलोकिताबाईच्या अध्यक्षतेखाली बौद्ध धर्मप्रसाराचं काम करण्यास निघालेला संघ भैरवपुराकड येऊन पोंचण्याला, गाठ पडली. मनानं यतिधर्माकड वळलेल्या महाराजांच्या मतपरिवर्तनाचा प्रवाह वाहण्याला आयतीच एक नवी जागा किंवा वळण मिळालं. हिंसेच्या एका टोकापासून परत फिरून अहिंसेच्या दुसऱ्या टोकाला जाऊन भिडूं पाहणाऱ्या या राजाला, या बुद्धसंघांत समानधर्म अशीं मनं भेटलीं; आणि भिक्षुसंघानं दयाधर्माचा, शांतीचा, अहिंसेचा उघड उपदेश सुरू केलेला कानांनी ऐकिल्यावर महा-राजांचं मन सहानुभवानं उचंबळून गेल्यास काय नवल?

* * *

नेमून दिलेल्या वेळीं रुद्रभट हा वैदिक परिषदेचे इतर प्रतिनिधि घेऊन दरबारांत येऊन दाखल झाला. राजापुढं आपआपल्या पक्षातर्फे फाजील अहं-काराचं प्रदर्शन कोणी करूं नये, आपसांतील फूट व स्पर्धा राजाच्या नजरेला पडूं देऊं नये, उलट रुद्रभट हा शिष्टमंडळाचा प्रमुख म्हणून राजाशीं जें बोलेल त्याला आपला पूर्ण पाठिंबा आहे असं म्हणावं, इत्यादि व्यवहारचातुर्याच्या गोष्टी अमात्याच्या अंतस्थ सूचनेवरून शिष्टमंडळाच्या लोकांना आधीच समजा वून पटवून देण्यांत आल्या होत्या; यामुळं शिष्टमंडळाला आसनं बसावयास दिलीं तेव्हा मानाची जागा कोणती, तिजवर कोणी बसावं, अशा प्रकारचा वाद पूर्वी परिषदेंत झाला तसा दरबारांतहि व्हावयाचा तो टळला.

राजानं सौजन्यपूर्ण मुद्रेनं आपलं म्हणणं सांगण्याविषयी रुद्रभटाला सूचना केली, तेव्हां तो म्हणाला, " आजचा हा प्रसंग फार खेदाचा आहे. कारण या राज्यांत अनादि परंपरेनं चालत आलेला शाक्त धर्म आज लयाला जाऊं पाहात आहे आणि त्याच्या जिवावर उठलेल्या अवैदिक अशा परकी धर्माला संरक्षण,

इतकंच नव्हे तर पाहुणचारहि लाभत आहे. महाराजांची पदवी सद्धर्मप्रतिपालक अशी आहे. तिचा अर्थ शाक्तधर्मप्रतिपालक असाच पूर्वपरंपरेनुरूप केला पाहिजे. पण आज राज्यांतील दानधर्माचे झरे शाक्तांच्या भूमींत आटून बौद्धांच्या भूमींतून वर निघाले आहेत. आम्ही फक्त न्यायाची याचना करतों, राजधर्मपरिपालनाची याचना करतों आणि नम्रतापूर्वक अशी मागणी मागतों की, शाक्त धर्माच्या पुनरुज्जीवनाला महाराजांकडून आम्हाला सर्वतोपरीं साहाय्य व्हावं. इतकंच नव्हे तर अवैदिक अशा बौद्ध धर्माकडून आमच्यावर जें अतिक्रमण होत आहे त्याला महाराजांकडून कांही नियंत्रण घालण्यांत यावं. नुकतीच या नगरांत समस्त वैदिक पंथांची परिषद भरली होती. तींत सर्वानुमतं महाराजांना अशी विनंति करावी असं ठरलं, आणि ती विनंति सादर करण्याकरिता परिषदेनं नेमलेले प्रतिनिधि मजबरोबर आले आहेत."

रुद्रभटाचं बोलणं संपल्यावर महाराजांनी सौम्यपणानं त्याला उद्देशून भाषण केलं. महाराज शांत चित्तानं म्हणाले, "माझ्या प्रजाजनांचीं दुःखं इथं येऊन तुम्हीं ऐकविलीं हा माझ्यावर तुमचा उपकार झाला. पण शाक्त धर्माचा ऱ्हास होत असेल तर त्याला त्या धर्माचं परिपालन करणाऱ्या समाजाहून दुसरा कोण जबाबदार म्हणतां येईल ? धर्म हा तत्त्व या नात्यानं कधीच नाश पावत नाही किंवा मलिन होत नाही. परंतु त्याचं प्रत्यक्ष तेज तद्धर्मीयांच्या युक्तायुक्त आचारावर अवलंबून असतं."

रुद्रभट—महाराज म्हणतात तें खरं. आमचा आचार मलिन झाला म्हणूनच आमच्या शाक्तपंथाला उतरती कळा लागली आणि म्हणूनच आम्ही त्या आचारांचं पुनरुज्जीवन करण्याच्या विचारांत आहों. या आचारधर्माला पूर्वकाळीं जसा राजाश्रय होता तसा तो अलीकड मिळत नाहीसा झाला आहे. मात्र तो आश्रय मिळत नाही अशी तक्रार करण्याकरिता आम्ही इथं आलों नसून निदान तो यापुढं मिळावा अशी प्रार्थना करण्याकरिताच आलों आहोंत.

महाराज— तुम्ही कोणत्या आचारांचं पुनरुज्जीवन करण्याचं योजलं आहे ?

रुद्रभट हात जोडून म्हणाला, "शाक्त धर्मांचे आचार सुप्रसिद्धच आहेत."

महाराज— पण या आचारांविषयीं जें प्रसिद्ध आहे तें असं की शाक्तपंथांत दक्षिणमार्गी व वाममार्गी अशीं दोन मतं असून यांतील ऐकाचे जे

आचार तेच दुसऱ्याचेहि आहेत असं नाही, मग तुम्ही आज कोणत्या मताच्या बाजूचे म्हणून बोलत आहां ? दक्षिणमार्गी किंवा वाममार्गी ?"

महाराजांचा हा प्रश्न उद्देशानं भेदक नसला तरी मार्मिक होता. त्यांच्या प्रश्नाचं मर्म लक्षांत येऊन रुद्रभट किंचित् गोंधळलाहि. पण लगेच सावरून तो म्हणाला, "शाक्तपंथांतील दक्षिणमार्गी व वाममार्गी आचारांत भेद असले तरी ज्याला जें मत ग्राह्य असेल त्याप्रमाणं त्याला आचरण्याचा अधिकार असावा. मी नुसत्या वाममार्गी शाक्तांकरिता बोलायला महाराजांकड आलों नाही. मजबरोबर दक्षिणमार्गी शाक्त आले आहेत; एवढंच नव्हे तर शाक्त नसलेल्या अशाहि वैदिक धर्मानुयायांचे प्रतिनिधि शिष्टमंडळांत आले आहेत."

महाराज म्हणाले, "मग तुम्ही आपापले आचार करीत जा. तुम्हाला कोणी प्रतिबंध केला आहे ?"

रुद्रभट—प्रत्यक्ष प्रतिबंध अजून कोणी केला नाही; पण अवैदिक धर्माच्या लोकांना राजाश्रय मिळूं लागल्यापासून राज्यांतील लोकांचींहि मनं वैदिक धर्मापासून पराङ्मुख होऊं लागलीं आहेत."

महाराज म्हणाले, "प्रजाजनांना जर धर्मस्वातंत्र्य हवंसं वाटतं तर राजालाहि तें कां नसावं ?"

रुद्रभट—प्रजाजनांप्रमाणं राजा ही कोणी खासगी व्यक्ति नसते. राजा हा प्रजेचा प्रतिनिधि असतो आणि या राज्यांतली प्रजा सर्व वैदिक धर्माची आहे.

महाराज म्हणाले, "तुमच्या बोलण्यांत थोडी अतिव्याप्ति होते. कशी ती पाहा. माझ्या राज्यांत वैदिक धर्म सुरू होण्यापूर्वी जो पुरातन धर्म प्रचलित होता तो अनुसरणारे अनार्य लोक माझ्या प्रमाजनामधे कांही आहेत. तसंच वैदिक धर्माची सुधारणा करून नवा पंथ स्थापणारे कांही बौद्ध हेहि माझे प्रजाजन आहेत. तेव्हा मी अमुकच एका प्रजाजनांच्या धर्माला आश्रय दिला तर ते माझ्या राजधर्माला दूषण होणार नाही काय ? आईला आपलीं सर्व मुलं सारखींच असतात. मग रूपानं, स्वभावानं तीं बरीवाईट कशींहि असोत. प्रजेकडून मी करभार घेतों तो दानधर्माच्या रूपानं परत देतों. तेव्हा प्रत्येक धर्माचा अंश त्यांत असलाच पाहिजे. पूर्वी शाक्त पंथाला राजाश्रय म्हणून केवढीं मोठीं इनामं, वतनं, अग्रहार या राज्यांत मिळाले. त्या मानानं हल्ली

मी बौद्धांना देतों तो आश्रय कांहीच नाही. त्यांचे आचार तुम्हाला विपरीत दिसतात. तसेंच तुमचेंहि कांही आचार त्यांना विपरीत दिसतात. म्हणून कोणी कोणाच्या आचारांना नांवं न ठेवतां आपल्याला पसंत पडतील ते आचार ज्यानं त्यानं आचरावं. त्याला राजानं हरकत करूं नये इतकंच."

इतकं संभाषण होतं तोंच राजद्वारावरचा प्रतिहारी सांगत आला की, बाहेर बौद्ध भिक्षुभिक्षुणींचा वेष धारण करणारी अशी कांही स्त्री-पुरुष मंडळी आली आहे. ती महाराजांची भेट व्हावी अशी प्रार्थना करीत आहे. महाराजांनी ती प्रार्थना मान्य करून त्यांना आंत सोडण्याची आज्ञा दिली. त्याबरोबर अवलोकिता, मृणालिनी, शमधन इत्यादि मंडळी बरोबर मुरारीला घेऊन आंत आली. लगेच महाराजांनी उठून उभे राहून अवलोकिताबाईंना अभिवादन केलं. मग थेट महाराजांच्या आसनापर्यंत जाऊन अवलोकितेनं मुरारीला एकदम महाजारांच्या पायांवर घातलं. हा प्रकार पाहून सभेंतील सर्व लोक आश्चर्यचकित झाले. त्यांना हा मुलगा कोण व त्याला महाराजांच्या पायांवर कां घातला याचा अर्थ कळेना.

रुद्रभटाला मात्र त्याचा अर्थ चांगलाच कळला. त्यानं डोळे लाल करून अवलोकितेकड आणि मुरारीकड टक लावली आणि जवळच्या शाक्त लोकांना तो हळूच म्हणाला, " पहा-पहा, हें पोरटं कुणी कुणाकड पळवून नेलं आणि आमच्या बलिदानाच्या धर्मविधींत व्यत्यय आणला तें पाहून घ्या. " तथापि सर्व सामान्य लोकांना त्याचा कांहीच बोध होईना.

स्वतः महाराजांनाहि त्याचा बोध झाला नाही. ते म्हणाले, " अवलोकिताबाई, हा लहान मुलगा कोण ? तुमच्या विहारमठांत लहान मुलं सहसा असत नाहीत आणि याला माझ्या पायावर घातलांत याचा हेतु काय ? "

अवलोकिता उभ्यानंच हात जोडून म्हणाली, " आमच्या विहारमठांतून लहान मुलं असत नाहीत हें खरं. पण दया व जीवसंरक्षण हेंच आमच्या धर्माचं मुख्य तत्त्व असल्यामुळं आमच्या स्वाधीन कोणी एखाद्यानं प्राणरक्षणाकरिता एखादं मूल आणून दिलं तर तें आम्ही आपलंच समजतों."

महाराज—ठीक आहे. त्याला तुम्ही विहारांत ठेवून घ्या. पण त्याचे प्राणरक्षण करण्याची गोष्ट बोललांत तिचा काय संबंध ? त्याच्या प्राणाला भीति कशाची ?

अवलोकिता म्हणाली, "शाक्तांची. त्यांच्या आसुरी धर्माचाराची. हा मुलगा कांहीं दिवसांपूर्वीं एका स्त्रीनं लपतछपत आमच्या विहारांत आणून दिला आणि सांगितलं की, याला शाक्त लोक देवीला बळी देणार आहेत, तुम्हीं वांचविलांत तरच तो वांचेल पण त्या बिचारीला त्याचं प्राणरक्षण करणं जसं कठिण वाटलं तसंच आम्हा मठवासी लोकांनाहि तें कठिण वाटतं. आम्ही शांतताप्रिय अहिंसेची शपथ घेतलेल्या निःशस्त्र भिक्षुभिक्षुणी. या मुलाला परत नेण्याकरिता शाक्तांनी आमच्या विहारमठावर हल्ला केला तर आम्ही त्याचा प्रतिकार कसा करणार? आमची जीवदया सफल व्हावयाची तर ती राजाश्रयावांचून सफल होणं शक्य नाही. या अगतिक भावनेनं आम्ही महाराजांना शरण आलों आहों. तर आम्हाला व या चिमण्या बालजीवाला अभय असावं.

हें ऐकतांच सर्व सभा गहिवरली. शिष्टमंडळांतीलहि कांहीं प्रतिनिधींचीं तोंडं गोरींमोरीं झालीं. महाराज म्हणाले, "तुम्ही मागतां तें अभयदान मीं तुम्हाला दिलं आहे. घ्या मुलाला वर उचलून. धर्माचाराच्या नांवाखालीं अशा मुलाचा बळी देणं ही त्या धर्माला काळिमा आणणारी गोष्ट नव्हे काय? दया हें तर सर्व धर्मांचं मूळ आहे असंच म्हणतात ना? आताच शिष्टमंडळाचे पुढारी हे शाक्त गुरु आपल्या धर्माचाराला प्रतिबंध नसावा अशी मागणी करीत होते. मीहि त्यांना सामान्य तत्त्व म्हणून तसा प्रतिबंध होऊं नये, सर्वांना आचारस्वातंत्र्य असावं, असं म्हणालों. पण हे धर्मगुरु धर्माचाराच्या नांवाखालीं नरबलि द्यावा व त्याला प्रतिबंध नसावा असं म्हणतील काय?"

पण रुद्रभट जसा धीट तसाच उलट्या काळजाचाहि होता. तो म्हणाला, "मी बोलतों याची महाराजांनी क्षमा करावी. आचारस्वातंत्र्य असावं असं, एकदा म्हटलं म्हणजे मग तिथं कसला आचार, कोणता आचार, हा प्रश्नच उत्पन्न होत नाही. कोणी कोणताहि धर्माचार करतो तो स्वधर्माला स्मरून जाणूनबुजूनच करतो. त्याचं पापपुण्य तो पदरांत घेईल. अनादि आचारांना बरं किंवा वाईट म्हणण्याचा कोणालाच अधिकार नसतो. परक्यांना आचारधर्माची चिकित्सा करण्याचा अधिकार दिला म्हणजे कोणाचं आचारस्वातंत्र्य तें काय उरलं? महाराज हे शाक्त प्रजाजनांचे राजे आहेत. त्यांनी आपल्या प्रजाजनांच्या आचारांचं संरक्षणच केलं पाहिजे. बोलूनचालून अवैदिक अशा बंडखोर धर्मभ्रष्टांनी दयेचा आधार घेतला म्हणून काय झालं? अहिंसा हा जसा एकाचा धर्माचार होतो तसंच—"

महाराज मधेच म्हणाले, " हिंसा हाहि दुसऱ्या एखाद्याचा धर्माचार होऊं शकतो असंच तुमचं म्हणणं ना ? "

रुद्रभट म्हणाला, " हिंसा हा शब्द मान्य न करण्याबद्दल मी महाराजांची क्षमा मागतों. परंतु मी असंहि म्हणतों की धार्मिक बलिदानाला हिंसा हा शब्द लावणं युक्त नाही."

महाराज निश्चयानं म्हणाले, " तें कांही नाही. हा निवळ शब्दच्छल होत आहे. त्याला मी बळी कसा पडेन ? माझ्या पायावर आणून घातलेल्या या कोवळया बालकाची हत्या मी करूं देईन तर मला धिक्कार असो."

रुद्रभट—फिरून महाराजांची क्षमा मागून मी म्हणतों की, या आमच्या धर्मशत्रूंचा प्रवेश सभेंत होण्यापूर्वी शेवटले उच्चारलेले महाराजाचे शब्द सर्व धर्मपंथांना आपापले आचार पाळूं द्यावेत, त्यांना प्रतिबंध करूं नये असेच होते ना ?

महाराज—होय, ते तसे होते. तथापि त्यामुळं मीं दिलेलं अभयदान परत घ्यावं असं होत नाही. इतकं बोलून महाराज अमात्याकडे वळले आणि म्हणाले, " अमात्यराज, तुमचा अभिप्राय या कामीं कसा पडतो ? "

अमात्य तोंडाला पदर लावून म्हणाले, " महाराज म्हणतात तेंच खरं. शिवाय शिष्टमंडळाच्या या पुढाऱ्यांना स्वतःच्या धर्मपंथाचा अभिमान व धर्माचाराचं प्रेम कितीहि वाटत असलं तरी त्यांना स्वतः महाराजांशीं असं उत्तरप्रत्युत्तर करणं शोभत नाही. मी तर त्याला राजद्रोहच म्हणेन. आचारांची चिकित्सा कोणी करूं नये हें कसं होईल ? आचारस्वातंत्र्याचा अधिकार जर महाराजांकडून घ्यावा लागतो, तर तो अधिकार द्यावा न द्यावा हें पाहण्याकरता आचारांची चिकित्सा करण्याचा अधिकार महाराजांना प्राप्त होतोच."

महाराजांना अमात्यांचा अभिप्राय ऐकून बरं वाटलं. ते म्हणाले, " अवलोकिताबाईंना या मुलाचं संरक्षण विहारमठांत करणं कठिण वाटत असेल तर मी हा मुलगा तूर्त अमात्यांच्याच स्वाधीन करतों, म्हणजे ते त्याचं संरक्षण नीट करतील. हा मुलगा कोण, कोणाचा, याची माहिती मागाहून काढूं, म्हणजे त्याचे आईबाप त्याला घेऊन जातील. पण शाक्तांच्या भीतीनं त्यांना त्याचं

रक्षण करणं कठिण वाटत आहे असं कळून आलं तर मी दुसरी कांही व्यवस्था मग करीन. तोंपर्यंत अमात्यांनीच हा मुलगा स्वाधीन ठेवून मी दोन दिवस यात्रेला जाऊन येतों तोंवर संभाळावा अशी माझी त्यांना आज्ञा आहे."

मुरारीला अमात्यांच्या स्वाधीन करून महाराज आसनावरून उठून अंतर्गृहांत गेले. दरबार संपला. अवलोकिता, मृणालिनी या समाधान पावून आपल्या विहाराकडे निघाल्या. शिष्टमंडळांतील इतर मंडळी शून्यवदन होऊन एकमेकांकड पाहूं लागली. फक्त रुद्रभट हाच क्रोधाविष्ट झाल्यासारखा दिसत होता. परंतु मुलाला संरक्षणाकरिता अमात्यांच्या स्वाधीन केलं या शेवटच्या प्रकारानं त्याच्या रागाला किंचित् सौम्यपणा आला असावा असंहि दिसलं. त्याची व अमात्याची नजरानजर बराच वेळ झाली. शेवटीं अमात्याकड व त्या मुलाकड पाहात विंचवाच्या नांगीसारख्या आपल्या मिशांना पीळ भरीत रुद्रभट सभागृहांतून बाहेर पडला.

दरबारांत घडलेला आणखी एक प्रकार आहे तो सांगतो. महाराजांनी मुरारीला अमात्याच्या स्वाधीन करतांच, दरबार पाहण्याला आलेल्या गर्दीतून एका बाजूला, पण सर्वांना सहज दिसेल अशा जागीं उभी राहिलेल्या, एका स्त्रीला इतकं मोठ्यानं खदखदा हसूं लोटलं की सर्व लोक तिजकडे आपले डोळे लावून टकटक पाहूं लागले. इतर सर्व लोक गंभीर वृत्तीनं निःशब्द बसलेले असल्यानं तिचं हसणं स्पष्टपणं सर्वांना ऐकूं आलंच. पण तिचं हसणंहि सामान्य हसण्यापेक्षा वेगळंच, किंबहुना थोडंसं विकृतहि भासलं. इतर सर्व लोक बसले असतां ही एकटीच उभी असल्यानं प्रमुखपणं नजरेस पडण्यासारखी होती. तिनं अंगावर फाटक्या चिंध्याचीं लक्तरं वेडींवाकडीं पांघरलेलीं होतीं, आणि झिंज्यांमधे पांढऱ्या फुलांचे तुरे लटकविलेले होते. हातांत एक नागव्या सुरीचं पातं मुठीनं धरून उराजवळ ठेवलं होतं. आणि आपले तारवटलेल्या सारखे डोळे ती सर्व सभेकड, महाराजांकड आणि विशेषतः रुद्रभटाकड रोखून फिरवी. प्रथमपासून ती या सभेंत हजर असतां इतरांप्रमाणंच स्तब्ध होती आणि सभेमधे होणारीं भाषणं लक्ष लावून ऐकत होती. पण शेवटीं महाराजांनी मुरारीला अमात्याच्या स्वाधीन केला आणि अमात्यानंहि मुलाचा हात धरून त्याला आपल्यापाशी घेतलं हें पाहतांच, तिला एकदम वर सांगितल्याप्रमाणं खदखदून हसण्याची उकळी फुटली. भरल्या सभेंत एकाच व्यक्तीकडून कांही कोकविलक्षणप्रकार घडला म्हणजे सर्वांचं लक्ष तिकड वेधतं, आणि ही व्यक्ति वेडी

असावी अशी शंकाच येते. आणि सर्वजणांनी या स्त्रीकड डोळे लावले तेव्हा तर तिच्या वेडेपणासंबंधाची अटकळ खरी असावी असाच तिचा वेष होता हें सर्वांना दिसून आलं. लगेच एक राजदूत तिजकडे जाऊन 'चल जा इथून इथं वेडीचं काय काम ?' असं म्हणून दरडावून तिला हडत हुडत करून घालवून देऊं लागला. हें महाराजांना दिसतांच ते म्हणाले, "हां हां, वेडी असली तरी ती नागरिक आहे. माझी प्रजाजन आहे. हसू येणं हा कांही अक्षम्य अपराध नव्हे; किंवा तिला हसूं येण्यालाहि तसंच कांही कारण नसेल कशावरून? खबरदार कोणी तिच्या वाटेला जाल तर!" ही आज्ञा ऐकून राजदूत मागे सरला. मात्र झाल्या प्रकारानं सर्व सभेचं लक्ष तिच्याकड अधिकच वेधलं. पण या प्रकरणानंतर स्वतः महाराज उठून अंतर्गृहांत गेल्यामुळं सभाच संपली; आणि जो तो आपल्या मार्गानं परत जाऊं लागला. यामुळं तिला कोणीच अधिक उपद्रव दिला नाही.

लोक सभेंतून बाहेर पडूं लागले तेव्हा प्रथम ती वेडी स्त्री रुद्रभटाच्या मागोमाग जाऊं लागली. तिची त्याची चार वेळ दृष्टादृष्टहि झाली. प्रत्येक वेळीं तिला पाहतांच रुद्रभट बोलण्याचा थांबे, आणि किंचित् भीतीनं किंचित् रागानं, ता तिजकड टवकारून पाही. आणि तीहि त्याच्याकड रोखून पाहून वेड्यासारखं हसे. आणि विशेष हें की, उराशीं असणाऱ्या नागव्या सुरीची मूठ घट्ट पकडून सुरी बाहेर काढून परजून दाखवी. हें सर्व वेडेचाराचं लक्षण उघडच ठरत असे. म्हणून लोक तिच्याकडं पाहून नुसते हसत व उपेक्षेनं आपल्या वाटेनं निघून जात. मात्र तिचे हे वेडेचार पाहून रुद्रभटाला एकदाहि हसूं आलं नाही. तिजकड वळून पाहण्याचं काम तो इतरांपेक्षा पुष्कळदा अधिक करी; पण लगेच इतरांपेक्षाहि आपण तिजकड अधिक दुर्लक्ष करतों असं भासविण्याचा बहाणाहि तो करी.

रुद्रभट व त्याचे साथीदार निघून गेल्यावर ही वेडी राजमार्गावर कोणाची तरी वाट पाहात असावी अशा रीतीनं कांही वेळ उभी राहिली. इतक्यांत अमात्य राजवाड्याकडून परत चाललेला तिथं येऊन पोंचला. त्याच्या बाजूला मुरारी अमात्याचाच हात धरून आपलीं चिमुकलीं पावलं टाकीत दुडदुड चालत होता. तो जवळ येतांच वेडी एकदम चटदिशी पुढं झटकली आणि 'माझा बाळ मुरारी' असं म्हणून तिनं खाली वळून त्याचा मुका घेतला. हें पाहून अमात्यासुद्धा सर्वजण दचकले. राजदरबारांत तिच्या हातांत सुरीचं

नागवं पातं पाहिल्यामुळं, ही वेडी या मुलाचा घात करण्याकरिता खाली वाकली की काय, अशी क्षणभर कल्पना येऊन एक परिचारक धावून जवळ गेला. पण वेडीनं मुलाला ओळखून हाक मारून त्याचा मुका घेतला हें पाहून सर्वांची भीति नाहीशी झाली. या वेडेचाराचं त्यांना कौतुक वाटलंच, पण मुरारीनंहि तिला ओळखून अमात्याचा हात सोडून तिजकडे धाव मारली; हें पाहून तर त्यांच्या कौतुकांत आश्चर्याची भरच पडली. अमात्य थांबून खिळून उभा राहिला. "दाई दाई, कुठं ग गेली होतीस मला सोडून ? चल चल आईकड मला घेऊन." असं मुरारीनं म्हटलेलं ऐकून तर तो स्तंभितच झाला. तो वेडीला म्हणाला, "काय ग वेडे, हा मुलगा तुझ्या ओळखीचा कसा ? तुझं नांव काय ? कोण, कुठली तूं ?"

पण वेडीच्या मनांत त्याला त्या वेळीं सरळ उत्तर देण्याचं नसावं. म्हणून तिनं मुरारीला चटकन दूर लोटल्यासारखं केलं, आणि स्वतः किंचित् दूर जाऊन वेडेपणाची अधिकच बतावणी तिनं आरंभिली. ती हसूं लागली. उड्याहि मारूं लागली. आपल्या केसांतील पांढरे तुरे काढून नाचवूं लागली; आणि "जा, बाळ जा. ज्याला देव तारणार त्याला कोण मारणार" असं मोठ्यानं म्हणून ती हसण्याऐवजीं आता मोठ्यानं रडूं लागली. मात्र त्या रडण्यांत दुःखापेक्षा आनंदाचीच छटा अधिक होती असं पाहणारास सहज भासे, पण ती यापुढं जागेवर उभी राहिलीच नाही, एकदम पाठ फिरवून उडी मारल्यासारखं करून पळून गेली. अमात्यहि वेडीचं कौतुक करीत फिरून मुरारीचा हात धरून आपल्या वाड्याकड निघून गेला.

महाराजांनी अमात्यांच्या हातीं दिलेली ठेव खरोखरच मौल्यवान् होती. जिवाचं मूल्य इतर कशाला येणार ? त्यांतून हा जीव चिमणा, आईबाप असतां पोरका, प्राणसंकटांत सापडलेला. आपल्या महत्त्वाकांक्षेमुळं अमात्य शाक्तांच्या कटांत सामील झाला असला तरी अजून अमात्यानं आपल्या गुप्त राजद्रोहावरचं पांघरूण फेकून दिलं नव्हतं. अवलोकितेनं स्वाधीन केलेला मुलगा महाराजांना स्वतःच्या वाड्यांत सुरक्षित ठेवतां आला नसता काय ? पण तो आपल्या स्वाधीन करून जो विश्वास प्रगट केला त्यानं महाराजांनी त्याच्या गुप्त राजद्रोहाच्या अग्नीवर पाणी ओतून तो थोडा शमविल्यासारखं झालं. महाराज आता वृद्ध झालेले, त्यांना मूलबाळ नाहीं, म्हणून ते निवर्तल्या-वर आपण सैन्याचं व जनतेचं पुढारीपण स्वीकारून सिंहासन हस्तगत

केलं तरी शाक्त पक्षपाताचा मोबदला आपणाला सहज मिळणार आहे. मग आजच राजद्रोह पेटवून बंड करून महाराजांना पदच्युत न करावं हें बरं नव्हे काय ? महाराजांचा विश्वस्त अमात्य म्हणून आपणाला मिळणारी उघड मान्यता काय कमी आहे ? तिनंच तूर्त आपलं समाधान करून का घेऊं नये ? हा मुलगा आपल्या स्वाधीन करून स्वतःचा स्वतःवर विश्वास नाही इतका विश्वास महाराजांनी मजवर टाकला, तेव्हा या मुलाचा प्रश्न निकालांत निघेपर्यंत आपण रुद्रभटाला अधिक उत्तेजन देऊं नये असं अमात्याच्या मनांत हळूहळू येऊं लागलं !

पण मनानं पूर्वी केलेल्या पापाचा ब्रह्मराक्षस त्याच्या डोक्याशीं उभा होता आणि त्याचं दर्शन म्हणूनच की काय, अमात्य घरीं येतांच रुद्रभट त्याच्या-पुढं येऊन उभा राहिला, तो म्हणाला, "महाराज मुरारीला आपल्याजवळ ठेवून घेतात की काय, अशी मला भीति वाटत होती; पण आमच्या दैवानं तो तुमच्या स्वाधीन करण्याची बुद्धि त्यांना व्हावी यांत आमच्या प्रयत्नाला यश आहे असाच देवीनं कौल दिला असं मीं समजतों. महाराजांच्या हातीं मुलगा असता तर तो आमच्या हातीं येणं कठीण झालं असतं. पण तो अमा-त्यांच्या हातीं दिल्यामुळं आमचं यश एक पायरी अलीकडं आलं. मग आता आम्हीं पुढं काय करावं ? याचा सल्ला आम्हाला देण्याला अमात्यच समर्थ आहेत. तो सल्ला आम्ही काय समजावा ?"

रुद्रभटाचा प्रश्न सूचक होता. परंतु अमात्याची जीभ अडखळूं लागली. तो म्हणाला, "ज्या धोरणानं तुमच्याशीं दरबारांत वागेन असं मीं तुम्हाला पूर्वी सुचविलं तेंच आणखी थोडा वेळ मला तसंच चालविलं पाहिजे. मी मनांतून तुमचा असलों तरी कांही वेळ वरपांगी मला अजून राजनिष्ठ आहें असंच दाखविलं पाहिजे. मुलगा स्वाधीन करण्याची तुमची मागणी महाराज मान्य करीत नाहीत यानं तुमच्या चळवळीला जर जोरच येणार असेल, तर मुलगा हातीं आल्यापेक्षा तो हातीं न आलेलाच बरा नव्हे काय ?"

"पण मुलगा हातीं येऊन तो बळी देतां आल्यानं आमचं कार्य अधिक चांगलं होणार नाही का ? म्हणजे बलिदानानं शक्तिदेवी संतुष्ट होऊन आम्हाला आशीर्वाद देईल, आणि बलिदान न आवडून महाराजांनी आपला राग अनावर होऊं दिला तर देवीच्या त्या आशीर्वादाच्या बळावर आम्ही राज्यक्रांति करूं."

अमात्य—पण मुलगा तुमच्या स्वाधीन केल्यानं माझ्या हातून महाराजांचा विश्वासघात होईल तो ? तुमची क्रांति एरवी थोडी तरी रंगरूपाला येईपर्यंत मी कांही करणं ठीक होणार नाही.

रुद्रभट विस्मयानं म्हणाला, "मग मुलगा हस्तगत करून घेण्याच्या मार्गांत तुमचा आणि महाराजांचा विरोध असे दोन तट आमच्या मार्गांत येणार की काय ? तुमच्यावर विश्वासघाताचा बोल न येतां आमचं तर कार्य व्हावं याला हवी तर एक युक्ति मला दिसते. मुलगा तुमच्या स्वाधीन असतां आम्ही त्याला पळवून नेऊं आणि मग महाराजांबरोबर तुम्हीहि आमच्यावर राग काढण्याला बाहेरून तयार झाल्यासारखं दाखवावं. त्याला आमची हरकत नाही. महाराजांविरुद्ध बंड करण्याचं बळ आमच्या अंगीं असलं तर तुमच्या विश्वासघाताचा विचार करण्याला महाराजांना अवसरच मिळणार नाही."

पण अमात्य मनांत इतका गोंधळून गेला होता की रुद्रभटाला काय उत्तर द्यावं हें त्याला सुचेना. म्हणून तो म्हणाला, "माझ्या हातीं मुलगा आल्यानंच तुमचं यश एक पायरी अलीकड आलं असं आता तुम्हीच म्हणाला ना ? तर मग आता जा, आणि तुम्ही आपले इतर प्रयत्न करण्याच्या मार्गाला लागा. मी आज विश्रांति घेऊन, विचार करून, उद्या काय तें तुम्हाला उत्तर देईन" असं म्हणून अमात्यानं रुद्रभटाला निरोप दिला.

प्रकरण अठरावें

नदीचें पाणी नदीला मिळालें

अमात्य चंडमति मुरारीला घेऊन आपल्या वाड्यांत गेल्यापासून त्यानं त्या मुलाला आपल्या डोळ्यांपुढून हलूं दिलं नाही. परक्या घरांत झालं तरी त्याच्याएवढ्या मुलाला संभाळण्याचं काम सहज घरच्या बायकांकडं असायचं; पण पूर्वी एके ठिकाणीं सांगितलंच आहे की, अमात्याची पहिली बायको पुरांत वाहून गेली, दुसरी केली ती लवकरच मेली, आणि तिसरी केली तीं त्याच्या कैफी वर्तनाला कंटाळून त्याचा त्याग करून कायमची माहेरीं जाऊन

बसली. घरांत गृहिणी नाहीं म्हणून घर हें घर नव्हे अशी स्थिति झाली होती. घरांत सेवकजनांना तोटा नव्हता आणि त्यांत कांहीं दासीहि होत्या! परंतु राजानं आपल्या स्वाधीन केलेल्या या बालनिधीला अमात्याच्यानं चाकरांच्या हातीं विसंबवेना. चाकरांची जात सहसा विश्वासु नव्हे; त्यांतूनहि हा मुलगा पाहुणा म्हणून सुखासुखी चार दिवस राहण्याकरिता आला नव्हता. त्याला स्वाधीन करून घेऊन बळी देणं यावर भैरवपुरांतलं आजचं शाक्तांचं सर्व राजकारण खेळत होतं. म्हणून निदान नोकरचाकरांच्या बेमानीनं, विश्वासघातानं, फसगतीनं मुलगा आपल्या हातून जावा आणि राजाच्या रोषाला आपण पात्र व्हावं हें अमात्याला ठीक वाटलं नाहीं.

पण याहून आणखीहि एक कारण होतं. मुरारीचा हस्तस्पर्श झाल्यापासून काय झालं कोणास ठाऊक! अमात्याच्या मनावर त्या मुलाची एक प्रकारची मोहनी पडल्यासारखी झाली. त्याला आपल्याजवळ बसवून घेऊन त्याच्या तोंडाकड पाहात राहावं अशी प्रबळ इच्छा अमात्याला होऊं लागली. मुरारीहि असा लाघवी होता, की तो कोणासहि आपल्या प्रेमळ बाळलीलांनी वश करून घ्यावयाचा. नीला आणि भवानी यांना त्यानं कसं वेड लावून सोडलं होतं हें वाचकांना ठाऊकच आहे. अवलोकिता आणि मृणालिनी यांच्या हातीं तो चार दिवस गेला तेवढ्यांत त्यांनाहि त्यानं असा लळा लाविला की, महाराजांच्या स्वाधीन त्याला करून परत फिरतांना त्यांच्या डोळ्यांला पाणी आलं तें कांहीं केल्या खळेना. आता अमात्याच्या घरीं तो आला तरी तोच प्रकार. तो सामान्य मुलासारखा रडवा नव्हता. कोणावरहि त्याच्या मजेदार प्रश्नांची सरबत्ती सुरू असावयाची. नाहीत ते खेळ काढून मोठ्या माणसांनाहि त्यामधे तो गुंतवून घेई. तो चौकस असल्यामुळं सभोवती दिसतील त्या वस्तूंची सगळी छाननी झाल्याशिवाय त्याच्या हातून राहत नसे. आणि त्याचं हसणंखिदळणं हें दुःखी मनुष्यालाहि क्षणभर दुःख विसरावयाला लावण्याइतकं मोहक होतं.

वाड्यांत गेल्यावर अमात्यानं चाकरांकरवीं खाण्याच्या पदार्थांचं ताट आणून मुरारीपुढं ठेवलं; परंतु त्यांतील कांहीं खाल्लं न खाल्लंसं करून त्यानं अमात्यांचा हात धरला, आणि वाड्यांतून हिंडण्या-फिरण्याची इच्छा दर्शविली. अमात्याला ही इच्छा मोडवेना. लहान मुलगा होऊन त्याचं लक्ष खाण्याच्या पदार्थांकड जात नाहीं, ही गोष्ट अपूर्व वाटून त्याच्या मनावर परिणाम झालाच.

पण मुलाची चौकस वृत्ति पाहूनहि त्याला कौतुक वाटलं. दोघं एकमेकांचे हात धरून मुरारी नेईल तसा अमात्य चालूं लागला. मुरारीनं या दालनांतून त्या दालनांत जावं, ही वस्तू हाताळून पाहावी, तिला कुरवाळावं असा क्रम सुरू केला.

लवकरच एका दालनांत ते गेले तों समोर एक मोठा आरसा भुईला चिकटेल असा टांगला होता. त्यापुढं उभा राहून मुरारी आपलं प्रतिबिंब न्याहाळूं लागला. अमात्यालाहि तें करणं प्राप्तच झालं. पण स्वतःचा आणि मुरारीचा चेहरा दोन्ही एकत्र दृष्टीस पडल्यावर, काय झालं कोणास ठाऊक, तो एकदम दचकला. कांही केल्या त्या सजोड प्रतिबिंबावरून त्याला दृष्टि काढवेना. आपल्या आणि मुरारीच्या चेहऱ्यांत विलक्षण साम्य कसं असावं या विचारांत तो मग्न झाला. होय. अगदी तेच डोळे, तेंच नाक, तोच तोंडावळा ! त्याबरोबर त्याला अभावितपणं पुरांत वाहून गेलेल्या स्वतःच्या मुलाची आठवण झाली. आपला मुलगा तर वाहून गेला, मग हा कोण ? आपल्या एखाद्या दासीच्या पोटीं आपला हा मुलगा येऊन तिनं तो आजवर आपणाला न कळत वाढविला असेल काय ? किंवा तिनं आपली लाज वांचविण्याकरिता त्याचा त्याग केल्यामुळं तो दुसऱ्या कोणाच्या हातीं लागून परंपरेनं अग्निवर्णाच्या स्त्रीच्या हातीं गेला असेल काय ? असे अनेक प्रश्न त्याला सुचूं लागले. ह्या प्रश्नांचा मनांत विचार करीत असतां त्याचे डोळे बाजूला होइचनात ! त्या आरशांत त्याची आणि मुरारीची दृष्टादृष्ट होई तेव्हा मुरारी हसे; त्याबरोबर अमात्यालाहि हसूं येई आणि दोघांच्या हसण्याचं रूपहि एकच हें पाहून तर अमात्याच्या आश्चर्यांत भरच पडली !

थोड्या वेळानं मुरारी आरसा सोडून पुढं चालला तेव्हा अमात्यानं मुरारीचा हात अधिकच घट्ट धरला. नंतर दुसऱ्या एका दालनांत ते गेले. तें अंतःपुराचं होतं. स्त्रियांच्या एक दोन तसबिरी देवीच्या चित्रांबरोबरच तिथं टांगलेल्या होत्या. स्त्रियांची आठवण व्हावी असे कांही पदार्थहि तिथं होते. पण तिथं एकहि स्त्री दिसत नाही असं पाहून मुरारीला विचारल्यावांचून राहवेना. तो अमात्याकड तोंड वळवून म्हणाला, " अहो-अहो " (अपरिचित पुरुषांना लहान मुलं याच नांवानं ओळखतात) " अहो-अहो, या घराची आई कुठं आहे ? " 'घराची आई' हा प्रयोग, वाचक हो, तुम्हाला चमत्कारिक वाटेल. पण मुरारीनं तरी काय करावं ? तुमची बायको कुठं आहे असं तो कसं

विचारणार! लग्न-संबंधाचे ज्ञान त्याला अजून नव्हतं. बायको हा शब्द त्याच्या कानांवरून कधी गेला असलाच तर त्याचा अर्थ त्याला कळणं शक्यच नव्हतं. मुलांना आई असते एवढं मात्र त्याला माहीत होतं; पण या मुलांची आई कुठं आहे असा प्रश्न सुचायला घरांत मुलंहि त्याला दिसेनात. आई ही मुलांची आई तशीच त्या मुलांच्या बापाचीहि आईच असते असं मानण्याइतकी त्याची पोर बुद्धि! 'पण तुमची आई कुठं आहे?' असं अमात्याला न विचारतां 'या घराची आई कुठं आहे हो?' असा प्रश्न त्यानं विचारलेला ऐकून अमात्याला हसूं कोसळलं. आता त्याला काय उत्तर द्यावं? तीन बायकांपैकी एक मेली म्हटलं, तर मेली या शब्दाचा अर्थ सांगत बसावं लागणार. एक आपल्या दुर्गुणांबद्दल आपला त्याग करून गेली, हें आधी या मुलाला समजावून सांगावं तरी कसं? आणि तें सांगतां आलं तरी इतक्या लहान मुलाजवळ देखील आपली बेअब्रू सांगण्याला अमात्याचं मन सहजच कचरलं. पण आपली पहिली बायको नदीच्या पुरांत वाहून गेली, पाण्यांत बुडाली, असं त्याला सांगतां येण्यासारखं होतं तेंच त्याच्या तोंडाला चटदिशी आलं. तो म्हणाला, "बाळ, या घराची आई नदींत वाहून गेली. पाण्यांत बुडाली."

हें ऐकतांच मुरारी एकदम म्हणाला, "हं-हं! माझी आई नदीच्या पुरांत वाहून बुडून गेली अशी गोष्ट माझी दाई मला सांगते तशीच ना?"

हें ऐकतांच अमात्य फिरून दचकला. मुलगा मनचं कांहीं तरी रचून का सांगेल? त्याला या वयांत तें तसं सांगतां तरी कसं येईल? पण हां. ही गोष्टींतली गोष्ट! गोष्टींत काय हवं तें येऊं शकतं. 'दाई गोष्ट सांगते तशीच' असंच मुलगा म्हणाला ना? ठीक. त्याला ती गोष्टच सांग म्हणावं, म्हणजे मनांतला गोंधळ थांबेल आणि त्या बोलक्या बाळालाहि बोलविल्यासारखं होऊन 'घराची आई कुठं आहे' या त्याच्या प्रश्नाचं उत्तर देण्याचंहि टळेल. असा विचार करून अमात्य म्हणाला, "सांग-सांग बरं, बाळ, तुझी दाई काय गोष्ट सांगते ती. आणि तुझी ती दाई कुठं आहे रे?"

मुरारीला ही पडत्या फळाचीच आज्ञा झाली. गोष्ट ऐकण्याइतकंच गोष्ट सांगणं हेंहि लहान मुलांना आवडतं. तो लगेच म्हणाला, "वः! माझी दाई नाही का तुम्ही सकाळीं पाहिलीत? माझा चोरून मुका घेऊन पळून गेली ती! लबाड कुठली! तिनंच मला सांगितलेली गोष्ट. खोटी हां अगदी! म्हणे, माझी आई मला पाळण्यांत घालून हालवीत होती. धो-धो पाऊस आला.

पाळणा वाहून गेला. आई वाहून गेली. देवाच्या घरीं गेली. मी कोणालासा सापडलों. दाईनं मला विकत घेतलं. माझ्या आईला दिलं. मी आईला आई म्हणतों. दाईला दाई म्हणतों. म्हणून ती माझ्यावर रागवती. अहो, मला पोंचवितां का माझ्या आईकड ?"

आई देवाच्या घरीं गेली म्हणतो, तरी आईकडे पोंचवा म्हणतो! कशास काय पत्ता! तरी पण यांत कांही तरी आहे खास, इतका उमज अमात्याला पडायला उशीर लागला नाही. त्याला त्या मुलाच्या प्रेमाचं भरतं तर आलंच; पण त्याच्या मनाला चटकाहि लागला. आपला त्याचा तोंडावळा हुबेहूब सारखा. आपली बायको आणि मुलगा वाहून गेलीं या हकीकतीसारखीच याचीहि हकीकत! किती विलक्षण हा योगायोग! कांहीच कळेना! त्यानं मुरारीला वर उचलून कडेवर घेतलं; आणि ज्या जागेवरून त्याची बायको आणि मुलगा पूर्वी वाहून गेलीं होतीं तिकड अमात्याचे पाय त्याला न कळतां चालूं लागले. त्या जागेवर इमारत होती. ती पुरांत वाहून गेल्यामुळं जागा मोकळी होती. तरी पण अमात्याला तो सर्व प्रकार आठवला. न कळत त्याच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. त्याची उभ्याउभ्या तंद्री लागली!

पण ती फार वेळ टिकली नाही. एक चाकर जवळ येऊन म्हणाला, " बाहेर एक वेडी बाई आली आहे; आणि ती आपली गाठ घेण्याचा हट्ट धरून बसलीं आहे. आम्ही तिला मारून हाकून घालवीत होतों तरी जाईना. महाराजांची काय आज्ञा आहे ?"

अमात्य चटदिशी भानावर आला आणि म्हणाला, " सकाळीं राजमार्गावर भेटली तीच ती वेडी असावी. जा, जा, तिला एकदम आंत घेऊन ये आणि माझ्या खास बसावयाच्या दालनांत तिला बशीव."

चाकर जातांच अमात्य म्हणाला, " बाळ, सकाळीं चोरून तुझा मुका घेऊन पळून गेलेली ती लबाड वेडी आली आहे. तुला ती पाहावयाची आहे काय ?" असं म्हणून अमात्य मुरारीला तसाच खांद्यावर टाकून परतला.

अमात्याच्या एकांताच्या खोलीच्या दाराशीं ती वेडी येऊन उभी राहिली होती. तिला पाहतांच मुरारीनं अमात्याच्या खांद्यावरून खाली उडी घेतली आणि त्या वेडीला तो जाऊन बिलगला. त्यानं तिच्या गळ्याला मिठी घातली आणि 'मला टाकून गेलीस नव्हे का ? थांब, तुला असा मार दिला पाहिजे'

असं म्हणून तो प्रेमानं तिच्या पाठींत बुक्क्या मारूं लागला. तीहि त्याला कुरवाळून त्याचे मुके घेऊं लागली.

हा सर्व प्रकार पाहून अमात्य चकित होऊन स्तंभित झाला. खोलींत जाऊन बसल्यावर तिला त्यानं आंत बोलाविलं आणि तो चाकराला म्हणाला, "ही बाई परत जाईपर्यंत इकड कुणालाहि सोडूं नको, खबरदार." चाकर 'जशी आज्ञा' म्हणून दूर जाऊन दाराशीं बसल्यावर, अमात्य म्हणाला, "बाई, हा मुलगा तुझ्या अगदीं प्रेमांतला दिसतो मला! तर हा तुझा कोण ?"

ही वेडी म्हणजे दुसरीतिसरी कोणी नसून स्वतः नीलाच होती. ती जाणून बुजून वेडेपणाचा आविर्भाव करीत म्हणाली, "मल्या माणसा! हा मुलगा तुझा कोण असं मला विचारतोस तर आधी तोच प्रश्न स्वतःला विचारीनास? हा मुलगा तुझा कोण माहीत आहे ?"

अमात्य म्हणाला, "बाई, रागावूं नकोस. हा मुलगा माझा कोण हें मला ठाऊक असतं तर तूं मला विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर दिलंच असतं. पण तुझा तो कोण हें तुला ठाऊक आहे, तो तुझ्या चांगल्या ओळखीचा आहे, हें दिसतंच म्हणून तुला विचारलं."

नीला म्हणाली, "तो माझा मुलगा नाही. तरी पण माझा मुलगाच आहे. असलं रत्न पोटीं यायला देवाची कृपा पाहिजे. देव देतो अन् दैव नेतं असं म्हणतात ना! त्याच देवानं हें रत्न तुला दिलं; आणि ज्या दैवानं तें नेलं त्यानंच हें तुझं रत्न फिरून तुझ्या स्वाधीन केलं आहे. मात्र आता तरी तें संभाळ."

"काय! हें रत्न माझ्या पोटीं आलेलं आहे? मग तें दैवानं कसं हरण करून नेलं? आणि जी गोष्ट मला माहीत नाही ती तुला माहीत कशी? तूं वेडी दिसतेस, पण खचित खरोखरीची वेडी नसावीस. तर कृपा कर आणि तुला याच्याविषयीं काय माहीत आहे हें सरळ सांग. हा मुलगा तुझा नव्हे, पण तुझाच आहे याचा अर्थ काय ?"

नीला म्हणाली, "याचा अर्थ उघड आहे. स्वतःच्या पोटीं न आलेल्या मुलावरहि स्वतःच्या पोटीं आलेल्या मुलाप्रमाणं मनुष्याची माया जडूं शकतेच की नाही? या मुलाची मी आई नाही. पण आईप्रमाणं प्रेम करणारी एक दुर्दैवी स्त्री आहे. त्याला मी एका कोळ्याकडून विकत घेतला."

"मग तो कोळ्याचा का मुलगा आहे ?"

"नाही. तो या गांवच्या नदीच्या पुरांत त्या कोळयाच्या जाळ्याला पाळण्यासकट लागला."

तो कुणाच्या घरांतून वाहून गेला?"

"मी ज्याच्या घरांत या क्षणीं बोलत बसलें आहें त्याच्याच घरांतून."

"काय माझ्या घरांतून? माझाहि मुलगा असाच पुरांत वाहून गेला होता. मग हा तोच माझा मुलगा असेल काय? त्याची आई त्याच्याबरोबर वाहत गेली तिचं काय झालं?"

"ती माउली स्वर्गाला गेली!"

"मग हा मुलगा तेव्हापासून आजपर्यंत या नगरांतच होता, आणि हा माझा मुलगा असं जर तुला माहीत होतं तर तूं तो एकदम माझा मला आणून कां दिला नाहीस?"

"हा मुलगा तुझा हें, भल्या माणसा, मलाहि परवापर्यंत माहीत नव्हतं. तो तुझा हें मला परवा अवचित कळलं; आणि तेंहि मीं त्याला बुद्धविहारांत अवलोकिताबाईंच्या स्वाधीन केल्यानंतर! नाही तर तो आणून एकदम तुझ्याच स्वाधीन केला असता! त्याच्या प्राणांवर संकट आलं त्यांतन त्याचं रक्षण करावयाचं तर तें एखाद्या परक्या बौद्ध भिक्षुणीपेक्षा स्वतः त्याचा बाप, आणि तोहि या नगराच्या अमात्यपदावर असलेला बाप, अधिक चांगलं करील हें न कळण्याइतकी कांही ही नीला, लोक तिला वेडी म्हणत असले तरी, वेडी नाही खचित!"

"मग हा मुलगा माझा असं तुला परवा कळून आलं म्हणतेस तें तरी कशावरून?"

"कशावरून होय? पण मी जास्त कशाला बोलूं? हा ताईतच तें तुला सांगेल!"

असं म्हणून नीलेनं आपल्या कनवटीला खोवलेला ताईत काढून तो अमात्यापुढं ठेवला; आणि म्हणाली, "तो ताईत उघडून पाहा. त्यांतच तुला देवाचा आणि दैवाचा दोघांचेहि हात दिसतील!"

अमात्यानं उतावीळपणानं तो ताईत उचलून घेतला. तो उघडून आंतलं पदक न्याहाळून पाहिलं, आणि त्याच्यावरचीं अक्षरं वाचतांच तो बेशुद्ध पडला!

नीलेनं चटदिशी मुरारीला खाली ठेवलं आणि पुढं होऊन, जवळच रुप्याचा गडवा होता त्यांतलं पाणी घेऊन, तें अमात्याच्या डोक्यावर शिंपडलं

व डोळ्यांला लावलं, आणि आपल्या अंगावरच्या चिंध्यांनी त्याला वारा घालण्याला सुरुवात केली.

सुमारे अर्ध्या-पाव घटकेनं अमात्य शुद्धीवर आला, कांही न बोलतां तो ओक्साबोक्शी रडूं लागला, आणि भ्रमिष्टाप्रमाणं बरळूं लागला. "होय, होय, दाई, हा माझाच मुलगा! पुरांत वाहून गेला तो दैवानं तुझ्याच हातून मला दिला. बिचारी माझी पत्नी, त्याची आई, मला अंतरली. पण आता त्या दोघांचंहि प्रेम मी या एकट्यावरच करीन."

असं म्हणून त्यानं मुरारीला आपल्या मांडीवर घेतला; आणि प्रेमानं त्याला कुरवाळून तो त्याचीं चुंबनामागून चुंबनं घेऊं लागला.

नीला उठून उभी राहून नाचून टाळ्या पिटूं लागली. "नदीचं पाणी नदीला मिळालं. माझं जन्माचं कार्य झालं. आता मी आहें, तो दुष्ट रुद्रभट आहे, आणि नदीकांठचं माझं स्मशान आहे. अमात्यराज, संभाळा आपल्या मुलाला. ही मी चाललें. आता मी पाहतें आपला मार्ग."

नीला इतकं बोलून बाहेर पडणार तोंच दुसऱ्या दारानं एक नोकर सांगत आला—

"बाहेर रुद्रभट आले आहेत. ते आपल्याशीं बोलायचं आहे म्हणतात."

रुद्रभटाचं नांव ऐकतांच नीला रागानं उसळली आणि म्हणाली, "आला का तो चांडाळ तुझ्या भेटीला पुन्हा! इथं माझ्यासमोर येऊं दे तरी म्हणजे पाहा, तुझ्या देखतां त्याचं नरडं फोडतें."

हें ऐकतांच अमात्य म्हणाला, रुद्रभटांना बाहेरच्या दाराजवळच तूर्त बसायला सांग. मी फिरून तुला सांगेन तेव्हा त्यांना आंत घेऊन ये."

निरोप्या चाकर बाहेर गेल्यावर नीला त्वेषानं म्हणाली, "चंडाळा! नगरच्या लोकांना उठवून, उत्तेजन देऊन, त्यांच्या बळावर तुला राजा व्हायला पाहिजे नाही का? घरांतली बायको नांदविण्याचं शहाणपण अंगीं नाही; मग तूं राज्यांतली प्रजा कशी नांदविणार अन् राजी राखणार? धर्माच्या नांवानं धिंगाणा घालणारा, आगी पेटविणारा तो राक्षस, तुला भेटल्यापासून तुझी स्वार्थी बुद्धि जागी झाली. अन् तूं कांगावा करून त्याला मोठेपणा दिलास. कशाला रे हवं तुला राज्य? देवानं एरवी तुला काय कमी दिलं आहे? राजाच्या तोंडापुढं राजभक्ति अन् घरीं गुप्त खलबतांत राजद्रोह! तो बिचारा राजा खरा धर्मात्मा आहे. त्याचा तूं असा विश्वासघात करतोस काय? कुठं

फोडशील हें पाप ? अन् शाक्त धर्म वाढवायला मुलांचे बळी द्यायला तूं तयार ! अशानं धर्माचं कल्याण होत असतं काय रे पाखांड्या ? ठीक आहे. लोकांचीं मुलंबाळं बळी द्यायला तुझं काय जातं ? पण आता हा तुझा सांडलेला मुलगा मीं तुला परत आणून दिला ! देशील का याला बळी ! दे पाहूं माझ्यासमोर ? ही मी तुझी देवी, रागीट भवानीच, तुझ्यापुढं उभी आहें ! आहे का तुला या रुद्रभटाचं चरित्र ठाऊक ? धर्माच्या नांवावर बलात्कारानं मद्य पाजून किती तरी स्त्रिया यानं आजवर भ्रष्ट केल्या, आहे का तुला माहीत ? ही पाहा तुझ्यापुढं उभी असलेली मी त्यांतलीच एक आहें. अन् त्या अपराधाचं प्रायश्चित्त त्याला देण्याकरिताच ही सुरी मी उराशी बाळगतें. पण तें माझं मी पाहून घेईन. बोलाव रुद्रभटाला आंत. तुझं त्याचं काय हितगुज होतं तें मला ऐकायचंच आहे. मुरारीला पाहून आपल्या भक्ष्याशीं गाठ घातल्यासारखं त्या लांडग्याला वाटेल. पण लांडग्याला मारून खाणारी ही वेडी वाघीण त्याच्या जवळच उभी आहे, हें कुठं आहे त्याला माहीत !"

अमात्य खाली वाकून नीलेच्या पुढं लोटांगण घालून म्हणाला, "बाई, तुला वेडी कोण म्हणेल. तूं मूर्तिमंत देवीच आहेस. तुझ्याच प्रसादानं आज तुझा मुरारी, पण माझा चंडभानु मला परत मिळाला. रुद्रभटाला त्याचं नखहि आता दृष्टीला पडायचं नाही. तुझ्या समक्षच मी त्याची काय संभावना करितों पाहा. तूं त्या पलीकडच्या दालनांत दाराआड उभी राहा."

"ठीक आहे." असं म्हणून नीला आड जाऊन उभी राहिल्यावर अमात्यानं चाकराकरवीं रुद्रभटाला आंत बोलाविलं; आणि एक नागवी तरवार त्यानं आपल्या पायांशीं आडवी ठेवली.

अमात्य हा तरवार उपसून आपलं स्वागत करावयास तयार झालेला पाहून रुद्रभटाला आश्चर्य वाटलं. पण तें अमात्याचं कपटी नाटकच मागील अंकावरून पुढं चालू आहे असं समजून प्रथम तो लाडीगोडीच्या थाटानं म्हणाला, "इतक्यांतच तरवार उपसून दाखविण्याचं कांही कारण नाही, अमात्यराज ! आपल्या राजनिष्ठेला दूषण न येण्याकरिता मुलगा पळवून नेण्याचा दोष आमच्यावर घेऊन, ठरलेला बेत सिद्धीस नेऊन, धर्मकार्य करण्याकरिता आम्ही केव्हां यावं याविषयी विचार घेण्याकरिता मी आता तूर्त एकटाच आलों आहें. चांगलं दिसेल पण कार्य साधेल असं करणं केव्हाहि इष्टच—सर्वांना."

पण अमात्य ओरडून दरडावून म्हणाला, "मुलगा पळवून नेण्याची गोष्ट तुम्ही बोललां म्हणून मीं तिला संमति दिली असं होत नाही. मुलगा महाराजांनी मजजवळ ठेव म्हणून ठेवायला दिला आहे. तो मला परत त्यांच्याच स्वाधीन केला पाहिजे. इतकंच नव्हे, तर यापुढं या मुळाला बळी देण्याची गोष्ट बोलाल तर संभाळा. राज्यक्रांति घडवून आणणाऱ्या तुमचं तोंड पाहून घ्या! तुम्ही समस्त वैदिक परिषदेंतले लोक म्हणजे आवळयाची मोट. महाराजांना टाकून, रागावून बोलावं तसं बोलण्याचीहि तुमची छाती परवाच्या दरबार प्रसंगीं झाली नाही. आता तर मुलगा पळवून नेण्याची तुमची काय छाती आहे? आधी माझं प्रेत पडेल; मग मुलगा तुमच्या स्वाधीन होईल आणि शिवाय आता तुम्हाला सांगतोंच, हा मुलगा माझा आहे! गेल्या पुरांत वाहून गेला तो देवीनं माझा मला कृपा करून परत दिला. तुम्हाला आता बलिदान करावयाचं तर स्वतःचंच करा ना! देवी तुमचा बळी कां स्वीकारणार नाही? माझ्या डोळयांत देवीनं चांगलंच अंजन घातलं. जा येथून निघून. आपलं तोंड काळं करा. इतर धर्माचार पाळून तुम्हाला जो काय धर्मोद्धार करायचा असेल तो खुशाल करा. पण या मुलाच्या बलिदानाची गोष्ट फिरून काढलीत तर या तरवारीनं तुमची जीभच छाटून टाकीन, संभाळा. चला, चालते व्हा माझ्यापुढून. माझ्या मुलाचं नखहि फिरून तुमच्या दृष्टीला पडणार नाही."

इतकी संभावना झाल्यावर रुद्रभट तिथं कसा राहाणार, सर्व गाडं एकदम बदललेलं पाहून तो खजिलच झाला आणि खाली मान घालून मागच्या पायानं निघून गेला.

नीलाहि लपलेल्या जागेतून बाहेर आली आणि रडरडत म्हणाली, "अमात्यराज, मी वेडाच्या लहरीत तुम्हाला टाकून बोललें याची क्षमा करा. पण मी तरी काय करूं? त्या दुष्टानं मला बेशुद्धींत भ्रष्ट केल्यापासून मी हा देह म्हणजे अपवित्रतेचा गोळाच मानितें. त्याचं विसर्जन केव्हा होईल तें होवो. त्या दुःखाचा थोडा विसर पडायला कारण हें माझं बाळ झालं. मला तो किती प्रिय आहे म्हणून सांगूं? पण दैव हात धुऊन पाठीला लागावं त्याप्रमाणं त्याच्याहि जिवावर त्या नीचानं घाला आणला; पण आता मी निर्धास्त झालें. संभाळा माझ्या बाळाला. मी मात्र फिरून तुमच्या दृष्टीला पडणार नाही." इतकं बोलून नीला तीरासारखी अदृश्य झाली.

* * *

नीला अमात्याच्या घरून निघाली ती तडक धावतच भवानीच्या घरीं गेली. अग्निवर्ण घरीं नाहीं असा कानोसा घेऊन ती थेट भवानी बसली होती तिथं पोंचली. पाहते तों भवानी भ्रमिष्टासारखी होऊन हातानं कांहीं तरी चाळा करीत आणि डोळ्यांतून टिपं गाळीत बसली होती. नीलेनं हसून टाळी वाजविली तेव्हा भवानी शुद्धीवर येऊन म्हणाली "वेडे, कुठं गेली होतीस मला टाकून इतके दिवस!"

नीला म्हणाली, "तुझ्या यजमानांनी मला या घरांतून घालवून दिली, मग मीं काय करूं? हें घर तुझं नाहीं. तुझ्या यजमानाचं आहे आणि आता आलें तीं देखील परत जाण्याकरिता!"

"मग आलीस तरी कशाला, चांडाळणी?"

"माझा एक हृद्रोग गेला तसाच तुझाहि घालविण्याकरिता."

"तो तूं कसा घालविणार?"

"मुरारीविषयी अतिशय आनंदाची बातमी सांगून."

"ती काय? सांग, सांग लवकर." भवानी आनंदाच्या आवेगानं उठून उभी राहिली, आणि उभ्या असलेल्या नीलेच्या दोन्ही खांद्यांवर हात ठेवून तिनं आपलं तोंड अगदी नीलेल्या तोंडाशीं नेलं.

नीला म्हणाली, "मुरारी सुखरूप आहे. इतकंच नव्हे तर तो यापुढं कायमचा निर्भय झाला असं समज. त्याच्या जिवावरचं संकट जन्मभर टळलं."

"तें कसं?"

"त्याचा बाप, जो या नगराचा अमात्य, त्याच्या स्वाधीन मुरारी होऊन मुलाची ओळख बापाला पटल्यानं! नदीचं पाणी नदीला परत मिळाल्यानं!"

"पण अमात्य त्या दुष्ट निर्दय शाक्तांना सामील झाला होता म्हणतात ना?"

"मौज तर त्यांतच आहे. अग, पुत्रप्रेमापुढं सगळीं ढोंगं, सगळे कांगावे लटपटतात. मुरारी हा पुरांत वाहून गेलेला आपलाच मुलगा आहे अशी जेव्हा अमात्याची खात्री पटली तेव्हा तो आनंदानं बेशुद्ध झाला. मलाच त्याला शुद्धीवर आणावा लागला. त्यानं रुद्रभटावर तरवारच उपसली. आता कसलं मुरारीचं बलिदान आणि काय?"

"बरं, मुरारीला माझ्या अंथरुणावरून कुणी उचलून नेला?"

"ज्याला देवानं तशी बुद्धि दिली त्यानं!"

"म्हणजे तूंच ना? अन् मला सांगून नेतीस तर!"

हें ऐकतांच नीला चवताळून म्हणाली, "तुझ्यासारखी मूर्ख तूंच आहेस ग माझ्या बहिणी अन् अवदसे! तुझ्या हातन मुरारी माझ्या हातीं देववला नसता, पण त्याच्या प्राणाचं रक्षणहि करवलं नसतं. तुला देवानं प्रेमळपणाच्या गुणाबरोबर पति हा देव मानण्याचा दोष दिला आहे ना? आणि पापाला पुण्य म्हणण्याच्या कामीं रुद्रभटापेक्षा तूंहि कांही कमी नाहीस बर का! आग लागो तुझ्या त्या धार्मिकपणाला, आणि तुला पशु बनविणाऱ्या त्या धर्माला! वेळ पडली असती तर तूंच रडत रडत आपल्या हातानं त्या पोराचा गळा चिरला असतास, आहे ठाऊक? पुराणांतल्या त्या चांगुणेनं --चांगुणा कसली चांडाळीण ती- तिनं नाही का आपल्या हातानं पोटचा गोळा-एकुलता एक प्रेमाचा कंद-भाजीसारखा चिरून, कुटून, शिजवून अतिथीला वाढला! अन् हें कां? तर म्हणे नवऱ्याची आज्ञा! अन् नवरा तरी असली आज्ञा कां करतो? तोंडांतन शब्द गेला म्हणून! मग असा शब्द तोंडांतन घालविण्यापेक्षा तो बाप, नव्हे राक्षस, आधी आपली जीभच आपल्या हातानं कापून घेता तर? अन् अतिथि तरी काय! म्हणे पोटच्या पोराचं मांस शिजवून खाऊं घाल म्हणतो! मी त्या श्रियाळाच्या जागीं असतें तर, तसलं तें इष्टान्न भोजन मागण्याचा शब्द तोंडांतून काढणाऱ्या त्या चंडाळ अतिथीच्या डोक्यांत मुसळ घालून तिथल्या तिथं आधी त्याचाच प्राण घेतला असता! अतिथि देवच होता आयता तर देवाच्या म्हणजे आपल्याच घरीं गेला असता! त्यांत काय वाईट होतं? मीं सांगतें तुलाहि, भवानी! तुझीं मुलं वांचत नाहीत याचं कारण देव म्हणतो, 'मीं इचीं मुलं जगवलीं तर खोट्या धर्मभावनेनं ही खुळी त्यांतलं एखादं मूलहि देवीला बळी द्यायची! म्हणे, मला सांगून मुरारीला नेतीस तर! तसं सांगितलं असतं म्हणजे मुरारीला तर तूं गुपचूप माझ्या हातीं दिलाच नसतास, पण रडून, आकान्त करून, नवऱ्याला मात्र माझ्या बेताचा सुगावा लागूं दिला असतास!"

"बरं-बरं! आता म्हणशील तितकं थोडंच!" भवानी स्वतःचा दोष पदरांत घेण्याला तयार होऊन किंचित् हसून म्हणाली. "माझ्यापेक्षा तूं प्रेमळ असून शहाणीहि आहेस. म्हणूनच तूं मला आवडतेस. बरं, पण माझ्या अंथरुणावरून मुरारीला उचलून नेलास तो कुठं? अन् मुरारी अमात्याचा मुलगा हें तुला कसं उमगलं? सांग सगळं. घरांत आता कोणी नाही."

असं म्हणून भवानीनं नीलेला मिठी मारून दडपून धरून बसविलं. तेव्हा नीलेनंहि आपल्या मैत्रिणीचं समाधान व्हावं म्हणून तिला सर्व इत्थंभूत हकीकत सांगितली. मग भवानी म्हणाली, " आता तूं पुढं कुठं जाणार अन् राहणार ?

नीला म्हणाली, " आता अजून आणखी एक काम राहिलं आहे की ! तें उरकलं म्हणजे स्मशान हें माझं घर कायमचं ठेवलेलंच आहे. हा अपवित्र देह या जगांत उरायला योग्य नाही. तें माझं काम उरकेपर्यंत मी नंदामाईच्या घरीं राहणार. बिचारी म्हातारी सात्त्विक आहे. पण तुझ्यासारखी दुबळी अन् मूर्ख नाही. चांगली तिखट आहे. तिचा स्वभाव मला फार आवडतो. अन् तिच्या झोपडीपासून स्मशान अगदी जवळ आहे हा त्यांतल्या त्यांत मोठा फायदा ! "

असं म्हणून नीला टाळ्या पिटून हसूं लागली. तिला वेडाची खरी खोटी लहर केव्हा येईल याचा नेम नव्हता. असो. 'आता हीच आपली शेवटची भेट' असं म्हणून ती भवानीच्या गालाला एकदा तोंड लावून उडी मारून निघाली ती एकदम घराबाहेर पळतच गेली.

प्रकरण एकोणिसावें

गौळवाड्यांतलें हितगुज

आज सायंकाळीं नंदा गौळणीचं गृहकृत्य आटोपल्यामुळं ती बाहेरच्या अंगणांत, नेहमीप्रमाणं लाकडी तक्त्यावर बसून, हातांतील जपमाळेचे मणी सरकवीत होती. नीलेचा संचार संपल्यामुळं तीहि परत आपल्या या प्रेमनिवासांत येऊन, नंदामाईच्या पायांशीं आवडत्या कपिला कालवडीच्या माथ्यावर हलके हलके थापट्या मारीत बसली होती.

इतक्यांत दुरून शमधन आणि मृणालिनी हातांत हात घालून गुजगोष्टी करीत इकडच येतांना दिसल्या. त्यांना पाहून नीला, नंदामाईचं लक्ष वेधण्या-करिता, तिच्या मांडीला बारीकसा चिमटा घेऊन म्हणाली " बघितलंस का नंदामाई, बुद्धविहारांतलं हें प्रणयी जोडपं आपल्या भेटीला येत आहे तें ? "

नंदामाईनं जप थांबविला. शमधन आणि मृणालिनी जवळ येतांच ती म्हणाली, "या, या, निष्पाप सुखी प्रेमी जीवांनो, या. पुष्कळ दिवसांनी आज आम्हाला भेट दिलीत."

तीं दोघं येऊन जवळच्या दुसऱ्या एका तक्त्यावर बसलीं असं पाहून नीला म्हणाली, "धर्मप्रचाराचं काम संपून प्रेमाच्या प्रचाराचं काम सुरू झालं म्हणावयाचं आजच्या दिवसाचं?"

नंदा म्हणाली, "असं कां ग बोलतेस, वेडे, त्यांना नेहमी लावून टोचून?"

"यांत लावून तें काय बोललें? त्यांचं परस्पर प्रेम पाहून मला वाईट का वाटतं नंदामाई? उलट तीं दोघं या धर्मप्रसाराच्या खुळया नादाला लागून आपल्या तारुण्याचा काळ व्यर्थ दवडतात हें पाहूनच मला वाईट वाटतं. अन् खरं बोलावयाचं तर त्यांचा रागहि येतो त्याकरिता." नीला हसून म्हणाली.

नंदा म्हणाली, "अग वेडे, संसार हा काय माणसाच्या मागं लागलाच आहे, पण धर्मसेवेची एखादी आवडती कल्पना मनांत आली असतां, तिचं कार्य करण्याकरिता तरुणपणींहि माणसानं जर चार दिवस घालविले तर त्यांत काय वाईट? तुम्हाला काय वाटतं, शमधन, याविषयी?"

शमधनानं या प्रश्नाला कांहीच उत्तर दिलं नाही. पण मृणालिनी म्हणाली, "नंदामाई अगदी बरोबर बोलल्या."

नीला म्हणाली, "आहे ठाऊक धर्मकार्य! या दोघांचं मी कांही बोलत नाही; पण यांच्या या बौद्ध विहारांत काय काय प्रकार चालतात हें मीं डोळ्यांनी पाहिलं आहे. इतक्या उनाड तरुण-तरुणी एकत्र आणून ठेवल्या म्हणजे तिथं बोडक्याचं आलं आहे धर्मकार्य? आणि हीं दोघं झालीं तरी काय, हातानं चाळा होत असेल धर्मकार्याचा; पण मनांतन सगळा चाळा प्रेमाचाच की नाही? मग तें प्रेम शुद्ध का असेना? कशाला ग नंदामाई हींच दोघं हातांत हात घालून फिरतात? नेहमी यांचे डोळे एकमेकांकड लागलेले! जुलमानं उपास करणाऱ्या माणसाचे डोळे अन्नाकड वळावयाचेच! तो यांचा दुसरा एक भिक्षु जीर्णमन्यु, त्याचा क्रोध जीर्ण आहे; पण काम? या मृणालिनीबाईच्या लोभानं अगदी कसा कुत्र्याप्रमाणं त्यांच्याजवळ झटत असतो. त्याच आपल्या सोशीक म्हणून ठीक! मात्र शमधनाच्या तावडींत एखादा दिवस तो सापडला म्हणजे पिळून निघेल चरकांत गेलेल्या उसाच्या कांड्यासारखा. अवलोकिताबाईचा डोळा पाहात असला म्हणजे हे तरुण भिक्षु

सुविनीत निष्पाप धर्मात्मे ! कीडमुंगीलाहि चिरडावयाला प्राणापलीकड जपतील. डोळे काय आकाशाकड लावतील ! हात जोडून काय उभे राहतील ! आवाज काय बंद तळघरांतन आल्यासारखा काढतील ! पण त्या किंवा मृणालिनीबाई दूर गेल्या की मग पाहून घ्या ! एकेका भिक्षुणीच्या भोवती दोन-दोन, तीन-तीन भिक्षु भोवऱ्यासारखे फिरत राहतात. स्त्रीपुरुषांची बरोबरी इतकी की स्त्रिया पुरुषासारख्या वागतात तर पुरुष स्त्रियासारखे वागून संख्या सारखी करतात; आणि रात्रीं तर काय बोलावयालाच नको. सगळीं व्यसनं तिथं चालू असतात. आग लागो यांच्या या बुद्धविहारांना ! ”

मृणालिनी रागावली आणि म्हणाली, “ चल रे शमधना, जाऊं या आपण इथून. हें निंदापुराण आपणाला ऐकवत नाही.”

पण शमधन म्हणाला, “ या बाई खरं तेंच बोलतात. मींहि याविषयी अवलोकिताबाईजवळ पुष्कळदा कागाळी करून पाहिली. पण त्या या गोष्टी मनावरच घेत नाहीत.”

“ त्यांना त्या गोष्टी खऱ्या वाटत नसतील. मग त्यांनीं तरी काय करावं ? ” नंदामाई अवलोकितेची कड घेण्याकरिता म्हणून पण उगीच वरपांगी म्हणाली.

नीला म्हणाली, “ मनुष्यानं आपल्यासारखं जगाकड पाहावं तें परपीडा न करण्यापुरतं. पण जगाच्या नीतिअनीतीचीहि परीक्षा याच न्यायानं करून वागणं याला कोणी शहाणपणा म्हणत नाही. चुन्याचं एक बोट मडक्यावर ओढलं म्हणजे बाकीचं त्याचं तोंड काळं नाही असं होत नाही. हे शमधन आणि या मृणालिनीबाई यांची एक गोष्ट सोडा; पण या त्यांच्या बुद्धसंघांत बिनलग्नाच्या नवराबायको किती तरी नांदत आहेत ! भिक्षेंतली चोरी करून किती भिक्षु आपलीं घरं भरून घेत आहेत ! किती भिक्षु नगरांतल्या कुमारिकांना आपल्या वेषानं भुलवून नादीं लावीत आहेत ! उलट प्रकार भिक्षुणींचाहि तोच. माझ्या हातीं जर राजसत्ता असती तर मी पहिल्या प्रथम–”

“ काय केलं असतंस, नीले ? ” नंदामाई हसून म्हणाली.

“ काय केलं असतं ? कोणाचीं डोकीं मारलीं नसतीं म्हणा. पण संघाच्या आवारांतल्या दर एक चौकांत बोहलीं घातलीं असतीं प्रथम ! ”

“ तीं हो कशाला ? ” इतका वेळ स्तब्ध बसलेला शमधन नीलेच्या या विनोदी भाषणानं करमणूक होऊन म्हणाला.

"बोहलीं कशाला बांधतात? लग्न लावायला! तुमच्या संघांत कुमार-कुमारीप्रमाणं विवाहित संसारी भिक्षुहि घेतात असं मीं ऐकलं आहे तें खरं ना हो, शमधन?"

"हो-हो, त्याला काय हरकत?" मृणालिनी उतावळेपणानं म्हणाली. संघाविषयी अधिकृत माहिती द्यावयाची झाली तर तो अधिकार या ठिकाणी आपला, शमधनाचाहि नाही, अशा अहंकारानं ती प्रवृत्त झाली.

"झालं तर मग!" नीला म्हणाली. तुमच्या संघांत लग्नाशिवाय विवाह-सौख्य भोगणाऱ्या जोडप्यांची त्या बोहल्यांवर लग्नं लावून देईन. अशानं रोज होणारी अनीति तरी थांबेल. धर्मप्रसाराचं कार्य स्वतः सद्धर्मानं वागणाराच्या हातून होऊं नये असं थोडंच आहे. आता ब्रह्मचारी अन् कुमारिका असून धर्माचार्य म्हणून मिरविण्यांत जी एक माधुरी आहे ती गमावेल! ढोंगाचा भपका थोडा कमी होईल! श्रद्धाळु मूर्ख प्रेक्षकांच्या डोळ्यांत थोडी कमी धूळ फेकली जाईल, आणि धूळ गेलेले डोळे चोळण्यांत, किंवा ते मिटून सगळं कांही दिसतं असं मानण्यांतच, ज्यांची सर्व धर्मभावना साठविली असेल त्यांचा थोडा विरस होईल. पण धर्माच्या नांवाखाली रचले जाणारे पापाचे डोंगर तरी रोड होतील."

"बरं पण, मग त्यांतलं एक बोहलं शमधन आणि मृणालिनीबाई यांच्या-करिता राखून ठेवशील की नाही?" नंदा थट्टेखोरपणाची लहर येऊन म्हणाली.

"वा! त्यांच्याकरिता तर पहिलं बोहलं. अन् या बोहल्यावर जर हीं माझीं दोन आवडतीं प्रेमळ माणसं लग्नाला उभीं राहायला तयार झालीं तर मी तें बोहलं आपल्या हातानं रचीन. माझ्या आनंदाश्रूंनी मी तें सारवीन, माझ्या केसाची केरसुणी करून तें झाडीन, आणि माझ्या केसांत खोवतें ते पांढऱ्या फुलांचे तुरे मी त्याच्या कळसावर रोवीन. पण, नंदामाई, त्यांचं लग्न मी कशाला या वनवासांत लावूं? घरीं त्यांना गजान्त संपत्ति आहे. त्यांचे कुलशीलवान् आईबाप त्यांच्या घरीं येण्याकड डोळे लावून बसले आहेत. तीं परत गेलीं म्हणजे त्यांच्या नगरांतल्या दीपमाळा आनंदोत्सवाकरता पाजळल्या जातील. त्यांचं लग्न हा नागरिकांचा सण होईल. शिवाय त्या दोघांचं शील इतरांसारखं नाही. त्यांना दुष्कीर्तीचा डाग लागलेला नाही. मी जें बोललें तें सारं संघांतल्या इतर अनेक तरुणतरुणींसंबंधानं. यांतल्या बहुतेकांना घरं दारं नाहीत. घरं असलीं तर खायला अन्न नाही. खायला पुरतं अन्न असलं

तरी कोण काय पाहून यांना मुलगी देणार? अन् जसे कांही हे मुलगे, तशाच कांही मुलीहि असतात. त्या दोघांनाहि हा बौद्धसंघ म्हणजे फुकटा सुख-निवास झाला आहे. डोकीं बोडून अंगावर पिवळीं वस्त्रं घेतलीं की बनले हे सनातन्यांना, शाक्तांना किंवा इतर कुणालाहि धर्मोपदेश करण्याला सत्पात्र! आणि आमचे गृहस्थ स्त्रीपुरुषहि असे वेडे की, यांचा हा विचित्र वेष पाहूनच जगांतल्या साऱ्या सद्धर्माचा अवतार यांच्या अंगांत झाला असं त्यांना वाटतं. नंदामाई, असल्या उनाड, चटोर, वाह्यात तरुण-तरुणींकरिताच मी या बोहल्यांचं बोललें ग! कडेवरचं मूल संभाळीत, खेळवीत जी स्त्री स्वयंपाक अन् घरकाम करिते तीच गृहिणी खरी. त्याचप्रमाणं आपल्या श्रमानं आपली उप-जीविका करणारा संसारी सदाचारी मनुष्य आपल्या स्वतःच्या आचरणानं, उदाहरणानं जो धर्मोपदेश करतो तोच देवाला आवडतो. भिक्षा मागणारा तो खरा भिक्षु नव्हे. भिक्षा न मागणारा तो भिक्षु. भगवान् बुद्धानं राज्य सोडून भिक्षा स्वीकारली हें एका अर्थानं चांगलं खरं; पण त्यानं कुपात्र भिक्षेला मान्यतेचा ताम्रपट दिला हें कांही चांगलं केलं नाही."

ही सर्व टीका ऐकतांना मृणालिनीचा जीव वर येत होता. हें पाहून विषय बदलावा म्हणून नंदामाई म्हणाली, "आमच्या या मित्रांचं लग्न बुद्धाश्रमांत होत नाही तर एकंदरींत! होतं तर पाहायला तरी सांपडलं असतं. पण काय हो शमधन, तुमच्या नगरांत तें होईल तेव्हा आमची आठवण ठेवून आम्हाला निमंत्रण कराल का?"

हें ऐकून शमधन आणि मृणालिनी दोघंहि एकमेकांकड पाहून गालांतल्या गालांत हसूं लागलीं. नीला म्हणाली, "पण त्याला अजून थोडा अवकाश दिसतो ग नंदामाई! शमधनांना हें धर्मप्रचाराचं काम पुरं झालं असं वाटत असावं. पण मृणालिनीबाईच्या धर्मप्रचाराच्या सर्व हौशी अजून फिटल्याशा दिसत नाहीत; त्यांना शाक्त धर्माचारांतलीं दूषणं अजून कांही पाहायचीं उरलीं आहेत ना! आता नगरांत एक मोठा श्रीचक्रसमारंभ व्हायचा आहे तो त्यांना पाहायचा आहे! अन् त्याचं वर्णन अवलोकिताबाईंना सांगायचं आहे. अन् नगरच्या महाराजांकडून धर्मांतर करवायचं आहे. तो पराक्रम झाला म्हणजे मग असेल लग्नाचा विचार."

"अरेच्या!" नंदा म्हणाली. "तुझ्या हातांत राज्याचा अधिकार असता

तर काय काय करणार होतीस हें सांगतां सांगतां तितकंच राहिलं अन् मधेच आमचे महाराज बौद्ध धर्माची दीक्षा घेणार हें काय पुढं आलं कुलंगडं ? ”

“ तें खरंच आहे. बिचारा मृणालिनीबाईलाच म्हणजे समजेल.” नीलेनं उत्तर केलं.

“ हो-हो, तें खरंच आहे.” मृणालिनी म्हणाली. “ उगीचच का आमच्या धर्मसंघानं आजवर मतप्रचार केला तो ! आमच्या अवलोकिताबाईच्या हाताला यशच येणार तसं. महाराज दोन दिवस यात्रेला म्हणून सांगून गेले ते कुठं गेले असं तुम्हाला वाटतं ? त्यांना मुळी दृष्टांतच झाला भगवान् बुद्धाचा. म्हणून ते बुद्धगयेला गेले आहेत स्तूपाचं दर्शन घ्यायला !”

शमधनाला तिच्या या बढाईखोरपणाचा राग आला, म्हणून विषय बदलण्याकरिता तो म्हणाला, “ पण काय हो नीलाबाई, महाराजांनीं यात्रेला जातांना त्या लहान बाळाला अमात्यांच्या स्वाधीन केला तो शेवटीं स्वतः आमात्यांचाच मुलगा ठरला म्हणे ! तुम्ही प्रथम तुमचं काम केलं त्याला आश्रमांत आणून आमच्या स्वाधीन करून. मग आम्ही आमचं काम केलं त्याला महाराजांच्या स्वाधीन करून. पण महाराज त्याला अमात्यांच्या स्वाधीन करतील आणि त्याहिपेक्षा तो मुलगा स्वतः अमात्यांचा ठरेल, हें कुणाच्या स्वप्नांत तरी आलं होतं का ? आणि या सर्व प्रकरणाचा असा गोड शेवट झाला याकरिता नीलाबाई तुमचं अभिनंदन करावं म्हणून आम्ही सहज आज इकडं आलों. खरोखर तुमचं अभिनंदन करावं तेवढं थोडं आहे.”

नीला म्हणाली, “ हो, पण त्या अभिनंदनाचा वाटा सगळा या वेडीकडं येत नाही. त्यांत तुम्हा आश्रमविहारांतील लोकांकडहि वाटा आहे. अन् कांही या म्हातारीकडहि जातो. आपण सगळेच तो वाटून घेऊं. मी तो मुलगा पळवून आणला म्हणून, तुम्ही तो ठेवून घेऊन महाराजांच्या स्वाधीन केला म्हणून. पण महाराजांनीं तो अमात्याच्या स्वाधीन केल्यावर तो त्यांचाच मुलगा आहे हें मला त्यांना पटवून कसं देता आलं माहीत आहे ? तें या म्हातारीच्या चाणाक्षपणामुळं.”

“ तें कसं काय ? ” शमधन आणि मृणालिनी दोघांनी एकच प्रश्न मोठ्या उत्सुकतेनं विचारला.

नीला म्हणाली, " तें असं. मुरारीला मी पळवून आणला तो प्रथम या झोपडींत आणला. नंतर तिनं अन् मी मिळूनच तुमच्या आश्रमांत त्याला नेला. पण या गडबडींत झालं काय, की मुरारीच्या गळ्यांतला ताईत तुटून खाली पडला या झोपडींत. मग काय झालं ग नंदामाई ? "

नंदा म्हणाली, " मी आश्रमाकडून परत आलें आणि झोपडीचं दार उघडून आंत आलें तों कायससं पायाला लागलं. तो विंचूकिडा असेल म्हणून झाडून मारण्याकरिता दिवा घेऊन पुढं आलें अन् पाहतें तो हा ताईत! मला कल्पना नाही झाली प्रथम तो मुरारीच्या गळ्यांतला म्हणून. पण दुसरे दिवशीं ही वेडी आली तिनं तो ओळखला."

नीला म्हणाली, " ताईत वरून ओळखीचा होता. पण तो फुटून आंतलं पदक दृष्टीस पडलं तेव्हा पाहतें तों मुरारी अमात्यांचा मुलगा ! मग मुरारी अमात्याच्या घरीं जातांच मागोमाग मी जाऊन या ताइताच्या सहायानंच तो आपला मुलगा अशी त्याची खात्री पटवून दिली."

"सर्वच गोष्ट अद्‌भुत घडली खरी!" शमधन म्हणाला. त्याला "भगवान् बुद्धाची कृपा ! " असं म्हणून मृणालिनीनं पुरवणी जोडली.

इतक्यांत आकाशांत वीज चमकून मेघांचा प्रचंड गडगडाट ऐकूं आला. सर्व मंडळी दचकली. लगेच शमधन उठला आणि म्हणाला, " चल, मृणा, पाऊस डोक्यावर आलासा दिसतो. दुपारीं याचं कांहीच चिन्ह नव्हतं. मग हेंहि अद्‌भुतच म्हणायचं. पाऊस सुरू होण्यापूर्वी आश्रमांत परत पोचलेलं बरं."

" खरंच ! " नीला आणि नंदा दोघींच्या तोंडून तोच उद्गार निघाला. आणि " या बरं " असं म्हणून या दोघींनी त्या दोघांना निरोप दिला.

प्रकरण विसावें

बलिदान झालें! पण कोणाचें?

अमात्यानं अशा अनपेक्षित रीतीनं उलट खाल्ल्यामुळं महाबलिदान करून शाक्त धर्माचा जीर्णोद्धार करण्याच्या कामीं रुद्रभटाची निराशा झाली. परंतु हातीं धरलेलं काम मधेच सोडण्याइतका तो मनाचा दुर्बळ नव्हता. शाक्त धर्माच्या जागृतीचा एकच मार्ग नसतो. धर्माच्या नांवानं केलेलं कर्म नैमित्तिक म्हणजे केव्हा तरी प्रसंगविशेषीं करण्याचं असलं तर त्यांत पुण्य विशेष असतं. आणि त्यांतूनहि तें कर्म अचाट असलं तर त्याचं पुण्य आणीक विशेष अशी त्याची समजूत होती, ही ठीकच आहे. भिळमिळीत मद्यानं यावा तसा कैफ येत नाहीं. तें घन आणि तीक्ष्ण असावं लागतं. म्हणून कोणता शाक्त धर्माचा आचार-प्रसंग घडवून आणावा या विचारांत त्यानं रात्र घालविली. आणि शेवटीं असं ठरविलं कीं, या नगरींत फार वर्षे न झालेला श्रीचक्रसमारंभच करावा. या समारंभांत वाममार्गी शाक्त धर्माच्या पंचमकारांचं अनुष्ठान एकत्र करतां येतं. सर्व स्त्रीपुरुषांना त्यांत भाग घेतां येतो. महाराजांकडून त्याला प्रतिबंध होण्याची भीति नव्हती. आणि अमात्यांनीहि स्वार्थामुळं बलिदानाचा विघात केला तरी इतर मार्गांचा अवलंब करण्याला त्यांच्या तोंडून ओंझरती अनुमति बाहेर पडली होती.

लगेच रुद्रभटानं आपले हस्तक आणि नगरांतल्या शाक्त धर्मांचे पुढारी यांना पाचारण करून, पूर्वी ज्या मुहूर्तावर महाबलिदान करावयाचं ठरलं होतं त्याच मुहूर्तावर महाश्रीचक्रसमारंभ करण्याची आज्ञा केली. महाबलिदानाखालोखाल आदिशक्तीला प्रसन्न करण्याचा हाच मार्ग तंत्रग्रंथांत सांगितलेला होता, हें या सर्वांना ठाऊक असल्यामुळं त्यांनी तो समारंभ घडवून आणण्याला कमरा बांधल्या. पूर्वी समस्तवैदिक-परिषद भरविण्याचं योजिलं तेव्हा, नगरांतील शाक्तांहून इतर लोकांचं मन वळवून त्यांना सामील करण्याचे श्रमसायास करावे लागले ते या प्रसंगीं करण्याचं कारण नव्हतं. केवळ वाममार्गी शाक्तांनी करण्याचाच तो धर्मविधि होता; आणि पंचमकारांचा उपभोग घेण्याची ही संधि असल्यामुळं त्या सर्वांनीं त्याची सिद्धता करण्याचं अभिवचन रुद्रभटला उत्साहपूर्ण रीतीनं दिलं.

महाश्रीचक्रसमारंभांत तृतीय मकार हाच महत्त्वाचा असतो. त्याला अत्यंत सोज्ज्वळ अशी कुमारिका अवश्य असते. तिला भ्रष्ट करण्यांतच महापुण्य असतं. अशी कुमारिका कोठून मिळवावी याची चर्चा झाली. भैरवचौकांत पूर्वी एकदा कांही भीषण वेषधारी शाक्तांनी मृणालिनीचा सत्कार करून, तिला शाक्त धर्माचारांतील अत्यंत दूषणास्पद प्रकार प्रत्यक्ष दाखविण्याचं आश्वासन दिल्याचं वाचकांना स्मरत असेलच. या कपट-नाटकांत भाग घेतलेला एक शाक्त या वेळीं पुढं झाला आणि म्हणाला, " धर्मबांधव हो, या समारंभाला हवी तशी सोज्ज्वळ कुमारिका मिळवून देण्याचं काम मजकडं लागलं. बुद्धसंघांतील मुख्य कार्यकर्त्री तरुण कुमारिका मृणालिनी आमच्या कपटपाशांत सापडलेली आहे. शाक्त धर्माचारांतील दूषणास्पद प्रकार दाखविण्याचं वचन आम्हीं तिला दिलं, तें केव्हा पूर्ण करता असं ती आमच्यापैकी भेटेल त्याला मोठ्या आस्थेनं विचारीत असते. यामुळं हा श्रीचक्रसमारंभ पाहण्याला तिला बोलविलं तर ती निश्चित येईल; आणि ती मंडळांत आली म्हणजे अवचित तिलाच धरून पूजामंचकावर बसवूं म्हणजे झालं."

ही युक्ति सर्वांना पसंत पडली. रुद्रभटाला तर ती फारच मान्य झाली. तो म्हणाला, " वाहवा! आमच्या शत्रुपक्षांतली ही प्रमुख स्त्री जर या कार्याला लाभली तर सहजच एकांत दोन कामं होतील. तंत्रशास्त्रांत सांगितल्याप्रमाणं हवी तशी कुमारिका पूजाविधीनं भूषित करायला मिळेल. आणि आपल्या अज्ञानामुळं ती दूषित भ्रष्ट झाली असं मानणाऱ्या आपल्या बौद्ध शत्रूंवर उत्तम रीतीनं सूड घेतां येईल. पण ही मृणालिनी एकटी या समारंभाला कशी येणार?"

पहिला शाक्त म्हणाला, " त्याची चिंता तुम्ही करूं नका. आम्ही तिजपुढं प्रसंग साधून केलेल्या शाक्त धर्माच्या कपटी निंदेनं तिचा आमच्यावर पूर्ण विश्वास बसला आहे. तिच्या दृष्टीनं अत्यंत दूषणास्पद आणि निंद्य असा गुप्त शाक्त धर्माचार तिनं पाहिला, म्हणजे तिच्या बौद्ध-धर्मप्रसाराला अधिक उत्साह येऊन अवलोकिताबाईच्या द्वारं महाराजांकडून शाक्त धर्माचा आपण उच्छेद करूं असा तिला आत्मविश्वास वाटतो. यामुळं या समारंभाची नुसती वार्ता कानावर आल्याबरोबर तो समारंभ पाहण्याला ती उत्सुक होईल; आणि आम्ही सुचवूं तेव्हा हवा तो कपटवेष धारण करून ती एकटी येण्याला सिद्ध होईल. आमच्याशीं चाललेलं कपटी हितगुज तिच्या सहचारी मित्रापासून ती नेहमी

गुप्त ठेवते. कारण आमच्या नगरांत एकाकी संचार करण्याची तिला फार हौस असते. तसंच तिच्या अंगांत उत्साहाबरोबर साहसहि हवं तितकं आहे. तात्पर्य काय, की श्रीचक्रसमारंभाची इतर सर्व सिद्धता तुम्ही करा आणि मृणालिनीला समारंभाच्या जागीं एकटी आणण्याचं काम तुम्ही मजवर निश्चितपणं सोपवा. बौद्धसंघावर पडणारा हा सूडाचा आघात तो संघ जन्मांतरीं कधी विसरणार नाही इतकी अद्दल या आमच्या शत्रूंना आपण घडवूं."

झालं. अवचित होणाऱ्या या लाभानं सर्व शाक्तकूटाला विशेष स्फुरण चढलं हें सांगायलाच नको.

ठरल्याप्रमाणं श्रीचक्रसमारंभाची सर्व सिद्धता झाली. समारंभाच्या दिवशीं प्रातःकाळापासून रक्त-पुष्पांच्या माळा आणि मद्याचे घडे समारंभाच्या जागीं गाडयांतून भरभरून येऊं लागले. समारंभाकरिता देवीच्या मंदिराजवळ एक विस्तीर्ण मंडप घालण्यांत आला होता. आज रोजच्याहून मंदिराकडे शाक्त स्त्री-पुरुषांची येरझार विशेष प्रमाणांत सुरू झाली होती. दोनप्रहरच्या सुमाराला तर मंडपांत मावेना इतकी गर्दी झाली. टाळ, मृदंग याच्या निनादानं, आणि शक्तिदेवीच्या भजनानं, सर्व मंडप इतका दणाणून गेला होता की, शेजारच्या लोकांना एकमेकांशीं बोलतांना ऐकूं जाण्याकरिता कानाशीं तोंड लावून बोलावं लागे. देवीच्या प्रसादाचे मद्याचे पेले एकानं दुसऱ्याला, दुसऱ्यानं तिसऱ्याला देण्यांत अहमहमिका सुरू झाली असून, कोणी दिलेला पेला नाकारणं हा देवीचा अपमान केल्यासारखं होईल या भीतीनं तो तिचा प्रसाद सर्वजण भक्तीनं स्वीकारीत. भजन करणारे स्त्री-पुरुष हळूहळू नाचूंहि लागले होते. सभागृहाच्या मध्यभागीं उच्चस्थानीं एक चौरंग मांडला असून त्याच्या चारहि दिशांना केळी उभ्या केल्या होत्या. त्याभोवती रंगीत लतापुष्पांच्या वेष्टनांनी शोभा निर्माण केली होती. आणि पूजनविधि करण्याची कुमारिका कोण पुढं आणली जाते, आणि तिच्या पूजेचा मान कोणाला मिळतो, याची सर्वजण उत्सुकतेनं वाट पाहात होते.

* * *

हा सर्व प्रकार सुरू होण्याच्या आधीं एक घटकाभर बौद्ध-संघाच्या आवारांत, हातांत कसलंसं बोचकं घेऊन, एक वेडी भिकारीण शिरून ती शमधनाच्या विहाराकड गेली. दोनप्रहरीं विश्रांतीची वेळ असल्यामुळं शमधनाला

बसल्याजागीं थोडी डुलकी लागली होती. जवळ दुसरं कोणी नव्हतं असं पाहून भिकारीण पुढं झाली आणि शमधनाच्या कानाशीं तिनं मोठ्यानं टाळी वाजविली. ती ऐकतांच शमधन खडबडून जागा झाला. एक क्षणभरच त्यानं त्या भिकारणीकड डोळे लावून पाहिलं, पण ती दुसरी तिसरी कोणी नसून नीलाच होय असं त्यानं ओळखलं आणि म्हणाला, "कोण, नीलाबाई? आणि तुम्ही इकड या वेळीं कशाला आलां?"

नीला म्हणाली, "सर्वनाश थांबवितां येतो का हें पाहावयाला!"

"म्हणजे! याचा अर्थ मी नाहीं समजलों."

"अर्थ कसचा? सगळा अनर्थच ओढवतो आहे, आणि तुम्ही हे असे विश्रांति घेत कसे बसला?"

"मला अजून उमज पडला नाहीं, नीलाबाई! अनर्थ कसला? तो ओढवतो कुणावर? आणि त्यांत माझा काय संबंध?"

"नुसता अनर्थ नव्हे तर महाअनर्थ आहे. तुमची प्रियकरीण मृणालिनी कुठं आहे याचा गुप्तपणानं आधी शोध करा पाहूं. मग मला विचारा."

या बोलण्यावरून मृणालिनीलाच कांहीं अपघात झाला किंवा होऊं घातला आहे अशी कल्पना येऊन, नीलेला तिथंच बसवून, शमधन संघाच्या अंतर्गृहाकड गेला. मृणालिनी आपल्या नित्याच्या जागीं नाहीं हें पाहिल्यावर त्यानं ती निजण्याबसण्याच्या सर्व जागा इतर कुणाशीं कांहीं न बोलता शोधल्या, आणि ती सगळ्या विहारांत कुठं नाहीं अशी खात्री झाल्यावरून तो परत नीलेकड येऊन म्हणाला, "खरंच, नीलाबाई, मृणालिनी कुठंच आढळत नाहीं! सांगा, सांगा ती कुठं आहे? तिला कांहीं अपघात झाला की काय?"

नीला म्हणाली, "अजून पुरा झाला नाहीं; पण तुम्ही घाई करून मजबरोबर न याल तर मात्र अपघात झाल्याशिवाय राहात नाहीं."

"कृपा करा आणि काय तें सगळं एकदम सांगून टाका. तुमच्याबरोबर सांगाल तिथं येण्याला हा पाहा मी सज्ज आहें."

नीला म्हणाली, "चला तर, वाटेनं सर्व कांहीं सांगतें."

दोघंहि भराभर चालूं लागलीं. त्यांचा रोख श्रीचक्रसमारंभाच्या मंडपाकड होता. चालतां चालतां नीला धापा टाकीत बोलूं लागली—

"तुमची प्रियकरीण राजाची राणी होण्याच्या योग्यतेची आहे; पण तुमच्या आणि तिच्या दुर्दैवानं, तिला अशा तरुण वयांत धर्मप्रचाराची दीक्षा

घेण्याची जी दुर्बुद्धि झाली तिचं दुष्फळ तिच्या पदरांत पडण्याची आता वाईट वेळ आली आहे. नगरांत आज दुष्ट शाक्तांनी श्रीचक्रसमारंभ आरंभिला आहे. त्यालाहि कारण तो चंडाळ रुद्रभटच. आग लागो त्या समारंभाला. पूजेचा मान देण्याकरिता मृणालिनीबाईंना भुलवून एकटी नेण्यांत आलं आहे!"

"मृणालिनीचा या समारंभांत काय संबंध?"

"आपल्या हातातं मनुष्य आपणावर दुर्दैव ओढवून घेत असतं. त्याला फक्त दुसरे निमित्तमात्र होतात. शाक्त धर्मातले दुराचार पाहण्याची या अननुभवी भोळ्या मुलीला फार हौस आहे असं पाहून, कांही दुष्ट शाक्तांनी कपट करून तिला तिकड आपल्या पायांनी नेलं. पण तिच्याभोवती त्यांचा गराडा पडला म्हणजे कुमारिका-पूजनाचा तिला मान देऊन ते तिला भ्रष्ट करणार."

"पूजाविधि आणि भ्रष्ट करणं हीं दोनहि एकच कशीं?"

"शाक्त धर्माचाराविषयीचं तुमचं हें अज्ञान पाहून मला तुमची फार कीव येते. पण ही वेळ तुमची कीव करण्याची नसून तुमच्या प्रियकरणीच्या पवित्र देहाची विटंबना थांबविण्याची आहे. चला, पाय उचला. या सुमारास त्या बिचाऱ्या हरिणीभोवती त्या दुष्ट लांडग्यांचा गराडा पडत असेल. तुमच्या माझ्याकरिता, शाक्त लोकांचा वेष धारण करण्याची सिद्धता ही पाहा माझ्याबरोबर मीं आणली आहे. चला, आपण शाक्त बनल्याशिवाय त्या मंडपांत आपला प्रवेश होणार नाही. आंत गेल्यावर तिथं काय प्रकार होत आहेत हें पाहिल्यावर पुढं काय करावं हें तुम्हाला मी सांगण्याचं कारण उरणार नाही. तुमचं प्रेम आणि शौर्य हींच तुम्हाला तें सांगतील. तुम्ही निःशस्त्र आहां तरी तुमचं सिंहासारखं बळ त्या चंडाळांना पुरून उरण्यासारखं आहे याविषयीं मला विश्वास वाटतो."

हें एकतांच शमधन त्वरित चालूं लागला. नीलाहि कांही कमी चपळ नव्हती.

आतां मंडपांत श्रीचक्रसमारंभाला खूपच रंग चढला होता. त्यांत धर्मभावनेचा अंश अधिक होता, की मद्याच्या धुंदीचा अंश अधिक होता हें सांगणं कठिण होतं. पूजामंचकाच्या शेजारीं, कपाळभर शेंदूर फासलेले, आणि तांबड्या फुलांच्या माळा गळ्यांत घातलेले, कांही प्रतिष्ठित शाक्त बसले होते. त्यांच्यामधे मृणालिनी ही सभोवारचा सर्व देखावा पाहात बसली होती.

तिच्या तोंडावर हास्याची छटा दिसत होती. कारण आपण कांहीं तरी अपूर्व पाहत आहों असं तर तिला वाटत होतंच, पण त्याबरोबरच आपल्या धर्माच्या प्रतिपक्षीयांची सकारण निंदा करण्यासारखं आपण कांही पाहत आहों, या आत्मविजयाच्या अहंकाराची किंचित् छटा त्या हास्यामधे मिश्रित झाली होती. सभामंडपांतील लोक धर्मभावनेच्या नांवाखाली मद्य पिऊन गुंग झालेले पाहून तिच्या मनाला फार वाईट वाटत होतं. पण या वेळीं या ठिकाणीं प्रत्यक्ष बौद्ध-धर्मप्रचाराला ती आलेली नसून, त्या प्रचाराच्या कार्याला उत्साहवर्धक असे शाक्त धर्माचे दोष पाहण्याला ती आलेली होती. आणि आपल्या मनांतलं खरं इंगित आपल्या भोवतालच्या लोकांना कळत नसून, आपलं मात्र कार्य आपण मोठ्या चतुरपणानं साधीत आहों या आत्मप्रौढीच्या विकारानं तिचं मन तामसी समाधानांत गुंग झालं होतं. आपण पाहिलेला प्रकार आपण उद्या शमधनाला आणि अवलोकिताबाईंना किती चटकदार रीतीनं वर्णन करून सांगूं, तो ऐकून तीं दोघंहि किती आश्चर्यचकित होतील, त्यामुळं धर्मप्रसाराचं कार्य अधिक उत्साहानं करण्याला अवलोकिताबाई किती तत्परतेनं आज्ञा करतील, आणि त्यांच्या मधुर चित्ताकर्षक वाणीनं नगरच्या महाराजांच्या दोलायित मनावर परिणाम होऊन, त्यांच्याकडून बौद्ध धर्मप्रसाराला अधिकाधिक राजाश्रय कसा मिळेल या व अशाच इतर गोड कल्पनांनी तिचं मन व्यापून गेलं होतं.

इतक्यांत रुद्रभट पुढं होऊन तो पूजामंचकाकडे गेला. त्यानं मंचकाची यथाविधि पूजा केली. आणि उद्दिष्ट कुमारिकेला मंचकावर आरूढ होण्याची वेळ आली असं दर्शविण्याकरिता मृणालिनीसन्निध बसलेल्या शाक्तांना त्यानं खुणावलं. तेव्हा त्यांपैकी एकजण मृणालिनीच्या कानाशीं लागून म्हणाला, "हां, मृणालिनीबाई, तुम्हाला शाक्त धर्माचाराचे निंद्य चाळे समक्ष पाहावयाचे आहेत ना? तर व्हा पुढं, आणि त्या मंचकावर चढून बसा. नाही म्हणूं नका."

पण या समारंभांत आपण केवळ प्रेक्षक म्हणून उपस्थित झालों आहों, त्यांतील कोणत्याहि विधीशीं आपला प्रत्यक्ष संबंध येणार नाही, अशी तिची समजूत असल्यामुळं, हा शाक्त काय म्हणतो याचा तिला कांहीच अर्थ कळेना. यामुळं तीं स्तब्धच राहिली. तेव्हा दुसरा साथीदार शाक्त म्हणाला, "असं हो काय करता? येथील सर्व प्रकार नीट समक्ष दाखवा असं तुम्हीं

म्हटल्यावरून तर आम्ही तुम्हाला इथं घेऊन आलों. ते सर्व प्रकार इथल्यापेक्षा पूजामंचकावरूनच तुम्हाला अधिक चांगले दिसतील. काय होतं त्याची गंमत तर पाहा ! तुम्हाला मंचकारूढ व्हावयाला सांगणारे तुमचा मोठा मानच करीत आहेत. त्यांना नाही म्हणण्यानं त्यांचा अवमान नाही का होणार ? अशा समारंभांत आम्ही शाक्तांशिवाय इतर कोणाला येऊं देत नाही. त्यांनी तुमच्यावर विश्वास टाकला तसाच उलट त्यांच्यावरहि तुम्ही विश्वास दाखविला पाहिजे. तुम्ही नाही म्हणाल, खळखळ कराल, तर आमचं सारं बिंग बाहेर पडेल ! तुम्ही कोणी तरी परकी असून या समारंभांत प्रवेश मिळवून विश्वासभंग केला असा दोषारोप तुमच्यावर येईल. आणि त्याचं शासन आम्हाला म्हणजे तुमच्या विश्वासु मित्रांना भोगावं लागेल. तर असं करूं नका, पुढं व्हा, आणि पूजामंचकावर चढा पाहूं. शाक्तांनी तुमची पूजा केली तर ती पूजाच आहे. तुम्ही स्वतः शाक्त नसलां तरी त्या पूजेनं तुम्हाला दोष लागणार नाही."

तरीहि मृणालिनी जागची हालेना असं पाहून दोघा शाक्तांनी तिचे दोनहि दंड धरून तिला पूजामंचकाकड ओढून नेलं आणि वर चढविलं. मृणालिनी कावरीबावरी झाली. काय करावं हें तिला सुचेना. ती बसल्या जागीं चुळबूळ करूं लागली असं पाहून, मागं उभ्या राहिलेल्या दोन धटिंगण शाक्तांनी तिला खेचून दाबून स्थानापन्न केलं. हें पाहून सभोवतालच्या लोकांनी शक्तिदेवीच्या नांवानं गर्जना केली, ती एवढ्या मोठ्यानं की, ती ऐकून मृणालिनी भयचकित झाली, आणि गांगरून जाऊन चोहोंकड पाहूं लागली. लगेच रुद्रभट पुढं झाला आणि त्यानं तिच्या गळ्यांत तांबड्या फुलांची माळ घातली. तिच्या पायांवर त्यानं गंधपुष्प वाहिलं. बचकभर गुलाल घेऊन त्यानं तिचा मळवट भरला आणि ओंजळभर तांबडीं फुलं घेऊन तिच्या अंगावर उधळलीं. हें पाहून शाक्तांनी आणखी एकदा जोरानं देवीच्या नांवाची गर्जना केली. नंतर रुद्रभटानं जवळच्या एका रौप्य कलशांतल्या मद्यानं एक रुप्याचा पेला भरला आणि तो मृणालिनीच्या तोंडाशीं नेला. तेव्हा मात्र ती जोरानं आपलं अंग हलवूं लागली आणि तोंडाला लावलेला पेला तिनं आपल्या हातानं दूर केला.

हें पाहून मात्र प्रथम तिला मंचकारूढ होण्याचा आग्रह करणारा शाक्त उठून उभा राहिला आणि म्हणाला, " हां, हा प्रतिकार आम्ही चालूं देणार नाही. या स्त्रीला आम्हा शाक्त लोकांचे दुराचार गुप्तपणं पाहण्याची इच्छा अनावर

झाली म्हणून आम्ही तिला इथं घेऊन आलों. आता नाही म्हणून कसं चालेल ? आमच्या धर्माचा अपमान आम्ही कसा सहन करूं! हा कांही बौद्ध-संघाचा विहार नाही, किंवा राजाश्रयाखाली राजमार्गांतून बौद्ध धर्मांचा प्रचार करीत जाण्याचा चव्हाटा नाही. हा समारंभमंडप आमचा आहे. इथं येणारानं आमच्या धर्माचाराला मान दिलाच पाहिजे." इतकं बोलून तो रुद्रभटाला म्हणाला —

"पाहतां काय ? या लुसलुशीत कोवळ्या पोरीला मद्यप्रसादाचा पेला पाजायला उशीर करूं नका. श्रीचक्रसमारंभ यथासांग पार पाडण्याला आम्ही सर्व उतावळे झालों आहों."

रुद्रभटाला या उत्तेजनाचं कारणच नव्हतं. सगळ्या शाक्तमंडळींत स्वतः मद्य न पितां सावध राहिलेला तो एकटाच होता. त्याचा हात थांबला असला, तर तो मृणालिनीच्या सौंदर्याकडं लोभी कामुक वृत्तीनं पाहत दंग झाल्यामुळंच. त्यानं तिच्या मुखाकडील दृष्टि न काढतां हातांतला पेला फिरून तिच्या तोंडाशीं नेला आणि ती तोंड उघडीत नाही असं पाहून, डाव्या हातानं तिच्या गालावर बोटं टेकून, तिचे ओठ उघडण्याचा प्रयत्न करूं लागला. मद्याची घाण येतांच मृणालिनीनं जोरानं तोंड बाजूला केलं. पण हातांचा उपयोग करण्याला आपण मोकळे नाही असें पाहून तिनं केविलवाणेपणानं किंचाळी फोडली !

ती ऐकतांच त्या समाजांतून दोन शाक्तवेषधारी व्यक्ति ताडकन् उठून उभ्या राहिल्या. एक ओरडून म्हणाली, "हां चांडाळा, हात मागं घे. हा पाहा तुझा काळ या ठिकाणीं उभा आहे. खबरदार त्या अबलेच्या अंगाला स्पर्श करशील तर!" दुसरी व्यक्ति ओरडून म्हणाली, "मृणालिनी, भिऊं नको, भिऊं नको, हा पाहा मी आलोंच तुझ्या रक्षणाला !" या व्यक्ति म्हणजे नीला आणि शमधन होत्या, हें वाचकांना सांगावयाला नकोच. दोघंहि उड्या टाकीत आणि वाटेंत जे कोणी बसले किंवा उभे होते त्यांना लाथाडीत, तुडवीत एकदम पूजामंचकाशी येऊन भिडलीं. शमधनानं आपल्या डाव्या हातानं रुद्रभटाचा गळा चिमट्यांत पकडावा त्याप्रमाणं घट्ट धरला आणि उजव्या हाताची मूठ वळून तो ओरडून म्हणाला, "संभाळा, जो कोणी पुढं येईल त्याचीं शंभर वर्षं आज भरलीं असं समजा !"

नीलेनं तर आपल्या वस्त्रांत झाकून ठेवलेली कट्यारीसारखी सुरी बाहेर काढली आणि ती सर्वांपुढं परजून दाखवून म्हाणाली, "शाक्त अधमांनो, बसा.

जाग्यावरचे हलाल तर मराल." शमधनाच्या मगरमिठीने रुद्रभटाचा गळा इतका चेपला गेला की त्याचा श्वास कोंडल्यामुळं तो तडफडून हातपाय झाडूं लागला. असं पाहून नीला म्हणाली, "शमधन, त्या दुष्टाच्या गळ्यावरचा पाश ढिला करा. तो घुसमटून तुमच्या हातानं मरता कामा नये. तो माझ्या हातानं-च मेला पाहिजे. तुमच्या हातून तो मेल्यावर मी आपला सूड कसा उगविणार ! त्याच्या प्रेतावर मी आपलं शस्त्र चालविण्यांत मला खरा आनंद लाभणार नाही. ही पाहा माझी कट्यारच त्याच्या काळजांत घुसून त्याचे प्राण घेईल." असं म्हणून कुशीवर वळून तडफडणाऱ्या रुद्रभटाच्या काळजावर तिनं घावांमागून घाव घातले. त्याबरोबर रक्ताच्या चिळकांड्या उडून त्या तिघांचींहि वस्त्रं भरून गेलीं, आणि तोंडांतून शब्दहि न निघतां रुद्रभट कोसळून खाली पडला.

शमधन त्याच्या छातीवर एक पाय देऊन उभा राहून, सर्व समाजाकडं अशा भीषण मुद्रेनं पाहात होता की, बसल्या जागेवरून उठण्याचा प्रयत्न करण्याची कोणाचीहि छाती झाली नाही. कारण पायाजवळ बसलेल्या, आणि पुढं होण्यासाठीं किंचित् हालचाल करणाऱ्या, दोन तीन शाक्तांना त्यानं आपल्या दुसऱ्या पायानं इतक्या जोरानं लाथाडलं की ते दूर फेकले गेले. नीलाहि रक्तानं ओथंबणारी आपली कट्यार चहूं दिशांना फिरवीत म्हणाली, "हां ! आता मात्र बलिदान पूर्ण झालं खरं. पूर्वी या चांडाळानं असाच एक श्रीचक्रसमारंभ करून त्यांत माझा पवित्र देह भ्रष्ट केला. त्या दुःखानं मी वेडी होऊन आज इतके दिवस त्याचा सूड घेण्याची वाट पाहात बसलें होतें. ती संधि मला शेवटीं मिळाली. या पाप्याचे शंभर अपराध पुरे घडले. आग लागो तुमच्या त्या शाक्त धर्माला ! देवीच्या उपासनेचं निमित्त करून तुम्ही मद्य पिऊन पशु बनतां, तसंच पूजेचं सोंग करून तुमच्यांतले कामुक तरुण अशा निरपराधी कुमारिकांना मद्य पाजून त्यांना बेशुद्धि आणून त्यांच्या देहावर बलात्कार करतात आणि हे सर्व अत्याचार जी तुमची शक्तिदेवी निमूटपणं चालू देते ती अधमांतली अधम राक्षसीण होय. पण त्या बिचाऱ्या देवीला तरी मी नांवं कां ठेवूं ? ती स्वतः कांहीच करीत नाही. तिच्या नांवानं तुम्हीच उपासक भक्त म्हणवून घेऊन त्या नांवाखाली आपल्या हीन दुष्ट इंद्रियवासना तृप्त करून घेतां त्या तुम्हा शाक्तांना धिक्कार असो ! पण तुम्ही

अशा पातकांनी नरकांत जा नाही तर महानरकांत जा, मला तुमच्याशीं आणि तुमच्या धर्माशी कांही करावयाचं नाही. माझा सूड मीं घेतला. आता माझ्या आयुष्याचा शेवट करून स्मशानांतल्या जळत्या चितेंत उडी घेण्याला मी पूर्ण मोकळी झालें. चला शमधन! आपलं कार्य झालं."

शमधन आपल्या सात्त्विक संतापानं इतका बेभान झाला होता की त्याच्या तोंडून सरळ शब्दच निघेना. आपल्या जळत्या डोळ्यांतून सभोवार ठिणग्या पाडीत तो इतकंच म्हणाला, "मीं अहिंसेची शपथ बुद्धसंघांत शिरतांना घेतली ती आज मोडली. आणि या स्त्रीच्या प्रेमाखातर ज्या बुद्धसंघांत शिरलों होतों तो संघहि मी आज या क्षणापासून सोडून दिला." असं म्हणून शमधनानं मृणालिनीला उचलून आपल्या खांद्यावर आडवी घेतली. ती बिचारी आपल्या पहिल्या किंचाळीबरोबरच बेशुद्ध होऊन पडली होती. त्यानंतर झालेला कांहीच प्रकार तिला माहीत नव्हता. तिचे डोळे मिटलेले असून तिच्या एकाहि अवयवाची हालचाल होत नव्हती. शमधनानं तिच्या हाताचा विळखा आपल्या गळ्याभोवती घातला, आणि आपली वळलेली वज्रमुष्टि सर्वांकडे दाखवीत उडी मारून तो ताठपणं त्या भरल्या सभेंतून बाहेर पडला. नीलाहि आपली रक्तमय कट्यार सभेला दाखवीत त्याच्या पावलांवर पाऊल टाकीत सभागृहांतून बाहेर पडली.

सभेंतील पुष्कळसे लोक मद्यपानानं आधीच निमेशिमे गुंग झाले होते आणि जे थोडे मद्यपानाचे सराईत असल्यानं अजून शुद्धीवर होते त्यांचीहि दातखिळी हा भीषण प्रकार पाहून बसली. एकाचाहि हात किंवा पाय उचलूं शकला नाही.

* * *

शमधन आणि नीला दोघं सभामंडपांतून बाहेर पडलीं तीं थेट बुद्ध-संघाच्या विहाराशीं जाऊन पोंचेपर्यंत एक क्षणभरहि थांबलीं नाहीत. तिथं जातात तों अवलोकिता आपली दोनप्रहरची विश्रांति पुरी करून ठराविक आसनावर येऊन बसून पोथी-पुस्तक चाळीत होती. शमधनानं मृणालिनीला आपल्या खांद्यावरून उतरून, नुकत्याच जन्माला आलेल्या एखाद्या हरिणाच्या पाडसाप्रमाणं, अवलोकिताबाईच्या पायाशीं ठेवलं आणि हात जोडून नम्रभावानं उभा राहिला. अवलोकितेला या प्रकाराचा कांहीच उमज होईना. ती आश्चर्यानं म्हणाली, "याचा अर्थ काय!"

शमधन आणि नीला दोघांना एकदम एकच उत्तर सुचलं. तीं म्हणालीं, " धर्मप्रसारांतील उत्साहाच्या अतिरेकाचं हें फळ ! "

तरीहि अवलोकिताबाईला कांहीच उमज पडेना. तेव्हा शमधन म्हणाला, " नगरींत धर्मप्रचार करावयाचा तर तो सावधपणानं करावा, एकटं-दुकटं हिंडूं नये, शाक्त लोकांच्या गुप्त गाठीभेटी घेऊं नयेत, त्यांच्यावर विश्वास टाकूं नये, त्यांचे दोष हुडकून काढण्याचा उपद्व्याप करूं नये, सरळ मार्गानं आपल्याला काय धर्मोपदेश करावयाचा तो करावा, असं मी हिला परोपरीनं समजावून सांगत होतों. पण तिची ती खोड जाईना. शेवटीं तिच्या भोळेपणाचा फायदा घेऊन शाक्तांनी आज तिला आपल्या श्रीचक्रसमारंभांत भुलवून फसवून नेलं, आणि तिला मद्य पाजून तिच्यावर बलात्कार करण्याचा कट केला होता. पण सुदैवानं या बिचाऱ्या, वेड्या म्हणवून घेणाऱ्या, परोपकारी स्त्रीनं या कटाची बातमी मला वेळेवर दिल्यामुळं आम्ही दोघेजण त्या ठिकाणीं जाऊन पोंहोचलों, तिची विटंबना वांचविली, आणि त्या अधम शाक्तधर्मगुरूचा वध केला."

मृणालिनीवरचं संकट टळलं असं पाहून अवलोकितेला आनंद झाला. पण या कार्यांत वध झाला ही गोष्ट तिला आवडली नाही आणि तो वध शमधनाच्या हातून म्हणजे आपल्याच एका बौद्ध भिक्षूकडून झाला, असं वाटून ती म्हणाली, " काय शमधना, तूं आपलं अहिंसाव्रत मोडलंस ? आपल्या दीक्षेच्या प्रतिज्ञावचनाचा भंग केलास ? "

हें ऐकून नीला खदखदा हसूंच लागली. तिला हसूं आवरेच ना. ती म्हणाली, " नाही. अवलोकिताबाई, तें पाप आपल्या या सत्‌शिष्याकडून झालं नाही. तुम्ही चिंता करूं नका. रुद्रभटाचा वध मीं आपल्या हातानं केला. आणि त्यावरचा न्यायाचा सूड मीं उगवला. तो वध करण्याला मला तरी माझ्या धर्माचा प्रतिबंध नाही. कारण मी मूळ धर्मानं शाक्तच आहे नव्हे का ? पण मीं वध केला नसता तर या शमधनांनी त्याचा गळा दाबून त्याचा प्राण घेतल्याशिवाय सोडला नसता हें खचित. मात्र तुमचं हें अहिंसेचं थोतांड पाहून मला हसूं येतं. जसे ते शाक्त तसेच तुम्ही बौद्ध. अगदी मूर्ख, अगदी निर्बुद्ध. मी लहान तोंडी मोठा घास घेत असेन. पण मला हें म्हटल्याशिवाय राहवतच नाही की तुमच्या अहिंसाव्रताचाहि अतिरेक होतो. दुष्टांचा संहार करणं हाच खरा धर्म होय. निष्पाप, असहाय अशा अबलांवर अत्याचार करूं पाहाणाऱ्या अधमां-

मांना देहान्त शासन केल्याशिवाय जग चालणार नाही. धर्मभावनांचं खूळ शाक्त तसं माजवितात, तर अहिंसाव्रताचं खूळ तुम्हीं बौद्ध म्हणविणारे असं माजविता! मिळून दोघेहि मूर्खच. पण मला तुमच्या धर्माशीं काय करावयाचं? माझं आयुष्याचं कार्य संपलं. माझी तुम्हांला शेवटीं येवढीच विनंति करायची की, हे शमधन आणि ही मृणालिनी दोघांना तुम्ही आताच्या आता बुद्धसंघाच्या दीक्षाप्रतिज्ञेतून मुक्त करा. तीं दोघेंजण ऐकमेकांवर अनुरक्त असून, पुढं सुखाचा संसार करण्याची आशा धरून या तुमच्या संघांत वावरत कांही काळ काढीत होतीं. मृणालिनी आपली गुप्त इच्छा प्रगट न करतां ती दाबून ठेवून तुमच्या संघाच्या धर्मप्रचाराचं कार्य करीत होती हा तिचा थोरपणा म्हणा, किंवा भावनावशतेचा सद्‌गुण म्हणा. ही गोष्ट तुमच्यासारख्या प्रौढ बुद्धीच्या अनुभवी स्त्रीच्या लक्षांत यापूर्वीच यायला पाहिजे होती. पण तुम्ही पडला ध्येयवादी! तुमचा गर्व त्यांतच सांठविलेला. या बुद्धसंघांत अशा तरुण मुली आणि मुलगे गोळा करून धर्मप्रसाराचा नुसता पोरखेळ तुम्हीं चालविला आहे. त्या तुम्हालाहि धिक्कार असो! जगाची रहाटी सोडून तरुणांवर अकालीं यतिधर्म लादणाऱ्या तुमच्या विपरीत तत्त्वज्ञानाची फटफजिती केव्हा तरी होणारच होती. ती आज अशा अवचित घडलेल्या अपघातानं तुमच्या प्रत्ययाला आली बरं झालं. आश्रमांत गुप्त रीतीनं अनीति बोकाळत राहावी, आणि अशा अनीतिमान भिक्षूंकडून तुम्ही उघड रीतीनं मात्र जगाला सद्धर्म शिकविण्याचं स्तोम माजवावं या तुमच्या विपरीत व्यवहाराला काय म्हणावं हेंच कळत नाही. माझं ऐकाल तर असं करा. हा बौद्धसंघ मोडून टाका. निदान त्यांतल्या प्रार्थनापीठाचीं बोहलीं बनवून आश्रमांतल्या तरुणतरुणींचीं जोडपीं त्यावर उभीं करून त्यांचीं लग्नं लावा आणि अशा विवाहित दांपत्यांकरवी काय धर्मप्रसार करावयाचा तो करवा. तुमच्यासारख्या निष्कलंक प्रौढ स्त्रिया धर्मप्रसाराला सरसावल्या तर तें कांही तरी शोभेल. पूर्व आयुष्यांत संसारसुख भोगून किंवा त्याची पूर्ण निराशा झाल्यावरच तुम्ही स्वतः झाली तरी ही धर्मदीक्षा घेतली की नाही? मनुष्यानं आपणावरून जग कांही तरी ओळखावं. धर्म स्वतःची चिंता वाहण्याला समर्थ आहे. जगाची रहाटी चालतां चालतांच मनुष्यस्वभावाचा विकास होऊन काय धर्म-सुधारणा होईल ती खरी. देव म्हणून कोणी बसला तर त्याला तीच मानवेल. जगाला सन्मार्गाचा उपदेश करावयाचा तर तो जगांत राहून आपल्या सन्मार्गी उदाहरणानंच

कोणीहि करावा. नदीचं पाणी आडविल्यानं नदी वाहावयाची थांबत नाही. ती आपला बांध फोडील किंवा आडवळण घेऊन फिरून आपलं जीवनकार्य करीलच करील. त्या तुमच्या बुद्ध गुरूनं राज्याचा आणि त्याबरोबर बायकांपोरांचा त्याग केला त्यांत त्यानं काय मिळविलं? आयता हाताशीं राज्याधिकार होता. त्याचा योग्य उपयोग करून सुष्टांचं पालन आणि दुष्टांचं निर्दलन करून त्यानं राजधर्म पाळला असता तर जगावर त्यानं अधिक उपकार केला असता. असो. मी टाकून बोललें याची क्षमा करा, पण आज इतके दिवस तुमच्या या बौद्धसंघाचं खरं चरित्र मीं गुप्तपणानं पाहिलं म्हणून, आणि आज मृणालिनीवर असा प्रसंग आलेला पाहिला म्हणून, माझ्यानं बोलल्यावांचून राहवलं नाही इतकंच. तुमच्या स्वतःविषयीं मला आदर वाटतो म्हणूनच मी हा तुम्हाला शेवटचा प्रणाम करतें."

असं म्हणून नीलेनं पुढं होऊन शमधनाला प्रेमानं जवळ बोलावून, "भाऊराया, ये" असं म्हणून, त्याचा आणि निश्चेष्ट पडलेल्या मृणालिनीचा असे दोघांचे हात धरून एकमेकांच्या हातांत घातले. "प्रेमानं सुखाचा संसार करतांना या दीन जन्मदुःखी अनाथ भगिनीची आठवण ठेवा" असं म्हणून तिनं मृणालिनीच्या गालाचं चुंबन घेऊन त्यावर अश्रुसिंचन केलं, आणि उडी मारून ती धांवत निघून गेली.

हा सर्व प्रकार चालला असतां अवलोकिता स्तब्ध राहिली होती. तिच्या तोंडून एक शब्दहि निघाला नाही. नीलेनं केलेली आपली निंदा तिनं सर्व निमुटपणं ऐकून घेतली. तिच्या उपदेशाचा प्रत्येक शब्द अवलोकितेच्या हृदयांत शिरून तिथं स्थिरपद होत होता. नीला निघून गेल्यावर तिनं मृणालिनीला उचलून आपल्या मांडीवर घेतलं आणि पाणी आणवून तिच्या डोळ्यांना लावून तिला सावध केलं. मृणालिनी देहभानावर आली तेव्हा आपण श्रीचक्रसमारंभाच्या मंडपांत नसून परत आश्रमांत आणि अवलोकितेच्या मांडीवर असल्याचं पाहून तीं आश्चर्यचकित झाली. ती उठून दूर जाऊं लागली तेव्हा अवलोकितेनं तिला हातानं धरून जवळ बसवून घेतलं, आणि शमधनालाहि तिनं आपल्याजवळ बोलावलं. दोघांच्याहि पाठीवर प्रेमानं हात फिरवून ती आकाशाकडे दृष्टि लावून म्हणाली—

"बाळांनो, देव कोणाच्या तोंडानं आपला आदेश मनुष्यमात्राला कळवील याचा नेम नसतो. मी अनुसरणाऱ्या मार्गाबद्दल माझं मन मला दोषी ठरवीत

नसलं तरी, या वेडीच्या बोलण्यांत पुष्कळच सत्य होतं आणि तिला वेडी तरी मी कशी म्हणूं ? असो, तिनं जातांना तुम्हा दोघांचे हात एकमेकांत देऊन त्यांची गाठ घातली ती मी सोडविणार नाही आणि तुम्हीहि सोडूं नये. तुम्ही दोघे मिळून प्रथम या आमच्या संघांत प्रविष्ट होण्याला आलां, तेव्हा मीं तुम्हाला प्रश्न केला की, तुम्ही पति-पत्नि आहां काय ? तेव्हा तुम्ही लाजलां, पण आपल्या मनांतली प्रेमभावना त्या लाजेनंच प्रगट केलीत. तेव्हा आता परत आपल्या नगराला जा आणि पति-पत्नीच्या नात्यानं सुखाचा संसार करा. तुमच्या हातून आजवर धर्मप्रचाराचं कार्य झालं तें उत्तम झालं. तुम्हीं दीक्षाप्रतिज्ञा चांगली संभाळली आणि माझ्या सर्व आज्ञा निष्ठेनं पाळ-ल्यात. तुमच्याकडून याहून अधिक धर्मसेवा या संघानं घेणं योग्य होणार नाही."

इतकं बोलून अवलोकिता डोळे पुशीत अंतर्गृहांत निघून गेली. मृणालि-नीलाहि प्रेमाचा आवेग सहन करवेना. तिनं शमधनाला मिठी मारली आणि त्याच्या कानाजवळ आपलं मुखकमल नेऊन हळूच म्हणाली, "शमधना, तूं माझ्या साहाय्याला आयत्या वेळीं धावून आलास म्हणूनच माझी विटंबना वांचली. ती घडून येती तर मी जन्माची दुःखी आणि वेडी झालें असतें आणि मला आपल्या आयुष्याचा शेवट करावा लागला असता."

शमधन तिला अंगाशीं कवटाळून म्हणाला, "ईश्वर तें काय म्हणून करूं देईल ? माझ्या सत्यसंकल्पाला त्याचा आधार मनांत घेऊन राहिलों होतों, तो आज त्यानं सफळ केला. अवलोकिताबाईच्या पवित्र सान्निध्यांत मला अशी तपश्चर्या करावयाला लाभली यामुळं मी स्वतःला भाग्यवान् सम-जतों. मात्र माझी तपश्चर्या वैराग्याच्या स्फूर्तीची नसून प्रेमाच्या स्फूर्तीची होती."

प्रकरण एकविसावें

नीलेचें आत्मसमर्पण

नीला बौद्ध विहारांतून निघाली ती तडक नंदामाईच्या गौळवाड्याशीं जाऊन थांबली. आपल्या हातांतील रक्तानं माखलेली कट्यार विहाराकड जातांना वाटेंतच एका पाण्याच्या डबक्यांत तिनं फेकून दिली होती. तिचं तिला आतां कांहीच कारण उरलं नव्हतं. पण तिच्या अंगावरील वस्त्रावरचे रक्ताचे डाग तसेच होते. तिची मुद्रा आज इतके दिवस कधीहि नव्हती इतकी शांत व प्रसन्न झाली होती.

नीला आज अवेळीं गौळवाड्यांत परत आली असं पाहून नंदामाईला आश्चर्य वाटलं. पण ती आपल्या नित्य कार्यक्रमांत गुंतलेली असल्यामुळं तिनं नीलेकड फारसं लक्ष दिलं नाही. नीलाहि तिच्याशीं विशेष कांही न बोलतां थेट झोपडींत शिरली, देवापुढं नुसत्या जमिनीवर मानेखाली हात घेऊन आडवी झाली आणि दहावीस क्षणांत झोप लागून ती घोरूं लागली.

कांही वेळानं नंदामाई घरांत गेली तों नीला निश्चेष्ट निद्रित पडलेली असून घोरते आहे असं पाहून तिची झोप न मोडावी म्हणून मागच्या पायानं परतली. मग सर्व काम आटोपल्यावर ती नित्याप्रमाणं अंगणांत तक्त्यावर येऊन बसली. थोड्या वेळानं नीला जागी झाल्याची चाहूल लागतांच तिनं नीलेच्या नांवानं मोठ्यानं हाक मारली. ती ऐकून नीला बाहेर आली आणि नंदामाईशेजारी येऊन आपल्या ठराविक जागेवर बसली. तेव्हा नंदा म्हणाली, " वेडे, आज तुझी दिनचर्या बदललेली दिसते. तूं संध्याकाळशिवाय परत यायची नाहीस ती आज इतक्या लवकर कशी आलीस ? कुणाकुणाला भेटून आलीस ? "

नीला म्हणाली, " माझं सर्वांचं भेटून झालं. आता यापुढं या जगांत मला कुणालाच भेटायचं उरलं नाही. म्हणून मी अवेळीं परत आलें या गौळवाड्याकड. शिवाय पक्षी संध्याकाळीं आपल्या घरट्याकड परत येतात तेव्हा दुसरे दिवशीं उजाडल्यावर तरी फिरून बाहेर पडण्याची इच्छा आणि अपेक्षा

असते त्यांना. पण मला तर्शीहि आता उरली नाही. मी भैरवपूरचं आणि त्यांतल्या साऱ्या लोकांचं शेवटचं दर्शन घेऊनच आलें आहें."

इतक्यांत नंदेची दृष्टि नीलेच्या अंगावरच्या वस्त्रावरच्या डागांकड गेली. ती म्हणाली, "अन् हा शिडकाव कसला तुझ्या अंगावर? कुणी चुकून गुलाल टाकला की काय?"

"छेः छेः! गुलाल कोण टाकणार? आणि मी बरी कुणाला टाकूं देईन? हे डाग म्हणजे माझ्या धर्मनिष्ठतेच्या खुणाच आहेत, समजलीस?"

"त्या कशा?"

"अग! हे रक्ताचे डाग आहेत. मी शाक्त धर्मांतली स्त्री आहें ना? मला बलिदान करून देवीला प्रसन्न करून मोक्ष मिळवायचा आहे ना?"

"मग तूं कुणाचं बलिदान केलंस? एरवीं बलिदान म्हटलं की तुझ्या कपाळाला आठ्या पडतात."

"तें खरं, आज असलं दिव्य बलिदान करायला मला सांपडलं की त्यामुळं इतकीं वर्षं माझ्या कपाळावर पडून राहिलेल्या साऱ्या आठ्या एकदम निघून गेल्या. असला तसला हीन दीन पशु बळी देऊन का माझं समाधान होणार होतं? चांगला मोठा रेडा बळी दिला आणि तोहि मनुष्याचं रूप धारण केलेला रेडा! त्यांतूनहि शाक्त धर्माचीं सर्व तत्त्वं अंगांत मुरलेला! अगदी इथल्या शाक्तांचा धर्मगुरुच्च म्हणेनास? मुरारी काय कोवळं अजाणतं पोर. त्याच्या बलिदानानं देवी कशी संतुष्ट होणार? काली देवी जशी मोठी तशी तिची भूकहि मोठी नव्हे का?"

आता नंदामाईच्या मनावर थोडाथोडा प्रकाश पडूं लागला. ती म्हणाली, "एकूण तूं ज्याचा ध्यास घेऊन बसली होतीस तें सूड घेण्याचं कृत्य तूं शेवटीं केलंसच! भारीच धारिष्टाची तूं."

"बरं ती सगळी हकीकत तुझी मी मग ऐकून घेईन. पण आधी झोपडींत जाऊन रक्तानं भरलेलं हें अमंगळ वस्त्र सोडून दुसरं नेसून ये कशी!"

"वाहवा ग शहाणे. हें वस्त्र अमंगळ म्हणतीस काय? रक्त हें अमंगळ खरं, तरी पण तें शत्रूचं आणि त्यांतूनहि सूड घेण्यांत सांडलेलं असलं म्हणजे तें मंगलमय होतं. मला तर हें वस्त्र आता मरेपर्यंत अंगावरून काढण्याची इच्छाच होत नाही. माझ्या या भ्रष्ट देहापेक्षा का तें वस्त्र अधिक अपवित्र आहे?"

" म्हणजे ? " नंदामाई आश्चर्यचकितच होऊन म्हणाली. " हेंच वस्त्र तूं अंगावर घेऊन सारा जन्म काढणार की काय ? अन् तो कसा ? "

" जन्म तो सारा कितीसा ? आता तो संपायला वेळ आहे कुठं ? मला भेटायचं त्या सर्वांना भेटून झालं. केवळ तुझ्या देवघरांतल्या देवाचं अन्, नंदामाई, तुझं दर्शन घ्यायचं तेवढंच माझं उरलं होतं, ते घेतलं; आणि ही पाहा चाललें माझा मोक्ष मिळवायला. या समोरच्या नदीला पाणी चढल्यानं तिनं स्मशानांतल्या जळत्या चिता सगळ्या विझवून अन् बुडवूनहि टाकल्या. पण टाकल्या तर टाकल्या. अग्नि काय अन् जळ काय, दोन्ही झालीं तरी त्या एकाच देवाच्या घरचीं महद्भूतं ना ? त्यांतल्या कुणाच्याहि स्वाधीन मीं आपला देह केला तरी तें मला ईश्वरासन्निध नेऊन पोंचवीलच ! "

इतकं बोलून होतांच नीला ताडकन् उभी राहिली, आणि नंदामाईच्या पायाला हात लावून तीरासारखी धांवत निघाली. नदीच्या दरडीवर पोंहोचतांच तिनं एकदम खाली उडी घेतली आणि वेगानं वाहणाऱ्या त्या जलप्रवाहांत ती अदृश्य झाली !

— समाप्त. —

कथावाङ्मय

प्रस्तावना

या पुस्तकांत वाचकाला करमणूक होण्यासारख्या माझ्या गोष्टी व इतर कांहीं लेख एकत्र करून छापले आहेत. ते लेख लिहितांना केवळ स्वतःला करमणूक व्हावी एवढाच लेखकाचा हेतु होता व ते छापून प्रसिद्ध करितांना वाचकांना चार घटका मौजेंत घालविण्यास मदत होईल याहून अधिक अपेक्षा नाहीं. तथापि, लेखानें करमणूक करावयाची म्हटली तरी, लेख लिहितांना लेखकाची कांहीं एक विशेष प्रकारची मनःस्थिति असते; व ती प्रकट केल्यास लेख समजण्याला थोडीशी मदत होण्याचा संभव असतो. म्हणून या पुस्तकांतील लेखासंबंधानें एखाद-दुसरी टीप प्रत्येक लेखाला जोडावयाची, परंतु ती तशी न जोडतां या प्रस्तावनेंतच एके ठिकाणीं त्या सर्व टीपा देत आहें.

'गीताराव' या लेखाची कल्पना कै. प्रोफेसर चिंतामण गंगाधर भानू यांच्या गीताविषयक प्रचंड ग्रंथावरून सुचली होती असें स्मरतें. गीता हा ग्रंथ जरी महत्त्वाचा असला तरी, त्यासंबंधानें 'जितकें लिहावें तितकें थोडें' हें वाक्य डोळ्यांपुढें ठेवून अक्षरशः त्याचप्रमाणें प्रोफेसर भानू यांनीं केलेंसें वाटलें; आणि अशा लेखकांप्रमाणें त्यांना सहानुभवी असे वाचकहि लाभतात हें पाहून श्रद्धाळु मनाची मौज वाटली; व त्या मनःस्थितीचाच उद्गार त्याला विनोदाची थोडी भूमिका जोडून, या लेखांत प्रकट केला.

'सामाजिक चालीरीतींचा बदल' या लेखाच्या प्रारंभीं वर्णन केलेलें जोडपें गाडींत बसून लकडीपुलावरून गणेशखिंडीकडे गव्हर्नरसाहेबांच्या गार्डनपार्टीला जातांना प्रत्यक्ष पाहिलें व त्यावरून कल्पना सुचली. गणेशखिंडींत गार्डन-पार्टीला जावयाचें म्हणजे पोषाख कसा असावा हें ठरलेलें आणि तेथें गेल्या-वर कसें वागावें याची रीतभातहि ठरलेली. पण प्रसंगोपात्त मनुष्य जी रीतभात कारणपरत्वें अनुसरितो तीहि इतकी वेगळी किंवा विपरीत अशी इतर लोकांना भासते कीं, कोणी तिचें यथार्थ वर्णन केलें तर तें खरेंहि वाटत नाहीं. मग बोलूनचालून एखाद्या परक्या समाजाची रीतभात वर्णन केली तर ती किती विपरीत वाटेल हें सांगावयासच नको. पण मौज ही कीं, जी एका समाजाला विपरीत वाटते ती दुसऱ्यासंबंधीं अगदीं स्वाभाविक व सभ्य अशीहि ठरू

शकते. पण त्या सभ्य चालीरीतींचा इतरांना भासणारा विपरीतपणा चांगला लक्षांत येण्याला आणखी थोडी वेगळी युक्ति करून दाखवावी लागते. म्हणून एका संभावित इंग्रज कुटुंबांतील माणसाच्या जागीं आपण दक्षिणी ब्राह्मण असूं तर क्षणभर कसे दिसूं याचें चित्र उमटविण्याकरितां ही गोष्ट लिहिली आहे. वास्तविक गोष्टींत कथानक असें कांहींच नाहीं. पण परकाया-प्रवेशाचा आभास मौज उत्पन्न करूं शकतो, म्हणून तें चित्र एका सनातनी भटजीपुढें रंगवून दाखविलें अशी कल्पना केली आहे. एकाच ब्राह्मण-समाजांतील भिक्षुक व गृहस्थ हेंहि घेतले तरी त्यांच्या शिष्टसंमत वळणांत जर पुष्कळ फरक पडतो, तर दोन निरनिराळे समाज घेतले असतां, नीति व संभावितपणा यांच्या दृष्टीनें कांहीं एक बिघडलें नसतांहि, चालीरीतींचें चित्र असें हास्यास्पद रंगतें, कीं पाहणारा ओरडतच उठेल. एखाद्या सिनेमाच्या चित्रपटांत भिक्षुक-ब्राह्मणी पोषाखांतल्या मनुष्याकडून साहेबाचें चरित्र प्रत्यक्ष करून दाखवावें म्हणजे फार मौज दिसेल.

'माझी आगगाडी कशी चुकली' या लेखाला त्यांत वर्णिलेल्यासारखा एक प्रसंगच कारणीभूत झाला. आपल्या समाजांत पाहुणचार कसा करावा याचें शिक्षण लोकांना अद्यापि पुष्कळ मिळावयास पाहिजे असें मला वाटतें. कारण मला स्वतःला ही काल्पनिक गोष्ट लिहिण्यापूर्वी लोकांच्या पाहुणचाराच्या जुलमाचे प्रसंग पुष्कळच आले व अजूनहि येत आहेत. पाहुणचाराला जुलूम हें नांव देणें ही एक प्रकारची कृतघ्नताच वाटेल. पण पुष्कळ वेळां पाहुणचार करण्यांत इतका अविचार होतो कीं, पाहुण्याला त्यांत कांहीं एक गोडी न वाटतां उलट तो उपद्रव ठरतो. भोजनाच्या वेळीं आग्रहाचा जुलूम इतका झालेला मीं पाहिलेला आहे, कीं त्यामुळें जेवणारे आजारी पडले! पाहुणचारांत एक प्रकारचा उदारपणा असतो. कारण खर्च करावा लागतो, श्रम करावे लागतात, झीज सोसावी लागते. पण पाहुण्याला सुख द्यावें, आनंद व्हावा ही मुख्य कल्पना लोपून, त्या ठिकाणीं आपल्या वैभवाची बडेजाव किंवा अगत्याचें प्रदर्शन दाखविण्याची कल्पना यजमानाच्या मनांत न कळत उत्पन्न होते व तिच्यामुळें पाहुण्याला त्रास होतो. वास्तविक आपल्या घरीं पाहुणा आला असतां त्याला काय हवें-नको हें विचारून किंवा तर्कानें ओळखून तें वेळच्या वेळीं पुरविणें, त्याच्या अंगीं लागेल असेंच जेवण देणें, व आपल्या घराहून पुढें कोठें जावयाचें वगैरे त्याचे बेत योजलेले असतील ते बिनचूक पार पाडण्यास मदत

करणें हाच खरा पाहुणचार होय. पण तो तसा न करितां नेणत्या मुलाला आपण वागवितों त्याप्रमाणेंच कांहींसें पाहुण्यालाहि वागवितों. पाहुणा भिडस्त आहे, तो काय-हवें नको तें खरें सांगत नाहीं, हें किंचित् कोठें खरें असलें तरी जवळ जवळ सगळाच व्यवहार त्याच्याशीं अशा समजुतीनें पुष्कळ लोक करितात. आपला कृपणपणा पाहुण्याला भासूं नये ही भावना योग्य आहे; पण ती संभाळण्याच्या भरांत पाहुण्याला नको त्याहि गोष्टी करून आपण त्याला गांजीत असतों. तो परगांवीं पुढें जावयाचा असला तर, स्टेशनवरून दोनच गाड्या सुटणाऱ्या असतां तीन असल्याचें सांगतील, त्या सुटण्याची वेळ टाइम टेबलाच्यापेक्षां दहावीस मिनिटें उशिराची सांगतील, किंवा मोटारीचा प्रवास असेल तर वाटेचें अंतर वीस मैलांचें असलें तर त्यांतलें सहज दहा कापतील. आणि मोटारीला लागणाऱ्या वेळाचा हिशेब करितांना नक्की मोटार ताशीं चाळीस मैलांखालीं कमी चाल कधींच चालणार नाहीं व तिला वाटेंत कोणत्याहि कारणानें कधींच खोळंबा होणार नाहीं, असें गृहीत धरून कार्यक्रम ठरवितील! यांतल्या पुष्कळ गोष्टी जाणूनबुजून न होतां सहज झोकांत होतात! आणि हा सगळा बिनहिशेबीपणा कां तर पाहुण्याचा पाहुणचार यथासांग करण्याला काय मिळेल तो तास अर्धा तास आपणाला अधिक मिळावा म्हणून!! मला तर असें वाटतें कीं, फाजील पाहुणचार करणाऱ्या लोकांच्या मनांत मनुष्य-जातीची एक आनुवंशिक गुप्त उपजत बुद्धि प्रकट होत असावी. म्हणजे हातीं सांपडेल तो गडी पराभूत व चारीमुंडे चीत करण्याची! लढाईत आपला दारूगोळा खर्च करून शत्रूला लोळविण्यांत जो आनंद, तोच आनंद आपल्या घरचे लाडू खर्च करून पाहुण्याला 'लोळविलेला' पाहून किती तरी यजमानांना मनांतून होत असेल. जेवणांत फाजील आग्रह केल्यामुळें लोळलेले लोक मीं पाहिले आहेत; आणि कांहीं श्रीमंत व हौशी लोकांच्या घरीं पक्वान्नांचा आग्रह करून खाबू गडी लोळविणें हा एक 'स्पोर्ट' होऊन बसतो! असो. आम्ही हिंदी लोक पाहुणचाराकरितां फार प्रसिद्ध आहों. पण त्या पाहुणचाराची पद्धत थोडी बदलली पाहिजे. युरोपियन लोकांत पाहुणचाराची कल्पना अधिक व्यवस्थित आहे. टेबलाशीं बसून मद्यप्राशन करितांनाच ते एकमेकांना काय आग्रह करीत असतील तितकाच; पण जेवणाच्या कामांत ते लोक मुळींच आग्रह करीत नाहींत, आणि पाहुण्याच्या हिंडण्याफिरण्याची व प्रवासाची वेळ संभाळण्यांत तर ते मोठे दक्ष असतात. केवळ पाहुणचारांतले दोष दाखविण्या-करितां ही गोष्ट लिहून मीं थोडी थट्टा केली आहे.

" दुधाची धार अथवा गुप्तदान " ही गोष्ट स्वतः माझ्याच एका अनुभवावरून सुचलेली आहे. यांतला शेवटचा भाग, लहानपणीं मिळालेल्या दुग्धधारेच्या गुप्तदानाचें साफल्य करण्याकरितां, कल्पनेनें बनविला आहे.

" अलीगड किल्ल्यांतील एक रहस्य " ही गोष्ट कायदेकौन्सिलच्या कामाकरितां एके वर्षी सिमल्यास असतां सुचलेली व तेथेंच लिहिलेली आहे. ही गोष्ट लिहिली तेव्हां हिंदु-मुसलमानांतील तंटे विकोपाला गेलेले होते. उत्तर हिंदुस्थानांत हिंदूंना बाटविण्याचा कहर झालेला आहे, तसाच शुद्धि-चळवळीचाहि उदय मुख्यतः तिकडेच झालेला आहे, ही गोष्ट मनांत ठसून राहिलेली असल्यामुळें तशा प्रकारचें कथानक आपोआप सुचलें. या गोष्टीच्या प्रारंभाचें एक वाक्य—म्हणजे 'गेले पंधरा दिवस हा पर्वत या दऱ्या यांना इंद्रानें जणूं काय बाटविलें होतें '– इत्यादि वाक्य खासगी संभाषणामध्यें माझे तोंडून निघालें. व तेथें वर्णन केल्याप्रमाणें बिघडलेली हवा शुद्ध झाल्याचा चमत्कार पशुपक्ष्यांप्रमाणें आम्हां मनुष्यांनाहि मोठा आनंददायक झाला होता. यामुळें 'रत्नाकरा'करितां एखादी गोष्ट लिहून पाठवावयाची आहे ती याच विषयावर पाठवावी असें मनानें घेतलें व ती लिहिण्याला प्रारंभ केला. पण खरें सांगावयाचें म्हणजे मी पुढें काय लिहिणार याची आधीं यत्किंचितहि कल्पना नसतां, अलीगड किल्ल्याच्या ओसाड पटांगणावर पहारा करीत रिकामा बसलेला एक पहारेकरी मी आहें अशी कल्पना करून केवळ कल्पनेला जसें सुचत गेलें तसेंच लिहीत गेलों, व ज्या शंका मला सुचल्या त्यांचीं उत्तरें मीच देऊन कथानक पुरें केलें. मनांत आधीं कथानक नसतां कांहीं तरी लिहिण्याला प्रारंभ करावा म्हणजे पुढचें आपोआप सुचत जातें, असा मौजेचा अनुभव ही गोष्ट लिहितांना मला आला. प्रतिभा ही नेहमीं मनुष्याच्या अंतरंगांत असते. पण ती जागृत होण्याला बाहेरचें कांहीं तरी निमित्त कारण लागतें. ती आपोआप जागृत होत नाहीं.

'कपड्यांची अदलाबदल' ही गोष्ट देखील कांहीं निमित्तानें सुचलेली आहे. तिचा प्रकार असा. पुणें डेक्कन कॉलेजाजवळ संगमाचे अलीकडे एक बेटबाग आहे. कॉलेजांत असतां बोटींत बसून स्वतः वल्हवीत जाऊन या बेटावर उतरण्याचा आनंद मीं पुष्कळ वेळां विद्यार्थिदशेंत घेतला. तो अजूनहि तसाच आठवतो. तो एकदां आठवल्यावरून या गोष्टीचा प्रारंभ केला. बेटावर आंबे मिळण्याची निराशा होऊन परत येऊन पाहतों तों कपडे नाहींसे झाले

अशी एक कल्पना सुचली, आणि त्यामुळें 'कपड्यांची अदलाबदल' सुचली. महायुद्धाच्या वेळीं सैन्यभरती कशी जुलुमानें झाली याची आठवण होऊन ती कपड्यांची अदलाबदल सयुक्तिक करण्याला आयतीच संधि मिळाली. येथेंहि गोष्टीस प्रारंभ करितांना ही कशी संपणार याविषयीं माझी मलाच कल्पना नव्हती. 'वडाची साल पिंपळाला' लावून बागवानाला जें कलम बनवितां येत नाहीं तें मनुष्य-कल्पनेला बनवितां येईल.

'शृगाल-संमेलन' या गोष्टींतील कोल्ह्याच्या भेटी होण्याचा भाग दिल्लीस असतांना अनेक वेळां प्रत्यक्ष अनुभवाला आलेला आहे. सकाळीं-संध्याकाळीं नव्या दिल्लीच्या सडकेनें हिंडावयास जात असतांना कोल्हे नेहमीं आढळत, व रस्त्यावरून खुशाल आडवेहि जात. तसेंच रात्रीं अंथरुणावर पडण्याची वेळ व कोल्हेकुई सुरू होण्याची वेळ एकदम येई, आणि बंगल्याच्या आवारांत कोल्हे आलेलेहि पाहिले आहेत. अर्थात् अंथरुणावर पडल्यापडल्या झोप लागेपर्यंत जे मौजेचे कल्पनातरंग मनांत येत त्यांची गोधडी या लेखांत वर्णिली आहे. कोल्ह्यासंबंधीं ऐकलेल्या अनेक गोष्टींचा उपयोग त्यांत सहजच करतां आला.

'शारदेची आकाशवाणी' हा लेख 'शारदा' या शब्दांतील श्लेषावरून सुचला व शारदाबिलानें त्या वेळीं बरीच खळबळ उडविली असल्यामुळें त्या श्लेषाचा मीं भरपूर फायदा करून घेतला. मात्र मला हें कबूल करावें लागत आहे कीं, या लेखाला प्रारंभीं जें विनोदी स्वरूप मीं दिलें तें मला अखेरपर्यंत टिकवितां आलें नाहीं. मी विनोदांतून युक्तिवादांत शिरलों.

'म्हणा स्वराज्य-मतदार की जय' हा लेख १९२० सालच्या नव्या सुधारणांच्या तोंडीं कायदेकौन्सिलांच्या निवडणुकी सुरू झाल्या तेव्हां लिहिला. मतदारी ही गोष्ट अगदीं नवी आहे म्हणून मतदारांना राजकीय विषय होतां होइल तों सोप्या शब्दांनीं, त्यांच्या अंतरंगांत शिरून समजून सांगण्याची जरूरी भासूं लागली. म्हणून केसरींत हा एक प्रयत्न करून पाहिला व पुढें १९२३ व १९२६ या सालीं असेंब्लीच्या निवडणुकीकरितां मी बाहेरगांवीं हिंडत होतों तेव्हां अनेक लोकांनीं गमतीनें या लेखाची मला आठवण दिली हें पाहून मला सहजच आनंद झाला.

'मुरलीधर कीं गारुडी' हें रूपक खरोखर त्या वेळीं पाहिलेल्या एका गारुड्याच्या खेळावरून सुचलें. येथेंहि, एका वेळीं ऐकलेलें एक पद व दुसऱ्या वेळीं पाहिलेला एक खेळ यांची सांगड कल्पनेनें यदृच्छेनें घातली.

शेवटले तीन लेख—म्हणजे 'एका ट्रान्सफर सीनची हकीकत,' 'दुर्जनसिंह-महाराजांनीं नवस कसा फेडला' व 'शेवटलें लढाऊ जहाज'—हे तीन लेख राजकीय विषयांवर आहेत. 'ट्रान्सफर सीन' या लेखांत सरकारचें एकाच वेळीं लोकांशीं वागण्याचें धोरण कसें दुटप्पी असतें, म्हणजे दाखविण्याचा एक प्रकार व त्याबरोबर तद्विरुद्ध दुसरा प्रकार यांचा खेळ कसा सुरू असतो हें किंचित् दर्शविलें आहे. 'दुर्जनसिंहाची नवसफेड' हें राउंड टेबल कॉन्फरन्सचें लाक्षणिक वर्णन आहे, हे राजकारण-परिचित वाचकांच्या लक्षांत आल्या-वांचून राहणार नाहीं. 'शेवटचें लढाऊ जहाज' या लेखांत एक ऐतिहासिक भविष्य रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. इंग्लंड व हिंदुस्थान यांच्या स्थितीची तुलना केली असतां, या लेखांत वर्णिल्यासारखा प्रकार घडणें हें हिंदुस्थानाला स्वराज्य कसें मिळेल या कूट प्रश्नाच्या अनेक उत्तरांपैकीं एक उत्तर आहे. हिंदी लोक स्वराज्य मिळविण्याच्या कामांत अखंड प्रयत्न करतीलच. पण स्वतः इंग्लंडवर संकटें येणें ही गोष्ट देखील महत्त्वाची आहे व ती जेव्हां जेव्हां घडेल तेव्हां तेव्हां हिंदी राष्ट्राचें पाऊल पुढें पडण्यास मदतच होईल. रोमन साम्राज्याची व ब्रिटिश साम्राज्याची तुलना इंग्रज लोक हौसेनें करितात. तेव्हां रोमन साम्राज्य नष्ट होण्याच्या वेळच्या त्यांच्यावरील संकटामुळेंच खुद्द इंग्लंडला स्वातंत्र्य लाभलें, तसेंच इंग्लिश साम्राज्य इतर रीतींनेंहि नष्ट होण्याचें संकट जेव्हां इंग्लंडवर येईल, तेव्हां इकडील चळवळीला मदत होऊन हिंदु-स्थानाला स्वराज्य मिळेल असें भविष्य करून, त्याच ऐतिहासिक तुलनेची पूर्तता कोणी केल्यास ती बोधप्रद व्हावी असें वाटतें!

कथावाङ्मय

१ गीताराव

—:※:—

माझा मित्र 'गीताराव' हा मोठा भला माणूस होता. त्याच्यासारखीं सज्जन व भाविक माणसें फार विराळा. गीताराव हें कांहीं त्यांचें खरें नांव नव्हे. बायकामध्यें 'गीताबाई' असें नांव असतें, पण तें निरर्थक असतें. पण माझ्या मित्राचें नांव सहेतुक म्हणून सार्थ होतें. आपल्या प्रेमळ मित्रांनीं आपल्याला दिलेलीं टोपणनांवें सर्वांनाच आवडतात. लहानपणीं मनुष्याला पाळण्यांत घालून नांव ठेवितात तो समारंभ फार गोड असतो, पण त्याची गोडी इतरांना. लोक आपणास पोर समजून कौतुक करीत असतां, उलट लोकांसच पोरें समजून त्यांचें कौतुक करण्यासारखी प्रौढ बुद्धि पोटांत असणें ही गोष्ट श्रीकृष्णासारख्यांनाच अनुभवावयास मिळणार! कुक्कूबाळ म्हणून अंगाखांद्यावर खेळावयास घेतलेल्या श्रीकृष्णाच्या मनांतले सर्व विचार जसेच्या तसे कळते, तर प्रेमळ अशा गोपींनींहि, हातावर पडलेला निखारा किंवा विंचू आपण फेकून देतों, तसा श्रीकृष्णाला दूर फेकून दिला असता असें वाटतें! असो; सांगावयाचा मुद्दा इतकाच कीं, लहानपणीं पाळण्यांत झालेल्या आपल्या नामकरणविधीच्या आनंदास आपण मुकतों. पण विनोदी व प्रेमळ मित्र संग्रहीं असलेल्या मनुष्याला प्रौढपणींहि तो आनंद भोगावयास मिळण्याचा संभव असतो.

माझ्या मित्रास त्याच्या मित्रांनीं 'गीताराव' हें जें नांव विनोदानें दिलें, तें त्यानें साभार, किंबहुना कृतज्ञताबुद्धीनें स्वीकारिलें होतें. कारण तो खरोखरच अंतर्बाह्य गीतामय नटला होता. असा त्याचा कोणताहि व्यवहार नव्हता, कीं ज्यांत त्यानें गीतेचा संबंध आणून भिडविला नाहीं. गीतेच्या तीन षडध्यायी होतात, म्हणून तो दिवसांतून फक्त तीनच वेळां चहा घेई. जेवणांतला कोणताहि पदार्थ पुष्कळ वाढला असला तरी अठरा घासांत तो

संपवी, किंवा थोडा वाढला असला तर अठरा घासांना पुरेल इतका मुद्दाम मागून घेई. कारण गीतेचे अध्याय अठराच आहेत ! त्याच्यापाशीं १२६० रुपये शिल्लक होते. ते त्यानें प्रथम अठरा निरनिराळ्या बँकांतून प्रत्येकींत ७०० प्रमाणें वांटून ठेवीदाखल ठेविले होते. कारण गीतेचे अध्याय अठरा व एकंदर श्लोक ७०० आहेत म्हणून ! पुढें पुढें बँकांचीं दिवाळीं निघूं लागलीं तेव्हां बाकीचे सर्व काढून घेऊन फक्त ७०० रु. त्यानें अठरा बँकां-मिळून शिल्लक ठेवले; आणि तेहि गीतेंतील निरनिराळ्या अध्यायांत जितके श्लोक आहेत त्या त्या प्रमाणानें. गतवर्षीं जानेवारीच्या पहिल्या तारखेपर्यंतचा एका बँकेकडून त्याचा हिशेब आला. त्यांत व्याजाचा दर मध्येंच अभावित रीतीनें वाढल्यामुळें कांहीं रुपये फुगून हें प्रमाण बिनसलें; तेव्हां वाढलेले रुपये आपले वहींत जमा धरितांना 'प्रक्षिप्त' असें त्यांपुढें त्यानें लिहून ठेविलें.

त्रिगुणाचे रंग तीन म्हणून निळ्या, तांबड्या व काळ्या रंगांशिवाय दुसऱ्या कोणत्याहि रंगाचा कपडा गीताराव कधींहि वापरीत नसे. त्याच्या थोरल्या मुलाचें नांव भगवान् व धाकट्याचें केशव असें होतें. दोघांच्यामध्यें एक मुलगी होती. तिचें नांव गीता होतें, हें सांगावयास नकोच. मुलांना हाका मारणें झाल्यास 'भगवद्गीते' अशा जोड-शब्दानें तो हाका मारी. या एका शब्दांत दोन नांवें आल्यामुळें एकाऐवजीं दोन मुलें हाकेसरशीं त्याजपुढें येत ! धाकटा मुलगा केशव हा व्रात्य असे. परंतु गूळ फार खाणारा केशव, म्हणून 'गुडाकेश'; शेजाऱ्यांस ताप देणारा केशव म्हणून 'परंतप' अशा तऱ्हेचे गीतेंतील व्यक्तिवाचक शब्द आठवल्यामुळें तो सात्त्विकपणानें मुलांच्या खोड्यांचें चीजच करीत असे. मुलें फार ओरडूं लागलीं अगर भांडूं लागलीं म्हणजे राग आलाच तर पहिल्या अध्यायांतील १२, १४ किंवा १८ या श्लोकांचें स्मरण होऊन 'शंखं दध्मौ प्रतापवान्', 'दिव्यौ शंखौ प्रदध्मतुः' किंवा 'शंखान् दध्मुः पृथक् पृथक्' असें म्हणतांच गीतेच्या स्मरणानें त्याचा राग शांत होत असे. एकदां त्यानें 'आपणास रेशमी मुकट्यापेक्षां तागी मुकटाच अधिक आवडतो' असें मला सांगितलें; व कारण विचारतांच तो म्हणाला कीं 'तागी' मुकटा उलटा करून नेसूं लागलों म्हणजे अक्षरांचें परिवर्तनहि मनांत आपोआप होऊन 'गीता' या शब्दाची आठवण अनायासें होते.

योग हा शब्द तो बहुधा बसतां उठतां 'लाथाडीत' असे. असें म्हणण्यांत किंचित् विपरीतत्व वाटतें, परंतु तात्पर्यार्थानें तशी गोष्ट होत असे यांत शंका

नाहीं. एखाद्या गोष्टीबद्दल नुसतें 'वाईट वाटतें' असें म्हणण्याऐवजीं मला 'विषादयोग' प्राप्त झाला आहे असें तो म्हणे. 'करतों' या साध्या क्रियापदाऐवजीं 'कर्मयोगाला आरंभ करतों', असेच शब्द यावयाचे. कुळानें आणून दिलेले रुपये मोजणें हा 'सांख्ययोग.' विडी ओढीत असतां आरामखुर्चीवर पाय ताणून डोळे मिटून पडणें हा 'ध्यानयोग.' एखाद्या सरकारी कागदाविषयीं माहिती विचारली असतां, 'ते कॉन्फिडेन्शल आहेत म्हणून सांगतां येत नाहीं,' असें सांगण्याऐवजीं 'तो राजगुह्य योगापैकीं' प्रकार आहे असें म्हणून पृच्छकाची तो संभावितपणें संभावना करी. इतर लोक स्वतःच 'राजनिष्ठ' म्हणवून घेवोत; परंतु 'मी राजनिष्ठ आहें' असें म्हणण्याऐवजीं मी 'भक्तियोगी' आहे असें म्हटलें तरी चालावें, अशी त्यानें सरकारकडे परवानगी मागून ठेवली होती व ती त्यास मिळाली होती. एक दिवस हपीसचे साहेब फार रागावले तेव्हां 'You need not be angry, Sir,' असें म्हणण्याऐवजीं गीतारावास भान न राहून 'Why do you practise विश्वरूप-दर्शनयोग, Sir? असे शब्द गीतारावाच्या तोंडांतून निघून गेले. पण साहेबास त्या शब्दांचा अर्थ न कळल्यामुळें लगेच तेवढ्या वेळांत त्यानें 'Beg your pardon' असें म्हणून रीतीप्रमाणें नीट इंग्रजी बोलण्यास सुरुवात केली. 'श्मश्रु करण्यास बसतों असें म्हणण्याऐवजीं, तोच अर्थ 'संन्यास-योग' हे शब्द घालून तो सुचवीत असे. याशिवाय गीतेंतील इतर अनेक शब्दहि प्रसंगोपात्त त्याच्या तोंडून येत. पण यथान्याय बोलावयाचें म्हणजे ती सर्व क्रिया त्याचे हातून न कळत आपोआप होत असे, इतकें त्याचें मनच गीतेंत खरोखर गढून गेलें होतें. 'यस्य निश्वसितं वेदाः' हें जसें ईश्वराचें यथार्थ वर्णन होऊं शकतें, तसेंच 'यस्य निश्वसितं गीता' हें वर्णनहि माझ्या मित्रास बरोबर लागूं पडण्यासारखें आहे.

असो. थोड्या दिवसांपूर्वी सकाळीं मी घरीं चहा घेत बसलों असतां, गीतारावाची स्वारी येऊन माझ्यापुढें अकस्मात् थडकली. गोष्ट कधींहि न होणारी ती झाली म्हणून मी आश्चर्यानें त्याला म्हणालों, "अरे गीतराव, तूं या वेळीं इकडे कसा? या वेळीं तर तुझ्या खोलीमध्यें गीतेचा कीस पडत असावयाचा. गीतेचें उच्च स्वरांत पाठांतर तरी चालावयाचें, किंवा गीताभाष्यापैकीं एखाद्या छेदाच्या शब्दार्थाचा छल सुरू असावयाचा किंवा गीतेच्या अभ्यासाचीं तुझीं टिपणें चालूं असावयाचीं. आणि लिहिण्यावाचण्याचा तुला कंटाळाच आला तर निदान गीताग्रंथाचे रेशमी पुठ्ठे साफसूफ करीत तरी तूं बसलेला असावयाचा!"

गीताराव म्हणाला, “आज तुला आनंदाची बातमी सांगावयाची आहे.”
मी म्हणालों, “ती कोणती?”
गीताराव म्हणाला, “आज बारा वर्षें–नाहीं–चुकलों–अठरा वर्षें–गीतेच्या अभ्यासाचा जो कर्मयोग मीं आरंभिला होता तो आज सकाळींच संपला.”
मी म्हणालों, “काय? गीतेच्या एकूणएक आवृत्त्या तुझ्या वाचून झाल्या?”
“होय. सर्व आवृत्त्या मी व्हाल्यूम्समध्यें बांधून ठेविल्या होत्या व त्यांपैकीं अठराव्या व्हाल्यूमचें शेवटचें पान सकाळींच संपलें.”
“बरें, गीतेवरच्या सर्व संस्कृत टीका?”
“होय.”
“त्यावरील सर्व इंग्रजी ग्रंथ?”
“होय, सर्व.”
“सर्व पद्यात्मक भाषांतरें?”
“होय. श्लोकबद्ध ज्ञानेश्वरीपासून आर्याबद्ध आठल्येश्वरी आणि साकीबद्ध आपटेश्वरी यासुद्धां वाचून झाल्या.”
“बरें त्यांवरील टीकात्मक व विवेचनात्मक मराठी सगळे गद्य ग्रंथ वाचून झाले म्हणतोस?”
“होय सगळे. एकहि ठेवला नाहीं. प्रो. भानू यांच्या उपसंहारांत मी कालपर्यंत गढून गेलों होतों. पण त्यांच्या चवथ्या भागाच्या ६२६ व्या म्हणजे शेवटच्या पानावरील शेवटच्या ‘शांति’ शब्दापुढील तीन उद्गारचिन्हें, तत्सद्ब्रह्मार्पणपर शब्द व समाप्त हीं अक्षरें १० मिनिटांपूर्वींच वाचलीं. राहतां माझा गीतेवरील एकच मराठी ग्रंथ वाचावयाचा राहिला आहे.”
“तो कोणता?”
“नाहीं म्हणायला लोकमान्य टिळक यांनीं मंडाले येथें तुरुंगांत बसून गीतारहस्यावर जो मराठी ग्रंथ लिहिला आहे, तो तेवढा वाचावयाचा राहिला आहे बुवा! तो तयार झाला असें कळलें असल्यामुळें वाचावयास मिळत नाहीं या विचारानें मला फार तळमळ लागून राहिली आहे. तो ग्रंथ वाचावयाला मिळावा म्हणून टिळक यांचा ‘आचारी’ होऊन मंडालेस जातां येतें तरी मी गेलों असतों. फार तर काय, पण अशी परवानगी मिळावी म्हणून मीं सरकारकडे अर्जहि केला होता. पण त्यावर असें उत्तर आलें कीं, ‘एक टिळकांना तुरुंगांत ग्रंथ लिहिण्याला परवानगी देण्यांत आली, म्हणून

त्यांच्या आचाऱ्यास तो ग्रंथ तेथें वाचण्याची परवानगी देण्यांत येईल अशी अर्जदाराची समजूत असेल तर ती चुकीची आहे. तुरुंगांत टिळकांसारख्या सवलती मिळायला कैद्याच्या अंगीं टिळकांइतकी मान्यता असावी लागते, हें अर्जदार यास माहीत नसावेंसें दिसतें!' असा जबाब आला तेव्हां माझा नाइलाज झाला. अर्थात् गीतेवर जगांत आज अस्तित्वांत असलेला एक ग्रंथ माझा वाचावयाचा राहिला हें शल्य माझ्या मनांत सलतेंच आहे पण उपयोग काय? टिळकांना सुटून यावयाला अजून अवकाश आहे. म्हणून १८ वर्षांच्या गीता-ज्ञान-यज्ञाचें आजच अवभृथस्नान करणार."

गीतारावाच्या हातांतील निळ्या, तांबड्या व काळ्या तीन रंगांच्या पेन्सिलीं-कडे बोट दाखवून मी म्हणालों, "अरे, पण सत्त्व-रज-तम त्रिगुणसूचक अशा तीन पेन्सिली अद्याप तुझ्या हातांत आहेत; असें असतांना अवभृथस्नानाची गोष्ट कशी बोलतोस?"

"त्यांनाहि आजपासून कायमची विश्रांति मिळणार! या रंगी पेन्सिली म्हणजे मुमुक्षु-जिज्ञासूला एक मोठीच ईश्वरी देणगी होय. माझ्या कपाटांतील गीता-विषयावरील वाटेल तें पुस्तक तूं उघडून पहा. त्यांत जें जें महत्त्वाचें अगर स्मरणीय स्थळ असेल तेथें तेथें त्यांत तुला निळ्या पेन्सिलीच्या उभ्या तीन, तांबड्या पेन्सिलीच्या आडव्या तीन, व काळ्या पेन्सिलीच्या फिरून उभ्या तीन अशा रेघा हटकून सांपडतील."

"वः, तुझ्या वाचनाचा व विचारसरणीचा फायदा घेणाराला या उभ्या, आडव्या व पुन्हा उभ्या तीन तीन रेघांच्या खुणा म्हणजे उत्कृष्ट सोळा आणे, नाहीं पण चुकलों, पावणे सोळा आणे तरी मदत होईल खरी. शिवाय उरला पैसाभर मदत तूं पुस्तकांतून काढलेलीं काकपदें, वर्तुळें, स्वस्तिकें, बाणशिरें, उद्गारचिन्हें वगैरे मिळून होईल यांत मला तर शंका वाटत नाहीं."

गीताराव म्हणाला, "तुझी आपली सारीच थट्टा."

मी म्हणालों, "थट्टा कशी होईल? अठरा वर्षें आरंभिलेल्या ज्ञानयज्ञाचें अवभृथस्नान करावयाला तूं निघालेला. तुझ्या तोंडावरील या पुण्यकारक तपश्चर्येच्या तेजापुढें कोणाचीहि थट्टा वितळून गेली पाहिजे. पण, गीताराव, मला वाटतें कीं, तूं अवभृथस्नानाला तीर्थकुंडांत अजून कांहीं वेळ उतरूं नयेस."

गीताराव आश्चर्यानें म्हणाला, "तें कां?"

मी म्हणालों, "गीतेवरील सर्व ग्रंथ अजून तुझे वाचून झालेच नाहींत."

" असे ग्रंथ कोणते ? "

" उदाहरणार्थ–मीं लिहिण्यास सुरुवात केलेली—"

" तुझा ग्रंथ ? भलतेंच कांहीं तरी. गीतेची नेहमीं थट्टा करणारा तूं! तूं गीतेवर कसचा ग्रंथ लिहितोस ! शिवाय तूं लिहिलास तरी त्यांत गीतेची थट्टा असेल म्हणून मला तो मुळीं वाचावयाचाच नाहीं."

" छेः, थट्टा काय म्हणून ? शिवाय मला थट्टा करावयाची असली तरी तिच्यापर्यंत मजल येण्याला अद्यापि फार अवकाश आहे. हल्लीं मी लिहीत आहें तें सर्व गंभीरपणाचेंच आहे. पण मीं लिहिलेलें तेवढें तुला वाचण्याला एक अयन लागेल. उत्तरायणाचें दक्षिणायन होईल."

" तें काय म्हणून ? तूं इतकें काय लिहिलेलें असणार ? "

" काय म्हणजे काय ? आजपर्यंत कोणीहि लिहिला नाहीं एवढा प्रचंड ग्रंथ गीताविषयावर लिहिण्यास मीं प्रारंभ केला आहे. नुसत्या 'श्री'वर टीका सुरू केली आहे, तिचींच १३५० पानें झालीं ! "

" काय, श्रीकारावरील टीकेचीं साडेतेराशें पानें ? "

" अरे वेड्या, श्रीच; पण ती गीतेची श्री ना ? गीतेची श्री आणि इतर ग्रंथारंभाची श्री एकच वाटतें ? "

या प्रश्नाला गीतारावास नकारार्थी उत्तर देतां येणें शक्यच नव्हतें. पण माझें म्हणणें त्याला आणखी पटावें म्हणून मी म्हणालों, " भगवद्गीता सांगणारी व्यक्ति जर अलौकिक तर त्या ग्रंथाची 'श्री'हि अलौकिक-अर्थपूर्णच असली पाहिजे. जर सर्व अक्षरें सारखींच अर्थगर्भ असतील तर त्यांचा उपयोग करणारे लोकहि सर्व सारखेच विद्वान् ठरतील! शिवाय 'गूढार्थप्रियाः-हि वै देवाः' असें वचन प्रसिद्धच आहे. प्रत्यक्ष ईश्वरानें सांगितलेल्या गीतेंत, साधें संस्कृत कळणाऱ्या मनुष्यास समजेल असा सोपा व उत्तान अर्थ असला तर मग देवांचें गूढार्थप्रियत्व तें काय राहिलें ? श्रीरामचंद्र एकवचनी होता हें सत्य आहे; पण त्याचा अर्थ इतकाच कीं, श्रीरामचंद्र जे शब्द तोंडांतून काढी, ते 'शब्द' तो नेहमीं कायम ठेवीत असे, म्हणून त्यांचा अर्थहि एकच व कायमचा असें मानतां येणार नाहीं. श्रीरामचंद्रांनीं सीतेला 'मी तुला कधींहि अंतर देणार नाहीं,' असें वचन देऊन तिचें पाणिग्रहण केलें. पण पुढें लंकेहून सोडवून आणल्यावर तिचा जेव्हां त्यांनीं वनांत त्याग केला तेव्हां पुष्कळ अयोध्यावासी लोकांनीं 'ही गोष्ट रामचंद्रांनीं एकवचनत्वाला विरुद्ध

केली,' असा प्रवाद सुरू केला. त्या वेळीं अयोध्येंत दोन तट होते. एक सीतात्यागाला अनुकूल व दुसरा प्रतिकूल. पैकीं सीतात्यागास अनुकूल असणाऱ्या रजकप्रभृति नागरिकांचें समाधान सीतात्याग करून रामानें केलेंच. पण त्याच गोष्टीस प्रतिकूल असणाऱ्या लोकांचें समाधान स्वतः रामचंद्रांनीं न करतां तें फक्त वसिष्ठऋषींवर सोंपविलें आणि वसिष्ठांनींहि 'गूढार्थप्रियाः हि वै देवाः' या सूत्राच्या आधारानेंच तें समाधान केलें. 'मी तुला अंतर देणार नाहीं' या रामचंद्रांच्या शब्दांचा अर्थ 'मी तुला कधीं दूर ठेवणार नाहीं,' असा लौकिक दृष्ट्या होतो; पण तोच गूढार्थ अलौकिक दृष्ट्या पाहिला तर कांहीं वेगळाच होतो, असें सूचक भाष्य वसिष्ठांनीं सुमंताच्या कानांत सांगतांच सर्वांचें समाधान झालें व गूढार्थप्रियत्वाची ही मीमांसा लोकांस इतकी पटली कीं, अयोध्येंतील ज्या कित्येक पौरजनांनीं 'तुझें पुनः कधींहि तोंड पाहणार नाहीं,' असें म्हणून आपल्या स्त्रियांना माहेरीं पाठविलें होतें, त्यांना त्यांनीं परत घरीं आणून, त्यांचें तोंड येतां जातांहि दिसेल अशा नित्य नजरेसमोर ठेवल्या व इतकेंहि करून प्रतिज्ञापालनाचा त्यांचा अभिमान कायम राहिला तो राहिलाच!"

मी पुढें म्हणालों, "ब्रह्मसूत्रें, गीता वगैरेंतील शब्द जर खरोखर गूढार्थ-पूर्ण नसते, तर त्यांच्यावर सर्वस्वी भिस्त ठेवून अनेक भाष्यकारांनीं अनेक भाष्यें करून तीं सर्व खरीं असें कसें प्रतिपादिलें असतें? भाष्यकार सर्व प्रामाणिक मीमांसा करणारे. अर्थात् एकाच शब्दांतून इतके अर्थ निघण्याला ब्रह्मसूत्रें व गीता यांतील शब्दांचें गूढार्थत्वच कारण असलें पाहिजे! एकाच ब्रह्मसूत्राच्या शब्दांतून जर शुद्ध द्वैत व शुद्ध अद्वैत निघतें व हजारों लोक हे चमत्कार खरे मानतात, तर ब्रह्मसूत्रें हीं 'Three in one' ह्या वर्णनाच्या जादूच्या चित्रा-सारखींच असलीं पाहिजेत, हें उघड आहे. परवांच एका थिऑसफिस्टानें मला असें सप्रमाण सिद्ध करून दाखविलें कीं, श्रीमद्भागवत हा ग्रंथ शब्दशः द्व्यर्थी आहे. मला वाटलें कीं, फक्त कृष्णचरित्राच्या कित्येक अध्यायांसंबंधानें हें खरें असेल. कारण गोपींचें लौकिक प्रेम आणि त्यांची अलौकिक भक्ति यांचा उत्कृष्ट मेळ घालण्याकरितां भागवतकार शब्दालंकाराचा थोडासा खेळ खेळले असतील. पण माझ्या थिऑसफिस्ट मित्राला या माझ्या सूचनेचा रागच आला. तो म्हणाला, 'असें काय म्हणून होईल? सर्व भागवतच्या भागवत इथूनतिथून द्व्यर्थी आहे.' मीं म्हटलें, 'ग्रंथकार असा द्व्यर्थी ग्रंथ काय म्हणून

लिहील?' तेव्हां तो म्हणाला, 'एरव्हीं देवांचें गूढार्थप्रियत्व तें काय राहिलें?' देवांनीं भाषा बोलावी आणि मध्यस्थ गुरुमुखाच्या मदतीशिवाय ती भक्ताला कळावी, यांत देवाचें देवत्व तें काय राहिलें? व भक्तिमार्ग इतका सोपा केला तर गुरूंना मग कोण विचारतो? आणि गुरुमुख हा तर सिद्धीचा राजमार्ग. अर्थात् देवांच्या देवत्वाकरितां नसलें तरी गुरुपरंपरा कायम राहण्याकरितां देवांना आपली भाषा अशी गूढार्थपूर्ण ठेवावी लागते. 'अमरुशतक' ग्रंथाचे नाहीं का दोन दोन अर्थ होत? मग मनुष्यकृत ग्रंथाचे जर दोन दोन अर्थ होऊं शकतात, त्यांना जर गूढार्थयोजना इतकी सुलभ आहे, तर देवांना ती अर्थात् अधिक सुलभ असली पाहिजे. आज जर भागवताचे दोन दोन अर्थ होऊं शकतात तर कालांतरानें गुरुपरंपरा जसजशी वाढेल तसतसे त्याच ग्रंथांतून ४-४, ५-५ अर्थहि कां निघूं नयेत? हें सर्व सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, 'श्री' झाली म्हणून काय? ती गीतेची प्रस्तावना करणारी श्री असेल तर तिच्यांतहि गूढार्थ असलाच पाहिजे. एखादी सुवर्णमय मूर्ति बनवावयाची असेल तर तिचें प्रत्येक उपांग व त्या उपांगांचेंहि उपांग कोणी झालें तरी सुवर्णमयच बनवील. मूर्तीचे नेत्र अगर मुख तेवढें सुवर्णाचें करून नखें मात्र हिणकसाचीं कोणी करील काय? गीता जर गूढार्थपूर्ण आहे, तिच्यामध्यें जर सर्व भूतकालचें—एवढेंच नव्हे, तर भविष्यकालाचेंहि—ज्ञान सांठविलेलें आहे, व प्रो. भानू यांच्या प्रतिपादनाप्रमाणें गीतेमध्यें जर सर्व प्राच्य व प्रतीच्य तत्त्वज्ञानाचा सांगोपांग समावेश होतो, तर गीतेच्या प्रास्ताविक 'श्री'मध्येंहि असेंच कांहीं तरी अलौकिक सत्त्व असलें पाहिजे, या बुद्धीनें मी संशोधन करण्यास प्रारंभ केला आहे. गीतेच्या 'श्री'चें पठण मीं एक हजार एक वेळां केलें आहे व आणखीहि तितकेच वेळां करणार आहें व तसें केल्यानें आज ह्या श्रीच्या प्रतिपादनाच्या ज्या अनेक दृष्टि मला प्राप्त झाल्या आहेत, त्याच आणखीहि फैलावतील अशी मला आशा वाटते. हल्लीं मी या श्रीचा भौतिक शास्त्राच्या दृष्टीनें विचार करीत असतों."

गीताराव म्हणाला, "श्रीचा भौतिक अर्थ तो कसा काय?"

मी म्हणालों, "कसा तो पहा! प्रत्येक अक्षराला विशिष्ट प्रकारचा ध्वनि असतो, व प्रत्येक ध्वनीचा जड सृष्टीवर कांहीं वेगळाच परिणाम होत असतो. तसें नसतें तर सा रि ग म प ध नि या सप्तस्वरांच्या परिणामांत कांहींच फरक पडला नसता. सप्तस्वरांच्या अंगोपांगांचें एक स्वतंत्र शास्त्रच आहे.

प्रत्येक स्वराचा वर्ण, त्याचा गुरु, त्याची अधिष्ठात्री देवता, त्याची गाण्याची वेळ, तो गाण्याचें आसन, त्याचें ध्यान, त्याची मुद्रा, ओंकाराशीं त्या प्रत्येकाचा संबंध, ओंकाराचें त्या प्रत्येकांत प्रमाण, अशा शेंकडों गोष्टी विचार करण्यासारख्या असतात. विषयगत आणि विषयीगत असेहि या प्रत्येक स्वरांत भेद आहेत. उदाहरणार्थ, मुलानें उच्चारिलेल्या सारिगमचा परिणाम तरुणानें उच्चारिलेल्या सारिगमसारखा नाहीं. तसेंच स्त्रीनें म्हटलेलें सारिगम वेगळें व पुरुषानें म्हटलेलें वेगळें! पुन्हा पुरुषानें स्त्रीस उद्देशून म्हटलेलें सारिगम, स्त्रीनें पुरुषास उद्देशून म्हटलेलें सारिगम, आणि तेंच पुरुषानें पुरुषाला व स्त्रीनें स्त्रीला उद्देशून म्हटलेलें सारिगम यांच्या परिणामांत पुष्कळच फरक आहे. पुरुषांना स्त्रियांचें गाणें आवडतें तें याचमुळें. ध्यान, आसन वगैरेंचीहि गोष्ट अशीच आहे. मांडी मोडून वीरासनावर म्हटलेलें गाणें व वारकरी पीठावर उभें राहून म्हटलेलें गाणें हीं दोन्ही परिणाम दृष्टीनें वेगळीं. स्त्रियांनीं हातांत वीणा घेऊन केलेलें गायन व वीणा न घेतां म्हटलेलें गायन यांत फरक नाहीं, असें कोणीहि तज्ज्ञ म्हणणार नाहीं. या सर्व उपमानपरंपरेवरून हें अगदीं उघड होत नाहीं काय, कीं काव्य-नाटकास प्रारंभ करतांना म्हटलेली किंवा लिहिलेली श्री आणि गीताशास्त्रासारख्या आध्यात्मिक ग्रंथाच्या प्रारंभीं लिहिलेली किंवा म्हटलेली श्री यांचें स्वरूप अर्थात् वेगळें असलें पाहिजे?"

मी पुढें म्हणालों, "एका जर्मन प्रोफेसरानें असा नुकताच शोध लाविला आहे कीं, ज्या प्रकारची भावना मनांत धरून मनुष्य अक्षर उच्चारतो किंवा लिहितो त्या भावनेनुरूप उच्चाराच्या आंदोलनाची संख्या बदलते आणि त्या उच्चाराच्या लेखाच्या रेखारचनेंत फरक पडतो. मीं असा तर्क केला आहे कीं, नुसतें 'दे' हें साधें अक्षर घेतलें तर त्या उच्चाराच्या आंदोलनानें जें शब्दचित्र वायुपटावर उमटेल त्याचा आकार 'दे' या क्रियापदाच्या निरनिराळ्या कर्मांप्रमाणें बहुधा निरनिराळा असेल. म्हणजे 'बटलर, ब्रँडीचा ग्लास दे,' असें म्हणणाऱ्याच्या 'दे'चें शब्दचित्र दारूच्या ग्लासासारखेंच उमटेल. दारूच्या ग्लासाऐवजीं त्यानें मांसाचा तुकडा मागितला, तर ज्या पशूच्या किंवा पक्ष्याच्या मांसाचा तुकडा तो खाऊं इच्छितो, त्या पशूचें चित्र किंबहुना फोटोग्राफ मांसभक्षकाच्या 'दे'पासून निघाला पाहिजे. मुलानें आईला 'आंबा दे' म्हटलें तर 'दे' पासून आंब्याचें चित्र उठेल. असेंच इतर सर्व प्रकारांसंबंधानें समजावयाचें आहे. या सर्व विचाराला शब्दब्रह्माचा

किंवा अक्षरब्रह्माचा भौतिक विचार म्हणतात व तो मीं हल्लीं सुरू केला आहे. प्रो. जगदीशचंद्र बोस, लॉर्ड केलविन वगैरे शास्त्रज्ञांच्या ग्रंथांचें साहाय्य मला या कामीं पुष्कळ झालें आहे. गीतेच्या प्रारंभीं असलेल्या श्रीचें स्वरूप व अर्थ जो जसा पाहील तसा तो त्याला दिसेल. म्हणून म्हणतों कीं, गीताराव, गीताध्ययनाच्या यज्ञाचें अवभृथस्नान करण्याला तूं अद्यापि विश्रांतिकुंडांत उतरूं नकोस."

बिचाऱ्या गीतारावावर माझ्या या युक्तिवादाचा विशेष परिणाम झाला. गंभीरपणानें व श्रद्धायुक्त मनानें तो मान हालवून म्हणाला, "पहा, गीताशास्त्र अनंत आहे म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. तुझें हें सगळें विवेचन ऐकून मला बरेंहि वाटलें व वाईटहि वाटलें. बरें अशाकरितां कीं, ज्या भाविक-पणानें मी गीताशास्त्र वाचीत होतों तो दृढतर झाला, पण गीताशास्त्राचें सांगोपांग अध्ययन माझ्या या जन्मांत संपवीन असा जो मीं निश्चय केला होता तो फुकट जाणार म्हणून निराशा वाटते."

मी म्हणालों, "एका जन्मीं पुरता विचार करून आत्म्याचे चरित्राची परि-समाप्ति एका जन्मांत होते, असा क्षणभर जरी तुझ्या मनांत विचार आला असला तरी आश्चर्यच. कारण जें आत्म्याचें चरित्र गीतेंत सांगितलें आहे तें तुला कळलें नाहीं. अर्थात्, तुझा गीतेचा अभ्यास अपुराच झाला असें म्हणावें लागेल."

गीतारावाला असा मोह खरोखरच क्षणभर पडला होता. रिव्हर्सिंग स्टेशनावर गाडीचें तोंड उलट्या दिशेस झालें म्हणजे पुण्याहून मुंबईस जावयाचें सोडून फिरून आपण पुण्यासच परत जातों कीं काय, अशी जी. आय. पी.च्या प्रवाशाला क्षणभर भीति पडते. त्याप्रमाणें गीताशास्त्राच्या अध्ययनाच्या शेवटास आपण आलों अशी कल्पना आपण करीत असतां यानें फिरून आपणास मूळ पदावर नेऊन सोडलें, अशा विचारानें त्याचा चेहरा क्षणभर उदास झाला. कर्मोपदेश करणारी गीता वाचून जर ही निराशा टिकली तर आश्चर्यच म्हणावयाचें! पण तें आश्चर्य घडून आलेंच नाहीं. क्षणभर आलेला मोह झाडून टाकून 'करिष्ये वचनं तव' या गीताशब्दांनीं मला उत्तर देऊन, गीतारावानें माझ्या टेबलावरील चाकू घेतला व त्रिगुणसूचक आपल्या तीन पेन्सिली खूप तासून शस्त्राप्रमाणें त्यांचीं टोकें तीक्ष्ण केलीं. तेव्हां मीं मनांत म्हटलें, 'हा मात्र गीतेचा भक्त खरा.' युक्तायुक्तता न पाहतां केवळ सहज

असणाऱ्या कर्माप्रमाणें हा गीताभक्त फिरून गीतावाचनास सिद्ध झाला. अर्थात् याला पुढें मुक्ति मिळाल्याशिवाय राहणार नाहींच. या वेळीं जर एखादा दिव्यदृष्टि आलेला थिऑसफिस्ट येथें असता, तर त्यास गीतोपदेशाच्या अखेर हातांत धनुष्यबाण घेऊन सज्ज झालेल्या अर्जुनाच्या चेहऱ्याभोंवतीं जशा प्रकारचें प्रकाशवर्तुळ पूर्वीं दिसलें असेल तसेंच प्रकाशवर्तुळ गीतारावाच्या चेहऱ्याभोंवतीं दिसलें असतें, यांत मला तर शंका वाटत नाहीं.

भाविकपणा असावा तर असाच असावा.

२ सामाजिक चालीरीतींचा फरक

नित्यक्रमाप्रमाणें बाळंभटजी फराळ करून परवां रात्रीं येऊन माझ्या अंगणांतील बैठकीवर जेठा मारून बसले. विडा खाऊन झाल्यावर तोंडांत तंबाखूची चिमूट टाकतां टाकतां त्यांना कसली आठवण झाली कोणास ठाऊक, पण ते खुदकन् ऐकूं येण्यासारखे मोठ्यानें हसले.

मी म्हणालों, " कां भटजी, तुम्हांला हसायलासें आलें ? "

त्यावर तोंडांतील तंबाखूचा चेंदामेंदा करून भटजी म्हणाले, " हो बुवा, हसायला आलें खरें. पण मी आज पाहिला तो चमत्कार तुम्हीं पाहिला असतात म्हणजे तुम्हालाहि हसायला आलें असतें, अशी माझी खात्री आहे."

मी म्हणालों, " हसायला येण्यासारखे चमत्कार आपण सर्वच केंव्हां केंव्हां पाहतों खरे; पण तुम्हीं पाहिला तो चमत्कार कसला तो तर सांगाल ? "

भटजी म्हणाले, " आज तिसरे प्रहरीं मी देवदर्शनाला निघालों, तेंव्हां लकडीपुलाकडे तांग्यांवर तांगे व गाड्यांवर गाड्या जात होत्या."

इतकें म्हणून बोलण्याच्या पुढील तयारीकरितां त्यांनीं तोंडभर जीभ फिरवून पानसुपारीचे जे कण चिरडण्याच्या भीतीनें कानाकोपऱ्यांत लपून, दडून बसले होते त्यांना खेंचून बाहेर काढलें.

मीं म्हटलें, "हाच का चमत्कार? हा चमत्कार बहुधा रोजच दृष्टीस पडतो."

भटजी म्हणाले, " तसें नव्हे हो. सर्व ऐकून तर घ्याल ! तांगे, गाड्या पुष्कळशा जात होत्या यांत कांहीं विशेष नाहीं. पण त्यांत एक उघडी गाडी

जात होती त्यांतल्या माणसांकडे पाहून मला तेव्हां हसूं आलें, आणि आतांहि त्याची आठवण झाली म्हणून फिरून हसूं आलें."

मी म्हणालों, "अजून चमत्कार तो पुढेंच असला पाहिजे. कारण उघड्या गाडींत मनुष्यें बसलीं होतीं यांत हसूं येण्यासारखें तें काय आहे ?"

भटजी म्हणाले, "तुम्ही तर बुवा फारच उतावळे ! अहो, उघड्या गाडींत कोण होतें माहीत आहे का ? आमचे ते खुशालराव बोभाटे आणि त्यांच्या पत्नी म्हाळसाबाई. पण तुम्ही म्हणाल, या नवराबायकोंना तुम्हीं पूर्वी पाहिलें नव्हतें का ? हो, पाहिलें होतें. त्यांच्या मुलांच्या मुंजीच्या वेळीं पुण्याहवाचनाला हीं नवराबायको अशींच शेजारींशेजारीं बसलेलीं मीं पाहिलीं होतीं. आणि याज्ञिक चालवावयाला जवळच मी हातावर बसलों होतों. पण तेव्हांचें तें रूप व तो पोषाख कोणीकडे आणि आज गाडींत पाहिलें तें रूप व तो पोषाख कोणीकडे ? घरीं पाहिलें तों कपाळ भस्मानें भरलेलें, शेंडींत रुद्राक्ष घातलेला, भोंगळ पीतांबर मधून मधून सुटतो आहे, आणि प्रायश्चित्तार्थ पंचगव्याचीं आचमनांवर आचमनें घेत आहेत, असें होतें नवऱ्याचें स्वरूप आणि बायकोकडे पहावें, तों काय सांगूं ? नुसता अंबाबाईचा अवतार!"

मीं म्हटलें, "तो कसा काय तो सांगा तर खरें."

भटजी म्हणाले, "अहो, त्यांत काय सांगावयाचें ? कपाळावर कुंकवाचा मळवट, नाकांत नथेचें सुंकलें, पिशव्यांसारख्या अस्तन्यांची कोपरभर चोळी, झोळण्यासारखें लोंबतें अठरा हात लुगडें, आणि हातभरून कोपरापर्यंत बांगड्या !"

मी म्हणालों, "हं, आतां थोडें थोडें माझ्या लक्षांत आलें खरें. उघड्या गाडींतून हें जोडपें जर आज लकडीपुलाकडे जातांना पाहिलें असलें, तर असले पोषाख कांहीं त्यांच्या अंगावर नसतील. आजचे पोषाख कांहीं निराळेच, म्हणजे तुमच्या डोळ्यांना कधीं न दिसणारे असतील म्हणून तुम्हांला हसूं आलें तें ठीकच."

भटजी म्हणाले, "पण तुम्हांला हें कसें कळलें ?"

मी म्हणालों, "मला कर्णपिशाचानें सांगितलें त्याचें तुम्हांला काय ? मी न बघतांना त्यांच्या पोषाखाचें वर्णन करूं का ? भटजी, तुम्हांला माहीत नाहीं. आज गणेशखिंडींत सरकारी बंगल्यांत गार्डन-पार्टी होती म्हणून हें जोडपें

तिकडे जात असावें. तेव्हां अशा वेळचा त्यांचा पोषाख कसा असेल याची कल्पना तें न पाहतांहि होते."

भटजी म्हणाले, "होते तर करा पाहूं?"

मी म्हणालों, "ऐका. खुशालरावांनीं अगदीं ताजी ताजी श्मश्रु केलेली होती. मिशा कोरलेल्या होत्या. अंगांत काळा कोट, पायांत काळी विजार, व करकरीत काळा बूट, डोक्याला झुळमुळ्यांची रेशमी पगडी, अंगावर धुवट जरीकांठी धोतराची घडी, गळ्यांत पांढऱ्या कडकडीत सदऱ्यावर रेशमी पट्टीचा गळफांस आणि कपाळावर गूळ घालून तुकतुकीत केलेल्या तांबड्या गंधाची टिकली! कां, आहे बरोबर? पण तुम्हांला जें हसूं आलें तें याहि पोषाखानें नसेल, तर तुमच्या अंबाबाईची सब्जपरी बनलेली पाहून!"

मला उत्तर न देतां भटजी नुसते खो, खो, खो हसत होते.

मी पुढें म्हणालों, "म्हाळसाबाईचा पोषाख कसा होता तें मी सांगतों. चापून चोपून नेसलेलें जरीकांठी पातळ, अंगावर बुट्टेदार शाल, अगदीं ताजी ताजी वेणी घालून वेणींत खोवलेलीं ताजीं फुलें, सर्व अंगभर जेथें जेथें म्हणून घालतां येतील तेथें तेथें दागिने, डोक्यांत रेखीव भांग, कपाळावर दिसे न दिसे इतकी बारीक कुंकवाची टिकली, हातांत रेशमी रुमालाची घडी. पण हसण्याचें याहून मुख्य कारण म्हणजे पायांत पायमोजे आणि बूट! कां बोला, वर्णन बरोबर आहे कीं नाहीं?"

हें ऐकतांच भटजी पुन्हा पोट धरून खो, खो हसायला लागले, आणि म्हणाले, "पंत, तुम्हीं तर बुवा खूप केलीत. मीं डोळ्यांनीं पाहिलें त्यापेक्षां तुम्हीं न पाहतांच अधिक पाहिलें. वर्णन अगदीं ततोतंत बरोबर झालें. पण काय हो, पोषाखाच्या ऐटीसारखी त्यांच्या मनाची कांहीं ऐट दिसत नव्हती. दोघेंहि अशीं खुडकून बसलीं होतीं कीं, सगळ्या अंगभर त्यांना कोणी कांटेलगामच घातले होते कीं काय! हात हालत नाहींत, पाय हालत नाहींत. जशीं काय रेखीव चित्रें. पण इतकेंहि करून अंगांतला पिळपिळीतपणा तर तसाच. चेहरे तर काय, एखाद्यानें त्यांस मारावयास काढल्याप्रमाणें पडके व उदास!"

मी म्हणालों, "भटजी, हें तुमचें वर्णन मात्र चुकलें. अहो, चेहऱ्यावर उदासपणा कसा वाटेल? अशा सन्मानाचा प्रसंग वर्षांतून एक वेळ येतो. खरोखर मनांतून अशा वेळीं खूप आनंदच असतो, पण अपरिचित पोषाख

मुद्दाम एक दिवस करावयाचा, त्यानें गांगरल्यासारखें वाटतें आणि गणेशखिंडींत गेल्यावर साहेबलोकांच्या डोळ्यांपुढें फिरतांना कांहीं चुकेल-घसरेल कीं काय, या भीतीनें त्यांना अर्धमेलें झाल्यासारखें वाटत असेल, आणि म्हणून तोंडावर ही गंभीरपणाची मुद्रा--इतकेंच काय तें."

भटजी म्हणाले, "गणेशखिंडींत जायचें तर जावें, पण असला पोषाख कशास करावा?"

मी म्हणालों, "आधीं जावेंच कशाला, असें हवें तर म्हणा; पण जोडप्यानें साहेबलोकांत जावयाचें तर असल्या पोषाखाशिवाय सुटका नाहीं त्याला तुम्हीं व मी काय करणार; व हें जोडपें तरी काय करणार? जेथें जायचें तेथली रीतभात पाळलीच पाहिजे."

भटजी म्हणाले, "म्हणतां काय? साहेब लोक झाले तरी माणसेंच कीं नाहीं? माणसामाणसांत इतकी वेगळी रीतभात कोठून येणार?"

मी म्हणालों, "अहो, माणूस तेवढें येथूनतेथून सारखेंच खरें, पण फरक पडतो तो सर्व रीतीभातीमुळेंच. तुम्हीआम्ही वैदिक व गृहस्थ, एकाच समाजांतले कीं नाहीं? तुमची आमची तरी रीतभात एक कोठें आहे? तुमचें वळण वेगळें, आमचें वेगळें. मग साहेबलोक तर काय बोलूनचालून परदेशांतले. तेव्हां त्यांची व आमची रीतभात वेगळी असावी यांत नवल नाहीं."

भटजी म्हणाले, "तुम्ही काय म्हणतां याची आपणास कल्पनाच होत नाहीं. रीतभात वेगळी झाली तरी किती वेगळी असणार? साहेबलोकांत झालें तरी आम्हांस लोकविलक्षण वाटेल असें काय असतें तें सांगा तर पाहूं?"

मी म्हणालों, "सांगेन, पण थोडक्यांत सांगतां येणार नाहीं. जरासें लांबड लावून सांगावें लागेल. पण मग तें तुम्हांला चांगलें पटेल. ऐका तर, सांगतों. पण साहेबलोकांचीं नांवें न घालतां इकडचीं नांवें घालतों आणि तिकडल्या रीतीभातीचें वर्णन करतों, म्हणजे तुमच्या बरोबर लक्षांत येईल."

भटजी म्हणाले, "सांगाच तर, ऐकूं द्या मला कसें काय तें!"

मी म्हणालों, "इकडचीं नांवें घालून मी बोलणार आहें, संभाळा—"

* * *

रामचंद्रराव आपल्या अभ्यासाच्या खोलींत काम करीत बसले होते. त्यांची मुलगी वेणू बंगल्याच्या व्हरांड्याच्या तोंडीं खुर्चीवर हातांत विणकाम घेऊन बसली होती व तिच्या पायाशीं कुत्रें खेळत होतें.

मुद्दाम एक दिवस करावयाचा, त्यानें गांगरल्यासारखें वाटतें आणि गणेश-खिंडींत गेल्यावर साहेबलोकांच्या डोळ्यांपुढें फिरतांना कांहीं चुकेल-घसरेल कीं काय, या भीतीनें त्यांना अर्धमेलें झाल्यासारखें वाटत असेल, आणि म्हणून तोंडावर ही गंभीरपणाची मुद्रा--इतकेंच काय तें."

भटजी म्हणाले, "गणेशखिंडींत जायचें तर जावें, पण असला पोषाख कशास करावा ?"

मी म्हणालों, "आधीं जावेंच कशाला, असें हवें तर म्हणा; पण जोडप्यानें साहेबलोकांत जावयाचें तर असल्या पोषाखाशिवाय सुटका नाहीं त्याला तुम्हीं व मी काय करणार; व हें जोडपें तरी काय करणार ? जेथें जायचें तेथली रीतभात पाळलीच पाहिजे."

भटजी म्हणाले, "म्हणतां काय ? साहेब लोक झाले तरी माणसेंच कीं नाहीं ? माणसामाणसांत इतकी वेगळी रीतभात कोठून येणार ?"

मी म्हणालों, "अहो, माणूस तेवढें येथूनतेथून सारखेंच खरें, पण फरक पडतो तो सर्व रीतीभातीमुळेंच. तुम्हीआम्ही वैदिक व गृहस्थ, एकाच समाजांतले कीं नाहीं ? तुमची आमची तरी रीतभात एक कोठें आहे ? तुमचें वळण वेगळें, आमचें वेगळें. मग साहेबलोक तर काय बोलूनचालून परदेशांतले. तेव्हां त्यांची व आमची रीतभात वेगळी असावी यांत नवल नाहीं."

भटजी म्हणाले, "तुम्ही काय म्हणतां याची आपणास कल्पनाच होत नाहीं. रीतभात वेगळी झाली तरी किती वेगळी असणार ? साहेबलोकांत झालें तरी आम्हांस लोकविलक्षण वाटेल असें काय असतें तें सांगा तर पाहूं ?"

मी म्हणालों, "सांगेन, पण थोडक्यांत सांगतां येणार नाहीं. जरासें लांबड लावून सांगावें लागेल. पण मग तें तुम्हांला चांगलें पटेल. ऐका तर, सांगतों. पण साहेबलोकांचीं नांवें न घालतां इकडचीं नांव घालतों आणि तिकडल्या रीतीभातीचें वर्णन करतों, म्हणजे तुमच्या बरोबर लक्षांत येईल."

भटजी म्हणाले, "सांगाच तर, ऐकूं द्या मला कसें काय तें !"

मी म्हणालों, "इकडचीं नांवें घालून मी बोलणार आहें, संभाळा—"

* * *

रामचंद्रराव आपल्या अभ्यासाच्या खोलींत काम करीत बसले होते. त्यांची मुलगी वेणू बंगल्याच्या व्हरांड्याच्या तोंडीं खुर्चीवर हातांत विणकाम घेऊन बसली होती व तिच्या पायाशीं कुत्रें खेळत होतें.

भटजी म्हणाले, "बायका अशा 'माझा नवरा' म्हणतात वाटतें ?"

"तेव्हां इतक्यांत वेणूचा बाप रामचंद्रपंत बाहेर आला व सितारामपंत यांनीं एकमेकांचे हात हालवून वेणूसह सर्व मंडळी दिवाणखान्यांत गेली व शेजारीं शेजारीं खुर्च्यांवर बसली. रामचंद्रपंत म्हणाले, 'वेणू, सितारामपंतांना तुझें गाणें ऐकावयाचें आहे. परवां मी तुला बसवून दिलेलें पद यांना म्हणून दाखव पाहूं?' तेव्हां वेणू बाजाच्या पेटीवर बसून वाजवून गाऊं लागली व सितारामपंत हातांत गाण्याचें पुस्तक घेऊन तिच्या शेजारीं उभे राहिले. इतक्यांत आंतून फराळाची वर्दी आली. तेव्हा रामचंद्रपंत 'मी पुढें होतों' असें म्हणून गेले व सितारामपंतांनीं वेणूचा हात आपल्या काखेंत धरून तीं दोघेंहि आंतल्या दालनांत जाऊन मोठ्या टेबलासमोर खुर्चीवर जाऊन फराळास बसलीं. आचारी बशांतून पदार्थ आणून देत होता व वेणू त्यांतील जिन्नस उचलून आपल्या व सितारामपंतांच्या पानांत घाली. जेवण झाल्यावर टेबलावर ग्लासांतील पाण्यांत हात धुऊन हातरुमालानें पुसून मंडळी उठून बाहेर गेली. रामचंद्रराव म्हणाले, 'सितारामपंत आमच्या येथें आजच्या दिवस राहाण्यासच आले आहेत. तेव्हां कंटाळा येणार नाहीं, करमणूक वाटेल, हें पाहाणें तुझें काम आहे."

भटजी म्हणाले, "ठीक! पाहुण्या पुरुषांची करमणूक घरच्या बायकांनीं करायची? खासा रोजगार!"

"वेणू म्हणाली, 'होय, बाबा.' रामचंद्रराव आपलें काम करण्याला निघून गेले. वेणू सीतारामपंतांना म्हणाली, 'चला आपण बागेंत जाऊं. आम्हीं नवीन लावलेलीं झाडें तुम्हांला दाखवितें.' मग त्या दोघांनीं बागेंत अर्धा तास घालविला व परत व्हरांड्यांत येतात तोंच वेणूचा नवरा सदाशिवराव व वेणूची आई दोघें बाजारांत गेलीं होतीं तीं परत आलीं. वेणू नवऱ्यास म्हणाली, 'सदाशिव'—"

भटजी म्हणाले, "ही नवऱ्याला हाक मारून बोलली वाटतें!"

मी संथपणें म्हणालों, "होय. स्वस्थपणें ऐका."

"वेणू म्हणाली, 'हा बघ, सदाशिव, तुझा मित्र तुझीच वाट पाहात आहे. मीं त्यास बागेंत अर्धा तासपर्यंत फुलझाडें दाखविलीं, म्हणून त्याची करमणूक तरी झाली.' सदाशिवराव म्हणाला, 'तूं ठीक केलेंस. आम्हांला बाहेरून येण्याला वेळ लागला नसता, पण सासूबाईंना घेऊन बऱ्या चांभाराच्या

दुकानीं नवीन जोडा सांगण्यास गेलों होतों, म्हणून जरा उशीर लागला. तितक्यांत एक भटारीण चांगलींशीं अंडीं घेऊन विकावयास बसली होती तींहि थोडीं घेतलीं. आणि कोंबडीचा रस्सा उत्तम करणाऱ्या आचाऱ्याचे दुकानीं जाऊन आम्हांस थोडासा पाठवून दे म्हणून सांगण्यास थोडा बाजूस वळलों होतों."

बाळंभटजी उतावळेपणानें नाकास पदर लावून म्हणाले, 'ऊं:! अब्रह्मण्यं !' हें काय ?"

मी म्हणालों, " वः भटजी, नुसत्या शब्दाची तुम्हाला घाण आली वाटतें. अहो, ह्या गोष्टी मी बनावट सांगतों हें विसरलांत वाटतें ?"

भटजी म्हणाले, " बनावट गोष्ट झाली म्हणून काय झालें ? मघांपासून तुम्ही सांगतां तरी काय काय ? मुलीच्या मांडीवर कुत्रें खेळतें काय ! ती परक्या पुरुषाच्या हातांत हात देते काय ! बागेंत अर्धा तास तीं दोघें फुलझाडें पाहतात काय ! बायको नवऱ्याला अरेतुरे म्हणते काय ! सासू व जांवई मिळून चांभाराकडे जातात काय व येतांना अंडीं आणतात काय ! ही काय रीत झाली ? "

मी म्हणालों, " अगदीं बरोबर, रीतच. पूर्ण संभावित घराण्यांतल्या नित्यक्रमापैकीं लहानसा भाग सांगतों आहे. तुमच्या परिचयाचीं नांवें सांगितलीं म्हणून घाबरूं नका, हें पूर्वींच तुम्हांला सांगितलें आहे."

मी पुढें आणखी म्हणालों, " ऐका. संध्याकाळीं वेणू व तिचा नवरा आपल्या घरीं परत जाण्यास निघालीं. तेव्हां रामचंद्रपंतांनीं वेणूच्या कपाळाचें चुंबन घेतलें; आणि सर्वांनीं एकमेकांच्या हातांत हात घालून हात हालविले."

इतकें बोलून मी म्हणालों, " भटजी, तुम्हांस दुसरा एक प्रसंग सांगतों. परवां गंभीररावांच्या घरीं नुकताच पाहुणेमंडळींना जेवण व नाच देण्यांत आला त्याचें वर्णन दुसरे दिवसाच्या वर्तमानपत्रांत खालीलप्रमाणें आलें होतें:—

'बरोबर ९॥ वाजतां पाहुणेमंडळी जमूं लागली. गंभीरराव व त्यांची बायको चंपाबाई पडवींत उभी राहून मंडळींचें स्वागत करीत होतीं. गंभीर-रावांनीं कोटपाटलोणीसह पोषाक केला होता, पण ते बोडकेच उभे होते. त्यांनीं कोटाच्या गुंड्या न घातल्यामुळें त्यांच्या खडखडीत सदऱ्याचा सर्व भाग दिसत होता. चंपाबाईनीं रेशमी पायघोळ झगा घातला होता. मात्र

निम्या दंडापासून सगळे हात व छातीचा निम्मा भाग हे उघडे होते. त्यांनीं अर्धचंद्राकृति चोळी घातली होती व पाठीच्या बाजूलाहि अर्धचंद्रच होता.' "

भटजी म्हणाले, " भलतेंच! असें का कोठें असतें? चोळीचा अर्धचंद्र म्हणजे काय?"

मी म्हणालों, " सांगतों यांत एक अक्षरहि खोटें नाहीं. मुकाट्यानें ऐकून घ्या. 'थोड्या वेळांत सर्व पाहुणेमंडळी जोड्या-जोड्यानें येऊन दाखल झाली. घराच्या मधल्या दिवाणखान्यांत रोषणाईचा लखलखाट केला होता. जमीन लांकडी असून तुळतुळीत केली होती. पाहुण्या स्त्रिया फारच सुंदर दिसत होत्या. सौ. यमुनाबाई या उत्तम चंद्रकळा नेसल्या असून तिजवर मोती गुंफले होते. अंगांत चोळी निळी जरीकांठी होती. सौ. चिमाबाई या अस्मानी रंगाचा बुट्टेदार शालू नेसल्या होत्या व त्यांनीं अस्मानी रंगाचीच चोळी घातली होती. सौ. ठमाबाई यांचाहि पोषाख फार उंची असून या तरुण स्त्रीचा चेहरा फार सतेज दिसत होता.' "

भटजी म्हणाले, " बस करा तुमचें वर्णन. हा काय वर्तमानपत्राच्या बातमीदाराचा संभावितपणा? खाजगी घरांत जाऊन संभावित बायकांना तरुण सुंदरी म्हणणें, त्यांचीं लुगडीं-चोळ्या बारीक नजरेनें टेहाळून, त्यांचे रंग सांगणें, ही काय रीत झाली? आपले इकडेसुद्धां अक्षतीचे वेळीं किंवा महालक्ष्मीचे प्रसंगीं स्त्रीपुरुष एकत्र दिसतात. म्हणून आपल्यांतले कोणी असें बोलेल काय अगर असें वर्णन करील काय? माझ्यासमोर असला कोणी चारगटपणा करूं द्या, कीं मी लगेच त्याच्या तोंडांतच भडकावीन."

मी म्हणालों, " भटजी, मी खरेंच सांगतों. यांत चारगटपणा नाहीं. कोणत्याहि जाफतीच्या प्रसंगाचें वगैरे असेंच वर्णन येतें. पण पुढें ऐका. 'दहाचा ठोका पडल्याबरोबर पाहुण्यांपैकीं विश्वासराव हे पुढें येऊन त्यांनीं गणपतरावांचें कुटुंब चंपाताई यांना आपल्याबरोबर नाचण्यास येण्याची विनंति केली व ती मान्य करून चंपाताईंनीं आपला हात विश्वासरावाचे हातीं दिला.' "

भटजी दांतओठ खाऊन हात झाडीत म्हणाले, " आणि तो दळ्या नवरा होता ना जवळ?"

मी म्हणालों, " अहो होय, होता. पण त्यानें स्वतः काय केलें हें मी सांगणारच आहें. 'विश्वासराव व चंपाताई नाचत नाचत घिरट्या घालूं लागलीं. इतक्यांत गंभीरराव यांनीं विश्वासरावांची पत्नी सौ. सुंदराबाई

यांसहि आपल्याबरोबर नाचण्यास येण्याची विनंति केली व पहिल्या जोडप्या-प्रमाणें हेंहि जोडपें नाचूं लागलें. त्यानंतर क्रमानें पाहुण्यामंडळीपैकीं प्रत्येक पुरुषानें एकेका स्त्रीस पसंत करून जोड्याजोड्यांनीं सर्वजण नाचले. मात्र एक गोष्ट लक्षांत ठेवा कीं, नवरा आणि त्याचीच बायको अशा जोडयानें कोणीच नाचलें नाहीं.' "

भटजी म्हणाले, " कशाला नाचतील ! परपुरुषाबरोबर नाचण्याची शपथच बायकांनीं घेतली, मग घरचें दंपत्य कसलें जुळणार ? "

मी म्हणालों, " रागावूं नका. तुमच्या दृष्टीनें सगळा भ्रष्टाकार झाला हें मी जाणतों. पण फिरून सांगतों कीं संभावित, नीतिमान् व धर्मभीरु अशा युरोपियन व्यक्तींचीच चालरीत मी तुम्हांला सांगतों आहें. यांत अतिशयोक्ति किंवा थट्टा मुळींच नाहीं. अहो, हा फक्त सामाजिक चालरीतींचा फरक ! "

३ माझी आगगाडी कशी चुकली ?

आमच्यामध्यें आग्रहाची एक चाल मोठी वाईट आहे. पाहुणचार हा गुण खरा, पण फाजील पाहुणचार हा अवगुण असून तो संतोषापेक्षां असंतोषालाच अधिक वेळां कारण होतो. पाहुणचार, याचा अर्थ पाहुण्याचा संतोष. पण जी गोष्ट पाहुण्याला नको किंवा जी गोष्ट त्याला गैरसोईची असेल ती त्याचेवर लादणें, हा मार्ग पाहुणचाराच्या अगदीं उलट्या दिशेचा होय. पण दुर्दैवानें आदरातिथ्याच्या भरांत आम्ही ही साधी गोष्ट विसरून जातों. त्याचा परिणाम कित्येक वेळां खरोखर असा होतो कीं, पाहुणा घरून जातांना गोड तोंडानें व धन्यवाद गात जावा तो, आंबट तोंड करून व प्रत्यक्ष शिव्या-शाप देत नसला तरी, मनांतल्या मनांत निंदा करीत जातो.

कांहीं दिवसांपूर्वी लोणावळें स्टेशनापासून सुमारें चार मैलांवर असलेल्या एका गांवीं कांहीं कामाकरितां जाण्याचा मला प्रसंग आला होता. ज्यांच्या-कडे मी गेलों ते गृहस्थ माझ्या वडिलांच्या जुन्या ओळखीचे असून त्यांचा व आमचा विशेष घरोबा होता. त्यांच्या गांवीं मी पुष्कळ वर्षांत न गेल्यामुळें या माझ्या भेटीला एक प्रकारचें महत्त्व होतें, व मी तेथें गेल्यावर माझा

चांगला पाहुणचार होणार अशी माझी अपेक्षा होती. पण दुर्दैवानें तेथें चार दिवस स्वस्थ राहून पाहुणचार झोडण्याइतका मला वेळ नव्हता. मला सोमवारीं सकाळच्या मेलनें मुंबईस जावयाचें असून रविवारची रात्र तेवढी या गांवीं मला काढतां येण्यासारखी होती. सकाळच्या मेलनें मी पुढें जाण्याचें कारण असें कीं, त्या दिवशीं दोन प्रहरीं माझा एक स्नेही एका फ्रेंच बोटीनें विलायतेस जाणार होता; व तो जातांना त्याची माझी गांठ पडण्यावर त्याचें व माझें शेंकडों रुपयांचें नफा-नुकसान अवलंबून होतें. त्या काळीं पुण्याची मेल सकाळीं लोणावळ्याहून सव्वानऊ वाजतां सुटत असे, तिनें मी गेलों तर बोट सुटण्याच्या आधीं दीड तास मी मुंबईस पोंहोंचावयाचा, आणि ती गाडी चुकली तर पुढें चार तास गाडी नाहीं व बोटीनें जाणाऱ्या मित्रास भेटणें मुळींच शक्य नाहीं अशी स्थिति होती. या गांवीं लोणावळयाहून जाण्यायेण्याचा रस्ता भातखांचरांतून असून त्यावरून गाडी जाई, पण मोठ्या कष्टानें; आणि बैल चांगले व हाकणारा चांगला असें असलें तर या चार मैलांच्या प्रवासास कमींत कमी सव्वा तास लागेल असें होतें.

असो. सदर गांवीं मी रविवारीं रात्रीं पोंचलों. रात्रीचा पाहुणचार तर यथास्थित झालाच. पण रात्रीची गोष्ट आपल्या हातची, तास अर्धा तास जागरण अरतेंपरतें इतकेंच, असें समजून मीं तो पाहुणचार आमचे यजमान दादासाहेब यांच्या इच्छेप्रमाणें सर्व घेतला. अखेर गाण्या-बजावण्याशिवाय सर्व पाहुणचार फुकट, अशी कल्पना येऊन दादासाहेबांनीं गांवांत चांगला गाणारा एक असा मानला गेलेला एक गृहस्थ होता त्याला बोलावण्याचा घाट घातला.

मी म्हणालों, "उगाच तसदी कशाला घेतां ? दहा साडेदहा वाजण्याचा सुमार आहे व जेवणहि यथेच्छ झाल्यामुळें मला झोप येत आहे. शिवाय सकाळींहि मला लवकर उठलेंच पाहिजे. म्हणून मला वाटतें आतां झोपीं गेलेलें बरें !"

यावर दादासाहेब म्हणतात, "छेः, असें कुठें झालें आहे कीं काय ? तुम्ही शहरचे राहणार. तुम्हांला रहिमतखान, बंदेअल्ली असल्या गवय्याबजवय्यांचीं गाणीं बजावणीं ऐकण्याची सवय. तुम्हांला आमच्या खेडेगांवचें गाणें कसलें पसंत पडतें म्हणा ! पण खेडेगांवचा मासलाहि तुम्हांला दाखविलाच पाहिजे."

जवळच्या मंडळींनींहि त्यांच्या म्हणण्याची री ओढली व गाण्याच्या बैठकीच्या तयारीस प्रारंभ झाला. खेडेगांवांतली गाण्याची तयारी म्हणजे संन्याशाच्या लग्नाला जशी शेंडीपासून तयारी तशी. गाणें खेडेगांवचें, पण तें साथीशिवाय कसें होणार ? तंबोरा पाहिजे, तो आणण्यास एक गेला. गांवच्या गुरवाकडे तबला खचित असावा असें अनुमान करून दुसऱ्यास तिकडे धाडण्यांत आलें. मुख्य गवयीबुवा त्या रात्रीं गांवांत आहे असें कोणी म्हणे तर कोणाचा समज असा होता कीं, ते संध्याकाळींच परगांवीं कामास निघून गेले असावेत. तथापि, त्यांच्याहि शोधाला मनुष्य धाडण्यात आला.

अशा रीतीनें चहूंकडे मनुष्यें शोधाला गेलीं व सुमारें पंधरावीस मिनिटेंपर्यंत कोणी आलें नाहीं असें पाहून, मला मनांत एकप्रकारें आनंदच झाला. मी मनांत म्हणालों, "बहुधा गाण्याचा प्रसंग टळला असें दिसतें." पण वरउपचारी म्हणालों, "खेडेगांवचें गाणें झालें म्हणून काय झालें ? एखादा गवयी चांगला असतो. मधुर गळा असला म्हणजे, गाण्याची बहुतेक गोडी त्यांत आलीच ! पण आतां उशीर झाला आहे. अकरा वाजायला आले, तेव्हां आतां निजावें हेंच बरें."

दादासाहेब म्हणाले, "छेः छेः, असें कुठें झालें आहे कीं काय ? आमच्या तिंबूबुवांचें गाणें तर ऐका. तो एका मुसलमान वस्तादाजवळ दोनतीन वर्षें चिलीम भरून देत होता. मग गाणें आल्याशिवाय त्याला कसें राहील ? शेण जमिनीवर पडेल तर थोडी तरी माती घेऊन उठेलच ! आतां गुरूच्या संगतीनें हे बुवाहि थोडेसे तऱ्हेवाईक झाले आहेत खरे. त्यांची तार लागेल तरच ते एखादी चीज म्हणतील, नाहीं तर प्राण गेल्यानें आ म्हणून करणार नाहींत. पण—"

इतक्यांत तंबोरा आणण्यास गेलेला मनुष्य परत आला व म्हणाला, "सदूदादाकडून काल त्या अंबाजीनें तंबोरा नेला तो तिकडेच आहे."

दादासाहेब म्हणाले, "अरे, मग हात हालवीत काय आलास ? धांव मार ! जायला फार तर अर्धी घटका व यायला अर्धी घटका. अंबाजीचें घर काय असें चार कोस थोडेंच आहे ! जवळच्या वाडींत तर राहतो. जा जा, घेऊन ये."

हें ऐकून तो मनुष्य कांकूं करीत निघून गेला.

मीं म्हटलें, " दादासाहेब, राहींना का? उगाच कशाला त्याला हेलपाटा देतां?"

ते म्हणाले, " अहो, हीं आमचीं खेडेगांवचीं माणसें म्हणजे अशींच चुकार-तट्टू. त्यांना असे हेलपाटेच दिले पाहिजेत."

इतक्यांत गुरवाकडला मनुष्य येऊन सांगूं लागला कीं, " गुरव जेवत बसला आहे. तो म्हणतो तबल्याच्या वाद्या तुटल्या आहेत, पण जरा दम धराल तर त्या गांठून आणि ठोकळे बडवून देईन."

मी घड्याळाकडे पाहून म्हणालों, " जाऊं दे कीं, तशाला इतका त्रास!"

दादासाहेब म्हणाले, " छेः, असें करून कसें चालेल? तुम्ही आज एक दिवस आला, पण इथल्या लोकांशीं आमची नित्य गांठ. जेव्हांच्या तेव्हां या लोकांकडून काम चापून घेतलें तर बरें, नाहीं तर हे उरावर बसलेच!"

मी मनांत म्हणालों, " हा माझा पाहुणचार, कीं दादासाहेबांच्या अमल-बजावणीची परीक्षा?"

दादासाहेब आढ्यतेनें म्हणाले, " जा, गुरवाला सांग, क्षणभर लागला तरी हरकत नाहीं, पण म्हणावें तबला दुरुस्त होऊन आलाच पाहिजे."

अकरा वाजून दहा मिनिटें झालीं. इतक्यांत गवयीबुवाकडे गेलेला मनुष्य आला. तो म्हणाला, " तिंबूबुवा गांवांत घरींच आहेत; गांवाला गेले नाहींत. पण म्हणतात, आमांश झाल्यामुळें आज रेचक घेतलें होतें. तब्येत बरी नाहीं, त्यांतूनहि आज्ञा होईलच तर थोड्या वेळांत येतों."

दादासाहेब म्हणाले, " हेंच तें. म्हटल्याबरोबर कोणी येईल तर शपथ! पण यांना एकदां सैल सोडलें कीं, हे बसलेच उरावर. तें कांहीं नाहीं, तूं परत जा आणि तिंबूबुवांना म्हण कीं, 'असाल तसे या.' तेथें तुम्हांला औषध मिळेल. चार पदें म्हणून जा म्हणजे झालें."

झालें. तंबोरा, तबला व गवयी यांचा अशा रीतीनें अजून ठिकाण नाहीं व मला तर चांगलीच झोप येऊं लागली. तरी मला निजूं देण्याची बुद्धि दादासाहेबांस होई ना. गवयी नाहीं तर नाहीं, गवयांच्या गोष्टी सांगितल्यानें तरी माझा संगीत पाहुणचार होणार असें वाटून कीं काय, त्यांनीं मला तिंबू-बुवांच्या एकेक गोष्टी सांगण्यास आरंभ केला.

मी इकडे पेंगत होतों. मधून मधून घड्याळ काढून पाहात होतों व चूळ भरून टाकून डोळ्यांना पाणी लावीत होतों; पण कांहीं केल्या दादासाहेबांना

माझी दया येई ना. तिंबूबुवाला गाण्याची आवड प्रथम कोणी लाविली; त्याची आणि त्याच्या वस्तादाची गांठ गांजा ओढण्याच्या एका अड्डयांत कशी पडली; तो आपल्या वस्तादाच्या मौजेच्या गोष्टी कशा सांगतो; त्यानें एका भर मजलशींत तंबोऱ्याच्या चारी तारा युक्तीनें तोडून बदरंग कसा केला; त्यानें दुसऱ्या एका प्रसंगीं मृदंगास लावण्याला आणलेली कणीक भूक लागल्यामुळें कोणास न कळत हळूच कशी खाल्ली; तो गाण्यापेक्षां गाण्याच्या गप्पा मारूनच वेळ अधिक कसा काढतो; त्याचें व तबलजीचें एकदां भांडण होऊन त्यानें तंबोरा उचलून तबल्यावर हाणल्यामुळें दोन्हीहि कसे फुटून गेले; साधारण मनुष्यानें एकादें पद किंवा राग नांव घेऊन 'गा' म्हटलें म्हणजे, 'आपल्या वडिलांनीं तरी तें कधीं ऐकलें होतें का ?' असें म्हणून तो अपमान कसा करी; वगैरे अनेक गोष्टी खुलवून सांगण्यास दादासाहेबांनीं प्रारंभ केला.

मी म्हणालों, "दादासाहेब, खरोखरच मला गाण्याची हौस नाहीं."

दादासाहेब म्हणाले, "छेः, असें कुठें झालें आहे कीं काय ? तुमचें शहरचें पंचपक्वान्न रोज चालूच आहे. पण आमच्या खेडेगांवच्या चिंचेचा ठेंचा एक दिवस तरी खाऊन पाहा."

अकरा वाजून पंचवीस मिनिटें झालीं. इतक्यांत तिंबूबुवा खोकत खोकत आणि हातांतील काठी टेकीत टेकीत येऊन दाखल झाले. दादासाहेबांनीं गड्यास बैठक घालण्यास हुकूम केला.

बुवा म्हणाले, "काय दादासाहेब, काय आज्ञा आहे ?"

दादासाहेब म्हणाले, "अहो, आज्ञा कसची ? तुम्ही आमच्या गांवचें सौभाग्य. हे मोठ्या शहरचे मोठे पाहुणे, कधीं नव्हे ते आपल्या घरीं आले. यांना चार पदें ऐकवा, दुसरें काय ?"

बुवा म्हणाले, "हो ऐकवूं, त्यांत काय ? पण माझा घसा आज बसला आहे व प्रकृतीहि साफ नाहीं."

मी पडत्या फळाची आज्ञा घेऊन म्हणालों, "बुवासाहेब आपण आलां इतकें पुरें झालें. आपली प्रकृति नादुरुस्त आहे, आपल्याला मुळींच त्रास देण्याची माझी इच्छा नाहीं."

पण बुवांना चढविण्याच्या हेतूनें दादासाहेब म्हणाले, "अहो, कसली प्रकृति आणि कसलें काय ? आमच्या बुवासाहेबांची लहर मात्र लागली

पाहिजे! एकदां ते घसा खाकरून आ करून बसले म्हणजे त्यांना भीमाचें बळ येतें. रात्र सहज उजाडायची!"

मी मनांत म्हणालों, "ईश्वर करो आणि तसा प्रसंग आज तरी न येवो."

बुवासाहेब म्हणाले, "असें तर खरेंच आहे. वेळेचा गुण कांहीं वेगळा असतो."

असें म्हणून त्यांनीं गाण्याच्याऐवजीं आपल्या आयुष्यांतील आठवणी सांगण्यास हळूहळू प्रारंभ केला. दादासाहेब आणि बुवा दोघेहि रंगांत आले होते व मधून मधून जोरानें हसत होते. मीहि हसण्याचा मधून मधून प्रयत्न करी. पण इकडे डोळ्यांत झोप भरलेली व दुसरे दिवशीं लवकर जेवून निघून गाडी गांठायला सांपडते कीं नाहीं, या भीतीचा वायगोळा क्षणोक्षणीं पोटांत उठत होता, तेव्हां मला कसचें हसूं येणार!

हें चाललें आहे तोंवर तबल्याकडे गेलेला मनुष्य तबला तर घेऊन आला. तबल्याच्या दोन भांड्यांपैकीं मुख्य भांडयाची शाई बहुतेक उडालेली होती व डग्ग्याच्या कातडयाला चीर पडली होती. मिळून दोन्हीहि बदबदच वाजत होतीं. हें पाहतांच बुवांनीं गुरवाला शिव्या देण्यास प्रारंभ केला. "हे लेकाचे असेच! हत्यार कधीं दुरुस्त ठेवतील तर शपथ. वडिलार्जित तबलजीचा धंदा राखायचा सोडून पत्रावळी लावून पोट भरण्यांत यांना आनंद वाटतो. हे पत्रावळीचे टांके यांच्या घशांत शिरून एकदां यांचा प्राण कां जात नाहीं? बरें तबला पाठविला तर स्वतः आला तरी? माझा मीच वाजवून गाऊं कीं काय? आणि मी तरी हा तबला कसा वाजवूं? यापेक्षां एखादें फुटकें गाडगें द्याल तरी बरें?"

आपणांवर बाजू आली असें पाहून, दादासाहेबांनींहि गुरवाला शिव्या झोडण्यास सुरुवात केली.

मी मध्येंच म्हणालों, "जाऊं दे कीं, इतका खटाटोप कशाला!"

दादासाहेब म्हणाले, "असें कोठें झालें आहे कीं काय? माझा स्वभाव करारी आहे. मीं तुम्हांला गाणें ऐकवीन म्हटलें तर गाणें ऐकवीनच." बुवांनीं तर तबल्यावर डग्गा पालथा घालून रागानें तो दूर भिंतीशीं सारून दिला आणि मुख्य बैठकीवर जाऊन पानसुपारी खाण्यास सुरुवात केली. व गाणें नाहीं तर नाहीं, निदान गवयाच्या गप्पागोष्टी ऐकावयाला मिळतील तरी मी

माझें भाग्यच समजेन अशा समजुतीनें कीं काय, मला पुण्यांतील दोनचार पिढ्यांच्या गवयांची माहिती विचारण्यास प्रारंभ केला.

" आपण चुन्नाचें गाणें ऐकलेंच असेल ? "

" नाहीं, मी तेव्हां पुण्यांत नव्हतों."

" नसला म्हणून काय झालें ? चुन्ना म्हणजे प्रत्यक्ष गंधर्वांची राणी. पण आपल्याला अबदुल करीमखांचें गाणें तरी पुष्कळ वेळां ऐकावयास सांपडलेंच असेल ? "

पण तिंबूबुवांचें व माझें भाषण सर्व सांगत बसलों तर वाचकांना कंटाळा येईल. त्यांतील तात्पर्य इतकेंच कीं, बुवांनीं प्रश्न विचारविचारून मनाशीं असें ठरविलें कीं, मी नांवाचा मात्र शहरवासी; पण गाणें वगैरेच्या बाबतींत बुवांच्या दृष्टीनें मी अगदीं ठोंब्या होतों! पण मला बोलणें होईल तितकें आवरतें घ्यावयाचें होतें म्हणून 'होय नाहीं' वगैरे एकेरी शब्दांशिवाय मीं त्यांना माझ्या उत्तरांत फारसें कांहीं लाभूं दिलेंच नाहीं.

असो. बुवांनीं केलेली माझी उलटतपासणी संपली व बाराचा ठोका पडला. तों इतक्यांत तंबोरा आणण्यास गेलेला मनुष्य तो घेऊन परत आला.

घरधनी म्हणाले, " कां बुवा, एकूण तुम्हांला आजचें गाणें चुकत नाहीं असेंच दिसतें. कारण नाहीं होय म्हणतां म्हणतां तबला व तंबोरा दोन्ही शेवटीं आलेच."

बुवा म्हणाले, " आले, पण हे असलेच कीं नाहीं ? येथें काय गवई रडेल ? "

पण बुवांनाहि दिसलें कीं, घरून उठून साहेबांच्या घरापर्यंत हेलपाटा तर घातलाच आणि तबला-तंबोरा मोडकातोडका कां होईना, पण येऊन दाखल झाला. तेव्हां आतां कांहीं तरी गायल्याशिवाय यजमान स्वास सोडीत नाहींत. म्हणून त्यांनीं तंबोरा जवळ घेतला व गवसणी काढून तारा लावण्यास आरंभ केला. पण वेळच खडतर, त्याला ते काय करणार ? कारण खुटी पिळतां पिळतां पंचमाची तार तडकून तुटली !

झालें. फिरून बुवांनीं तंबोरावाल्याचे आईबाप उद्धरण्यास सुरुवात केली. हें निमित्त घेऊन मी म्हणालों, " साहेब, खरोखरच आज योग दिसत नाहीं. कोणीहि झालें तरी वेळेला सतावूं नये."

पण मला गाणें ऐकवून पाहुणचार करण्याच्या बुद्धीपेक्षां आपल्या गांवचे

आपण राजे असा अभिमान तडीस नेण्याच्या कल्पनेचाच अम्मल साहेबांवर पुरा झाल्यामुळें मी गरीब त्यांत सांपडलों.

साहेब म्हणाले, "तो तंबोराहि नको आणि तबलाहि नको आपल्याला. गळा गोड असला म्हणजे इतर साहित्य लागत नाहीं. आणि तोच वाईट असला, म्हणजे इतर साहित्यानेंहि निभावत नाहीं. तें कांहीं नाहीं. ठेवा तो तंबोरा बाजूला आणि झडूं दे नुसत्या गळ्याचीच लकेर."

आतां बिंबूबुवांस कांहींच सबब उरली नाहीं. त्यांनीं खाकरून आ तर पसरलाच; पण नुसते एकदोन आलाप घेतल्याबरोबर गायनशास्त्रांतल्या अगदीं साध्या गोष्टींवर मला व्याख्यान देण्यास सुरुवात केली. तेव्हां मींहि निश्चय केला कीं, या पाहुणचाराचा जुलूम यापुढें सोसावयाचा नाहीं; आणि बुवांच्या कहाणीस हुकार देतां देतां हळूच भिंतीजवळच्या तक्क्यास टेकून पाय लांब केले, डोळे मिटले आणि खुशाल घोरण्यास सुरुवात केली.

त्याचा मात्र साहेबांवर कांहीं परिणाम झाला असें दिसलें. कारण, "यांना खरीच झोप येऊं लागली बरें का," असें म्हणून त्यांनीं मला अंथरूण घालून देण्याकरितां गड्यास हाक मारिली. मी निजावयास निघालों खरा, पण रात्रीच्या पाहुणचारावरून सकाळीं काय होणार याची कल्पना मला पुरी येऊन चुकली, म्हणून जातां जातां मी साहेबांस ऐकूं येईल अशा रीतीनें आपणाशीं म्हणालों, "सकाळीं लवकरच उठलें पाहिजे."

आणि माझी खरी अडचण व कळकळ दाखविण्याकरितां पुढें म्हणालों, "सकाळची झोप थोडीशी मोडली तरी हरकत नाहीं, येऊनजाऊन गाडी सापडली म्हणजे मग माझा दहा जाग्रणांचाहि शीण जाईल."

हें ऐकून साहेब म्हणाले, "त्याची तुम्हांला काळजी नको, अगदीं पहांटे म्हटलेंत तरी पहांटे जेवण तयार! आमच्या भिम्या आचाऱ्याला इशारत द्यायची फुरसत, कीं दहा मिनिटांत स्वयंपाक तयार! दिवस उगवण्यापूर्वीं जेवायचें नाहीं म्हणूनच काय तें; नाहीं तर हा झाडावरच्या कावळ्यांना दगड मारून त्यांच्या ओरडण्याची आज्ञा घेऊन हरहर महादेव म्हणावयाचा."

हें ऐकून मला फार समाधान वाटलें. मी मनांत म्हणालों, "भिम्या आचाऱ्यामुळें आपणांस उद्यां गाडी सापडणार तर मग." पण मला हर्षवायु होण्याची भीति ईश्वराला पडली म्हणूनच कीं काय, त्यानें साहेबांस आणखी पुढें बोलण्याची बुद्धि दिली.

ते म्हणाले, भिम्या घरीं निजला असला तर बरेंच झालें, नाहीं तर आपण त्याला आणूं सकाळीं लवकर हाक मारून म्हणजे झालें. भिम्याला हुडकून आणायचा म्हणजे तें एक मोठेंच काम आहे म्हणा; पण तो घरीं येऊन दाखल झाल्यावर स्वयंपाकास उशीर नाहीं." मग माजघराकडे तोंड करून ते कोणालासें ओरडून म्हणाले, "काय रे, पाहुण्यांना सकाळीं लवकर जेवण करून जावयाचें आहे हें भिम्याला कोणीं सांगितलें का?"

पण रात्रीचे बारा वाजून सर्व सामसूम झालेली. साहेबांना उत्तर देणार कोण? तेव्हां साहेब निराश न होण्याचा निश्चय करून म्हणाले, "हुंः, त्यांत काय? आधीं सांगून नाहीं ठेवलें तर नाहीं ठेवलें. एक प्रहरांत शंभर पानांचा स्वयंपाक भिम्या करील."

झालें. माझा सर्व हर्ष मावळला आणि फांशीं देण्यास चालविलेल्या मनुष्या-इतक्या उल्हासानें मी माडीकडे निजण्यास गेलों!

पहांटे उठण्याची सगळी काळजी मला होती, तरी मी स्वतःच सहा वाजल्या-वर जागा झालों. तरी काय, घरांत जिकडे तिकडे सामसूम. साहेबांस झोप लागली असतां त्यांना उठविण्याचा शिरस्ता नाहीं; आणि ते नाहींत तर चाकरमाणसांना हुकूम सोडणारा मी कोण? अर्थात् चूळ भरून टाकून अंथ-रुणावर वेड्यासारखा नोकरचाकरांच्या हालचालीकडे आशाळभूतपणें पाहत बसलों होतों. शेवटीं सात वाजण्याच्या सुमारास साहेब जागे झाले व फिरून माझ्या पाहुणचारास त्यांनीं सुरुवात केली. प्रातर्विधि करण्यापुरता माझा मी मोकळा होतों, पण पाहुणचाराच्या जुलुमास चहापासून सुरुवात झाली. उत्तम चहा करण्याचे हुकूम सुटले व लवकर चहा करण्याचे तगादेहि झाले. होतां होतां साडेसात वाजतां चहाचे पेले वर आले. तों त्यांत थोडीशी राख पडली असून पहिल्याच घोटाबरोबर राकेलची घाण आली! पण आतां जर कां मी ही चूक साहेबांच्या नजरेस आणीन, तर या चहाप्रकरणांत आणखी अर्धा तास जाणार असें जाणून, मी मन घट्ट करून, ओठ दाबून खोटा हसण्याचा आव घालून, घोटाघोटांनीं चहा पिऊनहि टाकला. पण साहेब थंड चहा पीत; म्हणून थांबले होते. त्यांनीं तोंडाला पेला लावतांच त्यांना सर्व कळून चुकलें. त्यांनीं एकदम सर्व चाकरमाणसांस शिव्यांची लाखोली वाहण्यास सुरुवात केली व फिरून चहा करून आणण्यास त्यांनीं हुकूम सोडला. बऱ्याच वेळानें

नाहीं होय म्हणतां म्हणतां, चाकरांनीं लाजत लाजत येऊन कळविलें कीं, घरांतील चहा संपला आहे.

साहेबांची अब्रू बचावावी व पाहुणचाराचा जुलूम टळावा म्हणून मी म्हणालों, "मी कांहीं चहाचा मोठासा पोकी नाहीं, आणि प्यालेल्या चहालाहि कांहीं फारशी घाण येत नव्हती." पण पाहुणचाराची साहेबांची कल्पना जाज्वल्य असल्यामुळें ते म्हणाले, "फिरून चहा करवीन; एवढेंच नव्हे, तर बाजारांतून 'लिप्टन'चा नवा डबा आणवीन."

मी मनांत म्हणालों, 'नशीब माझें!' फिरून विचार केला, जेवणाची तयारी वेळेवर असली म्हणजे झालें. तोंवरचा तास अर्धा तास यजमानास खूष करण्यांत गेला तर जाईना का? पण इतक्यांत साहेबांना आठवण होऊन ते म्हणाले, "आमच्या भिम्याचा चहा कधीं बिघडावयाचा नाहीं; पण आजच त्याला काय अवदसा आठवली कोणास ठाऊक!" पण इतक्यांत शेजारीं गडी उभा होता त्याच्या मनांत न्यायदेवता उभी राहून त्यानें सांगितलें कीं, चहा भिम्यानें केला नसून घरांत कोणी नाहीं म्हणून आयत्या वेळीं शेजारच्या आजीबाई बोलावून आणल्या व त्यांनीं हा चहा बनविला. साहेबांच्या मनांत आजीबाईनाहि शिव्या द्यायचें येऊन गेलें. पण कांहीं कृतज्ञता व कांहीं शिष्टाचार मिळून त्यांनीं आजीबाईवर शिस्त धरली नाहीं.

पण या सगळ्या प्रकरणांत, भिम्या आचारी अजून आला नाहीं, मग स्वयंपाकास सुरुवात होणें लांबच, एवढी गोष्ट मात्र आपोआप सिद्ध झाली. मग काय विचारतां? साहेबांच्या आरडण्याओरडण्यानें सर्व घर दणाणलें. दाही दिशांना गडी पाठवून भिम्यास असेल नसेल तिथून धरून आणण्याचे हुकूम सुटले, व दरम्यानचा वेळ कोणत्या तरी पाहुणचारांत जावा, व्यर्थ दवडूं नये, म्हणून साहेबांनीं आपला नवा बगीचा पाहून येण्याची गोष्ट काढली.

ते म्हणाले, "बगीचा येऊनजाऊन मैलभर तर लांब आहे; स्वयंपाक होईपर्यंत आपण दहादां जाऊनसुद्धां येऊं." आणि स्वयंपाक करण्याचा तगादा भिम्यामागें लावण्याचा फिरून एक हुकूम सोडून ते म्हणाले, "स्वयंपाक-स्वयंपाक तो काय, आपण बगीच्यांत जाऊन येईतों दहा वेळां स्वयंपाक होईल."

स्वयंपाक होईपर्यंत बगीचाच्या दहा खेपा होणार, आणि बगीच्याची एक खेप होईपर्यंत स्वयंपाक दहा वेळां होणार, हें एकांत एक कसें बसतें याचें

कौतुक वाटून मला थोडेंसें हसूंहि आलें; पण त्याचा संबंध बगीचा पाहण्याच्या आनंदाशीं जोडून देऊन मीं वेळ मारून नेली.

बगीचांत न जातां आम्ही घरीं राहिलों, तरी मला स्वतःला चुलीपुढें जाऊन स्वयंपाक थोडाच करावयाचा होता. स्वयंपाकघरांतली 'भवितव्यता' सर्वस्वीं भिम्याच्या हातांत राहणार. म्हणून बाहेर बगीचांत गेलों तर स्वयं-पाकाकडचें लक्ष तरी कमी होईल अशा हेतूनें बगीचाकडे जाण्यास मीं संमति दिली.

बगीचांतहि पाहुणचार माझी वाट पाहतच होता. झाडांवरचीं फुलें खुडणें, फळझाडांवरचीं ताजीं फळें तोडणें, वगैरे गोष्टी साहेब मजकरितां करीत होते, त्या पाहुणचाराच्या रूपाच्याच होत्या यांत शंका नाहीं. पण कित्येक वेळां अशा गोष्टींत पाहुणचाराच्या बुद्धीपेक्षां गर्वोक्तीचें आत्मनिवेदनच अधिक असतें. तसेंच येथेंहि झालें. साहेबांनीं मला मूळ बगीचा घेतल्यापासून सर्व वृत्तान्त निवेदन केला. त्यांनीं केलेलें सर्व कांहीं चांगलें व शहाणपणाचें होतें अशी माझी खात्री करून देण्याचा त्यांचा सारखा प्रयत्न चालू होता. क्षणो-क्षणीं हुंकारानें मी कबुलीजबाब देतच होतों. पण खात्री करावी तितकी थोडी, अशांपैकीं ही गोष्ट आहे असें साहेबांस वाटत असावें. यामुळें पुराव्यांचीं ओझ्यांवर ओझीं मजवर लादून युक्तिवादाचे हल्ल्यांवर हल्ले ते मजवर चढवीत होते. त्यांची जमीन चांगली, त्यांचे गडी हुशार, शेती व बागाईत करण्याची त्यांची पद्धति लोकोत्तर, त्यांचें पीक लोकांपेक्षां अधिक, फार काय पण पाऊस-सुद्धां त्यांचा पक्षपाती असून शेजारच्या नंबरांतल्यापेक्षा त्यांच्या नंबरांत अधिक मुबलक व वेळेवर पडत असे, अशीहि माझी खात्री झाली! पण खात्री न होईल तर काय झालें! माझे कान तेवढे साहेबांकडे होते; पण मन स्वयंपाक-घरांतील भिम्याचा स्वयंपाक आणि स्टेशनांतील मुंबई-मेल यांच्या दरम्यान भ्रमण करीत होतें. साहेबांच्या पाहुणचाराच्या बुद्धीला मजकडून मिळावा तितका खुलासेवार व कृतज्ञतापूर्वक जाब मिळत नव्हता, पण त्याला मी तरी काय करणार!

मला स्टेशनावर पोंहोचविण्याकरितां बहुधा शेतांतल्या बैलांपैकींच जोडी मिळणार असें वाटून मी होऊन साहेबांस म्हणालों, "यांतले कोणते बैल मला स्टेशनवर नेणार?"

साहेब एका जोडीकडे बोट करून म्हणाले, "ही तर घरची सत्तेचीच आहे, पण शेजारचा वांटेकरी बळी पायगुडा यानें प्रदर्शनांत घेतलेली एक जोडी आहे तीच होतां होईतों तुम्हांस नेण्यास मी देणार आहें."

शोध करतां गड्याकडून कळलें कीं, पायगुड्याची जोडी एक मैलावर असलेल्या कुरणावर चरावयास ठेवलेली आहे. तेव्हां ती कदाचित् वेळेवर येणार नाहीं, अशा भीतीनें मी म्हणालों, "हें पाहा साहेब, घरची जोडी तीच खरी. दुसऱ्याची कशाला?"

फिरून साहेबांना आपण गांवचे अधिराजे, या अभिमानाची लहर आली. ते म्हणाले, "हें पाहा, आमच्या या गांवांत कोणतीहि वस्तु दुसऱ्याबिसऱ्याची हें मी जाणत नसतों. म्हणेन तेव्हां ती वस्तु मला मिळालीच पाहिजे, हा आपला माझा कायदाच आहे. मला जोडी देतो म्हणजे पायगुड्या काय उपकार करतो कीं काय?" असें म्हणून त्यांनीं ती जोडी घेऊन येण्यास चाकरांना सक्तीचा हुकूम सोडला.

मी या मुद्द्यावर अधिक हुजत घालीत बसलों नाहीं. पण एवढेंच म्हणालों, "आपलें काय जातें मिळालें तर? प्रदर्शनांत बक्षीस मिळालेल्या जोडीच्या गाडींतूनच आपण राजासारखे स्टेशनवर जाऊं."

पण लगेच डामडौल व मिजासीपणा यांच्यामुळें राजेलोकांच्या आगगाड्या कित्येक वेळां चुकतात, या आठवणीनें मनाला धक्का बसून मी पुढें म्हणालों, "जोडी कोणाची का होईना, पण आपलें स्टेशनावर वेळेवर पोंचलें म्हणजे झालें."

पण तोफेच्या तोंडीं दिलेल्या मनुष्याचीं जितकीं शकलें होत असतील तितकीं साहेबांनीं आपल्या निश्चयात्मक उत्तरानें माझ्या शंकेचीं केलीं.

ते म्हणाले, "हात्तेचा रे, स्टेशनावर वेळेवर पोंचायचें येवढीच ना येऊन जाऊन तुमची शंका? हुंः, त्यांत काय आहे? आमचा नाम्या गडी आणि आमचीच जोडी असली म्हणजे स्टेशन काय १५ मिनिटांचा रस्ता!"

नाम्या गडी व त्याची बैलाची जोडी यांची किंमत कमी करण्याचें मला कारण नव्हतें, पण चार मैलांची मजल पंधरा मिनिटांत मारावयाची म्हणजे ताशीं सोळा मैल वेग होतो, हें उदाहरण मनानें सोडविल्यामुळें मीं तें सहज साहेबांपुढें मांडलें. हेतु हा कीं, साहेबांचें गणित चुकल्यानें माझी गाडी चुकूं नये.

पण साहेब पडले अभिमानी पुरुष. ते काय अशा दुरुस्तीला भीक घालतात ? ते म्हणाले, " पंधराच्या ठिकाणीं वीस. आमची ही जोडी एकदां चौखूर उडूं लागली, म्हणजे एखाद्या वेळीं घोड्याच्या गाडीलाहि मागें टाकावयाची."

मीं अगदीं मनाविरुद्ध 'तथास्तु' असा आशीर्वाद देऊन हा वाद थांबविला.

घरीं येतों तों आठाला सुमारें दहा मिनिटें कमी होतीं. पण माझ्या दुर्दैवानें लिप्टनचा चहाचा डबा येऊन पडला होता. मग काय साहेब मला सोडणार ? मीं म्हणालों, " स्टेशनवरून गाडी हालायला फक्त एक तास पंचवीस मिनिटें आहेत. इतक्यांत मला आंघोळ-जेवण करून भातखाचरांतून चार मैलांवर मजल जावयाची आहे. तेव्हां आतां चहाच्या भानगडींत कशाला पडावें ? " पण साहेब म्हणाले, " स्वयंपाक चुलीवर होतोच आहे, पण वैल रिकामाच आहे कीं नाहीं ? " असें म्हणून भिम्या—जो या सुमारास येऊन चूल पेटवून भात टाकीत होता– त्याला साहेबांनीं चहा करण्याचा हुकूम दिला.

झालें, यापुढची हकीकत वर्णन करण्यास मी असमर्थ आहें. प्रत्येक पळाबरोबर माझा जीव तिळतीळ तुटत होता. माझें सगळें लक्ष आगगाडीकडे होतें आणि एखाद्या कळसूत्री बाहुल्याप्रमाणें मी साहेबांचा पाहुणचार घेत होतों. प्रथम चहा झाला. नंतर आंघोळीकरितां बाजारांतून साबण आणण्यास पांच मिनिटें गेलीं. नको नको म्हणत असतां गुलाल-रांगोळ्या झाल्या. ऐन भात वाढावयाच्या वेळीं भजीं केलीं नाहींत म्हणून भिम्यास रागें भरून घेऊन चुलीवर कढई ठेवावी लागली. भिम्यानें ऊन ऊन चपाती करून वाढावी व मीं खावी याशिवाय यजमानांचा संतोष होण्यासारखा नसल्यानें तो प्रकार आग्रहपूर्वक सुरू झाला. पाणी पिण्याची वेळ आली तेव्हां घरच्या विहिरीचें आख्यान दिवाणी कोर्टांतील अपिलापर्यंत सांगून त्याचें पर्यवसान असें झालें कीं, रहाटास दोर नव्हता, तो मुद्दाम बांधून ताजी घागर काढून अखेर मला पाणी पाजण्यांत आलेंच ! पानसुपारीचे वेळीं मला: नुसतीं फुलें न देतां त्यांचा गुच्छ सजवून द्यावा, अशी साहेबांची लहर लागल्यामुळें त्यांतच चारदोन मिनिटें गेलीं.

जेवणांतून मोकळा झालों असें पाहून मीं अंगरखा पागोटें घालण्याची लगबग केली; पण देवापुढें सुपारी ठेवून जाण्याच्या शिष्टाचारांत मी सापडून

साहेबांनीं शिसवी देव्हारा करणाऱ्या सुताराची कामगिरी आणि महत्प्रयासानें मिळविलेले बाण व चक्रांगद यांचें वर्णन करून साहेबांनीं दोनतीन मिनिटें खाल्लींच. अखेर ओटीवर येऊन हातांत बॅग व काठी मी घेतों तों मला समजलें कीं, दारांत मुळीं गाडीच उभी नाहीं. तें ऐकतांच साहेबांनीं नाम्या गड्यास चार शिव्या हासडल्या. एकामागून एक दोन-तीन गडी धाडले व इतकें केल्यानेंच चुकीची योग्य ती दुरुस्ती झाली असें मनाशीं ठरवून ते संथपणानें मला म्हणाले, " अहो, बसाल तर खरे. फिरून एक वेळ विडा खा." तेव्हां मी मात्र मनांत बराच संतापलों. मीं साहेबांस जाणवेल अशा रीतीनें घड्याळ काढून पाहून खिशांत आपटलें. पण घड्याळांत किती वाजले ही बाबत साहेबांच्या हिशेबांत नव्हती. 'सकाळीं जेवून गाडीला जायचें' इतकीच गोष्ट ते जाणत होते. सर्व पाहुणचाराच्या समारंभांत त्यांनीं घड्याळाकडे एक वेळहि पाहिलें नव्हतें.

असो; पुन्हा एकदां विडा खाऊन झाल्यावर मी उठलों व सामान घेऊन दारांत उभा राहिलों, तरी गाडी येईना. मी आपणांकडून चुळबूळ करीत होतों, व 'गाडी आतां इतक्यांत येईल' असें आशापूर्ण शुभवर्तमान साहेब वर्तवीत होते. अखेर एकदांची गाडी आली. तों इतक्यांत घरच्या घड्याळांत नवाचे ठोके पडले. याचा अर्थ चार मैलांवर असलेल्या स्टेशनावरची गाडी बरोबर १५ मिनिटांनीं सुटावयाची!

पण साहेब स्वस्थपणें म्हणाले, " शकुन तर ठीक झाला." मी गाडींत बसून गाडी चालू होतांना साहेब म्हणतात, " पंधरा मिनिटें आहेत ना? हात्तेच्या! नाम्या तेवढ्या वेळांत दोनदां स्टेशनला पोंचवील. नाम्या, ढवळा बैल जरासा लंगतो आहे, पण हाण जरा जोरानें म्हणजे झालें."

शेवटीं साहेब मला म्हणतात, " एक मिनिटभर थांबत असलां तर थोडेंसें फराळाचें देतों बरोबर." मी हातानेंच नको म्हणून आपल्याच हातीं धन्याचा अधिकार घेऊन 'हाण गाडी' असें नाम्यास म्हणालों.

साहेबांचे अखेरचे शब्द ऐकूं आले ते असेः–" पुन्हा लवकरच या बरं का आजच्यासारखे!"

यावर मीं काय उत्तर दिलें तें साहेबांस किंवा नाम्यालाहि ऐकूं जाण्यासारखें नव्हतें. पण तें उत्तर काय असेल याची वाचक कल्पना करतीलच!

मी स्टेशनावर पोंचलों तों पावणेदहा झाले होते. मेलगाडी जाऊन अर्धा तास झाला होता आणि स्टेशनवर सर्वत्र सामसूम झालें होतें.

साहेबांच्या पाहुणचारामुळें माझी आगगाडी कशी चुकली, याचें सर्व चित्र माझ्या डोळ्यांपुढें पाहुणचाराच्या पहिल्या हल्ल्यापासूनच उभें राहिलें व मीं कंबर खचून मटकन् प्लॅटफॉर्मच्या बाकावर बसलों.

४ दुधाची धार अथवा गुप्तदान !

'आमच्या भिमाकाकू' म्हणजे अगदीं देवमाणूस. आळींतील प्रत्येक मनुष्य त्यांना 'आमच्या भिमाकाकू' असेंच केंव्हांहि म्हणे. 'आमच्या' असें आधीं म्हटल्याशिवाय पुढचे भिमाकाकू हे शब्दच कोणाच्या तोंडाला येत नसत. त्यांच्याबद्दल लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांना असाच आपलेपणा वाटे. आपल्या ममतेच्या दुव्यांनीं त्यांनीं आळींतल्या सगळ्या घरांची एकच साखळी बनविली होती. लोकांकरितां जगांत कसें उरावयाचें याचें त्या एक उत्कृष्ट चालतें बोलतें उदाहरण होत्या.

खरें पाहिलें तर त्यांनीं आमचा गांवहि पूर्वी पाहिलेला नव्हता. पण आमच्या गांवची हवा दमेकरी रोग्यांना चांगली म्हणून पांच वर्षांपूर्वी आपल्या दमेकरी मुलाला घेऊन हवा पालटायला त्या येथें आल्या. पण दुर्दैवानें तो बरा न होतां निवर्तला ! बरें, त्यानंतर त्या आपल्या गांवीं जावयाच्या असें लोकांना वाटे. पण लवकरच असें कळून आलें कीं, खरोखर या एका मुलग्याशिवाय त्यांना जवळचें असें जगांत दुसरें कोणीहि नव्हतें. त्यांच्या मुलाच्या तीन महिन्यांच्या आजारांत मी व जगू हे अगदीं लगत्याचे—डाव्या उजव्या हातांचे—शेजारी म्हणून आम्ही त्यांची विचारपूस करीत असूं.

त्यांचें तें दुःख पाहूनच आम्हांला वाईट वाटे. पण त्यांच्या सात्त्विक स्वभावाचें कौतुक आम्हांला त्याहूनहि अधिक वाटे. बाजारचा जिन्नस तो काय; पण तेवढा आणून दिला कीं, भिमाकाकू किती पण आर्जवून चार-चार वेळ निरनिराळ्या रीतींनें आभार मानून कृतज्ञता प्रकट करीत ! आम्ही म्हणावें, " भिमाकाकू, यांत मोठेंसें तें आम्हीं काय केलें? हा साधा शेजारधर्म

नव्हे का ? " पण त्या म्हणत, " बाबा, शेजारधर्माला जगांत अलीकडे उलटा अर्थ आला आहे. 'बरा वैरी पण नको शेजारी ' म्हणून तुम्ही करतां त्यानें पोट भरून येतें." 'बरा वैरी पण नको शेजारी.' ही म्हण आम्हीं पूर्वीं ऐकली नव्हती. खरोखर ती भिमाकाकूंनींच बनविली होती. त्या गाणीं रचीत, यमकें जुळवीत, आणि नव्या म्हणी बनवीत, हें आम्हांला पुढें प्रत्यक्ष कळूनच आलें.

मुलाच्या तीन महिन्यांच्या आजारांत किंवा तो मेल्यावरहि त्यांच्या समाचाराला बाहेरगांवाहून कोणी आलेलें दिसलें नाहीं. पोस्टांतलीं पत्रें मुलाच्या नांवानें पांचचार वेळां आलीं, इतकेंच काय तें. मुलाचा प्रेतविधि अर्थात् आम्हीं शेजाऱ्यांनींच केला. पण आम्हीं स्मशानांतून परत येण्यापूर्वींच त्यांनीं सगळें दुःख गिळून टाकलें होतें. इतकेंच नव्हे, तर आपल्या हातानें घर सारवून, कपडे बाजूला काढून, सगळें साफसूफ करून बसल्या होत्या. आम्हीं आल्यावर शेजारणींनीं त्यांना अंग धुवायला घातलें मात्र, कीं लगेच त्यांनीं घराचें देऊळ बनविलें.

देऊळ म्हणण्याचें कारण, संसाराच्या इतर जिनसांना सांधी-कोपऱ्यांत दडवून टाकून त्यांनीं देवाचा देव्हारा, देव-पूजा-साहित्य, पोथीपुस्तकें, यांची स्थापना घराच्या मोठ्या पडवींत केली. कोणी म्हणाला असता कीं, या योजलेल्या उपक्रमाला त्या मुलाच्या मरणाची वाटच पाहत बसल्या होत्या! सुतकांत देवाला कशी शिवूं असा विचार त्यांच्या मनाला शिवलाहि नाहीं. मलाच तें थोडेंसें चमत्कारिक वाटून, दुसऱ्या दिवशीं मीं त्यांना म्हटलेंहि, " काकू, मी करीन हो दहा दिवस तुमच्या देवांची पूजा." पण त्या म्हणाल्या, " दिगूभाऊ माझ्या देवाची पूजा दुसऱ्यानें केली तर मग तो माझा देव कसला? माझ्याबरोबर देवहि आज सुतकांतच नाहीं काय? कारण विनू जसा माझा तसाच तो देवाचाहि होता. महारा-चांभारांच्या घरांत त्यांचे देव नसतात का? मग त्यांच्या पूजेनें कुठें देव विटाळतो?" हे उदार व मार्मिक विचार या अशिक्षित म्हातारीच्या तोंडून ऐकून मी तर अगदीं थक्कच झालों.

मुलाचें उत्तरकार्य करतांनाहि बाईनें असाच विवेक दाखविला. ती म्हणाली, " कसलीं श्राद्धें आणि कसले पक्ष! परलोक असला तर तिथें अन्नपाण्याला काय कमी पडणार? चौऱ्यायशीं लक्ष योनी जीव फिरणार, तो काय

पूर्वजन्माच्या शिधासामुग्रीवर ? कर्माप्रमाणें चांगला किंवा वाईट जन्म मिळेल. पण मिळालेल्या जन्मांत नवीन उद्योग करून मिळेल तेंच अन्नपाणी !"

दुसरे दिवशीं मी व जगू सहज बोलत बसलों, तेव्हां तो म्हणाला, "अरे, तुला ठाऊक नाहीं. भिमाकाकूजवळ पैसा कोठून येणार ? मुलगा असतांनाहि आपण पाहत नव्हतों का ? औषधालासुद्धां बाईच्या हाताशीं भरपूर पैसा नव्हता, मग श्राद्धपक्षांवर आणि उत्तरक्रियेवर कुठला खर्च करणार ? पोटांत पीळ पडत असेल नुसतें तीळ-पाण्यावर भागवितांना ! पण बाहेर दैन्य दाखवायचें नाहीं, म्हणून बाई असें बोलत असेल. मला तर तिचें शहाणपण पाहून आश्चर्यच वाटतें."

आम्हीं दोघांनीं मनाशीं ठरविलें कीं, भिमाकाकू गांवांतून जाईपर्यंत युक्ति-प्रयुक्तीनें, हस्तेंपरहस्तें त्यांना आपण कांहीं ना कांहीं मदत करावयाची. युक्ति-प्रयुक्तीनें म्हणण्याचें कारण इतकेंच कीं, त्यांना 'अमुक ही मदत फुकट घ्या' असें म्हणण्याची सोयच नव्हती. कोणी मदत केली तर तो दानधर्म झाला, घेणाराला पाप लागतें, अशी स्वाभिमानी कल्पना त्यांच्या मनानें पक्की घेतली होती. म्हणून कोणी कांहीं घ्या म्हटलें, म्हणजे त्या जरी रागवत नसत, तरी वाटेल त्या सबबी सांगून मदत मात्र नाकारीत.

एक दिवस मीं सहज बाजारांतून आणलेल्या भाजींतली थोडी भाजी त्यांना दिली आणि सांगितलें कीं, आमच्या गांवच्या मळ्यांतल्या वाटेकऱ्यानें पाठविली म्हणून. पण संशय पोटांत धरून भिमाकाकूंनीं मी घरीं नाहीं असें पाहून हळूच आमच्या 'हि'च्याजवळ गोष्ट काढली. त्या म्हणाल्या, "बनूताई, तुमच्या मळ्यांत भाज्या मोठया चांगल्या होतात बरें का ? पण का हो, तुम्ही नाहीं का कधीं मळ्यावर राहायला जात चार दिवस थोरपालट करायला ?" बिचाऱ्या माझ्या बायकोला भिमाकाकूंच्या पोटांतलें कपट काय माहीत ? ती भोळी. सरळ तें बोलून गेली. आश्चर्य दाखवून म्हणते काय "आमचा मळा ? अन् तो कधीं ? अन् कुठं ? कुणी पाहिला ? कुणी ऐकला ? भलतंच कांहीं तरी. आम्हांला अशा श्रीमंतीची संवयबिवय नाहीं हो. माझा मळा माझ्या झोळींत आहे- रोज सकाळीं हात घातला कीं, भाजी आयती तयार, मळ्यांत ती काय मेली एकाददुसरी पर मिळणार. माझ्या झोळींत रोज नवी भाजी." बोलघेवडी बोलली, पण तिनें मला खोटें पाडलें !

भिमाकाकू धूर्त. त्यांनीं तिच्याशीं एक अक्षरदेखील काढलें नाहीं. "असें काय, मला हो काय माहीत?" इतकंच त्या म्हणाल्या. दोन दिवसांनीं मी गेलों तेव्हां त्या देवाशीं बसलेल्या होत्या. मला पाहून त्यांना कांहीं विचार सुचलासा दिसला. त्या म्हणाल्या, "दिगूभाऊ, बरे वेळेवर आलां, हात पुढें करा." मला वाटलें म्हातारी हातावर तीर्थ, फार तर नैवेद्याची साखर घालणार असेल. पण चटदिशी तिनें हातावर एक आणेली टाकली. मीं म्हटलें, "हें काय?" म्हातारी म्हणाली, "तुम्ही ब्राह्मण आहां कीं नाहीं बोला?" मीं म्हटलें, "ब्राह्मण नाहीं तर दुसरा कोण?" ती म्हणाली, "म्हणूनच दक्षणा दिली. आजची एकादशी आठवली. तेव्हां म्हटलें उगाच कांहीं धर्माला जागावें." मी म्हणालों, "आणेलीवर उदक सोडून तुळशीपत्र नाहीं दिलेंत?" म्हातारी म्हणाली, "दक्षणा गांठीं नसेल तेव्हां उदक किंवा तुळशीपत्र. दक्षणा घेऊन आणखी भरतीला उदक, तुळशीपत्र अशी तिहेरी दक्षणा काय म्हणून देईन? देवाशीं वागतांनाहि मी हिशोबीपणानें वागणारी स्त्री आहें बरें का दिगूभाऊ!"

पण बाई कांहीं बोलली तरी मी मनांत चरकलों. हा तिचा हिशोबीपणा देवाला उद्देशून नव्हे, तर मला! मी भाजी 'मळ्यांतली' असा बहाणा करून फुकट देऊं पाहत होतों. बाईनें दक्षिणेचा बहाणा करून भाजीची किंमत माझ्या पदरांत टाकली!

भिमाकाकूंचा हा करारीपणा पाहून त्यांचा स्वाभिमान दुखवूं नये असें मी आणि जगू यांनीं यापुढें वागायचें ठरविलें; पण बाईंचा चरितार्थ चालावा कसा, ही मनाची काळजी मात्र कांहीं केल्या जाईना.

— २ —

आठ आठवडे असेच गेले. मग एक दिवस टपालवाला एक मनीऑर्डर घेऊन आला. "भिमाबाई पळणिटकर इथेंच राहतात का? अन् त्या कोण?"

मी म्हणालों, "शेजारच्या भिमाकाकू." पण त्या त्याच्या ओळखीच्या नव्हत्या. आणि मनीआर्डर द्यायला तर ओळख पाहिजे म्हणून तो मला 'चला' म्हणाला. बाईंना प्रथम आपली मनीआर्डर असें कांहीं केल्या वाटेच ना. त्यांना मराठी लिहावाचायला येत होतं म्हणून, उलथूनपालथून मनीआर्डर पाहिली. पण ती इंग्रजींत लिहिलेली! मीं वाचली त्यांत पाठविणाराचें नांव 'भाऊ चिटणीस' असें निघालें. त्याचा त्यांना कांहींच उमज पडेना. एकदां वाटे नांव

ओळखीचें आहे. एकदां वाटे नाहीं. पण बाईंचें नांव, त्यांच्या नवऱ्याचें आडनांव, घरनंबर, गांव, सगळीं बरोबर जुळलीं. तेव्हां मी म्हणालों, "घ्या. तुमचीच मनीऑर्डर आहे; शंका कसली?" बाई म्हणाल्या, "होय, पण पाठविली कुणीं? पुरें लक्षांत येत नाहीं." शेवटीं टपालवाल्याला उशीर होतो असें म्हटल्याबरोबर त्यांनीं चटकन् सही केली व रुपये ठेवून घेतले.

मी व जगू भेटलों तेव्हां परस्परांनीं आनंद बोलून दाखविला. भिमाकाकूंना मदतगार कोणी तरी आहे एकूण! त्यांना मदत करणें हें आम्हांला संकट नव्हतें; पण त्यांना स्वतःचें तर कोणी नाहीं आणि आम्हीं दिलेली मदत घेण्याचें त्यांना संकट वाटतें, हेंच आमचें संकट होतें, पण तें देवानें निवारलें. मनीआर्डर वीस रुपयांची होती. दोन महिने सहज पुरेल. पुन्हा येते का पाहूं. नाहीं तर आणीक कांहीं उपाय योजूं.

पुढें दोन दिवस मनीऑर्डरीबद्दल त्या कांहींच बोलल्या नाहींत. तिसरे दिवशीं त्या हळूच मला म्हणाल्या, "दिगूभाऊ, मनीऑर्डर कोणत्या गांवाहून आली होती? तुम्हांला आठवतें का?"

मी म्हणालों, "कां बरें? गोरखपूर असें गांवाचें नांव मीं वाचलें. पण गोरखपूर कोणत्या प्रांतांतलें हें मलाहि माहीत नाहीं. तुम्हांला आहे का माहीत कुठलें गोरखपूर तें?" भिमाकाकू म्हणाल्या, "देव जाणें कुठलें गोरखपूर! मी तर हें नांव आज पहिल्यानेंच ऐकतें."

"पण भाऊ चिटणीस कोण, हें तर तुम्हांला माहीत असेल?"

"खरें म्हणाल तर तेंहि मला माहीत नाहीं. चिटणीस कां टिपणीस अशा कायशाशा नांवाचें एक कुटुंब आमच्या डोंगरगांवीं पूर्वीं— फार वर्षांपूर्वीं— राहात होतें. तरी पण काय? बायकाबायकांची थोडीशी ओळख. पुरुषांची तोंडओळखहि नव्हती. मुलांत मुलें त्यांचीं आमचीं खेळत. पण त्यांचीं तरी नांवें मला काय माहीत? आणि कसेंहि असलें तरी पंचवीस वर्षांनंतर त्यांतल्या एखाद्या मुलानं मला मनीआर्डर पाठविण्याचें काय कारण? आणि ती विनूच्या नांवची असती तरी एक वेळ असो. माझ्या नांवची कशी?"

पण हें कोडें भिमाकाकूंना न उकललें तर मला तरी कसें उकलणार? हा विषय इथेंच संपला. मनीऑर्डरीच्या रुपयांचा खर्च भिमाकाकू कसा करतात याकडे आमचें सहजच लक्ष राहिलें. पण संसाराला लागणारा असा त्यांचा खर्च कांहींच वाढलेला नजरेला येई ना! फक्त फुलांचा पुडा देवाला

सुरू झाला. पेलाभर तांदूळ घेऊन बाई रोज समोरच्या देवळांत पुराणाला जाऊं लागल्या. भिक्षेकऱ्यांना भिक्षाहि वाढूं लागल्या. एक दिवस शेजारच्या मैनाताईकरितां हिंवतापाच्या गोळ्या आणण्याकरितां त्यांनी मला चार आणे दिले, आणि त्यांच्या अंगणांत मुलें खेळत त्यांना रंगपंचमीच्या दिवशीं साखरेच्या गांठ्या आणून द्यायला आठ आणे देऊन मला म्हणाल्या, "मुलांची जात. कशीं आनंदानें खेळलीं. पण शेजारच्या रावसाहेबांच्या मुलाच्या गळयांत तळहाताएवढ्या पानांची माळ पाहून त्यांनीं तोंडें कशींशींच केलीं तें मला पाहवेना."

दुसऱ्या महिन्याला पुन्हा वीस रुपयांची मनीऑर्डर जवळजवळ त्याच तारखेला आली. या खेपेला पाठविणाराचें नांव तेंच असून पत्ता मात्र ललितपूरचा होता. झालें, पुन्हा बाई व मी गोंधळांत पडलों. बाईंनीं मनीऑर्डरचे रुपये ठेवून घेतले व इतकेंच म्हणाल्या, "दिगुभाऊ, हें आश्चर्य नव्हे काय ? अनोळखी मनुष्य मनीऑर्डर पाठवितो. मी घेऊं तरी कशी ? अन् माझें नांवगांव बिनचूक लिहिलें तेव्हां मी न घेऊं तरी कशी ?"

यावर मला एक कल्पना सुचली. मी म्हणालों, "तुमच्या विनायकरावांचा कोणी कर्जदार असेल, ते गेले म्हणून तुमच्या नांवानें हप्ते पाठवून कर्ज वारीत असेल. बरा बिचारा धर्माला जागतो."

भिमाकाकूंना हा तर्क मुळींच पटला नाहीं. त्यांनीं डोळ्यांना पाणी आणलें व मला म्हणाल्या, "विनूचा कर्जदार ! भलतेंच कांहीं तरी. त्याजजवळ दुसऱ्याला कर्ज द्यायला होतें कधीं काय ? उलट तो दुसऱ्याच्या ऋणांत पडावयाचा तो अखेरपर्यंत निभावला एवढीच देवाची कृपा समजतें."

ठरलेल्या तारखेला दर महिन्याला २० रुपयांची मनीऑर्डर आपली हटकून यावयाची. असा नियम एकसारखा सहा महिने चालला. माझी व जनूची खात्री पटली कीं, विनायकरावांचा कोणी कर्जदार इमानाला जागून कर्जफेड करीत असेल. पण बाईंना कर्जाची माहिती नाहीं इतकेंच. पण बाईंचें समाधान या कल्पनेनें झालें नाहीं. तिच्या मनांत अरतूनपरतून संशय येई कीं, आम्हीच कोणी तरी, त्यांना पैसे पुरवावयाचे म्हणून, अशा युक्तीनें ते पाठवीत आहों. पण दुसऱ्या तिसऱ्या खेपेला दूरदूरच्या गांवच्या पोस्टाचे शिक्के मनीऑर्डरवर उठविलेले आम्हीं भिमाकाकूंना दाखविले व म्हटलें कीं, "तुमचा संशय बरोबर नाहीं. तुम्हांला आमची मदत घ्यायची नाहीं तर नको. पण ती

गाळ्यांत बांधण्याकरितां आम्ही उत्तर हिंदुस्थानांत जात होतों कीं काय? कारण आतांपर्यंत मनीऑर्डरी आल्या तीं सगळीं गांवें गंगायमुनाकांठचीं होतीं." इतकें निक्षून सांगितल्यावर बाईंचा आमच्याविषयींचा संशय फिटला. मग त्यांना तो दैवी चमत्कार आहे, असें वाटूं लागलें किंवा काय माहीत नाहीं. पण एक गोष्ट निश्चित कीं, मनीऑर्डरीच्या पैशांपैकीं आपल्या उदरंभरणाकरितां त्यांनीं कधींहि खर्च केला नाहीं.

सातव्या महिन्यांत एक दिवस एक गृहस्थ प्रवासी सामान बरोबर घेऊन आमच्या गांवीं आला आणि भिमाकाकूंचा शोध करीत आमच्या दाराशीं येऊन ठेपला. मी त्याला आंत घेऊन गेलों. पण आश्चर्य हें कीं, भिमाकाकूंना त्याची ओळख पटेना. पाहुण्यानें निर्भीडपणानें आपलें सामान पडवीच्या एका कोपऱ्यांत लाविलें आणि अशा रीतीनें मुक्काम करण्याचा निश्चय कळविला. हळूहळू बाईलाहि पाहुण्यांच्या तोंडाकडे पाहून याला केव्हां तरी, कोठें तरी, पाहिला असावा अशी पुसट ओळख पडल्याचें चिन्ह दिसूं लागलें.

मी व जगू म्हणालों, " अरे, मनीऑर्डर पाठविणारा गृहस्थ हाच तर नसेल? कारण कांहीं दिवस यानें उत्तर हिंदुस्थानांत घालविले असावेत असें याचें सामानसुमान दाखवितें." पाहुण्यानें बाईला 'भिमाकाकू' म्हणून हाक मारली, तेव्हां बाईला त्यानें चांगलेंच ओळखलें यांत शंका नाहीं. तेव्हां त्याला तिथेंच सोडून आम्ही घरीं गेलों. जेवणखाण झाल्यावर तिसरे प्रहरीं आम्हांला भिमाकाकूंनीं बोलावून घेतलें आणि आमच्याच घरांतून चहाचें सामान आणवून चहा केला. बाईचा हेतु असा कीं, आम्ही आणि पाहुणे यांच्या गोष्टी चालल्या असतांना, परस्पर पाहुण्याची माहिती नक्की कांहीं तरी निघावी आणि ही त्यांची अटकळ साधलीहि; कारण पाहुणा मोकळ्या मनाचा आणि आनंदी स्वभावाचा होता. त्यानें आपण गंगायमुनाकांठीं काय उद्योग करतों वगैरे सर्व सांगितलें, पण हळूहळू जुन्या लहानपणच्या गोष्टीहि त्यानें काढल्या.

ही संधि साधून बाईंनीं मला एकीकडे बोलावून हळूच सांगितलें कीं, पाहुण्याशीं मनीऑर्डरी पाठविल्याचीहि गोष्ट सहज काढा. तेव्हां युक्तीप्रयुक्तीनें मीं ही गोष्ट सहज भाषणांत आणली. तेव्हां पाहुण्यानेंहि आढेवेढे न घेतां " मीच मनीऑर्डर पाठवीत होतों " असें कबूल केलें. पण मनीऑर्डर पाठविण्याचा तुमचा संबंध काय असें विचारण्याची छाती आमची होई ना. तेव्हां बाईंनींच आपण होऊन तो प्रश्न विचारला. त्या म्हणाल्या, " लहानपणीं विनूबरोबर

खेळायलाबिळायला येत असाल असें किंचित् आठवतें खरें. पण मला दरमहा बिनचूक मनीऑर्डर पाठवावी याचें कारण मात्र कांहीं कळत नाहीं! जगांत धर्माची आई मानणाऱ्या स्त्रिया असतात, तसेच धर्माची मातुश्री मानणारें पुरुषहि असतात. पण तुम्ही माझ्यावर एवढे प्रत्युपकार करावे असे उपकार मीं तुमचेवर काय केले आहेत, हें मात्र स्मरत नाहीं, म्हणून जीव घोंटाळ्यांत पडला आहे. तुम्ही विनूच्या आईवर म्हणून उपकार केला असला, तरी विनू संपला, त्याबरोबर त्याची आईहि संपली. फारसें आतां उरला तो केवळ देवाचा प्राणी! त्याला खाण्यापिण्यालाहि कांहीं लागत नाहीं."

इतकें बोलून बाईनीं डोळ्यांना पाणी आणलें. तें पाहून पाहुणाहि गहिंवरला व म्हणाला, "तुम्ही गोष्ट काढलीत म्हणून आतां सांगतों. लपवूंन कशास ठेवूं? माझ्या बाळमित्राची आई म्हणून तुम्हांला मी धर्माची आई म्हणतों, यांत विशेष तें कांहींच नाहीं. पण त्याहीपेक्षां जवळचें आईपणाचें नातें तुमचें व माझें आहे हें तुम्हांला माहीत नाहीं काय?"

या प्रश्नानें बाईला किंचित् गंमत वाटली असावी. कारण तिच्या तोंडावरची दुःखाची छटा मावळली. त्या म्हणाल्या, "हें खोटें-खरें मला तरी कांहीं कळत नाहीं. खेळायला जमलेल्या बरोबरीच्या मुलांनीं एकमेकांच्या आयांना आपल्या धर्माच्या आया मानलें तर तेंहि एक असो. पण या पलीकडे आईपणाचें नातें मीं कोणतें लावलें असावें हें मला तरी कळत नाहीं."

पाहुणा म्हणाला, "याच्या पलीकडचें आणि कांहीं अंशीं खरोखरच आईचें नातें तुम्हीं होऊन माझ्याशीं जोडलें आहे, तें मी कसा विसरेन? तुम्हांला आठवतें का, कीं एके दिवशीं आपले गांवीं राममंदिराचे आवारांत एका भजनीबुवाचें भजन चालू होतें. बुवा भाविक प्रेमळ होता. त्याच्या मागें उभें राहावयाला पंचक्रोशींतले सगळे टाळकरी जमले होते. दहावीस हिलाल लावून रोषणाई केली होती. देवळाच्या ओसरींत गांवच्या सगळ्या बायका बसल्या होत्या. त्यांत तुम्ही आणि माझी आई जवळजवळ बसला होतां."

भिमाकाकू म्हणाल्या, "भजन आठवतें खरें. पण तुमची आई व मी एके ठिकाणीं बसल्याचें चांगलेंसें आठवत नाहीं. बरें पण मग काय झालें?"

पाहुणा म्हणाला, "मग असें झालें कीं, माझ्या आईनें मला थोपटून निजवलें व ती कांहीं वेळानें निघून घरकामाला गेली. ती फिरून लवकरच

येणार असावी. पण इतक्यांत मी जागा झालों आणि डोळे मिटून रडूं लागलों. कांहीं केल्या मी आपले डोळे उघडीना व रडायचाहि थांबेना. तेव्हां मला कोणी तरी मांडीवर घेतलें, तरी पण मी रडायचा राहीना. माझ्या रडण्यानें भजनाला व्यत्यय येऊं लागला असावा. कारण भजन ऐकायला आलेली मंडळी हें कोणाचें मूल रडतें म्हणून तक्रार करूं लागली. त्यांतला एक तर फटकळच असावा. तो मोठ्यानें ओरडून म्हणाला, “ बायका येतात तर येतात आणि रडणारीं लहान मुलें घेऊन येतात. आपलीं मुलें रडवीं असलीं तर घरीं राहावें. लोकांना विनाकारण हा उपद्रव कां ? ”

“ मी तेव्हां लहान, मला तें बोलणें सर्व कशानें कळणार ? मी फक्त डोळे मिटून रडत होतों एवढें मला माहीत. उलट मी अधिक जोरानें रडूं लागलों. कारण आईनें मला मांडीवर उचलून घेतलें, पण प्यायला कांहीं दिलें नाहीं, याचा मला फार राग आला. मी रडायचा थांबे ना तेव्हां मग आईनें माझी दुधाची तहान भागविली ! पण मी दूध पीत भिटक्या मारीत आहे इतक्यांत एक बाई आली आणि म्हणाली, ‘ बऱ्या बाई तुम्ही जवळ होतां म्हणून हा रडायचा थांबला. नाहीं तर यानें आकाशपाताळ एक करून सोडलें असतें. मी कुठली उठून बाहेर गेल्यें असें मला यानें केलें असतें. बरी माझी अब्रू संभाळलीत.’ मी तोंड वर करून न्याहाळूं लागलों, तों मी कांहीं माझ्या आईच्या मांडीवर नव्हतों असें मला कळून आलें ! ”

भिमाकाकू मला म्हणाल्या, “ मग तुम्ही कोणाच्या मांडीवर होतां ? ”

पाहुणा म्हणाला, “ तुमच्या मांडीवर ! माझ्याकडे पाहून माझी आई आणि तुम्ही दोघीजणी हसूं लागला. माझी आई मला एवढेंच म्हणाली कीं, ‘गुलामा, तुझें पोट तर भरलें. आतां तुला मी काय व या काय दोघीहि आया सारख्याच ! राहीनास का त्यांच्या मांडीवरच.’ पण आईनें असें म्हटलें म्हणून मी थोडाच राहणार ? झेंप टाकून आईच्या मांडीवर गेलों.”

भिमाकाकू हसत म्हणाल्या, “ होय हो होय; ही गोष्ट आठवते खरी. सांगितल्याशिवाय आठवली नसती हें खरें, पण तुम्ही आठवण देतांच तो सगळा प्रसंग डोळ्यांपुढें चांगला उभा राहिला. ”

पाहुणा म्हणाला, “ त्या दिवसापासून तुम्ही माझी आई आणि मी तुमचा मुलगा हें नातें सिद्धच झालें. प्रथमप्रथम तुम्हांला कोणी माझी आई म्हटलें, कीं मला राग येई; पण जसजसा मी मोठा झालों तसतसें तुम्हांला आई

म्हणण्याचें स्वारस्य मला कळूं लागलें. विनूबरोबर मी तुमच्या घरीं खेळायला येई, तेव्हां तुम्ही कौतुकानें ही गोष्ट सांगत असा आणि म्हणत असां कीं, 'हा माझा मुलगा आहे.' मीं पुढें शाळेंत जाऊं लागलों, तेव्हां तुमची रस्त्यानें गांठ पडली म्हणजे मलाहि उभें राहून तुमच्याशीं बोलावेंसें वाटे. आणि तुम्हीहि पण हातांत खाऊ असला तर खाऊ, फुलें असलीं तर फुलें, मला देत असां, माझ्या पाठीवरून हात फिरवीत असां, आणि मी जेव्हां त्याहून मोठा झालों तेव्हां तुम्हांला आई म्हणण्यांत मला राग येईनासा झाला; इतकेंच नव्हे, तर उलट अभिमान व प्रेम वाटूं लागलें. पण पंधरा वर्षांच्या वयाचा झालों तेव्हां तुमची व माझ्या आईची, विनूची आणि माझी, जी एकदां ताटातूट झाली ती कायमची झाली !

"विनू तर गेलाच, पण तो गेला असें जेव्हां मला कळलें, तेव्हां काय असेल तें असो, त्याची जागा मीं मनानें घेतली व घेतली पाहिजे असेंहि मला वाटूं लागलें. त्या दिवशीं माझ्या तोंडांत पडलेली दुधाची धार मला अजून चांगली स्मरते. मुलीच्या पाठचा तुमचा विनू त्या वेळीं जन्मलेलाहि नव्हता. अर्थात् मी त्याचा थोरला भाऊ झालों. तो होता तोंपर्यंत मीं तुमची अधिक विचारपूस केली नाहीं, याचेंच मला दुःख वाटतें; पण विनू गेला आणि तुम्ही या गांवीं निराश्रित राहिलां आहांत असें मला कळलें तेव्हां कांहीं तरी मातृधर्माला जागावें असा मीं निश्चय केला आणि तुम्हाला मनीऑर्डर पाठविण्यास सुरुवात केली."

भिमाकाकू म्हणाल्या, "असें जर होतें तर आपलें सर्व नांव का नाहीं लिहिलेंत मनीआर्डरीवर ? 'भाऊ' एवढेंच टोपणनांव कां लिहिलेंत ?"

पाहुणा म्हणाला, "पुत्रपणाला जागावें, पण नांव कळविल्यानें ममतेच्या कृत्यांत कमीपणा येतो असें मला वाटलें. होतां होईतों गुप्तदान करावें असें वाटे."

भिमाकाकू म्हणाल्या, "तें कां ? गुप्तदान काय म्हणून ? मी जर तुमची आई आणि तुम्ही जर माझे मुलगे, तर मग गुप्तदान कां ?"

पाहुणा हसून म्हणाला, "पण तुम्हींहि मला गुप्तदानच केलें होतें नव्हे का ? मला मांडीवर घेऊन पाजलेंत त्या वेळीं मीं तुम्हांला ओळखून तोंड बाजूला करीन म्हणून माझ्या तोंडावर पदर टाकलात, आणि मी माझ्या आईचें

दूध समजून तुमचें दूध न कळत प्यालों! हें झालें तरी तुमचें गुप्तदानच नव्हे काय?"

पाहुण्याच्या या उत्तरानंतर कोणासच बोलवेना.

भिमाकाकू आणि पाहुणा दोघेंहि गहिंवरून रडूं लागलीं. फार काय? मीं व जगू दोघेंहि समरस होऊन रडूं लागलों.

दुसरे दिवशीं मी व जगू एकत्र जमलों, तेव्हां आम्हीं भिमाकाकूंचें वर्णन केलें तें कोणत्या शब्दांनीं म्हणून सांगूं? पण भिमाकाकूंपेक्षां पाहुण्याचेंच कौतुक आम्हांला अधिक वाटलें. भिमाकाकूंचा मुलगा गेला तरी त्याच्या जागीं दुसरा उभा राहिला. तेव्हां त्यांच्याविषयींची आमची काळजी दूर झाली. पण राहून राहून असें आश्चर्य वाटे कीं, त्या दुधाच्या एका धारेचा केवढा हा प्रभाव! मी तर जगूला म्हणालों कीं, "जगांत कृतज्ञता नाहीं असें म्हणतात. पण आतां ह्यापुढें तसें कोणीं म्हटलेलें ऐकलें तर, हीच गोष्ट मी त्याला सांगेन."

---

५ अलीगड किल्ल्यांतील एक रहस्य

गेले पंधरा दिवस हिमालयावर माजलेलें धुक्याचें तमोयुग संपून सूर्य बाहेर निघाल्यावर प्रकाशयुग अवतरलें. कोठें तळहाताएवढाहि ढग आकाशांत उरला नाहीं. एकंदर पक्षीगण घरटीं व इतर आश्रयस्थानें सोडून बाहेर स्वारीवर निघाला. पाऊस थांबला होता, तरी पूर्वसंचित ओसरण्याला कांहीं काळ लागतोच त्याप्रमाणें, डोंगरमाथ्यावरचें पाणी ओहोळांतून अजून झुळझुळ वाहतच होतें. अशा सुप्रसन्न वेळीं मीं व माझा वृद्ध स्नेही पंडित अयोध्याप्रसाद असे दोघे बाहेर पडलों. दोन आठवडे घरांतल्या घरांत बसून पाय आंखडले होते, त्यांची रग जिरविण्याकरितां चांगले दोन कोस हिंडलों व मग विश्रांति घेण्याकरितां तारादेवीच्या चौथऱ्यावर पाय सोडून गप्पा मारीत बसलों. अयोध्याप्रसाद म्हणाला, "गेले पंधरा दिवस हा पर्वत, या दऱ्या, यांना इंद्रानें जणूं काय बाटविलें होतें!"

मी म्हणालों, "मग आतां सूर्यानें त्यांना पुनः शुद्ध करून घेतलें म्हणावयाचें. पण त्यांना 'बाटविलें' होतें असें म्हणण्याचें कारण?"

अयोध्याप्रसाद म्हणाला, "त्यांचा नेहमींचा 'धर्म' स्वच्छ व प्रसन्नमुख राहण्याचा आहे म्हणून."

मी म्हणालों, "इकडे तुम्हां लोकांच्या डोक्यांतच शुद्धिसंघटनेच्या कल्पना आमच्यापेक्षां अधिक खोल गेलेल्या दिसतात. कारण तुमच्या उपमादेखील शुद्धिसंघटनेच्याच येतात. आमच्याकडे देखील या चळवळी सुरू आहेत; पण त्यांवरून उपमा, रूपकें सुचविण्याइतक्या खोल त्या अद्यापि गेलेल्या नाहींत."

अयोध्याप्रसाद म्हणाला, "त्यांतल्या त्यांत शुद्धीची कल्पना आमच्याकडे देखील कांहींशी नवीच आहे, पण बाटविण्याचा जुलूम मात्र फार जुना आहे."

यावरून याच विषयावर आणखी कांहीं गोष्टी झाल्या. शेवटीं तो म्हणाला, "बसल्या बसल्या वेळ जायला तुम्हांला एक गोष्ट सांगतों. ती माझ्या प्रत्यक्ष आजाची आहे. त्यानें माझ्या वडिलांना ती सांगितली व त्यांनीं ती मला सांगितली. पण गोष्ट तुमच्यावरूनच आठवली."

मी आश्चर्यानें म्हणालों, "आणि ती हो कशी?"

अयोध्याप्रसाद म्हणाला, "१८०२च्या सुमारास अलीगड मराठ्यांच्या स्वाधीन होता असें म्हणतात ना?"

मी म्हणालों, "त्या सुमारास असावा; पण वर्ष पक्कें लक्षांत नाहीं."

अयोध्याप्रसाद म्हणाला, "तें असो. गोष्ट अलीगडसंबंधाची आहे, म्हणून तुम्हां मराठ्या गृहस्थाला पाहून आठवली."

मी म्हणालों, "पाहा, कशास काय संबंध? अलीगड कुठें? तुम्ही कोण? मी कोण? योगायोग तो असा! असो. गोष्ट तर सांगा पाहूं!"

अयोध्याप्रसाद म्हणाला, "हीच तर या जगांत मौज! पुरांत वाहून आलेल्या काटक्याकुटक्या कुठल्याच्या कुठें येऊन भेटतात. गीतेंत म्हटलेंच आहे ना— 'यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महोदधौ'—"

मी उत्सुकतेनें म्हणालों, "तुमच्या वेदान्तांत गोष्ट विसरून जायची एखादी. तर ती आधीं सांगा पाहूं; नाहीं तर आपण घरापाशीं गेल्यावर 'समेत्य च व्यपेयातां तद्वत् भूतसमागमः' हा दुसरा चरण म्हणण्याची पाळी येईल!"

अयोध्याप्रसाद म्हणाला, "ठीक आहे. सांगतोंच तर. मात्र मी म्हणजे माझा आजाच समजा हां क्षणभर!"

मी म्हणालों, "कांहीं चिंता नाहीं. 'आत्मा वै पुत्रनामासीत्'. या वाक्या-ऐवजीं 'आजा वै पौत्रनामासीत्' असें गमतीनें म्हणूं."

"ठीक." असें म्हणून त्यानें तोंडांतला तंबाखूचा बार थुंकून टाकला आणि गोष्ट सांगण्याला प्रारंभ केला.

—१—

मध्यरात्रीची वेळ. समोर ओसाड अलीगड किल्ल्याचें पटांगण. मी एकटाच देवडीवर पहारा करीत बसलों होतों. सोबतीला फक्त वारा घोंघावत होता. पहिल्या रात्रीं झोप घेऊन सोबत्याला सोडवून पहारा घेतला. त्याला एकदोन घटकाच झाल्या होत्या. खडखडीत जागा होतों. यामुळें कल्पनातरंग मनांत एकामागून एक उठत.

एक वेळ वाटलें आमच्या कप्तानसाहेबांनीं या किल्ल्यावर उगाच पहारा ठेवला. आंत रक्षण कशाचें करायचें? शून्याकाराचें? मग वाटलें पहारा ठेवला तेंच बरोबर. किल्ला म्हणजे लष्करी ठाणें. दिवसारात्रीं माणूस जागतें हवें. मूळ किल्ला बांधला मुसलमानांनीं. त्यांच्यापासून तो पुढें मराठयांनीं घेतला. त्यांच्यापासून इंग्रजांनीं घेतला. अजून शत्रूच्या सैन्याच्या हालचाली आजूबाजूला होत होत्या. चुकून एखाद्या वेळीं दगा व्हावयाचा म्हणून पहारा ठेवला तोच बरोबर.

किल्ल्याच्या वेशीला मीं आंतून अडसर लावला होता. कोणी दार उघडण्याची भीति नव्हती. शिवाय चांदणें पिठासारखें पडलें होतें म्हणून सहज वाटलें मोकळया पटांगणांतून हिंडून पायहि थोडे मोकळे करावे.

पटांगणाच्या दोन बाजू हिंडून झाल्या. तिसऱ्या बाजूला निघालों व बुरुजाचा निम्मा भाग ओलांडला. इतक्यांत कांहीं तरी आवाज ऐकलासा वाटला. त्याबरोबर थबकून उभा राहिलों. कानोसा घेतला, तों आवाज खराच, भ्रम नव्हे. पण आवाज कसला? होय. कोणी तरी, कशानें तरी, कोठें तरी खणीत असावें. पण बुरुजाच्या पोटांतून आवाज निघतों हें कसें? तसाच पुढें गेलों. बुरुजाची अर्धप्रदक्षिणा पुरी झाली. इतक्यांत बुरुजाला एक दार दिसलें. दाराच्या बाजूला उभा राहून फटींतून पाहिलें तों एक पणती लुकलुकत असून तिच्या उजेडांत कोणी तरी कुदळ घेऊन खणीत होतें.

किती तरी कल्पना एकदम मनांत आल्या! कोणी सुरुंग खणीत अ
पण हल्ल्याची बोलवा नाहीं! कोणी चोरी करीत असेल; पण ओसाड कि
च्या बुरुजांत चोराला काय लभ्यांश? कोणी घर बांधण्याकरितां दगड
चोरून नेत असेल; पण त्यांना बाहेर काय तोटा! हां! कोणी एखादा
तर पुरीत नसेल? होय. याचा मात्र सर्वांत अधिक संभव! या विचारानें
थोडी भीति वाटली. बुरुजांतल्या निरुंद जागेंत युद्ध करण्याचा प्रसंग!
कमरेला तरवार होतीच. कांहीं असो. खणणाराचा पुरा शोध लावण
इच्छा मात्र अनिवार झाली. तरवारीच्या मुठीला हात घालून निघालों.
चाहूल लागतांच खणणारी आकृति किंचित् थांबली. तिनें इकडे ति
पाहिलें आणि मी आणखी थोडा पुढें जातांच ती भयंकरपणें किंच
धाडकन् खालीं पडली.

क्षणभर थांबून, किंचाळी ऐकून तिचा कोणी सोबती मागून येत आहे
काय हें पाहिलें, आणि कोणी येत नाहीं असें वाटल्यावर थेट पुढें गे
पाहतों तों एक स्त्री निश्चेष्ट पडली होती. आतां काय करावें? ही सावध
होणार? फेट्याच्या पदरानें वारा घालून पाहिला. फुकट! मला वा
देवडीवर माझा लोटा पाण्यानें भरलेला आहे तो आणावा आणि पाणी
डून पाहावें. म्हणून तसाच धांवत गेलों आणि लोटा घेऊन आलों.
चमत्कार असा झाला कीं, इतक्यांत पणती विझून अंधारगुडूप झाला होत
अंधारांत पुढें जावें तर, खरें बोलायचें म्हणजे, दग्याची भीति वाटली. पु
परत आलों. धुमी फुंकून काटक्या पेटविल्या. फेटा फाडून पलिता बनवि
आणि तो काठीवर खोंवून परत येऊन बुरुजांत शिरलों. पाहतो तों खणण्या
कुदळ तशीच पडली होती, पण ती आकृति मात्र अदृश्य झाली. आसप
पाहिलें तों एक ठेंगणें कवाड दिसलें, उघडावें म्हणून ढकललें तों तें बाहेर
बंद!

जिवाला चुटपुट लागली. जमीन दोन बोटांहून अधिक खणली नव्हत
वाटलें कीं, कदाचित् खणणारी व्यक्ति फिरून उद्यां येऊन आपलें काम
करूं पाहील. तसें झाल्यास गूढ उकलेल. मग तसाच देवडीकडे परत फिर
नंतरहि दीड प्रहरभर किल्ल्याच्या पटांगणांत पिठासारखें शुभ्र चांदणें पड
लेंच होतें. पण मला त्याची एक वेळहि आठवण झाली नाहीं. उजाडतां
पथारी गुंडाळून निघालों. सकाळीं पहाऱ्याची वर्दी देण्याकरितां हेडक्वार्टरक

घ्याटाकडे चाललों तों सर्व वाटभर मनांत काहूर माजलें होतें. वर्दी देतांना कप्तानसाहेबाला किल्ल्यांत रात्रीं दिसलेला प्रकार सांगूं कीं नको? अखेर मनाचा निर्णय झाला, कीं सांगूं नये, व फिरून तोच पहारा मिळाला तर पहावा.

तंबूंत कप्तानसाहेब तंबाखूची पाईप ओढीत बसला होता. त्यानें माझा सलाम घेतला व हसत विचारिलें—

"काय हरप्रसाद, तुझा किल्ला काय म्हणतो? वर्दी सगळी बरोबर?"

मी म्हणालों, "होय, साहेब." पण शब्दशः खोटें बोलवेना. मीं झट्दिशी कांहीं निमित्त करून तोंडच फिरविलें.

फिरून कप्तानसाहेब म्हणाला, "ठीक आहे. आज रात्रीं तूं पहारा कोणता घेणार?"

मला आयतीच संधि मिळाली. मी सहज बोलल्यासारखें दाखवून म्हटलें, "खावंद, कालच्याच पहाऱ्यावर जाण्याला माझी कांहीं हरकत नाहीं." तोंड म्हणालें, 'हरकत नाहीं,' मन म्हणत होतें, 'इच्छा आहे!'

कप्तानसाहेब म्हणाला, "ठीक आहे, तुझी इच्छा असेल तर तोच पहारा घे."

जवळच समीउल्ला पलटणीची डायरी लिहीत बसला होता. त्यानें आमचीं प्रश्नोत्तरें ऐकून हात थांबवून हळूच मान वर करून माझ्याकडे पाहिलें. रोज पहारा बदलण्याची रीत होती. मलाहि ती माहीत. असें असतां कप्तानसाहेबानें मला तोच पहारा फिरून दिला याचें त्याला आश्चर्य वाटलें नाहीं. पण मीं तो मागितला याचें त्याला विशेष आश्चर्य वाटलें असावें. कप्तानसाहेबाचें आश्चर्य न वाटण्याचें कारण साहेबाची माझ्यावर मर्जी होती म्हणून मीं मागितलेली ही साधी सवलत तो देणारच अशी त्याची खात्री होती. पण त्याला माझें आश्चर्य वाटण्याचें कारण हें असावें कीं, या ओसाड किल्ल्याच्या पहाऱ्याला जो जातो त्याला भीति वाटते व तो पहारा कांहीं कारणानें दिला तर हटकून टाकतो. समीउल्लाला आश्चर्य वाटलें, पण तो साहेबापुढें माझ्याशीं काय बोलणार? त्यानें कपाळाला खोल विचाराची आठी मात्र घातली.

समीउल्ला व मी एकदमच नोकरींत शिरलों होतों. त्यापूर्वीं त्याची माझी मैत्री असे. पण ती पुढें नष्ट होण्याचें कारण असें:—समीउल्ला हा प्रथम हिंदु

होता. त्याचें नांव तेव्हां रामभरोसी असें होतें. पण लष्करांत मोठी नोकरी मिळवून देण्याचें आमिष दाखवून एका मौलवीनें त्याला धर्मांतर करावयाला लावलें. पुढें नोकरी मिळाली, पण ती मोठी मिळाली नाहीं. मी हिंदु असतां मला जेवढी नोकरी मिळाली तेवढीच त्याला धर्मांतर करून मिळाली ! शिवाय लोक त्याची निंदा करूं लागले, गांवांत मान उरला नाहीं. 'ये देख अल्लाके प्यारे' असें म्हणून चावट लोक त्याची थट्टा करीत. 'धर्म घालवून काय मिळविलेंस ?' असें म्हणून माझें उदाहरण त्याला देत आणि पुढेंहि दैव असें कीं, मी वाढत जाऊन नाईक तरी बनलों आणि तो मात्र साधा शिपाईच राहिला. कप्तानसाहेबांच्या कृपेमुळें मला त्याला पाचचार वेळां वरिष्ठ म्हणून हुकूम करण्याचेहि प्रसंग आले. हें सर्व वैषम्य मनाला बोंचून त्यानें माझ्याशीं बोलणें जवळजवळ सोडलें होतें. जुनीच ओळख म्हणून क्वचित् सलामी घडे.

— २ —

असो. या दुसऱ्या रात्रीं फिरून मी पहाऱ्यावर गेलों. मध्यरात्र उलटल्यावर आदल्या दिवसाप्रमाणें त्या बुरुजाकडे निघालों.

बुरुजाकडे तोंड करून जात असतां वर पाहून मी एकदम दचकलों. कारण तटावर कोणा तरी मनुष्याची आकृति उभी असावी, असा मला भास झाला, पण निर्णय होईना. आणि शंकेच्या दारांतून भुतें आंत येतात हा अनुभवच आहे ! अलीगडच्या किल्ल्यांत भुताटकीचे प्रकार होतात, हें मला ऐकून ठाऊक होतें. तेव्हां तीच कल्पना मनांत कां न यावी ? तथापि भुतांखेतांना भिणारा हा गडी नव्हता, आणि मीं आंतल्याआंत मन घट्ट केलें. याचाच परिणाम म्हणून कीं काय, ती आकृति दृष्टिआड झाली. एक वेळ आकृतीची ठेवण— ढब समीउल्लासारखी वाटली. पण ती दृष्टिआड झाल्यावर तिचा अधिक विचार मी कशाला करूं ?

पण आज बुरुजांत शिरतांना मीं कालची चूक मात्र केली नाहीं. काल प्रथम त्या स्त्रीच्या दृष्टीला पडलों म्हणून ती एकदम घाबरली. आज दाराआड उभा राहून प्रथम आश्वासनपर शब्द मऊ आवाजांत उच्चारिले : "देवी माते, भिऊं नको." हे शब्द ऐकून ती स्त्री खणण्याची थांबली; पण घाबरली नाहीं. मलाहि इतकें आश्वासन पुरें झालें. मी बुरुजांत शिरलों व फिरून

तेच शब्द मीं आणखी एकदां उच्चारले. तेव्हां ती म्हणाली, "तुम्ही कोण आहां?"

मी—मी या किल्ल्याचा रखवालदार आहें.

ती—मीं तुमचा मोठाच गुन्हा केला, माफ करा.

मी—तुम्हीं माझा गुन्हा केला हें अगदीं खरें आहे. पण तुम्हीं येथें कशाला आलां व काय करीत होतां हें कळलें म्हणजे मग तुम्हांला माफी करतां येईल कीं नाहीं हें पाहीन!

ती—हा रे देवा! आज किल्ल्यांत यायला मला बंदी आहे. पण एक वेळ या किल्ल्यांतच माझें घर होतें ना!

मी—काय! तुम्ही या किल्ल्यांत राहात होतां?

ती—होय. जुन्या किल्लेदाराचे आम्ही नातलग होतों. मात्र आम्ही एका स्वतंत्र घरांत राहात होतों.

मी—म्हणूनच वाटतें तुम्हांला किल्ल्यांत शिरण्याची गुप्तवाट ठाऊक आहे?

ती—होय. लहानपणीं ती माझी लपंडाव खेळण्याची जागा होती. तीच प्रौढपणीं आज मला संकटकालीं उपयोगी पडली! रखवालदारसाहेब, किल्ल्या-वर तुमचा हक्क असो; पण माझ्या लहानपणच्या खेळाच्या जागेवर माझा हक्क नसावा काय?

मी—पण तुम्ही किल्ल्यांत परवानगीशिवाय शिरलां. इतकेंच नव्हे तर या बुरुजांतली जागा तुम्हीं खणली आहे ती कां?

ती—त्यांत माझे प्राण राखून ठेवले आहेत म्हणून!

मी—म्हणजे काय?

ती—तें तुम्ही मला अभय दिल्याशिवाय सांगणार नाहीं.

मी—पण मी या किल्ल्याचा रखवालदार असलों तरी मालक नाहीं हें तुम्हांला माहीत आहे?

ती—पण मी जें खणून नेणार होतें, त्यानें तुमच्या किल्ल्याच्या मालकाचें एका काडीइतकेंहि नुकसान होणार नाहीं, असें असलें तर मग अभय द्याल कीं नाहीं?

मी खरोखरच मोठ्या बुचकळ्यांत पडलों. कदाचित् या बाईचा ठेवा मोठ्या किंमतीचा नसेल; पण किल्ल्यांतील मिळकतीसकट किल्ला आतां इंग्रज सरकारच्या मालकीचा झाला आहे. तेव्हां त्यांतली एखादी काडी तरी हलवूं

देण्याचा मला काय अधिकार? तथापि मनाचा धीर करून मी म्हणालों, "ठीक आहे. अभय आहे, बोला."

ती—या जागेंत माझे पूजेचे देव ठेवले आहेत.

मी—काय? पूजेचे देव? इतके दिवस तुम्ही घरीं कशाची पूजा करीत होतां? आणि किल्ला सोडून जातांना तुम्ही ते बरोबर कां नेले नाहींत?

ती—जातांना देवांचें रक्षण व्हावें म्हणून तें इथें ठेवले. आज माझें रक्षण व्हावें म्हणून मी ते घेऊन जात आहें. पण तुम्ही मला खणतांना पाहिलें! आतां मला ते खणून नेऊं देणार? तुम्ही अभय दिलें तें खरें ना?

मी—होय, अभय दिलें तें खरेंच आहे; इतकेंच नव्हे, तर मीच जमीन खणून देव वर काढून तुमच्या स्वाधीन करतों. मला तुमची सर्व हकीकत ऐकण्याची फार उत्कंठा लागली आहे. पण आतां तितका वेळ नाहीं. या वेळीं मी आधीं तुमचें काम करून देतों. हकीकत मग कोठें तरी, केव्हां तरी ऐकेन.

असें म्हणून मीं अस्तन्या सारून हातांत कुदळ घेतली आणि तिनें पूर्वीं खणल्या जागींच खणूं लागलों. हें पाहून ती गहिंवरून रडूं लागली. "देव तुमचें कल्याण करो. माझा संसार तर संपलाच होता, पण उरला माझा धर्म तोहि जाणार होता, तो आतां वांचेल. देव तुमचं कल्याण करो!" असें वरचेवर म्हणून ती स्फुंदून रडूं लागली, आणि आपणहि मला कांहीं तरी मदत करावी म्हणून ती खणलेली माती हातांनीं बाजूला सारूं लागली.

सुमारें अर्धा तास खणल्यावर कापडांत बांधलेली एक पेटी लागली. ती वर काढून मी म्हणालों, "हीच का ती तुमची देवांची पेटी?"

तिनें झेंप घालून ती हातांत घेतली. कपाळाला हात लावून आंतल्या देवांना वंदन केलें व रडत रडत म्हणाली, "झालें, माझें काम झालें. आतां माझा धर्म वांचेल."

या तिच्या निष्ठावंत उद्गारांनीं माझी उत्कंठा अधिकच वाढली व मीं म्हणालों, "बरें, मीं आपलें वचन खरें केलें ना? आतां तुम्ही आपली हकीकत केव्हां सांगणार?"

इतक्यांत तटावर कोणीं तरी एखाद्या रंगेल गझलाची आवडती ओळ मोठ्यानें म्हटल्यासारखा आवाज आला. मी व ती दोघेंहि दचकलों. मीं म्हणालों, "बाई, आतां येथें अधिक वेळ राहतां येत नाहीं."

ती म्हणाली, "तटावर कोणीसें गाणें म्हटलें. तो माझ्या भावाचा आवाजसा वाटला; पण तो इथें कसा आला?"

मी म्हणालों, "तुमच्या भावाचें नांव काय?

ती म्हणाली, "हल्लींचें त्याचें नांव समीउल्ला असें आहे.

माझा हात एकदम कपाळाकडे गेला. पण मी घाईनें म्हणालों, "पण तुम्ही मला आपली हकीकत केव्हां सांगणार एवढेंच बोला, व एकदम निघून जा कशा.

ती म्हणाली, "मी रोज तिसऱ्या प्रहरीं भोलाघाटावरील देवळांत जात असतें. तुम्ही तेथें आलां तर मी माझी हकीकत सांगेन. असें म्हणून तिनें देवांची पेटी खांकेंत घेतली आणि उडी मारून ती भुयारी दारांतून निघून गेली.

मी क्षणभर गोंधळून गेलों, पण लगेच सावध होऊन पायांनीं भराभर कशी तरी माती खड्ड्यांत ढकलली आणि किल्ल्याच्या दरवाजाकडे परत आलों.

— ३ —

दुसरे दिवशीं सकाळीं मी नेहमींप्रमाणें कप्तानसाहेबांकडे वर्दी घ्यायला गेलों तेव्हां फिरून आदल्या दिवसासारखींच प्रश्नोत्तरें झालीं. फिरून रात्रीच्या पहाऱ्याचा प्रश्न निघाला. तेव्हांहि कप्तानसाहेबानें "तुला हवा तर तोच पहारा घे असें सांगितलें. पण काल समीउल्ला गप्प होता तो आज बोलूं लागला. साहेबहि खुषींत होते. समीउल्ला म्हणाला, "साहेब, अलीगडच्या किल्ल्यांत भुताटकी आहे. मी तर तो पहारा आपण दिला तरी नाहीं म्हणेन. पण हरप्रसादाला तोच पहारा कसा आवडतो याचें आश्चर्य वाटतें.

साहेब हसून म्हणाला, "सैतान का साथी सैतानहि होगा."

यावर बोलणें तितकेंच राहिलें. साहेब उठून जातांच समीउल्ला मला म्हणाला, "काय रे, हरप्रसाद तुला त्या ओसाड किल्ल्यांत भीति कशी वाटत नाहीं कोण जाणे! आम्ही पूर्वीं या किल्ल्यांत राहात होतों, तेव्हां रात्रीचें बाहेर डोकावण्याची आमची छाती होत नसे. बरें, पण एकदोन दिवसांच्या पहाऱ्यांत तुला कांहीं भूतबीत आढळलें कीं नाहीं?

मीहि दुहेरी अर्थानें म्हणालों, "होय बाबा! काल तुझ्यासारखें एक भूत तटावर गस्त घालीत होतें खरें."

हें ऐकून समीउल्ला चपापला व विषय बदलण्याकरितां म्हणाला, "पण तेव्हां तूं काय करीत होतास?"

मी म्हणालों, " त्याच्या गाण्याला खाली ताल देत होतों."

परत घरीं आल्यावर पुनः पुन्हा समीउल्लाचेच विचार माझ्या मनांत घोळूं लागले. मीं मनाला अनेक प्रश्न केले पण उत्तर मिळे ना.

तिसरे दिवशीं मी भोलाघाटावरील देवळाशीं गेलों. तों ती स्त्री तेथें पूर्वीच आली होती. तिनें मला आपली हकीकत सांगितली, ती पुढें कळून येईलच.

त्या रात्रीं फिरून मी पहाऱ्यावर गेलों. मध्यरात्रीनंतर माझे पाय आपोआप बुरुजाकडे चालूं लागले. खणलेली जमीन पुनः पूर्ववत् नीट करून ठेवावी, या कानाचें या कानाला न कळत हें सर्व प्रकरण संपवून मोकळें व्हावें, व फिरून हा पहारा मागूं नये, असें योजून पावलें मोजीत मी बुरुजाकडे चाललों. पण जागेशीं पोंहोचतों, तों दोन गोरे शिपाई संगिनी लावून दाराच्या तोंडाशीं उभे असलेले दिसले. मी दिसतांच त्यांनीं 'कोण आहे ?' असें विचारलें व मी माझें नांव सांगतांच, त्यांनीं मला कैद केलें.

दोन दिवसांनीं दवंडी देऊन कोर्ट मार्शल (कोटमास) भरलें. माझी चौकशी होणार असें मला वाटलेंच होतें. कोर्टानें माझी जबानी घेण्याला सुरुवात केली. माझ्यावर आरोप ठेवण्यांत आला कीं, किल्ल्यांत पहाऱ्यावर असतां बुरुजांत खणती लावून तेथील जवाहीर मीं काढून चोरून नेलें. मीं जबाबांत जवाहिराची गोष्ट नाकबूल केली; पण मीं जमीन खणली ही गोष्ट मात्र कबूल केली.

कोर्ट मार्शलचा मुख्य अधिकारी आमचा कप्तानसाहेबच होता. त्याची माझ्यावर मर्जी असल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. मीं आपला बचाव करावा म्हणून त्यानें अनेक प्रकारचे प्रश्न करून पाहिले. शेवटीं निरुपाय होऊन मला शिक्षा दिली. आतां मला शिपाई घेऊन जाणार इतक्यांत एक स्त्री धांवत व रडत पुढें आली, आणि तिनें कप्तानसाहेबांच्या पायांवर लोळण घेतली. समीउल्ला जवळच होता. तिला पाहतांच तो रागानें लाल झाला. साहेबानें न सांगतांहि तो तिच्या हाताला धरून मागें ओढून लाथा मारूं लागला व म्हणाला, " तूं पडदा टाकून बाहेर कां आलीस ? येथें तुझें काय काम ? "

कप्तानसाहेबाला आश्चर्य वाटलें. तो समीउल्लाला म्हणाला, " काय रे, ही स्त्री तुझ्या ओळखीची दिसते ? " तो म्हणाला, " होय साहेब, ती माझी बहीण आहे; पण ती शुद्ध पागल आहे."

साहेब दयाळु होता. तो म्हणाला, "थांब, तिला सोड. तिचें म्हणणें मला ऐकून घेतलेंच पाहिजे."

समीउल्ला बाजूला झाला. साहेब म्हणाला, "बाई, तूं इथें कां आलीस? येथें तुझें काय काम?"

ती म्हणाली, "माझें नांव उमा. या परोपकारी हरप्रसादाला माझ्याकरितां तुरुंगवास सोसावा लागणार म्हणून!"

साहेब म्हणाला, "मग तूं त्याचा तुरुंगवास कसा चुकविणार? तुझ्यापाशीं काय पुरावा आहे?"

असें म्हणतांच तिनें खाकेंतून कापडांत बांधलेली एक पेटी काढून साहेबापुढें ठेविली व म्हणाली, "हरप्रसादावर किल्ल्यांतील जवाहीर चोरल्याचा आरोप आल्याचें ऐकलें. पण ही पेटी! पाहा यांत काय आहे तें! परवां बुरुजांतून ही पेटी मींच रात्रीं खणून काढली. साहेब, तिच्यांत माझ्या पूजेच्या देवांखेरीज दुसरें कांहीं नाहीं."

साहेब म्हणाला, "तूं खरें बोलतेस कशावरून?"

उमा—या देवांचीच शपथ. मी सांगत्यें तें खरें आहे."

असें म्हणून ती रडूं लागली व हळूहळू कपडा सोडून, पेटी उघडून तिनें आंतले देव दाखविले. एक पंचायतन, अभिषेकपात्र, जपाची माळ, गंधाची थाटी व नैवेद्याची वाटी अशी सामग्री होती. जमलेले सर्व लोक आश्चर्यचकित झाले. समीउल्ला दांतओठ खाऊं लागला. कप्तानसाहेब म्हणाला, "बाई, भिऊं नको. काय असेल तें सर्व सांग." पण तिच्या तोंडांतून शब्द निघेना. ती भिऊन इकडेतिकडे पाहूं लागली. शेवटीं समीउल्लाकडे पाहून ती अडखळत म्हणाली, "सरकार, भिऊं नको तर काय करूं? माझी सर्व हकीकत सांगितली तर मी घरीं जिवंत परत कशी जाईन?"

साहेब म्हणाला, "ठीक आहे. तूं सांगूं नको, मी विचारतों. मग तर सांगायला हरकत नाहीं? तुझ्या जिवाला धक्का लागणार नाहीं."

उमा—मला सांगितलेंच पाहिजे तर मी खोटें कसें बोलूं?

साहेब—ठीक आहे, सांग तर. ही पेटी कोणाची?

उमा—माझी.

साहेब—तींत काय आहे?

उमा—माझे देव आहेत.

साहेब— ही पेटी कुठें होती ?

उमा—किल्ल्यांतल्या बुरुजांत पुरून ठेवली होती.

साहेब—कधीं ?

उमा—तीन वर्षांपूर्वी.

साहेब—कां पुरली होती ?

उमा—त्यांचा उच्छेद होऊं नये म्हणून. ते माझे आणि माझा भाऊ रामभरोसी याचे होते.

साहेब—तो भाऊ आतां कुठें आहे ?

उमा—जो आपणाजवळ उभा आहे तोच.

साहेब—याचें नांव तर समीउल्ला असें आहे !

उमा—तें त्याचें बाटल्यावरचें नांव आहे. पण मी त्याला त्या नांवानें कधींच हाक मारणार नाहीं.

साहेब—तो केव्हां बाटला ?

उमा—तीन वर्षांपूर्वी.

साहेब—तो कां बाटला ?

उमा—लष्करांत नोकरी मिळावी म्हणून !

साहेब—तुम्ही कुठें राहात होता ?

उमा—तीन वर्षांपूर्वी किल्ल्यांतच राहात होतों. पण इंग्रज सरकारच्या ताब्यांत किल्ला गेल्यावर आम्हांला बाहेर जावें लागलें.

साहेब--मग जातांना देव बरोबर कां नेले नाहींत ?

उमा—तो बाटला. त्याला देव काय करायचे ? मीं न्यावे तर तो म्हणे "तूं माझ्यासारखी बाटून जा. तुला मी जन्मभर कुठें पोसूं ? तूं बाटलीस तर तुझा पुनर्विवाह होईल. एखाद्या नबाबाच्या घरीं पडण्यासारखी सुंदर आहेस. तुझें आणि माझेंहि कल्याण होईल. न बाटशील आणि हे देव घेऊन बसशील तर ते विहिरींत फेकून देईन." म्हणून किल्ल्यांतून बाहेर पडण्यापूर्वीं मीं ते बुरुजांतल्या अंधारांत पुरून ठेवले.

साहेब—पण तुला तो काय म्हणून पोसणार होता ?

उमा—साहेब, दुर्दैवानें लहानपणींच मी विधवा होऊन बापाचे घरीं परत आलें.

साहेब—मग तूं भावाच्या म्हणण्याप्रमाणें कां वागली नाहींस ?

उमेला रागाचा झणकारा आला. ती म्हणाली, "तुम्ही माझ्या भावासारखेच निर्दय असाल असें वाटलें नव्हतें. मी धर्म सोडूं आणि पुनर्विवाह करूं? यापेक्षां उपाशीं मेलें तर काय वाईट? माझ्या भावानें धर्मांतर करून आपलें कोटकल्याण केलें आहे तेवढेंच पुरें!"

साहेब—बरें, पूर्वीं देव पुरून ठेवले ते आज उकरून काढण्याचें काय कारण?

उमा—मी बाटणार नाहीं असें म्हटल्यापासून रामभरोसीनें—

साहेब—कोणी? समीउल्लानें?

उमा—होय. त्यानेंच तोंडानें पुकारा करून दिला आहे कीं, मी बाटलेंच म्हणून. त्याचें ऐकून लोकहि तसेंच म्हणूं लागले. शेजारीपाजारीहि माझ्याकडे संशयानें पाहूं लागले. तेव्हां आतां त्यांची खात्री केल्याशिवाय सुटका नाहीं. म्हणून हे देव घेऊन पूजा मांडीन, तेव्हां लोकांची खात्री होईल कीं, मी हिंदुच आहे म्हणून!

साहेब—पण हे देव काढून नेण्यापेक्षां दुसरे देव विकत घेऊन कां नाहीं पूजा मांडली?

उमा—ते देव माझ्या वाडवडिलांपासूनचे आहेत. देवासारखे देव बाजारांत पुष्कळ मिळतात. पण ज्याचें तेंच त्याला. साहेब, मी आपणालाहि एक प्रश्न विचारूं का?

साहेबाला तिच्या धिटाईचें आश्चर्य वाटलें. पण त्याला उमाची करुणा आधींच आली होती; म्हणून तो म्हणाला, "खुशाल विचार."

उमा—साहेब, आपली आई जिवंत आहे कीं मेली?

साहेब निःश्वास टाकून म्हणाला, "होय बाई, दुर्दैवानें ती कधींच मेली."

उमा—मग आपण दुसरी एखादी आई विकत घेऊन तिच्यावर प्रेम कां करीत नाहीं?

साहेब हसला व ओशाळून म्हणाला, "बाई, तूं म्हणतेस तेंच खरें. जा, तुला तुझे देव घेऊन जाण्याची मोकळीक आहे."

उमानें देवांची पेटी खाकेंत घेतली. पण तिचा पाय तेथून निघेना. ती एकदां समीउल्लाकडे पाही, एकदां मजकडे पाही. तिच्या चेहऱ्यांत भीति व सहानुभूति यांची छटा स्पष्ट दिसत होती.

साहेबाला त्याचा उमज पडला. तो म्हणाला, “ भिऊं नको. मी समीउल्लाला तुझ्यासमक्षच ताकीद देऊन ठेवतों कीं, फिरून त्यानें तुला त्रास दिला तर त्याला मी नोकरींतून काढून टाकीन. जा.”

तरी तिचा पाय निघेना. आतां ती समीउल्लाकडे पाठ फिरवून माझ्याकडे पाहूं लागली.

साहेब म्हणाला, “ या हरप्रसादाबद्दल तुझें काय म्हणणें आहे ? ”

उमा—त्यांचा गुन्हा आपण त्यांना माफ करावा. त्यांनीं केवळ परोपकार केला. त्यांचे उपकार मी कसे फेडूं ?

साहेब—तें माझें मी पाहून घेईन. तुझ्या पूजेच्या कामांत जसें मीं बोलूं नये, तसेंच माझ्या सरकारी कामांत तूंहि बोलूं नयेस, हाच न्याय नव्हे का ?

उमा निरुत्तर होऊन म्हणाली, “ तर मग तुम्हाला देव बुद्धि देईल तसें करा.” इतकें बोलून साहेबाला लवून सलाम करून माझ्याकडे एक वेळ दुःखानें पाहून ती निघून गेली. ती जातांच साहेब मला म्हणाला, “ हरप्रसाद, आतां तरी तुझें म्हणणें काय आहे, बोल.”

मी म्हणालों, “ माझें कांहींच म्हणणें नाहीं. आपण दिलेली शिक्षा सोसायला मी तयार आहें. कारण आपल्या परवानगीशिवाय त्या बाईचे देव मीं उकरून काढून दिले. पण जवाहिराचा अपहार केल्याचा आरोप मजवर आला होता तो उडाला यांतच मला सर्व कांहीं मिळालें.”

साहेब—मला वाटतें तुझें तिच्यावर प्रेम आहे म्हणून ही गोष्ट तूं केलीस.

मी म्हणालों, “ तिला मीं जन्मांत प्रथमच बुरुजांत खणतांना पाहिली. होय, माझें तिच्यावर प्रेम जडलें आहे -- ” हे शब्द कानीं पडतांच समीउल्ला कावराबावरा झाला. पण मी लगेच पुढें म्हणालों, “ प्रेम आहे, पण भाऊ बहिणीवर करतो तें. या धर्मनिष्ठ स्त्रीचा भाऊ नष्ट झाला, तेव्हां त्याची जागा भरून काढून मीं तिला त्या वेळेपासूनच धर्माची बहीण मनानें मानली आहे.”

साहेब व समीउल्ला दोघांनींहि आपलीं तोंडें बाजूला फिरविलीं. पण क्षणांत साहेब माझ्याकडे वळून म्हणाला, “ ठीक आहे. तुझी शिक्षा मीं माफ केली. जा आपल्या उद्योगाला. परोपकाराचें फळ मनुष्याला देण्याचें काम कोणी ईश्वरावरच कां सोपवावें ? आणि त्याला पुढचा जन्म तरी कशाला ?”

इतक्यांत एक घोडेस्वार एक लखोटा घेऊन दौडत आला. आम्ही सर्व उभेच आहों, तोंच साहेबानें तो फाडून वाचला आणि म्हणाला, " हरसिंग, माझा आणि अलीगडचा संबंध आजपासून सुटला."

मीं आश्चर्यपूर्वक विचारलें, " काय, खावंद, अशी काय गोष्ट घडली ?"

साहेब म्हणाला, " माझी बदली मुझफरपुराला झाली. मला उद्यांच येथून निघालें पाहिजे."

मी म्हणालों, " बदली म्हणायला आपणाला येथें येऊन फार दिवस झाले नाहींत."

साहेब म्हणाला, " मला बढती मिळाली आहे, म्हणून बदली झाली."

मी अभिनंदन करण्याच्या इच्छेनें म्हणालों, " साहेब, तर मग परोपकाराचें फळ मनुष्याला याच जन्मीं मिळतें. पुढच्या जन्मापर्यंत वाट पाहावी लागत नाहीं, असें आपण नुकतेंच म्हणालां तें खरें तर ! उमाच्या बाबतींत माझ्या परोपकारापेक्षां आपला परोपकारच अधिक होय."

साहेबाची बदली झाली, हें ऐकून समीउल्लालाहि आनंद झाला, असें त्याच्या चेहऱ्यावरून दिसलें. पण त्याला आनंद कां बरें झाला असावा ?

— ४ —

असो. वरील संभाषण झाल्यावर साहेब घोड्यावर बसून निघून गेला. समीउल्ला माझ्याशीं कांहीं बोलला नाहीं. फक्त त्यानें मिशीला पीळ भरला.

मी घरीं गेल्यापासून सचिंतच होतों. बुरुजांतला प्रकार सर्व नीट निभावून गेला. पण उमाची वाट पुढें काय होणार ? तिचा पत्ता मला कसा कळणार ? तिनें आपले देव घेऊन पुढें काय केलें असेल ? तिच्या मागचा शेजाऱ्यापाजाऱ्यांचा त्रास चुकला असेल काय ?

दोन दिवस याच विचारांत गेले. तिसरे दिवशीं मी परेडीहून घरीं चाललों होतों. वाटेंत कांहीं फळफळावळ घ्यावी असें वाटून बाजाराकडे वळलों. एक बोळ ओलांडून दुसऱ्यांत शिरलों. इतक्यांत एका बैठ्या घरासमोर कोतवाल, कांहीं शिपाई व इतर अनेक लोक जमलेले दिसले. कोतवाल ओळखीचा होता. त्याला मीं विचारलें, " कोतवालसाहेब, ही काय गडबड आहे ?"

तो म्हणाला, " या घरांत अपघात झाला आहे. आंत चला. पाहा काय भयंकर प्रकार आहे तो."

मी व तो आंत गेलों. पाहतों तों रक्त्यावर उमा मरून पडली होती. तिच्या उरांत खंजीर खुपसला गेला होता व उपसलेला बाहेर जवळच पडला होता. तिचा हात एका पेटीवर होता. पण पेटी मोकळी होती ! हें पाहतांच माझ्या डोळयांतून घळकन् पाण्याच्या धारा आल्या.

हें पाहून कोतवाल म्हणाला, " या स्त्रीला तुम्ही ओळखतां काय ? बिचारी आपल्या जिवावर कां उदार झाली देव जाणे ! "

मी म्हणालों, " काय म्हणतां ? आत्मघात ! छेः ! भलतीच शंका ! " असें म्हणून कोतवालाला हाताला धरून मीं बाजूला नेला व त्याच्याशीं कानगोष्ट केली.

यापुढचें मीं सांगायलाच पाहिजे असें नाहीं. सर्व व्हावयाचें तें यथासांग झालें. मींहि लवकरच बदलून परगांवीं गेलों. पण दगडावर कोरून ठेवावी त्याप्रमाणें अलीगड किल्ल्यांतल्या पहाऱ्याची आठवण जन्मभर माझ्या हृदयांत अढळ राहिली !

---

६ कपड्यांची अदलाबदल

अगदीं कल्पना नसतां मनुष्यावर कसे अवचित अवघड प्रसंग येतात याचा माझाच एक अनुभव सांगतों ऐका.

महायुद्ध नुकतेंच जुंपलें असल्यानें लष्करभरती जोरांत सुरू होती. या लष्करभरतींत जुलूम कसे झाले हें प्रसिद्धच आहे. त्या काळांत–१९१५ साल असेल--ढवळापूर येथील माझ्या मित्राच्या निमंत्रणावरून चार दिवस त्याजकडे राहून परत यावें म्हणून मी निघालों. दिवस उन्हाळ्याचे. बरोबर अंथरूण-पांघरूण कांहीं घेतलें नव्हतें. फक्त अंगावरचे कपडे. खिशांत चार रुपये आणि हातांत एक काठी– इतक्या सरंजामानें निघालों.

स्टेशनपासून चार मैल गेल्यावर एक सुंदर तलाव दिसला. त्याबरोबर पोटांत भूक लागल्याची जाणीव झाली. अंगाला घाम आला होता म्हणून स्नान करण्याचीहि इच्छा अनावर होणारच. तेव्हां वाट सोडून तळ्याच्या कांठीं गेलों, आणि चांगला स्वच्छ खडक व त्यावर झाडाची सावली आहे

असें पाहून पाय पसरून बसलों. सुमारें पांच मिनिटें बसतांच थकवा गेला आणि त्या दरींतील सृष्टिवैभव पाहण्यांतच रममाण झालों. इतक्यांत पलीकडच्या बाजूला एक मनुष्य स्नान करून पाण्यांतल्या खडकावर बसून आपलें अंग चोळीत होता, तो मला हाक मारून म्हणाला, "कां पाव्हण ! इचार कसला करतायसा ? पाणी तरी कस अक्षी कावळ्याच्या डोळ्यावाणी हाय बगा. मला तर दिवसभर डुंबतच न्हावस वाटत ह्येच्यांत."

मला त्याचें आमंत्रण नकोच होतें म्हणा. पण त्यानें पाण्याचें वर्णन केलेलें ऐकून एरव्हीं उठलों असतों त्याच्या आधींच उठावेंसें वाटलें खरें. अंगांतले कपडे काढून उपरण्यांत गुंडाळून ठेवले. आंत लंगोट होताच. हळूहळू पाण्यांत उतरून चुळा भरून टाकूं लागलों. तेव्हां तो फिरून म्हणाला, "पवायला शिकला न्हाईंस जणूं."

हा नसता दोषारोप मी कसा ऐकून घेईन ? मी लगेच त्याला म्हणालों, "तें काय म्हणून ? असा सुंदर तलाव मिळाल्यावर मी बरा पोहायचा राहीन ?" मग पाण्यांत शिरून थोडेंसें पोहून झाल्यावर फिरून खडकावर बसून मीहि अंग चोळूं लागलों. तें पाहून तो म्हणाला, "काय राव झाल पवणं इतक्यांतच ! ह्ये पल्याडचं छोटं बेट तर बघा. कुणा हौशी गड्यानं त्येच्यांत बागशाईबी क्येली हाय लई नामी. आंब्याच्या कैऱ्या तरी कशा अक्षी कपाळाला बडवत्यात अन् खायला जस काय खोबर ! तळ्यांत पाणी काई खोल न्हाई. जातांना मधनं मधनं उभं ऱ्हायाला खडक बी हायती."

पाणी फार नाहीं असें त्यानें मुद्दाम सांगितलें. याचा अर्थ, फिरून मला चांगलें पोहायला येत नाहीं अशी त्याची समजूत झाली असावी. हा विचार मनांत येतांच, आंतून किंचित् राग आला आणि मी म्हणालों, "अहो, पाण्याची पर्वा कोण करतो ? मनुष्य एकदां पोहूं लागला, म्हणजे खालीं पुरुषभर पाणी काय आणि भालाभर काय सारखेंच. उगाच घामाचें अंग चोळून स्वच्छ करीत होतों इतकेंच. मी फिरून पोहायला पडणारच आहें."

अंग चोळून झाल्यावर फिरून पोहायला पडलों. समोरच तें बेट दिसत होतें, आणि त्यांतली झाडीहि सुंदर होती. खोबऱ्यासारख्या लागणाऱ्या कैऱ्यांचीहि आठवण होतीच म्हणा ! म्हणून तसाच पोहत पोहत बेटापर्यंत गेलों आणि ओल्या अंगानें झाडींत शिरलों. बेट कांहीं मोठें नव्हतें. शोभा पाहत पाहत दुसऱ्या टोंकापर्यंत गेलों. पण त्या गृहस्थानें वर्णन केलेली बाग-

शाही नाहीं. फार काय मनुष्याच्या वस्तीची खूणहि नाहीं, आणि त्या कपाळावर आपटणाऱ्या खोबऱ्यासारख्या लागणाऱ्या कैऱ्या तर राहोतच, पण आंब्याचें एक झाडहि शपथेला नाहीं !

हें ध्यानांत येतांच मन किंचित् चरकलें. "या परक्या माणसानें माझी अशी थट्टा कां केली ?" लगेच खिशांतल्या रुपयांची आठवण होऊन मी मनांत म्हणालों, "अरे हा कोणी चोरबीर तर नसेल ना ?" हा विचार मनांत येतांच पाय घाईनें चालूं लागले. एकदम पाण्यांत शिरून झपझप हात टाकून मी परत निघालों. निम्म्यावर गेल्यावर पाहतों तरी तो मनुष्य दिसेना. म्हणून आणखी थोडी घाई करून कांठावर येऊन पाहतों तों त्याच्या जागेवर तो मनुष्य नाहीं आणि माझ्या जागेवर माझे कपडे नाहींत! झालें! तोंडांत मारल्यासारखा फजीत झालों! पण करणार काय ?

कांहीं वेळ इकडेतिकडे हिंडल्यावर एका खडकाच्या सांधींत त्या मनुष्याचे कपडे आढळले. त्यावरून तो लष्करांतला शिपाई असावा असें ठरलें. तो कोणीहि असो, पण माझ्यापुढें प्रश्न असा येऊन पडला कीं, आतां हे त्याचे कपडे घालूं कीं नको ? पण ते घातल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. नुसती चड्डी-लंगोट घालून उघडाबोडका चाललों तर लोक मला वेड्यांत काढावयाचे ! तेव्हां शेवटीं असा निश्चय केला कीं, त्याचे हे कपडे घालावे, आणि एखादा गांव लागला म्हणजे कसे तरी नवे कपडे मिळवून हे फेकून द्यावे. बराच वेळ विचारांत घालवून शेवटीं कपडे अंगावर चढविले आणि पाहतों तों, बेटे अंगाला बरोबर बसलेहि ! जणूं काय माझ्या अंगावरच शिंप्यानें बेतून शिवलेले ! झालें, मी असा हा मारूनमुटकून शिपाई बनलेला पाहून मला मोठ्यानें हसूं आलें. पण पोटांत भूक लागल्यामुळें तलावावर वेळ न घालवितां फिरून ढवळापूरच्या वाटेला लागलों.

सुमारें कोस दीड कोस जमीन चाललों असेन. इतक्यांत समोरून दोघे लष्करी जवान आले. मला पाहतांच ते एकदम थबकले. एकानें मला हटकलें, "खबदार पुढें जाशील तर. आधीं तुझें नांव सांग !" दुसरा म्हणाला, "अरे, नांव विचारून काय उपयोग ? तो खरें नांव थोडेंच सांगणार आहे ! पण त्याच्या पलटणीचें नांव विचार. आसपास दुसरी पलटण नाहीं म्हणा. पण त्याच्याच तोंडानें न्याय होऊं दे." त्यावर खालील संभाषण झालें.

"मला काय पलटण माहीत ?"

तर मग हा पोषाख तुझ्या अंगावर कसा? लष्करांत नसलेले लोक असला पोषाख घालतात वाटतें!"

"नाहीं हो, हे कपडे माझे नव्हेत."

"मग चोरलेस वाटतें कोणा शिपायाचे?"

"नाहीं हो, मीं ते चोरलेले नाहींत."

"मग तुला कोणीं ते बक्षीस दिले कीं काय?"

"मला ते कोणी बक्षीसहि दिलेले नाहींत." यावर दोन फितीचा शिपाई म्हणाला, "अरे, बरोबर आहे; याचेच कपडे याच्या अंगावर आहेत. तेव्हां ते त्यानें चोरले नाहींत किंवा त्याला कोणी बक्षीस दिले नाहींत हें खरेंच आहे. बस्स. पकड याला आणि घेऊन चल. पलटणीचें नांव माहीत नाहीं म्हणतो, खोटी गोष्ट. पळून जाण्याकरितांच ही सर्व बतावणी आहे. चला. फरारी सांपडला, आपलें काम झालें."

लगेच माझ्या हाताला काढण्या बांधण्यांत आल्या व त्या दोघांबरोबर मीहि चाललों. पोटांत भूक खवळली होती, पण करणार काय?

सुमारें एक कोस गेल्यावर लष्करी तळ लागला. बरोबरच्या शिपायांनीं मला साहेबापुढें उभें केलें व सांगितलें कीं, पळून जाणारा हा 'रंगरूट' आपल्या हुकुमाप्रमाणें धरून आणला आहे. साहेबानें अधिक चौकशी केली नाहीं. माझें नांव देखील कोणी विचारलें–उच्चारलें नाहीं आणि 'आठ दिन कांजी हाऊस. डबल परेड. आगे इन्साफ!' अशी शिक्षा सांगून टाकून साहेब आपल्या कामाला निघून गेला. शिपायांनीं मला पहारेवाल्याच्या स्वाधीन केलें व तेहि निघून गेले. पहारेवाला मला अंधारकोठडींत घेऊन गेला. दिवस बुडण्यापूर्वीं एका लोखंडी थाळांत मला डाळभाकरी देण्यांत आली. भुकेमुळें ती खाऊन पाणी प्यालों आणि कांबळ्यावर पडून आजच्या दिवसाचें नवल करीत करीत झोपीं गेलों.

दुसरे दिवशीं सकाळीं मला परेडीला नेण्यांत आलें. इतर शिपायांबरोबर मीहि उभा राहिलों, पण कवाइतीच्या इंग्रजी शब्दांपैकीं मला एकहि माहीत नव्हता. कोठून असणार? नांगर व आसूड यांच्याशींच माझा संबंध! लष्करी शिपाई दिसला तर त्याच्याकडे गांवढळ माणसांच्या कौतुकानें पाहण्यापलीकडे मला लष्कराचा परिचय नव्हता. आज अंगावर प्रत्यक्ष लष्करी कपडे येऊन पडले, पण त्यामुळें कवाइतीचें ज्ञान थोडेंच येणार? कवाइतीच्या हुकुमाचे

शब्द ऐकून इतर शिपाई (अजून ते रंगरूटच होते) त्याप्रमाणें मागेंपुढें पावलें टाकीत; खालवर हात करीत. त्यांचें पाहून मग त्याप्रमाणें करावयाचें म्हणून मी सहजच मागें राही. पण कवाईत शिकविणाऱ्या सुभेदाराच्या लक्षांत हें तेव्हांच आलें. तेव्हां तो माझ्यावर रागावून ओरडूं लागला. मी खुलासा कसा करणार? फक्त गयावया करूं लागलों. तेव्हां शेजारचा दुय्यम अधिकारी म्हणाला, "सुभेदारसाहेब, हा इसम नुसतें ढोंग करतो आहे. त्याला लष्करांतून पळून जायचें होतें. लुच्चा मनुष्य आहे. त्याला मार दिल्यावर कवाईत आपोआप येईल." सुभेदार म्हणाला, "फरारी झाला होता तो इसम हाच काय?" असें बोलून त्यानें हातांतल्या छडीनें माझ्या पिंढऱ्यांवर दोन तडाखे दिले. पण नुसत्या मारानें विद्या थोडीच येते! तो दिवस तसाच गेला. दुसरे दिवशींहि तोच प्रकार. या दिवशीं मी काकुळतीला येऊन थोडें धैर्य धरून म्हणालों, "साहेब, माझी हकीकत तरी ऐकून घ्या." सुभेदार म्हणाले, "हकीकत मला कशाला? आतां तुझा इन्साफ होईल, तेव्हां साहेबालाच काय हवें असेल तें सांग. माझें काम फक्त कवाईत शिकवावयाचें आहे." त्याहि दिवशीं रागानें त्यानें माझ्या पायांवर दोन छड्या मारल्याच. तिसरे दिवशीं माझ्यामुळें इतर रंगरूटांची कवाईत बिघडते, असें पाहून "दोनतीन दिवसांत आणखी रंगरूट धरून आणतील त्यांच्याबरोबर याला उभा करीत जा." असें सांगून सुभेदारानें माझा नाद सोडला, तीन दिवसांनीं आणखी पंधरा नवे रंगरूट आले, तेव्हां त्यांच्याबरोबर मला अगदीं पहिल्यापासून कवाईत शिकविण्याला सुरुवात झाली.

कोठडींत पडल्यापडल्या मी दररोज रात्रीं विचार करीं कीं, कुणाच्या तरी हृदयाला दया येईल तर पाहावी आणि खरी हकीकत सांगून सुटका करून घ्यावी. पण कवाइतीच्या वेळेशिवाय मला बाहेरच काढीत नसत; आणि कवाईत चालली असतांना बोलण्याची मनाई! नवे आलेले रंगरूट मोकळे असत; पण मला मात्र बंदी. कारण माझा इन्साफ व्हावयाचा होता. या नव्या रंगरूटांपैकींहि कांहीं माझ्यासारखे दुर्मुखलेले व मनांतून दुःखीकष्टी दिसत. पण कांहीं आनंदांत व खुषींत होते. अंगावरच्या लष्करी पोषाखाकडे पाहून कांहींना दुःख होई तर कांहींजण त्यामुळें ऐटीनें झुलत चालत, मधूनमधून आपल्या अंगाकडे आणि छातीकडे मान मुरडून पाहात, आणि मिशांवरून हात फिरवीत.

मग एके दिवशीं एक नाईक सुटीच्या वेळीं, माझ्या कोठडीच्या बाहेरच्या बाजूला, छायेंत भिंतीला टेकून स्वस्थपणें चिलीम ओढीत बसला होता. त्याच्या चेहऱ्यावरून तो भलाहि दिसत होता. तेव्हां मोठा धीर करून मीं त्याला म्हटलें, " नाईकसाहेब, आपणांशीं दोन शब्द बोलूं का ?" तो म्हणाला " ठीक आहे. बोल तुला काय बोलावयाचें तें. तेव्हां त्याचें माझें खालील-प्रमाणें संभाषण झालें:—

" नाईकसाहेब, आपण दयाळु दिसतां; आपण माझी दाद घ्याल काय ?"

" बाबा, लष्करच्या कारभारांत दया, मायाबिया कांहीं एक नसतें. येथें नुसता हुकुमाचा—शिस्तीचा कारभार !"

" पण शिस्तीच्या मुळाशीं कांहीं न्याय तरी पाहिजे !

" तुझ्यासारखीं माणसें आधीं स्वतः चुका करतात आणि मग अन्याय, अन्याय म्हणून लोकांच्या नांवानें हाक मारीत बसतात."

" पण नाईकसाहेब, मीं खरोखर कांहींच चूक केली नव्हती."

" तुला रंगरूट म्हणून धरून आणला, तेव्हां तूं कागदावर अंगठा उठवून कां दिलास ? बरें, अंगठा उठवून दिलास तर शिपायाची नोकरी पुरी करायची होतीस. मिळाला असता डिस्चार्ज चारदोन वर्षांनीं ! हें युद्ध कांहीं जन्मभर चालत नाहीं. कशाला गेलास पळून ? भोग आतां कर्माचीं फळें !"

" नाईकसाहेब, अहो ! देवाशपथ मीं कागदावर अंगठा उठवून दिलेला नाहीं. मला वाटेंत पकडून आणलें आणि त्या दिवसापासून बघा मला कोठडींत ठेवून दिलें आहे. मला माझें नांवगांवहि कुणी विचारीना ! मग माझा अपराध खरा कीं खोटा याची चौकशी कोण करणार ?"

" काय वेडा ! अरे, असें धडधडीत खोटें तरी बोलूं नकोस. तुला वाटेंत उगीच पकडून आणलें तर हे लष्करी कपडे तुझ्या अंगावर कुठून आले ?"

" हां, नाईकसाहेब, मुद्द्याचाच प्रश्न केलात. हे कपडे माझे नव्हेत. चुकून माझ्या अंगावर आले."

" झोपेंत कुणीं तुझ्या अंगावर घातले जणूं !"

" नाहीं. मींच ते अंगावर घातले. पण माझे कपडे चोरीला जाऊन त्यांच्याऐवजीं हे दुसरे तिथें चोरानें ठेवले. दुसरे कपडे अंगांत घालायला

नव्हते म्हणूनच हे घातले आणि आतां कुठें तरी जाऊन नवे घेऊन घालीन आणि हे फेकून देईन अशा विचारांत होतों इतक्यांत धरणें आलें."

"बाबा! तूं काय वाटेल तें सांगशील, पण तुझ्यावर कोणी भरंवसा ठेवावा? चोराच्या हातीं लष्करी कपडे जायला ते काय असे वाटेवर पडले आहेत, का ते बाजारांत मिळतात?"

"पण माझा चोर हाच तुमचा फरारी मनुष्य असला तर त्याच्याजवळ लष्करी कपडे असणारच."

"अस्सं! एकूण फरारीपणाच्या गुन्ह्याला चोरीची जोड असेल बाबा! नाहीं कोणी म्हणावें? पण तूं असा गाफील कसा?"

"हां नाईकसाहेब. आपण बरोबर विचारलेंत. पण मी सगळी हकीकत सांगतों ती ऐकून घ्याल ना?

नाईक म्हणाला "सांग तर."

तेव्हां त्याला मीं इत्थंभूत हकीकत थोडक्यांत सांगितली. ती ऐकून घेऊन तो कांहीं न बोलतां निघून गेला, पण दुसऱ्या दिवशींहि पुनः त्याच वेळीं नाईक त्याच जागीं येऊन बसला व तोच होऊन मला म्हणाला, "तुझें नांव काय?" मी म्हणालों, "माझें नांव संताजी जाधव." तेव्हां तो म्हणाला, "तूं सांगतोस हेंच नांव खरें असेल तर, तुझी हकीकतहि खरी असावी."

मी म्हटलें "तें कशावरून?"

नाईक म्हणाला, "मी सकाळीं मुद्दाम रजिस्टर पाहून आलों. त्यांत फरारी इसम म्हणून ज्याच्या नांवापुढें शेरा पडलेला आहे त्याचें नांव संताजी जाधव असें नाहीं. सदू कदम असें आहे."

मी म्हणालों, "माझें नांव मला माहीत! पण नाईकसाहेब, माझी हकीकत जर खरी आहे असें तुम्हांला वाटतें तर माझी सुटका होण्याला तुम्ही मदत नाहीं का करणार?"

नाईक म्हणाला, "तूं म्हणतोस तें सारें खरें. तुझी मला दया येते, पण मी तरी काय करणार? खरा फरारी सांपडला तर मग तुझी सुटका होण्याचा कांहीं तरी संभव. पण न सांपडला तर आयता नगाला नग मिळालेला. आमचा साहेब कशाला तुला सोडील? नांव कांहीं का असेना? एकाच्या जागीं दुसरा. पण त्याचें काम झालें. ह्या भागांत पन्नास रंगरूटांची भरती झाली पाहिजे, असा वरच्या साहेबाचा हुकूमच आहे. तेव्हां सदू कदम

नसला तरी संताजी जाधव चालतो; आणि उद्यां तर तुझी चौकशी होणार. तेव्हां तुझें हें काम मला कठीण दिसतें. पण तुझा अंगठाबिंगठा खराच घेतलेला नाहीं ना ? म्हणजे बोलायलाच नको."

मी म्हणालों, "माझा अंगठाबिंगठा कांहीं घेतलेला नाहीं. मी फरारीच समजून सगळे चालले आहेत. कोणी नुसतें नांव काय असें विचारील तर शपथ !"

नाईक म्हणाला, "लष्करभरती म्हणजे सगळाच जुलमाचा मामला सुरू आहे. नांव कोण विचारणार आणि कशाला ? हातांत बंदूक द्यायला दोन पायांचा माणूस उभा करतां आला म्हणजे काम झालें. असो. पण त्यांतूनहि कांहीं सुचलें तर पाहीन. नुसती खरी हकीकत सांगून निभाव कितीसा लागणार तें दिसतेंच नाहे. पण दैवावर हवाला ठेवून बैस. याहून मी अधिक काय सांगणार ?"

इतकें बोलून नाईक निघून गेला. तो बोलला तेंच खरें होतें. कारण अशा स्थितींत दैवावर हवाला ठेवण्यापेक्षां माझ्या हातीं दुसरें कांहींच नव्हतें.

त्याच दिवशीं संध्याकाळीं एका शिपायानें येऊन माझ्या कोठडीचा दरवाजा उघडला. त्याच्याबरोबर एक इसम होता त्याला त्यानें 'येथें पडून राहा' असें म्हणून दटावून आंत लोटून दिला आणि दाराला कुलूप घालून तो निघून गेला. अंधार पडत चालल्यामुळें मला त्या इसमाचें तोंड दिसलें नाहीं. पण तो लष्करी पोषाखांत नव्हता, इतकें साधारण वाटलें. रात्रीं सुमारें नऊ वाजतां कँपांत जिकडेतिकडे सामसूम झालें. तेव्हां तो इसम मला हलक्या आवाजांत हाक मारून म्हणाला, "पाव्हण, तुमच्याशीं दोन गोष्टी बोलायच्या आहेत. बोलूं का ?"

मी म्हणालों, "बोल बाबा. एकट्यानें वेळ जात नव्हता म्हणूनच ईश्वरानें सोबत पाठविली असें दिसतें."

इतकें आश्वासन मिळाल्याबरोबर त्यानें येऊन माझे पाय घट्ट धरले आणि दीनवाणा आवाज काढून म्हणाला, "पाव्हण, मला माफ करा. मीं तुमचा मोठा गुन्हा केला."

मला यांतलें कांहींच उमगेना. मी म्हणालों, "माफी करण्याच्या आधीं तुम्ही कोण, आणि तुम्हीं माझा गुन्हा काय केला, हें तर सांगाल कीं नाहीं ?"

त्यावर तो म्हणाला, "तुमचा काय गुन्हा केला, हें सांगायला फारशी लांब हकीकत सांगायलाच नको. सहा दिवसांपूर्वीं तळ्यावर तुमची गांठ पडली होती. एवढ्यावरूनच मी कोण आणि तुमचा गुन्हा काय केला हें आपोआपच कळून येईल."

मी आश्चर्यानें थक्कच झालों. हा मनुष्य माझ्याच कोठडींत अवचित कसा आला याची कांहींच कल्पना चालेना. मी इतकेंच म्हणालों, "गुन्हा तर खराच, पण त्या तुमच्या गुन्ह्यानें लष्कराच्या कायद्याचे एकाऐवजीं आपण दोन गुन्हेगार झालों. देवानें तुम्हांला माझे कपडे घेऊन जाऊन आपले ठेवण्याची बुद्धि कां दिली हें सांगाल काय?"

तो म्हणाला, "काय सांगूं बाबा? माणसावर जन्मांत कधीं कधीं प्रसंगच तसे येतात. मीं साऱ्या जन्मांत कोणाच्या सुतळीच्या तोड्याचाहि अपहार केला नाहीं. तुमच्या कपड्यांची चोरी केली हें मात्र खरें. पण त्याचें कारणहि तसेंच होतें."

मी म्हणालों, "माझी कुचेष्टा करण्याची तर तुम्हांला लहर आली नाहीं ना?"

तो म्हणाला, "मी तुम्हांला भेटलों त्या वेळीं माझ्या मनाची स्थिति काय होती हें काय सांगूं? मनांतलें दुःख दाबून ठेवून मी संभावितपणानें धूर्तांची करणी तुमच्याशीं कशी केली याचेंच मला आश्चर्य वाटतें."

मी म्हणालों, "तुमचें मन तुम्हांलाच माहीत. मला काय माहीत? तुम्ही सांगाल तीच हकीकत खरी."

तो म्हणाला, "तुम्ही विश्वास ठेवा किंवा न ठेवा, पण मी सांगतों यांतलें अक्षरहि खोटें नाहीं. माझें नांव सदू कदम. एक महिन्यापूर्वीं मला अधिकाऱ्यांनीं जबरीनें आणून लष्करांत दाखल केलें, आणि माझा अंगठा घेऊन माझें नांव शिपायांत दाखल केलें. लष्करांत नोकरी करण्याचें मला वाईट वाटत नव्हतें. नोकरी काय कोठें तरी करायचीच; पण घरीं म्हाताऱ्या आईला दुखणें आलें होतें. तिच्याकरितां औषध आणायला म्हणून बाजारांत गेलों तों तिथेंच मला पकडून नेलें. मीं साहेबाला होईल तितकें समजावून सांगितलें कीं, 'मला लष्करांत तुम्हीं दाखल करून घेतलें तर नोकरीहि करीन, पण घरीं आई मरायला टेकली, तिला तांब्याभर पाणी द्यायलाहि कोणी नाहीं, तिचें आतां काय होईल? म्हणून मला सोडा. नाहीं तर

रजा द्या. मी जातों, आईची सेवा करतों. जगली तर तिची परवानगी घेऊन आनंदानें परत येतों; आणि मेली तर मग मला जगांत कशाची काळजीच उरली नाहीं. मी परत येऊन इमानानें नोकरी बजावीन!' पण रंगरूटांची भरती करणाऱ्या साहेबाला हें काय होय? त्यानें माझें धड बोलणेंहि ऐकून घेतलें नाहीं. तेव्हां मींहि निश्चय केला कीं, सांपडेल त्या युक्तीनें पळून जावें, मग काय होईल तें होईल! त्याप्रमाणें एके दिवशीं संधि साधून रात्रीचा मी कोठडीचे गज काढून पळून गेलों आणि धरणें येईल म्हणून आडमार्गानें गांवीं चाललों. पण अंगावरचे लष्करी कपडे चहाडखोर! त्यांची भीति मनांत एकसारखी वाटत होती. इतक्यांत सुदैवानें तळ्यांत आंघोळीला उतरलों असतां तुम्ही तिथें आलांत आणि तुम्ही कपडे उतरून ठेवलेले बघतांच चोरीची कल्पना मनांत आली. कल्पना कसली? ईश्वरी प्रेरणाच ती! कारण त्या चोरीमुळें आईचें मरण्यापूर्वी मला दर्शन तरी झालें. तुमचे कपडे मीं चोरलें तेव्हां नुसती चोरी केली इतकेंच मन खात होतें. पण आतां तुमच्यावर हें नसतें संकट आलें असें पाहून माझ्या मनाला अधिकच दुःख होत आहे. तुमच्या कपड्यांमुळें मला आईची भेट घेतां आली. आतां मी मरणालाहि भिणार नाहीं; आणि माझे प्राण देऊन देखील तुमची सुटका करतां आली तर करीन."

इतकें बोलून तो कोंवळ्या मनाचा मनुष्य रडूं लागला व खरोखरच त्यानें आपल्या अश्रूंनीं माझे पाय भिजविले.

त्याची ती प्रेमळ भावना पाहून मी आपलें संकट विसरूनच गेलों व त्याला म्हणालों, "बाबा, तूं दुःख करूं नको. लष्कराच्या कायद्यांत आपण दोघेहि सांपडलों खरे, तेव्हां समदुःखीच म्हणावयाचे. तूं वाईट वाटून घेऊं नकोस. फरारी म्हणून मला शिक्षा झाली तरी मी सोशीन; आणि लष्करी नोकरी बोकांडीं बसलीच तर तूं आणि मी आनंदानें करूं."

यावर तो म्हणाला, "मीं उद्यां खरी हकीकत सांगितली म्हणजे तुम्हांला त्यांनीं सोडूनच दिलें पाहिजे. एक फरारी झाला तर त्याची शिक्षा दोन माणसांना काय म्हणून? असें मी साहेबाला हडसूनखडसून विचारीन."

मी म्हणालों, "तुम्ही काय वाटेल तें सांगाल, पण तुमचें ऐकणार कोण? असो. मला आधीं हें सांगा कीं, तुम्हांला मीं ओळखलें नाहीं, पण मला तुम्हीं ओळखलेंत हें कसें?"

तो म्हणाला, " ही सर्व नाइकांची कृपा. मला पकडून आणलेल्या महारानें नाइकापाशीं गुदरलें, तेव्हां त्यानेंच आपण होऊन मला एकदम विचारलें, 'काय रे, तुझें नांव सदू कदम का ?' मी 'होय' म्हणतांच त्याला आनंद झाल्यासारखा दिसला व तो म्हणाला, 'गड्या, भली केलीस! सुखासुखी दुसऱ्याच्या घराला आग लावायची विद्या कुठें शिकलास? ज्याचे कपडे चोरलेस तो इसम पाहा त्या पलीकडच्या कोठडींत संकटांत पडला आहे. तुला त्याच्याच कोठडींत नेऊन कोंडणार आहे. उद्यां काय होईल तें होईल, पण आज आधीं त्याची माफी माग.' पण आतां उगाच बोलत बसण्यांत अर्थ नाहीं. मी सांगतों एवढी गोष्ट प्रथम करा म्हणजे मला समाधान वाटेल."

मी म्हणालों, "ती काय?"

तो म्हणाला, त्या दिवशीं तळ्यावर जशी आपण कपड्यांची अदलाबदल केली तशीच आतां येथेंहि करूं."

मी म्हणालों, "त्याची घाई कशाला? सकाळीं काय होईल तें पाहूं."

पण तो म्हणाला, " मी एक क्षणभरहि थांबणार नाहीं. त्या दिवशीं तुमची चोरी केली त्याच्या भरीला आज तुमच्यावर जुलूम करतों असें वाटलें तर म्हणा; पण आधीं तुमचे ते लष्करी कपडे उतरा, मला द्या आणि हे तुमचे परत घ्या."

या इसमानें सुचविलेल्या या युक्तीनें सुटकेची कांहीं तोड कदाचित् निघेल असें वाटून मी कबूल झालों. पण अडचण अशी आली कीं, दोघांच्या अंगावर कपडा एकेकच. मध्यें तिसरा कपडा असल्याशिवाय अदलाबदल कशी व्हावयाची? पण तो हसून म्हणाला, "येथें सगळा अंधारच आहे, कोण कोणाला पाहतो? मी आपले कपडे उतरून तुम्हांला देतों, तुम्ही आपले उतरून मला द्या." अंधार सहजच आमच्या उपयोगीं पडला; आणि पूर्वीं तळ्यावर भर दिवसा कपड्यांची पहिली अदलाबदल झाली, त्याच्या उलट आज तुरुंगांत पुनः दुसऱ्यांदा झाली. पूर्वीं पाण्यानें व आज अंधारानें उपवस्त्रांचें काम केलें असें म्हणून या योगायोगाचें आम्हां दोघांनाहि खूप हसूं आलें.

कांहीं वेळानें मी त्याला म्हणालों, "कपडे ज्याचे त्याला मिळाले खरे; पण तुमच्या आईची हकीकत पुढें काय झाली?" तो म्हणाला, "तुमच्या

कपड्यांनीं माझ्यावर मोठा उपकार केला. त्यांनींच माझ्या आईची गांठ पडूं दिली. लष्करी कपडे टाकून साध्या कपड्यांत असल्यावर मला एकदम कोण ओळखणार? हे तुमचे कपडे अंगावर घातल्याबरोबर धांवतच घरीं निघालों. आई मरायला टेकली होती आणि खरोखरच तिला तांब्याभर पाणी द्यायला कोणी नव्हतें. मीं लष्करांत गेलों असें तिला कळलें तेव्हां मी मेलों असेंच घेऊन ती चालली होती. मग मी फिरून दृष्टीस पडल्यावर तिला किती आनंद झाला असेल, याची तुम्हीच कल्पना करा. त्यापुढें ती तीन दिवस जगली. पण त्या अवधींत तिला होणाऱ्या असह्य वेदनांबद्दल ती एक शब्दहि बोलली नाहीं. शुद्ध जाईपर्यंत 'माझा बाळ परत आला. मी आतां सुखानें मरेन,' एवढेच शब्द ती वरचेवर बोले आणि माझा हात जो तिनें धरून ठेवला होता तो तिला झोप लागल्याशिवाय किंवा बेशुद्धि आल्याशिवाय तिच्या हातून मला सोडवून घेतां येत नव्हता. मीं आपल्याकडून पुष्कळ उपचार केले. पण मी लष्करांत गेलों हें ऐकल्याबरोबर तिनें जें अंथरूण धरलें तें मी परत गेलों तरी सोडलें नाहीं; इतका तिला जबर धक्का बसला होता. मीं तिला वाटेल तें खोटें सांगितलें व असेंहि म्हणालों कीं, 'मला आतां यापुढें लष्करांत परत जावयाचें नाहीं. मी पुष्कळसा पगारहि बरोबर आणला आहे. तूं आणि मी खुशाल राहूं.' पण त्याचाहि कांहीं उपयोग झाला नाहीं व शेवटीं माझें नांव घेत घेत तिनें प्राण सोडला!"

इतकें बोलून तो स्तब्ध बसला व कांहीं वेळानें मला पुनः म्हणाला, "या जगांत मला एकटी तीच होती. मला संसारांतलें दुसरें कोणीहि माणूस नाहीं. तेव्हां मी आतां मरणाला सुद्धां भिणार नाहीं. मग लष्करी शिक्षेला कसा भिणार?"

मी म्हणालों, "तरी पण तुझी आयती सुटका झालेली, तिचा फायदा घ्यावा कीं नाहीं? कोठें चार दिवस दुसऱ्या मुलुखांत गेला असतास म्हणजे झालें होतें. मला सोडविण्याला कशाला आलास?"

त्यावर तो म्हणाला, "मी खोटें कशाला बोलूं व मानभावीपणा कशाला करूं? केवळ तुमची सुटका करावी म्हणूनच मी कांहीं परत आलों नाहीं. एक तर तुम्ही पकडले जाऊन या संकटांत पडलां असाल अशी मला कल्पनाहि नव्हती. पण मी आपल्या पायांनीं परत आलों याचें खरें कारण

विचाराल तर आईचेंच प्रेम! मरणापूर्वी तिची गांठ पडावी म्हणून मी पळून गेलों आणि तिचें उरलेलें कार्य नीट व्हावें म्हणून परत आलों!"

मी म्हणालों, "गड्या, मला हें नीट समजत नाहीं. तुम्ही परत आल्यानें तिचें उरलेलें कार्य कसें शेवटाला जाणार?"

तो म्हणाला, "सांगतों ऐका. आई मेली त्याच दिवशीं महारानें गांवांत दवंडी पिटविली, कीं सदू कदम म्हणून कोणी लष्करचा शिपाई फरारी झाला आहे. त्याला जो कोणी धरून देईल त्याला वीस रुपये बक्षीस मिळतील! मीं आईला 'पुष्कळ पगार बरोबर घेऊन आलों म्हणून सांगितलें;' पण खरोखर माझ्या खिशांत एक पैसाहि नव्हता. तुमचे कपडे घातले त्यांत रुपये होते; पण ते मी ईश्वराचें नामस्मरण करून तेथेंच ठेवले. ते तुम्हाला सांपडलेच असतील."

मीं म्हणालों, "होय, सांपडले; आणि म्हणूनच मी मोठ्या बुचकळ्यांत पडलों कीं कपडे चोरून न्यावेत, पण त्यांतले रुपये काढून ठेवावे हें काय गौडबंगाल? बरें पुढें?"

तो म्हणाला, "पुढें खिशांत पैसा नाहीं हें लक्षांत आल्याबरोबर मला आई मेल्यापेक्षांहि अधिक दुःख झालें. तेव्हां मींच होऊन पाटलाला बोलावूं पाठवलें आणि तो आला तेव्हां त्याला म्हणालों, 'पाटीलबुवा, जिच्याकरितां मी लष्करांतून पळून आलों ती गेली. आतां मी आपल्याच पायांनीं लष्करांत परत जाणार. पण एवढी कृपा करा कीं, मला धरून गांवकामगाराबरोबर लष्करांत पोंहोचता करा.' हें बोलणें ऐकून तो सहजच बुचकळ्यांत पडला. तेव्हां त्याला मीं सांगितलें कीं, 'आतांच तुमच्या महारानें दवंडी दिली.' पाटील म्हणाला, 'मग त्याचें काय? तुम्ही आपल्या पायांनीं गेल्यावर मला धरून पाठवायला कशाला पाहिजे?' मी म्हणालों, 'बक्षिसाच्या वीस रुपयांकरितां! पाटील म्हणाला, 'अशीं बक्षिसें मिळविण्यापेक्षां मी पोटांत कांटे भरीन! लष्करांत लोक कसे धरून नेतात याची मला पुरी माहिती आहे!' तेव्हां मी म्हणालों, 'पाटीलबुवा, बक्षिसाचे रुपये तुम्ही घ्या, असें मी म्हटलें नाहीं.' तो म्हणाला, 'तर मग बक्षिसाचें काय बोलतां?' मी म्हणालों, 'ही माझी आई मरून पडली आहे. हिला जाळण्याला मजजवळ एक पैसाहि नाहीं. तेव्हां मी गेल्यावर मागें ते बक्षिसाचे रुपये तुम्हाला तिच्या कार्याला होतील.' पाटील भला माणूस होता; तो मला म्हणाला, 'लोकांना धरून देऊन बक्षीस मिळवून

त्यांतून कोणाचें धर्मकृत्य करावें इतका मी नादान नाहीं. समजा, माझीच आई मेली असती तर मीं काय केलें असतें ?' असें म्हणून त्यानें चावडीच्या शिपायाला हाक मारली, कनवटीचे रुपये काढून त्याला दिले व पुढची व्यवस्था कानांत सांगून त्यानें त्याला पाठवून दिलें आणि तो मला म्हणाला, 'बाबा, माझा धर्म मीं केला. तुझा धर्म तूं कर. मी तुला परत जाहि म्हणत नाहीं व राहाहि म्हणत नाहीं; आणि राहिलास तरी पकडून देत नाहीं. एका आईच्या पोटीं जन्माला आल्यानें जसे दोघे भाऊ होतात, तसेंच एका आईला स्मशानांत पोंहोचविण्यानेंहि दोघे भाऊ होतात. तुमची आणि माझी आई गेली तरी तुम्ही व मी आतां भाऊभाऊ उरलों आणि आपला जन्म असे तोंवर हा ऋणानुबंध आपण पाळूं.' आईच्या दुःखानें रडण्याचा मी थांबलों होतों. पण पाटलाचा हा भलेपणा पाहून, आई मेल्यावर भाऊ भावाला प्रथम भेटला म्हणजे जसें त्याला दुःख होतें, तसेंच मला फिरून झालें. ओक्साबोक्शीं रडलों आणि सुतकी होतों तरी पाटलाला मीं कडकडून आलिंगन दिलें. पण त्याच्या ऋणांत राहूं नये हाच माझा धर्म म्हणून स्मशानांतून तसाच इकडे निघालों आणि पाटलाला इतकेंच म्हणालों कीं, 'आईच्या अस्थींची वाट कशी लावावी, हें भावानें भावाला सांगायला नकोच.' झालें. मीं होऊन गांवचा महार बरोबर घेतला आणि पाटलानें धरून पाठविला अशी बतावणी करण्याच्या निश्चयानें इकडे आलों. पण येथें येऊन पाहतों तों माझें नशिब थोर. कारण मीं पूर्वी तुमचे कपडे चोरल्यानें तुमच्यावर जें संकट आणलें तें स्वतः हजर होऊन कपड्यांची अदलाबदल केल्यानें तें टळेल असें वाटून आतां मनाला सुखच होतें."

इतकें बोलून तो स्तब्ध बसला. त्याच्यानें पुढें बोलवेना. तेव्हां मीच त्याला म्हणालों, "बाबा, या जगांत इतका भलेपणा असेल आणि इतका प्रेमळपणा असेल अशी मला कल्पना नव्हती. तूं माझ्या संकटाबद्दल यत्किंचितहि काळजी करूं नकोस. माझ्या नशिबीं असेल तर मी सुटून जाईन, नाहींतर शिक्षा भोगीन आणि लष्करांत दाखलहि होईन. त्याचें एवढें संकट कसलें ? पण पाटील जसा तुझा भाऊ झाला तसा मीहि तुझा भाऊ झालों नाहीं का ? पाटील तुझ्या आईच्या स्मशानयात्रेला उपयोगीं पडला. पण मी तर तुला तिची शेवटची भेट घेण्याला उपयोगी पडलों कीं नाहीं ? झालें तर ! भावाशिवाय असें एकमेकांच्या कोण उपयोगीं पडतें ?"

हें माझें मनमोकळें भाषण ऐकून त्याला फार आनंद झाला. पण आलेलें संकट यापलीकडे निवारण्याचें त्याच्या किंवा माझ्या हातीं कांहींच नसल्यामुळें मी म्हणालों, " आतां आपण सुखानें झोप घेऊं."

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आठ वाजतां नाईक आमच्या कोठडीपाशीं आला व हसतच म्हणाला, " गारुडी एक रुपयाचे दोन रुपये करितो, तसें आमच्या एका कोठडींत आज एका फराऱ्याचे दोन फरारी झाले ! "

इतक्यांत आम्हीं एकमेकांनीं एकमेकांचे कपडे बदलले ही गोष्ट त्याच्या लक्षांत आली. तेव्हां तो हसून म्हणाला, " शाबास, तुम्ही आधींच माझें निम्में काम केलेंत." आणि त्यांतल्या त्यांत माझ्याकडे वळून तो म्हणाला, " संताजी, तुझी सुटका करण्याचें जमलें तर पाहतों. पण एक गोष्ट तूं करावी कीं, मी साहेबांपुढें जें काय करीन त्यांत तूं मध्यें बोलूं नये. एवढेंच नव्हे, तर मीं तुला शिव्या दिल्या, मारलें, काय वाटेल तें केलें, तरीहि ओठ मिटून गप्प बसलें पाहिजे."

मला याचा कांहींच अर्थ कळेना. पण नाइकाचा हेतु चांगला म्हणून पुढें तोंड मिटायचें तें आधींच मिटून घेतलें आणि खुणेनें म्हणालों, " चला, माझी तयारी आहे."

कॅंपाच्या हपिसांत साहेब खुर्ची टाकून चौकशीला बसला होता. नाइकानें सदू कदमाला पुढें केला व मला किंचित् मागें उभा केला व तो म्हणाला, " साहेब, सोनगांवचा पाटील फार हुशार. त्यानें हा फरारी रंगरूट धाडून दिला आहे."

साहेब खुषींत येऊन म्हणाला, " बहोत अच्छा." त्यानें रजिस्टरचें पान उघडलें आणि ज्याच्यापुढें फरारी असा शेरा लिहिला होता तें नांव मोठ्यानें उच्चारून म्हणाला, " सदू कदम कोण ? तूंच ? " तेव्हां सदू म्हणाला, " होय साहेब. मीच फरारी झालों होतों."

पण साहेबाला अधिक खुषींत आणण्याकरितां नाईक म्हणाला, " साहेब, नुसत्या नांवावर काय जातां ? चेहरेपट्टी तपासली तरी त्यांत काय फरक पडणार ? सदू तो सदूच."

तेव्हां साहेबाला आपलें काम पक्कें झालें असें वाटून तो थाटानें म्हणाला, " लष्करांतून पळून आल्याबद्दल सदूला आणखी आठ दिवस अंधारकोठडी द्या ? "

इतकें झाल्यावर साहेब माझ्याकडे पाहून म्हणाला, "क्यौं नाईक, हा दुसरा इसम कोण?"

तेव्हां नाइकानें लगेच मोठ्या रागाचा आविर्भाव आणला आणि हातांतल्या छडीनें माझे पाय सडकीत तो म्हणाला, "हा कोणी सदूचा भाऊ त्याला सोडवायला म्हणून येथें आला होता. एकदां रंगरूट आम्हीं पकडल्यावर याच्या बापालाहि काय सोडतों? साहेब, रदबदली करण्याला आलेले लोक असेच आम्हांला नेहमीं त्रास देतात; त्यांना अशीच शिक्षा केली पाहिजे."

असें म्हणून त्यानें आणखी चार छड्या माझ्या पायांवर ओढल्या. त्या इतक्या जोरानें लागल्या कीं, मी अगदीं कळवळलों, आणि त्या दुःखानें माझ्या सुटकेचा आनंदहि क्षणभर खाऊन टाकला. छड्या देऊन झाल्यावर नाइकानें मला मोठमोठ्यानें चार शिव्या हांसडल्या, स्वतः चार धक्के दिले, आणि शेजारच्या शिपायाला तो म्हणाला, "जा, याला धक्के देऊन एकदम हद्दीच्या बाहेर घालीव." साहेब पुनः म्हणाला, "बहोत अच्छा किया." दाद ना फिर्याद!

आठ दिवस कोठडींत राहिलों काय? फरारी ठरलों काय? चौकशी झाली काय? आणि मी सुटलों काय? कोणी एकानें तरी आठ दिवसांत मला नांव विचारायचें होतें किंवा माझी चेहरेपट्टी पडताळून पाहायची होती. रंगरूट खात्यांत तेव्हां अशीच अंदाधुंदी होती. पण या सर्वांचा विचार करायला मी तेथें राहतों कशाला? नाइकाचे आभार मानण्याला थांबेन म्हणावें तर त्यानें आधींच ताकीद देऊन ठेवली होती. इमानी प्रेमळ सदूला भाऊ म्हणून एकदां कडकडून भेटावें असें मनांत आलें, पण तें तरी कसें घडणार? पण या विचारांनाहि वेळ नव्हता. कारण शिपायानें मला धक्के देत ढकलीत ठाण्याच्या हद्दीपर्यंत आणून सोडलें होतें. तेव्हां मी सदूला आणि नाइकाला तेथूनच मनानें नमस्कार केला आणि घरीं परत आलों.

घरीं आल्यावर घरचे भाऊ व बाहेरचे चार सोबती जमवून सर्व हकीकत सांगितली. मी घरून निघालों तो स्नेह्याच्या गांवीं जाण्याकरितां. म्हणून चारांचे आठ दिवस होऊन मी परत आलों नाहीं तरी त्याची त्यांना काळजीच नव्हती. पण मी झालेला हा सगळा प्रकार जेव्हां सांगितला, तेव्हां आश्चर्यानें हसून त्यांची मुरकुंडी वळली. असो. त्या आठ दिवसांत मी कवाइत. . काहीं

नाहीं म्हटलें तरी चार धडे शिकलों होतों. ' लेफ्ट राइट ' कळूं लागलें होतें. तेव्हां खेडवळ स्नेह्यांना संध्याकाळीं हुरडा खायला बोलावून ते आल्यावर त्यांना मीं म्हटलें, " गड्या हो, चला आतां मी तुम्हांला लष्करची कवाईत शिकवितों."

पण माझ्यासारखेच ते सगळे ठोंबे ! ओळींत एक उभा राहील तर शपथ; आणि राइट म्हटलें कीं, डावा पाय व लेफ्ट म्हटलें कीं उजवा पाय पुढें टाकीत. तेव्हां मी हसून म्हणालों, " गड्या हो, लष्कराच्या गोष्टी कांहीं फुकटच्या नाहींत ! " असें म्हणून माझ्या पायांना हात लावून पुन्हा म्हणालों, " कवाईत यायला अशा छड्या खाव्या लागतात. "

पण मीं मात्र छड्या कोणालाच दिल्या नाहींत. डिसमिस् ! एवढा आणखी एक शब्द पाठ झाला होता तो उच्चारला, पण कोणीच जागचा हालेना. तेव्हां श्राद्धांतल्या पिंडांप्रमाणेंच आपल्याच हातांनीं सर्वांना मागेंपुढें केलें आणि लष्करभरतीच्या गोष्टी बोलत घरीं परत गेलों !

७ शृगाल-संमेलन
अथवा
मनुष्य व कोल्हा

नव्या दिल्लीची लोकसंख्या सरकारी कागदोपत्रीं काय लागली आहे माहीत नाहीं. परंतु माझ्या दप्तरांत ती " चार हजार मनुष्यें व दोन हजार कोल्हे " अशी मांडलेली आहे.

आज चार वर्षें मी नव्या दिल्लींत दरसाल दोन अडीच महिने मुक्काम करीत असतों. यामुळें माझा व नव्या दिल्लींतील या दुसऱ्या रहिवाशांचा पुष्कळच परिचय झालेला आहे. संध्याकाळीं बाहेरून फिरून परत घरीं येतांना यांची गांठ पडली नाहीं असा एकहि दिवस जात नाहीं. मात्र त्या वेळीं त्यांचें माझें संभाषण होत नाहीं. ते व मी अगदीं एकमेकांजवळूनहि जातों, पण तिसऱ्या कोणी ओळख करून दिल्याशिवाय परक्यांशीं बोलावयाचें नाहीं, हा

जो साहेब लोकांचा शिष्टाचार तोच हे कोल्हेहि आम्हां मनुष्यांशीं पाळतात. तथापि, साहेबांशीं न बोलतांहि जसें इंग्रजी येऊं शकतें तशीच कोल्ह्यांशीं प्रत्यक्ष न बोलतां त्यांची भाषा मला समजूं लागली आहे.

रात्रीं आठ वाजले न वाजले कीं, यांचें आपापसांतील संभाषण सुरू होतें आणि रात्र जसजशी वाढत जाते तसतसा यांच्या संभाषणाला अधिक जोर चढतो. कामधाम करून रात्रीं अंथरुणावर पडलों असतां झोप लागेपर्यंत यांचें संभाषण कानांवर एकसारखें येत असतें आणि कोणतीहि भाषा कानांवरून एकसारखी जात असल्यास ती समजूं लागते, हें प्रसिद्धच आहे.

असो. परवां शिवरात्रीच्या दिवशीं हें भाषाज्ञान मला फार उपयोगी पडलें. त्याचा प्रकार असा:—भोलानाथ जो शंकर त्याची जडीबुट्टी सेवन करण्याचा प्रघात उत्तर हिंदुस्थानांत सर्व लोकांत असतो. ज्या देशांत जावें त्या देशांतला आचार पाळावा ही रीतच आहे. त्याप्रमाणें मींहि शिवरात्रीच्या दिवशीं थोडीशी भांग घेतली. आम्हां दाक्षिणात्यांना सवय नाहीं म्हणून दूधसाखर व बदाम इत्यादि मसाला पुष्कळ घातला होता. तथापि, घोटा तयार करणाराला भांगेचें प्रमाण बरोबर माहीत नसल्यानें त्यानें थोडी चूक केली व त्यामुळें ती आम्हां पिणारांच्या पुष्कळशी अंगावर आली.

रात्रीं नऊ वाजतां उष्मा बराच वाटूं लागला. अंथरुणावर पडलों, पण झोप येईना. डोकें फिरूं लागलें. काळीज दणदणा धाव घालूं लागलें. एका दिव्याचे दोन दिवे दिसूं लागले. जिभेला कोरड पडली. तोंडानें शब्द निघे, पण कानांना तो ऐकूं येईना. यामुळें मी काय बोलतों हें माझें मलाच कळेना. बंगल्यांतले कांहीं लोक कावरेबावरे होऊन मजकडे पाहूं लागले व कांहीं हसूं लागले. तेव्हां हवा घेण्याकरितां अंगणांत जाण्याला म्हणून अंथरुणावरून उठलों, पण घेरी घेऊन पुन्हा अंथरुणावरच पडलों. त्यानंतर सकाळीं जागा होईपर्यंत मी कोठें होतों व काय केलें हें मला नक्की माहीत नाहीं. पण या अवधींत घडल्यासारखा एक प्रकार, सकाळीं उठून हिंडूंफिरूं लागल्यावरहि, माझ्या डोळ्यांपुढें चित्रासारखा उभा राहिला. तें स्वप्न म्हणावें, कीं जागृतींतला अनुभव म्हणावा हें ठरविणें कठीण! माझें कोडें मलाच सुटेना, तर दुसरा कोण सोडविणार? तथापि, तें चित्र वाचकांपुढें मांडल्यास त्यांची करमणूक होईल, या विचारानें खालील हकीकत देत आहें.

मला वाटलें कीं, मोकळी हवा घेण्याकरितां मी अंगणांत गेलों व कंपाउंडाच्या दारांतून बाहेर पडलों, तों एक कोल्हा दाराच्या बाजूला अंधारांत उभा होता. त्याचें शरीर झांकलें होतें, पण अंधेरांतून त्याचे ते पिवळेनिळे डोळे चमकत, तें पाहून मी थबकलों. तेव्हां कोल्हा म्हणाला, "काय दोस्त ! असें बिचकतां कां ?" कोल्ह्यांची भाषा मला समजते असा माझा पूर्वीपासून समज होता. त्याचा आतां अकल्पित अनुभव येतांच मी आश्चर्यानें प्रथम स्तंभित झालों. पण या भाषाज्ञानाच्या प्रचीतीचा मला अनिवार आनंदहि झाला व लगेच आमचें संभाषण सुरू झालें.

मी त्याला म्हणालों, "गड्या, तुझीमाझी पूर्वीं कोठें तरी गांठ पडली असावी असें वाटतें; खरें का ?"

तो म्हणाला, "जुन्या ओळखीशिवाय मी नेमका तुमच्याकडेच कसा येईन ?"

"गांठ कधीं, कुठें पडली असावी बरें ?"

"पंधरा दिवसांपूर्वीं तुम्ही व तुमचे स्नेही चांदण्यांत फिरायला निघालां होतां. तोंडानें आम्हां कोल्ह्यांविषयीं तुमच्या गप्पा चालल्या होत्या. तुम्ही धिटाईनें हातांतली काठी मूठ धरून गरगर फिरवीत होतां. इतक्यांत आमच्या जातीचेंच नांव निघाल्यामुळें मी जरा पुढें झालों. मला पाहून तुम्ही व तुमचे स्नेही दोघे दोन दिशांना धांवलां, आहे का लक्षांत ?"

कोल्ह्यानें सांगितलेला प्रकार खरा होता. खूण चांगलीच पटली. आमच्या मित्रेपणाची त्यानें दिलेली ही साक्ष ऐकून मी मनांत खजील झालों. पण उसनी ऐट आणून मित्रेपणावर सारवण घालण्याकरितां म्हणालों, "समोरासमोर अवचित आलेल्यांनीं एकमेकांना वाट द्यावी ही रीतच आहे."

पण कोल्हाहि आम्हांला पाहून पळाला होता हें आठवून मी म्हणालों, "पण गड्या, तूंहि धावत बाजूला गेलास याचें काय कारण ?"

हें ऐकून कोल्हा हसून म्हणाला, "तुमच्या प्रश्नाचें माझें उत्तरहि तुम्हींच देऊन टाकलें आहे. संभावितपणाला कोणी भीतीहि म्हणूं शकेल; पण माणूस आणि कोल्हा दोघांची भावना एकच असणार ! पण हा भलताच विषय निघाला. मी आलों तो तुम्हांला आमच्या संमेलनाला बोलाविण्याकरितां. येतां का ? रोज तुमची सभा त्या मोठ्या वाटोळ्या इमारतींत भरतच असते. पण राव, आज आमची तरी सभा एक दिवस पाहा."

" सभा कोठेंशी भरणार आहे ? "

" दूर पलीकडे त्या बाभळीच्या बनांत."

अमावास्येच्या आदल्या दिवसाचा काळोख. लांब बाभळीच्या वनांत आड-रानांत जावयाचें आणि कोल्हे मंडळींशीं गांठ. म्हणून तोंडानें 'होय' असा शब्द एकदम येईना. पण नवीन भाषाज्ञानाच्या हौसेमुळें जावें असेंहि वाटे.

माझ्या मनांतला तो गोंधळ पाहून कोल्हा म्हणाला, " काय दोस्त, शंका कशाची आली ? आमच्या इमानाचा विश्वास तुम्हांला पटत नाहीं असें दिसतें एकूण !; मी मात्र तुमचा विश्वास धरून तुमच्या दाराशीं आलों."

झालें. विश्वासाच्या भेटीला विश्वासाची परतभेट दिलीच पाहिजे, असें मनाशीं ठरवून मी म्हणालों, " छेः छेः असें कसें होईल ? चल, मी तुमच्या संमेलनाला अवश्य येतों. पण गड्या, माझ्या चालीबरोबर तुझी चाल तुला ठेवली पाहिजे. मला तुझ्यासारखे धांवतां येत नाहीं, तसेंच आज भांग घेतल्यामुळें डोकें भ्रमत आहे. तरी वाट चालतांना तुला माझ्याशीं बोलून करमणूक करावी लागेल."

कोल्हा म्हणाला, " ठीक आहे. आतां मनुष्यांची रहदारी थांबली आहे. तेव्हां रस्त्यावरून तुमच्याबरोबर सावकाश चालत जाण्यांत धोका नाहीं. शिवाय तुम्ही बरोबर आहांतच ! ! "

इतकें बोलणें झाल्यावर आम्ही वाट चालूं लागलों. प्रथम मी म्हणालों, " खरंच, गड्या, तुझें नांव काय बरें ? "

" मला जंबू म्हणतात !"

" तुम्हां कोल्हे लोकांतहि नांवें असतात तर ? "

" नसायला काय झालें ? कोठेंहि झालें तरी जितक्या मूर्ति तितकीं नांवें असायचींच !"

" जंबू या नांवाचा एक राक्षस पूर्वी होता."

" त्यांत काय आहे ? कोल्हे या आडनांवाचीं मनुष्येंहि आहेत, असें मीं ऐकलें आहे. नांवाची अदलाबदल त्रिखंड त्रिकाळ होतच असते. आमच्या जातींतल्या कांहीं लोकांना त्यांच्या पापकर्माबद्दल 'तुम्ही पुढच्या जन्मीं मनुष्यें व्हाल,' असा शाप झाडावरून फिरता आश्रम ठेवणाऱ्या एका लालमुखी तापस मुनीनें दिला. मग दुःख होऊन उःशाप मागितला, तेव्हां

त्यांना असें सांगण्यांत आलें कीं, ‘मनुष्यजन्मांत तुम्ही कोल्हे हें नांव धारण केलें म्हणजे तुमचें दुःख हलकें होईल.’ ”

बाजू माझ्या अंगावर आली असें पाहून मी म्हणालों, “मनुष्यजात कोल्ह्याहून श्रेष्ठ कीं नीच हें कसें समजावें? पण एवढें खरें कीं, आम्हां लोकांत लुच्चेगिरीची उपमा द्यावयाची असली म्हणजे कोल्ह्याची देतात!”

जंबू म्हणाला, “ठीकच आहे. आमच्या जातीच्या बुद्धिमत्तेचा लौकिकच तसा आहे. पण राव, आमच्या कोल्हीभाषेंत ‘मूर्ख’ किंवा ‘अधम’ असें विशेषण लावावयाचें असलें तर काय म्हणतात माहीत आहे काय?”

“नाहीं. मला माहीत नाहीं. मला तुमची कोल्हीभाषा समजते, पण पुरी समजत नाहीं. त्याला बेवकूफ किंवा कदाचित् गाढव असें म्हणंत असाल!”

“छेः, गाढव हा किती झालें तरी उमदा प्राणी! त्याच्याप्रमाणें धन्याच्या घरचें न खातां धन्याची सेवा कष्टाळूपणानें करणारा दुसरा कोण आहे? त्याची उपमा माणसाला कशी द्यावी? दोस्त, आमच्या भाषेंत अत्यंत मूर्ख किंवा अत्यंत नीच कोल्ह्याला ‘तो अगदीं मनुष्य आहे’ असें आम्ही म्हणतों.”

फिरून बाजू अंगावर आली. नंतर जंबू म्हणाला, “आमच्या जातीवरून तुमच्या मनुष्यी-भाषेंत आणखीहि कांहीं असेच शब्द आले असतील!”

“होय. कोल्हेकुई असाहि आणखी एक शब्द आहे.”

“त्याचा काय अर्थ?”

“त्याचा अर्थ सर्वांनीं मिळून किंवा एकानेंच व्यर्थ खूप मोठमोठ्यानें ओरडून गलगा करावा व दुसऱ्याला भांबावून गोंधळून सोडावें.”

जंबू एखाद्या भाषासंशोधकाच्या ऐटीनें म्हणाला, “एका जातीवरून दुसऱ्या जातीच्या भाषेंत शब्द घेतांना नीट लक्ष पुरविलें जात नाहीं, असें दिसतें. कारण आम्ही कोल्हे लोक जें ओरडतों तें उगीच– व्यर्थ नसतें; किंवा दुसऱ्याला गोंधळून सोडण्याचा त्यांत उद्देश नसतो. आतां संमेलनांत हें तुम्हांला दिसून येईलच.”

असो. अशा रीतीनें आम्ही बोलतबोलत वाट चालत होतों. थोड्या वेळांत गाडीचा रस्ता सुटून आडरानांतली वाट सुरू झाली. अशा रानांतून चालण्याचा सराव नसल्यानें मी म्हणालों, “जंबू, सडक नाहीं तर नसो, पण पाऊलवाटेनें तरी चल.”

हें ऐकून जंबू हसूं लागला. तो म्हणाला, "मनुष्याच्या पाऊलवाटेनें गेलों कीं, आमचा घात झालाच. म्हणून मुद्दाम पाऊलवाट सोडून चालतों. पाऊलवाट याचा अर्थ पावलानें मळलेली वाट असा नाहीं, तर आम्हीं पावलांनीं प्रत्यक्ष चालत गेलों ती वाट. शिवाय आम्ही एका वाटेनें दोनदां कधीं जातच नाहीं. यामुळें आमच्या पावलांनीं वाटहि मळत नाहीं!

मी थोडा रेंगाळलेला पाहून जंबू मागें वळून म्हणाला, " कां? पायांत चढाऊ मजबूत जोडे तर आहेत; मग असें कचरतां कां वाट चालतांना?"

जंबू थोडेंसें लावूनच बोलला असें वाटून मी रागानें म्हणालों, " गड्या, तुझें ठीक आहे. ईश्वरानें तुझ्या पायांना कायमचेच बूट जोडे मढवून ठेवले आहेत. तुला काट्याकुट्यांची भीति कसली? काटाकुटा नसला तरी साप, विंचू, खेकडा पायाला डसेल याची तरी भीति मला बाळगावी लागते. तुझें काय? यांतला कोणी प्राणी आढळला तर तुला उलटा आनंदच. तोंड उघडून गट्ट करून टाकला कीं झालें!

हें ऐकून जंबू मोठयानें हसला. त्याला आपल्या खाद्य पदार्थांची आठवण होऊन आनंद झाल्यासारखें त्याचें हसें भासलें. पण त्याच्या या हसण्याबरोबर दुरून कोल्ह्यांचा एकादा ताफाच्या ताफा ओरडावा असा ध्वनि ऐकूं आला.

मी म्हणालों, " हे कोण ओरडतात? हेच तुझे संमेलनवाले वाटतें?

जंबू म्हणाला, "होय, संमेलनाची जागा जवळ आली, म्हणजे वाट चालायची बहुतेक संपली म्हणूनच तुमची थोडीशी थट्टा केली."

कांहीं वेळानें आम्ही संमेलनाच्या जागेशीं पोंहोंचलों. ही जागा एका ओढ्याच्या कांठीं होती. माणसांच्या संमेलनाची जागा अधिकांत अधिक उजेडाची असते. पण कोल्ह्यांनीं आपल्या संमेलनाला जास्तींत जास्त अंधाराची जागा पसंत केली होती. जवळ गेलों तरी प्रथम कांहीं वेळ कोल्हे दिसेनात. मात्र दुरून पिवळ्यानिळ्या डोळ्यांच्या रांगांच्या रांगा दिसूं लागल्या. हळूहळू अंधारांत माझी दृष्टि निवळूं लागली व संमेलनाची मंडळी मला चांगली न्याहाळतां येऊं लागली.

अलीकडे आमच्या ऑल-इंडिया कॉंग्रेस कमिटींत मंडळी ज्या व्यवस्थेनें बसतात, तशीच ही कोल्हेमंडळीहि बसली होती. कोणी आळसावल्यासारखे

होऊन पाय पसरून त्यावर डोकें टेकलें होतें. कोणी डोळे मिटून ध्यान लावलें होतें. कोणी एकदां एका बाजूला तोंड व दुसऱ्यानदां दुसऱ्या बाजूला तोंड करून उगीच गंभीरपणानें कुजबुजत होते. कोणी एकमेकांवर गुरकावून भांडत होते. कोणी शेजारच्या स्त्रियांशीं अदबीनें प्रिय भाषण करण्यांत गुंतले होते. कोणी तोंडांतील हाडूक केवळ चाळा म्हणून चघळीत होते. कोणी एखादा अर्धमेला बेडूक किंवा खेकडा पंजाखालीं धरून कुरतुडत होते. कोणी ओढ्याचें पाणी पीत तर कोणी पाण्यांत शेपटीचा गोंडा घालून क्रीडा करीत होते.

मी जातांच जंबूनें माझें नांव घेऊन सर्वांना ओळख करून दिली. त्याबरोबर सर्व कोल्ह्यांनीं हुक्कीहुकी करून माझें स्वागत केलें. मला मानाचें आसन म्हणून एका मोठ्या शेवाळलेल्या दगडावर बसविलें.

संमेलनाचें काम परक्यादेखत चालवावें कीं नाहीं अशी शंका येऊन एक कोल्हा जंबूच्या कानाशीं येऊन लागला. तेव्हां जंबू सर्वांच्या समाधानाकरितां मोठ्यानें म्हणाला, "आज हे आपले पाहुणे आपल्याशीं संभाषण व सहविचार करण्याकरितांच आले आहेत. म्हणून तें झाल्यावर आपण आपल्या संमेलनाचें काम मागाहून सावकाश करूं. रात्र पुष्कळ आहे."

जंबू माझ्याशेजारींच बसला होता. मला कोल्ह्यांची भाषा थोडथोडी समजत होती. तरी संमेलनांत मला दुभाष्या हवाच होता. प्रथम मी जंबूला म्हणालों, "गड्या, तुम्ही कोल्हे लोक मोठमोठ्यानें ओरडून बोलतां, यामुळें तुमची भाषा मला थोडीशी येते. पण आम्हां मनुष्याची भाषा तुला कशी आली?" जंबूनें उत्तर दिलें तें निषेधदर्शक हास्यानेंच दिलें. पण आणखी म्हणाला, "हः! आम्ही कोल्हे लोक मोठ्यानें ओरडून बोलतों; आणि तुम्ही मनुष्यें हळू कुजबुजत बोलतां कीं काय? तुमची तशी समजूत असेल तर ती चुकीची आहे. बोलणारा कोणी किती मोठ्यानें बोलत असतो हें बोलणारापेक्षां ऐकणारालाच अधिक चांगलें कळतें. तुम्हांला वाटत असेल कीं, दिल्लीस येणारे तुम्ही लोक जंटलमेन, नाजूक हळू बोलतां! पण तें खोटें. आमच्यासारखीच मोठ्यानें ओरडून बोलण्याची सवय तुम्हां लोकांना लागलेली आहे. फरक इतकाच कीं, आम्ही लोक रोज अर्धा दिवस तरी मौनव्रत धरतों. तुम्हां लोकांचें तसें नाहीं. दिवसां तर मोठ्यानें बोलतांच, पण रात्रींअपरात्रींहि तुम्हीं बोलूं लागला म्हणजे तुमचा शब्दन् शब्द आम्हांला बसल्या ठिकाणीं ऐकूं येतो. आमच्या गुरुजींनीं एक दिवस आम्हांला याचें

कारणहि सांगितलें. ते म्हणाले, 'हे मूर्ख लोक मनांत असेल तें अगदीं उघड बोलतातच; पण मनांत नसेल तेंहि बोलत असावेत. म्हणूनच त्यांना दुसऱ्याची न पटणारी खात्री पटवून देण्याकरितां खोटा आविर्भाव आणून मोठ्यानें बोलावें लागत असेल.' मी उदाहरणेंहि सांगूं शकेन. फक्त मला नांवें माहीत नाहींत, पण तुम्ही अदमासानें ओळखूं शकाल. रोज संध्याकाळीं या इकडच्या मोठ्या रस्त्यानें तीन-चार गृहस्थ हवा खाण्याला जात असतात. पहिल्या दिवशीं त्यांचें संभाषण ऐकून मला तर वाटलें कीं, हे भांडणांत वर्दळी-वर आले आहेत आणि आतां हे एकमेकांना मारणार; पण त्यांच्या हातांत काठ्या नव्हत्या. कोणी हातहि अंगरख्याच्या खिशांत घातले होते. कोणी गळयाभोंवतींचें उपरणें दोन्ही हातांनीं धरून त्याशीं चाळा करीत होते. म्हणून मारामारीची भीति वाटली नाहीं."

मी म्हणालों, "पण ते तशाच कांहीं गहन विषयावर वादविवाद करीत असतील."

जंबू म्हणाला, "तें काय मला कळणार? पण एक म्हणाला, 'नव्या दिल्लींतले दिवे हल्लीं सहा वाजून दहा मिनिटांनीं लावतात,' तें दुसऱ्यानें साफ खोटें म्हटलें. तिसऱ्यानें खिशांतून घड्याळ काढलें. चवथ्यानें म्हटलें,'तुम्हांला कांहीं कळत नाहीं. मी स्वतः नोटीस-बोर्डावर वाचलें आहे.' पहिला म्हणाला, 'चष्मा जरासा पुसून वाचीत जा.' दुसरा म्हणाला, 'चष्मा पुसला तरी डोळे धड असावे लागतात. ब्ल्यू-बुकें वाचून वाचून यांची दृष्टि मंद झाली आहे.' तिसरा म्हणाला, 'तर तर! पुस्तकें वाचून भाषणें करण्याला आम्ही जसे काय मवाळच असूं! तुम्हांला आंतली जिवंत भावना नाहीं म्हणून इकडूनतिकडून आंकड्यांची, उताऱ्यांची भाषणांत भरती करितां.' चवथा म्हणाला, 'तोंडाला येईल तें जहाल बोलावें यांत शहाणपण नाहीं. भुशाचे फुसके लाडू तोफांच्या गोळयांच्या आकाराचे करून मारले म्हणून कांहीं शत्रूच्या अंगाला लागत नाहींत.' यावरून मग बरेंच भांडण जुंपलें. एक दुसऱ्याला म्हणाला, 'तुम्ही देशद्रोही आहां.' दुसरा म्हणाला, 'खरें आहे! संस्थानिकांकडून गुप्तपणें पैसे घेऊन तळीराम गार करून देशभक्ति मिरवायची आम्हांला कशानें साधणार!'

"इतक्यांत सर्व रस्ताभर विजेचे दिवे एकदम लागले. तेव्हां सर्वजण खो-खो-खो करून हसत निघून गेले. आम्ही कोल्हे हुकीहुकी करितों, तुम्हां

लोकांची पायरी त्यापुढची आहे, तुम्ही खो खो खो करतां. तुमच्यापैकीं, एकजण तर बोलतांनाच हसतो व हसतांनाच बोलतो! मला वाटतें तो मनुष्य व कोल्हा यांची एकदमच बतावणी करीत असावा. असो. पण सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, तुम्ही लोक रस्त्यानें अगदीं साध्या गोष्टींची चर्चा करीत जातां तेव्हांहि अगदीं वर्दळीवर आल्यासारखें बोलतां. तुमच्या एका बंगल्यांत एका रात्रीं दोन स्नेह्यांचा वाद चालू होता तो एवढ्या मोठ्यानें, कीं त्या रात्रीं आमची हुकीहुकी कुणालाच ऐकूं गेली नाहीं. तुमच्या या मोठ्यानें बोलण्याच्या सवयीमुळेंच मला मनुष्याची भाषा समजूं लागली आहे समजलां?"

इतक्यांत एक घुबड घू घू करून ओरडलें. तेव्हां एक वृद्ध दिसणारा कोल्हा (हाच बहुधा पुढारी व संमेलनाचा अध्यक्ष असावा) म्हणाला, "हं, रात्र चढत चालली. पाहुण्यांशीं संभाषण करण्याला आतां सुरुवात व्हावी. पण काय रे जंबू, संभाषणानें पाहुण्यांना त्रास तर होणार नाहीं ना?"

मी म्हणालों, "त्रास कसला? मी मोठ्या हौसेनें आलों आहें. आजच्या या संभाषणप्रसंगानें मला एक नवीन जग लाभल्यासारखें वाटतें."

जंबू म्हणाला, "प्रयत्नानें परिचय वाढवील तर मनुष्याला नवीन जग जोडण्याला आयुष्यहि पुरणार नाहीं. आपलेंच पाहा ना. तुम्हीआम्ही एकाच गांवांत अगदीं शेजारींशेजारीं किती तरी दिवस राहत आहों. पण जसें काय दोघेंहि त्या गांवचेच नव्हत."

मी म्हणालों, "परिचय नाहीं खरा; पण आपण एकमेकांना मुळींच ओळखीत नाहीं असें मात्र नाहीं. तरी परिचयाशिवाय चरित्रवर्णन यथार्थ असतेंच असें म्हणवत नाहीं."

"ही गोष्ट उभयपक्षींहि लागू आहे."

"होय, अगदीं बरोबर. आम्हीं तरी आजवर केलेली मनुष्याची पारख अगदीं बिनचूक होती असें कसें म्हणावें?"

त्यावर वृद्ध कोल्हा म्हणाला, "पण, आज तरी प्रत्यक्ष प्रसंग आला आहे, तेव्हां ज्या कोणाला कांहीं माहिती विचारावयाची असेल, शंका-समाधान करून घ्यावयाचें असेल त्यानें तें करून घ्यावें. वेळ फुकट घालवूं नये."

तेव्हां निरनिराळ्या कोल्ह्यांनीं मला अनेक प्रश्न विचारले आणि मींहि त्यांचीं उत्तरें दिलीं. त्यांनींहि त्यांवर मधूनमधून टीका केली. या सर्व संभाषणाचा साधारण सारांश खालीं देत आहें. बोलणारा कोल्हा कीं मी, हें अर्थावरून कोणालाहि सहज कळून येईल, म्हणून मीं तसें पदोपदीं स्पष्ट करून मात्र लिहिलें नाहीं.

" काय हो, आम्हां कोल्ह्यांविषयीं तुम्हां मनुष्यांची खरोखर काय कल्पना आहे ? "

" कल्पना अशी आहे कीं, तुम्ही कोल्हे लोक मोठे धूर्त, स्वार्थी, लोकांना फसविणारे व क्रूर असे आहां ! दोस्त हो ! मी प्रांजलपणानें बोलतों, माफ करा हां."

" पण या कल्पनेला आधार ? "

" आमच्यांत कोल्ह्यांसंबंधानें ज्या म्हणी, जे वाक्प्रचार किंवा ज्या गोष्टी प्रचलित आहेत तोच आधार."

" म्हणजे कल्पनेला आधार गोष्टींचा आणि गोष्टींना आधार कल्पनेचा, असेंच कीं नाहीं ? "

" काय म्हणून ? दोहोंचा आधार चारित्र्याचा अनुभव ! असेंच कां म्हणत नाहीं ? "

" पण गोष्टी आणि म्हणी तर सांगा म्हणजे तुम्हां मनुष्यांचा अनुभव कितपत खराखोटा तें पाहूं ! "

" ठीक आहे." असें म्हणून मीं कोल्ह्यासंबंधींच्या आठवल्या त्या गोष्टी व म्हणी सांगितल्या. त्या ऐकून त्यांच्यांतला एक वृद्ध कोल्हा थोडासा पुढें सरसावून म्हणाला, " तुम्हीं आपलें म्हणणें सांगितलें. आतां त्याच्यावर आमचें म्हणणें ऐका." असें म्हणून त्यानें प्रत्येक म्हण व गोष्ट घेऊन त्यावर खालीलप्रमाणें भाष्य केलें. तो म्हणाला—

" बुद्धिवानाला धूर्त व धूर्ताला स्वार्थी म्हणण्याची रीतच आहे. एरवीं जगांत स्वार्थ कोणाला सुटला आहे सांगा बरें ? बुद्धिवान् आपल्या बुद्धीचा उपयोग स्वार्थाकडे करतात, आणि निर्बुद्ध अथवा मंदबुद्धि आपल्या बुद्धीचा उपयोग स्वार्थाकडे करीत नाहींत असें थोडेंच आहे ? पण ईश्वरानें एकाला दुसऱ्यापेक्षां अधिक बुद्धि दिली, हा त्याचा दोष काय ? आतां तुमची ती पंचतंत्रांतलीच गोष्ट घ्या. आम्हांला पावसाळ्यांत खायला अन्न पाहिजे होतें,

कबूल. पण तुम्ही मनुष्य नाहीं का सुगींत बेगमी करून ठेवीत? म्हणून आम्ही 'कर्पूरतिलक' हत्तीला दलदलीच्या वाटेनें जायला सांगितलें. पण तो कां गेला? आपल्या इच्छेनेंच ना? त्याची इच्छा नसती तर हजार कोल्ह्यांना त्याला ओढून तिकडे नेतां आलें नसतें. त्या दलदलीच्या वाटेनें गोड ऊंस खायला सांपडतात असें त्याला हळूंच सांगितलें, तेव्हां तो जिभल्याच चाटूं लागला! तेव्हां त्यानें असा विचार केला काय कीं, उसाच्या मळेवाल्यानें मोठ्या कष्टानें हा ऊंस लावला व वाढविला असेल! आपण तो खाल्ला तर त्याचें नुकसान होईल! बरें, दलदलीच्या वाटेनें आपण गेलों तर रुतून बसूं हें तरी त्याचें त्याला कळावें कीं नाहीं? लोक हत्तीची फार स्तुति करतात, कीं तो फार सावध, नीट जमीन पाहिल्यापारखल्याशिवाय पाऊलहि टाकीत नाहीं म्हणून. पण उसाचें नांव निघाल्याबरोबर गेली त्याची सावधगिरी कोठच्या कोठें! स्वार्थापुढें अंगचे गुणहि फुकट जातात ते असे. कर्पूरतिलक हत्तीला लोकांचे फुकटचे ऊंस हवे होते तसेंच आम्हांला त्याचें मांस पाहिजे होतें. यांत काय बिघडलें?

"आतां तुमची दुसरी गोष्ट घ्या. आमच्यांतल्या एकानें बगळ्याकडून चोचीनें गळ्यांत अडकलेलें हाडूक काढविलें आणि बगळा बक्षिस मागूं लागला तेव्हां तो म्हणाला, "माझ्या जबड्यांत तुझी मान सांपडली तेव्हांच ती मीं तोडली असती तर काय करतास? तोडली नाहीं हेंच उपकार मान व तेंच बक्षिस समज. आतां यांत बक्षिसाची आशा दाखवून तें दिलें नाहीं, म्हणून फसविल्याचा दोष दिसतो; पण हा दोष जगांत एकट्या कोल्ह्यांच्याच अंगाला चिकटतो काय? कृतघ्नतेचा दोष तुम्हां मनुष्यांच्या अंगांत आहेच कीं! 'Ingratitude, thy name is man' अशी एका तुमच्या मनुष्य-कवीचीच उक्ति आहे ना?

"आतां तिसरी एक गोष्ट घ्या. बगळ्यानें मला मेजवानीला बोलाविलें आणि सुरईत भरलेली खीर माझ्यापुढें ठेवली! पण मलाहि 'जशास तसें' ही म्हण माहीत होती. म्हणून मींहि त्याला उलट मेजवानीला बोलावून उथळ परातींत खीर वाढली. परातींत त्याची चोंच जाण्याला तरी अडचण नव्हती; पण सुरईत माझें तोंड जाणार नाहीं, हें त्याला माहीत नव्हतें काय? पण कुचेष्टा करावयाची बुद्धि एकदां झाली म्हणजे मग संभाविती सुटते. दुसरें काय? देवानें आम्हांला थोडीशी बुद्धि अधिक दिली तिचा उपयोग करून

मीं सहजच बगळयावर बाजू परतविली यांत काय चुकलें ? तुम्ही मनुष्यें अशी बाजू प्रतिपक्षावर परतवितांच कीं नाहीं ?

"आतां द्राक्षाची गोष्ट घ्या. उड्या मारूनहि द्राक्षें तोंडाला लागेनात, तेव्हां त्यांचा नाद सोडावा लागला. शेजारच्या झाडावर बसलेला कावळा हें पाहून मला हसला. तेव्हां स्वतःची फजिती लपविण्याकरितां मी बतावणी करून विनोदानें हसत हसत उद्गार काढले कीं, 'चला, द्राक्षें फार आंबट आहेत' म्हणून. पण फजिती व पराभव अशा रीतीनें छपविण्याचा तुम्हां मनुष्यांचाहि परिपाठ आहे कीं नाहीं सांगा बरें? तुमच्यापैकीं किती लोभी निर्धन लोक वैराग्याचें सोंग आणून धनाला नांवें ठेवतात ? किती कुरूप पुरुष बायकोच मिळत नाहीं म्हणून ब्रह्मचर्याचे गुण गातात ? आणि मान मिळत नाहीं म्हणून किती लोक त्याविषयीं प्रयत्न करूनहि तुच्छता दाखवितात ?

"पण लक्षांत ठेवा कीं, आम्ही कोल्हे झालों तरी जगांत आमच्याहून अधिक धूर्त कोणी नाहीं किंवा आमच्या बुद्धीचा प्रभाव सर्वांवर चालतोच असें आम्ही मानीत नाहीं. परवां भूक लागली आणि कोंबडी घराच्या छपरावर पिलांसह फिरतांना दिसली. तेव्हां तिला म्हणून पाहिलें कीं, 'ताई, तूं दुखणाईत दिसतेस. खालीं ये, म्हणजे तुझी नाडी पाहतों.' पण ती कसली वस्ताद ! ती म्हणाली, 'भाऊ, आहे तिथेंच मी बरी आहें रे. तुझ्यासारख्या एका वैद्यानेंच मला सांगितलें कीं, छपरावरची मोकळी हवा माझ्या आजाराला बरी म्हणून !' आतां पाहा कीं, एवढा हत्ती फसला, पण एवढीशी कोंबडी कांहीं फसली नाहीं. बरें, नाहीं म्हणावें तर एखादे वेळीं सहज साधून जातें. झाडावर कावळा तोंडांत मांसाचा तुकडा घेऊन बसला होता. त्याला सहज म्हटलें, :' अहाहा ! ईश्वरानें काय सुंदर आवाज तुला दिला आहे !' झालें, तो फुशारला आणि मूर्ख आपलें तोंड उघडून गाऊं लागला. मग चोचींतला मांसाचा तुकडा खालीं पडला तो मीं कां घेऊन खाऊं नये ? आपल्या आवाजाबद्दल जगाचें मत काय आहे हें कावळयाला कळूं नये काय ? आणि तुम्ही मनुष्यें तर इतकीं गाजरपारखीं कीं, 'कावळा' हा धूर्तपणाचें उपमानच बनवून ठेवलें आहे. काय म्हणे, मनुष्य धूर्त दिसला कीं म्हणतात 'हा अगदीं कावळा आहे !' तात्पर्य, आम्हां कोल्ह्यांची बुद्धि तीच, पण उसाच्या लोभानें हत्ती फसला, आणि स्तुतीच्या गर्वानें कावळा फसला,

तथापि केवळ आत्मरक्षणाची सात्त्विक बुद्धि बाळगणारी कोंबडी फसली नाहीं. जगांत बुद्धिबुद्धीचें युद्ध कायमचेंच जुंपलेलें आहे. आपल्या फायद्याकरितां आपल्या अंगच्या कोणत्या गुणाची पराकाष्ठा करण्याचें मनुष्य सोडतो? पैलवानानें पैलवानाला पाडलें तर तुम्ही त्याचा गौरव करून पागोटें बांधतां; मग धूर्तानें मूर्खाला चकविलें तर त्यालाहि पागोटें कां बांधीत नाहीं ? निदान निंदा तरी करूं नये. तुमच्यांतले कांहीं शहाणे लोक म्हणतांना मीं ऐकिलें आहे कीं, 'इंग्रजांनीं आमचें राज्य कपटानें घेतलें.' हें ऐकून मला तर हसायलाच येतें. कारण तुम्हांला कपट करून आपलें राज्य राखण्याला कोणीं मनाई केली होती ? आणि साधलें तेथवर इंग्रजांशीं कपट करावयाला तुम्हीं तरी सोडलें काय ? पण बुद्धीच तितकी. त्याला काय करणार ? कुस्तींत पडलेल्या पैलवानानें रडून तक्रार केली कीं, 'पाहा हो, यानें मला आपल्या पेचांनीं पाडलें,' तर त्याला लोक हसणार नाहींत काय ? तसेंच हें आहे.

" आतां लांडया कोल्ह्याची म्हणून जी गोष्ट तुम्हीं सांगितली, तीं खरोखरच तशी घडलेली नाहीं. म्हणजे सांपळ्यांत सांपडून माझी शेपटी तुटली ही गोष्ट खरी. पण मी नंतर इतर कोल्ह्यांना आपल्या शेपट्या तोडीत जाण्याचा उपदेश करीत फिरलों ही हकीकत खोटी. त्याचें खरें असें झालें. मी पडलों अधिकारी. माझें पाहून आपणहि तसेंच करावें आणि माझी मर्जी संपादावी अशी ज्याला त्याला इच्छा, त्याला मी काय करूं ? मी आपणाकडून सांगतहि होतों कीं, 'सापळ्यापासून दूर राहात जा. शेपटी तुटण्याचा प्रसंग असा येतो.' पण ऐकतो कोण ? साहेबांची शेपटी लांडी तीच छान दिसते असें (माझी फजिती वांचविण्याकरितां) जो तो म्हणूं लागला. झालें. त्याच्याहि पुढें कैक गेले व त्यांनीं आपल्या शेपट्या मुद्दाम कापून घेतल्या. मिशा काढण्याच्या शिष्टाचारासंबंधानें साहेबलोकांचें पाहून तुमच्यांत जें घडलें तेंच आम्हां कोल्ह्यांत ! एका अधिकाऱ्याची एक मिशी न्हाव्यानें चुकून निम्मी काढली. निम्मी वाईट दिसते म्हणून मग सगळी काढली. एक काढली म्हणून दुसरी; आणि अधिकाऱ्यांनीं क्षौर केला म्हणून सर्वांनीं, दुसरें काय ?

" हें आमच्या धूर्तपणासंबंधानें झालें. आतां आमच्यावर जो क्रूरपणाचा आरोप आहे, त्याचा विचार करूं. आम्ही प्राणी मारून खातों हें कबूल. आधीं पुष्कळसे मेलेलेच खातों म्हणा; पण थोडेसे मारूनहि खातों. पण आम्हांला क्रूर म्हणणारे तुम्ही लोक काय कमी क्रूर आहां? तुमच्याआमच्यांत फरक

इतकाच कीं, आम्ही घरीं बटलर-बबर्जी ठेवीत नाहीं, आणि आयदी आयतोबा-सारखे आयत्या वेळीं पोषाख करून जेवायला टेबलाशींहि येऊन बसत नाहीं. आम्हांला मेलेला प्राणी तरी चालतो. पण प्राण्याला हालहाल करून मारल्या-शिवाय खाणें हें तुम्ही लोक निषिद्ध समजतां! मुसलमानांना तर झटकाहि खपत नाहीं. झटक्यानें मारलेला प्राणी खाल्ला तर म्हणे यांचा देव रागावतो ! म्हणून गळ्याला सुरी लावूनच तो चरचर कापला पाहिजे. हा क्रूरपणा नव्हे वाटतें ?

" आतां मनुष्य व कोल्हा यांच्या संबंधाविषयीं कांहीं सांगतों. 'वाघाच्या शिकारीची तयारी करावी तेव्हां कुठें कोल्हा हातीं लागतो' अशी तुम्ही एक म्हण म्हणतां; पण खरा प्रकार काय आहे ? कोल्ह्याच्या शिकारीची तयारी करावी, तेव्हां वाघ हातीं लागतो, इतकी आमची शिकार कठीण आहे. वाघाची शिकार वेळीं एकटा मनुष्यहि हातांत बंदूक घेऊन करतो,पण माझ्या शिकारीचीं इंग्रजी वर्णनें वाचा म्हणजे कळून येईल. पांचपन्नास घोडेस्वार, शें-दोनशें कुत्रे इतकें मिळून रान उठवितात. वाघ व सिंह रानांतून कोणत्या वाटेनें कसे बाहेर पडतील याची अटकळ मनुष्यांना करतां आलेली आहे; पण आम्ही कोल्हे रानांतून कसे पळत जाऊं व बचाव करूं याची कल्पना अजून कोणाला आलेली नाहीं. आमचा हा खरा गुण आहे, तो न घेतां खऱ्या नाहींत अशा कल्पना मात्र कांहीं आमच्या अंगीं चिकटवितां, याला काय म्हणावें ?

" असो. आतां मनुष्य आणि कोल्हा यांचा परस्परांना किती उपयोग आहे तें पाहा. मनुष्यानें आम्हां कोल्ह्यांच्या सुखसोई कांहीं तरी केल्या आहेत काय ? पण शेताच्या बांधांतील खेकडे आम्ही मारतों त्यामुळें, बांधांत भेगा पडून पाणी फुटून जाण्याचें बंद होतें ना ? मनुष्य मेला तर त्याचें मांस आम्हांला फार तर एक दोन दिवस पुरेल. उलट आमचें मांस खाऊं नये असा निर्बंध कांहीं आम्हीं मनुष्याला घातलेला नाहीं. तो तें खात नसेल तर ती त्याच्या मर्जीची गोष्ट आहे. पण आमचें कातडें मनुष्याला एकदोन पिढ्या तरी उप-योगीं पडण्यासारखें आहे. युरोपिअन स्त्रिया थंडी निवारण्याकरितां आमच्या केसाळ कातड्याचीं वस्त्रें वापरतात. एवढेंच नव्हे, तर आमच्या झुबकेदार शेपट्या कमावून, रंगवून आपल्या गळ्याभोंवतीं भूषणें म्हणूनहि धारण

करतात. तेव्हां आतां सांगा कीं, कोण कोणाला अधिक उपयोगी, मनुष्य, कीं कोल्हा ?"

इतकें बोलणें झाल्यावर अध्यक्षांचे जागीं बसलेला वृद्ध कोल्हा म्हणाला,

"काय रे पोरो. तुम्हांला कांहींच कळत नाहीं! पाहुणा आला तर त्याला त्याचें स्वतःचें कांहीं विचाराल कीं नाहीं? कां आपल्याच माहात्म्याचें पुराण चालवावयाचें ?" असें म्हणून त्यानेंच मला प्रश्न विचारण्याला प्रारंभ केला.

"तुम्ही मंडळी आपापलीं घरें सोडून दिल्लीस कां येतां ?"

"असेंब्ली नांवाची आमची सभा तेथें भरत असते म्हणून."

"सभा कोठें भरते ?"

"त्या पलीकडच्या मोठ्या वाटोळ्या इमारतींत."

"सभेंत कोण बसतात ?"

"हिंदुस्थानांतील लोकांनीं निवडून दिलेले प्रतिनिधि."

"तेथें काय काम चालतें ?"

"राजकारणी चर्चा व निर्णय."

"राजकारणाचा हेतु काय ?"

"राज्यकारभारावर आपली सत्ता पूर्णपणें प्रस्थापित करणें."

"मग आज तुमची तशी सत्ता नाहीं तर !"

"हो. नाहीं खरी."

"मग ती केव्हां मिळेल ?"

"स्वराज्य मिळाल्यावर."

"स्वराज्य केव्हां मिळेल ?"

"ही सत्ता हातीं येईल तेव्हां."

"पण आज सत्ता नसली तरी इतर सुखें तुम्हांला काय थोडीं आहेत ?"

"हीं सुखें राहूनच्या राहून सत्ताहि मिळाली तर आम्हांला हवी आहे."

"तुम्हां माणसांना दोनच काय पण तीन डोळे मिळाले, तरीहि हवे हें खरें पण तीन राहोतच, तर पुरे दोनहि नाहींत, आणि ईश्वरानें म्हटलें कीं, एकच डोळा तुम्हांला मिळेल, उजवा किंवा डावा, सुख किंवा सत्ता, म्हणजे तुम्ही कोणता हवा म्हणाल ?"

हा प्रश्न ऐकून मी बुचकळ्यांत पडलों. सत्ता नको म्हणावी, तर सर्व प्रयत्न त्याकरितां सुरू आहेत असें आधींच म्हटलें. बरें सुख नको म्हणावें तर सुखा-

शिवाय सत्ता घेऊन काय करावयाची? सत्तादेखील सुखाचेंच एक साधन आहे. एवढेंच नव्हे, तर विद्यमान थोड्याशा सुखानें हल्लीं आम्ही इतके सुखावून गेलों आहों कीं, सत्ता हस्तगत करण्याचे प्रयत्न त्याच्या लोभानें शिथिल होतात. पण अडचणीचा प्रश्न अडचणीच्या प्रश्नानें उडविण्याकरितां म्हणून मी म्हणालों, "तुमच्या प्रश्नाचें सरळ उत्तर देणें कठीण आहे. पण मलाहि तुम्हांला असें विचारतां येईल कीं, रानांत तुमच्यापुढें ससा आणि खेकडा असे दोन प्राणी एकदम वर निघाले आणि निरनिराळ्या दिशांनीं धांवूं लागले तर तुम्ही काय कराल?"

कोल्होबा म्हणाला, "मी तुमच्या प्रश्नाचा अर्थ समजलों. पण त्याचें उत्तर असें कीं, या दोहोंत मी कांहींच फरक करीत नाहीं. कोणताहि एक मिळाला तरी एक वेळेची भूक भागेल. म्हणून जो हटकून सांपडेल तोच मी धरीन. तुम्ही अडवणुकीकरितां मला प्रश्न असा टाकायला हवा होता कीं, 'समजा, तुम्ही जाळ्यांत सांपडलां आहां; आणि पारध्यानें तुमच्या जाळ्यांत ससा आणून टाकला तर तुम्ही प्रथम ससा खात बसाल कीं जाळें कुरतडाल?' आणि त्याचें मात्र माझें उत्तर असें कीं, भूक लागून मेलों तरी चालेल, पण जाळें कुरतडून आधीं मोकळीक करून घेईन."

पण मींहि बुद्धि चालवून म्हटलें, "पण जाळ्याऐवजीं लोखंडी पिंजऱ्यांतच सांपडला तर काय कराल? लोखंडी गज कुरतडण्यांत दांत पाडून घ्याल? कीं पुढें आलेला ससा खाऊन भूक भागवून मग सुटकेचा प्रयत्न कराल?"

"हा तुमचा प्रश्न अधिक अवघड आहे खरा. सुटकेची निराशाच झाली तर मग पुढें आलेलें अन्न खाऊन कोणीहि भूक भागविणारच. पण अन्नहि वर्ज्य करून स्वातंत्र्याकरितां प्राण दिला असेहि कांहीं कोल्हे आमच्यांत झाले आहेत."

"तसे कांहीं लोक आमच्यांतहि झाले आहेत व होत आहेत. त्यांनीं स्वातंत्र्याकरितां सुखच काय, पण भुकेचा घासहि वर्ज्य केला आणि स्वातंत्र्याचा उच्चार करीत प्राण सोडला."

"खरें आहे. अशा विभूती, आम्हां कोल्ह्यांप्रमाणें, तुम्ही मनुष्य झालां तरी, तुमच्यांतहि क्वचित् कां न निर्माण होतील? पण मला वाटतें एका गोष्टींत मात्र थोडासा फरक दाखवितां येईल."

" ती कोणती ? "

" लोखंडी पिंजऱ्यासारख्या पारतंत्र्यांत सांपडल्यावर अन्न न खातां प्राण देणारा एखादा मनुष्य भेटेल, तसाच एखादा कोल्हा भुकेचा घास खाऊन, जीव जगवून, सांपळ्याच्या कैदेचें दुःख विसरून, जीवयात्रा आक्रमणारा आढळेल. नाहीं असें नाहीं. पण फरक हा कीं, तुम्हां लोकांप्रमाणें आम्ही एखाद्या रानांतले सगळेच्या सगळे कोल्हे मात्र जाळ्यां-सांपळ्यांत सांपडून कधींच कायमचे पिंजऱ्यांत पडलेलों नाहीं. फसल्या लोभावल्या तरी फक्त कांहीं व्यक्ति. सगळी जात नव्हे. तसेंच तुम्हां लोकांप्रमाणें आम्हां कोल्ह्यांनीं परक्यांना आमच्या रानांत येऊन राहण्याला कधीं आमंत्रण दिलें नाहीं, आमचीं बिळें खुलीं करून दाखविलीं नाहींत, आमच्या चोरवाटा उघड केल्या नाहींत, त्यांच्याशीं वस्तूंची अदलाबदल केली नाहीं, आमच्या शत्रूंचा पाडाव करण्याकरितां परक्याचें साहाय्य घेतलें नाहीं, आणि दुसऱ्या एखाद्या रानांतल्या कोल्ह्यांना पकडण्याकरितां निघालेल्या शत्रूला, लोभानें किंवा द्वेषानें, मिळून जाऊन त्याला युद्धांत मदतहि केली नाहीं."

" पण समजा, तुमचें एखादें रानच्या रानच शत्रूनें सगळेंच्या सगळें वेढलें तर तुम्ही काय कराल ? "

" युद्ध करीत करीत मरून जाऊं. आमच्यांतले कांहीं हस्तगत होऊन तुरुंगांतहि पडतील. पण तुरुंगांतल्या सुखसोयींचें कौतुक करीत पारतंत्र्य स्वीकारणार किंवा विसरणार नाहींत, किंवा निदान संतुष्ट राहून आमच्या शत्रूला खूष करण्याकरितां त्याच्याकडे पाहून हसणें, त्याला मान लवविणें, त्याची स्मृति करणें, त्याचें अनुकरण करणें, त्याला खेळ करून दाखविणें, असले अपमानास्पद प्रकार तरी खास करणार नाहींत."

" पण सुटकेची निराशा झाली म्हणजे तुमच्यापेक्षां अधिक बलवान्, तेजस्वी, स्वातंत्र्यप्रिय अशा प्राण्यांनींहि असले खेळ केले आहेत. आम्हां माणसांनाच कां दोष देतां ? "

" असे कोण आहेत ? "

" वाघ आणि सिंह हेच कां घ्या ना ? हे प्राणी कांहीं खचित तुम्हां कोल्ह्यांपेक्षां कमी स्वातंत्र्यप्रिय नाहींत. आम्हां माणसांची गांठ पडली म्हणजे मरूं कीं मारूं, अशाच निश्चयानें ते लढतात. पण ते माणसाच्या हातांत

कायमचे सांपडले म्हणजे मनुष्य सांगेल तसें वागतात. भूक आणि मार यांच्या योगानें त्यांनाहि आपला स्वभाव सोडावा लागतो. आमच्या सर्कशींत वाघ, सिंह काय काय खेळ करतात हें माहीत आहे काय ?"

"नाहीं. आम्हां कोल्ह्यांना तुमची सर्कस कशी पाहवयाला मिळणार ? सांगा पाहूं वाघ, सिंह काय काय खेळ करतात ते ?"

"अहो, काय सांगावें ? ते मनुष्याला पाठीवर घेऊन नाचतात, शेळी-बरोबर एकाच ताटांत खातात, एकाच परळांत पाणी पितात, कसरत करून दाखवतात, उलटसुलट उड्या मारतात, वाण्याची तराजू रचतात, जळत्या कड्यांतून धांवतात, तोंडांत दोरी धरून ओढून बंदुकीचा बार काढतात. अशा रीतीनें ईश्वरानें आपल्यालाहि कांहीं बुद्धि दिली आहे, हें ते सिद्ध करतात."

हें ऐकून कोल्ह्यांची सगळीच्या सगळी सभा खदखदां हसूं लागली. त्यांच्यांतील संभावित कोल्हेहि ऐकूं जाण्याइतके मोठ्यानें हसले, मग इतर कित्येकांना हसण्याच्या उकळ्यांवर उकळ्या फुटल्या तर काय नवल ?

हसणें थांबल्यावर तो वृद्ध कोल्हा मला म्हणाला, "पण तुमच्या या वाघ-सिंहांनीं केलेलें हें प्रदर्शन त्यांच्या बुद्धिमत्तेचें दर्शक कीं नादानपणाचें ? या गुणप्रदर्शनानें आपल्याला पकडून ठेवण्याची इच्छा मनुष्यांत उत्पन्न करून आपल्या पारतंत्र्यालाच ते मदत करतात असेंच नाहीं का तुम्हांला वाटत ? वाघ-सिंह हे आमच्यापेक्षां अधिक बलवान् म्हणून त्यांचें उदाहरण तुम्हीं दिलें, तरी पण एखादा प्राणी अधिक बलवान् झाला म्हणून कांहीं नीतिदृष्ट्या अधिक श्रेष्ठ ठरत नाहीं. जो मनोगुणांनीं श्रेष्ठ तोच खरा श्रेष्ठ. वाघ-सिंह यांना तुम्ही माणसें 'वनराज' असें म्हणतां ! पण आतां वर्णनच केलेंत यावरून पाहा म्हणजे झालें. आम्हां कोल्ह्यांना वाघ-सिंहांपेक्षां कमी मान तुम्हीं दिला म्हणून आम्हीं तुमच्याकडे कधींच तक्रार केली नाहीं. स्वाभिमान हा केव्हांहि परक्यांनीं दिलेल्या मानापेक्षां श्रेष्ठ असतो हें आम्ही जाणतों. यामुळें तुम्हीं वाघसिंहांना 'वनराज' म्हणून आमचें राज्यपद त्यांना देऊन टाकल्यानें आमचें समाधान थोडेंच नष्ट होणार? किंवा आम्ही त्यांचे प्रजानन थोडेच ठरणार ? पण शरीरबळानें श्रेष्ठ असणारा प्राणी दुर्बळांपेक्षां अधिक स्वातंत्र्य-प्रिय असतो, अशी तुमची समजूत असेल, तर ती मात्र चुकीची आहे. याविषयीं तुम्हांला एकच रोकडा प्रश्न विचारतों त्याचें उत्तर द्या म्हणजे परस्पर न्याय होईल."

"तो कोणता ?"

"मनुष्य हा वाघ-सिंहांना मारील तसाच कोल्ह्यांनाहि मारील. तो वाघ-सिंहांना सांपळयांत, पिंजऱ्यांत कायमचा धरून जन्मभर ठेवील, तसाच आम्हां कोल्ह्यांनाहि ठेवील. पण सर्कशींत अपमानास्पद खेळ करून दाखविणारे वाघ-सिंह तुम्ही नित्य पाहतां, त्याप्रमाणें आजवर एक तरी कोल्हा तुमच्या पाहण्यांत आला आहे काय ?"

मी म्हणालों, "तुम्ही म्हणतां तें अगदीं खरें आहे. आतां माझ्या अंतःकरणांत प्रकाश पडला."

कोल्हा म्हणाला, "अहो, ईश्वरानें बळ हें कांहीं सर्वांना सारखें वांटलेलें नाहीं. यामुळें प्रबळ दुर्बळाला जिंकील. पराभूत होऊन पारतंत्र्य पदरांत पडणें हें नशिबांत असलें तर कांहीं कोणाला चुकत नाहीं. उलट पक्षीं केवळ सुदैवानें प्रबळ शत्रूचा घाला न पडल्यानें ज्यांचें स्वातंत्र्य गमावलें गेलें नाहीं, असे नादान प्राणीहि जगांत थोडे नाहींत. पण त्या स्वातंत्र्याचा त्यांनींहि गर्व वाहण्यांत अर्थ नाहीं. नादान प्राणी स्वतंत्र राहिला हें जसें त्याला भूषण नाहीं, तसेंच स्वाभिमानी मनुष्य परतंत्र झाला हेंहि कांहीं त्याला दूषण नाहीं. पण दुर्दैवानें आलेल्या पारतंत्र्यांतहि कोण कसा वागतो यावरूनच त्याची परीक्षा जग करील. म्हणून जे केवळ सुदैवानें नव्हे तर स्वपराक्रमानें स्वतंत्र राहिले, पारतंत्र्यांत पडले नाहींत, तेच प्राणी जगांत श्रेष्ठ. मग ते तुमच्यासारखे सुधारलेले असोत किंवा आमच्यासारखे रानटी असोत. आमच्या परात्पर गुरूनें आम्हां कोल्ह्यांना हेंच शिकविलें आणि आमचा त्यावर विश्वासहि आहे."

त्या वृद्ध कोल्ह्याचें हें भाषण ऐकून मी तर खजील झालों. माझ्या तोंडून शब्द निघेना. उद्यां स्वातंत्र्य मिळवूं अशा पूर्ण किंवा अर्धवट भावनेनें नव्या दिल्लीच्या मैदानांतील वाटोळ्या इमारतींत जाऊन वाक्पांडित्य करणारे आम्ही मनुष्यप्राणी ! आणि त्या इमारतीजवळच रानांत राहणारे, पण स्वातंत्र्य भोगणारे कोल्हे यांपैकीं श्रेष्ठ कोण, हा गहन प्रश्न माझ्या मनांत उत्पन्न झाला.

इतक्यांत घुबड पूर्वीप्रमाणेंच पुन्हा एकदा ओरडलें. घुबडाकडे कोल्ह्यांच्या घड्याळजीचें काम असतें कीं काय, कोणास ठाऊक ? पण त्याचा आवाज ऐकतांच तो वृद्ध कोल्हा म्हणाला, "गड्या हो, आतां रात्र बरीच झालेली

दिसते. या आपल्या पाहुण्यांना फार जागण्याची सवय नसेल. आमच्या संमेलनाचेंहि कार्य व्हावयाचें आहे, म्हणून त्यांना आपण आतां रजा द्यावी हें बरें."

हे आज्ञेच्या सूचनेचे शब्द ऐकून, एका खप्पड कोल्ह्यानें माझ्यासमोर कांहीं खाद्याचे पदार्थ म्हणून आणून ठेवले. पण आज मला शिवरात्रीचें उपोषण आहे असें सांगून तो नजराणा मीं हस्तस्पर्शानेंच परत केला. आणि "ठीक आहे, मी येतों आतां" असें म्हणून निघालों.

वृद्ध कोल्हा मला चार पावलें पोंचवायला आला; आणि इतर कोल्ह्यांनीं हुकीहुकी करून माझा सन्मान केल्यावर तो म्हणाला, "जंबू, जा. आणलेस तसें पाहुण्यांना परत पोंचीव."

पण मी म्हणालों, "छेः छेः, येतांना वाट माहीत नव्हती. आतां जातांना ती माझी मला सहज सांपडेल. आमच्या बंगल्याच्या बाजूचे दिवे रांगेनें लागलेले येथून दिसतच आहेत. शिवाय आणखी थोडा पुढें गेलों म्हणजे आमच्या अनेक बंगल्यांतून मित्रमंडळींच्या ओरडण्याचे आवाज ऐकूं येऊं लागतील. त्यावरूनहि दिशा लक्षांत येईल."

वृद्ध कोल्हा म्हणाला, "आरडाओरड कशाबद्दल? स्वातंत्र्यप्राप्तीच्या मार्गांचीच कसून चर्चा चाललेली असेल!"

मी लज्जित होऊन म्हणालों, "असेल, एखाद्या ठिकाणीं तीहि चर्चा चालू असेल, पण स्वातंत्र्याच्या चर्चेला असा घसा फोडीपर्यंत ओरडावें लागतेंच असें नाहीं. इतर ठिकाणच्या ओरडीला वेगळींच कारणें असतील."

"तीं कशीं काय?"

"शिवरात्र म्हणून माझ्यासारखाच पुष्कळांनीं आज भांग-घोटा घेतला असेल, आणि उद्यां सुट्टी म्हणून त्यांचे खेळ चालू असतील. कोणी फोनो-ग्राफांतली हसण्याची प्लेट लावून त्या हसणारावर अधिक मोठ्यानें किंवा अधिक मजलेदार हसून मात करीत असतील. कोणाच्या बिझिकच्या डावांत विजातीय राजाराणींचा विवाह लागला असेल आणि ते हसून तो लग्नसमारंभ साजरा करीत असतील. कोणी विलायतेंतून आणलेली एखादी बीभत्स गोष्ट किंवा कोटी सांगितली म्हणून इतर त्याला ओरडून, हसून शाबासकी देत असतील; कोणी दुसऱ्या कोणाच्या भेसूर वक्तृत्वाची नक्कल करण्याकरितां आरडत असतील; कोणी शुष्क वादविवादांत वर्दळीला आले असतील."

कोल्हा म्हणाला, "एकूण ती माणसांची हुकीहुकीच म्हणा ना? प्रकार वेगळा इतकेंच."

मी दुःखानें म्हणालों, "हुकीहुकी तुमच्यासारखीच आहे, पण स्वातंत्र्य मात्र तुमच्यासारखें नाहीं; इतकेंच काय तें."

इतकें म्हणून मी तडक चालूं लागलों. पण लवकरच एका दगडी बांधावर पाय पडून सपशेल पालथा पडलों. म्हणून कोणी तरी हात देऊन मला उठवूं लागला, आणि या रानांत माणसाचा हात कुठला? याचा विचार करतों तों माझे मित्र बापूसाहेब हेच मला हालवीत होते व म्हणत होते, "अहो, उठा. काय झोंप, कीं थट्टा? शिवरात्रीच्या पारण्याकरितां गोपाळ-गोविंदांनीं ताटें सुद्धां मांडलीं. आमचा चहा केव्हांच घेऊन झाला. अशी अंगावर येतें तर भांग घ्यावी कशाला?"

* * *

मी शुद्धीवर आलों. पण स्वप्नाचें विस्मरण झालें नव्हतें. म्हणून म्हणालों, "अहाहा, तेंच स्वप्न पुन्हा पडणार असेल तर पुन्हा भांग पिईन."

८ शारदेची आकाशवाणी

— १ —

फार वर्षांपूर्वीं मी कृष्णा नदीच्या डोहांत बुडालें. पण कै. देवलांनीं मला आपल्या नाटकाच्या सोयीकरितां मरूं दिलें नाहीं. नाटक आनंदपर्यवसायी व्हावें असा एक नाट्यशास्त्राचा नियम आहे म्हणतात आणि किर्लोस्कर नाटक कंपनीचा म्हणे तसा आग्रहच होता. म्हणून त्यांनीं नाटकांत आयत्या वेळीं कोदंडांना घाटावर आणून, माझा हात धरवून माझी आत्महत्या वांचविली आणि कोदंडाशीं माझें लग्न लावून दिलें. पण देवलांच्या पहिल्या योजनेंत मीं मरावें असेंच होतें व त्याप्रमाणें मी मेलेंहि आणि मग परलोकांतूनच मी पुढचा सर्व प्रकार पाहात होतें. रंगभूमीवर कोदंडाच्या हातीं लागलें तें माझें भूत होतें, पण परोपकारी कोदंडांना भय वाटूं नये म्हणून माझ्या भुताला त्यांच्याशीं मीं सुखानें संसार करूं दिला. म्हटलें कोणाच्या आनंदाचा भंग उगीच कशाला करा!

पण मीं मृत्युभूमि सोडली तरी जगावरचें माझें लक्ष कमी झालें नाहीं. माझ्या स्थितींतल्या मुलींची माया मला रात्रंदिवस वाटते. मला झालेलें दुःख त्यांना होऊं नये म्हणून प्रौढविवाह करीत जाण्याची व त्याहनहि विशेष म्हणजे प्रौढविवाहाला नांवें न ठेवण्याची प्रेरणा, मी माझ्या दैवी शक्तीनें लोकांच्या मनांत करीत असतें. त्यामुळें 'वाढली उंच ही किती । स्वजन बोलती । नाक मुरडिती । स्त्रिया परभारां । तुजठावें ईश्वरा ॥' असें रडगाणें गाण्याची पाळी आतां अविवाहित मुलींवर येत नाहीं. इंदिराकाकूहि आतां कांचनभटाच्या मागें मुलींच्या लग्नाचा तगादा फारसा लावीत नाहींत. मुली आतां इतक्या मोठ्या होतात कीं, कित्येक वेळां स्वतःचीं लग्नें त्या स्वतःच ठरवितात म्हणे! आणि एका वधूनें व तिच्या स्वयंवरित वरानें दोघांनीं मिळून आपल्या सह्यांनीं स्वतःच्या लग्नचिठ्या काढल्या असेंहि मला समजलें आहे! या गोष्टी मला अगदीं नापसंत आहेत. पण एक गोष्ट अजून झाली नाहीं. ती ही कीं, मला मागणी घातलेल्या श्रीमंतासारखे म्हातारे अजूनहि तरुण मुलींशीं लग्नें करतात तें पुरें बंद झालें नाहीं.

माझ्या नांवाच्या नाटकांत देवलांना प्रौढविवाहाचें समर्थन करावयाचें होतें असें कित्येक समजतात, पण ती चूक आहे. त्यांचा हेतु वृद्ध-तरुण विवाहाचा आणि मुलीचा विक्रय करून श्रीमान् होऊं पाहणाऱ्या 'कसाबा'चा निषेध करण्याचा हेतु होता. पण देवलांचें कौशल्य या कामीं अपुरें पडल्या-मुळें 'श्रीमंता'च्या निंदेच्या कोणत्याहि पदापेक्षां, देवलांच्या मनांत नसतां माझ्या थट्टेचें पद म्हणजे 'वाढली उंच ही किती' हेंच अधिक लोकप्रिय होऊन लोकांच्या तोंडीं बसलें आहे, आणि शारदा म्हणजे 'घोडनवरी' असा माझ्या नांवाला अर्थ जडला आहे इतकेंच.

माझ्या 'जन्माचें नाटक' झालें तेव्हां मी किती वर्षांची होतें बरें? देवलांनीं याविषयीं कांहीं गमकें ठेविलीं आहेत. उदाहरणार्थ, माझ्या वडिलांनीं माझ्या आईला लग्न-वयोमर्यादेचीं 'शास्त्रवचनें' (!) सांगितलीं त्यांवरून मी चौदा वर्षांची होतें असा ध्वनि निघतो. तसेंच श्रीमंत धुंडिराज यांनीं वधूविषयींची आपली आवड सांगतांना 'सुंदर खाशी सुबक ठेंगणी स्थूल न कृशहि न वय चवदाची' असें वर्णन केलें. त्यावरून मी चौदा वर्षांची होतें असें वाटेल. दोन्ही अनुमानेंच. पण मी सुमारें चौदा वर्षांची होतें ही गोष्ट

खरी. माझा उलट-हुंडा घेण्याकरितां वडिलांनीं मुद्दाम मला बिनलग्नाची वाढविली; पण तें वय कांहीं त्या वेळीं सरांस सर्वसंमत झालें नव्हतें. कारण ही गोष्ट ३०–३५ वर्षांपूर्वींची आहे. माझें नाटक पाहणारांची मात्र माझ्या वयाच्या बाबतींत फार धांदल होई. कारण नाटकांत माझी भूमिका घेणारा मुलगा जसा मिळेल तसें माझें वय दिसून यावयाचें. मुलगा एखाद्या वेळीं चांगला गाणारा मिळाला, पण फार लहान मिळाला, तर 'वाढली उंच ही किती' हें पद म्हणतांना प्रेक्षकांना हसूं येई. उलट तिशी उलटलेलेहि गायक नट माझी भूमिका वठवीत, तेव्हां त्यांनीं पोषाख कितीहि ठाकठीक सजविला तरी लोक हसतच.

असो. माझें वय नक्की मला माहीत नसलें तरी, म्हाताऱ्या नवऱ्याला देण्यापेक्षां, 'तूं टाक चिरून ही मान,' असें आईला स्पष्ट सांगण्याइतकी मी मोठी झालें होतें. 'माझें वय चौदापंधरा वर्षांचें झालें, तरी माझें लग्न होत नाहीं तें होऊं दे,' असा मी ईश्वराचा धांवा करी हें खरें. पण त्याचें कारण कोण पाहतो? संसार करूं लागण्याची तळमळच कांहीं मला खरोखर लागलेली नव्हती, आणि आतां माहेरीं राहणें पुरें झालें असेंहि मला वाटलें नाहीं. तर माझ्या चिंतेचें खरें कारण म्हणजे, माझ्या आईची चिंता. बाबा तर मला विकायलाच बसलेले. त्यांना कसली जनापवादाची लाज? पण माझ्याकडे पाहून समाजांतील स्त्रिया आईच्या तोंडाकडे पाहात, तेव्हां तिचें तोंड कसें गोरेंमोरें होई, हें पाहूनच मला माझें लग्न लवकर होऊन जावेंसें वाटे. शिवाय मी जितकी मोठी होईन, तितका अधिक म्हाताऱ्या नवऱ्याच्या गळ्यांत पडण्याचा संभव हें मला दिसत होतें. म्हणूनहि लवकर लग्न होऊन जावें असें वाटे.

अशा रीतीनें मी बाबांच्या हातून सुटावें असें जरी मला वाटत असलें, तरी आईचा हात सुटावा असें मला वाटत नव्हतें खास. 'बाळपणीचा काळ सुखाचा आठवतो घडिघडी' हे शब्द अगदीं बाहुली खेळवण्याच्या स्थितींतल्या अज्ञानी बाळपणाला उद्देशून मी लावले होते खरे. पण सज्ञान अवस्थेंतलें बाळपण म्हणून कांहीं नाहींच कीं काय? दुर्दैवानें आठ आठ वर्षांच्या मुलींचीं लग्नें होत, तेव्हां डाव्या हातांतली बाहुली काढून घ्यावी आणि उजव्या हातांत वराच्या गळ्यांत घालण्याची माळ तिला द्यावी असा प्रकार होत असे! पण बाहुली आणि बोहलें या दोहों शब्दांच्या प्रारंभीं

ब-कारच असला तरी एक पाय पहिल्या ब–वर तर दुसरा दुसऱ्या ब–वर अशी स्थिति होणें योग्य होतें काय? आतां तेव्हां तरी सगळ्याच सासवा कजाग होत्या असें नाहीं. पुष्कळ सासवा सुनांना लेकीसारख्या वागवीत. पण आईच्या घरचें बाळपण आणि सासूच्या घरचें बाळपण यांत जमीनअस्मानचा फरक असतो, आणि सासू कितीहि प्रेमळ असली तरी, तो फरक निघून जाणें अशक्य असतें. कारण स्वातंत्र्याची खरी मर्यादा बाहेरच्या गोष्टींपेक्षां मनानेंच अधिक घातली जाते.

जुन्या काळच्या गुलामगिरीच्या पद्धतींतहि गुलामांना ममनेनें वागविणारे मालक नव्हते असें नाहीं. पण ममता म्हटली तरी, त्यांतल्या त्यांत फरक असतो. घरच्या आवडत्या गाईबैलांविषयीं मालकांना वाटणारी ममता, गुलामांविषयीं मळेवाल्याला वाटणारी ममता, घरच्या नोकरांविषयीं धन्याला वाटणारी ममता, घरच्या सुनांविषयीं सासवांना वाटणारी ममता आणि घरच्या मुलाविषयीं आईला वाटणारी ममता–या सर्वांमध्यें ममता हा एकच शब्द असला, तरी त्याच्या प्रकारांत व व्याप्तींत किती तरी फरक असतो! व तो असणारच. सासू कितीहि सुस्वभावी आणि प्रेमळ असली तरी, स्वतः सुनेच्या मनांत आजवरच्या परंपरेनें जो एक अदबशीरपणा, जी एक मर्यादा, जी एक लाज उत्पन्न होते ती कांहीं केल्या जाऊं शकत नाहीं. सासू सुनेला कितीहि प्रेमळपणानें वागवीत असली तरी आजवर कोणत्या सुनेनें भूक लागली असतां सासूजवळ खावयाला हवें म्हटलें? कोणत्या सुनेनें खेळण्याची भातुकली मागितली आहे? कोणत्या सुनेनें दुखणें आलें असतां तें मोकळ्या मनानें एकदम सासूला सांगितलें आहे? कोणत्या सुनेनें आपल्या मैत्रिणींना सासरीं खेळावयाला फराळाला बोलावलें आहे?

सासू प्रेमळ असली तरी घरांतील नवऱ्याच्या वावरण्यामुळें तिची मोकळीक कायमची निम्मी मेलेली असते. सासूपुढें ती एक केवळ स्वस्थपणें बसेल; पण आपणामध्यें नवऱ्याच्या दृष्टीला बायको बसलेली दिसावयाचीच नाहीं. ती बसली असली तर उठलीच पाहिजे. तिला 'उठूं नको ग' असें खऱ्या मनानें कोणी दहादां सांगितलें तरी ती उठणारच! कारण पद्धतच तशी पडलेली. नवऱ्याच्या येण्याजाण्यांनीं बायकोला खोखोच्या डावासारखें होतें. केव्हां खोलींतून बसलें उठावें लागेल याचा नियमच नाहीं. मोठ्या घरांतून देखील सुनेनें बाजूला जाऊन स्वतःच्या मालकीचा वेळ म्हणून स्वस्थ बसण्यानिजण्याचा परि-

पाठ नाहीं. मग लहान घरांतून सुनांची अवस्था काय होत असेल बरें? सासर म्हटलें म्हणजे कांहीं एका मर्यादेपलीकडे तिचा आवाज उंच जातांच कामा नये, आणि मनमोकळें करून बोलणें हें तर नाहींच. एकंदरीनें स्वतः सून संसार करूं लागेपर्यंत सासरीं ती अर्ध्या जिवानें जगते असें म्हणण्यांत मुळींच अतिशयोक्ति नाहीं.

तेंच माहेरीं पाहा. या सर्व गोष्टी ती हट्टी नसतांहि आपल्या आईजवळ मोकळ्या मनानें करील. शिवाय कांहीं मर्यादेंत निरुपद्रवी हट्ट करणें हा एक किती अवर्णनीय अशा नाजूक आनंदाचा प्रकार आहे? आईपेक्षां बापाजवळ मुलगी कमी मोकळेपणानें वागते हें खरें. तरी पण बाप बसला असतां मुलगी सदरेवर जाऊन बसेल, त्याच्या टेबलावरचे कौतुकाचे जिन्नस हातांत घेऊन त्याच्याशीं ती खेळेल, त्यांतला एखादा मागूनहि घेईल. त्याच्याजवळ पडलेलें एखादें वर्तमानपत्र किंवा पुस्तक घेऊन वाचील. फार काय पण एखादे वेळीं आईनें हौस-हट्ट पुरविला नाहीं, तर त्याविरुद्ध तक्रार करून तो पुरवून घेण्याचें एक सत्तेचें स्थान म्हणजे बाप हा होय. दिवसांत 'आई आई' म्हणून दहादां हाक मारिली आणि बापाला एकदांच बाबा म्हणून हाक मारली तरी तिचीच किंमत प्रेमळपणांत व लडिवाळपणांत अधिक भरेल!

हें मी सांगतें याचा हेतु काय? इतकाच कीं, माहेरच्या आनंदाचे व मोकळेपणाचे चार दिवस तुमच्याआमच्या मुलींबाळींना अधिक मिळाले तर हवेच आहेत. आज नाहीं उद्यां सासर ठेवलेलेंच आहे, व मुली एकदां सासरीं गेल्या कीं मग माहेरीं येणेंराहणें ही गोष्ट कांहींशी जिकिरीचीच होऊन बसते. सासरमाहेर हीं गांवांतच असलीं तर कांहीं तरी सोय निघेल. पण परगांवीं सासर असलें म्हणजे प्रवासाचा खर्च व सोबत या दुहेरी अडचणींची भर त्यांत पडते. पुष्कळ प्रेमळ सासवा, मुलीसारखें सुनेचें कौतुक हातून घडावें म्हणून, मुलांचीं लग्नें लहानपणीं करतात. पण सुनांचें कौतुक म्हणजे सासूचें वैभव मिरविणें असाच प्रायः अर्थ असतो. कारण या सुना म्हणजे शृंगार घालून सजविलेले मुके प्राणी! सुनेच्या शृंगाराइतकें तिच्या सुखसोईकडे सासूचें लक्ष जात नाहीं. शिकारखान्यांत पक्षी कोंडून ठेवून त्यांना चारापाणी घालतात व ते पिंजऱ्यांत तरी उडतात बागडतात. कारण राखणारा फार तर दिवसांतून एक वेळ पिंजरा उघडतो. पण सुनेच्या पिंजऱ्याजवळ तिची राखणदारीण सासू दिवसभर असते.

बारा व चौदा या वर्षांतच मुलींचे दिवस माहेरीं अधिक सुखाचे व जाणत्या आनंदाचे जातात. 'जाणता आनंद' मी म्हणतें याचें कारण असें कीं, बारा वर्षांपर्यंत मुली खेळत असतात म्हणून आनंदांत असल्या तरी, किंचित् प्रौढपणामुळें घरचें बाहेरचें कळूं लागल्यानंतर त्यांना स्वतंत्रतेचा जो आनंद वाटतो तो नेणत्या वयांतील आनंदापेक्षां श्रेष्ठ आहे. या वयांत मुली कामेंहि करतात, पण तीं कोणी 'लादलीं' म्हणून नाहीं, तर घरच्या प्रेमाखातर. एखादें वेळीं कोणी काम सांगितलें तर "मी नाहीं करीत जा." असें म्हणण्याची जी स्वतंत्रता मुलींना माहेरीं असते ती सासरीं असत नाहीं. या स्वतंत्रतेचा हक्क मुली फारसा बजावतात असेंहि नाहीं. पण हक्क तो हक्क. एरवीं कामाला त्या चुकारपणा करतात असें नाहीं. आई किंचित् आजारी असली, किंवा घरीं पाहुणे आले, अगर घरीं व्रतवैकल्य किंवा सणसमारंभ असला, म्हणजे मुली हौसेनें आईच्या बरोबरीनें काम करतात आणि शेवटीं आईनें "दमली बाळ माझी" असें म्हणून पाठीवरून हात फिरविला म्हणजे मुलीला जो काय सात्त्विक गर्व, मोठेपणा, धन्यता वाटते त्याचें तेज तिच्या तोंडावर पाहून घ्यावें. सुनेनें केलेलें काम सासूला दिसतें, उमजतें, सर्व कांहीं खरें; पण तिच्या तोंडून शाबासकीचा शब्द उघडपणें निघत नाहीं, आणि तो निघाला तरी त्याची जाणीव प्रकट करण्यालाहि सुनेला मर्यादा वाटते.

माझें स्वतःचें लग्न प्रौढ होईपर्यंत झालें नाहीं, म्हणून या सगळ्या गोष्टींचा अनुभव मला आला. पण माझ्या आनंदाच्या दुधांत मिठाचा खडा पडला होता. तो असा कीं, लग्न न झाल्यामुळें लोकापवादाची आईला रात्रंदिवस वाटणारी चिंता. पण आतां या चिंतेचें कारण राहिलें नाहीं. मुली खुशाल चौदा वर्षांच्या झाल्या तरी जनापवाद येत नाहीं. आयांना चिंता वाटत नाहीं. यामुळें अज्ञानांतलें माहेर आणि प्रौढपणचें सासर यांमधला, माहेरचें जाणतें सुख भोगण्याचा, काळ असतो तोच खरा आनंदाच्या बहारीचा व मनोहर असतो आणि तो हल्लींच्या मुलींना पूर्वीपेक्षां अधिक लाभतो.

— २ —

शारदा नाटक कालांतरानें सहजच मागें पडलें. तेव्हां लोकांच्या तोंडचा 'शारदा', 'शारदा' हा शब्द कमी ऐकूं येऊं लागला. तेव्हां मला वाटलें, "बरें झालें. लोक मला विसरले." त्यांच्या स्मरणांत निरंतर राहावें असें मी तरी

काय केलें होतें ? मुळूमुळू रडलें आणि शेवटीं नदींत जीव दिला ! किती तरी कुमारिकांवर माझ्यासारखे किंवा माझ्यापेक्षां अधिक कठीण प्रसंग येत असतील. त्या साऱ्याच का असा जीव देतात ? कोणाचीं लग्नें वृद्ध वरांशीं झालीं पण त्यांनीं गृहिणीपेक्षां इस्पितळांतल्या नर्सचें परोपकारी कामच आपल्याला देवानें दिलें असें समजून, नवऱ्यांची शुश्रूषा करून, बिनबोभाट जन्म काढला. कोणाचीं लग्नें तरुण वरांशीं झालीं असतां त्यांचे नवरे शील व स्वभाव यांत हीन असल्यामुळें त्यांना दुःखांत व मनःसंतापांत जन्म काढावा लागला ! म्हातारा नवरा सुस्वभावामुळें किंवा 'त्या व्यंग ठाउके अंगिचें' यामुळें 'राखितो लौकिक घरच्या घरीं' असें म्हणवून घेण्यासारखा संभावितीनें वागतो, आणि 'ती नवरा तो स्त्री परी' असा वागणारा भेटला तर मग काय ? तिला मोठ्या अभिमानानें व आढ्यतेनें संसार करतां येतो !

पण तरुण तथापि दुःशील नवरा मिळाला तर बायकांना बिनलग्नाच्या सवतीची सेवा बटिकीप्रमाणें करण्याची पाळी येते. मग स्वाभिमान सोडून तसें तरी करावें एक, किंवा कायद्याच्या दृष्टीनें नव्हे, पण वस्तुस्थितींतली काडी मोडून घेऊन, नवऱ्याकडून मिळणारी पोटगी घेऊन, स्वतंत्र राहून, जिवाला दुसरा कसला तरी ळळा लावून घेऊन जन्म काढावा ! तिसरा मार्ग नाहीं. इतर कोणाला मनासारखा नवरा मिळाला असतां दुर्दैवच आडवें येतें आणि मग सर्व जन्म वैधव्याच्या दुःखांत काढावा लागतो. तात्पर्य, लग्न होऊन-सुद्धां "मी कुमारी कीं विधवा ?" असा प्रश्न विचारण्याचा प्रसंग माझ्या-सारख्या पुष्कळ मुलींवर येतो. पण त्या कांहीं माझ्यासारख्या जीव देत नाहींत. माझ्या या कृत्याचा मलाच पश्चात्ताप होऊन मनांत मी नेहमीं रंजीस असें. म्हणून माझें नांव लोक विसरले हें पाहून मला बरें वाटलें. पण गेल्या दोन वर्षांपासून पुनः 'शारदा-शारदा' या नांवाचा उच्चार होऊं लागला. म्हणून स्वस्थान सोडून जरा खालच्या अंतराळांत येऊन पाहूं लागलें, तों कळलें कीं, नांव तेंच खरें, पण ही स्त्री नसून तो कोणी एक साठीच्या घराला पोंचलेला वृद्ध गृहस्थ आहे !

पण त्या नांवाबरोबर दुसरेंहि एक नांव जोडलेलें आढळलें. नुसतें शारदा नव्हे, तर शारदा बिल ! मी कांहीं इंग्रजी शिकलें नव्हतें. मला बिल हा शब्द कसा ठाऊक असणार ? भिल्ल हा शब्द मात्र ऐकलेला होता. तेव्हां वाटलें कीं, 'तंट्या भिल्ला'प्रमाणें हाहि कोणी एखादा पराक्रमी भिल्ल होऊन गेला

असेल, म्हणून त्याचें नांव ज्याच्या त्याच्या तोंडीं झालें आहे. पण पुनः बारीक चौकशी केली तों कळलें कीं, बिल हें नांव कोणा वाटमाऱ्या दरवडेखोर भिल्लाचें नसून, नव्या झालेल्या एका कायद्याच्या योजनेचें आहे, आणि शारदा ही स्त्री नसून ती योजना घडवून आणणारा, समाजांतल्या अल्पवयाच्या मुलींची माया बाळगणारा, तो एक पेन्शनर न्यायाधीश आहे. 'गोदीचा गोविंदा' झाल्याची अद्भुत गोष्ट मीं ऐकली होती. पण स्वतः माझ्याच नांवाचा संबंध येत असल्यामुळें, या शारदेच्या नांवाचें असें तंतोतंत अक्षरशः रूपांतर झालेलें पाहून मला फारच मौज वाटली आणि मी हिमालय पर्वतावर जाऊन त्या माझ्या आडनांवाच्या गृहस्थाला पाहूनहि घेतलें. मनुष्य संभावित व रुबाबदार दिसला आणि वाटलें कीं, अलीकडचे कांहीं वृद्ध लोक माझ्या 'श्रीमंत पतीसारखे तरुण मुलींशीं लग्नें करण्याच्या उद्योगांत न पडतां' मुलींशीं लग्नें अगदीं लहान वयांत न होतां किंचित् प्रौढपणीं करण्याच्या सार्वजनिक खटपटींत गुंतलेले आहेत, तेव्हां खरोखरच समाजचरित्राचें चक्र फिरूं लागलें.

थोडें लक्ष घातल्यावर मला 'शारदा बिल' म्हणजे काय हें तर समजलेंच; पण त्याबरोबर आणखीहि कांहीं गोष्टी समजल्या. त्या अशा—हें बिल घडवून आणूं पाहणारा गृहस्थ जसा वृद्ध, तसाच त्याच्याविरुद्ध भांडणारा म्हणून ज्याची प्रसिद्धि झाली तो गृहस्थहि वृद्धच आहे. त्याचें नांव शर्मा असें आहे. तो पुरस्कर्ता क्षत्रियाचा पोषाख घालणारा, व हा विरोधक कपाळभर त्रिपुंड लावणारा, दाढी वाढलेला, ब्राह्मणी पोषाख घालणारा, असें पाहून मला वाटलें कीं, वैदिक काळांतला ब्राह्मण-क्षत्रियांचा, वसिष्ठ-विश्वामित्रांचा वाद पुनः हिमालयांत उपस्थित झाला कीं काय? पण हें तसें नव्हतें. ब्राह्मणक्षत्रियांच्या हक्कांचें हें भांडण नव्हतें. मुलींचा लग्नविधि करण्याला वयाची कांहीं मर्यादा घालावी कीं नाहीं इतकाच तो वाद होता; पण लग्नविधीपुरताच हो! कारण उलट शारदा म्हणत होते कीं, फलशोभन होण्याला चौदा वर्षांची मर्यादा पुरे, तर शर्मा म्हणत, "नाहीं, ती मर्यादा पंधरा वर्षांची असली पाहिजे!"

मग मला वाटलें हे भांडतात तरी कां? संसार करूं लागण्याचें वय जर चौदापंधरा असावें असें हे कबूल करतात, तर मग उगीच चार-दोन वर्षें लग्नविधि आधीं करण्यांत यांनीं काय हित साधलें? मीं पूर्वीं सांगितलेंच नाहीं का, कीं बारा व चौदा या वयांच्या आंतबाहेरच मुलींना माहेरच खरें सुख

मिळतें. लहानपणीं अज्ञानावस्थेंत भातुकली खेळतांना तें मिळत नाहीं किंवा मोठेपणीं मुलांचा मेळा बरोबर घेऊन चार दिवस माहेरीं येण्यानें मिळत नाहीं. कारण पुनः सासरचें 'पाठवून द्या' म्हणून पत्र येण्याची, किंवा यजमानांना खाणावळींतलें कदान्न खावें लागतें या जाणिवेची चिंता त्यांच्या मनांत असते. लहानपणीं माहेरघरीं मुलगी फुलपांखरासारखी असते. या फुलावरून त्या फुलावर उडण्याप्रमाणें या खेळावरून त्या खेळावर तिचें चित्त जात असतें. तिला घरांत काय चाललें आहे याची वार्ताच नसते. मोठेपणीं माहेरपणाला येणारी मुलगी आनंदानें वावडीप्रमाणें सुखसंवेदनांचें गुंजन करीत असते; पण वावडीला जसा सडा मागें खेचीत असतो, तशी तिची सासरची आठवण आपोआपच ओढ घेत असते.

आम्हा मुलींचीं लग्नें दहाबारा वर्षांच्या आंत झालीं असतां आमच्या लहानपणच्या खेळांतच ती एक भर पडते यांत शंका नाहीं. या खेळांतून बाहुल्यांच्या रूपानें मुलींना मुलें होतात. त्या त्यांना न्हाऊंमाखूं घालतात. आपल्या-दुसऱ्यांच्या बाहुलाबाहुलींचीं लग्नें लावितात. पण अशा रीतींनीं मातृपदस्थ झाल्याचा खेळ त्या खेळत असल्या तरी, स्वतःच्या लग्नाचा खेळ खेळतांना आढळतात काय? खेळगड्यांपैकीं घेतला एक मुलगा, म्हटला त्याला आपला नवरा, आणि लावीत बसल्या स्वतःचें लग्न, असें कोणीं कधीं पाहिलें नाहीं. स्वतःकडे मातृपद घेण्यांत त्यांना जी लाज वाटत नाहीं, ती स्वतःचा विवाहसमारंभाचा खेळ खेळण्यांत वाटते खचित. पण आपलें लट्टु-पटीचें लग्न आपण खेळांत न करतां आईबापांनीं खरोखरीचें आरंभलें तरी बालवयांत खेळापेक्षां मुलींच्या दृष्टीनें त्याला अधिक महत्त्व किंवा वेगळें स्वरूप नसतें. शाळेंत बक्षिससमारंभाच्या वेळीं संभाषणाचा पाठ म्हणण्याकरितां जर-तारीनें नटवूनसजवून मास्तरणी आपणांला नेतात, तसेंच बोहल्यावरचा खेळ खेळण्याच्या वेळीं पिवळी साडी नेसवून नेतात इतकाच काय तो फरक.

मोठेपणीं लग्नें केलीं तर लहान मुलींचाच काय पण हौशी आईबापांचाहि तो एक खेळ बुडतो हें अगदीं खरें आहे! लहानपणीं हलव्याच्या मुंडावळ्या बांधल्या असतां हळूच जिभेनें एक पदर तोंडांत घेऊन त्याचे एकदोन दाणे तोडून खातां येतात, तें मोठेपणीं कसें करतां येईल? प्रौढपणीं सुपारी लप-विण्याच्या जागा मर्यादित होतात व चोरी लवकर उमगते. नवरानवरी लहान असलीं म्हणजे त्यांना एकत्र न्हावयाला घालण्याचा खेळ, स्त्री-पुरुषांचा मेळा

सभोंवतीं उभा राहून, सर्वांना पाहावयाला सांपडतों. तेंच थोरपणीं अपुरीं पातळ पडदणी लावून घेऊन, नवऱ्याच्या अंगाला अंग भिडवून स्नान करणें, आणि पाण्यानें अंग व पडदणी भिजल्यानें शरीर संगमरवरी पुतळीसारखें दिसणें हें मुलींना सहजच आवडत नाहीं. लहान मुलींना उखाण्यांचें कौतुक वाटतें तसें प्रौढ मुलींना वाटत नाहीं. विड्या तोडण्याचा खेळ तर प्रौढ मुलांकडूनच बंद झाला आहे. वरातीचाहि थाट कमी होत चालला आहे; व कित्येक लग्नांतून अक्षतीसारख्या निष्कारण समारंभावर व एकंदरीनें सरसकट वाद्यांवर बहिष्कार घालण्यांत येऊं लागला आहे. ही किती तरी हौस गमावली! यांतल्या पुष्कळाला प्रौढ विवाहच कारण आहे.

पण लहान मुलींच्या खेळांत बालविवाहानें भर पडते म्हणून, किंवा प्रौढ-विवाह केल्यानें आईबापांच्या हौसेंत कमीपणा येतो म्हणून, बालविवाह करावा असें म्हणाल काय? असें तुम्हां आईबापांनाच मी शारदा विचारतें! स्वतः मुलीचें माहेरपणचें सुख, किंवा वधूवरपसंतीमध्यें मुलाप्रमाणें मुलीचा अल्पस्वल्प विचार घेण्याचा हक्क, या गोष्टीकरितां लग्नाची मर्यादा थोडी वाढवावयाला नको काय? वधूवरपसंतीच्या कामीं समाजाचें पाऊल कालांतरानें कसें पुढें पुढें पडत चाललें आहे हें थोडक्यांत मीं तुम्हांला सांगतें. फार जुन्या काळीं एक समाज दुसऱ्या समाजाशीं लग्नें करी, तीं मुलामुलींचीं नसत; तर समाजासमाजांचींच असत. पुरुषार्थाचे अनेक प्रकार आहेत. त्यांत जुन्या काळीं असा एक प्रकार होता कीं, एका समाजानें दुसऱ्यावर स्वारी करून त्याच्या मुली पळवून आणावयाच्या. या बलात्कारविवाहाची खूण अजूनहि कित्येक जातींत उरली आहे. हल्लीं प्रत्यक्ष बलात्कार होत नाहीं, पण बलात्काराचें नाटक होतें तें असें कीं, नवऱ्यानें मुलीला उचलून आणावें व तिच्या आप्तांनीं नवऱ्याला हसतखेळत विरोध करावा. म्हणजे बलात्काराचें, अत्याचाराचें स्वरूप जाऊन त्याला समारंभाचें स्वरूप आलें आहे.

श्रीकृष्णानें रुक्मिणी पळवून आणली, अर्जुनानें सुभद्रा पळवून आणली. या उदाहरणांत वधूची संमति असली, तरी व्याह्याव्याह्यांच्या दृष्टींनीं तो बलात्कारच होय. रोमन इतिहासांत साबियन टोळीच्या मुली रोमन लोकांनीं पळवून आणल्या व लग्नें केलीं अशा दंतकथा आहेत. अशा विवाहांत ज्याच्या हाताला लागेल ती त्याची नवरी. याच्यापुढची पायरी अशी कीं, एका राजानें दुसऱ्या राजाला जिंकलें असतां, जित राजाची बहीण किंवा मुलगी

जेत्या राजाला बायको म्हणून अर्पण करण्याची अट तहांत घालावयाची व ती पुरी झाली म्हणजे, दोन्ही राज्यांचें सख्य व्हावयाचें. हा राजकारणी विवाह होय. यानंतर शांततेच्या काळांतहि दोन गांवांनीं स्नेहसंबंध जोडण्याकरितां एका गांवाची मुलगी दुसऱ्या गांवाला द्यावयाची असा प्रकार आढळतो. याची खूण कांहीं ठिकाणीं अजून अशी उरली आहे कीं, लग्न झाल्यावर मुलीचा बाप जसा जांवयाच्या घरीं जेवीत नाहीं, त्याप्रमाणें ज्या गांवानें मुलगी दिली त्या गांवच्या कोणाहि मनुष्यानें, ज्या गांवांत मुलगी दिली त्या गांवचें अन्न खावयाचें नाहीं किंवा पाणी प्यावयाचें नाहीं. अशी चाल अजूनहि जुन्या चालीच्या कांहीं गांवांतून दिसून येते. याचें कारण द्वेष नव्हे. तर 'मुलीचें दान' केलें म्हणजे, त्या वेळीं तिचें सर्वस्व दान झालें म्हणून तिच्या घराचें पाणीहि प्यावयाचें नाहीं ही स्वत्वनिवृत्तीची अत्यंत उदात्त सात्त्विक कल्पना. अर्थात्, एक गांव दुसऱ्या गांवचा व्याही झाला म्हणजे एका गांवानें दुसऱ्या गांवचें पाणी प्यावयाचें नाहीं हा त्याच कल्पनेचा विस्तार होय.

यानंतर गांव सुटून घराणें हा सामाजिक घटक (Unit) झाला; तेव्हां एका घराण्यानें दुसऱ्या घराण्याला मुलगी दिली असा विवाहाचा अर्थ झाला. या कल्पनेच्या स्थितींत व्यक्तिशः मुलगा पाहणें किंवा मुलगी प्रत्यक्ष पाहणें याला अवकाशच उरत नव्हता. दोन घराण्यांचा स्नेहसंबंध किंवा सोयरीक जमविणें, संपादणें हें ध्येय, व वधूवर हीं त्या ध्येयाचीं फक्त साधनें! जुन्या खानदानीच्या घराण्यांतून अजूनहि असले विवाह झालेले पाहण्यांत येतात. ही स्थिति जाऊन वधूवरांची पसंती समक्ष पाहून—पारखून करावयाची अशी चाल पडली. पण यांतहि वराला वधूचें दर्शन नाहींच. यानंतर वराकरितां आईबापांनींच वधू पसंत करावयाची, पण ती त्याला सहज नजरेला घालावयाची अशी चाल पडली. यांत वराला फार तर नकार दर्शविण्याचा (Veto) अधिकार मिळाला. पण अमुक नवरी नको म्हणण्याप्रमाणें अमुक हवी असें म्हणण्याचा (Initiative) अधिकार त्याला मिळाला नाहीं. त्यानंतरची अलीकडची पायरी म्हणजे, वराला अनेक वधू दाखवावयाच्या व त्यांतील वाटेल ती त्यानें पसंत करावी; व मग त्या मुलीशीं त्याचा विवाह करावा ही होय. पण त्यांतहि वधूला वराचें दर्शन घडावयाचें तें वरानें वधू पाहण्याच्या व्यवहारांत ओझरतें घडावयाचें. पण अलीकडे कांहीं सुज्ञ आईबाप वधूलाहि वर

'हवा-नको' म्हणण्याचा अधिकार आहे असें न्यायबुद्धीनें मान्य करून, वधूवर-दर्शनाचा व्यवहार दुतर्फी हेतूनें करतात. म्हणजे आज मुलीला फार झालें तर नकाराचा म्हणजे Veto चा अधिकार मिळाला आहे इतकाच त्याचा अर्थ होय. पण हा अधिकार बजावणारी मुलगी आमच्या पुराणप्रिय शास्त्र्यांच्या मतांप्रमाणें 'अष्टवर्षा गौरी' खास नव्हे. ती तेराचौदा वर्षांची तरी निदान असली पाहिजे व असतेहि.

हा सर्व सामाजिक इतिहास पायरीपायरीनें सांगण्याचा हेतु इतकाच कीं, विवाहकल्पनेच्या दृष्टीनें आपल्या 'सनातनी' हिंदु समाजाच्या पायाखालील वाळू किती तरी निघून गेली आहे हें दाखवावयाचें. समाज हा पोहावयाला पडलेल्या गड्याप्रमाणें आहे. तो प्रवाहाबरोबर वाहवत असतो, पण स्वतःहि हात टाकीत राहिल्यानें त्याला वाटतें कीं, मी कांहीं प्रवाहामुळें स्थानभ्रष्ट झालों नाहीं! एका टोळीनें दुसऱ्या टोळीवर स्वारी करून मुली पळवून आणून विवाह करणें हें जितकें एक वेळ 'सतातन' म्हणजे शुद्ध मानलें जात होतें, तितकेंच आज वधूवरांना परस्पर-दर्शन घडवून व त्यांना निदान नकाराचा अधिकार देऊन त्यांच्या अकरणरूपी पसंतीनें त्यांचे विवाह करणें हें तितकेंच शुद्ध व 'सनातन' मानलें जाऊं लागलें आहे. या दोन सनातन चालींतील अंतर जमीनअस्मानाचें नाहीं काय? पण या भेदांतहि एक चमत्कारिक साधर्म्य आहे. तें असें कीं, या दोन्ही चालींत विवाहाची मुलगी अज्ञान असत नाहीं, तर खरी उपवर असते!

— २ —

किंचित् प्रौढपणीं मिळणारें माहेरच्या रहिवासाचें सुख, आणि "मला अमुक वर नको" इतकेंच आईबापांना मानेनें किंचित् दर्शविण्यापुरता वधूला स्वयंनिर्णय, या दोहोंच्या दृष्टीनें मुलींच्या लग्नाचें वय चौदा वर्षांपर्यंत वाढवावें असें मीं म्हटलें. पण त्यापेक्षां त्याला आणखीहि कारणें आहेत. मात्र तीं माझी नाहींत हो! तुमचीं तुम्हींच उत्पन्न केलीं आहेत. कशीं तीं पाहा. राजकारणांत आपण घराबाहेर, सभांतून, वर्तमानपत्रांतून काय बोलत असतों व कायदे कौन्सिलांतून काय करीत असतों याची शुद्ध तुम्हां पुरुषांना सामाजिक बाबतींत रहात नाहीं, असेंच मी शारदा म्हणतें! प्रथम सक्तीचें सार्वजनिक शिक्षण घेऊं. ही सक्ती तुम्ही मुलांप्रमाणें मुलींच्याहि आईबापांवर

करावयाला तयार आहां. याचा अर्थ मुलीनें लहानपणीं शिक्षण घेण्यास सुरुवात करावी अशी आज सर्व समाजाची इच्छा आहे. सरकार पैसा देत नाहीं, आणि तुमच्या लोकल बोर्डाजवळ पैसा नाहीं, म्हणून घोंगडें भिजत पडलें आहे ही गोष्ट वेगळी. पण पैसा असल्यास, कुणबी, कोळी, महार, मांग, वडार व कातवडी या सर्वांच्या मुलींना सहा वर्षांपासून तुम्ही शाळेंत शिकावयाला पाठविण्याची सक्ती करावयाला तयार! म्हणजे इतक्या लहानपणीं मुलीचें पाऊल घरांतून बाहेर तुमचें तुम्हीच काढलें ना?

मुलगी शाळेंत जाते, या गोष्टीचें दूषण न वाटतां, तें आतां भूषण वाटूं लागलें आहे! लग्नाला मुलगी पाहावयाला लोक आले म्हणजे, त्यांनीं विचारण्याच्या आधींच "ती अमक्या इयत्तेंत आहे," असें थोडेंसें फुगवून तुमचें तुम्हीच सांगतां. ती इंग्रजी शाळेंत जाऊं लागली असल्यास तिजकडून आग्रहानें चार छापील अक्षरें लावून दाखविलीं म्हणजे तुम्हांला किती तरी धन्य वाटतें. या अप्रत्यक्ष शिफारशीमुळें हुंडा कमी होईल अशी आशा कांहीं तुम्हांला फारशी नसते म्हणा; पण मुलगी मुलाला पसंत होण्याचा संभव थोडा अधिक म्हणूनच तिच्या शिक्षणाची किंचित् अतिशयोक्ति करण्याचें धाडस तुम्ही करतां. याचें कारण तुम्हांला आतां माहीत झालें आहे, कीं लिहितांवाचतां येणारी मुलगी नवऱ्यामुलाला अधिक आवडते. उघडच आहे. विद्या हें जर स्वतःचें भूषण असें मुलगे समजतात, तर त्या भूषणानें थोडीबहुत तरी मंडित अशीच सहचारिणी वधू आपल्याला असावी असें मुलांना वाटल्यास त्यांत काय आश्चर्य? अर्थात् मुलांना सुशिक्षित करून त्यांना लग्नाचे मोठे ठेवून, थोडीबहुत त्यांजकडून वधूची पसंती करवून लग्नें करण्याचा प्रघात तुम्हीं पाडला, त्यामुळें मुली शिकलेल्या असाव्यात हें ओघानेंच प्राप्त होतें.

पण बारा वर्षांपर्यंत मुलीचें अध्ययन तें कितपत होणार? आणि समजा, तिची बुद्धि चालू लागली, ती वर्गांत वरचा नंबर व बक्षिसें मिळवूं लागली, तर मग काय तिला तुम्ही बळजबरीनें मागें खेचणार? तुम्हांला पाहिजे तितकेंच शिक्षण तिनें मिळविणें हें भूषण! आणि त्यापुढें अधिक शिक्षण मिळविण्याची इच्छा धरणें हें मात्र दूषण काय? आतां केवळ शिक्षणाची हौस पुरी करण्याकरितां अविवाहित राहणाऱ्या मुली किंवा त्यांना अविवाहित ठेवणारे आईबाप थोडे असतात. पण त्या मुली आपण विचारांतूनच वगळूं.

लग्नें चौदापंधरा वर्षांपुढें ठेवावयाचीं नाहींत असें म्हटलें, तर बाराच्यापुढें आणखी फार तर दोनतीन वर्षें शिकतील, आणि त्यानें म्हणजे त्यांचें शिक्षण पुरें झालें असें होत नाहीं हें खरें. पण मुलांचें तरी शिक्षण मनानें खरोखर पुरें झाल्यावरच ते विद्यापीठ सोडतात असें आहे काय? कोणी मॅट्रिक झाला म्हणजे घरचा संपन्न म्हणून इतकेंच पुरें म्हणतो, तर कोणी श्रेष्ठ पदवी घेऊन पुरें म्हणतो. पण 'पुरें' याचा अर्थ खरा काय असतो? विद्या व शिक्षण हें कधींच कोणाचें पुरें होऊं शकत नाहीं. पण "आतां उदरनिर्वाहाचें साधन पाहावयाला लागूं," असें म्हणण्यानें मुलांच्या शिक्षणाला जशी स्वाभाविक मर्यादा पडते, तशीच "आतां संसार करावयाला लागूं या," असें वाटण्यानें मुलीच्या शिक्षणालाहि मर्यादा पडते व ती तेथें पडावी हें योग्यच आहे.

पण एखाद्या मुलीला विद्याच अधिक शिकावी आणि संसारप्रारंभ थोडा लांबवावा असें वाटलें तर मग काय करणार? नुसतें पोटाला मिळविणें हें जसें तुम्हीं मुलांचें ध्येय ठेवलें नाहीं, तसेंच नुसता संसार करणें हें तुम्हीं मुलींचेंहि ध्येय ठेवलें नाहीं! तर तुम्हांला आपल्या देशाला स्वयंनिर्णयानें ठरविलेलें 'स्वराज्य' किंबहुना 'स्वतंत्र स्वराज्य' पाहिजे! आणि मुलामुलींच्या भावी पिढ्यांकडून तुम्ही तें मिळवणार, टिकवणार व चालवणार! या सर्व गोष्टी बारा वर्षांच्या मुली व अठरा वर्षांचे मुलगे यांचीं लग्नें उरकून घेऊन मग तुम्ही करणार! पण हें सर्व शक्य किंवा निदान बरोबर आहे, असें तुम्हांला वाटतें का? जुन्या काळीं हें शक्य होतें असें मीच आपण होऊन म्हणतें, कारण सगळें जगच तसें होतें. पण जग बदलल्यावर तुमचे तुम्ही मात्र जागेवर राहून जगाच्या बरोबरीनें त्यांच्याशीं व्यवहार करून यश मिळवाल हें शक्य आहे काय? स्वराज्य मागण्याची हुकी आली म्हणजे, नेहरू रिपोर्टांत काय असेल नसेल त्यासकट तो मान्य करण्याची तुमची तयारी. पण त्या रिपोर्टांत स्त्रियांना पुरुषांबरोबरीचे सर्व हक्क दिले आहेत ते द्यायला तुम्ही तयार आहां काय? तयार नसला तर नेहरू-रिपोर्टांतील त्या कलमाविषयीं निषेधपर सभा तुम्ही का भरवीत नाहीं? आणि तयार असला तर आपला लग्नवर डोळ्यांनीं पाहून हुकारनकार—निदान डोळ्यांनीं—देण्याइतका त्या लग्नाच्या वेळीं प्रौढ असाव्या असा त्यांनीं किंवा त्यांच्याकरितां दुसऱ्या कोणी हक्क सांगितला तर तो तुम्ही अमान्य करणार काय?

स्वराज्याच्या चळवळींत जो कोणी हितशत्रु विरुद्ध बोलेल त्याचें तें म्हणणें

खोडून टाकावयाला तुम्ही सहजच तयार असतां. एखाद्या इंग्रजानें असें म्हटलें कीं, "तुम्ही हिंदी लोक स्वराज्याला नालायक आहां, कारण तुमच्यांत स्त्रियांना शिक्षण नाहीं !" तर त्याला खोडून काढावयाला तुम्ही असें नाहीं म्हणत कीं, "वा:, स्त्रीशिक्षणावर स्वराज्याची लायकी अवलंबून असते वाटते ! आमची अहल्याबाई कुठें इंग्रजी शिकली होती ? तिला पोथीपुस्तकदेखील वाचतां येत नव्हतें. पण तिनें राज्य हाकलें व मुत्सद्द्यांत गणना करून घेतली," असें तुम्ही म्हणत नाहीं; तर लगेच सरोजिनी नायडूकडे अंगुली दाखवितां आणि म्हणतां, "पाहा ही आमची विदुषी ! साहेबा, तूं तरी बोलून पाहा तिच्यासारखें फटाकडें इंग्रजी. आम्ही तिला राष्ट्रीय सभेची अध्यक्ष केली, आणि आमचा परराष्ट्रीय वकील म्हणून अमेरिकेला पाठविली." पण असें उत्तर देऊन, तुम्ही स्त्रीशिक्षण व प्रौढविवाह गळ्यांत घेतां हें आहे का ठाऊक ? पदवीधर स्त्रियांचीं चित्रें अभिमानानें वर्तमानपत्रांतून देतां. कोणतीहि परिषद किंवा सभा स्त्रीनें एखादें भाषण केल्याशिवाय सांग झाली असें तुम्हांला वाटत नाहींसें झालें आहे. झगा घालून एखाद्या नव्या वकिलीणबाईनें खटला चांगला चालविला म्हणजे, न्यायाधीशानें तिच्या स्तुतिपर काढलेले शब्द तुम्ही उद्धृत करतां. एखादी स्त्री स्थानिक स्वराज्यसंस्थेची किंवा कायदेकौन्सिलाची सभासद झाली तर तुम्ही 'मर्यादा सुटली' असें म्हणून निषेदप्रदर्शक सभा भरवितां काय ? तात्पर्य, स्त्रीशिक्षण, स्त्रीकर्तृत्व हें भूषण मानण्याची सवय तुमच्या चोरट्या मनाला लागून राहिली आहे हें तुम्हांला माहीत आहे कोठें ?

या अपवादात्मक गोष्टी सोडून दिल्या तरी, केवळ मुलांच्या लग्नाची मर्यादा वाढूं लागल्यामुळेंहि मुलींच्याहि लग्नाची मर्यादा वाढूं लागली आहे. मुलांना सहजच वाटूं लागलें आहे कीं, आपण उदरनिर्वाह करण्याचें साधन मिळवूं लागेपर्यंत लग्न करून, आपल्याबरोबर बायकोचा उदरनिर्वाह करण्याची जबाबदारी आणखी कशाला पत्करा ? ती पात्रता आली म्हणजे लग्न करूं. मोठी वधू आयतीच मिळेल. मग एकदम संसाराला सुरुवात करूं ! पण मुलांचें लग्नवय वाढलें म्हणजे मुलींचें वय याहि कारणानें वाढतें. वधूवरांच्या वयांत कांहीं ठराविक अंतरच असावें, जास्त असूं नये, ही गोष्ट सर्वमान्य आहे. अर्थात् 'सुईमागें दोरा' हा न्याय येथें लागू पडतो. व्याकरणदृष्ट्या ही उपमा चूक ठरेल; पण व्यवहारदृष्ट्या खचित बरोबर आहे. सुईमागें दोरा असें न म्हणतां वाटल्यास 'टोच्यामागें दोरी' असें म्हणा; पण पुरुषलग्नमर्यादेची वाढ ही

अनुयोगी आणि स्त्रीलग्नमर्यादेची वाढ ही त्याची प्रतियोगी—एक कारण—दुसरें अनुबंदी कार्य हें कांहीं खोटें ठरत नाहीं.

परवां माझ्या नांवाच्या बिलाची चर्चा कायदेमंडळांत चालू होती, तेव्हां मी बिनतिकिटानें गॅलरींत बसून कानोसा घेत होतें. नवा कायदा नको म्हणणारे व पाहिजे म्हणणारे यांच्यांत एरव्हीं विरोध हवा तितका दिसला; पण एका गोष्टींत त्यांचें ऐकमत्य दिसलें. ती ही कीं, गर्भाधानसंस्काराची मर्यादा चौदाच काय पण पंधरासोळा वर्षांचीहि ठेवावी. कायद्याला विरोध करणारे लोक तर ही गोष्ट इतरांपेक्षां अधिक जोरजोरानें व आग्रहानें प्रतिपादन करीत होतें हें पाहून मला हसूं आलें! कारण त्याचबरोबर ते हें मात्र प्रतिपादींत होते कीं, मुलींचा नुसता लग्नविधि मात्र बारा वर्षांच्या आंत उरकून घ्यावा! हें केवळ शास्त्राच्या दृष्टीनें नव्हे, पण आम्हां मुलींवर विश्वास ठेवतां येत नाहीं म्हणूनहि बरें का? आमचें लग्न इतक्या लवकर उरकण्याला आतां योग्य वरच मिळत नाहींत हें वेगळें. पण मिळालें तर उरकून घ्यावें असें त्यांचें म्हणणें. कां? तर गुन्हेगारांकडून जसा सद्वर्तन ठेवण्याबद्दल जामीन घ्यावयाचा, किंवा क्रिमिनल ट्राइब्सच्या लोकांकडून गुन्हे होऊं नयेत म्हणून त्यांच्यामागें रात्रीं चौकीवर हजेरी देण्याची सक्ती ठेवावयाची, त्याचप्रमाणें आम्ही मुली बारा वर्षांच्या झाल्याबरोबर आमचें पाऊल वांकडें पडूं नये याकरितां लग्न करून आम्हांला जामिनकींत गुंतावावयाचें! येऊनजाऊन आम्हां मुलींवर तेवढा तुमचा अविश्वास! ठीक आहे. शहाण्या इसापनें सिंह आणि चितारी यांची गोष्ट लिहिली ती खोटी कां होईल?

पण अशा लग्नानें एकांत अनेक तोटे कसे होतात पाहा. आम्हां मुलींचें शिक्षण लवकरच अकालीं संपुष्टांत येतें. किंचित् प्रौढपणीं मिळणाऱ्या माहेरच्या सुखाला व आनंदाला आम्ही आंचवतों. मुलींच्याप्रमाणें नवऱ्याच्या अभ्यासाला एक नसता अडथळा येतो. नवऱ्याच्या परीक्षेच्या काळजींत संसाराच्या काळजीची अकालीं भर पडते, आणि वैधव्ययोगाचा संभव तितकाच दोनतीन वर्षांनीं विनाकरण वाढतो. आमच्या पतिप्रेमाची वेल फळाला यावयाची तर, ती रुजत घालण्याला योग्य ऋतु आमच्या ऋतुकालपूर्वींचाच असतो असें कांहीं सामाजिक स्थितींतील तज्ज्ञ बागवानांनीं ठरवून ठेवल्याचें दिसतें. ही वेल कांहींजण मृगाच्या झडींत लावावी म्हणतात, तर ती गोष्ट त्यापूर्वीं रोहिणीमंडपांतच उरकून घ्यावी असें इतर म्हणतात. प्रो. गोळे यांनीं

‘ हिंदु धर्म आणि सु
जोपासनेचें जें वर्णन . . . . आहे, पण तें पटत नाहीं !

९ म्हणा स्वराज्य-मतदार की जय !

दिपवाळी सण नुकताच होऊन गेला होता. पण आजचा दिवस पिंपळगांवच्या लोकांना दिपवाळीपेक्षां अधिक आनंदाचा वाटला. आज गांवच्या देवीचा उत्सव; आणि गांवच्या देवीचा उत्सव म्हटला म्हणजे खेडे-गांवच्या प्रत्येक मनुष्याला घरच्या लग्नसमारंभासारखा प्रिय. त्या दिवशीं गांवचा मनुष्य प्राण गेल्यानें परगांवीं जायचा नाहीं; इतकेंच नव्हे तर परगांवीं नोकरीवर असलेले गृहस्थहि किरकोळ रजा काढून उत्सवाला यायचे. सर्व दिवसभर एक ना एक कार्यक्रम असायचाच. कथा, पुराण, पालखी, कुस्त्या, ललित व भंडारा या नेहमींच्या कार्यक्रमाला यंदा पतपेढीची सभा व शेतकी प्रदर्शन यांची जोड मिळाली होती.

गांवांत दुफळी मुळींच नाहीं. सत्यशोधक समाजाचें नवें वारें गांवांत भरलें नव्हतें. यामुळें ब्राह्मणांपासून महारांपर्यंत सर्व लोक एकमेकांस भावाभावांप्रमाणें वाटत असत. मध्यरात्रीं ललित आटोपल्यावर बरीचशी मंडळी घरोघर निघून गेली. तथापि एका गटांतली अशी दहापंधरा मंडळी मागें राहिली होती, मंडळी जवळजवळ समवयस्क—तीसपस्तीस वर्षें उमरीची. त्यांचा दर्जा निरनिराळा होता तरी ते सर्व एकमेकांस केवळ मित्रत्वाचे नात्यानें अरे-जारे म्हणत.

चौकाच्या एका कोपऱ्याला दगडांच्या चुलीवर चहानें भलें मोठें आधण ठेवलें होतें व ऊन ऊन चहा होईपर्यंत श्रमपरिहारार्थ खरोखरीच शिळोप्याच्या गप्पा सुरू होत्या.

या मंडळींत कोण कोण लोक होते याची माहिती दिल्यास ग्रामस्थ व मित्र या नात्यानें त्यांच्यांत एकोपा कसा नांदत होता हें कळून येईल. सर्वांत श्रीमंत व मोठ्या दर्जाचा इसम म्हटला म्हणजे राघोपंत सबनीस. हा मध्य-भागांतील एका जिल्ह्याच्या गांवीं वकील असून म्युनिसिपालिटीचा अध्यक्ष

होता. घरीं तीन कारकून राबण्याइतकें वकिलीचें काम होतें. दुसरा गृहस्थ सखारामपंत नाशिककर. याचा विद्याभ्यास मध्येंच संपला होता. तरी तो चांगला लेखक असल्यामुळें मुंबईच्या एका पत्राचा दुय्यम संपादक होता. सदू बारटक्के हा व्यापारी असून त्यानें घरीं मागांचा कारखाना घातला होता. जानराव पाटील याजकडे मुलकी व पोलीसपाटिलकी दोनतीन वर्षांपासून आलेली होती. हरबा कुळकर्ण्यानें वतन मोबदला करण्याचें नाकारल्यामुळें त्यावर अधिकाऱ्यांची इतराजी झाली होती; पण त्याच्या जागीं लायक तलाठी न मिळाल्यामुळें प्रांतसाहेबांनीं त्याला, कानाडोळा करून, तसेंच कामावर ठेविलें होतें. नामू न्हाव्यानें एका खांसाहेबांच्या पिकदाण्या धुऊन गायनाची विद्या उत्कृष्ट संपादिली होती. तो सनई फार चांगली वाजवी. त्यानें नव्या पद्धतीचा हेअर-कटिंग सलून काढला होता. तुका महाराचा झुळझुळीत पोषाख पाहून हा गांवचा येसकर असें त्याला म्हणण्याची कुणाचीहि छाती झाली नसती. लहानपणणीं मृदंगपाट खेळण्यांत तो पटाईत असल्यामुळें ब्राह्मण, मराठे मंडळी त्याला आपल्याबरोबर खेळायला चोरून घेत. प्रथम प्रथम शिवाशिवीच्या पापाबद्दल ते हौदावर संध्या करतांना दोन आचमनें हळूच प्रायश्चित्ताबद्दल म्हणून अधिक टाकीत. पुढें पुढें त्यांच्या संध्येबरोबरच प्रायश्चित्ताचीं आचमनें सुटलीं. तुकाहि येसकरीचें काम नांवाला करून शेतवाडीवर चांगलेंच पोट भरूं लागला. बगाराम गुपचूप वंशपरंपरेचा हरदासाचा धंदा चालवून लोकप्रिय झाला होता. चेंडया भागवत हा नांवाप्रमाणें खुशालचेंडू गर्भश्रीमंत असून स्वभावानें आनंदी, विनोदी व परोपकारी असल्यामुळें त्याच्याकडे आलेलें गांवमामाचें काम तो मोठ्या आनंदानें करी.

चहा तयार झाल्यावर ढोसण्याचा एकमेकांस आग्रह व्हायचा तसा झाला. डोळ्यांवर आलेली झोप निघून गेली. पानसुपारीचें तबक रिकामें होऊं लागलें. विडयांचा धूर चुलवण्याच्या धुराला मागें टाकूं लागला. कांहीं वेळानें तुका महार पुढें होऊन म्हणाला, " दादा, बाबा, रामराम, मी घेतों आपली रजा."

कुळकर्णी—कां रे तुक्या, अशी घाई कां ? तूं चहा घेतलास कीं नाहीं ?

महार—घेतला कीं दादा.

कुळकर्णी—मग बस ना क्षणभर स्वस्थ ! कालपासून तुझा पाय जमिनीला टेकलाच नाहीं कसा तो. मोठा गुलाम मेहनती !

महार—गांवचें काम, मेहनत न करून कसें होणार! घटकाभर बसलो बी असतों हायसा–पण ते नवे जाहीरनामे आल्यातना तालुक्यांतून. ते सकाळच्या आधीं गांवभर चिकटायला हवेत. आतां हायसा बस म्हणशील आणि सकाळला भिंतीवर जाहीरनामे दिसले नाहींत म्हणजे, कुळकर्ण्याच्या कांद्या, तूंच काढशील कीं माझी खरड ?

वकील—काय रे हरबा, कसले रे जाहीरनामे ?

संपादक—काय रे, गांवावर जादा पोलीसबिलीस बसलें कीं काय ?

पाटील—आमच्या गांवावर जादा पोलीस ? आणि तें कसें बसेल ? अस्मादिक पोलीसपाटील आहेत. गांवचा बंदोबस्त बिघडेल ? काय बिशाद ? वर्षभर रामराज्य असतें. या उत्सवाच्या निमित्तानें हे तुम्ही संपादक आणि वकील गांवांत येऊन काय राजद्रोहाची आग लावाल तेवढीच. पण ती विझवायला मीहि उत्सवाला हजर राहतोंच.

संपादक—काय लेकाचा जान्या रामराज्याच्या गोष्टी सांगतो आहे पाहा! मी आणि हा राध्या वकील वर्षांतून एकदां येतों म्हणून तुम्हां अधिकारी लोकांना वचक तरी बसतो ! नाही तर तुम्ही पाटीलकुलकर्णी लोकांनीं मिळून गांवाला आगी लावल्या असत्या, आहे ठाऊक? वर्तमानपत्रकारांचा कोरडा तुमच्या पाठीवर आहे म्हणूनच गोष्ट बरी.

हरदास—का संपादकराव, वर्तमानपत्राची पांच हजारांची जामीनकी आपण पटवायच्या उद्योगांत होतां ती पटली का ?

संपादक—ही हरदासी अक्कल! पण सख्या, लेका वर्म म्हणून काढलेंस तेंच भूषण ठरलें ना ? योद्ध्याला जशी हाडावरची जखम तशी संपादकाला प्रेस आक्टाखालची जामीनकी !

हरदास—बरोबरच आहे. दोन्हींहि भरायला सारख्याच कठीण, इतकेंच त्यांचें जे आहेत्ते साम्य !

संपादकावर बोलण्यांत हरदासानें बाजू परतवली. सर्व हसूं लागले. तेव्हां सबनीस वकील म्हणाला, " तें राहूं दे ना ! पण जाहीरनामे कशाचे लागणार तें अजून नाहीं कळलें ? "

कुळकर्णी—जाहीरनामे तुमच्या नव्या स्वराज्याचे, दुसरें काय? काय रे सख्या, हें स्वराज्य म्हणजे तुम्हां वर्तमानपत्रकारांची कमाई ना ? तूं दिमाखानें ' होय ' म्हणणार हें मला माहीतच आहे.

संपादक—यांत काय संशय ! दिमाखानें होय म्हटलें काय, नाहीं तर लाजत नम्रपणानें होय म्हटलें काय, खरें तें खरेंच ! वर्तमानपत्रें जगांत नसतीं तर स्वराज्य कुणाला मिळालेंच नसतें. श्रम आमचे आणि बक्षिस तुमचें ! चैन आहे झालें गुलामांनो !

सावकार—काय रे सबनीस, तूं जुन्या इतिहासाचे कागद अलीकडे चाळीत असतोस म्हणतात. शिवाजीनें स्वराज्य मिळविलें तें कोणा वर्तमानपत्राच्या पराक्रमावर हें तुला कुठें आढळलें असेल तर सांग ना ?

हरदास—शिवाजीच्या वर्तमानपत्राचें नांव 'भवानी' असें होतें म्हणतात. तें ठराविक वाराला प्रसिद्ध होत नसे. पण योग्य व कठीण प्रसंगाला त्याचा अंक हटकून प्रकट होई, व तें प्रकट झालें कीं त्याबरोबर त्याचा वार ठेवलेलाच असायचा. 'भवानी'चा वार कधींच चुकला नाहीं.

वकील—तें राहूं द्या ना. पण जाहीरनामे कशाबद्दल तें अजून पुरें कळायचें राहिलेंच आहे.

कुळकर्णी—कसले जाहीरनामे ? येऊनजाऊन गांवच्या नांवनिशीच्या याद्या आहेत.

वकील—नांवनिशी खरी, पण कशाबद्दल ? पिंजऱ्यांतल्या साक्षिदाराप्रमाणें चोरटें चोरटें बोलूं नको. यादींतल्या लोकांना काय फांशीं द्यायचें का पागोटीं बांधायचीं, हें तुझा जाहीरनामा बोलत असेल का नाहीं ?

कुळकर्णी—ती नव्या मतदारांची यादी आहे. मग त्यावरून त्यांना फांशीं द्यायचें का पागोटीं बांधायचीं हें तूंच ठरीव.

वकील—असें-असें ! एकूण मतदारांच्या यादीचे जाहीरनामे. आतां आलें लक्षांत. भावी स्वराज्याच्या इमारतीच्या पायाचे दगड आपल्या गांवांत कोण कोण आहेत हें या यादींत लिहिलें आहे ! काय रे गड्यांनो, आपल्यापैकीं कोणाकोणाच्या नांवावर बत्तीस रुपयांपेक्षां अधिक आकाराची रयताव्याची जमीन दाखल आहे सांगा पाहूं ?

हरदास—याच जमिनींत स्वराज्याच्या पायाचे दगड सापडणार तर ?

सर्वजण एकमेकांकडे पाहूं लागले.

आपल्या नांवावर इतक्या आकाराची जमीन असल्याचें कोणाच्याच तोंडून निघेना. पण नाम्या न्हावी मात्र या कसोटीला उतरला. जी गोष्ट इतक्या ब्राह्मणांत नाहीं ती आपल्यासारख्या न्हाव्यामध्यें कशी असावी याचें

आश्चर्य वाटून तो प्रथम थोडासा गोंधळला. पण गोष्ट खरीच पडली, त्याला तो काय करणार ? तो म्हणाला, "आहे, माझ्या नांवावर बत्तीस का, त्रेसष्ट रुपये आकाराची जमीन आहे. मग काय रे वकिला बामणा, तीं सरकारजमा करायची तूं कांहीं युक्तिबिक्ती काढिली आहेस कीं काय ?"

वकील—थांब. आधीं खात्री करून घेतों व मग सांगतों.

पक्क्या चौकशींत असें निष्पन्न झालें कीं, खरोखर नाम्या न्हाव्याखेरीज दुसऱ्या कोणाच्या नांवावर बत्तीस रुपयांहून अधिक आकाराची जमीन नव्हती. वकील स्वतः येथीलचा ग्रामस्थ, पण त्याच्या जमिनी परजिल्ह्यांत. सखाराम नाशिककर हा एक संपादक होता, पण सर्व सामान्य संपादकांप्रमाणें तो दरिद्रीच. त्याचे नांवावर कोठें एक टीचभर देखील जमीन नव्हती. सदू बारटक्के हा श्रीमान्; पण त्याला जमीन खरेदीचा नाद नव्हता. जानराव हा पाटील खरा, पण बिनखातेदार मुखत्यार. हरबा कुळकर्ण्याच्या घरची आणि चेंड्या भागवताच्या घरची जमीन पुष्कळ होती, पण त्या दोघांचे बाप जिवंत असल्यामुळें बापाचींच नांवें खातेदार म्हणून दाखल होतीं. तुक्या महार गरीब, त्याच्याजवळ एवढी जमीन कोठली ? आणि बगाराम हरदास तर बोलूनचालून भटक्या तंबुरीवाला !

अखेर सचनीस वकील उठला व हा काय करतो हें लोकांच्या लक्षांत येण्याच्या आंत त्यानें जाऊन नाम्या न्हाव्याच्या पायांवर डोकें ठेवलें. सर्व मंडळी खो-खो हसूं लागली; पण त्यांना हें गूढ मात्र उकलेना. तेव्हां वकील म्हणाला, "मी तुम्हांला संशयांत कशाला ठेवूं ? सांगतों ऐका. सरकारनें असें ठरविलें आहे कीं, बत्तीस रुपयांहून अधिक आकाराची जमीन ज्याच्या नांवावर असेल तो या नवीन स्वराज्यांतला मतदार होणार. कायदेकौन्सिलांतील सभासद नेमून देण्याचा अधिकार आपणां सर्वांपैकीं एकट्या नाम्यालाच या गांवांत निर्विवाद आहे. तो स्वराज्याच्या पायाचा दगड म्हटला तरी तो आतां आमचा देवच ! मला उद्यां कौन्सिलच्या निवडणुकीकरितां उमेदवार उभें राहावयाचें झालें तर हा मतदार म्हणून याच्या पायां पडणें आहे, तें आजच पडून घेतों, दुसरें काय !"

पुन्हा सर्व मंडळी खो-खो हसूं लागली. जो तो म्हणूं लागला, "नाम्या, लेका, केवढी ही तुझी योग्यता ? एवढा मोठा वकील तुझ्या पायां पडतो !" इतक्यांत चेंड्या भागवताला कांहींसें आठवून तो म्हणाला, "थांबा रे थांबा,

राघ्या सबनिसाचा नमस्कार फुकट गेला असें मला वाटतें." नाशिककर म्हणाला, " तें कसें काय ?" चेंड्या म्हणाला, " नाम्याच्या नांवावर आज त्रेसष्ट रुपये आकाराची जमीन आह हें खरें. पण त्याच्या भावानें त्याच्यावर वांटणीची फिर्याद केली आहे, तिचा निकाल महिना पंधरा दिवसांत होईल. भावाला सारखी वांटणी मिळाली तर नाम्याच्या नांवावर ३१॥ रुपयांची जमीन राहणार, आणि हें सर्व नव्या निवडणुकीच्या आधीं घडणार. म्हणून म्हणतों राघ्या वकिलाचा नमस्कार फुकट गेला."

कुळकर्णी—नाम्या, लेका, राघ्या वकिलाच्या नमस्कारानें हुरळून गेला होतास नाहीं का ? तुझी नामदारी का मतदारी कीं काय ती वाऱ्यानें आली आणि वावटळीनें गेली !

वकील—नाम्या, तूं भिऊं नको. माझा नमस्कार फुकट जायचा नाहीं. मतदारांच्या यादींत एकदां नांव पडलें म्हणजे ती निवडणूक होऊन जाईपर्यंत तें कायम राहतें. तो वज्रलेप तेवढ्यापुरता तरी होतो, हें या ठोंब्यांना काय माहीत ? हरबा आणि चेंड्या तुझा नुसता हेवा करीत आहेत. वास्तविक मतदारीचा हक्क मिळविण्यापुरती त्यांच्याहि घरची जमीन पुष्कळ आहे; पण दुर्दैवानें त्या दोघांचे बाप अजून जिवंत आहेत. त्यांना भाजून आला म्हणजे तुम्हीहि मतदार व्हाल रे, घाबरूं नका.

सावकार—बाबा, आमचें दुर्दैव आम्हांला जन्मभर लाभो ! आम्हांला आपले बाप हवेत, तुझी ती मतदारी नसली तरी चालेल.

कुळकर्णी—बरें बाबा, राघ्या, देवळांत तरी बोललास, माझ्या घरीं माझ्या म्हाताऱ्यादेखत बोलायचें होतेंस म्हणजे त्यांनीं तुला दाखविलें असतें स्वराज्य !

तात्पर्य, नाम्या न्हाव्याची मतदारी अशा रीतीनें कायम झाली. त्यावर सखाराम नाशिककरानें एक नवा मुद्दा काढला. तो म्हणाला—

" पण, साऱ्याच्या जमिनीहून दुसरेहि प्रकार आहेत मतदारी मिळण्याचे. उदाहरणार्थ, खाजगी उत्पन्न, प्राप्तीवरील कर वगैरे वगैरे." पण प्रत्येकाला ती कसोटी लावून पाहतां फुकट गेली. उत्पन्न तरी नाहीं किंवा आहे तें दुसऱ्याच्या नांवावर आहे असें होऊन जो तो मतदारीला नालायक ठरला ! झालें. जो तो नाम्या न्हाव्याला " भले शाबास, वाहवा, जिंकलीस, थेरे पठ्या, येंवरे स्वराज्याचा सरदार !" असें म्हणूं लागला.

नाम्याला 'मतदारी'चा अर्थ खरोखर चांगलासा कळलाच नाहीं. तो भांबावून गेला होता. पण आपणाला कांहीं तरी मोठा मान मिळाला आहे, अशी त्याची खात्री झाली. निजतांना दरिद्री बापाच्या मांडीवर निजावें, आणि झोपेंत दत्तविधान होऊन, उठतांना पाहावें तो एका लक्षाधीशाच्या मांडीवर! असाच कांहींसा हा प्रकार झाला असें त्याला वाटलें. पण राघ्या वकिलाला त्याची दया न येतां त्याला अधिकच गोंधळांत पाडण्याकरितां त्यानें आपलें भाषण पुढें चालविलें. तो म्हणाला, "गड्याहो, ऐका. खरेंच तुम्हाआम्हांला या गांवीं न मिळालेला असा एक अधिकार नाम्याला मिळालेला आहे आणि त्याचें महत्त्वहि कांहीं कमी नाहीं. तें कसें तें थोडक्यांत सांगतों. आजवर या देशांत आपणाला स्वराज्य नव्हतें तें आतां मिळालें, चुकलों-मिळायला घातलें आहे; पहिला हप्ता घातला काढला आहे. आणि तो कुणाच्या बळावर, कुणाच्या विश्वासावर? तर मतदारांच्या. आजवर आमचे खरे राजे कोण होते? विलायतेंतले मतदार!"

सावकार—ज्यांनीं आमचें तोंड पाहिलें नव्हतें आणि ज्यांचें तोंड आम्हीं पाहिलें नव्हतें—

वकील—होय. तरी पण आमचे राजे विलायतचे मतदारच होते!

महार—जे सहासात हजार मैलांवर राहात होते—

वकील—होय, तरी पण आमचे राजे विलायतचे मतदारच होते!

हरदास—ज्यांचा आमचा धर्म वेगळा, आमच्या रीतिभाती वेगळ्या—

वकील—होय, तरी पण आमचे राजे विलायतचे मतदारच होते.

संपादक—ज्यांचा आमचा हितसंबंध परस्पर वेगळा– विरोधी– होता, ज्यांनीं आम्हांला बुडवून आपला स्वार्थ साधला—

वकील—होय, तरी पण आमचे राजे विलायतचे मतदारच होते!

संपादक—ज्यांनीं कधीं हिंदुस्थानच्या लोकांच्या बऱ्यावाइटाची चौकशी केली नाहीं, ज्यांनीं पार्लमेंटांत आपला प्रतिनिधि निवडून देतांना तो हिंदुस्थानासंबंधीं आपलें धोरण काय ठेवील, मत कसें देईल, याची कधीं चौकशी केली नाहीं—

वकील—होय, तरी पण आमचे राजे विलायतचे मतदारच होते!

संपादक—ज्यांच्या नांवांवर विलायतच्या ऑफिसांतले लोक आणि गोरे सिव्हिलियन लोक वाटेल तसा अधिकार गाजवीत होते—

वकील—होय, हें सर्व खरें; पण ईश्वराची करणी आणि—

हरदास—नारळांत पाणी !

संपादक—नव्हे, जर्मन केसरची वाणी !

वकील—होय. त्या वाणीनें युद्ध पुकारलें, इंग्रजांना साम्राज्याचा कमकुवतपणा कळून आला, हिंदुस्थानची मदत झाली, तेव्हां आज अधिकाऱ्यांच्या मनांत हिंदुस्थानच्या लोकांना स्वराज्याचे अधिकार द्यावे अशी प्रेरणा झाली.

कुळकर्णी—पण, हे अधिकार लोकांना म्हणजे कुणाला द्यायचे ?

हरदास—लोक म्हणजे लोक; यांत अडचण कसली !

वकील—कळायला अडचण आहे. ती मग समजावून सांगेन. तूर्त मुद्दा इतकाच कीं, विलायतेंतल्या मतदारांना आमच्यावर राज्य करण्याचा जो अधिकार होता, त्यांतला थोडासा त्यांनीं आमच्या देशांतील कांहीं लोकांना मतदार बनवून त्यांच्या हातीं देण्याचें ठरविलें. त्या ठरावाची अंमलबजावणी सुरू आहे, आणि त्यासंबंधाचाच हा जाहीरनामा.

सावकार—राघ्या, तुझें हें पुराण बस् झालें. हजार वळसे, एक गांठ, नामू न्हावी मतदार ठरला एवढी गोष्ट खरी ना ?

हरदास—आणि तुम्ही कुणी नाहीं हेंहि खरें.

सावकार—म्हणूनच म्हणतों कीं, आतां नाम्यानें आम्हांला खूष केलें पाहिजे. काय रे नाम्या, आम्हांला खूष करणार कीं नाहीं ?

न्हावी—बरें बाबा, मला शेण थापून शिराळशेठ बनविलेंत. मी औट घटकेचा राजा झालों. माझ्या प्रजेला मला खूष केलेंच पाहिजे !

हरदास—वाहवा ! पाहा, नाम्याच्या अंगांत मतदारीच्या द्वारानें राजसत्ता झळकूं लागली, तरी तो उन्मत्त झाला नाहीं. राजा रामाप्रमाणें अगदीं प्रजेला खूष ठेवावयाच्या गोष्टी बोलतो.

न्हावी—माझ्या राज्याचा जाहीरनामा तुम्ही वाचलांत, तेव्हां बक्षिस काय हवें तें तुम्हींच मागा म्हणजे झालें !

कुळकर्णी—उद्यां हेअर कटिंग सलूनमध्यें आलों म्हणजे डोकें कापल्याशिवाय स्मश्रु कर म्हणजे झालें !

सावकार—हरबा, लेका, गांवढळेंच कीं नाहीं तूं ! असलें का बक्षीस मागायचें ?

हरदास—तें कांहीं नाहीं. नाम्या, चल, तूं आपली सनई काढ आणि एक छानदारसा पहांटेचा राग वाजवून दाखीव म्हणजे आम्हांला बक्षिस पोंचलें.

वकील—मलाहि हें कबूल आहे.

नाम्यानें सनई काढून राग सुंदर वाजविला. सर्व खूष झाले.

वकील—म्हणा आतां स्वराज्य-मतदार की जय! म्हणा आतां स्वराज्य-मतदार की जय!

हरदास—हा आपल्या देशांत एक नवा जयजयकारच उत्पन्न झाला खरा! पण संभाळा. लोकहिताकडे लक्ष देणाऱ्या राष्ट्रीय पक्षाच्या माणसालाच आपलें मत द्या. एखाद्या हांजीखोराला किंवा मवाळाला दिलेंत तर या जयजयकाराचा प्रतिध्वनि धिक्कारांत उमटेल!

इतकें भाषण झाल्यावर सर्वजण आपआपल्या घरीं निघून गेले.

१० मुरलीधर कीं गारुडी ?

मीं पुण्यांतील गणपतिमेळ्यांचा परम भक्त आहें. कोठेंहि मेळ्याच्या पदांचें गायन चालू असलें तरी तेथें जाऊन तीं पदें ऐकण्याचा मला मोठा नाद आहे. यंदांच्या उत्सवांत दोन पदांनीं मी खरोखरीच मोहून गेलों होतों. तीं पदें महात्मा गांधींविषयीं होतीं. एकाचें पालुपद 'गुरु गांधि वाजवी मुरली' आणि दुसऱ्याचें पालुपद 'गांधिजी बडा जादुगार। एक फुंक मारितां जगाला दावि चमत्कार' असें होतें. उत्सव चालू असतांच काय, पण त्यानंतरहि कांहीं दिवस, मी झोपीं जाऊं लागलों असतां हीं पालुपदें माझ्या कानांत कोणी तरी गुणगुणत असे; व एखाद्या वेळीं झोप न आली तर स्वतः मीच तीं गुणगुणें आणि तसें झालें कीं मला हटकून झोप येई. परवां म्हणजे बार्डोली येथील संकीर्ण सत्याग्रह होणार होता त्या दिवशीं, सर्व दिवसभर तारेमध्यें काय काय बातमी येते या चिंतेंत मी होतों. तेव्हां त्याहि दिवशीं रात्रीं ठरल्या वेळीं अर्थातच वरील पालुपदाची गुणगुण माझ्या

कानांत सुरू झाली. पण रोज या गुणगुणीनें मला लवकरच गाढ झोप लागे तीं आज चित्त अतिशय व्यग्र असल्यामुळें तशी लागली नाहीं. अर्धी जागृति अर्धी सुषुप्ति व अर्धा स्वप्नभ्रम अशा दिडक्या स्थितींत मीं रात्र घालविली.

त्या रात्रीं मधूनमधून मला महात्मा गांधींचीं दोन प्रकारचीं स्वरूपें दिसत. पण तीं एकांत एक इतकीं मिसळलेलीं होतीं कीं, त्यांतील कोणतें खरें याचा निर्णयच मला करितां येईना. एक चित्र नेहमीं दिसणारें असे कीं, गांधी हे थेट मुरलीधर बनले आहेत. त्यांचें तें नीटस रेखीव स्वरूप, चपळ व सुटसुटीत अंगयष्टि, शांततापूर्ण चेहऱ्यावरील तेजस्विता, त्यांतच गोड हास्याची छाया, सभोंवतीं बाळगोपाळांचा मेळा, तें प्रेम, तें वात्सल्य, तो आज्ञाधारकपणा, तो राष्ट्रीयमुक्तीचा ध्यास, एकाच थाळ्यांत पाणी पिणारीं तीं वाघसिंहांचीं बछडीं व साजिरीं-गोजिरीं कोकरेंपाडसें—अशा सर्व परिवारांत गांधीजी अनत्याचारी असहकारितेची मुरली वाजवीत आहेत व तिच्या नादानें सन्निध बसलेले मित्र व दुरून डोकावणारे शत्रूहि सारखेच मोहित होऊन गेले आहेत ! हें माझ्या डोळ्यांपुढें नेहमीं उभें राहणारें चित्र झालें. पण त्या दिवशीं कांहीं केल्या हें चित्र माझ्या नजरेसमोर पूर्ण व स्पष्ट येईना; व त्याच्या जागीं त्यांचें दुसरेंच एक चित्र दिसूं लागलें. पण तें मुरलीधर गोपाळकृष्णाचें नसून नागसूर वाजविणाऱ्या गारुड्याचें होतें. या दृश्यामध्यें महात्माजींनीं खरोखर एखाद्या गारुड्यासारखा विचित्र भीषण वेष धारण केला होता. त्यांच्या तोंडावरील सात्त्विकपणा अगदींच लोपला नसला, तरी त्याबरोबरच एखाद्या रागीट फकिराच्या कोपिष्टपणाची छाया मधूनमधून झळकत होती. त्यांच्या आसपास लहानमोठे अनेक पेटारे व खादीच्या गोधडीची एक मोठी पिशवी पडली होती. त्यांच्याशेजारीं एक दाढीवाला हंडीबाग बसलेला असून तो गांधीजींच्या तोंडून निघणाऱ्या बऱ्याच प्रश्नांना 'हा—हा' म्हणून उत्तरें देत होता. पण मध्येंच एखाद्या वेळीं भलतेंच प्रतिकूल उत्तर देऊन गांधीजींची सर्व विचारपरंपरा लोळवी. मुरलीधराच्या वेषांत गांधीजी असतांना त्यांच्याभोंवतीं जितकी गर्दी जमे, त्याहिपेक्षां आज त्यांनीं गारुड्याचा वेष घेतला असतां अधिकच गर्दी जमली होती.

प्रथम या गारुड्याच्या हंडीबागानें खूप जोराजोरानें दोन्ही हातांनीं गळ्यांतील ढोलावर तडाखे देऊन एकच कल्लोळ केला. तो शांत झाल्यावर गारुडी पुढें येऊन त्यानें आपल्या हातांतील नागसूर घेऊन वाजविण्यास सुरुवात

केली. हा नागसूर एका मोठ्या कागदी भोपळ्याचा बनविलेला असून त्याला एक जोडदांडी होती व तिला सप्तसुरांचीं सात भोकें होतीं. त्या प्रत्येकाचें नांव सांगणारी एकेक चिठ्ठी त्याजवळ डकविलेली होती. त्यावरून तीं भोकें खालील सात सूर निघण्याकरितां होतीं असें दिसलें. (१) सत्य, (२) अहिंसा, (३) शांति, (४) भूतदया, (५) स्वार्थत्याग, (६) अविश्रांत उद्योग व (७) निर्भयता, हे ते सात दूर असून हा गारुडी त्यांवरून वाटेल तशीं बोटें खेळवून वाटेल तो राग आळवी. पण कोणत्याहि रागाचा परिणाम एकच होई तो हा कीं, ऐकणारा मोहित होऊन डोलूं लागे. हा नागसूर ऐकून भोंवतालच्या गर्दीतील मुलांनीं रडण्याचें थांबविलें. कांहीं वाचाळ तरुणांनीं जीभ आवरून धरली; उलट कांहीं मुके लोक एक नवीन भाषा बोलूं लागले. पानतंबाखू खाणारांनीं चंचीला गांठ दिली; चोरांनीं व कृपणांनीं दानबुद्धीनें सर्व जन्मांत प्रथमच स्वतःच्या खिशांत हात घातला; स्त्रियांनीं पडदे व बुरखे फाडून पुरुषांच्या गर्दीत प्रवेश केला; फार काय पण विषारी नाग व साप आपल्या पेटाऱ्यांचीं झांकणें डोक्यानें उघडून ते नागसुराच्या नादानें मोहून डोलूं लागले. गारुड्याचा हात व अंग यांचा झोंक वाजविण्याच्या भरांत जिकडे जिकडे जाई तिकडे तिकडे हे सर्प आपले गुंजावनी डोळे फिरवीत, आणि दुहेरी जिभलीचें प्रदर्शन करीत. फार काय, पण गारुड्याचा हात विशेष जवळ आल्याचा संशय येतांच चावण्याकरितां त्या दिशेनें फणाहि आपटीत. हें सर्व खरें; तथापि ते नादमोहित झाले नव्हते असें मात्र नाहीं.

कांहीं वेळानें नागसूर थांबवून पुनः ढोलग्याची आदळआपट सुरू झाली. गारुड्यानें नागसूर बाजूला ठेवून खेळ पाहावयास येण्याकरितां अष्ट दिक्पालांना मोठमोठ्यानें हाका मारून निमंत्रण केलें. गारुडी व हंडीबाग यांचीं प्रश्नोत्तरें सुरू झालीं, व त्यांत, अस्सल अनत्याचारीपणा म्हणजे काय? तुरुंगांत जाण्याचा अगदीं सोपा मार्ग कोणता? स्वराज्य व तुरुंगवास हे शब्द कितपत समानार्थक आहेत? सभ्यता तर सुटूं नये आणि वस्त्राचा फाजील खर्च तर होऊं नये यांचें समीकरण सोडविणारा पोषाख कोणता? आत्मशुद्धीचे प्रकार किती आहेत? उपवासानें खरोखर अधिक पीळ स्वतःच्या पोटास पडतो का दुसऱ्याच्या पोटास पडतो? हिंदु-मुसलमानांची एकी टिकण्याचे खरे उपाय कोणते? असले मनोरंजक विषय होते. हीं प्रश्नोत्तरें चालू असतांच, हा गारुडी अष्टावधानी असल्याकारणानें, त्यानें इतर खेळहि चालविले होते. त्यानें प्रथम

स्वराज्याच्या आम्रवृक्षाची एक कोय काढून एका कुंडींत सर्वांदेखत रुजत घातली; व तिला एकामागून एक अशा आठ निरनिराळ्या अमृतकलशांतील उदक घालतांच एका घटकेंत आंबे लागतील असें सांगितलें. निरनिराळे इतर खेळ चालू असतां इकडे झाड दृष्टीआड उगविण्याकरितां, 'अनेकार्थी शब्द' या नांवाची एक उंच जाळीदार बुरडी करंडी कोयीवर झाकून ठेविली होती, तिच्या फटींतून एकेक कलशांतील पाणी ओतलें जाई.

या कलशांवर निरनिराळ्या नांवाच्या चिठ्ठया मारल्या होत्या त्या अशा—(१) सरकारी बहुमानाचा त्याग, (२) शाळांवर बहिष्कार, (३) न्याय-कचेऱ्यांचा उच्छेद, (४) परदेशी माल व व्यापार यांवर बहिष्कार, (५) हातरहाट व हातमाग यांचा प्रसार, (६) अस्पृश्यतानिवारण, (७) वैयक्तिक कायदेभंग आणि तुरुंगवास व (८) संकीर्ण कायदेभंग. मधूनमधून हंडी-बागाशीं प्रश्नोत्तरें आणि प्रेक्षकवर्गाशीं संभाषण होत असतां एकेक कलश उचलून त्यांतील पाणी फटींतून ओतलें जाई; व प्रेक्षकांच्या गर्दींतील एखाद-दुसरा भाविक इसम पेटाऱ्याशीं येऊन आंतील आंब्याचा वृक्ष कोठवर उग-वला आहे हें पाही. कोणास पानें फुटण्याच्या आधींच झाडावर कैरी धरावयास पाहिजे होती. कोणास वाटे झाडाला फळें येतील खरीं, पण तीं इतक्या अनेक लोकांना खावयाला कशीं पुरेशीं होणार? जाग्यावर बसल्याबसल्याच कित्येकांच्या मिटल्या डोळ्यांना झाड वाढतांना दिसूं लागलें. उलट कांहीं असे मख्ख व खमंग होते, कीं ते म्हणत, "गारुड्याच्या झाडावरील आंबेफळ झालें तरी तें धरण्याआधीं झाडाला मोहोर फुटला पाहिजे व तो फुटला म्हणजे त्याचा सुवास हवेंत दरवळेलच. उठून जाऊनच पाहा कशाला?" मध्येंच जर कोणास विशेष शंका आली तर दुसरा त्याला कोयीवर झाकलेल्या पेटाऱ्याचें लेबल दाखवून 'स्वराज्य' या शब्दाचे अनेक अर्थ अशा गूढ भाषेनें समजावून देई कीं, कोयींतून झाड उगवलें तरी वाहवा व उगवलें तरी वाहवा!

अशा रीतीनें सहासात कलशांतील पाणी घालून झाल्यावर आठवा कलश ओतण्याच्या पूर्वीं या गारुड्यानें एक नवाच खेळ काढला. त्याचें नांव सापमुंगुसाची लढाई. हा खेळ गारुड्याचा बहुधा अखेरचाच असतो. म्हणून तेवढा पाहूं, व आंब्याचें झाड उगवलेलें बघून मिळाल्यास कैऱ्याहि खाऊं, अशा दुहेरी हेतूनें प्रेक्षकवर्ग तल्लीन झाला होता. किंबहुना सगळ्या प्रेक्षक-

वर्गाच्या डोळ्यांचा एकच डोळा होऊन तो गारुड्याच्या हाताकडे पाहूं लागला. गारुड्यानेंहि बाकी सर्व चिजा मागें सारून डाव्या हातानें सर्वांत मोठी बुरडी टोपली पुढें ढकलली; व तीवरील झाकण काढतांच आंतून एक प्रचंड नाग ताठ उभा राहून जिभल्या चाटीत जोरानें फूत्कार करूं लागला. लगेच गारुड्यानें उजव्या हातानें एक पिशवी पुढें सरकविली, व तिचें तोंड उघडतांच शेपटीचे केस पिंजारलेलें एक मुंगूस उडी मारून बाहेर पडलें व कावरेंबावरें होऊन सापाकडे बघूं लागलें. तेव्हां गारुड्यानें मेख मारून मुंगुसाच्या गळ्यांतील दावें तिला अडकविलें. इकडे दोनहि खेळ पाहूं इच्छिणाऱ्या प्रेक्षकांची तारांबळ उडाली. सापमुंगुसाच्या युद्धाकडे पाहावें तर उगवत्या आंब्याच्या झाडाचा चमत्कार पाहावयास सापडणार नाहीं, आणि आंब्याकडे पाहावें तर अहि-नकुलाचा रसभरित रणसंग्राम पाहणें अंतरणार. सर्व तयारी होतांच गारुड्यानें एका हातानें आठवा कलश पाणी ओतावयाला उचलला व त्याचा दुसरा हात मुंगुसाच्या गळ्यांतील बिरडें खुलें करण्यास सरसावला.

इतक्यांत एकाएकी आकाशांत, 'अशरीरिणी वाणी' झाली व ती म्हणाली, " सर्व सज्जन हो ! हा खेळ आटोपा. मला रक्तपात आवडत नाहीं. मी ज्या यज्ञाची भुकेलेली आहें तो यज्ञ हा नव्हे. या आठव्या कलशांत जादूचें अमृतोदक नसून केवळ रुधिर भरलेलें आहे. पण कलशाचें तोंड बंद असल्यामुळें गारुड्याला तें दिसत नाहीं." ही आकाशवाणी संपण्याचे सुमारास सर्प व मुंगूस दोनहि हातघाईवर आलीं होतीं. मुंगूस त्वेषानें सर्पाभोंवतीं वाटोळें फिरूं लागून त्याची मानगुटी धरण्याकरितां त्यानें जबडा पसरला होता; व सर्पहि खडा राहून आपणाभोंवतीं चक्राकार फिरत होता. इकडे ढोलकें भरभर जोराजोरानें वाजत होतें, व हंडीबाग मोठमोठ्यानें सर्व दृश्य व अदृश्य शक्तींना हाका मारीत होता. अखेरीस झडप टाकण्याकरितां मुंगुसानें उडी घातली व सर्पहि सगळाच्या सगळा खडा होऊन फणा आपटूं लागला. स्वतः गारुडी निर्विकार व सर्व खेळ त्याचे हातीं होता तरी क्षणभर तोहि कावराबरा झाला. इतक्यांत वरील आकाशवाणी पूर्ण होऊन गारुडी स्तंभित झाला. पण लगेच त्यानें उडी मारून मुंगुसाला आवरून पिशवींत कोंबलें, व सापाच्याहि डोक्यावर झाकण टाकून त्याला शांत करून फिरून पेटाऱ्यांत घातलें. पेटारा एका शिंक्यांत व पिशवी दुसऱ्या शिंक्यांत घालून

गारुड्यानें कावड खांद्यावर टाकली, व आकाशवाणीच्या नादांत गुंग होऊन खेळाची जागा सोडून तो एकदम तसाच पुढें चालता झाला. उघडच आहे कीं, स्वतःच्या पोटाकरितां त्याला थाळी फिरवून दिडक्या जमवावयाच्या नव्हत्या. त्यामुळें तो कोणाची कशाला पर्वा करील किंवा थांबेल ?

पण चालतां चालतां फिरून नागसूर उचलून त्यानें तोंडाला लावला व त्यांतून वर उल्लेखिलेल्या दिव्य सप्तसुरांचे मधुर आलाप फिरून काढूं लागला. पूर्वीचे प्रेक्षक व आतांचे श्रोते पूर्वीसारखेच गुंग होऊन गेले. पण कांहीं थोड्यांच्या मनाला खेळांतील पूर्वसूत्र चिकटून राहिलें होतें त्यांपैकीं एक म्हणाला कीं, " सापमुंगुसाची लढाई तर थांबलीच. आतां या ठिकाणीं कोण उभा राहतो ?" असें म्हणून तो निघून गेला. दुसरा म्हणाला, " सापमुंगुसाची लढाई रोजची आहे, त्यांत नवीन काय ? ती दाखवायला गारुडीच कशाला ? एखाद्या रान वाढलेल्या परड्यांतहि ती दृष्टीस पडते. पण एका घटकेंत स्वराज्याचा वृक्ष उगवून फलभरित होणें हा चमत्कार खरा; त्याचें काय ? " पण लगेच दुसऱ्यानें जादूचीं अक्षरें लिहिलेल्या, कोयीवर झाकलेल्या, करंडीकडे बोट दाखविलें व तो म्हणाला, " हां, तिकडे आंत पाहण्याचा आपणा पापी लोकांना अधिकार नाहीं असें म्हणून ते दोघेहि निघून गेले. चवथा अधिक चिकित्सक बुद्धीचा व धीट होता. त्यानें थेट जाऊन करंडी उचलून आंत पाहिलें तों तेथें स्वराज्याचा वृक्ष तर नाहींच, पण कोयहि जागेवर दिसेना ! फक्त तिच्या जागीं धर्मबुद्धीनें मंतरलेले कांहीं ताईत व दोरे विखुरले होते आणि 'शांतिः शांतिः शांतिः' अशीं अक्षरें लिहिलेलीं होतीं.

क्षणांत सर्व गर्दी ओसरली व या जागीं गारुड्याचा खेळ झाला होता असें दाखविणारी एकहि खूण उरली नाहीं. तरी साप व मनुष्य या दोघांनाहि मोहित करून सोडणाऱ्या नागसुराचे गोड आलाप अजूनहि आसपास सर्वत्र भरून राहिलेच होते. आणि सिनेमांतील चित्रांत चित्र दिसावें त्याप्रमाणें जादुगार गारुड्याचा वेष टाकून महात्माजींची मूर्ति मुरलीधराच्या रूपानें फिरून माझ्या डोळ्यांपुढें उमटूं लागली. 'गांधिजी बडा जादुगार। एक फुंक मारितां जगाला दावि चमत्कार' हे शब्द माझ्या कानांतून हळू हळू नाहींसे होऊन 'गुरु गांधी वाजवि मुरली' हे शब्द फिरून ऐकूं येऊं लागले !

१३ एका 'ट्रॅन्स्फर सीन' ची हकीकत !

× × सालीं जूनच्या २३ व्या तारखेला सकाळीं १० वाजतां एक मध्यम वयाचा युरोपिअन बॅलर्ड पिअरच्या प्लॅटफॉर्मवर खालीं मान घालून, हातांतली छडी फिरवीत इकडून तिकडे येरझारा घालीत फिरत होता. त्याच्या पोषाखा-वरून तो उच्च दर्जाचा मुलकी अधिकारी असावा असें वाटे. येरझारां घाल-तांना तो एकदां एका कानाला हात लावून शहराकडील दूरच्या आवाजाचा कानोसा घेतोसा दिसे. कांहीं वेळानें तो बंदराकडे तोंड वळवी व खिशांतली दुर्बीण काढून समुद्राकडे नीट निरखून पाही. त्याचा चेहरा काळजीनें काळ-वंडलेला असून कपाळावर आठ्या व गालांवर सुरकुत्या पडलेल्या होत्या. त्याच्या बरोबर प्लॅटफॉर्मवर दुसरें कोणी नव्हतें. पण दूर प्लॅटफॉर्मच्या प्रवेशद्वारा-जवळ खाकी पोषाख केलेला एक लष्करी व एक पोलीस अधिकारी, एकाच मेजावर दोन्हीकडून पाय तणावून, सिगारेट ओढीत खुर्च्यांवर बसले होते. ते आपापसांत बोलत, पण हलक्या कुजबुजण्याच्या स्वरानें. भव्य मंडपांत एका कोपऱ्याला एक पोलिसांची तुकडी व दुसऱ्या कोपऱ्याला एक हमालांचा तांडा उभा होता. मात्र बंदरावरून बोट सुटण्याचा किंवा येण्याचा तो नेहमींचा दिवस नसल्यानें प्रवाशांचा मागमूसहि नव्हता.

कांहीं वेळानें विलायती थाटाचा पोषाख केलेला एक हिंदी गृहस्थ दर-वाजाशीं आला. त्यानें टेबलाशीं बसलेल्या खाकी पोषाखवाल्यांना अदबीनें टोपी काढून गुड मॉर्निंग केला. पण उलट्या दिशेनें तो शिष्टाचार घडला नाहीं. गृहस्थाला दारांतून प्लॅटफॉर्मवर जावयाचें होतें व मार्ग तर या दोघांनीं अडविलेला. तेव्हां तो त्यांना उद्देशून म्हणाला, "माफ करा. पण मला बाहेर प्लॅटफॉर्मवर जावयाचें आहे, तर जाऊं द्याल काय ?"

"बंदरावर आज तुमचें काय काम ठेवलें आहे ? आज प्रवासी बोटीची ना आयात ना निर्गत !"

"मला होम मेंबरसाहेबांची जरूरीनें गांठ घ्यावयाची आहे."

"ते येथें या वेळीं येणार हें तुम्हांला कोणी सांगितलें ?"

"त्यांच्या मेमसाहेबांनीं."

"पण बातमी दिली म्हणजे कांहीं परवानगी दिली असा त्याचा अर्थ नव्हे."

"त्या कोण परवानगी देणार म्हणा ! पण त्यांच्याच हातचें हें पत्र पाहा, म्हणजे समजेल सर्व कांहीं."

खाकी पोषाखवाल्यांनीं तें पत्र वाचलें व ते पाय आखडून घेऊन म्हणाले, "ठीक आहे, जा आंत. होममेंबरसाहेबांचें मनोगत आम्हांला काय कळणार ?" हिंदी गृहस्थ आंत गेला. होममेंबर दूर अंतरावर होते. त्यांना गांठण्याकरितां याला जवळ जवळ धांवावेंच लागलें.

हिंदी गृहस्थाला पाहून खाकीवाल्यांप्रमाणें या गोऱ्या मुलकी अधिकाऱ्यालाहि आश्चर्य वाटलें. पण मडमसाहेबांचें पत्र हातीं पडतांच साहेब तें वाचूं लागले. वाचण्यांत गढूनहि गेले. या वेळांत हिंदी गृहस्थांनीं बोलण्याचा सपाटा लावला. "त्याचें असें झालें, साहेब ! मला वाटलें तुम्ही घरींच असाल ! ब्रेकफास्टचीच वेळ, म्हणून बंगल्यावर गेलों. पण पाहतों तों आपण घरीं नाहीं. मडमसाहेबाला विचारून पाहिलें, त्याहि प्रथम दाद देईनात. मग सांगितलेंच कीं, गांवांतल्या दंग्याबद्दल कांहीं बातमी सांगावयाला आलों आहें. तेव्हां त्यांनीं ती थोडक्यांत ऐकून घेऊन हें पत्र खरडून हातांत दिलें, आणि तुमचा पत्ता सांगितला. तेव्हां तसाच मोटार दामटीत इकडे आलों."

इतक्यांत साहेबांनीं पत्र संपवून खिशांत घातलें आणि म्हणाले—

"मग कसें काय सर ख्रिस्तोदास ! राष्ट्रीय सभावाल्यांचे पुढारी थोडेसे वळणावर आले आहेत म्हणतां ?"

"अहो, न येऊन काय करतात ? एका बाजूनें त्यांच्यावर बहकलेल्या तरुणांचें दडपण असलें, तरी दुसऱ्या बाजूनें आम्हां हबकलेल्या प्रौढांचेंहि दडपण त्यांच्यावर अजून आहे. प्रयत्न आमचा, यश सरकारचें !"

"मग काय म्हणतात हे पुढारी ? त्यांनीं पूर्ण स्वराज्याचा आग्रह सोडून दिला ? आणि वसाहती-स्वराज्याचें ध्येय संतोषानें मान्य केलें ? तुमचे सरकारवर फार फार उपकार आहेत. पण–पण–पण ही तडजोड थोडी उशिरा झाली, याचें जरासें वाईट वाटतें इतकेंच."

"म्हणजे ?" हिंदी गृहस्थ गोंधळून म्हणाले, "म्हणजे, वसाहती स्वराज्य देखील द्यावयाचें नाहीं असा सरकारचा निश्चय ठरला कीं काय ? तसें असेल तर जरा सुमारच होईल. कारण वसाहती स्वराज्याच्या आश्वासनावर तर आम्हां मध्यस्थांनीं या पुढाऱ्यांची कशी तरी समजूत काढली."

"तुम्हीं त्यांना काय सांगितलें, सर ख्रिस्तो ?"

"सरकार तूर्त पण ताबडतोब वसाहतींचें स्वराज्य देण्याला तयार आहे, तें घ्या आणि मग स्वातंत्र्याचा दावा मांडा. नको कोण म्हणतो ?"

"मग तुमची मध्यस्थी यशस्वी झाली म्हणतां ?"

हिंदी गृहस्थानें समाधानानें आपल्या चेहऱ्यावरून हात फिरविला. ते एकदां खाकरले आणि अडखळत अडखळत विनयानें म्हणाले—

"बोलणें योग्य असलें म्हणजे तें कोणालाहि पटावयाचेंच. जन्मभर दुतर्फी धोरणें संभाळलीं तीं या वेळींच मला दगा कशीं देतील ? शिवाय चळवळीच्या पुढाऱ्यांचाहि पाहिला अंदाज ! हिलाल पेटतो म्हणजे वरच्या कापसाचा तेलबोळा पेटतो. आंतलें लोखंड का कधीं पेटलें आहे ? कसेंहि असो. पण आमच्या मध्यस्थीला देवानें यश दिलें एवढें खरें. हा पाहा पुढाऱ्यांच्या सह्यांचा तहनामा."

हिंदी गृहस्थानें पुढें केलेला कागद पाहून वाचून साहेब थोडें हसून म्हणाले, "तुम्ही आपली कामगिरी ठीक बजावली, सर ख्रिस्तो. पण ही तडजोड, हा तहनामा, थोडासा उशिरा झाला असें मी म्हणालों तेंच खरें !"

"पण 'याचा अर्थ काय.?' असें मींहि मघाशींच विचारलें होतें. परवानगी असेल तर तेंच फिरून एकदां विचारतों. आपण खुलासा कराल तर मेहेरबानी होईल."

"त्याचा अर्थ इतकाच कीं, सरकारनें उदार होऊन हिंदुस्थानाला वसाहतींचेंच नव्हे तर पूर्ण स्वराज्यच द्यावयाचें ठरविलें आहे."

"म्हणजे ?"

"म्हणजे हिंदी लोकांनीं यापुढें सुखानें राज्य करावें आणि—"

"आणि आपण काय करणार ?"

"आम्हांला मग येथें राहण्याचें काय कारण ? आम्ही तुमच्या कॉंग्रेसच्या हातीं राज्यसूत्रें देऊन स्वदेशाला जाणार ! आणि कोणत्याहि राज्यव्यवस्थेच्या गोष्टींत अग्रमान गव्हर्नरसाहेबांचा असतो. म्हणून प्रथम त्यांच्या गमनाची तयारी करण्याकरितां मी बंदरावर आलों आहे. तर आतां तुम्ही हा करार-हा तहनामा-लोकपक्षाच्या पुढाऱ्यांच्याच हातीं परत नेऊन द्या व मीं सांगितलेला निरोपहि त्यांना पोंचवा."

"छेः छेः, हें आपण अगदीं भलतेंच बोलतां !"

" काय म्हणतां ? असली गोष्ट तुमच्या कल्पनेंतहि कधीं आली नाहीं ? "

" कल्पनेला कधीं शिवली नाहीं व बुद्धीला कधीं पटली नाहीं."

" कल्पनातीत अशाहि गोष्टी केव्हां केव्हां अनुभवाला येतात नव्हे ? त्यांतलीच ही समजा."

" आमचें सर्व स्थिरस्थावर होईपर्यंत इंग्रज येथें राहतील, तर तें फार चांगलें होईल. झोपेंतून एकदम उठविलेल्या माणसाला डोळे चोळावयाला व ताठ उभें राहावयाला कांहीं वेळ दुसऱ्यानें हात द्यावा लागतो."

" हें म्हणणें ठीक आहे. पण आम्हींहि पाहिलें कीं, पूर्ण स्वराज्य तुम्हां लोकांना केव्हां तरी देऊन टाकावेंच लागणार. मग उद्यां द्यावयाचें तें आजच देऊन टाकलें, तर त्या स्वराज्यदानांत स्वारस्य राहून तुमच्या राष्ट्राचें प्रेम तरी राखतां येईल. आजचें उद्यांवर गेलें म्हणजे दानांतली गोडी जाईल. राज्य तर जाणारच आणि वरती तुमचें प्रेमहि जाईल. मग तसें कां करा ? "

" घोड्यावर नव्यानें बसणाराची रिकिबी दुसऱ्या बाजूला कोणी तरी दाबून धरावीच लागते. स्वार सराईत झाला म्हणजे मग तो उडी मारूनहि घोड्यावर बसतो."

हें ऐकून साहेब एकदम गरम झाले.

" काय म्हणतां ? तुम्ही लोक घोड्यावर स्वार होणार ? आणि आम्ही इंग्रजांनीं तुमची मोतद्दारी पतकरून, तुम्ही घोड्यावर बसावयाला शिकेपर्यंत तुमची रिकिबी धरून उभें राहावें ? आणि तुम्ही बसण्यांत पटाईत झालां म्हणजे उडी मारून घोड्यावर बसणार ? तेव्हां तुम्ही उडी मारतांना तुमच्या लाथा आम्हीं खाव्या असाच ना तुमचा अर्थ ? ही गोष्ट हातांनीं करील त्या इंग्रजालाच काय पण मनांत नुसती कल्पनेनें आणील त्या इंग्रजालाहि धिक्कार असो. आम्ही इंग्रज वेळीं राज्य गमावूं पण स्वाभिमान सोडणार नाहीं."

" छेः छेः, साहेब ! मीं उपमा दिली कोणत्या अर्थानें व आपण ती घेतली कोणत्या अर्थानें ? माझे हेतु अत्यंत शुद्ध व चांगले होते."

" होय, मी नाहीं कशाला म्हणूं ? पण इंग्रजींतली एक म्हण आहे ती ठाऊक आहे ना ? नरकाचा मार्ग शुद्ध हेतूच्या फरसबंदीनेंच चांगला बांधून काढलेला असतो. असो. सर ख्रिस्तोदास, तुम्ही जा. मी कांहीं तुमच्यावर

रागावलों नाहीं. ओघाला आलें तेंच बोललों आणि मी रागावलों नाहीं हें कसें तें तुम्हांला सांगूं का एका वेगळयाच रीतीनें ?

" तें कसें काय ? "

" तें असें. आज दोनप्रहरीं चार वाजतांच गव्हर्नरसाहेब, राज्यसूत्रें खालीं ठेवून विलायतेस प्रयाण करण्याकरितां या बंदरावर बोटींत पाय ठेवणार. तरी त्यांना जातांना निदान पानसुपारी करावी असें तुम्हांला वाटणारच ! "

" हो-हो, यांत काय संशय ! "

" मग जा, जा लवकर परत कसे ? पानसुपारीची चांगली तयारी करा. तुमची पानसुपारी पत्करली असें गव्हर्नरसाहेबांना सांगून ठेवून टिपणबुकांत मी त्याची नोंदच भरून ठेवतों. जा कसे ! "

हिंदी गृहस्थ आश्चर्यचकित झाले. त्यांच्या तोंडून शब्द निघेना. त्यांनीं साहेबी टोपी डोक्यावर घातली. शेकहँड करावयाला होममेंबर हात पुढें करतील म्हणून सेकंदभर त्यांनीं वाट पाहिली. पण तो हात पुढें न आल्यानें त्यांना तसेंच माघारें फिरावें लागलें. ते तडक येऊन मोटारींत बसले. मोटार-वाहकानें कोणीकडे जावयाचें असें मुद्दाम विचारलें. पण यजमानाच्या तोंडून शब्द निघेना. त्यांनीं नुसतेंच हातानें 'परत चल' अशी खूण केली.

हिंदी गृहस्थांची मोटार बंदराच्या आवारांतून बाहेर पडल्याला सुमारें दहापंधरा मिनिटें झालीं असतील नसतील; इतक्यांत समुद्राच्या बाजूला एका मोठ्या आगबोटीचा भोंगा जोरानें तीन वेळां वाजला. त्याबरोबर बंदराचे आंतबाहेर शिट्या वाजल्या. पोलीसपार्टी आपला कोपरा सोडून बंदराच्या तोंडाशीं रांग धरून उभी राहिली. हमालांचा तांडाहि रांग धरून मोठ्या दारांतून बंदरालगतच्या धक्क्यावर जाऊन उभा राहिला !

ठरल्याप्रमाणें सायंकाळीं चार वाजतां सरसाहेब हॉर्नबी रोडवर गव्हर्नर साहेबांच्या पानसुपारीचा थाट करून बसले होते. इतक्या थोड्या वेळांत इतक्या थाटाची तयारी आपणांस कशी करतां आली याविषयीं स्वतः सरसाहेबांनाच आश्चर्य वाटत होतें. पण गव्हर्नरसाहेबांना पानसुपारी करावयाची म्हटली म्हणजे त्यांच्या अंगीं चौपट बळ येत असे. आजचा प्रसंग दुःखानंदामिश्रित होता; तथापि पानसुपारी गव्हर्नरांनाच होती !

होममेंबरांनीं वेळ कळविली त्याप्रमाणें एका हातांत घड्याळ घेऊन सरसाहेब उत्तर दिशेकडे टक लावून बसले होते. कारण गव्हर्नरसाहेबांची मोटार

यावयाची ती उत्तरेहून वाळकेश्वराकडून ! इतक्यांत एकाएकी दक्षिणेकडून बिगुलांचा आवाज व घोड्यांच्या टापा ऐकूं आल्या. त्या ऐकून सरसाहेबांनीं दक्षिणेकडे तोंड फिरविलें आणि पाहतात तों एक गोऱ्या सोल्जरांची पलटण-च्या पलटण शिस्तीनें रांग धरून येत आहे, तिच्यापुढें लष्करी बँड वाजत आहे, व सर्वांच्यापुढें एका मोठ्या मोटारींत स्वतः होममेंबर डाव्या बाजूला व पलटणीचा मुख्य अधिकारी उजव्या बाजूला बसले असून मोटार मंद गतीनें चालत आहे. हा उलटा प्रकार पाहून सरसाहेब गोंधळांत पडले. गव्हर्नर-साहेबांची स्वारी बंदराकडे जाणार म्हणून नेहमींप्रमाणें रस्त्यावर नाकेबंदी व्हावयाची, त्याऐवजीं उलट्या दिशेनें रस्ता आडवण्यासारखी ही लष्कराचीच अभावित गर्दी कशी झाली? कुलाब्याकडे कायम वस्तीची एवढी मोठी पलटण नाहीं, मग ही इकडून कोठून आली ?

पण सरसाहेबाच्या शंकांचें उत्तर स्वतः होममेंबर यांनींच दिलें. पान-सुपारीच्या शामियान्याशीं लष्करी मिरवणूक येतांच आघाडीची मोटार थांबली. त्यांतून होममेंबर व लष्करी अधिकारी उतरले. स्वतः होममेंबर यांनींच त्या अधिकाऱ्याला मुख्यासनावर नेऊन बसविलें व ते सरसाहेबांना म्हणाले, "हं, चला आटोपा ! आणा तुमचे हार वगैरे काय असतील ते आणि घाला यांच्या गळ्यांत !"

सरसाहेबांचा गोंधळ अनावर झाला. शेवटीं त्यांनीं तोंडाला हातरुमालाची घडी लावून होममेंबरांना स्पष्ट विचारलेंच, "गव्हर्नरसाहेब कोठें आहेत व मिरवणूक बंदराकडे जावयाची ती उलट बंदराकडून कशी आली ?"

होममेंबर म्हणाले, "यांना आधीं हार तर घाला, मग सांगतों." त्या-प्रमाणें हारतुरे पानसुपारी झाली. तेव्हां होममेंबर म्हणाले, "कां ! कशी मौज झाली ! तुम्हां हिंदी लोकांचे हातीं पूर्ण स्वराज्य देऊन गव्हर्नरसाहेब परत स्वदेशीं जाणार म्हणून मीं थट्टेनें तुम्हांला सांगितलें, तें तुम्ही खरेंच घेऊन चालला ना ! भोळे आहां, सरसाहेब, तुम्ही ! आणि तुमच्यासारखे भोळे लोक या देशांत आहेत म्हणून तर आम्ही येथें अजून राज्य करतों. सकाळीं तुम्हांला सांगितलें तेंच खरें कीं, वसाहतींचें स्वराज्य घेऊन संतुष्ट राहण्याचा जो तहनामा तुम्हीं कॉंग्रेसच्या अध्यक्षाकडून लिहून आणला, त्याची आतां गरज नाहीं. कसलें पूर्ण स्वराज्य घेऊन बसला ? आणि कसलें वसाहतींचें तरी ? आणि गव्हर्नरसाहेब असे सुखासुखी परत जातील हें मीं सांगितलें

पण तुम्हांला खरें कसें वाटलें? सकाळीं मी बंदरावर गेलों होतों तों, राज्य-सूत्रें तुम्हा लोकांच्या हातीं देऊन इंग्लंडाला परत जाणाऱ्या गव्हर्नरसाहेबांच्या गमनाची व्यवस्था करण्याकरितां नव्हे; तर मुंबईस लष्करी कायदा सुरू करण्याकरितां इंग्लंडहून हें जादा गोरें लष्कर आम्हीं मागविलें होतें, त्याच्या आगमनाच्या व्यवस्थेकरितां! आतां तुम्ही हारतुऱ्यांची व पानसुपारीची व्यवस्था आयती करणारच होतां ती उपयोगी पडली. फुकट तर गेली नाहीं ना?"

इतकें बोलून होममेंबर लष्करी अधिकाऱ्याला घेऊन मोटारींत बसले व पलटणीची मिरवणूक क्रॉफर्ड मार्केटकडे गेली. दुसरे दिवशीं सकाळच्या दैनिक पत्रांतून खालील मजकूर जाड्या टाइपांत लोकांनीं वाचलाः—

"सरसाहेबांचा देशद्रोह! काँग्रेसच्या अध्यक्षांची फसवणूक! लष्करी कायदा पुकारण्याचा गुप्त कट! स्वराज्यदानाची वाटाघाट, पण लष्करी कायद्याच्या स्वागताचा थाट! फिरून येरे माझ्या मागल्या. आतां लष्करी कायदा विजयी होणार कीं सत्याग्रह विजयी होणार?"

सरसाहेबांनीं फडाफडा तोंडांत मारून घेतल्या! "जन्मभर दुतर्फी धोरणें संभाळल्याची ऐट कालच मिरविली आणि आज हें काय झालें? पुनः म्हणून या जन्मांत सरकार व लोकपक्ष यांच्या दरम्यान मध्यस्थी करणार नाहीं! मला फसविण्याला होममेंबर यांना लाज वाटली नाहीं! पण त्यांच्यावर विश्वास ठेवणाऱ्या माझी अक्कल कोठें गेली होती?"

१४ दुर्जनसिंह महाराजांनीं नवस कसा फेडला?

महाराज दुर्जनसिंह यांना एकदां घटसर्पाचा रोग झाला. औषधें थकलीं, दूधहि घोटेना. तेव्हां त्यांचा आवडता नोकर मटग्या यानें त्यांच्याकरितां 'इच्छाभोजनाचें गांवजेवण' घालण्याचा नवस केला. कर्मधर्मसंयोगानें महाराजांचा रोग हटला. ते बिछान्यावरून उठले, हिंडूं-फिरूं लागले, पूर्वी-सारखे जेऊंखाऊं लागले. किंबहुना आजारानंतर रोग्याची भूक बहुधा वाढते तशी त्यांची वाढली.

एक दिवस महाराज जेवतांना खुषींत आहेत असें पाहून मटंग्यानें हळूच भीतभीत नवसफेडीची प्रस्तावना केली.

मटंग्या हा जातीचा मातंग म्हणजे मांग होता. पण महाराज अस्पृश्यता-निवारणाचे पुरस्कर्ते, म्हणून त्यांनीं त्यालाच आपल्या मुदपाकखान्यावर नेमलें होतें. त्याला ते मांग-मांग्या न म्हणतां संस्कृताची ऐट करून 'मातंग्या' म्हणत. पुढें मटंगे हें ब्राह्मणांत एक आडनांव असतें असें कळल्यावरून त्यांनीं त्याला मातंग्या म्हणण्याचें टाकून देऊन मातंग्या, माटंग्या, मटंग्या असें लीलेनें म्हणण्याचा परिपाठ ठेवला. हेतु हा कीं, या नांवाच्या निमित्तानें, आपला स्वयंपाकी 'बामण' आहे असा रोज कानांना तरी भास व्हावा, आणि सत्तेनें शिवी देऊन या काल्पनिक ब्राह्मणाला रोज-दररोज हांका मारतां याव्या.

असो. आज मटंग्यानें महाराजांना पुलाव्याचा थोडा अधिक आग्रह करून तो वाढला. खाणार स्वतः महाराज होते, तरी कृपण स्वभाव सुखानें कसा खाऊं देईल. ते म्हणाले, "काय रे लेका, मटंग्या, मला आज पुलावा लई चारतुयास? तवा त्यो काय फुकटचा आलाय् वाटत कुठून तरी?"

"व्हय सरकार, आपण रोगांतून बर निभावलासा, म्हून गांवच्या लोकांनीं आज स्वारीकरितां पुलाव्याचा शिधा अक्षी चमचभीत धाडला व्हता ना. गांव देनार, सरकार खानार, तवा म्हटल मीच मंदी कशाला हात आखडूनशेनी चंडाळ व्होऊ?"

"काय म्हनतुस? गांवकरांनीं ह्यो पुलाव्याचा शिधा मला धाडला?"

"व्हय सरकार. त्येंचं तसं प्रेमच हाये आपणावरती. म्हून म्या बी गाढिच्यान येक नवस केला. आपुन जेर व्हऊन पडला व्हतासा तवा."

पण जाऊं दे. आपण आतां ही कुणबाऊ भाषा टाकून देऊं. कारण सुदैवानें आतां महारमांगसुद्धां व्याकरणशुद्ध बोलूं लागले आहेत.

"काय, काय नवस केलास सांग पाहूं तूं माझ्याकरितां?"

"फार कांहीं नाहीं. पण 'महाराज बरे झाले तर सगळ्या गांवाला एक इच्छाभोजन देईन' असें मी बोललों; आणि लगेच महाराजांना गुण पडला."

"हा लेका, मटंग्या, तो तुझा नवस माझ्या पोटांतच गेला असेल जसा कांहीं. औषधांचीं पिपेंच्या पिपें गेलीं ना सरून, तेव्हां आला गुण!"

इतक्यांत एक शिपाई एक लिफाफा घेऊन आंत आला. महाराज उघडून पाहतात तों त्यांत डॉक्टराचें एक हजार रुपयांचें बिल! शिवाय बक्षिशीहि

मागितली होती! तो कागद रागानें भिरकावून देऊन महाराज म्हणाले, "काय रे मटंग्या, या डॉक्टराला वेडबिड तर नाहीं ना लागलें? हा औषधांच्या बिलाचे पैसे कसचे मागतो, आणि वरती बक्षिस? आतां तूंच म्हणालास ना मीं नवस केला होता म्हणून? लिहून पाठीव डॉक्टरला, म्हणावें एक पैसाहि मिळावयाचा नाहीं. माझ्या नवसानेंच महाराजांना गुण आला."

"पण सरकार, डॉक्टर लोकांचा विश्वास नसतो नवसावर. रोग्यानें औषधें मोरींत ओतलीं आणि तो बरा झाला तरी त्यांना वाटतें औषधांनींच गुण आला."

"पण उलट माझा तरी विश्वास कोठें आहे नवसावर? बाबा रे, जो तो आपल्याच प्रकृतीचा धनी. ती तारणार ती मरणार! औषध फुकट, नवसहि फुकट."

"पण महाराजांचा नवसावर विश्वास नसला तरी माझा आहे ना?"

"मी कोठें नको म्हणतों आहे तुझ्या विश्वासाला?"

"मग तो नवस मला फेडला पाहिजे ना, सरकार?"

"मी कोठें नको म्हणतों आहे तुला तो फेडायला?"

"पण सरकार, मी गरीब माणूस. मी कसें गांवजेवण देणार आणि तें दिल्याशिवाय नवस कसा फिटणार?"

"मग नवस केलास तेव्हांच हें यावें कीं नाहीं लक्षांत? तुझा नवस आणि माझा खर्च होय? दुसऱ्याच्या खर्चानें फेडलेला नवस फुकट जातो. आणि मी तुझ्या नवसाकरितां खर्च करीन तर मला पाप लागेल त्याची वाट?"

"पण सरकार, आपली प्रकृति बरी व्हावी म्हणूनच नवस केला होता! आणि तो करतांना सरकारी खर्चानें तो फेडीन असेंच मनांत आलें होतें. खरें तेंच बोलतों सरकार."

"बरें रे आपलें हलवायाच्या घरावर ब्रह्मार्पण! पण तें असूं दे. नवस काय केला होतास तें नीट सांग पाहूं?"

मी देवाला म्हणालों, "महाराजांची प्रकृति चांगली बरी होऊं दे, म्हणजे मी शहरच्या लोकांना इच्छाभोजनाचें गांवजेवण देईन."

महाराजांनीं क्षणभर विचार केला आणि ते म्हणाले, "मटंग्या! आहेस, तूं चांगला भाविक आहेस. तुझा नवस मला फेडलाच पाहिजे. पण माझी प्रकृति अजून 'चांगली बरी' झाली नाहीं! ती झाली म्हणजे फेड तुझा नवस.

अरे, तुला काय कमी? माझ्या तिजोरीची किल्लीच तुझ्या स्वाधीन करतों. मग तर झालें? पण नवस फेडावयाचा तर त्यांतले शब्द खरे झाले पाहिजेत. म्हणजे मी अर्धा बरा नव्हे तर चांगला बरा झालों पाहिजे. तसा झालों म्हणजे सांगेन तुला."

यावर पुष्कळ दिवस गेले. मटंग्यानें नवसाची आठवण करून द्यावी. महाराजांनीं 'पुढें पाहूं' असें म्हणावें. असें चाललें होतें.

एक दिवस गोष्ट निकरावर आली तेव्हां महाराज म्हणाले, "ठरलें. लेका, मटंग्या, माझ्या येत्या वाढदिवसाला इच्छाभोजनाचें गांवजेवण द्यायचें. उगाच तुला आणि तुझ्या देवाला तिष्ठत किती वेळ बसवावा?"

वाढदिवसालाच लोकांना जेवायला बोलावलें म्हणजे ते सहजच कांहीं अहेर बरोबर घेऊन येतात. शिवाय गळ्याजवळ थोडेंसें दुखूं लागल्यामुळें पुनः घटसर्प होण्याची भीति महाराजांच्या मनांत आली म्हणून नवस फिटावा असेंहि त्यांना थोडेंसें वाटूं लागलें. मग महाराजांनीं नवसाचा थोडासा खुलासा करून घेण्याला प्रारंभ केला.

"काय रे मटंग्या, तूं नवस नक्की कोणत्या शब्दांनीं केलास, तें फिरून सांग पाहूं? अगदीं शब्दाबरहुकूम नवस फेडावा लागतो म्हणून पुनः विचारतों; बाबा रे, देव कराराला अगदीं जागतात."

"महाराजांची प्रकृति चांगली बरी झाली म्हणजे शहरच्या लोकांना इच्छाभोजनाचें गांवजेवण घालीन!"

"ठीक. गांवजेवण म्हणजे गांवच्या सगळ्या लोकांना जेवण, असेंच ना?"

"होय, सरकार."

"बरें, इच्छाभोजन म्हणजे काय?"

"जेवणाराला आवडेल व तो हवा म्हणेल तो पदार्थ देणें."

"तेंहि ठीकच. कारण जेवणाराला एक हवें आणि आपण वाढलें भलतेंच तर तें काय उपयोग? बरें आहे. मग गांवाला विचारून ये जा; त्यांना मेजवानीला कोणतें एकच पक्वान्न किंवा कोणता एकच पदार्थ पाहिजे म्हणून? करणार काय? नवसाचे शब्द खरे झाले पाहिजेत! मग खर्च कांहीं होवो!"

" त्यांत त्यांना काय विचारायचें, सरकार ? हें नाहीं तर तें पक्कान्न केलें झालें; आणि इतर जिन्नस ठराविकच असतात. कोणीकडून तरी लोकांचें पोट भरलें झालें."

" मग एरवीं लोक रोज उपाशीच राहतात वाटतें आपापल्या घरीं ? आणि तूं नवस करतांना तरी कशाला बोललास रे इच्छाभोजन म्हणून ? 'गांवच्या लोकांना पोटभर जेवायला घालीन एक दिवस' असेंच नुसतें कां नाहीं म्हणालास ? इच्छाभोजन याला अर्थ आहे, बाबा ! आणि बोललास तें खरें केलें पाहिजे."

" सरकार करणार झाल्यावर काय होणार नाहीं ? तर मग अगदीं इच्छा-भोजन द्यावें."

" पण काय पदार्थ, काय पक्कान्न करावें तें आधीं लोकांना लवकर विचारून ये जा पाहूं. माझ्या वाढदिवसाला आतां फार अवधि राहिला नाहीं. सगळा बंदोबस्त नीट झाला पाहिजे. ह्या किल्ल्या घे. खर्च वाटेल तो कर."

मटंग्याचा आनंद गगनांत मावेना. त्यानें कोतवालास बोलावून आणून जाहीरनामा काढविला. दवंडीवाले लावून, टिमक्या वाजवून, साऱ्या गांवाला जाहीर करविलें कीं, " येत्या वाढदिवशीं महाराज राजधानीच्या लोकांना इच्छाभोजनाचें गांवजेवण देणार. तरी त्या दिवशीं सर्वांनीं घरच्या चुलीला अक्षत द्यावी हो ऽ ओ ! "

झालें ! त्या क्षणापासून गांवांत एकच गर्दी माजली. गांवच्या नगरशेठनें सभा भरविली आणि महाराजांना वाढदिवशीं काय नजराणा द्यावा हें ठरविण्याकरितां निरनिराळ्या जातींच्या पंचांचें एक पंचमंडळ नेमलें. फिरून त्या मंडळाच्या सभा सुरू झाल्या.

कोणी म्हणे, " एक पैदेखील नजराणा देऊं नये. हा राजा कसलें जेवण देणार ? आणि म्हणे इच्छाभोजन देणार ! सब झूट ! आजवर लोकांना काय दिलें ? कोणीहि आठवण करावी ! "

दुसरा म्हणाला, " जेवणाचा आणि वाढदिवसाचा संबंध आपण कशाला जोडावा ? वाढदिवसाप्रीत्यर्थ नजराणा देणें हें आपल्या प्रजाजनांचें कर्तव्यच आहे. फारच तर बेताचा अहेर करावा झालें ! "

एकजण म्हणाला, " छे: छे:, असें कसें म्हणतां? आजपर्यंत महाराजांनीं कधींहि गांवजेवण दिलें नव्हतें तें यंदा देणार; तेव्हां नजराणा फार मौल्यवानच दिला पाहिजे."

त्यावर नगरशेठ म्हणाले, " होय. नजराणा देऊं आणि तो मोठा मातबरहि देऊं; पण मला मघाशींच महाराजांकडून असा निरोप आला आहे—खासगी, अगदीं खाजगी हां—कीं, गांवजेवणच्या इच्छाभोजनाला पक्वान्न काय करावें हें सर्वांचा विचार घेऊन एकमतानें ठरवून सांगा. तर याचा निर्णय आधीं झाला पाहिजे. गांवजेवण म्हणजे कांहीं लहानसहान गोष्ट नव्हे. वाकनिस-खात्याला आधीं आठ दिवसांपासून राबावें लागणार. अहेराचें हो काय? एका घटकेंत सिद्धता होईल. तरी आपणां सर्वांना विनंति ही कीं, इच्छा-भोजन काय मागावें हें लवकर ठरवून खाजगी कारभाऱ्यांना कळवूं या."

फिरून गांवांत एकच गर्दी! राजेसाहेब गांवजेवण देणार! त्यांतूनहि 'इच्छाभोजन!' तेव्हां काय मागावें, काय मागूं नये, याचीच काय ती वाटाघाट. बाकी एकमुखानें मागूं तें मिळेल याविषयीं कोणालाच शंका नव्हती; आणि शंका तरी कशी उरणार? कारण गांवच्या वेशींवर, तिठ्यांवर, इमारतींवर सहीशिक्क्यांचे जाहीरनामेच लागले होते!

मुद्दाम नेमलेल्या मंडळाच्या बैठकी रोज सुरू होत्या. रात्रौ भोजनोत्तर स्वस्थपणा म्हणून या शांत व स्वस्थ वेळीं बैठकी चालत आणि या बैठकींत काय चाललें याची बित्तंबातमी फुटूं नये अशी पक्की खबरदारी इच्छाभोजन-पक्वान्नमंडळानें घेतली होती.

इकडे राजेसाहेबांच्या हुकुमावरून रोज एकेक नवा नवा जाहीरनामा प्रसिद्ध होत होता. त्यांतले कांहीं खालीं दिले आहेत:—

(१) गांवजेवणाची तयारी झाली. इच्छाभोजन म्हणून पक्वान्न काय हवें तें लवकर कळल्यास त्याप्रमाणें वाकनिसांना बेत ठेवण्याची महाराजांची सक्त आज्ञा आहे.

(२) नवस फेडण्याचा महाराजांचा कृतसंकल्प आहे; फक्त आवडीचें पक्वान्न व आकंठ भोजन यामुळें प्रजेच्या आरोग्याची महाराजांना काळजी वाटत आहे.

(३) गांवजेवणाला चंदनाचे पाट तर मांडले जाणारच; पण त्या सर्वांना रुप्याच्या फुल्या इतक्या थोड्या वेळांत बसवून कशा होतील याचाहि विचार खासगी कारभारी करीत आहेत.

(४) पक्वान्न तर सरकारी खर्चानें होणारच; पण पाणी, पंचपात्रीं, पापड, पत्रावळ हीं रूढ शिष्टाचाराप्रमाणें किंवा इतर कांहीं पदार्थ आवडीचा म्हणून ज्याचा त्यानें आणण्याचा आग्रह धरल्यास महाराज त्याबद्दल गैरसमज करून घेणार नाहींत.

(५) गांवच्या पंचांनीं पक्वान्नाचा प्रकार एकमतानें मेजवानीच्या आदल्या दिवसापर्यंत कळविला तरी चालेल. पण एकमतानें तें न ठरल्यास आयत्या वेळीं दहा प्रकारचीं दहा पक्वान्नें कशीं होणार ? एकमतानें कोणतेंहि पक्वान्न ठरल्यास तें पुरवण्याची व्यवस्था करतां येईल.

(६) लोकाग्रहास्तव वाढदिवसाचे नजराणे घेण्याच्या समारंभाची वेळ सकाळीं बरोबर नऊ वाजतां ठरविण्यांत आली आहे. तें काम दोन तासांत उरकलेंच पाहिजे व बरोबर अकरा वाजतां पंगत बसली पाहिजे, अशी महाराजांची सक्त ताकीद आहे. भोजनाला अवेळ झाली तर जेवण चांगलें जात नाहीं!

(७) नवसफेडीची सांगता व्हावी म्हणून महाराजांच्या आज्ञेवरून कालपासून देवळांत अनुष्ठानें बसविण्यांत आलीं आहेत.

वाढदिवसाला दोनच दिवस मध्यें उरले. तेव्हां मटंग्यानें महाराजांना विचारलें, "सरकार, आतां वेळ अगदीं थोडा उरला, नवसफेडीच्या दिवसाला, आपली आज्ञा झाली म्हणजे पक्वान्नाच्या तयारीला लागतों. आणि आतां तयारीला लागायलाच हवें ! गांवजेवण म्हणजे हजारों पात्रें उठावयाचीं. पक्वान्न साधें म्हटलें तरी रांधून व्हायला हवें ना !"

महाराज म्हणाले, "ठीक आहे. पक्वान्नमंडळाकडून अखेरचा पक्का निरोप आला म्हणजे सांगेन."

त्या दिवशीं मंडळाची सभा पहांटेपर्यंत झाली. मंडळाच्या सभेला महाराजांनीं आपलीं कांहीं माणसें मुद्दाम हजर राहण्याला पाठविलीं होतीं. मात्र त्यांना आंतून तीन प्रकारचे हुकूम होते. १ आपण महाराजांकडून आलों आहों, असें कोणालाहि उमगूं देऊं नये. २ जो कोणी एखाद्या पक्वान्नाचें

नांव सुचवील त्यापेक्षां अधिक खर्चाचें किंवा श्रीमंतीचें पक्कान्न आपण सुचवावें. ३ कांहींनीं आपण स्वतः सुचविलेल्या पक्कान्नाचें नांव मागें न घेण्याचा हट्ट धरावा व इतरांनीं आपल्या सूचना परत घेऊं पण नयेत, अशाविषयीं कांहींनीं आंतून कसून प्रयत्न करावा.

पहांटे चार वाजेपर्यंत वाद होऊन लोक पेंगून जागच्या जागेवर पडूं लागले. तेव्हां अध्यक्षानें महाराजांकडून आलेलें फर्मान वाचून दाखविलें. तें असें कीं, "एकमतानें पक्कान्नाचें नांव न कळविलें तर इच्छाभोजन होऊं शकत नाहीं. कारण गांवजेवण व इच्छाभोजन असा सजोडच मूळचा नवस आहे व तो त्या शब्दांनींच फेडला पाहिजे." म्हणून कृपा करा व एकमत करा, म्हणून अध्यक्षांनीं परोपरीनें विनविलें; पण तें सर्व फुकट जाऊन सभा बरखास्त करावी लागली. मात्र लोक घरोघर जातांना म्हणत होते कीं, अहो, इच्छाभोजनाची फर्मास करा असें म्हणावें हा महाराजांचा मोठेपणा झाला. पण आमच्यांत एकमत न झालें तर स्वतः महाराजांची जी इच्छा ती आमचीच इच्छा असें समजण्याचा अधिकार त्यांना सहजच येतो. आणि एवढा समारंभ करणार ते जिलबीच्या ऐवजीं चुरमुरे थोडेच वाढणार!!"

झालें, महाराजांचा वाढदिवस उजाडला. मटंग्या चुळबूळ करूं लागला. महाराजांच्यापुढें जाऊन लाचारपणें त्याला बोलतां बोलतां पुरें झालें. महाराज इच्छाभोजनाचें गांवजेवण कसें देणार याचा त्याला कांहींच उमज पडेना. कारण स्वयंपाकाकरितां चुली पेटविल्या, पण पक्कान्नाची फर्मास होत नाहीं, आणि कांदे-बटाट्यांपलीकडे कांहीं पदार्थ पाकशाळेंत येऊन पडत नाहींत. पण महाराज म्हणत, "मटंग्या, अगदीं भिऊं नको. तुझा नवस फिटल्याची पावती माझ्याकडे लागली. गांवजेवण इच्छाभोजनाचें देतों म्हणून सांगितल्यावर तुझी माझी जबाबदारी संपली. लोक जर एकमुखी इच्छाभोजनाची फर्मास करीनात, तर त्यांत आपला काय दोष? आपण तयारी ठेवली कीं, नवस फिटला. मग लोकांना जेवण न मिळतां ते उपाशी राहिले तर त्याला आपण काय करणार?" यावर मटंग्या चूप राहिला!

ठरल्याप्रमाणें सकाळीं बरोबर नऊ वाजतां महाराज दरबारांत येऊन बसून अहेर घेऊं लागले. मौल्यवान् अहेर देण्यांत लोकांची स्पर्धा सुरू झाली. हें काम अकरा वाजेपर्यंत भरपूर चाललें व देणग्यांनीं जामदारखाना भरला. अकरा वाजतां मेजवानीची घांट झाली तेव्हां लोक तिकडे वळले.

गांवजेवणाकरितां मोठा शोभिवंत मांडव घालून भोंवतीं रेशमी कनाती लाविल्या होत्या. मंडपाला आठ दारें ठेविलीं होतीं. त्या प्रत्येकाच्या तोंडीं चौघडे एकसारखे झडत होते. आंत प्रवेश करून पाहतात तों, तेथें मात्र भोजनाची तयारी अशी कांहींच नव्हती. चंदनाचा पाट व त्याला रुप्याच्या फुल्या असा थाट जाहीर झाला होता. पण देवदाराच्या फुटक्या फळ्या अंथरल्या असून त्यांवर कावेनें 'चंदन' अशीं तांबडीं अक्षरें लिहिलीं होतीं. तसेंच रुप्याच्या फुल्या लावलेल्या असावयाच्या तेथें खडूनें रेघा ओढून पांढऱ्या फुल्या केल्या होत्या. पण लोक काय करणार ? जाऊन पाटावर बसले. थोड्या वेळानें महाराज मटंग्याला पुढें घालून पंक्तींत आले व म्हणाले, " मटंग्या, आतां उदक सोड. आजचें हें जेवण तुझ्या नवसफेडीचेंच ना ? "

" होय, सरकार."

" नवस माझी प्रकृति दुरुस्त होण्यासंबंधाचाच ना ? "

" होय, सरकार."

" नवस गांवजेवण देण्याचा होता ना ? "

" होय, सरकार."

" सगळ्या गांवाला निमंत्रण दिलें होतें ना ? त्यांत कोणी वगळला नव्हता ना ? "

" होय, सरकार. गांवजेवणाचें आमंत्रण गांवभर दवंडी पिटवून जाहीरनामे लावूनच दिलें होतें."

" गांवजेवणाचें पक्वान्न आपण ठरवावयाचें होतें कीं गांवानें ? "

" इच्छाभोजनाचेंच आमंत्रण होतें, सरकार. मग पक्वान्नाची फर्मास आपण कोण करणार ? गांवानेंच ती करावयाची होती. गांव सांगणार, आपण रांधणार."

" गांवानें म्हणजे सगळ्या गांवानें मिळून ना ? "

" होय, सरकार."

" गांवजेवण झालें तरी पक्वान्न एकच असणार कीं जितकीं माणसें तितकीं पक्वान्नें निरनिराळीं ? "

" छे, सरकार. कोणतें झालें तरी एकच."

" मग कोणतें हवें हें सगळया गांवानें एकमुखानें सांगायचें का दहा तोंडांनीं दहा ? "

" एका तोंडानेंच आणि एकच, सरकार."

" मग गांवच्या लोकांनीं तें आतांपर्यंत सांगितलें का ? "

" नाहीं, सरकार. कोणी म्हणे एकजिनसी सरबरीत श्रीखंड हवें; कोणी म्हणे कळीबंद लाडू हवा."

" झालें तर! आपण काय करणार? एकमुखी मागतील तें देण्याची आपली तयारी होती ना ? "

" होय, सरकार."

" एकमुखी मागणी नाहीं, म्हणूनच आपणाला कांहीं एक पक्वान्न करतां आलें नाहीं हें खरें ना ? "

" होय, सरकार."

" मग बोल, चूक आपली कीं लोकांची ? "

" लोकांची, सरकार."

" पण मग तूं नवसफेडींतून मोकळा झालास ना ? "

" होय, सरकार."

महाराज गंभीर स्वर काढून म्हणाले, " पण बाबा, आपण पडलों राजे; देव त्यांना नाहीं पण मला बोल लावील! म्हणून माझें कर्तव्य मला केलेंच पाहिजे."

महाराज कंपित स्वर करून म्हणाले, " प्रजा माझी आहे. तिला मी उपाशी कसा पाठवूं."

महाराज दुःखित स्वर काढून विव्हळून म्हणाले, " मग त्याकरितां खर्च कितीहि झाला तरी मला त्याची काय पर्वा! "

महाराज डोळे पुशीत म्हणाले, " मला ईश्वरानें औरस मुलेंबाळें थोडींच दिलीं आहेत? माझी प्रजा हींच माझीं मुलेंबाळें! "

महाराज घसा साफ करून म्हणाले, " त्यांना न सुचलें तर मला सुचलें पाहिजे. गांवजेवणांत भोजन द्यावयाचें तें सर्वांना सारखेंच हितकर, पथ्यकर असलें पाहिजे. शिवाय त्यांत समतेचें तत्त्व साधलें पाहिजे. कारण हे दिवस आतां लोकमताचे, समाजसत्तेचे आहेत. श्रीमंत खाईल तें गरीब खाईल हें होऊं शकत नाहीं; म्हणून गरीब खाईल तेंच श्रीमंताला घातलें पाहिजे.

याचेंच नांव गांवजेवण. आणि गांव एकमतानें इच्छा सांगत नाहीं तर माझी इच्छा तीच गांवाची इच्छा. ठीक आहे, कोण आहे रे तिकडे! आणा तीं 'समाजसत्तावादी बंधुमंडळां' नीं पसंत केलेलीं 'समानता-अन्ना'चीं पोतीं आणि वाढा सर्वांना पोटभर. तसेंच तो सुंठवडा. तें एक खायचें तर मागोमाग या दुसऱ्याची गरज लागणारच."

नोकरांनीं धांवत जाऊन हातगाड्यांवरून चुरमुऱ्यांचीं पोतीं पंक्तींत आणलीं. एकेकापुढें मोठाले पळसाचे द्रोण भरून चुरमुरे ठेवले. चुरमुऱ्यांत डाळें किंवा भुईमुगाचे दाणे खाणींत सांपडणाऱ्या हिऱ्यांप्रमाणें बेलाशक आढळत. शिवाय एकेक चिमूटभर सुंठवडा उजव्या हातावर टाकीत गेले. या सुंठवड्यांत साखऱ्याचा कण मधूनमधून एकेक चमके. पण तुपाचा स्पर्शहि नव्हता. उजव्या हातांतला सुंठवडा तोंडांत टाकल्याशिवाय चुरमुरे तरी कोण कसे खाणार? म्हणून लोकांनीं ती वस्त्रगाळ सुंठ तोंडांत टाकली. सुंठीचे कण घशांत-नाकांत जाऊन लोक शिंकूं-खोकूं लागले. त्याबरोबर महाराजांच्या खुणेवरून नोकरांनीं "पुंडलीक वरदे हार विठ्ठल! श्रीज्ञानदेव तुकाराम" असा घोष केला व महाराज पंक्तीला मोठ्या अदबीनें व आदरानें नमस्कार करून मटंग्याला पुढें घालून निघून गेले.

आंतला घोष ऐकतांच चौघडेवाले अधिक जोरानें वाजवूं लागले. महाराज कनातीबाहेर पडतांच पंक्तीकडे मधून मधून पाहून सर्वांग हदरेपर्यंत खदखदां हसूं लागले. पण बाहेर चौघडे वाजत होते म्हणून तें हसणें कोणाला ऐकूं जाण्यासारखें नव्हतें. शिवाय महाराज पडले संभावित. त्यांनींहि हसतांना तोंडाला जरतारी शेल्याचा पदर लावला होता!

१५ शेवटचें लढाऊ जहाज

— १ —

सन १९४७ हें वर्ष कांहीं अपूर्व चमत्कार दाखविणार याविषयीं सगळ्या जगांतील तज्ज्ञांचें बहुधा एकमत होतें. भविष्याच्या नांवानें अनुमानें करण्याचा अग्राधिकार ज्योतिषी गणक यांना असतो; आणि खरोखरच पाहावें तों विलायतेचा झडकील आणि हिंदुस्थानांतले ज्योतिर्भूषण यांनीं या १९४७ सालाविषयीं स्वतंत्र रीतीनें एकच भविष्य वर्तविलें होतें. आणि ते झाले तरी तसें न वर्तवून काय करणार? ज्योतिर्मंडळांत जर या सालीं सत-ग्रहीच उपस्थित झाली तर तें वर्ष अपूर्व योग घडवून आणणार हें आपो-आपच सिद्ध होतें. योग अपूर्व तेव्हां फल अपूर्व असलेंच पाहिजे. मग तें जगाला चांगलें असो किंवा वाईट असो. पण फलज्योतिषाच्या भविष्याची हीच मौज असते कीं, कोणत्याहि फलित गोष्टीला 'चांगलें' अथवा 'वाईट' हीं दोन्ही विशेषणें यथार्थतेनें लावतां येतात. म्हणून त्या स्थूल विशेषणांच्या शब्दांनीं भविष्य वर्तविणाराचें भविष्य चूक ठरतच नाहीं.

१९१४ चें महायुद्ध चांगलें कीं वाईट? याचें उत्तर दोन्ही प्रकारचें देतां येतें व दोन्ही उत्तरें बरोबर ठरतात. महायुद्धांत मनुष्यप्राणहानि झाली म्हणून तें वाईट! पण त्यांतून स्वयंनिर्णयाचें तत्त्व प्रस्थापित झालें, लहान-सहान राष्ट्रांच्याहि स्वातंत्र्याचा हक्क जगानें मान्य केला, व राष्ट्रसंघाची संस्था निर्माण झाली—तेव्हां महायुद्धाला चांगलेंच म्हटलें पाहिजे! हा जुना अनुभव असल्यानें १९४७ या सालाला 'अपूर्व' असें जरी भविष्य-कारांनीं म्हटलें तरी, त्याला चांगलें किंवा वाईट असें निर्णायक गुणविशेषणहि लावण्याच्या भरीला ते पडले नाहींत. मनांत म्हणाले, "फलाची अपूर्वता सिद्ध झाली म्हणजे चांगलेंवाईट जें काय म्हणावयाचें तें पुढें म्हणूं. आजच घाई कशाला? आज 'अपूर्व' म्हटलें, काम झालें!"

पण ज्योतिषी किंवा भविष्यवादी यांच्याशिवाय इतर लोकांनाहि वाटे कीं, १९४७ हें साल कांहीं तरी विलक्षण घडामोडी करील खास. कारण १९१४च्या महायुद्धसमाप्तीनंतर तीस वर्षें बिनबोभाट गेलीं. तीस वर्षांचा काळ हें राष्ट्रीय

व आंतर-राष्ट्रीय चारित्रांत एक युग मानितात. तेव्हां ज्योतिष सोडून दिलें तरी व्यवहाराच्या अनुभवानें पाहतां, आतां नव्या घडामोडींचा काळ आला होता. स्वाभाविक फेरबदलानें प्रबळ राष्ट्रें दुर्बळ होऊं घातलीं होतीं व दुर्बळ प्रबळ होऊं घातलीं होतीं. परिस्थितीमुळें जित व जेते यांची अदलाबदल होण्याचा रंग होता. १९१४ च्या युद्धसमाप्तीनंतर आलेली उद्योगधंद्याची शिथिलता जाऊन फिरून एकवार कारखाने समृद्ध होऊन उत्कर्षाची वाट पाहत होते. १९१४ च्या महायुद्धांत जी पिढी गारद झाली तिच्या जागीं आलेली नवी पिढी अंगांतील नव्या रक्तामुळें मनानें युयुत्सु बनली होती. आणि संहारकारक असे नवे शोध लावून, त्यांवर पैसा खर्चून व त्यांचें पेटंट जगभर घेऊन बसलेले शास्त्रज्ञ आपल्या शोधांचा उपयोग करून पाहण्याची संधि मिळण्याविषयीं उत्सुक व उतावळे झाले होते.

महायुद्धांत स्वतंत्र झालेल्या लहान राष्ट्रांना आपल्या सरहद्दी अधिक सोयीच्या व प्रशस्त करून घ्याव्याशा वाटत होत्या. पूर्वी भोगलेलें साम्राज्य नष्ट झालेल्या राष्ट्रांना आपल्या जुन्या वसाहती परत मिळविण्याची इच्छा झाली होती. रशियानें पंचवीस वर्षें कम्यूनिझमच्या नांगरानें सर्व जग नांगरून, पेरून ठेवलें असल्यामुळें, रक्ताचा एक मोठा पाऊस पडतांच हें नवें पीक जमिनींतून फोंफावून वर येईल अशी त्याला आशा वाटत होती. जर्मनी महायुद्धानंतर सक्तीनें निःशस्त्र करण्यांत आला होता. परंतु कारखानदारीची मोकळीक त्याला होती तिचा फायदा घेऊन, त्यानें कारखान्यांनाच शस्त्रागारांचें रूप देऊन ठेवलें होतें. आणि ज्याप्रमाणें नाटकांत एका प्रकट देखाव्याच्या मागें दुसरा गुप्त देखावा आधींच रचून ठेवण्यांत येतो, आणि शिटी वाजली किंवा बार उडाला म्हणजे पुढचा देखावा एका क्षणांत कोसळून पडतो व मागचा एकदम त्याचे जागीं उभा राहतो, त्याप्रमाणें कारखान्याच्या तळघरांतून युद्धोपयोगी नवीं साधनें बाहेर काढून, जगाशीं झुंजण्याच्या तयारीनें जर्मनी टपून बसला होता. इंग्लंडला असें झालें होतें कीं, विमानविद्येंत आपण मागें पडलों खरेंच, परंतु अजूनहि आरमार शिल्लक व तयार आहे तोंपर्यंत त्याचा एकदां उपयोग करून पाहावा व बिघडत जाणारी वर्चस्वाची घडी पुन्हा बसवून पाहावी. आणि अमेरिका म्हणत होती कीं, " पूर्वी नाहीं नाहीं म्हणतां म्हणतां आपण युद्धांत गुंतून गेलों, पण आतां तसें कांहीं एक न करितां हातांत केलॉग पॅक्ट घेऊन,

त्यावर सद्या केलेल्या राष्ट्रांना तोंडानें नांवें ठेवीत, हातांनीं पुन्हा एकवार जगांतील सोनें गोळा करून आपल्या तळघरांतून भरून ठेवूं."

हिंदुस्थानांतील लोकहि या सालाकडे मोठ्या उत्सुकतेनें पाहत होते. पण त्याचीं कारणें मात्र वेगळीं होतीं. त्यांपैकीं सामान्य अशीं कांहीं वर दिलींच आहेत. पण आणखीहि कांहीं थोडीं विशेष होतीं तीं अशीं. १९१७ सालीं स्वराज्याचा जाहीरनामा प्रकट झाला. १९२७ सालीं सायमन कमिशन बसलें. १९३७ सालीं एका लष्कराशिवाय सर्व वरिष्ठ खातीं लोकप्रतिनिधींकडे सोपविण्यांत आलीं. अर्थात् १९४७ सालीं उरलें तेवढें सर्व स्वराज्य हिंदी लोकांच्या हातीं जावें हा क्रमच ठरत नाहीं काय? याहीपेक्षां एक सूक्ष्म कारण असें कीं, १८५७ सालीं बंड झालें व १ ८ ५ ७ या आकड्यांची बेरीज २१ होते तशीच १ ९ ४ ७ या आकड्यांचीहि होते. अर्थात् बंडाच्या सालीं घडलें तसलेंच कांहीं तरी या नव्या सालींहि घडणार खास! पण याहीपेक्षां सूक्ष्म व शेवटचें निर्वाणीचें कारण असें कीं, विद्यमान व्हाइसरॉयांचें नांवच Lord Shevetlor असें होतें. याचा उच्चार लॉर्ड शेवटलॉ असा होतो. प्रतिष्ठित इंग्रज लोक अन्त्य r किंवा र याचा उच्चार करीत नाहींत. अर्थात् लॉर्ड 'शेवटलॉ' या शब्दानेंच अशी गुप्त सूचना दिली कीं, 'लॉर्ड शेवटलॉ' हा 'शेवटला'च व्हाइसरॉय होणार. म्हणजे हिंदी लोकांना संपूर्ण स्वराज्य मिळणार!

— २ —

दिल्ली येथील नव्या राजवाड्यामध्यें लॉर्ड शेव्हेट लॉर हे आपल्या खाजगी खोलींत महत्त्वाचे कागदपत्र पाहत बसले होते. महत्त्वाचे कागदपत्र पाहणें सुरू असलें म्हणजे थोर लोकांचा शांतताभंग कोणी करीत नाहीं. असलें कागदपत्र पाहणें ही मोठ्या लोकांची गूढ विचाराची गोष्ट असल्यामुळें, क्वचित् आत्मा 'पुरितति नाडींत' शिरूं शकतो व त्यामुळें कागद पाहणाराला झोंप येते; पण खोलीचें दार उघडण्याची मनाई असल्यामुळें महत्त्वाचे कागदपत्र पाहणारा खरोखर कागदपत्र पाहतो आहे, कीं निजला आहे हें तो प्रत्यक्षपणें घोरत असल्याशिवाय कसें कळणार?

असो. ता. ३१ डिसेंबर १९४७ या दिवशीं तिसरे प्रहरीं लॉर्ड शेव्हेट लॉर हे, वर सांगितल्याप्रमाणें, 'महत्त्वाचे कागदपत्र पाहत' बसले असतां, त्यांचा प्रायव्हेट सेक्रेटरी मि. गॉन हा खोलीच्या दरवाजाशीं घाईनें पावलें टाकीत, पण पाऊल न वाजवितां, येऊन दाखल झाला. त्याच्या तोंडावर बेसुमार फिकटपणा आला होता व त्याचे डोळे डोक्यांतील भ्रमामुळें बाहेरचें कांहींच पाहत नव्हते म्हटलें तरी चालेल. त्यानें दोन मिनिटें थांबून खोलीच्या दाराला कान लावून कानोसा घेतला. घोरण्याचा आवाज ऐकूं येत नाहीं असें पाहून त्याला थोडें बरें वाटलें. आणखी दोन मिनिटांनीं त्यानें दाराची कडी खुणेदाखल वाजविली, तेव्हां दार उघडलें गेलें. लॉर्डसाहेबांनीं प्रश्न केला, "काय, मि. गॉन, आज भेटीस येणाऱ्या स्वराज्यवादी लोकांच्या शिष्टमंडळाच्या सत्काराची सर्व तयारी नीट झाली ना?"

"होय, ती सर्व तयारी नीट झाली आहे. शिष्टमंडळ येण्यास अजून दोन तास आवकाश आहे. पण मध्येंच लंडनहून ही तार आतांच हातीं आली ती देण्याकरितां म्हणून मला अवेळीं येऊन आपल्या कामांत व्यत्यय आणावा लागला याबद्दल माफी असावी."

लॉर्डसाहेबांनीं सेक्रेटरीच्या हातांतली तार उतावीळपणानें हिसकावून घेतली असें म्हटलें तरी चालेल, व वाचतांच ती त्यांच्या हातून गळून पडली. उभयतांच्याहि तोंडांतून शब्द निघेना; पण मोहांत फार वेळ पडणें हा इंग्रजांचा धर्म नव्हे. त्याप्रमाणें लॉर्डसाहेबांनीं ती तार वर उचलून घेतली व तिजकडे पाहत पाहत ते म्हणाले, "गॉन, तुम्ही आलां त्या वेळीं मी ताज्या वैमानिक टपालानें हातीं आलेले खलितें व पत्रें वाचीत होतों. त्यांतील मजकूर वाचतांना अशी ही तार कदाचित् लवकरच केव्हां तरी येईल असें मन सांगत होतें, व स्टेट सेक्रेटरींच्या पत्राच्या ताजा कलमांत 'तार पाठवूंच' असें लिहिलेंहि होतें. पण मनुष्याची आशा ही बलवत्तर असल्यामुळें ही तार आजच येईल, असें मात्र वाटलें नव्हतें खास. असो, आतां विचार कसला? पुढच्या तयारीला लागलेंच पाहिजे. तर याच पावलीं जा व आपल्या सेनापतींना तावडतोब घेऊन या. शिष्टमंडळ येईपर्यंत मी काम करीत येथेंच बसणार आहें!"

सेनापति जनरल डायर हे पाय आपटीतच आले. त्यांच्या तोंडावर घाबरटपणापेक्षां खेदाचीच छटा अधिक होती. ते म्हणाले, "आपण कशाला

बोलाविलें तें मी समजलों. पण आपणाला तार आली त्याच्या आधींच बारा तास मला सांकेतिक शब्दांची अशींच तार आली होती."

लॉर्ड शेव्हेट लॉर म्हणाले, " आश्चर्य आहे! माझ्या आधीं तुम्हांला तार? छेः, पण आश्चर्य कसलें? हिंदुस्थानांत व्हाइसरॉयापेक्षां सेनापतीला अधिक मान ही गोष्ट कर्झन-किचनेर यांच्या युद्धापासून ठरलेलीच आहे! तथापि ही वेळ तुमच्याआमच्या मानाची तुलना करण्याची नव्हे."

" तार पाठविणारांनींहि या वेळीं ती दृष्टि ठेविली नव्हती. तर मला एकदम परस्पर तार पाठविल्यानें जहाजाची तयारी अधिक त्वरित होईल म्हणूनच. व त्याचप्रमाणें शेवटच्या लढाऊ जहाजाची सिद्धता मीं करून ठेवली आहे."

" फार चांगलें केलेंत. मी तरी बोलावून तेंच सांगणार होतों!"

" वाईट इतकेंच वाटतें कीं, ज्या गोऱ्या इंग्रज सैन्याचें ठाणें हिंदुस्थानांत आज दोनअडीच वर्षें होतें, त्याला आज तें ठाणें समूळ उठवावें लागणार!"

" होय. लॉर्ड हार्डिज यांनीं पूर्वीं एक वेळ India was bled white of troops असें म्हटलें होतें. तेंच आज India must be bled of white troops असें म्हणावें लागत आहे. पण काळें सैन्य मागें राहणार हें एका अर्थानें ठीकच आहे. कारण हिंदुस्थानचें रक्षण व्हावयाचें तर तें आतां तेंच सैन्य करील!"

" पण आपण तर त्या सैन्याला आज दोनशें वर्षांत तोफेचा गोळा उडविण्यालाहि शिकविलें नाहीं."

" नाहीं म्हणून काय झालें? मनुष्य पाण्यांत पडला म्हणजेच पोहायला शिकतो. तुम्ही आणखी दोनशें वर्षें राहतां तरी त्याला कांहींच अधिक शिकविलें नसतें. प्रसंग हाच मनुष्याला सर्व कांहीं शिकवितो. असो. आज जाणारें तेंच शेवटचें लढाऊ जहाज ना?"

" तेंच शेवटचें. आपण व मी दोघेहि त्याच जहाजावरून स्वदेशीं परत जाणार आहों!"

" हिंदुस्थानांतून पाय काढतांना वाईट वाटणारच. पण तोंडापर्यंत पाणी चढलें तेव्हां गोष्टींतल्या वानरिणीनें आपलें मूल पायाखालीं घालून त्यावर ती

उभी राहिलीच कीं नाहीं ? गोऱ्या सैन्यानें मूळ तरवार कमरेला बांधली तीं इंग्लंडांतच. त्या तरवारीच्या आज इंग्लंडच्याच संरक्षणाकडे उपयोग व्हावयाचा तर त्यांत तरी वाईट काय ?"

इतकें बोलणें झाल्यावर जनरल डायर (हे अमृतसर येथें प्रसिद्धीस आलेल्या डायरसाहेबांचे चिरंजीव आज सेनापतिपदाला पोंहोचले होते) निघून गेले! पाठोपाठ लॉर्ड बिशपसाहेब आले. त्यांचीहि जागा या शेवटच्या जहाजावर राखून ठेवल्याचें त्यांना कळविण्यांत आलें होतें. पण हिंदुस्थान सोडण्याची गोष्ट जनरल डायरपेक्षां या भटजीबुवांनाच अधिक अप्रिय वाटत होती. ते देवळांतील प्रार्थनेचा रडका सूर काढून म्हणाले, "हाय रे देवा, आम्ही ख्रिस्ती धर्मोपदेशक गेल्यावर बिचाऱ्या हिंदुस्थानाचें कसें होणार ? पीक पिकवून तें मळून कणगींत भरण्याच्या वेळीं जमिनीचा ताबा सावकाराला देतांना जें दुःख शेतकऱ्याला होतें, तेंच आज मला व मिशनरी लोकांना ख्रिस्ती धर्माचें चंबूगवाळें येथून गुंडाळतांना होत आहे."

लॉर्ड शेव्हेट लॉर किंचित् हसून म्हणाले, "सद्धर्म बांधवा! जाऊं दे कीं! ख्रिस्ती धर्मोपदेशकांनीं परदेशांत जाऊन करावयाचें तें स्वदेश-कार्य सर्व तुम्हीं येथें पुष्कळ केलें! शिवाय हल्लीं धर्मांतर करविण्याचा तुमचा धंदा पूर्वीसारखा चालत नाहीं आणि तुमच्यांतले जे खरे निःस्वार्थी ख्रिस्तसेवक असतील त्यांना आज स्वदेशांतच काय थोडी कामगिरी आहे ? परोपकारापेक्षां स्वदेशभक्ति हीच अधिक श्रेष्ठ नव्हे काय ? चला, तुम्ही आम्हीं सर्वच जाऊन आपलें घर संभाळूं."

इतकें बोलून त्यांनीं बिशपसाहेबांना रजा दिली व आपलें उरलेलें सामान व कागदपत्र गोळा करून पेट्यांतून भरण्याचा हुकूम त्यांनीं पट्टेवाल्यांना केला.

— ३ —

ठरल्याप्रमाणें हिंदी पुढाऱ्यांचें शिष्टमंडळ आलें. थाट नेहमींसारखाच होता. आज-उद्यां सर्व इंग्रज शेवटच्या लढाऊ जहाजावरून स्वदेशीं परत जाणार या जाणीवेची गंधवार्ताहि व्हाइसरॉयांनीं आपल्या चेहऱ्यावर शिष्टमंडळाला दिसूं दिली नाहीं.

परस्पर ओळखी करून झाल्यावर शिष्टमंडळाच्या पुढाऱ्यानें खणखणीत आवाजानें आपली कैफियत वाचली व फिरून मुखजबानीनें सांगितलें कीं,

" स्वराज्यदान मागण्याचा हा शेवटचाच प्रसंग समजा. यापुढें अशी याचना तोंडानें हिंदुस्थान तुम्हांकडे पुन्हा केव्हांहि करणार नाहीं. हातांनीं काय होईल तें पाहून घेऊं. गैरसमज होऊं नये म्हणून इतकेंच सांगतों कीं, प्रत्यक्ष राजसत्ता जावी असें आम्ही अजून म्हणत नाहीं. स्वतंत्र वसाहती व इंग्लंड यांचा–सोन्याच्या सांखळीनें बांधलेल्यासारखा–जो नाजुक पण जिव्हाळयाचा ऋणानुबंध आज आहे-तसाच हिंदुस्थानाचाहि राहो व राहील. पण पावणे-सोळा आणे स्वराज्य ताबडतोब मिळालेंच पाहिजे अशी आमची मागणी आहे."

लॉर्ड शेव्हेट लॉर हे शिष्टमंडळाला उत्तर देण्याकरितां उभे राहिले. ते म्हणाले, " मित्र हो—"

शिष्टमंडळी हा अपरिचित उद्गार व संबोधन ऐकून आश्चर्यानें एकमेकांकडे पाहूं लागून 'आज हें नवें काय ?' असें एकमेकांना नेत्रसंकेतानें विचारूं लागली.

लॉर्ड शेव्हेट लॉर यांनीं अधिकच गंभीर स्वर काढून भाषण चालूं केलें. ते म्हणाले, " आपण आज भेटीला आलों हा खरोखरच अपूर्व योग आहे. कारण, मी जें आपणांला सांगणार तेंहि तसें अपूर्वच आहे. आज जुनी भाषा बोलूं नये, स्पष्टच सांगून टाकावें, अशी मला विलायतेंतील सरकारची आज्ञाच आहे."

हें ऐकतांच शिष्टमंडळापैकीं प्रत्येकाच्या चेहऱ्यावर भीति व संशय हीं ज्याच्या त्याच्या मूळ स्वभावाप्रमाणें प्रकट झालीं. " आपण काय म्हणणार असें विचारावें असें प्रत्येकाला वाटलें. पण व्हाइसरॉय बोलत असतां कोणी मध्यें बोलण्याची चाल नाहीं.

लॉर्ड शेव्हेट लॉर म्हणाले, " 'अंधळा मागतो एक डोळा व देव देतो दोन'. ही म्हण तुमच्या भाषेंतलीच आहे. आज तिचाच अनुभव तुम्हांला येईल. तुम्ही पावणेसोळा आण्यांचा आग्रह धरितां पण—पण–"

शिष्टमंडळाचे लोक तटस्थ झाले. त्यांच्या डोळयांचीं बुबुळेंहि हालेनात.

" पण मला सांगायला आनंद वाटतो कीं, मला आतांच तारेनें खलिता येऊन पोंहोचला. त्यांत हिंदुस्थानला सोळा आणे स्वराज्य देण्याचें विलायती सरकारनें ठरविलें असून मला तसें कळविण्याचा हुकूमहि केला आहे."

आपण काय ऐकतों हें शिष्टमंडळाला क्षणभर कळेच ना. शिष्टमंडळापैकीं एकजण 'गॉड सेव्ह दि किंग' असें मोठ्यानें म्हणाला व 'वंदे मातरम्' या शब्दांनीं दुसऱ्या एकानें त्याला जोरानें उत्तर दिलें.

लॉर्ड शेव्हेट लॉर यांनीं आपला आशय पुन्हा एकवार स्पष्ट करून सांगितला. व्हाइसरॉय यांच्या उत्तरावर प्रत्युत्तर देण्याची रीत नाहीं. तथापि आश्चर्यानें बेभान झाल्यामुळें शिष्टमंडळांतील गृहस्थ व्यक्तिशः बोलूं लागले. पैकीं एक गृहस्थ म्हणाले, "सरकारनें आमच्यावर असा राग करूं नये. शतकांचा जोडलेला संबंध तोडूं नये. दोघांचेहि हितसंबंध परस्पर गुंतलेले आहेत."

दुसरा म्हणाला, "आपण सर्व सैन्य काढून नेणार, मग रशिया, अफगाणिस्थान किंवा जपान यांनीं आमच्यावर स्वारी केली तर? आज आम्हांला निराश्रित असहाय टाकून जाणें हा इंग्लंडच्या हातून अन्याय घडत आहे. मी म्हणतों, तो नैतिक गुन्हा आहे. वसाहतीप्रमाणें हिंदुस्थानचें संरक्षण, आम्ही समर्थ होईपर्यंत, करणें हें इंग्लंडचें पवित्र कर्तव्य आहे."

यावर तिसरा म्हणाला, "बस करा हा भ्याडपणा, हा लाळघोटेपणा. लॉर्डसाहेब बोलले याचें प्रत्यंतर येण्याला अजून अवकाश आहे म्हणा. तो इंग्रजांचा शब्द! त्यांत किती अर्थ असतील कोणी सांगावें. पण जर बोललेले शब्द खरेच असतील तर, मी म्हणतों कीं, दोनतीन शतकें केलेल्या पापाची निष्कृति करण्याची बुद्धि देवानें इंग्रजांना आज दिली म्हणावयाची! आणि त्यांच्या पापाची निष्कृति करण्याबरोबर आम्हां हिंदी लोकांनाहि ईश्वरानें स्वाभिमान प्रकट करण्याची बुद्धि दिली असें मी म्हणतों. जपान-चीनची भीति कसली सांगतां? तीं मात्र माणसें आणि आम्ही काय पशु आहों वाटतें? ज्या ईश्वरानें आम्हांला उत्पन्न केलें तोच आमचें रक्षण करील."

हें ऐकून लॉर्ड शेव्हेट लॉर म्हणाले, "मित्र हो! आजवर तुमच्यातुमच्यांतले मतभेद कानांवर आले म्हणजे आम्हां इंग्रजांना आनंद होई. पण ईश्वरसाक्ष सांगतों, आजचाच पहिला दिवस असा कीं, तुमच्यांतले मतभेद ऐकून इंग्रजांना वाईट वाटतें. तसेंच आजवर तुमच्यांतल्या जहाल लोकांना नांवें ठेवावीं असेंच आमचें धोरण ठरलें होतें. मनांतून त्यांची किंमत आम्ही ओळखीत होतों; पण आज ती तोंडानें बोलून दाखविण्याचा सुदिन उगवला खरा. ढोंगीपणामुळें आजवर छातीवर पडलेलें दडपण आज निघालें.

प्रामाणिक उद्गार तोंडांतून निघाल्यानें आजवर घुसमटलेली सद्सद्विवेक बुद्धि देखील मोकळी झाली. मित्र हो, तुमच्यापैकीं शेवटला गृहस्थ बोलला तेंच खरें. स्वावलंबनासारखा दुसरा गुण जगांत नाहीं! आज आमचेंच पाहा ना. इंग्लंडवर प्राणसंकट आल्याबरोबर आम्ही दुसऱ्या कोणाला हाक न मारतां सगळ्या जगाच्या कानाकोपऱ्यांतले इंग्रज घराकडे धांवून निघालेंच कीं नाहीं?

" अमेरिकन इतिहास तुम्हांला माहीतच आहे. मूळ अमेरिकन वसाहतवाले किती राजनिष्ठ! पण सत्ताभिलाषानें इंग्रज-मंत्रिमंडळानें कशी दडपशाही केली व कर बसविले! शेवटीं राजनिष्ठ लोक बंडखोर झाले. युद्ध जुंपलें. अमेरिका स्वतंत्र झाली. इंग्लंडला तिचें स्वातंत्र्य मान्य करावें लागलें. इंग्लंडच्या राजदरबारीं पहिल्या अमेरिकन वकिलाची नेमणूक झाली. वकिलानें आपलें अधिकारपत्र जॉर्ज राजाला सादर करण्याचा दरबार भरला! राजावर कोण तो प्रसंग? पण आम्ही इंग्रज शहाणे आहोंत. जॉर्ज राजानें वकिलाचें स्वागत केलें व म्हणाला, ' एक वसाहत हातची गेली; पण एका स्वतंत्र पराक्रमी राष्ट्राचा कायमचा स्नेह जोडला गेला! अमेरिकेला स्वातंत्र्य-दान करण्याला माझ्याइतका विरोध माझ्या राज्यांत खरोखर दुसऱ्या कोणीहि केला नसेल. पण लक्षांत ठेवा, तुमचें स्वागत मी जितक्या आनंदानें, खुल्या दिलानें करीत आहें इतका दुसरा कोणीहि करणार नाहीं."

" आज हिंदुस्थानच्या लोकांना उद्देशून अशाच अर्थाचे शब्द बोलण्याचा मान मला मिळत आहे हें मी माझें महद्भाग्य समजतों."

" आमचें शेवटचें लढाऊ जहाज निघण्याची वेळ झाली. तर माझ्याशीं एक वेळ हस्तांदोलन करून जा!"

शिष्टमंडळ निघून गेलें. लॉर्ड शेव्हेट लॉर आपल्या खोलींत गेले व काठी घेऊन बाहेर आले. प्रायव्हेट सेक्रटरी दिसेल म्हणून त्यांनीं इकडेतिकडे पाहिलें, पण तो दिसेना. तेव्हां त्यांनीं ए. डी. कॉला विचारलें, " व्हेअर इज मि. गॉन?" ए. डी. कॉ. म्हणाला, " ही इज गॉन, सर!" त्यावर लॉर्ड शेव्हेट लॉर म्हणाले, " वेल्, ही इज राइट. ही इज ट्रू टु हिज नेम. सो वुइ मस्ट ऑल बी!"

* * *

सुमारें एका तासानें दूर क्षितिजावर एका लढाऊ जहाजाचें धुराडें इंच दोन इंच दिसत होतें. पण पंधरा मिनिटांनीं तेंहि नाहींसें झालें!!

१६ वेताळाचा घाट

(केसरी, १७ जुलै १९३६)

अबब—केवढा तरी तो लमाणाचा तांडा! त्या अंधुक प्रकाशांत दूर नजर पोंचेल तेथपर्यंत तो एकसारखा पसरलाच होता. एखाद्या सैन्याचा तळच पडला आहे जसा कांही. बैल काय, घोडीं काय, खेचरें काय! दहापांच उंट आणि एक लहानसा हत्तीहि पण! वड्डुरी पालापासून शोभिवंत तंबूकनातीपर्यंत सर्व आच्छादनाचे प्रकार उभे होते. चौकाचौकांतून आगट्या पेटलेल्या. त्यांवर शाकाहारी, मांसाहारी सर्व प्रकारच्या अन्नाचा शिधा तयार होऊन रांधला जात होता. विश्रांतींतील ख्यालीखुशालीचे सर्व बरेवाईट प्रकार सुरू होते.

दहा घटका रात्र झाली तेव्हा, आगट्यांचें काम संपल्याने त्या बहुतेक विझल्या. तथापि वाऱ्याची झुळूक येई त्याबरोबर एखादी जळकी काटकी क्षणभर पेट घेई किंवा राखेबरोबर ठिणग्याहि उडून दूर जात. कोठे कोठे एखादा दिवा लुकलुके. आता लमाणी छावणीवर शांतता पुरी अवतरली होती. फक्त क्वचित् एखाद्या पेंगणाऱ्या जागल्याची आरोळी किंवा उनाड कुत्र्याचें भुंकणें ऐकूं येई.

* * *

अजून दहा घटका रात्र उरली असेल तों, छावणीच्या मध्यभागीं उभारलेल्या मोठ्या तंबूंतून एक भव्य व्यक्ति धडपडत बाहेर येऊन, झोके खात पण पवित्र्यावर उभी राहिली. तोंड उघडतांच त्याने आपल्या नोकरांचाकरांची व लमाणी तांड्यांतील निरनिराळ्या खांडांच्या म्होरक्यांचीं नांवें घेऊन हाका मारण्याचा सपाटा लावला. दर नांवागणिक एक एक शेलकी शिवी तो हासडी. मधून मधून पाय उचलून चामड्याच्या बुटाची टाच जमिनीवर आपटी आणि हातांतला रंगीत मुठीचा आसूड झाडी.

"अरे उठा, निजलां काय? घोड्यावर खोगीर घाला. बैलावर मुठी चढवा, बस्ते-बासन गोळा करा. पडशा भरा. तंबू—राहुट्या—कनाती पाडा. चराटें सोडवा. खुंट्या उपटा. तळ मोडून चालूं लागा. ऐका, ऐका, तो तुमचा बाप—

कोंबडा आरवतो आहे. तो पाहा तुमचा काका--शुक्राचा तारा—उगवून माथ्यावर चढावयाला करतो आहे. आताच पाय न उचलाल तर उन्हापूर्वी हा ताठ घाट चढून कसे जाल? जनावरें मारणार की काय उन्हाने आणि तहानेने! सगळे लेकाचे ऐदी. असे घोरत पडलां त्यापेक्षा तसेच उरावर हात घेऊन एकदाचे मेलां कां नाही? म्हणजे दुसरे तरी चाकर अधिक हुशार आणि कमी झोपाळू पाहून चाकरीला ठेवीन. अशा गुणाने माझा लमाणाचा धंदा तुम्ही बुडविणार खास. पण मी बरा बुडवूं देईन? हा आंगले नाईक असा तसा नाही. सगळें व्यापारी जग पालथें घालतो. सगळया जगाचा व्यापार इकडून तिकडे वाहून नेतो. सगळया जगाला भूल घालून लुबाडतो. सगळया जगाला गुलाम बनवतो. असे आळशी, झोपाळू चाकर ठेवून त्याचं कसं चालेल, बऱ्यानं उठा अन् चालूं लागा. नाही तर पाहा देरेकाच्या कुशींत लाथ घालून झोप बाहेर काढीन् अन् बुटांच्या ठोकरीनं आडव्याचा उभा करीन!”

इतकें सगळें एकानेच बोलत राहावें हें जरा सुमारच नव्हे काय? पण मदिरेच्या राज्यांत बुद्धि बंदिवान् होऊन जीभ मोकळी सुटते.

हा गलगा ऐकून पायमा नाईक, आंगले नाइकाचा सोबती, डोळे चोळीत बाहेर आला आणि म्हणाला, “भल्या माणसा, ही काय बोंबाबोंब चालविली आहेस, अशा अवेळीं?”

पायमा नाईक आपल्या मित्राच्या खांद्यावर हात ठेवावयाला जवळ गेला, पण लगेच नाकाला पदर लावून चार पावलें मागे सरला. आंगले नाइकाने मध्यरात्रीं ढोसलेल्या दारूचा भपकारा त्याला सोसवला नाही.

“बोंबाबोंब! अलबत. पहाट झाली तरी तळावर हालचाल कांहीच नाही हें काय?”

“काय पहाट? कोणी सांगितलें तुला पहाट झाली म्हणून?

“दुसरा कोण सांगावयाला पाहिजे? एक एक कोंबडा आरवतो तो!”

पायमा नाइकाने थोडा वेळ कानोसा घेतला; पण त्याला कोंबड्याचें आरवणें कोठूनच ऐकूं आलें नाही. तो म्हणाला, “भलतंच कांही तरी! काल रात्रीं मारून खाल्लेलं कोंबडंच कदाचित् तुझ्या पोटांतून आरवलं असेल; जिवंत कोंबडं नव्हे खास!”

कोंबडं राहिलं, पण तो शुक्राचा तारा पाहा किती वर आला आहे तो!”

" फिरून तेंच ! तुला भ्रम झाला आहे खास आज ! तो शुक्राचा तारा नव्हे, तो लुब्धक आहे लुब्धक ! शुक्राचं सोंग आणतो, त्याच्यासारखा प्रकाश पाडतो, आणि प्रवाशाला पहाट झाल्याचं भासवून फशीं पाडून घात करतो. आंगल्या, जा तूं, पुन्हा थोडी झोप घे. चार घटकांनी मी तुला उठवीन! आज आपणाला एक नवाच अन् अवघड घाट चढून जायचं आहे. म्हणून चांगलं फटफटीत उजाडलं म्हणजे मगच तो चढून गेलेलं बरं नव्हे का ? शिवाय या घाटांत वेताळचं ठाणं असतं म्हणतात तांबडं फुटूं लागेपर्यंत ! "

हें ऐकतांच आंगले नाईक खवळला. पाय जमिनीवर आपटीत आणि हातांतला चाबूक खडकावीत म्हणाला, " वाहवा ! ठीक-ठीक. अजून खरी पहाट झाली नाही तेंच बरं. कारण या तुझ्या वेताळची तरी गाठ पडेल समक्ष. हा आंगले नाईक असे दहा वेताळ जमिनींत गाडील. चलाच तर मग. हलवा रे तळ. तूं फुंकतोस शिंग, की मीं फुंकूं ? "

पायमा नाइकानें पाहिलें की, अधिक वाद घालण्यांत अर्थ नाही. त्यानें तीनदा शिंग फुंकलें. त्याबरोबर सगळा तांडा खडबडून जागा झाला.

थोड्या वेळांत आवराआवरी होऊन तळ हालला. सगळीं माणसें अन् जनावरें घाटाकडे तोंड करून चढणीची वाट चालूं लागलीं. आंगले नाईक सर्वांच्या आघाडीला ऐटीनें चालला होता, मधून मधून तो चिलीम पिई, आणि एखाद्या लावणीचें आवडतें कडवें तोंडांतल्या तोंडांत गायल्यासारखें घोळवी.

* * *

वाट अर्ध कोस चालून गेल्यावर घाटाच्या खऱ्या चढणीला सुरुवात झाली. दोहों अंगच्या झाडींतून काजवे चमकून जाऊन वाट दाखवीत. पंचरसी घंटांच्या मधुर आवाजांत गुंग होऊन सर्वांच्या पुढे बैलांचा तांडा, मागून घोडीं, त्यामागून उंट असे चालत होते. पिछाडी सांभाळण्याचें काम झुलता हत्ती करीत होता.

अशा रीतीनें वाट चालत असतां आंगल्या नाईक पायमा नाइकाला म्हणाला, " जसा हा घाट नवा आपण पूर्वी पाहिलेला नाही, तसाच घाटमाथ्याचा मुलूखहि. पण काय रे, हा मुलूख फारच सुपीक आहे म्हणे ! तसं असलं तर मौज होईल. अलीकडे अनेक जुन्या मुलुखांतून दुष्काळ पडूं लागले

आहेत. व्यापार मंदावला आणि थोडा आहे त्यांतहि नवे लमाणाचे तांडे निघून वाटेकरी झाले. म्हणून या नव्या मुलुखांतल्या व्यापाराचा मक्ता आपणाला मिळेल तर चैन होईल. जुने तांडे पोसूनच्या पोसून कांही नवेहि ठेवतां येतील; आणि तसं झालं म्हणजे आंगलवाडींतलं सगळं बेकार भिकार तर उद्योगाला लागलेच, पण तुमच्या आमच्या पोरांच्या हातांतलीं सोन्याची सलकडीं दोन दोन आहेत तीं चार चार होतील; आणि घरधनिणहि शृंगारानं मढवून काढून खूष करतां येईल."

उत्तर द्यावयाला पायमा नाइकाचें मन प्रसन्न नव्हतें. त्याचें सारें लक्ष घाटमाथ्याकडे लागलें होतें. कारण तेथे एक प्रचंड तांबडा दिवा तळपत होता. त्याला वेताळाची मशाल म्हणतात असें त्याने ऐकलें होतें. त्याकडे हात करून पायमा नाईक म्हणाला, "गड्या राहूं देत ना तुझ्या त्या नव्या मुलुखांतल्या व्यापाराच्या गोष्टी. आधीं ती तिकडे पाहा, घाटमाथ्यावरच्या वेताळाची मशाल! मला वाटतें आपला लमाणी तांडा थोडा थोपवून धरावा."

"आणि थोडं भजनहि करावं, असंच की नाही, पहाटच्या पाऱ्याचं! चल, मित्रा भागुबाई कुठचा! घाटमाथ्याला पोचायला उशीर आहे याचंच उलट मला वाईट वाटतं. अरे, पण हें पायांत कोण लुडबुडत आहे मघाचपासून?"

दोघांनी खाली पाहिलें तों पांढरीं शुभ्र सशाचीं गोजिरवाणीं पोरें. तीं दुड-दुडत पायांशीं येत आणि हुंगून जिभेनें चाटून दूर पळून जात. त्यांना पाहून आंगल्या नाईक हसून म्हणाला, "मला वाटतं, पायम्या, हे तुझ्या त्या वेताळाचे दूत असावेत! माझ्या पाया पडून पहिली सलामी देण्याकरिताच तुझ्या त्या वेताळानं पाठविले वाटतं. गरीब बिचारे! पाया पडतां पडतां पायाखाली चिर-डून जाऊं हें त्यांच्या लक्षांतहि येत नाही. पण आपणच त्यांची काळजी घेतली पाहिजे नव्हे का?"

पायमा नाईक कांहीच बोलला नाही. थोडें पुढे गेल्यावर सशाच्या पिलां-च्या आकाराचे पांढरे, पण अधिक केसाळ प्राणी दोघांच्या पायांजवळून जाऊं लागले. तीं एका जातीचीं कुलंगी कुत्रीं होतीं. आपणाकडून ती भुंकण्याचा प्रयत्न करीत. जवळ आलीं म्हणजे पाय चाटतात की काय असें वाटे. पण वस्तुतः तीं या प्रवाशांच्या पायाला जीभ न लावतां आपले बारीक कोवळे दांत लावीत, आणि अंगावर पाय पडतोसा वाटला, की आपलीं नाजुक नखें काढून

ओरबाडल्याचा बहाणा करीत व पळून जात. यांना पाहून आंगल्या नाईक हसून म्हणाला, " तुझ्या त्या वेताळाच्या या दूतांच्या स्वागताचा प्रकार मात्र थोडा वेगळा दिसतो रे, गड्या! जात दिसण्यांत कुत्र्यांची खरी. म्हणून ससासारखी शिजवून खाण्याची वस्तु नव्हे; पण घरीं संभाळून ठेवून लोकांना दाखविण्याची शोभेची मात्र वस्तु खरी." असें म्हणून त्यानें खाली वाकून त्यांतलीं एक दोन कुलंगी कुत्रीं पकडून खिशांत घातलीं व एक दोन उचलून आपल्या खांद्यावर ठेवलीं. खिशांतले प्राणी मधून मधून तोंड वर काढून भुंकण्याचा नाजूक आवाज करीत. पण नाइकाचा हात जवळ येतांच परत खिशांत दडून बसत. खांद्यावर बसलेल्यांना आपली जागा मोठीशी सुरक्षित वाटत नव्हती; पण खाली उडी मारून सुटका करून घेण्याचीहि त्यांना छाती नव्हती!

प्रवाशांना वाट चालण्याला या कुलंगी कुत्र्यांची अडचण मुळीच झाली नाही. पण यापुढे गेल्यावर मात्र त्यांना किंचित् वेगळा प्रकार दिसला.

आंगले नाईक पायमा नाइकाला म्हणाला, " गड्या, येथून वाट अवघड लागलेली दिसते. येथे निराळ्याच जातीचे कुत्रे दिसतात. हे पाठ सोडतीलसं वाटत नाही. थांब, आता आपण असंच करून पाहूं!" असें म्हणून मागे वळून एका लमाणी बैलाच्या पाठीवरच्या ओझ्याचें तोंड त्याने सोडलें. मुठी-मुठीनें आंतले कांही जिन्नस काढून आपल्या आंतल्या-बाहेरच्या अंगरख्याचे खिसे भरून घेतले. आणि कुत्रे भुंकून पुढे येऊं लागले की, त्यांतलें थोडें खाद्य बाहेर काढून तो दूर फेकून देई. या युक्तीचा थोडासा उपयोग झाला. फेकलेल्या जिनसांकडे त्या कुत्र्यांचें लक्ष सहजच वेधे आणि त्यांतले कांही कुत्रे तोंड फिरवून त्या खाद्याकडे धावत जात व ते खात बसत. पण पुष्कळ कुत्रे तिकडे ढुंकूनहि न पाहतां जागेवरून भुंकून प्रवाशांना दुरून भिवविण्याचा क्रम चालू ठेवीत.

यापुढे जातात तों कुत्र्याच्या निराळ्या जातीचे प्राणी एकाहून एक मोठे ओळीने उभे होते. आंगले नाईक येतांच ते भुंकूं लागले. जणु काय ते कोणाला सावधगिरीची सूचना देत आहेत. त्यांतला एखादा धीटपणें वाटेवर येऊन प्रवाशांना आडवा होई व त्याच्या पायाचा चावा घेण्याकरिता झडप घाली. पण प्रवाशाचे पाय उंच चामडी बुटाने झाकलेले. त्यांचे दांत आंतल्या कातडी पायांना लागेनात. शिवाय आंगले नाईक हातांतला चाबूक उडवी. त्याचे

फटके बसल्याकारणाने त्यांना मागे हटावें लागे. आंगले नाइकालाहि, पूर्वीच्या दोन प्राण्यांसंबंधाने ठेवली तशी, केवळ कौतुकाची वृत्ति, या तिसऱ्या वर्गाच्या प्राण्यांविषयी ठेवतां आली नाही. कारण हे धनगरी खिलारी कुत्रे सशांच्या किंवा कुलंगी कुत्र्यांच्याप्रमाणे स्वतःचें कौतुक करून घेणारे नव्हते. पाठीवरून हात फिरवूं देणारच नाहीत असें नाही. पण तो हात प्रेमाचा नसला तरी निदान भलेपणाचा असला तर ! मात्र रागाच्या शब्दाला उलट रागाच्या भुंकण्याचा जाब दिल्याशिवाय ते राहणार नव्हते. मात्र यापुढे मजल गेल्यास चाबकाचे तडाखे खाऊनहि, चावा घेण्याकरिता, ते उडी घातल्याशिवाय राहणार नाहीत हें लमाणी नाइकाला उघड दिसून आलें; आणि कांही तर थेट आडवे होऊन वाट आडवीत उभे राहूं लागले.

याप्रमाणे आणखी थोडी वाट चालून गेल्यावर नाईक पाहतो तों भुंकण्याचा आवाज थांबला. त्याला वाटलें आपल्या मागचा त्रास चुकला. पण आता भुंकणाऱ्या लहानमोठ्या जातींच्या कुत्र्यांऐवजी, जवळच्या झाडींत अदृश्य होऊन दबा धरून बसलेले प्राणी मधून मधून धावून येऊन एकदम अंगावर चालून येत. यांचें स्वरूप अर्धे कुत्रे, अर्धे लांडगे असें मिश्र असून, त्यांच्या अंगावर केस मुळींच नसत. फक्त त्यांचे कान लांब असत यामुळे त्यांना पकडावयाचें तर हे कान धरून पकडणेंच शक्य होतें. पण ते एकदम न कळत येऊन झडप घालीत, व पायाकडे तोंड न नेतां गळा पकडण्याला छातीपर्यंत उडी मारीत. यामुळे प्रवाशांना वाटलें की, आतां यापुढे पायीं पायीं चालण्याचें टाकून घोड्यावरच बसावें. तसें त्यांनी केल्यावर त्यांच्या मार्गांतला त्रास थोडा कमी झाला.

पण अजून घाटांतली वाट संपली नव्हती. उलट ती अधिकाधिक वळणांची व बिकट होऊं लागली. इतकेंच नव्हे तर झाडींत दडून बसणाऱ्या श्वापदांऐवजी आता तर वाघसिंहांसारखे दिसणारे भयंकर प्राणी थेट वाट अडवून बसलेले आढळूं लागले. त्यांना चुकवून जाणें अशक्य. आणि या प्रत्येकाशीं लढल्याशिवाय पाऊल पुढें पडणेंहि अशक्य. नाईक म्हणाला, "आता मात्र प्रसंग कठीण दिसतो. तुझ्या माझ्या हातांत हत्यारं सज्ज आहेत, म्हणून आपला कांही तरी निभाव लागेल, पण माझ्या इतर लमाणांचं काय होणार ?"

आता मात्र पायमा नाईक तोंड उघडून बोलला. तो म्हणाला, "गड्या, इतक्या अवेळीं घाट चढूं लागण्याची बुद्धि तुला कां झाली? मी सांगत होतों त्या वेताळाचेच हे दूत असावेत. रानांत एरवीची हिंस्र श्वापदं भेटलींच तर तुरळक भेटतात. त्यांचा असा जमाव का कुठं असतो? किल्ल्याच्या मार्‍याच्या जागा नेमक्या पाहून चौक्या बसवाव्या तसे हे वेताळाचे शिपाई ठेवलेले नव्हेत का? केवळ स्वतःचं पोट भरणारे जंगली प्राणी माणसांची वस्ती किंवा धनगराचे गोठे हुडकीत रात्रीं फिरावयाचे. ते अशा वैराण—दगडी पहाडी मुलुखांत कशाला राहतील? पण या श्वापदांना कोणी तरी कांही रखवालीचं काम देऊन नेमल्यासारखं दिसतं, नाही का? आतां मीं सांगतों, गड्या, तूं या वेताळाला एखादा नवस तरी कर, म्हणजे उरली वाट कदाचित् आपण सुरक्षितपणें चढून जाऊं!"

हें ऐकून आंगले नाईक इतक्या मोठ्यानं खदखदा हसला कीं, त्याच्या प्रतिध्वनीनें खालची दरी जागी झाली. तो म्हणाला, "मित्रा, या आंगले नाइकाला तूं अजून पुरं ओळखलं नाहीस तर. यानं आज एवढा व्यापार कमावला तो काय असे नवस करून अन् वेताळांना भिऊन? छट्, बोलूंसुद्धा नको. कुत्रे येवोत, लांडगे येवोत, वाघ येवोत, मी सगळ्या लमाणी तांड्याला, फार काय स्वतःला, खर्ची घालीन पण नवस म्हणून करणार नाही. माझ्या शरीराच्या मांसाचे जितके घास होतील तितके वाघ आणि सिंह भेटेपर्यंत मी लढेन आणि हलक्या श्वापदांना लोभवून वाटेंतून दूर करावयाचं तर, माझ्या लमाणी गोण्या तुडुंब भरल्या आहेतच. त्यांतल्या खर्चून किती खर्चतील! घाट आता बहुतेक चढून झालाच आहे. म्हणून आता कृपा कर अशा नाउमेदीच्या, नामर्दाईच्या गोष्टी बोलूं नको माझ्यापुढं."

इतकें बोलून आणखी दोन वळणें चालून जातात तों प्रवाशांना एक चमत्कार दिसला. अजून खरा घाटमाथा पुढेच होता, पण येथे मधेच, डोंगराच्या पोटांत गेलेली एक विस्तीर्ण मोकळी जागा होती. मुद्दाम समारंभाला शृंगारावी त्याप्रमाणे ती जागा शोभिवंत कलाकृतीच्या वृक्षलतांनी आच्छादलेली आणि त्यांवर दरपानागणिक बसलेल्या काजव्यांनी, पौर्णिमेचें चांदणेंच जणू कांही अशा आल्हाददायक प्रकाशाने ती उज्ज्वल केली होती. या मोकळ्या जागेच्या मध्यभागीं एक भव्य पण प्रशान्त आकृति उच्चासनावर बसली असून चोहोंकडे पांचपन्नास चाकर व दूत अदबीने उभे होते. त्यांना

धड मनुष्याचा नाही व धड श्वापदांचाहि नाही असा कांही अपूर्वच आकार होता. आंगले नाईक व पायमा नाईक या जागेजवळ येतांच त्यांचे डोळे दिपल्यासारखे झाले; आणि समोरून आलेल्या दोघा कोणा आकृतींनी त्यांना अशा कांही पकडींत धरलें की, त्यांचा पाय उचलेना व तोंडांतून शब्द निघेना. आता या पकडलेल्या प्राण्यांचें काय करावें असें विचारण्याच्या अर्थाने, त्या सेवकांनी उच्चासनावर बसलेल्या आपल्या धन्याकडे पाहिलें. तेव्हा तो गंभीर आवाजाने म्हणाला, " सोडा, सोडा त्या दोघांना. त्यांचे प्राण आपण घेण्याचं कारण नाही. पुढच्या वाटेवर ते आपल्या मरणानं लवकरच मरणार आहेत. आपलं काम फक्त व्यापारी दस्तुरीचीं दस्तकं तपासण्याचं आहे. तरी तीं काढून दाखवावयाला त्यांना सांगा म्हणजे झालं."

आंगले नाइकाची मगरुरी आता सगळी निघून गेली होती. तो अदबीनें पुढे होऊन जमिनीला हात लावून प्रणाम करून म्हणाला, " सरकारस्वारी आमच्याजवळ दस्तक कसलं मागते तें कळत नाही." त्यावर खालील उत्तरें-प्रत्युत्तरें झालीं:—

" दस्तक दस्तुरीच्या माफीचं."

" पण आम्हाला दस्तकाशिवायच आजवर जगभर माफी आहे."

" दस्तुरीचा आकार म्हणून तुम्ही बिछाइतांकडून कांही रकम घेतां की नाही ? "

" होय. पण आमच्या दलालीचा मोबदला म्हणून आम्हीच ती ठेवून घेतों."

" मग तींच मीं तुमच्यापासून हा घाट चढूंउतरूं देण्याचा मोबदला म्हणून घेणार. इतकंच नव्हे, तर मला माझ्या धन्याची अशी आज्ञा आहे की, या घाटांतून जाणाऱ्या-येणाऱ्या सर्व प्रवाशांचं सामान तपासून पाहावं आणि तें कोठून कसं आणलं याबद्दल जाब विचारावा ! "

" वाः ! या घाटांत हा नवाच कायदा दिसतो ! "

" हा कायदा नवा, तसा घाटहि नवाच आहे. जुने घाट सोडून तुला आज या घाटानं येण्याची बुद्धि कां झाली ? "

" या घाटानं आलं-गेलं तर पलीकडच्या सुपीक प्रदेशांतल्या व्यापाराचा मक्ता मिळेल म्हणून."

" ठीक आहे. आधी तुझा सगळा माल इथं मला सोडून दाखीव, तो कोठून कसा मिळवला याचा जाब दे, आणि तो न्यायमार्गानं मिळवलास

असं दिसून आलं तरच, तरीहि पण योग्य जकात घेऊनच, पुढं जाऊं देईन. नाही तर तुझ्या मालासकट तुला आणि तुझ्या तांड्याला या पर्वताच्या कड्यावरून लोटून देईन संभाळ."

आंगले नाइकाला हे शब्द ऐकून घामच फुटला. घाट वलांडून न जातां सगळा तांडा घेऊन परत जातां येईल काय या आशेने तो मागें वळून इकडे तिकडे पाहूं लागला, तों त्याला असें दिसून आलें की, आपलीं सगळीं माणसें, जनावरें या चौकीशीं येऊन पोचलीं आहेत व परत जाण्याची आशा नाही. कारण चोहो बाजूंनी वेताळाच्या सेवकांचा गराडा पडला आहे, आणि त्यांनी हत्यारें सरसावलीं आहेत. शेवटीं नाइलाज होऊन आंगले नाइकाने आपल्या जवळचा सगळा माल सोडून दाखविण्याचें कबूल केलें आणि आगाऊच प्राण-दानाची याचना केली.

तो गुडघे टेकून हात जोडून म्हणाला, "वेताळमहाराज, मला अभय असावं."

वेताळ हसून म्हणाला, "दुसऱ्याचे प्राण घेतांना हा मऊपणा आठवला नाही तुला. पण मला प्रवासी व्यापाऱ्यांचा न्याय करण्याकरिता नेमलेला नसून त्यांचा माल तपासून, दस्तुरी वसूल करण्याकरिताच चौकीदार नेमलेला आहे. मुकाट्यानं आपले बस्ते-बासन, गोण्या सोडून माल दाखीव."

आंगले नाइकाने एकेक बस्ता सोडून माल दाखवण्याला सुरुवात केली. तों त्यांतून निघालेला माल पाहून चौकीदार थक्कच झाला!

नाइकाला वाटलें, आपल्या मालाचें वैचित्र्य पाहून चौकीदार खूष झाला असावा. म्हणून किंचित् गोडबोल्या स्वराने तो म्हणाला, "सरकार, आपणाला हा माल पाहून आश्चर्य वाटलं तें योग्यच आहे. माझा लमाणाचा धंदा माझ्या कुळांत पंचवीस पिढ्या चालत आला आहे. माझ्या पूर्वजांनी या धंद्यांत सगळं जग पालथं घातलं आहे."

चौकीदार म्हणाला, "दुष्टा, तुझीच वाणी वदली. तुझ्या पूर्वजांनी सगळं जग 'पालथं' घातलं हेंच खरं. आणि ज्यांना पालथं घातलं त्यांचा माल हिरावून घेतलाच पण त्यांच्यावर नुसती माणुसकीची दयाहि केली नाही. तुझा माल पाहून मला आश्चर्य वाटलं तें त्याच्या वैचित्र्यामुळं नव्हे, तर प्रत्येक मालावर कुठं रक्ताचे डाग पडले आहेत, कुठं त्याला एखादा चामड्याचा

तुकडा चिकटून आला आहे, कुठं घामाची घाण मारीत आहे, कुठं त्यावर मानवी अश्रूंचे डाग पडले आहेत, हें सारं पाहून!"

असें म्हणून चौकीदाराने एक एक माल बाहेर काढून मांडविला, त्यांत मलमल, हिरे, हस्तिदंत, सोन्याच्या लडी, लोकर असें किती तरी कारागिरीचे व मौल्यवान् जिन्नस निघाले. मग चौकीदाराने तोंडाने मंत्र म्हणून एक लाकडी चौकटींत बसविलेलें स्फटिक शिलायंत्र आपल्यासमोरच्या पेटींतून काढलें, तें दर एक मालापुढे धरलें आणि तो आंगले नाइकाला म्हणाला "डोळ्यांनी नीट बघ, कानानं नीट ऐक, आणि सांग तुला काय दिसतं, ऐकूं येतं तें!" हें यंत्र फारच अद्भुत होतें. कारण त्या स्फटिकशिलेच्या पोटांत सनातनी करपुतळीप्रमाणे अद्भुत देखावे दिसूं लागले. आणि आधुनिक रेडियोप्रमाणे त्यांतून 'अनाहत' ध्वनि ऐकूं येऊं लागले. ते देखावे, आवाज, एकजात करुणास्पद होते. अंगाला गुप्त चाप लावल्यापासून शिरच्छेदापर्यंत घाताचे सगळे प्रकार डोळ्यांपुढून जाऊं लागले. आणि लहान अर्भकापासून वृद्धापर्यंत स्त्री–पुरुषांच्या तोंडून निघालेले आर्तस्वर व करुणालाप ऐकूं येऊं लागले.

चौकीदार म्हणाला, "पाहा-पाहा, ऐक-ऐक, या तुझ्या मालाचा इतिहासच जणू कांही हें स्फटिकयंत्र तुला-मला सांगत आहे. असल्या मालावर जकात मी मागेन ती तूं देशील. पण हा माल विकून तुला त्याचा पैसा करूं देणं हा देवाघरीं अपराध होईल. हा सगळा माल मी धन्याच्या हुकुमानं जप्त करतों आणि तो ज्याच्या हातीं जाईल त्याला तो अंतीं दुःखी केल्यावांचून राहणार नाही, म्हणून मी तो सर्व या कड्यावरून दरींतल्या प्रवाहांत फेकून देतो. त्यांतला एकहि जिन्नस तुला ठेवतां येणार नाही. तुझ्या तांड्यांतल्या जनावरांनी अशा दोषी मालाच्या गोण्या आजवर पाठीवरून वाहिल्या तेवढं पाप पुरें झालं. त्या सर्वांना आज मी तुझ्या बंदींतून मुक्त करणार आहे. तुझे हात मीं तोडले असते तरी त्यांत अन्याय नव्हता. पण संपत्तीनं भरलेल्या खिशांत घालून चालायची सवय लागलेले तुझे हात चोळींत जाण्याला तुला उरावे म्हणून मी ते तोडीत नाही. जा, माझ्यापुढं एक क्षणहि उभा राहूं नको.":

चौकीदाराची आज्ञा होतांच त्याच्या अतिमानुष सेवकांनी तो सगळा माल, पोत्या-बस्त्यांचीं तोंडें सोडून, कड्यावरून खाली ओतून दिला, आणि

हत्तीसुद्धा लमाणी तांड्यांतलीं सर्व जनावरें आणि त्यांचें राखण यांना रानभर उधळून लावलें.

इतक्यांत चौकीच्या बाजूने कोंबडा आरवला; आणि पूर्वेच्या बाजूने दिशा उजळलेली दिसूं लागतांच तो तांबडा आकाशदिवा विझला. काजव्यांची चमक एकदम थांबली आणि आपल्या सर्व सेवकगणांसह चौकीदार जागच्या जागीं अदृश्य झाला !

आता घाटमाथ्यावर आंगले नाईक आणि पायमा नाईक दोघेच उभे होते.

पायमा नाईक म्हणाला, " पाहिलास हा चमत्कार ! दैवानंच तुझी झोप मोडून अवेळीं जाग केलं आणि लुब्धकानं तुला चांगलंच फसवलं. आता हात खिशांत घालून चाळवावयाला त्यांत कांही उरलं नाहीच. पण रिकामे हात चोळून वैतागहि करूं नको. तर ते या उगवत्या सूर्याला जोडून ईश्वराची क्षमा माग पाहूं ! तो पुढच्या आयुष्यांत तरी तुला सुबुद्धि देईल ! "

१७ लखपति वधारो !

मी सहसा कोणाच्या आग्रहाला बळी पडणारा नव्हें. पण परवा काय झालं कुणाला ठाऊक ! भाऊसाहेबांच्या आग्रहामुळं पांच रुपयांचं तिकीट काढून त्यांच्याबरोबर मुंबईच्या रेसकोर्सवर शर्यती पाहावयाला गेलों खरा ! ती त्या मोसमांतली शेवटची शर्यत होती म्हणे. आणि खरंच सांगायचं तर मनांत असंहि आलं की आता आमदार ल. रा. गोखल्यांचं बिल पास झालं म्हणजे मग शर्यती बंद होणार ! तेव्हा एकवार शर्यतीचा काय चमत्कार असतो तो पाहून तरी घ्यावा ! शर्यत न पाहिली म्हणून मरतांना प्राण घुटमळेल असंच कांही नव्हे, पण मी जरासा जग पाहण्याचा शौकिन आहें. अमुक एक पाहिलं आहांत काय ? असं कोणी ठासून विचारलं, आणि तें पाहिलं नाही असं म्हणण्याची पाळी आली, तर वाईट वाटतं, इतका जग पहाण्याच्या हौसेचा अहंकार जडला आहे. म्हणून वाटलं " पांच रुपयांची काय कथा ! "

पण शर्यतीच्या मैदानावरचं जुगारी जग पाहून घेतलं असं समाधान तरी असावं. तसंच आग्रही मित्राचं म्हणणं ऐकलं म्हणजे तोहि खूष होतो. तर करूं या झालं त्याच्या म्हणण्याप्रमाणं एकदा."

आज शेवटची शर्यत.: गर्दी खूपच व्हावयाची हें भाऊसाहेबांना माहीत. म्हणून आम्ही आघाडी मारून एक तास आधी जाऊन पुढची जागा पटकावण्याची खबरदारी घेतली होती. वेळ घालविण्याकरिता सहजच आम्ही गप्पा मारूं लागलों.

भाऊसाहेब म्हणाले–'का रावजी इथं कसं काय वाटतं ?

मी—एका नव्या जगांत आलों असं वाटतं खरंच.

" हें तर तुमच्यापुढं मोकळं मैदान आहे. खरं जग अजून डोळ्यांना दिसायचंच आहे."

" तें कोणतं ? घोडे फिरतात तें ना ? "

" छेः, घोडे फिरूं लागले म्हणजे मागं वळून या चढत्या-उतारत्या शिड्यांवर बसलेल्या लोकांकडे पाहा. म्हणजे खरं नवं जग दिसेल."

" वः ! हें असं काय म्हणतां ? मी घोड्यांच्या शर्यती पाहावयाला आलों की, माणसांचे चेहरे ? ते मला रस्त्यांत काय थोडे दिसतात दररोज ? "

" मौज तर हीच आहे. शर्यतींचं मर्म घोड्यांच्या धावण्यांत मुळीच नाही. कुठला तरी एक एक घोडा सर्वांत पुढं येणारच. पण कुठला येणार हें अनिश्चित असल्यामुळं, जुगारीचीं तिकिटं घेऊन पैसे पणाला लावणाऱ्या लोकांच्या तोंडावर, काल्पनिक आशा व निराशा यांची जी शर्यत लागते ती घोड्यांच्या शर्यतीपेक्षा अधिक मनोरंजक व बोधप्रद असते. रस्त्याने जाणारे लोकहि स्वार्थाकरिताच बाहेर पडलेले असतात हें खरं; पण त्यांच्या मनांत आशानिराशा इतक्या वेगानं एकापुढं एक धावत नसतात. मी तर पैजेचं तिकीट घेऊन जागेवर येऊन बसलों म्हणजे केव्हा केव्हा मैदानाकडे पाठ फिरवून जुगारी लोकांच्या चेहऱ्यांकडेच पाहत बसतों."

"पण शर्यतींत धावणाऱ्या घोड्यांतहि मोठी चुरस उत्पन्न होऊन ते अगदी माणसासारखे जय मिळविण्यास उत्सुक झालेले असतात असं म्हणतात तें खोटंच का ? "

नाही तें खरं आहे. पण स्वाधीनतेंतली चुरस पराधीनतेंतल्या चुरशीइतकी तीव्र नसते. मैदानावर सुटलेला घोडा स्वतःच्या बळावर धावतो; जुगारी

माणसांची आशा दुसऱ्याच्या बळावर धावते. शिवाय घोडा पहिला आला किंवा पांचवा आला तरी त्याचा खुराक किंवा त्याचं मालीस यांत फारसं कमजास्त होत नाही. पण जुगाऱ्यांच्या तिकिटांतला घोडा पहिला आला तर त्याचा खिसा भरतो आणि न आला तर तो रिकामा होतो, म्हणून त्यांचं सुखदुःख हें त्यांची आशा सफळ किंवा विफळ होणार यावर अवलंबून असतं. शरदृतूंत आकाशांतील पोकळ ढग सूर्यापुढून वाऱ्याच्या जोरानं धावत जातात ते तुम्ही कधी पाहिले आहेत काय ?"

"हो, पुष्कळ वेळा पाहिले आहेत. मग त्यांचं काय ?"

"त्यांच्यामुळं उन्ह व सावली हीं जशीं पाठशिवणीचा खेळ खेळत असतात तशी जुगाऱ्यांची आशा व निराशा ! आणि मौज ही की त्याहि तशाच पोकळ !"

"कां बरं ? तिकीट खरं झालं म्हणजे खिसा भरतो असं तुम्ही म्हणाला ना ? मग आशा-साफल्य पोकळ कसं ?"

"पोकळ असं की, दहा रुपयांचं तिकीट खरं झालं तर लगेच वाढत्या आशेवर तो पंधरा-वीस रुपयांचं दुसरं तिकीट विकत घेतो. आणि एका-मागून एक ज्याचं तिकीट खरं होतं असा मनुष्य विरळा ! जुगारीचं तिकीट खरं ठरून खिशांत गेलेला पैसा क्षणभरहि तेथे राहात नाही. धीवराच्या जाळ्यांत आलेला मासा किंचित् फट सांपडली की जसा पाण्यांत उडी घेतो तसाच जुगारींत जिंकलेला पैसा. लागोपाठ शर्यतींत धावणारा घोडा एखादा, पण लागोपाठ जुगारीचीं तिकिटं विकत घेणारीं माणसं किती तरी ! एकच घोडा एकामागून एक अनेक शर्यतींत धावत नाही याचं कारण त्याच्या शक्तीचं भांडवल मर्यादित असतं. पण जुगाराच्या आशेच्या भांडवलाला अंतच नाही."

"पण एकाचा नफा तो जर दुसऱ्याचा तोटा, आणि एकामागून एक जय कोणाचं जुगाऱ्याला मिळत नाही असं तुम्हीच म्हणतां, तर आशेचा चेक फटून पदरांत ऐवज पडण्याची पाळी क्रमानं आधी किंवा मग सर्वांवर आलीच पाहिजे असं होत नाही काय ?"

"वः ! अशा रीतीनं शंभरांत शंभर वांटून जाऊन तळाला कांहींच उतरायाचं नसलं तर हीं शर्यतींचीं मैदानं कोण कशाला विकत घेईल ? कोण कशाला या इमारती बांधील ? आणि कोण कशाला घोड्यांचे तबेले सजवील ! शेजारणीला मोहरा मोजायला म्हातारीनं अधोली दिली. पण तिच्या तळाला

मेण लावून दिली. त्यामुळं सहजच एक-दोन मोहरा त्याला चिकटून आल्या! हें अरेबियन नाईटमधे वाचलं असालच. शर्यतीच्या एका दिवसांत टर्फ क्लब दहापांच वेळां आपली मेणवलेली अधोली, जुगाऱ्यांचे पैसे मोजून द्यावयाला घ्यावयाला देते तेव्हा काय होत असेल तें पाहा!"

"हरणारांचे पैसे घेऊन जिंकणाराचे पदरांत टाकणारा दलाल म्हणजे हा टर्फ क्लब, प्रत्येक घालमेलींत आपला हिस्सा काढून ठेवीत असतो. अर्थात् शेवटीं दुसऱ्या कोणाला तरी कमी पडलेंच पाहिजे. पण या टर्फ क्लबच्या हिश्शाचा पैसा कधीच बुडत नाहीं. आणि हें माहीत असूनहि "बुडणार तर नेहमी दुसरा बुडेल आपण तरूं" अशा खोट्या व अन्यायी आशेनं जुगारी मनुष्य तिकिटामागं तिकिटं विकत घेत सुटतो. त्याला अश्वपरीक्षेचं ज्ञान नसतं. यामुळं तज्ज्ञ म्हणून कपटानं मिरविणाऱ्या लोकांच्या सूचनांवर त्याला अवलंबून राहावं लागतं. तात्पर्य, याचा सर्वच उद्योग पराधीन! ज्ञान तज्ज्ञांचं, शर्यत धावण्याचं बळ किंवा चापल्य घोड्याचं, आणि एकदा खिशांतला पैसा गेला म्हणजे पुढं तिकिटं विकत घेण्याला लागणारा पैसा सावकाराचा! स्वतः यांचं काय? तर लोभ व आशा! त्यांना मात्र कांहीं कमी नाहीं. माझं हें चवथ्यानं दिवाळं निघालं! तरी पण मी मैदानावर हजर आहेंच. कारण मी ईश्वराचा प्यारा आहें, तो मला केव्हा तरी हात देईल, ही आशा मला सोडीत नाहीं. ईश्वरावर अशी अढळ श्रद्धा ठेवणारा मनुष्य तुम्हांला दुसरा कोणी भेटला असेल तर सांगा!"

"आहेत आणखीहि आहेत. उगीच आत्मनिंदा कां करून घेतां? सोडतींत पैसा घालणारे थोडे आहेत? सोडत मांडणारा हाहि असाच दुसऱ्यांना ताक वाटून स्वतः लोणी खातो की नाहीं? शेअर-बाजारांत वायदे करून दिवाळीं काढणारे लोक मुंबईत किती आहेत सांगा. एथे घोडा पळतो, तेथे बाजार पळतो. मिळून एकच. शर्यतींत तिकिटागणिक घोडे तरी जागेवर असतात. पण शेअर बाजार, सट्टा-बाजार यांत अस्तित्वांत नसलेले रोखे किंवा कापसाच्या गांठी यांच्या नांवानं सौदे होतातच की नाहीं? गंधर्व नगरांतले वर आणि गंधर्वनगरांतल्या वधू, मग विवाहांना काय तोटा?"

"व मौज तर त्यांतच आहे! अर्थशास्त्रांत मूर्त वस्तूंच्या देवघेवीचा-विचार असतो. अनर्थशास्त्रांतला सगळा व्यवहार काल्पनिक वस्तूंवरच

चालवयाचा. वस्तु असल्याच तर त्या आपल्या जागेवर. जुगारी लोक चाळवितात ती फक्त आपली आशा आणि ईश्वराच्या हातचा संभव किंवा असंभव !"

"नाही; हें अनर्थशास्त्रहि अर्थशास्त्रच आहे. कारण ज्यांत पैसा म्हणजे अर्थ हा पणाला लागत नाही, त्या जुगारींत रस किंवा रंगच भरत नाही. अनार्जित म्हणजे श्रम केल्याशिवाय, आणि तोहि एकदम पुष्कळसा, पैसा मिळविणं हेंच जुगारी विद्येचं सूत्र आहे. पण नुसता पैसा हातांतून गेला-आला येवढ्यानंहि भागत नाही. आपल्याच पेटींतला पैसा काढून तो आपणच पैजेला लावला तर तो जिंकल्याचा आनंद व हरल्याचं दुःख कसं होणार ? सोबती मिळत नाही म्हणून एकच गडी बुद्धिबळाचा किंवा पत्त्यांचा डाव दोन्ही अंगांनी चालवील काय ? परवा मी आजारी होऊन अंथरुणांत पडलों. जुगारी मित्र कोणी जवळ नव्हता, तेव्हा बायकोशींच पैज मारली की 'आजच्या साऱ्या दिवसांत तुला केव्हां तरी राग येणारच. न आला तर मी शंभर रुपये हरेन व तुला देईन; आणि राग आला तर तूं शंभर रुपये मला दिले पाहिजेस.' तिनं बिचारीनं संध्याकाळपर्यंत कसाबसा आपला राग सांभाळला. पण शेवटीं माझ्या तंबाखूच्या धुरानं खोली भरून गेली तेव्हा ती रागावलीच. मी म्हणालों, "मीं पैज जिंकली, टाक शंभर रुपये." ती म्हणाली, "ठीक आहे, द्या पेटीची किल्ली इकडे आत्ता काढून देतें." ही काय जुगार झाली ? दुसऱ्या एका दिवशीं बायकोहि हजर नव्हती पैज लावायला. तेव्हा मीं माझ्याशींच पैज लाविली. कशावर ? तर पांच मिनिटानंतर माझा श्वास म्हणजे सूर डाव्या नाकपुडींतून वाहूं लागेल की, उजव्या नाकपुडींतून ? ती पैज मीं जिंकली. पण पैसे मीच देणार मीच घेणार. मग काय मौज राहिली त्या जुगारींत तुम्हीच सांगा ! रावजी, खरी जुगार म्हणजे तीच की, अभावितपणें दुसऱ्याचा पैसा मिळाला म्हणजे त्याचं काय करूं हें न सुचण्याच्या गोंधळानं जिंकणारा वेडा झाला पाहिजे, आणि होतं नव्हतं तें सगळं जाऊन अन्नान्न दशा झाली म्हणून हरणाराचीं बायकापोरं रडूं लागलीं पाहिजेत !"

"मग आमदार तात्यासाहेब गोखले जें करीत आहेत, म्हणजे कायद्यानं जुगार बंद करीत आहेत, तें बरंच म्हणावयाचं !"

"सिद्धीस जाईल तेव्हा काय तें म्हणा ! सरकार हें बिल पास होऊं देईल या भ्रमांत तुम्ही अजून आहां असं दिसतं. अहो, घोड्यांच्या शर्यतींतली जुगार

हें इंग्लंडच्या राजाच्या वैभवांतलं वैभव आहे ! परवाच्या गोलमेज परिषदेंत हें वैभव नष्ट होऊं नये म्हणून सेफगार्ड्स मागितले नाहीत हें भाग्य समजा ! होय, कारण तुम्हाला स्वराज्य दिलें आणि तुम्हीं शर्यती बंद केल्या तर तो राजेसाहेबांचा अपमान नाही का होणार? विलायतच्या राजा पार्लमेंट उघडण्याला चार घोड्यांच्या गाडींतून जात असला, तर अस्कॉटच्या शर्यती सुरू करण्याला सहा घोड्यांच्या गाडींतून जातो म्हणतात."

" उगीच दुसऱ्याला लावून बोलण्यांत काय अर्थ ? आपली बायको जुगारींत पणाला लावणारा तुमचा आर्यवर राजा युधिष्ठिर हा कांही विलायतेंत झाला नाही."

" होय. पण त्यानं त्या गोष्टीला निंद्य व्यसनच मानलं व म्हटलंहि. त्यानं तें व्यसन आपल्या बिरुदावळींत समाविष्ट केलं नव्हतं."

" कांही झालं तरी एकच. श्रीमंतांचा खेळ होतो व गरिबांचा जीव जातो हेंच अखेर कुठंहि अनुभवाला येतं. व्यसन हें निरुद्योगीपणाचं अपत्य आहे. श्रीमंतांना फावल्या वेळेचं काय करूं असं होऊन जातं म्हणून त्यांना हे खेळ सुचतात. आणि श्रीमंत करतात ते करण्यांत मान्यता मानणारे गरीब लोक तेच खेळ खेळूं लागतात. तथापि अशा खेळांत श्रीमंतांच्या हातचा मळ जातो, पण गरीबांच्या अंगाचं सालडं जातं हें कोणी पाहात नाही ? "

" उगीच कशाला गरीबांची कड घेतां ? गरीब झाले तरी त्यांना लोभबुद्धि, फुकटा लाभ पदरांत पाडण्याची इच्छा, एकदम श्रीमंत होण्याची हौस, ही श्रीमंतापेक्षा कमी असते असं म्हणत असाल तर तें मात्र चूक आहे. तरी पण या दोघांच्याहि व्यसनाला आळा बसवितां आला तर हवा हें मात्र मी कबूल करतों."

" पण तें कसं होणार ? शर्यतीच्या जुगाराचं समर्थन करणारे शहाणेसुर्ते कायदेकौन्सिलांतून नष्ट होतील तेव्हा ना ! आज तर हे शहाण्याचे कांदे उघड असं प्रतिपादितात की शर्यती सुरू ठेवल्यानं घोड्यांची अवलाद सुधारते ! पण सांगा की कोणता शर्यती घोडा लढाऊ घोडदळांत समाविष्ट होऊं शकेल ? बरं शर्यतीला घोडे घ्यायचे ते सुद्धा परदेशी. या शर्यतीच्या बाबतींतहि 'इंडियनायझेशन' चा प्रश्न येतो; पण हिंदी शिपायांच्या अवलादीबरोबर हिंदी घोड्यांची अवलाद नष्ट झाली तर काय नवल ? "

" असो. वाइटांतून चांगलं इतकंच की टर्फ क्लब दानधर्मांत पुष्कळ पैसा घालतो. सत्कार्य घडतें ! "

" होय. कुंटणखान्याच्या उत्पन्नांतून देवळं बांधण्यासारखं हें सत्कार्य आहे खरं."

" कसंहि असो. अवचित लाभासारखा लाभ जगांत दुसरा नाही. माधवराव जोशांच्या म्युनिसिपालिटीच्या नाटकांतला 'हुसन्या' म्हणतो ना 'एकदिन तेराबी तकदीरका चक्कर फि-र्र-र्र-र्र जायगा !' इतकी तरी आशा माणसाला असते ना ? "

" होय, पण ही आशा सफळ होऊन सुखी झालेल्या माणसाचं पात्र माधवराव जोशांच्या एखाद्या नाटकांत रंगभूमीवर येऊन दिसेल तेव्हा ती आशा तरी खरी म्हणूं. आज पाहावं तो हुसन्या ज्या दिवसाचा हवाला देतो तो दिवस कोणाचाच उजाडलेला दिसत नाही इतकं मात्र खरं ! "

आम्ही इतकें बोलतों तों शर्यती सुरू झाल्याची घंटा वाजली. तेव्हा आम्ही बोलणें बंद करून मैदानाकडे पाहूं लागलों. पण भाऊसाहेबांचा उपदेश लक्षांत होता. शिवाय मैदानाबाहेर उभे राहून घोडे धावतांना पूर्वी एक दोन वेळ पाहिलेहि होते. मी शर्यत पाहावयास गेलों होतों तरी नुसते प्रेक्षकांचें तिकीट काढलें होतें. सोडतीचें तिकीट घेतलें नव्हतें. यामुळे कोणताहि घोडा पहिला आला तरी मला त्याचें सुखदुःख कांहीच नव्हतें. म्हणून खरोखरच मैदाना-कडे पाठ फिरवून प्रेक्षकांच्या समुदायाकडेच पाहूं लागलों, तों अपूर्व देखावा दिसला ! आपल्या पदरचा पैसा देऊन त्याच्या मोबदला 'आशा' विकत घेतलेल्या लोकांनी स्वतःला भवितव्यतेच्या हातीं दिलें आहे ! तिने त्यांचें खेळणें बनविलें आहे ! ती त्यांच्या तोंडापुढून आपला दिवा फिरवीत जात आहे ! दिवा तोंडापुढे आहे तोंपर्यंत चेहरा किती उमदा, सतेज ! आणि तो दिवा घेऊन ती पुढे गेली म्हणजे तोच चेहरा किती काळाठिक्कर पडत आहे ! निदान मनाने मैदानांत जाऊन आपण पैज लावलेल्या घोड्यावर बसून त्याला दामटून पुढे आणावें अशी इच्छा ! पण अनेक धावत्या घोड्यांत तो आपला घोडा ओळखीचा नाही म्हणून गोंधळांत पडून उलथेपालथे होत ! आणि शर्यत संपतांच आपण स्वर्गांत गेलों असें कोणाला वाटत आहे तर पाताळांत गेलों असें कोणाला वाटत आहे ! हा सर्व प्रकार पाहून मी तर थक्कच झालों. वाटलें की, पांच रुपये खर्चले त्याचें सार्थक झालें !

---

१८ हिंस्र वाघांचा सरकाराकडे अर्ज

(केसरी, ता. १३ जून १९३३)

हल्लीचे दिवस ज्याने त्याने सरकारकडून स्वतःला संरक्षण मागून घेण्याचे आहेत. तेव्हा आपण ज्यांना हिंस्र पशु म्हणतों अशा वाघांनीहि जर आत्मसंरक्षणार्थ हिंदुस्थान सरकारकडे एखादा अर्ज केला तर काय आश्चर्य ! आणि तसा एक अर्ज नुकताच प्रसिद्धहि झाला आहे. आता वाघांना लिहितां वाचतां येत नसल्याने त्यांनी तो अर्ज आपल्या एका वकिलाकडून करविला आहे इतकेंच. हे वकील अर्थात् एक प्राणिशास्त्रज्ञ आहेत. त्यांचें नांव चार्लस थिओबोल्ड असें असून ते झुऑलॉजिकल सोसायटीचे फेलो आहेत. त्यांनी ता. ९ च्या 'टाइम्स' पत्रांत ही वाघांची कैफियत सादर केली आहे. वाघांना मनुष्यवाणी नाही, म्हणून म्हैसुरास प्रकट झालेल्या या कैफियतीचा सारांश मराठींत दिल्यास मराठीने कानडीवर अतिक्रमण केलें असा आरोप आमच्यावर केला जाणार नाही अशी आशा आहे. या कैफियतीचा आशय असा आहे.

(१) हल्ली शिकारी लोकांकडूनच आम्हा वाघांचा किती बेसुमार संहार चालला आहे याच्या हकीकती वर्तमानपत्रावरून लोकांना विदितच आहेत. प्राणि-सृष्टींतील देखणेपणाच्या वैभवांत आमचा दर्जा फार श्रेष्ठ आहे. आमची जात नष्ट झाली तर सौंदर्यशास्त्राची त्यामुळे फारच हानि होणार आहे. दुर्दैवाने आमची जात खरोखरच नष्ट होण्याच्या पंथाला लागली आहे !

(२) बरें, मनुष्याला असा उपद्रव तरी आम्ही काय करतों, की त्याकरिता त्याने आमचा असा संहार करावा ? घरीं गोठ्यांत बांधलेलीं पोसलेलीं जनावरें आम्ही सहसा खात नाही. तशींच शेतीला उपयोगी जनावरेंहि ! कारण त्यांचे मालक त्यांना उत्तम जपतात. मग तो गोड घास आम्हांला कसा लाभणार ? आमचें मुख्य भक्ष्य हरणें, रानडुकरें ! पण हीं आम्हीं मारून खाल्ल्याने शेतीबागायतीला होणारा किती उपद्रव आम्ही वांचवितों याचा नीट विचार करा.

(३) एखाद्या शेतकऱ्याने गुरांची नीट काळजी न घेतलेलें किंवा एखादें उनाड जनावर आम्हीं खाल्लें तर त्यांत आमचा काय दोष ?

(४) आपल्या साऱ्या जन्मांत आपली एक दोहोंहून अधिक जनावरें वाघानें खाल्याची तक्रार सहसा ऐकूं येणार नाहीं. दहापांच रुपयांचेंच नुकसान!

(५) वाघांच्या व वाघिणींच्या शिकारीबाबत सरकारने आता नियमच करावे व परवान्याशिवाय वाघ मारणें हा गुन्हा ठरवावा.

(६) एका जिल्ह्यांत एका सालांत दोहोंहून अधिक वाघ मारण्याला परवानगी देऊं नये.

(७) गोळी घातली की, वाघ-वाघीण गणतींत धरावी. प्रत्यक्ष मेलीच पाहिजे असें नाही.

(८) गर्भारशी किंवा लहान लेकराची आई (वाघीण) मारूं नये. पुराव्याचा बोजा शिकाऱ्यावर राहावा.

(९) सरकारच्या परवानगीशिवाय वाघाचीं पिलें धरूं-मारूं नयेत. त्यांचे दुधाचे दांत पडले आहेत की नाही, हें आधी पाहावें. पुराव्याचा बोजा शिकाऱ्यावर.

(१०) मोटारींत बसून कोणींहि वाघ मारूं नये. तो भागुबाईपणा होय, मर्दानी खेळ नव्हे. पुराव्याचा बोजा शिकाऱ्यावर.

(११) जंगलांत हाके घालण्यास सरकारची परवानगी घ्यावी.

(१२) विषारी खाद्य घालून किंवा सापळे लावून वाघ मारूं किंवा धरूं नयेत.

(१३) मनुष्यें खाण्यांत सवकलेल्या वाघाशिवाय इतरांस मारून आणणारास सरकारने बक्षिसें देऊं नयेत.

(१४) वाघ चालूनच आला तर आत्मसंरक्षणाचे पिनल कोडांतले हक्क मनुष्याने बजवावे.

असें केल्यास शिकारीची क्रीडा संपुष्टांत न येतां वाघांची जातहि भूतलावर शिल्लक राहील. ही कैफियत ठीक आहे. पण त्यांत आणखी थोडा खुलासा व्हावा असें आम्हांस वाटतें तो असाः--

१ वर्षांतून ठरीव दोन वाघांची वर्गणी देण्याची कांही व्यवस्था वाघ करणार आहेत काय?

२ उलट आपणास अमुक इतके बळी वर्षांतून हवे असें सांगून तेवढ्यांची

व्यवस्था परस्पर झाल्यास दिवसारात्रीं आम्ही इतर कोणालाहि उपद्रव देणार नाही असा करार करण्यास वाघ तयार आहेत काय ?

३ मोटारींतून शिकार करूं नये हें ठीक, पण रानांत झाडावर मचान बांधण्यास कांही हरकत आहे की काय, याचा खुलासा करावा.

४ गोळी लागतांच आपण हरलों असें म्हणून, शिवलेला गडी जसा खेळांतून बाद होऊन निमूटपणें बाजूला बसतो त्याप्रमाणे, वाघ शिकाऱ्याचे हातीं जिवंत लागण्यास तयार होतील काय ? तसें झाल्यास ते परवान्याच्या संख्येंत मोजतां येतील व प्रत्यक्ष मरण वांचेल. अशा रीतीने युद्धांतील कैद्यांप्रमाणे शरण आलेल्या वाघांस शिकारखाने व अजबखाने यांत संभाळून फुकट मांस खावयास घातलें जाईल. अशाने प्राणिशास्त्रास मदत होईल.

५ पाडाव करून सोडून दिलेले वाघ अहिंसाव्रत स्वीकारण्यास तयार आहेत काय ?

६ मनुष्याने बंदूक टाकून देण्याचें ठरविलें तर वाघहि आपले दांत व नखें काढून टाकण्यास तयार आहेत काय ?

७ ज्या त्या गोष्टींत पुराव्याचा बोजा मनुष्यावर टाकलेला दिसतो. पण स्वतः वाघ हे आपणावर कोणत्या बाबतींतला पुराव्याचा बोजा घेण्यास तयार आहेत ?

अनायासाने युरोपांत शस्त्रसंन्यास परिषद भरून संहार कमी करण्याचा विचार सुरू आहे. तेव्हा त्याबरोबर या दोन कैफियतींचा विचार होऊन कांही करार ठरतील तर बरें नव्हे काय ?

---

१९ न्यायकोर्टांतील एक काल्पनिक दृश्य

(केसरी, १७ मार्च १९३३)

——:0:——

कधीहि मी संध्याकाळीं फार उशिरा चहा घेत नाही. पण आज तो घेत आहें याचें आश्चर्य वाटून भाऊसाहेब म्हणाले—

" आं ? हें काय ? संध्याकाळींसा चहा घेतां ? झोप नाही का जाणार ? "

मी म्हणालों—

" आज तिसरे प्रहरीं इतक्या गमतीच्या गोष्टी पाहिल्या व ऐकल्या की वरचेवर होणाऱ्या त्यांच्या आठवणीने एरवीहि झोप बहुधा येणारच नव्हती. आणि रोजचा तिसरे प्रहरचा घरचा चहाहि बुडाला होता. म्हणून म्हटलें सहा वाजले असले तरी चहा घ्यावा, शीण जाईल. चहाने झोप जाईल, पण एरवी तरी तीं जाणारच होती."

" पण आज तिपारचा चहा कां बुडाला ?"

" दोन वाजल्यापासून सहा वाजेपर्यंत कोर्टांत गुंतलों होतों."

" कां कांही साक्षबिक्ष होती वाटतें ?"

" साक्ष नाही, फिर्याद नाही, कैफीयत नाही--"

" मग कांही पेन्शनर मुन्सफ आपल्याच कोर्टांत वकिली करतात तशी वकिली करूं लागला कीं काय ?"

" भलतेंच कांही तरी ! मीं काय दुसरें-तिसरें लग्न केलें आहे म्हणून मला पेन्शान पुरत नाही ? की, माझा एखादा मुलगा नवा वकील झाला आहे म्हणून त्याच्या धंद्याचा जम बसवून द्यायला वकिली करूं ?"

" मग कदाचित् ऑनररी मॅजिस्ट्रेटांप्रमाणे, सदर अमीनाचें काम बिनपगारी करीन असें कळवून सरकाराकडून 'जॉइंट'ची नेमणूक करून घेतली असाल ! ठीकच आहे. सरकार हल्ली खर्चाच्या पेचांत सांपडलें आहे. तेव्हा अनुभविक असून बिनपगारी न्यायाधीश सरकारला मिळाला तर तें आज त्याला डोक्यावर धरतील. सर गोविंदराव माडगावकरांनी नव्हतें का सरकारला कळविलें की मी फुकट हायकोर्टांत न्यायाधीशाचें काम करायला तयार आहें म्हणून !"

" तुमची ही कल्पनासुद्धा चुकली. खरें असें की, हल्लीचे सदर अमीन पडले ख्रिस्ती आणि त्यांच्यापुढे येऊन पडले आहेत असले चमत्कारिक दावे आणि असले अपरिचित पक्षकार, की हिंदु-धर्मशास्त्राच्या सूक्ष्म तत्त्वांचा खल तर त्यांत व्हावयाचाच आहे. शिवाय—"

" वाः ! मग त्यांत हो काय ? प्रिव्ही कौन्सिलचे गोरे न्यायाधीश नाही वाटतें हिंदुधर्मशास्त्राची चर्चा करून निवाडे देत ? कसें सुरेख वांग्यांचें भूत आणि गणपतीचें माकड बनवितात ! आणि आम्हा हिंदूंचा सर्व व्यवहारधर्म त्यावर कसा बिनतक्रार चालतो ? विटंबना ! विटंबना ! हेंच परकीय राज्यांतलें जीवन ना ? मग तुमच्या सदर ख्रिस्ती अमीनांना हिंदुधर्मनिर्णयाचें एवढें संकट कां पडावें ? हें तर नित्याचेंच आहे !"

" पण या नित्याबरोबर भानगडीचें असें अनित्यहि थोडेंसें उपस्थित झालें आहे. आमचा ख्रिस्ती न्यायाधीश आहे जरा भला माणूस. त्याने मला बोलावून घेऊन म्हटलें, " ईश्वर मला बुद्धि देईल तसा न्यायनिवाडा मी करीनच. पण कोर्टांत तुमच्या धर्माचे अनेक शंकराचार्य व सनातनी शास्त्री-पंडित हजर राहणार आणि त्याचबरोबर महात्मा गांधी व भोपटकर यांसारखे सुधारक लोक व खुद्द अस्पृश्यहि ! या खिचडी दरबारांत सर्वांना त्यांच्या अधिकाराप्रमाणे वागविण्यांत यावें, त्यांपैकी कोणाचाहि उपमर्द मजकडून होऊं नये, अशी मनापासून इच्छा. तेव्हा हिंदु मित्र व अनुभवी न्यायाधीश म्हणून तुम्हांला बोलावलें. तुम्ही सांगाल तशी सर्व व्यवस्था ठेवीन."

" काय ? न्यायकोर्टांत एकाच वेळीं शंकराचार्य आणि शास्त्री-पंडित ? आणि सुधारक व अस्पृश्य पुढारी ? हा सर्व घोटाळा आहे तरी काय ? आणि तो घडून तरी कसा आला ? "

" तुम्हांला शंकराचार्य व न्यायकोर्ट यांचा हल्लीचा ऋणानुबंध माहीत नसावासं दिसतं ? अहो ! दिवाणी हक्कांच्या सर्व प्रकारचे दावे आज शंकराचार्य वादी-प्रतिवादी होऊन कोर्टांतून लढत आहेत, लढवीत आहेत. कर्जदारी, सावकारी, वतनदारी, सगळे कांही प्रकार आहेत. कोणाला वाटलं असेल की, शंकराचार्य संन्यासी म्हणून दत्तकप्रकरणासारखीं तरी त्यांचीं भांडणं नसतील. पण शिष्य करणें म्हणजे दत्तक घेणेंच नव्हे का ? फक्त शंकराचार्यांचं एखादं विवाहप्रकरण मात्र अजून कोर्टांत आलेलं नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वडिलांनी नाही का चतुर्थाश्रमाचा त्याग करून संसार पुनः स्वीकारला ? पण त्या वेळीं असले वाद समाज मिटवीत होता, हल्ली तें सामर्थ्य समाजांत न राहिल्यामुळं ते वाद कोर्टांतच जावयाचे ! परदेशगमन व अंत्यजपरामर्श हीं फक्त स्वतः शंकराचार्यांना वर्ज्य ! पण संन्याशाचाहि संसार आहेच. त्याला खरोखर कांही म्हणतां कांहीच वर्ज्य नाहीं."

" हें चालायचंच ! जैन यतीप्रमाणं हिंदु संन्यासी एका ठिकाणीं त्रिरात्र वास करीनासा होईल, केवळ पायानं प्रवास करील, व नुसतं भिक्षान्न खाईल तर तो खरा संन्यासी. मला आपले पुण्याचे प्रज्ञानेश्वर यति हेच वंद्य वाटतात. नाही तर शंकराचार्यांच्या हल्लीच्या वैभवाचा प्रकार ! स्वयंपाकाला सोन्याचीं भांडीं पाहिजेत आणि शिकारी कुत्रे पाहिजेत पलंगपहाऱ्याला ! पण त्याचं वर्णन करून कशाला उगीच जीभ विटाळूं ! युरोपांत तरी काय ? बोर्जिया

वंशांतले पोपमहाराज धर्मगुरु आणि कार्डिनल रिचलियो हे धर्मकार्याध्यक्ष ! जग हें असंच आहे व असणार ! तें असो; पण तुमच्या ख्रिस्ती न्यायाधीशांना अडचण कशाची पडली ?"

"कोर्टांत शंकराचार्य, शास्त्री-पंडित येणार, त्यांचा सन्मानक्रम कसा लावावा ? त्यांना कोठें बसवावें ? सुधारक व अस्पृश्य येणार त्यांना कोठे बसवावें ? अपमान व विटाळ कसा वांचवावा ? शंकराचार्यांना शपथा कशा कोणी द्याव्या ?. व त्यांच्या साक्षी कशा घ्याव्या ? अनेक भानगडी ! माझा मित्र तर अज्ञानाने गोंधळून गेलाच, पण आपल्या भलेपणाच्या बुद्धीनेच त्याहून अधिक !"

"मग तुम्ही त्याला काय सल्ला दिलात ? व त्याच्या अडचणी कशा दूर केल्यात ?"

"सांगतों ऐका. प्रथम सल्ला हा दिला की, या तारखेचं सर्व काम रीतसर चाललं तरी कोर्ट म्हणून न चालतां चेंबर पद्धतीनं चालावं."

"म्हणजे ?"

"त्याचा अर्थ असा. कोर्टानं म्हणजे स्वतः न्यायाधीशानं उंच व्यासपीठावर न बसतां, खाली येऊन, इतर चार-चौघांप्रमाणं साध्या खुर्चीवर, सभोवार वकील--पक्षकारांना घेऊन बसावं. असं झालं म्हणजे उच्चनीच भाव जाईल !"

"हां. हायकोर्टांत हें केव्हा केव्हा पाहतों खरं. पण शंकराचार्य खुर्चीवर बसणार ?"

"होय. त्यांच्या खुर्च्यांवर मृगाजिनं अंथरण्याची परवानगी दिली आहे. ज्या त्या शंकराचार्यांमागं, कोर्टाच्या शिपायाप्रमाणं, त्यांचे रुपेरी-सोनेरी छडी-भालदार उभे राहतील !"

"आणि या भालदार-चोपदारांनी पहाटच्या कोंबड्यांप्रमाणं ओरडून ओरडून, आपापल्या जगद्गुरूंच्या बिरुदावळीची घोषणा चालविली म्हणजे सर्वच पक्षकारांना, वकिलांना, कोर्टानं पुकारल्याचा भास होऊन बाहेरून गर्दी लोटली तर ?"

"तें होऊं नये म्हणून त्या दिवशीं दुसरे कोणतेच नंबर कोर्टानं ठेवले नाहीत. फक्त शंकराचार्य व चांडाळ यांनाच उद्या कोर्टांत प्रवेश."

" पण शंकराचार्य कोर्टाच्या आवारांत येणार तेव्हा आडव्या पालख्यांचं कसं काय होणार ? "

" वाः, सरकारनं लाखों रुपये उधळून पुण्याचीं कोर्टं अशा प्रशस्त ठिकाणीं बांधलीं आहेत की, पन्नास आडव्या पालख्या एकाला एक लागून सहज चालतील."

" पण दरवाजे लहानच की नाही ? त्यांतून आधी कोणी शिरावं याचा निर्णय कसा काय ? "

" हा हक्कनिर्णय करण्याकरिता माधवराव बोडसांनी लिहिलेल्या शंकराचार्याविषयींच्या पुस्तकाचा उपयोग करण्याचं ठरलं आहे. खपोत बिचाऱ्याचीं चार पुस्तकं ! नाही तर या मुद्द्यावर त्यांची 'कमिशनर' म्हणून नेमणूक करवून निकाल घेऊं. मिळोत बिचाऱ्याला भत्त्याचे तरी चार पैसे या निमित्तानं ! साऱ्या जन्मांत हेंच एक चोपडं लिहिलंन् ! विद्वान आहे, पण करणार काय ? बेकारीचं दुःख सर्वांनाच बाधतं. अलीकडे त्यांना कोर्टांत झुंजवायला कोंबडींहि कमी झालीं आहेत म्हणतात ! "

" पण कोर्टाच्या इमारतींत दिवसा मशाली लावायला परवानगी मिळणार काय ? "

" हो न मिळायला काय झालं ? फक्त कोणाला ठसका लागूं नये म्हणून बुदलींतलं तूप खवट नसावं इतकाच निर्बंध घालायचा ठरला आहे. रोमन कॅथोलिक देवळांत दिवसा मेणबत्त्या लावतात हें या ख्रिस्ती अमीनसाहेबाला माहीत आहे."

" बरं, पण बसायच्या खुर्च्यांखाली जाजम-सतरंजी असणार. तें समान आसन ! त्यावर शंकराचार्य व चांडाळ लोक बसावयाचे म्हणजे तो विटाळ नव्हे काय ? "

" शंकराचार्यांच्या सर्वाधिकाऱ्यांच्या विनंतीवरून तें जाजम काढून टाकलं, तरी खालच्या जमिनीचं समानाधिष्ठान उरतं त्याला इलाज नाही. पण जमिनीवर फरशी आहेच. आणि पाट वेगळा असला म्हणजे पंगत वेगळी ठरते हा जसा शास्त्रार्थ आहे, तसाच फरशीचा प्रत्येक दगड सुटा असतो म्हणून तो पाटच समजावा, आणि सीमेंटाची काळी रेघ हें प्रत्येक पाटाभोंवती फिरविलेलं पाणी समजावं. अशा रीतीनं प्रत्येकाची बैठक किंवा भूमिका वेगळी ठरते, विटाळ टळतो, असा शास्त्रार्थ मिळाला आहे ! "

"खरंच तें. प्रत्येकाची मनोभूमिकाहि वेगवेगळीच की नाही? प्रत्येक शंकराचार्य वेगळ्या परंपरेचे. कोणी द्वैती, कोणी अद्वैती, कोणी विशिष्टाद्वैती! महात्मा गांधी हे जन्मानं त्रैवर्णिकांतले असतां स्वतःला चांडाळ म्हणवितात; आणि डॉ. आंबेडकर हे जन्मानं चांडाळ असतां विद्येनं श्रेष्ठ म्हणून ब्राह्मण ठरतात! आणि फिरून त्या दोघांचीं मतं म्हणजे मनोभूमिका वेगळ्याच! बरं, काम चेंबरप्रमाणंच चालावयाचं तेव्हा विड्या सिगारेट ओढायला वकिलांना परवानगी असेल की नाही!"

"चेंबरमध्यें कोर्ट स्वतः सिगारेट ओढूं शकतं. पण तेहि या दिवसाकरिता 'आदरार्थ' निषिद्ध ठरविण्यांत आलं आहे. फक्त तपकिरीच्या डब्या व बेलटीं चालतील असं ठरलं आहे!"

"शंकराचार्यांना साक्षी-जबानीच्या प्रारंभीं उठून उभे राहून शपथ घ्यावी लागेल त्याचं काय? धर्मगुरु उठले म्हणजे सर्वांनी उठून खडी ताजीम द्यावयाची असते!"

"तो प्रश्न बराच भानगडीचा ठरला. कारण जशी शंकराचार्यांची इभ्रत तशीच कोर्टाची! कोर्ट आलं की सर्वांनी उठून उभं राहावं लागतं. म्हणून कोर्टांत प्रवेश करण्यासंबंधी अशी तोड ठरली की, वादी-प्रतिवादी शंकराचार्य, साक्षीदार गांधी, वकील भोपटकर, बॅरिस्टर आंबेडकर सर्वांनी एकदमच आंत यावं व स्वस्थानीं बसावं. म्हणजे कोणाकरिता कोणी उत्थापन दिलं असं होणार नाही."

"पण मग शपथ घेण्याच्या वेळीं शंकराचार्य बसूनच शपथ घेणार की काय?"

"नाही त्या वेळीं मात्र ते उभे राहिले पाहिजेत. पण स्वतः कोर्ट उभं राहणार नाही असं ठरलं आहे. अमीनसाहेब म्हणाले, "मी वाटेल तर उठून उभा राहीन तुमच्या धर्मगुरूचा सन्मान करावयाला. मी तयार आहें. पण जी पक्षकाराची अदबी ती कोर्टाची बेअदबी होते. म्हणून मला बसूनच उभ्या शंकराचार्यांना शपथ द्यावी लागेल."

"मग परिहार कसा? शास्त्रवचन काय निघालं?"

"'ना विष्णुः पृथिवीपतिः' राजा हा श्रीविष्णूचा अवतार, व सदर अमीन न्यायाधिकारी हा पृथ्वीपतीचा प्रतिनिधि. शंकराचार्यांनाहि श्रीविष्णूपुढं नमलंच पाहिजे. कोर्टाच्या हातचा निवाडा हवा, तर शपथ घ्यावयाच्या वेळेपुरतं तरी उठून उभं राहिलंच पाहिजे. त्याला काय करणार? शिवाय असाहि

समाधानाचा पर्याय निघाला आहे की, शपथ घेण्याच्या वेळीं शंकराचार्यांनी उठून उभं राहावयाचं तें कोणा मनुष्याकरिता नसून फक्त ईश्वरस्मरणार्थ !"

"पण ख्रिस्ती माणसानं शंकराचार्यांना शपथ देणं म्हणजे अब्रह्मण्याची परमावधि नव्हे काय? आणि ती शपथ तरी कशी? 'ईश्वरसाक्ष खरं सांगेन; खोटं सांगणार नाही.' ईश्वरसाक्ष इतकं म्हणण्यांत कदाचित् अपमान नाही. पण 'मी खरं बोलेन' असे शब्द शंकराचार्यांच्या तोंडून काढवावे?"

"भाऊसाहेब ! हा व्यवहारांत पडल्याचा दोष आहे ! संन्यासी जर व्यवहार करूं लागले तर असले अपमान कसे टळणार? म. गांधी हे राजकारणांतले यति-संन्यासीच ना ! पण मंदिरप्रवेश बिलाची इच्छा झाल्याबरोबर कायदेमंडळाचा सगळा संसार-व्यवहार मागं लागलाच की नाही?"

"पण तुम्ही म्हणतां या मुकद्दम्याची कारवाई स्वतः शंकराचार्यांनी केलेली नाही. तो कोणी हरकारे की कोण तिसराच उद्योगी मनुष्य आहे म्हणतात !"

"होय. पण त्यानं सद्धर्मावरची आपत्ति टळण्याकरिताच उद्योग केला. कांही शंकराचार्य नाइलाजानं प्रतिवादी म्हणून गोवले गेले. पण कांही स्वतः-च्या इच्छेनं वादी म्हणून सामील झाले आहेत म्हणे ! तात्पर्य काय, संन्यास घेण्याच्या वेळचं मुंडन क्षेत्राशिवाय झालं असेल ! पण मताच्या आग्रहाचं व हक्कांच्या भांडणाचं मुंडन कोर्टाशिवाय नाही हें धर्मगुरूंना कळून आलं खरं. एरवीं संन्याशांना त्यांचं नांव विचारण्याची सोय नाही. पण कोर्टांत आल्यावर 'तुम्ही कोण? तुमचं नांव काय?' असा प्रश्न विचारला म्हणजे 'अहं ब्रह्मास्मि' म्हणून चालावयाचं नाही. वय विचारलं तर 'ब्रह्म अनादि आहे' म्हणून चालावयाचें नाही. जात कोण असं विचारलं तर 'शिवः केवलोऽहं' असं म्हणून चालावयाचं नाही. फार फार म्हणजे धंदा विचारला तर 'जगाला सद्धर्म शिकविण्याचा' असं उत्तर यतिमहाराजांना देतां येईल. कारण मनुष्य सांगेल तोच त्याचा धंदा ! म. गांधींनी एका खटल्यांत आपला धंदा 'विणकराचा' म्हणून सांगितलं, आणि वकील माधवराव अणे म्हणाले, 'माझा धंदा सभा भरविण्याचा !'"

"म्हणजे तुमचं म्हणणं शंकराचार्य, गांधी व अणे सर्वांनीच शपथ घेऊन शेवटीं खोटी जबानी दिली असंच ना ! धन्य आहे बुवा तुम्हा निंदकांची !"

"कांही असो, न्यायकोर्टांत धर्मगुरूंपासून धर्मद्रोही लोकांपर्यंत सगळ्या प्राण्यांचा असा हा अजबखाना जुळविणारे हरकारे पराक्रमी खरे की नाही?"

"त्यांना ही विद्या फार चांगलीच साधली आहे!"

"कां न साधेल? स्टेशनावर प्लॅटफॉर्म तिकिटं देणारं यंत्र उभं केलेलं असतं, त्याच्या तोंडांत आणेली टाकली की तिकीट तयार! तशीं हीं न्यायकोर्टें. फिर्याद दाखल करून प्रोसेस फी भरली की समन्स–नोटीस निघालीच पाहिजे!"

"पण साध्या पक्षकाराला जसं समन्स जातं तसंच शंकराचार्यांना व गांधीजींनाहि! हा काय न्यायकोर्टाचा न्याय झाला?"

"नाही. तेवढं मात्र नाही. शंकराचार्यांना जाणारीं समन्सं रेशमी पिशव्यांतून व गांधीजींना खादीच्या पिशवींतून जावीं असं ठरलं आहे."

"बरं, या दिवशीं दावा तरी कोणाचा, कोणावर व कशाकरिता हें अजून सांगितलं नाहीत?"

"दावे उलट सुलट अनेक आहेत. कांही 'डिक्लरेशन'चे म्हणजे हक्कशाबितीचे आहेत, कांही नुकसानभरपाईचे आहेत, कांही इन्जंक्शनचे आहेत. मुख्य दावा वरिष्ठ कायदे–कौन्सिलला मंदिरप्रवेशबिलाची चर्चा करण्याला प्रतिबंध करविण्याचा आहे."

"आणि डॉ. केतकरांचाहि दावा याच दिवशीं असेल तर बरं नव्हे काय? कारण तो म्हणे पार्लमेंटला हिंदुस्थानावर मुळीं राज्य करण्याचा अधिकारच नाही असं ठरविण्याचा आहे म्हणतात! तो जिंकला गेला तर काय बहार होईल! एका हुकूमनाम्याच्या कागदावर सह्या झाल्याबरोबर सगळं स्वराज्य–स्वातंत्र्य तुमच्या आमच्या पदरांत पडेल! चळवळ नको, कांही नको. कसे पण सरकारचे दांत सरकारच्याच घशांत! कोणा कायदेपंडिताच्या बापाला तरी आजवर असली युक्ति सुचली असेल काय?"

"पण अजून आणखी एक दावा शिल्लकच आहे. तो असा की, हें जग सत्य नसून मिथ्या, मायामय आहे असें ठरवून मागण्याचा."

"ठीक! पण एका वादीनं मला स्वतःला वेडा ठरवून द्या असा हक्कशाबितीचा आणलेला दावा काय, आणि जग हें मायामय आहे असं ठरवून मागणं काय, दोनहि एकच. नानासाहेब, तुम्ही उगीच मुदतीच्या आधी

प्रेन्शन घेतलं. आज तुमच्या या ख्रिस्ती मित्राच्या जागीं तुम्हीच सदर अमीन असावयाचे आणि तसे तुम्ही असतां तर मग काय हो तुमचं वैभव! शंकराचार्य, महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर हे सारे तुमच्या कोटींत तुमच्यापुढं."

"पण त्या सर्वांतहि मुख्य म्हणजे डॉ. केतकर आणि हरकारे! त्यांना विसरलांत वाटतं! छेः सगळं मुसळ केरांत!"

२० सावकाराला सुट्टी

(केसरी, ता. ७ जुलै १९३३)

नेहमीप्रमाणे भाऊसाहेब आज मजकडे गप्पा मारायला आले, ते हुश्-हुश् करीतच आले. मला वाटलें हे कोठून तरी दमून आले असावे. श्रम-निवारणाचे उसासे टाकीत असतील, म्हणून म्हणालों—

"कोठे गेला होतां आज इतके दमायला? उतारवयांत असे श्रम करणें नीट नव्हे."

"छे, आलों गेलों कुठेच नाही. वर्तमानपत्र वाचीत होतों तें खाली ठेवलें व तसाच इकडे आलों."

"वः! वर्तमानपत्रें वाचण्याने उसासा टाकण्याइतके श्रम होतात की काय?"

"कां बरं? श्रमपरिहार जसा शारीरिक तसाच तो मानसिकहि असतो. आणि दोहोंमुळे मुखांतून सारखाच उद्‌गार निघतो. दगडाचें ओझें वाहण्याचे श्रम शरीराला होतात, तसेंच कर्जाचा बोजा वाहण्याचे श्रम मनाला होतात. पण आजचें वर्तमानपत्र वाचून खात्री झाली की, आणखी कांही दिवस तरी मला कर्जाचा विचार करायला नको. तो श्रमपरिहारच नव्हे का? म्हणून तोंडाने हुश्श आलें."

"मला नाही कळला वर्तमानपत्र वाचण्याचा व कर्जतहकुबीचा संबंध."

"नाही कसा? आजच्या पत्रांत कितीतरी युरोपियन राष्ट्रांनी सावकाराला सुट्टी दिल्याची बातमी आली आहे."

" अस्सं अस्सं! अमेरिकेने या राष्ट्रांना कर्जफेडीला मुदत दिली, थकबाकी वसुलीचा हप्ता पुढे ढकलला त्याबद्दलच बोलतां ना ? "

" छे:–छे: ! असें उलटें काय बोलतां ? अमेरिकेने मुदत दिली म्हणणें हा सत्याचा अपलाप. फ्रान्सने कर्जाचा हप्ता द्यायला काढला असता तर अमेरिका थोडीच देणार होती मुदत ! अमेरिकेने ती मुदत दिली म्हणण्यापेक्षा फ्रान्सने आपल्या हाताने ती मुदत घेतली असेंच म्हटलें पाहिजे."

" पण अशी मुदत आपल्याच हाताने घेतली तरी त्यामुळे कर्जफेड फारतर लांबणीवर पडेल, कायमची टळणार नाही."

" टळणार नाही याचा अर्थ इतकाच की, कर्जाची नोंद अमेरिकेच्या हिशेबी-वहींत फ्रान्सच्या नांवें लिहिली जाईल. जाईना का ? ज्यांना कधी परतफेड नाही अशा कर्जनोंदी पुष्कळ असतात. न दिलेलीं कर्जें जशीं नोंदलीं जातात तशीं दिलेलीं, पण फिटण्याची आशा नसलेलीं."

" न दिलेलीं कर्जें हिशेबी वहींत कोण कशीं नोंदील ? "

" व: ! अनागोंदी जमाखर्च तुम्हांला माहीत नाही वाटतें ? "

" नांव ऐकलें आहे; पण त्याचा प्रकार खरोखरच मला माहीत नाही."

" अनागोंदी हा निजामशाहींतील एक जहागिरीचा गाव आहे. तेथील जहागिरदाराच्या घरच्या वहींत इंग्रज सरकारावर कोट्यवधि रुपयांचें कर्ज ' येणें बाकी ' म्हणून लिहिलेलें असतें."

" आणि त्याचा वसूल ? "

" व:, वसुलाला काय कमी ! दरसाल व्याजाचा हिशेब बरोबर आणे पै करून तो जमा म्हणून लिहावयाचा आणि फिरून तितकीच रक्कम नांवें लिहावयाची."

" 'कागदी मेळ आणि शाईचा खेळ' म्हणतात तें अगदीं बरोबर! पण कुळरुजवात कधी होते की नाही ? "

" ती कशी होणार ? या कर्जदारीचा अर्थ असा आहे की, हिंदुस्थानाचें राज्य या अनागोंदीच्या जहागिरदारांच्या पूर्वजांच्या मालकीचें आहे. ते त्यांनी इंग्रज सरकाराला वऱ्हाडाप्रमाणे वहिवाटीला दिलें आहे. त्या वहिवाटीबद्दल स्वामित्वाची दरसालची उक्ती रक्कम ठरली आहे. पण ती देण्याला इंग्रज सरकाराजवळ पैसा नाही म्हणून वहींत त्यांच्या नांवें लिहिली गेली आणि त्याचाच दरवर्षी दुबेरजीचा हिशेब वहींत लिहिला जातो."

" इंग्रज सरकाराजवळ पैसा नाही असें कसें ? "

" अनागोंदीचा जहागिरदार म्हणतो, इंग्रज सरकार आधीच कर्जबाजारी आहे. त्याला इतर सावकारांचे तगादे फार. त्यांत माझ्या तगाद्याची भर घालून त्याची अब्रू कशाला बाहेर काढूं ? समजूतदार सावकार व अब्रूदार कूळ यांचा मेळ पडला म्हणजे कूळरुजवात न करतां हिशेब बिनचूक लिहिले जातात. खऱ्या सौजन्याची रीतच ही असते की, उजव्या हाताने केलेलें सत्कृत्य डाव्या हाताला कळूं नये ! "

" अहो, हें झालें सावकाराचें सौजन्य. पण कुळाच्या सौजन्याचा काय प्रकार ? "

" प्रकार हाच की, कर्जफेड केली म्हणजे सावकाराला वहीखातें काढून लिहावें लागतें, ते श्रम वांचविणें हें सज्जन कुळाचें काम आहे. मोठमोठ्या सावकारांच्या पेढ्यांवर जाऊन पाहा. कारकून रोज लिहिणें लिहीत असतात, व मालक रोज वह्या तपाशीत असतात. कोण त्रास ! सावकार झाले म्हणून त्यांना सुट्टी नकोच काय ? 'निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स'च्या अॅक्टाने कांही ठराविक सुट्या बाजाराला दिल्या जातात. त्याचें कारण हेंच की, सावकाराला विश्रांति मिळावी. दर रविवाराला सुट्टी असते, पण ती पुरत नाही. बँका व पेढ्या यांची ही गोष्ट झाली. पण आमच्या सावकारी पद्धतींत मुळी सुट्टीच नांही, रविवार नाही, बँक हॉलिडे नाही, एकादशी नाही, अमावास्या नाही. आम्ही कुळें ज्या सुट्या देऊं तितक्याच सावकाराला मिळावयाच्या. म्हणून आम्ही त्या देतों."

" पण सावकाराला त्या मान्य असतात का ? "

" त्याला मान्य असण्यानसण्याशीं काय कारण ? अहो ! द्रव्यलालसा मोठी कठीण आहे. औषध हें गुणकारी असतें. पण रोगी तें खुषीने आनंदाने घेतो काय ? डॉक्टराला तें बळजबरीने द्यावें लागतें. आम्ही कर्जदार म्हणजे सावकाराचे डॉक्टरच म्हणा ना ! "

" हा बरा उलटा न्याय ! "

" उलटा काय म्हणून ? कांही कांही रोग्यांच्या अंगांतली रक्तसमृद्धि हेंच रोगाचें कारण असतें. अर्थात् तुंबडी लावून रक्त काढणें हाच त्यांचा रोग बरा करण्याचा उपाय. तीच गोष्ट संपन्न सावकारांची. त्यांची संपत्ति थोडी-

बहुत कमी झाल्याशिवाय त्यांचा मेद झडत नाही ! 'मेद झडोनी होय कृशोदर उठण्याबसण्या श्रम नाही' असें अण्णा किर्लोस्करांचें पदच आहे !"

"अरे वः ! सुटीवरून हळूहळू कर्ज न परत देण्यावरच घसरत चाललां की?"

"कोणतीहि गोष्ट एकदम न होतां क्रमाक्रमाने होत जावी हा सौंदर्यशास्त्राचा मुळी नियमच आहे. सुंदर रीतीने सावकाराचा मेद झडावयाचा तर तो सावकाराला सुट्या देत देतच झडला पाहिजे. रशियाला हें कांहीच कळत नाही. तो अगदी आडमुठा–धसमुसळ्या आहे. बेट्याने एक दिवस कारवा वर करून एकदम सांगून टाकलें की, मी युरोपिअन राष्ट्रांचें एक पैहि देणें लागत नाही ! ही काय संभाविती झाली ?"

"मग संभाविती प्रकार कोणता ?"

"संभाविती प्रकार म्हणजे कर्ज कबूल तर करावयाचें, तुझें कर्ज लागतों म्हणावयाचें, पण तें द्यावयाचें नाही असें मनांत ठरवून कर्जफेडीशिवाय इतर अनेक सोंगें करावयाचीं."

"तीं कशीं काय ?"

"त्यांची यादीच होईल. ती कांहीशीं अशी. हिशेब द्या म्हणावें. हिशेब दिला तर खोटा म्हणावें. हिशेब खरा ठरला तर मुदती घ्याव्या व हप्त्यांच्या रूपाने रुपयांचे कच्चे व कवड्या कराव्या. अशा रीतीने कर्ज वसूल झालेंच तर मूळ सावकार मरून जातो व तिसऱ्या पिढीला कर्जाची फेड होते. बिनवसूल झालेल्या हुकुमनाम्यांचे तर डोंगर भरतील. ही रीत झाली अप्रबुद्ध महाराष्ट्रांतील डे. अॅ. रि. आक्टानें सोकावलेल्या शेतकऱ्यांची ! पण सुधारलेल्या युरोपियन राष्ट्रांकडे पाहा ! रशिया म्हणाला, खुद्द झारच जर आम्ही पदच्युत करून जिवें मारिला तर त्याने केलेलें कर्ज आम्ही देतों होय ? ज्या कर्जाला राष्ट्राची संमति नव्हती तें कर्ज राष्ट्राने कां द्यावें ? रशियाने ही तक्रार नुसती सांगितली नव्हे तर अमलांतहि आणली !"

"पण रशियाला अप्रामाणिक म्हणून नांवें ठेवणारांनी काय केलें ?"

"अगदी सोज्ज्वळ केलें. प्रामाणिकपणाची, डोळ्याला न दिसण्याइतकी बारीक तार खेंचली ! फ्रान्सचा प्रामाणिकपणा कांही न बोलतां गप्प बसण्यांत आहे. लहानसान युरोपियन राष्ट्रांनी कुळंगी कुत्र्यांप्रमाणे कुय् कुय् करून केविलपणा दाखवून वेळ मारून नेली."

" पण इंग्लंड तरी प्रामाणिक ना ! हिंदी राष्ट्रीय सभेसारखा म्हणजे कर्जें नाकबूल करण्याचा प्रकार त्याने अमेरिकेशीं केला नसेल."

" इंग्लंडाचीं कर्जें आणि हिंदुस्थानाचीं कर्जें यांचा प्रकार एक नाहीच मुळी. हिंदुस्थानाला स्वराज्य मिळून मग त्या स्वतंत्र हिंदी सरकारने इंग्लंडाच्या कर्जांत वांधा काढला तर पुढची गोष्ट. पण राष्ट्रीय सभेने मुळी कर्जें नाकबूल केलीं कोठे ? फक्त शेतकरी जसा सावकाराला कर्जांचा हिशेब हक्काने मागतो, तसाच कॉंग्रेसने हिशेब मागण्याचा सवाल टाकला. कारण हिंदुस्थानाला जिंकण्याकरिता झालेला खर्चहि हिंदुस्थानाच्याच डोक्यावर ! हिंदुस्थानावर विविध जुलूम करण्याचा खर्चहि त्याच्याच डोक्यावर ! "

" ठीकच आहे. ज्याला गोळी घालून ठार मारावयाचें ठरलें त्याला पुरण्याचा खड्डा आधी त्याच्याच हाताने काढवीत असतात. तो खर्च गोळी घालणाराने निष्कारण कां करावा ? बरें, इंग्लंडाचें सांगायचें तुमचें राहिलेंच ! "

" होय. इंग्लंड प्रामाणिक !! फक्त त्याच्या कांही तक्रारी आहेत. १ अमेरिकेने कर्ज दिलें त्यांतलें कांही इंग्लंडाने इतर युरोपियन राष्ट्रांना दिलें. अर्थात् कर्ज फिटलेंच. २ इंग्लंड व अमेरिका एकाच युद्धांत एकाच शत्रूविरुद्ध लढलीं. मग द्विधाभाव राहिला कोठे ? दरोडेखोरांविरुद्ध गावकरी मिळून लढूं लागले असतां एकाच्या हातीं दगड आला तो त्याने फेकला. दुसऱ्याच्या हातीं घरचें भांडें लागलें तें त्याने फेकलें. म्हणून दगड आणि भांडें यांच्या किंमतींतलें अंतर कोणी मागतो व कोणी देतो घेतो असें होतें काय ? ३ अमेरिकेने कर्ज दिलें तें मुळी रोख पैशांत दिलेंच नाही. तर युद्धोपयोगी सामानाच्या रूपाने दिलें ! झालें तर ! तें सामान युद्धांत खर्च झालें. मग देणें घेणें काय उरलें ? ४ हें सामान दिलें म्हणजे तरी घरची अडगळच विकली की नाही ? ५ विक्रीची किंमत तरी किती जबर लावली ! युद्ध सुरू होतें तेव्हा इंग्लंडला किमतीविषयी घासाघीस करण्याला वेळ कुठे होता, म्हणून होय ? ६ शेवटची तक्रार जागतिक मंदीची ! आणि तोहि दोष अमेरिकेचाच. म्हणजे नुकसानभरपाई व कर्जफेड नसती, तर म्हणे, जागतिक मंदी तरी कां होती ? इतकें सर्व असूनहि इंग्लंड कर्ज तोंडाने कधी तरी नाकबूल करतें काय ? "

" कांही हप्तेहि भरले म्हणतात ! "

" पण ते पुढे कर्ज रद्द ठरल्यावर, उलट इंग्लंडचें अमेरिकेकडे कर्ज म्हणून इंग्लंडाने न मागितलें म्हणजे अमेरिकेने मिळविली ! "

हें सर्व झालें ! पण तुम्ही तुमच्या सावकाराशीं वागतांना यापैकीं कोणता प्रकार विशेष प्रामाणिकपणाचा म्हणून स्वीकारणार ? "

" मी या भानगडींत न पडतां फक्त 'मेरी तेरी यंव' असें म्हणणार, व वळलेली उपडी मूठ सावकारांना दाखवून त्यांना सुखाची सुटी देणार ! "

" 'मेरी तेरी यंव' हा काय नवीनच मंत्र काढलांत ? "

" इंग्रजींत ' मॉ-रि-टो-रि-य-म ' की कायसेंसें म्हणतात त्याचा तो प्रतिशब्द आहे. मॉरिटोरियम म्हणजे कर्जफेडीची मुदत कायदेशीर रीतीने लांबविणें. म्हणजे सुटी ! म्हणून मीं माझ्या सावकारांना सुटी देण्याचें ठरविलें आहे."

" पण अशी सुटी देण्याला फक्त सरकारलाच अधिकार असतो; खाजगी लोकांना नसतो."

" वः, खाजगी कर्जदारांना सत्याग्रह तर करतां येतो की नाही ? मुर्दाडपणाने जमीन धरून ठेवावयाची याचेंच नांव सत्याग्रह. वाघाने उघड्या जागेवर रेडा मारला म्हणजे तो अशीच जमीन धरून सत्याग्रह करून वाघाची फजिती करतो. वाघाला रेडा मारतां येतो; पण तो खाण्याला झाडींत ओढून नेण्याचें काम वाघाला करतां येत नाही. आणि उघड्या जागेंत वाघाला रेडा खातां येत नाही."

" वः ! हा सत्याग्रह हरिश्चंद्राच्याहि पलीकडचा झाला."

" हरिश्चंद्र वेडा ! त्याने स्वप्नांत कबूल केलेलें कर्ज जागतेपणीं स्वतःला विकून फेडलें. आम्ही म्हणजे मी व इंग्लंड व आमच्याबरोबरचीं युरोपियन राष्ट्रें– यांनी जीव जगण्याला जागतेपणीं कर्जें काढलीं तीं स्वप्नांतहि फेडणार नाही. आणि कर्जें बुडालीं म्हणून सावकारालाच स्वतःस विकून घेण्याची पाळी आणूं. बस्स ! तें कांही नाही ! सावकाराला सुटी !

२१ गलबलाचार्यांचें आश्रम-परिवर्तन

(सह्याद्रि, ऑगस्ट १९३६)

नवलपुरांतला माझा मित्र श्रीमान् गलबलाचार्य हा कट्टा वीर वैष्णव. जितका कर्मठ तितकाच तामसी. कर्मठ इतका की, सोवळ्यांत लागणारा विस्तव धुवून घेईल! आणि तामसी इतका की, आपल्या किंवा इतरांच्या हातून चूक झाली तर रागाच्या भरांत एका दिवसांत दहा वेळ देहान्त प्रायश्चित्त घ्यावयाला निघेल. आता एकच जीव दहा वेळां जात नाही ही गोष्ट निराळी! किंबहुना सर्व जन्म चुकांत जाऊन जीव मात्र एकदाहि गेला नाही. पण याचें कारण इतकेंच की, त्याला स्वतःच्या जिवाची किंमत नसली तरी, इतरांना तो इतका मौल्यवान् वाटे की, ते त्याकरिता काय वाटेल तें करतील, पण त्याचा त्रागा शेवटास जाऊं द्यायचे नाहींत; आणि हा यमधर्म दस्तुरीच्या चौकीदारासारखाच हट्टाला पेटल्यास, फार तर लाक्षणिक अर्थानें इतर कोणाला बळी देऊन प्रसंग मारून नेतील. गलबलाचार्यांचे हे दोनहि गुण किंवा दोष त्यांनाच काय पण इतरांनाहि जाचक होत, पण करायचें काय?

एक दिवस कधी नव्हे तो असा प्रकार झाला. आचार्यांचा नित्यक्रम हा की, संध्याकाळीं अग्निहोत्रावर शेकण्याची समिध त्यांच्या कुटुंबानें आणून हातावर द्यायची, आणि मग तिनें हाताला हात लावून त्यांनी स्वाहाकार करायचा. बायको डोळ्यांसमोर क्षणभर नसली तर त्यांना चुकल्या–चुकल्यासारखें व्हायचें. पत्नी ही धर्मदृष्ट्या सहकारिणी, अर्धांगी, याचा आधार त्यांनी बाइलवेडाला पुरा घेतला होता. पण आज कुटुंबाच्या वडिलांची प्रकृति अगदी एकाएकी बिघडली, म्हणून तिला एकदम माहेरीं जावें लागलें. ती पतिराजांचा निरोप घेण्याला गेली तों हे राजश्री न्हाणीघरांत दार लावून घेऊन स्नान करीत होते, व तोंडानें इतक्या मोठ्यानें विष्णुसहस्रनाम म्हणत होते की, बाहेर कोणी शंख केला असता तरी, तो त्यांना ऐकूं गेला नसता. तिनें दाराशीं डोकावून 'जाऊन येतें बरं का' असें म्हणून निरोपहि घेतला; आणि तो ऐकूं न च गेला तर दुसरा कोणी मागाहून सांगेल अशा समजुतीनें ती गाडी करून माहेरीं निघून गेली.

आचार्यांचें स्नान झालें, संध्या झाली, ब्रह्मकर्म झालें, आणि संध्याकाळ झाली असें पाहून अग्नींत टाकण्याची समिध बायको नेहमीप्रमाणे आणून देणार या समजुतीने ते हात पसरून बसले. पांच मिनिटें झालीं, सहा झालीं, पण समिध हातांत पडेना. तेव्हा त्यांनी कुटुंबाला हाका मारण्याला सुरुवात केली; पण ओ कोठून मिळणार? झालें. आचार्य खवळले. ज्या तोंडांतून विष्णुसहस्रनाम यावयाचें त्यातून अभद्र गालिप्रदान सुरू झालें. आधी कांही दिवस कांही इतर कारणांवरून कुटुंबाशीं कुरबुर झाली होती ती त्यांना आठवली. मनांत वैतागाने कहर केला. त्यांनी कशीबशी अग्निपूजा समाप्त केली आणि आता कुटुंबाला काय शिक्षा करावी हा विचार करूं लागले. असला विचार सुचायला कितीसा उशीर लागणार? विवाहित स्त्रीला मोठ्यांत मोठी शिक्षा वैधव्याची.

पण आजवर आपणाला कोणी सुखाने मरूं दिलें नाही ते आता तरी कसे मरूं देणार? हें ध्यानांत येऊन त्यांनी विचार केला की, या जन्मीं पत्नीला वैधव्याखालोखाल मोठ्यांत मोठी शिक्षा तिला न विचारतां नवऱ्याने संन्यास घेण्याची! स्वतः आचार्य गृहस्थाश्रमाच्या जबाबदाऱ्या संभाळायला, म्हणजे पत्नीबरोबर संसार करायला, आणखी पांचसात वर्षें चांगले लायक होते. परंतु स्वार्थत्यागाशिवाय क्रोधाग्नि कसा शमणार? म्हणून त्यांनी त्याच वेळीं जानवें तोडून टाकलें, लंगोटी घातली, अग्निहोत्राच्या कुंडांतलीच राखेची चिमूट घेऊन कपाळाला लावली, आणि आत्मगुरु होऊन आपली आपण दीक्षा घेऊन मोठ्यामोठ्याने 'नारायण नारायण' असा गजर करण्यास सुरुवात केली. घरची–बाहेरची मंडळी येऊन हा कोण संन्यासी आला असा पूसतपास करूं लागली, तों स्वतः गलबलाचार्यच स्वामी झालेले!

कोणाला कांहीच तर्क होईना. कोणी असें काय झालें, असें कां केलें, असें कां हो करतां, असें विचारलें तर 'नारायण नारायण' इतकेंच म्हणून मोघम उत्तर देत. रात्रीं आचार्यांच्या श्वशुरांची प्रकृति थोडी बरी झाली आणि दुसऱ्या दिवशीं घरचा निरोप गेल्यामुळे त्यांची स्त्री घरीं परत आली अन् पाहते तों हा गोंधळ! पण तीच बिचारी नवऱ्यापेक्षा अधिक सुज्ञ व विचारी ठरली. तिने जास्त कमी कांही न बोलतां पतीला स्वामी म्हणून नमस्कार केला, आणि भरलेल्या घराला मठाचें रूप कसें अधिकांत अधिक येईल याची 'विधायक' योजना चालविली. ती म्हणे, "पतीची आज्ञा मला शिरसावंद्य

असली पाहिजे म्हणून मी हें करतें." लोक म्हणाले, "घराचा मठ न बनवील तर काय करील? 'मूर्खे छंदानुरोधेन' असें वचनच आहे!"

बिचारीने पहिलें काम हें केलें की, कापडांचीं चार ठाणें आणवून त्यांना भगवा रंग देऊन घरांतल्या सर्व मौल्यवान लांकडी बिलोरी वस्तूंना भगवे अभ्रे चढविले. स्वतःच्या अंगावरचे सर्व दागिने उतरून लोखंडी पेटींत भरून ठेवले. कोणी म्हणाले, 'कशाला ठेवतां ते आतां उगीच नसत्या आठवणीला? त्यांचे कमंडलु आणि पेले करून स्वामींना वापरायला द्या. वरून फक्त राखेने ते सारवीत जा म्हणजे झालें!" बाई म्हणाली, "मला म्हणजे दागिन्यांची हौस आहे असा अर्थ नाही. पण तामसी माणसांचा हा गुण असतो की, त्यांना विनाकारण उपरति येते, तसाच मागाहून पश्चात्तापहि होण्याचा संभव असतो. पतिराज विद्वान् आहेत हें तुम्ही जाणतांच. पण समजा, उद्या कोणी त्यांना शास्त्रांतला एखादा आधार काढून दाखविल्याने त्यांनी संन्यासाश्रम टाकून दिला आणि गृहस्थाश्रमाची दीक्षा घेतली, तर मला त्यांच्यापुढे पूर्वीच्या सालंकृत रीतीने म्हणजे त्यांना पूर्वी आवडत असलेला सगळा शृंगार घालून, हाक मारल्याबरोबर उभं राहिलं पाहिजे ना! घेईनात का आज संन्यास. पण मनांतून अगदी प्रेमळ आहेत बरं का? आता स्वभाव उतावळा आहे थोडासा; पण माणसांत सगळे का सद्गुण एकत्र असतात? त्यांचं मन पालटायला, उपरतीच्या जागीं रतिभाव यायला, कदाचित् एक दिवसहि लागणार नाही. पण माझे सगळे दागिने एक दिवसांत करून देणारा कोणता सोनार भेटणार! पडून राहूं देत दृष्टिआड लोखंडी पेटींत हे दागिने. त्याचाहि एक दिवस येईल. अहो, तामसी लोकांचं वैराग्य टिकाऊ का असतं? आणि खरं म्हणाल तर त्यांचा उतावळा तामसी स्वभाव हीच तर मला पुढं मागं माझं सुप्त सौभाग्य परत मिळण्याला आशेची जागा आहे.

* * *

असो, घराचा मठ बनविल्याचें वर सांगितलेंच. घर व मठ यांच्या दरम्यान एक पक्की भिंतच घातली. फक्त या भिंतींत एक दरवाजा ठेवण्यांत आला. प्रथम दिवशीं स्वामी या नात्याने आचार्यांना नमस्कार केल्यावर त्यांच्या कुटुंबाने (बाईचें नांव हौसाबाई असें होतें) स्वामींच्या पुढे येण्याचें बंद केलें. फक्त स्वामींच्या सर्व नित्यक्रमाची व्यवस्था बाईनी ब्राह्मण नोकरचाकरांमार्फत सुरू केली. तसें पाहिलें तर आचार्यांना घरचें असें कांहीच कमी

नव्हतें, समृद्धि होती. यामुळे हौसाबाईला लोकांच्या तोंडाकडे पाहण्याचें कांहीच कारण नव्हतें. आणि त्यांतूनहि आचार्यांनी संन्यास घेतल्यामुळे बाईविषयी वैष्णव सांप्रदायी समाजाची सहानुभूति असल्यामुळे त्यांनी मागितल्यावर त्यांना सर्व कांही मिळेच, पण न सांगितलें असतांहि लोक आपण होऊन देत.

आचार्य गृहस्थाश्रमी असतां त्यांचा मुख्य धार्मिक व्यवसाय स्मार्ताग्नि संभाळण्याचा. पण संन्याशाला अग्निहोत्र चालवितां येत नाही, तो गृहस्थाश्रमी माणसाचाच अधिकार, आणि आचार्यांचा तर गृहस्थाश्रम सुटला. शिवाय गृहस्थाश्रमांत ज्या ख्यालीखुशालीच्या गोष्टी करतां येत होत्या त्याहि त्यांच्या आता अंतरल्या. पठण-पाठण व मनन या प्रकारचें विद्वद्व्यासंग त्यांना नव्हते. ते नुसते कर्मठ ब्राह्मण. यामुळे गलबलाचार्यांना चिंता पडली की, आतां वेळ कसा जावा? पूर्वाश्रमीं हौसाबाईशीं बोलण्याचालण्यांत त्यांचा पुष्कळ वेळ जाई. ते पत्नीच्या सहवासाचे मोठे भोक्ते. घरीं बरोबरीचा भाऊ, मुलगा कोणी नाही. यामुळे कोणताहि व्यवहार उभयतांच्या विचारविनिमयाने व्हावयाचा. तात्पर्य, पतिपत्नींचा सहवास फार, सहवासामुळे प्रेम फार, प्रेमामुळे भावनेची तीव्रता फार, आणि या तीव्रतेमुळे सहवासाची अपेक्षा फसल्यास येणारा रागहि फार. यामुळेच चमत्कार घडला तो असा की, हातावर समीध टाकायला बायको समोर आली असती, तर तिजकडे प्रेमाने पाहून हसून तिच्या हस्तस्पर्शाचें सुख अनुभवीत जे आचार्य स्मार्ताग्नीची पूजा करावयाचे, तेच पत्नी शेजारीं असण्याच्या अपेक्षेचा भंग झाल्याबरोबर वैतागून संन्यासाला उठले, म्हणजे पत्नीच्या कायमच्या वियोगाला सिद्ध झाले. अर्थात् हा सर्व उतावळेपणाचा परिणाम.

हौसाबाईला किती वाईट वाटलें असेल हें सांगायलाच नको. पण आपणाकडे खरी चूक कांही नसतां, आपणावर इतर कोणी अन्यायाने रागावला अशी खात्री झाली म्हणजे, मनुष्याला सात्त्विक प्रतिक्रिया म्हणून उलटा राग येतो, आणि आत्मसमर्थनाचा खंबीरपणा त्याच्या अंगीं भरतो. हौसाबाईचें तसेंच झालें. म्हणून एरवी ती कांही तरी निमित्त काढून पति–स्वामीपुढे जायची ती सबंध आठ दिवस गेली नाही; मात्र दुरून स्वामीमहाराजांची सर्व व्यवस्था उत्तम ठेवीत होती. यति म्हणून धार्मिक भावनेचा जिव्हाळा आणि नवरा म्हणून प्रेमाचा जिव्हाळा असे दोन जिव्हाळे येथे एकत्र झाले होते.

आठ दिवस गेले तरी, बायको समोर आली नाही असें पाहून गलबला-चार्यांच्या मनांत गलबल सुरू झाली. पण बायकोला प्रत्यक्ष निरोप पाठवून बोलावून घेण्याचें धैर्य त्यांना झालें नाही. ते आपल्या व्यवस्थेत दोष काढून हें नीट करायला सांगा असें मोघम बोलत. पण हौसाबाईने तिकडे लक्ष दिलें नाही.

कांही दिवसांनी हौसाबाईचा भाऊ भीमाचार्य श्रीक्षेत्र काशीहून नवल-पूरला आला. घरीं पाहतो तों बहीण खिन्नवदन होऊन बसलेली! तेव्हा त्याने तिला सर्व हकीकत विचारली. त्यावरून त्याला असें दिसून आलें की, गलबलाचार्यांनी संन्यास घेतला तो खऱ्या मनाने नाही. तो सर्व त्यांच्या हातून अविचार झाला. तो म्हणाला, "काय ग ताई, आचार्यांना जर मी पुन्हा गृहस्थाश्रमांत घेण्याचा कांही मार्ग काढला तर त्यांना कसें काय आवडेल? ते दार उघडलेलें पाहून परत आंत येतील, की आहेत तसेच संन्यासी राहण्याचा आग्रह धरतील?"

हौसाबाईने कानोसा घेतला अन् आसपास कोणी नाही असें पाहून म्हणाली, "भाऊ, माझ्या तोंडानेच कशाला वदवतोस? त्यांचा स्वभाव तुला माहीतच आहे. पुन्हा ते गृहस्थाश्रमांत मनाने एका पायावर चालत येतील. पण जनलज्जा आहे ना! शिवाय आश्रम बदलणें हा अधर्म होतो ना!"

भीमाचार्य म्हणाला, "वेडी कुठची? कसला धर्म अन् अधर्म घेऊन बस-लीस? आचार्यांनी वैतागाने तामसीपणाने संन्यास घेतला हाच मुळांत अधर्म झाला. म्हणून तो दुरुस्त करणें हाच खरा धर्म होईल. आता या नाचरेपणाला लोक नांवें ठेवतील हें खरें, पण आजहि काय थोडी ठेवीत आहेत? आणि त्यांतूनहि जेव्हा आचार्यांच्या हातून संन्यासधर्म नीट पाळला जात नाही असें होईल, तेव्हा लोक आणखी नांवें ठेवतील. एकदाच आश्रमपरिवर्तनाचा जो काय दोष घ्यावयाचा तो त्यांनी घ्यावा. म्हणजे यापुढे होणारी त्या यति-धर्माची विटंबना तरी टळेल आणि या बिचाऱ्याचा भावी आयुष्यक्रम तरी सुखाचा होईल. बसेल अग्निहोत्राचा विधि करीत पूर्वीसारखा. तें पुण्य होईल तितकेंच आपलें म्हणावें. उगीच स्वभावाविरुद्ध वर्तन करून आत्मवंचना अन् परवंचना यांचें पातक कां जोडावें?"

"पण हें होणार कसें?" नवलपूरचे शास्त्री-पंडित हें मान्य करतील का?"

"झट मान्य करतील. मी महामहोपाध्याय आहें. म्हणून धर्मशास्त्राचें खरें रहस्य मी जाणतों हें त्यांना कबूल करावेंच लागेल. येथले शास्त्री काय त्यांना इंग्रजी पदवी नाही की, त्यांनी संस्कृत विद्यापीठाच्या परीक्षा दिलेल्यों नाहीत. त्यांनी वाद आरंभला तर मी त्यांची फजिती करून सोडीन तेव्हाच कोट्या प्रतिकोट्या करून. मी परिवर्तनवादी आहे पण तत्त्वनिष्ठ आहें हें मी त्यांना सहज पटवून देईन. ज्ञानेश्वराच्या बापाने नाही का काशी-च्याच शास्त्र्यांच्या संमतीने यतिधर्म टाकून गृहस्थाश्रम फिरून स्वीकारला? तें जर पाप असतें तर तें परिवर्तन ईश्वराघरीं कसें रुजू झालें असतें? निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई अशीं मुलें त्या परिवर्तनानंतर झालीं तीं अशीं भगवद्भक्तसंतमालिकेंत बसण्यासारखीं कशीं निपजलीं असतीं? तें कांही नाही. सर्व कांही मला समजलें आहे. लागतों मी त्या उद्योगाला. तूं अगदी काळजी करूं नको."

महामहोपाध्याय भीमाचार्य नवलपुराला घरीं परत आले. त्यांना मिळालेल्या महामहोपाध्यायाच्या पदवींत आपल्या गांवचे आपण शास्त्री-पंडित सहजच अंशभागी होतों म्हणून त्यांचा सन्मान केला तर पर्यायाने तो आपलाच होतो, या स्वार्थी भावनेने या शास्त्री-पंडितांनी सभा भरवून भीमाचार्यांचा सत्कार करून त्यांना शालजोडी बक्षीस दिली. या समारंभांत त्यांनी आश्रम-धर्म हा विषय व्याख्यानाला घेतला. त्यांत गृहस्थाश्रमाची फार फार स्तुति केली. संन्यासाचा केवळ सोपेपणा व गौणपणाच नव्हे तर गृहस्थाश्रम आचरण्याचाच कठीणपणा श्रोतृवर्गाला समजावून सांगितला. जातां जातां असेंहि सुचविलें की, कोणी अविचाराने संन्यास घेतला तर तो संन्यासच नव्हे. त्याची इच्छा असल्यास त्याला आश्रमांतर करण्याची परवानगी धर्मशास्त्रांत दिली आहे. अशा प्रकारचें व्याख्यान देण्यांत भीमाचार्यांच्या पोटांतले पाय सामान्य लोकांना वर दिसून आले नाहीत. पण जाणत्यांनी ओळखावयाचें तें ओळखलेंच.

इतकी पूर्वतयारी करून मगच भीमाचार्यांनी आपल्या मेहुण्याची गांठ घेतली. मेहुण्याने नमस्कार केला तेव्हा गलबलाचार्यांनी मोठ्या कष्टाने 'नारा-यण नारायण असें म्हटलें. त्याला भीति वाटत होती, की तोंडाने नारायण म्हणून आपण संन्यास घेतल्याची कबुली मेहुण्याला दिली, की संन्यासावर शिक्काच बसला; आणि तोहि एका महामहोपाध्यायापुढे. पण न म्हणून तरी करतो काय? मात्र यापुढचें संभाषण सर्व एकांतांत झाल्याने गलबलाचार्यांने

संन्यास घेण्यांत झालेला आपला अविचार कबूल केला, आणि खिन्नवदन होऊन हातांतील स्मरणीचे मणी तो ओढूं लागला. त्याचें धर्मशास्त्राचें ज्ञान शून्य असल्यामुळे आश्रमपरिवर्तन शक्य असेल ही कल्पनादेखील त्याला नव्हती. आता संन्यासदुःखांत पिचतच आपणाला पुढचा सर्व जन्म काढला पाहिजे असें वाटून त्याला फार दुःख होऊं लागलें.

लगेच घरीं येऊन भीमाचार्यांनी श्रीजगद्गुरु शंकराचार्यांकडे रीतसर फिर्याद दाखल केली. तिच्यांतील कलमांची गोळाबेरीज खाली लिहिल्याप्रमाणेः—

"आजकाल धर्माचाराचा लोप इतर अनेक रीतींनी सुधारकांच्या मतप्रसारामुळे होत आहेच. पण भरींत भर म्हणूनच की काय, उलट्या दिशेनेहि धर्मावर घाले पडत आहेत. आपल्या स्मृतिग्रंथांतून आश्रमधर्माचें वर्णन स्पष्ट केलेलें आहे; परंतु त्यांत सांगितलेल्या यतिधर्माच्या बहुतेक सर्व आश्रमनियमांचें उल्लंघन करून नवलपुरांतील प्रसिद्ध वैष्णव गलबलाचार्य यांनी एकदम गृहस्थाश्रमांतून परातिक्रमण करून संन्यासाश्रम घेतला! असें करतांना त्यांनी संन्यासाश्रमाचे इतरहि नियम कांही मोडले आहेत. हा धार्मिक अत्याचार श्रींच्या अधिकारक्षेत्रांतील नवलपूरसारख्या लोकप्रसिद्ध गांवीं घडल्यामुळे श्रींनी आपल्या पीठाचे वरिष्ठ अधिकारी तिकडे पाठवून नवलपुरांतील ग्रामाधिकाऱ्याच्या साहाय्याने रीतसर चौकशी करून अपराध्याला योग्य ती शिक्षा करावी. नवलपुरांतील जनतेला व एकंदरीने हिंदु आश्रमधर्माला योग्य तो न्याय द्यावा. ही माझी फिर्याद श्रींच्या शिष्यवर्गाचा एक प्रतिनिधि या नात्याने मी प्रविष्ठ करीत आहे. फिर्यादी या नात्याने माझी प्रत्यक्ष मागणी व विनंति अशी की, गलबलाचार्य यांना संन्यासाश्रमधर्माच्या त्यागाची शिक्षा देऊन फिरून गृहस्थाश्रम घेण्याची आज्ञा करावी. आणि स्मृतिग्रंथांत अशा अत्याचाराला जीं योग्य प्रायश्चित्तें सांगितलीं असतील तीं त्यांजकडून करवून घेण्याविषयी मला व ग्रामस्थ धर्माधिकाऱ्यांना अधिकार द्यावा."

श्रींच्या कार्यालयांत ही फिर्याद येतांच मोठी गडबड उडाली. श्रींना दुहेरी चिंता उत्पन्न झाली ती अशी—स्मृतिधर्माप्रमाणे गलबलाचार्यांचा संन्यास हा अपराध म्हणजे पातक ठरेल, तर त्याला आश्रमपरिवर्तनाची शिक्षा न सांगणें हा अधर्म होईल. बरें, तसें करावें तर आद्य श्रीशंकराचार्यप्रणीत संन्यासपक्षपाताला कमीपणा येऊन आयता एक संन्यासी सांप्रदायाला लाभला तो परत

गृहस्थाश्रमांत घालावा लागतो. जाळ्यांत आलेला मासा कोणी परत तळ्यांत टाकील काय ?

तथापि फिर्याद आली तेव्हा तिची चौकशी करणें प्राप्त म्हणून तशा अर्थाचें आज्ञापत्र निघालें. श्रींचे अधिकारी नवलपुरास येऊन त्यांनी ग्रामस्थ अधिकाऱ्यांच्या साहाय्यानें न्यायमंडळ नेमलें, व त्यापुढे समक्ष येण्याविषयी गलबलाचार्यांना आज्ञा केली. तींत म्हटलें होतें की, "कोणी संन्यासी झाला तरी तो धर्मगुरूच्या अधिकारकक्षेंतून मुक्त होऊं शकत नाही. म्हणून न्याय-मंडळापुढे न येण्याविषयी कोणतेंहि कारण इकडून मान्य करण्यांत येणार नाही."

त्याप्रमाणे न्यायमंडळाची सभा भरली. तिजपुढे आचार्य आले. हें प्रकरण लोकांतील चर्चेचा विषय होऊन राहिलेला असल्यामुळे न्यायमंडळाच्या आवारांत सहजच लोकसमुदाय मोठा जमला होता. त्यापुढून गलबलाचार्य हे यतिवेषधारी असे जाऊं लागले तेव्हा, संभावितपणा संभाळतां न आलेले अनेक लोक तोंडाला पदर लावून हसूं लागले. कारण आचार्यांचा यतिवेष मुळीच बरोबर सजला नव्हता. त्यांचे नवशिके पाय खडावांवरून मधून मधून घसरत. त्यांनी एक भगवें फडकें हातांतील त्रिदंडाला बांधलें होतें. तें मधोमध बांधावें तें न बांधतां वरच्या टोकाला निशाणसारखें फडकत ठेवलें होतें ! आचार्यांचा जुना वेष व चरित्र लोकांच्या पुऱ्या ओळखीचें असल्यामुळे केवळ कौतुकानेच कांही लोक हसत होते. त्यांना हें यतिवेषाचें सोंग प्रथमच पाहून मोठी मौज वाटली. कांही म्हणाले, "अहो, आमची अशी कल्पना होती की, एकदा मनुष्य परमहंस झाला म्हणजे तरी त्याला पूर्ण स्वातंत्र्य लाभतें. पण येथे पाहावें तों यतियतींमध्ये देखील अधिकारभेद दिसतोच की ! कारण एका वरिष्ठ म्हणविणाऱ्या यतीने आज्ञापत्र काढून नेमलेल्या न्यायमंडळापुढे, दुसऱ्या यतीला नाक धरून आपल्यावरील आरोपांचें उत्तर देण्याला जावें लागतें. मिळून परब्रह्मस्वरूपीं लीन झालेल्यांतहि हा श्रेष्ठ कनिष्ठभाव शिल्लक उरतोच म्हणावयाचा ! यांत श्रेष्ठपणा गाजविण्याची बुद्धि होणाऱ्या शंकराचार्यांची वृत्ति स्वाभाविक म्हणतां येईल. पण स्वामी गलबलाचार्य यांनी जर हें आज्ञा-पत्र मानलें नसतें तर त्यांचें कोण काय करणार होतें ? ग्रामण्याचा धाक त्यांना काय होता ? आणि संन्याशावर बहिष्कार तो कसला पडणार ? पतितालाहि जर भिक्षा वाढतात तर दाराशीं आलेल्या स्वामीला ती कोणीहि वाढील !

प्रत्यक्ष संन्यासांतहि जर स्वातंत्र्य नाही तर मग तें मिळणार तरी कोठे ? मग हा कांही एखादा कपटाचा खेळ तर नव्हे ना ?" अशा नाजुक शंकेंत तर्क-वितर्कांचें पर्यवसान झालें.

असो. आचार्य न्यायमंडळापुढे आल्यावर न्यायाधिकाऱ्यांनीहि स्वतः उठून स्वामींना नमस्कार करून बसावयास आसन दाखविलें. नंतर अभियोगी भीमाचार्य यांना गलबलाचार्यांना प्रश्न विचारण्याची व स्वामींना उत्तरें देण्याची सूचना करण्यांत आली. हीं प्रश्नोत्तरें झाल्यावर भीमाचार्यांनी आपल्या वादीपक्षाचा समारोप खालीलप्रमाणे सादर केला:—

"गृहस्थाश्रम हा सर्वश्रेष्ठ आश्रम आहे ही गोष्ट खुद्द स्मृतीवरून सिद्ध होते."

एते गृहस्थप्रभवाः चत्वारः पृथगाश्रमाः
सर्वेषामपि चैतेषां वेदस्मृतिविधानतः
गृहस्थ उच्यते श्रेष्ठः स त्रीनेतान् बिभर्ति हि
यथा नदीनदाः सर्वे सागरे यांति संस्थितिम्
तथैवाश्रमिणः सर्वे गृहस्थे यांति संस्थितिम्

आता कोणा एखाद्या गृहस्थास यतिधर्माचा स्वीकार करणें योग्य वाटलें तरी त्याला हरकत असूं नये. ती ज्याच्या त्याच्या इच्छेची गोष्ट आहे असें मानावें हें योग्यच आहे. तथापि आश्रमान्तर करण्याचेंहि जे नियम स्मृतिग्रंथांत सांगितले आहेत त्यांचें उल्लंघन झाल्यास अधर्म घडतो असें म्हणावें लागतें व तेंच प्रस्तुत प्रकरणीं घडलें असें मी म्हणतों. मनुस्मृतीच्या सहाव्या अध्यायांत असें सांगितलें आहे की आयुष्याचा तिसरा भाग वनवासांत म्हणजे वानप्रस्थाश्रमांत घालवून चौथ्या भागांत सर्वसंगपरित्याग करावा व संन्यासव्रत आचरावें. त्याप्रमाणे गलबलाचार्यांचें वय लक्षांत घेतां ते अद्यापि चवथ्या भागांत प्रविष्ट झालेले नाहीत. त्यांचें वय अवघें ३५-४०च्या आंतील आहे. म्हणजे गृहस्थाश्रमाचा तो माध्यान्ह काल म्हणावा. वानप्रस्थाश्रम हा तिसरा भाग होतो. त्यांत गलबलाचार्यांनी अद्यापि प्रवेश केला नव्हता. मनुष्याचें आयुष्यमान 'शतायुर्वै पुरुषः' या श्रुतिवचनाप्रमाणे १०० धरलें तर वानप्रस्थाश्रमाला प्रारंभ ६० व्या वर्षीं होतो. शिवाय गलबलाचार्यांना अकालींच वैराग्य प्राप्त झालें म्हणावें तर त्यांची विषयासक्ति निःशेष नाश पावली असेंहि म्हणतां

येत नाही. कारण पत्नी सायंहोमाची समिध हातीं देण्यास जवळ नाही एवढ्यानें त्यांना राग आला व ती न सांगतां माहेरीं गेली, यामुळे तो राग परमावधीला जाऊन त्यांनी जानवें तोडलें! त्यांच्या अकाल वैराग्याचा इतर पुरावा कांहीच नाही. अविचार हेंच त्यांच्या संन्यासाचें कारण आहे. स्मृतींत सांगितल्याप्रमाणे आचार्यांनी तीन वैदिक ऋणें फेडलेलीं नाहीत. विशेषतः पुत्रोत्पत्तीने फेडण्याचें पितृऋण त्यानी फेडलेलें नाही. पुत्रप्राप्तीविषयी त्यांची निराशा झाल्याचा पुरावा नाही. ती होती तर ते कदाचित् दत्तक घेते. मनुस्मृतींत स्पष्ट सांगितलें आहे की—

'पुत्रांश्च उत्पाद्य धर्मतः मोक्षे निवेशयेत् ।
अनुत्पाद्य तथा सुतान् मोक्षमिच्छन् व्रजत्यधः ॥'

एथपर्यंत धर्मवचनाची मजल गेली आहे. तसेंच मनुष्याने प्राजापत्य इष्टि करून तिजमध्ये सर्वस्वाची दक्षणा देऊन आत्म्यामध्ये अग्नीचा समारोप करून चतुर्थाश्रम स्वीकारावा असेंहि सांगितलें आहे. खऱ्या संन्याशाने घरांतून बाहेर पडून वनांत जावें. दंड-कमंडलूव्यतिरिक्त सर्व उपभोग्य वस्तूंचा त्याग करावा, कोणाचें साहाय्य न घेतां सर्व आत्मसेवा आपणच करावी. दुसऱ्याला अपशब्द बोलूं नये व दुसरा बोलला तरी त्यावर रागावूं नये. सुवर्णाचीं पात्रें वापरूं नयेत. भिक्षा मागून निर्वाह करावा, आदरपूर्वक मिळणाऱ्या, म्हणजेच आस्था, प्रेम इत्यादि भावनांनी कोणी भिक्षान्न वाढल्यास, त्या अन्नाचा वीट मानावा इत्यादि वचनें मनुस्मृतींत सापडतात. पण प्रस्तुत गलबलाचार्यांचें चारित्र पाहावें तर तें सर्व विपरीत आहे. ते मठ हें नांव दिलेल्या घराच्याच एका भागांत राहातात. पर्वतशिखरावरील एखाद्या राजवाड्याला पर्णकुटी हें नांव दिल्याने ती झोपडी होऊं शकत नाही, त्याचप्रमाणे मठ हें नांव दिल्याने संसारोपयोगी घराचा मठ बनत नाही. या स्वामींच्या वापरांतलीं भांडीं सोन्यारुप्याचींहि आहेत. फक्त तीं मौल्यवान दिसूं नयेत, अशीं घाणेरडीं ठेवण्यांत येतात. स्वामींना कोणते पदार्थ खाण्याची आवड आहे हें माहीत असल्यामुळे त्यांच्या पूर्वाश्रमीच्या स्वयंपाकघरांत ते तयार होऊन शेजाऱ्यांच्या घरीं आधी ठेवून देऊन, ते भिक्षेला येतांच त्यांच्या झोळींत टाकण्यांत येतात. स्वामींच्या सन्निध नोकरांचाकरांचा खडा पहाराच असतो. यामुळे स्वामींना स्वतःची म्हणून सेवा स्वतःच करण्याचा प्रसंग दिवसांतून अवश्य त्या दोनतीन वेळींच येत असेल तेवढाच. बरें, क्षमाशांतीविषयी म्हणावें तर यांनी केवळ एक वेळ अपेक्षे-

प्रमाणे बायको जवळ उभी नाही असें पाहून, संन्यास घेऊन, तिचा 'अशस्त्र वध' केला, ते नोकरांचाकरांना कितीसें क्षमाशीलतेने वागवतील? त्यांच्या 'नारायण नारायण' या शब्दांमधून आमच्यासारख्या गृहस्थांनी उच्चारूं नयेत असेहि शब्द ऐकूं येतात. अशा रीतीने गलबलाचार्य यांच्याकडून अधर्माचरण झालें आहे."

नंतर तुमचें स्वतःचें कांही म्हणणें आहे की काय असें न्यायाधीशमंडळाने गलबलाचार्यांना विचारलें. तेव्हा ते म्हणाले, 'धर्म्य व अधर्म्य हें कांही मी जाणत नाही. मीं अविचाराने संन्यास घेतला असला तरी मला तो कांही केल्या सोडावयाचा नाही. आश्रमधर्म न पाळल्याने जी लोकनिंदा होईल किंवा अधोगति मिळेल ती सोसण्यास मी तयार आहें. पण ही माझी फक्त तात्त्विक भूमिका होय.' इतकें म्हणून भीमाचार्यांकडे पाहून ते म्हणाले, 'न्यायाधिकारी श्रींकडून अखेर जो निर्णय मिळेल तो मी मान्य करीन; परंतु तो अमलांत आणीत असतां मी तत्त्वभ्रष्ट झालों नाही, मी तत्त्वाला चिकटूनच राहिलेलों आहें, होत असेल तर माझ्या हातून तपशिलांत फरक होत असेल, मी मनाने बदललों नाही व उद्या श्रींनी दिलेलें प्रायश्चित्त म्हणून मी गृहस्थाश्रम पुनः करूं लागलों तें खऱ्या मनाने नव्हे; किंबहुना इतर कोणाचें समाधान व्हावें व मजकडून परोपकार घडावा अशा बुद्धीने मी करीत राहीन. हाताने मी कांही करीत राहिलों तरी मीं मतपरिवर्तन केलें नाही अशी घोषणा व खुलासे मी जाहीर करीत जाईन, त्याला माफी असावी व त्यामुळे श्रींच्या आज्ञेचें उल्लंघन किंवा उपमर्द मजकडून होतो असें म्हणण्यांत येऊं नये.'

यानंतर न्यायमंडळापैकी एकाने प्रश्न विचारला की, 'संन्यास घेण्यापूर्वी तुम्ही पत्नीची संमति घेतली होती काय?' त्याला 'नाही' असेंच उत्तर आचार्यांना द्यावें लागलें. दुसऱ्या एकाने प्रश्न विचारला की, 'संन्यासदीक्षा तुम्हीं घेतली ती देण्याला कोणी गुरु स्वामी होता, की ती दीक्षा तुम्ही स्वतःच घेतली?' त्यावर आचार्यांनी उत्तर दिलें की, 'माझी दीक्षा मींच घेतली. जानवें जुनें झालें होतें, तें मीं आपल्या हातानेच तोडलें, डोक्याचा एक केस आपल्या हाताने काढला आणि बाकीचे हाताने काढवेनात म्हणून कारागीर बोलावून त्याजकडून केशविमोचन केलें.'

नंतर कांही वेळ विचार करण्याकरिता एका बाजूस जाऊन, न्यायाधीशमंडळाने बाहेर येऊन आपला निर्णय सांगितला; तो असा की, 'गलबलाचार्यांनी

घेतलें या प्रकारचा संन्यास घेणें हें अधर्माचरण होतें. त्याला प्रायश्चित्त द्यावयाचें पण ते यतिधर्मांत असतां दिल्यास परमहंस-स्थितीची विटंबना होते. शिवाय संन्यासांत राहून तद्विपरीत आश्रमाचें वर्तन घडण्याचें पाप लागण्याचा फारच संभव आचार्यांच्या वृत्तीवरून दिसतो. म्हणून त्यांना योग्य अशा पूर्वीच्या गृहस्थाश्रमांतच प्रविष्ट होण्याचें प्रायश्चित्त देण्याची विनंति श्रींकडे करण्यांत येईल.'

त्याप्रमाणे विनंति करण्यांत आली. ती मान्य होऊन आज्ञापत्र निघालें. तें बजावण्याचा अधिकार फिर्यादी भीमाचार्यांनी मागितल्याप्रमाणे त्यांना देण्यांत आला. न्यायमंडळाने न सुचविलेली अशी एक सवलत श्रींनी आपण होऊन सुचविली होती. ती अशी की, संन्यासांतून एकदम गृहस्थाश्रमांत जाणें ही विपरीत वर्तनाची पराकाष्ठा होते, म्हणून प्रथम इच्छा असल्यास आचार्यांनी उलटा क्रम अनुसरतांना वानप्रस्थाश्रम आचरावा. त्याहीपुढे जाऊन प्रत्यक्ष गृहस्थाश्रमांत आचार्यांनी प्रवेश करणें किंवा न करणें याविषयीचा अधिकार फिर्यादी भीमाचार्य यांना देण्यांत आला आहे.

* * *

प्रथम गलबलाचार्यांनी वानप्रस्थाश्रम पत्करला. त्यामुळे घरावरील 'संन्यास मठ' ही पाटी काढून टाकून 'तपोवन' अशी पाटी लावण्यांत आली. वानप्रस्थाश्रमाचें आचरण पत्नीसमवेत करतां येतें. यामुळे अर्थात् हौसाबाई स्वामीसमोर येऊन उघडपणें वावरूं लागली व त्यांची सेवा करूं लागली. आचार्यांनीं जाहीर खुलासा केला की, "मी मनाने अद्यापि संन्यासीच आहे. झालें तें परिवर्तन केवळ देहाचें. माझ्या धोरणाचा हा खुलासा समजावा. वानप्रस्थाश्रम हें असिधाराव्रत म्हणण्यांत येतें. त्याप्रमाणे मी शयनगृहांत माझ्या व पत्नीच्यामध्ये आमच्या पूर्वजांच्या वेळची जुनी तरवार ठेवीत असतों!"

हा खुलासा वाचून कांहींनी आचार्यांच्या तत्त्वनिष्ठेची तर कांहींनी त्यांच्या बुद्धिमत्तेची तारीफ केली. पण पुढे लवकरच एक दिवस अशी गोष्ट घडली की, भीमाचार्यांनी सरकारांत कळविलेल्या खाजगी बातमीवरून नवलपूरचे पोलीस अधिकारी येऊन त्यांनी शयनगृहांतील ती जुनी तरवारहि, (बिगर परवानगीने हत्यारांच्या कायद्याविरुद्ध ठेवलेली म्हणून) जप्त करून नेली; व आचार्यांना कळविलें की, कायद्याप्रमाणे गुन्हा खरा परंतु ती बोथट, गंजलेली व निकामीच होती हें लक्षांत घेऊन खटला करण्यांत येत नाही.

आचार्यांनी पुनः खुलासा प्रसिद्ध केला. "मी मनाने अजून संन्यासीच आहें! श्रींनी दिलेल्या सवलतीचा फायदा टाकून गृहस्थाश्रम न स्वीकारतां वानप्रस्थाश्रमांत राहून आपली तत्त्वनिष्ठा सांभाळीत आहें. शयनगृहांतील तरवार राजाधिकाऱ्यांनी जप्त करून नेली त्यामुळे माझा नाइलाज झाला. तथापि तत्त्वनिष्ठा कायम आहे हें उमजण्याकरता मी शयनगृहांत दोन बिछान्यांच्या दरम्यान संगमरवरी दगडांची एक चिरफळी कायमची बसवून घेतलेली आहे. तरी मला कोणी गृहस्थाश्रमी म्हणतील तर ती माझी बेअब्रू समजून मी श्रींकडे अर्ज करून न्याय मिळवीन हें सर्वांनी लक्षांत ठेवावें."

ईश्वर करणार झाला म्हणजे सर्व कांही विपरीत होतें. कारण या वृत्तान्तापुढे सुमारें दहा महिन्यांनी आचार्यांना मुलगा झाला. तेव्हा त्यांनी फिरून जाहीर खुलासा केला, तो असा. "मी मनाने अजून संन्यासीच आहे. शयनगृहांतील तरवार निघून गेल्यामुळे मला वानप्रस्थाश्रमाचा विसर पडला व गृहस्थाश्रम नाखुषीने सिद्ध झाला, तरी माझी तत्त्वनिष्ठा अद्यापि कायम आहे! पुत्र झाल्यावरच पितृऋण फिटतें असें स्मृतिग्रंथांत सांगितलें आहे. मुलगा होऊन तें ऋण फिटल्याने मी संन्यासाश्रमाला पूर्वीहून अधिकच लायक झालों आहें. म्हणून पुनः इच्छेस येईल तेंव्हा संन्यास घेईन. तथापि मी घेतलेली दीक्षा नवी असें न समजतां पूर्वी घेतलेली दीक्षाच चालू आहे असें लोकांनी समजलें पाहिजे."

नवलपुरांतील लोक हौसाबाईच्या हातून पूर्वीची चूक पुन्हा केव्हा होते याची कौतुकाने वाट पाहात बसलेले आहेत!

---

२२ दुहेरी सुधारणेची फसवणूक

(सह्याद्रि, जून १९३५)

माझे मित्र विनायकशास्त्री पुराणिक हे नवलपुरांतील एक विद्वद्रत्न. पुराणिकाच्या वडिलार्जित पेशामुळे त्यांना 'पुराणिक' याशिवाय दुसऱ्या आडनांवाने लोक ओळखीनासे झाले. शास्त्रीबुवा माझ्यापेक्षा वयाने बारा वर्षांनी लहान. त्यांनी स्नेहापेक्षा वडील बंधूचेंच नातें माझ्याशीं अधिक ठेवलें होतें. ब्राह्मण अगदी जुन्या वळणाचा, पण सालस सात्त्विक. त्याच्या तोंडून

चळ्या सुराचा बोल कधी निघावयाचा नाही. फक्त पुराण सुरू झालें म्हणजे उंच आवाजाने वाणीचा प्रभाव अस्खलित चाले. रोज तिसरे प्रहरीं, आम्हा दोघांचीहि वामकुक्षी झाल्यावर, ते आपल्या घरून उठून माझ्या माडींत येऊन बसावयाचे, त्यांनी आपली चंची सोडावयाची, मीहि आपला खलबत्ता पुढे ओढावयाचा; आणि मग तास अर्धा तास आमच्या गप्पागोष्टी, हास्यविनोद मनमोकळेपणें चालवयाचे. मी सुधारकी वळणाचा, शास्त्रीबुवा जुन्या वळणाचे यामुळे आमच्यामध्ये कोणते विषय चर्चेला निघत, आणि कोट्या व प्रतिकोट्या कोणत्या रंगत, याची कल्पना वाचकांना येईलच.

आज सकाळीं शास्त्रीबुवांच्या दाराशीं दोन टांगे थांबून त्यांतून दोन बायका, दोन पुरुष व बरेंचसें सामान उतरलें होतें. तेव्हा मी सहज शास्त्रीबुवांना म्हणालें, “ काय हो शास्त्रीबुवा, आज तुमच्या घरीं बरीच पाहुणेमंडळी आलीशी दिसतात ! तेव्हा तुम्ही गडबडीत असावयाचे. तरी बरें आलां ! ” यावर खालील संभाषण झालें.

“ कोणी पाहुणीं नव्हत तीं, नानासाहेब, घरचींच आहेत; आणि तींहि पुढे कोठे प्रवासाला जाणारी नव्हत, तर जवळ जवळ घरींच कायम राहणारीं आहेत. म्हणून नेहमीसारखें तुमच्याकडे यावयाला फावलें.”

“ तुमच्या घरचीं ! आणि तीं कायमचीं राहण्याला आलेलीं ! अन् मीं कधी पूर्वीं नाही पाहिलीं तीं ? ”

“ तुम्ही कशीं पाहाल ? आणि मींदेखील फार थोड्या वेळींच त्यांना पाहिलेलें आहे.”

“ म्हणजे ? ”

“ मी सांगतोंच तर तुम्हाला सगळी हकीकत. तुम्हाला माहीतच आहे की, मला एक थोरला भाऊ होता. तो लहानपणींच घराबाहेर पडून झांशी, ग्वाल्हेर, कानपूर इत्यादि ठिकाणीं राहून त्याने आपली विद्या स्वावलंबनाने पुरी केली; आणि व्यापारटापार तिकडेच करून बराच पैसा मिळविला. तिकडची काशीचीच एक मुलगी पाहून त्यानें लग्न केलें, आणि मरेपर्यंत त्याचा सगळा संसार तिकडेच झाला. त्याची बायको त्याच्या आधी आठ वर्षें वारली. तेव्हापासून आपल्या दोनच दोन मुलींना मोठ्या लडिवाळपणाने वागवून, त्यांचें शिक्षण त्याने बी. ए.च्या अर्ध्या परीक्षेपर्यंत केलें. पुढे तो स्वतः वारला. तेव्हा त्याच्या मुली, बापाच्या इच्छेनुसार, तिकडचा संसार

सगळा मोडून आपला गडी व आचारी बरोबर घेऊन आता पुण्यास माझ्या म्हणजे त्यांच्याहि, घरीं कायमच्या राहायला आल्या आहेत. पुढचें शिक्षण ह्या पुण्यांतच पुरें करणार. माझें घर हें त्यांचेंच घर हें मीं म्हटलें, तें अनेक अर्थांनी खरें आहे. एक तर मी या मुलींचा चुलता. शिवाय हें माझें घर असें टुमदार बांधण्याला लागलेले सगळे पैसे केवळ बंधुप्रेमाने, आणि वडिलार्जित घर नीट राखावें म्हणून, त्यानेच मधून मधून पाठविले. मला पुराणिकाला कोठून मिळणार ? मला कुटुंब नाही व मूलहि पण नाही हें तुम्ही पाहतांच. तेव्हा माझें घर जागवायला व शोभवायला माझ्या पुतण्या, म्हणजे माझ्या मुलीच म्हणा ना आता आल्या त्यामुळे मला मनांतून फार आनंद होतो आहे. माझा बंधु मृत्युशय्येवर पडला. मी त्याला भेटायला गेलों, तेव्हा त्याने गहिंवरून मुली माझ्या पदरांत घातल्या, आणि तो इतकेंच म्हणाला, "भाऊ, सांगायचें एवढेंच की, मी काय, माझ्या मुली काय, सुधारकी वातावरणांत वाढलेल्या. तूं स्वतः शुचिर्भूत, जुन्या वळणाचा. तुझ्या घरीं या मुलींनी राहणें, हें तुजवर एक प्रकारें संकटच. पण आजवर बंधुप्रेम केलेंस, तसेंच यापुढे अपत्यप्रेम करून त्यांना संभाळ—" यापुढे त्याच्याने बोलवेना. मीहि त्याला अधिक बोलूं दिलें नाही. त्याच्या मृत्यूनंतर मी मुलींना बरोबरच घेऊन येणार होतों, पण हातातोंडाशीं आलेल्या इंटरच्या परीक्षा बुडूं नयेत म्हणून, त्यांनी तिकडे वर्ष पुरें केलें, आणि आतां इकडे आल्या."

मी म्हणालों, "सकाळीं मी आपल्या माडीवरून ओझरतेंच पाहिलें म्हणा ! पण तुमच्या या दोघी पुतण्यांपैकीं एक गतभर्तृका दिसली. मग दुसरी विवाहित किंवा कुमारिका आहे, हें माहीत नाही."

माझे हे शब्द ऐकतांच शास्त्रीबुवांची मुद्रा एकदम गंभीर झाली. बोलूं की न बोलूं, असें त्यांना झालें असावें. शेवटीं ते मला हळूच म्हणाले, "नानासाहेब, काय सांगूं आणि काय न सांगूं ? तुमच्याजवळ कसली चोरी ? मात्र माझ्याने मोठ्याने उच्चारहि करवत नाही. इकडे कान करा, म्हणजे हळूच सांगतों."

मला मोठेंच आश्चर्य वाटलें ! कारण त्या दोघी मुलींना पाहून, (म्हणजे एकीचें पांढरें फटफटीत कपाळ आणि दुसरीचें कुंकवाचा टिळा लावलेलें कपाळ पाहून) मीं त्यांचें वर्णन केलें, तसेंच कोणी परका मनुष्यहि करताच नाहीं काय ? पण शास्त्रीबुवांना मोठ्याने सांगण्याचें संकट वाटतें तर आपणहि त्यांना विश्वास देणें योग्य म्हणून, मी खलबत्ता थांबवून कान किंचित्

पुढे केला. मिनिट दोन मिनिटांत शास्त्रीबुवांनी काय सांगावयाचें तें सांगितलें. तें ऐकून मलाहि विस्मय वाटला. आणि खरें बोलावयाचें तर मनांत थोडें हसूंहि आलें. पण मी हसणें, म्हणजे चिंतातुर अशा शास्त्रीबुवांशीं मला सहानुभूति वाटत नाही असेंच प्रकट करण्यासारखें झालें नसतें काय? म्हणून मी हसें दाबून, किंचित् गंभीरपणाचा मुद्दाम आवहि आणून, फक्त इतकेंच म्हणालों, " आता आला सारा मजकूर ध्यानांत. चालायचेंच. नव्या युगांत नवेच अनुभव यावे यांत काय आश्चर्य?"

पण आपण जें कानांत सांगितलें त्यामुळे परनिंदेचें पातक हातून घडल्यासारखें वाईट वाटून, जणू काय तिचें प्रायश्चित्त स्तुतीच्या शब्दांनी घ्यावें म्हणून, (पण आतां मात्र 'जरा कान इकडे करा' असें न म्हणतां) मोठ्यानेच ते म्हणाले, " पण नानासाहेब, मुली मोठ्या सुस्वभावी दिसतात. माझ्या भावानें सांगितल्याप्रमाणे त्यांना संभाळून घेणें कदाचित् कठीण जाणारहि नाही."

पण हे शब्द केवळ भलेपणाचे होते, खऱ्या निर्भयतेचे नव्हते, हें मीं तेव्हाच ताडलें. आणि मी इतकेंच म्हणालों, " छे, छे! सर्व कांही नीट निभावून जाईल." त्यावर शास्त्रीबुवा मला काकुळतीने म्हणाले, " पण नानासाहेब, मला या कामीं तुमची मदत सर्वस्वीं हवी."

" ती कोणती?" मीं मोठ्या उत्सुकतेने विचारलें.

" इतकीच की, माझ्या बंधूच्या आणि पुतण्यांच्यासारखे तुम्हीहि नव्या वळणाचे, शिवाय माझे स्नेही किंवा बंधुच म्हणा ना. तेव्हा त्यांना तुम्ही आपल्याच पुतण्या समजा. तुमच्या घरीं त्यांना माझ्या घरापेक्षा अधिक मोकळेपणा वाटेल; आणि सुदैवाने आपलीं घरें एकच घर मानण्याइतकीं जवळजवळहि आहेत."

त्या दिवशीं इतकेंच बोलणें होऊन तोंडांत तंबाखूची चिमूट टाकून शास्त्रीबुवा उठून गेले.

शास्त्रीबुवांचा अदमास खरा ठरला. त्यांच्या दोन्ही पुतण्या (वडील गंडकी व धाकटी शरयू) यांना आपल्या पुराणमतवादी चुलत्याच्या घरापेक्षा माझें घरच अधिक आवडूं लागलें. आपल्या सुधारकी आचरणाने चुलत्याला उपद्रव होऊं नये याबद्दल त्या फार दक्षता घेत. पुस्तकवाचन, वेणीफणी, चहापाणी सर्व त्या आपल्या खोल्यांतून दारें लावून करीत. कॉलेजच्या निमित्ताने

त्यांचीं जेवणें चुलत्याची पंगत टाळून होत. आणि उलट त्यांची खुशामत करण्याकरिता, शास्त्रीबुवा भजन करीत तेव्हां थोडा वेळ माजघरांत जाऊन बसून तें त्या ऐकत. सुटीच्या एखाद्या दिवशीं देवळांत त्यांचें पुराण ऐकायलाहि जाऊन बसत. नाही म्हणायला त्या जोडीने सायकलीवर बसून कॉलेजांत जात; आणि चुलत्याच्या डोळ्याला हें चमत्कारिक दिसेल असें माहीत होतें तरी, त्यांत खरोखर आपण वावगें कांही करीत नाही या स्वाभिमानाच्या जाणीवेने, त्या चुलत्याच्यादेखत सायकलींवर बसून हिंडत. माझ्या घरीं अर्थातच त्यांना पूर्ण मोकळ्या मनाने वागतां येई. रोज सकाळीं, संध्याकाळीं मी त्यांना चहाला बोलावी. कारण चहाबरोबर खाण्याच्या पावरोटीचे तुकडे शास्त्रीबुवांचे घरीं पडूं नयेत अशी माझ्याप्रमाणे त्यांचीहि इच्छा असे.

— २ —

मी पेन्शनर (संस्कृतचा प्रोफेसर) होतों. वाचन, अध्ययन, अध्यापन हीच माझी करमणूक असे आणि गांवांतल्या दोनहि कॉलेजांतील बी. ए., एम्. ए. च्या क्लासांतील माझ्या स्नेह्यांचीं मुलें— मुलगे व मुलीहि— माझ्याकडे व्याकरण, फायलॉलॉजी, षड्दर्शनें वगैरे अवघड विषय शिकण्याला मधून येत. कारण मी संभाषणपद्धतीने व मराठींत चर्चा करी.

आज तिसरे प्रहरीं, सुटीचा दिवस म्हणून वसंत करमरकर आणि भालचंद्र पाटणकर हे दोघे मुलगे मजकडे आपले विषय समजून घेण्याकरिता आले होते. ते एम्. ए. परीक्षा पास होऊन पुढे डी. लिट्.चा अभ्यास करीत होते. त्यांचें वाचून झाल्यावर मीं त्यांना सहज चहाला ठेवून घेतलें. तों नित्याप्रमाणे गंडकी व शरयू याहि आल्या. परक्या माणसांना पाहून त्या जराशा बुजल्या; पण त्या कॉलेजांत बी. ए.च्या विद्यार्थिनी आहेत असें मी सांगतांच 'सर्वः सगंधेषु विश्वसति' या न्यायाने त्यांचें समाधान होऊन, आम्ही सर्व मोकळ्या मनाने संभाषण करूं लागलों. धाकटी शरयू ही बोलकी असे. थोरली गंडकी ही कमी बोलकी पण मार्मिक असे. दोघी बहिणी पाठोपाठच्या, दोन वर्षांनी वडील धाकट्या, अगदी सारख्या चेहऱ्याच्या. **फक्त शरयूचें फटफटीत कपाळ आणि गंडकीच्या कपाळावरील ठळठळीत कुंकवाचा टिळा** (नव्या चालीची टिकली नव्हे) यामुळेच काय तो दोघींमध्ये स्पष्ट असा फरक दिसे.

आज संभाषणाला सुरुवात झाली ती फर्ग्युसन कॉलेजांत दोन प्रहरीं झालेल्या विष्णुशास्त्री चिपळूणकर बक्षिसाच्या समारंभावरून. वसंत थोडासा उसळून लावून बोलण्याच्या स्वराने म्हणाला, "आहेत बुवा चिपळूणकर भाग्यवान्! त्यांच्या नांवाचें बक्षीसहि ठेवण्यांत आलें. बिचाऱ्या आगरकरांच्या नांवचें कोण ठेवतो! ते पडले सुधारक. अजून सनातनी मताचा जय आहे खरा!"

मी म्हणालों, "दातुरिच्छा बलीयसी. उगीच कशाला नांवें ठेवा दुसऱ्याला?" त्यावर शरयूला राहवेना. ती म्हणाली, "पण काका, बक्षीस ठेवण्याला पैसे रोकड जमवावे लागतात, आणि पैसे पुष्कळ जमायला देणारांत स्वार्थत्याग लागतो. आगरकरांकरिता बक्षीस ठेवायला कोणी नको का म्हटलें असेल? आगरकरांच्या नांवाचा व सुधारकी मताचा उदो उदो करणारे पुष्कळ श्रीमंतहि आहेत; पण त्यांच्याकरिता कां नाही कोणी फंड जमवला? आगरकरांचें 'सुधारक' पत्रहि श्रीमंत सुधारकांत स्वार्थत्याग नाही म्हणूनच बुडलें म्हणतात."

गंडकीने दुसरी बाजू घेतली. ती म्हणाली, "पैशाच्या बक्षिसापेक्षा मनुष्यजातीच्या कृतज्ञतेचें बक्षीस श्रेष्ठ आहे. युनिव्हर्सिटी चिपळूणकरांच्या नांवाने पैशाचें बक्षीस देवो; पण आगरकरांना महाराष्ट्रांतल्या एकंदर स्त्रीजातीकडून, विशेषतः सुशिक्षित स्त्रिया व त्यांतल्या त्यांत विधवा स्त्रिया यांच्याकडून, आगरकरांनी त्यांची वकिली केली त्याबद्दल कृतज्ञतेच्या अश्रूंचें बक्षीस मिळतें, तें अधिक मौल्यवान ठरत नाही का?"

भालचंद्राने गंडकीच्या म्हणण्याचें समर्थन केलें. तो म्हणाला, "चिपळूणकरांकरिता बक्षीस ठेवलें तें त्यांनी किंवा त्यांच्या स्फूर्तीने उत्पन्न होऊन आजपर्यंत चांगल्या चाललेल्या संस्थांनीच ज्या वर्गण्या दिल्या त्यांच्या व्याजांतून देण्यांत येतें. आगरकरांनी स्वतः अशी कोणती संस्था काढली नाहीं. ते संस्था-संस्थापक नव्हते. आगरकर हे स्त्रीवर्गाचे वकील होते; आणि त्यांनी ती वकिली किती लोकनिंदा सहन करून यशस्वी केली हें जनता पाहतेच आहे."

त्या पहिल्या दिवशीं इतकाच वाद संपून वसंत व भालचंद्र निघून गेले. शरयू-गंडकीशीं मात्र मी बराच वेळ बोलत बसलों.

असेच कांही दिवस गेले. नंतर तुळशीच्या लग्नाच्या तिसरे दिवशीं शास्त्रीबुवा मजकडे आले. त्यांच्या हातांत एक लखोटा होता. तो फोडून त्यांतील

कागद त्यांनी पूर्वीच वाचला होता. पण मला दाखविण्याकरिता त्यांनी तो मुद्दाम आणला होता. 'तुळशीचें लग्न झाल्यावर लगेच हा लखोटा फोडावा' असें लखोट्यावर शास्त्रीबुवांच्या बंधूने आपल्या हाताने लिहिलें होतें. आंतला कागदहि त्याच्याच हातचा असून तें त्याचें मृत्युपत्र होतें. त्यांत प्रथम स्वतःचें वृत्त, नंतर आपल्या मिळकतीची यादी, आणि शेवटीं तिच्या विल्हे-वाटीचीं कलमें होतीं. राहातें घर हें शास्त्रीबुवांना तहहयात, व त्यांनी फिरून लग्न केल्यास व त्यांना मुलगा झाल्यास तें त्याला दिलें होतें. हेतु हा की वडिलार्जित वास्तु खुद्द वंशांतच राहावी. नंतर मुलींसंबंधाने कलम होतें. त्यांत प्रथम प्रत्येकीला वीस वीस हजार रुपये देऊन विधवा मुलीला जादा देणगी म्हणून वीस हजार रुपये दिले होते. शेवटीं शिफारसवजा एक कलम होतें तें असें की, अविवाहित मुलीचें लग्न ताबडतोब करावें, व विधवा मुलीने पुनर्विवाह केल्यास तिला सर्व प्रकारें त्या कृत्यास मदत करावी. मीं मृत्युपत्र वाचल्यावर शास्त्रीबुवा म्हणाले, "मृत्युपत्राचा एक्झिक्यूटर किंवा काय तो भावानें मला नेमलें असलें तरी, मुलींसंबंधाचीं कलमें अमलांत आणणें हें माझ्या हातून कसें पार पडणार ? नानासाहेब, एरवीहि 'या मुली तुमच्याच असें समजा,' असें मी पूर्वीं तुम्हाला म्हणालों होतोंच, पण आता हीं लग्नाचीं कलमें उरक-ण्याचा भार तर मला तुमच्यावर सर्वस्वी टाकला पाहिजे. एका प्रौढ कुमा-रिकेचा विवाह म्हणजे तो दिवसमानाप्रमाणे प्रीतिविवाह ! आणि दुसरा तर बोलून चालून पुनर्विवाह ! माझ्या भावाने या कामीं मजवर विश्वास टाकला तरी, आणि मुलींविषयी मला ममत्व वाटत असलें तरी, माझ्या सनातनी बुद्धीचे संस्कार मला अपात्र ठरवितात. तर हात जोडून विनंति अशी की, या कामीं तुम्हीच लक्ष घाला व काय तें लवकर करा."

शास्त्रीबुवांची खरी अडचण आणि दोघी मुलींविषयी मला वाटणारी सहा-नुभूति यामुळे मी "ठीक आहे शास्त्रीबुवा. तुम्ही कांही काळजी करूं नका" असें म्हणतांच शास्त्रीबुवांनी हात पुढे करून व 'हातावर हात मारा' असें म्हणून मजकडून वचनच घेतलें. तेव्हा बिचारा ब्राह्मण अगदी निष्काळजी झाला असें त्याच्या आनंदी मुद्रेवरून दिसलें. मग मी त्या उद्योगाला लागलोंच.

दुसरे दिवशीं नित्यक्रमाप्रमाणे वसंत व भालचंद्र ही जोडी आपले विषय वाचण्याला, आणि शरयू व गंडकी चहा घेण्याला चारदोन मिनिटांच्या फरका-

नेच आल्या आणि न जाणो, वधूवरांच्या नांवाच्या जुड्या बांधणाऱ्या ब्रह्मदेवाने माझ्या मनांत प्रेरणा करावी त्याप्रमाणे, माझ्या मनांत एकदम विचार असा आला की, या दोन मुलांशीं या दोन मुलींचे विवाह लावून देऊन शास्त्रीबुवांना काळजींतून मुक्त करावें. या कल्पनेंतील 'वर', 'वधू', त्यांची संस्कृति, शील व सांपत्तिक स्थिति सर्वच गोष्टी परस्पर अनुकूल अशाच होत्या. पण दोन 'वर' व दोन 'वधू' असा हिशेब जमला तरी कोणत्या वराला कोणती वधू योजावी याचा कौल मला मनाकडून निश्चित मिळेना. तेव्हा मीं म्हटलें की, "मन कौल देत नाही तेंच बरोबर. कारण अशा प्रौढ मुलामुलींचे वधूवर पसंत करणारा मी कोण? ती गोष्ट त्यांची त्यांनीच करणें योग्य नव्हे काय?"

असो. त्या दिवशीं मीं हा विषय कांहीच काढला नाही. मनांत असा विचार केला की, या दोन्ही मुली व हे दोघे मुलगे यांपैकी प्रत्येकाशीं वेगवेगळें बोलून त्यांचे लग्नविषयक विचार स्वतंत्रपणें समजून घ्यावे; आणि मग 'मालतीमाधवां'तील 'कामंदकी'प्रमाणे जी काय करामत करावयाची ती करावी. माझ्या चौकशींत मला असें दिसून आलें की दोन्ही मुली विवाहाला तयार असून, ते दोघे मुलगेहि विवाह करण्यास सिद्ध आहेत. त्यांतल्या त्यांत वसंताच्या मनाचा ओढा गंडकीकडे व भालचंद्राचा शरयूकडे दिसला. मग चार दिवस जाऊं देऊन, लग्नाचे मुहूर्त जवळ येऊं लागले असें पाहून, माझी गुप्त पोलिसाची कामगिरी मी अधिक नेटाने करूं लागलों. त्यांतील मुख्य भाग असा की, पूर्वी या मुलांमुलींची मजकडे येण्याची वेळ हटकून एकच जमत नसे ती मी आता मुद्दाम हटकून जमवूं लागलों. म्हणजे बरोबर साडेचार ही वेळ चहाची ठरवून चौघांना घेऊनच चहापार्टी करी. मी ब्रह्मदेवाचें सोंग आणलें तें मला साजण्याइतका मी प्रौढ व परिचित, आणि ते मुलगे व त्या मुली सर्वच नवीन वळणाच्या. यामुळे माझें हृद्गत ओळखून ते व त्या मला एक प्रकारें उत्तेजन देऊन मदतच करूं लागल्या.

पण वसंत व भालचंद्र यांच्या मनाची परीक्षा किंचित् कसोटी लावून करण्याचें मीं ठरविलें. वसंत व भालचंद्र दोघेहि शेपन्नासांत लायक असे नवरेमुलगे. औचित्याच्या दृष्टीने कोणांत कांहीच कमी नव्हतें. वसंताला गंडकी कां आवडावी व भालचंद्राला शरयू कां पसंत वाटावी याला केवळ अभिरुचीपेक्षा वेगळें कारण काय सांगतां येईल? वास्तविक त्यांतल्या त्यांत वसंत हा

अधिक दिमाखदार सुधारक; व भालचंद्र हा सुधारणाप्रेमी असला तरी आग्रही किंवा उतूं येणारा नव्हता. दोघेहि पुनर्विवाहाला आक्षेप न घेणारे असेच होते. मात्र आवर्जून पुनर्विवाहच करावा असें त्यांच्याशीं झालेल्या माझ्या चर्चेत केव्हाहि दिसून आलें नव्हतें. शेवटीं शेवटीं तर त्यांनी माझ्याविषयी इतका प्रेमादर दाखविला की, स्वतः त्यांची पसंती कशीहि असली तरी मी जें सुचवीन तें, ते दोघे मुलगे व त्या दोघी मुली, जशी कांही ती त्यांच्या वडिलांची आज्ञा--असें समजून, माझी इच्छा अमलांत आणतील असा मला दृढ विश्वास वाटूं लागला. योगाहि असा की, या दोघी मुलींना ज्याप्रमाणे पितृवियोग घडला होता त्याप्रमाणे या दोघा मुलग्यांचेहि बाप निवर्तलेले असून, केवळ मनाप्रमाणे विवाह घडवून आणण्यास त्यांना कांहीच आडकाठी येण्यासारखी नव्हती. म्हणून प्रथम त्यांची पसंती तीच माझीहि पसंती असें भासवून, माझ्या मनांत वसंताचें लग्न गंडकीशीं व भालचंद्राचें शरयूशीं करावें असें असल्याचें मीं त्यांना दर्शविलें.

पण आणखी चार दिवस जाऊं देऊन मीं एक युक्ति केली. विनायकशास्त्र्यांच्या बंधूंच्या मृत्युपत्राची एक नक्कल उत्तम कागदावर स्वच्छ लिहवून घेतली. मात्र कपट इतकेंच केलें की, मुलींच्या नांवाचा निर्देश अस्सल मृत्युपत्रांत होता तो काढून टाकला. आणि 'विवाह' 'पुनर्विवाह' हे शब्द मोघम ठेवले. तसेंच वीस वीस हजारांच्या प्राथमिक देणगीचें कलम काढून टाकून, पुनर्विवाहितेला देण्याच्या वीस हजारांच्या जादा देणगीचें कलम तेवढें ठेवलें. मृत्युपत्राची ही नक्कल एवढा एकच कागद माझ्या चहाच्या टेबलावर समोरच राहूं दिला; आणि वसंत व भालचंद्र यांना वेगवेगळ्या वेळीं चहाला बोलावून तो त्यांच्या नजरेस पडेल असा ठेवला. त्यांपैकी प्रत्येकजण टेबलाशीं येऊन बसल्यावर, मी मुद्दाम कांही निमित्त करून दहा दहा मिनिटें बाजूला गेलों. आणि ते दोघे मुलगे त्या कागदाचें काय करतात हें आडून लपून पाहूं लागलों. मात्र बाहेर आल्यावर त्या कागदाचा कोणत्याहि प्रकारें उल्लेख न करतां, चहा घेऊन इकडे तिकडे बोलून प्रत्येकाची मीं रवानगी केली.

मीं आडून लपून पाहिलें त्यांत मला असें दिसलें की, वसंताने तें मृत्युपत्र हातांत घेऊन सर्व लक्षपूर्वक वाचलें व होतें तसें परत ठेवलें. तें वाचीत असतां त्याच्या तोंडावर निरनिराळे विकार प्रकट होत होते. मात्र मी आंत

आल्यावर आपण त्या गावचेच नव्हे अशी बेमालूम बतावणी त्या गुलामानें केली! भालचंद्रानेंहि तो कागद वाचला; पण मुद्दाम त्याची ओळख मला देऊन तो म्हणाला, "सर, मीं करूं नये ती गोष्ट केली. मीं टेबलावरील मृत्युपत्र वाचलें. पण मला शरयूशीं पुनर्विवाह करावयाचा नाही." मी म्हणालों, "तूं पुनर्विवाहाला प्रतिकूल आहेस की काय?" तो म्हणाला, "मुळीच नाही. पण या मृत्युपत्रांत शरयूला पुनर्विवाहाबद्दल वीस हजारांची जादा देणगी दिली आहे ती मला नडते. आणि मीं तिच्याशीं विवाह केला तर, त्या देणगीच्या लोभानें केला असें लोक म्हणतील तें मला लज्जास्पद वाटतें व सोसवणार नाही. ती देणगी तिला देण्याची रहित होईल तरच मी तिच्याशीं पुनर्विवाह करीन." मी म्हणालों, "भालू, आपण मुलीचें नांव न घेतां मोघम बोलूं. तूं ती जादा देणगी नको म्हटलीस तरी तुझ्या वधूने ती कां टाकावी? शिवाय मृत्युपत्राच्या एक्झिक्यूटरला तें कलम आहे तसें अंमलांत आणलें पाहिजे नव्हे का? बरें, पण तुझ्या मनोभावनेविषयी आदर दर्शविण्याकरिता मीं जर तुला म्हटलें की, शरयूशीं पुनर्विवाह नको तर नको; पण गंडकीशीं लग्न करण्याला तुझी कांही हरकत नाही ना? तर—" तो म्हणाला, "शरयूशीं पुनर्विवाह करण्यांत एका सामाजिक सुधारणेच्या तत्त्वाला मला हातभार लावतां आला असता. पण माझा स्वभाव सुधारणांबाबत आग्रही नाही आणि तुमच्या शब्दापलीकडे जाणारा मी नाही. म्हणून गंडकीशींहि मी आनंदानें विवाह करीन. रूप व गुण या दोन्ही दृष्टींनी त्या मला सारख्याच वाटतात. शरयू विधवा म्हणून मला विशेष सहानुभूति वाटते ही गोष्ट खरी; पण मृत्युपत्रांतील जादा देणगीचें कलम पाहून केवळ स्वाभिमानास्तव तो मार्ग सोडून देऊन, गंडकीशीं विवाहबद्ध होण्याला मला तुमची आज्ञा प्रमाण."

दुसरे दिवशीं मीं वसंताला वेगळा भेटीला बोलाविला व म्हणालों, "गड्या, सुदैवाने गंडकीशीं म्हणजे तुझ्या आवडत्या वधूशीं तुझा विवाह लावून देण्याचा योग मला येत आहे, याबद्दल आनंद वाटतो. तुझा बाप माझा परम स्नेही होता, म्हणून त्याच्या हातून पार न पडलेलें त्याचें कर्तव्य मला करतां येणार हें माझें भाग्य नव्हे का?" पण हें भाग्य मला लाभूं देणें वसंताला पसंत नव्हतें असें दिसलें. तो म्हणाला, "दोन्ही मुली सारख्याच रूपवान् व सद्‌गुणी आहेत. पण एका कार्यांत दोन कार्यें घडत असलीं तर तीं बरीं."

मी म्हणालों " म्हणजे काय रे ? " वसंत म्हणाला, " इतर गोष्टी समान असतां विवाहाऐवजीं जर मला पुनर्विवाह करतां आला तर, मी जो स्वतःला सुधारक म्हणवितों त्याप्रमाणे माझ्या हातून सुधारणेचें अल्पस्वल्प कार्य होणार नाही काय ? म्हणून, मला तुमच्यापुढे बोलवत नाही, बोलतां येत नाही, तरी प्रेमळपणामुळे पसंती-नापसंतीचा अधिकार तुम्ही मला देत आहां तो बजावून—मात्र तुमची क्षमा मागून—मीं शरयूशीं पुनर्विवाह करावा असेंच ठरविलें आहे. मला पुनर्विवाह करतां येत असतां—मीं जर ती संधि स्वीकारली नाही तर—माझ्या तत्त्वनिष्ठेला बाध आला असें तुम्हीच उद्या म्हणणार नाही काय ? "

तेव्हा माझ्याने राहवेना. पण माझें कपट उमगूं न देतां मी सहजावारी हसून म्हणालों, " मी कुणाविषयी पुढे काय म्हणेन याची चर्चा आजच कशाला ? तुम्ही हे दोघे मुलगे व या दोन्ही मुली यांपैकी ज्याचा जिकडे कल त्याप्रमाणे घडण्याला माझ्या हातून मदत व्हावी इतकीच या कामीं मी कृत-कृत्यता समजतों. बरें, पण तुझा कल गंडकीकडे होता असें मीं म्हटलें तर तें चूक होईल काय ? " तो म्हणाला, " माझा खरा कल तसा असता तर तुम्ही म्हणतां ही चूक ठरली नसती. पण माझा खरा कल तुम्हाला मला दाखवितां आला नाही असें उघड दिसतें. म्हणून ती मात्र माझीच चूक असें मी म्हणतों."

असो. मी जाणावयाचें तें जाणलें. बोलणें तेथेच संपविलें. फक्त इतकेंच म्हणालें कीं, " या मुलींची मला दया येते. त्यांच्या वडिलांनी त्यांना झुळ-झुळीतपणाची राहणी शिकवली, पण त्या चांगल्या ठिकाणीं पडाव्या याला मदत म्हणजे हुंडा, स्त्रीधन, असली कांही विशेष तजवीज त्यांच्या बापाला करतां आली नाही. तेव्हा त्यांचें रूप व गुण एवढाच हुंडा देऊन त्यांच्या चुलत्याला किंवा मला त्यांचें कन्यादान करणें प्राप्त आहे. असो. इलाज नाही." वसंतहि होला हो मिळविण्याच्या ऐटीने म्हणाला, " अशा मुलींच्या संबंधांत हुंड्यापांड्याचा विचार मनांत आणणें म्हणजे ती माणुसकी नव्हे इतकेंच मी म्हणेन."

असो. वसंत व भालचंद्र यांचे निश्चय तर मला कळले, पण मुली काय म्हणणार हा प्रश्न बिकट वाटे. तथापि मौज ही की, त्यांचा बाप सुधारक, त्यांची संस्कृति व राहणी सर्व सुधारकी वळणाची, असें असतां त्या इतक्या विनयशील ठरल्या कीं, जेव्हा जेव्हा म्हणून मीं त्यांच्यापुढे लग्नाची गोष्ट

काढली तेव्हा तेव्हा, जुन्या वळणाच्या मुलींप्रमाणे, त्यांनी कांही न बोलतां मान खाली घालून केवळ मी करीन तें प्रमाण असेंच निःसंदिग्धपणें दर्शविलें. परंतु मीं बारकाईने पाहून ठेविलें होतें की, शरयूचें मन वसंतावर होतें व गंडकीचें मन भालचंद्रावर होतें.

— ३ —

असो. पुढील आठवड्यांत येणाऱ्या मुहूर्तावर शरयूचें वसंताशीं व गंडकीचें भालचंद्राशीं लग्न ठरवून मीं तोंडी निमंत्रणें अक्षतवजा केलीं. विनायकशास्त्री या कामीं बाजूला राहिल्याबद्दल त्यांना कोणीच दोष देऊं शकला नसता. निमंत्रणांत प्रथम-विवाह किंवा पुनर्विवाह असा भेद दर्शविण्याचें मला कारणच नव्हतें. कारण, 'सौभाग्याकांक्षिणी' हें विशेषण दोघींना सारखेंच लागणारें होतें. पण तें अगदीं शिळें व सनातनी म्हणून मीं उच्चारलें नाहीं. लग्नें सुधारकी पद्धतीनें विशेष गाजावाजा न करतां केलीं. भालचंद्राची समजूत आपण कुमारिकेशीं लग्न करितों अशी असल्यामुळे त्याने सर्व गोष्टी त्या समजुतीने केल्या. आपण केवळ मामुली विवाह करीत आहों, म्हणजे त्यांत कांही 'पराक्रमाची' गोष्ट आहे असें नाही, असेंच त्याला वाटत होतें. पण वसंताला मात्र आपण शरयूशीं पुनर्विवाह म्हणजे एक मोठा 'पराक्रम' करीत आहों असें भासवावयाचें असल्यामुळे 'पुनर्विवाह' या शब्दाचा उल्लेख मीं मना केला होता तरी खाजगी रीतीने त्याने आपल्या सुधारक मित्रमंडळींना आंतून तसें कळविलें होतें.

लग्नविधि अगदी संक्षेपाने होतांच दोन्ही जोडपीं मीं आणून दिवाणखान्यांत बसविलीं. गंडकी व भालचंद्र यांना स्नेहीमंडळींनी हार घातले, तसेच शरयू व वसंत यांनाहि घातले, पण एक-दोघां सुधारक गृहस्थांनी मुद्दामच सुचविलें की, "हारतुरे झाले, पण वसंतरावांनी शरयूबाईंना पुनः सौभाग्यदान दिलें त्याला अनुसरून त्यांनी त्यांच्या कपाळाला आता कुंकुमतिलक लावावा." परंतु मी लगेच पुढें झालों; आणि म्हणालों, "हां! थांबा. आजचे हे विवाहसमारंभ झाले त्यांत सुधारणेचें तत्त्व या मुलींनी मानलें तें एकेरी नसून दुहेरी आहे. आम्ही कोणाचीच जाणूनबुजून फसवणूक केली नाही. वधू-वरांनी आपापल्या मनाप्रमाणे वरवधूंची पसंती केली आहे. पण दुहेरी सुधारणा म्हणतों याचें कारण असें की, शरयूबाईचा हा पुनर्विवाह नव्हे, तो प्रथम-विवाह आहे! असें असतां कुंकुमतिलक लावून घेण्याला त्यांनी मानलेल्या

एका विशेष तत्त्वनिष्ठेमुळे, त्या तयार नाहीत. आजच्या प्रसंगीं खरा पुनर्विवाह आहे तो गंडकीबाईचा! परंतु वैधव्यस्थितींतहि त्यांनी आपल्या कपाळावरील कुंकू राहूं दिलें ही देखील त्यांनी मानलेली तत्त्वनिष्ठाच होय. कोणाला वाटेल की, ही तत्त्वनिष्ठा नसून सुधारणेच्या नांवाखाली लहरीपणाने माजविलेले हे चाळे किंवा थेर आहेत. तथापि, या ठिकाणीं 'तसें कांही नाही' हा खुलासा मी आपणा सर्वांना आता सादर करितों. तो आपणाला मान्य होईल अशी मला आशा आहे. मी सांगणार ही माहिती ईश्वरसाक्ष खरी आहे इतकेंच मी आपणाला सांगतों. या द्विविध तत्त्वनिष्ठेचा प्रकार असा आहे की, या मुलींचा बाप सुधारक असतांहि, आपण एका विशेष आजाराने: म्हणजे काळजाच्या विकाराने लवकरच मरणार, आणि तसें झालें तर परप्रांतांत मुलींची काळजी कदाचित् घेतली जाणार नाही म्हणून, त्याने आपली प्रौढ-विवाहासंबंधी सुधारकी मतें बाजूला ठेवून, सर्वस्वी योग्य असें स्थळ दिसतांच गंडकीचें लग्न चौदाव्या वर्षीं केलें. पण दुर्दैवाच्या तडाख्यामुळे लग्नानंतर तीन महिन्यांनी तिचा नवरा अपघाताने मृत्यु पावला. गंडकी चौदा वर्षांची म्हणजे लहानच होती. तरी तिला आपल्यावरील संकटाची खरी कल्पना होऊन, नवऱ्याच्या मृत्यूची बातमी ऐकतांच तिने आक्रोश करून आपल्या हाताने आपलें कुंकू पुसलें. तिची धाकटी बहीण शरयू त्या वेळीं बारा वर्षांची होती. तिला वैधव्यदुःखाची कल्पना येणें शक्य नसलें तरी, प्रेमळपणामुळे आपल्या बहिणीच्या दुःखावस्थेची व शोकाची कल्पना तिला आली. पण ती इतकीच की, वडील बहिणीला आपल्या कपाळाचें कुंकू आपल्या हाताने पुसावें लागतें हेंच तिच्या शोकाचें, दुःखाचें व आक्रोशाचें खरें कारण! म्हणून कांही दिवस जाऊं देऊन तिने एके दिवशीं वडील बहिणीकडून 'शरयू! तूं सांगशील तें ऐकेन. तुझ्याच गळ्याची शपथ' असें वदवून घेतलें. आणि चटदिशी आपल्या कपाळाचें कुंकू काढून घेऊन तिच्या कपाळाला लावलें. आणि आपल्या गळ्याच्या शपथेची आठवण देऊन ती म्हणाली, "मी तुला लाविलेलें कुंकू पुसून टाकशील तर माझा गळा चिरून खाशील." वय बारा काय चौदा काय, दोघी मुली अज्ञानच. बिचाऱ्या शरयूला वाटलें की, आपण आपल्या कपाळाचें कुंकू लावून आपल्या बहिणीचें वैधव्यदुःख कायमचें नाहीसें केलें! व गंडकीला वाटलें की आपल्या प्रेमळ बहिणीला गळ्याची शपथ

दिली ती कशी मोडूं ? तिचा गळा चिरून खाल्ला असें होईल ! मुलींचा बाप सुधारक होता. त्याने हा सर्व प्रकार पाहिला. तेव्हा त्याला तो भगिनी-प्रेमाचा निष्कपट अस्सल प्रकार पाहून इतकें भडभडून आलें की, मुलीला वैधव्य आलें त्या दिवशीं तो रडला नसेल इतका या दिवशीं आपल्या खोलीला कडी लावून तो रडत बसला. भगिनीप्रेम हेंहि एक तत्त्वच आहे ! त्याबद्दल आदर दाखवावा म्हणून त्याने आपल्या दोघीं मुलींनी केलेल्या व पुढे चालविलेल्या या गोष्टींत कांहीच हात घातला नाहीं. किंबहुना त्याच्या अखेरच्या दिवसापर्यंत त्याची विधवा मुलगी कुंकुममंडित व अविवाहित मुलगी कुंकुमरहित असा प्रकार चालू होता. आणि तो परप्रांतांतच असल्या-मुळे या लोकविलक्षण प्रकाराची चिकित्सा करणारे फारसे कोणी त्याला भेटले नाहीत.

" सद्‌गृहस्थ हो ! आज या मुलींच्या बापाच्या ठिकाणीं मीच पुढे होऊन त्या दोघींचीं कन्यादानें केलीं. आणि त्याने आपल्या मुलींच्या प्रेमळपणाचें अपूर्व स्मारक म्हणून जो हा विपरीत दिसणारा प्रकार चालू दिला, तो, स्वतः त्यांची इच्छा बदलेपर्यंत, तसाच चालूं द्यावा अशी माझी आपणाला विनंति आहे. म्हणून आता एका मित्राने सुचविल्याप्रमाणे, शरयूताईचा प्रथमविवाह असला तरी या विशेष कारणामुळे तिला कुंकुमातिलक लावूं नये. गंडकी-ताईचाच पुनर्विवाह आहे, म्हणून तिच्या कपाळाला कुंकू नसतें तर भालचंद्र-पंतांनी तें आता लाविलें असतें. पण तें पूर्वीचें आहेच. पतीने आपल्या स्वामि-त्वाची खूण म्हणून लाविलेलें कुंकू, आणि बहिणीने प्रेमाने आपल्या कपाळाचें काढून लाविलेलें कुंकू, यांतील अधिक श्रेष्ठ कोणतें हें तुम्हीच ठरवा. तात्पर्य, तिलाहि कुंकू लावण्याचें कारण नाही. हल्ली सुधारणा म्हणून कुंकू न लाव-णाऱ्या विवाहित स्त्रिया समाजांत दिसतात, त्याचप्रमाणे विधवांनी कुंकू लावणें ही सुधारणा म्हणून त्या नांवाने चळवळ सुरू आहे. मी यापैकी कोण-त्याच सुधारणेचें खंडन किंवा मंडण करूं इच्छीत नाही. परंतु आजच्या या जोडीच्या लग्नांत कोणाची फसवणूक होत असेल तर ती होऊं नये याकरिताच हा वृत्तांत सांगून मीं खुलासा केला. "

मात्र वसंताकडे पाहून रोखून मी म्हणालों, " पण कोणी स्वार्थीबुद्धीनेच आपली फसवणूक करून घेतली असेल तर त्याला मात्र मी जबाबदार नाही.

मृत्युपत्राप्रमाणे वीस हजारांचा चेक गंडकीच्या हातीं जाहीर रीतीने त्याच सभेंत मीं देवविला. या वेळीं वसंताच्या चेहऱ्याकडे बारीक नजरेने पाहिल्याशिवाय माझ्या 'दुष्ट' बुद्धीला राहवलें नाही. त्यांतलें मर्म एक तो जाणत होता किंवा मी जाणत होतों !

पण गंडकीने तो चेक लगेच सही करून माझ्या स्वाधीन केला, व ती आणि भालचंद्र यांच्या संमतीने मीं तो एका सुप्रसिद्ध अशा स्त्रीशिक्षणसंस्थेस देऊन टाकला !

---

२३ नवें नवलाचें अर्थशास्त्र

(सह्याद्रि, मार्च १९३५)

माझ्या मित्राने या अर्थशास्त्राची गोष्ट सांगितली ती अशी:—

" **नवलद्वीपाला** जावें, आणि तेथील समाजाची जी हकीकत प्रवासी सांगतात ती समक्ष पाहावी अशी इच्छा बरेच दिवस होती. पण हें द्वीप फार आडवळणाला, यामुळे गलबतवाला कोणी मिळेना. आडवळणाशिवाय दुसरीहि एक गोष्ट अशी की, या द्वीपाच्या आसपास कोणी गेलें म्हणजे त्याच्यावर बंदरांतून तोफाबंदुकांचा मारा होतो. महायुद्धापर्यंत या द्वीपांतून कोट्यवधि रुपयांचा माल निर्गत व आयात होई. बंदरावर एकहि जकात नव्हती; आणि खुल्या व्यापाराचें तत्त्वज्ञान शिकविणारें एक विद्यापीठच येथे स्थापलें होतें. त्याच्या मुख्य इमारतीच्या डोक्यावर 'आव जाव घर तुमारा' अशीं अक्षरें शंभर नंबरी सोन्याची करून लाविलीं होतीं. पण महायुद्धानंतर नवलद्वीपच्या लोकांनी हें विद्यापीठ सुरुंग लावून उध्वस्त केलें. बंदरावर किल्ले उभारले व किल्ल्यावर तोफा चढविल्या. आणि अर्थशास्त्रदृष्ट्या असें नवें धोरण सरकारी हुकुमाने प्रवर्तित केलें की, व्यापार हा मोठा घातक आहे. त्याने समाज बिघडतो. म्हणून व्यापार ठेवावयाचा, तर फक्त नवलद्वीपांत उत्पन्न झालेल्या वस्तूंचाच. आणि तोहि द्वीपांतल्या द्वीपांतच. एक पैचाहि बाहेर देशचा माल जो कोणी देशांत आणील, त्याला मृत्यूची शिक्षा ठरविण्यांत आली. देशांतलें-

च घ्यावें, देशांतलेंच द्यावें, इतका मर्यादित व्यवहार राहिल्यामुळे, पैसारूपी जो दलाल किंवा मध्यस्थ त्याची गरज राहिली नाही. तथापि सर्व द्वीपभर कारखाने उभारलेले असून, त्यांच्या धुराड्यांतील धूर समुद्रांत पंचवीस कोसांवरून दिसे. तसेंच सर्व द्वीपभर 'नवलद्वीपाचाच माल वापरा' हे शब्द लिहिलेल्या पाट्यांशिवाय दुसरी पाटी दिसत नव्हती.

नवलद्वीपाला अगदी जवळ जाऊन हें सर्व नवल डोळ्यांनी पाहावें, ही माझी इच्छा अखेर सफळ झाली. पुष्कळ पैसे देऊन एक धाडसी नावाडी मीं मिळविला आणि दोन आठवड्यांचा समुद्रप्रवास करून नवलद्वीपाजवळ गेलों. बंदरकिनाऱ्यापासून एक कोसावर आमचें जहाज जातांच एक सरकारी पडाव आमचेपाशी येऊन दाखल झाला. आम्ही कोण काय याची चौकशी केल्यावर, आम्ही व्यापारी नाही केवळ प्रवासी आहों, आमचेजवळ विकण्याची अशी एकहि वस्तु नाही, अशी खात्री करून घेतल्यावर बंदरांत शिरण्याचा खास परवाना आम्हांला देण्यांत आला. त्यांत अट अशी लिहिली होती की, 'एक दिवसाहून अधिक वेळ राहूं नये. या मुक्कामांत नवलद्वीपचे सर्व कायदेकानू बिनतक्रार पाळावे.' बंदरांत **संत दिवाळखोर** या नांवाच्या एका साधूचा एक मोठा पुतळा उभारला होता. त्या गावांत त्या एका देवाशिवाय दुसऱ्या कोणाचीहि पूजा करण्याला कायद्याचा प्रतिबंध होता. या एकजिनसी धर्माचीं तत्त्वें सरकारने छापून काढलीं होतीं. त्यांतील पहिलें तत्त्व असें की, "व्यापारी जिनसाच्या किंमती (ऐन जिनसी देवघेवीच्या व्यवहारांतहि) इतक्या चढ्या ठेवाव्या की देवघेव करणेंहि प्रायः अशक्य व्हावें." हेतु हा की, ज्याने जें पिकवावें त्यानेच तें खावें या अर्थशास्त्राचा दंडक अंमलांत राहावा. दुसरें तत्त्व असें की, "मजुरीचे दर इतके कमी ठेवावे की, कोणाहि मजुराला ते परवडूं नयेत." हेतु हा की, होतां होईतों ज्याने पिकवावें त्यानेच खावें यालाच पूरक असा दुसरा दंडक म्हणजे ज्याला खावयास हवें त्यानेच पिकवावें, याचा अंमल व्हावा. भारी किंमतीमुळे विक्री न होतां जो माल शिल्लक उरेल त्याचा नित्य नैवेद्य **संत दिवाळखोर** याला अर्पावा. अशा रीतीने बराच माल या पुतळ्यापुढे जाळीत किंवा त्याच्या नांवाने समुद्रांत फेकून देत.

किनाऱ्यावर उतरून आंत प्रवेश केला, तों निरनिराळे सरकारी अधिकारी दिसूं लागले. ते बरेच कृश म्हणजे गवती टोळासारखे भासत. त्यांच्या

अंगावरील कपडे सर्व कागदाचे केलेले होते. याचें कारण विचारतां असें कळलें. नवलद्वीपांत कापूस पुष्कळ पिकतो खरा पण सन १९३३ सालीं असा शोध लागला की, रस्ते करतांना खडीच्याऐवजीं कापसाचे जाड थर घालावे, म्हणजे रस्त्यावरील वाहतूक सुखाची होते. अर्थात् बहुतेक कापूस रस्ते बांधण्याकडे गेला, यामुळे केवळ लक्षाधीश असतील त्यांनाच विकत घेतां येईल इतका कापूस महाग झाला. म्हणून सर्व जनता कागदाचे कपडे करूं लागली. मुलूख थंडीचा, आणि मऊ रस्त्यावर चालण्यापेक्षा थंडी निवारण्याचें सुख अधिक वाटावें. पण करणार काय?

कांहीं पुढे गेलों तों शेकडो गुरें दावणीला बांधून दूरच्या एका इमारतीकडे हाकून चालविलेलीं दिसलीं. मीं विचारलें 'हें काय आहे?' तेव्हा मला वाटाड्याने सांगितलें की, 'रोज इतकीं गुरें कत्तलखान्यांत मारलीं जातात आणि त्यांच्या चरबींतून एक प्रकारचा डिंक तयार करण्यांत येतो.' या डिंकाचा काय उपयोग असें विचारलें तेव्हा तो म्हणाला, 'सरकारला परदेशी मालाची जी नाकेबंदी करावयाची आहे ती नुसत्या बंदरांवर पहारा ठेवून किंवा बुरुजांवर तोफा चढवूनहि पुरी पडत नाहीं. चांचे लोकांना काय? ते धाडसी खलाशी. बंदरें टाळून ते नवलद्वीपच्या विस्तीर्ण किनाऱ्यावर कोठेंहि उतरून परदेशीमाल द्वीपांत घुसवावयाचे. म्हणून या कत्तलखान्यांत तयार होणारा डिंक सर्व द्वीपाभोवती एक मैलभर लांब जाड थराने ओतून ठेवलेला आहे, व ते थर कायम राहावे अशी दक्षता ठेवण्यांत येते. डिंक इतका चिकट आहे की, त्याला स्पर्श होतांच कोणतीहि वस्तू इतकी 'जाम' चिकटून गुरफटून जाते की तींतून सोडवणूक होणें अशक्य असते. अनेक चांचे लोक या डिंकाला चिकटून उपासमारीने मेले आहेत. त्यांना वेगळी शिक्षा करण्याचें सरकारला कारण राहिलें नाहीं!'

मी भोळा माणूस. बँकेसारखी एक कचेरी दिसली तींत गेलों; आणि खिशांतून अस्सल नोटा काढून त्यांचें 'नवलद्वीपी नाणें द्या' असें म्हणालों. पण नवलद्वीपांत नाणेंच चालत नसल्यामुळे त्यांनी त्या नोटा मला परत केल्या; व संभावितीने हसून म्हणाले, 'या कागदावरील हे मुखवटे व वेलबुट्या सुंदर चित्रासारख्याच दिसतात नाहीं का?' मी म्हणालों, "शंभर पौंड अशीं अक्षरें लिहिलेला हा कागद इतर कोणत्याहि देशांतील सरकारी बँकेंत मीं दिला तर मला शंभर पौंड किंमतीचें सोनें मिळेल. पण येथे तर तुम्ही बाजारी चित्रांच्या कागदाइतकीच या

शंभरपौंडी नोटांची किंमत करतां हें काय ?" ह्यावर तो अधिकारी म्हणाला, "असें ! तुम्हाला या नोटा मोडून येथील कांही माल खरेदी करावयाचा आहे असें दिसतें. पण त्याला एकच साधन आहे. तुमच्या हातांतली अंगठी किंवा खिशांतलें घड्याळ देऊं कराल तर तुम्हाला कांही जिनसा मिळतील, शिधासामुग्रीहि मिळेल, पण या व्यापाराकडे तुम्ही नेहमीच्या किंमतीच्या दृष्टीने पाहूं नका. शिवाय घड्याळ व आंगठी या वस्तु ऐनजिनसी देवघेवीला येथे उपयोगी पडणाऱ्या असल्या तरी त्या परदेशी वस्तु आहेत. येथील बाजारांत फक्त वस्तुवस्तूंचीच देवघेव होते. पण फिरून त्याहि खास नवलद्वीपांत तयार झालेल्या वस्तूंचीच ! परदेशी वस्तूंचा व्यापार येथे करणें हा फांशीच्या शिक्षेचा गुन्हा ठरतो. म्हणून संभाळा ! आणि पोलिसाची नजर चुकवून काय करावयाचें तें करा."

हें होतें तों सुमारे ११ वाजले. फार भूक लागली. किनाऱ्यावर उतरण्याच्या कौतुकांत जहाजावरील खाण्याचे माझे पदार्थहि होते ते खाल्ले नाहीत. म्हणून नाक्यावर पोलीस शिपाई दिसला, त्याला जाऊन विचारलें, "शिपाई-बुवा, कॉफीचा सुगंध कोठूनसा येतो आहे. तरी कॉफी पिण्याचें दुकान दाखवाल काय ?" त्यावर तो शिपाई हसून म्हणाला, "कॉफीच्या सुगंधाने तुम्हाला मोहविलें खरें; पण नवलद्वीपांत कॉफीचा उपयोग पिण्याकडे करीत नाहीत ! एक शोध असा लागला आहे की, डुकरांना कॉफी खाऊं घातल्याने तीं चांगलीं पुष्ट होतात; किंवा शहरांत गॅसची रोषणाई असते, ती करण्याकरिता कॉफी जाळतात. त्याचा तुम्हांला वास आला असेल."

भुलभुलाईंत सापडावें त्याप्रमाणे मी गोंधळून गेलों, मी पोलिसाला विचारलें, "पलीकडे हीं मोठमोठीं धुराडीं दिसतात, तीं कारखान्यांचीं असावींत. मग हे कारखाने कसले ?" त्यावर तो म्हणाला, "तें सांगून तुम्हाला कळणार नाही. तुमच्या नेहमीसारखे ते कारखाने नाहीत. अकल्पित पदार्थांचा अकल्पित उपयोग केल्याने देशांतील संपत्ति वाढते, म्हणजे नित्यनैमित्तिक गरजा फार चांगल्या भागतात, असा शोध कांही शास्त्रज्ञांनीं लाविलेला आहे. आणि त्या शोधाचे प्रचंड प्रयोग धुराडीं पेटलेल्या या कारखान्यांतून होत असतात. उदाहरणार्थ, नवलद्वीपची हवा थंड. येथे कॉफी मुबलक पिकते. पण उष्ण कटिबंधांतील फळझाडांची लागवड येथे व्हावी, म्हणून कृत्रिम उष्णता उत्पन्न करून पडदपोशीच्या मंडपांतून या फळझाडांचे प्रयोग सुरू आहेत. या मंडपांतील उष्णता

कायम राखण्याला जळण हवें म्हणून मोठमोठ्या चुलवणांतून कॉफी जाळतात. हें सर्व ऐकून मी वेडा बनण्याच्या बेताला आलों, व मोठ्याने म्हटलेंहि "कोण हा अविवेक! कोण हा मौल्यवान् वस्तूंचा निष्कारण नाश! उष्ण देशांतील फळें थंड देशांत पिकविण्याचा, सृष्टीविरुद्ध, हा प्रचंड खटाटोप करण्यापेक्षा हीं फळें ज्या देशांत मोठमोठ्या उघड्या बागांतून पुष्कळ पिकतात, तेथूनच तीं कां आणावीत नाहीत? कॉफी जाळून अशा फळांची लागवड येथे करण्यापेक्षा तें किती तरी अधिक स्वस्त पडेल!"

हे माझे उद्गार ऐकतांच तो घाबरला व रागवलाहि आणि म्हणाला, "हें काय तुम्हीं भलतेंच केलें? असें बोलणें हा नवलद्वीपच्या कायद्याप्रमाणे गुन्हा ठरतो. या देशांत या देशाच्या चालीरीतींची किंवा अर्थशास्त्राची जो निंदा करतो त्याला फांशीची शिक्षा देण्यांत येते, हें तुम्हाला माहीत नाहीसें दिसतें. तरी तुम्हाला कैद करणेंच मला प्राप्त आहे. चला मजबरोबर मुकाट्याने. पोलीस कमिशनर तुमचें काय करतील तें खरें." ह्याप्रमाणे मला त्या बड्या अधिकाऱ्याकडे नेण्यांत आलें. पण माझी सर्व हकीकत ऐकून घेऊन त्याने असें ठरविलें की, हा कोणी गृहस्थ अज्ञानी व विक्षिप्त दिसतो. असा परदेशी पाहुणा फार दिवसांत इकडे आला नव्हता. म्हणून त्याला शिक्षा न करतां सोडून द्यावें. माझें भाग्य थोर. असें म्हणून मी थेट परत बंदरची वाट धरली. जातांना आणखी एक चमत्कार दिसला. कांही लोक घराबाहेर चहा पीत बसले होते. ते एक घोट घेऊन झाला की जीभ बाहेर काढून भिंती चाटीत. मी बरोबरच्या शिपायाला विचारलें, "हे लोक असें काय करतात?" येथील लोकांचा हा कांही धर्माचार आहे की काय?" तो म्हणाला, "अलीकडे एक शोध असा लागला आहे की, सिमेंटांत साखर घातली म्हणजे तें फार सकस होतें, व त्याने बांधलेल्या इमारती शेकडो वर्षे टिकतात. यामुळे सिमेंटच्या कारखानदारांकडून साखरेला फार मागणी वाढली. मग गोरगरिबांना ती कशी मिळणार? जे लोक तुम्हीं आता भिंती चाटतांना पाहिले, ते कोणताहि धर्माचार पाळीत नसून, चहाला गोडी येण्याकरिता, साखर घालून केलेलें सिमेंट वापरलेल्या घरांच्या भिंती जिभेने चाटीत आहेत." फिरून नवलद्वीपच्या अर्थशास्त्राच्या निंदेचा उद्गार माझ्या अगदी ओठाशीं आला; पण फांशीच्या भीतीने मी तो तेथेच दाबला. मी तडक बंदरावर जाऊन गलबतावर चढलों आणि तांडेलाला म्हणालों, "बाबा, काय मागशील

तें देतों. पण कृपा करून गलबत या क्षणीं हाकाल आणि वाटल्यास दोन मैलांपलीकडे जाऊन उभा राहा. नाही तर किनाऱ्यालगत पसरलेल्या डिंकाला गलबताचा स्पर्श होतांच 'चिकटगुंडा' होईल, व येथेच उपाशीं मरावें लागेल. ”

त्या बिचाऱ्याला या शब्दांचा अर्थ कळला नाही. नवलद्वीपापासून एक कोसावर गलबत समुद्रांत गेलें, तेव्हा मात्र मी त्याला सर्व समजावून सांगितलें.

---

२४ मीराजीके प्रभु (परलोकविद्येला सर्टिफिकेट)

(सह्याद्रि, मे १९३५)

आज सकाळीं थोडा उशीरा उठून, अंधेरी येथील माझ्या घराच्या खिडकींतून समुद्राकडे पाहात, व डाव्या हाताच्या मुठीवर उजव्या हाताचीं बोटें तबल्यासारखीं नाचवीत शून्यदृष्टि असा बसलों होतों. टेबलावर चहाचा पेला निवत होता, पण तिकडे माझें लक्ष नव्हतें. इतक्यांत माझा मित्र दिवाकर दाराशीं येऊन, मोठ्याने हाक मारून, माझी समाधि बिघडवून, व खांद्याला हात लावून मला हालवून म्हणाला, “ बबन, हा काय चमत्कार आहे ? आणि मी तुला हाक मारली तेव्हा तूं हसतमुख असा पाहात होतास तो कोणाकडे ? ”

माझी समाधि भंगली त्या वेळीं खरोखरच मी न कळत आपल्या ठिकाणीं हसत असलों पाहिजे. वास्तविक तें कोणालाच उद्देशून नसलें तरी मी तें दिवाकरालाच लावून म्हणालों, “ तुझ्याशीं बोलत होतों; तुझी फजिती करीत होतों; म्हणून तुलाच हसत होतों. ”

दिवाकर म्हणाला, “ पण हें सारें मी येथे येण्यापूर्वी ? ”

मी म्हणालों, “ काय हरकत आहे ? मला जर परलोकांतील आत्म्याशीं बोलतां व त्यांना बोलावितां येतें तर शेजारी एक मिनिटाच्या अंतरावर राहणाऱ्या माझ्या जिवंत मित्राशीं मनाने मला बोलतां कां येऊं नये ? तुझ्या मनांत या खोलींत पाऊल ठेवतांना काय होतें, हेंच घे सांगतों पाहिजे तर !

तूं म्हणत होतास, " हा काय चमत्कार बबन ? आजच्या प्रभातच्या अंकांत ही जी बातमी तुझ्यासंबंधाने आली आहे ती काय ? "

दिवाकर म्हणाला, " चल, राहूं दे तें थोतांड ! " असें म्हणून तो माझ्या शेजारीं खुर्ची घेऊन बसला आणि हातांतून आणलेला प्रभातचा अंक त्याने टेबलावर ठेवला. तेथे आधींच मी उघडून ठेवलेला तांबड्या पेन्सिलीने खुणा केलेला प्रभातचा अंक पडलाच होता, त्याला हा आयताच जोडीदार मिळाला.

प्रभातमध्ये माझ्यासंबंधाने आलेल्या बातमीचा खुलासा समजून घेण्याकरिता तो अगदी उतावळा झाला होता आणि माझ्या बरगड्यांत बोटें रोवून मला डिवचीत होता; इतका की गाईचें वासरूं कासेला लावून, दूध पिण्याकरिता ढुश्या देतें त्याची मला आठवण झाली.

मी म्हणालों, " प्रभातमध्ये बातमी लिहिली आहे ती अगदी सोप्या बिनचूक मराठींत लिहिली आहे. मग त्याचा खुलासा तो काय विचारतोस ? "

दिवाकार म्हणाला, " तें सारें ढोंग मला समजतें. पण बऱ्या बोलाने खुलासा—नव्हे चुकलों हकीकत—न सांगशील तर वासरासारख्या ढुश्याच न देतां टक्करींत पराभूत झालेल्या बैलासारखा लोळवीन हें मात्र पक्कें समज."

दिवाकर खरोखरीच टकरी बैलासारखा होता. मी आणखी उशीर केला असता तर मला तो खरोखरच खुर्चीवरून खाली ओढून आपल्या वज्रमुष्टीने गुद्दे चढविता. म्हणून हें टाळण्याकरिता मी एकदम म्हणालों, " सांगतों. सबूर कर. सर्व कांही सांगतों." आणि निवालेला चहा खिडकींतून फेकून देऊन घरांतून फिरून चहा करण्याचा हुकूम सोडून मी दिवाकराला म्हणालों, " आहे की नाही गंमत ! परलोकविद्येला सर्टिफिकेट मिळालें की नाही ! आणि तेंहि कोणाकडून तर एका मोठ्या संस्थानिकाकडून ! पण त्यांत एकच गोष्ट सुमार झाली ती अशी की, मी तुझ्यासारखाच मुंबईतल्या गूढविद्या–चिकित्सक मंडळाचा सभासद आहें हें पुष्कळांना माहीत आहे, तेव्हां या सर्टिफिकिटाची वावडी वरच्या वाऱ्याला लागणार, की गिरकी खाऊन फाटून तुटून पायमाल होणार हें पाहावयाचें आहे. "

दिवाकर म्हणाला, " याच्या मुळाशीं कांही तरी कपट आहे हें मीं तुझें नांव पाहतांच ओळखलें. पण कांहीच तर्क चाले ना. तेव्हा म्हटलें की, तुझें कोडें तूंच उलगडशील. ईजिप्तमधील एक वास्तुदेवता प्रवाशाला कोडीं घालते आणि तीं त्याला सुटलीं नाहींत म्हणजे शेवटीं स्वतःच त्याचा

अर्थ सांगून प्रवाशाचा बळी घेते ! तसा वाटेल तर माझा बळी घे. पण तुझें कोडें तूंच सोडवून सांग. ”

मी म्हणालों, “ तुझा बळी कांही घेत नाही; पण मी खरी हकीकत न सांगेन तर टकरी बैलाकडून स्वतः माझ्यावर प्राणसंकट येणार होतें तें मीं वांचविलें एवढें मात्र खरें.”

मग टेबलावरचे प्रभातचे दोन्ही अंक गुंडाळून ठेवून, मीं चहाच्या तबकाला जागा केली आणि म्हणालों, “ एक महिन्यापूर्वी ढवळपूरचे राजेसाहेब नंदीदुर्ग यांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीच्या सहीने प्रसिद्ध झालेली जाहिरात तूं वाचली असशीलच ? ”

दिवाकर म्हणाला, “ हो तर. परलोकविद्येच्या खरेपणाविषयी महाराजांकडून जो सर्टिफिकीट मिळवील त्याला सर्टिफिकिटाबरोबर पांच हजार रुपये इनाम मिळेल, असें त्यांत आव्हान केलें होतें. मला तेव्हाच वाटलें की, या स्वारीला कोणी तरी बनविलें खास ! कारण जगांतल्या सगळ्या विषयांचें ज्ञान आपल्याला आहे अशी या घमेंडनंदनाची समजूत आहे. एरवीं गाण्या-बजावण्याच्या मैफली करून रंगमहालांत नायकिणी नाचविणें व शर्यतीच्या मैदानावर घोडे नाचविणें याशिवाय दुसरी कोणतीहि विद्या ज्याला येत नाही, त्याला परलोकविद्येची ही उठाठेव कशी सुचावी याचेंच मला आश्चर्य वाटलें.”

मी म्हणालों, “ मलाहि तसेंच आश्चर्य वाटून, जमलें तर या राजेसाहेबांना आणखी बनवावें अशी बुद्धि झाली. बऱ्याच रात्री विचारांत घालविल्या; पण म्हणतात ना ‘लाभांतून लाभ निघतो’ तशी गोष्ट झाली.”

दिवाकर उत्सुकतेने म्हणाला, “ तें कसें काय ? ”

मी म्हणालों, “ त्याचें असें झालें. अलीकडे मीं रेडिओ सेटस् विकण्याची व बसवून देण्याची एजन्सी घेतली आहे, हें तुला माहीतच आहे. आठ दिवसांपूर्वी माझी अकरा सेटची ऑर्डर निरनिराळ्या गिऱ्हाइकांकडून पुरी झाली. आणि कमिशन एजन्सीच्या नियमाप्रमाणे मला बारावा सेट फुकट मिळावयाचा होता. बाकीचे अकरा सेट मुंबईतच खपले व आता या बाराव्या सेटचें काय करावें याचा विचार करूं लागलों. तों पूर्वी एकदा वाचलेली ढवळपूरच्या राजेसाहेबांची जाहिरात फिरून अभावितपणें नजरेस पडली. तेव्हा या द्विरुक्तीचा अर्थ मला लाभ होणार असा करून चौकशी चालविली.

प्रथम दोन मुद्द्यांवर खात्री करून घेतली. एक हा की, ढवळपूरच्या राजधानींत विजेच्या पुरवठ्याची योजना झालेली आहे; व दुसरा असा की, त्या शहरांत पूर्वी आजपर्यंत एकहि रेडिओचा सेट कोणी घेतलेला नाही. नंतर मुंबईच्या रेडिओ मेसेज पाठविणाऱ्या कचेरींत गेलों. तेथील मुख्य संचालक बर्जोरजी शावक शाह हा माझा स्नेहीच होता. त्याला म्हणालों, " गड्या, एक काम आहे. करशील ? " तो म्हणाला, " तें काय ? " मी म्हणालों, " काम असें की, मी सांगेन त्या दिवशीं रात्रीं २।-२॥ वाजण्याचे सुमाराला मला तुझा रेडिओ ट्रॅन्समिटर तास अर्धा तासपर्यंत चालवून वापरावयाला दे." तेव्हा तो आश्चर्याने म्हणाला, " तो कशाला ? आणि इतक्या रात्रीं ? त्यावर अशा वेळीं कोणी बोललें-गाइलें तर तें ऐकणार कोण ? आमचे कार्यक्रम ११॥ ला संपतात व सकाळीं ८ ला सुरू होतात." मी त्याच्या पाठीवर थाप देऊन म्हणालों, " अरे, तुझे प्रोग्रॅम बांधल्या वेळेचे असतात. तेव्हा त्या वेळीं तुझें यंत्र मला कसें मिळणार ? म्हणून ही मधलीच वेळ काढली आहे. आणि ती झाली तरी मला एक विशेष प्रयोग करून पाहावयाचा आहे म्हणून." इतकी साधी गोष्ट माझा मित्र नाकबूल कशी करणार ? " हे रावसाहेब अमुक दिवशीं रात्रीं दोन वाजतां आले, तरी त्यांना किंवा चिठी आणील त्याला ऑफिस उघडून द्यावें " अशी बर्जोरजीने आपल्या पहारेवाल्याला ताकीद दिली.

नंतर मी असा विचार करूं लागलों की, ढवळपूरच्या राजेसाहेबांच्या खात्रीचा मेलेला असा माणूस कोण की, ज्याचें भाषण किंवा गाणें ऐकण्याकरिता ते उत्सुक असतील ? मग शोध करतां असें कळलें की, त्यांच्या पदरीं असलेली 'मीरा' नांवाची नायकीण त्यांचें बरेचसें डबोलें घेऊन पळून गेली. ती मुंबई शहरांतच राहते. आपलें नांव बदलून तिनें गायनाचा धंदा मुंबईत सुरू ठेवला आहे; पण या संस्थानिकाचा उपद्रव टळावा म्हणून आपण मेल्याची बातमी मुद्दाम उठवून ती जाहिरात रूपाने मुंबईच्या " टाइम्समध्ये " युक्तीप्रयुक्तीने छापून देऊन इतर रीतींनीहि राजेसाहेबांच्या हस्तकांकडून आपण मेल्याविषयी तिने त्यांची खात्री पटविली आहे.

" योगायोग म्हणतात तो हा असाच. मी तडक उठून 'मीरा' नायकिणीचा शोध लावून तिजकडे गेलों. पण तिच्या कपटाची ओळख न देतां तिला तिने नवीन धारण केलेल्या 'गुलाब' या नांवानेच तिच्याशीं संभाषण केलें. तिच्या एका मैफलीचा ठराव केला. तिने मागितलेली बिदागीची रक्कम

कबूल केली. ही मैफल अगदी खास गाण्याच्या शौकीन अशा लोकांकरिता व्हावयाची आहे, आणि श्रोत्यांना मध्यरात्रीच्या नंतरचे राग ऐकवावयाचे आहेत असें सांगून, अवेळीं गाणें करण्याच्या कारणाची बतावणी केली. जागेविषयी तिने कांहीच चौकशी केली नाही, शिवाय जागा रेडिओ ऑफिस ठरविली होती. तरी तिचें नांव मीं भलतेंच सांगितलें !

इतकी सगळी तयारी करून ढवळपूरच्या राजेसाहेबांच्या सेक्रेटरींना लिहून कळविलें की, "मी परलोकविद्येच्या शाबितीच्या बक्षिसाचें आव्हान स्वीकारण्यास तयार आहें." मला निमंत्रण व प्रवासाच्या खर्चाचे पैसेहि आले. मुंबईतील कार्यक्रम ठराविक दिवशीं रात्रीं कसा पार पाडावयाचा हें रेडिओ कचेरींतल्याच माझ्या एका हुषार स्नेह्याकडे सोपवून, एक स्नेही विश्वासांतला बरोबर घेऊन मी ढवळपुरास गेलों. आणि बरोबर नेलेल्या स्नेह्याची ओळख तो परलोकांतील आत्मे बोलावणारा 'मीडियम' अशी करून दिली. आणि हा 'मीडियम' सांगेल त्या दिवशीं व वेळीं प्रयोग होईल, इतर वेळीं हुकुमी होणार नाही, तरी दिवसाचें व वेळेचें मात्र बंधन राजेसाहेबांनी मान्य करावें असें मोठ्या अदबीने सांगितलें. आम्ही ज्या गेस्ट हाउसमध्ये उतरलों तेथेंच प्रयोग करणें सोयीचें असें ठरवून घेतलें. बोलून चालून मृत आत्म्याचें प्रकटीकरण तें राजवाड्यांत कशाला ? नांदती जागा अशा कामाला योग्य नाही, तर बकाली धर्मशालावजा गेस्ट हाउसची जागा चांगली, हें राजेसाहेबाना पटलें. गेस्ट हाऊसमध्ये आम्हीच तेवढे पाहुणे असल्यामुळे आम्ही पुढील दाराला कडी लावून घेऊन मागील गच्चीवर जाऊन कोणास न कळत एअरीअलचे खांब व तार उभी केली आणि एका कपाटांत रेडिओ सेट लावून लपवून ठेविला. रात्रीं २ वाजतां तातडीने राजेसाहेबांकडे निरोप गेला. तेव्हा परलोकविद्येची कसोटी पाहून ती खोटी ठरविण्याच्या उमेदीने ठरल्याप्रमाणे महाराज एकटे एक नोकर घेऊन आले. प्रथम इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर मी म्हणालों, "राजेसाहेबांचें आमंत्रण तर मीं स्वीकारलें आणि माझा प्रयोग यशस्वी होईल अशी मला उमेदहि वाटते. पण मृतात्मे आणि मीडियम यांची एकतानता होण्याचीच जरा अडचण असते. शिवाय मृतात्मे लहरी असतात. एकाला बोलावलें, तरी दुसराच एखादा हट्टाने घुसून येतो. म्हणून प्रयोग सुरू केल्यावर राजेसाहेब हुकुमी ज्या मृतात्म्याला बोलावतील तोच येईल असें नाही. तथापि, जो येईल तो मृतात्माच आहे अशी राजे-

साहेबांची पक्की खात्री असल्यावर मग मात्र प्रयोग यशस्वी झाला याविषयीं शंका घेतली जाऊं नये." तें राजेसाहेबांनी कबूल केलें.

नंतर २॥ वाजण्याला १० मिनिटें होतीं. ह्या वेळांत माझ्या मित्राने प्लँचेटच्या कांहीं निरर्थक खेळ चालवून टेलिफोनवर बोलतांना ऐकलें न ऐकलें असें होऊन बोलणारा 'हां हूं' करीत असतो तसा प्रकार परलोकाशीं टेलिफोन जोडल्याच्या ऐटीने त्याने सुरू केला. त्याचा फायदा घेऊन मीं राजेसाहेबांशीं सहज संगीताच्या गोष्टी काढल्या. कारण कोणाच्याहि विद्येची गोष्ट निघाली असतां ती आपल्याला माहीत नाहीं असें कबूल करणें राजेसाहेबांना अशक्य होतें. त्याचा फायदा घेऊन प्रथम त्यांच्या गायनप्रियतेच्या लौकिकाची, मग त्यांच्या रसिकतेची, मग त्यांच्या औदार्याची, मग गेस्ट हाऊसमध्ये झालेल्या अनेक मैफलींची, मग त्यांच्या पदरीं पूर्वी असलेले नामांकित गायक व गायिका यांची स्तुति मीं केली. तेव्हा 'मीरा' नायकिणीची गोष्ट सहजच निघाली. लगेच महाराजांनी दुःखाचा सुस्कारा टाकून ती कांहीं दिवसांपूर्वी मेल्याची हकीकत सांगितली व तिच्या गाण्यासारखें गाणें पुन्हा ऐकावयाला मिळणार नाहीं अशी ग्वाही दिली! इतक्यांत अडीचच्या ठोका पडल्याबरोबर माझ्या मीडियमरूपी मित्राने एखाद्या देवऋषीची ऐट आणून तोंडाने 'हं हूं' करीत स्वर्गीय टेलिफोनवर बोलणें ऐकूं येऊं लागल्याची ऐट व अंगविक्षेप केले. तोंच, आकाशांतून गाणें कानावर पडावें त्याप्रमाणे, 'मीरा' नायकिणीच्या ख्याली अस्ताईचे आलाप उमटून त्या शांत वेळीं गेस्ट हाउसच्या दिवाणखान्यांत घुमूं लागले. हें होतांच प्रकाश हा " परलोकवासी आत्म्याशीं संभाषण-व्यवहार करण्याला बाधक होतो" असें म्हणून मी बाकीचे विजेचे दिवे मालवून फक्त एक लहानसा हिरव्या कांचेचा दिवा शिल्लक ठेवला. त्यामुळे अंधार तर सर्वस्वी गुडुप असा पडला नाहीं, पण त्या रंगीत प्रकाशाने परिस्थितीचा अद्भुतपणा वाढला खास!

मीरा नायकिणीचा तो ओळखीचा आवाज कानीं पडतांच, राजेसाहेब अगदी गलबलले आणि 'आं हें काय' असें मोठ्याने म्हणूं लागले. मी म्हणालों, "महाराजांना काय ऐकूं येतें?" राजेसाहेब म्हणाले, "अहो, 'मीरा' नायकिणीचा आवाज मी प्रत्यक्ष ऐकत आहें! आणि ती तर कांहीं दिवसांपूर्वी मेली!" मी म्हणालों, "छे, छे, राजेसाहेबांना हा भ्रम झाला असेल, गोड गळ्याच्या गाण्याचा आवाज ऐकूं येतो खरा. पण तो मीराचा नसेल." पण राजेसाहेब म्हणाले, "छे, छे, शंका कसली?" मी म्हणालों,

"मला तर हा आवाज मेलेल्या माणसासारखाहि वाटत नाही." पण राजेसाहेबांनी स्वतःच सगळ्या शंकांचा निरास केला. ते म्हणाले, "अहो, मी एक वेळ माझा आवाज विसरेन, पण मीराचा आवाज सतत दहा वर्षे ऐकला तो कदापि विसरणार नाही, शिवाय ती मेल्याचा मजजवळ नक्की पुरावाहि आहे. मग बोलूं द्याल का हो मला तिच्याशीं?" महाराज अगदी काकुळतीला आलेसे दिसले.

पण मी म्हणालों, "तें आमच्या मीडियमसाहेबांना विचारा. या कामीं त्यांची काय बुद्धि चालेल तीं खरी." तेव्हा माझा मित्र दुःखाचा सुस्कारा टाकून म्हणाला, "मृतात्मे हे मोठे लहरी असतात. शिवाय ती नायकीण झाली तरी विनयशीलच असणार. आम्ही किती केलें तरी परकी माणसें. आमच्या देखत आपण प्रश्न विचाराल त्यांचीं उत्तरें देण्याला ती कदाचित् लाजेल. तेव्हा या प्रथम प्रयोगांत आपण या विद्येची अधिक परीक्षा पाहूं नये. आजचा प्रयोग हा केवळ आपल्या जाहिरातीला उत्तर म्हणून करण्यांत आला आहे. तरी आज महाराजांनी इतकेंच करावें की, प्रेमाच्या जुन्या सर्व आठवणी विसरून, हा मृतात्मा केवळ आपल्याच इच्छेने करील तेंच आज त्याला करूं द्यावें. महाराजांच्या उदार आश्रयाने भारावलेली ही गायिका कृतज्ञतेला अगदीच पारखी होईल असें नाही. न जाणो यापुढे हळूहळू सर्व गोष्टी महाराजांच्या मनाप्रमाणे होतीलहि."

मंत्रविद्येच्या प्रयोगांत राजावरहि मांत्रिकाचा ताबा राहतो; म्हणून या वेळीं राजेसाहेबांनाहि आपलें राजेपण बाजूला ठेवून मीडियमचें ऐकावें लागलें. मात्र त्याचा मोबदला म्हणून त्यांना आपल्या आवडत्या गायिकेचें गाणें एक तासभर ऐकावयास मिळालें. हें गाणें चालू असतां मधूनमधून 'वाहवा' 'खाशी' वगैरे किंवा इतरहि शब्द ऐकूं येत. तें काय असावें असें राजेसाहेबांनी विचारलें तेव्हा माझा मित्र म्हणाला, "महाराज, आत्मा परलोकांत गेला तरी रसिक तो रसिकच. असलें सुंदर गाणें ऐकावयाला मिळालें असतां, आसपासचे रसिक मृतात्मे तें ऐकावयाला कां न येतील?" मग मी म्हणालों, "महाराज, पण सगळ्या गोष्टींतली गोष्ट ही सांगा की, मीरा खरोखरच मेली का जिवंत आहे?" तेव्हा महाराज आवेशाने म्हणाले, "अहो ती मेली म्हणूनच आज ती या ठिकाणीं नाही हें समजा. ती या पृथ्वीच्या पाठीवर कोठेहि जीवंत असती, तर तिला मी हातची जाऊं देत होतों? काय बिशाद!"

या ठिकाणीं आपल्या राजेशाहीचा संचार अंगांत होऊन महाराजांनी "ती मेली म्हणूनच आज राजवाड्यांत नाही" असें तीन तीनदा बजावून माझें कार्य अप्रत्यक्ष रीत्या सुलभ केलें. तेव्हा मी मुद्द्यावर येऊन म्हणालों, "महाराज तर मग आता परलोकविद्या खरी की खोटी?" अर्थात् मीराचें मरण खरें ठरल्यावर, तिचें गाणें हें परलोकांतून आल्याची कबूली दिल्याशिवाय महाराजांना सुटका नव्हती आणि मीराच्या गोड आठवणींत त्यांनी लगेच पांच हजारांचा चेक लिहून माझे अंगावर टाकला. तो तर मी खिशांत घातलाच, पण म्हणालों, "आपल्या चेकपेक्षा आपल्या सर्टिफिकिटाचीच मला किंमत अधिक वाटते." पण मनांत म्हणालों, "गूढविद्या-चिकित्सक मंडळाचा एक सभासद म्हणून परलोकविद्येची फजिती करण्याकरिता." लगेच महाराजांनी सर्टिफिकेटहि लिहून दिलें. मुळीच आढेवेढे घेतले नाहीत. पण फिरून त्याचेंहि कारण त्यांच्या राजाधिकाराचा अहंकारच! मीरा जीवंत असेल तर ती आज राजवाड्यांतच असावयाची, दुसरी गोष्ट नाही. तेव्हा ती मेली हें खास आणि ज्याअर्थी मेलेल्या मीराचें गाणें राजवाड्यांत ऐकलें, त्याअर्थी तें परलोकांतलि मृतात्म्याचें गाणें यांत काय संशय?

असो. इतकें जाग्रण झाल्याने महाराज निजावयास गेले. दुसऱ्या दिवशीं आम्ही राहतों तर रीतीप्रमाणे आमच्या प्रवासखर्चाची तजवीजहि झाली असती. पण मला व माझ्या मित्राला येथून पाय केव्हा काढतो असें झालें होतें. म्हणून दुसरे दिवशीं मुक्काम करण्याची खोटी बतावणी करून गेस्ट हाऊसच्या अधिकाऱ्याला आम्हीं घरीं निजावयास पाठविलें आणि रेडिओ सेट ट्रंकेंत घालून भाड्याची गाडी करून आम्हीं तडक स्टेशन गांठलें. त्या घाईत गच्चीवरील एअरिअलचे तार व खांब हीं मात्र उसकटावयाचीं राहिलीं. त्यासंबंधाने दुसरे दिवशीं गेस्ट हाउसच्या अधिकाऱ्याने काय कल्पना केली असेल सांगवत नाही. पाहुण्यांचे कपडे वाळत घालावयाचे तर खाली दांड्या काय कमी होत्या? असें म्हणून तो नोकरावर रागावला असेल झालें!

इतकी हकीकत सांगून झाल्यावर दिवाकर हसून म्हणाला, "मग प्रभात पत्रांतील परलोकविद्येच्या सार्टिफिकिटाची बातमी बहुधा तूंच पाठविली असशील?" मी म्हणालों, "हां, अलबत. परलोकविद्येला सार्टिफिकेट माझ्या हातीं. मग ती बातमी दुसरा कोण प्रभातला देणार! पण तेंहि मोठ्या युक्तीने

केलें हां." मग दिवाकर म्हणाला, "युक्ति तरी कशाला? प्रत्यक्ष सर्टिफिकेटच तुझ्या खिशांत आहे, मग बातमी खोटी कोण म्हणेल?"

मग मुद्दा इतकाच राहिला की, दिवाकर व मी दोघेहि परलोकविद्या ही खोटी आहे असा चंग बांधून वाद करणारे. 'गूढविद्या-चिकित्सक मंडळा'चे कट्टे सभासद. म्हणून ती विद्या खोटी कशी आहे, निदान तिच्यांत कपट-प्रयोग किती होतात, हें सोदाहरण सिद्ध करण्याकरिता ही हकीकत सविस्तर झाली तशी 'सह्याद्री'कडे प्रसिद्धीला पाठवावी आणि आपल्या तत्त्वनिष्ठेला जागावें किंवा आयते मिळालेले पांच हजार रुपये खिशांत घालावे आणि ढवळपूरचे महाराज व परलोकविद्येच्या नादाने प्रॅंचेटें खेळविणाऱ्या लोकांच्या मूर्खपणाला मनांत हसत राहावें? पण या द्वंद्वांत आमच्या तत्त्वनिष्ठेचीच सरशी झाली. दिवाकरादेखत मी तो पांच हजारांचा चेक ढवळपूरचे महाराज नंदीदुर्ग यांना परत केला आणि या प्रकारांत घडलेली खरी हकीकत 'सह्याद्री'-कडे लिहून पाठविली. मग ती संचालक छापोत वा न छापोत.

---

२५ इथे कायदा काय रडेल?

(सह्याद्रि, सप्टेंबर १९३५)

"काय रे शंकर, रावसाहेबांची तब्येत आज कशी काय आहे?"

"कोणती तब्येत विचारतां भाऊसाहेब?"

शंकर हा विनयशील मुलगा होता. परंतु थोडा विनोदीहि असे. एरवीं तो माझ्या प्रश्नाला उलट प्रश्न न विचारतां सरळ उत्तर देता. म्हणून आज त्याच्या विनयाचा विसर पाडण्याइतका कांही तरी विनोद त्याला सुचला किंवा अनुभवाला आला असेल, अशी खात्री वाटून मी हसून फक्त इतकेंच म्हणालों, "कोणत्याहि तब्येतीची हकीकत सांग."

त्यावर तो म्हणाला, "इस्पितळासंबंधाची तब्येत बरी आहे तशीच आहे."

"मग दुसरी कोणती तब्येत म्हणतोस?" मी खरोखरच उमज न पडल्याने विचारलें.

याचें उत्तर देतांना प्रथम तो किंचित् हसला. पण लगेच थोडासा गंभीर

चेहरा करून म्हणाला, "शर्यतीं मैदानासंबंधाची तब्येत सुधारतां दिसत नाही."

"म्हणजे ?" मी आश्चर्यानें विचारलें.

"कारण रावसाहेबांना आता शर्यतीच्या मैदानावर जातां येत नसलें, तरी त्यांनी पडल्या पडल्या जुगार सुरू केला आहे."

मला कांहीच तर्क होईना. म्हणून मी पुन्हा म्हणालों, "बरं, बरं, सांग तर खरं."

इस्पितळाच्या दुसऱ्या मजल्यावरची शेवटची खोली स्पेशल घेऊन तींत रावसाहेबांना ठेवण्यांत आलें होतें. शंकर किंचित् खोलींत डोकावून म्हणाला, रावसाहेब झोपेंत आहेत. तरी क्षणभर आपणाला बाहेर व्हरांड्यांतच खुर्ची देतों" असें म्हणून हळूच, पाय न वाजवितां, त्याने खुर्ची आणली. तिजवर मी बसलों आणि शंकरला म्हणालों, "सांग पाहूं आता रावसाहेबांच्या दुसऱ्या तब्येतीची काय हकीकत आहे ती! तूं बी. ए.ला मानसशास्त्र हा विषय तत्त्वज्ञानांतला घेतला होतास. तेव्हा सिव्हिल सर्जन हे जसे रावसाहेबांच्या शरिराची चिकित्सा करणार, तशी तूंहि त्यांच्या मनाची करणारच. मानसशास्त्रांतला एक प्रयोगच तुला आपोआप पाहावयास मिळाला म्हणावयाचा."

पण शंकराने सांगितलेल्या हकीकतीपूर्वी रावसाहेब इस्पितळांत कसे आले हें थोडक्यांत सांगतों.

* * *

गेल्या शनवारचीच गोष्ट. पुण्यांतील पावसाळी शर्यतीच्या कार्यक्रमांतली गव्हर्नर कपाची शर्यत होती. ती रावसाहेब कशी चुकविणार ? पण कोर्टांत त्या दिवशीं साक्षीपुराव्याचा त्यांचा एक मुकदमा चालू होता. म्हणून त्यांची लवकर सुटका होई ना. शर्यतीच्या वेळेला अवघीं वीस मिनिटें होतीं, असें पाहून कांही तरी निमित्त सांगून मुनसफाची विनवणी करून, मुकदम्याचें काम थांबवून त्यांनी पुढची तारीख घेतली. बाहेर मोटार उभीच होती. पण आज ड्रायव्हरला वेळेचें महत्त्व कळणार नाही म्हणून त्यांनी स्वतःच मोटारचें चाक आपल्या हातीं घेतलें. आणि मोटार बेसुमार भरधाव काढली.

त्यांचें सर्व लक्ष शर्यतीच्या मैदानाकडे लागल्याने समोरून येणाऱ्या दुसऱ्या मोटारी, कंदिलांचे खांब, वगैरे त्यांना कांहीं दिसे ना, अशा स्थितींत पुलाकडे रस्ता वळतो तेथील लोखंडी खांबावर त्यांची मोटार इतक्या जोराने आदळली की, खांबहि निखळला! मोटारीचा चुराडा झाला! कांचा फुटून अंगातोंडांत घुसल्या, आणि डोक्याला इतका जबरदस्त धक्का बसला की, ते बेशुद्ध पडले. हा प्रकार इस्पितळाजवळच झाला; त्यामुळे त्यांच्या ड्रायव्हरने ताबडतोब त्यांना इस्पितळांत पोचविलें. अर्ध्या तासाने मला खबर कळल्यावर मी जाऊन त्यांची सर्व व्यवस्था करून दिली. स्पेशल खोली, अखंड वेळ शुश्रूषा करण्याकरिता पहारे करणारे परिचारक, सर्व कांही ठीक झालें. रावसाहेबांसारख्या श्रीमंताला काय कमी? पण शरिरापुढे काय करणार! बेशुद्धीमुळे त्यांना अंथरुणावरच जखडून ठेवण्यांत आलें होतें. मेंदूला धक्का बसल्यामुळे त्यांना भ्रम झाला होता. यामुळे जेव्हा ते जागे होऊन बोलूं लागत, तेव्हा भ्रमिष्टासारखे बोलत; आणि बोलत त्यांतला विषय शर्यतीचाच असे.

* * *

असो. शंकर म्हणाला, “ रावसाहेबांचा भ्रम लवकर जाईलसें दिसत नाही, याचें वाईट वाटतें. पण ते भ्रमांतहि जुगारीचेच चाळे करतात तें पाहून हसूं आल्याशिवाय राहात नाही.”

वेडेपणाची हकीकत ऐकतांना वेड्याबद्दल सहानुभूति वाटली तरी, त्याच्या चाळयाचें हसूं कोणालाहि येणारच.

रावसाहेब शर्यतीचे चाळे इस्पितळांतल्या अंथरुणांत करतात हें ढोबळ वर्णन ऐकून मलाहि हसूं आलेंच. पण ते चाळे तरी काय करतात हें समजण्याची उत्कंठा वाटून मी शंकराला तसें विचारलें. तेव्हा तो म्हणाला——

“ आज सकाळचीच गोष्ट. रावसाहेब चांगले जागे झाले. त्यांना थोडें दूध व ब्रँडी मिळून एक डोस दिला व चिकनसूपचे चार चमचे त्यांना खाऊं घातले व ते डोळे उघडून स्वस्थ पडले. तेव्हा त्यांना कांही तरी वाचून दाखवावें म्हणून, एक ताजें वर्तमानपत्र व पुस्तक घेऊन, मी जवळच खुर्ची घेऊन बसलों, आणि कांही वाचून दाखवूं का असें विचारलें. तेव्हा ते मला म्हणाले, “ खुळ्या वाचतोस् काय? जरा करमणूक तर कर खरी.” मी म्हणालों, “ करमणूक? ती कसली?” ते म्हणाले, “ सांगतों पाहा. त्या पलीकडच्या खिडकींत चिमणी येऊन बसली आहे ना? आणि चिलटें खाण्याकरिता

खोलीभर उडतांना मधून मधून ती खोलींत टांगलेल्या विजेच्या दिव्यांवर बसते ना ? तर मग आता आपण असें करूं. हा दिवा पश्चिमेकडला. हा पूर्वेकडला. मी म्हणतों की, यानंतर चिमणी उडून पश्चिमेच्या दिव्यावर बसेल. मग तूं काय म्हणतोस बोल ?"

" मी काय बोलणार ! पण एवढा मोठा माणूस विचारतो त्याला उत्तर दिलें पाहिजे. शिवाय रावसाहेबांची लहर कोणत्या खेळाकडे झुकत आहे हें पाहून मी म्हणालों, " मला वाटतें ती पूर्वेकडच्या दिव्यावर बसेल." लगेच रावसाहेब म्हणाले, " शाबास, मर्द आहेस. तर आपण पैज मारूं. पश्चिमेच्या दिव्यावर चिमणी बसली, तर तूं मला दोन रुपये द्यावे, आणि पूर्वेकडच्या दिव्यावर बसली तर मी तुला दोन रुपये देईन."

" झालें. रावसाहेबांबरोबर मीहि जुगारी बनलों. क्षणभरांत चिमणी उडून इकडे तिकडे फिरून येऊन पश्चिमेच्या दिव्यावर बसली. लगेच अंगांत होतें नव्हतें तेवढें बळ एकवटून रावसाहेब ओरडून म्हणाले, " जिंकली रे जिंकली. टाक दोन रुपये."

" मी हसण्यावारी हें घालविणार होतों; पण खरोखरच एखाद्या जुगाऱ्याने आवेशाने मोहरा करावा त्याप्रमाणे रावसाहेब डोळे फिरवून म्हणाले, " हां, तें कांही चालवयाचें नाही. टाक दोन रुपये आधी. मग पुढची गोष्ट."

" भ्रमांतली लहर खरी, पण ती न पुरवावी तर रावसाहेबांचा चित्तक्षोभ व्हावयाचा ! म्हणून मीं खिशांतले दोन रुपये काढून जवळच्या टेबलावर ठेवले. रावसाहेबांना मोठें समाधान वाटलें. चिमणीहि दिव्यावरून उडून गेली."

" पण इकडे तिकडे हिंडून एक दोन चिलटें, एखादा कोळी, किडामुंगी खाऊन, फिरून ती खिडकीवर येऊन बसली. आता बहुधा ती लवकरच दुसऱ्या मोहिमेवर निघून, वाटेंत कोणत्या तरी दिव्यावर मुक्काम करणार असें वाटून रावसाहेब मला म्हणाले, " हां, चल बोल आता चिमणी कोणत्या दिव्यावर बसेल ?"

" मी म्हणालों, " आपण कोणत्या दिव्यावर बसेल म्हणतां ?"

" रावसाहेब म्हणाले, " पूर्वेच्या दिव्यावर."

मला " पश्चिमेच्या दिव्यावर " म्हणणें भागच होतें.

लगेच रावसाहेब म्हणाले, " नाही, पूर्वेच्याच दिव्यावर ! लाव दोन रुपयांची पैज !"

" क्षणांत चिमणी उठली ती फिरून पश्चिमेच्याच दिव्यावर बसली. म्हणजे या वेळीं मीं पैज जिंकली असें पाहून रावसाहेबांनी दुःख झाल्याप्रमाणे वाईट तोंड केलें, व म्हणाले, 'घे बाबा, ते दोन रुपये. मी हरलों खरा.' लगेच मीं ते रुपये उचलले व खिशांत टाकले.

" फिरून रावसाहेबांचा चाळा सुरू झाला. चिमणी आपली मोहीम संपवून खिडकीवर येऊन बसली असें पाहून रावसाहेब म्हणाले, " आता मी म्हणतों की, चिमणी पश्चिमेच्या दिव्यावर येऊन बसेल."

" पण मला हा खेळ पुढे चालवावा असें वाटेना. मी पैज लावीत होतों ती त्यांच्या करमणुकीकरिता. बरें, त्यांत दोन रुपये गेले ते परत आले. तेव्हा आता वेळ मारून न्यावी म्हणून मी कांही न बोलतां गप्प बसलों. फ्लॉवर-पॉटमध्यें फुलें कांही एका आकाराने लावलीं होतीं, तीं दुसऱ्या एका आकारानें बसवावीं, म्हणजे कांही तरी हाताने चाळा करावा म्हणून मी उठलों.

" पण रावसाहेब कसले गप्प बसूं देतात. ते जुगाराच्या ईर्षेने मला म्हणाले, " काय शंकर ! माझा सवाल पश्चिमेकडच्या दिव्याचा आहे. तुझा बोल, लाव दोन रुपयांची पैज."

" पण उत्तर तर द्यावें व पैज तर लावूं नये, म्हणून मीं या वेळीं एक युक्ति केली. मीं म्हणालों, " रावसाहेब, मलाहि वाटतें की, चिमणी पश्चिमेच्याच दिव्यावरच बसेल. "

" झालें ! दोघांचे सवाल एकच पडल्यावर पैज कसची लागणार ? राव-साहेब हिरमुसले झाले. कारण त्यांची जुगार थांबली. उलटसुलट पैज मारली तरच जुगार होते. पैज लागत नाही असें पाहून रावसाहेब म्हणाले, " छट् ! बेट्या, तूं कच्च्या दिलाचा आहेस. तुला पैजा लावावयाच्या कळत नाहीत. आता तूं आधी सांग, चिमणी कोणत्या दिव्यावर बसेल तें. आणि मी हटकून उलटें बोलून पैज लावतों; की नाही तें पाहा ! अरे, मर्दासारखी पैज लावण्याची संधि येते ती सोडतोस कसा ? आणि पैजेचे विडे न उचलशील तर उद्या जगांत तुझें कसें होईल ? "

" इतकें बोलणें होतें तोंच सिव्हिल सर्जनची रोगी तपासण्याची फेरी रावसाहेबांच्या खोलीशीं येऊन थांबली. अर्थातच विषय बदलला, खेळ राहिला. रावसाहेबांचे डोळे नीट उघडून पाहून डॉक्टर म्हणाले, " अजून भ्रमाची लहर हटत नाही."

ही हकीकत ऐकून मी म्हणालों, " तूं रावसाहेबांच्या दोन प्रकृतींविषयी बोललास तेंच खरें. त्यांची शरीरप्रकृति सुधारत आहे, पण मानसप्रकृति सुधारल्याचें चिन्ह दिसत नाही."

* * *

इतक्यांत रावसाहेबांचे खोलींतून खोकल्या-कण्हण्याचा आवाज आला म्हणून मी व शंकर आंत गेलों.

रावसाहेब जागे झाले होते. मला पाहून त्यांनीं हसतमुखानें 'नमस्कार भाऊसाहेब, या बसा' असें म्हणून डोळ्यांच्या खुणेने खुर्ची दाखवली. जवळ बसून माझ्या मित्राच्या अंगावरून हात फिरवून मी म्हणालों, " होशील, चार-आठ दिवसांत बरा होशील, पण अद्दल घडली त्याची याद ठेव. तूं स्वतः मोटार हाकावयाला बसलेला पाहिला की मला धाकच पडतो."

रावसाहेब म्हणाले, " मी इतके दिवस मोटार हाकतोंच की नाही ? पण त्या दिवशीं वेळ आली खरी. अरे, रेस कोर्सवर पोंचावयाला पंधरा मिनिटें उरलीं तेव्हा हाकली झालें मोटार जरा जोराने, तों वाटेंत बेटा दिव्याचा खांबच का आडवा न यावा ! "

मीं हसून म्हणालों, " तुझी शर्यतीची लगीनघाई पाहून खांबाने बाजूला सरावयाला पाहिजे होतें खरें ! पण मला आधी सांग की, तो खांब निर्जीव, त्याला काय कळणार ? पण तूं कांही विचार करावासा की नाही ! नसती साधली शर्यत म्हणून काय बिघडलें होतें ? "

हेंच तुझें नेहमीचें. जाऊं दे रे. गोगलगाईच्या पायानें चालायचें तर गोगलगाईच्याच पाठीवर बसावें. मग मोटार कशाला ? 'अरे, प्राणाः जन्मनि जन्मनि !' पण गव्हर्नरच्या कपाची मातबर शर्यत जन्मोजन्मीं कोठून पाहावयाला आणि 'बेटिंग' करावयाला मिळणार ? या जन्मांत मिळणारीं सुखें याच जन्मांत भोगलीं पाहिजेत."

यावर मी निरुत्तर झालों. लगेच खिशांतून एक कागद बाहेर काढून मी तो रागारागानें फाडून तुकडे करून फेकून दिला. तें पाहून रावसाहेब म्हणाले, " अरे, तो कागद कसला फाडलास ? आणि तो कां ? "

मी म्हणालों, " न फाडूं तर काय करूं ? मुंबई सरकारने जुगारीला आळा घालण्याकरिता एक नवें बिल तयार केलें आहे. त्याची एक प्रत माझ्याकडे

अभिप्रायाकरिता डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनें पाठविली होती. अभिप्राय पाठविण्यापूर्वी तुझा सल्ला कांही मुद्द्यावर घ्यावा म्हणून आलों; कारण तूं जसा हुशार वकील तसाच या विषयांतला जाणता. पण खोलीबाहेर शंकरने सांगितलेली चिमणीच्या जुगारी खेळाची हकीकत, आणि आताच तुझ्या तोंडून पडलेली मुक्ताफळें ऐकून मी निराश झालों. वाटलें, सरकार काय रडेल तुम्हा जुगारप्रिय लोकांपुढे! कसचे कायदा करून जुगार थांबविणार! म्हणून बिलाचा कागद फाडून टाकला, दुसरें काय?"

हें ऐकून रावसाहेब खदखदा हसले आणि डोळे फिरवून म्हणाले, "माधवराव जोशांच्या 'म्युनिसिपालिटी'च्या नाटकांतला तो हुसन्या का कोण तो मला फार मोठा तत्त्ववेत्ता वाटतो. तो सांगतो ना "एक दिवस तुझेंहि नशीब गिरकी खाऊन तुला श्रीमान् करील म्हणून!" तेंच खरें आहे. साहस नाही तर श्री कोठली? धोका नाही तर साहस कसलें? संशय नाही तर धोका कसला? आणि आशा नाही तर संशय कसला! अरे वेडया, आशेवर, खोट्याहि आशेवर, जग चालू आहे. तुम्हां विवेकी व हिशोबी माणसांना आशेच्या नेत्रांनी दिसणारें सौख्याचें नंदनवन नेहमीं पारखेंच राहावयाचें."

इतक्यांत ती चिमणी आणखी एक शिकारीची मोहीम संपवून खिडकीवर येऊन बसलेली पाहून रावसाहेब मला म्हणाले, "हा बेटा शंकर कच्च्या दिलाचा दिसतो, गेलेले दोन रुपये परत मिळतांच त्याने ते खिशांत टाकले. छट्! जुगारीचें टेबल असें मोकळें राहतां कामा नये. तूं लावतोस का पैज चिमणी कोणत्या दिव्यावर बसेल त्याची? आता आपण पैज लावूं ती मात्र पन्नास रुपयांची—" इतकें बोलून होतें तोंच रावसाहेबांना बोलण्याच्या श्रमाने घेरी आली व ते निपचित पडले. तेव्हा पुनः एक सोडा-ब्रँडीचा लहानसा डोस देववून शंकराजवळ इतर व्यवस्थेची चौकशी करून मी घरीं परत आलों.

मी दिसतांच माझी बायको उत्सुकतेने म्हणाली, "कशी काय आहे रावसाहेबांची प्रकृति?" तेव्हा थोडी गम्मत करण्याकरिता, शंकर माझ्याशीं 'दोन प्रकृती' संबंधाने बोलला तसेंच मीहि तिच्याशीं बोललों आणि मग उडत्या चिमणीवर रावसाहेब जुगार कसा खेळतो हें सांगितलें. तेव्हा आम्ही

दोघेंहि खूप हसलों. मग मी बायकोला म्हणालों, " संभाळ बरें, मीहि उद्या-पासून तुझ्याशीं जुगार खेळणार आहे ! "

" इश्श ! ती कसली ! " तिने विचारलें. मी म्हणालों, " वेणींत घालतेस त्या गुलाबाच्या पाकळ्यांवर पैज लावून. उद्याच्या गुलाबांतल्या पाकळ्यांची संख्या सम भरली तर तूं मला—आणि ती संख्या विषम भरली तर मी तुला—"

पण पैज हरल्या-जिंकल्यास काय द्यावें-घ्यावें त्या बक्षिसाचा उच्चार होण्या-पूर्वीच ती लाजून माजघराकडे वळली, आणि झणकाऱ्याने पण विनोदाने हसून म्हणाली, " आपल्या या गुलाबी जुगारी पैजेंत जुगारीचें मुख्य तत्त्वच नाहीं. जुगारींत एकाचा लाभ ती दुसऱ्याची हानि असते. पण इथं—? एकूण तुम्ही आपल्या जुगारीच्या हौसेकरिता रोज माझ्या डोक्यांतलें गुलाबाचें फूल चुरगा-ळून कुसकरून त्याच्या पाकळ्या मोजणार हं ! पण मीं ते दिलें पाहिजे ना ! थांबा, पुरुषांनी चालविलेल्या स्त्रियांवरील जुलमाचा वादविवाद उद्या आमच्या वनिता-मंडळांत होणार आहे. तेव्हा त्यांत हेंच तुमचें ताजें उदाहरण सांगून खोडच काढतें ! "

— समाप्त —

पद्य-गच्छ

निवेदन

'पद्यगुच्छ' हें माझें प्रस्तुतचें पुस्तक 'गद्यगुच्छ' या माझ्या दुसऱ्या एका पुस्तकाचें छोटें भावंड आहे. पद्यगुच्छांतील पहिल्या पद्यांतच या दोन वाङ्मय-प्रकारांचे गुण मीं वर्णिले आहेत. त्यांपैकीं 'पद्याचे' म्हणून सांगितलेले गुण या गुच्छांतील पद्यांतून कितपत आढळतात हें बारीक नजरेनें पाहण्याची इच्छा वाचकांना सहजच होईल आणि तशी ती झाली तर मलाहि बरें वाटेल.

माझे मित्र प्रो. माटे यांच्या मतें "वाङ्मय लिहिणारानें यापुढें पद्याच्या भानगडींत न पडतां, त्याला जें काय लिहावयाचें तें सर्व गद्यांतच लिहावें." केवळ व्यवहार, मतप्रसार किंवा शुद्ध ज्ञानप्रसार यांच्यापुरतें माटे यांचें म्हणणें खरें आहे आणि हे दोन हेतु मनांत ठेवूनच जो लिहील तो पद्यरचनेच्या भानगडींत पडणार नाहीं. पण कलाविलासाचा आनंद सेवण्याकरितां म्हणूनहि कांहीं वाङ्मय लिहिलें जातें; व त्याला पद्याचा प्रकार हें एक फार सोईचें साधन होऊं शकतें. आतां कलाविलास हा शब्द थोडा जाडा भरदार होतो; तो झेपण्यासारखी कांहीं लेखकांची पात्रता खरोखरच नसते. पण ज्याला कला-निर्मितीचा विलास यशस्वीपणें करतां येणार नाहीं अशा लेखकालाहि 'मी स्वतःची करमणूक करतों' असें तरी निदान म्हणण्याचा अधिकार खचित असतो. स्वतः मींहि या पद्यरचनेच्या भानगडींत पडतांना करमणुकीहून अधिक उच्च हेतूची हाव कधींच मनांत धरली नव्हती. या पद्यगुच्छांतील पुष्कळशा कविता केवळ वेळ घालविण्याचें एक साधन म्हणूनच मीं लिहिल्या आहेत. केव्हां ठरीव कार्यक्रम संपून गेल्यामुळें उरल्या वेळेचें काय करावें हें समजत नाहींसें झालें आहे; केव्हां आजारांतून उठून बरा होतांना घरच्या घरीं बसून राहावें लागलें आहे; केव्हां विलायतेसारख्या लांबच्या प्रवासांत इतरांच्या ख्यालीखुशालींत समरस होतां येत नाहीं व समुद्राकडे एकसारखें पाहात बसण्याचा कंटाळा आला आहे; अशासारख्या स्थितींत रचलेल्या पद्यांत करमणूक होऊन पुन्हा मनःप्रसन्नता लाभावी याहून दुसरा हेतु कोणता अस-णार? मात्र मनुष्य, पाण्याच्या चुळा सहज थुंकीत बसला असतां त्याच्या

तोंडून उडणाऱ्या पाण्यानें देखील जर यदृच्छेनें कमी अधिक रम्य आकार भूमीवर निर्माण होतात, तर निवान्त वेळीं मन गंभीर असतां निघालेल्या उद्‌गारांतून कांहीं बोधप्रद आणि प्रसन्नतेच्या उपासनेंतून कांहीं विनोदकारक असे विचार निघून, त्यांनीं न कळत कला-विलासाचें रूप घेतल्यास त्यांत अस्वाभाविक असें काय आहे?

पद्यरचनेला सकृद्दर्शनीं गद्यापेक्षां कांहीं अधिक बंधनें असलेलीं दिसतात. म्हणून कोणाला वाटेल कीं, गद्यापेक्षां पद्य लिहिणें हें करमणुकीच्या खेळाला उपकारक न होतां अपायकारकच्च होईल. पण दुसऱ्या एका दृष्टीनें पाहतां गद्यलेखनापेक्षां पद्यलेखनानेंच मनाचें रंजन अधिक होण्यासारखें असतें. आणि खेळाकडे कोणी उपयुक्ततेच्या दृष्टीनें पाहत नसला तरी, गद्यापेक्षां पद्याची कांहीं विशेष उपयुक्तता असते, हा विचारहि जमेस धरावा लागतो. पद्याचे खालीं दिलेले विशेष गुण कोणाला नाकारतां येतील असें वाटत नाहीं—

(१) गद्यापेक्षां पद्यांत शब्द-संक्षेप करून गद्याइतकाच अर्थ प्रकट करतां येतो. पद्य हें शब्द सोडलेल्या धड्यासारखें ठरतें. म्हणजे सोडलेले शब्द कोणते असावेत हें वाचकाला साध्या तर्कानेंहि सहज समजतें. किल्ली देऊन आवळलेला घड्याळाच्या कमानीसारखी बहिःक्षेपक शक्ति संक्षिप्त वचनांत असते; तिजमुळें गद्यापेक्षां पद्य रम्य वाटतें.

(२) गद्य-वाक्यरचनेचे सामान्य नियम पद्यांत न संभाळले तरी चालतें. यामुळें गद्यांत न आढळणाऱ्या अशा कांहीं अपरिचित तालाचा ध्वनि पद्याच्या शब्दांतून ऐकूं येतो व त्यामुळें नवेपणा वाटतो.

(३) गद्यांत शब्दांचीं ठरीव व्याकरणाचीं रूपें योजावीं लागतात; पद्यांत एकाहून अधिक रूपांचा हवा तसा उपयोग करतां येतो. उदाहरणार्थ, गद्यांत 'पाहून' हें एकच रूप वापरतां येईल. पण पद्यांत 'पाहुनि', 'पाहोनि', 'पाहुनिया', 'पाहोनिया', अशीं अनेक रूपें वापरतां येतात.

(४) जे प्राचीन शब्द गद्यांत वापरले असतां विद्वत्तेचें मिथ्या प्रदर्शन असें लोक म्हणतील ते शब्द पद्यांत वापरले असतां सहजच शोभून जातात. कारण गद्यापेक्षां पद्यप्रकाराचें प्राचीनत्व लोक घेऊनच चालतात.

(५) गद्यांत अनुप्रास मर्यादेबाहेर साधितां येत नाहींत; पद्यांत अनुप्रासाची मर्यादा लवचिक असते.

(६) गद्यांत अंत्य यमक ठराविक कालांतरानें साधण्याचें कारण नसतें, व फारसें साधतांहि येत नाहीं. पण पद्यांत तें ठराविक कालांतरानें साधावें लागतें. पण हें बंधनच दोन तऱ्हांनीं उपयोगी पडतें. एक तऱ्हा अशी कीं, ठराविक वेळानें तेंच तेंच अक्षर, तोच तोच ध्वनि, कानांवर आल्यानें तालबद्धतेचा स्वर-पुनरुच्चाराचा आनंद लाभतो. आणि दुसरा प्रकार म्हणजे यमक जुळविण्याच्या नडीनेंच एरवीं कदाचित् सुचल्या नसत्या अशाहि कल्पना सुचविल्या जातात. कल्पनावैचित्र्याच्या दृष्टीनें पाहतां सयमक कविता ही निर्यमक कवितेपेक्षां सहजच अधिक चांगली ठरते. मराठींतील कांहीं निर्यमक व सयमक कविता कोणी ताडून पाहिल्यास हें म्हणणें त्याला पटेल. तात्पर्य, यमक हें एका बाजूनें बंधनकारक म्हणून कष्टदायक वाटत असलें तरी दुसऱ्या एका बाजूनें पद्यकाराला तें उपकारकच ठरतें.

(७) पद्य हें तालसुरावर गातां येतें हा त्याचा गुण गद्यापेक्षां फारच फार श्रेष्ठ ठरतो. गद्य वाचतांना कदाचित् एकाद-दुसऱ्या प्रकारचा हेल काढून गाण्याच्या सुराचा आभास उत्पन्न करतां येईल. परंतु तालाशिवाय गाण्याचा खरा पुरा आनंद नाहीं. आणि गद्यच जर तालबद्ध व गेय झालें, तर त्याला गद्य कोण म्हणेल ? तें पद्यच होय. ठरीव क्रमानें, ठरीव कालांतरानें मात्रांचें आवर्तन पुरें करून पुनरुक्ति करणें यांत जो आनंद आहे तो निव्वळ भरमसाट गद्यांत कधींहि लाभणें शक्य नाहीं.

(८) पण सर्वांत शेवटचा गुण उपयुक्ततेचा. तो असा कीं, पद्याच्या ओळी किंवा तुकडे जसे स्मरणांत राहतात, तसे गद्याचे राहूं शकत नाहींत. ते स्मरणांत राहण्याला संक्षेप, शब्दचमत्कृति, तालबद्धता, यमक वगैरे पद्यांतील अनेक गोष्टी आपापल्यापरीनें कारणीभूत होतात.

पद्याच्या अंगीं गद्यापेक्षां इतके गुण अधिक असल्यामुळें, कलाविलास किंवा करमणूक याकरितां मनुष्य गद्यापेक्षां पद्याचाच स्वीकार अधिक तत्परतेनें करील यांत काय संशय ? आतां गद्यांतहि लघुकथा, कादंबरी, नाटक वगैरे लिहून कलाविलास किंवा करमणूक करतां येते. पण सर्वांत संक्षिप्त अशी लघुकथा घेतली तरी ती शब्दसंख्येनें एखाद्या खंडकाव्याइतकी मोठी भरेल! पद्य लिहून जशी थोडक्यांत करमणूक करतां येईल, तशी गद्यांत होऊं शकणार नाहीं. सुनीत किंवा गझल घेतला तर त्याचें काम किती थोड्या

ओळींत भागून एखादी तुटक कल्पना संपूर्णत्वानें रंगवितां येते ! इतक्या संक्षेपांत गद्याला आपलें काम साधावयाचें तर ज्याला 'गद्यकाव्य' म्हणतात तसें लिहावें लागेल, याचाच अर्थ तें धोपट सरळ गद्य नव्हे.

पद्याच्या अंगीं इतके गुण असतांहि त्याचा इतका थोडा उपयोग केला जातो याचा अर्थच हा कीं, मनुष्याच्या जीवनांत गंभीर व्यवसायाच्या मानानें करमणुकीचें प्रमाण फार थोडें असतें. स्वतः माझीच गोष्ट घेतली तर हें दिसून येईल कीं, 'गद्यगुच्छ' हें माझें पुस्तक दोनशें पानांचें व 'पद्यगुच्छ' हें शंभर पानांचें आहे. पण गद्यगुच्छांतील माझें लेखन हें माझ्या एकंदर गद्यलेखनाचा एकपांचशेंअंश इतकें भरेल, तर माझ्या पद्यगुच्छांत समाविष्ट न झालेल्या अशा माझ्या कविता पांच-सात-पानेंहि भरणार नाहींत ! अर्थात् या करमणुकीच्या साधनाचा मीं इतका अल्प उपयोग करून घेतला आहे. पद्यगुच्छांतील माझी सर्वांत जुनी कविता १८९२ सालीं लिहिलेली असावी, व सर्वांत अगदीं अलीकडची कविता १९३५ च्या मार्चमध्यें लिहिली असेल. म्हणजे सुमारें ४३ वर्षांत मीं लहान आकाराचीं शंभर पानें भरतील इतकी थोडी कविता लिहिली हें उघड होतें ! ही गोष्ट एका बाजूनें मी हौशी कवि नाहीं हें सिद्ध करण्याला जशी उपयोगी पडते, तशीच ती, कविता करणें हें साहित्य-व्यवसायी माणसाच्या खास करमणुकीचें एक साधन ठरविण्यालाहि उपयोगी पडेल. माझी एखादी कविता केवळ प्रसंग साजरा करण्याकरितां नडीमुळें लिहिलेली आहे. उदा०—गतवर्षीं 'सह्याद्रि' मासिक मीं सुरू केलें तेव्हां त्याच्या पहिल्याच अंकांत सह्याद्रिविषयक एखादी कविता यावी अशी मला इच्छा झाली; आणि असलें काम लोकांना सांगून करवून घेण्यापेक्षां स्वतः करणेंच अधिक सोयीचें व हुकुमी असतें, म्हणून ही नड भागविण्याकरितां 'रायगडावरील हिरकणी बुरुजाचा पोवाडा' मीं लिहिला. पण असे प्रसंग अर्थात् थोडे. सामान्यतः करमणुकीकरितांच मीं कविता लिहिल्या. मग त्यांत कांहीं प्रसंगविशेषानें सहज सुचल्या, कांहींत तर पहिली ओळ सहज मनांत स्फुरून तोंडानें निघाली व तिच्या अनुरोधानें बाकीच्या लिहिल्या गेल्या असेंहि घडलें आहे. आतां मनुष्य लिहावयालाच बसला म्हणजे त्याच्या मनःप्रवृत्तीप्रमाणें तो केव्हां रस आळवील, केव्हां अलंकारावर भर देऊन कल्पनावैचित्र्यांत रमेल, तर केव्हां सत्प्रवृत्त असा बोधहि त्याला कवितेंत घालावासा वाटेल. आणि या

सर्वांतून कलानिर्मिति होणें हें त्याच्या जातिवंत कवित्व गुणावर अवलंबून राहील. पण ती निर्मिति न झाली तरी, आपण एका उच्च प्रतीच्या करमणुकीच्या आनंदाचा लाभ घेतला, या विचारानें तरी तो कृतकृत्यता मानील यांत शंका नाहीं. मात्र त्याचें त्या वेळचें कृत्य व कर्तव्य तितकेंच मर्यादित असतें !

हें सर्व सांगण्याचें कारण इतकेंच कीं, मी कवि नसतांहि कविता करण्याच्या नादांत, अगदीं क्वचितच का होईना, कां पडलों याचें प्रांजल समर्थन करावें. १९३१ च्या डिसेंबरांत उज्जयिनी येथें कविसंमेलनाचा अध्यक्ष होण्याचा बिकट प्रसंग मजवर येऊन पडला. त्या वेळच्या माझ्या भाषणांत मीं असें म्हटलें होतें,–" माझी विनयबुद्धि मला असें सांगते कीं, मी स्वतःला कवि म्हणवितों असा लोकांचा गैरसमज न होऊं देण्याची खबरदारी मला घेतली पाहिजे. अवंती येथील कविसम्मेलनाचा अध्यक्ष म्हणजे, काव्यसिंहासनावर क्षणभर का होईना पण मान्यतापूर्वक बसविला जाणारा राजा ! म्हणून त्या पदाला स्पर्श करतांना, विक्रमाच्या खांद्यावर बसणारा वेताळ किंवा भोजाच्या सिंहासनाला जोडलेल्या पुतळ्या यांनीं जसा त्या राजांना त्यांच्या पात्रतेविषयीं प्रश्न विचारून कुंठित केलें तसेंच मला कोणी दुसऱ्यानें न म्हणतां मी होऊनच उत्तर देत आहें कीं, कोणताच कविगुण मजमध्यें नाहीं. कविसंमेलनाच्या अध्यक्षपदाचा जुलूमच मजवर झाला आहे." आज प्रस्तुतचें पुस्तक प्रसिद्ध करतांनाहि तीच भूमिका माझी कायम आहे व मी वाचकांना त्या अर्थाचें आश्वासन आगाऊच देत आहें. वाचकांना विनंति इतकीच कीं, या कविता मीं जशा केवळ करमणुकीकरितां लिहिल्या तशाच त्यांनी त्या, मजशीं सहानुभवी होऊन, करमणुकीकरितांच वाचाव्या.

हें पुस्तक हल्लीं छापून हातावेगळें करण्याचें कारण इतकेंच कीं, अनेक कामांत मीं आपल्या हातानें मांडलेला पसारा आपल्याच हातानें आवरावा अशी वेळ येत चालली असें माझें मला वाटूं लागलें आहे. आणि आपण मांडलेला पसारा आपणच आवरावा हें सर्वच दृष्टींनीं सोयीचें नव्हे काय ? एरवीं या कविता प्रसिद्ध करण्यांत, कवि या नात्याचा अहंकार मिरविणें, किंवा साहित्यिक या नात्यानें जें कांहीं अल्पस्वल्प यश मला लाभलें असेल त्यांत अधिक भर घालण्याची इच्छा करणें, हा माझा हेतु नाहीं.

मी मनःप्रकृतीनें विचारी, चिकित्सक, आणि विनोदप्रिय असा आहें. हे तीनहि धर्म काव्यनिर्मितीला वावडे असतात. जातिवंत काव्य निर्माण होण्याला लागणारें भावनाप्राधान्य मजमध्यें नाहीं. मी फार तर विकार व विचार यांचा मेळ घालूं शकतों. तथापि, 'दगडालाहि पाझर फुटूं शकतो' या म्हणीप्रमाणें ज्यांत भावना खुलली किंवा फुलली अशा माझ्या कवितांचीं उदाहरणें म्हणून मी खालील देऊं शकेनः—क्रमांक ९, १२, १३, १६, १९, २९, ३०, ३४, ३५, ३६, ३७ इ० पण या मानानें चिकित्सक व विनोदी कवितांची संख्या अधिक भरेल यांत शंका नाहीं.

पद्यगुच्छाच्या शेवटच्या भागांत गायकीचीं म्हणून कांहीं पद्यें दिलीं आहेत. त्यांसंबंधीं थोडा खुलासा करणें अवश्य आहे. तो असा. 'संगीताचें मराठीकरण' या विषयासंबंधानें मध्यंतरीं मीं मतप्रसार चालविला होता; व तो कांहींसा यशस्वी झाला असें मला वाटतें. हा मतप्रसार करीत असतां, त्यांतल्या त्यांत, संगीत शास्त्रांतील रागांचीं नांवें ज्यांत गोवलीं गेलीं आहेत अशीं कांहीं पद्यें मीं केलीं. त्या पद्यांपैकीं कांहीं कांहीं ख्यालाच्या धर्तीवर असून त्यांचें नोटेशनहि तज्ज्ञांनीं केलें होतें. पण नोटेशन न झालेलीं अशींहि पद्यें बरींच आहेत. तीं केवळ बीजरूपानें लिहिलेलीं असून, सोप्या वृत्तांत असल्यामुळें त्यांचेहि ख्याल किंवा इतर गायकीचे प्रकार करतां येण्यासारखे आहेत आणि तशीं तीं मीं म्हणवूनहि घेतलीं आहेत. या योजनेचा हेतु हा कीं, हीं मराठी पद्यें गायकीच्या थाटानें म्हणतां यावीं. शिवाय रागांचीं नांवें पद्यांत ग्रथित असल्यामुळें त्या पद्यांची चाल तोंडांत बसून, इतर प्रबंध कोणी गातांना ऐकले तर त्यांतील सुरालाप सादृश्यामुळें आपणाला ओळखतां यावे असाहि हेतु आहे. नुकतेंच श्री. तांबेशास्त्री यांनीं रामदासकृत 'मनाच्या श्लोकां'ना असेंच गायकी रूप देऊन 'सुबोध संगीत' नांवाचें पुस्तक छापलें आहे. जो उपयोग गणवृत्ताच्या बंदिस्त श्लोकांचा करतां येतो तो अभंग, आर्या, साक्या, अशा मात्रावृत्तांतील पद्यांचा अधिकच सुकर होतो. तात्पर्य, हीं पद्यें संगीताच्या मराठीकरणाकरितां केलीं आहेत; तीं फार लहान असावीं म्हणून त्यांत फक्त एकेकच मुख्य कल्पना घातली आहे; आणि ती रागाच्या नांवावरून सुचणारी अशीच घातली आहे. कोणतेंहि पद्य म्हटलें म्हणजे तें गायनक्षम असतेंच. तथापि या शेवटच्या भागांतील पद्यें काव्यापेक्षां गायनक्षमतेच्या विशेष दृष्टीनेंच रचलीं आहेत.

शेवटीं ऋणविमोचनार्थ हें सांगतों कीं—क्रमांक ६ हें वाल्मिकीकृत गंगास्तोत्राचें भाषांतर आहे; घरच्या मुलींबाळींना स्नानाच्या वेळीं म्हणण्याकरितां त्यांच्या सूचनेवरून हें भाषांतर करून दिलें होतें. क्र. ८ ला एका बंगाली कवितेचा आधार आहे; क्र. ९८ ला थॉमस मूर या आयरिश कवीच्या एका कवितेचा आधार आहे; १९१० सालीं आयर्लंडच्या इतिहासाचें पुस्तक लिहिलें त्यांत घालण्याकरितां हें भाषांतर केलें होतें.

पुणें,
रंगपंचमी, शके १८५७.
ता. १३ मार्च, १९३६

न. चिं. केळकर

———

पद्य-गुच्छ

१ गद्य व पद्य

एक अर्थ दोन ठायीं — गद्य पद्या भेद नाहीं
गद्य शिव पद्य शक्ति — दोन मार्गें एक भक्ति
एका जनक जननीचीं — गद्य पद्य बाळें साचीं
परि करणी ईश्वर करी — भेद स्वभावा अंतरीं

मंद जड गद्य दादा — पद्य ताई चंचळ सदा
गद्य स्तिमित दूर बसे — पद्य गळां पडुनी हसे
गद्य मानी मनीं कुढे — पद्य निर्भीड ओरडे
गद्या मनीं दुरुनी आस — पद्य हातें घेई घास

गद्य पल्लव विस्तृत — पद्य पुष्प सुगंधित
गद्य मेघांचें डंबर — पद्य वीज झळके वर
गद्य पाथरवटी घडण — पद्य रंगीत रोगण
गद्य आखिव रेखिव भाषा — पद्य मुक्तहस्त रेषा

गद्य तर्कग्रस्त भाष्य — पद्य स्फूर्तीचें हविष्य
गद्य जेवीं दगडा शिळा — पद्य जलवीचि-लीला
गद्य उद्योगाचा साठा — पद्य दैवाचा झपाटा
गद्य विद्वत्तेचें सोंग — पद्य तुकयाचा अभंग

२ रेंगाळणाऱ्या कवितावधूस!

चल उचल पाय आणि प्रिय सखये
किती अदयपणें शिणविसि सदये

इतर बंधु कवि परतीरीं जाउनि बसले प्रहरभरी
मीच अभागी कां ठरलें ऐलतिरीं डांबुनि बसलें
तव संगति मी रेंगाळें जड पाउल तव नच हाले
घेउनि कवितावधु संगें लावुनि अंगाशीं अंगें
क्रीडति ते बघ मुदित मनीं सरस्वतीच्या उद्यानीं

कीर्तिमंदिरीं तत्स्थानें मांडियलीं किति बहुमानें
कृपाकटाक्षें ती त्यांतें प्रसाद अर्पी निज हातें
प्रसाद तो संपुनि जातां उच्छिष्टाविण मम हाता
येईल काय पहा दुसरें म्हणुनी चिंताज्वरहि भरे
सरस्वतीच्या निजांगणीं तुलाच आमंत्रण रमणी

तेथ पती तूं मी पत्नी! तव अनुचर! इतर न कोणीं
'मिसेस यांसह मिस्टरना' निमंत्रणाचा हा नमुना
प्रवेश मग कैचा होई एकाकी मी जरि जाई
म्हणतिल आगंतुक मातें देतिल घालवून हातें
विदुषी तूं तव सांगाती जातां येइल मज महती

महत्प्रयासें यमकांचे नूपुर तव चरणीं साचे
बांधियले मीं हौसेनें धावुनि कृतार्थते त्यां ने
वेंचुनि अर्थ अलंकारा घालुनि भूषविलें शरिरा
जरि न कोणि त्यां निरखियलें व्यर्थ श्रम ते मम गेले
लोकीं तव कौतुक केलें तरि तें कौतुक मम झालें

म्हणुनि विनावितों पडुनि पदीं रेंगाळुं नको कर जलदी

३ मी कवि आहें समजलां !

मी कवी जगाचा राजा   मजपुढें न तुमच्या गमजा
गाउनि मम स्तुतिगीतें   करभार आपुल्या हातें
अर्पुनी राजभक्तीतें   दाविणें तुम्हा नच सुटतें
जरि मनीं प्रेम नच भरलें   गीतांत काव्य न स्फुरलें
मी देइन माफि तुम्हाला   परि हक्क न सोडिन अपुला

कविचा हा वंश अनादी   अंत तेंवि होईं न कधीं
आमुचें राज्य हें सगळें   कपि महाशयें स्थापियलें
जो अमुचा पूर्वज मान्य   त्यासम तो इतर न अन्य
तत्पुण्यें आजवर आम्ही   वैभवा भोगितों कांहीं
चौहातीं धरुनी वृक्षा   वांकुल्या दावितां पक्षा
चावितां मुखानें पाला   वर्णोद्गम सहजचि झाला
तेंचि होय आदिम काव्य   रसपूर्ण उदारहि भव्य
कवि आम्हि तदंशचि गातों   जन त्याचें कौतुक करितों

विषयांना तोटा नाहीं   शब्दांचें बंधन कांहीं
लेखनी स्पर्शितां दुरुन   नवरसीं जातसे भरुन
धावते अलंकृति मागें   औचित्य पाठिशीं लागे
मग व्याकरणाचे पाश   पावतात सहजचि नाश
हातांत शस्त्र जणुं नाचे   तोडितों पाय वर्णांचे
कापितों कान मात्रांचे   छेदितों हात कान्यांचे
संपूर्ण शब्द जरि खातों   लोप हा काव्यगुण ठरतो
माजवितां अडगळ त्यांची   स्तुति भाषासंपत्तीची !

शब्दांत अम्हालां नाहीं   मृदु कठिण भेद हा कांहीं
मानुं ना देशिपरदेशी   समतेनें वागुं प्रजेशीं
बनवितों समास मजेचे   शत्रुमित्र भेद न बोचे
असवर्ण लावुं जरि लग्न   शब्दजाति करि ना विघ्न

अभ्यासि जन्म वेंचोनि योजुनी तर्क अनुमानीं
शास्त्रज्ञ बनवि सिद्धान्त तरि होत न कधीं निभ्रांत
परि परामर्श सत्याचा जणु चाकर कविच्या घरचा
पायाळ काढितो पाणी सत्य तेंवि कविच्या वदनीं

जे देखे न कधींहि रवी तळहातीं मिरवील कवी
सर्वज्ञ अशा ईशाचा शिक्काच कवीची वाचा
ज्ञानदीप काजळ धरलें तें सगळें शाइंत विरलें
लेखनी जगावरि वितरी सत्य-तत्त्व पर्जन्य-सरी
सौवर्णिक खणुनी खाणी टांकसाळि पाडुनि नाणीं
देताति सुवर्णा चलना परि व्यर्थ श्रम तो त्यांना
कवि आम्हि चिपा सोन्याच्या बनवितों योजुनी वाचा
व्यवहार भागवूं नाना शृंगार पुरवुं ललनांना

काढिताति अनगड रत्नें मूर्ख लोक बहुत प्रयत्नें
खोदुनी मृत्तिका वाळू शेषाची फोडुनि टाळू
परि हिरे रंगि बेरंगी चिकटले कवीच्या अंगीं
मारुनी फुंक गारोडी काव्यानें कविही काढी

यमक हीच कविची किमया ऐंद्रजाल किंवा माया
अक्षरासि अक्षर जुळलें कविसृष्टिकर्म तरि फळलें
ईश्वरी शिल्प रचनेंत एकासि न दुसरें जुळत
तद्गुरुनें विद्या न दिली जी कविच्या अंगीं मुरली
यमकाच्या पायावरती केवढ्या इमारति उठती
तीच वीट तीच चुनाही कविसंग्रहिं दुसरें नाहीं
तीच रंग तीच सफेती यमकी गुण सर्वहि येती
त्रिगुणाविण ईश्वर अडला द्व्यक्षरी कवि यश चढला

४ नमोस्तु ते माते !

भारत जननी असासि सुगुणखनि तूं या जगिं आर्यां
दे आशीर्वच अभयदान दे या मंगलकार्यां
जातां स्मृतिपंथें मन मागें दिसलों पूर्व युगीं
ध्रुव तारा शिरिं उषा रम्यशा चमकति दिग्भागीं
अंतिम उत्तरदेशीं रमसि तूं ऐशा हिमभागीं
अग्नि पेटवुनि तेथ बैसले ऋषी जागजागीं
अनादि वेदां दिव्यज्ञानें जे झाले रचिते
संचरप्रिय अवतरशी तूं गे मग दाक्षिण देशीं
जेथ लागल्या तुर्क इराणी मिसर मार्ग-वेशी
पांघरुनी वृकहरिणाजिनमय उष्ण वस्त्रकंथा
वन्य तापसी शिष्यगणांतें देति पाठसंथा
विवेचुनी उपनिषदां उपदेशिति वेदांतातें
होय युगांतर फिरुनि एकदां जैं येशी खालीं
वलांडुनि हिमाचला प्रवेशिसि पंचसिंधुपालीं
कृषी सुफल हिम सह्य म्हणुनि उद्यमीं आर्य शिरती
विद्याभ्यास कलाकौशल्यीं उपजे त्यांस रती
अनार्य जिंकुनि वश वा करुनी आर्य करिति त्यांतें
क्रमें आक्रमुनि अखिल रम्य भू भारत ज्या म्हणती
विभव मिळविसी विविध तयाची कोण करी गणती
सूर्यचंद्र नामांकित वसविति राजवंश सत्ता
प्रजा प्रेमसुख शांति जयांची असे मुख्य मत्ता
स्वर्णधूम आमोद कीर्तिचा व्यापिति गगनातें
हिंद तीच तूं भारतदेवी आम्हां भरतजनां
मुक्तकंठ सानंद हर्षमय करूं तुझ्या भजना
दुःस्वप्नें पडुनी उठती जरि कुकल्पना लहरी
तव प्रसादावीण कोण गे सांग तया वारी
तूंच असासि आधार आमुच्या सत्संकल्पातें

५ भारत-गान

मिळुनि सकल गाउं भरतवर्ष-सुयश-गान
करुनि एक जीव भाव चित्त हृदय प्राण
कोण असे भरत-भुवनसम दुजें ठिकाण
बहु फलदा भूमि इला अन्य नोपमान
कोण नदी अद्रि सिंधु हिमवता समान
अन्या धन्या पुन्या शततटिनी
हेममणी रत्नखनी हिंदधननिधान
विक्रमपटु वामनबटु द्विजशिरोमणी
परशुराम वीर राम सज्जनाग्रणी
कर्मयोगनिपुण कृष्ण राजकारणी
सावित्री यमजेत्री पतिपरायणा
अग्निपूत शुद्ध सती जनकनंदना
दमयंती तारामति पात्र वंदना
ज्यांहीं भू ही होई ख्यात जगीं सर्व युगीं
त्यां करा प्रणाम
व्यास मुनी आर्यकथा कथित भारतीं
वाल्मिकि ज्या सुवश असे काव्यभारती
धर्मनीति घालिति कवि सकल दृक्पथीं
आणी ध्यानीं सगळे चंडमती अतुलकृती
भवभूती कालिदास बाण
पौराणिक योध भीष्म भीमकर्णसे
शिव बाजी वीरमणी विसरलां कसे ?
आर्तबंधुभारतभयसिंधुसेतुसे
शरणा अवना यवना असिधारा
अनलकरापरिस खरा देति समरिं जाण

६ गंगास्तोत्र

—:❀:—

माते भागीरथी ! वंदितें कर जोडुनियां तुला
जन्मजन्मिचें पातक धुउनी करि तूं पावन मला
तव तटिं बसतां तव जळ पीतां लाटांवरि लोळतां
नामहि घेतां मरण येऊं मज लाभ न यापरता
तव तीरावरि वृक्षकोटरीं बसणारा खग बरा
तव जलवासी मत्स्यकूर्म वा धन्य मानितें खरा
नको नको तें तुझ्या संगतीवांचुनि जरी लाभलें
अन्य ठायिं सिंहासन नृपपद गमत न मज चांगलें

स्तुतिपाठी बहुभाष भाट कवि यांच्या सुरस कथा
चंचल पैंजण कंकण-किंकिणि गोड शब्द ऐकतां
चंदनचामर हातिं घेऊनी घालिती वारांगना
शीतल पवना सेवुनि सुखवी अनुदिनिं जो निज मना
अशा नृपाळाहुनिहि वाटते कीटकयोनी बरी
सर्पतुरगगजपक्षी यांची स्थिति किति सुखदा तरी
हत शव माझें तव प्रवाहें क्षणभर जरि वाहिलें
तटजल अथवा पुलिन यांत तें एकवार घोळलें
तरंगहिंदोलावरि किंवा जरि तें आंदोळिलें
सुरस्त्रिया मग चवऱ्या वारुनि करुनि टाकितिल भलें

चरण विष्णुचे कमल तयांची तंतुवल्लि ही असे
शंभुशिरीं रुळणारी अथवा मालतिमाला दिसे
जिनें टाकिला धुउनि कलीचा कलंक सारा अशी
मोक्षश्रीजयपताक करु ही पुनीत गंगा मशीं
निबिड ताल तरु तमाल सालहि अन्य विविध वेली
रविकिरणांचा ताप वारुनी धरिति जिथें साउली
सुमृदुल सैकत शंखशशीपरि धवल जेथ चमकते
सुरस्त्रियाकुचकुंकुमचंदनगंध ज्यांत वाहते

हरिच्चरणाची धूलि पुण्यकर असे ज्यांत मिसळली
हिमाचलाच्या गुहा विदरुनी भूवरि ये खालीं
पापहारि तें तरंगचंचल पुण्यद जल गंगे
पावन करुं दे प्रतिदिनिं माते ! दुर्गेचीं अंगें

७ गंगातटाकावरील उषःकाल

उजळुनि अष्ट दिशा रविसारथि हळुहळुहि येतसे उदया
प्राचीमुखिं बहु खुलली रम्य छटा फिकट गोड रागमया

पावूं लागलि हळुहळु भंगा जी शांतता त्रियामभरी
बसली होती व्यापुनि गगनांतरिं तेवि सर्व पृथ्विवरी

काळतमोमुखिं पडलें दडलें जें शून्यता–उदरकुहरीं
वाटे अरुणकरच्चमू उद्धरुनी सकल विश्व मुक्त करी

किंवा गतदिनिं रविपति सिंधुजळीं मग्न जाहला बघुनी
प्राणव्यसनीं जाणुनि पडली मूर्च्छित नितांत खिन्न मनीं

त्या पृथ्विकामिनीप्रति रविवार्ता कुशल अरुण समजविता
वाटे सावध होऊं लागे तद्वदनिं येत ही शुचिता

कीं तम-चांडाळाच्या स्पर्शें अपवित्रता भुवन भोगी
पावनता त्या द्याया सकरुण सरसावला अरुणयोगी

रवितेज-तीर्थ नभपुटकमंडलूमधुनि काढुनी हातीं
प्रोक्षणविधि करि तो तव विनटे भुवनांगिं सर्वही कांती

रवि पश्चिमेसि जातां भूलोक न्यस्त करित जेंवि धना
प्रत्यर्पुनि तो रविकरिं दिक्पालहि अष्ट जाति स्वस्थाना

पंच उषःकाल महापुण्यद पर्वासि जाणुनी बुडती
गंगाजळिं तारागण होउनि सुस्नात गुप्त ते जाती

भरला प्रकाश गगनीं आश्वासन सकल येत जीवगणा
कीं अंधकारसंकट निरसुनि जगदीश दावितो करुणा

मोदभरें वृक्षाश्रित पक्षिकुलें मंजुशब्दरव करिती
कीं परमेशोपकृती जाणुनि तत्स्तोत्रपाठ आचरती

ऐन उषःकालिं अशा तापसमुनिगण पहा सकल आला
गंगातटिं शिष्यांसह प्रातःस्नानादि विधि करायाला

उपकरणें संध्यार्चनविधिचीं मोठे करंड वेताचे
आणुनि केले पुलिनीं स्थंडिल-आकार विविध बेताचे

जल न दिसे घन पडलें वाफेचें धवल आवरण वरती
सुरसरितापावनताउद्गाराचि उजळ वाटले निघती

करुनि निमज्जन मुनिगण कर पूर्वाभिमुख होउनि जोडी
बालार्ककलादर्शन होतां प्रथमार्घ्य भक्तिनें सोडी

---

८ सरस्वतीचा वाल्मीकिकवीस आशीर्वाद

नांव असे मम सरस्वती मी वीणापाणी देवी
नांव आद्यकवि तुझें वाल्मिका कथितें होइल केंवि

आलें जगतीतळीं तुजसि गा ! शिकवाया गानातें
पाषाणांचीं मनें वितळतिल सहस्र ऐकुनि ज्यातें

ज्या गानातें ऐकुनियां तव हृदयं कठिण तें द्रवलें
तेंचि कंठिं तव सदा सर्वदा राहिल वाल्मिकि ! भरलें

गान ऐकुनी तव काव्याचें तव चरणीं लागोनी
गभीर सिंधू रडेल चंचळ प्रेमभरें होवोनी

दिक्पाळांच्या रमणी तुंजवरि ढाळितील अश्रूंतें
आनंदानें मुग्ध होउनी विमल सुधारापातें

तारागणहि शिरीं गाळितिल शुभ्रजळाचे बिंदू
अशनी वितळुनि होतिल त्याचे प्रेमरसाचे सिंधू

ज्या कारुण्योदधिमधिं वाल्मिकि आज बुडुनि गेलासी
त्यांताचि जगता स्वयें बुडविशिल सत्य होय हा आशी

जोंवरि गिरिवर असे हिमाचल उभा सृष्टिच्या पाठीं
तोंवरि राहिल अखंड तूझें नांव जनांच्या ओठीं

जोंवरि पृथ्वीतळीं वाहते पवित्र गंगा माता
तोंवरि राहिल तव काव्याचा प्रचंड ओघ वहाता

अमर होय तव काव्य सुरापरि रविशशि नवग्रह तारे
सत्य समज तव कीर्ति पूर्वि हे विलया जातिल सारे

अनंत कालावधिवरि वाजत राहिल तव ही वीणा
तूंच आद्य कवि अंत्य कविहि तूं सदैव कविकुलराणा

मयुरासन मम तत्पदिं होइल वाल्मिकि तव चिर वसति
नित्य नवनवीं कविताकुसुमें जेथ सुगंधित विकसति

कविबालक तवपदीं बैसतिल नम्रभाव मनिं धरुनी
मधुर कंठरव तुझा ऐकण्या ठेवुनि मानस कानीं

ही घे वीणा देतें माझी जतन करि इला बा रे
जें जें गायन गाशिल तें तें निघेल यांतुनि सारें

चरख्याचें गाणें

किती गुण गाऊं चरख्यारे माझ्या भाऊ
रात पडालि ही पिठी चांदिणी   सारविल्या या प्रसन्न अंगणिं
मुलें निजविलीं कथुन कहाणी   विश्रांतीच्या क्षणिं या सांजणि
चरखा वंदुनि हातीं घेऊं

बाळां घास उद्यांच्या पुरता मिळेल कैसा वाटे चिंता
परि आशा दे बळ या हातां म्हणुनि राहि तो न कधींहि रिता
आनंदानें कष्टां साहूं

आम्हां दीन जनांची करुणा आली दरिद्र–नारायणा
कृपे तो न कधिं पडला उणा धावुनि येतो हाके शरणा
म्हणुनि तयातें हृदयीं ध्याऊं

पहा कशी ही छान धनुकली पराक्रमी जरि दिसे चिमुकली
कापुस-गाठी : सर्वेचि उकली झाडुनि टाकी कीट केर मळि
गडे धनुर्धर आपण होऊं

निर्मळ विरळ करोनि फुलविला हासतमुख मग प्रसन्न झाला
कापुस भंगल वर दे मजला कां पुससि म्हणे निज नयनाला
नको मानसीं कष्टी राहूं

निराकार मी जरि ईश्वरसा परि मानसिं हा धरी भरंवसा
घेइन देशिल आकार तसा स्थूल सूक्ष्म वा रूपहि सहसा
मीहि कां न अवताराचि घेऊं

शरद्घनां सम मी पोकळ जरि संग्रहिं जीवन नाहिं कमी तरि
मुकल्यां सुकल्यां तृषित पिकांवरि धनार्जनाच्या पाडीन सरी
पसरुनि दशदिशिं माझे बाहू

कामधेनु मी मद्भक्तांना त्यां पाहुनि मज फुटतो पाना
हात प्रेमळ लागतां स्तना स्रवविन सूत्ररूप धारांना
सरत न कोणी कितीही सेवूं

नाजुकशी मग पेळू वळिली एक्या हातीं हळूच धरिली
दुसऱ्यानें चक्रा गति दिधली प्रभुची लीला प्रगटूं लागली
कां मग हृदयिं न गहिंवर येऊं

चरखा नोहे चक्र सुदर्शन आयुध दारिद्र्यासुर-मर्दन
फिरूं लागल्या क्षण मग अर्ध न लागे होण्या दुःखविमोचन
म्हणुनि तत्स्तुति करिताचि राहूं

१० पैसाफंडाष्टक

निमेषक्रमें आक्रमी सूर्य राशी
अनुल्लंघ्य तो अंबुधी बिंदुराशी
अणू विश्वपिंडास आधार जैसा
तुम्ही राष्ट्रकार्यीं गणा तेवि पैसा

असोनि स्वयें आकृतीनें लहान
कृतीतें करी सर्व थोरासमान
कधीं द्यावया त्या कुणा कष्ट नाहीं
अनिर्वाच्य त्याचें परी मूल्य कांहीं

महाराज पैसा असे सिद्ध योगी
सदा अष्टसिद्धी-सपर्येसि भोगी
धरी सूक्ष्म वा स्थूल रूपा विशाला
तरी तीच दावी जगीं नित्य लीला

कदर्यांसि अल्पव्ययें कर्णकीर्ति
धनाढ्या उदारासि संतोषपूर्ति
नकारप्रिया नीच पैशून्यकंदा
पहा लाभवी हा पुरी लोकनिंदा

जशी कस्तुरी विस्तरी गंधभारा
रजांशें भरोनी उरे त्या अगारा
तसा एक पैसा दिल्या भक्तिनें तो
दिगंतीं यशामोद वाहोनि नेतो

दुधाचा स्तना लागतां स्निग्धहस्त
सुखें देत पीयूष धेनू समस्त

तुम्ही देउनी अल्पशी एक मुद्रा
पुरा पूर घ्या राष्ट्र-लक्ष्मी-समुद्रा

तरू कल्प दिव्यांगणीं:होय जैसा
असे राष्ट्रमार्गीं उभा तेवि पैसा
मिळोनी करा प्रार्थना सर्व याची
न जाई रिता भक्त जो यास याची

महाराष्ट्रिं हा फंड वाढो उदंड
कला-उद्यमां रूप लाभो प्रचंड
स्वयंसेवकांचें उभारोनि सैन्य
'लुटा' कांचना घालवा देशदैन्य

---

११ देशाची दुर्दशा

दीन बापुडा हा देश — काय त्याचा हीन वेष;
जगीं कोठें मान नसे — परराष्ट्रीं होत हंसें
ज्ञाति एकमेकांसंगें — करिति हाणामाऱ्या दंगे
द्वेषें उकललीं अंगें — जणूं भाजलेलें वांगें
देशभक्तीचें भांडण — भरी जखमेमध्यें लवण

जगतिं पतितां काय कमी — उद्धारका न हो श्रमी
मागें पुढें पायातळीं — असे तयांची चंगाळी
तुज जवळिल पुण्योदधी — उद्धारासि न पुरे कधीं
तुझें पुण्य म्हणशी वाढे — तयांचेंहि पाऊल पुढें
पुण्य पतित दोघां वाढ — संपे न कधीं चढाओढ

देशीं बोकाळले संत गुरुशिष्यहि महंत
तोंडीं वैराग्याचा पाठ रंगी वस्त्राचाहि थाट
गळां हातभर माळा हातीं संसृतीचा चाळा
परनिंदेवीण वाणी शब्दसृष्टि इतर न गणी

डोळे मोठमोठे करुनि लोकां बोले गुरकावोनी
परि माझा मी मोकळा कोठें गुंतवीना गळा
लागे अंगा किमपि न चाट जरी बोले मी उद्धट
करीं संसार सुखाचा धरी मर्यादा कां वाचा

स्वार्थत्यागी सुनिर्मळ नर जगतीं या दुर्मिळ
बोलघेवड्यांची रास ठेंचा लागती पायास
शीलें चरित्रेंहि खोटीं कोठें लागेना कसोटी
भाषा गोड अलंकार वक्तृत्वहि अपरंपार
शब्दसमुद्र अथांग कृतीचा तो नलगे थांग

---

१२ महानुभावप्रशस्ति

नयन सलिलें झाले ओले गळा बहु दाटला
वच नच फुटे वाग्धारेचा झरा जणुं आटला !
हृदय भरलें आनंदानें अशी गति जाहली
सदयहृदया तुम्हां पाहोनियां अजि ये स्थळीं
विनतिवचना या मित्रांच्या तुम्हीं बहु मानुनी
परिणतवया अध्वक्लेशा मनीं नच आणुनी
सुदिन अजि हा या भेटीचा प्रमोदक आणिला
उपकृति महा ती या वर्णूं नये मम वाणिला
सुकृत अमुचें तें पूर्वींचें असे लय पावलें
विधिबल अम्हां दुर्भाग्यांना पराङ्मुख जाहलें

कठिण समयीं या उद्धर्त्याविना अमुची गती
परम हत या भावें देवें दिली आपणां मती !

विविधविषयीं प्रेमाचें जें निबंधन वर्ततें
जडत बहुधा अंतर्भावें उपाधिबळें न तें
ठसत हृदयीं या वाक्याची प्रतीति हि बाणुनी
सुदृढ अपुला प्रेमा आम्हांवरील विलोकुनी

श्रम करितसां उद्धाराया उदात्तमहामते
तनमनधनें या आर्यांच्या महीस उदार ते
बघुनि भरती सुप्रेमाचे समुद्रहि अंतरीं
विमल जलसंकीर्णा नेत्रां कृतज्ञपणा करी

अमित उपकारांचें ओझें शिरीं अमुच्या पडे
अनृण अपुलें कैसें व्हावें पडे मज सांकडें
सुजन करिती सत्कार्यातें अहेतुक ते जरी
उपकृत जनें फेडावें ही सुनीति कसे तरी

उपकृतिस्मरणानें येइ जी बाष्पधारा
धरुनि कुसुमहारीं अर्पुं आम्ही उदारा
वरुनि सुमनगंधें युक्त पुष्पोपहारा
विनति करित आम्ही या मनीं नित्य थारा

अश्रांत श्रम तें करोनि सदया सत्कार्य आरंभिलें
हें राष्ट्रोन्नतिबीज शिक्षितमनःक्षेत्रीं तुवां पेरिलें
सेवीं बाल तरूवरील सुमनें जीं आज हीं अर्पिलीं
तीं राहोत समीप नित्य तुझिया सद्भावचिन्हें भलीं

१३ 'डोंगरी'माहात्म्य वर्णन

इहलोकीं दरबार यमाचा अनुदिनिं कारागृहिं भरतो
पापपुण्य झडतिला निघोनी मनुज मोकळा तो होतो
प्राकारावृत पुरी डोंगरी अन्वर्थक हें नांव तिला
उंच उंचशा भयाण भिंती पहाडसम चौबाजूला
काभिन्न काळे दरवाजे ते दोन दिशेला असति उभे
मेघडंबरी त्यावरि केली मेघशबलशा नीलनभें
समंत भागीं वस्तिं दाटली जशा वारुळामधिं मुंग्या
परि अंतरिं शून्यता राखिती उभ्या संगिनी त्या नंग्या
जरी म्हणावें स्मशान येथें हात पाय तरि वावरती
सदन म्हणावें तरी मनुष्यें मुकीं भुतासम आचरती
सदन म्हणा वा स्मशान येथें सदा नांदतो यमराजा
परलोकाचा अनुभव देई मनुजा चालु न दे गमजा

द्वारामागें द्वार लागलें प्रवेश दुर्घट तो मोठा
वर्दी देउनि उभे रहावें घटका दो घटका घंटा
यमदूताच्या संगतिवांचूनि संचारासी वाव नसे
शुक्लकाष्ठ पाठिचें पाठिशीं सदा लपेटुनि तें बैसे
कारभार करणार यमाचा त्यासी 'जेलर' ही संज्ञा
प्रमाण शिरसावंद्य तयाची कोणि न अवमानिति आज्ञा
कामधाम तरि चिठ्ठिचपाटी व्हा जाउनि त्यापुढति उभे
शिका प्रथम नम्रता नीचपण उचित दंडधर कालसभे
भेट कुणाची हवी तरी ती क्षणभितशा अवधींत मिळे
अधिक उणें बोलण्यास चोरी यमसचिवाचे कान खुले

आंत बंदिजन जे सांपडले वर्णुं तयांची काय गती
बोल बोलण्या तद्विषयक मम जीभ धरितसे बहु खंती
पंजरस्थ पिक मोर सारिका यांचें हृद्गत अजि कळलें
प्रवेश परकायेंत न केला अनुभव बीज तरी फळलें

ऐकतसें सिद्धांत आजवरि गहनचि आत्मौपम्याचा
प्रकाश पडला हृदयिं तयाचा कुंठित हो म्हणुनी वाचा
स्वातंत्र्यासम हरहर दुसरें प्राण्या जगतीं सौख्य नसे
विघात करि जो त्या सौख्या त्यासम अधमाधम तोचि असे
व्यक्ति असो वा राष्ट्र असो तत्पापाची खुणगांठ खरी
स्वतंत्रता-हानिची आपदा अतुल तिजसि सम ना दुसरी

बंदिजनांचा नित्य दिनविधी सूत्रबद्ध जणुं रेखटला
अनंत कल्पें अबाधित असा चालु असे हो हा खटला
दो घटका रात्रीसि उठोनि अशुचि शौच मार्जन करणें
वदनिं येत तरि स्फुट न वदा हरिनामादिक प्रातःस्मरणें
जरि मजुरीची कैद तुम्हाला 'सण' पुढतीं घ्या खोलाया
इतरहि अथवा कर्म नीचतर उरकाया सारा बाह्या
दस घंट्याला करा तयारी भोजनविधिची गर्दी उठे
कदान्नमय तीं दोन वर्तुळें त्यावरि तुरिचें दाट घुटें
घृतदुग्धारिक्त शाक लवण वा गरम मसाला तो विसरा
करा साजरा पाणि घोटुनी शिमगा दिपवाळी दसरा

दिन ओसरतां रांठ कांबळ्यावरति देहयष्टी पसरा
झोंप न ये तरि जन्मजन्मिच्या कर्मांची ती टीप करा
मत्कुण-दंशहि नरशोणित पी चावचावुनी करिति दशा
अंशभागि त्यां करा धरा मग सक्तीनें शिबिराज-यशा
अळेपिळे घ्या वळा तळमळा योगासनविधि सर्व करा
ठाव न सोडा शब्द न काढा खुशाल मग सुखशेज करा
आस्तिकता ती येत नास्तिका अहृदयहि प्रेमी बनतो
क्षणभर सद्गुरु रामकृष्ण वा आयबाय बाबा म्हणतो

दो घटका रात्रीस होतसे ठायिंठायिं नाकेबंदी
फिरुं न शके कोणिही होउ तो चोरसाव वा फटफंदी
सवाल करितां जबाब द्यावा सांकेतिकशा शब्दाचा
यमकिंकर तो हत्यार सांवरि अडखळली जरि लव वाचा

शिपाइभाई पूर्वरात्रिं बहु सक्त हुषारी दाखवितो
परि माध्यान्हीं डोळ्यांवरती झांपड येउनि तो पडतो
घंटानादें उठे खडबडे सजीव होतां जसें मढें
अलकाऱ्या ललकाऱ्या देउनि आलबेलिचा मंत्र पढे

कारागृह हें ब्रह्मस्वतंत्राचि चौप्राकारांतरिं वसलें
जिवशिव सच्चित् प्रकृतिपुरुष गुण उपाधि त्यांतचि सांठवलें
एक नियंता यमस्वरूपी इतर सर्व त्याची लीला
सुखदुःखादिक भोग मोक्ष वा देत असे तो मनुजाला
स्वस्थानासी कधिं नच सोडी परी मनानें वावरतो
दूतपाश पसरुनी करविं त्या सर्व कार्यभर आवरितो
गरुडपुराणचि दुजें असें हें जेल कायदा त्या म्हणती
स्केलकोष्टकें मांडुनि करिती पापापुण्याची गणती
उठबशा अंधारकोठडी दंड पाश फटके खोडे
प्रायश्चित्त प्रकार येथिल वर्णावे तितुके थोडे

भलाबुरा हा भेद न येथें एक तत्त्व कीं शिरगणती
धर्मजाति वा नीति सुजनता विवेक यांचा नच करिती
न्यायदेवता अंध अशी ही त्रैलोक्यीं विख्याति असे
राव रंक समसमान ऐसा खासा अनुभव देत असे
कोर्ट कायदा चाळण तीच्या छिद्रांतुनि खालीं पडती
धान्य रजःकण रत्न मौक्तिकें एका मापामधिं भरती
खुनी डकाइत निपट भामटे ठग बदफैली कीं अमली
परोपकारी धार्मिक सात्त्विक जनतेचे किंवा वाली
सकल संग्रहीं यमप्रभूच्या भेदभाव नाहीं त्याला
शामकर्ण खर त्याच दावणीं कामधेनु नंदी ढवळा

इहलोकीं दरबार यमाचा अनुदिनिं कारागृहिं भरतो
पापपुण्य झडतिला निघोनी मनुज मोकळा तो होतो

१४ अर्पणपात्रिका

नीर वगळितां उणें क्षीर नच अधिक मधुरता देई
वेज पाडितां उणें न मौक्तिक अधिक कार्यवश होई
आत्मनिरीक्षण करितां अधिक प्रकाश अंतःकरणीं
प्रमाद होता परागति रणीं नीतिच ती हितकरणी
चौचाकांचा रथ डौलाचा शोभा व्यर्थ असे ती
जरी न होई राजमार्गींहि प्रगट तयाची प्रगती
वीज रम्य परि कार्य नच घडे गगनीं पाहुनि तिजला
कौतुक नेत्रा परि न उष्णता लव पाकस्थालीला
ध्रुवनिष्ठेनें दिशा लक्षुनी ध्येयमार्ग राखावा
परि पायातळीं दृष्टि न देतां लागे गोता खावा
विवेकचक्रा हातीं धरुनी नित्य **महाराष्ट्रा** तूं
श्रमकार्पासांतुनी कांतिला कर्तव्याचा तंतू
दैनंदिन वा नित्यकर्म हा पसरे विस्तृत ताणा
नैमित्तिक विक्रम जणुं ताठर त्यांत आडवा बाणा
फेंकुनि धोटा ठांसुनि दोरे नीतिपटहि जो बनला
रक्षण करितो राष्ट्रदेह तो निवारुनि जला अनला
दूरदर्शी तूं कृषीवल जसा बघतां ढग आकाशीं
निघसि उद्यमा शकट जोडुनी सुदृढ रज्जुमय पाशीं
नांगरुनि कुळवोनी पेरुनि तृण हस्तें काढोनी
मोट हांकुनी वाफे भरुनी पिकास पाजिसि पाणी
पडति पोटऱ्या तेव्हां हांकुनि कीटक पशुपक्ष्यांना
निवारिसी बेकार भिकाऱ्या सोसुनि अपवच नाना
मग जयिं पेटे धुमी आगटी हुरडा चोळुनि खाया
लावुनि नातें म्हणे पाहुणा 'येतों आलों' 'या या'

असो ईश्वरें शेत पिकविलें काय कमी मग होई
कोणी खावो कोणी नेवो कोणी तुडवो पायीं
राष्ट्रकार्य ही कृषि निरपेक्षचि करूं आपुल्या धर्मा
काय फायदा ध्यानीं आणुनि मग इतरांच्या वर्मा
मुसळधार भावना-मेघ जरि या भूशिखरिं न पाडी
हार्दिक जलरस पोशि पिका त्या फार येतसे गोडी
महाराष्ट्रा–जित्या राष्ट्रा ! तुजला तिलतर्पण (!)
सत्पुत्र करिती त्यांना, कौतुकें ग्रंथ अर्पण !

२५ रायगडावरील हिरकणी बुरुजाचा पोव

कोकणी बांधिला गड नाम रायगड उंच अवघड
चढावया उतराया
बघुनि तो जहाला खूष मनीं शिवराया–जी
आबाजि सोनदेव वदे अंतरीं मदें " मी अभेद्य
बांधियला दुर्गेंद्र
होउं द्या इथ मऱ्हाठी साम्राज्याच केंद्र"–जी
फोडोनी फत्तर घणीं गवंडी गुणी उंभविती झणीं
जयध्वज पाषाणीं
हा स्वर्गि ओरडून कथील शिवविक्रम कहाणी–जी
चौबाजू संगिन तट रुंद बळकट मुंगिला वाट
आत मुळी ना गवस
वरि समंद घाली घस्त दिला त्या घोर बळी अवस–जी
या किल्लया एकच दार निरुंदहि फार मार्गे अडसर
तयाच्या लोखंडी
दो बाजूस बुरुजावर 'भांडि' अन् दारु खंडी खंडी–जी
रातीच्या पहिल्या पारी पहारेकरी वेशिच्या दारिं
अडसरा ओढुनीया

राहि उभा पाहाऱ्या सिद्ध तरवार हातिं धरुनीया–जी
राबता बंद मग करी आत बाहेरी दुरूनच हेरी
ना कुणा येऊ दे जवळी
अति प्रसंग करि त्यावरी धार पट्टयाची सळसळी–जी
मग एकदिनीं वर्तल नवल तें भल ऐका सगळ
शिवराय ठेवुनी चित्तीं
आबाजि सोनदेवाची झालि कशी फटफजिती–जी
आला कोजागिरिचा सण पड्ल चांदण करू जाग्रण
म्हणति या खेळ खेळूं
पट मांडुनि चौफेर दंगलिंत कवड्या फासे घोळ घोळू–जी
दस घटका झाली रात राजमहालांत गोंधळी गात
खेचुनी कान तुणतुणीचा
शाहीर वाजवी डफ ताल धर धरुनि दुगणीचा–जी
तंव पश्चिम बुरुजाकड घ्येउन कावड पावला फुड
पावल टाकून् निघाली
गौळण हिरकणी बघा जायाला गडाच्या खाली–जी
वेशिचा दरवाजा बंद बघुनिया सुंद होइ जळबुंद
नयनांत तिच्या मग आल
तोंडातुनि शबुद बी निघना झाल गाल चिंब ओल–जी
बोले तिला गडकरी करुनि मस्करी धरुनि अंतरीं
अभिलाष कामिनीचा
अधिकार मदान मस्त येइ मग लाज कुठिल त्या नीचा–जी
" हिरकणे सांगतों बघ नको लगबग बघु आग माग
हत है मी एकला गडी
फार दिसा हेत मनिं धरिला त्यो ये सुफळ व्हायची घडी "–जी
घळघळा रडूं लागली हिरकणी भली सती त्या काळि
फुंदफुंदुनिया हैराण
घाबरा व्हउन निघालाऽ जणुं जाया कुडिंतुन प्राण–जी
म्हणे " अहो राव गडकरी जाउ द्या घरीं मला सत्वरी
हाय बाळ ताहान अक्षी

" मी रंडकी एकली घरची मजवीण कोण त्या रक्षी–जी
" आज कोजागिरीचा सण पडूल चांदण दूध अदमण
जमवून विकाया आले
" ओतुनी कावडी उभ्यानच्‌ त्या पावली परत निघालें–जी
" नका वाट अडवुनी धरू तुमच लेकरूं गरिब कोकरू
पसरितें बघा पदरा जी
" हाये लोटक दुधाच देते त्याते घेउनी सुख व्हा राजी–जी
" बाळ पाळण्यांत निजविल बघुनि झोपल दार लोटल
करुनिया घट्ट जीवाला
" आले गडावरी झपझपा परि अता धीर न धरवे मजला–जी
" बाळ माझ जाग होउन बघुनि घर सुन रडूऽरडून
करिल्‌ आकांत जिवाचा
" नाहि आइ म्हणाया तया दिली हो देवे अजुनी वाचा "–जी
गडकरी हसूनी म्हणे " वा ग हिरकणे ! नको बहाणे
करु असे माझिया पुढती
" ह्या हृदयामंधि पहा कसे पिरतिच दाट कढ कढती–जी
" वेशिच दार लागल कोण उघडिल नको चंदबळ
ओढुनी आणु या वेळीं
" वाल हातामधी या हात पिरतिचा गोड घास तूं कवळी "–जी
उसळली तवा हिरकण जणू नागिण बोले फणफण
हसडुनी शिव्या इरसाऽल
" तुम्हि मांग, नव्ह गडकरी, अशान लवलाहिच उलथुन जाल–जी
" आठवली तुला अवदसा म्हणुन हा असा नरक वसवसा
ओकलास तोंडातून
" घे वाण तुझिच तीं तुला चालले गडाखालि उतरून–जी
" काय दिमाखदार गडकरी भरुनिया भरी ऐट किति करी
म्हणे वेस मी न उघडीन
" थांब दाविन तुज मी अतां कोणरे असे गडाची धनीन "–जी
हिरकण माग परतली उभ्या पावली तडक धावली
तट चढुनी गड उतराया

विसरली दुष्ट गडकरी अता ती आठवि आपल्या तान्ह्या–जी
कंबरे पदर खोविला स्मरुनि देविला पाय रोविला
हेरुनी पाउल् वाटऽला
बळ सगळं पायांत उतरलं पापणी मिटेना डोळा–जी
जपुनिया टाकि पाऊल सावरुनि तोल पाहुनि खोल
चहुकडे पसरल पाताळ
लागतां तिची चाहूल दचकती पशुपक्ष्यांचीं बाळं–जी
उगवतांच दुसरा दिन म्हणाति हिरकण पंख लावुन
उतरली पर्वताखाली
कीं वेशि बंद अन् उभी जागती रातपारि रखवाली–जी
ग्येलि वार्ता किल्ल्यावर सकळ सत्वर उतरला नूर
आबाजि सोनदेवाचा
गड अभेद्य ऐशा फुशारकीन व्यर्थ शिणविली वाचा–जी
शिवराय तोषला मनीं म्हणे हिरकणी बोलवा झणी
तीच या गडाची धनीन
द्या नांव तिच त्या बुरुजा माथा लववुन तिजला नमीन–जी
आणिला अधम गडकरी तटाच्या वरी दाविली दरी
लोटिला बांधुनी दोरांत
मग भोजन मासाच झालं कोल्ह्या कुतऱ्यां दिन रात–जी
केलि बंद चोरटी वाट बुजविला फाट बसविल्या दाट
शिळा त्या जागीं
जरि निजे बुद्धि शहाण्यांची, ममता आइची जगीं या जागी–जी

१६ मराठा स्त्रीचें गाणें

गिरिशिखरिं असे धवल धुकें तें जडलें रविकिरण न भूवरि पडले
तयिं जिवलग शृंगारुनि वारू अपुला चुंबुनि मज प्रेमें गेला
घनवनांवरूनि भरारी—मारूनी
मैदानीं जाइल स्वारी—धांवुनी
शिवरायशा सिद्ध कराया सजला रणधीर रक्षि दयाळा

शिरिं चढवुनियां पिळदार शिपाईपगडी मोत्यांच्या शिरपेंचि लडी
लटकवुनि सखा मम अंतरीं चिलखत बसवी वरि रूभरि जामा सजवी
समशेर सोडिली नंगी—कटिवरी
रणतेज झळाळे अंगा—रविपरी
शिवराययशा सिद्ध कराया सजला रणधीर रक्षि दयाळा

रिपु अधम पहा हे देशमाउली छळिती निजधर्मकर्म दूषविती
चिरसंस्थित जी राजभजननयरीती मळवुनि नृप वैरी बनती
सरसावुनि बळकट भाला—निजकरीं
गर्जुनी घालि सखि बाला—त्यांवरी
शिवराययशा सिद्ध कराया सजला रणधीर रक्षि दयाळा

अरिकदन करो गे रणपण जिंकुनि साचा खड्ग होउ जयलाभाचा
मम रमण कधीं पाहिन मी सखि नयनीं जयशाली करिं आदरुनी
जयदुंदभि वाजुं सख्याची—जगभरीं
घडि येवो परि भेटीची—झडकरी
प्रिय राजयशा सिद्ध कराया सजला रणधीर रक्षि दयाळा

---

१७ सिंह-दुर्ग-प्रशस्ति

——:0:——

माथां निर्मळ नीलांतराळ समंतभागीं अतळ पाताळ
मध्यें पर्वतशिखर विशाळ ‘ सिंह-दुर्ग ’ त्या नांव
शैलोत्तमांगीं राहोनि उभा पाहतां निसर्गनिर्मित शोभा
हृदयांगणीं प्रतिभारंभा लीलानृत्य करूं पाहे
कीं हा स्वर्गावतरण-सोपान अथवा देवतानिवासस्थान
सादर कातर मुदित मन यातें पाहोनि होतसे
येथें गगन ठेंगणें झालें वाटे स्वर्गाचि हातां आलें
भूमंडळ क्षुद्रत्वें व्यापिलें कष्टें दिसे पाहतां

भूगत रक्षत्व लोपलें वरि स्निग्ध मार्दव विलेपिलें
कीं रंगशलाकेनें रेखिलें चित्रकारें स्मृतिचित्र
जिकडे तिकडे एकसरी गिरिमार्गे पसरले गिरी
अर्धोन्मीलित दलकुसरी जेवि कमळीं दिसतसे
कीं हे करंडक गुप्तपुटी सृष्टिदेवतेचिया गांठीं
शृंगारभूषा ठेवण्यासाठीं विश्वकर्म्यें निर्मियले
छायाप्रकाश सरमिसळ रविकर पसरवी पातळ
दावी नीचोच्चरूप सकळ लीलास्पर्शें करोनी
गहन गिरिपार्श्वसंपुटीं दुरूनी अवचित पडतां गांठी
प्रेमनिर्भर मारिती मिठी सरिता सख्या आनंदें
कीं असतांहि अति निकट पर्वतपति हे निष्ठुर निपट
षण्मासांतींहि नच भेट होऊं देती स्ववधूंची
पहा हा दिग्गज पर्वत बळी तृण पसरोनि गंडस्थळीं
शुंडादंडें वृक्ष कवळी मुखीं ग्रास घालावया
पर्वतपृष्ठ नखशिखांत ठायीं ठायीं निम्नोन्नत
त्यांतोनि जलनिर्झर वाहत घर्ममाला जेवि श्रमें
अतुलबलिनी निसर्गरमणी पाककर्मनिपुण गृहिणी
घेवोनि अशनि कातरणी गिरिशष्कुलीतें मुरड घाली
गिरिपादपीठीं वृक्षवेली पसरती शीतळ साउली
पक्षिगण चिमुकलीं घरकुलीं त्यांत बांधोनि नांदती
ठायीं ठायीं निर्मळ पाणी त्यांत बिंबली शैलश्रेणी
जळमंदिराची उभारणी तेविं शोभा दिसतसे
भेटतां निश्चल निर्झरिणी रूप पाहुनी भूषादर्पणीं
सृष्टिवधू वेणीफणी वाटे करित उल्हासें
येथ काळेकभिन्न पाषाण तेथ मृण्मयपट विस्तीर्ण
तिकडे कोमल हरित तृण आसनांपरी पसरियलें
श्रमसायासें नांगरणी करोनि समृद्ध धान्यखाणी
आशावंत कृषिवल्गणीं गर्भांकांक्षिणी भू केली

अनंत पाऊलवाटा उमटल्या जिकडे तिकडे पसरल्या
जणुं रक्तवाहिन्या चितारिल्या अखिल पर्वतशरीरीं
वरुनी चालले पशु अनेक स्वैरसंचर भक्ष्योन्मुख
आकंठ तृण-कवळा आणिक जयांस सुख वा मोक्ष नसे
ग्रामीं वनीं मनुष्यसंचार असुनि न होत दृष्टिगोचर
दिसत तरी अल्पाकार जैशा वारुळीं पिपीलिका
पहा इकडे ही पुण्यनगरी शिरुनि बैसली क्षितिकुहरीं
वृक्षपल्लवां अभ्यंरीं लपोनि गेली सर्वथा
उंच प्रासाद सौधशिखरें तैशीं हरिमंदिरें गोपुरें
विविध जलसंचय सारे एका पंक्तीस बैसले
चित्रवर्ण बिंदुकृश दिसती नगरावयव लेश
थोरां सान, सानां अदृश्य केविं केलें गिरिराजें
दुर्ग सिंह पदें फिरवून होत असेल नामाभिधान
तेंच यासि उचित जाण सगुणरूप अनुसारें
दुर्ग मृगांतील मृगेंद्र दुर्ग नरांचा नरेंद्र
दुर्ग देवतांचा देवेंद्र सर्वांहुनी श्रेष्ठ असे
मानधन स्वायत्त उन्नत कोणी न करी याशीं लगट
दुरुन देखतांच दंडवत यास घालिती सर्वहि
पुण्य–दशक्रोशीचें रक्षण अंगिकारी प्रबळ विचक्षण
शतघ्नी–निःश्वसितें मरण सर्व शत्रूंस देतसे
अनंत पाद अनंत हस्त पसरोनी देह अति प्रशस्त
रात्रंदिन हा घाली घस्त आप्तरक्षणा कारणें
मस्तकीं वाहे नित्य भरारा सागर-तुषार-वाही वारा
हा न देत क्षणभर थारा दुष्ट घातक रोगबीजां
या न लतांची आवडी या न मधुर फळांची गोडी
यासमीप न मिळे वाढी कुसुम-कलिका-लीलेला
यासि गर्द छाया नावडे प्रखर रवितापें तेजाचि चढे
दुर्मनस्क होउनि कुढे जरि घन पसरी आतपत्र

सहा ऋतु बाराहि मास देती यासि दृढ विश्वास
अवगणुनी सुखदुःखास तत्पर समान राहताती
आवडीचे वृक्ष पक्षिगण जरि सेवक तरी मित्रासमान
स्नेहबद्ध करोनि जाण संग्रहीं ठेवी महानुभाव
जयांसि चाळवी सुखलालसा चंचळ मनें करिती हव्यासा
त्यांसि हा मर्मज्ञ सहसा जवळीं थारा देत नसे
याची सहज वेषरचना या नावडती पोषाख नाना
याचिया मना किंवा नयनां सौंदर्य लोभवूं न शकेचि
परि ऋतु-मित्राची याचना हा औद्धत्यें अवमानीना
उचित स्वपरमनरंजना यथाप्रसंगें करीतसे.
येतां वसंत सन्मुख हा पावतसे अव्याज हरिख
सह परिवारें सेवी सुख मधुमाधवसंगतीं
आरक्त कोमल पल्लव लोल मधुनी मधुनि शिंपोनि जल
त्यास आणिली शोभा अतुल पहा समयज्ञें गिरिराजें
वृक्षशाखांचीं तोरणें लावुनि वनस्थलींचीं अंगणें
शोभविलीं स्वागताकारणें श्री-प्रिय वसंत ऋतूच्या
नीलांबराचें छत उभारी श्वेताभ्रखंड लटकती वरी
मंगल मंडपाच्या झालरी तेंवि शोभिवंत दीसती
येथ न विलासी कोकिळा आम्रासवमदें चढवोनि गळा
दाविण्या अंगीची गायनकळा तरी न कांहीं उणेपण
गगनभेदी प्रचंड घारी मारितां योजनप्राय भरारी
करिती शब्द त्याची सरी इतर गायना नच येई
ऐसे अपूर्व देखावे नयनां दिसती स्वभावें
शैलतटावरुनि हलावें ऐसें मना मानेच ना
अविट रुचिर दर्शनसुख नित्य दे जो दुर्गप्रमुख
तद्वर्णन समर्पक कविमुखहि करिल केवि

१८ देशमातेला शेवटची विज्ञप्ति

माते स्वदेशजननी! तव पुत्र पाहीं
मी आज अंकिं शिर ठेवुनि तूज वाही
घेतों तुझें फिरुनि दर्शन हें प्रमोदें
बाळावरी सतत लोभ तुझा असों दे

स्थापूनि मूर्ति तव या मम मंदिरांत
मीं दासभाव वरिला जननी नितांत
तो आज अंतिं अवघाहि फळासि आला
हा देह कारणिं तुझ्या बहु धन्य झाला

जें वाहिलें तुजसि तें तव; केंवि माझें?
त्यासें न लाभे कसला अवघेंचि ओझें
अर्पूनी देह तुजला परलोकिं जातां
प्राणप्रयाणसमयींहि मला न चिंता

होणार सत्य अपुला शरिरें वियोग
होवो; प्रसिद्ध दुरतिक्रम दैवयोग
ठावें मला प्रणयरज्जु जरी असारा
अंगावरी परतवी तरि वज्रधारा

मी चाललों तरि उरे मम नांव मागें
जें मत्कथा विविध या जगतासि सांगे
तैसीच भोगियलि दुःखपरंपरा जी
ती ठेवण्या स्मरणाचिन्ह म्हणोनि राजी

केले अनंत अपराध परोपरींचे
होवोनि मानवश सर्व तुझ्या अरींचे
ठेवूनि जागृत अमर्षण वैरभाव
दुष्कीर्तिदूषित गमे करितील नांव

होतां तसें जननि तूं रडशील काय
मातें स्मरूनि करुणे म्हणशील हाय

त्वन्नेत्रिं अश्रु जरि एकचि एक आला
तीं दूषणें तरि समर्थ पुसावयाला
जो काय लोभ अवघा हृदयांत होता
तूं एक तद्विषय नैव दुजा पहातां
माझे विचार सगळेहि तुझेच होते
या आपुल्याच मुखिं काय कथूं अगे ते
स्वातंत्र्य-उज्ज्वल तुझे दिन वैभवाचे
मीं दैवहीन बघण्या न कदापि वाचे
जे कोण पुत्र असती तव दैवशाली
त्यांच्याच तें सुख असे लिहिलें सुभाळीं

१९ दुर्योधनाचे शेवटचे उद्गार

अस्तास जाउनि दिवाकर काळ झाला
अंधार घोर भुवनीं गगनीं रिघाला
ऐश्वर्य सर्व सरलें गमतें दिनाचें
आपत्तिरात्र अतिभीषण नाच नाचे
हे वृक्ष पर्वत तशा सरिता महा या
ज्यांतें सुहास्यमय जीवनतेज द्याया
सन्मित्र तत्पर तया कळिकाळ नेतां
शोकांधकारिं जणुं मग्न लवोनि माथा
झाली अनाथ पृथिवी करुणार्त खिन्न
डोळे मिटोनि रडते जणुं ही सुदीन
गाळीत सांद्रनिबिडासितपक्ष्म-वाटे
दुःखाश्रु संतत अहा दंवबिंदु मोठे
आकाश-अंगण त्रिलिंपिन काजळानें
ऐसेंच भासवि मला घन हा बळानें

शिंपीयला वरि सडा रुधिरोदकाचा
संध्या सुवर्ण बघुनी ग्रह हो मनाचा
नक्षत्रपुंज अणुरेणु जसे विकीर्ण
त्यांचा बघोनि बहु उज्ज्वळ शुभ्र वर्ण
हाडें चुरोनि गमतें जणूं चूर्ण केली
रंगावळी विविध त्यांतुनि काढियेली
निःष्पंद निश्चलचि या जरि विश्वकाळीं
गंभीर नाद भरला मम कर्णपाळीं
हा एक मात्र करि किर्किर कोण नेणें
याचें मना गमत काय किं गोड गाणें
भाळीं स्रवे हिम करा मम थंड काय
हे सर्व गार पडले मम हातपाय
काळीज चंचळपणा बहुसाल दावी
जैसी क्षणोक्षणिं तडित् तळपोनि जावी
येई स्मृति परि पुन्हा परतोनि जाते
नेणें असेंचि वरचेवर काय होतें
ज्या देखिल्या कधि न पूर्वि अशा विचित्र
नाना चमत्कृतिहि अंतरिं पाहि नेत्र
आत्मा जणों वितळला जळरूप झाला
ब्रह्मांडगोल अवघा द्रववूं निघाला
कीं आरसा हृदय हें मम आज झालें
त्यांतून विश्व प्रतिबिंबित आंत आलें
मी कोण? मी नृप सुयोधन कौरवांचा?
हें सत्य ना? भ्रम पडे मज थोर साचा
हो मीच मी अखिल कौरवलोकनाथ
हा हाय, हाय, स्मृति कां परतोनि येत
कोठें असे मम पुरी मम राजधानी
ऐश्वर्यपूर्ण मणिकांचनरत्नखाणी
हें काय मी चहुंकडे वन दाट पाहें
जैसें स्मशान बहु घोर तसें दिसे हें

प्रासादगोपुर विलासगृहें अनंत
दीपावली चमकती मणिपात्रिं ज्यांत
स्पर्शेंच जे गुदगुल्या करिती बिछाने
झाले अदृश्याचि कसे निमिषांत नेणें
प्रालंबि मौक्तिकफळें बहु झालरीला
वेलींत पाचुकण शोभविती जयांला
ते विंझणे बहु सुगंधित चंदनाचे
ज्या वारितां युवतिचा कर गोड नाचे
प्राणाहुनी अधिक जे ममता करीती
सेवेंत दाविति दृढ भक्ति सुनम्र रीती
देऊनि आशि यश शोभन चिंतणारे
जाती कुठें मजसि सोडुनि भृत्य सारे
ही उच्च नीच बहु कंटकपूर्ण भूमी
कीं श्वान लोळत तसाचि पहा प्रभू मी
हे शिंपडे हिमतुषारहि फार गार
जीवासि गोठुनि जणूं हरि सत्त्वसार
हीं वाजती फडफडा वरि वृक्षपर्णें
विस्तारि पंख जणुं वाजविले सुपर्णें
स्फुंदोनि उच्छ्वसन टाकित जीर्ण वारा
एकांत भासवि बळें मज हा निवारा
हे काजवे चमचमा चमकोनि जाती
मी नष्टवैभव गणोनिच हांसताती
त्यांचे सुतीक्ष्ण करिती किरण प्रवेश
सोसे न टोचाणि मनीं बहु होति क्लेश
धिप्पाड काळतरु उग्र समंधरूप
माझ्या शिरावरि उभे असती कुरूप
खद्योतनेत्र मिचकावुनि हातवारे
वारोनि दाविती मला भय काय सारे
मी चाललों त्वरित सोडुनि जीवलोक
होई विलंब न अतां पळमात्र एक

ऐश्वर्य तें घडत अंत असा पहातां
दैवा तुला शरण नम्र लवोनि माथा
आहे असार जिव चंचळ राज्यलक्ष्मी
मारी कटाक्ष युवती जशि नेत्रपक्ष्मीं
मीं विश्वव्यापि अवडंबर जें रचावें
तें कां असें बुडबुड्यासम हें फुटावें
तैलाभिषिक्त जशि वात जळे प्रदीपीं
हा जीवही फुरफुरे नव रक्त जों पी
दोन्ही सर्वेचि वमती मलिनत्व काळें
काळी मसी अयश लांछन तेंहि काळें
मीं जाळिले सुगुण सज्जन सत्य सारे
मीं जाळिले सुहृद इष्टहि आप्त प्यारे
स्वत्वासि आहुत करोनि सुतृप्त केला
आशाग्नि जो हृदयिं या भडकोनि गेला
कोठें सखा शकुनि कल्पक इष्टवादी
कोठें सुयोध मम कर्ण अरिप्रभेदी
भीष्मादि साह्य करणार पुराण वीर
ज्यांच्यापुढें थरथरे रणिं काळ थोर
ते गुंतले मजशिं सौहृदरज्जुपाशें
मी ओढिलों नियतिकल्पित सर्वनाशें
ब्रीदासि राखुनि सवें मज सर्व आले
माझें कपाळ फुटकें इतरां फळालें,
मी कालकूट विषबिंदु महा जहाल
पीयूष गोड भरलें जगिं जें रसाळ
तें टाकिलें कटु कषाय असें करोनी
उद्गार केवळ करीलचि जीवहानि
जैसें सुदूर क्षितिजीं जळ तें मृगाला
आकर्षि राज्य धनलोभ तसाच माला
सूर्यास्त नाशित अवास्तविका जळाला
हा घोर अंतहि तसा मजलागिं आला

२० देव आणि मनुष्य

बीजांतुनी वृक्ष वाढे वृक्ष निर्मी बीजें पुढें
देवें निर्मियलें मानवा मग निर्मी मानव देवा
देवा जगीं अधिष्ठान आम्हावीण दुसरे कोण
आम्ही त्याचें सिंहासन आम्ही प्रत्यक्ष प्रमाण
आम्ही त्याचेच अवतार आम्हावरी त्याचा भार

काय वर्णूं मानवशक्ति देवा जगवी त्याची भक्ति
देवा देई उत्तम गुण आपल्यांतले काढून
तळहातिची मृत्तिका करुनि तिची मूर्ति देखा
स्नान अभ्यंग त्या घाली मऊ वस्त्रें वरती खाली
धूपदीप नैवेद्यादि करी उपचारांचे विधी

देवा मधें अभिषेकिलें तीर्थ गोड तें आपुलें
त्यासि लावितां चंदन हळुच माखी अपुलें वदन
उदबत्ती जरि कस्तुरमुखी आपुलें घ्राण होतें सुखी
पेटवितां त्या दीपज्योति तेजें नेत्र संतोषती
मिष्ट नैवेद्य दाखवी म्हणे मजविण कोण खाई

वैभवाचाहि पसारा दाखविण्या देव बरा
सगुण पूजाप्रदर्शन मुक्त हस्तें ओपी धन
सोनें रुपें रत्नें हिरे अलंकारादि गोजिरे
सर्व शृंगार वस्त्रादि उपचारांच्या उपाधी
पुढें मांडोनी बैसतां ध्यानीं आणी निज धनमत्ता

होतां ध्यानस्थ तो मग मनीं आणी सर्वहि जग
जणूं राजा दिग्विजयी तैसा तुष्ट अपुले ठायीं
जग जिंकितां आयास लवमात्र न होती त्यास
देहात्मतेचा पसारा अंतर्बाह्य नटला सारा
देव प्रतीक केवळ अहंबुद्धीचें फळमूळ

सुख-भोगाचिये काळीं
देवनामा अळीमिळी
दुःख लेश होतां जिवा
हाक मारी देवा देवा
क्लेश सरतां देवा विसरे
भक्तिप्रवाह ओसरे
आला वळिवाचा पाऊस
क्षणे भरे क्षणे ओस
कळ येतां पोट धरी
तेवि देवातें आदरी
नाम घेतांना देवाचें
सुख दुःख कांहिं न वाचे
लक्षावधी एर शब्द
उच्चारितो प्रतिअब्द
तैसें देवाचेंहि नांव
जिव्हालीलेचा प्रभाव
अंतरासी कांहि न पोंचे
श्वास दरच्यावरी वेंचे
भरे नामें शब्दकोश
भावनेचा किमपि न लेश
आम्हा सगुण भक्ति हवी
परिती नव्याहूनी नवी
कोण कलि म्हणतो यासी
कृत युगाचि हें आम्हासी
प्रगटे जनार्दनाचि जनीं
लागा तयाच्या भजनीं
तोच मारील तारील
मोक्षमार्गहि दावील
जी जी करूं त्याची सेवा
ती ती सर्वहि पावे देवा

२१ गुरुशिष्यांची खाशी जोडी !

अडी अडला नारायण
धरी गर्दभचरण
म्हणे तूंच देव आतां
तूंच गुरू मातापिता
तोहि मनीं आनंदला
नारायणासी बोलला
“ आज तुझिया बहुमानें
संतोषलों मीहि मनें
धरिसि तरी धरी चरण
परि मी सांगें एक खूण
पायांपासून मागल्या
दूर राही भक्ता भल्या
भरतां भक्तप्रेम उरीं
माथा खाशील ठोकरी ”
मनीं म्हणे गर्दभगुरू
“ शिष्य दिसतो उदरंभरू
धरितां चरण मम मागले
केव्हां ओढिल तें न कळे ”
गुरू तसे शिष्य भोंदू
नका कोणा स्तवूं निंदूं

२२ पंढरी-वर्णन

आज पाहिली पंढरी विठोरायाची नगरी
थेट घेतलें दर्शन चरणिं मस्तक ठेवून
माळ वाहिली घातली प्रेमें देवघेव केली
पदरीं बांधिला प्रसाद घुमविला नाम-नाद
प्रदक्षिणा पुरी केली मूर्ति दुरुनी न्याहाळिली:

क्षणभरी बसुनी द्वारीं यात्रा पूर्ण केली सारी:
पाठ फिरवितां फिरेना परत फिरणें येनां मना
मागें राउळीं राहिले भक्त भजक प्रेमी भले
त्यांचा वाटला मज हेवा बघुनी दृढभाव सेवा
जणु तें घरचेंच लेंकरूं उडतें फिरतें मीं पांखरूं

असो निघालों घेऊन पुण्य पीठाचें स्मरण
पुरविन मी ती शिधोरी फिरुनि येईन तोंवरी:
द्रौपदीची स्थाली जशी तैसें स्मरण हेंहि मशीं
हात घालितां आठवणी मज होतील त्या क्षणीं
तीच पंढरीची भेटी तेंचि वंदन भीमातटीं

प्रवेशतां महाद्वारीं दोहों अंगें परोपरी
पेढ्या दुकानें लागलीं व्यवहारीं जीं गुंतलीं
त्यांसि विठ्ठलाचें स्मरण होत पैशा-अडक्यांतुन
बुक्का कुंकू नारळ माळा बांधितातीं यात्रिक गळां
माल विठ्ठल विठ्ठल पैसा होतो संचित आपैसा

पुढें जातां ये सामोरी नामदेवाची पायरी
संत सज्जनांच्या लत्ता तीच नामयाची मत्ता
भावें देहाचें साफल्य केलें अन्य न व्रत-वैकल्य
नामा जाहला भांडारी श्री विठ्ठलाचिये द्वारीं
जाऊं देइ न दिधल्यावीण कोणा चरणरजःकण

चढुनी वरती जातां उभा
सभामंडप दावी शोभा
देवतेदेवता चिल्लर
मंडपांताचि त्यांचें घर
स्तंभ उत्तुंग कमानी
कुसर आकारहि नामी
पक्षि बसुनियां निवांत
चिमु-चिमुकल्या घरट्यांत
यात्रेकरूंची रहदारी
पाहताती कौतुकभरीं

चार पायऱ्यांच्यावर
मुख्य श्री विठ्ठल-मंदिर
खांब दगडी दगडी भाले
छत तेंहि दगडी केलें
जुन्या काळचें तें शिल्प
बळ भारी कुसर अल्प
मंद प्रकाश भीतरीं
दीपज्योती मिणमिण करी
छतीं पाडोनी भोकसे
आंत घेतले ते कवडासे

येथ बसती भक्तलोक
स्त्री-पुरुषादिक भाविक
कोणीं पांडुरंग ध्याती
अभंगातें कोणी गाती
कोणी वाजविती टाळ्या
कोणी मंजुळ चिपळ्या
कोणी हातीं कान धरुनी
मुखें अपराधातें स्मरुनी
म्हणती देवा क्षमा करी
पातक्या या तूं उद्धरी

पुढें जातां लागे द्वार
ना उंच ना रुंदहि फार
आंत लोखंडी साखळी
लावी दर्शनाची पाळी
एका मागें एक सरे
मध्यें मुंगीहि न शिरे
येतां बारी मग तातडी
चरण धरण्या घाली उडी
भक्त देवासीं भेटला
वाटे भवसिंधू आटला

सोडीना तो चरणकमळा
जैसा गुळासी डोंगळा
पद-मस्तकांची गांठ
पडतां स्फुरती हृदय-ओष्ठ
ब्रह्मानंद हातीं आला
क्षणमात्र उन्मन झाला
म्हणे देवा येवो मज
मरण सुखें येथचि आज
परि पुजारी करी गर्दी
चला घटका झाली अर्धी

आली वियोगाची वेळ
उठे चित्तीं तळमळ
डोळे विस्तारुनी दीर्घ
पाही मूर्ती ती समग्र

अन्न भक्षितो अधाशी किंवा तृषित जळ प्राशी
तेविं साठवी अंतरीं सगुणरूपधर हरी
म्हणे दुःखें 'जातों देवा' 'दीनावरी कृपा ठेवा'

उभे पुजारी शेजारी त्यांचें लक्ष द्रव्यावरी
कोणी वाही नुसता बुक्का त्यासी देती त्वरित धक्का
कोणी ठेवितातो पैसा त्यासि म्हणती दूर बैसा
चवली पावली अधेली क्रमें मान्यता वाढली
रुपया पुतळी वा मोहोर त्यातें परत ये अहेर

मिळे जितुकें नाणें सुर्ति तितुकि विकिती विठ्ठल मूर्ति
कोणा प्रत्यक्ष प्रसाद कोणा दुरुनी नेत्रास्वाद
कोणा निर्माल्याचें फूल कोणा तीर्थ कोणा गूळ
कोणा नारळ करिती परत कोणा माळ कंठगत
भक्त बघती देवाकडे बडवे हातांतील कडें

वतनदारी बोकाळली वृत्ति बाजारी जाहली
देव बसला होउनि शेठ भक्ता-दलालांशीं गांठ
त्यांसी सगळाचि नफा भक्त भाविक करिती सफा
पुजाऱ्यांचा झुकता कांटा पुण्य भक्तांच्याच वाटा
पूर्वजन्मीचें तें ऋण देव फेडितो राबून

सगुण स्वरूप घेतलें पुजाऱ्यांच्या उदरीं आलें
पुंडलीक मेला गेला मागें वारस उभा झाला
देव मिळकत वडिलार्जित त्यें केली हस्तगत
वाटवाटूनी घेतली तोड मोडुनि शकलें केलीं
राईवजा केले तुकडे होतां वांटप वांकडें

मूर्ती फुटतां सर्व नाश म्हणुनि बचावली खास
दिली जिवाची किंमत नाहीं म्हणण्या ना हिंमत

स्वयें झाला बंदिवान केलें स्वातंत्र्य अर्पण
दरवेशा हातीं ऋषभ शेतकऱ्या हातीं वृषभ
तेंवि दिली वेसण हातीं पुजाऱ्याच्या इतर न गति
तयें लावीयलीं मागें सगुण पूजेचीं उपांगें
जणुं देवा मनुजाहुनी सुख-भोगीं आवड मनीं

जणुं देव देहधारी नित्य नैमित्तिक आचरी
जणुं ज्ञान कर्मेंद्रियें देव चालवीतो स्वयें
जणुं देव हा विलासी भोग्य वस्तूंचा अभिलाषी
दिनचर्येंची मोठी गर्दी जरी कर्मं घडती अर्धीं
सकल मनुजांचे चोचले एका विठ्ठला सूचले

गृहस्थाचा पूर्णाश्रम आचरण्यातें घेतो श्रम
नाहीं दम ना विश्रांती नाहीं वीट नाहीं खंती
जसा घाण्यासी जुंपला डोळे बांधुनि रेडा भला
हातीं घेवोनी काकडा किल्ली कुलपाचा आकडा
उघडती तें कवाड स्वार्थी पुजारी लबाड

म्हणती देवां आतां उठणें तुम्हा यांतुनि नाहीं सुटणें
न सोडाल आंथरूण व्यर्थ जातील लाभ-क्षण
तुम्हां येतांचि जागृती सुरू होते अमुची प्राप्ती
तुम्हां नाहीं कांहीं उणें परि घ्या आमुच्या कारणें
भक्त लावी तुम्हां भोग तोच अमुच्या लाभा योग

आम्हीं देतों मोठेपण फेडा त्याचें कांहीं ऋण
आला तैसे कां न गेलां कोणी तुम्हां आग्रह केला
पुंडलिकाचें निमित्त खरें भूतलीं तुमचें चित्त
मोठे काकडे पेटले धूमें देवा घुमटाविलें
शंख झांजादि वाजती कानठळ्या बसती किती

येई देवा झोंप कैची मागें पुढें लागे कैची
मग सोडी शय्यागृहा सर्वे त्याहि निद्रा-स्पृहा

चालविला स्नानस्थाना उभे तेथें भोग नाना
पंचामृताचें साबण देवा अंग तुमचें घाण
म्हणुनि घासुनि शुद्ध करिती मनुजापरती स्नानरीती

हंडे दुधाचे ओतले खालीं माजे मोठें तळें
तीर्थ विकण्या सोय झाली असती गिऱ्हाइकें भलीं
पुसुनि केला मग कोरडा वस्त्रें बांधिला जणुं मुढा
लावितात‍ि चंदन-लेपा अहंकाराच्या अवलेपा
घालितात‍ि गुंफुनि गळां विविध कुसुमांच्या त्या माळा

लावा कस्तुरीतिलक देवा व सुहेर न सुतक
शृंगारिती दागिन्यांनीं घोस बिगबाळ्या कानीं
अंगा अत्तर चोपडिलें सगळें राऊळ दरवळिलें
येती नैवेद्यांचीं ताटें भरभरुनी मोठ्या थाटें
पांचा बोटांचा नैवेद्य जाणे पुजारी तत्‌ह्रद्य

देवा धिरडीं पापड भजीं अजीर्णाची ना काळजी
दिवसांतुनि दहा जण देवा घालिती भोजन
पंचरस देवा नांवें लावुनि आपणाचि खावे

महापूजा परोपरी बांधिति भक्त वारकरी
देव नवसासी पावता ऋण फेडिती तत्त्वतां
जैशी भक्ति वा श्रीमंती तैसी पूजा ते बांधिती
पूजा प्रकारांची स्पर्धा जीव देवाचा हो अर्धा
जैसें देणें तैसें सोंग देवा लेवविती चांग
पूजा आरती पालखी अन्य विषय न येती मुखीं
प्रत्येकाचे ठरले दर कांहीं देती न उधार

कसर सळई पंचोत्री यांची लिहिली असे जंत्री
माफी सूट मुळीं नाहीं कार्या आधीं रोकड घाई
कधीं आत नाहीं बट्टा विनामुद्दल सगळा सट्टा
भक्त होतां दृष्टीआड लावी पुजारी कवाड

देवा नागविती सगळा लुटुनी करीति मोकळा
द्रव्य पूजादि साहित्य घरीं पाठविती नित्य
पुन्हा वस्त्रें नेसुनि जुनीं देव उभा दीनवाणी
नव्या श्रीमत् भक्तांसाठीं वाट पाहत काळा कंठी
पुजाऱ्यांचीं घरेंदारें थाटतातीं परस्परें

पूर्वजन्मीचें तें देणें देतो करुनी मस्तक किणें
देव व्यवहारातें साक्षी ठायीं बसुनी सर्व लक्षी
काय करील बिचारा मना आपुल्या विचारा
कसे असोत पूजारी खरे भक्त वारकरी
पदरा बांधूनीया गाठ कष्टें चालुनि येती वाट

असो वारा पाऊस-पाणी कधिं न आणितात ध्यानीं
जिथें मिळेल जें कदान्न करिती खाऊनी गुजराण
हातिं पताक मुखीं नाम हाचि तयांचा विश्राम
वारी चुकता तयांची अंतःकरण फार जाची
साधतांचि वाटे त्यांना मोक्ष दूर असेचि ना

हातीं घेतां ध्वज पताक वाटे पाप होय खाक
तुळशीकाष्ठाची ती माळा भासे वैजयंती गळा
मुखीं भजनीं नाम आलें तेणें वज्र संपादिलें
खरे भक्त वारकरी सरळ सुताचिये परी
लोकां वाटतीं मेंढरें परि तीं देवाचीं लेंकरें

शुद्ध भाव बोले मुखीं सदा संतोषी तो सुखी
शुद्ध भक्ति नम्र शीर तेंच देवाचें गोपुर
शुद्ध भाव तो निर्मळ तेंच उपासनामूळ
जेथें नसे तत्त्वज्ञान काय करील तीर्थस्नान
मुख्य प्रेमाची तन्मयता तेणें देव येई हातां

देव राहिला भरूनि सर्व सृष्टिमात्रामधुनि
जयां क्षणिं भाव दाटे तया क्षणिं तोहि प्रगटे
सेव्य-सेवक एकरूप तोचि राजा तोचि भूप

राज्यविस्तार मानसीं जेंवि भरती समुद्रासी
द्रव्यकोश गंगाजळी सर्व असे भीमातळीं

राज्य घेणें न कोणाचें मग सैन्य लागे कैचें
सगळा दरबार राऊळीं तेथें कारस्थानें सगळीं
राज्यभांडाराची शोभा केवळ गरुड तेथें उभा
भक्त मंडळीची सेना तिचा पति न्हावी सेना
राजधानी ती पंढरी वींतभर जी भीमातिरीं

ध्वज पताका निशाण वीट तेंच सिंहासन
टिळा मुद्रा वा चंदनी तींच होतीं चलनीं नाणीं
भालीं लावियेला बुक्का तोचि सरकाराचा शिक्का
तुळशी मंजरी वा पत्र तेंच मान्य आज्ञापत्र
अठ्ठावीस आगें मागें काळ मोजित बैसे युगें

कैक राज्यें मोडुनि गेलीं जुनीं झालीं इतुक्या काळीं
विठ्ठलशाही ताम्रपट वज्रकाय असे निपट
ह्याला म्हणाति दैवी सत्ता नये कोडें उकलितां
कोण कोठिल पुंडलीक सफळ झाली त्याची हाक
दिलें सोडुनि स्वर्गभुवन वस्ती केली मृत्युभवन

स्वयें मोजूनी जागा घे विटेहूनि आणिक न मागे
परी पुंडलीका दिलें कीर्तिक्षेत्र जग सगळें
दोन्ही पाय अवघडती जागा आकुंचित अति
कधीं त्याचें तोंड न फिरलें आंगा आळेपिळे न दिले

पाय फार अवघडले परी मुखें शब्द न बोले
ऐसा देव भक्तनिष्ट आनंदानें सोशी कष्ट
निज क्षीराब्धि सोडूनि जन्मठेप काळे पाणी
आला भोगाया भूवर रखमा देवीचा प्रियकर
मागें तांतडीनें सती आलि.शोधाया निजपति

परी तो असे भक्तनिष्ठ म्हणूनि तिची गांठ न घेत

दिलें तिजला बांधुनि घर
आत्म-मंदिराबाहेर
तेथें बसुनि न्याहाळिते
लोक:दर्शना येति ते
ओसरेल हा प्रवाह
तेव्हां म्हणे मजला वाव
देवा येते तुमची कींव
आम्ही बरे मानव जीव

२३ धर्मक्षेत्रांचें नशीब !

'आक्रोशाच्या भिंती' नसती एकट्या जरूशालेमांत
साऱ्या धर्मक्षेत्रांचा करि दुष्ट दैव हा असाच घात
जाऊनि तुम्ही काशी क्षेत्रीं मंदिरीं पहा विश्वेशाच्या
म्हणजे वाटे कां न जाहल्या बघत्या डोळ्यांच्या या खाचा
धर्म आपला राज्य दुजाचें ही कशी जगीं जुगते जोडी
एक घालवुनि दुजें उराशीं बाळगणें ही मनुजा खोडी,
द्विसहस्रावधि वर्षें यहुदी पारखा असे निज भूमीला
ख्रिस्तमहंमद अनुयायांनीं क्षेत्र घेऊनि कबजा केला
सर्व देशभर फिरला मग तो बांधुनी उरीं निज धनराशी
तिरस्कारिलें अखिल जगानें थारा न मिळे कोणापाशी
वळचणीस सर्पाला जागा तेवि या मिळे देशोदेशी
मस्तकमणि जाहल्या हस्तगत ठेचतात मग दुसरे दिवशीं
जखम भराया कपाळांतली तेल मागण्या अश्वत्थामा
फिरतो त्यापरि चिरंजीव हा कोणि ये न परि त्याच्या कामा
जिणें कंठितो असेंच जगभर पाहतो परी वळुनी मागें
एक नेत्र टोकास जगाच्या दूसरा तरी घरच्या जागे
यात्रा करितो मधुनी मधुनी येऊनि जरूशालेमाची
आक्रोशांच्या भिंतिस माथा टेकुनि व्यथा घालवि मनिची

नेत्रांतुनि वाहवी अश्रुजळ प्रार्थितो मनें अपुल्या प्रभुला
आम्हा 'आवडतें' म्हणवीसी दाखवी तरी आपुली लीला
महायुद्ध निर्माण जाहलें आलि संधि यहुद्याच्या सोन्या
अरबांवरि उसळुनी निघाला खड्गभार धिक्कारुनि म्याना
इंग्रज झाला अंतिं यशस्वी पंथ एक दों कामें त्याचीं
कृतज्ञता यहुद्यास दावितां जोडि शृंखला साम्राज्याची

---

२४ धन-निंदेची निंदा

प्रवृत्ति विषय जो जो त्यासि म्हणति अर्थ सकल शास्त्रज्ञ
'अर्थाविणें निरर्थक सकल' म्हणति जे विचक्षण प्राज्ञ

धननिंदा मुखिं भरली परि आचारें स्तुतीच जन करिती
बोलावें एक असो कृति दुसरी हीच दांभिकी रीती

द्राक्षें आंबट कोल्ह्या तेंवि म्हणति द्रव्य दुष्ट निर्धन जे
श्रीमंतां अति परिचय म्हणुनि अवज्ञाचि तन्मनीं माजे

'अर्थमनर्थं भावय नित्यं' हें वदति आद्य आचार्य
परि तच्छिष्यकुळाचें सुवर्ण पात्राविणें न हो कार्य

हरिभक्तपरायण करि धननिंदा गात गात वाजवित
परि उपवस्त्रा त्याच्या पाहुनि घ्या कांठ रुंद वीतावित

कोट्याधीश म्हणे मज घासभर कदान्न पुरत खायाला
परि रेशमी रुजाम्याविण बैठक बोचतेच पायाला

कोणी धर्ममिषानें हरिमंदिर बांधुनी विभव दावी
मूर्तिसि चढवी रत्नें सोन्याचे कळस गोपुरीं लावी

बुडवुनि विधवा पोरें धन मेळविलें जरी पिळुनि माना
तरि घालितां सहस्रां भोजन न पडे कमी तया माना

राबवुनि रात्रंदिन चाकर लोकांसि फोडितो घाम
घालोनि पाणपोई फुकट्या पथिकास देइ आराम

व्यवहार अर्थमूलक आधारहि अर्थ सकल:जगताचा
धननिंदेनें मग का बनुनि कृतघ्नहि विटळतां वाचा ?

व्यक्ति असो राष्ट्र असो धनचि हवें त्यास आपणापुरतें
मान धना योग्य असे द्यावा तो न्यायनिष्ठ सत्यरतें

आपण होउनि न करी घात कुणाचा कधीं धन बिचारें
घडला कधीं अपव्यय तरि जाणा जाहलाचि अविचारें

प्रेमळ गृहिणी हस्तीं अग्नि करी अन्नसिद्धि रुचकरशी
परि तत्सहाय घेउनि जाळी परगृहचि दुर्मती विवशी

सच्छील अग्निहोत्री जोडितसे पुण्य पेटवुनि कुंड
घेउनि अग्नि तयांतिल जाळी जग 'सत्यशोधकी' पुंड

धन निर्दोष म्हणा वा निर्गुण, दे फल तया जशी आज्ञा
सेवक मनुज–करी तें उल्लंघाया नसे तया प्राज्ञा

बुद्धिबळें मेळवितां धन या जगतीं नसे कुणी पापी
भरल्या सरोवरिं जसा ओंजळभर उदक तृषित मानव पी

समृद्ध जग असें हें निर्मियतो देव मानवासाठीं
पितृधनचि जीवयात्रेकरितां बांधोनि घ्या तुम्ही गाठीं

उद्योग-दैव-योगें सद्वांछेनें धनासि मिळवोनी
सद्व्यय त्याचा करितां नांव न ठेवी तुम्हा जगीं कोणी

धन औषधी रसायन, संतोष तयास मुख्य अनुपान
संतुष्ट मानसा दे सम सौख्या धन असो अधिक ऊन

२५ माझा आवडता फकीर

जेउनि खाउनि सुखें बैसलों रात्रहि दस घटका झाली
तंव फकिराची दीर्घ हाक ती मार्गामधिं ऐकूं आली
न करि याचना न करि वंचना आशीर्वाद फुका देतो
भिक्षा मागुनि जरब राखिता धनी जगाचा हा दिसतो

जसा एकला जगीं उपजला तसाच अजवरि तो राहे
पुत्रकलत्रें स्नेही चाकर यांचा बंध न मुळिं साहे
अन्य उपाधी कांहिं न जाणे देहावांचुनि सुखदुःखा
स्थान न उरलें 'अल्ला-' नामाशिवाय इतर न येत मुखा
जसा पाहुणा दो दिवसांचा तटस्थ हा तैसा असतो
भिक्षा मागुनि जरब राखिता धनी जगाचा हा दिसतो

जरी विरागी प्रपंचविन्मुख न करि जिवाचा कंटाळा
ज्या देवानें निर्मियलें त्या सहज न म्हणतो का पाळा ?
क्षुधा तृषादिक देहधर्म हे जनरीतीनें वारावे
याच हेतुनें केवळ खाउनि पिउनि पुष्टता तो पावे
परि रुचि अरुची गोड कडू हा विवेक किमपि न मनिं करितो
भिक्षा मागुनि जरब राखिता धनी जगाचा हा दिसतो

जीवावरती लुब्ध असति जे त्यांचे प्राण हरायाला
विशेष गोडी मनीं वाटते क्रूर दुष्ट यमरायाला
मृत्यु भयातें हा नच जाणे; चाड त्या न या जीवाची
चित्रगुप्त मग पान काढुनि फुकट कशाला हो वाची
नव्वद झालें वय फकिराचें सदा निरोगी तरि असतो
भिक्षा मागुनि जरब राखिता धनी जगाचा हा दिसतो

दिवसवेळचे प्रहर चारही निवांत जागा पाहोनी
अंधारामधिं सुखें घालवी ध्यानीं 'अल्ला' आणोनी

रवितेजानें उजळुनि जातां प्रकट होउनी स्पष्टपणें
रूप जगाचें मलिन नीचसें दिसेल नयना या भेणें
भिउनि तमाचा धरी आसरा घूकापरि विवरीं बसतो
भिक्षा मागुनि जरब राखिता धनी जगाचा हा दिसतो
रवि मावळुनी सकळ जगावरि छाया काजळि जंव पडते
व्याघ्र सर्प वा तस्कर यांच्या नयनांनीं रजनी बघते
तंव फकिराची स्वारी सोडुनि गुहा हळुहळू मग निघते
अंगिं गोधडी तशि लंगोटी मिण मिण ज्योती धरि हातें
थाट असा हा विचित्र पाहुनि कुतरा अंगावरि भुंकतो
भिक्षा मागुनि जरब राखिता धनी जगाचा हा दिसतो

---

२६ दोन जुळीं भावंडें

(सुख व दुःख)

कूट घालितों तुम्हांलागुनि पाहूं सोडवितो का कोणी
संसाराच्या दीर्घ अंगणीं कुणि भावंडें खेळति दोनी
करिती इतरांचि न तीं पर्वा परि कौतुकदर्शन तें सर्वां
कधीं कुठें जन्मलीं न जाणे आंगीं चार युगांचें लेणें
दिसे न पडलें त्या कांहिं उणें मानिती न कोणाचें भेणें
त्यांची भाषा न कळे कवणा जरी पुसावें जाउनि त्यांना

भांवडें हीं आवळिं जावळिं बिलगुनि राहति जवळी जवळी
एका देठावरि दोन फुलें तशीं दिसति हीं अतर्क्य बाळें
शामशबल तनु मोहक आनन शुभ्र तीक्ष्ण परि त्यांचे रदन
नयन नासिका रेखिव कांतिव शरीर टचटचलेलें ओंतिव
अवयव गोंडस दोघांचे सम पाहुनि होतो मानसिं विभ्रम
तो हा कीं हा तोहि असावा भेद न कांहीं भावांभावां

परोपरीचे खेळ खेळतीं
परी तयांची नुमजे रीती
प्रारंभ कुठें कुठें अंत वा
कसा कुणाचा जय जाणावा
साध्य कोणतें साधन तेंही
सूक्ष्म पाहतां उकलत नाहीं
मल्लांपरि दोघेंहि झगडती
अंतर्यामिं दिसे परि प्रीती
स्पर्धा करि ना प्रेमा बाधा
प्रेम आणिना युद्धा बांधा
जयापजय जणुं वांटुन घेतीं
धर्मयुद्धरीती आचरती

एक दुज्याला ठोसा मारी
परि पडल्या सांवरूनहि धरी
शेळयांचीं कोंकरें कोवळीं
ढुश्शा मारुनि पडतात गळीं
उगिच ओढिती धरुनी कानां
टक्कर देउनि चाटिति माना
एक दुज्या हुलकावणि दावी
बळेंच आपण तीही खावी
भ्यालों ऐसें दुसऱ्या दावुनि
उलट दावितें गुरकावोनी
शरद् ऋतूमधिं निर्मळ गगनीं
सहजासहजीं एखादे दिनिं

शबलवर्ण मेघांचें बाळ
धारा कानिं भरोनी चंचळ
सूर्यापुढुनी धावुं लागती
आठपाठिचा खेळ खेळती
भूमीवरि मग त्यांच्यायोगें
धांवे उन्ह सावलिच्या मागें
सावलि जाइ उन्हासि धराया
खेळ रंगतो गोड पहाया
संसारांगणिं हेंही भाऊ
पाठी शिवण्या लागति जाऊं
सांगा आतां हीं कोण मुलें ?
खरेंच आम्हां नाहिं उमगलें

ओळखतां का तुम्ही तयांना
आम्हांला मग कां सांगा ना ?
काय खुळे तुम्हि नित्यपरिचितां
भुलुनी ऐसे कसे विसरतां
एक दुःख दुसरें तें सौख्य
खचित तुम्हां हे परिचित–आख्य
खरेंच कीं हो वेडे बनलों
व्यर्थ बुचकळ्यामध्यें पडलों
प्रहर आठ बाराही मास
निकटचि घडतो ज्यांचा वास
सुखदुःखातें कोण न जाणे
केवळ फसलों काव्यवर्णनें

सोपें अवघड करुनि सांगतां
काय कुशलता तुमच्या हाता
तुम्हींच परिचित दिसतां थोडे
भावंडें जुळिं आम्हा न कोडें
तुम्हीं पाहिलीं संसारांगणिं
आम्हां भेटति अंतःसदनीं
आम्हीही तत्कौतुक करितों
स्वयें तयांचे गुण अनुभवितों

आम्हिच का सगळें जग तैसें भावंडांशीं परिचित खासें
कीं सुखदुःखाच्या रांध्याचें जीवित बनलें सर्व तयाचें

निपुत्रिक स्त्री खिन्न मनासीं गर्भिणि होतां गर्व तियेसी
परि डोहाळे पीडा देती जीव नकोसा तिजला करिती
प्रसूतिकालीं सर्व हर्षती पहिलटकरिण म्हणुनि मनिं भीती
अडली बाळंतीण तियेला शस्त्रयोग आवश्यचि झाला
मूल कापिलें म्हणुनी दुःख माता सुटली जिवें हेंचि सुख
दुसरे वेळीं सुखप्रसूती नामकरण थाटानें करिती
परि तेराव्या दिवशीं रोग तान्ह्याचा पाहवे न भोग
ज्या हातें पाळणा बांधिला तयेंच पुरण्यां खड्डा खणिला

तिसरे वेळीं कन्या झाली पुत्र न म्हणुनी मनें रंजलीं
चवथा तो मग पुत्र जहाला परि दुर्दैवें अंध जन्मला
अपत्य होतां पंचम वेळीं पुत्रकन्यका जाहलीं जुळीं
कन्या उपवर होतां चिंता झोंप न येई सहजचि ताता
लग्न सोहळा थोर मांडिला परि कर्जाचा बोजा चढला

पडतां टाळी धन्य वाटलें कन्यादानीं अश्रु लोटले
विवाह झाला म्हणुनी सौख्य परगृहिं जाते म्हणुनी दुःख
पुत्र म्हणावा आनंद जरी त्यांतचि मिसळति चिंतालहरी
वंश भूषविल तरि होय बरें न तरि निपुत्रिकताचि सुख खरें
द्रव्यलाभ हो आनंदाचा रक्षणयोग विषय चिंतेचा

कीर्ति वैभव सौख्य मानिती केली कष्टांची कुणि गणती
देशभक्त कारागृहीं सुखी तत्सुतकांता मरतात भुकीं
वीर पडुनी रणिं स्वर्ग जिंकिती विधवा पदरीं वदन दडविती
उज्ज्वल मुगुट शिरीं धरि नृपति राज्य हांकण्या कष्ट ते किती
छत्र शिरींचें ऊन्ह निवारी दांडा धरिता ठरे बिगारी
पडदा राखी स्त्रीमर्यादा एकांताची तिलाच बाधा
तीव्रज्वर कधिं देहीं भरला रक्तदोष सर्वहि ओसरला
शल्य उपटितां तिडिक मस्तकीं निघतां तेंच किती होत सुखी

सोडतींतला पैसा दिसला
हसूं लोटलें फार विनोदें
रम्य गुलाबफुलांना खुडतां
शिकार करूनी ऐट मिरवितां

हर्षवायुनें प्राणचि गेला
पोटीं गोळा उठुनि दुःख दे
व्रण कंटक बहु करितो हाता
मुठींत प्राणा घेऊनि फिरतां

पक्वान्नावरि ताव मारिला
मासा रुचकर म्हणुनि भक्षिला
कला चालवुनि वस्तु निर्मिली
सुखदुःखाची अशी सांखळी
समदुःखाची सूक्ष्म तागडी
सुखदुःखाचा ताणा बाणा

अपचनदोषें रोग जडविला
तीक्ष्ण अस्थिनें गळा चिरियला
अर्धे जग करि तिची टवाळी
तोडितां न ये कुणी किती बळी
कणभारानें बिघडते घडी
मिळुनि वस्त्र हें ध्यानीं आणा

---

२७ मोहरलेला संभव

संभव मोहरला हो मोहरला सुगंध गगनीं भरला
ईश कृपा तरि दिसेल सत्वर फळभारें लवलेला
परि न कळे विधिलिखित काय कीं गंडांतर ये याला ॥ ध्रु० ॥

आम्रमंजरी हिरवे पिवळे कोंब फुटुनि तरतरली !
(अहाहा, मग असेंच व्हावें)
हुंगुनि कोकिळ मदोन्मत्तसा मुक्तकंठ गाईल
शिवरात्रीं दिनिं शिवपिंडीवरि भक्त तीस वाहील
(पण हाय हाय, न जाणो असेंहि होईल)
काक चंचुनें तुटुन पडोनी वाळुन ही जाईल
गर्दभ ठोकर मारुनि विष्ठेमाजि तिला मिळवील १

सुविद्य सुंदर ललना यौवन–संभारें तरतरली !
(अहाहा, मग असेंच व्हावें)
प्रेमळ समगुण स्वयंवरित पति मिळवुनि आनंदानें
जीवन सौख्यें भोगुनि संसारातें स्वर्गपदा ने
(पण, हाय हाय, न जाणों असेंहि होईल)
लोभी जनकें मैंदा विकुनी 'राख' तियेची केली
भोग्य वस्तु संग्रहीं पतीनें दावणीस बांधियली २

पूर्वसंचितें गुरुमुख लाभुनि सद्विद्या तरतरली !
(अहाहा, मग असेंच व्हावें)
भक्ति विरक्ती वरुनि दावितो मोक्षमार्ग जगतातें
जैसा प्रेमळ पिता सुताला जपुनी धरुनी हातें
(पण हाय हाय, न जाणों असेंहि होईल)
वादविवादीं शिणविल जगता ज्ञान भिरवुनी खोटें ३

प्रज्ञा–प्रतिभा–प्रसाद पावुनि ललितकला तरतरली !
(अहाहा, मग असेंच व्हावें)
अरूप आणुनि रूपा सगळे रचील नवविश्वातें
भोगिल ब्रह्मानंदोपम सविकल्प समाधि– सुखातें
(पण हाय, हाय, न जाणों असेंहि होईल)
शीला मळविल मानुषतेच्या सोडुनि सकल व्रीडा
जशी सूकरी सहचर घेउनि करी कर्दमीं क्रीडा ४

---

२८ विचित्र वल्ली

सर्वांगा:वन वेलिशी जरी गमे मीं प्रेक्षका ती नसें
मायावी मम रूपरंग तुझिया नेत्रांसि वंचीतसे
पाहोनी मजला कुतूहल तुला वृत्तांत माझा खरा
ऐकाया तरि सांगतें हृदयिं या गूढासि दे आसरा

सकल वनस्पतिगण ही माझी प्रजा असें मी राणी
वनभुवनाचें राज्य करित जणुं अमरपुरीं इंद्राणी
हिम पुष्पांच्या माला शोभति विशुभ्र ज्यांच्या शिखरीं
हरित लतांच्या ध्वजा फडकवी मंद वायुच्या लहरी
नीलवर्ण ते प्रचंड पर्वत रोधिति अष्ट दिशांनीं
गति कोटासम निवासमंदिर असें वसे मम रानीं
भूतळ भेदुनि सहज काढिती ठावची पाताळाचा
मुळें जयांचीं शिखरें ओढिति मुगुटहि आभाळाचा
प्रचंड ऐसे पादपनायक जेथ पहारा करिती
सकल वन्य पशु नम्र आचरिति जेथ सुसेवकरीति
पक्षिकुलें किति नागरिकांसम सुखें वसाहत करुनी
मदाश्रयें संसार थाटती प्रजाभाव मनिं धरुनी
कोकिल बुलबुल कीर पारवे रुचिर फळें मम खाती
गोड गळ्यानें कीर्तिगायनें कृतज्ञतेनें गाती
सहस्रपरिचीं फुलें प्रतिदिनीं उमलुनि परिमळभारें
वासित करुनी टाकिति माझें वनस्थलीपुर सारें
भृंग विलासी उद्यमरतशा फिरति मक्षिका वेगें
मकरंदाची सार्थकता बहु करिति खरी विनियोगें
स्फटिक कांति जळ कांच तयानें महाल माझा रचिला
शैवालावृत शिलाशकल या सुखासनांनीं खचिला
जल वेलींचे सुचक गालिचे ठायिं ठायिं पसरीले
सुवर्णकमलाचें सिंहासन त्यांत एक बसवीलें
सुरम्य माझी वनस्थली जणुं नंदनवन स्वर्गाचें
कौतुककारण यक्षसुरासुरकिन्नरवरवर्गाचें
स्वरूप माझें दिव्य कांतिला उपमा न मिळे भुवनीं
तारे बघती टकमक मजला अपुल्या मौक्तिक नयनीं
असो; एकदिनिं कमळ-सुखासनिं लीलेनें मी बसलें
असतां सरसिजळीं मुख बिंबित पाहुनि हळु मी हंसलें

स्मित वदनाची सुंदर शोभा बघुनि धन्यता झाली
परि दुःखाची तीक्ष्ण वेदना हृदयिं तत्क्षणीं आली
नयनिं अश्रुजळ उभें राहिलें एकवार मी फिरुनी
विमळ जळामधिं बिंब पाहिलें धैर्य कसें तरि धरुनी
बिंदुपूर्ण मग दृष्टि चहुंकडे समंतभागीं दिधली
असारता त्या शुष्क वनाची दुःखद मजला झाली
शिव शिव सुंदर रूप फुकट हें कांहीं गुण न तयाचा
असदृशयोजन दोष केवढा अरसिक जड धात्याचा
रस-रसिकांचा वियोग करणें याविण जगतीं नाहीं
घोर निंद्य अक्षम्य असें हें पातक दुसरें कांहीं
रसगुणभोक्ता रसिक भूतलीं एकचि मनुज प्राणी
सृष्टयद्भुतता सफल कराया अन्य समर्थ न कोणी
पाहुनि माझें रूप तयाच्या नयनांतुनि जरि पडला
संतोषाचा किरण एक तरि लाभ बहू मज घडला
खेद वाटला मनिं मग सोडुनि शीघ्रवनस्थलि माझी
स्मशानभूमीपरि मी आलें येथ उपवनामाजी

गार लता ही मम आवडती वेष इचा मी धरूनी
उपवनिं बसलें नम्रवदनशी कृशतनु एका कोनीं
कंटक वेली अन्य उगवल्या खडे पसरले भंवतीं
कीट विषारी रचुनि वारुळें उग्र जेथ वावरतीं
काळ न गेला बहु इतुक्यांतचि रसिक एक नर आला
निरखुनि निरखुनि मजला पाहुनि मुदित मनीं बहु झाला

धरुनि करिं तयें कौतुकदर्शक नयनप्रसाद दिधला
गमलें मजला स्तुति भारत मम निमिषार्धीं तो वदला

प्रसन्न झालें प्रमुदित हृदयें स्नेह वरियला त्याचा
सुसदृश योजन सुगुण एक तरि होय खरा धात्याचा

———

२९ कांटेरी गुलाब

अहा ही दैववशें लाधली
विपिनीं फिरतां अवचित मजला कंटककलिता कळी
करिं धरितां देई दिव्यगंधपरिमळा
उघडितां नयन करि प्रेमदृष्टिसोहळा
ओष्ठासि देतसे स्पर्शमोद आगळा
स्नेहसागरा संचित करिते वाटे प्रतिपाकळी

परि वेष्टन ईचें दुःख फार देतसे
विषकंटक हस्ता ठायिं ठायिं तो डसे
नैराश्य येऊनी जडत मनाला पिसें
स्थिति ऐशी ही रक्त आटवी अन्तःकरणा पिळी

तुज मान्य असें हें अमान्य अथवा कसें
दिल खुलवुनि कलिके ! बोल तुझें मन जसें
रक्षणार्थ देसी दास्यमूल्य कीं असें ?
परवशतेंतुनि मुक्त कराया तुजसि न कां कुणि बळी ?

वद अथवा तुजला वेष्टन हें आवडे
दाविसी दास्य कीं सोय सुखाला पडे
धरुं नको बोलण्या स्पष्ट मनीं सांकडें
करिन मनाचें समाधान मग देउनि आशे बळी

३० फुलराणीला ओवाळणी

भिऊं नको पाहुनी मला
मी नच तोडिन तुला फुला
येतां जवळी कापुं लागसी
अधिक्षेप ऐसा कां करिसी
परि तुज लावि न मी बोल
दूषित मनुजाचें शील
कुसुमसेवनीं एकच रीती
तुंवा तयाची अनुभविली ती
उच्छेदाविण त्या कांहीं
सौख्य भोगिलेंसें नाहीं

तीक्ष्ण नखाची तलवार चालवुनी तुज करि वार
कंठनाळ नाजुक चिरला वाटे त्या विक्रम केला
वास घेइ डोलवि माना कोण राक्षसी रसिकपणा !
परि मूर्खा त्या हें न कळे हिंस्र पशूंचे हे चाळे
प्रेता हुंगी वृक रानीं तैशि तयाची ही करणी

हातीं धरुनी मग दुरुनी न्याहाळुनि पाहे नयनीं
वर्णन तव सौंदर्याचें करुनि करुनि आळवि वाचे
अर्पण करुनी दयितेला धन्य मानितो अपणाला
वाटे त्या तव जन्माचें सार्थकही केलें साचें
यज्ञपुरोहित पशु वधितो म्हणतो 'स्वर्गा पाठवितो'

वधकर्मातें उपकार मानी नर तो नर न खर
मानभावि ऐसा नाहीं भिऊं नको गे मज तूंही
राहिं सुखें लतिका बाले दुरुनिच पाहुनि मन धालें
निज मातेच्या मृदु अंकीं लोळ सुखाच्या पर्यंकीं
कोमल शाखांचे दोले करुनी त्यावरि घे झोले

चंचळ वारा खेळगडी घाल त्यासवें तूं फुगडी
मधमाशी सखि घरिं आली देइ तिला मध भातुकली
गुंजारव करुनी भ्रमर रंजवील तव मन फार
परि त्याच्या गुजगोष्टींना दुरुनि डुलविसी तूं माना
पतंग आला बहुरंगी नवा झगा त्याच्या अंगीं

त्याजकडे डोळे भरुनी बघतां तूं तो धन्य मनीं
पक्षी वसुनी शेजारीं गाति गाणिं तुज परोपरी
दिनभर जीवन–अमृतातें भरविल रवि तुज निज हातें
रात्र घालि तुज पांघरुण काजळि शालूचें छान
रातकिडा गाउनि गाणीं रमवुनि निद्रा तुज आणी

चांद चांदण्या हे दीप तेवति घेतां तूं झोंप
दहिंवर पाजी तुज पाणी धाराधर तुजला न्हाणी
तुज लागे न अलंकार स्वयें रूप सुंदर फार

तुझ्या सुगंधित निश्वासें
सौख्यानंदें तव जातो

वनगृह दरवळतें वासें
षड्ऋतुमाजी दिनराती

तुज खुडितांचि लता माता
ढाळिल रस आसवबिंदु
जन्मलीस तरि तव तीचा
नाहिं तोडिली तव नाळ
ती प्राशि मुळांतुनी जला

खचित करिल ती आकांता
आटवील करुणासिंधू
देह अखंड असे साचा
गेला इतुका जरि काळ
तेंच पोंचतें थेट तुला

सत् चित् आनंदहि तीनी
तोडियलें मा जरि तुजला
विरह न केवळ तो तिजला
ईशाघरचे तुम्हि प्राणी
तुला तोडुनी कां होऊं

एकची तुमची कणोकणीं
द्विवधाचें पातकें मजला
प्राणाघातचि जणुं झाला
आहे मीहि तसा कोणीं
अपराधी मी तव भाऊ

भावंडें एका घरचीं
एकच देठ निसर्गांचा
एक लतेचें तूं फूल
खेळुं रम दोघे मिळुनी
ईशाघरिल हवापाणी

अशीच देवहि सृष्टि रची
आधारवि तुज मज साचा
दुज्या लतेचें मी मूल
हातीं हातहि घालोनी
नांदूं आनंदें पिउनी

तुज माझा आधार जसा
कीटक तुज पीडा देती
आनंदवुनी मम नयना
श्री देशी उद्यानाला
तोडुनि तुज हातीं धरिलें

तुझा वासही मज तैसा
निवारीन मी त्यां हातीं
फेडिसि तूं अपुल्याहि ऋणा
काय दवडुनी लाभ मला
लोकां दावुनि मिरवियलें

अहंकृतीचा खेळच तो !
स्पर्श उष्ण या मम हाती
म्लान पाकळ्या होउनिया
हानि निसर्गाची करुनी
सत्तेचें वेड न मजला

उभयांना घातुक होतो
कोमेजवी तव मुखकांती
गंध श्री जाइल वाया
होइन पापाचाच धनी
बंधिं न घालिन मी तुजला

लतेवरी तूं डौलानें डोल सदा आनंदानें
दर्शन तव मम जीवाला सौख्याचा ठेवा गमला
समीपतेचा मोक्ष पुरे सायुज्यीं रसिकता नुरे
नको धरूं तूं भीति मनीं गंध तुझा सेविन दुरूनी

३१ वरुण-कन्यका

शिरीं पौर्णिमायुक्त चंद्रमा इच्छा हो जलसंचारीं
हातीं घेउनि एकेक वल्हें नौका लोटिलि कासारीं
शांत जळामधिं नाव चालली जशी गालिच्यावर राणी
राजभक्तिनें दुभंग होउनि वाट देतसे तिज पाणी
दूर चाललों तीर सोडुनी पाण्याविण कांहीं न दिसे
प्रचंड कढईमधिं यक्षानें रुपें वितळलें जणुं भासे
गोल किनारा वृक्षलतावृत चौकट जैशी चित्राला
दोनच डोळे एकच दृष्टी याचा खेद मला झाला

चौ बाजूंला नाव फिरवुनी शोभेचा आनंद जरी
यथेष्ट घेई तरी वाटलें शंभर डोळे कां न शिरीं
निसर्गशोभेमध्यें समरस होउनि गेलों आनंदें
एकांतीं सुख परिमित म्हणुनी सहचारेच्छा मनिं नांदे
रात्रिंचर पक्ष्याविण दूरहि शब्द करि न कोणी प्राणी
मासे चंचळ येरझरति परि देवें दिधलि न त्यां वाणी
कमळांच्या जाळ्यांतुनि फिरलों कळ्या तोडिल्या सुंदरशा
पानें खुडुनी करंड केला आंत बसविल्या त्या खाशा
अर्पुं कुणा उपहार वन्य हा मी न तयांचा अधिकारी
सत्पात्र न लाभे दाना तरि तो धनिक मानसीं खेद करी

वल्हीं आडवीं टेकुनि ठेविलिं विश्रांती मग त्या द्याया
छातीवरती हात ठेविले विश्रांतीसुख मज घ्याया
शुभ्र चंद्रिका—दीप्त उदक तें पाहुनि झाला उल्हास

परि स्पर्शसुख सेवायाची उद्‌भवली मग मनिं आस
बसल्या बसल्या हळुच सोडिले नौकाकांठावरि पाय
भक्ष्य म्हणोनी येउनि मासा चाटुनि पळुनी हळु जाय

इतुक्यामध्यें मउ हस्तांचा स्पर्श तयां कोणीं केला
तयें विजेचा नाजुक धक्का आरपार अंगीं गेला
संकट वाटुनि दचकुनि गेलों पाय काढुं लागे वरती
परी कुणीं ते दडपुनि धरिले पाण्यामधुनी नच निघती
मनीं म्हणालों मगर होइ हा तरि कांटे कांहिं न रुतले
महामत्स्य जरि होइ तरि तया पद धरण्या साधन कुठलें
पाय ओढितां जाउं लागला तोल शरीराचा खालीं
ओढणार ती आकृति मजला मनुजवचें बोलति झाली

भिऊं नको हे रम्य मानवा अपाय करिना मी तुजला
हौशी तूं रमवाया आले भूमीसम या मानि जला
बोलुनि ऐसें दूर ठाकली अर्धदेह सलिलामधुनी
काढुनि मग ती उभी राहिली नौका एक्या करिं धरुनी
मनुज स्त्रीदेह आकृतीनें, वरि कांति न परि मनुजाची
वाणी आश्वासनपर झाली तरि शंका अंतरिं जाची
पाण्याखालीं देह झांकला उदकप्रांतीं उभी कळी
कमळजाति ही दिव्य कोणती चिंतु लागलों ते वेळीं

धैर्य धरोनी बोलुं लागलों मनुजवाणि तूं खरि वदसी
परी देवता गंधर्वस्त्री किंवा यक्षिण गे अससी
बोले ती स्मित करुनि लाभ तुज काय लावुनी मम थांग ?
कमळकळ्या तोडण्या अनुमती कोणिं दिली तुज तें सांग
अपराधाची क्षमा करिन तुज जरि अर्पण करिसी मजला
अर्पण कोणा करुं ही चिंता क्षणपूर्वीच पडली तुजला
परि न घेइ मी येथ उभ्यानें तुझ्या हातुनी उपहार
वरुणलोकिं चल जाउं मिळोनी बसुनि तेथ गुंफूं हार

३२ स्त्री-विषयक सुभाषितगुच्छ

स्त्रीच्या देहीं त्रिवेणिसंगम सरिता तीन करीती
मुखीं सरस्वति नेत्रीं गंगायमुना नित्य वहाती
शिरिं गंगावानें चंद्रसूर्य हे वसती करिती नित्य
स्त्रीतें म्हणती संसारांतिल तीर्थ पवित्रहि सत्य

तत्त्वज्ञाना शिकवी स्त्री मज स्याद्वादाचि करि सिद्ध
तिला कटि स्यात् न स्याद्वा कविवर्णन हेंहि प्रसिद्ध
स्त्री शिकवी मज वेदांतातें घेउनि मायारूप
अद्वैतांतुनि द्वैत भासवी परोपरीनें खूप

जायापति हा द्वन्द्व समासचि म्हणुनी भांडे मजसी
व्याकरणाविण मजसि तंडण्या अन्य न कारण तिजसी
वामांगावरि स्वत्व तियेचें म्हणुनि अपर्णा पतिला
दर्पणिं पाहुं न देत नटेशा ऐसें वाटे मजला

मर्यादारक्षण हा स्त्रीचा गुण म्हणताती कोणी
प्रेमा मर्यादा न ठेवणें हाचि गुणहि मी मानी

अर्थालंकारप्रिय ललना शब्दालंकृत कविता
त्याज्य उभय मज समान वाटति तुलना त्यांची करितां

वृत्तदर्पणीं प्रेम बसविती स्त्रीवृत्ताचीं नांवें
गणमैत्री जरि कठिण जोडण्या यत्न करित मीं भावें

गंगा ओती प्रेमोदक जरि सगळें शंकरदेहीं
तज्जिह्वेचा दाह शमविण्या धरी चंद्र शिरिं तोही

अष्टांगें अर्पण करि पतिला देतहि पंचप्राण
परि अर्धे न दे दृष्टी सन्मुख तती अशी ही कृपण

शृंगारुनि बसली तद्दयिता वीणा घेउनि गाया
सत्वर मत्सर अग्नि भडकवी कर्पूरासम काया

म्हणे तो तिला निर्धन म्हणुनी अव्हेर माझा करिसी
भिक्षापात्र प्रसिद्ध पोकळ तुंबा अंकीं धरिसी
चंचल माझें प्रेम म्हणोनि राग मजवरी धरिसी
शतविध पावे स्फुरण निमेषीं तार करीं आदरिसी
गजरा पुष्पांचा प्रिय तुजला प्रहरमात्रिं जो सुकला
अष्टौप्रहर स्थिर प्रेम मम दूर लोटिसी मजला
कठोर मी बोललों शब्द जरि दिवसांतुनि एखादा
केशाकर्षककंकताहुनी अधिक तयाचि न बाधा
अर्धोदयपर्व आदरी जन हीन पूर्ण त्यापरिस
दयितामुख पूर्णचंद्रबिंबाहुनी कटाक्षचि सरस
सुशिक्षित स्त्री वरिली कीं ती अधिक दक्ष गृहकर्मीं
परि अमुच्या जोड्याहुनि रक्षी जोडा आपुला चर्मी
स्वर्गामधले देव विलासी खचितच मनुजाहून
गगनांगणिं हो रात्रिं तयांच्या उभी कलावंतीण
उत्तरध्रुवग्रहिं अष्टदिशां ती उषा नाचते खाशी
सूर्य भोगितो एक वत्सरीं सगळया बारा राशी
प्रेमाचा पति लाभल्याविना पतिप्रेम पत्नीला
कोण शिकवि ? गुरुमुखावांचुनी विद्या नच कोणाला
संसार सुखद्वार उभें तें प्रेम-बिजागिरिवरती
स्नेहलेपनें मृदु न केलि तरि करकर करिल सदा ती
प्रेमा म्हणती अंध बधिर परि ही न तयाची निंदा
दिसति न ऐकूं येति सतीला पतिचे दुर्गूण कदा
प्रेम असे तें अमर म्हणोनी म्हणती स्वर्ग गृहाला
प्रेमी स्त्री परि पंच महाभूतांचा संचय गमला
स्पर्श लागतां हाता नाजुक पृथ्वीगुण ती वाटे
आपतत्त्व तें गालावरच्या अश्रुद्वारें प्रगटे
नेत्रामधली चमक पाहतां तेजहि दिसतें स्पष्ट
वायु संचरे सोडी सुसकारे जैं होउनि रुष्ट

आकाशासम शून्य वदन ती होइ विरहीं रुतुन
श्री भौतिक ही स्त्रीची रुचते अधिक स्वर्गाहून
छत्रपती धिःकारिति ललना प्रेम न जरि त्यांवरती
'छत्रपती'हि ना खिशांत ऐसा दरिद्रि दयिता वरिती
प्रेमोष्मा जरि अंतःकरणीं विपद्धिमा तो वारी
शालजोडि गोधडी उभय सम मानी ती संसारीं
प्रेम रंगवी संसारपटीं सुंदर छायाचित्र
वन्य स्त्री होतसे चितारिण दिसतें जरी विचित्र
चित्रकार भरि रंग विविध परि त्यांत न कांहिं तजेला
प्रेमी स्त्रीच्या अर्धोद्गारें पतिवदनीं जो आला
कातर खचिताचि विनयशील ललना पति सन्मुख असतां
परि पतिकरितां चढेल पर्वत तरेल सिंधूसरिता
प्रेम अंध नच मज तिसरा जणुं शंकर नेत्रचि वाटे
मदनदहन विक्रम तो केवळ प्रेमें त्रिभुवन पेटे
विरहव्यथिता पखालभर जरि औषधरस पाजियला
तरी गुण न ये तैसा जैसा प्रेमळ स्त्रीशब्दाला
प्रेम रेशमी रज्जु असीचा घाय घालितां न तुटे
परि मृदु म्हणुनी बांधि जया त्या स्पर्शीं सौख्याचि वाटे
प्रेमाच्या किल्लीनें नुघडे ऐसें कुलुप न भुवनीं
विश्वकर्मि कौशल्य विधीनें असें आणिलें कुठुनी
प्रेमाच्या शाईनें लिहिलें अक्षर कधिं नच वाळे
जरी उघडिले प्रखर रवीनें आपुले द्वादश डोळे
मनिचीं अपुल्या स्त्रीपति मिळणें कठिण फार या जगतीं
खेळिं आंधळ्या कोशिंबिरिच्या गळ्या मारणें हातीं
प्रेमासम दाता नच भोक्ता प्रेमासमान दुसरा
घेइल देइल जीव आपुला प्रेमी नर तोच खरा
रंकाच्या प्रेमाला रावाची भीति ही न वश करिते
दंड नमवि सर्वां परि प्रेम तया मुळिंच दाद ना देतें

प्रेमाचें तोरण जगिं एकच त्यांतूनि सर्वही जाती
निर्धन नम्रचि नमविति उत्तुंग शिरासही प्रबळ नृपति
गणितीं एकामाजीं एक मिळवितांचि दोन होतात
प्रेमांक-मिती अद्भुत चौ हातांचाचि एक करि हात
मदनाच्या संग्रामीं पुष्पांचे बाण मिळविती विजया
कीं सुभ्रु स्त्री सैनिक भ्रुकुटी चापावरूनि मारि तया
शब्द प्रथम प्रगटला सृष्टींत ब्रह्म नाम त्या साजे
प्रेमळ दयिता शब्दा ऐकियले प्रथम मर्म तरि समजे
संसाराच्या पुष्पीं प्रेम-मधू गुप्तरूप परि असतो
प्रेमी स्त्री मधमाशी मध्यस्थीविण तिच्या न तो मिळतो
पुरुष मनानें चंचळ प्रेमी त्या करमणूक मात्र दिसे
परि तें जीवन, सार्थक जीवाचें, स्त्रीस सकल कांहीं असे
आश्रम-भंग करी नर लोकोत्तर जरि मनांतुनी हौशी
स्वामी कुमार कार्तिक परि करि तो लग्न देवसेनेशीं

---

२३ वेषभूषा

रचिसि वेषभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ?
सुटले काळे केश मोकळे तैलबिंदु त्यां वरती
विंचरिशी मग हस्तिदंतमय कंकत घेउनि हातीं
रचिसि केशभूषा ? अथवा कुसुमचापपाशा

कुरळ कुंतलां स्वैर बालकांपरि आंवरुनी ठायीं
उन्नतिमार्गें हळूहळू रिझवुनि नेतां श्रम तुज होई
रचिसि मौलिभूषा ? अथवा कुसुमचापपाशा

पेड पिळांचा वळुनि बांधितां ऐटदार वांटोळा
शिवपिंडीतें वाटे वेढी सर्पराज जणुं काळा
रचिसि वेणिभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ?

अर्धोन्मीलित कुंदकळयांचा गजरा घालिसि वरती
गमतें गिरिशिरिं गंगामण्डळ धरि रवि-किरणें कांती
रचिसि पुष्पभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ?
स्थिर तर्जनिनें सुरम्य कुंकुमतिलक लावितां भाळीं
रक्त गोल जणुं प्रभातरविचा प्रकटे प्राचीमूळीं
रचिसि भालभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ?
रत्नमुद्रिकामंडित अंगुलि ईची करुनि शलाका
विशाळ निर्मळ नयनसंपुटीं काढिसि कज्जलरेखा
रचिसि नेत्रभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ?
भूषाभूषित देहयष्टि मग बघसी जयिं आदर्शीं
प्रतिबिंबातें बिंब तेवि मम मन तव मन आकर्षी
रचिसि वेषभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ?

३४ अपूर्व देणगी

अर्पिन ती तुज मौक्तिकमाला
प्रेमाभरणें इतर कशाला
शुक्ल पौर्णिमा आश्विनमासीं
कोजागिरि दिनिं पडतां परदेशीं
तळपत गगनीं दुग्धधवल शशि
तो सौधावरि मीं देखियला
दुग्धपान गायनादि केली
प्रियजनसंगम सौख्यें सगळीं;
स्मृतिपथगत तीं अजि मज झालीं
बघुनि उसळला दुःखउमाळा
चंद्रवदन नाभिं गवाक्षमार्गें
बघतां मम हृत्पुटिं दिसुं लागे
वदनचंद्र जणुं सखि तव सुभगे
अश्रुपूर मग नयनीं आला
प्रशांत उज्ज्वल सागर पृष्ठीं
स्वातीजलकण शुक्तिसंपुटीं
पडतां मोत्यें बनति गोमटीं
दिव्य गर्भधारण विधि झाला
हृत्पुटिं मम तव स्मृतिजळ तैसें
बनवि मौक्तिक-दाणे खासे
अश्रुरूपधर तत्सर विलसे
पक्ष्मसूचिनें जो ओंवियला

३५ प्रेमाचे प्रश्न

भेटसि मज पुनरपिं कधिं सांग प्रियकरे ?
प्रेमासनिं सुस्थित कधिं करिसि निजकरें ?

शयन करिन कधिं शिर तव अंकिं ठेवुनी
चिर उन्मुख रुचिर नयनिं नयन लावुनी
ओष्ठ पुष्ट उत्सुक जे असति चुंबनीं
तत्कंपा शमविन कधिं सांग मज बरें ?

वक्षस्थलिं ठेवुनि तव मौलि साजिरा
हुंगुनि स्नेहार्द्र चिकुरभार गोजिरा
कंकतसम फिरवुनि त्यामाजि मम करा
सेविन कधिं सौख्य अनिर्वाच्य परि खरें ?

काव्यामृत गायन रस तव पितां पितां
स्वैर चित्र आलापहि मधुनि सेवितां
कधिं येइल वेळाभर मम सुभाषिता
पौर्णमासपूर्णकलाप्रणयविधुकरें ?

---

३६ गणेशचतुर्थीचें चंद्रदर्शन

शुक्ल भाद्रपदिं चंद्रकोर चवथिची पाहिली गडे
किंचित मुरडुनि पदरांतुनि जंव बघितलेंस मजकडे

चंद्र हासला म्हणुनि गणेशें तया शाप जो दिला
बाधा त्याची टळणार कशी चिंता पडली मला

शाप सफळ होणार होउ तरि असाच घरच्या घरीं
यावा आळ परी न घडावी परक्याची चोरी

घडे कसें हें अशा विचारीं मग्न राहतां मला
तुझिया चित्राःकडे पाहुनी विचार सुचला भला

शयनिं अंग टाकतां झोपलिस झोप न मज आली
चंद्रदर्शनापराधनिष्कृति सर्वेचि मग केली

ओष्ठ लावुनी हळूच माझे तव नाजुक गालां
चुंबन केलें परि तव निद्राभंग न तो झाला

निद्रित-जन-मुख-चुंबन यातें सुजन म्हणति चोरी
शापग्रस्त म्हणोनि न उरली मजला गति दुसरी

चौर्यकर्म हें घडलें परि मज देइल कोण शिवी
शाप सफळ व्हावया अवश्यचि अपकीर्तीहि हवी

हें अपराधी मुख काळें जरि दुजा न कोणि करी
स्वयेंच करूं म्हणुनियां युक्ति मीं केली मग दुसरी

तुझिया कज्जलमंडित नेत्रांवरति ठेविं गाला
कज्जललांछन मला मिळालें जाग तुला आला

पहिलि साधली दुसरी फसली सखये मम चोरी
सराईत मी मज वाटे परि फजिती झालि पुरी

शाप सफळ व्हावया राहिली अजुन कसर थोडी
अपशब्दाची वाण उरे ती धिक्कारुनि फेडि

एकेरी मम नांव घेउनी संबोधिशिल मला
चंद्रदर्शनाचा अपराधहि निष्कृत मग सगळा

कळे अतां कां म्हणती देवा मनुज पक्षपाती
शाप भोगुनि स्वयें तयांना सहज सुखी करिती

३७ विरहिणीची प्रणयपत्रिका

१ [हिंदी नमुना]

विशिष्टाद्वैत

माथां आदरिलें सुदीर्घ चुरिलें घेऊनि अंकावरी
होतां दृष्टिस आड पाय आजि ते मी होतसें बावरी
भासे शून्य मला सदा सदन हें कीं येतसे खावया
आणीं धीर पदोपदीं मनिं परी तो सर्व जाई लया

गाई हंबरती उदास बघती मी जात जैं दोहना
प्रेमानें कुरवाळिलें तरि न ये संतोष त्यांच्या मना
वाटे लावुनि नेत्र तोहि थकला काडी तृणाची न घे
खंड्या खिंकळुनी करी थयथया तोडोनि दावें निघे

सोन्यानें घर शोधिलें सकळही दारीं उभा राहिला
रागानें झिडकारिला मधुर जो हातांत खाऊ दिला
पोटीं भूक परी उपोषण करीं पाटीं निजोनी कण्हे
येणें होउनि घास घालिति मला जेवीन तेव्हां म्हणे

वासाचीं फुललीं फुलें तरतरा फोफावल्या मंजिऱ्या
आलासे भर चंपकादि तरुंना तैसाच तो मोगऱ्या
उद्यानीं शिरतें परंतु कुसुमां ना धैर्य ये तोडण्या
अर्पूं तीं कवणा विचार मनिं हा देई मला डागण्या

केले हार परोपरी सुबकशा माळा तशा गुंफिल्या
झाल्या व्यर्थ करंडकीं रचुनियां पूजार्थ ज्या ठेविल्या
कीं पुष्पार्थ मला करील न कुणी प्रेमोद्गमा याचना
शोभे पूजनकर्मिं जी सुदयिता देवप्रिया आपणां

पोथी वाचुनियां जपासि बसतें ध्यानस्थ मी होउनी
बोटें चाळवितें तरी न सरती माळेंतले ते मणी

देवाचें जरि नाम घेइन म्हणे येतें तिथें आपुलें
घेतां तें मन लाजवोनि म्हणतें हें काय गे, हा खुळे!

पूजामंचक मोकळा बघुनियां देवगृहाभ्यंतरीं
शून्याकारचि तें गमे मजपुढें मूर्ती उभ्या त्या जरी
माझे देव पती न अन्य मज तत्प्रीत्यर्थ पूजाहि ते
प्राणावांचुनि देहमंदिर गमे तैसेंच मातें रितें

घेतां घास मुखीं गळीं न उतरे अर्धाहि पाण्याविणें
हातें वाढियलीं न आज तुमच्या पात्रांत कीं भोजनें
खातां आवडता पदार्थ उरतो गोविंद-नामें मला
प्रेमोच्छिष्टविभाग ठेवित असा तो आज ना लाभला

शय्येला पद लागतां कर पुढें हो पादसंवाहना
कोणी नाहिं तिथें बघोनि मजला ये दुःखसंवेदना
टेकोनी बसतांचि नेत्र मिटती जाते निशा संभ्रमीं
स्वप्नें इष्ट अनिष्ट फार पडुनी अस्वस्थ होतें श्रमी

देई धीर मनासि आजवरि मी झाले प्रयत्न वृथा
चोरी काय मला जिवास कथण्या माझ्या जिवाची कथा
संकेतावधि खास सर्व सरली आतां घरीं या गडे
द्या ना! दर्शन सत्वरी उचलुनी घेवोनि सोन्या कडे

२ [विलायती नमुना]

शुद्धाद्वैत

रे माझ्या छकुड्या सुवर्णतुकड्या प्रेमी गड्या सौंगड्या
ये धावोनि असाच ये मजकडे चौखूर टाकी उड्या
लोळे स्वर्गसुखीं जरी निशिदिनीं मी लूट वाटे करी
थोडेंसें चुकल्यापरीस गमतें कीं तूं न वांटेकरी

आधीं आंथरुणावरोनि उठतें आठांनवांच्या पुढें
सांगे डॉक्टर कीं प्रभातहिम तें हो नाजुकां वावडें
पेले मांडुनि बैसतें मग चहापानास मेजावरी
देतें बैसवुनी समोरच तुझ्या खुर्चीमधें मांजरीं

जातें पुस्तकसंग्रहालयिं तदा शोधीत कादंबऱ्या
ज्या लीलाप्रणयप्रकर्ष कथिती त्या भासताती बऱ्या
वाटे वाण मला तुझीच परि कीं वाचून दावूं कुणा
माझ्या पादतलासमीप जरि तूं घ्यायासि ना लोळणा

जातां जात नसे तिपार म्हणुनी मी आडवी होउनी
पर्यंकीं भर तास दोन पडतें निद्रेसि आलिंगुनी
माशामच्छर वारिता कर तुझा नाहीं म्हणोनि मला
ये ना झोंप तदा सुदीर्घ सखया मी आठवीतें तुला

होतां ऊन्ह कमी क्लबांत निघतें क्रीडार्थ मी जावया
माझा ओव्हरकोट बॅट नससी सांगाति तूं घ्यावया
जोडीदार गडी नवा प्रतिदिनीं साजे तसा शोधितें
खाके घेउनि तत्करा कशि तरी दांपत्य संपादितें

आहे उत्सव शारदीय पडतें रात्रीं कसें चांदणें
येताती वनभोजना मज नवीं सप्रेम आमंत्रणें
होडींतूनि मला किती फिरविती कासारपृष्ठावरी
हातीं घेउनि कर्णसूत्र वदनें मी वाजवी बांसरी

सप्ताहामधिं बॉल चार झडले श्रीमंत मित्रांघरीं
नाचोनी दमलें अति श्रमभरें वाटे फुटें मी उरीं
होतें मी तुज आठवीत परि तूं होसी असोनी वृथा
घावा हात परा नरा युवतिनें नाचांत आहे प्रथा !

होतां उत्तररात्र मी परतुनी खेदें घरीं येतसें
अर्धत्यक्त सुखोपभोग म्हणुनी लागे मनाला पिसें
घेवोनि निजतें समीप कुतरा विश्वासु मोत्या गडी
होतां खूण चलाख घालित पहा छायेवरी जो उडी

३८ गोरी बाईल

उंच टाचेची बाईल गोरी मोठ्या नवलाची
चाले तुरू तुरू बोले चुरू चुरू
बुका मागुन बुक ती वाची

पाठी पोटी सपाट उभी डोलकाठी ताठ
बाहुलि ती जशी फडक्याची

दादल्यापुढ चाले दादला मागुन पळे
धीट झाली साऱ्या मुलखाची

तोंडीं लांब शिगारेट सोडी धुराचे लोट
जशि आगीनबोट मंबईची

सदा करि वेणीदान मोठी सती ही जाण
उद्या संजाप बी ठेवायची

लागे वस्तऱ्याची फणी न्हाव्या झाली धणी
त्येची गिऱ्हाइकी वाढायची

वरी वरी खालून खाली खाली वरून
लुगड्या-चोळ्यांना घाइ सरकायची

उंच टाचेची बाईल गोरी मोठ्या नवलाची

---

३९ रिकशावाला

दौड निघाला
हा आमचा रिकशावाला

अंगीं पैरण घामट भरडी
विजार खाकी लांडी करडी

चार हातभर रंगित फेटा
तरी सोडतो शमला मोठा
कंबर कसतो पटकुर बंदें
पुढें काढि कष्टाळू खांदे

पोरखेळ ही रिकशा गाडी
दों चाकांवर बांधिलि माडी
बसण्या सुपली अंगासरशी
पाय सोडण्या तशीच खाशी
पडदा टप भिंगाचीं दारें
निवारताती पाउस वारें
गुरफटून बसतांना, आई
वाटे बाळा कुशींत घेई

गाडी बिन घोड्याबैलाची
मोटार हि नच पेट्रोलाची
पालखी न वा मेणा वाटे
तिरडी श्रीमंतीची थाटे
दोचौघांनीं ओढित नेणें
मृतासारखें काय हें जिणें

शाबास म्हणे आपणा आपण
शिणल्याची ती त्याची खूण
इतर कोण त्या 'भले वाहवा'
म्हणतो आला जरि त्या थकवा
वाजवुनी घुंगरू रुपेरी
भरीस घालुनि 'खबरदारी'
पुढिल पदातिस देत इशारा
हंसाल पाहूनि त्याचा नखरा

दौड निघाला
हा आमुचा रिकशावाला

४० हें पहा आमचं नवं राज्य

आम्हि राज्य बनवल नव अक्षि तस जस मनाला होव
आमच्चेवर कृपा क्येली द्येव जी ॥ ध्रु० ॥

तार पोस्ट दोनिबी खातीं दिलिं गोगलगाइच्या हातीं
काय बिशात यत्याल तक्रारी धा वर्सांत एक 'डिलिव्री'
खेकड्या रेल गाडीचा सुप्परदंड करू जल्माचा
मागफुड हवी तशि गाडी बगलन बगलन काढी
मांजरा क्येला रखवालदार दुधलोणी राखायचा कारभार
कदि न्हइना इक्तिं बी चोरी प्रामाणिक त्ये लइ भारी
गाढवा गुपितपोलिस नेमून दिलऽ आम्हि खास
त्यो उकीरडा फुंकून द्येइ चोरीचा तलास लावुन
डुक्करऽसफाइ कामगार घाण राहु न द्ये तिळभर
गाव ठेवित धुतल्यावाणी घालून गंगच पाणी
कोल्होबा क्येला नैधीश वादि परतिवादि बी खूष
न्हाइ मुदमालाची तक्रार समदा बिळांत ग्येला पार
वाघसिंहाचि क्येली भरती खिल्लार राखण्या खातीं
त्येला मायाच समद्याहून राखतो पोटिं घालून
वानरा करूं इंजन्येर बांधकामाच त्येला ध्येन थोर
रातभर करील नकाशा दिस फुटता गुंडाळि गाशा
अजगरा वसूली काम रयतला अक्षि आराम
हातांत आणुन कर द्येती त्येना खिनांत मिळती पावती
दागदुजिचीं समदीं खातीं दिलिं उंदराघुशीच्या हातीं
शेताच्या बांध-उरोळ्या राखितात धरमशाळा
बैलाला मास्तर क्येला कदि मारि न इद्यार्थ्याला
रऊऽन शिक्शन खास करुन सोडी आपुल्या सरिस

मुंगिला सेनापति करा
शत्रुला न तिळभर थारा
वारुळाचा खंदक क्येला
साप आयता त्येतच शिरला

कुत्रा वकील परदरबारी
त्यो गुपित राखतो भारी
भुकु भुकुन अक्षि क्येजार
तह कराया लइ हुरशार

घुबड झाल दरबारी गवई
मधरात्रिच घे आरोळी
त्येच गाण ऐकता जरा
पोराथोरांचा जिव घाबरा

हत्तिला क्येला वाकनिस
खंडीचा येकच घास
काटकसरी हाय त्यो फार
खायाचच तुडवून पार

अस्वलाला खुष्रमस्करी
राज धन्याचि करमणुक करी
हसवील गुदगुल्या करून
गोष्टी सांगल कान भरभरून

कोंबड्या पलंगीं पहारा
रातभर मुडदा तरीं बरा
परि धन्याचि साखरझोप
मोडमोडील आरवून खूप

येक वाणच पुरलि न अजुनी
नव्या राज्या हुडकितो धनी
आमि दमलों शोधशोधुनि
परि तयारच व्हइना कुणी

---

४१ विलायतेच्या यात्रेची तयारी

"तुम्हा जाणें विलायतेला
तरी लागा तयारीला
शस्त्रावीण शिकारीला
वीर तरी केविं जाय ?

सहा हजार मैल दूरी
जावें लागे सागरांतरीं
देव तारी त्या कोण मारी
परी सिद्धता असावी

मरण न तरी दुखणें-बाणें
त्याहीसाठीं उपाय करणें
पश्चात्तापाची वेळ न येणें
या नांव दूरदर्शित्व

पहिलटकरणीस सुईण
नवख्या प्रवाशा मित्र सुजाण
पूर्वानुभव विशेषगुण
ऐसा कोणी बोलवा "

मग मेळविले कोण कोण आप्त प्राज्ञ विचक्षण
प्रवाशा उपयोग म्हणून देतों वर्णन यथामति

* * *

आले मिस्तर फॅशनेबल त्यांजकरितां मांडलें टेबल
कारण विलायतेंत सकळ खातांपितां बोलताती
म्हणती मिस्तर फॅशनेबल खर्च करावा लागेल सढळ
जरी होईल थोडा पाल्हाळ यादी करा वस्तूंची
पांच तऱ्हेचे कोट बेतणें तितकींच हवीं पाटलोणें
वेस्टकोट जाकिटांचें लेणें त्यांत स्वयें समाविष्ट
कापड असावें बहुत उंची ती काय तंबाखूची चंची
म्हणोन त्यांत सदभिरुची न मानोनि चालेल ?
कापड असावें भरदार कापड असावें ऊबदार
कापड असावें मजेदार परी सर्वही लोकरीचें
विलायतेंत कापूस जात परी त्या तेथ कोणि न पुसत
कापशी वस्त्रें विणतात परी तुम्हांकारणें
'पोझिशन' राखणें राहो परंतु तेथें थंडी कोण हो
अन्नपरी प्राणाचा लाहो तरी कापड लोकरी
कापड होईल सहज पसंत परी कोणता शिंपी बेतीत
सर्व मर्म आहे त्यांत म्हणुनि चिकित्सा करणें लागे
एक नूर अदमी दस नूर कपडा हाच सुधारणेचा निवाडा.
म्हणोन चतुर शिलाई निवडा त्यांतूनही इंग्रज
ज्याचें काम त्यानें करावें नेटिव्हांनीं दुरून पहावें
सूट कटाचें पारखावें नाणें इंग्रजांनीं इंग्लंडीं
'सूटा'ची ही मोठी कटकट परी काय उपयोग येवोनि वीट
विलायती सफरीचा घाट घातला तरी सोसावें
पहिला कपडा दुसरी हजामत दोघांचेंहि तेंच महत्त्व
सुधारणेचें सर्वस्व सत्त्व यांतचि असे सांठविलें

लोमशत्रुत्व अंगीं आणा धरा पुरा हजामाचा बाणा
सर्व लपवाव्या खाणाखुणा चेहऱ्यावरी केसाच्या
सक्षौर श्मश्रू अभिमत सुधारणावाद्यांचें हें मत
अंगिकाराल तरीच हित होईल कांहीं इंग्लंडीं
प्रतिप्रभातीं दिसावा चेहरा कीं हा बाळ मातेच्या उदरा
सोडुनि आल्या क्षणहि पुरा झाला असेल नसेल
चेहरा असावा तुळतुळीत कीं दुसऱ्यानें पाहतां त्यांत
आपुलेंच मुख प्रतिबिंबित वाटे त्यास दिसावें
त्यानंतर बोलणें चालणें हें तो सांगोनि कवणा येणें
शुद्ध परमेश्वराचें देणें परि यत्न कांहीं करावा
इंग्रजी भाषा ओष्ठदंत यांतुनि पुरी बाहेर न पडत
र वर्णादी वर्ज्य होत अन्य व्यंजनें कठोर
कांहीं येतें जेथल्या तेथें परी सांगितल्या वेळीं स्मरतें
निश्चयें गेल्या युक्त पंथें यशःसिद्धी होईल
आतां वस्तु कोणत्या उरल्या त्या पाहिजे सांगितल्या
फॅशनेबलां भल्या भल्या वेळीं विसर पडतसे
बूट पाहिजे विलायती पेटंट चामड्याचीच ख्याती
परि रोगणें तुळतुळती तेही कांहीं घ्या सवें
बूट लेसेची ब्रह्मगांठ दिसे गोंडस बसे निपट
शिका ती करूनी खटपट सर्व विद्या येणें हवी
पायमोजे लोकरी रेशमी वरी नक्षीची काडी नामी
पायीं घालता न व्हां श्रमी तरी इंग्रजी रीत शिका
पाटलोणीचीं 'ब्रेसें' हवीं तींच मुशाफरांचीं जानवीं
दोन्ही एकदम उजवीं डावीं खांद्यावरूनी घालतात
शर्टबटणें घ्यावीं बरीं विविधरंगी विविधाकारी
हातरुमाल परोपरी किनारदार तेविं साधे
सांगतां राहिली एक गोष्ट परंतु तीच सर्वांत श्रेष्ठ
शिकण्या थोडे पडतील कष्ट परि अवश्य शिकावी

स्त्रीस जैसें मंगळसूत्र पूजासाहित्यीं अभिषेकपात्र
नाट्यप्रयोगासी रात्र तेविं पोशाखा नेकटाय
पाहतां वीतभर चिंधोटी परंतु तियेची प्रतिष्ठा मोठी
न वापराल ही गळोटी तरी म्हणतील रानवट
खुळे वेडे नंगे फकीर ख्रिस्ती धर्माधिकारी थोर
नेकटाय-माफीचा वर केवळ यांसच दीधला
गंगे जातां गंगादास तमसा-तीरीं आंग्लवेष
जो असेल अभिमत विशेष तोच अवश्य आदरावा
गळबंदावीण शर्टबटण मानिला असे निषिद्धदर्शन
जेविं पदरावीण स्तन पतिव्रता कुलवधूचा
आतां केशमंडन-विचार थोडक्यांत सांगतों साचार
प्रथम करणें संहार शेंडी नामक बटीचा
असेल ती हिंदुत्वाची खूण परि जातां विलायतेस आपण
तेथें मस्तका भूषण वपित केशकलापाचे
गवती मैदान कापलें तेवीं मस्तक दिसावें भलें
मध्ये भांगें दुभंगलें तरी त्या गुण विशेष
केशविधान परोपरी करावें रुचिपरत्वें तरी
एक शेंडी आणि 'भादरी' यावीण कांहीं चालेल
ऋषीशाही बोकडशाही नीग्रोशाही टक्कलशाही
अन्य प्रकार आणखी कांहीं परी होईल विस्तार
अक्षौर श्मश्रू रक्षणें तरी हवी आधिपासोनि तयारी
कारण दाढी ती बिचारी आयत्या वेळीं न उगवे
दाढीनें फुकें साधुत्व मिळतें तरुणास प्रौढत्व
वयाआधीं वयोगुण प्राप्त व्हावा तरी दाढी ठेवा
परंतु दाढीस अंगयष्टि लागते तशीच बळकट मोठी
काडी-जवाना ऐसी खोटी उठाठेव शोभेना
झुरळा सिंहाची आयाळ भातेणासि वटशाखाजाळ
गुप्तपोलिसा शब्दपाल्हाळ तेविं रोडक्यास दाढी

फंगवा फणी हस्तिदंती
साबण सुगंधी सांगाती
घड्याळ साखळी रबरें किती
लेखनसाहित्य सर्वही
कातडी पेट्या, कापडी पेट्या
असाव्या कांहीं लहानमोठ्या
हातीं धरण्याच्याही काठ्या
शोभिवंत असाव्या
सोनेरी सुंदर सिगार केस
सिगार-पेट्या दहावीस
लागती आपणा ओढण्यापरिस
दुसऱ्यास अधिक द्यावया
विडी ही न बिडी, ती समिध
क्षणांत होमाग्नि होतो सिद्ध
तत्साक्षिक मैत्री प्रसिद्ध
करिता होते कायमची
नसेल ओढण्याची चाड
तरी सवईची करावी वाढ
भल्याभल्यांची मैत्री गाढ
पाडुनि देतें ही वल्ली
जरी असती डोळे बरवे
तरी सांगाती चष्मे हवे
बिन नंबरी भिंगाचे घ्यावे
चष्मा वाढवी सौंदर्य
कांहीं असावे आणिक रंगी
लांकडी झांपडी दोहीं भागीं
घालितां वाटे लोकांलागी
क्षणैक घोडा टांग्याचा
रंगी चष्मा डोळां चढे
पाहतां येतें लोकांकडे
ते न मात्र उलट बापुडे
आपणासी न्याहाळूं शकती
मिळाल्यास घ्यावी दुर्बिण
बायनॉक्यूलर दूरदर्शन
पुढें दिसणार तरी आधीं क्षण
पाहिल्याविना केविं होय
क्षणोक्षणीं भिंग लावावें
तेंचि तेंचि देखावे पहावे
परी इतरांस भासों द्यावें
मार्मिक नजरबाज हा

* * *

असो. फॅशनेबल उठले
शेकहँड शिकवोनि गेले
नंतर समाचारा आले
दुसरे मित्र खाद्यगुरू
तेच होवोनि म्हणती सत्वर
इतर सर्व राहो विचार
परी आधीं भोजनाचार
तुम्हां शिकला पाहिजे
वनस्पत्याहाराची प्रौढी
मिरवा हिंदुस्तानांत बापुडी
परी मांसाहारीं उडी
घातली पाहिजे परदेशीं
चार-पंचमांश जग
मांसाहारीच आहे मग
व्यर्थ शुद्धाहाराची रग
जिरली पाहिजे सुविचारें

पापपुण्य कोणी पाहिलें
सर्व धर्माधिष्ठान भलें
केवळ शरीररक्षण पहिलें
शरीर असें मानिती

'जीव जीवाचें जीवन'
त्यातें अवमानितां जाण
हें तों प्रसिद्ध मनुवचन
धर्मव्यवहार उल्लंघती

मांसाहारीं न मुळीं पाप
सर्व योजना आपोआप
दोरीस म्हणूं नये साप
परस्पर झाली असे

खाटिकें स्वगृहीं मारिला
आपण फक्त मुखीं घातला
बबर्जीनें शिजवियला
यांत कैचें पापाचरण

हिंसा म्हणावें कशाला
ब्रह्मदेवाचा बाप बोलला
हेंच न कळे मुळिं आम्हाला
'हिंसित पूर्वींच मृत असती'

कांटा म्हणजेच त्रिशूल
चमचा 'यज्ञस्रुच्'चि केवळ
सुरीचें 'नंदक' खड्ग मूळ
सकल खाद्य पवित्र करी

कढीभाताचें खूळ पुरें
शरीरप्रकृतीसहि बरें
हंसतील इंग्रजांचीं पोरें
म्हणोनि मांस स्वीकारा

खावीं उकड-अंडीं सकाळीं
मातापितर संध्याकाळीं
दुपारीं कुक्कुटबाळें कोंवळीं
वंशक्षय एका दिवशीं

येणें मागें उरत न कोणी
बोलती सर्व तत्त्वज्ञानी
दुःख करावया लागोनि
मृत न दुःखी, उरला तो

गोमांसासारखें खाद्य नाहीं
विहित-निषिद्धाची ग्वाही
पोषक जगतीं दुसरें कांहीं
परदेशीं ईश्वरीं सोंपवावी

कोणाची जीभ कोणाची शेपटी
विविध रुचिर खाद्यदटी
एकाचें काळीज दुसऱ्याची ओटी
मांसाहारीं लाभतसे

परदेशगमन नव्हे ती थट्टा
म्हणोनि तुम्ही तुमचा कोठा
वरतीं पडे कामाचा रट्टा
पुष्टसमृद्ध ठेवावा

अन्न खावोनि बनविणें मांस
भक्ष्य भक्षक दोन्ही समरस
यासि जठरा पडत आयास
त्वरित होती मांसाहारीं

* * *

असो, यावरीं आले सभ्य तदुपदेश लाभ अलभ्य
कारण आम्ही जन्मादारभ्य देशी सभ्यताच जाणों
भिस्तर सभ्य मग म्हणती इंग्रजांची सभ्यतेंत ख्याती
म्हणोन शब्दाची व्याख्याव्याती जाणून ठेविली असावी
सभ्यपणांत हिंदी लोक प्रमुख ऐसा आहेच लौकिक
परंतु स्थलपरत्वें फरक सर्व गोष्टींत पडत असे
शिंक येतां शिंको नये ढेंकर येतां देऊं नये
खाकरवसा काढो नये या नांव असे सभ्यता
प्राणापान तेंविं उदान सर्व वायूंचें वशीकरण
प्राणायाम सभ्यताकारण सहज परत्वें होत असे
दांतांवरतीं कीट वाढलें तोंडीं शिरोन कोणी पाहिलें
परी चेहऱ्यास साबण लाविलें या म्हणताती सभ्यता
थुंकी भरली जरी तोंडांत तरी धरोनि हातरुमालांत
खुशाल घालावी खिशांत आपुला माल आपण धनी
हंसणें लोटलें पोटांत तरी न आणावें ओठांत
जेविं दरिद्र्याचे मनोरथ तेविं गूढाचि जिरवावें
गालावरची सुरकुती तीच हास्याची परिमिती
अतिक्रमणाची वाटतां भीती तोंडा रुमाला लावावा
अनोळख्याशीं बोलूं नये जरी कोणाचा प्राण जाये
उद्दामपण मिथ्या विनयें झांकोन सर्व काढावें
कोणाकडे डोळे भरून पाहतां सभ्यतेचा खून
होतसे म्हणुनी नेत्रकोण केवळ त्याकडे फिरवावा
आभारप्रदर्शन खिशांत भरोनि घ्यावें दिवसरात
त्याइतुका इतर न होत नित्य खर्च कशाचाहि
थॅंक्यू-क्यू-क्यू होतां होतां शेवटीं यू ऊ उरलें हातां
परि कृतज्ञतेची ओळखतां भाषा सर्वा येत असे
काडी उचलोन दिली वरी 'उपकार-पर्वत झाले' तरी
ऐसें उद्गारावें सत्वरीं मनांत शिव्या जरी दिल्या

अपराध करितां कांहीं आपण म्हणावें 'झालों दुःखपूर्ण'
मनांत शापाशिव्या जाण दिल्या तरी चालताती
थँक्यू शब्दें उपकार संपला मग काय देणें तुझ्या बापाला
ऐसाच त्याचा अर्थ झाला हें तों जग जाणतसे
तैसेंच मागा सवंग माफी अपकाराची साफसुफी
आपोआप होते फुकी मग अपराधा काय तोटा ?
नमस्कार मस्तकें करावा कटिवर देह लववावा
कंबर मोडल्याचा देखावा केल्या सभ्यतें रंग चढे
दुसऱ्या प्रथम वाट द्यावी आपण थोडी सबूर करावी
पुढें मागें याची राखावी आठवण निरंतर
स्त्रियांस सर्वश्रेष्ठ मान त्या येतां द्या उत्थापन
ना तरी तुम्ही देहभान विसरलां ऐसे म्हणतील
जेथें नारींची पूजा करिती देवता तेथें आनंदें रमती
हेंच स्मरोनी सर्व रीती आचरती लोक इंग्लंडीं
स्त्री-पुरुष एकत्र दिसतां शंका-कुशंका मनीं न घेतां
आदरावीं सम उभयतां मग ते असोत कोणीही
स्त्रीची वस्तू पडतां खालीं एकदमचि मारोनि उसळी
परक्यानेंहि हातीं दिली तरीच त्यास सभ्य म्हणती
मिथ्या विनय असे घातक परस्त्रियांसीं वागतां देख
धीटपणानें हंसतमुख आपण सदा असावें
सुंदरगात्री सुंदर वदना ही कोण असे आपली ललना
गौरवपूर्ण उत्तान प्रश्ना करणें हीच सभ्य रीती
परिचित स्त्रीस आपला हात खुशाल द्यावा इतरां देखत
ती 'शिव्हलरी', 'गलांट्री' होत इतर अर्थ कांहीं नसे
हे शिष्टाचार दिसती विपरीत परंतु ही त्या देशाची रीत
तियेचें शिक्षण घ्यावें येथ मग परदेशीं पाय घाला

* * *

असो. यापरी अनेक लोक
उपदेशूनि गेले देख
नवख्या प्रवाशाचें मुख
वाळोनि गेलें सत्वरीं
जलसागर उत्तीर्ण होणें
हें तो सुलभ आगबोटीनें
परी आचार सागर ओलांडणें
कवणें उपायें होणार ?
ज्या न स्वदेशींच रीत भात
त्याची परदेशीं काय गत
असो तरी आतां जाणें प्राप्त
म्हणोनि गेलें पाहिजे

* * *

तज्ज्ञ मित्र गेल्यामागुती
आले 'देशी' मित्र सोबती
तैसेंचि आप्तइष्टांप्रती
भेटण्या जाणें प्राप्त झालें
त्यां सर्वांहीं केला उपदेश
प्रकृति सांभाळण्याचा विशेष
साधन सामुग्रीचा आदेश
कोणाचाहि अवमानवेना
खाद्य आवडे यांस काय
याचा मानसीं निश्चय
करोनि प्रत्येकीं पाथेय
निरनिराळें बांधियलें
कोणी केले लाडू डिंकाचे
उपयोगी जे प्रवासाचे
म्हणती टिकाऊ हेंच साचें
इतर नासोनी जाईल
कोणी आलेपाक बनविला
कोणी नारळ दिधला ओला
कोणी वाळल्या खोबरी भकला
आणोनि देती तांतडीनें
कोणी म्हणती लोणचें घ्यावें
पापड पोहे म्हणती न्यावे
खिसमिस खारका अवश्य हवें
ऐसें सुज्ञ कोणी म्हणती
मुख्य ते भुईमूग राहिले
त्याविण इतर कांहीं न भले
तैसेचि फोडोनि गुळाचे भेले
मोठा खडा घ्या म्हणती
होतां होतां माजली गर्दी
पडशी यानेंच भरली अर्धी
इतक्यांत आंत आली वर्दी
वैद्यराज आल्याची
त्यांहीं पाहिला हा संभार
आणि मनाशीं केला विचार
जुळविला रोगांचा बाजार
परि औषध कांहीं दिसेना
तेव्हां म्हणती वैद्यराज
तुम्हा परदेशीं कामकाज
परी आरोग्याचा इलाज
घेतल्याविण जाऊं नये

देशी प्रकृतीस औषधें देशी परदेशी मानवतील कैशीं
म्हणोन कांहीं देईन खाशीं घ्या तीं तुमच्या संग्रहीं
पनवेलचे ते पुराणिक किंवा झंडूभटजी नामक
वैद्यवर्यांचीं दुकानें संमुख औषधास हो काय तोटा
हवे ते देशी रोग जुने किंवा नवे इंग्रजी नमुने
सर्व संहार आपुल्या गुणें करितील आमुचीं औषधें
त्यांतूनही नित्यानित्य विवेक करावा अगत्य
मूर्धाभिषिक्त असती सत्य त्याचि औषधी आधीं घ्या
अवरोध हेंच असतें जाण प्रायः सर्व विकारकारण
म्हणून पहिलें त्रिफळाचूर्ण कुपी भरोनि घ्या जवळी
हिरडा बेहडा आवळकाठी जो नित्य घाली निजपोटीं
तया जगजेठी उठाऊठी शौचास साफ करवील
तैसी मात्रा सूतशेखर सर्व प्रवाशांचा आधार
वातापित्तांचा संहार सदा निश्चयें करित असे
खाद्य औषधें झालीं तरी राहिली सुगंधौषधि सुपारी
तिची आठवण नित्य दुपारीं झाल्यावीण केविं राहे ?

* * *

इतक्यांत आले उपाध्ये भट त्यांना लागलीसे चुटपुट
म्हणती ब्राह्मण्यरक्षणाची वाट काय केली तें सांगा
प्रायश्चित्तांचा विचार सावकाश करूं आल्यावर
परी अवश्य न्यावें बरोबर यज्ञोपवीत मंतरोनी
पवित्र सूत्राची ब्रह्मगांठ सर्व पातकांचा नायनाट
करिते म्हणोनी खटपट माझी सर्व चाललीसे
मग भिक्षुकांचे अड्डयावर मी गर्वानें करीन जाहीर
आमचे यजमान धर्मावतार जानवें विलायतेसि नेलें
प्रवासीं मनुष्य काय करितो तें कोण कोणास विचारितो
अभिनिवेश तयारींत दिसतो तेवढा आम्हा ग्राह्य पुरे

* * *

असो. ऐसी सर्व तयारी करोनि गांठली मुंबानगरी
देवोनि घेवोनि परोपरी आशिर्वाद लहानथोरां
सन एकोणीस एकोणिशीशीं एप्रिलाच्या उपान्त्य दिवशीं
'मनोरा' आगबोट खाशी आम्हां घेवोनी निघाली

---

४२ घाटीण वरमाईची मिरवणूक

मिरवित फिरवित नेत तुला मी वरघाटिणि गे वरमाये
तुझिये बोळ्यां दिलें चेडवां सून करून तिज घ्याया ये ॥ ध्रु० ॥
ठायि ठायि चौरंग भले दगडी तुज बसण्या केले
कातळि काळी वेलबुटी लावुनि शोभविली कांठीं
पायघडी मउ मखमाली भातेणाची पसरियली
[टाक हळुच पावलें नातरी लोटांगण घालिशिल बये] १
झाड उभें झाडासरिसें तोरण बांधियलें खासें
झापांची अबदागिरि ही झुलतचि डोक्यावरि राही २
टाहाळाचे विंझवणे शीतळ वाऱ्या काय उणें
[तोंड करुं नको पुढें ना तरी बसेल फटकाराच बये]
मशाल जोख्यांची केली नको तेल तिज ना बुदली
गर्द काजवे राईंत उडुनि तुजपुढे धाईंत
लाख चकमकींची चमक झाडिति क्षणिं एका देख
[खालि बघुनि चाल गे ना तरी फुरसें लाविल दांत बये] ३
अखंड गायक रातकिडे खळ त्यांच्या गाण्या न पडे
हुकी हुकी कोल्ह्यांची ती ऐकूं ये परि दूर अती
चुकुन वाघरूं जरि दिसलें कोंकणिं भय त्याचें कसलें
[नको घाबरूं ना तरि तुजला हंसेल सून तुझीच बये] ४
राखडि केली चाफ्याची कुडी मानि त्या मोत्यांची
घालुनि गुंजांचे घोस पुरवि पोवळ्यांचा सोस
सुरमाडी मोहनमाळा दाटूनि शोभवितील गळा
[अहेर सुंदर जरि हे ताजे ठेवणींतले नसति बये] ५

आंबे रचले ताटभर करवंदाचें त्यांत थर
निळीं जांभळें चकचकती काजूबोंडें मधुर किती
उभा फोडुनी फणस गरे रसाळ देतें तुज सारे
[जपुन खाइ गे ना तरि चिकटे चारखंड तोंडास बये] ६
हात खुरपणीचें लोणी जांभ्या दगडांतिल पाणी
पातळ आंबट ताकवणी तीन दिसांची साठवणी
कोंकणि अमृतें हीं तीनी प्रेमें अर्पिन तुज विहिणी
[हळूच पी ना तरि ठसका तुज कासावीस करील बयें] ७
घाटिण वरमाई आली सून सगुण मिळवुनि धाली
चखोट कोंकणच्याच मुली घरकामें करिती सगळीं
ताकभात जरि घासभर तोच तयांना मोतिचुर
मुठिंत ठेवितिल घोंवाला राग जरी त्या कधि आला
जाचुं नको गे चेड्वा माझे पदर पसरिला तुजसि बये
[बोलुं नको मैत्रिणिला अमुचे ना तरि मोडूं पाय बये] ८

---

४३ गासी व्यर्थचि तूं कोकिळे !

गासीऽ व्यर्थचि तूं कोकिळें
आवर्षण पडुनि भू करपली
ग्रीष्म–उग्रता वसंतिं आली
ठिणगी पडतां पेटे होळी
छायेमध्यें प्राण तळमळे

वृक्षगण पहा सारा सुकला
झाला पालविचा पाचोळा
स्मशान भासे नव्हे हा मळा
मेला जगला जीवहि न कळें

आम्रमंजिरी क्वचिताचि उरली
उरली तीही काळी पडली
रुक्ष टरफलें तोंडीं बनलीं
आसवलव तुज केवि मिळे

स्वभावधर्मे जरि तूं गासी,
तरि कौतुक तव काय जगासी
आत्मनिष्ठ मधुरता तयासी
गर्व वाहसी फुकट खुळे

जा सोडुनि हा निष्फळ चाळा
धुंडुनि काढी अपुल्या बाळा
पाज लाव त्या कांहिं जिव्हाळा
मातृपद तरी सहज फळे

स्वाभिमान हा श्रेष्ठ गुण खरा
रुचि न त्या विना परोपकारा
परपिंडानें पुष्ट नच बरा
देह हें तुज अजुनि कळे

४४ काजव्याला निमंत्रण

स्वागत असो तुला ये ठेविलिं वातायनें पहा उघडीं
खद्योता ! संगतिचा लाभ मला दे निदान एक घडी
पाहुनि तेज तुझें हें वेडावुनि पूर्ण हृदय मम गेलें
लागे ध्यास तुज करीं घेइन केव्हां असें मला झालें
कृमिकीटक इतर पहा दीपाशिखालुब्ध होउनी जाती
मालवतां ती तन्नेत्रा वरती येऊनि अंधता पडती
परि देवें तुजजवळी पाजळुनि नित्य ठेविला आहे
दिव्य दिवा स्नेहाविण स्वयंप्रकाशी अखंड जो राहे

तेजस्वी तूं अससी किमपि अपेक्षा तुला न इतरांची
अन्या ज्योतिमतांची संगत ही नावडे तुला साची
देह तुझा अणुमित परि तेज जणूं वीज सर्व सांठविली
'नापेक्षिति वय आकृति तेजस्वी' म्हण यथार्थ आठवली
अद्भुत चमत्कृती तव सर्गी जीं विश्वनायकें केली
पाहुनि ती तूं भूतलवासी ही कल्पना विरुनि गेली
पृथ्वीजळतत्त्वात्मक रसें तुझें अशनपान सांग मला
होइल केविं ? सुधेचा भोक्ता तूं मज विचार हा गमला
रात्रिवधूकंठांतिल तारामौक्तिक सतेज जरि आहे
काजळि शालूंतिल तूं हिरा विभूषण सतेजपर पाहे
भूतलिं जलिं वृक्षशिरीं क्षणिं एके अंतरालिं तरि दिससी
क्षणिं दुसऱ्या गति ऐसी चपल मनासम सलील तूं वरिसी
स्पर्धा तुजसिं कराया एकच मज अखिल जगतिं वस्तु दिसे
ती प्रेमपूर्णदयिताविमलनयन–जलरुहीं निमेष असे
घनकांताराभ्यंतरिं पाक्षिकुळें जेथ झोप घेति सुखें
सर्पादिक वावरती पिउनि निशावात थंडगार मुखें
सलिल प्रवाह जेथें झुळझुळसा शब्द एकसरि करिती
रातकिडे किरकिराकिर करुनि द्विजवेदपाठिपद वरिती
तेंच तुझें आवडतें स्थळ लीलावहर सर्व दाखविसी
तेथें तूं प्रेक्षकजननयनांतें धन्यतेस पाचविसी
तुज पाहुनियां उडतां वाटे मणिदीप उजळ बहु साचे
हातीं घेउनि आनंदानें वनदेवता झुलत नाचे
अथवा वाटे पृथ्वी पाहोनि दुरून मोह ज्या पडला
ऐसा कोणी तारा स्वर्गांतुनि येथ येउनी रमला

४५ चिमणीचें घरटें

बांधुं का इथें मीं घरटें मम चिमणें
घाल काय मज इतुकें देणें ॥ ध्रु० ॥

गृह तुमचें नृपसदनाचि दुसरें
आश्रित गण त्या भूषणाचि खरें
कुंद कोपरा इवला तिवला
पुरेल तो मम संसाराला
या बागेंतचि करीन गोळा
चार काटक्या वरि पाचोळा
त्यांतचि माझें निजणें बसणें १

बघुनि निवारा घर बांधियलें
त्या झाडावर होतें पहिलें
झंझावातें उमळुनि गेलें
निसंतान हा ! माझें झालें
फिरुनि बघितली जागा खाशी
परी लागती माझ्या राशी
दुष्ट सर्प कावळे अधाशी
सोसूं जाच मी कोठवर कशी
आलें स्थळ तें दुसरें बघणें २

म्हणुनी आलें तुमच्या दारीं
नको मज अतां जागा दुसरी
लोटुं नका अवकृपा करुनि दुरिं
खुशालचेंडू माझा प्रियकर
(ठेवो त्याला सुखांत ईश्वर)
बागडतो या त्या झाडावर
छाती रंगित काढोनी वर
परि गृहकर्मीं मलाच झटणें ३

अजुनि न माझी कुस वांझोटी
चार बाळकें अशिंच गोमटीं
प्रसविन तान्हीं होतिल मोठीं
हवी सोय मजला त्यांसाठीं
चिंव चिंव करुनि माझ्या भोंवति
मुलें पहा हीं उडती पडती
पंख त्यांस हे नुकते फुटती
कीड मुंगी चोंचित धरुनी
घालिन त्यांना खाया लगुनि
तत्प्रतिपालन हेंचि मम जिणें ४

४६ कुग्राम कीं सुग्राम ?

—:०:—

आनंद जेथ आराम तें कुग्राम न-सुग्राम
येथ ना चौघडा वाजे जात्याची घरघर गर्जे
कासया घड्याळें गजरी कोंबडा आरवे दारीं
येथ ना फ्लशिंग् संडास परि एक न भेटे डांस
संग्रहीं न टुथ पावडर दातवण वनस्पति मधुर
ना ब्रश स्ट्रॉप रेझर परि गालिं गुलाबी नूर
कोण घे चहाचें पाणी धारोष्णाचि अमृतावाणी
येथें न पाव बिस्कीट परि शेंगा हुरडा अविट
हव कुणा पिअर्सच सोप ? मउ अंगचि आपोआप
येथ ना गुप्त अंघोळ डुंबण्या जलाशय खोल
ना वाटी ताट रुपेरी पत्रावळ थोर दुहेरी
पक्वान्नें येथ न घरचीं परि अन्ना स्वर्गीय रुची
कां करा मसाली भाज्या प्रत्यहीं मिळति जरि ताज्या
ना विडा त्रयोदश गुणी मुखशुद्धि फळें तोडोनी

येथें न बिछाना खासा
परि निद्राभंग न सहसा
खेळ ना क्रिकेट् टेनीस
मोकळी हवा सहलीस
येथ ना क्लबाची मौज
परि वेळ जातसे सहज
ना वीणा पेटी येथें
पक्ष्यांचीं मंजुळ गीतें
वाचण्या न दैनिक वृत्त
अंतर्मुख राही चित्त
येथ ना तार ना पोष्ट
मन सांगे निज गुजगोष्ट
हवि कशास बिजली बत्ती ?
जरि कार्या पुरते पणती
येथ ना घड्याळी कांटा
वेळ जाइ बारा वाटा
बाजारपेठ ना येथें
देवघेव कोणि न करितें
येइ ना चेकबुक हाता
परि पैसा खर्चांपुरता
येथ ना सार्वजनचर्चा
परि स्वयंस्फूर्तिची अर्चा

---

४७ तारकेशीं हितगुज

निर्मळ नील नभांतुनि तारा
सूचिकाग्रसम तेज भरारा
सोडुनि स्पर्श करीत शरीरा
परि न कळे ती काय करी
शोषितसे मत्प्रेम–जळाला
किंवा अर्पी निज अमृताला
असो कांहिं तें ! सुखवी मजला
नितांत आपुल्या शीत करीं

निर्मळ नील नभांतुनि तारा
पसरी घन रजताच्या तारा
जेविं धनुर्धर करि शर–मारा
परि न कळे ती काय करी
बांधित पूल उतरण्या खालीं
किंवा नेण्या मज आभाळीं
दाबुनि यंत्रांतिल गुप्तकळी
दावि शिल्प–जादूगारी

खालि तारके येसि कशाला
नेशि न कां वरतिच तूं मजला
होइन मी सांगाती तुजला
घेइ एकदा अनुभव हा
पृथ्वीवरचें हितगुज सारें
ऐकशील तूं आनंदभरें
रात्रंदिन जें कधींच न सरे
म्हणशिल मग मज रहा रहा

स्वर्लोकाचा गर्व कशाला
अद्भुत–रसामृताचा पेला
पृथ्वी सृष्टींतिल आवडती
खगोल तेजस्वी परि माती
माझ्या नेत्रीं विश्व समावे
निर्गुण सगुणादिक देखावे
स्वर्गी ज्योतिर्विलास चाले
त्यां न पाहती माझे डोळे
म्हणुनि तारके हात देउनी
आपण पाहूं त्रिभुवन तेथुनि
स्वर्गंगेमधिं नित्य नहाणें
सुधा–मधूचीं करूं भोजनें

उणें न किमपि भूलोकाला
इथेंहि सांडुन वाहतसे
चीज ईश्वरा ऐसी ख्याती
जीवनसम त्या मूल्य नसे
ईश्वर निर्मी मी निजभावें
कल्पुनि कौतुक मीच करीं
लक्ष योजनांवरुनी चाळे
तरि चमचम निष्फळ सारी
सत्वर ने मज तुझिया भवनीं
एक करुनिया दोन मनें
नक्षत्रांचें लेऊं लेणें
धवल चंद्रिका–पात्रानें

४८ पाउस

झिम् झिम् झिम् पर्जन्य पडे
करुनि मलिन मुख करुण रडे
घन जमले बहु दाट भरारा
हरिणगण पहा अशनि-रव-भयें
दिशिं दिशिं सुचपल वीज चकाकत
परि रंगित पसरोनि पिसारा
दिव्य रथावरि इंद्र धनुर्धर
ग्रीष्मवीररिपु होउनि जर्जर
बसली गर्भाधान विधानीं
तत्शिरिं मंत्रोदक–प्रोक्षणीं

गमत गगन जणुं मिटुनि नयन अणु
झिम् झिम् झिम्
वायु हाल्वी वृक्ष थरारा
घनकुंजांतरिं शिरुनि दडे
निज तेजें करि दृष्टी विफलित
मयूर किति नाचत मुरडे
बसुनि सोडितां सर सर सर शर
शरण येउनी चरणीं पडे
भूधर पतिसह भूमी रमणी
जलद पुरोहित करीं पडे

४९ एकच काळ पण तीन देखावे

देखावा १ ला

हिंद जगताचा हा जीव देवा पाऊस पाठीव
तीन नक्षत्रें कोरडीं जातां झाली रडारडी
होवोनिया नांगरठी केलीं दावरें गोमटीं
जमविलें बीं बियाणें होतें नव्हतें कृषिवलगणें
लावी दृष्टी मेघाकडे मनीं भरोनी सांकडें

आर्द्रा गेली मघा आली पुढें चिंता उभी ठेली
बोटभर मेघ न वळला मग मंडप कोठला
जळधारेच्या ऐवजीं उष्ण किरण घुसती वेजीं
आंत बाहेर करपली भूमि संतप्त ती झाली
वाटे शापातें द्यावया किंवा येतसे खावया

देखावा २ रा

एका घटकेपूर्वीं होतें आभाळ तें सर्वहि रितें
किती दाट जमले मेघ देती प्रकाशा न भेग
कोठली ही जलसंपत्ती साठविली कोठें होती
तिला वाहण्या वाहन झाला कोण कोठिल पवन
दिव्य संधान सर्वहि आम्हा मनुजा न कळे कांहीं

कैसा पडतसे पर्जन्य म्हणे शेतकरी मी धन्य
आजवेरी मारुनि दडी आतां आला घालुनि उडी
धारा पडती सळासळा जशी माता पाजी बाळा
फारा दिवसांची तान्हेली पिउनि जळा भूमी धाली
कृषीवलांचा कळवळा अजुनि आहे त्या गोपाळा

देखावा ३ रा

आग लागो रे पावसा तुला आठवली अवदसा
दहा दिवस झाले तरी धार रात्रंदिन हा धरी

हें का देणें मागितलें म्हणुनि देवें आम्हा दिलें
मातला हा वर्षासुर कैसा आमुच्या या भूवर
बुडुनि डोईबूड जळीं पृथ्वी जाई जणुं पाताळीं

यमें वरुणें केला बेत धरुनि संहाराचा हेत
प्रळयकाळांचि अवतरविला सूड पृथ्वीचा घेतला
डोंगर माथ्याचीं गोकुळें उदकें वाहुनि नेलीं बळें
जमिन धुपुनि गेली सारी खडक आले खालुनि वरी
आतां कुठली शेती खेती गेलों दुष्काळाच्या हातीं

५० निंदकाला परत भेट

जगा निंदावया चाले अहर्निश जीभली तुमची
उडवि ती आगिचा भडका लवंगी तिखट जणु मिरची

तुम्हां दोषाविना दुसरें दिसेना कांहींही चांग
जणो प्रभु विश्व रचितांना पुरेशी प्यायला भांग

स्वताच्या काळिजीं काळें विदोषी रक्त जें भरलें
तयें नेत्रांतुनी तुमच्या जगाचें तोंड सारविलें

तुम्ही विद्वेषबुद्धीचा प्रभावी अग्नि पेटविला
तयें जगतांतल्या साऱ्या गुणांचा सिंधु आटविला

करी शुभ्रासि काळेरें ऋजू तें वक्र ही किमया
कुठें गेलां शिकायाला कुविद्या थोर मोहमया

सुधामय चंद्रबिंबाचे तुम्हाला डाग ते दिसती
पवित्रीं पात्रिं गंगेच्या तुम्हाला आढळे रेती

डुले जरि रसिक आनंदें प्रभातीं कोकिळा गातां
गळा काळा तिचा कांहो असा हा दोष दाखवितां

प्रकाशा सर्व विसरोनी दिव्याची काजळिच बघवे
तमाचा शत्रु रवि म्हणतां तरी कां रात्रिचा नुगवे
धराधर थोर मेघांना निमंत्रुनि करविती वृष्टी
तयांचें अंग खडकाळें म्हणोनी होतसां कष्टी
नद्यांचे पूर वाहोनी समृद्धी प्राणिमात्रांना
चिखल तो लागतो पायां म्हणोनी त्यांसि अवमाना
कमळिं जन्मे महालक्ष्मी वहाती पुष्प देवाला
सुगंधा वाण त्या म्हणुनी म्हणां त्या रानटी पाला
पितामह जेधवां बसला विधाया विश्वरचनेला
तयें पाचारिलें नाहीं तुम्हांला राग तो आला
जरी कां लाभलां असतां प्रसंगीं सूचना द्याया
तुम्हासम त्यास सन्मंत्री चुकाही तो न करता या
अनादरि आद्य कुंभार म्हणोनी जाहलां क्रुद्ध
परी घटकर्मि तुम्हि असतां तरी खर 'अन्यथासिद्ध'
चुकोनी अंश तेजाचा मिळाला काजव्यापुच्छीं
प्रकाशाया जगा साऱ्या तयानें मूर्ख तो इच्छी
जसा कण रेडियमचा तो अनंत-स्फुरण-गुणशाली
सहस्रां अन्न पुरवाया जशी पांचाळिची स्थाली
तसें वाटे तुम्हां अपुलें अगाध ज्ञान कणमात्र
म्हणोनी दोष काढाया जगाचे मानितां पात्र

---

५१ खळखळणाऱ्या प्रवाहास

प्रवाहा खळखळ कां करिसी
अधोगतीतें विक्रम मानुनि व्यर्थ काय मिरविसी ॥ ध्रु० ॥
वर्षाकाळीं गिरिवर देतां जळ पुष्कळसें तुजला
स्वार्जित धन मानुनी मदानें विसरुनि जासी त्याला

तटवासी कोमल वृक्षलता सकल करुनि निर्मूल
वाहविसी त्या दाहि दिशांना हेंच काय तव शील

शरत्कालिं गिरिशिखरीं पोकळ ढग पाहुनियां हंससी
मम पात्रांतुनि अजुनि वाहतें पहा जळ कसें म्हणसी

उष्णकाळ येइल प्रखर मग विसरुनि जाइ जळाला
खळखळ थांबलि पाहुनिया तव जन हसतिल तुजला

गिरिवर शिखरीं जळ आटे परि निसर्गशीतळता
म्हणुनि प्राणी सुखें नांदती सुकति न वृक्षलता

पूर्णांतुनि पूर्ण घेतलें तरि ब्रह्म न होइ रितें
तेविं झऱ्याच्या तळींतलें जळ उपसलें तरी भरतें

अखंड जळ हा झरा वाहतो षड्ऋतु मासहि बारा
परी तयानें कधिं न मिरविला तुझ्यासारखा तोरा

विनयशील लपवुनी शरीरा तृणपर्णांतरिं राही
शब्द तयाचा मंजुळ गुंजनसम कर्णा सुख देई

उष्णकाळिं तव पात्रीं पेटे कुंड वालुकामय तें
शरीर भाजुनि निघेल तेथें तहान कसली निवते

तुझिया उसन्या अशा वैभवा खळखळ शोभे कैसी
ओसरतां पर्जन्य गिरीवरि पायमाल तूं होसी

---

५२ दिव्य मोटार

मोटार चालि कुणिकड
चौयुगाचिं क्येलीं चाक
वरसांचि घुसवलीं नाक
मोटार खडी अंतराळीं

बाऱ्या बाला सुटल न कोड
त्यांत पाल्डी खालवर भोक
तिन काळाच जोडल दांडक
टप चढऽविला आभाळीं

मखमाल मढवली निळी
नाक्षित्र दिव ठायठाई
काळुखाला थारा न्हाई
चांदसूर्य आगिच गोळ
दिपवती जगाच डोळ
पासिंजर दाटुन बसती
समद्यांच्या तिकिट हातीं
सामानहि भरलं भारी
फळाफुलांच्या करंड्यावरी
यंत्रांत शिलगली आग
हज्जार कोस आगमाग
मोटार हाकाया बसला
त्येचा चेहरा दरेस कसला
लइ हुशार हयो ड्रायव्हर
दुसऱ्यान करी कारभार
बिन हात लावता जरा
उलटसुलट घेत्याती फेरा
मोटार चालली तडक
हवि तशी मऊ अन कडक
बाजू ना उजवी डावी
मग खुणचा हात कोण दावी
भरदाव चालं मोटार
माग पसर कोसकोसभर
बिन सांध्याचि ही मोटार
गाडीच बनवलं घर
एकला गडी ड्रायव्हर
न्हाइ पल्डी कधिं आजवर
भांडवल बी त्येच घरच
सार हिशेब हातोहातच

कडकडन फीत काजळी
जणु इजाचि क्येलि रोषनाई
पाताळिं पळुन त्यो जाई
दो बाजु दोन लटकावल
'फ्रंट लाइट' मुलखा आगळ
त्येचि कुणी करावी गिणती
दिलि जल्माचिं मांडुन खातीं
ट्रंक डब उंच डोंगरी
साता समिंद्राच्या घागरी
कोण पेटवि त्येचा न थांग
पसरली अक्षि धगधग
गडि कधीं कुणा ना दिसला
हयेरणार समदा फसला
एक हातच चाकावर
डोळा ठेवी समद्यावर
चाक फिरत्याती गरगरा
न्हाईं खिनाचा त्येना थारा
जाइ तकड सडकच सडक
जणु संगमरवरी खडक
तिला धरायला होवावी
मन मानल तकड न्यावी
शेंडनाक्षित्राचा धूर
वाजत शिंग ओंकार
उतराया चढाया न दार
जल्माचि त्यांत येरझार
त्येला लाग ना कुणी क्लीनर
करण्याला इक्ति रीपेर
मोजिना कुणाला कच्च
मग कुणा इचारी कसुच

बिन ब्रेक अशी मोटार
आक्षि अखंड चाले दूर
ह्ये मोटारीच नांव
इद्वान इश्व म्हणत्याती

बिन 'लेसन'ची ड्रायव्हर
न्हाइ कदीं जणूं संपणार
हव तस कुणी ठ्येवाव
इचिभन शबुद चि न येती

५३ सागर व नौका

किती बुडविले किती तुडविले याद राख साजणी
जरि डौलानें ठुमकत मुरडत चाललीस या क्षणीं
हीं शिडें नव्हत हे गाल तुझे गोरटे
फुगवुनी हंससि तूं मला खचित उद्धटे
मम अंगावरुनी बेगुमान धावसी
आशि कोळुन प्यालिस मर्यादा तरि कशी
वाकुल्या दाविसी माना वेळुनि मला
परकऱ्या पोरिचा नाच न शोभे तुला
बहकलीस अगदीं बेसुमार तूं जशि अल्लड तरुणी

* * *

कां वृथा भरतसां रागें मज सागरा
मनिं विचार करुनी बघा मजकडे जरा
मधु वसंत आला भेटाया कुल सखा
घेउनी सर्व या रम्य लोल तारका
मम बंधू प्रेमळ शीत वात मज सवें
घेउनी धावतो स्वगृहीं जाया जवें
मी काय अनादर केला तुमचा बरें
सांगाना उकलुनि अंतरंग तें खरें

५४ पाळणा

पालक हा पाळणा जगाचा पालक हा पाळणा
दिव्य गुणि न मुळिं गणा उणा हा ॥ ध्रु० ॥

हा पंजर मृत काष्ठांचा परि अमृतपूर्ण ओष्ठांचा
आर्द्र मेघ वळवुनि साचा वरि धार पाडवी पुनः पुन्हा

तृण पर्ण पुष्प पाचोळा कंथा वा शाल दुशाला
सुखशयन पुरत जीवाला प्रेमें अंथरिलें कुणि कुणा

गत जन्म जोडि हा दुवा ठेविलें न अजुनी नांवा
परि पाहुनि पाळण्यांत घ्याव्या दो जन्मींच्या सकल खुणा

गात गात मंजुळ गीता आंदोलन येतां जातां
दे व्यापृतकर जी माता ती दिग्विजय करी ललना

५५ सुगृहिणीचा वेदान्त

सांगुं नको वेदांत सये मी जाणत सारा
प्रकृति पुरुष हीं आम्हीं दोघें वावरतों गेहीं
पुत्र कन्यका रूपें नांदे माया ती देहीं
प्रेमाद्वैतीं अमुच्या न मिळे द्वैताला थारा
जिवशिव भेटी होति अहर्निश ब्रह्मानंद घडे
मी निर्गुण पति सगुण-मूर्ति तत्पूजन छंद जडे
पंच प्राणांची सुममाला वाहिन उपचारा

५६ कृष्णाचा हट्ट

सोड सोड तान्हुलिया छंद हा न घेई
गगनिं दूर चंद्र तुझ्या हातिं केंवि येई
दर्पण हें तुजपुढती त्यांत निरखि बाळा
काय दिसे सांग मला बोल बोल वेल्हाळा
देउं कोणता जरि हें चंद्र दोन ठाईं

रडसि म्हणुनि चंद्र तुला हंसतसे पहा हा
कां न तूंहि हंससि तया उद्गारुनि हा हा हा
फजित करुनि चंद्रा मज गोड मुका देई

५७ एक प्रार्थना

खळकुळा लागला चाळा घाली आळा गोपाळा
गंगा लोटुनि आली द्वारीं मानी तीतें नागझरी
दर्शन प्रभुचे निशिदिनिं घडतां खंति तयाची करि भारी
परमार्थाचें सुवर्ण उज्ज्वळ दैवें पडलें जरि पदरीं
भक्ति-निकष तो जवळिं न म्हणुनी पाषाणासम दूर करी

५८ रंगदेवतास्तवन

वंदन तव चरणिं असो रंगदेवते
तेजस्वी भरतपुत्र तव कृपामृते
लक्ष्मीपति राक्षि पहा अन्य युगिं सुरां
रूपा धरि मोहिनिच्या श्रीगुणाकरा
देहार्धीं दावि उमावरहि व्यतिकरा
अवतरलें भूवरिं या नाट्यतत्त्व तें
संसृतिची रंगसभा भुवनिं थाटली
भूषाही नैसर्गिक रम्य दाटली
नरनारी बालक नेपथ्थ्य विनटलीं
वर्णावे किती कौतुककारि वेष ते
भावसूत्रिं कवि गुंफी हृदयमोहका
नवरसमय त्रिगुणचित्रसंविधानका
त्यामाजीं विविधविषयभूत भूमिका
पाहुनि मनिं धन्य न हो चरित कोण तें

५९ नवमतवादी मंगळाष्टकें

गंगा-सागर* संगम विश्वेश्वरसन्निधानि होउं सुखें ।
येथूनचि कुरवाळिन वधूवरांचीं प्रसन्न गोड मुखें ॥ १ ॥

गंगा सागर शोधित जाते हें लौकिकांत जन बोले ।
परि सागरेंच गंगा शोधियली नवल हें इथें घडलें ॥ २ ॥

शोधो कोणी कोणा परिणामीं एकजीव ते होती ।
कीं संगमाविणें या जगतीं आकर्षणा न अन्य गति ॥ ३ ॥

तीन तपें जो तुमचा अमुचा घडला ऋणानुबंध भला ।
त्यातें दृढ करण्या विधि योजी मजला विवाह हा गमला ॥ ४ ॥

आतां एक्या हातें पोथी घेउनि तुम्ही पुरोहित व्हा ।
दुसऱ्या हातें कन्यादाना करुनी पुढें अचिंत रहा ॥ ५ ॥

हा वृत्तिभंग केला पुरोहिताचा तरी न हें सोपें ।
प्रायश्चित्त घडेलचि तुम्हा जामातदक्षिणारूपें ॥ ६ ॥

एकाकी 'श्री' बघुनी बांधितसा त्या विवाहरज्जूंनी ।
राखिल पाठ तयाची तेथें ऐसें न आमचें कोणी ॥ ७ ॥

तरि सांगा नलिनीला शालीला चिमुकल्या अहिल्येला ।
कीं मेहुण्यासि संभाळुनि घ्या, घाला न त्यावरी घाला ॥ ८ ॥

तीन करवल्या वात्रट मग थट्टामस्करी किती होई ।
वाटेल श्रीधराला कीं नौका वादळांत निज जाई ॥ ९ ॥

परि एक मात्र बरवें. नव्या युगीं या सनातनी चाळे ।
पूर्वींचे ओसरुनी त्या जागीं नवे नवे असे आले ॥ १० ॥

हळद पळाली, काजळ डोळा चुकवोनि मस्तकांत शिरे ।
मुंडावळ्या अदृश्यचि कांपिव केशांवरूनि हात फिरे ॥ ११ ॥

---

* गंगा म्हणजे गंगातीरंनिवासी मालिनी आणि सागर म्हणजे सागर-संचारी श्रीधर.

आतां न तोडिति विड्या वधुवर धरुनी मुखीं लवंगांच्या ।
बौद्धिक मतभेदाने ओरखड्या काढितात अंगाच्या ॥ १२ ॥
गुप्तप्रेमा शोधायाते दडवीत ना कुणि सुपारी !
वडिलांदेखत वधुवर बोलत बसतात तीं भरदुपारीं ॥ १३ ॥
कोणी न घास घाली आता नवऱ्या सुधारली नवरी ।
पाटासि पाट लावुनि जेवित बसते खुशाल पोटभरी ॥ १४ ॥
घेतां नांव पतीचें पत्नि न लाजे न मारिते मुरका ।
एकेरि नांव घेउनि दुरुनी ही त्यास घालिते हाका ॥ १५ ॥
श्रीधर म्हणेल मालू मालूहि म्हणेल श्रीधरा ये रे ।
'स्वारी' 'स्वतः' 'हं' 'आपण' यांतिल कांहीच यापुढे न उरे ॥ १६ ॥
हें सारेंहि जरि खरें प्रेमीं होईल काय न्यून उणें ।
हृदयोद्गारा मिळतां वाव खुला वाढतेंच तें द्विगुणें ॥ १७ ॥
युगपरिवर्तन होतां जीवनपरिवर्तनीं खुणा फिरती ।
आचरण नवें दिसलें तरि अंतरिं तीच ती रती विरती ॥ १८ ॥
घ्या मंगळाष्टकें हीं नवीं नव्या लग्नपद्धतीस जीं सुचलीं ।
जाऊनि तेलवाती त्या जागीं वीज सज्जना रुचली ॥१९ ॥
ताई आक्का विठ्ठल अण्णा शांता नि मालती मामी ।
यांच्यासह अभिनंदनपर आशीर्वचन पाठवितें हें मी ॥ २० ॥

---

६० वरुण-बाला

—·—:०:——

बघ लाटांचा झोपाळा । उंच टांगिला आभाळा ।
त्यावरि बसुनी क्रीडा करिं मी वरुणाची बाला ॥ ध्रु० ॥

प्रेमळ भाउराय वारा । दे झोके मज भराभरा
क्षणिं पद या एका क्षितिजा । लागे तों दुसरेंहि दुजा ।
गें जाउनी पाताळातळिं । समुद्र डोक्यावर आला ॥ बघ ॥ १

हंस पंख फुगवोनि वरी । शुभ्र तलम विंझण्यापरी
नम्रपणें ये सामोरा । सुखवि मज घालुनि वारा ।
क्रीडाश्रम होवोनि फुटे जरि । लवहि घर्मबिंदू भाळा ॥ बघ ॥ २

'जल-नर' मारुनि उड्या बुड्या । 'जल-नारी' घालुनि फुगड्या ।
स्वागत करितां मम हर्षें । मोद बहर त्यांवरि वर्षे ।
इंद्रधनुष्यें मज पुढती । दिवसा धावति वायुगती ।
रात्रि मत्स्यगण पुच्छ मशाली । उजळिति माझ्या मार्गाला ॥ बघ ॥ ३

मृत नाविक नव देह धरी । त्यातें मी सरदार करीं ।
जळराज्याची रखवाली । करुनि घस्त तो मग घाली ।
झोंप जावया कानिं सांगतो । अद्भुत गुजगोष्टी मजला ॥ बघ ॥ ४

अवतारहि पहिले दोनी । जन्म घेति मम कुलभुवनीं ।
देवांची संरक्षक मी । ऐश्वर्याला काय कमी ।
दशदिशिंची संपत्ति लोळुनी । मळवी माझ्या चरणाला ॥ बघ ॥ ५

मोति-पोवळ्यांच्या माळा । परोपरीच्या गुंफविल्या ।
पाताळाच्या खोल तळीं । झाकियल्या मृदु शैवालीं ।
अलंकार परि घालायाला अंगीं । रुचत न कधि मजला ॥ बघ ॥ ६

सुरूप सुंदर सुरयुवक । प्रेमाची मागति भीक ।
अव्हेरितें मी परि त्यांना । उणे पडति ते मम माना ।
अशीच अविवाहित राहिन मी । मानधना नवयुग–बाला ॥ बघ ॥ ७

पिता वरुण मम म्हातारा । त्या न साहवे राज्यधुरा ।
म्हणुनि घेतला मी हातीं । राजदंड होउनि पुढती ।
धाक कदर राखित मी, परि नच सीमा मम वात्सल्याला ॥ बघ ॥ ८

(संगीताच्या 'मराठीकरणा'करितां रचलेले)

गायकी प्रबंध

राग–श्री

श्री देई देवा
तव गुण--गायन करूं अहर्निश
धरुनि पूज्यभावा
नादब्रह्म जरि एकरूप तें
विविधरसालंकारीं नटतें
म्हणुनि सुलभ सेवा
नारद तुंबरु अमुचे प्रतिनिधि
तुझिया संनिध उभे गुणनिधी
आम्हासाठीं त्या वर द्यावा

राग--अडाणा

१ अडाण्या धरी समज मनिं काही
जग तुजसम जडधि नाहीं
त्रिगुणात्मक जग एक्या मानें
मोजु पाहसी तूं कसा
अक्षक्रीडा एक्या दानें
सार्थ सफल कैसी होई
२ गृहदेवता--गीत मुखिं गावें
लाभते तेणें मानसा शुचिता
यारे गारे भा ऽऽऽवें
स्वर्ग भूमिवरि अवतरवी सुगृहिणी
स्तुतिसुमनानीं तिज पूजावें

राग--असावरी

असा वरीः तूं वर मनुजा
जाइल दुरित सकल अघ नाशा
घडेल निशिदिनिं हरिपूजा
वर वरण्या सद्भाग्य लागतें
जरि ईश्वर सन्मुख झाला
निर्धन परि पुण्यशील रंका
सुचेल कधिंहि न जें राजा

राग--कानडा

१ कानडा मला पति केला
मी तर अशी मराठिण बाला
मी बोले तें त्यातें न कळे
तो बोले तें मज न आकळे
जिव्हा ओष्ठहि हलवितों बळे
बोध परि कुणा कांहिं न झाला
दुःखभरानें म्हणे चित्कला
पडला गळिं जड देह दादला
सद्गुरुवाचुनि यांतुनि मजला
कोण सोडवी सज्जन बोला
२ मना सुजना स्मरे ईश्वरा
तरि होती सुफला मनकामना
व्यर्थ उपाय जरी आधार
तरी हरिनाम ना ?
३ का न डागु ही मम रसना
जरि सच्चरितीं हरिगुणवर्णनिं
इजला रस मुळि गवसेना

राग--काफी

१ कॉफी या झोकोनी
मैफलींत ये रंग न अजुनी
चढतां बारावरती काटा
झोप पळतसे बारा वाटा
मग बैसा तुम्हि मारुनि जेठा
सन्मुख सरसावोनी
ओढुनि तबक पुढें पिकदाणी
बागेश्री आळवितां साधी
पंचम लाविल सहज समाधी
मग मध्यम स्वरसाम्राज्यामधि
मालकंस शिरतांना
शांत रसोदधिमंथनवीची
पडतिल तुमच्या कानीं
पहाट समयीं करुण रसाला
शीतळ वातें भर बहु आला
मग सुचवा तुम्हि गवइबुवाला
राग परोपरीचे ते
परज रामकलि ललतहि सोनी

२ घ्या कॉफी गोड गोड
स्वीकारुनि नव रीती
मिष्टान्नें दिलिं हातीं
आवडिचे राग जुने
तालादिक मुळि न उणें
एक मात्र मोडिलि परि पुरति खोड
परभाषा आदरिता
दूषण ये संगीता
निजजनवच वरुनि दिली मधुर जोड

राग--कामोद

कामोदय तरुणा
करित मूढ बधिर अंध
घालुनि दृढ पाशबंध
मुळि नच ये त्या करुणा
मिळवियलें धुळिस किती
आजवर तयानें
बांधुनि अपकीर्ति पदरिं
मळवुनिया सकळ गुणां

राग--किर्वाणी

कीरवाणी गीर्वाणी ऐकुनि मन धालें
देवा त्वां पाक्षिवरा ज्ञान
दिव्य किती दिधलें
कर्ण नसुनि श्रोत्रेंद्रिय
तीक्ष्ण जशी असिधारा
ओष्ठ दंत गुप्त तरी
करित स्पष्ट उच्चारा
जिव्हा ही लोल सकल
शब्द मानवी बोले

राग--केदार

केदार अचल शिखरी
वसति करीतो परि तो
शिव जगताचें हृदयीं धरी
प्रिया अपर्णा पर्णा--भरणा
पुत्रद्वय ते विकृतमुखी
रक्षामय गृह तरि सहजसुखी
निजभक्तांचें दुःख हरी

राग--खमाज

ख--माज घर हें क्रीडा
करण्या दिलें यक्षललनांना
स्वैरपणें तेथ त्या नांदती
खेळ खेळती नाना
निळी पसरली चादर
तिजवर उधळिलिं तारासुमनें
क्रीडा कंदुक चंद्र करोनी
डाव मांडिला त्यांनीं
लपती मेघांमागें कोणी
मार वाचविति चपला
पळतां शेला सावरिती
कुणि अभ्रखंडमय अपुला

राग - गारा

गारा भरारा
दाहि दिशा करिति किती मारा
तडातड
घडा कावेचा चुडा लाखेचा
घडा मातीचा चुडा हातीचा
काय करूं कोठे शिरूं
जवळि न वृक्ष घ्यावया थारा
सासुरवासी मी दीन अबला
सासुबाई रागे भरतिल
देतिल दोष तो मला सारा

राग– गौरी

गौरीहर पूजित बाला
पीत-वसन परिधान करोनी
घालुनि कंठीं मंगलमाला
देखिला न नयनीं जरि निज वर
तरि रंगविते ती हृदय-पटावर
सगुणरूप त्याचें अति सुरुचिर
निज अभिरुचिचा करुनि कुंचला

राग– छायानट

छायानट नटला विटप किती
शुभ्र चंद्रिका प्रकाश मिसळुनि
अंधकारिं हा करि गमति गमति
शिखरिं जटाजूट शोभतो हा
शबल-द्युति-मय किरणसंगमें
पांडुर रेषा दावि विधुकला
नील गमत तो सर्प वक्रगति

राग–जयजयवंती

जयजयवंती रसवंति जय खरा
तव होई जगभरी
मिष्टान्नासम ललित नव रसां
रसिक आदरी

राग– जीवनपुरी

जीवनपुरि ही किति नवलकरी
अद्भुत-दर्शन ईशें रचिली
क्रीडा छंदें
अस्थिमांसशोणितमेदांनीं
रचिल्या भिंती बुरुज गोपुरें

राग– जोगी

जोगी कोण असे हा वाटे
अपूर्व मम चित्ताला
सेवी भस्मासम जरि लागे
केशरतिलक कपाला

नेसाया पीतांबर देती
तरी दिगंबर वृत्ती
मुखीं अमृतमय घांस पडे परि
वाटे ती त्या माती
सुंदर ललना जरि सेवेला
उभ्या सतत जणु दासी
होई कष्टी मानासिं पिक जणु
कंटकंपजरवासी
मस्तक ठेवुनि जनीं उठविले
घट्टे याच्या पायीं
" सेवक जनतेचा मी " अन्य न
मानी अपुल्या ठायीं

राग— जंगला

जंगला जा जरि न दे
ही संसृती तुज सुखा
हास्यमुख बालक तुजपुढें
चुंबना वांछुनी मागतां गळिं पडे
खेळकर बालिका दुडदुडे
हट्ट धरुनी म्हणे घ्या कडे
अन्य आनंद जगिं काय मनुजा
कामिनी प्रेमळ सती लाभली
दक्ष गृहकर्मीं असे जी भली
भूवरी देइ ती स्वर्गसौख्या

राग— झिंझोटी

झिंझोटीची बट करिं धरुनि
गात सखी स्तव तीचा
म्हणे सांठला ईतचि सगळा
सद्गुणगण सुसतीचा
स्नेह रसें भरली परि सन्मुख
नित्य अधोमुख राहे
प्रेमें कुरवाळिलि तरि नयनीं
कटाक्ष रोखुनि पाहे

राग— तिलंग

तिल अंग किती शुभ्रवर्ण
तव बघ हे शोभविती
कर्मकुशल चतुराई
दावी विधिहास्ति किती
लांछन जणु चंद्रवदनिं
अपवादहि व्याकरणीं
द्रुतगति लयमय गानीं
शरणागति अभय रणीं
दूषण भूषण द्विगुणित

राग— तोडी

तोडी हा प्रेमपाश
कणसा जन-हृदयिं खुपत
असिसम मम हृदयिं रुतत
दुखवुनि तुज मजसि सतत
अंतिं करिल सर्वनाश

राग— दरबारी (कानडा)

दरबारिं बसुनिया हा राजा
नवदाक्षिण्यां ठेवुनि हृदयीं
साधितसे पुर-जन काजा
पितां अर्भकां पुत्र निःसुतां
बंधू अनाथ वधुला
अपराध्या यम, भीतिपीडिता
आश्रय अचल असे हा

विद्वानां सहकारी, दुःखितां
मित्र सुहृद् सुखभाजा

राग—दीपक

दीपक सत्पुत्र हा शोभवी
जसा चंद्रमा गगना
उज्ज्वल करितो यश अन् कीर्ति-
सुधा—विलेपनें कुलवदना
पिढयांपिढयांचें सुकृत
सांचुनी तेंचि फळाला येतें
एका देहीं एका जीवीं

राग—देश

देश हा माना
देवासम पूजनीय निशिदिनिं
देशभक्ति हा धर्म सनातन
उपासनाविधि जरि ते नाना

राग—दुर्गा

दुर्गा या ऽ करगत करा
सत्कीर्ती रणिं झणि वरा
प्राकारा भंगुनि या
हर हर हर करित शिरा
कापुनि अरिशिरकमलें
यमपूजापात्र भरा

राग—देशी

१ दे शील विमल देवा इतर न कांहीं
जगीं यशा जाई
धनविद्यां विभव जरी अगणित तरि
त्यासि मान्यता नाहीं
२ देशीं कृषि शिल्पोद्यम या जनते-
वीण अन्य ना कोणी
आधार युगिं असे या म्हणुनि करा
वृक्षतळिं जशी भरणी
३ देशी तिल चिन्हांकित वदनांतिल
गोड जीभ मम वदनीं
स्वीकारुनि हा तिळगुळ तुजशीं
बोलेन गोड रमणि झणिं

राग—धनाश्री

धनाश्री न म्हणा
घातक लोभमूल
करवित नरकरवीं
अशुभ वृत्ती नाना धना
श्री सात्त्विक भावा
वरिते दिव्य गुणा
तेजश्री औज श्री पहा
श्रीच्या सहज खुणा

राग—नटनारायण

नटनारायण राजहंस हा
रंगभूमि-कासारीं
क्रीडालीला करी आजवर
जनमन रंजवि भारी
गंध सुवर्णा तेवी सुस्वर
अधिक गोड करि रूपा
प्रेक्षकगण करभार देई त्या
जैसी प्रजा न भूपा
जयिष्णु होउनि विष्णु धरितसे
मोहिनिच्या रूपातें
नरनटधृत ललना रूपानें

ईशचरित तें स्मरतें
नटनारायण रंगभूमि हें
विश्व तयाला साजे
मायेसह सजला रंगाया
काय उणें मग मौजे
एकाक्षर ओंकारीं भरलें
नाटक वाङ्मय सारें
ग्रह निज गतिनें गायन निर्मुनि
गाती त्या अनुसारें

राग—परज

परज परज जिव्हा वदनांतरि
खडग्लता जशि निष्फळ झळके
लीला प्रिय ललना करीं
घोर भयंकर मुखीं मुखवटा
पुच्छासम उठविला बाहुटा
तरि व्याघ्र न तुज कोणि म्हणे
वीररसात्मक शब्दसमूहा
कोशाभ्यंतरिं काय उणें

राग—पहाडी

पहाडी मजा करूं चला
या सुप्रभात समयाला
सहस्रकर रवि क्षितिजावरतीं
अजुनि न जंव तो आला
पक्षी गाती साद घालिती
हलुहलु मधुनि मधुनि
डोकावीती मान काढुनी
घरट्यामध्यें बसुनी
अंग झाडुनी हरिणें उठती
बघतीं चौबाजूला

राग—पंचम

पंचम दिधला गोड कोकिळे
वसंतमुख खुलवाया
जनमन दुःखी उदासीन
जरि तरि तो जाई वाया
गानमाधुरी आत्मनिष्ठ
ती कोकिळकंठीं नाहीं
उष्ण चंद्रमा विरहिणीला
प्रिय—संगति शीतल रविही

राग—बरवा

बरवा बहिरेपणा
दुरुक्तिश्रवणाहुनि मज वाटे
उपोषणहि तें पथ्यकर
नको परि उदरामधिं कांटे

राग—बहार

बहर न तनुविटपा कां आला
प्रिय सुहृदा रे सांगे सकल खरें
लपवूं नको विनयभरें
होइ बघुनि दुःखि तुला दुःख मला
यौवनसम कोण दुजा
सहकारी मित्र तुझा
परि तेज न ये नयनीं
सहज गोड हास्य वदनीं
हृदय हरुनि सौख्यधनीं
कोण घालि घाला

राग—बागेश्री

१ रम्यता किति देतो बागे श्री
लता वृक्ष हे सुंदरसे

सुमनें फुललीं मधुपगण
वरि डोलति हे
होउनि गुंग मधुर रसें

राग–बिभास

बिभा सकळ साठली जगांतिल
या रमणीच्या नयनीं
विनटे जी रवि मुखिं सीमांता
जातां उत्तर-अयनीं

राग–बिलावल

बिलावलि जशा पाडिति
मूषक जीर्ण विजनशा सदनीं
पाडीं वृद्धावस्था निर्दय
खिडारें या रदनीं
तेंवि दैवगति खनित्र
करुनि तीक्ष्णदंत चिंतेला
मनुजहृदय काढितें खणोनी
दावुनि कुकर्मलीला
बीं लाव लहान आल–
वाली पाडुनि रेखिव पाळीं
घाली मग खत पाणी उपटुनि
काढी तृणमय जाळीं

राग–भीमपलास

भीम पलाश दिसे हा रानीं
रम्य किती नयनाला
पर्ण न फुटलें एकहि परि
हा पुष्पमय कसा झाला
वाटे राक्षस देवेंद्राशीं
करितां समर पळाला
गुप्त स्थाळिं रक्षणार्थ
शोधित गिरिकुहरांतिं आला
वज्रें केले घाव तनूवरि
तिळहि न जागा उरली
रक्तें फुटुनी गोठुनि जणूं हीं
पुष्पाकारचि बनलीं

राग–मल्हार

मल्हार देव ये गजरत भारी
मेघ वारुवरि करुनि सवारी
श्याम कवच घालुनि अंगावरि
मौक्तिक-माला अभ्रमय शिरीं
घेवोनि सवें वीज सहचरी

राग–मारवा

मार वाट रोखुनि बसला
तरुण नरांवरि नवयुवतीवरि
घालित अवचित तो घाला
यौवन वन घनदाट बिकट अति
विवेक लोचन विफळचि होती
अमोघसंधानी धनु हातीं
वीर अनुभवी तो कसलेला

राग–मांड

मांड जगीं मांडियला दैवें
विपरीत कसा हा निष्ठुरें
बघुनि मनीं ये विषाद, मम
जिव्हा निंदाकर्मीं स्फुरे
चंद्रा लांछन दीपा कज्जल
सौंदर्या वैधव्य जडे
गुणवंता निर्वंश घडतसे विद्या

निर्धन पदरिं पडे
समसंगम लोभनीय परी जग
विषमयोग निकरें भरे

राग—यमन

यम न करी कल्याण जगाचें
उपेक्षुनी खळ ऐसे भुवनीं
धूर्त छलक खल लंपट लोभी
सज्जनांसि जे करिति उपाधी

राग—वसंत

वसंत ऋतु हा रमवी
वृक्षलतांसह मना देत किति
प्रफुल्लता टवटवी नवी
हिमनिद्रेंतुनि जागृत झालें
जग सगळें उघडित नयना
खेळ खेळण्या परोपरी त्या
हाक मारि खेळिया रवी

राग—सारंग

सारंगराज हा भटके रानीं
तृषित कंठ दग्धांग होउनी
तृण वृक्षादिक गेले करपुनि
रवि तळपे तद् द्वादश लोचनिं
उघडुनि भस्म कराया अवनीं
क्षितिज भरे धूमिकामय जळें
जातां जवळीं क्षितिज दुरि पळे
मग परतें व्याकुळ नयनीं

राग—हमीर

गुरुविण कोण दाखवी वाट
गर्व गिरीपरि अडवि परोपरि
बिकट त्यांतले घाट
भ्रम तरु शंका लतिका यांचें
जाल पसरलें दाट
षड्रिपु भिल्लासम घातक बहु
प्राणा घालिति गाठ
माया सरिता ओढ किति तिला
पाय न ठरती ताठ
डोळे फिरती बघुनि भोवरे
दर्यातीर अफाट
गुरु तुज नौका गुरु नावाडी
गाठुन देइल काठ
मार्ग दाखवी तोच दयाळ
सोडि न त्याची पाठ

राग—हिंडोल

हिंदोल त्रिगुणात्मक
रचिला संसृतिनामक
डोले दे घे झोले
त्यावरि नर शीघ्रगती

— समाप्त —

ग्यारीबाल्डी

ग्यारीबाल्डी

भाग १ ला

जन्मवृत्तान्त

क्रियासिद्धिः सत्वे भवति महतां नोपकरणे
—भोजप्रबंध

दैवायत्तं कुले जन्म, मदायत्तं च पौरूषं
—वेणीसंहार

फ्रान्स व इटली या दोन देशांच्या सरहद्दीवर भूमध्य समुद्राला लागून असलेल्या आल्प्स पर्वताच्या एका भागाचे पायथ्याशीं नाईस या नांवाचें एक शहर हल्लीं वसलेलें आहे. एकोणिसाव्या शतकाचे प्रारंभीं नाईस हें निवळ खेडें होतें; तथापि त्याची रचना फारच निसर्गरमणीय होती. एका बाजूस लांबच लांब डोंगर गेलेले असून, दुरून आल्प्स पर्वताचीं बर्फानें आच्छादिलेलीं पांढरींशुभ्र शिखरें स्वच्छ दिसत. त्याच्या पलीकडे माउंट ओबॅनो नांवाचा बळकट तटबंदीचा व शेंदीडशें वर्षें लढायांमध्यें झुंजलेला असा भव्य डोंगरी किल्ला एका उंच व तुटलेल्या कड्यावर उभा होता. त्याच्या भयाण छायेंत हें लहानसें खेडें गडप होऊन जात असे. दुसरे बाजूस पाहिलें तर भूमध्य समुद्राच्या सुंदर निळ्या लाटा या खेड्यांतील घरांच्या पायऱ्यांवर आपटत. निवान्त वेळीं किनाऱ्यावरील अवघ्या इमारतींच्या ओळींचें प्रतिबिंब समुद्राच्या स्वच्छ पाण्यांत पडत असे. तिसऱ्या बाजूस पाहावें तर आल्प्स पर्वतामधून निघालेला एक मोठा ओढा या गांवाचे कडेनें खळखळ वाहत जाऊन समुद्राला मिळालेला होता. या खेड्यांत चालू शतकाचे आरंभीं कोळी लोकांची बरीच वस्ती असे. त्यांनीं होड्या बाळगाव्या, समुद्रांत जाऊन मासे धरून आणावे, व त्यावर आपली उपजीविका करावी. इतर कोणी याहून बऱ्या

स्थितींत होते, त्यांचीहि पण उपजीविका समुद्रावरच चाले; म्हणजे कोणी परक्यांच्या जहाजावर नोकरी पत्करून खलाशाचे किंवा तांडेलाचें काम करीत व कोणी स्वतःचे मालकीचीं जहाजें ठेवून व्यापार करीत.

अशा या खेडेगांवांत या शतकाचे प्रारंभीं डोमेनिको ग्यारीबाल्डी व त्याची बायको रोझा असें एक सुखी जोडपें राहत असे. डोमेनिको हा घरचें जहाज ठेवून व्यापार करी व रोझा गृहप्रपंच मोठ्या नीटनेटकेप्रमाणें करून नवऱ्याला सुख देई. डोमेनिको व रोझा दोघेंहि स्वभावानें सज्जन व प्रेमळ अशीं होतीं. ग्यारीबाल्डी हें नांव फार जुनाट आहे; तें इतकें कीं, सुमारें दोन हजार वर्षांपूर्वी रोम येथील प्रजासत्ताक राज्याचे वेळच्या कित्येक वरिष्ठ प्रतीच्या कुळांतून ग्यारीबाल्डी हें उपनांव प्रचलित असलेलें आढळतें. परंतु खुद्द डोमेनिको ग्यारीबाल्डीचे घराण्यांत या जुन्या नांवापेक्षां दुसरें कोणतेंहि ऐश्वर्य उरलेलें नव्हतें. डोमेनिकोचा आजा पुरा दरिद्री होता, व त्याच्या बापानें जे काय दोन पैसे मिळविले होते ते त्याचे त्यानेंच मूर्खपणानें सट्ट्याचे व्यापार-धंदे व चैनबाजी करून उडवूनहि टाकिले होते. पुढें डोमेनिको वयांत आला, तेव्हां घरची अगदीं गरिबी असल्यामुळें प्रथम प्रथम त्याला निवळ कोळ्याचा म्हणजे मासेमाऱ्याचा धंदा करावा लागला. परंतु कोणताहि धंदा नेकीनें व मेहनतीनें केला असतां तो बहुधा सफळ होतो; त्याप्रमाणें डोमेनिकोला असल्या हलक्या धंद्यांतहि चार पैसे मिळाले. नंतर त्यानें आपल्या मालकीचें एक जहाज घेऊन व्यापार चालविला. तथापि एकंदरीनें पाहतां, डोमेनिकोची घरची स्थिति गरीबीचीच होती म्हटलें तरी चालेल.

अशा या सुशील, सात्त्विक, धर्मभोळ्या व गरीबशा जोडप्यास इ.स.१८०७ सालचे जुलई महिन्याचे २२ वे तारखेस एक मुलगा झाला. त्याचें नांव जोसेफ. रोझा हिची आपल्या मुलावर फारच ममता असे. जोसेफला तर ती अगदीं जीव कीं प्राण करी. आपला जोसेफ पुढें अचाट पराक्रमानें जगाला थक्क करून सोडील व इटलीचा उद्धार करून पृथ्वीवरील स्वदेशभक्त-मालिकेंतील शिरोमणि किंबहुना अवतारी पुरुष अशी कीर्ति मिळवील हें त्या बिचारीच्या स्वप्नांतहि कधीं आलें नसेल. पण असें आलें असतें तरी काय? मुलगा म्हणून जोसेफवर तिचें जें प्रेम होतें तें वाढण्याला त्या तिच्या हृदयांत वावच नव्हता!

जोसेफचा बाळपणीं विद्याभ्यास फारसा झाला नाहीं. घरचें वळण तिकडे नव्हतेंच व मुलालाहि जातीनें विद्याभ्यासाची फारशी गोडी नव्हती. तथापि इतर मुलांप्रमाणें आपल्या बाळपणीं त्यानें फारशी उगाच उनाडकी केली नाहीं. सृष्टिसौंदर्याच्या अभिरुचीचें मात्र त्याला बाळकडूच होतें म्हटलें तरी चालेल. केव्हांहि फुरसत सांपडली कीं, त्यानें उठून उंच डोंगरावर जावें व तेथें एकांतवासांत सृष्टिसौंदर्य पाहत तासाचे तास घालवावे. त्याला प्रवासाची गोडी केव्हां व कशी लागली असेल ती असो. प्रवास म्हटला, कीं याचा पाय नेहमीं पुढें असावयाचा. त्यांतून समुद्रावरचा प्रवास म्हटला म्हणजे तर, त्याला अगदीं दुधांत साखर पडल्यासारखें वाटे. जोसेफ हा बाळपणापासून किंचित् हूड व साहसप्रिय असा होता. पाण्याचें भय म्हणून कसें तें त्याला ठाऊकच नव्हतें. आपल्या इकडे मुलाला किनाऱ्यावर घालतात, तसा डोमेनिकोनें जोसेफ-ला लहानपणींच होडीवर घातला होता. परोपकारीपणाचाहि त्याचा अंकुर जन्मसिद्धच होता. यामुळें अगदीं बाळपणापासून त्याचे हातून परोपकारा-प्रीत्यर्थ साहसाचीं कृत्यें घडलीं. जोसेफ हा केवळ आठ वर्षांचा असतां त्यानें पाण्यांत पडलेली एक परटीण वर काढली अशी गोष्ट कित्येकांस खरी वाटत नाहीं. परंतु पुढें १२ व्याच वर्षी तो एकदां होडींत बसून समुद्रावर मौजेनें चालला असतां अकस्मात् वारा सुटून दुसऱ्या एका होडींतील माणसें होडी उलटून पाण्यांत पडलीं; हें पाहतांच जोसेफनें उडी टाकून त्यांपैकीं कांहींचे प्राण वांचविले ही गोष्ट मात्र महशूर असून तिजबद्दल कोणाचाहि वाद नाहीं. जोसेफ ग्यारीबाल्डी आपल्यास 'जलमाणूस' असें म्हणवून घेई व खरोखर त्याची सर्व तालीम व कसरत जहाजावर म्हणजे डोलकाठ्यांचे खांबांवर व अवजारांच्या दोरांवरच तयार झाली होती. समुद्रपर्यटणासंबंधानें एक गोष्ट त्याच्या चरित्रांत व खुद्द त्यानें लिहिलेल्या आत्मवृत्तांतांतहि नमूद केलेली आढ-ळते, ती अशी:— लहानपणीं शाळेंत शिकत असतां जोसेफला समुद्रावर सफर करावयाची एक दिवस हुक्की आली. लागलीच त्यानें आपले दोन सोबती बरोबर घेतले व प्रवासाची सामुग्री एका लहानशा फडक्यांत बांधून घेऊन हे तिघे प्रवासी बंदरांत जाऊन, एका कोळ्याच्या होडीवर चढले. होडी बंदरां-तून काढून त्या खाऱ्या बाहेर समुद्रावर तर गेल्याच, मग पुढें शेंपन्नास कोसांची सफर करावयाचा त्यांचा बेत होता कीं काय न कळे! पण कर्मधर्मसंयोगानें

एका गृहस्थानें ह्या सफरीची वर्दी जोसेफच्या बापाला दिली तेव्हां लागलीच त्यानें त्यांच्या मागोमाग एक होडी पाठवून त्यांना पकडून परत आणिलें !

ग्यारीबाल्डी हा घोड्यावर बसायला व तरवार खेळायला फार चांगलें शिकला होता; व बहुधा त्याचा करमणुकीचा सर्व वेळ मर्दुमकीचे खेळ खेळण्यांत जाई. आईबाप शाळेला जा म्हणत त्यांची आज्ञा मोडावयाची नाहीं, येवढ्याकरितांच तो शाळेला जाई व थोडाबहुत अभ्यासहि करी. परंतु आईबापांचे मनांत तरी त्यानें पुष्कळ अभ्यास करून विद्वान् व्हावें असें कोठें होतें ? त्या वेळची परिस्थितीच अशी चमत्कारिक होती, कीं विद्वत्तेला सरकार-दरबारांत फारसा मान नव्हता. शिवाय धर्मोपदेशक लोक साऱ्या देशभर पसरलेले असत; चांगलासा शिकला सवरलेला मुलगा पाहिला कीं, 'संसारांत पडून काय करावयाचें ? राजकीय कारभारांत कशाला मन घालतोस ? मठवास पत्करून धर्माचें अध्ययन व पोपच्या धर्माचा प्रसार करायला चल आमच्याबरोबर' असा ते बुद्धिवाद करीत. यामुळें मुलानें शिकून सवरून चार पैसे मिळवावे व राज्य-कारभारांत मान्यता संपादावी अशी महत्त्वाकांक्षा असलेल्या आईबापांना, मुलास शिक्षण देऊन त्यास मोकळें सोडणें फारच धोक्याचें वाटूं लागलें होतें. इकडे सरकारकडून शिक्षणाला उत्तेजन म्हणावें, तर तेंहि यथायथाच. त्या काळच्या जुलमी राजांच्या मनानें, शिक्षणाचे योगानें तरुण लोक स्वातंत्र्यप्रिय व बंडखोर होतात अशी दहशत घेतली होती. अनुभवावरून पाहतां त्यांची ती भीति अगदींच निरर्थक होती असें म्हणतां येत नाहीं. कांहींहि असलें तरी, त्या काळीं सरकारनें शिक्षणावर कडक अम्मल व दाब ठेवला होता एवढें खरें. या सर्व कारणांमुळें शिक्षणासंबंधानें सर्वत्र अनास्था माजलेली होती. या बाह्य कारणांची स्वाभाविक मनःप्रवृत्तींत भर पडून जोसेफच्या दप्तराला लवकरच गांठ लागली ! तरी पण त्याचें वाचन तेथेंच संपलें असें झालें नाहीं. फावल्या वेळीं आपल्या आवडीचीं पुस्तकें मिळवून तो वाची. कांहीं कांहीं शिक्षकांशीं त्याचा स्नेह जमला होता त्यांजपासून तो स्वदेशाचे जुने इतिहास घेऊन त्याची पारायणें करी. देशभक्तांचीं मनें प्रायः बाळपणींच स्वदेशाच्या जुन्या इतिहासाकडे आपोआप वेधतात व त्या इतिहास-वाचनाचे योगानें त्यांचे मनांतील स्वातंत्र्यप्रियतेच्या अंकुराला अधिकच पुष्टि मिळते हा नियम जगाचे इतिहासांत पुष्कळ ठिकाणीं पाहण्यांत आलेला आहे. जोसेफ ग्यारीबाल्डीचीहि गोष्ट अशीच होती. आधींच शिक्षण थोडें व कनिष्ठ प्रतीचें,

शिक्षकवर्गांत स्वदेशभक्तांचा अभाव व स्वातंत्र्यप्रियतेचें बीज करपवून टाकण्यासारखी जुलमी अधिकाराची प्रखरता. अशा परिस्थितींत असूनसुद्धां ग्यारीबाल्डीचें मन स्वभावतःच कोणी न शिकवितां, न सवरतां स्वदेशाच्या जुन्या इतिहासाकडे वेधलें, ही गोष्ट ध्यानांत धरण्यासारखी आहे. इटलीचा जुना इतिहास वाचावा, त्याचेंच मनन करावें, स्वदेशाचें गतवैभव आठवून वाईट वाटून डोळ्यांतून पाणी काढावें व त्या डोळ्यांतील पाण्यानेंच मनांतील स्वदेशप्रीतिरूपी वल्लीला पुष्टि मिळावी, हा क्रम जोसेफ ग्यारीबाल्डीच्या बाळपणापासून चाललेला होता. जुन्या इतिहासांत नांवाजलेलीं व आपल्या पूर्वजांनीं पराक्रम करून चिरस्मरणीय करून ठेविलेलीं स्थळें तो प्रसंगाप्रसंगानें पाहून येत असे. इतिहासांत प्रख्यात असलेलें, सर्व जगाची एक वेळ राजधानी होऊन बसलेलें, व विद्या आणि कला यांचे योगानें नेहमींच जगद्वंद्य होऊन राहिलेलें रोम शहर, जुलमी पोपच्या व फ्रेंच राजाच्या ताब्यांत गेलेलें पाहून त्या वेळीं जोसेफ ग्यारीबाल्डीचे मनांत कालवाकालव होऊन जात असे. तात्पर्य, ग्यारीबाल्डीच्या मनाची व शिक्षणाची स्थिति अशी होती हें ध्यानांत आणलें म्हणजे, त्याचा आयुष्यांतील पुढील सर्व वर्तनक्रम समजतो.

वयांत येऊन कांहीं तरी स्वतंत्र धंदा करण्याएवढा झाल्याबरोबर जोसेफनें दर्यावर सफरी करण्यास प्रारंभ केला. तारुण्यांत जो धंदा करावा त्यावर प्रेम बसतें. ग्यारीबाल्डीला तर या सफरी म्हणजे जसें कांहीं आनंदाचें निधानच वाटत असे. त्या वेळीं त्याचे दृष्टीनें सर्व जगांत शूर माणूस म्हणजे जहाजाचा तांडेल. जहाज म्हणजे जशी काय त्याची आवडती बायकोच, प्राणाहून प्यारी! सगळ्या संगीतांत नावाड्यांचें गाणें म्हणजे अगदीं गोड. फार काय, पण खलाशी म्हणजे आकाशांतला देव, निदान देवदूत असें त्याला वाटत होतें. मुलगा लहान पडला आणि सफरीचें काम फार धोक्याचें; यास्तव ग्यारीबाल्डीचा बाप त्याच्याबरोबर प्रथम प्रथम जात असे; परंतु लवकरच तो स्वतंत्रपणें समुद्रावर जाऊं लागला. ग्यारीबाल्डी हा सुमारें २२ वर्षांचा झाला, त्या वेळीं त्यानें कॉरटेसी नांवाच्या एका जहाजावर दुय्यम कप्तानाची नोकरी धरली. नोकरी करीत असतां पहिल्या पहिल्या सफरींत तर त्याजवर पुष्कळच संकटें आलीं. भूमध्यसमुद्रांत तो एकवेळ प्रवास करीत असतां फार जोराचें वादळ झालें. त्याच्या बरोबरचें दुसरें एक जहाज खडकावर आपटून फुटलेंहि. खुद्द त्याचें जहाज मात्र मोठ्या शर्थीनें वांचलें. ग्यारीबाल्डीच्या बऱ्याच सफरी

भूमध्यसमुद्रांत, काळ्या समुद्रांत व विशेषतः ग्रीस देशाच्या किनाऱ्याकडे झाल्या. त्या काळीं या समुद्रांवर चांचेलोकांचा फारच सुळसुळाट असे. त्यांच्या तावडींत ग्यारीबाल्डी हा तीन वेळां सांपडला होता. पहिल्या खेपेस तर त्याची फारच दुर्दशा झाली. एके दिवशीं माटापानचे भूशिरापाशीं असतांना चांचे लोकांची अकस्मात् गांठ पडून, त्यांनीं ग्यारीबाल्डीचें जहाजच्या जहाज लुटलें, पोटांत भूक पेटली आहे, पायांत बूटसुद्धां राहिला नाहीं, अशा स्थितींत तो एकदांचा कसा तरी जमिनीला लागला. नंतर सुदैवानें एका इंग्लिश सद्गृहस्थाची व त्याची गांठ पडली. त्याचे साहाय्यानें ग्यारीबाल्डी फिरून नाईस गांवीं परत आला. असे प्रसंग एक का दोन म्हणून सांगावे? टक्के-टोणपे खाऊनच माणसास शहाणपण येतें म्हणतात, त्याप्रमाणें ग्यारीबाल्डीनें लहानपणच्या सफरींत अनेक संकटें सोसलीं खरीं, परंतु त्यामुळें त्याच्या अंगीं साहस, धैर्य व शहाणपण हे गुण चांगलेच आले. त्याहूनहि विशेष फायदा असा झाला कीं, त्याचे अंगीं स्वातंत्र्यप्रियतेचें एक प्रकारचें वारेंहि खेळूं लागलें. अशा रीतीनें आपल्या वयाचीं पहिलीं २५-२६ वर्षें ग्यारीबाल्डीनें बाळपणच्या लीला व तरुणपणचे स्वेच्छाचार करण्यांत घालविलीं. या संथ व निर्मळ आयुष्याच्या प्रवाहांत पुढें त्याचेच हातून घडून येणाऱ्या प्रचंड देशकार्याची छाया पूर्वीं कधींहि पडली नव्हती. उन्हाळ्यांतील एखादे दिवशीं सायंकाळीं प्रचंड वादळ व्हावयाचें असून, त्याची सामुग्री हळूहळू दिवसभर जमत असते, तथापि प्रातःकाळच्या स्वच्छ आभाळांत त्याचा मागमूस तरी दिसतो काय? किंवा आपल्या मुखाजवळ प्रतिसमुद्राचें स्वरूप धारण करून व शेंकडों प्रवाह-बाहूंनीं समुद्राला कवटाळून, आपल्या ओघाचे जोरानें खारें पाणी कित्येक कोसपर्यंत मागें हटविणाऱ्या सिंधुनदाचें किंवा गंगानदीचें पात्र जर उगमाजवळच पाहिलें, तर त्यांच्या मुखाजवळच्या पराक्रमाची कोणास कधीं तरी कल्पना येईल काय? ग्यारीबाल्डीच्या बाळपणचीहि गोष्ट अशीच होती.

भाग २ रा

स्वदेशाभिमानाचा संचार

एकेनापि सुपुत्रेण सिंही स्वपिति निर्भयं।
सदैव दशभिः पुत्रैर्भारं वहति रासभी ॥ १ ॥

—सुभाषित

स्वदेशभक्ति अंगीं येण्याला शिक्षण मिळावें लागतें असें कित्येकांचें मत आहे, परंतु हें अगदीं चुकीचें म्हणावें लागतें. स्वातंत्र्यप्रियता किंवा स्वदेभभक्ति हे गुण अंगीं उपजतच असावे लागतात. हे गुण जातीचेच असतील तर शिक्षणाचे योगानें त्यांना उज्ज्वलता किंवा दीप्ति येईल, परंतु ते नसतील तर कितीहि शिक्षण दिलें तरी तें अळवावरच्या पाण्यासारखें व्यर्थ होय. एवढेंच नव्हे, तर स्वार्थपरायण व स्वदेशप्रीतीशून्य माणसाचें शिक्षण हें माकडाचे हातांतील कोलतीप्रमाणें, केवळ देशाच्या नाशास व अनर्थास कारणीभूत होतें. दुसरे पक्षी पाहतां शिक्षणाचा गंधहि नसतां कित्येक महात्मे केवळ आपल्या देशभक्तीचे जोरावरच नांवारूपास येऊन, विद्वत्तेनें कधीं साध्य न होणारीं अशीं कृत्यें त्यांनीं केल्याचीं उदाहरणें जगाचे इतिहासांत किती तरी सांपडतील ? ग्यारीबाल्डीचें चरित्रहि अशाच उदाहरणांपैकीं एक नमुनेदार प्रमुख उदाहरण म्हणून मनन करण्यासारखें आहे.

आपल्या वयाचे २६।२७ वे वर्षापर्यंत ग्यारीबाल्डीला स्वदेश खरोखर कोणत्या स्थितींत आहे व ही स्थिति सुधारण्याला काय उपाय योजिले पाहिजेत याची कल्पनाहि नव्हती. तथापि एका गोष्टीबद्दल त्याची पुरी खात्री होऊन राहिली होती. ती ही कीं, आपला देश परकीयांचे म्हणजे ऑस्ट्रियन लोकांचे ताब्यांत गेलेला असून त्याचें पूर्वीचें सर्व वैभव नष्ट झालेलें आहे. जिकडे पाहावी तिकडे बेबंदशाही माजलेली, राज्याबाहेर समुद्रावर जावें तर दुष्ट जुलुमी चांचेलोक प्रवाशांना खुशाल लुबाडून घेऊन अनन्वित कृत्यें करीत, व प्रजेच्या संरक्षणाचा पत्कर घेतलेल्या राज्यकर्त्यांचे हातून त्यांचा मुळींच प्रतिकार होत नसे. राज्यांत पाहावें तर रयतेच्या तोंडावर तेज नाहीं. झाडावर रोग पडावा तसा प्रकार पारतंत्र्यानें प्रजेचा झालेला. राज्याधिकाऱ्यांच्या करड्या अंमलामुळें शहरांना व खेड्यांना तुरुंगांचें स्वरूप आलें होतें. अज्ञानाचा अंधःकार

चहूंकडे दाट पसरला होता. अभिमानाचा तर मागमूसहि नाहीं व स्वदेशप्रीतीची एखादी ठिणगी कोठें कधीं लकाकलीच, तर आसमंतात् दाही दिशांना माजलेल्या औदासीन्यरूपी अंधःकाराचे योगानें निराशा ही मात्र एखाद्या भुयाराप्रमाणें भयाण दिसे. जुलमी राजांच्या कडक अमलामुळें वर्तमानपत्रें सर्रास चालत नसत. विचारस्वातंत्र्य तर अगदींच नव्हतें. यामुळें जिकडे पाहावें तिकडे अज्ञान व भ्रम माजलेला. लोकमत बनण्यास चांगलीं साधनें मुळींच नव्हतीं. तथापि आगीवर माती लोटली असतां फार तर ज्वाला दबतात पण धूर येतच असतो, अंतर्यामीं निखारे पिचत असतात हें मात्र तो दर्शवितो, त्याचप्रमाणें मुद्रणस्वातंत्र्य नष्ट झालें होतें, तरी त्या स्थितीमध्येंहि किंचित् विचार करणाऱ्या माणसाला असें तेव्हांच कळून येत असे कीं, प्रजा व राज्यकर्ते यांजमध्यें पराकाष्ठेचा बेबनाव झालेला असून तो क्षणोक्षणीं कमी न होतां उलटा वाढतच जात आहे. राजांनीं मनस्वितेनें व अधिकारमदानें धुंद होऊन कडक कायदे करावे व त्यांचा अंमल सक्तीनें चालवावा; आणि इकडे प्रजेच्या मनांत असंतोष अधिकाधिक धुमसत जाऊन, नाइलाजास्तव बेफामपणानें बंडें करण्यास त्यांनीं प्रवृत्त व्हावें अशा तऱ्हेची लोकस्थिति लपवून कशी लपणार? प्रख्यात इंग्लिश कवि लॉर्ड बायरन यानें इटलीसंबंधीं खालील उद्गार काढले आहेतः—'काय सांगावें? या हतभागी देशावर हल्लीं जो जुलूम चाललेला आहे त्याचें नुसतें वर्णन करण्यास कोण समर्थ आहे? आज हजारों लोक या जुलमी राजांनीं पकडून तुरुंगांत टाकले आहेत, हजारों देशोधडीला लाविले आहेत, व हजारों, त्यांच्यावर कोणत्याहि तऱ्हेचा आरोप न ठेवितां किंवा कोणत्याहि रीतीनें त्यांचा इन्साफ न करतां बंदींत टाकले आहेत! मोठमोठीं कुळें व घराणीं सफई उध्वस्त झालेलीं आहेत! कोण हे नीच राजे! त्यांचा एकदां नाश तरी होऊं द्या, कीं पाहा इटली देश फिरून पूर्वीप्रमाणें तरतरीत व टवटवीत होईल! ज्या या हतभागी देशानें आजपर्यंत दुःखाचे व निराशेचे सुस्कारे टाकीत कैक शतकें घालविलीं त्याचा उद्धार करायला आज जी काय किंमत पडेल ती थोडी आहे! या देशाच्या दुर्दैवी प्रजेनें एक हजार वर्षेंपर्यंत आशातंतूवर आपला जीव धरून ठेविला मग आम्हांलाहि तशीच सदाशा कां वाटूं नये? इटली देशाचें नष्ट स्वातंत्र्य व वैभव फिरून मिळवून देणें हा केवढा स्तुत्य व उदात्त हेतु आहे! अवघ्या इतिहासाच्या नीरस कथानकांत गोड काव्य असें काय तें एवढेंच आहे असें मी समजतों!'

देशाची ही शोचनीय स्थिति हळूहळू ग्यारीबाल्डीस समजूं लागली व तिजबद्दल त्याच्या मनांत अत्यंत क्रोधहि येऊं लागला! परंतु त्या क्रोधाला बाहेर पडण्यास कोठेंहि वाव मिळे ना; व स्वदेशाच्या स्थितीबद्दल खरी माहिती मिळविण्याचें काम त्याजकडून अहोरात्र चाललेलें असल्यामुळें, त्याच्या मनांतील क्रोधाग्नीला दिवसेंदिवस अधिकाधिक पुष्टीच मिळत चालली होती. यासंबंधानें खुद्द ग्यारीबाल्डीनें खालील उद्गार आपल्या 'आत्मचरित्रां'त लिहून ठेविले आहेत. 'अगदीं बाळपणापासूनच स्वदेशप्रीति माझे हृदयांत बेफाम वाढली होती. देशांत येऊन जुलूम करणारे जे परकीय राजे त्यांच्याविषयीं पराकाष्ठेचा क्रोधाग्नि माझें हृदयांत अगदीं जळजळत असे. अशा स्थितींत माझ्या देशाची मुक्तता करण्याकरितां कांहीं गुप्त कट चाललेले होते, त्यांजमध्यें शिरावें अशी माझ्या मनांत नेहमीं उत्कंठा लागलेली होती. तो हेतु सिद्धीस नेण्यास प्रथम इटलीच्या भावी स्वातंत्र्याविषयीं जें जें काय कोठें लिहिलेलें असेल, तें तें सर्व हुडकून काढून वाचण्याचा व त्याचप्रमाणें ज्या स्वदेशबांधवांनीं या महत्कृत्यास आपलें जीवित अर्पण केलें होतें अशांची ओळख व मैत्री संपादण्याचा दीर्घ उद्योग मीं चालविला. या मार्गांत असतां एके प्रसंगीं मी 'टॅगन् रॉक'कडे जहाजांतून सफरीस गेलों होतों, तिकडे जिनोआ येथील एका स्वदेशाभिमानी पुरुषाची व माझी अवचित् गांठ पडली. त्यानें स्वदेशमुक्ततेविषयीं कांहीं लोकांचे गुप्त प्रयत्न कोठपर्यंत आले होते तें मला सांगितलें. तें ऐकतांच मला झालेला आनंद माझ्या हृदयांत मावेना. आपल्या देशाची सोडवणूक करण्याकरितां कंबर बांधून तयार झालेला असा एक माझा देशबांधव मला आज मिळाला, या विचारानें मला जो हर्ष झाला त्याच्यापुढें एक सबंध नवीन जगच्या जग हुडकून काढलेल्या कोलंबसाचा हर्ष तुच्छ आहे असें मला वाटलें! पुढें लवकरच दुसरे एके प्रसंगीं बॅरॉल्ट या नांवाच्या एका बाणेदार व शूर देशभक्ताची व ग्यारीबाल्डीची कॉन्स्टॅन्टिनोपलला जातांना वाटेंत जहाजावर अवचित् गांठ पडली. दोघांचेहि मनांत स्वदेशाविषयीं सारखीच प्रेरणा झाली असल्यामुळें त्यांची तेव्हांच परस्परांशीं मैत्री जमली. आजपर्यंत ग्यारीबाल्डीचे मनांत फक्त इटलीपुरत्याच कल्पना होत्या, परंतु बॅरॉल्ट यानें निरनिराळे इतिहास सांगितल्यामुळें त्याचे मनांत इटलीमधीलच्यशा काय परंतु जगाचे पाठीवर सर्व ठिकाणीं असणाऱ्या जुलुमाबद्दल. अत्यंत तिटकारा व द्वेष उत्पन्न झाला.

आपल्या देशापुरतें लढण्याचें काम एखादा यःकश्चित् पगारी शिपाईहि करितो. परंतु जो खरा वीर म्हणून असेल त्यानें पृथ्वीवर कोठेंहि अन्याय अगर जुलूम चालला असेल त्याविरुद्ध लढण्यास तेथें धांव घेतली पाहिजे असें त्याला वाटूं लागलें. आजपर्यंत जहाज म्हणजे निव्वळ व्यापाराचें किंवा सफरींचें साधन इतकीच त्याची कल्पना होती. ती विस्तृत होऊन त्याला तेंच जहाज म्हणजे, मनुष्यकृत अन्यायांविरुद्ध खुद्द ईश्वराची हुकमतच अवतरली आहे कीं काय, असें वाटूं लागलें. न्यायाची संस्थापना करणारी ईश्वराची तरवार हातांत धरून पृथ्वीवर अवतरणारा असा एक देवदूतच मी आहें असेंहि त्याला भासूं लागलें. आजपर्यंत केवळ व्यापाराच्या दृष्टीनें पृथ्वीचें तो निरीक्षण करीत असे, तेव्हां त्याची नजर अगदीं कोती होती. परंतु जुलूम व अन्याय यांजवर मोहीम करण्याचा निश्चय मनांत झाल्याबरोबर त्याची तीच दृष्टि जणूं काय एकदम फांकली; व आजपर्यंत कधींहि न पाहिलेलीं दूरदूरचीं क्षितिजें, एवढेंच काय, परंतु भविष्यकाळीं स्वदेशांत घडून येणारे जे अनेक चमत्कारिक युद्धप्रसंग, तेहि धुक्यांतून पाहिल्याप्रमाणें आपणास अंधुक अंधुक दिसूं लागले कीं काय, असेंहि त्याला वाटूं लागलें. कर्मधर्मसंयोगानें त्याच्यासारख्या मनःप्रवृत्तीचे सोबतीहि त्याला लवकरच भेटले. पंढरीच्या वारीला जाण्याचा मनांत निश्चय करून वारकरी अगदीं एकटा जरी दूरच्या प्रवासाला निघाला, तरी थोड्याच वेळानें वाटेंत त्याला पुष्कळ सोबती भेटूं लागतात व माळेनें माळ पाहिली कीं, मैत्री जमलीच! तोच प्रकार देशभक्तांचा आहे. स्वदेशप्रीतीची खूण जरी सप्तपाताळाइतक्या खोल हृदयांत गुप्त राहिली असली, तरी दूर दूर निराळ्या असणाऱ्या देशभक्तांचीं हृदयें लोहचुंबकाप्रमाणें ओढ घेऊन, एकमेकांस ओळखून काढतात. ग्यारीबाल्डीचीदेखील अशीच स्थिति झाली. जगाचे इतिहास सांगणाऱ्या बॅरॉल्टनें खुद्द इटली देशांतच एक मॅझिनी नांवाचा देशभक्त वास्तव्य करीत आहे असें ग्यारीबाल्डीला सांगितलें होतें, व त्याचें मन या अदृष्टपूर्व मॅझिनीकडे एकदम इतकें ओढलें होतें कीं, त्यास केव्हां एकदांचा पाहीन असें त्याला झालें होतें. वास्तव तो लवकरच त्याच्या शोधाकरितां मार्सेलिसला निघून गेला. दोघांचीहि गांठ पडली व त्यांच्या पहिल्याच भेटींत त्यांनीं एकमेकांची मैत्री संपादिली. येवढेंच नव्हे तर, पुढें देशोद्धाराचे कामीं दोघांनीं मिळून काय काय करावयाचें याबद्दलचे बेतहि त्यांनीं ठरवून टाकले.

पुढें ग्यारीबाल्डी हा मॅझिनीचे लेख मनःपूर्वक वाचूं लागला; तेव्हां त्याला त्यांत अस्सल स्वदेशाभिमान व स्वदेशप्रीति थबथबून भरलेली असल्याचें दिसून आलें!! मॅझिनीची भाषा अत्यंत आवेशयुक्त व जोरदार असे. यामुळें ते लेख, म्हणजे प्रत्यक्ष ईश्वरानें पृथ्वीवर अवतरून सांगितलेलें शुभवर्तमानच कीं काय, असें त्याला वाटूं लागलें. ग्यारीबाल्डीच्या पुढील सर्व आयुष्याच्या क्रमाचा पाया तारुण्याच्या या थोड्या दिवसांतच रचला गेला. आपल्या हतभागी देशाकरितां लढाई करण्यास प्रवृत्त झालेला असा इटलींत मीं एकटा एकच नसून, माझ्याप्रमाणें इतरहि कांहीं लोक तयार आहेत, असें पाहतांच ग्यारीबाल्डीचे हृदयांतील प्रेरणेस अधिकच दीप्ति आली. सर्व राष्ट्राची एकवटलेली मनोवृत्ति व जोर हीं आपल्या मनगटांत आलीं कीं काय, असें त्याला वाटूं लागलें. मॅझिनीसारख्या लेखकाचे लेख वाचून त्याची अंतरदृष्टि विशाल व सतेज झाली, व स्वदेशाची मुक्तता करण्याकरितां अवतार घेतल्याप्रमाणें त्याचे अंगांत संचार झाला. असो. मॅझिनी हा कोण होता, मॅझिनी आणि ग्यारीबाल्डी त्यांच्यासारख्या मनःप्रवृत्तींचे लोक त्या वेळीं इटलींत आणखी कोण कोण होते, त्यांनीं पारतंत्र्याच्या बळकट किल्ल्यांचे तटबंदीखालीं गुप्तपणें सुरंग कसे लाविले, व पुढें सुमारें पन्नास वर्षेंपर्यंत इटली देश संयुक्त व स्वतंत्र करण्याकरितां तिच्या सुपुत्रांनीं जें निकराचें तुंबळ रण लवकरच माजविलें त्याची पहिली सरबत्ती कशी उडाली, याचा वृत्तान्त पुढील एक दोन भागांत संक्षिप्तपणें सांगण्याचा विचार आहे.

भाग तिसरा

गुप्त मंडळ्या, बंडाळी व छळ

प्रजापीडनसंतापात्समुद्भूतो हुताशनः।
राज्ञःकुलं श्रियंप्राणान् न दग्ध्वा विनिवर्तते ॥

वॉटरलूचे लढाईंत नेपोलियन बोनापार्टाचा पराभव करून युरोपांतील सर्व राष्ट्रांनीं युद्धांतील लूट वांटून घेऊन पुढें युरोपांत शांतता राखण्यास काय उपाय करावा याचा विचार करण्याकरितां व्हिएन्नास एक सभा भरविली. त्या सभेंत झालेल्या तहाच्या योगानें इटली देश कायमचा ऑस्ट्रियाचे ताब्यांत

गेला. या वेळीं इटली या नांवाखालीं मोडणाऱ्या प्रदेशाचें क्षेत्रफळ पुरें एक लक्ष चौरसमैलसुद्धां नव्हतें. म्हणजे या वेळचा इटली देश हिंदुस्थानांतील हल्लींचा मध्यप्रांत किंवा हैदराबादच्या निझामचें राज्य, यापेक्षां फार तर किंचित् मोठा होता. या वेळीं त्याची लोकसंख्या पुरी दोन कोटी म्हणजे हल्लींच्या पंजाबच्या लोकसंख्येइतकीहि नव्हती. असें असतां इटली देशाचे त्या वेळीं १० भाग झालेले असून त्यांवर तितकीं निरनिराळीं स्वतंत्र राज्यें होतीं. परंतु बहुतेक राजे ऑस्ट्रिया किंवा फ्रान्स यांच्या मदतीच्या जोरावर व त्यांच्या हुकमतीनें कळसूत्री बाहुल्यांप्रमाणें नाचून प्रजेवर जुलूम करीत होते. कांहीं आपल्याच तंत्रानें राज्य चालवीत असत; परंतु ते कमी जुलमी होते असें मात्र नाहीं. अवघा इटली देश इतक्या नीच स्थितीला आला होता कीं, त्यामध्यें अज्ञानाचा अंधःकार अमावास्येप्रमाणें जिकडे तिकडे पडला होता. आळस, भ्याडपणा, लाचलुचपत, धर्मभोळेपणा, कलह, हेवादेवा व असत्यप्रियता इत्यादि अनेक दुर्गुण केवळ परकीयांच्या कडक अमलाखालीं अनेक वर्षें गेल्यामुळें सर्व देशभर भरून राहिले होते. दोन तीन शतकेंपर्यंत इटली देशावर निरनिराळे परकी राजे होऊन गेल्यामुळें लोकांच्या अंगीं आधींच असलेल्या दुर्गुणांत पारतंत्र्याच्या विशेष दुर्गुणांची भर पडली होती. प्रजेला राज्यकाभारामध्यें चिलकूल अधिकार नसल्यामुळें तिचें सर्व लक्ष दुर्गुणांचें परिपोषण करण्याकडे लागलें होतें. वास्तविक इटलीमध्यें या सुमारास कांहीं वर्षेंपर्यंत जितकी शांतता होती तितकी शांतता त्यापूर्वीं कित्येक शतकेंपर्यंतहि नव्हती हें खरें. परंतु ती शांतता हितकारक नसून केवळ परकीय व स्वदेशी जुलमी राजे यांचे कडक अमलामुळें व लोकांचे अंगीं आलेल्या क्षीणतेमुळें उत्पन्न झालेली होती. म्हणून ज्याप्रमाणें अष्टौप्रहर दाट सावली पडत असलेल्या दलदलीचे जागीं केवळ कर्दमच माजतो व तेथें विषारी वनस्पती व कृमीच उत्पन्न होतात, चांगल्या जातीचें झाड पोसत नाहीं, त्याचप्रमाणें इटली देशामध्यें या काळच्या अशा प्रकारच्या शांततेमुळें दुर्गुणांची वाढ मात्र पराकाष्ठेची होऊन लोक हीन, दीन, निस्तेज व निंद्य होऊन राहिले होते. परंतु अशी स्थिति असतांहि इटलीमध्यें पुढें कांहीं वीर, कांहीं मुत्सद्दी व कांहीं देशभक्त असे निपजले कीं, त्यांनीं आपल्या उद्योगानें व उदाहरणानें सर्व इटली देशाचें रूपचें रूप बदलून टाकलें. जेथें स्वतंत्रेला कोठेंहि थारा मिळत नव्हता,

दुर्गुणांचें दाट जंगल माजून राहिलें होतें, व स्वदेशप्रेमाचा झरा पार आटून गेला होता अशा शुष्क व रूक्ष वनाचा त्यांनीं थोडक्याच काळांत असा सुंदर बगिचा बनवून दिला कीं. त्या ठिकाणीं शक्ति, नीति, शांति, संपत्ति, विद्वता, रसिकता वगैरे आपल्या सर्व सख्यांसह स्वतंत्रतादेवी परत येऊन तिनें कालांतरानें तें आपलें क्रीडास्थान केलें. म्हणूनच 'इटलीचें पुनरुज्जीवन' हा युरोप खंडाचे इतिहासांतील भाग एखाद्या कादंबरींतील अद्भुत व रमणीय कथानकाप्रमाणें मनोवेधक झाला आहे. हा कथाभाग कसा घडून आला, याचें मूळ बीज कोठें आहे, असें हुडकीत गेलों असतां आपणांस असें दिसून येईल कीं, ज्या गोष्टींमुळें इटली देशाची दुर्दशा झाली होती त्याच गोष्टी मधून इटलीचें पुनरुज्जीवन होण्याचेंहि कारण निघालें होतें. इटली देशास परकीयांच्या जुलुमानें दुर्दशा प्राप्त झाली पण त्याच जुलुमावर पुष्ट झालेला जो इटलीच्या कांहीं सुपुत्रांचा द्वेषाग्नि त्यानेंच पुढें त्या परकीयांचा बळी घेतला. ऑस्ट्रिया व फ्रान्स यांचे साहाय्यावर इटलींतील स्वदेशी राजांच्या जुलुमाचीं पहिलीं कांहीं वर्षें कोठें कांहीं गडबड न होतां निवांतपणें गेलीं खरीं, परंतु पुढें लवकरच लोकांचे मनांत असंतोष व अस्वस्थता हीं उत्पन्न झालीं. दहा लोकांचे मनांत एकच विचार आल्यावर ते तो एकमेकांपाशीं व्यक्त करणारच. मग त्यांच्या तोंडांस कुलुपें घातलीं, किंवा त्यांस भक्कम तुरुंगांत निरनिराळ्या खोल्यांमध्यें बिड्या घालून ठेविलें, तरी ते एकमेकांस कळल्याशिवाय कधींहि राहात नाहींत. ज्या वेळीं विचार व्यक्त करण्याचीं इतर सर्व बाह्यद्वारें बंद होतात, त्या वेळीं मानवी प्राण्यांच्या मनामध्यें परस्पर गुप्त भाषण करण्याची जी एक शक्ति आहे ती प्रकट होते. समाजांत किंचित् अस्वस्थता उत्पन्न होतांच जुलुमी राजांनीं इटालियन लोकांच्या पारतंत्र्याच्या दोऱ्या अधिकच आवळण्यास सुरुवात केली. या शतकाचे प्रारंभीं इटली देशांत मुद्रणस्वातंत्र्य फारच थोडें होतें व जें काय थोडें होतें तें सुद्धां लोकांत असंतोषाचीं चिन्हें दिसूं लागतांच या राजांनीं एकदम हिरावून घेतलें. परंतु याचा परिणाम राजांच्या इच्छेप्रमाणें न होतां, त्याचे योगानें असंतोष मात्र उलट अधिकच फैलावूं लागला. जिकडे तिकडे गुप्त पत्रव्यवहार, वर्तमानपत्रांचा गुप्तप्रसार व गुप्त मंडळ्या सुरू झाल्या. लहान मोठीं बंडें होऊं लागलीं, व प्रत्येक बंडागणिक राजांचा जुलूम दसपट वाढूं लागला. होतां होतां दोन दिवस बंडवाल्यांचे, तर दोन दिवस

राजांचे व पुन्हा दोन दिवस बंडवाल्यांचे, अशा क्रमानें सर्व इटली देशचे लोक बंडखोर बनले; शेवटीं लोकपक्षाला किंचित् अनुकूल असलेल्या एका राजानें पुढें सरसावून व त्यांचें पुढारीपण घेऊन इटली देश परकीयांचे जुलमापासून सोडविला, व स्वराज्य स्थापित केलें.

वर ज्या गुप्त मंडळ्या म्हणून सांगितल्या त्यांपैकीं प्रमुख म्हटली म्हणजे 'कारबोनेरी' या नांवाची गुप्त मंडळी ही होय. नेपोलियन बोनापार्टनें ज्या वेळीं इटली देश जिंकून आपल्या सरदारांच्या स्वाधीन केला त्या वेळेपासूनच ही मंडळी अस्तित्वांत आलेली होती. या मंडळीचा उत्पादक, निदान मुख्य पुरस्कर्ता, मालघेला या नांवाचा एक इटालियन देशभक्त होता. इ. स. १८१५ सालीं व्हिएन्नाच्या तहानें इटली ऑस्ट्रियाचे ताब्यांत गेल्याबरोबर ऑस्ट्रियन अधिकाऱ्यांनीं मालघेलास पकडून सार्डीनियन सरकारच्या स्वाधीन केलें व त्यांनीं त्यास तुरुंगांत टाकिलें. तथापि कारबोनेरीमंडळीचा पंथ इतका वाढला कीं, इटलींतील सर्व भागांत हजारों कारबोनेरी कटवाले थोडक्याच काळांत उत्पन्न झाले. या मंडळीचा नाश करण्याकरितां प्रिन्स ऑफ क्यानोझा या नांवाच्या पोलिसखात्याच्या मुख्य अधिकाऱ्यानें दुसरी एक मंडळी उलट स्थापन केली. तिजमध्यें सर्व तऱ्हेचे बदमाष, उडाणटप्पू, दरवडेखोर व तुरुंगवास भोगून बाहेर पडलेले अपराधी सामील केले. सरकारकडून त्यांस बंदुका वगैरे सामानहि पुरविण्यांत आलें. अर्थात् अशा लोकांचे हातीं काम गेल्यामुळें कारबोनेरी पक्ष नाहींसा करण्याच्या मिषानें या बदमाषांच्या सैन्यानें नाहीं नाहीं ते भयंकर अत्याचार केले. परंतु त्या योगानें कारबोनेरी मंडळीचा नाश न होतां उलट तिचे अनुयायी लोकांत जास्तच एकी झाली. आपल्यासंबंधानें ते अधिक गुप्तपणा राखूं लागले. हळूहळू या मंडळीचा प्रसार वाढत चालला. प्रथम पिडमांट, नंतर नेपल्स व पुढें पोपच्या राज्यांत सर्वत्र त्यांचा शिरकाव होऊन तेथून सर्व इटलीभर त्यांचा फैलाव झाला. या मंडळीच्या निशाणाची खूण जंबिया ही होती व तिचा सभासद होण्यास एक प्रकारचा विधि करावा लागत असे. कारबोनेरी पंथाची लोकप्रियता लवकरच इतकी वाढली कीं, सरकारी लष्करांतील कित्येक पलटणींच्या पलटणींनीं तो पंथ स्वीकारला व वाटेल तेव्हां उघड बंड करण्यास त्यांच्या मनाची तयारी झालेली होती.

कारबोनेरी पक्षाचें पहिलें बंड नेपल्समध्यें झालें. या बंडवाल्यांविरुद्ध नेपल्सच्या राजानें दोन सरदारांच्या हाताखालीं सैन्य देऊन पाठविलें. हें सैन्य व कारबोनेरी

लोक समोरासमोर आले मात्र, पण या सैन्यानें कारबोनेरी पक्षाच्या निशाणा-वरची खूण पाहतांच त्यांचेविरुद्ध लढण्याचें नाकरिलें. इतकेंच नव्हे तर उलट त्यांनाच जाऊन मिळण्याची त्यांची उत्कट इच्छा दिसूं लागली. तेव्हां त्या सरदारांस मुकाट्यानें सैन्य परतवून नेपल्सला नेणें भाग पडलें. शेवटीं फर्डीनंड राजास कारबोनेरी मंडळीचें म्हणणें कबूल करावें लागलें. १८२० सालच्या जुलई महिन्याचे १३ वे तारखेस फर्डीनंड राजानें देवाच्या मंदिरांत जाऊन शपथ घेऊन कारबोनेरी मंडळीचे म्हणण्याप्रमाणें प्रजेच्यातर्फे एक पार्लमेंट नेमून तिचा अधिकार कबूल केला. फार काय फर्डीनंड व त्याची प्रजा यांमध्यें असाही तह झाला कीं, राजानें प्रजेची परवानगी घेतल्याशिवाय संस्थानच्या बाहेरहि जाऊं नये. तेथून इटलींतील धामधुमीस खरी सुरुवात झाली.

यानंतरचें बंड म्हटलें म्हणजे सिसिलीमध्यें झालें. या बंडास प्रेरणा करण्या-सहि कारबोनेरी मंडळीच अप्रत्यक्ष रीतीनें कारणीभूत झाली. अशीं हीं दोन बंडें एकामागून एक होतांच युरोपांतील प्रमुख राष्ट्रें बरींच घाबरलीं. ही बंडाची लाट आतां युरोपभर पसरून सर्व ठिकाणीं राजसत्ता बुडवून टाकते कीं काय, अशी त्यांस भीति पडून लेब्यांक येथें त्यांनीं आपली एक सभा भरविली. या सभेस आलेल्या प्रतिनिधींपैकीं ऑस्ट्रियाचा राजा प्रमुख असून, प्रशिया, रशिया वगैरे राष्ट्रांचेहि प्रतिनिधि आले होते. सभेकडून नेपल्सचा राजा फर्डीनंड यासहि आमंत्रण गेलें होतें; परंतु वर सांगितल्याप्रमाणें प्रजेची परवानगी घेतल्याशिवाय राज्याची सीमा सोडून राजानें जावयाचें नाहीं असा करार झाला असल्यामुळें त्याला जातां येईना. तेव्हां आपण सभेस गेलों असतां प्रजेला पूर्वी दिलेले अधिकार कायमच करूं, असें वचन लोकांस देऊन त्यानें सभेस जाण्याची एकदांची परवानगी मिळविली. परंतु सभेस गेल्यावर फर्डीनंडची बुद्धि फिरली व त्यानें इतर राष्ट्रांचें म्हणणें निमूट-पणें कबूल केलें. सभेमध्यें असें ठरलें कीं, ऑस्ट्रियन सैन्य मदतीला घेऊन फर्डीनंड राजानें नेपल्स व सिसिली येथील बंडें मोडावीं व नंतर कांहीं दिवस शांतता राखण्याकरितां तें सैन्य आपल्या राज्यांत ठेवून घ्यावें. या ठरावाप्रमाणें फर्डीनंड हा ५०,००० ऑस्ट्रियन सैन्य घेऊन आपल्या प्रजेवर चालून आला! इकडे नेपल्समध्यें कारबोनेरी मंडळीच्या खटपटीमुळें पार्लमेंटनें लढाईशिवाय शरण जावयाचें नाहीं असा ठराव करून, पूर्वीच्या बंडांत पुढारी असलेला सरदार पेपी यास ८००० सैन्यानिशीं फर्डीनंडचे तोंडावर पाठविलें. दोन्ही

सैन्यांची लढाई झाली व त्यांत पेपीचा पराभव होऊन त्याचें सैन्य वाट फुटेल तिकडे पळालें.

फर्डीनंड पुन्हा एकवार सत्ताधीश झाल्यावर त्यानें बंडवाल्यांवर व विशेषतः कारबोनेरी मंडळीवर फारच भयंकर सूड घेतला. पहिली गोष्ट म्हणजे त्यानें लष्करी कायदा एकदम सुरू केला व बंडवाल्यांचा इनसाफ करण्यास एक स्वतंत्र कोर्ट नेमलें. या कोर्टानें १८२० सालचें बंडचसें काय परंतु १७९३ सालापासून प्रजेनें जास्त अधिकार मिळविण्याकरितां जी जी म्हणून बंडाळी केली होती, त्या सर्वांत सामील असलेले व नसलेलेहि लोक संशयावरून धरून आणले व त्यांना भराभर शिक्षा ठोठावल्या.

फांशी, तुरुंग, हद्दपारी या घोर शिक्षांचा वाटेल-तसा सरसकट उपयोग करून अशा रीतीनें सुमारें एक हजार लोक या कोर्टानें खपविले. शेंकडों अधिकाऱ्यांना त्यांचे अधिकार काढून घेऊन हाकून दिलें. या इतक्या लोकांपैकीं फारच थोडे लोक खरोखर बंडांत सामील होते. बाकीच्यांचा अपराध म्हटला म्हणजे त्यांचा लोकसत्तेकडे साधारणतः कल होता एवढाच काय तो. इतरांपेक्षां कारबोनेरी मंडळींवर राग विशेष, म्हणून कित्येक कारबोनेरी लोकांना गाढवांवर बसवून त्यांच्या धिंडका काढल्या, तर कित्येकांस खिळे लावलेल्या चाबकांनीं फोडून काढलें! त्या क्रूर छळवादाचे प्रकार एक का दोन म्हणून वर्णावे! परंतु या अशा भयंकर दिवसांतच निःसीम देशभक्तीचीं व स्वार्थत्यागाचीं कांहीं उदात्त उदाहरणें दिसून आलीं. त्यांचे योगानें समाजांत कांहीं वेळ जी भीति व निराशा उत्पन्न झाली होती ती नाहींशी होऊन उलट तिचे ठिकाणीं स्वदेशाकरितां हालअपेष्टा सोसण्यांत जी एक प्रकारची मौज असते तिचीच गोडी लोकांना लागून राहिली. याचा परिणाम असा झाला कीं, निरनिराळ्या ठिकाणीं पुन्हा भराभर बंडें उपस्थित झालीं.

नेपल्स येथील बंडाच्या पाठोपाठ पिडमांट येथें एक बंड झालें. त्या वेळीं पिडमांट येथें पहिला व्हिक्टर-ए-मॅन्युएल राजा राज्य करीत होता. या वेळच्या इटलींतील सर्व संस्थानांमध्यें पिडमांट येथील राज्य कमी जुलमी होतें. या राज्यांत दोन पक्ष होते. एकामध्यें उदार तत्त्वांवर राज्य चालावें असें म्हणणारी स्वातंत्र्यप्रिय मंडळी होती व दुसऱ्या पक्षामध्यें लष्करी कामगार, थोर घराण्यांतील उमराव, वगैरे अधिकारप्रिय लोक होते. परंतु दोन्हीहि पक्षांना

पिडमांटच्या राजानें ऑस्ट्रियाच्या तंत्रानें चालावें ही गोष्ट नापसंत होती. त्यांनीं राज्यपद्धतीच्या तत्त्वांचा एक नवीन मसुदा तयार केला. त्याचें धोरण राजपद नाहींसें करावें असें नसून फक्त कनिष्ठ व श्रेष्ठ वर्गाच्या प्रजाजनांस कांहीं अधिक सत्ता असावी इतकेंच होतें. व्हिक्टर-ए-मॅन्युएल यास तें मुळींच संमत नव्हतें; तथापि त्यानें प्रजेवर एकदम शस्त्र धरलें नाहीं. लोक कांहीं केल्या ऐकेनात तेव्हां मुकाट्यानें राज्य सोडून तो चालता झाला. त्याचे मागून त्याचा वारस चार्लस फेलिक्स हा गादीवर बसावयाचा, परंतु तो पिडमांट येथें त्या वेळीं हजर नव्हता. त्याचे गैरहजेरींत त्याचा जवळचा नातलग चार्लस आलबर्ट हा रीजंट या नात्यानें काम पाहत होता. त्यानें ॲलेक्झांड्रिया व ट्यूरीन येथें बंडें होतांच लोकांच्या मागण्या एकदम कबूल करून त्याप्रमाणें द्वाही फिरविली. परंतु चार्लस फेलिक्स यास तें करणें मुळींच आवडलें नाहीं. शिवाय लोकसत्तेची बंडाळी मोडण्याकरितां ऑस्ट्रिया त्यास हवी ती मदत करण्यास तयार होताच. तसेंच इटलीमध्यें शांतता राखण्याकरितां रशियानेंहि एक लाख सैन्य सज्ज केलें असून तें इटलीकडे यावयास निघालें अशीहि बातमी पसरली होती. यामुळें पिडमांट येथील बंडवाल्यांची बरीच निराशा झाली. तथापि कारबोनेरी पंथाचीं तत्त्वें, वरिष्ठ प्रतीचे लोक व तरुण कामदार यांजमध्यें फारच पसरलेलीं होतीं. पिडमांट येथील मोठमोठ्या कुलीन स्त्रियाहि कारबोनेरी मंडळीस सामील झाल्या असून काळीं, निळीं, तांबडीं अशीं निरनिराळ्या प्रकारचीं निशाणें कारबोनेरी पक्षाचे वतीनें त्यांनीं उभारलीं. बंडामुळें लोकांचे अंगांत संचारलेला त्वेष व अभिमान अद्याप जागृत होता. यामुळें बंडवाल्यांनीं आपलें सैन्य तर ऑस्ट्रियाचे तोंडावर पाठविलेंच, परंतु राजाचें लष्कर आपल्यास सामील होईल अशी जी त्यांस आशा होती ती अगदीं आयत्या वेळीं खोटी ठरल्यामुळें त्यांचा लढाईत पुरा मोड झाला. बंडवाल्यांचे पुढारी समुद्रावरून वाट सांपडेल तिकडे पळून गेले. यामुळें चार्लस फेलिक्स यास त्यांजवर सूड घेण्याची आपली तृषा प्रत्यक्ष शमवितां आली नाहीं, तथापि सर्व बंडवाल्यांना त्यांचे गैरहजेरींत फांशीची शिक्षा देऊन आपल्या हुकुमाचीं भेंडोळींच्या भेंडोळीं त्यानें चोहोंकडे पाठविलीं.

यानंतर कांहीं दिवसांनीं पोपच्या संस्थानांत एक बंड झालें. त्याचाहि लवकर मोड झाला. पार्मा येथेंहि एक बंड झालें; परंतु त्यासंबंधानें कांहीं विशेष

लिहिण्यासारखें नाहीं. यानंतरचें बंड मॉडिना या संस्थानांत झालें तें मात्र थोडेंसें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. या वेळीं म्हणजे १८३० ते ३१ चे सुमारास मॉडिना येथें फ्रान्सिस या नांवाचा ड्यूक राज्य करीत होता. त्यानें वेळोवेळीं आपल्या भाषणांनीं नवीन उदार तत्त्वांवर राज्य करण्याची पद्धति आपणास पसंत आहे असें लोकांस दर्शविलें होतें. त्यावर भरंवसा ठेवून सीरोमेनॉट्टी या नांवाच्या एका देशभक्तानें फ्रान्सिसच्या मदतीनें बंड करून सर्व इटली काबीज करण्याचा व मॉडिनाच्या छत्राखालीं स्वदेशी साम्राज्य करण्याचा धाडसी बेत केला; परंतु फ्रान्सिसचें बोलणें निवळ दिखाऊ असल्यामुळें मेनॉट्टीचे बंडाचा बेत राजाला कळला. हें बंड कांहीं अवधीनें व्हावयाचें होतें; परंतु फ्रान्सिसनें आपल्या गुप्त हेरांकडून बातमी काढून बंडाची पुरी तयारी होण्याचे आधींच एके दिवशीं संध्याकाळीं मेनॉट्टीच्या घरास वेढा देऊन त्यास एकदम पकडलें. लोक बिथरलेले होते यामुळें फ्रान्सिस हा स्वतः भयानें पळून गेला. मात्र त्यानें सिरोमेनॉट्टीस आपलेबरोबर कैद करून नेऊन ऑस्ट्रियाचे स्वाधीन केलें. इकडे सहा हजार ऑस्ट्रियन फौज मॉडिनावर चालून आली त्यामुळें बंडवाले जिकडे तिकडे पळून गेले. जे सांपडले त्यांस धरून शिपायांनीं तुरुंगांत टाकलें. इतकें झाल्यावर फ्रान्सिस हा मॉडिनास परत आला. परत आल्यावर सीरोमेनॉट्टीस त्यानें फांशी दिलें. मेनॉट्टी हा त्या काळीं कट्टा देशभक्त म्हणून नांवाजलेला होता. त्याचे वधामुळें लोकांना फार हळहळ वाटली. मेनॉट्टीनें फ्रान्सिसचा पूर्वी एक वेळ प्राण वांचविलेला होता. असें असतांहि फ्रान्सिसनें त्याचा फार अपमान व हाल केले. इतकेंच काय, परंतु मरणाचे दिवशीं सकाळीं मेनॉट्टीनें आपल्या बायकोस शेवटल्या निरोपाचें एक पत्र लिहिलें होतें तेंहि त्या नीचानें वाटेंत पकडून अडकवून ठेविलें. कां तर त्या पत्रांत हे शब्द होते म्हणूनः—“ प्रिये, मी तर चाललोंच. परंतु माझ्या पश्चात् माझीं मुलें मोठीं झाल्यावर मी आपल्या देशावर किती प्रीति करीत होतों हें त्यांना तूं सांग!”

अशा रीतीनें कारबोनेरी मंडळीच्या प्रसारामुळें व शिकवणीमुळें इटलींत जीं लहान मोठीं बंडें झालीं त्या सर्वांचा ऑस्ट्रियानें आपल्या सैन्याचे जोरावर मोड केला. या बंडाच्या संबंधानें एक गोष्ट दिसून येते, ती ही कीं, कनिष्ठ प्रतीची प्रजा म्हणजे शेतकरी, उदमी व साधारणतः सर्व अशिक्षित लोक या बंडापासून अलिप्त असत. बंडवाले म्हटले म्हणजे बहुतेक सुशिक्षित लोक

असत. निदान पुढारी तरी सुशिक्षितांशिवाय दुसरे कोणी नव्हते. वास्तविक ही गोष्ट युरोपच्या इतिहासांतील सामान्य नियमास अनुसरूनच होती. कोणत्याहि देशांत ज्या कांहीं राजकीय चळवळी घडून येतात, त्यांस मध्यम प्रतीच्या व शिक्षण पावलेल्या अशा लोकांचा जो एक वर्ग असतो तोच प्रायः कारणीभूत होतो. श्रीमंत लोक बहुधा नेहमींच राज्यक्रांतीच्या विरुद्ध असतात. याचें कारण असें आहे कीं, तिजमुळें होणाऱ्या स्थित्यंतरानें त्यांस आपलें नुकसान होण्याची फार भीति वाटते. दुसरे पक्षीं अगदीं गरीब व कनिष्ठ वर्गाचें प्रजाजनहि राज्यक्रांतीला फारसे अनुकूल असत नाहींत. याचें कारण असें आहे कीं, राज्यक्रांतीचें खरें स्वरूप काय व ती झाली असतां आपली स्थिति कशी सुधारेल, याची त्यांस चांगलीशी कल्पना नसते. अशा रीतीनें अति श्रीमान् व अति गरीब लोक, यांचेकडून राज्यक्रांतीची प्रथम चळवळ कधींहि होत नाहीं. सर्व राज्यक्रांत्या मध्यम स्थितींतील सुशिक्षित लोकांकडूनच प्रथम घडून येतात. निदान त्यांच्या मूळ कल्पना तरी मध्यम वर्गांतील लोकांच्याच डोक्यांतून निघतात; व त्या कल्पना सिद्ध होण्यास जी एक शक्ति, जो एक जोम किंवा त्वेष राष्ट्राच्या अंगीं यावा लागतो, तो सर्व तेच उत्पन्न करतात.

वरील बंडांसंबंधानें दुसरी एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे, ती ही कीं, त्या बंडांत प्रत्यक्ष यश आलें नसल्यामुळें ती करणाऱ्या लोकांस तत्कालीन शिष्ट लोकांनीं मूर्खांत काढलें. ऑस्ट्रियाचा पाय इटलीमध्यें जो एकवेळ घुसला होता तो केवळ या बंडांमुळें कायमचाच घुसणार असेंच प्रथम प्रथम कांहीं वेळ लोकांस वाटलें. आपली शक्ति ती काय, आपण मूठभर माणसें, आपणांत एकी नाहीं, परक्यांचें साहाय्य व शत्रु अति प्रबळ, असें असतां अकालीं लहानसहान बंड करण्यास प्रवृत्त होणें म्हणजे आपल्या गळ्याशीं आधींच बसलेला दास्यत्वाचा फांस अधिक घट्ट करून घेणें होय, असें पुष्कळांचें त्या वेळीं म्हणणें होतें. तथापि आधीं सर्वांची एकी करून व सर्व राष्ट्र सुशिक्षित करून मग कोणतीहि गोष्ट करूं असें म्हणणाऱ्यास ती गोष्ट करण्याची वेळ कधींच येत नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. लहानसहान बंडें करण्यानें इटलींतील बंडवाल्यांचें व त्यांच्या अनुषंगानें इतर कांहीं लोकांचें जन्माचें नुकसान झालें हें खरें; परंतु इटली स्वतंत्र करण्यासारखें महत्कार्य अशा रीतीनें कांहीं थोडया लोकांनीं स्वार्थत्याग केल्याशिवाय

कधींहि साधलें नसतें. एकादी भव्य इमारत बांधावयाची असतां तिचें काम चारहि अंगांनीं एकदम सुरू करूं, म्हणजे पाया, भिंती, गच्च्या, शिखरें हीं सर्व एकदमच बांधावयास लागूं असें म्हणणें हा निवळ वेडेपणाच होय. एकाद्या इमारतीच्या भव्यतेस किंवा सौंदर्यास घुमट किंवा शिखरें जितकीं अवश्य आहेत तितक्या कदाचित् पायऱ्या नसतात, परंतु त्या पायऱ्याच शिखरांच्या आधीं घडवाव्या लागतात. राष्ट्रोत्कर्षाचें वेळीं पहिल्या पिढींत जे लोक जन्माला येतात त्यांना आपलीं शिरकमलें वाहून त्यांच्याच योगानें या पायऱ्या रचाव्या लागतात. राष्ट्रोदयाचें कामीं या पायऱ्या घडविणारांनीं जरी तत्कालीन लोकांच्या दृष्टीनें फारसा बहुमानाचा भाग उचललेला नसतो तरी तोच खरोखर अतिशय महत्त्वाचा असतो व अशा प्रकारच्या विचारांनींच त्या वेळचे इटलींतील देशभक्त प्रवृत्त झाले होते असें दिसतें. इ. स. १८२०पासून १८४० पर्यंत इटलींमध्यें लहानसान बंडें झालीं तीं बहुधा निष्फळच झालीं, तथापि त्यांचे योगानें राष्ट्रामध्यें एक तऱ्हेचा त्वेष उत्पन्न झाला त्याचेंच फळ इटली देशाचें स्वातंत्र्य हें होय.

असो. येथवर ज्या बंडखोर चळवळींचा निर्देश केला त्या सर्वांचें आदिकरण कारबोनेरी नांवाची गुप्त मंडळी व तिनें दिलेलें लोकशिक्षण हें होय. या गुप्त मंडळीस प्रत्यक्ष यश आलें नाहीं. कारबोनेरी मंडळीचें काम दहा वीस वर्षें झाल्यानंतर **'तरुण इटली'** या नांवाची दुसरी एक गुप्त मंडळी तिच्या जागीं अधिष्ठित झाली. ही मंडळी पहिल्याहून अधिक तेजस्वी व कर्तृत्ववान् असून तिला पहिलीपेक्षां यशहि अधिक आलें. या मंडळीचा मूळ उत्पादक मॅझिनी होता, त्याचा वृत्तान्त पुढील भागांत दिला आहे.

भाग ४ था

मॅझिनीचा वृत्तान्त

न तच्छस्त्रैर्न नागेंद्रैः न हयैर्न च पत्तिभिः ।
कार्यं संसिद्धिमभ्येति यथा बुद्ध्या प्रसाधितम् ॥
—पंचतंत्रम्.

जोसेफ मॅझिनी हा जिनोआ येथें १८०५ या सालीं जन्मास आला. त्याचा बाप गिआकोमो मॅझिनी हा एक प्रसिद्ध वैद्य व शरीरशास्त्राचा अध्यापक होता. त्याची आई मेराया ही अत्यंत रूपवती, बुद्धिवान् व प्रेमळ स्त्री होती. मॅझिनी बाळपणीं फार नाजूक व अशक्त असे. तो इतका कीं, एकदोन वर्षांचा होईपर्यंत त्याला उभें सुद्धां राहतां येत नसे. तो सुमारें सहा वर्षांचा झाला तेव्हां कोठें त्यास कोणाचा हात न धरतां ताठपणें चालतां येऊं लागलें. मॅझिनी हा शरीरानें जितका अशक्त तितकाच बुद्धीनें प्रबळ होता. बाळपणापासून अन्यायाचा याला संताप असे व कोणाचीहि गरिबी पाहिली कीं त्याचें कोंवळें मन अतिशय द्रवत असे. जन्मतःच तो मानव जातीचा मित्र व जुलुमाचा शत्रु होता म्हटलें तरी चालेल. वास्तविक घराबाहेर तो फारसा पडत नसल्यामुळें आपत्ति व दारिद्य यांचें दुःख कसें असतें याची कल्पना त्यास येण्यासारखी नव्हती. परंतु ममता हा त्याचा उपजतगुणच होता. कोणीहि अनाथ, दुबळा, निराश्रित, पंगू किंवा रोगग्रस्त मनुष्य त्यानें पाहिला म्हणजे त्यानें त्याचे गळ्यास जाऊन मिठीच मारावी, त्याला कुरवाळावें व ‘कांहीं तरी त्याला दे, कांहीं तरी दे, तो किती तरी गरीब आहे पहा ग’ असें म्हणून आपल्या आईच्या मागें हट्ट घेऊन लागावें. लहानपणापासून त्याचा स्वभाव गंभीर व विचारी असे. पोरांचे खेळ त्याला मुळींच आवडत नसत. केव्हांहि कोणी तुला काय हवें म्हणून विचारलें असतां, नेहमीं ‘पुस्तक द्या’ असें त्यानें म्हणावें. तो अवघ्या पांच वर्षांचा असतां त्याचे बिछान्यावर जिकडे तिकडे पुस्तकें पडलेलीं असत व कधीं पुस्तकें वाचीत तर कधीं नकाशावर आडवा पडून भूगोल शिकत असलेला तो दिसे. ही त्याची वृत्ति पाहून पुढें हा कोणी मोठा पुरुष निपजणार अशी पुष्कळ जणांनीं त्याच्या आईची खातरजमा केली होती.

मॅझिनी सुमारें तेरा वर्षांचा झाल्यावर त्याला त्याच्या बापानें जिनोआ येथील विद्यालयांत शिकावयास पाठविलें. विद्यालयांत शिकत असतां त्याचा वाचनाचा व्यासंग दांडगा असे. आपल्या नीतिमत्तेनें व दानतीनें त्यानें शिक्षकवर्गांचे मनावर मोठा दाब ठेविला होता. शिकत असल्यापासूनच त्याचे मनांत स्वदेशा-विषयींचे विचार नेहमीं घोळत असत. सभोंवतीं समवयस्क विद्यार्थि निष्काळजी-पणानें हसून खेळून आयुष्याचा काळ सुखानें घालवीत असतां मॅझिनी हा मात्र उदास, विचारनिमग्न व एकांतवासप्रिय असा असे. स्वदेश परकीयांचे ताब्यांत असल्यामुळें तो मृतप्राय आहे अशी उग्र कल्पना मनांत बाळगून तो एखाद्या सुतकी मनुष्याप्रमाणें अंगावर नेहमीं काळा पोषाख घाली. अशी ही त्याची वृत्ति पाहून त्याच्या आईस वाईट वाटे व एखादे दिवशीं हा कदाचित् आत्महत्या करील कीं काय अशीहि तिला भीति पडे. सर्व विषयांत मॅझिनीला इतिहास व तत्त्वज्ञान हे विषय फार आवडत. विद्यालयांत पांच वर्षें घालविल्यावर मॅझि-नीनें वकिलीची परीक्षा दिली; परंतु वकिली करून संपत्ति मिळविण्याचा विचार त्याचे मनांत कधींहि आला नाहीं. त्या काळीं इटलीमध्यें असा नियम असे कीं, प्रत्येक नवीन वकिलानें दोन वर्षेंपर्यंत गरीब लोकांचीं कामें फुकट चालविलींच पाहिजेत. मॅझिनीला तर स्वभावतःच गरीब लोकांच्या उपयोगीं पडणें हें अत्यंत प्रिय होतें. त्यामुळें सर्व जिनोआमध्यें जो म्हणून कोणी गरीब पक्षकार असे तो एकदम मॅझिनीकडे धांव घेई.

मागें कारबोनेरी म्हणून जी एक गुप्त मंडळी सांगण्यांत आलेली आहे, तिजमध्यें मॅझिनी लवकरच सामील झाला. कारबोनेरी मंडळीचे कांहीं विधि, नवीन मनुष्यास तींत प्रथम सामील होतांना आचरावे लागत. मॅझिनी यास ते मुळींच आवडत नसत. तथापि आपल्यास त्यांच्या विधींशीं काय करावयाचें आहे, स्वदेश मुक्त करण्याचा त्यांचा व आपला हेतु एकच आहे एवढें बस्स आहे, असें म्हणून तो आपल्या मनाचें समाधान करून घेई. परंतु पुढें पुढें कारबोनेरी मंडळींचीं मतें, निदान त्यांची काम करण्याची रीति, त्यास पसंत पडेनाशी झाली. कांहीं दिवस गेल्यानंतर, १८३० सालीं फ्रान्स देशामध्यें जी राज्यक्रांति झाली त्या वेळीं कारबोनेरी मंडळीच्यातर्फे त्याजकडे कांहीं मह-त्त्वाचें काम सोंपविण्यांत आलें होतें; परंतु याच सुमारास एका गुप्त पोलिसानें त्यास पकडून सरकारच्या स्वाधीन केलें. मॅझिनीस कैद केलें त्या वेळेस त्याचा व इतर कांहीं लोकांचा बंडाशीं संबंध दाखविण्यासारखे त्याचेपाशीं कांहीं

कागदपत्र होते, ते त्यानें शिताफीनें एकदम नाहींसे करून टाकले व तो पोलिसच्या स्वाधीन झाला. पुढें कांहीं एक चौकशी वगैरे न करतां सरकारनें मॅझिनीला सॅव्होना येथील किल्ल्यांत तुरुंगांत टाकलें. ही बातमी कळतांच मॅझिनीचा बाप जिनोआ येथील गव्हर्नराकडे गेला व तुरुंगांत टाकण्याइतका आपल्या मुलाचा काय अपराध झाला हें कळविण्यांत यावें, असा त्यानें अर्ज केला. त्याचा त्याला असा जाब मिळाला कीं, 'तुमचा मुलगा तरुण व बुद्धिमान् आहे. त्याला रात्रीं बेरात्रीं एकट्यानें सहल करणें फार आवडतें. जे तरुण बुद्धिमान् आपल्या मनांत काय चाललें आहे हें बाहेर कळूं देत नाहींत ते सरकारास मुळींच आवडत नाहींत. या कारणास्तव तुमच्या मुलास बंदींत टाकण्यांत आलें आहे.' असो. तुरुंगवासांत असतांहि त्यानें आपले स्नेह्यांशीं गुप्त रीतीनें पत्रव्यवहार चालविला होता. त्यावरून त्याला असें कळून आलें कीं, आपणांस कैदेंत टाकल्यामुळें कारबोनेरी मंडळीला फार दहशत बसलेली आहे. हें पाहतांच त्या मंडळीच्या भित्रेपणाचा त्याला तिटकारा आला व ज्यामध्यें अद्याप थोडासा जीव उरला आहे अशा लोकांसच हातीं धरून एक नवीन मंडळी स्थापन केली पाहिजे असा त्यानें निश्चय केला. अशा रीतीनें **'तरुण इटली'** या नांवाच्या प्रसिद्ध गुप्त मंडळीचा जन्म एका अंधाऱ्या व भयाण तुरुंगांत झाला.

मॅझिनीला आपल्या हेतुसिद्धीच्या मार्गांत किती प्रचंड अडचणी होत्या हें माहीत होतें. तसेंच जें कार्य आपण आरंभणार त्या कार्याची सिद्धि आपल्या जन्मांत आपल्या डोळ्यांदेखत होणें शक्य नाहीं हेंहि त्याला दिसत नव्हतें असें नाहीं. परंतु त्याच्या विचारांत स्वार्थपरायणतेचा लवलेशहि नव्हता, याचमुळें त्याचे अंगीं आरंभिलेलें कर्तव्य सिद्धीस नेण्याची उमेद आली व त्याचे मार्गांत निराशेची छाया कधींहि पडली नाहीं असें म्हटलें पाहिजे. नवीन मंडळीची रचना कशी असावी, ती उभारण्यास कोणत्या प्रकारचें साहाय्य घ्यावें, क्रांतिप्रवर्तक इतर संस्था व लोक युरोपांतील निरनिराळ्या देशांत जे आगाऊच उत्पन्न झाले होते त्यांच्याशीं या नव्या मंडळींचा संबंध कोणत्या रीतीनें जुळवावा, वगैरे सर्व गोष्टींचा पुरा विचार तुरुंगाच्या एकांतवासांत मॅझिनीनें केला. विचारांतीं त्यानें असें ठरविलें कीं, गुप्तपणा राखल्याशिवाय आपल्या मंडळीचा निभाव लागणार नाहीं. तरी पण कोणत्याहि मनुष्यास मंडळीचा सभासद करण्यापूर्वी व त्याजकडून गुप्त-

पणा राखण्याची शपथ घेण्यापूर्वी, मंडळीचे खरे हेतु त्याला कळविलेच पाहिजेत. ज्यास मंडळींत यावयाचें असेल त्यानें उघड्या डोळ्यांनीं व आपल्या पायांनीं चालत यावें! तसेंच जो कोणी मंडळींत येणार त्याजकडून स्वदेश स्वतंत्र करण्याचा मी प्रयत्न करीन व सर्व इटलीमध्यें एकी करून प्रजासत्ताक राज्याचें छत्र उभारण्याचा प्रयत्न करीन, अशी शपथ घ्यावयाची असेंहि त्यानें ठरविलें. वरिष्ठ प्रतीच्या लोकांवर मॅझिनीचा बिलकूल विश्वास नव्हता. कधीं कांहीं झालें, तर तें मध्यम व कनिष्ठ लोकांचे हातूनच होईल. आज ते जरी मुग्ध आहेत, तथापि त्यांच्या हृदयांत स्वातंत्र्यप्रियतेचें बीज खास रुजलें आहे, व 'तरुण इटली' मंडळीच्या सभासदांकडून त्याजवर उपदेशामृताचें सिंचन केलें असतां त्याला हटकून अंकुर फुटेल असा त्याचा विश्वास होता. इटली देश मृत नसून केवळ निद्रिस्त आहे असें मॅझिनीचें मन त्यास सांगत होतें. मोठमोठ्या राज्यक्रांत्या किंवा उलाढाली होतात त्या समाजांतल्या व समाजावर प्रीति करणाऱ्या लोकांकडूनच होतात. त्यांना प्रथमतः आपला निश्चय व विश्वास यांच्या जोरावरच कामाची सुरुवात करावी लागते. श्रीमान्, संपन्न व वजनदार लोक नंतर येऊन त्यांत मिळतात, याकरितां एकदम कामासच सुरुवात केली पाहिजे असें मॅझिनीनें ठरविलें.

तुरुंगवासांत सहा महिने काढल्यावर मॅझिनीची सुटका झाली. त्यानें स्वदेशांत राहूं नये या शर्तीवर त्यास मोकळे करण्यांत आलें होतें. अशा रीतीनें स्वदेशांत राहण्याची मनाई झाल्यामुळें मॅझिनी फ्रान्समध्यें निघून गेला. त्या वेळीं फ्रान्समध्यें लुई फिलिप बादशहा राज्य करीत होता. त्यानें इटालींतून हद्दपार झालेले कोणीहि लोक आपल्या देशांत राहूं द्यावयाचे नाहींत, असा हुकूम फर्माविला होता. त्यामुळें मॅझिनीस गुप्तपणें मार्सेलिस येथें जावें लागलें. तेथें जातांच त्यानें 'तरुण इटली' नांवाची गुप्त मंडळी जमविण्याचा उद्योग आरंभिला. या मंडळीची निशाणी म्हणजे 'सायप्रेस' नांवाच्या झाडाची डाहाळी असे. हीच निशाणी असण्याचें कारण कीं, सायप्रेस हें झाड दुःखभावसूचक मानलेलें आहे. या खुणेनें स्वदेश स्वतंत्र करण्याकरितां ज्यांनीं आजपर्यंत आपले प्राण खर्ची घातले, त्यांची आठवण ती निशाणी पाहून आपोआप व्हावी.

या मंडळीचें कार्य झपाट्यानें व्हावें व लोकसत्तेच्या मूळ तत्त्वांचा समाजांत जलद प्रसार व्हावा, याकरितां 'तरुण इटली' नांवाचें त्यानें एक वर्तमानपत्र

काढलें. या वर्तमानपत्रामध्यें इटलीनें परकीयांचा अंमल झुगारून द्यावा व संयुक्त व स्वतंत्र लोकसत्ताक राज्य स्थापावें हे विचार व इतर धर्मनीति व राजकीय तत्त्वज्ञान यांचीं तत्त्वें शिकविलीं जात. अर्थात् हें वर्तमानपत्र इटली देशांत वाटूं देऊं नये असा अधिकाऱ्यांचा हुकूम होता. परंतु जितका त्याच्या प्रसारावर प्रतिबंध अधिक, तितका त्याचा प्रसार अधिक होऊं लागला. मार्सेलिस शहरांतून प्रथम जवळच्या अशा दोन तीन किनाऱ्यांवरील शहरांत या वर्तमानपत्राचे अंक लोक गुप्तपणें नेत व तेथून गुप्त छापखान्यांचे द्वारें त्याचा फैलाव इटलीच्या या कोपऱ्यापासून तो त्या कोपऱ्यापर्यंत होई. हें वर्तमानपत्र वाचण्याची गोडी लोकांस इतकी लागून राहिली होती कीं, तें वाचण्याकरितां लोक हाल सोसण्यास व क्वचित् प्राण देण्यासहि तयार होत. क्रमाक्रमानें इटलींतील लोक मॅझिनीच्या गुप्तमंडळीस येऊन मिळूं लागले. ज्या द्वारानें त्याच्या वर्तमानपत्राच्या हजारों प्रती गुप्तपणें पसरल्या जात, त्याच द्वारानें, तयार झालेल्या देशभक्तांचीं नवीं नवीं हजारों नांवें तरुण इटलीच्या मंडळीचे सभासद होण्यास हातीं येऊं लागलीं, हें पाहून मॅझिनीस आनंद झाला. परंतु त्याचें त्याला बिलकूल आश्चर्य वाटलें नाहीं. कारण त्याची खटपटहि अशीच कांहीं विलक्षण चालू होती. वर्तमानपत्राला हपीस नाहीं, लिहिण्यास मदतनीस नाहीं, पत्र छापून काढण्यास हाताखालीं चाकर नाहींत, अशा स्थितीमुळें मॅझिनीला अहोरात्र काम करावें लागे. वर्तमानपत्रांतील लेख लिहिणें व इतर पत्रव्यवहार करणें, पत्र छापून निघालें म्हणजे त्याच्या घड्या घालून त्याचे गठ्ठे बांधणें, कोणी प्रवासी आला असतां त्याला भेटून हकीकत विचारून घेणें, इत्यादि बहुतेक कामें त्याचीं त्यालाच करावीं लागत; शिवाय तो अगदीं दरिद्रावस्थेला आला होता. तथापि पुढें आपल्या राष्ट्राचा भाग्योदय होणार या विचारानें तो नेहमीं हसतमुख व आनंदी असे. कृतघ्न व शंकेखोर माणसें, निंदक लोक, आपल्याच तटांतील कलहप्रिय लोक व तसेंच पूर्वीचा मित्रभाव सोडून बनलेले शत्रू इत्यादि शेंकडों प्रकारच्या माणसांकडून त्याला त्रास होत असे. तथापि केवळ कर्तव्यावर लक्ष देऊन त्यानें आपला क्रम चालू ठेविला होता. यामुळें 'तरुण इटली मंडळी' स्थापून एक वर्ष होतें न होतें तोंच तिचें महत्त्व सर्व इटलीमध्यें अतिशय वाढलें. ही मंडळी स्थापन करणारे लोक अप्रसिद्ध, गरीब व तरुण असतां इतक्या थोड्याच काळांत तिचें इतकें महत्त्व वाढलें कीं, इटलींतील सातहि संस्थानांतील राजे तिला भिऊन तिच्या सभासदांचा छळ

करूं लागले. येवढ्याच गोष्टीवरून तिचा पाया भक्कम व उदात्त तत्त्वांवर रचिला होता हें सिद्ध होतें.

असो. मॅझिनीचें वर्तमानपत्र लोकांना जितकें प्रिय तितकेंच अधिकाऱ्यांना अप्रिय झालें होतें. त्यांनीं त्या वर्तमानपत्राचा प्रसार बंद करण्याकरितां अनेक खटपटी केल्या. जो कोणी त्या वर्तमानपत्राचे अंक धरून देईल त्यास बक्षिसें दिलीं जात व ज्या कोणावर त्यांचा प्रसार केल्याचा आरोप शाबीत होई, त्यास जबर शिक्षा देत. येवढेंच काय, पण त्या वर्तमानपत्राची नालस्ती किंवा त्यास प्रतिबंध करण्याचा प्रयत्न न करणें हें एक गुन्ह्याचें नवीन सदरच काढलेलें असून, तो करणारास दोन वर्षांची शिक्षा व दंड होई, व त्या अपराधाची गुप्त बातमी देणारास त्यांतील निम्में बक्षीस मिळे. या व यासंबंधीं इतर अपराधांची चौकशी करण्याकरितां लष्करी अधिकाऱ्याची एक न्यायसभाहि नेमिली होती. या न्यायसभेपुढें मॅझिनीचें वर्तमानपत्र वाचल्याचा ज्यांवर आरोप असेल त्यांस आणीत व ज्यांवर तो शाबीत होई त्यांस पाठीमागून गोळी घालून ठार मारीत. इतकेंहि करून मॅझिनीच्या वर्तमानपत्राचा प्रसार बंद होत नाहीं असें पाहून, इटलींतील राजांनीं फ्रान्सच्या लुई फिलीप राजास मॅझिनीला पकडण्याची विनंति केली. तेव्हां फिलिपच्या हुकुमावरून मॅझिनीला पकडण्यास पोलीस सुटले. परंतु दोन वर्षेंपर्यंत त्याचा त्यांस पत्ताच लागला नाहीं. एका जागेहून दुसरीकडे, दुसरीहून तिसरीकडे, असें करून मॅझिनीनें आपल्या राहण्याचें ठिकाण दोन वर्षेंपर्यंत गुप्त राखिलें. शेवटीं एके दिवशीं अशी मौज झाली कीं, मॅझिनी अमुक एका घरांत आहे असें कळतांच, पोलिसांनीं त्या घरास वेढा दिला. तेव्हां मॅझिनीसारखाच किंचित् दिसणारा त्याचा एक स्नेही होता तो, मीच मॅझिनी, असें सांगून पोलिसाचे स्वाधीन झाला. इकडे दुतर्फा उभे राहिलेल्या पोलिसांच्या रांगेंतून खरा मॅझिनी खुशाल सावकाश चालता झाला व सुरक्षित बाहेर पडून स्वित्सर्लंड देशास पळून गेला.

यापुढें मॅझिनी इटलींत नव्हता, तथापि **'तरुण इटली'** मंडळीचें काम बंद पडलें नाहीं. याचें कारण असें कीं, तें काम अमुक एकानेंच करण्याचें असें नव्हतें. स्वदेशाभिमान एकाद्या समाजांत एकदां जागृत झाला म्हणजे, मग तो वणव्यासारखा चरत जातो. मॅझिनी जरी जाग्यावर नव्हता, तथापि त्याच्या शिकवणीनें इटलींतील तरुण मंडळीच्या मनांत जें एक स्वदेशप्रीतीचें बीज रुजलें, तें एकसारखें वाढतच गेलें.

इकडे स्वित्सर्लंडमध्यें गेल्याबरोबर मॅझिनीच्याभोंवतीं जर्मनी, फ्रान्स, इटली व पोलंड इत्यादि देशांतून हद्दपार केलेली मंडळी बरीच येऊन मिळाली. 'तरुण इटली' मंडळीच्या नमुन्यावर 'तरुण युरोप' या नांवाची एक नवीन मंडळी त्यांनीं काढली. ही मंडळी काढण्यांत मॅझिनीचा मुख्य हेतु असा होता कीं, राजकीय जुलमाविरुद्ध सर्व युरोप खंडांत लोकमत जागृत करावें व जसजशी ही मंडळी हद्दपार होऊन एका देशाहून दुसऱ्या देशांत व दुसऱ्याहून तिसऱ्या देशांत आसरा घेण्यास जातील, तसतसा लोकसत्तेच्या उदार तत्त्वांचा प्रसार सर्व युरोपखंडभर व्हावा. मॅझिनींचा हा प्रचंड हेतु अखेर शेवटास गेला हें यानंतर घडून आलेल्या इतिहासावरून सिद्ध होतें.

असो. येथवर सांगितलेल्या हकीकतीवरून इटलीमध्यें लोकमताची जागृति कशी झाली व तें होण्यास मॅझिनीसारखे लोकशिक्षक व त्यांनीं स्थापिलेल्या मंडळ्या कशा उपयोगी पडल्या हें कळून येईल. मॅझिनीचें वर्तमानपत्र वाचून व त्यानें स्थापन केलेल्या मंडळ्यांतील प्रमुख देशभक्तांचीं संभाषणें केल्यानें ग्यारीबाल्डीचे मनाची पक्की तयारी होऊन राहिली होती. परंतु त्याच्या हृदयांत जो त्वेष व उत्साह उसळलेला होता, तो कृतीचे रूपानें बाहेर पडण्यास प्रथम कोणतें कारण झालें याची हकीकत पुढील भागीं येईल.

भाग ५ वा

देशकार्याचा ओनामा

विघ्नैः पुनःपुनरपि प्रतिहन्यमाना
प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति ॥

ग्यारीबाल्डीच्या खऱ्या चारित्रास इसवी सन १८३४ या सालीं सुरुवात झाली. त्या वेळीं तो अवघा २७ वर्षांचे वयाचा होता. या वेळीं इटलीमध्यें, 'बंडवाल्यांचे दोन दिवस संपून राजांचे दोन दिवस' आले होते. पिडमांट येथें एक लहानसें बंड झालें. त्याचा चार्लस आलबर्ट राजानें मोड करून त्यांत सामील असलेल्या व नसलेल्याहि लोकांस जबर शिक्षा देण्याचें

काम या वेळीं चालविलें होतें. या धामधुमींत पुष्कळ लोकांचा छळ झाला व पुष्कळ लोक सैरावैरा देशांतून पळत सुटले. हें पाहून ग्यारीबाल्डीचे मनास अत्यंत चेव येऊन त्याचे हात देशसेवा करण्यास फुरफुरूं लागले होते.

इतक्यांत त्याला एक संधि मिळाली ती अशीः—स्वदेश मुक्त करण्याची बडबड आजपर्यंत पुष्कळ झाली, आतां हातून प्रत्यक्ष कांहीं तरी झालेंच पाहिजे, असे विचार मनांत सारखे घोळत राहून लोकांस चैन पडेनासें झालें होतें. आतां यापुढें लोकांस धीर निघत नाहीं असें पाहून १८३३ सालचे सप्टेंबर महिन्यामध्यें मॅझिनीच्या सल्ल्यानें इटालियन लोकांनीं एक बंडाचा कट केला. पोलंड देशामध्यें स्वतंत्रता मिळविण्याबद्दल ज्या खटपटी झाल्या त्यांमध्यें, रॅमरीनो म्हणून प्रमुखपणानें काम केलेला असा एक वीर हद्दपार होऊन या वेळीं इटलीमध्यें आलेला होता. त्याला या बंडामध्यें पुढारी करण्याचें ठरविलें होतें. ग्यारीबाल्डीकडेहि मॅझिनीनें कांहीं कार्यभाग सोंपविलेला होता व तो त्यानें मोठ्या आनंदानें पत्करला.

परंतु रॅमरीनोचे हातून व्हावी तितकी झटपट न झाल्यामुळें उघडपणें बंड करण्याचें काम पुढील सालापर्यंत भिजत पडलें. पण त्याचेपूर्वीच अधिकाऱ्यांना बंडाची गुप्त बातमी लागली व ते आपली तयारी करून सावधपणें वाट पाहत बसले. इकडे पिडमांटवर स्वारी करण्याचा बंडवाल्यांचा निश्चय झाला. प्रथमतः 'सॅन जुलियानो' नांवाचें एक लहानसें खेडें होतें तें हस्तगत करून घेण्याचें ठरलें. बंडवाल्यांच्या दोन टोळ्या करून दोन दिशांकडून दोन्ही टोळ्यांनीं एकदम हल्ला करावा असाहि बेत ठरला होता. परंतु जलमार्गानें येणाऱ्या टोळीस किंचित् उशीर झाल्यामुळें रॅमरीनो यानें दुसराच एक रस्ता धरला. आपण कोठें जात आहों, हें त्याचें त्यासच पुरतें ठाऊक नव्हतें. त्या वेळीं थंडी म्हणजे मी म्हणत होती व रस्ते खडबडीत असल्यामुळें प्रवासास फार अडचण होऊं लागली. बंडवाल्यांच्या टोळींत बहुतेक अननुभविक, परंतु केव्हां एकदां लढाई करूं, असें म्हणणारे उल्लू तरणेबांड लोक भरलेले होते. त्यांना उशीराचा कंटाळा येऊन ते अगदीं उतावीळ झाले. आपण बंड करण्यास निघालों हें वास्तविक सर्व देशाचेंच कार्य, तेव्हां आपणास पाहतांच ठिकठिकाणचे लोक आपलें अभिनंदन व आदर करून आपणांस मिळतील अशी या तरुण बंडवाल्यांची अपेक्षा होती. पण प्रत्यक्ष पाहावें तर प्रकार अगदीं वेगळाच झाला. कोणीहि सामोरें येईना किंवा तुम्ही कोठले कोण, कोठें जातां,

असें एका शब्दानेंहि विचारीना. तेव्हां त्यांची बरीच निराशा झाली. मॅझिनी व रॅमरीनो यांचें आपसांत भांडण जुंपलें, इतक्यांत एकाएकीं एक बंदुकीचा आवाज चुकून झाला. तो होतांच मॅझिनी बेशुद्धच पडला. रॅमरीनोलाहि काय करावें हें सुचेना व तो आपल्या टोळीनिशी मागें फिरला. अशा रीतीनें हें बंड जेथल्या तेथेंच विझलें.

ग्यारीबाल्डीची नेमणूक या बंडाचे कामीं युरीडाईस नांवाच्या जहाजावर झालेली होती. त्यानें जहाजावरील लोकांचें मन बंडास अनुकूल करण्याची खटपट खूप जोरानें चालविली. इतक्यांत जिनोआ येथेंहि बंड होणार आहे असें कळतांच तो आपले कांहीं स्नेही जहाजावर ठेवून जिनोआस गेला. पण तेथें पाहतो तों कोठेंच कांहीं नाहीं. बंडाची बातमी आधींच फुटून कांहीं लोकांस कैदहि करण्यांत आलें होतें. बरें, परत निघून यावें तर भोंवतीं सैन्याचा गराडा पडत चालला होता. तेव्हां जलदी करून तो एका बागवानिणीच्या घरीं गेला व तिला त्यानें आपली स्थिति उघड करून सांगितली. तेव्हां तिनें ग्यारीबाल्डीला शेतकऱ्याचा एक पेहराव दिला तो अंगावर घालून त्यानें जिनोआ शहर सोडलें. जातांना वाटेंत बागांतून लपत छपत, कोठें भिंतीवर चढून तर कोठें डोंगराचे कडेकडेनें चालून तो एकदांचा हमरस्त्यास येऊन मिळाला. आणि नंतर कांहीं दिवस उपास काढीत तर कांहीं दिवस नुसतीं रानांतील फळें खात खात, हाल काढीत दहा दिवसांनीं नाईस शहरीं जाऊन पोंहोचला. त्या वेळीं त्याची इतकी दुर्दशा झाली होती, कीं त्याच्या मावशीनें त्याला प्रथम न ओळखतां कोणी भिकारी आला आहे असें समजून दारांतून त्यास हुसकून दिलें. परंतु नाईस येथें तो फार दिवस थांबला नाहीं. आपल्या आईची एक वेळ भेट घेऊन तो इटली सोडून निघून गेला.

नाईस सोडल्यावर वाटेंत एक नदी लागली. तिला पावसानें मोठा पूर आला होता. तरी ग्यारीबाल्डी नदींत उडी टाकून पोहून पार गेला. त्याच्या बरोबरच्या दोघां स्नेह्यांस मात्र पोहून जाण्याचें धाडस होईना, तेव्हां पैलतीरावरून ग्यारीबाल्डीनें त्यांस रामराम ठोकला व फ्रान्सच्या अधिकाऱ्यांची एक छावणी होती तेथें गेला. आपण कोठले कोण, व जिनोआहून कां आलों हें त्यानें त्यांस मोकळ्या मनानें सांगितलें. त्यांनीं असा अपरिचित माणूस हातीं सांपडतांच त्यास कैद केलें व तुरुंगांत टाकलें. या तुरुंगाच्या खोलींत

एक खिडकी जमिनीपासून सुमारें १५ फुटांवर होती. ती पाहतांच ग्यारीबाल्डीस मोठा आनंद झाला. तेथपर्यंत चढून त्यानें खिडकींतून खालीं उडी टाकली आणि रखवालदार लोक पाहत असतां तो पार निघून गेला.

लवकरच ओसाड व डोंगराळ अशा मुलखांत घुसून तेथून त्यानें मार्सेलीसची वाट धरिली. दुसरे दिवशीं वाटेंत एक खेडें लागलें. तेथल्या खाणावळीची विचारपूस करीत करीत ग्यारीबाल्डी चालला. खाणावळींत एक तरुण पुरुष व स्त्री विस्तवाजवळ शेकत बसलीं होतीं. त्यांचेपाशीं ग्यारीबाल्डीहि जाऊन बसला. नंतर खाणावळवाल्यानें जेवण तयार केलें. ग्यारीबाल्डी त्या दिवशीं इतकें जेवला, कीं त्याचें खाणावळवाल्यास आश्चर्य वाटूं लागलें. जेवण झाल्यावर रीतीप्रमाणें मेजावर मद्यहि आलें व स्वस्थ चित्तानें इकडच्या तिकडच्या गोष्टी निघाल्या. ग्यारीबाल्डीनें आपला सर्व वृत्तांत मागचा पुढचा विचार न करितां त्या खाणावळवाल्यास खुशाल सांगितला. तो ऐकतांच खाणावळवाल्याचा एकदम चेहरा पालटला, व तो ग्यारीबाल्डीस म्हणाला, "भल्या गृहस्था, तूं आतां इतका वेळ दिलेला कबुली जबाब ऐकून तुला कैद करणें हें माझें कर्तव्य आहे असें मला वाटतें." हे शब्द ऐकून ग्यारीबाल्डीस बिलकूल आश्चर्य किंवा भीति वाटली नाहीं. तो खदखदां हसून थट्टेच्या स्वरानें म्हणाला, "ठीक आहे. माझी त्याला मुळींच हरकत नाहीं. पण आधीं जेवण, खाणें-पिणें सर्व संपवूं दे व मग तुला माझें काय डोकेंबिकें मारावयाचें असेल तें मारून घे."

हें बोलणें चाललें आहे इतक्यांत त्या खेड्यांतली कांहीं तरुण मंडळी तेथें आली. मग अर्थातच त्यांच्या गप्पा-गोष्टी, खेळ-तमाशे, दारू पिणें, व गाणें-बजावणें चालू झालें. त्यांत ग्यारीबाल्डी हाहि खुशाल मिसळला व त्या मौजेच्या भरांत तो खाणावळवालाहि ग्यारीबाल्डीस कैद करण्याची गोष्ट अगदीं विसरून गेला. येवढेंच नव्हे, तर त्यांनीं एकमेकांस स्नेह्याप्रमाणें आलिंगनेंहि दिलीं. अशी ही रात्र ख्यालीखुशाली व चैनबाजींत काढून सकाळ होतांच ग्यारीबाल्डी पुढें जावयास निघाला. तेव्हां त्याचे रात्रीचे सोबतीहि त्याला पोंहोंचवायाला गेले. तेथून पुढें कांहीं एक दगाफटका न होतां ग्यारीबाल्डी मार्सेलीसला जाऊन पोंहोंचला.

तेथें जातांच त्याच्या हातीं सहज एक वर्तमानपत्र पडलें. त्यांत पाहतो तों आपणास फांशीची शिक्षा फर्मावलेली आहे असें त्याला आढळून आलें. आपलें नांव आज प्रथमच पण अशा रीतीनें छापलेलें पाहून त्याला मोठें नवल वाटलें. तेव्हां यापुढें आपलें नांव कायम ठेवणें सुरक्षित नाहीं असा विचार करून **एम् पेन** असें नांव त्यानें धारण केलें. नंतर कांहीं दिवस एका स्नेह्याच्या येथें काढून पुढें यूनियन नांवाच्या गलबतावर त्यानें चाकरी धरली.

पुढें मार्सेलिस येथें महामारीचा उपद्रव सुरू झाला. तो इतका भयंकर होता कीं, त्या वाख्यानें हजारों लोक गांव सोडून गेले. कोणाहि वैद्याचें औषध चालेना. रोग्यांना औषधपाणी करण्यास कोणी माणूस मिळेना. जे लोक गांवांत राहिले होते ते घरांतील माड्यांवर राहिलेले असून जेवणखाणासुद्धां खालीं न येतां अन्नपाणी दोऱ्यांनीं वर उचलून घेत! अशा ह्या वेळीं ग्यारीबाल्डी इस्पितळांत राहून रोग्यांची शुश्रूषा करी. स्वतःच्या प्राणाची त्याला कधींहि पवा नसे. परोपकार करण्यामध्यें मृत्यु आला तरी बेहेत्तर, परंतु हातून होइल तितका परोपकारच करावयाचा असा त्याचा निश्चय झाला होता.

मार्सेलिसहून ग्यारीबाल्डीनें निरनिराळ्या जहाजांवर बरींच जलपर्यटणें केलीं. परंतु त्याच्या चित्तास समाधान नव्हतें. आपण इटली सोडण्यापूर्वीं कोणचे विचार करीत होतों, व हातून कांहीं एक न घडून येतां पहिल्याच घासला माशी लागावी त्याप्रमाणें आपला हातीं घेतलेला पहिलाच उद्योग निष्फळ होऊन आपणास फांशीची शिक्षा झाली, ती चुकविण्याकरितां आपण परमुलखांत येऊन पडलों व इतउत्तर देशकार्य करण्याची पुन्हा संधि येण्याचा संभवहि कायमचा खुंटला, अशा विचारानें तो नेहमीं उदास असे. तथापि शेवटीं कांहींसें वैतागानें व कांहींसें दूर जलपर्यटण करण्याच्या आवडीनें त्यानें दक्षिण अमेरिकेस जाणाऱ्या एका गलबतावर नोकरी धरिली; व बरेच दिवस प्रवास करून तो रीयोजनिरीओ येथें जाऊन पोंहोचला.

भाग ६ वा

दक्षिण अमेरिकेंतील पराक्रम व विवाह

समानयन् तुल्यगुणं वधूवरं । चिरस्य वाच्यां न गतः प्रजापतिः ।

दक्षिण अमेरिकेस पोंचल्यावर ग्यारीबाल्डी आपला स्नेही रॉझेटी यांजकडे रिओ येथें कांहीं महिने राहिला. तेथें रिओग्रँडे या नांवाच्या लोकसत्ताक संस्थानच्या मुख्य अधिकाऱ्याची व त्याची सहज गांठ पडली. त्या वेळीं अमेरिकेंत राजसत्ता व लोकसत्ता यांचा झगडा चालू असून रिओग्रँडे संस्थान ब्रॅझिल देशाशीं लढत होतें. ग्यारीबाल्डीनें रिओग्रँडे संस्थानचा पक्ष उचलला. नंतर त्याला त्या संस्थानकडून एक जहाज मिळालें. जहाज हातीं येतांच ग्यारीबाल्डीनें सुमारें सोळा साथीदार मिळविले व ब्रॅझिल देशाच्या राजांबरोबर लढण्यास सुरुवात करण्याचा निश्चय केला.

या वेळीं त्याचे मनांत राष्ट्रीयत्वाची अत्युच्च कल्पना चांगली बिंबली होती. स्वदेश व इष्टमित्र यांना सोडून तो अमेरिकेंत आला होता. परंतु येथेंहि आपल्या देशाप्रमाणेंच राजे लोकांचा जुलूम गरीब प्रजेवर फार होत आहे असें पाहतांच इटली देशांतील लोकांप्रमाणेंच त्या गरीब प्रजेबद्दल त्याचे मनांत प्रीति उत्पन्न झाली. अवघें जग हाच आपला देश व अवघी मानवजात हेच आपले देशबांधव, जगाचे पाठीवर मानवजातींपैकीं कोणीहि कोठेंहि जुलमाचे तडाख्यांत सांपडला असतां त्यास सोडविणें हाच आपला देशाभिमान, असें त्यास वाटूं लागलें होतें. असो. आपल्या जहाजाला त्यानें आपल्या मित्राच्या स्मरणार्थ ‘ मॅझिनी ’ हें नांव दिलें व लढाईस एकदम सुरुवात केली. प्रथमतः त्यानें बुंद वगैरे भरून नेत असलेलें ऑस्ट्रियाचें एक मोठें जहाज पकडलें. ऑस्ट्रिया हा इटलीचा शत्रु, यामुळें आपल्या शत्रूला प्रथमारंभींच तडाखा देण्यास सांपडला, या गोड विचारानें ग्यारीबाल्डीस मोठा हर्ष झाला. या जहाजावर त्यास कांहीं हिरे मिळाले. नंतर या हस्तगत केलेल्या जहाजास स्कॅनोपिला हें नांव देऊन हीं दोन्ही जहाजें घेऊन ग्यारीबाल्डी हा मॉडोनेटो या नांवाच्या समुद्रकिनाऱ्यावरील एका गांवीं गेला. हें गांव मॉंटीव्हिडोचे ताब्यांत होतें. परंतु मॉंटीव्हिडो व युराग्वे हीं दोन्हीहि लोकसत्ताक संस्थानें

असून उभयतांचें परस्पर सख्य नव्हतें यामुळें त्यास तेथून लवकरच परत फिरावें लागलें.

घरत फिरण्याचे पूर्वीं एक लहानशी गोष्ट घडून आली ती अशी. मोल-डोनॅटो येथील एका व्यापाऱ्यानें ग्यारीबाल्डीचे कांहीं हिरे व कांहीं बुंद वगैरे जिन्नस खरेदी घेतले होते. परंतु त्याचे तो लवकर पैसे देईना. पुढें त्यास असें कळून आलें कीं, स्कॉनोपिला या जहाजास बंदर सोडून एकदम जाण्याचा हुकूम झाला आहे. यामुळें तर पैसे पचविण्याच्या बेतानें तो अधिकच टाळा-टाळी करूं लागला. संध्याकाळ होत चालली, हुकुमाप्रमाणें जहाज हाकारण्या-चीहि वेळ झाली, तरी अजून पैसे येईनात, असें पाहून ग्यारीबाल्डी यानें मुकाट्यानें आपलें जोडगोळीचें पिस्तुल खिशांत घातलें व जहाजावरून उतरून तो व्यापाऱ्याचे घरीं गेला. त्याला पाहतांच तो व्यापारी उडवाउडवीचीं उत्तरें देऊं लागला. तेव्हां ग्यारीबाल्डी एकदम आपलें पिस्तुल त्याचे छातीस लावून म्हणाला, 'पैसे टाक–दुसरी गोष्ट नाहीं.' ग्यारीबाल्डीचें उग्र स्वरूप पाहतांच तो व्यापारी भिऊन गेला व त्यानें मुकाट्यानें पैशाची थैली आणून दिली. एक चकारशब्द न बोलतां ती थैली खांद्यावर टाकून ग्यारीबाल्डी जहाजावर परत गेला व मध्यरात्रीं त्यानें आपलें जहाज बंदरांतून हाकारिलें.

पुढें वाटेंत शिधा सामुग्री लवकर संपली. समुद्र खवळलेला होता. किनाऱ्याजवळचा प्रदेश खडकाळ असल्यामुळें लाटाहि फार उसळत होत्या. जहाजाचे आसपास सुसरींचे कळपचे कळप हिंडत होते. अशा रीतीनें संकटांत पुष्कळ दिवस घालविल्यावर शेवटीं एकदांची जमीन व त्या जमिनीवर एक लहानसें घर असावेंसें दिसलें. परंतु जहाजावरून उतरून किनाऱ्याकडे जाण्यास होडी नव्हती. तेव्हां आतां काय करावें अशी पंचाईत येऊन पडली. जवळ होडी नाहीं असें पाहतांच ग्यारीबाल्डीनें जहाजावरील एक मेज घेऊन त्याच्या चार पायांस चार पिपें बांधलीं, व मेजावर एक काठी रोवून त्याला त्यानें आपले कपडे निशाणादाखल बांधले. मग तो व त्याचा एक सोबती असे दोघेजण ही नवीन बनविलेली होडी समुद्रांत लोटून तिच्यावर बसले व वल्ह्याच्याऐवजीं ती पायांनीं वल्हवीत किनाऱ्यास येऊन पोंहोचले, किनाऱ्या-पासून दिसलेलें घर समुद्रांतून चांगलें चार मैल लांब होतें. तेथें येऊन पाहतात तों घरामध्यें एक सुंदर स्त्री गृहकृत्यांत गुंतली होती. तिनें ग्यारी-

बाल्डीचें चांगलें आदरातिथ्य केलें. ती स्त्री स्वतः विद्वान् कवयित्री होती. तिचा नवरा कामाकरितां बाहेर गेला होता तो घरीं येतांच त्यानेंहि त्यांचें आदरातिथ्य केलें. जहाजावरील लोकांस अन्न पाहिजे होतें. त्याकरितां त्यानें एक मोठा थोरला बैल मारून ग्यारीबाल्डीस दिला. तो त्या मेजाऱ्या होडीवर घालून व त्या गृहस्थाचे आभार मानून ग्यारीबाल्डी जहाजावर परत आला. नंतर तें जहाज तेथून निघालें.

दुसरे दिवशीं सकाळीं कांहीं अंतरावर दोन जहाजें आपणाकडे येताहेतसें त्याला दिसलें. परंतु तीं लवकरच शत्रुपक्षाचीं ठरून त्यांची व ग्यारीबाल्डीचे जहाजाची लढाई सुरू झाली. दोन्हीकडील लोक फार निकारानें लढले व गोळीबाराची शिकस्त झाली. या झटापटींत सुकाणूंवाला गोळी लागून पडला; तेव्हां सुकाणूं फिरेना. तें स्वतः चालविण्याकरितां ग्यारीबाल्डी त्या जागीं गेला, तों इतक्यांत एक गोळी त्याचेहि गळ्यांत शिरली व तो जहाजावर बेशुद्ध होऊन पडला. ग्यारीबाल्डी पडला तरी त्याचे लोक धैर्यानें लढत होते. अशी सुमारें एक तास लढाई झाल्यावर शत्रु आपणच होऊन दमून निघून गेले.

यानंतर वाराहि चांगला सुटला व ग्यारीबाल्डीचें जहाज लापलाटा नदीमधून सुरक्षितपणें वर चढलें. ग्यारीबाल्डी शुद्धीवर आला तेव्हां त्यास अतिशय ताप भरला होता. तोंडांतून शब्द निघेना व डोळे अर्धवट पांढरे झालेले. जहाजावर कोणी वैद्यहि नव्हता. अशा स्थितींत ग्यारीबाल्डीस साधारण बरा होण्यास एकोणीस दिवस लागले. ग्युलाग्वे येथें पोंहोचल्यावर त्याचे मानेंतून एका शस्त्रवैद्यानें गोळी काढली व तो घोड्यावर बसून बाहेर हवेंत थोडथोडा व्यायाम घेण्यासहि जाऊं लागला. अंगांत थोडी शक्तीहि आली. गांवांतील कांहीं लोकांच्या ओळखी झाल्या. अशा रीतीनें सहा महिने बरे गेले; परंतु अखेरीस त्यास असें कळून आलें कीं, ग्युलाग्वे येथील अधिकाऱ्यांनीं त्यानें शहर सोडून जाऊं नये असा गुप्त हुकूम फर्माविला होता. आपण वास्तविक बंदिवान आहों असें ग्यारीबाल्डीस कळल्यापासून तेथून जाण्याची त्याची इच्छा फार वाढली. इतक्यांत लोकांनीं त्यास सांगितलें कीं, 'तुम्ही मुकाट्यानें निघून जा म्हणजे गव्हर्नर केवळ मुद्दाम होऊन तुम्हांस अडवीलच असांतला प्रकार कांहीं नाहीं.' तेव्हां ग्यारीबाल्डीनें गुप्तपणें पळून जाण्याची तयारी केली.

एके दिवशीं संध्याकाळीं वादळ सुटलें आहे व मनुष्यें फारशीं घरांतून बाहेर पडलेलीं नाहींत अशा वेळीं ग्यारीबाल्डी हा घोड्यावर बसून

बरोबर एक वाटाड्या घेऊन निघाला. दोघांनीं त्या रात्रींत जवळ जवळ ५४ मैलांची मजल मारली. सकाळचे प्रहरीं इबीक्यू नांवाचे गांवाजवळ रानांत त्यांनीं आपले घोडे एका झाडाला बांधले व वाटाड्या कांहीं कामाकरितां निघून गेला. ग्यारीबाल्डी हाहि थकला असल्यामुळें तो गवतावर हातपाय ताणून खुशाल पडला. परंतु बराच वेळ झाला तरी वाटाड्या येईना, तेव्हां हा काय प्रकार आहे हें पाहण्याकरितां ग्यारीबाल्डी उठून कांहींसा दूर गेला. इतक्यांत खाडखाड टापा वाजवीत कांहीं घोडेस्वारांची टोळी हातांत नागव्या तलवारी घेऊन त्याचेपाशीं येऊन थडकली. ग्यारीबाल्डीचा घोडा लांब होता यामुळें त्यास पळून जातां आलें नाहीं. इतक्यांत त्या घोडेस्वारांनीं त्यास कैद करून एका तट्टावर जखडून बांधलें व ग्युलाग्वे येथें घेऊन परत आले.

परत येतांच तेथील अधिकारी मिलन हा तुरुंगाचे दाराजवळ तयार होता. त्यानें ग्यारीबाल्डी येतांच 'तूं कां पळून गेलास? तुला कोणी मदत केली' वगैरे प्रश्न विचारले. परंतु ग्यारीबाल्डी मनासारखें उत्तर देईना. तेव्हां त्यानें त्यास आपल्या हातांतील चाबकानें बेदम फोडून काढलें. तरी ग्यारीबाल्डी नांवें सांगण्यास कबूल होईना, तेव्हां त्याचे हातास दोरी बांधून तिनें त्यास एका तुळईला टांगून ठेविलें. या ठिकाणीं ग्यारीबाल्डी दोन तास लोंबकळत राहिला होता. मनगटांवरच्या करकोच्यांतून रक्त वाहत होतें, शरीर तापानें भाजत होतें, पोट क्षुधेमुळें करपून गेलें होतें व जवळ उभा असलेला एक शिपाई घशांत मधून मधून पाणी ओतीत होता. ग्यारीबाल्डीच्या या यातनेचें वर्णन कोण करील? दोन तासांनंतर अधिकाऱ्यांनीं त्यास मोकळे केलें; परंतु लगलीच त्याचे पायांत बिड्या ठोकल्या. ग्यारीबाल्डीस तें कांहींच ठाऊक नव्हतें. कारण तो बराच वेळ बेशुद्ध होता. जागा होऊन पाहतो, तों खुनी खिसेकापू वगैरे दुष्ट लोकांच्या सोबतीला आपणांस तुरुंगांत टाकलें आहे असें त्याला आढळून आलें. तुरुंगांत मात्र यापुढें त्याचे हाल झाले नाहींत. सीनोरा आलेमन नांवाच्या एका मायाळू स्त्रीनें त्याची शुश्रूषा केली. दोन महिन्यांनीं तो बरा झाल्यावर, आतां वाटेल तिकडे जा, म्हणून गव्हर्नरानें त्याला सोडून दिलें.

तेथून निघाल्यावर ग्यारीबाल्डी मॉंटीव्हिडो येथें आला; परंतु या संस्थानाच्या दोन जहाजांशीं ग्यारीबाल्डीनें पूर्वीं लढाई केली असल्यामुळें तेथें त्यास गुप्तपणें कांहीं दिवस काढावे लागले. एक महिन्यानंतर ग्यारीबाल्डी व रॉझेटी

हे रिओग्रँडेकडे निघून गेले. वाटेंत त्यांस सुमारें दोनशें मैलपर्यंत घोड्यावरून प्रवास करावा लागला. परंतु पीरॅटियम् या गांवास आल्यावर त्याचे हाल बहुतेक संपले. कारण या ठिकाणीं लोकसत्ताक राज्याचे लहानशा सैन्याचा तळ पडलेला होता. तेथें जातांच त्याच्या विनंतीवरून ब्रेझिल राजाविरुद्ध लढण्यास जाणाऱ्या एका टोळीबरोबर जाण्याची त्यास परवानगी मिळाली. अशा रीतीनें कसे तरी एकदांचे पाय फिरून भुईस लागतांच लोकसत्तेच्या वतीनें निकराचें युद्ध करण्याचा संकल्प सिद्धीस नेण्याचे उद्योगास ग्यारीबाल्डी हा एकदम लागला.

लढाईवर जाण्याचा हुकूम होतांच ग्यारीबाल्डीनें आपल्यासभोंवतीं सुमारें तीस लोक जमविले व पुन्हा दोन लहान लहान जहाजें तयार केलीं. सुमारें चाळीस नीग्रो लोक जहाजांवर खलाशांचें काम करावयास ठेवले. लहानशा दोन पंचरशी तोफाहि त्यानें मिळविल्या. यांपैकीं एका जहाजाचें नांव रिओ-पार्डो होतें. हें ग्यारीबाल्डीनें स्वतः आपल्या हातीं घेतलें. दुसऱ्याचें नांव 'रिपाब्लिकन' असें होतें. त्यावर जॉन ग्रिग्झ या नांवाच्या आपल्या एका अमेरिकन स्नेह्यास त्यानें मुख्य नेमिलें. हीं जहाजें लहान असल्यामुळें त्यांस किनाऱ्याजवळूनच जावें लागे. आणि किनाऱ्याजवळ तर मोठमोठे खडक व भाटी पडलेल्या. त्यांतून जहाज चालविणें फार धोक्याचें असे. असें असतांहि त्यांनीं लवकरच शत्रूंचीं बरींचशीं लहानसहान जहाजें काबीज केलीं. शत्रूचें आरमार मोठें होतें तरी त्यांनीं ग्यारीबाल्डीकडे दुर्लक्ष केलें यामुळें त्याचें फावलें. पुढें एके ठिकाणीं किनाऱ्यावर उतरून त्यानें आपल्या खलाशांचे दोन तासांत घोडेस्वार बनविले, व केमाक्युअम् या नांवाचा एक समुद्रकिनाऱ्यावरील लहानसा किल्ला हस्तगत केला.

अशा रीतीनें एकीकडे लढाईमध्यें ग्यारीबाल्डी गुंतला असतां, एके दिवशीं त्याचे मनांत आपण लग्न करावें अशी एकाएकी अत्युत्कट इच्छा उत्पन्न झाली. यासंबंधानें त्यानें आपल्या आत्मचरित्रांत असें लिहिलें आहे : " यापूर्वीं लग्न करण्याचा विचार माझे मनांत कधीं आला नव्हता. मला स्वतंत्रपणा नेहमीं फार आवडे. मी वारंवार अचाट साहसें करीत असें, यामुळें माझ्यासारख्या मनुष्यानें लग्न करणें म्हणजे अगदीं गैरसोईचें. लग्न केलें म्हणजे त्याबरोबर मुलेंबाळें व सर्व संसार गळ्यांत पडलाच. संसार सुखाचा करण्यास कोठें तरी कायमचा निवास व स्वस्थता हवी. पण मी तर आपलें सर्व आयुष्य

एका विवक्षित कार्यास वाहिलें होतें. माझ्या अंगांत जो कांहीं जोम होता तो त्या कार्याचे पायीं लढण्यांत खर्च करणें अवश्य होतें. यामुळें माझ्यासारख्यानें लग्न करणें मुळींच उपयोगीं नाहीं. परंतु दैवाची इच्छाच कांहीं वेगळी होती. हा वेळपर्यंत केलेल्या लढायांत मजबरोबर असलेले माझे बहुतेक स्नेही व देश-बांधव मला सोडून परलोकीं गेले व मी या जगांत अगदीं एकलकोंडा आहे असें मला वाटूं लागलें. तेव्हां आपणास कोणी तरी जन्माचा सोबती पाहिजे अशी फार फार उत्कट इच्छा होऊं लागली. जें आपल्या सन्निध नेहमीं राहील व ज्याच्या समागमानें समाधान होईल, असें कोणी तरी मायेचें माणूस जवळ असावें, तें न मिळेल तर जीवित अगदीं दुःसह होणार. पण असें मायेचें माणूस परदेशांत मिळणें किती अवघड !

असे विचार मनांत असतांना एके दिवशीं बॅरा नांवाच्या एका टेंकडीवर कांहीं सुंदर घरें दिसत होतीं तिकडे बोटींतून मी सहज गेलों. जवळच्या दुर्बिणीनें पाहतों तों एका घराबाहेरच्या अंगणांत एक तरुण स्त्री उभी आहे असें मला दिसलें. तेव्हां अर्थात् तिकडे बोट वल्हवून किनाऱ्यावर उतरून मी त्या घराकडे गेलों. परंतु इतक्या लांबून पाहिलेली स्त्री तीच हटकून आपणास कशी भेटते अशा विचारानें मी किंचित् निराश झालों. इतक्यांत माझा एक स्नेही तेथें मला भेटला व त्यानें मला कॉफी घेण्यास चला म्हणून बोलाविलें. आम्ही दोघे त्याचे घरांत जातों तोंच दुर्बिणींतून पाहिलेली तरुण कुमारिका तेथेंच समोर उभी होती. आमची परस्पर दृष्टादृष्ट होतांच उभयतां आश्चर्यभरित व तटस्थ झालों. जणूंकाय आमची ही प्रथमचीच भेट नसून एकमेकांच्या चेहऱ्यां-कडे पाहून कांहीं वेळ विसरून गेलेल्या गत गोष्टींची आम्ही फिरून आठ-वणच करीत आहों. शेवटीं मी तिजपुढें किंचित् नम्र होऊन म्हणालों, 'कुमा-रिके, तूं माझी पत्नी होशील काय ?' वास्तविक तिची पोर्तुगीज भाषा मला चांगलीशी येत नव्हती. यामुळें मी वरील शब्द इटॅलियन भाषेमध्यें बोललों. पण मी ज्या धिटाईनें व मोकळ्या मनानें ते शब्द उच्चारले त्यांमध्यें एक प्रकार-चा चित्ताकर्षकपणा होता खास. कारण त्यांचा अर्थ तिला चांगला उमजला. येवढेंच नव्हे, तर त्याच्या योगानें परस्परांच्या मनास, मृत्यूशिवाय दुसऱ्या कोणास कधींहि सोडतां यावयाची नाहीं अशी बळकट गांठ लवकरच पडली, अशा चमत्कारिक रीतीनें आमचें चिरंतन प्रेम जुळलें."

या स्त्रीचें नांव ॲनिटा असें होतें. ॲनिटा ही स्त्री लोकोत्तर होती. ग्यारीबाल्डीसारख्या वीराचे पदरीं तिनें पडावें हें अत्यंत उचित होतें व तें तसेंच घडून आलें. दोघांचेहि अंगीं सारखेच गुण होते व दोघांनींहि जगांत सारखेंच धन्य म्हणवून घेतलें. ॲनिटा ही वास्तविक दुसऱ्या एकास देण्याचें तिच्या बापानें आगाऊ ठरविलें होतें. तिचा एक प्रकारें वाङ्निश्चय झाला होता; परंतु विवाह असा अजून व्हावयाचा होता. तोंच मध्यंतरीं ग्यारीबाल्डीची व तिची गांठ पडली व गांधर्व विवाहानें तिनें स्वतःस त्याला अर्पण केलें. यामुळें ज्याच्याशीं तिचा वाङ्निश्चय झाला होता त्याच्या सर्व सौख्यावर ग्यारीबाल्डीनें घाला घातल्यासारखें झालें; परंतु आपल्या हातून एका दृष्टीनें हें असत्कार्य होत आहे असें ॲनिटा किंवा ग्यारीबाल्डी यांचे मनांत त्या प्रेमभरांत कोठून येणार? पुढें ज्या वेळीं ॲनिटा ही मरण पावली त्या वेळीं तिजबद्दल विलाप करतांना तो आपल्या हातून घडलेल्या असत्कृत्याची आठवण काढ काढून रडे. तो म्हणे, "अरेरे! ॲनिटा मेली यामुळें मी अभागी झालों, परंतु त्या गृहस्थाचा मात्र सूड उगविला गेला खरा. ती मरण पावली तेव्हां तिला फिरून जिवंत करण्याचा मूर्ख प्रयत्न प्रेमातिरेकानें करीत असतां मी त्या प्रेताचा हात घट्ट धरला, व निराशेचे दुःखानें माझ्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले, त्या वेळीं मात्र मीं पूर्वीं केलेल्या पापाची बरोबर कल्पना माझे मनांत आली.'

असो. ग्यारीबाल्डीच्या इच्छेप्रमाणें ॲनिटा ही खरोखर लवकरच त्याच्या चित्ताच्या समाधानाचें स्थान होऊन बसली. साहसाच्या व दगदगीच्या वेळीं त्याच्या जीविताचा ॲनिटा हाच काय तो एक निवाऱ्याचा आश्रय होता. ज्याप्रमाणें वादळ मधून मधून होत असतांहि आकाशांतील एखाद्या ताऱ्याकडे डोळे लावून मनुष्य मार्ग आक्रमण करितो, त्याप्रमाणें लढाया व सहासें करीत असतां ग्यारीबाल्डीचें लक्ष नेहमीं ॲनिटाच्या प्रसन्न वदनाकडे लागलेलें असे. लग्न झाल्यामुळें ग्यारीबाल्डीच्या उद्योगास मुळींच व्यत्यय आला नाहीं. कारण कोणत्याहि उद्योगाचे कामीं, मग तो उद्योग नुसत्या सफरीचा किंवा लढाईचा का असेना, ॲनिटा ही त्याचा उजवा हात होऊन राहिली होती.

लग्नानंतर स्पॅनिअर्ड लोकांबरोबर लढाईचें काम पुनः लवकरच सुरू झालें. थोडक्याच दिवसांत ग्यारीबाल्डीचे जहाजाची व स्पॅनिश लोकांचे एका जहाजाची गांठ पडली. प्रथम एकमेकांच्या तोफा सोडून झाल्यावर जहाजें जवळ येतांच बंदुकी सुरू झाल्या. सुमारें पांच तास लढाई झाल्यावर शत्रूकडील

दारास गोळी लागून तो मेला. तेव्हां त्याचे लोक जहाज घेऊन पळून गेले. या लढाईमध्यें ॲनिटा ही स्वतः लढत होती. जहाजाचे फळयांवर हातांत तलवार घेऊन ती उभी राहून खलाशांस व लढणाऱ्या लोकांस उत्तेजन देत असे. यासंबंधानें ग्यारीबाल्डीनेंच खालील हकीकत लिहून ठेविली आहे. "लढाई चालली असतां तोफेच्या एका गोळयाचे धक्क्यानें ॲनिटा व तिच्याजवळ असलेले दोघे इसम खालीं पडले. तें पाहतांच ती मेली असें वाटून तिच्याजवळ मी एकदम उडी मारून गेलों. पाहतों तों ते इसम मात्र मेलेले असून ॲनिटा ही कांहीं एक इजा न होतां उठून उभी राहिली. नंतर तिनें खालीं जावें म्हणून तिची मीं पुष्कळ विनवणी केली. तेव्हां शेवटीं ती कबूल झाली व 'ठीक आहे. मी जातें व त्या मेल्या भिऱ्या भागूबाईंना वर पाठवून देतें' असें म्हणून खालीं गेली व खरोखरच ती गेल्याबरोबर जहाजांत दडून बसलेले कांहीं खलासी निर्भर्त्सना केल्यामुळें शरम पावून वर आले."

येथून पुढें ग्यारीबाल्डी हा आपलीं जहाजें घेऊन लग्यूना येथें गेला. तें शहर लोकसत्तेविरुद्ध उठलें होतें. तेव्हां त्या शहरावर त्यानें चाल करून तें घेतलें. तेथून पुढें गेल्यावर पुन्हा एकवार शत्रूचे एका जहाजाची व त्याची गांठ पडली. ग्यारीबाल्डीपाशीं ह्या वेळीं तीन जहाजें होतीं. परंतु त्याचें फारसें चालेना. ग्यारीबाल्डी व ॲनिटा हीं दोघेजण लढाईला तोंड देऊन उभीं होतीं. तिनें तर आपले ताब्यांत एक तोफ स्वतंत्रपणें घेऊन ती रोखून मारण्याचा धडाका चालविला होता. लवकरच ग्यारीबाल्डीचे बहुतेक कामदार मरून पडले. तेव्हां त्यानें ॲनिटास एका होडींत उतरविलें व सैन्याचा मुख्य सरदार किनाऱ्यावर होता त्याला तिजबरोबर असा निरोप पाठविला, कीं आणखी कांहीं कुमक पाठवाल तर लढाई चालवितों पण कुमक न मिळेल तर शेवटीं आपल्या जहाजास आग लावून देतों. ॲनिटाला पाठविण्यांत ग्यारीबाल्डीच्या मनांतील हेतु असा होता कीं, तिनें किनाऱ्यावर उतरल्यानंतर तेथेंच रहावें, परत येऊं नये. परंतु ती शूर स्त्री, सरदारास निरोप कळवून, आणखी कुमक मिळत नाहीं असें कळतांच तशीच परत फिरली. इकडे शत्रूकडून मारा होत होताच. ॲनिटा परत आल्यावर तिनें जहाजांतील होतीं नव्हतीं तीं हत्यारेंपात्यारें एका होडींत घातलीं व इकडे ग्यारीबाल्डीनें जहाजामध्यें जिकडे-तिकडे आगीनें भडकणारे पदार्थ पसरून ठेवले. दोघेंहि एका होडींत उतरून किनाऱ्याकडे आलीं. त्यांच्यामागें थोडक्याच वेळांत त्या जहाजामध्यें एकदम आगीचा भडका उसळला.

इकडे लोकपक्षाचें सैन्य हळूहळू रिओग्रँडेकडे वळलें. त्याबरोबर ग्यारीबाल्डी व ॲनिटा आपले उरलेले थोडेसे लोक घेऊन घोड्यावर स्वार होऊन त्या सैन्याबरोबर निघालीं. वाटेंत त्याचे बरेच लोक त्याला सोडून गेले. यानंतर लढाई कांहीं दिवसपर्यंत थांबली, तेव्हां ग्यारीबाल्डी हा उरलेले लोक घेऊन निवांत अशा एका खेड्यांत जाऊन राहिला. लग्न झाल्यापासून या लढाऊ जोडप्यास स्वस्थता म्हणून कशी ती माहीत नव्हती; ती या खेड्यांत आल्यावर त्यांना कांहीं दिवस मिळाली. नंतर थोड्याच दिवसांत ग्यारीबाल्डीस एक मुलगा झाला. त्याचें नांव त्यांनीं मिनॉट्टी असें ठेविलें. हा मुलगा पोटांत असतांच ॲनिटा हिनें कित्येक लढाया केल्या. तिजवर इतकीं संकटें आलीं होतीं कीं, त्यांमध्यें साधारण नशिबाची किंवा साधारण पराक्रमाची स्त्री क्वचितच वांचली असती. असें असतां नऊ महिने पूर्ण होऊन ती बाळंतीण झाली व मुलगा झाला हें पाहून उभयतांस फार आनंद झाला. तथापि तिच्या गर्भारपणांतील संकटांची एक खूण या मुलाचे अंगावर कायमची राहिली होती. मेनॉट्टी हा जन्माला तेव्हांच त्याचे कपाळावर एक जखम पडलेली होती. गर्भारपणीं घोड्यावरून भरधांव जातांना ॲनिटा एक वेळ घोड्यावरून पडली होती, त्या योगानें ही जखम झालेली असावी.

अशा रीतीनें ग्यारीबाल्डीनें संसार तर थाटलाच; परंतु तो संसार वास्तविक वनवासाहून अधिक कष्टमय होता. ॲनिटा आपला मुलगा घेऊन घरीं राही व ग्यारीबाल्डी हा खांद्यावर बंदूक टाकून शिकार मारून आणी. अन्नाची अशा रीतीनें व्यवस्था लागली खरी, तरी वस्त्र कसें मिळावें? वस्त्राविणें तर त्या लहान मुलास थंडी होऊं लागली. तेव्हां एके दिवशीं ग्यारीबाल्डी घोड्यावर बसून कांहीं कपडे मिळवून आणण्याकरितां निघाला. त्या वेळीं संध्याकाळ झालेली. पाऊस सारखा ओतत होता. रानांतून घोड्याच्या गुढग्यापर्यंत पाणी झालें होतें. कांहींसें लांब गेल्यावर एका स्नेह्याचे घरीं ती रात्र त्यानें काढिली व दुसरे दिवशीं सकाळीं उठून तो चालूं लागला. इतक्यांत दूर अंतरावर गोळीबार झाल्याचा आवाज ऐकूं येऊं लागला! तथापि कपडे मिळविण्याच्या तातडीनें तो तसाच सेंटिंब्रिना येथें जाऊन परत आला. परत येऊन पाहतो तों घरांत कोणीहि नव्हतें. तेव्हां आदले दिवशीं गोळीबार ऐकला त्या वेळींच कांहीं तरी दगा झाला असावा असें त्यास वाटलें; परंतु सुदैवानें खरोखर कांहीं एक दगा झाला नव्हता. मॉरिंग्यू या नांवाचा एक ब्राझिलियन शत्रु हा

ग्यारीबाल्डीचे पश्चात् आल्यामुळें आपला प्राण वांचविण्याकरितां ॲनिटा हिनें भर पावसांत घोडा काढला व आपल्या उघड्या-नागड्या मुलास घेऊन ती घर सोडून कांहीं अंतरावर रानांतच परंतु एका निवाऱ्याच्या जागीं जाऊन बसली होती. शोध करतां अखेरीस ती ग्यारीबाल्डीला सुरक्षित सांपडली!

हें संकट पार पडल्यावर ग्यारीबाल्डीस व त्याचे कुटुंबास पुनः कांहीं दिवस स्वस्थता मिळाली; परंतु सुखामागून दुःख ठेवलेलेंच असतें. सैन्याबरोबर परत जात असतां ग्यारीबाल्डी हा वाटेंत मुक्काम करून राहिला होता. पुढें हिंवाळा आला होता तरी तेथून त्या सैन्यास लवकरच छावणी मोडणें भाग पडलें. दक्षिण अमेरिकेंतील हिंवाळा म्हणजे अतिशय भयप्रद असतो. पर्वतावर चोवीस तास पर्जन्य मुसळधारेनें ओतत असल्यामुळें आसपासचे प्रदेशांतील नद्यानाले दुथडी भरून वाहत असतात व खालाटीचे उथळ प्रदेश सरोवराप्रमाणें डबडबून जातात. ग्यारीबाल्डीचें सैन्य निघालें त्या वेळीं रस्ते मुळींच नव्हते व पाऊलवाटा होत्या त्या बुजून गेल्या होत्या. बरोबर खावयास कांहीं एक नव्हतें. मात्र त्यांनीं कांहीं थोडे गाईचे कळप बरोबर घेतले होते. अशा संकटांत तीन महिने प्रवास चालला होता. त्यामध्यें सैन्यांतील बाया-बापड्या, लहान मुलें, बाजारबुणगे बरेच नाश पावले. ग्यारीबाल्डीलाहि फार हाल सोसावे लागले. बरोबर बायको व लहान मूल. वाटेंत पूर आलेल्या नद्या लागत त्यांतून तरून जावयाचें म्हणजे मोठेंच संकट. अशा प्रसंगीं ग्यारी-बाल्डी आपल्या लहानग्या मुलास ऊब येण्याकरितां हातरुमालानें गळ्याशीं बांधून नदी पोहून जात असे. वाटेंत अन्न अगदीं मिळेनासें झालें त्या वेळीं ग्यारीबाल्डीनें ॲनिटास घोड्यावर घालून पुढें लावून दिलें. तेथें कांहीं शिपाई भेटले त्यांनीं तिला अन्न दिलें व मुलाला कांहीं जुने लोकरीचे कपडेहि दिले. अशा रीतीनें त्यांनीं २५०–३०० मैलांचा प्रवास केला.

मकाणास पोंहोचल्यावर प्रवासाचे सर्व श्रम ग्यारीबाल्डीस आठवले. इटली-कडून देशस्थितीची किंवा आईची बातमी सहा वर्षांत कळली नव्हती. अरण्यांतून प्रवास व जहाजांवर शत्रूंशीं लढाया करीत राहावें तर हालअपेष्टांनीं बायको व मुलगा खास मरतील, याकरितां कांहीं दिवस कोठें तरी सोईची जागा पाहून स्वस्थ राहावें अशा विचारानें ग्यारीबाल्डीनें रजा घेतली व मॉंटी-व्हिडो येथें जाण्यास तो निघाला. ग्युलाग्वे येथील लोकसत्ताक राज्यास ज्या ग्यारीबाल्डीनें इतकी मदत व त्या कामीं शेंकडों साहसें केलीं, तोच आतां

जावयास निघाला तर त्याचेजवळ कांहीं एक उरलें नव्हतें. नाहीं म्हणायला अधिकाऱ्यांच्या मदतीनें त्यानें सुमारें नऊशें गुरांचा एक कळप मात्र जमविला, ही गुरें मॉंटीव्हिडोस नीट पोंहोचतीं तर त्यांस कांहीं किंमत तरी येती. परंतु तीं जनावरें आधींच रानटी, त्यांना वळवावयाचें काम कठीण, त्यांतून वाटेंत नद्या. अशामुळें निम्मींशिम्मीं गुरें मेलीं. बाकी उरलीं त्यांचीं कातडीं विकलीं. त्याचे मात्र त्यास शंभरएक पौंड मिळाले.

मॉंटीव्हिडो येथें गेल्यावर प्रथमतः त्यानें व्यापाराचें दुकान घातलें. त्यांतल्या त्यांत एका गृहस्थाचे घरीं गणिताची शिकवणी पतकरली. अशा रीतीनें चरितार्थाला सरासरीनें पुरेसे पैसे तो मिळवूं लागला. तेव्हां पोटाच्या धंद्याशिवाय हातून दुसरें कांहीं होण्यास वावच नव्हता. परंतु पुढें १८४२ सालीं युराग्वेचे प्रजासत्ताक राज्यास ब्युनॉसआयर्स येथील रोझॅस नांवाच्या जुलमी सरदाराविरुद्ध लढाई करण्याचा प्रसंग उपस्थित झाला. मॉंटीव्हिडो येथील प्रमुख लोकांस ग्यारीबाल्डीची कीर्ति माहीत होती. त्यानें सैन्यांत सरदारी पतकरावी असें त्याच्याशीं त्यांनीं बोलणें लाविलें. ग्यारीबाल्डीनेंहि तें काम आनंदानें पतकरलें. कारण राजकीय जुलमाविरुद्ध लढण्याचें व्रत त्यानें अंगीकारलें होतें व तें पाळण्यास हा एक नवीन प्रसंग आला. लागलीच अठरा तोफांचें एक जहाज व त्याच्या जोडीस लहानसें दुसरें एक जहाज, अशीं दोन जहाजें त्याच्या ताब्यांत देण्यांत आलीं. कोरियेंटीस नांवाचा सरदार रोझॅसच्या विरुद्ध आगाऊच लढत होता त्याला मदत करण्याचें काम ग्यारीबाल्डीकडे सोंपविण्यांत आलें.

मॉंटीव्हिडो येथें व्यापारासंबंधानें कित्येक इटालियन लोक येऊन राहिले होते. त्यांस लढाईचे कामीं मदत देण्यास तयार होण्याविषयीं ग्यारीबाल्डीनें विनंति केली. त्याबरोबर प्रथम पांचशें लोक एकदम तयार झाले व थोड्याच दिवसांत आणखी तीनशें मिळाले. त्याचप्रमाणें त्यानें अनेक नीग्रो लोकहि त्यांना स्वातंत्र्य देऊन लढण्यास तयार केले. इटालियन सैन्य आपल्या हाताखालीं आहे या विचारानें त्याला अतिशय अभिमान व उल्हास वाटे. पहिल्याच लढाईत इटालियन लोकांनीं पुष्कळ शौर्य दाखविलें त्याबद्दल त्यांस स्वतंत्र निशाण देण्यांत आलें. त्यावर व्हेसुव्हियस पर्वताचें चित्र ग्यारीबाल्डीनें काढविलें. त्याचें कारण असें कीं, तें चित्र पाहून इटालियन लोकांना लढतांना स्वदेशाची आठवण व्हावी. १८४४ सालीं मॉंटीव्हिडो शहरास जनरल रोझॅस

यानें वेढा दिला. या वेढ्यामध्यें तर इटालियन टोळीनें शौर्याची शर्थच केली, ती इतकी कीं, मॉंटीव्हिडोच्या सैन्यानें सुद्धां त्यांची प्रांजलपणें फार वाहवा केली. त्या योगानें ग्यारीबाल्डीस आपल्या कर्तृत्वाची धन्यता वाटली. मॉंटीव्हिडो येथील वेढा उठल्यानंतर ग्यारीबाल्डीनें मॅट्ररेरो नांवाच्या स्वतंत्रताप्रिय शूर अशा पहाडी जातीची मदत घेऊन शत्रूच्या मुलखावर हल्ले करण्यास प्रारंभ केला. हे हल्ले पुढें तीन चार वर्षेपर्यंत चालले होते. त्यांतील निरनिराळ्या प्रसंगीं ग्यारीबाल्डीनें असे कांहीं अचाट पराक्रम केले कीं त्यांचें वर्णन एखाद्या कादंबरीप्रमाणें अद्भुत वाटेल.

१८४७ चे अखेर ग्यारीबाल्डी मॉंटीव्हिडो येथें परत आला. एवढ्या अवकाशांत त्यानें व त्याच्या बरोबरीच्या इटालियन टोळीनें सर्वोत्कृष्ट कीर्ति संपादन केली. या लढायांमध्यें पुष्कळ तऱ्हेचा विचित्र अनुभव ग्यारीबाल्डी व त्याच्या सोबत्यांस येऊन इटलींत पुढें लवकरच जें महत्कार्य करावयाचें होतें त्याला ते अगदीं लायक झाले. एवढेंच नव्हे, तर या लढायांमध्यें त्यांनीं दाखविलेल्या शौर्यामुळें व अचाट पराक्रमामुळें त्यांची सर्व युरोप खंडांत कीर्ति पसरली. ग्यारीबाल्डीच्या विचाराचेच जे लोक इटलींत होते, त्यांस ग्यारीबाल्डीचे पराक्रम ऐकून त्याची स्वदेशकार्याला फार मदत होईल अशी आशा येऊन फार उमेद चढली. इटालियन लोकांची टोळी जमविण्यांतहि ग्यारीबाल्डीचा अशाच प्रकारचा हेतु होता. स्वदेशांत लढण्यास वाव नाहीं तर परदेशांत तरी स्वतंत्रतेच्या कामीं लढून अनुभव व शौर्य संपादन करावें, या कमाईचा पुढें मागें केव्हां तरी खास उपयोग होईल, अशी त्याची मनोदेवता त्यास सांगे.

ग्यारीबाल्डी मानानें सर्व सैन्यांतील मुख्य सरदार असा मानला गेला होता; परंतु त्याची मूळची स्थिति मुळींच बदलली नव्हती. मॉंटीव्हिडो येथील अधिकाऱ्यांनीं त्याचे उतराई होण्याकरितां पुष्कळ खटपट केली. रिओडीलापलाटा येथील फ्रेंच आरमारावरील सरदारानें तर ग्यारीबाल्डीस असें लिहिलें कीं, "तुम्ही केलेल्या पराक्रमांनीं नेपोलियनच्या प्रख्यात सैन्यालासुद्धा भूषण आलें असतें." मॉंटीव्हिडो येथील लोकांनीं त्यास बहुमानार्थ सरदार ही पदवी दिली; त्यावरूनच पुढें अमेरिका व यूरोपखंडामध्यें सरदार (जनरल) ग्यारीबाल्डी असें त्यांचें नांव पडलें. परंतु जेव्हां ते लोक त्याला जमिनी वगैरे बक्षीस देऊं लागले, तेव्हां 'केवळ स्वतंत्रतेकरितांच आम्ही लढलों, कोणच्याहि रीतीनें पैसा किंवा इतर नफा मिळविण्याकरितां लढलों नाहीं.' असें

सांगून त्यानें तें बक्षीस नाकारलें. येवढेंच काय परंतु स्वतःकरितां किंवा आपल्या लोकांकरितां लष्करी बहुमानाची बढतीहि त्यानें पत्करिली नाहीं. यासंबंधानें त्यानें आपल्या एका पत्रांत लिहिलें आहे कीं, " जें कार्य संपादन करण्यांत माझ्या इतक्या इटालियन देशबांधवांचे बळी पडले, त्याबद्दलचा बहुमान त्यांच्यामागें जिवंत राहून स्वीकारला तर त्या पापाच्या ओझ्यानें मी मरण पावेन." अशी कांहीं त्याची निःस्पृहता लोकोत्तर होती.

या वेळची त्याची गरीबी व साधेपणा मासलेवाईक होता. इतका कीं, त्याच्या अंगांत कधीं धड सदरा देखील असावयाचा नाहीं. त्याचें राहण्याचें ठिकाण म्हणजे एक अगदीं साधी झोपडी होती. तिच्या कवाडास कडी देखील नसून तें रात्रंदिवस अगदीं उघडें असे. एके दिवशीं फ्रेंच आरमाराचा एक अधिकारी त्यास भेटावयास आला. संध्याकाळ होऊन अंधेर पडला होता. त्या अधिकाऱ्यानें कसें तरी एकदां दार उघडून आंत प्रवेश केला, तों वाटेंत असलेल्या एका खुर्चीची त्याला धडक बसली. तेव्हां ग्यारीबाल्डीस हाक मारून तो विनोदानें म्हणाला, 'काय हो, तुम्हांस भेटावयास यावयाचें म्हणजे आधीं प्राण दिला पाहिजे !' तें ऐकतांच ग्यारीबाल्डीनें आपले बायकोस हाक मारून तिला दिवा आणावयास सांगितलें. तेव्हां तिनें आंतूनच उत्तर केलें 'दिवा कोठचा आणूं ? घरांत मेणबत्त्या विकत घ्यावयास पैसे असतील तर ना ?' शेवटीं त्या उभयतांचें बोलणें अंधेरांत बसूनच झालें. दुसरे दिवशीं त्या सरदारानें ग्यारीबाल्डीला वीस पौंड पाठवून दिले. ते तसेच परत करणें वाईट दिसलें असतें म्हणून त्यानें ठेवून घेतले व दुसरे दिवशीं गांवांतील गरीब, विधवा व भिकार जमवून ती सर्व रकम त्यानें वांटून टाकिली ! मात्र तो सरदार पुन्हा रात्रीं कदाचित् भेटावयास येईल म्हणून मेणबत्त्या विकत घेण्यापुरते पैसे त्यानें त्यांतून ठेवून घेतले.

तात्पर्य, अमेरिकेंत असतां ग्यारीबाल्डीचे गरिबीस सीमा नव्हती. परंतु त्याचें लक्ष पैशावर किंवा मानावर केव्हांच नव्हतें. 'तुम्ही मला बक्षीस देणारच तर अमक्या एका कैद्यास बंधमुक्त करा किंवा अमक्या दरिद्री माणसास इतकें द्रव्य द्या' असलें बक्षीस तो मागून घेई ! या अशा निरपेक्ष बुद्धीमुळें तर ग्यारीबाल्डीच्या कामगिरीबद्दल मॉंटीव्हिडो येथील लोकांस अधिकच उपकार वाटूं लागले. ही निरपेक्षता त्याची कीर्ति पसरण्यास विशेष कारणीभूत

झाली. केवळ ग्यारीबाल्डीचे हाताखालीं नोकरी करून नांव मिळवावें अशा हेतूनें यूरोपांतील निरनिराळे देशचे तरुण, होतकरू शिपाईगडी अमेरिकेस येऊं लागले. परंतु यानंतर ग्यारीबाल्डीस अमेरिका लवकरच सोडून जाण्याचें कारण पडलें. त्याची हकीकत पुढील भागांत दिली आहे.

भाग ७ वा

मातृभूमीची भेट

भर्तृःपिंडानृणकरो यशःक्रयमहापणः
सुरांगना स्वयंग्राहो रम्यः कालोयमागतः ॥

ग्यारीबाल्डी व मॅझिनी यांचें १८३४ तील छोटेखानी बंड फुकट जाऊन उभतांसहि फांशीची शिक्षा फर्माविण्यांत आली व ग्यारीबाल्डी अमेरिकेस व मॅझिनी स्वित्सर्लंडास निराशेनें निघून गेला, त्या गोष्टीला सुमारें १४ वर्षें झालीं होतीं. दरम्यानचा काळ ग्यारीबाल्डीनें कसा घालविला हें मागील भागावरून कळून येईल. इकडे मॅझिनीनेंहि आपला लोकशिक्षणाचा उद्योग अविश्रांत चालविला होता व १४ वर्षांनंतर उभतांचेहि निरपेक्ष देशकार्याचे खटपटीस यश येण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं. वास्तविक ग्यारीबाल्डी व मॅझिनी ह दोघेहि इटलींत नसतां त्यांच्या पश्चात् त्यांच्याच हेतूप्रमाणें गोष्टी घडून येत चालल्या होत्या. या १४ वर्षांत इटली देशांतील लोकस्थिति बरीच पालटून गेली होती.

इटलीचे निरनिराळे दहा तुकडे झालेले असून त्यांवर स्वतंत्र व निरनिराळ्या प्रकारचीं राज्यें होतीं. परंतु त्यांपैकीं प्रत्येक राज्यांतील लोकांचे मनांत परकीयांचे अमलापासून व देशी राजांचे जुलमापासून मुक्त होण्याची इच्छा प्रादुर्भूत होऊन ती दिवसेंदिवस प्रबळ होत चालली होती. लॉंबर्ड व व्हेनिस मिळून झालेल्या संयुक्त राज्यांत मॅझिनीच्या शिक्षणाचा प्रसार विशेष झाला असल्यामुळें तेथील लोक राजकीय हक्क मिळविण्याविषयीं उतावळे झाले होते. त्यांच्या मनांतील त्वेष मधून मधून लहानसान बंडांच्या द्वारें बाहेर पडत

असे. नेपल्स व सिसिली मिळून बनलेल्या राज्यांत फर्डीनंड राजाचा जुलूम व क्रूरता शिखरास पोंचली होती, व लोक अतिशय गांजून जाऊन जिवावर उदार होण्याच्या बेतांत आले होते. या टस्कनी संस्थानांत दुसरा लिओपोल्ड या नांवाचा राजा होता. त्यानें आपल्या आजानें घालून दिलेल्या सर्व शिस्तींचा उच्छेद करून, इटलींतील इतर संस्थानांच्या जुलमी राजांचें अनुकरण करण्यास प्रारंभ केला होता. यॉडिना व पार्मा येथें तर मूर्तिमंत ऑस्ट्रियाचा जुलमी अंमल चालू होता व या दोन्हीहि संस्थानांमध्यें लोक अगदीं चेपून गेले होते.

रोम म्हणजे पोपचें राज्य. लाचलुचपत व इतर हरएक प्रकारची अनीति यामुळें लोकांचीं मनें पोपविषयीं पुष्कळ दिवसांपासून विटून गेलीं होतीं. कोणतीहि सुधारणा करण्याची गोष्ट काढली कीं, पोपनें ती हाणून पाडावी. वर्तमानपत्रवाल्यांस व राजकीय आणि धार्मिक गुन्हेगारांस अत्यंत कडक अशा शिक्षा होत; पण दरवडेखोरांनीं लोकांस लुटण्याकरितां जणूं काय पोपकडून सनदाच मिळविल्या होत्या! स्वतः पैसे खाऊन पोपनें सर्व प्रकारचे मक्ते देऊन टाकल्यामुळें व्यापार जवळ जवळ बसला होता! पोस्टांतून खाजगी पत्रें पोपच्या हुकुमानें अधिकारी नेहमीं फोडीत. धार्मिकपणानें कोणी पोपकडे जाऊन आपलीं पापें गुप्तपणें कबूल केलेलीं असलीं तरी त्याचा उघड फायदा घेऊन तो लोकांवर जुलूम करी. खऱ्या धार्मिकपणाचा पुरा नायनाट झाला असून, जिकडे तिकडे पाद्रीवर्गानें थोतांड माजविलें होतें. या सर्व गोष्टींमुळें सत्यप्रिय, नीतिमान् व स्वदेशाभिमानी असे जे कोणी लोक राज्यांत होते ते पोपचें राज्य एकदां केव्हांचें नाहींसें होईल अशी मार्गप्रतीक्षा करीत बसले होते.

अशा स्थितीमुळें जरी इटलीमध्यें निरनिराळीं दहा संस्थानें होतीं तथापि त्या लोकांचे मनांत सर्वसाधारण असा एकच हेतु उद्भवून प्रबळ झाला होता. तो हेतु म्हटला म्हणजे, परकीय राजे जे ऑस्ट्रियन त्यांजविषयींचा द्वेषभाव हा होय. स्वदेशी राज्यें असूनदेखील जुलूम होतो याचें कारण ऑस्ट्रिया होय असें लोकांच्या मनानें पक्कें घेतलें होतें. ऑस्ट्रियाचा उन्मत्तपणा बेसुमार वाढला होता. थोड्याच काळांत ऑस्ट्रियानें इतकी अप्रीति मिळविली कीं, सर्व इटालियन लोकांचे मतानें ऑस्ट्रियन लोकांचा द्वेष करणें हा एक मोठा गुण, असें वाटूं लागलें होतें.

इ. स. १८३० मध्यें फ्रान्स देशांत राज्यक्रांति घडून आली व ती सफळ झाली. तिचे योगानें व्हिएन्ना येथील तह निदान ऑस्ट्रियापुरता तरी रद्द झाल्यासारखा झाला व फार पुरातन काळापासून फ्रान्सचा इटलीशीं जो कांहींसा वरिष्ठपणाचा संबंध चालत आला होता, तो पुन्हा स्थापित झाला. यामुळें ऑस्ट्रियाचे पाश आपोआपच किंचित् ढिले पडूं लागले होते. इटली स्वतंत्र होण्याचे कामीं फ्रान्सकडून मदत झाली असतीच असें नाहीं. उलट एक दोन प्रसंगीं त्या कार्यास फ्रान्सकडून थोडाबहुत अडथळाच झाला. परंतु फ्रान्स देशाचा इटलीमध्यें फिरून शिरकाव झाल्यामुळें ऑस्ट्रियास एका प्रकारचा प्रतिस्पर्धि किंवा शत्रु उत्पन्न झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. अशा रीतिनें १८४८ चे पूर्वी व त्यानंतरहि फ्रान्सचा इटलीमध्यें हात शिरकल्यामुळें एका बाजूनें नुकसान झालें, परंतु दुसऱ्या बाजूनें फायदा झाला.

याच वेळीं कर्मधर्मसंयोगानें दुसरी एक गोष्ट घडून आली. इटलीच्या स्वतंत्रतेचा मुख्य शत्रु जी पोपची गादी तेथूनच या सुमारास इटलीच्या लोकपक्षास आशा उत्पन्न झाली. ग्रेगरी पोप १८४६च्या जून महिन्यांत निवर्तला. हा पोप इतर पुष्कळ पोपांप्रमाणें जुलमी असून रोम संस्थानांतील प्रजेस अधिक हक्क देण्याचे विरुद्ध होता; परंतु त्याचे मागून नववा पायस नांवाचा पोप लोकांनीं निवडला. त्याची लोकांस हक्क देण्याची प्रवृत्ति तो गादीवर येतांच दिसून आली. पोप पायस हा चांगल्या बुद्धीचा परंतु भित्रा व कमकुवत होता. गादीवर बसल्यानंतर त्यानें पहिलें काम हें केलें कीं, जे राजकीय कैदी तुरुंगांत पडले होते त्यांस सोडून दिलें, व तसेंच हद्दपार केलेल्या लोकांस परत येण्याची परवानगी दिली. राज्यकारभाराचे बाबतींतहि कांहीं सुधारणा त्यानें केल्या व इटली देश संयुक्त व स्वतंत्र करण्याचे कामीं त्यानें आपल्या भाषणांत अनुकूल मतें प्रदर्शित केलीं. खुद्द पोप, कधीं नव्हे तो आपले बाजूस वळला या विचारानें लोकांचे मनांत सदाशेचा पूर आला, व पोप पायस एकदम अतिशय लोकप्रिय झाला. लोकांनीं त्याचें अभिनंदन करण्याकरितां जिकडे तिकडे दीपोत्सव केले व त्याच्या नांवाचे पोवाडे करून लोक रस्तोरस्तीं गाऊं लागले.

ही बातमी ऑस्ट्रियन बादशाहास लागतांच त्यास फार भय उत्पन्न झालें व त्यानें आपलें सैन्य १८४७चे उन्हाळ्यांत जनरल रॅडेट्स्की या सरदाराच्या हाताखालीं देऊन त्यास पोपच्या राज्यांत छावणी देऊन राहण्यास पाठविलें. या कृत्यानें पोपच्या पवित्र अधिकाराचा उघडपणें उपमर्द केल्यासारखें झालें.

त्याबद्दल पोपलाच काय पण सर्व इटालियन लोक व निरनिराळ्या संस्थानांचे राजे यांनांहि फार राग आला, व त्यांनीं लगेच एक कौन्सिल भरवून ऑस्ट्रियन बादशहानें जर आपलें सैन्य परत घेतलें नाहीं, तर एकदम लढाई सुरू करावी असें ठरविलें. या ठरावाप्रमाणें लढाईची तयारीहि झाली असें पाहतांच ऑस्ट्रियानें आपलें सैन्य परत घेतलें.

वरीलपैकीं बऱ्याच गोष्टी ग्यारीबाल्डी हा मॉंटीव्हिडो येथें असतांच त्यास कळल्या. त्या ऐकतांच इटलीचा ऊर्जितकाळ आला या सुखदायक विचारानें त्याचें मन हर्षभरित झालें. पोप पायस हा इटली स्वतंत्र करण्याचे कामीं अनुकूल झाला आहे असें ऐकतांच मनांतील सर्व तिटकारा विसरून जाऊन त्यानें पोपला आवेशयुक्त असें एक पत्र लिहिलें. त्यामध्यें पायसची स्तुति केलेली असून आपण इटली स्वतंत्र करण्याचे कामीं मदत करण्यास एका पायावर तयार आहों व पोपमहाराजांनीं या अल्पस्वल्प मदतीचा अंगीकार केला असतां आपणावर मोठा अनुग्रह केल्यासारखें होईल, असें मोठया आदरानें व गौरवानें त्यानें लिहिलें होतें, परंतु या पत्राचा त्यास पोपकडून मुळींच जबाब मिळाला नाहीं. पुष्कळ दिवस वाट पाहिली तथापि कांहींच उत्तर येत नाहीं याचें ग्यारीबाल्डीस वाईट वाटलें. परंतु तो बिलकूल निराश झाला नाहीं. कारण प्रत्यहीं इटलींत निरनिराळ्या अनुकूल गोष्टी घडून येत होत्या, त्यांची माहिती ग्यारीबाल्डीस हळूहळू टपालांतून मिळूं लागली.

इकडे मॉंटीव्हिडोसंबंधींचें कामहि फारसें उरलें नव्हतें. यामुळें आपण इटलीस परत जावें अशी ग्यारीबाल्डीस उत्सुकता उत्पन्न झाली. त्यानें अमेरिकेंतील सर्व इटालियन लोकांस एक विनंतिपत्र काढलें, व इटलीच्या प्रवासास लागणारा खर्च भागविण्याकरितां वर्गणी मिळविण्यास सुरुवात केली. इकडे मॅझिनीकडून त्यास सविस्तर पत्रहि आलें. त्यांत आनंददायक अशी खबर लिहिलेली असून मॅझिनीनें ग्यारीबाल्डीस इटलींत परत बोलाविलें होतें. यामुळें प्रवासाची तयारी जारीनें करण्यास त्याला दुप्पट उमेद आली. परंतु पुरेशी वर्गणी जमेना! मॉंटीव्हिडोवर ग्यारीबाल्डीचे पुष्कळ उपकार झालेले असल्यामुळें तेथील लोकांनीं तरी त्यास कृतज्ञपणानें मदत करावयाची; पण तें एकाच बाजूस राहून, परत जाण्यास जितके म्हणून अडथळे त्यांस आणितां आले तितके त्यांनीं आणिले. परंतु ग्यारीबाल्डीचा उद्योग त्याच्या उत्साहाइतकाच प्रबळ असल्यामुळें त्यांचे हेतु सिद्धीस गेले नाहींत. ज्या जहाजावरून

ग्यारीबाल्डी व त्याचे सोबती इटलीस परत जाणार होते, त्याचा मालक त्यांचेपासून अगदीं आयत्या वेळीं अवाचें सवा भाडें मागूं लागला. यामुळें त्यांस आपले अंगांतील कपड्यांखेरीज बाकीची सर्व चीजवस्त, वस्त्रप्रावर्णे विकून त्याचे पैसे करावे लागले. परंतु त्यानें तितकेंहि केलें. शेवटीं एका जिनोई व्यापाऱ्यानें त्यांस एक मोठी रक्कम बक्षीस दिली, व मॉंटीव्हिडो येथील लोकांनीं त्यास दोन तोफा व कांहीं बंदुका बक्षीस दिल्या. सरतेशेवटीं ग्यारीबाल्डी एकदांचा आपल्या सोबत्यांसह १८४८चे मार्चचे २६ वे तारखेस अमेरिका सोडून निघाला.

अमेरिका सोडतांना त्याचे मनास अतिशय वाईट वाटलें. अमेरिकेवर त्याचें प्रेम होतें. कारण सुमारें चौदा वर्षेंपर्यंत अमेरिका ही त्याच्या निःस्वार्थी पराक्रमांची व यशापयशांची कर्मभूमि होऊन राहिली होती. वास्तविक पाहतां अमेरिका ही परदेशाची भूमि, पण मॉंटीव्हिडोच्या रक्षणाकरितां त्यानें उभारलेले इटालियन स्वयंसेवक, त्यांनीं केलेल्या घनघोर लढाया व गाजविलेले पराक्रम यांचें सतत सान्निध्य असल्यामुळें, तेथेंहि एक प्रकारचें स्वदेशत्व निर्माण झालें होतें असें म्हटलें पाहिजे. शिवाय, पुढें इटलीमध्यें, आयत्या वेळीं स्वयंसेवक जमवून लढाया करण्याची जी अपूर्व पद्धत त्यानें अंमलांत आणली तिचें मूळ बीज प्रथम अमेरिकेंतच पेरलें गेलें. अमेरिकेमध्यें शेंकडों इटालियन स्वयंसेवक स्वतंत्रतेचे कार्यांत मरण पावले होते, व अशा उदार सोबत्यांनीं ज्या भूमीवर समाधि घेतल्या होत्या ती मागें सोडून जातांना ग्यारीबाल्डीस अर्थातच रडूं आलें.

परंतु किती झालें तरी स्वदेश तो स्वदेश! स्वदेश सोडून चौदा वर्षें झालीं व मध्यंतरीं त्याच्या जीवितक्रमांत पुष्कळच फरक पडला; तथापि इतक्या अवधींत त्याचा एकहि दिवस असा गेला नाहीं, कीं ज्या दिवशीं त्याला आपल्या प्रिय इटली देशाची आठवण झाली नाहीं! किंवा त्यानें असें एकहि महत्त्वाचें काम केलें नाहीं, कीं ज्यापासून स्वदेशकार्यास पुढें मागें केव्हां तरी त्याचा अप्रत्यक्ष फायदा होण्यासारखा नव्हता. आकाशांत उडणाऱ्या पक्ष्यांची आपल्या घरट्यांवर सदोदित दृष्टि असते, त्याचप्रमाणें हद्दपारीच्या ह्या चौदा वर्षांत त्याची अंतर्दृष्टि आपल्या जन्मभूमीवर एकसारखी खिळून राहिलेली होती. चौदा वर्षांचे वनवासांत ग्यारीबाल्डीनें आपणाकडून होईल तितका

परोपकार केला. परंतु ज्या अंगीकृत कार्यामुळें हा वनवास त्याला प्राप्त झाला होता, त्याचे सफलतेस पुन्हा एकवार अनुकूल स्थिति प्राप्त झाल्यावर स्वदेशाकडे परत धांव मारल्यावांचून ग्यारीबाल्डीस कसें राहवलें असतें.

इकडे ग्यारीबाल्डी व मॅझिनी यांच्या एकदां जडलेल्या कोवळ्या मैत्रीस १४ वर्षांच्या वियोगानेंहि भंग पडला नाहीं. ते मधून मधून एकमेकांस पत्रें पाठवून कुशलवृत्त व देशवृत्तान्त कळवीत असत. ग्यारीबाल्डीचे पराक्रम ऐकून मॅझिनीस फार हर्ष वाटे. त्याचें सुंदर व चटकदार वर्णन करून तो तें लंडन येथें प्रसिद्ध होणाऱ्या वर्तमानपत्रांचे द्वारें इटलींतील आपल्या देशबांधवांस वाचावयास पाठवी. यामुळें ग्यारीबाल्डी हा जो इटली सोडून जातांना अप्रसिद्ध होता, तो १८४८ त परत येण्याचे वेळीं इतका लोकप्रिय व प्रसिद्ध झाला होता कीं, त्याचे वाटेकडे इटलींतील देशभक्तांचे डोळे लागून राहिले होते. तीन महिने प्रवास केल्यावर, ग्यारीबाल्डीचें जहाज नाईसचे किनाऱ्याजवळ आलें. आपली जन्मभूमि १४ वर्षांनंतर फिरून दृष्टीस पडल्यामुळें त्याचा हर्ष हृदयांत मावेना. परंतु अद्याप पूर्वीची फांशीची शिक्षा, सुदर्शन चक्राप्रमाणें त्याचे डोक्यावर फिरत होतीच ! यामुळें ग्यारीबाल्डीनें एकदम किनाऱ्यावर उतरूं नये, अशाबद्दल त्याच्या सोबत्यांनीं त्याला फार आग्रहानें व विनंतिपूर्वक सांगून पाहिलें, परंतु तो तें मुळींच मनास आणीना. दूर समुद्रावर असतांच त्यानें आपल्या जहाजावरील मॉंटीव्हिडोचें निशाण काढून टाकून, इटलीचें तीन रंगी निशाण फडफडत लाविलें होतें. आणि आतां नाईस शहरहि डोळ्यांपुढें मूर्तिमंत आलें, मग ग्यारीबाल्डीस दम कसचा निघतो ? त्यानें सगळ्यांचें म्हणणें बाजूस ठेवून किनाऱ्यावर एकदम उतरण्याचा निश्चय केला.

ग्यारीबाल्डी आला असें कळतांच ती बातमी हां हां म्हणतां सर्व गांवभर पसरली, व थोडक्याच वेळांत अर्धा अधिक गांव किनाऱ्यावर येऊन थडकला. चौदा वर्षें मातृभूमीचा वियोग झाल्यामुळें ग्यारीबाल्डी व त्याचे सोबती यांना किनाऱ्यावर केव्हां एकदांचा पाय ठेवूं असें झालें होतें. तूं आधीं का मी आधीं, अशी जणूं काय त्यांच्यामध्यें शर्यत लागल्यामुळें, जहाजावरील लोक भराभर उड्या घेऊं लागले. उभयपक्षींहि आनंदाचें भरतें आलेलें असल्यामुळें त्या वेळचीं त्यांचीं प्रेमालिंगनें, त्यांचे आनंदाश्रु किनाऱ्यावरून जहाजावर व जहाजावरून किनाऱ्यावर येण्याजाण्याची गडबड या सर्वांचें वर्णन कोण करूं शकेल ?

ग्यारीबाल्डी इटलीकरितां लढण्याचें हेतूने अमेरिकेहून आला आहे असें कळतांच तेथल्या तेथेंच कित्येक लोक फुकट शिपाईगिरी करण्यास तयार झाले, व त्यांनीं ग्यारीबाल्डीचे सैन्यांत आपलीं नांवें नोंदून घेतलीं. गांवांतील इतर लोकांबरोबर ग्यारीबाल्डीची आई, त्याची बायको ॲनिटा, मुलें व इतर स्नेही हे सर्व अर्थात् किनाऱ्यावर आले होते. परदेशाहून जहाज आलेलें असल्यामुळें क्वारंटाईन वगैरेचे नियमामुळें जहाजावरील लोकांस उतरण्यास वेळ लागला असता, परंतु ते सर्व नियम नाईस येथील लोकांचेच हातीं असल्यानें तो सर्व त्रास टळला. किनाऱ्यावर उतरतांच ग्यारीबाल्डीनें आपल्या आईस प्रेमानें कडकडून मिठी मारली व परस्पर सुखदुःखाच्या गोष्टी सांगत व मंडळींना भेटी देत देत आपल्या सोबत्यांसह तो घरीं जाऊन पोंचला.

परंतु तो घरीं फार दिवस राहिला नाहीं. कारण सरहद्दीवर लढाई आगाऊच जुंपलेली होती. इटलीस येतांच ग्यारीबाल्डीनें एकदम जिनोआस निघून जावें असें ठरलें होतें. त्याप्रमाणें तो लागलाच निघून गेला. जिनोआ येथें लोक त्याची वाट पाहत बसलेच होते. त्यांनीं त्याला नेण्याकरितां मुद्दाम एक जहाजहि पाठवून दिलें होतें. ग्यारीबाल्डी जिनोआ येथें पोंचतांच नाईसप्रमाणें तेथेंहि लोकांनीं जिकडे तिकडे आनंदोत्सव केला.

भाग ८ वा

स्वातंत्र्याचें घनघोर युद्ध

१८४८ हें साल युरोपच्या इतिहासांत अत्यंत स्मरणीय अशांपैकीं एक होऊन गेलें. या वर्षीं सर्व युरोप खंडांत किंबहुना सर्व पृथ्वीचे पाठीवर बंडें व राज्यक्रांत्या यांचें वादळ उठलें होतें. त्यामध्यें विशेषतः फ्रान्स देशांत भयंकर बंड होऊन फ्रेंच लोकांनीं लुई फिलिप बादशहास पदच्युत करून पुनः एकवार लोकसत्ताक राज्य स्थापिलें. इतर देशांतूनहि बंडें झालीं. परंतु त्या सर्वांत फ्रान्समधील बंडाचा व इटलीचा सर्वांत अधिक निकट संबंध होता. खुद्द इटलींत या सालीं जितकी बंडाळी झाली, तितकी मात्र युरोपांत कोठेंहि माजली नसेल व एकंदरीनें इटलीचें त्यापासून जितकें नुकसान झालें तितकें दुसऱ्या एकाद्या राष्ट्राचें क्वचितच झालें असेल.

इटलींतील बंडास १८४७ चे अखेरीस सुरुवात झाली. पार्मा, मिलन, लेगहॉर्न, मेसिना, पालर्मो वगैरे ठिकाणींहि बंडें झालीं. ही बातमी नेपल्स येथें जाऊन पोंहोचतांच फर्डीनंड राजाकडून अधिक हक्क संपादण्याकरितां लोकांनीं फिरून एकवार डोकें वर उचललें. फर्डीनंड हा जात्या भित्रा असल्या-मुळें त्यानें लोकांच्या मागण्या एकदम कबूल केल्या. इटलींतील सर्व संस्थानां-मध्यें पिड्मॉंट हेंच प्रमुख व सर्वांपेक्षां अधिक उदार. त्यानेंहि या वेळीं पुढारीपण घेऊन, यापुढें चार्लस आलबर्ट राजा हा स्वतंत्र (पायास) या नात्यानें राज्य करणार अशी द्वाही फिरविली. त्याचे पाठोपाठ टस्कनीनेंहि तोच कित्ता वळविला. पोप पीओनोनो यानेंहि आपल्या धर्माधिकाऱ्यांची सभा भर-वून आपल्या राज्यांतील प्रजेस राजकीय हक्क देणें कितपत प्रशस्त होईल याची वाटाघाट चालविली. प्रत्यहीं नवीन नवीन बंड होऊं लागलें, व ड्यूक, राजे वगैरे लोक लढाई करण्याचे भानगडींत न पडतां आपापले अधिकारांचे भराभर राजीनामेच देऊं लागले.

याच सुमारास फ्रान्समध्यें राज्यक्रांति घडून आली व नवीन स्थापलेल्या लोकसत्तात्मक राज्याच्या अध्यक्षानें जिकडे तिकडे आपल्या वकिलांमार्फत असें फर्माविलें कीं, व्हिएन्ना येथील तहानें ठरविलेल्या इटलीच्या स्थलसीमा कायम राखणें जरी प्राप्त आहे, तरी कोणत्याहि स्वतंत्र संस्थानावर कोणी पर-कीय राजा स्वारी करील तर फ्रान्सचें लोकसत्तात्मक राज्य त्या संस्थानाचा पक्ष घेऊन लढण्यास उभें राहील. या द्वाहीमुळें तर इटलींतील लोकांस बंडें करण्यास अधिकच उमेद आली. इतकें झाल्यावर ऑस्ट्रियास लढाई करणें प्राप्त आहे असें वाटूं लागलें.

ही संधि साधून पिड्मॉंटचे चार्लस आलबर्ट राजानें ऑस्ट्रियाविरुद्ध लढाई करण्यास कंबर बांधली. या वेळीं त्यानें कांकूं केलें असतें तर त्याला मुकाट्यानें राज्य सोडून जाणेंच भाग होतें. ऑस्ट्रिया व इटली ह्यांच्या लढाई-चें तोंड उत्तरेकडील लॉंबर्डी व व्हेनिस या प्रांतांत लागलें होतें, व तेथील लोकांस मदत करण्याचा इतरांनीं निश्चय केला. पिड्मॉंट येथील सैन्य घेऊन चार्लस आलबर्ट हा स्वतः मोहिमेस निघाला, व वाटेंत लोकांनीं ठिकठिकाणीं इटलीचा राजा या नांवानें त्याचा जयजयकार केला. परंतु त्याचे हातून म्हणण्यासारखा कांहीं कार्यभाग झाला नाहीं. त्याचे सैन्यास प्रथम एक-दोन जय मिळाले खरे, परंतु ऑस्ट्रियाचा सरदार मार्शल रॅडेट्स्की

हा जलदी करून मागें फिरला व ऑस्ट्रियाचे इतर सरदारांस जाऊन मिळाला. अशा रीतीनें चार्लस आलबर्ट राजाचा आळस व कांहींशी इतर संस्थानिकांनीं दाखविलेली मत्सरबुद्धि यामुळें या मोहिमेंतून फारसें कांहीं निष्पन्न झालें नाहीं. शिवाय अगदीं आयत्या वेळेस पोपनें ऑस्ट्रियाचे विरुद्ध लढण्याचें नाकारलें. यामुळें इटलीचे कार्यास थोडासा अडथळा आला.

चार्लस आलबर्ट हा रोव्हरबेला येथें तळ देऊन राहिला असतां ग्यारीबाल्डी हा त्यास भेटण्याकरितां गेला. चौदा वर्षांपूर्वीं या चार्लस आलबर्टनेंच ग्यारीबाल्डीस फांशीची शिक्षा ठरविली होती. परंतु आज उभयतांहि एकाच कार्यांत गुंतले असल्यामुळें त्या गोष्टीचें वैषम्य नाहींसें झालें असेल असें निदान ग्यारीबाल्डीस तरी वाटलें. बाकी कांहीं असलें तरी राजानें त्याची फांशीची शिक्षा अमलांत आणण्याचा हुकूम केला नाहीं हेंहि खरें. चार्लस आलबर्टनें ग्यारीबाल्डीस भेटण्याची परवानगी दिली येवढेंच नव्हे, तर त्याचे हातांत हात घालून दक्षिण अमेरिकेंत नांव मिळविल्याबद्दल त्याचें अभिनंदनहि केलें. ग्यारीबाल्डीनें "आपल्या सैन्यांतील एक शिपाई होऊन लढावें अशा इच्छेनें आलों आहें" अशी नम्र विनंति केली. परंतु चार्लस आलबर्टनें "तुम्ही ट्यूरीन येथें जा म्हणजे तुम्हांस कामगिरी सांगतील" असा जबाब दिला. परंतु ग्यारीबाल्डी हा नुकताच ट्यूरीन येथून आला असून तेथील अधिकाऱ्यांनीं "राजाकडे जा, म्हणजे कामगिरी मिळेल" असें सांगितलें. तात्पर्य, इकडून तिकडे व तिकडून इकडे असे हेलपाटे घालण्यास लावल्यानें ग्यारीबाल्डीस फार वाईट वाटलें.

परंतु झालेल्या गोष्टीचा विषाद न मानतां, मिलन येथील लोकांनीं अद्याप आपणाकडून लढाई चालविली होती, त्यांस मदत करण्यास ग्यारीबाल्डी निघून गेला. मॅझिनीचे लोक त्या ठिकाणीं पूर्वींच येऊन बसले होते. त्यांनीं बंडवाल्यांस उत्तेजन देण्याचें व मदत करण्याचें काम चालविलें होतें. राजानें आपले सैन्यांत कामगिरी सांगितली नाहीं, यामुळें ग्यारीबाल्डीचें विशेष नुकसान न होतां राजाचेंच एक प्रकारें नुकसान झालें. कारण, तो राजपक्षास येऊन आयताच मिळत होता तो मॅझिनीसारख्या बंडखोराच्या हातांत अचूक जाऊन पडला !

ग्यारीबाल्डी मिलन येथें जातांच त्यास तेथील अधिकाऱ्यांकडून लष्कर उभारण्याची परवानगी मिळाली व थोड्याच काळांत त्यानें ३०,००० स्वयं-

सेवक जमविले. पुढें लवकरच ऑस्ट्रियन सैन्यानें मिलन शहरास वेढा दिला व ग्यारीबाल्डीस शहर लढविण्याचे कामीं आपले लोक घेऊन येण्यास पाचारण झालें. परंतु चार्लस आलबर्ट हाहि त्या सुमारास मिलन येथें आला व त्यानें कुणाचा सल्ला न घेतां ऑस्ट्रियन लोकांशीं एकदम तहाचें बोलणें लाविलें. या तहाचे योगानें मिलन ऑस्ट्रियाचे ताब्यांत गेलें ही गोष्ट ग्यारीबाल्डीस अर्थातच आवडली नाहीं. लढाईचें तोंड लागलें असतां विनाकारण आपल्या अनहिताचा तह करावयाचा व तरवारी म्यानांत फुकट घालून ठेवावयाच्या यापेक्षां अधिक शरमेची गोष्ट कोणती? तेव्हां आपण तरी होतां होईतोंपर्यंत लढूं, असा ग्यारीबाल्डी व त्याचे कांहीं सोबती यांनीं निश्चय केला. मॅझिनी-लाहि चार्लस आलबर्ट राजाचें करणें पसंत नव्हतें. त्यानेंहि त्यास कांहीं थोडे लोक व द्रव्य देण्याचें कबूल केलें. परंतु राजानें तह कबूल केलेला असल्यामुळें ग्यारीबाल्डीनें लढाई चालविणें म्हणजे ऑस्ट्रिया व चार्लस आलबर्ट या उभयतांच्या विरुद्ध बंडखोरपणा करण्यासारखें होतें. तथापि ग्यारीबाल्डीनें तें कांहीं एक मनामध्यें न आणतां आपल्या बरोबरीचें सैन्य घेऊन तो ऑस्ट्रियाविरुद्ध लढाई करण्यास निघाला. त्यानें एक विनंतिपत्र प्रसिद्ध करून त्यामध्यें लोकांस असें जाहीर केलें कीं, " चार्लस आलबर्ट राजा हा इटली देशाचा पक्का वैरी आहे. कारण त्यानें असा मित्रेपणाचा तह करून हातचें मिलन घालविलें; यापुढें जो कोणी इटलींतील ऑस्ट्रियन लोक हद्दपार होईपर्यंत लढाई थांबवा असें म्हणेल तो आपला शत्रु असें समजून आपण त्याचें पारिपत्य करूं."

ग्यारीबाल्डी आपलें सैन्य घेऊन आल्प्स पर्वताचे पायथ्यास गेला. तेथून ऑस्ट्रियन लोकांबरोबर त्यानें लढाई चालविली. लॅगोमॅग्युअर नांवाच्या सरोवरावर ऑस्ट्रियाचीं दोन जहाजें असतां त्यानें त्यांवर आपले १५०० लोक चढवून तो लुईनो येथें गेला. यानंतर लवकरच ग्यारीबाल्डीची व ऑस्ट्रियाचे सैन्याच्या एका तुकडीची चकमक उडाली. त्यांतहि त्यास यश आलें. परंतु सुमारें अर्ध्या तासांत ऑस्ट्रियन लोक फिरून जमाव करून परत आले. या वेळेस ग्यारीबाल्डीस ताप आला होता तरी तो तसाच घोड्यावर स्वार झाला. ऑस्ट्रियन लोक आले ते कांहीं एक कळूं न देतां एकदम ग्यारीबाल्डीचे सैन्यांत घुसले. संध्याकाळची वेळ झाली होती व ग्यारीबाल्डीचे लोक रात्रीची विश्रांति घेण्याकरितां व्यवस्था करूं लागले होते. अशा वेळीं शत्रूनें गांठल्यामुळें त्यांची थोडी धांदल झाली. परंतु ग्यारीबाल्डी हातांत तरवार घेऊन सर्वांचे

पुढें झाला व त्यानें आपल्या लोकांस उत्तेजन देऊन शत्रूस मागें हटविलें. परंतु पुढें फारसा निभाव लागणार नाहीं असा विचार करून ग्यारीबाल्डी रातोरात ती जागा सोडून परत फिरला. त्यानें आरोना येथें आपले सर्व लोक एकत्र केले व यापुढें लढाई चालविणें शक्य नाहीं असें ठरवून त्यांस घरोघर जाण्यास परवानगी दिली व आपण स्वतः एकटाच स्वित्सर्लंडकडे जावयास निघाला. वाटेंत कदाचित् कोणी ओळखील म्हणून त्यानें एका शेतकरी कुणब्याचा पोषाख अंगावर घातला व त्या प्रदेशांतील एक वाटाड्या बरोबर घेतला. अंगांत ताप होताच, तरी ग्यारीबाल्डी मजल दरमजल करून स्वित्सर्लंडांत पोंचला. स्वित्सर्लंडांत जाण्याचें कारण असें होतें कीं, ग्यारीबाल्डीनें तहाचे विरुद्ध वर्तन केल्यामुळें चार्लस आलबर्ट राजानें त्यास पिड्मॉंट प्रदेशांत परत येण्याची मनाई केली होती.

स्वित्सर्लंडांत कांहीं दिवस राहून तापांतून बरा झाल्यावर ग्यारीबाल्डी नाईस येथें गेला व तेथें आपल्या आईस व बायकामुलांस भेटून तो जिनोआ येथें गेला. जिनोआ येथें तो असतां चार्लस आलबर्ट राजानें ग्यारीबाल्डीस निरोप पाठवून पिड्मॉंट येथें परत बोलाविलें व आपले सैन्यामध्यें बहुमानाची जागा देण्याचें वचन दिलें. ग्यारीबाल्डीनें अमेरिकेंत व इटलीमध्यें केलेले पराक्रम पाहून व त्याची निःस्पृहता जाणून, हा मनुष्य केवळ बंडवाला नसून इटलीचा खरोखर हितकर्ता आहे अशी त्याची आतां खात्री झाली होती. परंतु ग्यारीबाल्डी हा अशा कोरड्या बहुमानाचा थोडाच भुकेला होता! त्यानें तो बहुमान तर नाकारलाच; परंतु चार्लस आलबर्ट राजास त्यानें उलट असें सांगून पाठविलें कीं, व्हेनिस शहर ऑस्ट्रियाशीं मोठ्या शौर्यानें लढत आहे त्यास मदत करण्यास मी जाणार. व खरोखरच त्यानें २५० लोक जमविले व तो जिनोआहून व्हेनिसकडे जाण्यास निघाला; परंतु वाटेंतच त्यास रोमकडील खबर कळली, त्यामुळें त्यानें व्हेनिसला जाण्याचा आपला बेत बदलला.

इकडे रोममध्यें अशी हकीकत घडून आली होती कीं, पोप पिओनोनो यानें जरी लोकपक्षाकडे आपला कल प्रथम दाखविला होता, तरी ऑस्ट्रियाशीं प्रत्यक्ष लढाई सुरू झाल्यावर त्याच्या कमकुवत व चंचल मनाला धीर धरवेना व त्यानें इतर संस्थानिकांस मदत करण्याचें आयत्या वेळीं नाकारलें. पुढें युद्धामध्यें चार्लस आलबर्ट राजाचे सैन्याचा पराभव झाल्यामुळें तर पिओनोनो-चा विचार अर्थातच कायम झाला. परंतु रोम येथील लोकांस त्याचें करणें

मुळींच पसंत नव्हतें. यामुळें रोमच्या राजसभेंत बरेच तंटेबखेडे झाले. मेमियानी नांवाचा, लोकपक्षास अनुकूल असा, एक मुख्य मंत्रि होता, त्यास पोपनें काढून त्याचे जागीं कौन्ट रॉमी या नांवाच्या मनुष्याची नेमणूक केली; परंतु तो अत्यंत अप्रिय असल्यामुळें लवकरच कोणी त्याचा खून केला. इतकें घडून आल्याबरोबर शहरांत जिकडे तिकडे एकच बंडाळी माजली. लोक हातांत शस्त्रें घेऊन रस्त्यांतून बेफामपणें फिरूं लागले. आतां लवकरच बंड होणार अशी भीति वाटून पोप व धर्माध्यक्ष मंत्रिमंडळ किल्ल्यांत दडून राहिलें. दुसरे दिवशीं लोकांनीं पोपचे वाड्यास वेढा दिला व राज्यामध्यें एक लोकसभा नेमावी व लोकनियुक्त मंत्रिमंडळ स्थापावें अशी मागणी केली. त्यास पोप कबूल होईना. मग लोकांनीं वाड्याचे दरवाजास तोफा लाविल्या, तेव्हां निरुपाय होऊन त्यास त्यांच्या बऱ्याच मागण्या कबूल कराव्या लागल्या.

पोप रोममधून निघून गेल्याबरोबर मागें रोमच्या लोकांनीं एकदम प्रजासत्ताक राज्याची द्वाही फिरविली. रोम येथील बंडाची बातमी ग्यारीबाल्डीस व्हेनिसला जात असतांनाच वाटेंत कळली. त्याबरोबर तो व्हेनिसकडे न जातां एकदम रोमकडे वळला. व्हेनिसपेक्षां रोमवर ग्यारीबाल्डी व मॅझिनी यांची अत्यंत प्रीति होती. रोमच्या नांवामध्यें इटलीच्या सर्व वैभवाची जादू भरून राहिली होती; आणि रोम स्वतंत्र केल्याशिवाय इटलीचें स्वातंत्र्य कधींहि सिद्ध, निदान सार्थ तरी होणार नाहीं असें प्रत्येक देशभक्ताच्या मनानें घेतलें होतें. लहानपणापासून रोमच्या नांवाचा किंवा दर्शनाचा कांहीं एक विलक्षण परिणाम ग्यारीबाल्डीच्या मनावर होत असे. तें रोम शहर आज प्रत्यक्ष बंड करण्यास उठलें आहे, येवढेंच नव्हे तर लोकांच्या भयानें जुलमी पोप रोम शहर सोडून पळून गेला आहे, ही बातमी कळतांच ग्यारीबाल्डीनें आपले इतर सर्व बेत जसाचे तसे ठेवून रोमकडे धांव घेतली!

या वेळेस मॅझिनीहि रोममध्यें आला होता. तो येतांच शहरांतील सर्व लोक लढाई करण्यास सज्ज झाले. आतां पोप फिरून रोमला परत येत नाहीं हें एक, किंवा आलाच तर परकीय सैन्याचे मदतीनें येऊन पूर्वीपेक्षां अधिक जुलमाचें राज्य करण्यास येणार! असें पाहून मॅझिनीच्या सल्ल्यानें रोमच्या नागरिकांनीं स्वतंत्र लोकसत्तात्मक राज्य स्थापण्याचें ठरविलें, व ठिकठिकाणीं लोक जमवून त्यांनीं नवीन राष्ट्रसभेमध्यें बसण्याकरितां आपल्यातर्फे प्रतिनिधीहि निवडून दिले. या निवडणुकीमध्यें मॅझिनी हा रोमच्यातर्फे व ग्यारीबाल्डी

मॉंसिरेटा या गांवाच्यातर्फें असे सभासद निवडले गेले. अशा रीतीनें कांहीं एक रक्तपात न होतां रोम बंडवाल्यांचे ताब्यांत आलें व त्यांनीं तेथें स्वतंत्र प्रजासत्ताक राज्यहि स्थापिलें.

पोप रोम सोडून निघून गेलाच होता. त्यानें गेटा येथील मुक्कामाहून युरोपांतील रोमन क्याथोलिक मताच्या राजांकडून मदत मागितली. ही मागणी फ्रान्स, स्पेन, ऑस्ट्रिया व नेपल्स इतक्या संस्थानांचे राजांनीं कबूल केली. प्रथम कांहीं दिवस कोणीच वचनाप्रमाणें लढण्याचे कामीं पुढारी-पण घेईना; परंतु चार्लस आलबर्ट राजाचा नोव्हेरा येथें पराभव झाल्याबरोबर ऑस्ट्रियास रोमकडे लक्ष देण्यास फावलें. फ्रान्स, ऑस्ट्रिया व नेपल्स या तिन्हीं संस्थानांचीं सैन्यें तिन्हीकडून एकदम रोमकडे येण्यास निघालीं. दक्षिणेकडून सिसिलीचा राजा फर्डीनंड याचेंहि सैन्य रोमवर चालून आलें. तेव्हां आतां रोमचा पुढें बचाव कसा करावयाचा याची मॅझिनी, ग्यारीबाल्डी वगैरे लोकांस पंचाईत येऊन पडली. वास्तविक रोममध्यें लोकसत्ताक राज्य स्थापिलें होतें, व आपल्या काळजावरून पोपचें मोठें दडपण एकदांचें निघालें या भरंवशानें रोमचे नागरिक लोक मोठ्या आनंदांत होते. शहरांत कोठें दंगाधोपा किंवा कांहीं एक गडबड न होतां नवीन स्थापिलेलें राज्य शिस्तीच्या मार्गास लागलें होतें. परंतु अद्यापि रोमच्या बाहेरचे लोक तटस्थ असल्यामुळें रोमच्या नागरिकांस बाहेरून मदत होईल अशी फारशी आशा नव्हती. अशा स्थितीमध्यें रोमच्या लोकांनीं आपला आपणच कसा बचाव करावा या विवंचनेंत बंडवाल्यांचे पुढारी पडले.

इतक्यांत ग्यारीबाल्डी रोम शहरास आला. त्याचेपुढें हें लढाईचें ताट वाढून ठेवलेंच होतें; आणि तें त्यास हवेंच होतें. शहरची व्यवस्था करण्या-करितां मॅझिनी व इतर दोन गृहस्थ अशा तिघांस राज्यकारभाराची पूर्ण मुखत्यारी मिळालेली होती. त्यांचे परवानगीनें 'कर्नल' ग्यारीबाल्डी हा रीटी नांवाच्या किल्ल्यांत परत गेला व तेथें त्यानें तटबंदीची दुरुस्ती करून आगाऊ असलेल्या व प्रत्यहीं नवीन नवीन येऊन मिळणाऱ्या शिपायांना पोषाख वगैरे देऊन कवाईत शिकविण्यास प्रारंभ केला. या वेळीं ग्यारीबाल्डीजवळ सुमारें २५०० सैन्य होतें. त्यामध्यें मॉंटीव्हिडो येथें त्याच्या लष्करांत असलेले पांचपन्नास शिपाई, तसेंच व्हेनिसहून नोकऱ्या सोडून देऊन आलेले ३०० सरकारी नोकर, ४०० युनिव्हर्सिटीचे विद्यार्थि असे निरनिराळ्या प्रकारचे

लोक होते. ग्यारीबाल्डी तापांतून नुकताच उठलेला असून या नवीन उद्योगांत त्याला स्वस्थता मुळींच मिळत नसे. तथापि त्यानें लष्कर जमविण्याचें व कवाईत शिकविण्याचें काम खूप जारीनें सुरू केलें होतें. त्याचें उदाहरण पाहून त्याचे लोकहि परस्परांशीं एकदिल व देशकार्यांत तल्लीन होऊन गेले होते.

चार्लस आलबर्ट राजा अद्याप समरांगणांत उभा होता. रोमच्या नवीन अधिकाऱ्यांचा प्रथमचा बेत त्यास कुमक करण्याकरितां कांहीं सैन्य पाठविण्याचा होता. परंतु पुढें लवकरच नोव्हेरा येथें चार्लस आलबर्ट याचा ऑस्ट्रियन सरदारानें पराभव केला. इकडे फ्रान्स व ऑस्ट्रिया यांचीं सैन्येंहि मजल दरमजल करीत रोमवर येत होतीं. या दोन सैन्यांपैकीं फ्रान्सच्या सैन्यानें आपण रोममधील लोकसत्तात्मक राज्य मोडण्यास आलों नसून, पोपच्या राज्यांत शांतता करण्याकरितांच आलों आहों, अशी बतावणी केली. या बतावणीस मात्र मॅझिनी फसला. परंतु ग्यारीबाल्डीला खरें वर्म माहीत असल्यामुळें त्यानें होतां होईल तितकें करून फ्रान्सचे सैन्यास आपण रोमचे आसपासहि येऊं देऊं नये व त्याजबरोबर एकदम लढाई करावी असा सल्ला देऊन सभेचें मन वळविलें.

लढाईचा निश्चय जाहीर होतांच रोम शहरांत रस्तोरस्तीं तट घालून त्यांवर ठिकठिकाणीं तोफांचे मोर्चे लावण्याची सुरुवात झाली व लोक शहराचा बचाव करण्याची तयारी करूं लागले. इकडे ग्यारीबाल्डी दृष्टीस पडतांच हजारों लोकांच्या झुंडीच्या झुंडी एकदम 'ग्यारीबाल्डी, ग्यारीबाल्डी' अशा शब्दांनीं आनंदाच्या आरोळ्या ठोकूं लागले. फ्रेंच सरदाराचें सैन्य रोमवर चालून येत होतें त्यास वाटेंतच प्रतिबंध झाला, व तेथेंच एक लहानशी लढाई झाली. ही बातमी रोम शहरीं येतांच क्यापिटॉल या प्रचंड इमारतींतील मोठ्या घंटा दणादण वाजूं लागल्या. शहराचे कोटावरून तोफांचाहि धडाका सुरू झाला व हजारों लोक आपापलीं कामेंधामें सोडून हातास येतील तीं हत्यारें घेऊन धांवत सुटले. कारण या ठिकाणींच रोमन सैन्याची व फ्रेंच सैन्याची प्रथम गांठ पडणार अशी त्यांची अटकळ होती. रोम शहरांतून लढाऊ नागरिकांचा जो हा लोंढा बाहेर पडला, त्याचेपुढें फ्रेंच लोकांचा टिकाव लागेना. तेव्हां त्यांनीं शहरचे दुसरे बाजूस आपला मोर्चा फिरविला; परंतु त्या ठिकाणीं ग्यारीबाल्डी हा आगाऊच सज्ज होऊन बसलेला असल्या-

मुळें त्यानें त्यांजवर एकदम हल्ला करून शत्रूचा धुव्वा उडविला. या चकमकींत यश आल्यामुळें रोमन नागरिकांस अधिकच स्फुरण चढलें.

दुसरे दिवशीं ग्यारीबाल्डी कुमक घेऊन पुनः हल्ला करणार, तों फ्रेंच सरदार ओडीनॉट यानें मॅझिनीशीं तहाचें बोलणें लाविलें. फ्रान्समधील प्रजासत्ताप्रिय लोकांकडून पुढें मागें बरीच मदत होईल, अशी मॅझिनीस आशा वाटत होती. यामुळें पुनः एकवार फ्रेंच सैन्याचा पराभव करून ती आशा कायमची गमवावी हें त्यास बरें वाटेना. याकरितां त्यानें ग्यारीबाल्डीस परत फिरण्याचा हुकूम दिला. ग्यारीबाल्डीस फ्रेंच सरदाराचें कपट माहीत होतें, म्हणून शत्रूचा पुरा मोड करण्याची ही अमोलिक संधि दवडण्याचें त्याच्या मोठें जिवावर आलें, परंतु करतो काय? तो ताबेदार पडला? मॅझिनी हा नवीन स्थापलेल्या लोकसत्ताक राज्याचा एक मुख्य अधिकारी होता व या वेळीं त्याचेच हातीं सर्व लोकसभा आलेली होती. म्हणून त्याचा हुकूम ग्यारीबाल्डीस मानावा लागला.

इकडे तहाचें बोलणें चाललें असतां, फ्रेंच सैन्य हळूहळू इटलींत भरत चाललें होतें. लढाई बंद असल्यामुळें त्याविरुद्ध ग्यारीबाल्डीस कांहीं करतां येईना; परंतु त्यास मध्येंच एक दुसरी कामगिरी मिळाली. नेपल्सचा राजा फर्डीनंड रोमवर चालून येत होता हें मागें सांगितलेंच आहे. त्याचे तोंडावर लोकसभेनें ग्यारीबाल्डीस ४००० सैन्य देऊन एकदम गुप्तपणें पाठविलें. परंतु त्या वेळीं त्याला मुख्य सरदार न करतां रॉझेली या नांवाच्या सरदारास ती बहुमानाची जागा दिली गेली! तथापि याबद्दल यत्किंचितहि विषाद न मानतां, आपलें सैन्य घेऊन ग्यारीबाल्डी निघाला तो सोळा तासांची एकदमानें मजल मारून झॅरगारोला येथें फर्डीनंडच्या सैन्याचे वाटेवर जाऊन छावणी देऊन राहिला. पुढें लवकरच शत्रूची व ग्यारीबाल्डीच्या सैन्याची गांठ पडली. ही लढाई पुष्कळ वेळपर्यंत चालली व तींत ग्यारीबाल्डीस एक-दोन जखमाहि झाल्या. परंतु त्याचे सैन्यानें त्याचेप्रमाणेंच मोठी मर्दुमकी केली, शेवटीं फर्डीनंडचें सैन्य २०,००० असूनहि त्याचा मोड होऊन तें पळत सुटलें, तें पुढें दोन दिवसांत सरहद्दीच्या पार निघूनहि गेलें.

इकडे जनरल ओडीनॉट याला फ्रान्समधून सैन्याची कुमक मिळाल्यामुळें तहाचें बोलणें तसेंच राहून तो फिरून रोम शहरावर आला. तेव्हां फिरून रोमशीं लढण्याची तयारी सुरू झाली. लागलीच ग्यारीबाल्डीस फर्डीनंडच्या

सैन्याचे पाठीवरून परत बोलावण्यांत आलें. नेपल्सच्या सैन्याचा पुरा मोड केल्याशिवाय परत फिरणें हेंहि ग्यारीबाल्डीच्या जिवावरच आलें होतें. कारण त्याचे नांवाची त्या सैन्यावर विलक्षण दहशत बसली होती. ग्यारीबाल्डी हा माणूस नसून केवळ 'सैतान' आहे. खुद्द पोपमहाराजांनीं आपल्या हातानें मंत्रून दिलेल्या तरवारीचे त्याचेविरुद्ध लढतांना खटाखट तुकडे पडावे, व त्यांनीं पवित्र करून दिलेल्या रुपेरी गोळ्यांपैकीं एक सुद्धां गोळी त्याचे अंगांत शिरूं नये हें तो कोणी खरोखर सैतान असल्याशिवाय होणें शक्य नाहीं, असेंहि त्यांना वाटूं लागलें होतें. परंतु त्या सैन्यापासून आतां भीति उरलेली नव्हती.

इकडे फ्रेंच सैन्य रोमच्याजवळ असल्यामुळें शहरास वेढा बसणार अशी भीति उत्पन्न झाली; तेव्हां ग्यारीबाल्डी त्याच्या पाठलागाचें काम एकदम सोडून देऊन मागें फिरला. फ्रान्सचें दुटप्पी वर्तन चालू होतें. प्रथम तहाचें बोलणें लाविल्यापासून फ्रान्सचा वकील एम्. डी. लिसेप्स हा अद्यापि तहाचें बोलणें चालवीत होताच. तहनाम्यावर सही होण्यास व जनरल ओडीनॉट रोमजवळ येण्यास एकच गांठ पडली. त्यानें 'मी तहनामा मुळींच जुमानीत नाहीं, कारण तुम्हीं आपल्या अधिकाराबाहेरील गोष्ट केली आहे' असें लिसेप्स यास बोलून झालेला तह एका शब्दानें मोडून टाकला, व गुप्तपणानें रोम शहराच्या आसपासचीं ठाणीं एकदम काबीजहि केलीं. अद्याप ग्यारीबाल्डी हा रोम येथें येऊन पोंचावयाचा होता. तोंच शहरामध्यें पुनः एकवार पहिल्याप्रमाणें गडबड सुरू झाली. भयसूचनार्थ कॅपिटॉलमधील मोठ्या घंटा पुन्हा घणघण वाजूं लागल्या, जिकडे तिकडे नौबदीहि झडूं लागल्या, व पुन्हा लोक हातांत शस्त्रें घेऊन सैरावैरा धांवूं लागले.

ग्यारीबाल्डी येऊन पोंचतांच त्यानें लढाईचें काम एकदम सुरू केलें; परंतु या वेळीं ओडीनॉट याचें सैन्य पुष्कळच असल्यामुळें ग्यारीबाल्डीच्या शूर शिपायांचेंहि कांहीं चालेना! यामुळें वेढ्याचे पहिल्या दिवशीं संध्याकाळपर्यंत शहराच्या आसपासचीं बरींच ठाणीं शत्रूच्या हातीं गेलीं. शहरांतील लोकांस मोठी चिंता उत्पन्न झाली. ग्यारीबाल्डीनें शहरचे तटावरून तोफांची मारागिरी करण्यास सुरुवात केली व मधून मधून एकदम खालीं उतरून शत्रूवर हल्ले करण्याची युक्तीहि योजून पाहिली. तथापि शत्रूस फारसा प्रतिबंध होईना. शिवाय टायबर नदीवरील पुलाखालीं दारूगोळ्याचें एक जहाज घालून पूल उडवून टाकण्याने

कृत्यांतहि त्यास यश आलें नाहीं. अशा स्थितीमध्यें जेवढा दिवस रोम शत्रूच्या हातीं न लागतां जाईल तेवढा भाग्याचा, असें आंतील लोकांस वाटूं लागलें होतें. अजूनहि मॅझिनीस लिसेप्सनें केलेला तहनामा फ्रान्स मंजूर करील अशी आशा होती. परंतु तिची लवकरच निराशा झाली. कारण फ्रान्स येथील सरकारनेंहि जनरल ओडीनॉटप्रमाणें लिसेप्स याचा तहनामा करण्याचे बाबतींत अधिकार नाकबूल केला. वास्तविक असें होण्याचें मुख्य कारण असें होतें कीं, जनरल ओडीनॉट यास हवी तितकी कुमक मिळाली होती व आतां रोम हातीं येणार अशी त्यांस बळकट आशा उत्पन्न झाली होती.

याप्रमाणें निराश होतांच रोमन लोक रागानें अगदीं बेफाम होऊन गेले. मॅझिनी व त्याचे बरोबरीचे इतर दोघे अध्यक्ष यांनीं, शहराची राखरांगोळी झाली व लोक त्यांत बुडून गेले तरी चिंता नाहीं, परंतु लढाई ही करावयाची असा निश्चय केला. परंतु आतां तसें करणें म्हणजे निव्वळ मूर्खपणाचें आहे असें ग्यारीबाल्डीचें मत पडलें. यामुळें मॅझिनी व ग्यारीबाल्डी यांचें खडाजंगी भांडण झालें. तें इतकें कीं, यापुढें आजन्मांत त्यांचा बेबनाव समूळ नाहींसा झाला नाहीं! असो. दिवसेंदिवस रोमच्या भोंवतालचे पाश अधिकाधिकच आखडूं लागले. फ्रेंच सैन्यानें शहरासभोंवार तोफा लाविल्या व गोळ्यांचा भडिमार चालविला. एकेका रात्रीं दीडदीडशें गोळे शहरांत येऊन आदळत व त्यामुळें शहरांतील व आसपासच्या इमारती व बागबगीचे अगदीं जमीनदोस्त होऊन जात. असें होतां होतां अखेरीस जूनचे ३० व्या तारखेस शेवटचा निकराचा हल्ला झाला. पहांटे दोन वाजल्यापासून ग्यारीबाल्डी हातांत तरवार घेऊन आपले शूर व करारी लोक घेऊन लढण्यास निघाला. प्रथम कांहीं वेळपर्यंत फ्रेंच सैन्याचा पाय पुढें पडेना; परंतु एवढ्या सैन्यापुढें आंतील लोकांचा निभाव कितीसा लागणार! शेवटीं आतां मागें फिरल्याशिवाय दुसरी तोडच नाहीं असें झाल्यावर, त्यानें रोमच्या अधिकाऱ्यांस निरोप पाठवून यापुढें लढणें अशक्य आहे असें कळविलें. मॅझिनी प्रभृति अध्यक्षांनीं सभा बोलाविली. रक्तानें माखून गेलेला व बंदुकीच्या गोळ्या आणि तरवारीचे घाव यांनीं अंगावरील कपड्यांच्या चिंध्या झालेल्या, अशा स्थितींत ग्यारीबाल्डी सभेपुढें येऊन हजर झाला; यापुढें लढण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असें त्यानें त्यांस फिरून सांगितलें, व त्याप्रमाणें लढाई बंद करावी असा हुकूम सुटला.

पुढें दोन-तीन दिवस तह जमविण्यांत गेले. आतां रोम सोडून जावें लागणार या विचारानें ग्यारीबाल्डीस फार दुःख झालें. परंतु या शहरांत राहण्यांत खास धोका आहे असें झालें तेव्हां त्यानें आपले सर्व शिपाई सेंटपिटर्सच्या देवळांत गोळा केले व त्यांस उद्देशून तो म्हणाला—"माझ्या शूर शिपायांनो! तुम्हांस देण्यास मजजवळ कांहींच उरलें नाहीं. एवढेंच नव्हे, तर मजबरोबर जो कोणी येईल त्यास यापुढें निवाऱ्याची झोपडीसुद्धां मिळणार नाहीं. तहान, भूक, ऊन, वारा हींहि सोसावीं लागतील. अन्नावांचून मुठींत जीव घेऊन लांबलांबच्या मजलाहि माराव्या लागतील, अशी स्थिति आहे. इतक्यांतूनहि कोणास मजबरोबर यावयाचें असल्यास खुशाल चलावें." हें भाषण संपतांच ४००० लोक त्याचेबरोबर जाण्यास तयार झाले व पुढें एक क्षणाचाहि विलंब न लावतां रोम सोडून टस्कनीच्या पहाडाच्या आश्रयाला जावयाचें असा बेत करून ही शूर शिपायांची टोळी ट्रिव्होलीच्या रस्त्यास जाऊन मिळाली. ग्यारीबाल्डी शहरांतून निघून गेला, ही बातमी कळतांच त्याच दिवशीं संध्याकाळीं चार वाजतां पोपचें निशाण रोमच्या किल्ल्यावर पुन्हा फडकूं लागलें, व फ्रेंच जनरल ओडीनॉट आपलें सैन्य घेऊन रोममध्यें शिरला.

भाग ९ वा

दुर्दैवाचा कळस

संपदसंपदं विपद् विपदमनुबध्नाति

—कादंबरी

ग्यारीबाल्डीनें रोम सोडल्यापासून पुढें त्याजवर इतके बिकट व चमत्कारिक प्रसंग आले कीं, त्यांची एक चांगली कादंबरीच बनेल. निघतांना ग्यारीबाल्डीनें आपल्याबरोबरचे सैन्यास अगदीं अवश्य ते पैसे सरकारी खजिन्यांतून घेतले. परंतु त्यांतली आपल्या स्वतःच्या उपयोगाकरितां त्यानें एक पैहि खर्चिली नाहीं. स्वतःच्या खर्चाकरितां त्यानें आपलें घड्याळ विकलें!

वाट चालूं लागल्यावर त्यास प्रथम अडचण आली ती अशी कीं, त्याचे बरोबरीचे लोक त्यास हळूहळू सोडून जाऊं लागले. शिवाय आपणांस ठिकठिकाणचे लोक येऊन मिळतील व आपणांस गांवोगांवचे लोक आनंदानें मदत करतील अशी जी त्यास आशा होती तीहि व्यर्थ आहे असें त्यास कळून येऊं लागलें. चोहोंकडे ऑस्ट्रियन सैन्य पसरलें असल्यामुळें त्यांची गांठ पडण्याची भीतीहि उत्पन्न होऊं लागली. रात्रीं उठून मजला माराव्या व दिवसा कोठें तरी सुरक्षित ठिकाण पाहून उतरावें, असा क्रम ग्यारीबाल्डीनें चालविला. अनोळखी मुलुखांतून हिंडावयाचें व वाटाड्या पाहावा तों मुळींच मिळेना! अशा बिकट अडचणींतून ग्यारीबाल्डीनें सॅन मेरिनो येथपर्यंत मजल मारली. येथें मात्र त्यास आशा उत्पन्न होण्यासारखें लोकांकडून आश्वासन मिळालें.

ग्यारीबाल्डी आला असें कळतांच तेथील छोटेखानी लोकसत्ताक राज्यानें त्याचें स्वागत करण्याकरितां आपले कांहीं अधिकारी त्यास सामोरे पाठविले. परंतु येथेंहि ऑस्ट्रियाचें सैन्य त्याच्या मागोमाग येऊन ठेपलेंच! त्याबरोबर ग्यारीबाल्डीचे लोकांची किंचित् धांदल झाली व बरेच लोक शत्रु दिसण्यापूर्वींच पळूं लागले. या वेळीं खुद्द त्यानें आणि स्वतः ॲनिटा हिनें त्या पळपुट्या शिपायांची निर्भर्त्सना करून त्यांस उत्तेजन आणण्याचा प्रयत्न केला; परंतु त्याचीहि त्यांस शरम वाटली नाहीं. सॅन मेरिनो येथील अधिकाऱ्यांनीं ऑस्ट्रियाचें सैन्य जवळ येऊन ठेपलें असतांहि मोठ्या उदारपणानें व धैर्यानें ग्यारीबाल्डीचे उरलेल्या लोकांस कांहीं शिधासामुग्री दिली, आणि पुढील मुक्कामीं पोंचतें करण्याचें त्यांस आश्वासन देऊन ग्यारीबाल्डीस व त्याचे बायकोस जवळच्या एका देवळांत राहण्याची सोय करून दिली. परंतु आतां पुढें निभाव लागणें कठीण असें पाहून ग्यारीबाल्डीनें उरलेल्या लोकांस येथूनच रजा द्यावी व आपण कोठें तरी निघून जावें, असा विचार केला. दुसरे दिवशीं देवळाचे पायऱ्यांवर उभा राहून आपल्या सैन्यास उद्देशून तो म्हणाला—"मजबरोबर येण्याचें तुम्हीं मला जें वचन दिलें होतें त्यामधून मी आज तुम्हांस मुक्त करतों. तुम्ही आतां आपल्या घरीं किंवा वाटेल तिकडे जा. परंतु येवढें मात्र नेहमीं लक्षांत ठेवा कीं, इटली परकीयांच्या दास्यांत दीन होऊन राहिलेला पाहण्यापेक्षां मरण बरें." हे वीरश्रीचे शब्द बोलून त्यानें त्यांस रजा दिली.

इकडे सॅन मेरिनोचे सरकारमार्फत ग्यारीबाल्डीनें आपल्या स्वाधीन व्हावें

अशाविषयीं ऑस्ट्रियन सरदारानें बोलणें चालविलें. प्रथम त्याचें म्हणणें ग्यारीबाल्डीनें हत्यार खालीं ठेवून आपणास शरण यावें असें होतें. परंतु या अटीचा ग्यारीबाल्डीनें धिक्कारपूर्वक निषेध केला. तेव्हां ग्यारीबाल्डीनें निदान इटलींत तरी राहूं नये, अमेरिकेस निघून जावें, असें पुनः बोलणें सुरू झालें. तेव्हां ग्यारीबाल्डीनें, आपणच कोठें तरी गुप्तपणें निघून जाऊन सॅन मेरिनो येथील सरकारास विवंचनेंतून सोडवावें, असा निश्चय केला व त्याप्रमाणें मध्यरात्रीचे सुमारास कांहीं निवडक लोक बरोबर घेऊन तो निघाला.

ॲनिटाहि अर्थात् त्याचेबरोबर होती. तिची प्रसूतीची वेळ जवळ जवळ येऊन ठेपली होती व ती बरीच आजारी होती. म्हणून "सॅन मेरिनो येथेंच तूं राहा, येथील लोक चांगले ममताळु आहेत, ते तुला चांगली मदत करतील" असें त्यानें तिला परोपरीनें सांगून पाहिलें. परंतु त्या शूर, करारी व उदार स्त्रीस या सूचनेचा अतिशय राग आला, व "मजवर तुमची प्रीतीच नाहीं, मी तुम्हांला जवळ नको, मला टाकून द्यावयाचा तुमचा विचार आहे म्हणून तुम्ही हें सर्व मायाजाळ पसरतां आहां असें वाटतें" असें निष्ठुरतेचें उत्तर तिनें ग्यारीबाल्डीस दिलें. तेव्हां अर्थातच निरुत्तर होऊन तिला बरोबर घेणें त्यास भाग पडलें. परंतु सर्व लष्करांत ही एकच स्त्री होती. याकरितां तिचें वेषांतर करणें अवश्य होतें. म्हणून पहिल्याच मुक्कामावर ग्यारीबाल्डीनें एका स्त्री-कडून ॲनिटाचे सर्व केस कातरले, तिला पुरुषाचे कपडे अंगांत घालावयास दिले व बसावयास एक घोडा दिला. याप्रमाणें ॲनिटा ही घोडेस्वार बनून आपल्या नवऱ्याबरोबर प्रवास करण्यास सिद्ध झाली.

यापुढें ग्यारीबाल्डीबरोबर सारे २०० लोक उरले. त्यांस घेऊन तो ॲड्रि-ॲटिक समुद्राचे किनाऱ्यावरील कोणत्या तरी एका बंदरांत जाण्याच्या उद्देशानें निघाला. वाटेंत गॅलोपिनी या नांवाचा एक स्नेही त्यास भेटला व त्याचे-बरोबर सेझेंटीको या गांवचे बंदरास ग्यारीबाल्डी शेवटीं एकदांचा जाऊन पोंचला. पण तेथें पुरेशा होड्या मिळेनात. याच सुमारास समुद्र फार खवळला होता, व पाण्यांत होडी घालावयास कोणी खलाशी धजेनात. ग्यारीबाल्डी समुद्र-पर्यटणाचे कामांत पुरा निष्णात होता व प्रसंग बिकट असल्यामुळें त्याचे अंगीं दुप्पट धैर्य आलें. रात्रीची वेळ होती व वारा सुटला होता; परंतु ऑस्ट्रियन लोक येऊन पोंचतील ही भीति क्षणोक्षणीं वाटत असल्यामुळें ग्यारीबाल्डीनें जलदी करून १०।१२ कोळयांच्या होड्या पाण्यांत लोटून त्यांवर आपले

लोक चढविलें, व उजाडतां उजाडतां ते बंदरांतून एकदांचे बाहेर निघण्यास व ऑस्ट्रियन सैन्य गांवांत शिरण्यास एकच गांठ पडली. ग्यारीबाल्डीनें जर जलदी करून आपले लोक होड्यांवर चढविले नसते तर दुसरे दिवशीं सकाळीं ते आयतेच शत्रूच्या हातांत लागते. ग्यारीबाल्डी बंदर सोडून निघण्याचे सुमारास वारा किंचित् अनुकूल झाला होता. ग्यारीबाल्डीनें त्याचा फायदा घेऊन व्हेनिसकडे आपल्या होड्या चालविल्या. या धामधुमीच्या श्रमानें ॲनिटाचा आजार फारच वाढला. होड्यांवर औषध वगैरे कांहीं नव्हतें. फार काय पण गोडें पाणीहि पुरेसें घेतलेलें नव्हतें. ॲनिटास तापाच्या आगीमुळें अतिशय तहान लागून ती एकसारखी पाणी पाणी करूं लागली. ग्यारीबाल्डीस होड्या तयार करण्याचे कामीं साऱ्या रात्रभर श्रम पडल्यामुळें त्यालाहि फार तहान लागली होती, परंतु पाणी म्हणून मिळेना. ते दिवशीं पौर्णिमेचें चांदणें पडलें होतें, व रात्र स्वच्छ होती यामुळें ग्यारीबाल्डीस किंचित् बरें वाटूं लागलें होतें. परंतु हें चांदणेंच या वेळीं ग्यारीबाल्डीस अनहिताचें झालें. कारण या बाजूस समुद्रांत ऑस्ट्रियाचीं लढाऊ गलबतें हिंडत होतीं व त्यांस ग्यारीबाल्डीच्या होड्या चांदण्यानें स्वच्छ दिसूं लागल्या. तेव्हां हीं गलबतें व किनारा यांजमधून सरळ व जलद गेल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें दिसून आलें. परंतु होड्या लहान व अवजारें थोडीं, यामुळें ते साधेना. शेवटीं दिवस उगवण्याचे सुमारास कांहीं होड्या शत्रूचे हातीं लागल्या व ज्या कांहीं थोड्या उरल्या त्यांना किनारा गांठणें भाग पडलें. इकडे किनाऱ्यावर उतरावें तर गलबतावरून लोक गोळ्या मारीत होते. अशा बिकट प्रसंगीं ग्यारीबाल्डीची होडी व इतर तीन होड्या एकदांच्या किनाऱ्यास लागल्या.

अशा रीतीनें ग्यारीबाल्डी हा शत्रूचे हातांतून निसटला. परंतु तो आनंद नाहींसा करण्याइतकें दुःख दैवानें त्याजपुढें मांडून ठेविलें होतें. कारण ॲनिटाची प्रकृति आतां अगदीं अत्यवस्थ झाली होती. तिला कशी तरी कवटाळून धरून ग्यारीबाल्डी हा किनाऱ्यावर तर एकदांचा उतरलाच, परंतु तेथें थांबण्याची बिलकूल सोय नव्हती. कारण शत्रूच्या होड्या मागोमाग येण्याची भीति होती, म्हणून त्यानें बरोबरचे लोकांस वाट फुटेल तिकडे जाण्यास सांगितलें. किनारा सोडून आंत जावें तर तेथेंहि शत्रू हातांत तिलांजलि घेऊन उभे होते. त्यांनीं ग्यारीबाल्डीच्या बरोबरचे कांहीं लोकांस तर गोळ्या घालून ठार

मारलेंच. त्यामध्यें ग्यारीबाल्डीचे जिवाला जीव देणारे असे कांहीं दोस्त होते. त्यांचें वर्तमान ऐकून त्यास अतिशय शोक झाला. इकडे खुद्द ग्यारीबाल्डी हा मात्र ॲनिटासह मोठ्या शर्थीनें वांचला. किनारा सोडल्यावर जवळच मक्याचें एक दाट शेत होतें, तेथें ग्यारीबाल्डी ॲनिटास घेऊन गेला. परंतु तिचे प्राण यापूर्वींच कंठांत येऊन राहिले होते व या निवाऱ्याचे जागीं येतांच ॲनिटा हिनें प्राण सोडला. मरतांना "मुलांची नीट काळजी घ्या" एवढेच शब्द तिनें ग्यारीबाल्डीस सांगितले. अशा बिकट प्रसंगांत आपण सांपडूं व परक्या ठिकाणीं अगदीं रानांत मदत करण्यास जवळ कोणी मित्र नाहीं, दवा नाहीं, पाणी नाहीं, अन्न नाही, वस्त्र नाहीं, चोहोंकडून शत्रूचा वेढा पडला आहे, व त्यांचे हातीं आपण सांपडून तोफेचे तोंडीं जातों कीं काय याची क्षणोक्षणीं मनांत धास्ती वाटत आहे, अशा स्थितींत आपली प्रिय पत्नी मरण पावणार हें पाहून ग्यारीबाल्डीला काय वाटलें असेल याची कल्पनाच केली पाहिजे! परंतु दुर्दैव हात धुऊन पाठीस लागलें म्हणजे कधीं कोणास कल्पनाहि करतां येणार नाहीं असे अद्भुत अनुभव, तें जगांत मनुष्यमात्रास दाखवितें. ग्यारीबाल्डीनें आपल्या जन्मांत अनेक दुःखें भोगिलीं, परंतु या पत्नीवियोग दुःखाइतका दुसऱ्या कोणत्याहि दुःखापासून त्यास शोक झाला नाहीं. परंतु करतो काय. जो ईश्वर पृथ्वीवर दुःखें पाठवितो, तोच तीं सोसण्यास लागणारें सामर्थ्यहि मनुष्यास देतो. आधींच वनवास, तशांत प्रिय पत्नीचा मृत्यु व तिजबरोबरच अकालीं प्रसूत झालेल्या बालकाचा मृत्यु, पाठीस शत्रु लागलेले, कोणी जिव्हाळ्याचा स्नेही जवळ नाहीं, अशा संकटांत ग्यारीबाल्डी सांपडला असतांहि त्यांतून निभावून जाण्यास ईश्वरानें त्याचे अंगीं बुद्धि व धैर्य दिलें होतें व तेंच या वेळीं शोकाहूनहि प्रभावी झालें. आपण आरंभिलेलें देशकार्य अद्याप आपल्या हातून पूर्ण व्हावयाचें आहे, अशा प्रकारची हुरहूर व तें आपण पुढें मागें खास पूर्ण करणार अशा प्रकारची उमेद त्याचे मनांत नेहमीं वास करीत असल्यामुळें ग्यारीबाल्डी इतक्यांतहि संकटांतून निभावून जाण्यास समर्थ झाला. मृत पत्नीच्या गळां पडून मन मोकळें करून रडण्यासहि त्याला त्या वेळीं अवकाश नव्हता. कारण ऑस्ट्रियन शिपाई शिकारी कुत्र्याप्रमाणें त्याचे पाठीवर होते. यामुळें त्यानें आपल्या पत्नीचें प्रेत कसें तरी गडबडीनें एकदांचें पुरलें; व पुढें अनुकूल वेळ आल्यास तेथून तिच्या अस्थी काढून नेऊं असा विचार करून तो पुढें चालता झाला.

ग्यारीबाल्डी जातांच ऑस्ट्रियन शिपाई लोक त्या गांवीं येऊन ठेपलेच. ग्यारीबाल्डीस तेथें आसरा मिळाला होता असें कळतांच त्यांनीं लोकांवर जुलूम चालविला. ज्या परोपकारी शेतकऱ्यानें ग्यारीबाल्डीस मदत केली होती त्याला आपल्या सद्गुणाचें प्रायश्चित्त प्राण खर्चून घ्यावें लागलें. तो सांपडतांच त्या नीच शिपायांनींच त्याला घराचे आढ्यास टांगून प्रथम फांशीं दिलें व नंतर खालीं ओढून त्यांनीं त्याचे तुकडे तुकडे केले. इकडे ग्यारीबाल्डी हा तेथून निघाला तो सार्डिनियास जावें या हेतूनें अरण्यांत शिरला तो सुमारें पस्तीस दिवसपर्यंत वेष पालटून पर्वताच्या दऱ्याखोऱ्यांतून व गुहांतून लपत छपत हिंडत होता. मधून मधून त्यास कोणी एखादा दयाळु व देशाभिमानी मनुष्य भेटे, तो त्यास खाण्यापिण्यास देई. परंतु कित्येक वेळां दिवसाचे दिवस अन्नाविणें त्यास काढावे लागत.

ग्यारीबाल्डीची खुद्द स्वतःची अशी स्थिति होती, तथापि त्याचें नांव मात्र सर्व देशभर अगदीं कान्याकोपऱ्यांतूनहि दुमदुमत होतें. सर्व इटलीभर ऑस्ट्रियाचे शिपाई फिरत होते, व ग्यारीबाल्डीस पकडण्याकरितां बक्षिसेंहि लावलीं होतीं. परंतु द्रव्यलोभानें त्यास कोणी पकडून देईल अशी मुळींच भीति नव्हती. उलट जेथें जेथें त्याचें नांव कळे तेथें तेथें लोक त्याला सुरक्षितपणें एका ठिकाणाहून दुसरे ठिकाणीं पोंचवून देत. अशा प्रकारें बऱ्यावाईट तऱ्हेनें सुमारें महिना दीड महिना प्रवासांत काढून ग्यारीबाल्डी पोर्टो व्हिनेरी या बंदरीं पोंचला. तेव्हां त्याजबरोबर फक्त त्याचा एकच स्नेही होता. तेथून चियाव्हेरी येथें तो गेला. ती सायंकाळची वेळ होती. तथापि त्याला लोकांनीं ओळखिलें. तो आला अशी बातमी कळतांच त्याला पाहण्याकरितां लोकांची एकच गर्दी जमली. परंतु तेथील अधिकाऱ्यांस तें पसंत नसल्यानें त्यांनीं ग्यारीबाल्डीस विनंति करून असें सांगितलें कीं, तुमच्यामुळें लोकांनीं अशी गडबड करावी हें चांगलें नाहीं. याकरितां आम्ही पिड्मॉंट येथें तुम्ही आल्याची हकीकत कळवून पुढें काय व्यवस्था करावयाची याबद्दल हुकूम आणवितों, तोंपर्यंत तुम्हांस येथें आमचे नजरेखालीं राहिलें पाहिजे व नंतर हुकूम येईल त्याप्रमाणें वागलें पाहिजे. ग्यारीबाल्डीनें हें तक्रार न करतां निमूटपणें ऐकून घेतलें. आपल्यामुळें गडबड व्हावी हें त्यास मुळींच पसंत नव्हतें.

पण ग्यारीबाल्डीस तेथें फार दिवस रहावें लागलेंच नाहीं. कारण पिड्मॉंटहून लवकरच हुकूम येऊन ग्यारीबाल्डीस सरकारी अधिकाऱ्यांचे संरक्षणा-

खालीं जिनोआ येथें जाण्याची सूचना झाली, त्याप्रमाणें तो जिनोआ येथें निघून गेला. तेथेंहि त्याचेभोंवतीं लोकांची अत्यंत गर्दी झाली व सगळें गांव त्यांजविषयींच्या विचारानें अगदीं हलून गेलें. कोणी त्यास भेटण्यास, तर कोणी त्याचा सन्मान करून आदरबुद्धि व्यक्त करण्यास जात. परंतु मजकरितां गलबला होऊं नये, हल्लींची वेळ वाईट आहे व आपण जरी मला बहुमान देतां तरी त्यापासून या वेळीं माझें हित न होतां अनहित होण्याचा संभव आहे, अशा गोष्टी सांगून युक्ति-प्रयुक्तीनें तो लोकांची गर्दी मोडीत असे.

जिनोआ येथें कांहीं दिवस घालविल्यावर त्याला नाईस शहरास जाऊन येण्याची परवानगी मिळाली. पुष्कळ दिवसांत त्याची व त्याच्या आईची व मुलांची भेट झाली नव्हती. यामुळें त्यांना भेटण्याची त्यास फार उत्कंठा लागली होती. म्हणून तो जलदीनें नाईस येथें गेला. परंतु तेथें त्यास फार दिवस राहतां आलें नाहीं; लवकरच परत यावें लागलें. परत आल्यावर त्याला पिड्मॉंटचे राजानें दिलेली हद्दपारीची शिक्षा फर्माविण्यांत आली !

ग्यारीबाल्डीनें ही शिक्षा निमूटपणें मान्य केली व तो इटली सोडून देशांतराला निघाला. परमुलखांत निर्वाहाचें कांहीं तरी साधन पाहिजे याकरितां त्यानें प्रथम कांहीं दिवस नोकरी धरिली व नंतर निरनिराळ्या बंदरांवर अडत्याचें काम तो करूं लागला, हें पाहून कित्येक सद्गृहस्थांनीं त्यास लहान मोठ्या रकमा देऊं केल्या व त्या स्वीकारण्याची विनंतीहि केली. परंतु त्यानें त्या सर्व नाकारल्या. इकडे व्यापारास तेजी नसल्यामुळें त्याचा अडतेगिरीचा धंदाहि नीटसा चालेना. तेव्हां पुन्हा एकवार अमेरिकेंत जाऊन आपल्या नशिबाची परीक्षा पाहावी असा ग्यारीबाल्डीनें निश्चय केला.

त्याप्रमाणें तो लवकरच उत्तर अमेरिकेंतील न्यूयॉर्क शहरीं गेला व तेथें त्यानें मेणबत्त्यांचा कारखाना काढला. शहराच्या कोपऱ्यांतील एका रस्त्यावर एक लहानसें दुकान घालून त्या ठिकाणीं मेणानें हात घाण झाले आहेत अशा स्थितींत तो दिवसाचा दिवस घालवीत असे. कर्मधर्मसंयोगानें ज्या वेळीं ग्यारीबाल्डी हा तेथें मेणबत्त्यांचें दुकान घालून बसला होता, त्याच वेळीं त्याच शहरांत त्याच्याचसारखे निरनिराळ्या देशांतून हद्दपार झालेले मोठमोठे लोक हलक्या प्रतीचे धंदे पोटाकरितां करून राहिलेले होते. ग्यारीबाल्डीच्या दुकानाजवळच जनरल प्रॉवेझाना हा राहात असे. हा पूर्वी स्वदेशी

प्रधानमंडळांत असून युद्ध व लष्कर यासंबंधींचा सर्व कारभार त्याजकडे सोंपविलेला होता. परंतु हल्लीं हद्दपार झाल्यानें पोट भरावयास कांहीं तरी साधन पाहिजे म्हणून तो तंबाकूच्या विड्या करून रस्त्यांतून विकीत असे. जर्मनीच्या पार्लमेंटांतील एक सभासद हद्दपार होऊन अमेरिकेस गेला होता; त्यानें आपलें व बायकापोरांचें पोट भरण्याकरितां हजामाचा धंदा पत्कारला होता. फ्रान्समधून हद्दपार होऊन आलेला एक पार्लमेंटचा सभासद गल्लोगल्लीं जाऊन भाजी विकीत असे. लेड्रू रॉलिन यानें बंदरावर हमालीचा धंदा पत्कारला होता. लुई ब्लॉक हा नृत्य शिकवून पोट भरी. फेलिक्स पायट हा एका नाटकगृहांत पडदे ओढण्याचें काम करी व लामारटाइन हा तर निवळ भीक मागून आपला चरितार्थ चालवीत असे.

तात्पर्य, ज्यास महात्म्यांचा आपत्काल पाहावयाचा असेल त्यास तो येथें मूर्तिमंत एक ठिकाणीं पाहावयास सांपडला असता. पोट हें कोणासहि सुटलेलें नाहीं; तरी पण पोट भरण्याकरितां कोणताहि धंदा प्रामाणिकपणें केला असतां त्यांत कमीपणा मानण्याचें कारण नाहीं. वरील उदाहरणांतील धंदे हलके होते, तरी त्यांनीं त्या माणसांस कमीपणा आला नाहीं. उलट त्या महात्म्यांचे समागमामुळें त्या धंद्यांसच महत्त्व आलें. स्वदेशभक्तीसारख्या थोर सद्गुणांनीं किंवा एखाद्या महत्कार्याचे विचारांनीं ज्या ममुष्याचें मन भरून गेलेलें असतें त्याला आत्मविस्मृति इतकी पडते कीं, आपला स्वतःचा मानापमान, स्वतःचें हितानहित, फार काय पण स्वतःचें पोट याचेंहि भान राहत नाहीं. कसेंहि बिकट प्रसंग आले तरी त्यांतूनहि आपलें कर्तव्य त्यांस नेहमीं दिसत असतें.

भाग १० वा

वीराचा वानप्रस्थाश्रम

तरुच्छाया तोयं यदपि तपसांयोग्यमशनं
फलं वा मूलं वा तदपि न पराधीनमिह वः ॥

—उत्तररामचरित्र

पोटासाठीं मेणबत्त्यांचा धंदा आपणांस करावा लागला याबद्दल ग्यारीबाल्डीस कधींहि वाईट वाटलें नाहीं. हात मेणानें घाण झाले आहेत अशा स्थितींत त्यास कोणी भेटण्यास आलें असतां तसाच तो त्याची भेट घेई व उलट आपल्या घाण हातांचें तो आपण होऊनच कौतुक करी. परंतु हा त्याचा धंदा नीट चालेना. शिवाय शहरांतील हलकट लोकांपासून त्याला उपद्रव होऊं लागला. तेव्हां त्यानें न्यूयॉर्क सोडण्याचा निश्चय केला. त्याप्रमाणें तो दक्षिण अमेरिकेंतील लिमा या शहरीं राहण्यास गेला. या शहरांत त्या वेळीं बरेच इटालियन लोक राहत होते. ग्यारीबाल्डीच्या पूर्वीच्या पराक्रमामुळें सर्व दक्षिण अमेरिकेमध्यें इटालियन लोकांचा चांगलाच वचक बसला असून त्यांस मान्यताहि आली होती. शिवाय लिमा येथें तर बहुतेक व्यापाराचीं सूत्रें यांच्याच हातीं आलीं होतीं. या लोकांस ग्यारीबाल्डी येणार अशी बातमी कळतांच त्यांनीं एक सभा भरवून त्यास स्वागतपूर्वक मानपत्र देण्याचें ठरविलें, व त्याप्रमाणें तो येतांच त्यांनीं त्याचा बहुमान केला. लिमा येथें ग्यारीबाल्डीनें दोन वर्षें घालविलीं. परंतु स्वदेशापासून दूर असल्यामुळें त्याच्या मनास असमाधान वाटे. यास्तव संधि सांपडतांच, १८५४ सालीं तो फिरून युरोपास परत गेला.

परंतु त्याची हद्दपारीची शिक्षा अद्यापि संपली नव्हती म्हणून त्यास इटालीमध्यें प्रवेश करतां येईना. यामुळें नाईस व मार्सेलीस यांचे बंदराचे दरम्यान तो दर्यावर्दीपणाचें काम करूं लागला. या धंद्यांत ग्यारीबाल्डीजवळ दोन पैसे शिल्लक पडले. त्यांचें एक शेत खरेदी करावें असें आतां त्याच्या मनांत आलें. आजपर्यंतचे दिवस दगदग करण्यांत घालविले तेव्हां आतां निवांतपणें चार

दिवस घालवावयाचें मनांत आलें तर सत्तेची टीचभर जमीन असावी या हेतूनें कॅप्रेरा नांवाच्या एका लहानशा बेटाचा निमा भाग त्यानें खरेदी घेतला.

कॅप्रेरा हें बेट सार्डिनिया नामक बेटाजवळ आहे. याची लांबी सारी पांच मैल असून एकंदर विस्तारहि लहानच म्हणजे सुमारें १५ मैल आहे. या बेटावर वस्ती मुळींच नव्हती म्हटलें तरी चालेल. ग्यारीबाल्डीचेपूर्वी सुमारें १५० वर्षें, या बेटांत कॉर्सिका येथील एक पुंड दरोडेखोर रहात असे. त्यानें त्या वेळीं निवाऱ्याचे व गुप्त अशा स्थळीं बांधलेली झोपडी ग्यारीबाल्डीचे वेळींहि तशीच उभी होती. याशिवाय दुसरें तिसरें मनुष्याचें वसतिस्थान मुळींच नव्हतें. पोप हा ग्यारीबाल्डीला पुंड दरोडेखोर असेंच म्हणत असे. तेव्हां दरोडेखोरांचे गुहेंत दरोडेखोर घर करून राहिला हें योग्यच झालें असें तो थट्टेनें म्हणे.

परंतु पूर्वीच्या दरोडेखोरास कॅप्रेरा हें बेट ज्या कारणांनीं प्रिय झालें होतें, त्यांहून भिन्न कारणांकरितां ग्यारीबाल्डीनें हेंच ठिकाण पसंत केलें होतें. त्याला लपून छपून रहावयाचें नव्हतें. तरी पण एकांतवास हा त्याला फार प्रिय असे व तें एकांतवासाचें सुख या निर्जन अशा बेटापेक्षां इतर ठिकाणीं अधिक कसें मिळणार ? सृष्टिसौंदर्याचे दृष्टीनें पाहिलें असतां कॅप्रेरा हें बेट फारच मनोवेधक होतें. लागवडीस जमीनहि तेथें मुबलक होती. शिवाय कारण पडलें असतां शत्रूविरुद्ध लढविण्याच्या हें बेट सोईचें होतें. चहूंबाजूंनीं समुद्र व आजूबाजूंच्या किनाऱ्यांवर डोंगरांची निसर्गसिद्ध अशी तटबंदी असल्यामुळें कित्येक दिवसपर्यंत शत्रूशीं टक्कर देऊन राहण्यासारखी सोय होती. इंग्लिश आरमारावरील प्रसिद्ध सरदार नेल्सन, त्याचप्रमाणें नेपोलियन बोनापार्ट, यांचा डोळा या कॅप्रेरा बेटावर होता असें म्हणतात. परंतु कर्मधर्म-संयोगानें तें फ्रान्स किंवा इंग्लंड यांचें ताब्यांत जावयाचें राहिलें आणि ग्यारीबाल्डी यास तें विकत घेतां आलें.

निमें बेट ताब्यांत आल्याबरोबर ग्यारीबाल्डीनें तेथें जाऊन वस्ती केली. त्याला जात्याच साधेपणा आवडत असे. त्यांतून त्या ठिकाणीं इतर कोणाच्या संपर्क नव्हता. यामुळें ग्यारीबाल्डीस आपलीं साधेभोळेपणानें रहाण्याची हौस तेथें पूर्ण करून घेतां आली. प्रथमतः त्यानें शेतांतल्या मांगरासारखें एक लहानसें घर बांधिलें. तें एक मजली असून त्यास आंतून बाहेरून सफेती दिलेली होती. घराच्या आसपासचें रान तोडून त्यानें कांहीं जागा लागवडी-

करितां तयार करण्याचे हेतूनें दूरदूर जाऊन तेथील मऊ माती आणून घातली. कांटेरी कुंपणें घालून त्यांमधून सुवासिक अशा झाडवेलीहि त्यानें लाविल्या. चहूंकडे दगडाचे गडगे रचून बांध घातले. ठिकठिकाणीं पाणी सांठविण्याकरितां डबकीं केलीं. त्यांतील पाण्याचे योगानें निरनिराळ्या प्रकारचा भाजीपाला, फुलझाडें, द्राक्षाच्या वेली, ऊंस वगैरे प्रकारची बागायत थोडक्याच काळांत त्यानें उत्पन्न केली. स्वकष्टानें पिकविलेला भाजीपाला व फळफळावळ आपल्या हातानें तोडून व त्यांचे हरतऱ्हेचे पदार्थ आपल्या हातानें बनवून सेवन करण्यांत जी एक अप्रतिम गोडी असते, तिची रुचि ग्यारीबाल्डीस पूर्णपणें होती. ग्यारीबाल्डीचे तबेल्यांत बसावयाचे कांहीं कांहीं चांगले घोडे होते व त्याचप्रमाणें कांहीं खेंचरेंहि होतीं. या खेंचरांस त्यानें मोठमोठ्या लोकांचीं नांवें ठेविलीं होतीं. पोप पिओनोनो, लुइ नेपोलियन वगैरे ज्या लोकांचा तो तिटकारा करी, अशांचीं बरींच नांवें त्यांत होतीं ! गोठ्यांत गाई व मेंढ्याहि बऱ्याच होत्या, त्यामुळें दूधदुभत्याची चंगळ व रेलचेल असे.

अशा या सुखनिवासांतील गृहकृत्यांचें काम ग्यारीबाल्डीची एक दूरची बहीण व त्याची आवडती मुलगी थेरेसिटा यांजकडे सोंपविलेलें असे. ग्यारीबाल्डीची प्रिय पत्नी ॲनिटा ही जर या वेळीं जिवंत असती तर त्याला या जीवितक्रमाचें सुख शतपट अधिक वाटलें असतें; परंतु त्याच्या व तिच्या दुर्दैवानें तो मृत झाली होती. तथापि तिचें उत्तम स्मारक म्हणून तिच्या कुरळ्या केसांची एक बट, शिसवी लाकडांच्या एका डबींत घालून ती त्यानें आपल्या निजण्या बसण्याच्या खोलींत समोरच लोंबत ठेविली होती. याशिवाय गृहशोभेचें सामान म्हटलें म्हणजे, त्याच्या आईची एक तसबीर, इतर दहापांच चित्रें, व एक मौल्यवान् तरवार एवढेंच काय तें होतें. तसेंच दुसऱ्या एका खोलींत ग्यारीबाल्डीचीं कांहीं आवडतीं कवितांचीं व युद्धशास्त्रासंबंधाचीं पुस्तकें, त्यानें मिळविलेलीं जयचिन्हें–निशाणें–वगैरे वस्तु होत्या. क्रमाक्रमानें लोकहि त्याला मौल्यवान् वस्तु नजर करूं लागले. यामुळें खुर्च्या, मेजें, शेतकीचीं आउतें, हत्यारें वगैरे सामानाचा त्याच्यापाशीं हळूहळू संग्रह होत चालला. घरीं कायमचीं माणसें म्हटलीं म्हणजे, ग्यारीबाल्डी, त्याची मुलगी, त्याची बहीण, व चाकर-नोकर इतकींच काय तीं होतीं; परंतु त्याचे दोघे मुलगे इटलींत असत ते त्यास भेटण्यास वरचेवर येत, व आले म्हणजे बरेच दिवस राहात. शिवाय युरोपांतील सर्व राष्ट्रांतील लहान मोठे लोकहि ग्यारी-

बाल्डीचे घरचा साधा पाहुणचार घेऊन जात. खुद्द इटलींतील मुत्सद्दी व कामगार लोक तर नेहमीं येत. ग्यारीबाल्डीचें कुटुंब मोठें नियमितपणानें वागे. सूर्योदयाचे पूर्वी उठून सर्वजण आपापल्या कामास लागत. सकाळचा उपाहार झाल्यानंतर कोठें रस्ते, शेत किंवा बाग यासंबंधीं काय काम निघेल तें सर्व मिळून करीत. दोन प्रहरचें जेवण झाल्यानंतर विश्रांतीचे वेळीं ग्यारीबाल्डी हा निरनिराळ्या युद्धप्रसंगांच्या गोष्टी सांगे, व थेरेसिटा, स्वदेशाभिमानानें पूर्णपणें भरलेलीं गाणीं किंवा पोवाडे म्हणे.

अशा रीतीनें ग्यारीबाल्डी हा एकांतवासांत होता तरी त्याचें जगावरील किंवा जगाचें त्याजवरील लक्ष मुळींच सुटलेलें नव्हतें. दर एक टपालानें त्याला दहावीस पत्रें हीं यावयाचींच. हीं पत्रें कोणी व कशाबद्दल पाठवावीं याचा सुमारच नव्हता. कोणी त्याच्या पराक्रमाची स्तुतिपर काव्यें करून त्याजकडे पाठवींत. कोणी त्यास फिरून लढाई सुरू करून पोप व उपाध्यायवर्ग यांना जाळून पोळून किंवा कापून काढ अशी विनंति करीत. कित्येक स्त्रिया त्यास कांहीं तरी हातचा लेख लिहून मागत; कोणी त्यास त्याच्या पिकलेल्या केसांची एखादी बट पाठवून देण्याबद्दल लिहीत. फार काय, पण कित्येक स्त्रिया त्याजवर आपलें प्रेम बसलें आहे, अशा अर्थाचीं पत्रेंहि त्यास पाठवीत. एका फ्रेंच वेड्यापिरानें तर त्याला एक यंत्र देऊं केलें होतें. तें यंत्र त्यानें स्वतः शोधून काढलेलें असून, त्याचे योगानें एका क्षणांत लाख पन्नास हजार लोक मारतां येतील असें त्यानें प्रतिपादन केलें होतें. तात्पर्य, त्यास कोणी काय लिहावें याचा सुमारच नव्हता. तथापि, या सर्व पत्रांस ग्यारीबाल्डी नम्र व सभ्यपणाचीं उत्तरें स्वतः लिहून पाठवी.

जवळच सार्डिनिया बेट होतें. तेथील लोकांमध्यें शिक्षण कमी होतें असें पाहून त्यानें लहान मुलांकरितां तेथें कांहीं शाळा काढल्या. ग्यारीबाल्डीच्या सूचनेस मान देऊन युरोपांतील पुष्कळ शहरीं या कार्याकरितां एजंट नेमून वर्गणी मिळविण्याचें काम सुरू झालें. अशा रीतीनें ग्यारीबाल्डीचें काम बसल्या बसल्या चालू होतें. आळस हा त्याला शत्रूप्रमाणें वाटे. तो जो जो म्हणून उद्योग करी, त्या सर्वांत परोपकाराचें बीज नव्हतें असें कधींच झालें नाहीं. या एकांतवासांतहि हातून अर्धेमुर्धे राहिलेलें स्वदेशकार्य त्याच्या डोळ्यांपुढें सदासर्वदा उभें असे. इटलींत काय गडबड चालली असेल याविषयींची माहिती तो मोठ्या उत्सुकतेनें मिळवी, या एकांतवासाचे शीतळाईनें त्याच्या

मनांतील द्वेषाग्नि मुळींच निवाला नसून, कालगतीनें व शांत विचारानें तो अधिकच वृद्धिंगत होत होता.

१८५४ सालीं तो कांहीं कामानिमित्त इंग्लंडास गेला. त्या वेळीं न्यूकॅसल येथील लोकांनीं त्याचें मोठ्या थाटानें स्वागत केलें व एक मानपत्र, एक दुर्बीण, एक तरवार, अशीं त्यास नजर केलीं. ग्यारीबाल्डीस इंग्रजी चांगलेसें बोलतां येत नसे, म्हणून त्यानें थोड्याच शब्दांनीं त्यांचे आभार मानले; व ते मानतांना असें बोलून दाखविलें कीं, "जी तरवार आज मला माझ्या उदार मित्रांकडून बक्षीस मिळाली आहे, ती माझ्या आवडत्या कार्यांत, म्हणजे स्वदेशस्वातंत्र्य परत मिळण्याचें कामीं उपसण्याचा दिवस सुदैवानें कधीं येईल हें आजच मला सांगतां येत नाहीं. परंतु इटली हें पुढें मागें स्वतंत्र होणार यांत शंका नाहीं. माझ्या देशाच्या संकटसमयीं या उदार मनाच्या परदेशीयांनीं इटलीस जे साहाय्य केलें याबद्दल त्यांचे आभार इटलीनें मानण्याचा दिवस लवकरच खास उजाडेल."

वरील शब्द त्या वेळीं जितक्या कळकळीचे होते, तितकेच ते पुढें खरे खरे ठरले. ग्यारीबाल्डीची तरवार इटलीकरितां नेहमीं सज्ज होती. परंतु ज्यांचे हातीं इटलींतील सर्व सैन्यावरील सत्ता व राज्यकारभाराचीं सूत्रें होतीं, त्यांनीं लढाईस प्रारंभ केल्याखेरीज या त्याच्या तरवारीचा उपयोग काय? परंतु ही संधि ग्यारीबाल्डीस लवकरच मिळाली. त्याची हकीकत पुढील भागांत येईल.

भाग ११ वा

मुत्सद्दीपणाचा विजय

एका केवलमेव साधनविधौ सेनाशतेभ्योधिका
नंदोन्मूलनदृष्टवीर्यमहिमा बुद्धिस्तुमागन्मम ॥

— मुद्राराक्षस

जगांतील व्यवहारांत नेहमीं असा अनुभव येतो कीं, कोणतेंहि महत्कृत्य साधण्यास दोन प्रकारचे लोक अवश्य असतात. एक कार्यसिद्धीची संधि आणून देणारे; व दुसरे ती संधि आली असतां ती साधून आपल्या कर्तृत्वानें

कार्य सिद्धीस नेणारे. वास्तविक इटलीस स्वतंत्रता मिळण्याची जी पूर्वी एक महासंधि किंवा महापर्वणी आली होती ती आणून देण्यास ग्यारीबाल्डी व विशेषतः मॅझिनी या देशभक्तांचें उदाहरण व उपदेश हींच मूळ कारणीभूत झालीं असें म्हटलें पाहिजे. परंतु एकंदरीनें पाहतां त्यांजकडे केवळ परोक्ष कर्तृत्व येतें. अपरोक्ष किंवा प्रत्यक्ष कर्तृत्वाच्या यशाचे मालक निराळेच होते. ते म्हणजे इटलीमध्यें राज्याधिकारारूढ जे मुत्सद्दी होते ते होत. ग्यारीबाल्डी किंवा मॅझिनी यांस एकादें साधें बंड करावयाचें झालें तरीं, किती तरी मेहनत पडे; परंतु या सर्व बंडाचा मुख्य हेतु म्हणजे ऑस्ट्रियाशीं युद्ध, तें सुरू करणें म्हटलें म्हणजे या अधिकारसंपन्न मुत्सद्द्यांच्या एका शब्दाचें काम होतें. अशा प्रकारच्या मुत्सद्द्यांमध्यें त्या काळीं दोनच प्रमुख होते. एक खुद्द पिड्मॉटचा राजा व्हिक्टर-ए-मॅन्युएल व त्याचाच मंत्रि कौन्ट कॅव्हूर, ग्यारीबाल्डी व मॅझिनी यांशिवाय इटली स्वतंत्र करण्यास ज्या देशभक्तांनीं मदत केली त्यांपैकीं वर सांगितलेले दोघे मुत्सद्दी अग्रगण्य असून ते सत्ताधीश असल्यामुळें त्यांचे हातून देशकार्यास जितकी प्रत्यक्ष व उपयुक्त मदत झाली, तितकी मॅझिनी व ग्यारीबाल्डी यांचे हातूनहि झाली नाहीं. ग्यारीबाल्डी हा सुमारें दहा वर्षें हद्दपारींत आपले दिवस घालवीत असतां इकडे इटलीचे स्वातंत्र्याचे धोरणावर नजर ठेवून आपल्या राजनीतिचातुर्यानें या दोघां मुत्सद्द्यांनींच ग्यारीबाल्डीस स्वदेशकार्यासाठीं पुन्हा तरवार उपसण्याची संधि आणून दिली.

ही संधि कशी मिळाली हें पाहण्यास इ. स. १८४९ पासून पुढें आठ नऊ वर्षांत इटलीची स्थिति कशी पालटत गेली हें पाहिलें पाहिजे. इ. स. १८४८-४९ सालीं इटलींत बंडें होऊन त्यांचा लगेच मोड झाल्यामुळें पुनः एकवार ऑस्ट्रियाचा जुलमी अम्मल स्थापित झाला. त्या सालीं निरनिराळ्या ठिकाणीं एकदम बंडें झाल्यामुळें स्वातंत्र्यप्रिय लोकांच्या मनांत भावी स्थितीविषयीं जी अत्यंत उज्ज्वल आशा प्रदीप्त झाली होती, ती एकदम समूळ मालवली. १८१५ सालीं व्हिएन्ना येथील तहानें इटलींत ऑस्ट्रियाचें जुलमी साम्राज्य युरोपियन राष्ट्रांचें बहुमतानें स्थापित केलें. तेव्हांपासून इटालियन देशभक्त वीर व मुत्सद्दी यांनीं तीस पस्तीस वर्षें जे जे अविश्रांत श्रम केले ते सर्व फुकट जाऊन पुन्हा एकवार १८१५ सालची भयंकर स्थिति येऊन पोंचली. हजारों लहानसहान देशभक्त मारले गेले, ग्यारीबाल्डी व मॅझिनी यांसारख्या लोक-

नायकांस हद्दपारीची शिक्षा झाली. इटलीच्या स्वातंत्र्याचा मुख्य शत्रु जो पोप त्याचे डळमळणारे पाय युरोपियन राष्ट्रांच्या मदतीनें पुनः एकवार रोमच्या गादीवर स्थिर झाले; निरनिराळ्या इटालियन संस्थानांच्या राज्यांतील जुलमास लोकसत्तेच्या प्रभावानें आळा पडला होता तोहि निघून गेला; व सर्व इटालियन संस्थानांत लोकप्रिय, शक्तिमान्, न्यायी व सुधारलेली अशी जी पिड्माँटची गादी तिला हात दाखवून अवलक्षण करून घेतल्याप्रमाणें ऑस्ट्रियाविरुद्ध मांडलेल्या युद्धांत पराजय होऊन, अपमानानें व लज्जेनें मान खालीं घालून बसावें लागलें. यापेक्षां इटलीच्या कार्यास अधिक अनिष्ट अशी दुसरी गोष्ट कोणती ?

इटलीची अशी भयंकर स्थिति झाली होती खरी. तथापि विचारी मनुष्यास त्यांतल्या त्यांत समाधान मानतां येण्यासारख्याहि कांहीं गोष्टी दिसून येत होत्या. १८१५ सालची इटलीची स्थिति व १८४९ सालची स्थिति यांमध्यें एक मोठें अंतर होतें, तें हें कीं, पूर्वीं इटलींतील लोकसमाज जो आपल्या गुलामगिरींत सुख मानून रहात होता तो आतां मनांतून असंतुष्ट व महत्त्वाकांक्षी झाला होता. एवढेंच नव्हे, तर आपलीं दुःखें व आपल्या इच्छा उघडपणें बोलून दाखविण्याइतके ते धीट झाले होते. अद्यापपर्यंत सर्व इटली एकत्र होऊन मॅझिनीच्या कल्पनेप्रमाणें त्यावर लोकसत्तात्मक साम्राज्य स्थापावें इतक्या मजलेपर्यंत कोणाच्या मनाची धांव गेली नव्हती हें खरें; तथापि आपआपल्या संस्थानास आपापल्या पुरतें का होईना, परंतु जुलमी राजापासून स्वातंत्र्य मिळावें, व तें मिळण्यास निदान ऑस्ट्रियाशीं युद्ध करण्यापुरती तरी इटलीची एकी व्हावी, असें लोकांस खास वाटूं लागलें होतें. मॅझिनीचें लोकशिक्षण, ग्यारीबाल्डीचें उदाहरण, व १८२१, १८३१ व १८४७ या तीन सालीं लोकांनीं बंडें करून आपली शक्ति प्रकट करून क्षणभर का होईना, परंतु जें स्वातंत्र्यसुख अनुभविलें होतें त्यामुळें कायमचें स्वातंत्र्य मिळविण्याविषयीं लोकांच्या मनांत उत्पन्न झालेली लालसा, ह्या इतक्या गोष्टी कांहीं खास फुकट गेल्या नव्हत्या. शेंकडों वर्षें ज्यांनीं आपल्या मानेवर परदास्याची जड धुरा निमूटपणें वाहिली, त्यांनीं क्षणभरच का होईना, परंतु एकदां मान हालवून ती फेंकून दिली या गोष्टींत कांहींच अर्थ नसेल काय ? १८१५ सालची स्थिति व १८४९ सालची स्थिति यांमधील मुख्य अंतर हेंच होतें कीं, जरी इतर गोष्टी कायम होत्या, तरी लोकांचीं मनें देशकार्याचे

बाबतींत सुशिक्षित होऊन लोकमत बनलें होतें व समाजांत स्वार्थत्यागी पुढारी बरेच उत्पन्न होऊं लागले होते; आपलें कर्तव्य काय व आपला मार्ग कोणता हें लोकांस स्वच्छपणें कळून आलें होतें; व काय होईल तें होवो, पण त्याच मार्गानें जावयाचें अशी लोकांनीं शपथ घेतल्यासारखी होती.

वास्तविक अशीच स्थिति देशाभिमानी व अधिकारसंपन्न मुत्सद्द्यांच्या कर्तृत्वाचा प्रभाव सिद्धीस जाण्यास उपयोगी असते; व याच स्थितीचा फायदा घेऊन मागें सांगितलेल्या दोघां श्रेष्ठ मुत्सद्द्यांनीं आपलें कर्तृत्व जगास दाखविलें. जगाचे इतिहासांत बंड व मुत्सद्दीपणा यांची सर्वत्र पसरलेली अशी साखळी दृष्टीस पडते. मुत्सद्दीपणानें बंडाची सामुग्री सिद्ध करून द्यावी व बंडानें मुत्सद्दीपणास अनुकूल अशी स्थिति पुनः आणून द्यावी, या नियमाचे अनुशासनानेंच जगांतील राष्ट्रांच्या उत्कर्षाचा इतिहास बनला असल्यासारखें दिसतें.

सर्व इटली देशामध्यें पिड्मॉंटच्या गादीकडेच सर्व तऱ्हेचा अग्रणीपणा होता. या गादीचा मालक चार्लस आलबर्ट हा मनांतून इटलीच्या स्वातंत्र्यास अनुकूल होता; तथापि प्रतिकूल परिस्थितीमुळें त्याचे हातून कांहीं घडून आलें नाहीं. उलट नोव्हॅरा येथील लढाईमध्यें पराभव झाल्यामुळें ऑस्ट्रिया व इटालियन लोक या दोन्ही पक्षांचा तो उघड शत्रु झाला. त्यामुळें अत्यंत खेद पावून त्यानें आपल्या गादीचा राजीनामा दिला. त्या गादीवर त्याचा पुत्र व्हिक्टर–ए–मॅन्युएल हा १८४९ सालीं बसला. हा राजपुत्र शूर, मनाचा थोर, दिलदार व राजनीति-कुशल होता. येथून पुढें इटली संयुक्त स्वतंत्र होईपर्यंत जो इतिहास घडून आला त्यामध्यें त्यानेंच अग्रेसरत्वाचा भाग उचलला. राजा या नात्यानें त्याचे हातीं सर्व राज्याधिकाराचीं सूत्रें सहजच आलीं होतीं हें खरें; तथापि त्यानें दाखविली इतकी जर बुद्धीची व्यापकता, मनाचा थोरपणा आणि स्वदेशप्रीति हीं दाखविलीं नसतीं, तर इटली देश स्वतंत्र झाला असता कीं नाहीं, याबद्दल शंका आहे. परंतु एकट्या व्हिक्टर-ए-मॅन्युएलच्या हातूनहि फारसें झालें नसतें. त्याचा मंत्री कौन्ट कॅव्हूर हाहि पराकाष्ठेचा देशाभिमानी व मुत्सद्दीपणांत तरबेज होता; व १८४९ नंतर जीं कांहीं कारस्थानें झालीं तीं या दोघांचे विचारानेंच झालीं. कॅव्हूर याच्या विशिष्ट राजकीय मतामुळें ग्यारीबाल्डी व मॅझिनी हे त्यास हा देशाचा हितकर्ता नव्हे असें मानीत व अखेरपर्यंत या दोन पक्षांचें वैमनस्य कायमच होतें. दोघेहि एकाच हेतूनें प्रवृत्त झालेले असल्यामुळें व कोणाचेच अंगीं स्वार्थसाधूपणा नसल्यामुळें

वेळ पडल्यास त्यांनीं एकमेकांस मदत केली हें खरें. परंतु त्यांचीं तत्त्वें स्वभावतःच विरुद्ध असल्यामुळें त्यांचें कधींहि पटलें नाहीं.

कौन्ट कॅव्हूर हा सरदारकुळांत जन्मलेला असून पिडमाँट येथील रहिवाशी होता. त्याच्या घराण्याचा व नेपोलियनच्या घराण्याचा सोयरिकीनें संबंध जुळलेला होता. कॅव्हूरचें बाळपणचें शिक्षण संपल्यावर त्यानें लष्करी विद्यालयांत बरेच दिवस अभ्यास केला. इ. स. १८३० सालीं फ्रान्समध्यें राज्यक्रांति घडून आली, त्या वेळीं तत्संबंधाचे आपले अनुकूल विचार फार उघडपणें बोलून दाखविल्यामुळें त्यास कांहीं दिवस अटकेंतहि ठेवण्यांत आलें होतें. १८३१ सालीं त्यानें लष्करांतील आपल्या जागेचा राजीनामा दिला, व पुढें बरींच वर्षें प्रवास करण्यांत व निरनिराळ्या देशांतील राज्यकारभाराचें सूक्ष्म निरीक्षण करण्यांत त्यानें घालविलीं. शिवाय शेतकीसंबंधानें त्यानें बराच अभ्यास करून शेतकऱ्यांची स्थिति कशी सुधारेल याविषयीं पुष्कळ विचार केला होता. इ.स. १८४७ सालीं कौन्ट कॅव्हूर यानें 'रीझॉर्झिमेंटो' या नांवाचें एक वर्तमानपत्र सुरू केलें. त्यामधून आपले व आपल्या पक्षाचे विचार इटालियन लोकांपुढें तो मांडीत असे.

व्हिक्टर-ए-मॅन्युएल व कौन्ट कॅव्हूर दोघेहि तरुण आणि बऱ्याच अंशीं सारख्या विचाराचे होते. यामुळें त्यांच्या अमलाखालीं फारशीं बंडें झालीं नाहींत. राज्याची दिवसेंदिवस जास्त सुधारणाच होत गेली व लोकांस हक्कहि आपोआप अधिकाधिक मिळत गेले. इ. स. १८४९–५९ या दहा वर्षांत या मुत्सद्द्यांच्या जोडीनें बरेंच काम केलें. प्रथमतः कॅव्हूर यानें पिड्माँट येथील पार्लमेंटची सुधारणा केली. सन १८५० सालीं कॅव्हूर हा प्रधानमंडळामध्यें शिरला व लागलीच त्यानें निरनिराळ्या सुधारणा करण्यास प्रारंभ केला. त्यानें जमाबंदीची पद्धति नवीन तत्त्वावर मांडून राज्याची सांपत्तिक स्थिति सुधारण्यास योग्य असे कायदे केले. राज्यांतल्या राज्यांत दळणवळण उत्तम रीतीनें चालण्यास अवश्य असे रस्ते वगैरे बांधले. व्यापारावरील घातुक बंधनें काढून टाकिलीं व त्या बाबतींत युरोपांतील प्रमुख राष्ट्रांशीं तह केले. शिवाय पोपचा अधिकार व राजाचा अधिकार यांची विलक्षण प्रकारची गुंतागुंत होऊन गेली होती, तीहि त्यानें सोडवून आपल्या राजाचे जखडलेले हात मोकळे केले व इटलीच्या स्वतंत्रतेंत मुख्य आडकाठी जी पोपची सत्ता तिला जबरदस्त प्रतिबंध केला.

इ. स. १८५२ सालीं कौन्ट कॅव्हूर हा राजाचा मुख्य प्रधान झाला. इटलीच्या स्वतंत्रतेसंबंधानें त्याचें असें मत होतें कीं, ती स्वतंत्रता लोक व संस्थानिक यांची एकी होईल तरच मिळणारी आहे, पण ही एकी होण्यास बंडें करणें हा कांहीं खरा उपाय नसून, जोरानें कायदेशीर चळवळ करणें, व दाद लावून घेणें हाच होय. इटली स्वतंत्र करण्याचें काम एकट्या पिड्मॉट-कडे आहे हें खरें. तथापि, जगाचे कामांत वाटेल तसा हात घालण्याचा नसता अधिकार बळकावून बसलेल्या युरोपियन राष्ट्रांस आपल्या संस्थानचा स्वतंत्र अधिकार मंजूर झाला पाहिजे, व हें घडून यावयाचें तर पिड्मॉटच्या राज्यानें आपल्या महत्त्वाकांक्षेस अनुरूप अशी पुढारीपणाची स्थिति प्रथम प्राप्त करून घेतली पाहिजे. यापुढें कॅव्हूर यानें केलेल्या सर्व कारस्थानांत आपल्या राज्यास असें महत्त्व आणणें हेंच त्याचें मुख्य तत्त्व होऊन बसलें होतें.

अशा प्रकारचें महत्त्व मिळण्यास १८५४ सालीं एक उत्कृष्ट संधि पिड्मॉट-ला मिळाली; व त्या धूर्त मुत्सद्द्यांच्या जोडीनें ती तेव्हांच उचलली. या सालीं क्रिमियन वॉर नांवाचें युद्ध युरोपांत सुरू झालें होतें. काळ्या समुद्रावर कोणा-च्या आरमाराचें वर्चस्व असावें असें भांडण निघून एका बाजूस रशिया, व दुसरे बाजूस इंग्लंड, टर्की व फ्रान्स असे तट होऊन राहिले होते. इंग्लंड फ्रान्स व टर्की यांस इतर राज्यांकडून जितकी मदत होईल तितकी पाहिजेच होती; परंतु जर्मनी, ऑस्ट्रिया वगैरे राष्ट्रें तटस्थ राहिलीं होतीं. अशा वेळीं मदत करण्याचें कबूल करून आपण मध्येंच घुसलों असतां आपणांस वरिष्ठ प्रतीच्या राष्ट्राचें महत्त्व येईल, व परिणामीं आपल्या पक्षाचा जय झाल्यास पिड्मॉटचा फायदा होईल, असा धूर्तपणाचा विचार करून कौन्ट कॅव्हूर यानें पार्लमेंटपुढें ता प्रश्न आणिला. या कामीं अदूरदृष्टि माणसाला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असा कांहींच फायदा दिसण्यासारखा नव्हता. यामुळें पार्लमेंट कौन्ट कॅव्हूरचे मतास अगदीं विरुद्ध होतें. परंतु व्हिक्टर-ए-मॅन्युएल राजानें नेट धरल्यामुळें पार्ल-मेंटचें कांहीं चाललें नाहीं. अखेर पिड्मॉटचें २५००० सैन्य इंग्लंड व फ्रान्स यांस मदत करण्यास गेलें.

पुढें क्रिमियन युद्ध लवकरच संपलें; व कौन्ट कॅव्हूर यानें अटकळ केल्याप्रमाणें रशियाचा पराभव झाला. अर्थातच फ्रान्स व इंग्लंड यांजबरोबर पिड्मॉटचेंहि महत्त्व वाढलें. कॅव्हूर व व्हिक्टर-ए-मॅन्युएल यांनीं हा एक सट्ट्याचा व्यापारच केला होता. तो फसता तर पिड्मॉटचे व त्याबरोबर

सर्व इटलीचे पाय पूर्वींहून अधिकच परदास्यपंकांत रुतले असते. परंतु तोच साधल्यामुळें सर्वांसच एकदम उच्च स्थिति प्राप्त झाली. कस्टोझा व नोव्हेरा या लढायांमध्यें पिड्मॉंट ऑस्ट्रियाशीं लढाई करितांना पराभव पावल्यामुळें जें अपयश आलें होतें, तें धुऊन निघून पिड्मॉंटच्या तोंडास एकदम जरासा उजळाहि आला. या सर्वांचा परिणाम असा झाला कीं, लवकरच पुढें पॅरिस येथें जी एक युरोपियन राष्ट्रांची सभा भरली तिजमध्यें पिड्मॉंटला आमंत्रण येऊन त्यास स्वतंत्रपणाच्या नात्यानें व युरोपांतील प्रमुख राष्ट्रीय शक्तींपैकीं एक शक्ति अशा जोरानें आपल्या बाजूचें म्हणणें सभेपुढें मांडण्यास सांपडलें.

वास्तविक पिड्मॉंट हें ऑस्ट्रियाचें मांडलिक संस्थान. अशी स्थिति असतां, या सभेंत पिड्मॉंटला स्वतंत्र सभासद पाठविण्याचा अधिकार युरोपियन राष्ट्रांच्या उघड कबुलीनें मिळाला, यांतच इटलीच्या भावी स्वतंत्रतेचें बीज होतें. अर्थातच ऑस्ट्रियानें या कामीं तक्रार केली. परंतु त्याचें कांहीं चाललें नाहीं. या सभेस पिड्मॉंटचा मुखत्यार म्हणून कौन्ट कॅव्हूर हा स्वतः हजर होता. कार्यक्रमानुरोधानें पिड्मॉंटच्या वतीनें बोलण्याचा जेव्हां प्रसंग आला, तेव्हां कॅव्हूर यानें इटलीची स्थिति युरोपियन राष्ट्रांपुढें उत्कृष्ट तऱ्हेनें मांडली. इटलींतील निरनिराळ्या संस्थानांमधून प्रजेवर कसकसे अनन्वित जुलूम होत होते, हरएक सुधारणेस पोप हे विनाकारण कशी आडकाठी घालीत आले, व ऑस्ट्रियाचे शिरजोर व अनधिकारी वर्तनामुळें इटलीच्या पायांत जड शृंखळा कशा पडल्या याचेंहि त्यानें हृदयद्रावक वर्णन केलें. ऑस्ट्रियाचा मुख्य प्रधान सभेस हजर असतां त्याचे समक्ष कॅव्हूर यानें असें स्पष्ट बोलून दाखविलें कीं, 'ऑस्ट्रिया हाच काय तो इटलीच्या स्वातंत्र्यास व सुधारणेस मुख्य शत्रू आहे.' हे शब्द ऑस्ट्रियास कोणी कानांमध्यें पिस्तुलाचा बार करावा त्याप्रमाणें कडक वाटले. परंतु तो काय करणार ! असो.

या सभेमध्यें पिड्मॉंटच्या स्वतंत्रतेसंबंधानें मुक्रर असें कांहींच ठरलें नाहीं. परंतु त्या प्रसंगानें इटलीची स्थिति सर्व युरोप खंडाच्या नजरेपुढें उत्तम तऱ्हेनें मांडली गेली; व निरनिराळ्या राष्ट्रांचे मनांत पिड्मॉंटसंबंधानें सहानुभूति उत्पन्न झाली. सभा विसर्जन झाल्यावरहि कौन्ट कॅव्हूर यानें निरनिराळ्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींच्या खासगी भेटी घेतल्या, त्यावरून त्यास असें कळून आलें कीं, इंग्लंडचें मनांत पिड्मॉंटविषयीं बरीच कळकळ आहे, तरी त्याचे हातून प्रत्यक्ष अशी फारशी मदत होण्याचा संभव नाहीं; परंतु तेंच फ्रान्सचा नवीन

बादशहा लुई नेपोलियन याजकडे संधान बांधलें असतां तशी मदत होण्याचा बराच संभव आहे. तेव्हां कौन्ट कॅव्हूर व व्हिक्टर-ए-मॅन्युएल यांचा ऑस्ट्रियाशीं युद्ध करण्याचा विचार ठरून गेला. तें युद्ध ओढवण्यास अनुकूल अशीं इतर कारणेंहि घडून येऊं लागलीं. एकंदर धोरण पाहून ऑस्ट्रियानेंहि पिड्मॉटच्या राज्यांतील प्रजेचीं हत्यारें काढून घेण्याविषयीं व्हिक्टर–ए–मॅन्युएल यास आज्ञा केली, परंतु अशा वेळीं आपली प्रजा आपण होऊन निःशस्त्र करण्याइतका तो मूर्ख नव्हता; त्यानें मीं तें करीत नाहीं, असा साफ जबाब पाठविला. इतकें झाल्यावर युद्धाचें तोंड आपोआपच लागलें.

स्वातंत्र्याकरितां दुसरें युद्ध

संग्रामाध्वर दीक्षितो नरपतिः...... ।
राजन्योपनिमंत्रणाय रसति स्फीतं यशोदुंदुभिः ॥

— वेणीसंहार

राजकारस्थानांची अशी धामधूम इटलींत चालली असतां ग्यारीबाल्डी हा शेतकाम करून व भाजीभाकरी खाऊन कॅप्रेरा बेटामध्यें एकांतवासांत निवांतपणें दिवस काढीत होता. मुत्सद्द्यांचें काम मुत्सद्दी करीत असतात, तो काळ वीरांना झोंप घेण्याचा असतो; व ग्यारीबाल्डीनें राजकारणाचे बाबतींतील ही झोंप आज जवळ जवळ पांच सात वर्षें घेतली होती. परंतु युद्धास सज्ज होऊन सैन्य बाहेर निघालें व लष्कराच्या नौबदीवर टिपरूं पडलें, म्हणजे तेथपासून वीरांच्या जागृतीस प्रारंभ होतो व मुत्सद्द्यांना विश्रांति मिळते. १८५९ सालच्या एप्रिलच्या २५ व्या तारखेस ऑस्ट्रियाशीं युद्ध करण्याकरितां निघालेल्या सैन्याची पाहणी व्हिक्टर-ए-मॅन्युएल राजानें स्वतः केल्यावर त्याच दिवशीं लष्करानें कूच केलें. सैन्य गोटांतून बाहेर पडल्याबरोबर कौंट कॅव्हूर दीर्घ उच्छ्वास टाकून म्हणाला, "ठीक आहे, इतका वेळ आपण थोडाबहुत म्हणण्यासारखा इतिहास तर केला. आतां खुशाल जेवत बसण्यास हरकत नाहीं."

व्हिक्टर-इ-मॅन्युएल राजानें युद्ध करण्याचा निश्चय केल्याबरोबर आपल्या प्रजेस व सैन्यास प्रोत्साहनपर असा एक जाहीरनामा काढिला होता. त्याच्या शेवटचें वाक्य असें होतें:—"इटलीच्या स्वतंत्रतेच्या कार्यांत शिपाई होऊन लढाईच्या आघाडीस जावें याइतकी वैभवाची गोष्ट मला दुसरी कोणतीच वाटत नाहीं. इटलीचा जयजयकार असो!" स्वदेशाभिमानी हृदयांत घुसणाऱ्या या शब्दांनींच ग्यारीबाल्डीची आज इतकीं वर्षें लावलेली सात्त्विक समाधि मोडली व तोच जयशब्द घेऊन ग्यारीबाल्डी आपल्या अस्तन्या वर सारून व हातांत नंगी तरवार घेऊन कॅप्रेरा बेटावर चाळविलेल्या समंधाप्रमाणें पुनः एकवार उभा राहिला.

यापूर्वीं इतके दिवसांत कौन्ट कॅव्हूर यास ग्यारीबाल्डीची फारशी आठवण झाली नव्हती. परंतु लढाईचा प्रसंग आला असें पाहून त्या शहाण्या मुत्सद्द्यानें पहिलें बोलावणें ग्यारीबाल्डीस केलें. ग्यारीबाल्डीची खरी योग्यता, त्याचें शौर्य, त्याचें युद्धचातुर्य व त्याची लोकप्रियता, या सर्व गोष्टी कॅव्हूर हा पूर्णपणें जाणून होता. ग्यारीबाल्डी हा नुसताच शूर सरदार नाहीं, तर तो सगळ्या लष्कराच्या आघाडीचें निशाण आहे, असें तो म्हणे. एके दिवशीं सकाळीं डोक्यावर रुंद टोपी, अंगांत लांबलचक असा तांबडा झगा घातलेला व हातांत एक भली मोठी काठी घेतलेला असा एक धिप्पाड बांध्याचा पुरुष कौन्ट कॅव्हूरचे दारापाशीं आला. आंत जाऊं लागतांच शिपायानें त्यास अटकाव केला. परंतु ग्यारीबाल्डी हा कांहीं केल्या आपलें नांव सांगेना व शिपाईहि त्यास आंत सोडीना. होतां होतां शेवटीं खुद्द कौन्ट कॅव्हूरपर्यंत ती बातमी गेली. तेव्हां हा कोणी तरी एखादा विक्षिप्त माणूस कांहीं तरी मागण्यास आला असावा असा तर्क करून त्यानें त्यास आंत बोलाविलें व पाहातो तों ग्यारीबाल्डी. या मुलाखतीपासून कॅव्हूर व ग्यारीबाल्डी या दोघांसहि समाधान वाटलें. परस्परांचे मनांत परस्परांबद्दल बहुमान तर होताच, परंतु या प्रसंगीं त्यांची एकमेकांस फारच जरूरी होती.

कॅव्हूर यानें आपणास एवढा मान देऊन जवळ केलें व स्वदेशाकरितां लढण्याची परवानगी दिली याबद्दल ग्यारीबाल्डीनें कॅव्हूरचे आभार मानिले. कॅव्हूरनेंहि त्याची प्रशंसा करून स्वयंसेवक, शिलेदार व शिपाई जमवून ऑस्ट्रियाविरुद्ध तुम्ही लढाई करावी अशी राजाची इच्छा आहे असें सांगितलें. एका गोष्टींत मात्र उभयतांचा मतभेद होता. ती ही कीं, ग्यारीबाल्डीचें

मनांत लुई नेपोलियनसंबंधानें अत्यंत तिटकारा व बेभरंवसा होता व लुई नेपोलियनला मदतीला घेऊन तर कॅव्हूर यानें ऑस्ट्रियाशीं युद्ध मांडिलें होतें. परंतु कॅव्हूर हा मुख्य प्रधान असल्यामुळें ग्यारीबाल्डीचे मतास कोण विचारणार? शिवाय ऑस्ट्रियाशीं युद्ध करणें या गोष्टीपुरतें दोघांचेंहि एकमत होतेंच. यामुळें लुई नेपोलियनाबद्दल भांडण वाढविण्याचें कारण नव्हतें.

ग्यारीबाल्डी लढाईला निघणार असें कळतांच जिकडून तिकडून स्वयंसेवक, शिपाई व शिलेदार जमूं लागले. सर्व इटलीभर या कामाकरितां सभा स्थापन केलेल्या असून त्यांचे गुमास्ते फेरीवाल्यांचे वेषानें गांवोगांव जात; व जे कोणी ग्यारीबाल्डीचे लष्करांत जाण्यास तयार असतील त्यांस कांहीं खुणेचे कागद देत. ते कागद दाखविले असतां सरहद्दीवर त्यांस अटकाव न होतां येतां यावें, अशी व्यवस्था गुप्तपणें करून ठेवलेली होती. हे फेरीवाले गुमास्ते, वीस वीस, तीस तीस लोकांच्या टोळ्या तयार झाल्या म्हणजे त्यांस नेमलेल्या ठिकाणीं व नेमलेल्या वेळीं जमवीत व त्यांचेबरोबर आपला माणूस देऊन ट्यूरिन अगर जिनोव्हा येथें लष्करचे मुख्य छावणीस पाठवून देत. येथें आल्यावर मग हवे तेवढे सरकारी लष्करांत सामील करून बाकीचे ग्यारीबाल्डीचे हाताखालीं देण्यांत येत.

या स्वयंसेवकांसंबंधानें सर्व प्रकारची मुखत्यारी ग्यारीबाल्डीकडे सोंपविण्यांत आली होती. त्यानें स्वयंसेवकांच्या तीन मोठ्या पलटणी तयार केल्या, व आपल्या मुख्य लष्कराचा तळ डोंगरकठडीवर बेला या नांवाचें गांव होतें तेथें दिला. ग्यारीबाल्डीचे शिलेदारांमध्यें व शिपायांमध्यें अठरापगड जातींचे व बहुतेक सर्व राष्ट्रांतील लोक होते, असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्या वेळीं युरोपखंडांत व अमेरिकेंत ज्याला म्हणून युद्ध करण्याची हौस आली असेल किंवा ज्या ज्या म्हणून तरुणाचे मनांत स्वातंत्र्याचें वारें शिरलें असेल त्या सर्वांचें कौतुक करण्यास व कोड पुरविण्यास ग्यारीबाल्डी हें मायपोट सदा तयार होतेंच. त्याचे हाताखालीं लढणें हा त्या काळीं एक प्रकारचा बहुमान गणला जात असे; एवढेंच नव्हे, तर गनिमी कावा शिकण्याची एकच शाळा सर्व युरोपांत असून तिचें नांव "ग्यारीबाल्डी" हें होतें.

ग्यारीबाल्डीनें आपलें लष्कर तर उभारलेंच. परंतु त्यास राजाकडून जी मदत व्हावयास पाहिजे होती ती झाली नाहीं. याचें कारण असें कीं, सरकारी लष्कराचे मुख्य अधिकारी ग्यारीबाल्डीचा व त्यानें उभारलेल्या पथकांचा द्वेष

करीत. त्याचे कीर्तीमुळें त्यांस एक प्रकारची स्वाभाविक असूया वाटे. लष्करची शिधासामुग्री, हत्यारपात्यार व इतर सामानसुमान ग्यारीबाल्डीस वेळचेवेळीं पोंचत नसे; एवढेंच नव्हे, तर मुख्य हुकमत सरकारी सरदारांकडे असल्यामुळें त्यांनीं ग्यारीबाल्डीस व त्याचे लोकांस वरचेवर निरनिराळे हुकूम देऊन इकडून तिकडे तिकडून इकडे असे हेलपाटे घालावयास लाविलें, यामुळें त्या स्वातंत्र्यप्रिय लोकांस अतिशय त्रास व संताप येऊन गेला. शेवटीं खुद्द राजाचे कानांवर ही गोष्ट ग्यारीबाल्डीनें समक्ष जाऊन घातली; व त्याकडून स्वतंत्रपणें हुकमत चालविण्याची त्यास परवानगी मिळाली. ती देतांना व्हिक्टर-ए-मॅन्युएल किंचित् हसून ग्यारीबाल्डीस म्हणाला, "तुम्ही खुशाल वाटेल तिकडे जा, व वाटेल तसें युद्ध करा. तुम्हांस मी बिलकूल आडकाठी करणार नाहीं. मात्र मला इतकेंच वाईट वाटत आहे कीं, तुमच्यासारख्या सरदाराच्या हाताखालीं लढण्यास मला मोकळीक नाहीं."

स्वतंत्रपणें लढण्याची परवानगी मिळाली हें ऐकून स्वयंसेवकांच्या सैन्यास पराकाष्ठेचा आनंद झाला. पुढें पांच तासांचे आंतच ग्यारीबाल्डीनें आपलें लष्कर घेऊन कूच केलें. गनिमी काव्याचे लढाईस सुरुवात केल्यामुळें पूर्वींच्या नेमस्त हालचाली आतां अर्थातच बंद पडल्या. यापुढें ग्यारीबाल्डीच्या भरारी मारणाऱ्या मनामध्यें जसजशा प्रचंड व धाडसी कल्पना येत गेल्या त्याप्रमाणें त्या सिद्धीस नेण्याकरितां, क्षणोक्षणीं निरनिराळ्या ठिकाणीं प्रकट होणाऱ्या विद्युत्पाताप्रमाणें, आपले सैन्याकडून तो चपळ हालचाली करूं लागला. मे महिन्याचे ९ वे तारखेस ग्यारीबाल्डी व्हेरूआ नांवाचे गांवीं जाऊन पोंचला. त्या रात्रीं ग्यारीबाल्डीनें तळ देऊन खुशाल झोप घेतली. आसपास लष्करचा तळ उघड्या मैदानांत पडलेला असून त्याचे शिपाई मोठमोठ्या आगट्या पेटवून त्याचेभोंवतीं चैनीनें गप्पा मारीत, डुलक्या घेत व चिलीम पीत बसले होते. दक्षिण अमेरिकेंत असतांना अरण्यामध्यें जे बहारीचे दिवस त्यानें घालविले त्याची या प्रसंगीं त्यास पुनः एकवार आठवण झाली.

दुसरा दिवस उजाडतांच लढाईच्या उद्योगास तो लागला. शत्रूस फसविण्याची युक्ति ग्यारीबाल्डीस फार उत्तम साधली होती. लॉंबर्डीचे मुलखाकडे जातांना वाटेंत ॲरोना नांवाच्या एका गांवीं त्यानें संध्याकाळीं तळ दिला. तेथें त्यानें इतकें कांहीं सामानसुमान मागविलें व घरादारांची व्यवस्था

केली कीं, तिजवरून त्याचा या ठिकाणीं पांच चार महिने तरी तळ पडणार असें कोणासहि वाटलें असतें. पण मध्यरात्र उलटते न उलटते तोंच सगळें लष्कर त्यानें एकदम हालविलें. कॅस्टेलेटो या बंदरावर आगाऊ कांहीं होडया गुप्तपणें जमविण्यांत आल्या होत्या; त्या ठिकाणीं तो रातोरात जाऊन पोंचला, व त्या होडयांतून आपलें सर्व सैन्य उतरून तो लॅंबर्डींत शिरला.

दुसरे दिवशीं सकाळीं त्यानें सर्व लॅंबर्डीच्या लोकांस एक जाहीरनामा काढून कळविलें कीं, "ज्याला हत्यार धरतां येत असेल त्यानें तें उचललेंच पाहिजे. नाहीं तर तो देशद्रोही गणला जाईल. देशाची गुलामगिरी आतां संपविलीच पाहिजे!" हा जाहीरनामा वाचतांच लोकांस आवेश चढला. आपणावर ऑस्ट्रियन सैन्य येत आहे असें माहीत असूनहि झुंडीच्या झुंडी जमून त्यांनीं ग्यारीबाल्डीचें स्वागत केलें. व्हॅरिसि या गांवीं तर घरोघरीं ग्यारीबाल्डीचे शिपायांस बोलावून नेऊन लोकांनीं मेजवान्या चालविल्या.

दुसरे दिवशीं ऑस्ट्रियाचें सैन्य येत आहे असें कळतांच लोकांनीं गांवा-भोंवतीं लाकडी तट बांधिले, व लढाईच्या प्रसंगीं ग्यारीबाल्डीनें उत्पन्न केलेल्या स्फुरणामुळें ते इतक्या शौर्यानें लढले कीं, ऑस्ट्रियन सरदार जनरल अर्बन याच्या तोफखान्याचे कांहीं न चालून त्यास परत हटावें लागलें. तेथून पुढें ग्यारीबाल्डी कोमो शहरीं जावयास निघाला. वाटेंत ऑस्ट्रियन सैन्य असेल याची त्यास कल्पनाहि नव्हती. परंतु या सुमारास एका शूर स्त्रीनें ऑस्ट्रियन सरदाराचीं कांहीं पत्रें वाटेंत पकडून तीं ग्यारीबाल्डीस आणून दिलीं; त्यामुळें त्यास सावध राहतां आलें. कोमो या ठिकाणींहि त्यानें ऑस्ट्रियन सैन्याचा पुनः एकवार पराभव केला. यामुळें कोमो येथील लोक आनंदानें वेडे होऊन जाऊन त्यांनीं ग्यारीबाल्डीचा जयजय-कार केला.

कोमो शहरची तटबंदी करून व्हॅरिसी येथें परत येत असतां ग्यारी-बाल्डीचे हातून एक मोठी चूक झाली. ती सुधारण्यास त्याचे अंगीं प्रसंगा-वधान नसतें तर त्यास कदाचित् शत्रूचे स्वाधीनहि व्हावें लागलें असतें. कोमोहून परत येतांना ऑस्ट्रियन सैन्य कोठें कोठें आहे याचा पुरा तलास न केल्यामुळें एके दिवशीं सकाळीं तो मॉंटिसॅक्रो या नांवाच्या टेकडीवर येऊन पोंचला; व खालीं पाहतो तों ऑस्ट्रियाचें सैन्य शिस्तीनें व लढाईच्या तयारीनें उभें राहिलें होतें. ग्यारीबाल्डी टेकडीवर आला असें

कळतांच जनरल अरबन यानें तिला वेढा दिला व त्यास पकडण्याची त्याला इतकी खात्री वाटली कीं, त्यानें ग्यारीबाल्डीस उद्यांचे दिवसांत जिता किंवा मेलेला धरून आणितों अशी मिलन येथें तार पाठविली.

त्याप्रमाणें पहिल्या हल्ल्यांत ग्यारीबाल्डीचा मोड होऊन त्यास माघारहि घ्यावी लागली. मात्र त्या प्रसंगीं त्याच्या प्रसंगावधानानें त्यास हात दिला. त्यानें अशी खुबी केली कीं, नेपोलियन व व्हिक्टर-ए-मॅन्युएल यांचे नांवची एक तार केली. त्यांत "माझा मोड होऊन माझी पीछेहाट झाली आहे, याकरितां माझ्या मदतीस घोडेस्वाराची एक तुकडी पाठवून द्या" असें लिहिलें होतें. ही तार त्यानें अशा बेतानें पाठविली कीं, ती ऑस्ट्रियन सरदाराचे हातीं हटकून पडावी. वास्तविक आपल्या मदतीस येण्यासारखे घोडेस्वार जवळपास नव्हते हें त्यास पक्कें माहीत होतें; परंतु त्यानें केवळ शत्रूस फसवण्याकरितांच ही तार लिहिली होती. ग्यारीबाल्डीची ही युक्ति सोळा आणे साधली. जनरल अर्बनचे शिपायांनीं तार वाटेंत पकडून त्याजकडे नेली. तिजवरून ग्यारीबाल्डी आहे तेथेंच मुक्काम करून राहणार असें त्यास वाटलें.

इकडे रात्र पडतांच ग्यारीबाल्डीनें भल्या मोठ्या आगट्या जिकडे तिकडे पेटविल्या; व त्यांच्या पुढून शत्रूस कळून येईल अशा रीतीनें इकडे तिकडे उगीच फिरण्यास आपल्या लोकांना त्यानें हुकूम दिला. इतक्यांत मोठें वादळ सुरू झालें, विजाहि चमकूं लागल्या व मेघगर्जनेचा गडगडाट पर्वताच्या खोल दऱ्याखोऱ्यांतून होऊं लागला. ही संधि साधून ग्यारीबाल्डीनें आपलें सर्व सैन्य एकत्र केलें, व डोंगराखालीं उतरला आणि ऑस्ट्रियन सैन्याचे अगदीं तळाजवळून गेला तरी त्यांस त्याची दाद मुळींच लागली नाहीं. या संकटांतून एकदां पार पडल्यावर मग स्वस्थपणें रात्रभर घाटांतून व दऱ्यांतून वाट चालून, सकाळीं इकडे ऑस्ट्रियन सैन्य त्याजवर हल्ला करण्याचे तयारीस लागणार त्या सुमारास, कित्येक कोसांवर कोमो येथें तो सुखरूप जाऊन पोंचला सुद्धां.

अशा रीतीनें गनिमीकावा अंगीकारून ग्यारीबाल्डी हा आश्चर्यानें थक्क होऊन सोडण्यासारख्या हालचाली करीत असतां इकडे फ्रान्स व पिडमॉट यांचें सैन्यानेंहि लढाईचा बराच नेट लाविला होता. या दोन सैन्यांपुढें ऑस्ट्रियाचें सैन्यास पीछेहाट करावी लागली असून खुद्द ऑस्ट्रियाचे मुलखांतच आतां लढाया होऊं लागल्या. तेव्हां ऑस्ट्रियाचा तरुण बादशाहा जोसेफ हा

स्वतः पुढें सरसावला व आपल्या सैन्याचें आधिपत्य त्यानें आपले हातीं घेतलें; परंतु त्याचा विशेष उपयोग झाला नाहीं. कारण पुढें लवकच सोलफेरिनो या ठिकाणीं जूनचे २४ वे तारखेस दोन्ही सैन्यांची गांठ पडून तुमुल युद्ध झालें. त्यांत ऑस्ट्रियाचा पुरा पराभव झाला. या युद्धांत एके बाजूस स्वतः फ्रॅन्सिस जोसेफ व दुसरे बाजूस फ्रान्सचा बादशहा लुई नेपोलियन व पिड्मॉटचा राजा व्हिक्टर–ए–मॅन्युएल असे तीन मोठे राजे हजर होते. ऑस्ट्रियाचें सैन्य १,७०,००० असून फ्रान्स व इटली यांच्या संयुक्त सैन्याची संख्या १,५०,००० वर होती. अशीं प्रचंड सैन्यें युद्धास सज्ज झालेलीं असल्यामुळें त्या दिवशींचें युद्धहि मोठें निकराचें झालें. दोन्ही बाजूंस फारच प्राणनाश झाला. सुमारें ४०,००० लोक त्या दिवशीं त्या रणभूमीवर मरून पडले असावे असें म्हणतात.

सोलफेरिनोची लढाई इतिहासांतील मोठ्या लढायांमध्यें गणलेली आहे. या मोहिमेचे प्रारंभापासूनच ऑस्ट्रियाचे मागें अपयश लागलेलें होतें व या पराभवामुळें तर ऑस्ट्रियाची पुनः कांहीं दिवस डोकें वर निघूं नये अशी दुर्दशा झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. तेव्हां अर्थात् या सर्व तंट्याचें मूळ कारण जी इटलीची स्वतंत्रता ती सिद्ध होणार असें सर्वांस वाटूं लागलें. हें संयुक्त सैन्य जर ऑस्ट्रियाचे सैन्याचा तसाच पाठलाग करून त्याचा आणखी एक दोन वेळ पराभव करितें तर तें ओघानेंच होणारें होतें; परंतु या ऐन आणीबाणीचे घटकेस नेपोलियननें आपला पाय मागें घेतला.

नेपोलियनचा या युद्धांत शिरण्यांत मुख्य हेतु कोठें तरी युद्धांत जय मिळवून फ्रेंच लोकांवर छाप पाडावी व धाडसानें व एक प्रकारच्या लबाडीनें मिळविलेल्या आपल्या बादशाहीचा पाया भक्कम करावा असा होता. तो सोलफेरिनोच्या लढाईनें पूर्ण साधला. दुसरें असें कीं, आज जरी एवढें मोठें नांव मिळालें आहे तरी तें यापुढें असेंच युद्ध चालविलें असतांहि टिकेल असा काय नेम? युद्धांमध्यें जयापजय अनिश्चित असणार व आज जरी ऑस्ट्रियाचे मदतीस कोणतेंहि युरोपियन राष्ट्र आलेलें नाहीं, तरी ऑस्ट्रियाची दुर्दशा झालेली पाहून कोणी तरी सकारण किंवा अकारण बंधु त्यास मदत करण्यास उभा राहणार नाहीं कशावरून? तेव्हां थोड्यांत गोडी मानून, साधलें तितकेंच सई असा त्यानें पोक्त विचार केला. शिवाय सर्व इटली स्वतंत्र करणें म्हणजे पोपची सत्ता झुगारून देण्यासारखें

होय व पोपच्या अनुकूलतेचें जें साहाय्य आज आहे तें गमावावें लागेल, याकरितां त्या भानगडींत न पडतां येथूनच माघार घ्यावी असें त्यानें ठरविलें. त्याप्रमाणें व्हिक्टर–ए–मॅन्युएल याचे अनुमोदनाची वाट न पाहतां आपल्या जबाबदारीवरच त्यानें ऑस्ट्रियाचे बादशाहाशीं तहाचें बोलणें लाविलें. उभयतां बादशाहांची मुलाखत होऊन व्हिलाफ्रँका या ठिकाणीं करारनाम्यावर सह्या पडल्या. या तहांत असें ठरलें कीं, लॉंबर्डी प्रांत व्हिक्टर–ए–मॅन्युअलचे राज्यास जोडावा, तेथून ऑस्ट्रियानें आपलें सर्व सैन्य काढून घ्यावें, मॉडिना पार्मा वगैरे लहान लहान संस्थानांचे राजे, या युद्धामुळें भिऊन पळून गेले होते त्यांस परत आणून त्यांचे गादीवर स्थापावें; त्यांकडून अत्यावश्य राजकीय सुधारणा अमलांत आणण्याचा करार करून घ्यावा व या सर्व कामगिरीबद्दल सॅव्हॉय व नाईस हे दोन प्रांत पिड्मॉंटचे राज्यांत होते ते फ्रान्सला जोडण्यांत यावे.

नेपोलियन हा जबरदस्त असल्यामुळें व्हिक्टर–ए–मॅन्युअल यास हा तह निमूटपणें मान्य करावा लागला, परंतु त्याचा प्रधान कौन्ट कॅव्हूर, त्याच-प्रमाणें ग्यारीबाल्डी व मॅझिनी व इतर सर्व राष्ट्रभक्त यांना तो मुळींच आवडला नाहीं. तसेंच टस्कनी, पार्मा, मॉडिना, रोमॅना वगैरे संस्थानांतील लोकांनाहि तो नापसंत होता. व्हिक्टर–ए–मॅन्युअल यास तरी तो आवडला होता असें नाहीं; कारण एक तर त्याच्या घराण्याचें मूळ स्थान जें सॅव्हॉय तें आज कायमचें फ्रान्सचे ताब्यांत जाणार होतें. व दुसरें असें कीं, सर्व इटली स्वतंत्र करण्याच्या हेतूनें त्यानें तरवार उपसलेली असून तिला आतांपर्यंत बरेंच यश आलें होतें व पुढील मार्गहि खुला होता. असें असतां केवळ परेच्छेनें तिला प्रतिबंध होऊन परत म्यानांत जावें लागत होतें. या सर्व गोष्टी खऱ्या परंतु कोणाचाच कांहीं इलाज चालण्यासारखा नव्हता. यामुळें त्याला गप्प बसावें लागलें. कौन्ट कॅव्हूर यानें या सर्व लढाईचा घाट घडवून आणलेला असल्यामुळें त्याला हा अर्धवट स्थितींत झालेला तह पाहून आपलें सर्व कारस्थान फुकट गेलें असें वाटून तो चवताळून गेला. ग्यारीबाल्डी हा तह ऐकून क्रोधानें बेफाम होऊन गेला. कारण त्याची आवडती जन्मभूमि जें नाईस शहर तें जन्मापासून शत्रुवत् मानलेल्या फ्रान्सच्या ताब्यांत जावयाचें होतें. परंतु व्हिक्टर-ए-मॅन्युएलनें तह कबूल केल्यामुळें ग्यारीबाल्डीचें कांहीं चालेना.

लढाई संपतांच अर्थातच ग्यारीबाल्डीच्या स्वयंसेवक सैन्याचें फारसें कारण उरलें नाहीं. सरकारी लष्करचे प्रमुख सरदारांस ग्यारीबाल्डी व त्याचें सैन्य याजबद्दल एक प्रकारचा हेवा व तिरस्कार वाटत असे, असें मागें सांगण्यांत आलेंच आहे. व त्याचे लोकांनीं अमुकच तऱ्हेनें वागावें, अमुक करूं नये, अमुक प्रकारची कवाईत करावी, वगैरे हुकूम रोज सुटूं लागले. वास्तविक पाहतां सर्व युद्धांत या स्वातंत्र्यप्रिय सरदाराचे स्वतंत्र सैन्यानें आपल्या गनिमी काव्याचे जोरावर जसे पराक्रम केले होते, तसे आपल्या शिस्तीची व नियमबद्ध कवाइतीची ऐट मारणाऱ्या सरकारी सैन्याचे हातूनहि झाले नव्हते. असें असतां कारण संपल्याबरोबर त्यांच्यामागें कांहीं तरी दुट्टें लावून त्यांना नाउमेद व हताश करणें म्हणजे एक प्रकारचा कृतघ्नपणाच होता. ग्यारीबाल्डीनें केलेल्या कामगिरीची किंमत व्हिक्टर-ए-मॅन्युएल यास माहीत नव्हती असें नाहीं. कारण त्यानें त्या कामगिरीबद्दल त्यास आपल्या हातची शिकारीची एक बंदूक नजर केलेली असून, लष्करांतील मानाची एक जागा व कांहीं वार्षिक उत्पन्न असें त्यास करून दिलें होतें. परंतु स्वयंसेवकांचे वागवणुकीसंबंधानें लष्करी अमलदारांचें म्हणणें ऐकणें त्यास भाग पडे.

सोलफेरिनोची लढाई व व्हिला-फ्रँकचा तह यांचे दरम्यान ग्यारीबाल्डीनें आणखी बरेच पराक्रम केले होते; व तोच क्रम पुढें चालवून व्हॅनेशिया व मध्य इटलींतील कांहीं संस्थानें काबीज करण्याचा त्याचा विचार होता. परंतु मध्यंतरीं तह झाल्यानें त्याची नाउमेद झाली. या तहामुळें उत्पन्न झालेल्या उद्विग्नतेनें व स्वतंत्रपणानें आपल्या जबाबदारीवर यापुढें वागतां यावें अशा हेतूनें त्यानें आपल्या सरकारी लष्करी जागेचा एकदम राजीनामा पाठवून दिला. परंतु व्हिक्टर-ए-मॅन्युएल हा तो राजीनामा स्वीकारीना. त्यानें त्यास लिहिलें कीं, "इटलीस आपली व आपल्या पलटणांची अद्याप गरज आहे. याकरितां आपणांस राहिलेंच पाहिजे." ग्यारीबाल्डीचे मनांत व्हिक्टर-ए-मॅन्युएलविषयीं पूर्वींपासून बराच आदर असे, व नुकत्याच झालेल्या युद्धांत स्वतः समरांगणामध्यें हजर राहून त्यानें जें शौर्य प्रकट केलें त्यामुळें तो आदर दुणावला होता. यास्तव त्याची अवज्ञा करून आपलेंच म्हणणें शेवटास नेण्याचें त्याचे हातून होईना. याकरितां आणखी कांहीं दिवस त्यानें आपल्या जागेवर राहण्याचें कबूल केलें.

भाग १३ वा

राजकारणाचें नवीन धोरण

तटस्थः स्वानर्थान् घटयति च मौनं च भजते ॥

—मालतीमाधव.

यापुढें लवकरच राजकारणास पुनः नवीन धोरण येऊं लागलें. व्हिक्टर-ए-मॅन्युएल याचा राजकीय बाबतींतील उदारपणा व स्वदेशाभिमान पाहून इटलींतील निरनिराळ्या संस्थांच्या लोकांचीं मनें त्याच्या जुलमी व स्वदेशाभिमानशून्य राजांवरून उडून व्हिक्टर-ए-मॅन्युएल याजकडे वेधूं लागलीं. विशेषतः ग्यारीबाल्डी यानें नुकतेच पराक्रम करून आपल्या कांहीं बांधवांना स्वतंत्रता मिळवून दिली होती, यामुळें तो आपल्या मदतीस येईल तर आपणासहि स्वतंत्रता देईल अशी त्यांची खात्री झाली होती. व्हिलाफ्रँका येथील तह होऊन शांततेचा अंमल बसतो न बसतो, इतक्यांत इटलींतील कित्येक शहरांनीं बंडें करून व्हिक्टर-ए-मॅन्युएलचे राज्यास सामील होण्याची इच्छा उघडपणें दर्शविली. याच सुमारास मॅझिनीनें सिसिलीमध्यें लोक पाठवून आपल्या मतांचा प्रसार करण्यास सुरुवात केली. जिकडे तिकडे गुप्तपणें सभा भरूं लागल्या, व जो तो चोरून मारून हत्यारें जमविण्याच्या मार्गास लागला. इकडे ग्यारीबाल्डीचे मित्रांनीं ऑस्ट्रियाशीं झालेल्या लढाईचे वेळीं सरकारी लष्करांत जागा पत्करल्या होत्या, त्यांनी भडाभड राजीनामे देऊन टाकले व ते आपल्या हाताखालीं स्वतंत्रपणें युद्ध करण्यास तयार झाले, हें पाहून ग्यारीबाल्डीनें निरनिराळे जाहीरनामे प्रसिद्ध करून लोकांत चळवळ सुरू केली, व फिरून एक वेळ आपल्याच जबाबदारीवर लढाई सुरू करण्याचा आपला इरादा त्यानें जाहीर केला.

अशा रीतीनें चोहोंकडे स्वदेशाभिमानाचा एकच संचार झाल्यामुळें व्हिक्टर-ए-मॅन्युएल राजालाहि ओघाबरोबर जाणें भाग पडलें. कौन्ट कॅव्हूर रागावून सहा महिने घरीं बसला होता त्यास त्यानें परत बोलाविलें; कारण नवीन राजकारणाचें धोरण संभाळण्यास दुसरा कोणीच समर्थ नव्हता. कौन्ट कॅव्हूर यानेंहि प्रसंग पाहून प्रधानकीचें काम फिरून हातीं घेतलें. इटलींतील

निरनिराळ्या शहरांनीं बंडें करून व्हिक्टर-ए-मॅन्युएलचे राज्यास सामील होण्याची इच्छा प्रकट केली होती हें वर सांगितलेंच आहे. अशा शहरांपैकीं सिसिलीच्या राजधानीचें शहर नेपल्स हें प्रमुख होतें; व ग्यारीबाल्डीनेंहि सिसिलीवर स्वारी करून नेपल्स येथील लोकांच्या मदतीनें तें संस्थान काबीज करून व्हिक्टर-ए-मॅन्युएलचे राज्यास जोडण्याचा बेत केला होता.

या वेळीं कॅव्हूर याची स्थिति मोठी चमत्कारिक झाली होती. इकडे ग्यारीबाल्डीस उघड मदत करावयाची म्हटली तर सिसिलीवरच्या स्वारींत फारसें यश येण्याचा संभव दिसत नव्हता. कारण ग्यारीबाल्डीजवळ फक्त एक हजार शिलेदार काय ते होते. एवढ्यानें सिसिलीच्या सैन्याशीं टक्कर कशी देववणार ? शिवाय नेपल्सचे राज्यास युरोपांतील फ्रान्स व ऑस्ट्रिया या राष्ट्रांकडून मदत होण्याचा संभव होता, परंतु दुसरे पक्षीं पाहतां ग्यारीबाल्डीस व त्याच्या बिथरलेल्या शिलेदारांस प्रतिबंध करणें हेंहि काम तितकेंच बिकट होतें. ग्यारीबाल्डी हा लोकांस या वेळीं इतका प्रिय झालेला होता कीं, त्याजवर सक्ती करून प्रतिबंध करण्याकरितां हात उचलला असतां कदाचित् लोक बंड करून व्हिक्टर-ए-मॅन्युएल राजासच पदच्युत करतील हें त्यास पूर्णपणें माहीत होतें. अशा वेळीं बेफाम झालेल्या घोड्यास होतां होईतों स्वेच्छेनें धावूं द्यावें व अगदीं प्राणावरच बेतेल तेव्हां निरुपाय म्हणून त्याजवर हात टाकावा, अशा तऱ्हेचें धोरण पत्करण्याशिवाय कॅव्हूर यास गत्यंतर नव्हतें.

ज्या वेळीं ग्यारीबाल्डीची फौज स्वारीवर निघाली त्या वेळीं कॅव्हूर यानें सरकारतर्फे ॲडमिरल परसॅनो या नांवाचा आरमारावरील अधिकारी त्याचे मागोमाग पाठविला. त्यास दोन प्रकारचे हुकूम देण्यांत आले होते. दिखाऊ हुकुमप्रमाणें पाहतां त्यास अशी आज्ञा होती कीं ग्यारीबाल्डी हातीं लागतांच त्यास एकदम कैद करून परत आणावें व अशा रीतीनें सिसिलीवरील स्वारीस प्रतिबंध करावा. परंतु गुप्त हुकूम असा होता कीं, परसॅनो यानें ग्यारीबाल्डी काय काय करतो यावर फक्त सूक्ष्म नजर ठेवून अगदीं आयत्या वेळीं शक्य असेल ती त्यास मदतहि करावी. तात्पर्य, ग्यारीबाल्डीचा विजय किंवा पराभव यांपैकीं कोणतीहि गोष्ट होवो, तिचा फायदा स्वराज्यास करून घ्यावयाचा असा त्यानें घाट घातला. इकडे अशी बेमालुम व्यवस्था केल्यानंतर परराष्ट्रांचीं तोंडें कशीं बंद करावयाचीं या विचारास तो लागला. कारण ग्यारीबाल्डीचे स्वारीच्या योगानें व्हिलाफ्रँका येथील तहाचे विरुद्ध सर्व युरोपच्या शांततेचा

भंग होत आहे अशी सर्व राष्ट्रांनीं कुरकूर करण्यास सुरुवात केली होती; व त्यांपैकीं एखाद्यानें जर का कंबर बांधली तर त्याचे योगानें ग्यारीबाल्डीची स्वारी फसेल एवढेंच नव्हे तर इटलीची स्वतंत्रता हें जें मुख्य कार्य त्यासहि धोका येईल अशी भीति बाळगण्यास कारण होतें.

या बिकट प्रसंगीं कॅव्हूर यास इंग्लंडचें मात्र थोडेंसें पाठबळ मिळालें. याचें कारण असें होतें कीं, यापूर्वी कांहीं वर्षें ग्लॅडस्टनसाहेब फिरत फिरत नेपल्स येथें गेले होते; तेथील जुलमी राजसत्तेचें भयंकर स्वरूप त्यांनीं आपल्या डोळ्यांनीं पाहिलें होतें; व इंग्लंडास परत गेल्यावर त्यांनीं या भयंकर स्थितीचें जें वर्णन केलें त्यामुळें सर्व राष्ट्राचीं मनें नेपल्सच्या राजाविरुद्ध अत्यंत क्षुब्ध होऊन गेलेलीं होतीं. अर्थात् त्याविरुद्ध जो कोणी शस्त्र धरील त्याजबद्दल इंग्लिश लोकांचे मनांत सहानुभूति उत्पन्न होणें हें स्वाभाविकच होतें. इंग्लंडनें या वेळीं नेट धरल्यामुळें लुई नेपोलियन यानें सिसिलीवरील स्वारीस प्रतिबंध करण्याचें मनांत आणलें होतें तें सोडून दिलें. ऑस्ट्रियाचे राजाचा नुकताच पराभव झाला असल्यामुळें त्यास या प्रसंगीं मूग गिळून स्तब्ध बसावें लागलें होतें व बाकीच्या युरोपियन राष्ट्रांना सिसिली गेली किंवा राहिली तरी त्याबद्दल बरें-वाईट वाटण्याचें कारणच नव्हतें.

इकडे ग्यारीबाल्डीनें आपले लोक जमविले व गुप्तपणें हत्यारें जमविण्याचेंहि काम चालू ठेवलें. यांपैकीं कांहीं हत्यारें सरकारी हुकुमावरून जप्त करण्यांत आलीं; तथापि मागें सांगितल्याप्रमाणें कॅव्हूरनें सिसिलीवरील स्वारीचे बाबतींत 'नरो वा कुंजरो वा' असें म्हणण्याचा प्रथमापासूनच घाट घातला असल्यामुळें ग्यारीबाल्डीचे मार्गांत म्हणण्यासारखें विघ्न आलें नाहीं. तारीख ५ मे १८६० चे सुमारास ग्यारीबाल्डीबरोबर निघण्यास सुमारें एक हजार लोक सज्ज झाले. यांपैकीं सुमारें चार सवाचारशें लोक घरचे खाऊन पिऊन सुखी, इभ्रतदार व सुशिक्षित असे होते. शिपाईगिरी हा त्यांचा धंदा नव्हता; तथापि त्या वेळीं लोकांत असाच कांहीं आवेश संचरला होता कीं, ज्यानें जन्मांत कधीं शिपाईगिरी केली नव्हती त्यासहि लढाईवर जाऊन झालें तर कांहीं देशकार्य करावें असें स्फुरण चढलें होतें. ग्यारीबाल्डीचे हे हजार लोक इतिहासामध्यें प्रसिद्ध होऊन राहिले आहेत. त्यांनीं कामगिरीहि तशीच केली. फक्त एक हजार लोकांनीं सिसिलीवर स्वारी करणें म्हणजे निव्वळ वेडेपणा होय असें कोणीहि म्हटलें असतें; परंतु जेव्हां मरणाची भीति मनां-

तून नाहींशी होते व स्वदेशाभिमानाची पवित्र ज्योति अंतःकरणांत प्रदीप्त होते तेव्हां निवळ संख्येवरून कर्तृत्वाची कल्पना करीत बसणें हें चुकीचें ठरतें. तारीख ४ मे रोजीं जिनोआचे आसपासचे किनाऱ्यावर हे हजार शूर शिपाई पसरले होते. आपलें तुटपुंजें सामान बरोबर घेऊन किनाऱ्यावरील खडकावरच एकेक दिवस आगाऊ त्यांनीं तळ दिला.

ग्यारीबाल्डीनें जिनोआचे बंदरांतील टिमोंटी आणि लांबर्डो या नांवाच्या दोन आगबोटी वेठीस धरल्या व त्यांवर लोक व सामान चढवून जलदीनें निघण्याचा हुकूम केला. या वेळीं लोकांत इतका आवेश चढला होता, कीं या हजार शिपायांना पोंहोचविण्याकरितां जे कित्येक लोक किनाऱ्यावर आले होते ते आयते वेळीं आम्हीसुद्धां तुम्हांबरोबर येतों, आम्हांस लढाईवर घेऊन चला, असा हट्ट धरून बसले. त्यांची समजूत काढतां काढतां ग्यारीबाल्डीस पुरें पुरें झालें. या शूर शिपायांच्या आया-बहिणी, बायका त्यांना निरोप देण्याकरितां आल्या होत्या. त्यांच्या डोळ्यांतून आनंदाचे अश्रु वाहत होते. ग्यारीबाल्डीला बंदरांतून पाय काढण्याची फार उत्सुकता झाली होती म्हणून निरुपायास्तव बोटी हाकारण्याचा शेवटीं त्यानें हुकूम दिला. तेव्हां जवळच्या गांवाहून स्वारीस जाण्यास निघालेले परंतु अद्याप बंदरावर येऊन न पोंहोचलेले असे चाळीस लोक मागें राहिले. त्यांजबरोबर त्यांचीं हत्यारें व दारूगोळाहि मागें राहिला.

आगबोटी समुद्रांत बऱ्याच दूर गेल्यानंतर ग्यारीबाल्डीनें या छोटेखानी लष्कराची शिस्त लाविली व त्यास उद्देशून एक सणसणीत व आवेशयुक्त असें भाषणहि केलें. तारीख ११ मे रोजीं हें सैन्य मार्सोला येथें येऊन पोंहोचलें. परंतु त्याचे मागोमाग नेपल्सचे राजाचीं गलबतें येत होतीं. हें वर्तमान कळतांच ग्यारीबाल्डीनें गडबडीनें तास दोन तासांत आपलें सैन्य व सामानसुमान किनाऱ्यावर उतरविलें, व त्या आगबोटीस आग लावून देऊन आपले लोक घेऊन तो मार्सोला शहरांत शिरला. ग्यारीबाल्डी अकस्मात् आला असें पाहून मार्सोला येथील लोकांस अत्यंत आश्चर्य वाटलें. परंतु त्यांनीं त्यास जाऊन मिळण्याचीं कांहींच चिन्हें दाखविलीं नाहींत. तेव्हां तेथून निघून तो सालेमी या गांवीं गेला. वाटेनें ठिकठिकाणीं त्याचा पुष्कळच गौरव झाला. बायका-मुलें, धर्मगुरु यांनींसुद्धां त्याचा जयजयकार केला. सालेमी येथें

ग्यारीबाल्डी यानें जाहीरनामा काढून, सिसिलींतील राष्ट्रपक्षीय सैन्याचा मुख्य सरदार व दिवाणी, मुलकी, लष्करी या सर्व अधिकारांचा मुख्य अधिकारी असा किताब आपणांस घेऊन व्हिक्टर-ए-मॅन्युएल राजाचे नांवानें द्वाही फिरविली.

परंतु मुख्य लढाईचें काम तें पुढेंच होतें. तो प्रसंग ग्यारीबाल्डीच्या इच्छे-प्रमाणें लवकरच घडून आला. कॅलटॅफिमी या नांवाचे घाटाचे पायथ्याशीं नेपल्सचे राजाच्या सैन्याची व ग्यारीबाल्डीची प्रथम चकमक झडली. या चकमकींत ग्यारीबाल्डीचा मुलगा मेनॉट्टी हा जखमी झाला. प्रथम कांहीं वेळ ग्यारीबाल्डीचे निशाणाचा पाडाव होतो कीं काय, अशीहि भीति वाटत होती. परंतु गनिमी काव्याची ही लढाई असल्यामुळें शेवटीं ग्यारीबाल्डीसच यश आलें.

पराभव पावलेल्या सैन्यानें पालेर्मो या बळकट शहराचा आश्रय धरला. त्याचे पाठोपाठ ग्यारीबाल्डी हाहि आपलें सैन्य घेऊन गेला. पालेर्मो शहरच्या रस्त्यांमधून सुमारें चार तास लढाई केल्यावर त्यानें शहरचें रक्षण करणाऱ्या बारा हजार नेपॉलिटन लोकांस मागें हटविलें. अद्यापि पालेर्मो येथील किल्ला व राजवाडा हे मात्र ग्यारीबाल्डीचे हातीं लागले नव्हते. या किल्ल्यावरून व बंदरांतील जहाजांवरून ग्यारीबाल्डीचे लोकांवर शत्रूंनीं गोळ्यांचा मारा चालू ठेवला होता. त्याचे योगानें शहरांतील कित्येक इमारती पडून बरेंच नुकसान झालें; तथापि ग्यारीबाल्डीचे सैन्यास मिळालेल्या विजयाबद्दल जिकडे तिकडे मोठा उत्सव चालू होता. आजूबाजूच्या डोंगरांतील शेतकरी-कुणबी भराभर पालेर्मो शहरांत जमूं लागले व जिकडे तिकडे ढोल, नौबदी व तुताऱ्या यांच्या ध्वनींची एकच गर्दी उठली. ग्यारीबाल्डीचा आवडता पेहराव तांबडा झगा हा असल्यामुळें शहरच्या सर्व लोकांनीं जिकडे तिकडे तांबड्या झग्याचाच पोषाख केला. गांवच्या सर्व दुकानांतील तांबड्या कापडाचे तागे संपून गेले, व कपडा शिवावयास शिंपी मिळावयाची मारामार पडूं लागली.

आपल्या गोळीबाराचा कांहीं उपयोग झाला नाहीं असें पाहून, नेपॉलिटन सैन्याचा सरदार जनरल लँझा यानें ग्यारीबाल्डीस मोठ्या गौरवानें पत्र लिहून भेट देण्याची विनंति केली. या भेटीमध्यें प्रथम तात्पुरता तह ठरला. नंतर लवकरच नेपल्स येथून हुकूम आल्यावर एकदोन ठिकाणांखेरीज करून बाकी सर्व सिसिली बेटांतून सैन्यानें निघून जाण्याचें कबूल केलें.

इकडे ग्यारीबाल्डीचे सांगण्यावरून पालेर्मो येथील लोकांनीं शहरची डाग-डुजी व तटबंदी केली. या वेळीं शहरवासी लोकांना इतका आनंद व उत्साह

आलेला होता कीं, शहरचे तटबंदीचे कामीं व किल्ला पाडण्याचे कामीं गोळा झालेल्या सर्व लोकांस एकदम कामावर लावतां देखील येईना.

ग्यारीबाल्डीस विजय मिळतांच, कॅव्हूर यानें ॲडमिरल फॅरिना यास पालेर्मो येथें पाठविलें. तेथें जाऊन तें शहर व्हिक्टर-ए-मॅन्युएलचे राज्यास सामील करण्याचे बाबतींत लोकांकडून उचल करतां येईल तर पाहावें असा त्यास हुकूम होता. परंतु इतक्यांतच ही गोष्ट करण्यास ग्यारीबाल्डी कबूल नव्हता. त्यानें फॅरीना यास पालेर्मो येथून हुसकून लावलें व पूर्ववत् सर्व अधिकार आपले हातीं घेतले. ग्यारीबाल्डी हा या वेळीं सर्व सिसिलीचा गव्हर्नर झाला होता. तथापि तो इतक्या साधेपणानें राहात असे कीं, यत्किंचित् लष्करच्या एकादा शिपाईहि अशा तऱ्हेनें राहात नसेल. देवळांत प्रार्थनेस गेला असतां त्याच्याकरितां लोकांनीं मुद्दाम तयार केलेल्या आसनावर न बसतां लोकांचे गर्दींत मिसळून नुसत्या फरशीवर गुडघे टेकून त्यानें ईश्वराची प्रार्थना करावी. त्यानें अंगांत नेहमींप्रमाणें एक लांबलचक झगा व डोक्यास कसली तरी एक टोपी घालावी, हें सर्व पाहून तर पालेर्मो येथील लोकांस अतिशय कौतुक वाटे व त्याजबद्दल अत्यंत प्रेम उत्पन्न होई.

भाग १४ वा

नेपल्सवरील स्वारी

साहसे श्रीः प्रतिवसति ॥

—मृच्छकटिक

तारीख १७ जुलै रोजीं ग्यारीबाल्डीस अशी खबर लागली कीं, नेपॉलिटन सैन्याचा मिलॅझो या गांवीं बराच मोठा जमाव होत आहे. तेव्हां अर्थातच ग्यारीबाल्डीनें स्वारीची तयारी केली. मिलॅझो येथें जमणाऱ्या सैन्याचें आधिपत्य नेपॉलिटन सरदार जनरल बास्को याजकडे होतें. हा सरदार स्वतः शूर असून त्याचें सैन्यहि कवाईत शिकलेलें होतें व त्यांनीं चांगल्या मजबूत ठिकाणचा आश्रय केलेला होता. दुसरे पक्षीं ग्यारीबाल्डीचें सैन्य पाहावें तर,

त्यांत युरोपांतील अठरापगड जाती भरलेल्या व लष्करांत नवशिक्या तरुण शिपायांची गर्दी विशेष. अशा या दोन विषम स्थितींतील सैन्यांची मिलॅझो या ठिकाणीं लढाई व्हावयाची होती. परंतु ग्यारीबाल्डीची त्या वेळीं सद्दीच अशी कांहीं विलक्षण होती कीं, तो जें जें करील त्यांत त्याला यशच येत गेलें.

लढाईचें तोंड लागण्यापूर्वीं ग्यारीबाल्डीनें बरोबर ५० लोक घेतले. प्रथम त्यानें बॉस्कोचे लष्करचे उजवे बाजूस हल्ला केला व शत्रूच्या एका तुकडीची दाणादाण केली. परंतु चुकून याचा असा परिणाम झाला कीं, तो स्वतः मागें असलेल्या शत्रूच्या तोफेच्या माऱ्यात आपोआप आला. दुर्दैवानें ही तोफहि फार अंतरावर नव्हती. थोड्याच वेळांत ग्यारीबाल्डीचा घोडा जखमी झाला, व त्याचे पायाखालची रिकीब तुटून पडली. त्याबरोबर घोडा बेफाम होऊन आवरेनासा झाला. या गडबडींत त्याचें पिस्तुल खोगिरांत राहून गेल्यामुळें हातांत तरवारीशिवाय दुसरें शस्त्रहि राहिलें नाहीं. इतक्यांत शत्रूचे चार शिपाई त्याचे अंगावर धांवून आले, व त्यांनीं त्यास घेरून व हत्यारें उगारून शरण ये व हत्यार खालीं ठेव असें दरडावून सांगितलें. परंतु ग्यारीबाल्डी मुळींच न डगमगतां उलट त्यांनाच दरडावून म्हणाला, "खबरदार, मी ग्यारीबाल्डी आहें. तुम्हीच मला शरण आलें पाहिजे." आतां एका क्षणांत त्या चौघांच्या तरवारीचे वार ग्यारीबाल्डीवर पडणार, इतक्यांत मिझोरी धांवून आला व शत्रूंनीं दचकून किंचित् तोंडें फिरविलीं. त्या संधीला त्यानें व मिझोरी या दोघांनीं मिळून त्या चौघांस ठार केलें.

या कठीण प्राणसंकटांतून बचावल्याबरोबर ग्यारीबाल्डीनें तोंड फिरवून तोफखान्याचे बाजूनें हल्ला करण्याचा निश्चय केला. स्वतः तो व दुसरे तीन शूर शिपाई यांनीं तटावरून चढून जाऊन गोलंदाजांवर चाल करून, तोफ काबीज केली. अर्थात् तीच तोफ आतां ग्यारीबाल्डीनें उलट शत्रूवर चालू केली. तोफ परत मिळविण्याकरितां नेपॉलिटन सैन्याचा एक सरदार कांहीं लोक घेऊन तोफेवर चालून आला. तेव्हां पुनः एक वेळ ग्यारीबाल्डीचें व शत्रूचें छातीला छाती भिडवून युद्ध झालें व त्यांतहि त्यास यश आलें.

अशा रीतीनें कांहीं वेळ लढाई झाल्यावर शत्रूचा मोड झाला, व त्यांस मिलॅझो येथील बालेकिल्ल्यावर आश्रय धरून बसावें लागलें. बॉस्को यानें कुमक मागण्याकरितां नेपल्स येथें माणूस पाठविला. परंतु पुरेशी कुमक न आल्यानें व तह करण्याचा हुकूम मिळाल्यानें बॉस्को यानें तहाचें बोलणें

लाविलें. किल्ल्यावरील सर्व युद्धाची सामुग्री आहे तशी ठेवून, फक्त आपापलीं हत्यारें घेऊन बाहेर पडावें अशी तहाची शर्त होती. परंतु शत्रूनें कपट करून कित्येक तोफांच्या कान्यांतून खिळे ठोकून दिले होते; एवढेंच नव्हे, तर भुयारांत दारू भरून लांब अंतरावरून त्यास बत्ती देतां यावी व ग्यारीबाल्डी किल्ल्यावर आल्याबरोबर सुरुंग उडवून द्यावा अशीहि त्यांनीं व्यवस्था केली होती. परंतु सुदैवानें हें कपट उघडकीस आलें व त्यामुळें किल्ला व ग्यारीबाल्डीचे लोक बचावले.

नेपॉलिटन सैन्य किल्ला उतरून जाईपर्यंत मिलॅझो येथील लोकांनीं ग्यारीबाल्डीस कांहींच मदत केली नव्हती. परंतु परस्पर त्याच्या पराक्रमानें स्वतंत्रता मिळाल्याबरोबर त्यांनीं ग्यारीबाल्डीचा जयजयकार केला. जय मिळाल्यावर त्या दिवशीं रात्रीं एका देवळाचे आगाशींत पाण्याचा खुजा व एकदोन पाव घेऊन ग्यारीबाल्डीनें भोजन केलें, व उशाला घोड्याचें खोगीर घेऊन त्यानें निवांतपणें झोंप काढली. मिलॅझोच्या पुढें मेसीना या नांवाचें एक शहर असून येथेंहि नेपॉलिटन सैन्याचें एक ठाणें होतें. ग्यारीबाल्डीनें पुढील हल्ला या शहरावर केला. या कामीं त्यास मुळींच अडथळा झाला नाहीं व मेसीना आपोआप हातीं लागलें. या शहरचे लोकांस ग्यारीबाल्डीचें येणें मनांतून नको होतें असें नाहीं. तथापि १८४८ सालीं झालेल्या बंडानंतर, नेपल्सच्या राजानें बंडवाल्यांस अतिशय कडक शिक्षा केल्यानें लोकांस जी एकदां दहशत पडली होती ते ती अद्याप विसरले नव्हते. यामुळें ग्यारीबाल्डी आला असें कळतांच लोक अतिशय घाबरून गेले व जो तो आपला जीव घेऊन होड्यांतून बसून बंदराचे आश्रयानें राहिला होता. परंतु आतां ग्यारीबाल्डीचें ठाणें शहरांत कांहीं दिवस बसल्यानंतर बाहेर गेलेले सर्व लोक परत आले व त्यांनीं ग्यारीबाल्डीचा जयजयकार करण्यास प्रारंभ केला. त्यांनीं गांवांत तोरणें उभारलीं व आनंदोत्सव केला. इतकेंच नव्हे, तर ग्यारीबाल्डीच्या गाडीचे घोडे सोडून त्यांनीं त्याचा रथ आपल्या खांद्यांनीं ओढीत नेला.

अशा रीतीनें ग्यारीबाल्डीच्या स्वारीचें काम निम्में फत्ते झालें. 'साहसे श्रीः प्रतिवसति' असें जें मृच्छकटिकांतील शर्विलकानें म्हटलें आहे त्याची प्रचीति जगाचे इतिहासांत वारंवार आलेलीच आहे. या अचाट साहसाचे योगानें ग्यारीबाल्डीनें अशक्यप्राय वाटणारें सिसिली बेट जिंकलें; एवढेंच

नव्हे, तर आतां त्याचेजवळ कमींत कमी पंचवीस हजार सैन्य आपोआप जमलें व हजारों बंदुकाहि जुळल्या.

इतकी सिद्धता झाल्यावर नेपल्स शहरावर स्वारी करण्याचे मार्गास ग्यारीबाल्डी हा नेटानें लागला. ग्यारीबाल्डी हा नेपल्सवर आल्याशिवाय आतां स्वास रहात नाहीं असें तेथील राजास वाटलें, तेव्हां त्यानें शेवटचा उपाय म्हणून व्हिक्टर-ए-मॅन्युएल राजाकडे आपला वकील पाठविला. यापूर्वी कॅव्हूर व व्हिक्टर-ए-मॅन्युएल यांनीं ऑस्ट्रियाविरुद्ध लढाई झाली त्या वेळीं आपल्यास येऊन मिळण्यास नेपल्सच्या राजास विनंति केली होती; परंतु इटली स्वतंत्र करावयाची या उदात्त कल्पनेचा त्याला पुरा अर्थहि कळत नसल्यामुळें त्यानें व्हिक्टर-ए-मॅन्युएल यास मदत करण्याचें नाकारलें होतें. आतां तोच फ्रान्सिस राजा नम्र होऊन शरण आला होता, व ग्यारीबाल्डीपासून कसें तरी माझें रक्षण करा असें म्हणूं लागला होता.

व्हिक्टर-ए-मॅन्युएल व कॅव्हूर यांना ग्यारीबाल्डीची नेपल्सवरील स्वारी उघडपणें पसंत करितां येत नव्हती, तरी देखील त्यांना फ्रान्सिसचे वकिलास आम्हांस या बाबतींत फारसें कांहीं करतां येत नाहीं असा निराशेचा निरोप देणेंच भाग पडलें. तथापि व्हिक्टर-ए-मॅन्युएल यानें ग्यारीबाल्डी याचें मन वळविण्याकरितां म्हणून त्यास पत्र लिहिलें व "हल्लीं इटलींतील प्रजेमध्येंच परस्पर जी लढाई चालली आहे ती संपविली पाहिजे, व म्हणून आपण नेपल्सवर जाण्याचा प्रस्तुतचा बेत रहित करावा" असें कळविलें.

या पत्रास ग्यारीबाल्डीनें "आपली आज्ञा मला शिरसावंद्य; तथापि इटलीची स्थिति पाहतां या क्षणीं ती मला सर्वथा पाळतां येत नाहीं. यास्तव महाराजांनीं या क्षणीं एक वेळ आपली आज्ञा अमान्य करण्याची मेहेरबानीनें मला परवानगी द्यावी." अशी अत्यंत नम्रपणानें विनंति केली.

वरील पत्रव्यवहाराच्या मासल्यावरूनच सर्व स्थिति एकदम लक्षांत येण्यासारखी आहे. ग्यारीबाल्डीच्या मनांतील जागरूक नम्रसेवकभाव व त्याचे कर्तव्याचे मार्गांत प्रतिबंध करणारी राजाज्ञा यांचा विरोध त्यास किती दुःसह झाला असेल, याची कल्पना सहज करतां येईल. दुसरे पक्षीं, व्हिक्टर-ए-मॅन्युएल राजाच्या मनाची स्थितीहि विचार करण्यासारखी आहे. एवढा महाप्रतापी व स्वामिभक्त वीर आपल्या प्रजाजनामध्यें आहे. त्याचें व आपलें मूळ कार्य एकच आहे. असें असतांहि त्याचें व आपलें धोरण सर्वांशीं न जुळल्या-

मुळें प्रतिक्षणीं विनाकारण विरोध येतो हें पाहून राजासहि किती वाईट वाटलें असेल याचीहि सहज कल्पना करतां येईल. परंतु राजा व राजभक्त यांचा हा विरोध टळण्यासारखा नव्हता. ग्यारीबाल्डीची नजर सर्व इटलीचें स्वातंत्र्य एकदम सिद्ध व्हावें या प्रचंड परंतु दुःसाध्य कल्पनेवर लागलेली असून त्याला कपट, कावा, धोरण किंवा युक्ति ही बाजू मुळींच दिसत नव्हती. व्हिक्टर-ए-मॅन्युएलची गोष्ट उलट होती. इटलीचें स्वातंत्र्य जरी त्यास परत मिळवावयाचें होतें, तरी हातचें राज्य गमावण्यास तो तयार नव्हता; व आपलें राज्य कायम ठेवणें हाच पुढील सर्व इमारतीचा पाया आहे हें त्यास माहीत होतें. तात्पर्य, एके बाजूस धीर व युक्ति व दुसरे बाजूस निस्सीम देशभक्ति व उतावळेपणा, अशी स्थिति झाल्यामुळें ग्यारीबाल्डी हा कट्टा स्वामिभक्त सेवक असतांहि अखेरपर्यंत एखादा पुंड बंडवाला असावा त्याप्रमाणें त्याचा व राजाचा संबंध इतिहासांत दिसून येत आहे.

राजास वरील प्रकारचें उत्तर लिहिल्यावर ग्यारीबाल्डीनें नेपल्सवर जाण्याची तयारी केली, व आपलें सैन्य जहाजावर चढविलें. त्या रात्रीं धुकें जिकडे तिकडे पसरलें होतें, व आभाळांत चंद्र असूनहि अंधःकार पडला होता. परंतु हीच वेळ योग्य असें जाणून ग्यारीबाल्डीनें जहाजें हाकारलीं. ज्या किनाऱ्यावर उतरावयाचें तो किनारा या सैन्यानें कधीं पूर्वीं पाहिलाहि नव्हता; तथापि त्याचें त्यास कांहींच वाटलें नाहीं. किनाऱ्यावर उतरून नेपल्सवर चाल करावयाची व तें हस्तगत करून तेथें व्हिक्टर-ए-मॅन्युएलचें निशाण लावावयाचें याशिवाय दुसरी तिसरी गोष्ट त्यास दिसत नव्हती. यामुळें वाटेंत आलेलीं सर्व संकटें सोसून हें सैन्य एके दिवशीं पहांटे चार वाजण्याचे सुमारास इटलीचे दक्षिण किनाऱ्यावर सुखरूपपणें पोंहोचलें. हा सर्व प्रकार अगदीं अवचितपणें घडून आल्यामुळें त्यांना शत्रूकडून मुळींच प्रतिबंध झाला नाहीं.

किनाऱ्यावर उतरतांच ग्यारीबाल्डीनें आपलीं जहाजें पेटवून दिलीं, व एकदम रेगियो या किल्ल्यावर हल्ला केला; सर्व दिवसभर लढाई केल्यावर तो किल्ला हस्तगत झाला. किल्ल्यांतील शिबंदी एका फ्रेंच व्यापारी गलबतावर बसून नेपल्स येथें पळून गेली. मागें राहिलेल्या त्यांच्या सर्व्हीस तोफा व इतर लढाईंचें पुष्कळ सामान, त्याचप्रमाणें धान्यसामुग्री, घोडे व खेचरें वगैरे या विजयी सैन्याचे हातीं अनायासानें लागलीं. नंतर लॉटिनो नांवाच्या एका

गृहस्थास रेगियो या किल्ल्याचा गव्हर्नर नेमून ग्यारीबाल्डी आपल्या सैन्यासह दुसरे दिवशीं बारा वाजतां पुढील मार्गास लागला.

सुमारें दोन दिवसांत त्यानें डोंगराळ प्रदेशांतून जवळ जवळ ऐंशी मैलांचा प्रवास केला. वाटेनें शत्रूच्या सैन्याच्या टोळ्यांशीं त्यास लहानसहान लढाया कराव्या लागल्या. त्या प्रदेशांतील उष्ण हवेनें त्याचे सैन्यास बराच ताप झाला. परंतु त्या सर्वांस न जुमानतां त्यानें नेपल्सच्या जवळ जवळ मजल मारली; एवढेंच नव्हे तर मधून मधून कित्येक ठिकाणीं आपले लोक पाठवून लोकांकडून नेपल्सचे राजाविरुद्ध बंडेंहि उभारविलीं. परंतु या मोहिमेंत आपल्या शिपायांकडून रयतेस यत्किंचितहि उपद्रव होऊं नये असे सक्त हुकूम ग्यारीबाल्डीनें सोडले होते. फार काय रस्त्याचे बाजूच्या द्राक्षवेलीच्या ताटव्यांत जाऊन मालकाचे परवानगीशिवाय मूठभर द्राक्षें जरी कोणी तोडलीं, तरी त्यास शासन द्यावें असा त्याचा कायदा कडक होता. यामुळें अखेरपर्यंत त्याच्या बाजारबुणग्या पेंढारांत उत्तम प्रतीची शिस्त राहिली.

कित्येक ठिकाणीं तर त्याचा आदरसत्कार लोकांनीं इतक्या उत्कृष्टपणें केला कीं, तो कांहीं वर्णन करतां येत नाहीं. ग्यारीबाल्डी हा कोणी देव आहे किंवा देवदूत आहे असें झालें. स्टोको या गांवीं तर स्त्रियांनीं शुद्ध प्रेमळपणानें त्यास एखाद्या भावाप्रमाणें आलिंगून त्याचीं चुंबनेंहि घेतलीं. रस्त्यांतून ग्यारीबाल्डीची गाडी जात असतां एखाद्या देशाभिमानी मातेनें आपल्या कडेवरचें बालक उचलून बेलाशक गाडींत टाकून द्यावें. मनांतील हेतु असा कीं, त्या महात्म्यानें त्याला उचलून त्याचें चुंबन घेतलें व त्यास आशीर्वाद दिला म्हणजे त्याच्या अद्भुत देशभक्तीचा व शौर्याचा कांहीं तरी अंश त्याजमध्यें उतरेल. या प्रसंगीं अशी मौज झाली होती कीं, युरोपांतील निरनिराळ्या वर्तमानपत्रांचे बातमीदार ग्यारीबाल्डीचे सैन्याबरोबर होते; त्यांना लढायांचीं चटकदार वर्णनें वर्तमानपत्रास पाठवूं अशी मोठी हौस होती; परंतु जिकडे जावें तिकडे लढाईच्या ऐवजीं ग्यारीबाल्डीच्या स्वागताचाच प्रकार. जेथें जावें तेथें मेजवान्यांचा थाट. असें झाल्यामुळें लढायांच्या वर्णनांच्या ऐवजीं त्यांना मेजवान्यांचींच वर्णनें लिहून पाठवावीं लागत, व तीं वाचून ही काय अजब जादू आहे अशा विचारानें सर्व युरोप खंडांतील लोक आश्चर्यचकित होऊन राहिले होते.

इकडे ऑलेटा येथें कर्नल पिअर्स नामक ग्यारीबाल्डीच्या एका सरदारानें सरकारी तार ऑफिस हस्तगत करून घेऊन नेपल्स येथील अधिकाऱ्यांस अशी बातमी कळविली, कीं ग्यारीबाल्डी हा नेपल्सचे अगदीं जवळ ठेपला आहे. ही बातमी कळतांच सालेर्नो येथील बारा हजार सैन्य राजानें नेपल्सचे बचावाकरितां एकदम परत बोलाविलें. अशा फसगमतीनें सालेर्नो हें ग्यारीबाल्डीचे हातीं सहज लागलें. येथून पुढला मुक्काम नेपल्सचा. नेपल्सचे इतके जवळ आल्यावर ग्यारीबाल्डीस फारच उतावळी झाली; त्यानें आपलें सैन्य मागें ठेवून थोड्या निवडक लोकांनिशीं सालेर्नो येथील स्टेशनावर आगगाडींत बसून नेपल्सची वाट धरली.

ग्यारीबाल्डी येत आहे असें कळतांच नेपल्स येथें एकच गर्दी उडून गेली. एकीकडे राजाची पांचावर धारण बसून पुढें काय करावें हें त्यास सुचेना. सरकारी लष्कर व आरमार यांवरील अधिकारीहि बिथरल्यासारखे दिसूं लागले. व खालचे प्रतीच्या शिपायांत तर फंदफितूर पुष्कळ वेळपासून चालू होताच. दुसरीकडे लोक हर्षभरित होऊन गेले होते. आगगाडी येण्याचे सुमारास चोहोंकडे लोकांची गर्दीच गर्दी होऊन गेली होती. आगगाडीचे रुळांवर रिकाम्या डब्यांवरून जिकडे तिकडे माणसेंच माणसें होऊन गेलीं होतीं. स्टेशनचे आवारांत तर गाड्या-घोडीं-माणसें हीं इतकीं ठेंचून भरलीं होतीं कीं, मुंगी रिघावयाला देखील वाव नव्हता असें म्हटलें तरी चालेल. चित्रविचित्र निशाणें, तांबड्या रंगाचे हातरुमाल, जिकडे तिकडे फडकत होते; आणि शिंगें व तुताऱ्या यांच्या ललकाऱ्यांनीं कानठाळ्या बसत होत्या. अशा प्रचंड समारंभांत ग्यारीबाल्डीची स्वारी स्टेशनांत येऊन दाखल झाली.

ग्यारीबाल्डी स्टेशनांतून बाहेर पडतांच हर्षगजराचा जो एक एकदम कल्लोळ उसळला, त्याचे योगानें किनाऱ्यावर राजा आपल्या बचावासाठीं लष्कर सज्ज करून होता त्याचे काळजांत धडकी भरली. त्याचे गोलंदाज हातांत तोडा शिलगावून तटावरील तोफांवर डावा हात ठेवून हुकुमाची वाट पाहत होते; सरबत्तीचा हुकूम झाला असता तर त्या हर्षभरित शहरांत धडाधडा गोळे पडूं लागले असते; परंतु हा सरबत्तीचा हुकूम सोडण्यास राजाची छातीच होईना. कित्येक वेळां तर ग्यारीबाल्डी हा तोफांचे माऱ्यांतहि आला असेल, परंतु तोफेचा एकहि आवाज कोणाचे कानीं आला नाहीं. त्या दिवशीं संध्याकाळचे सुमारास तर राजाचे सैन्यानें उघडपणें आपल्या डोक्यांवरील

टोप्या उडवून दिल्या व 'ग्यारीबाल्डी की जय' असा जयघोष करून घरोघर ते लोक निघून गेले.

ग्यारीबाल्डीला अशा प्रकारच्या स्वागताचा मनापासून तिटकारा असल्यामुळें आगगाडींतून उतरतांच तो राजमार्ग सोडून देऊन एका आडरस्त्यानें शहरांत शिरला, व शहरच्या मुख्य सार्वजनिक इमारतींत जाऊन त्यानें आपलें बिऱ्हाड ठेवलें. तेव्हांपासून लोकांच्या झुंडीच्या झुंडी वाड्यापुढें येऊन त्यांनीं 'ग्यारीबाल्डी की जय' अशा आरोळ्या द्याव्या व ग्यारीबाल्डीनें ग्यालरींत येऊन त्यांचे सलाम घेऊन त्यांना उत्तेजनपर दोन शब्द बोलून पुन्हा आंत जावें असा क्रम चालू झाला, तो सर्व दिवसभर सुरू होता. रात्रीं लोकांनीं नाना तऱ्हेचे दिवे लावून आपापलीं घरें सुशोभित केलीं व हजारों दिवट्या पेटवून मिरवणुकी काढल्या.

संध्याकाळचे सुमारास राजा फ्रान्सिस हा आपले लोक बरोबर घेऊन किल्ल्यावरून उतरला, व खालीं मान घालून शहरांतून निघून गेला. हा प्रकार पाहण्यास लोकांची दुतर्फा गर्दी झाली होती; परंतु मेहेरबानीनें त्याचा कोणत्याहि प्रकारें कोणी अवमान वगैरे केला नाहीं. राजा निघून गेल्यावर सर्व सार्वजनिक ठिकाणचीं राजचिन्हें काढून टाकून त्या ठिकाणीं राजा व्हिक्टर-ए-मॅन्युएल याचीं निशाणें उभारण्यांत आलीं. दुसरे दिवशीं सकाळीं आसपासच्या खेड्यापाड्यांतून ग्यारीबाल्डीनें आपल्या लोकाच्या कांहीं टोळ्या पाठविल्या व जिकडेतिकडे लोकांचा एकदिल करून व्हिक्टर-ए-मॅन्युएलच्या नांवाची द्वाही फिरविली.

ग्यारीबाल्डीचें सैन्य किल्ल्यावर चढतांच लोकहि किल्ल्यावर मोकळेपणें जाऊं-येऊं लागले. यापूर्वीं किल्ल्यावर जाणें लोकांस फार धोक्याचें वाटत असे. नेपल्स येथील ज्या तुरुंगाबद्दल युरोप खंडभर जिकडे तिकडे गवगवा झाला होता व ग्लॅडस्टनसारख्या संभावित मुत्सद्द्यांनींहि ज्यांचे बाबतींत नेपल्सचे राजास लाखोली वाहिली होती, ते सर्व बंदिखाने अथवा पृथ्वीवरील सैतानाचे महाल याच किल्ल्यावर होते. या तुरुंगाबद्दल नेपॉलिटन लोकांचे मनांत अत्यंत द्वेष असल्यामुळें किल्ल्यावर चढून जाणाऱ्या प्रत्येक माणसानें त्या तुरुंगाचे भिंतीवर बुटाच्या लाथा माराव्या आणि थुंकावें, व

अशा रीतीनें पूर्वीच्या राजाच्या जुलमी कारकीर्दीबद्दल आपला तिरस्कार दाखवावा असा प्रकार चालला होता. असो; एक दोन दिवसांत जिकडे तिकडे शांतता झाल्यावर ग्यारीबाल्डीनें निरनिराळ्या खात्यांवर नवीन अधिकारी नेमून शिस्त लावण्यास सुरुवात केली.

भाग १५ वा

देशाच्या एकीकरणाचा प्रारंभ

तत्तेन तत्समयसा घटनाय योग्यं ॥

—विक्रमोर्वशीय.

नेपल्सवरील ग्यारीबाल्डीच्या स्वारीची फत्ते झाली हें वर्तमान कौंट कॅव्हूर यास कळतांच हें नवीन मिळालेलें राज्य पिड्माँटच्या राज्यास सामील करावयाच्या खटपटीस तो एकदम लागला. नेपल्सवर ग्यारीबाल्डीनें स्वारी केली ती धडधडीत राजाज्ञेच्या विरुद्ध केली होती. तथापि, अनधिकारानें केलेल्या परंतु सफळ झालेल्या या कृत्यापासून आपल्या राजकीय धोरणाला जर फायदा मिळत आहे तर तो कां बुडवा असा कॅव्हूर यानें पोक्त विचार केला. तो विचार अर्थात् त्या धूर्त मुत्सद्द्याचे शहाणपणस योग्य असाच होता. ज्या गोष्टीचा आपण पूर्वीं एक वेळ निषेध केला तिचाच फिरून अंगीकार कसा करावा अशी शंका त्यास प्रथम उत्पन्न झाली. परंतु त्याच्या धूर्तपणास सुदैवानें या वेळीं चांगली मदत केली.

ग्यारीबाल्डीस जय मिळाला व नेपल्स त्याचे हातीं पडलें हें वर्तमान ऐकतांच मॅझिनी नेपल्सकडे जावयाला निघाला. मॅझिनी जेथें जाईल तेथें त्याचे मागोमाग लोकसत्ताक राज्याच्या कल्पना, बंडाळी व बेबंदशाही हीं ठेविलेलींच, असा त्या वेळीं सार्वजनिक समज होता. त्याचा फायदा घेऊन कॅव्हूर यानें अशी बतावणी करण्यास प्रारंभ केला कीं, मॅझिनीच्या योगानें सर्व सिसिली बेटाची दुर्दशा होऊन जाईल व अशा तऱ्हेची स्थिति होणें हें इटलीच्या कार्यास अहितावह आहे; यास्तव पिड्माँटचे राजानें केवळ सार्वजनिक कल्याणाकरितां नेपल्सचें राज्य आपल्या राज्यास जोडणें

हाच काय तो वरील संकट निभावण्यास बिनतोड मार्ग आहे. हा बहाणा तर खराच; परंतु ग्यारीबाल्डी व मॅझिनी हे दोन स्वतंत्र विचारांचे व राजसत्तेस न जुमानणारे देशभक्त एक-विचाराचे झाले असतां नेपल्स येथें खरोखरच प्रजासत्ताक राज्य स्थापित होईल, व असा एकदां प्रघात पडला म्हणजे लोकसत्ताक राज्यें स्थापण्याची लोकांची इच्छा अनिवार होऊन आपल्या धोरणास आळा पडेल अशी कॅव्हूर यास मनांत मुळींच भीति वाटत नव्हती असें मात्र नाहीं. तें कसेंहि असो, नेपल्सचें राज्य पिड्मॉंटचे राज्यास जोडण्याचा निश्चय करून त्या बाबतींत कॅव्हूर यानें पार्लमेंटांत अनुकूल असा ठराव करून घेतला येवढें खरें.

व्हिक्टर-ए-मॅन्युएल हा कॅव्हूर याचे विचाराबाहेर अर्थातच नव्हता. तथापि एक अडचण येऊन पडली ती अशी कीं, फ्रान्सचा बादशहा नेपोलियन याचे हातांत इटलींतील घडामोडीचीं सूत्रें अद्यापि होतीं, व पिड्मॉंटचे राजानें इटलींतील संस्थानें जिंकून आपल्या राज्यास सामील करण्याची ही रीति त्यास पसंत पडेल किंवा नाहीं याबद्दल किंचित् शंका वाटत होती. तथापि कॅव्हूर यानें नेपोलियनचें मन वळवून घेण्याचा प्रयत्न केला व तो सिद्धीसहि गेला. नेपोलियननें कॅव्हूरच्या वकिलास असा जबाब दिला कीं, योजिलेलें कृत्य करणें कॅव्हूर यास अत्यावश्यक वाटत असेलच तर त्यानें आपल्या जबाबदारीवर खुशाल करावें; परंतु ह्या कामीं ऑस्ट्रियाशीं युद्ध करण्याचा प्रसंग आला तर फ्रान्सकडून पूर्वीप्रमाणें मदत होणार नाहीं एवढें मात्र लक्षांत ठेवावें.

ही पडत्या फळाची आज्ञा मिळतांच कॅव्हूर हा आपल्या तयारीस लागला. त्यानें युरोपांतील सर्व राष्ट्रांस लिहून कळविलें कीं, आज जर नेपल्स आम्हीं आपल्या राज्यास जोडिलें नाहीं, तर सर्व इटलीचे शांततेस धक्का बसून राजसत्तेस मोठाच अपाय होणार आहे. अशा रीतीनें परराष्ट्रांकडून कदाचित् होणाऱ्या प्रतिबंधाचा आगाऊ बंदोबस्त करून कॅव्हूर यानें नेपल्सवर पाठविण्याकरितां सैन्य सज्ज केलें. या सैन्याबरोबर राजा व्हिक्टर-ए-मॅन्युएल यानें स्वतःच जावें असें ठरलें.

इकडे कॅव्हूर यानें नेपल्स येथें आपल्या गुप्तहेरांकडून फर्डीनंड राजाविरुद्ध बंड करण्यास लोकांना चिथविण्याचा क्रम चालविला होता व वरकरणी फर्डीनंड राजाशीं सलोख्याचें बोलणेंहि सुरू केलें होतें. तसेंच फर्डीनंडचे ताब्यांतील मार्चेस या प्रांतांतील कांहीं अर्जदार आपणाकडे आणविण्याची गुप्त

खटपट करून कॅव्हूर यानें त्यांस उघडपणें असें आश्वासन दिलें होतें कीं, तुम्हांस योग्य स्वतंत्रता मिळेल, अशी आम्ही लवकरच व्यवस्था करूं. इतकी सिद्धता आधींच झालेली होती. शिवाय ग्यारीबाल्डीचे सैन्यानें नेपल्स पूर्वींच जिंकलें होतें; तेव्हां व्हिक्टर-ए-मॅन्युएल यास फक्त नेपल्स येथें जाऊन लोकांचे मुजरे घेऊन आपल्या नांवाची द्वाही फिरवावयाची एवढेंच काय तें करावयाचें उरलें होतें. तें करण्यास तो लवकरच निघाला.

इकडे मॅझिनी हा व्हिक्टर-ए-मॅन्युएलचेपूर्वींच नेपल्समध्यें जाऊन पोंहोचला होता खरा; परंतु त्याचा हेतु साध्य होण्याचा मुळींच रंग दिसेना. मॅझिनी नेपल्समध्यें येईल तर त्यास एकदम कैद करावें असा कॅव्हूर यानें हुकूम देऊन ठेविला होता. ग्यारीबाल्डीनें मॅझिनीस कैद केलें नाहीं. परंतु तेथून निघून जाण्याची त्यानें त्यास विनंति केली. ती मॅझिनी यानें नाकारिली. त्यानें ग्यारीबाल्डी यासच उलट असा निरोप पाठविला कीं, तुम्हीच जर लवकर नेपल्स सोडून रोमकडे जावयास निघणार नाहीं, तर तुमच्या हातची सर्व सत्ता जाऊन शेवटीं पश्चात्ताप पावावें लागेल. परंतु ग्यारीबाल्डीला इतक्यांतच सिसिली बेट सोडून जाणें अशक्य होतें; कारण फर्डीनंडचा युद्ध करण्याचा विचार अद्याप दिसत होता. अदमासाप्रमाणें फर्डीनंडचे सैन्याशीं ग्यारीबाल्डीस लढाई द्यावी लागलीच. ता. १ आक्टोबर रोजीं व्होल्टरनो येथें दोन्हा सैन्यांची निकराची लढाई झाली व तींत फर्डीनंडचा पराभव होऊन त्यास गेटा येथील किल्ल्याचा आश्रय घेण्यास निघून जाणें भाग पडलें. याउपर ग्यारीबाल्डीस कोणतीच आडकाठी उरली नाहीं.

व्हिक्टर-ए-मॅन्युएल हा स्वतः सैन्यासहवर्तमान नेपल्सकडे येत आहे असें कळतांच ग्यारीबाल्डी राजास सामोरा जाण्याकरितां सैन्य घेऊन निघाला. नेपल्स पिड्मॉंटचे राज्यास सामील करण्याच्या कॅव्हूर याच्या बेतास आपण आड जावयाचें नाहीं असा ग्यारीबाल्डीचा निश्चय या वेळीं ठरला होता; व त्याप्रमाणें त्यानें मॅझिनीस निक्षून कळविलें. त्यामुळें मॅझिनीस नेपल्स सोडून जाणें भाग पडलें. हा वेळपर्यंत नेपल्ससंबंधानें सर्व अधिकार ग्यारीबाल्डीचे हातांत होते, परंतु व्हिक्टर-ए-मॅन्युएल आल्यावर ते सर्व अधिकार त्याचे ठिकाणीं समर्पण करून आपण बाजूस व्हावें असा ह्या उदार देशभक्तानें निश्चय केला. ता. २६ आक्टोबर रोजीं व्हिक्टर-ए-मॅन्युएल व ग्यारीबाल्डी

यांची मुलाखत झाली. त्या वेळीं उभयतांच्या मनांत परस्परांविषयीं अत्यंत आदर उत्पन्न झालेला होता. आपण आरंभिलेलें कार्य सुरळीतपणें शेवटास गेलें व आपल्या हातून थोडीबहुत राजसेवा घडली, याबद्दल ग्यारीबाल्डीस आनंद वाटला. व दुसरे पक्षीं राजासहि, अशा धीर, वीर, निःस्पृह, स्वामिभक्त सेवकाकडून देशकार्यांत साहाय्य मिळालें याबद्दल धन्यता वाटली. या भेटीचा देखावा डोळ्यांनीं पाहिलेल्या लोकांनीं असें लिहून ठेविलें आहे कीं, राजा व ग्यारीबाल्डी हे एकमेकांस आदरपूर्वक भेटतांना दोघांचेहि कंठ सद्गदित झाले होते.

भेटीनंतर दोघेहि नेपल्सकडे परत फिरले. राजा व ग्यारीबाल्डी यांनीं नेपल्समध्यें एकाच गाडींत बसून प्रवेश केला. राजा एका उघड्या गाडींत बसला असून ग्यारीबाल्डी त्याचेच बाजूस डाव्या हाताला बसला होता व समोर सिसिली व नेपल्सचे भावी गव्हर्नर बसले होते. ते दिवशीं पाऊस एकसारखा झिमझिम पडत होता; तथापि रस्त्यांतून लोकांची अतोनात गर्दी झालेली होती. त्यांच्या जयजयकाराच्या ध्वनीनें त्या वेळीं आकाशांत होणारी मेघगर्जनाहि क्षणैक लोपून जात असे. जिकडे तिकडे गुढ्या-तोरणें-निशाणें उभारलेलीं होतीं, व ठिकठिकाणीं राजाचे गाडीवर लोक फुलें उधळीत होते. अशा थाटानें व्हिक्टर-ए-मॅन्युएल यानें शहरांतील मुख्य देवळांत प्रवेश केला. तेथें सर्वांनीं मिळून ईश्वरोपासना केली. हा विधि झाल्यावर ग्यारीबाल्डीनें आपले सर्व अधिकार राजाचे स्वाधीन केले.

सरतेशेवटीं त्यानें जाहीरनामा काढून आपल्या विश्वासु शिपायांचा आणि सिसिलींतील सर्व लोकांचा व देशबांधवांचा नम्रपणें निरोप घेतला. वास्तविक या वेळीं ग्यारीबाल्डीची शक्ति अशी होती कीं, त्यानें नुसता ब्र काढण्याची फुरसत, कीं खुद्द त्याचें पंचवीस तीस हजार सैन्य व नेपल्सचे सर्व लोक त्याच्या हुकुमाप्रमाणें वागण्यास, फार काय पण प्राण देण्यासहि तयार होते. व यामुळें त्याचे मनांत यत्किंचितहि जरी अहंभाव किंवा महत्त्वाकांक्षा यांचा अंकुर उमटला असता तर त्याचे सर्व मनोरथ पूर्ण होण्यास मुळींच पंचाईत पडली नसती. असें असतांहि दुसऱ्याची ठेव निमूटपणें परत करावी त्याप्रमाणें आपले सर्व अधिकार राजाचे चरणांवर अर्पण करून एखाद्या यःकश्चित् मनुष्याप्रमाणें फिरून ग्यारीबाल्डी हा प्रजाजनांच्या समाजांत मिसळला. हा त्याचा निःस्पृहपणा पाहून त्याचे अंगीं खरोखर कांहीं दैवी अंश

आहे असें लोकांस वाटूं लागलें. ग्यारीबाल्डीनें गादीची एवढी मोठी कामगिरी बजविलेली पाहून आतां याचें कसें उतराई व्हावें अशी खुद्द राजासहि पंचाईत पडली असेल यांत कांहीं शंका नाहीं. त्यानें त्यास सर्वांत श्रेष्ठ अशी लष्करी मानाची पदवी व पांच लाख फ्रँक देऊं केले; परंतु ग्यारीबाल्डीनें आपण यांतील एक पैशासहि शिवणार नाहीं व बहुमानाची पदवीहि घेणार नाहीं असें राजास स्पष्ट कळविलें.

वरील समारंभ झाल्यानंतर लागलीच ग्यारीबाल्डीनें कॅप्रेरा बेटावरील निवासाश्रमास जाण्याचा निश्चय केला. या वेळीं त्याजपाशीं फक्त पंधरा शिलिंग काय ते त्याचे असे होते. यास्तव जाण्यापूर्वीं त्यानें वीस पौंड लोकांपासून उसने घेऊन आपलें खाजगी देणें होतें तें वारलें; व घरून निघाल्यापेक्षां रतिभर अधिकच दरिद्री अशा स्थितींत हा विजयी व शूर देशभक्त आपल्या घरीं परत निघाला. मात्र जाण्यापूर्वीं त्यानें एक वेळ राजाची गांठ घेतली व दोन मागण्या केल्या; पैकीं पहिली अशी होती, कीं राजानें आपणांस रोमवर स्वारी करण्याची परवानगी द्यावी; व दुसरी अशी, कीं आजपर्यंत पगार न घेतां केवळ स्वदेशभक्तीनें प्रेरित होऊन व जिवाला जीव देऊन ज्यांनीं आपल्या हाताखालीं लढाया केल्या त्या शिपायांस व सरदारांस सरकारी सैन्यांत सामील करून त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांस जागा द्याव्या. या दोन्हीहि मागण्यांस राजास रुकार देतां आला नाहीं व त्याचीं कारणेंहि विशेष होतीं. येथें एवढेंच सांगावयाचें कीं ज्यानें सिसिलीचें सबंध राज्य आपल्या धन्यास मिळवून दिलें, त्यानें वाटखर्चीकरितां लोकांचे पैसे उसनवार काढले व इतमामाशिवाय जसा एकटा तो सिसिलीवर स्वारी करण्याचे पूर्वीं घरांतून बाहेर पडला तसाच स्वारींत यश मिळवून सर्व सिसिलीचें राज्य काबीज केल्यावरहि एकांतवासांतील गृहसौख्याचा उपभोग घेण्यास तो एकटाच परत गेला!

भाग १६ वा

शांततेंतील सुखें व उद्योग

ग्यारीबाल्डी कॅप्रेरा बेटास परत येऊन पाहतो तों तेथील देखावा सर्वच बदललेला. घर सोडून जातेवेळीं जिकडे तिकडे प्रदेश ओसाड होता; परंतु आतां तेथें लागवड झालेली असून लहान लहान बागा व शेतें तयार केलेलीं होतीं. झाडांची लागणहि बरीच झाल्यामुळें जिकडे पहावें तिकडे हिरवळ दृष्टीस पडे. घरीं गेल्याबरोबर तो प्रथम तबेल्यांत गेला व आपल्या आवडत्या घोड्यांचे पायबंद सोडून त्यानें त्यांस यथेच्छ हिंडावयास मोकळीक दिली. नंतर इकडे तिकडे कमीजास्त आहे नाहीं पाहून व चाकर माणसांच्या व शेजाऱ्यांच्या भेटी घेऊन, पूर्ववत् आपल्या शेतकऱ्याच्या वर्तनक्रमास त्यानें सुरुवात केली. प्रथमतः त्यानें एक चक्की आणविली, शेतकीचीं निरनिराळीं आउतें जमा केलीं व थोड्याच दिवसांपूर्वीं ज्या हौसेनें रणभूमीवर तो युद्ध करीत होता त्याच हौसेनें तो शेतकीचें काम करूं लागला. तीस हजार सैन्य हाताखालीं वागवून व राजाच्या बरोबरीनें रथांत बसून सर्व राष्ट्राकडून जयजयकार व धन्यवाद ऐकत असतां जी त्याच्या मनाची स्थिति होती, तीच आजमितीस स्वतः हातांत नांगर धरून गड्यामाणसांबरोबर शेतकाम करीत असतानांहि होती.

ग्यारीबाल्डीचा स्वभाव उद्योगप्रिय असल्यामुळें हळूहळू त्या लहानशा बेटाला गोड रूप येऊं लागलें. तथापि त्याचें रहातें घर अगदीं साधें असून त्यांत ऐषआरामाचे पदार्थ कांहींच नव्हते. दूरदूरचे लोक त्याला अनेक तऱ्हेचे पदार्थ भेटीदाखल पाठवून देत. त्यांपैकीं कित्येक तर बरेच मौल्यवानहि असत. परंतु अशा भेटी घेणें त्याला मनापासून फारसें आवडत नसे; म्हणून कित्येक वेळां तो त्या भेटी परत सुद्धां करी. याच सुमारास ऑस्ट्रियांत मोठा दुष्काळ पडला होता. तेव्हां तेथील लोकांच्या मदतीकरितां त्यानें आपण स्वतः वर्गणीनें जमविलेले शंभर फ्रँक तिकडे पाठविले. "मला मौल्यवान नजराणे पाठविण्यापेक्षां दुष्काळपीडित ऑस्ट्रियन लोकांना जर त्यांचे पैसे करून पाठवाल तर मजवर मोठे उपकार होतील" असेंहि त्यानें कित्येकांस सांगितलें. त्याच्या या सांगण्याचा कित्येकांस राग आला व आपले हाडवैरी जे ऑस्ट्रियन लोक त्यांना

मदत करण्याची ग्यारीबाल्डीस इच्छा व्हावी याचें कित्येकांस आश्चर्य वाटलें. परंतु त्यासंबंधानें ग्यारीबाल्डी असें म्हणे, कीं माझें वैर ऑस्ट्रियन लोकांशीं नाहीं, तर त्यांच्या राजाशीं आहे. त्या बिचाऱ्यांनीं काय केलें आहे ? त्यांचा राजा वाईट आहे, त्या अर्थी ते उलट दयेलाच अधिक पात्र आहेत !

ग्यारीबाल्डीच्या ह्या एकांतवासांत त्याला भेटण्याकरितां अनेक देशचे मोठमोठे लोक येत असत. थोर थोर इंग्लिश अमीर-उमराव सुंदर व सजविलेल्या छोट्या जहाजांतून बसून कॅप्रेरा येथें येत. तसेंच प्रवासास निघालेले शोधक लोक किंवा हद्दपार झालेले देशभक्त मधून मधून त्याचे दर्शनास येत. त्या सर्वांचें तो मोठ्या प्रेमानें स्वागत करी; परंतु त्याच्या आदरातिथ्याच्या प्रकारांत श्रीमंती मुळींच नसे व ती येणार तरी कोठून ? अशा तऱ्हेचे पाहुणे आले असतां त्यांस घेऊन बागेंत किंवा शेतांत तो काम करण्यास जाई; व तेथें सुख-दुःखाच्या गोष्टी बोलत असतां तो जातीनें काम करूं लागला म्हणजे तेहि आनंदानें अस्तन्या वर सावरून त्याचेबरोबर काम करावयास लागत.

पहिल्या पत्नीपासून ग्यारीबाल्डीस तीन अपत्यें झालीं होतीं. पैकीं सगळ्यांत वडील मुलगा मेनॉट्टी हा आपल्या बापाबरोबर स्वारीवर जाण्याइतका मोठा झालेला होता. एक दोन वेळीं त्यानें आपल्या शूर पित्याच्या कीर्तीस योग्य अशी मर्दुमकीहि केली होती. दुसरा मुलगा रिसीऑटी हा इंग्लंडला लिव्हरपूल येथें स्नेह्यांच्या देखरेखीखालीं विद्याभ्यासाकरितां ठेवलेला होता. ग्यारीबाल्डीची मुलगी थेरेसीटा ही देखणी असून आपल्या बापासारखी उंच व सशक्त असे. हीच काय ती ग्यारीबाल्डीचा प्रपंच पाहणारी घरधनीण. थेरेसीटा हिनें आपल्या बापाप्रमाणेंच, पाण्यांत पडत असलेल्या कित्येक लोकांचे प्राण वांचविले होते. ती चपळ असून आपल्या बापाच्या बरोबरीनें डोंगरांतून भराभर उड्या मारीत जाई. या मुलीवर ग्यारीबाल्डीचें विशेष प्रेम होतें. नेपल्सच्या स्वारीहून ग्यारीबाल्डी परत आल्यानंतर थेरेसीटा हिचें कॅनाझिओ नांवाच्या एका लष्करी अधिकाऱ्याबरोबर लग्न झालें. या प्रसंगीं व्हिक्टर–ए–मॅन्युएल राजानें नवऱ्यामुलीस आंदणादाखल एक सुंदर हिऱ्यांचा हार बक्षीस दिला होता. तात्पर्य, ग्यारीबाल्डीचे सर्व आयुष्यक्रमांत शांततेचा व गृहसौख्याचा काळ असा हा गेला. तथापि हें गृहसौख्य असावें तसें नव्हतें. कारण त्याची प्रियपत्नी निर्वतलेली होती व मुलेंहि किंचित् आडदांड व बिनमुर्वतखोर अशीं निपजलीं. तथापि केवळ बायकांमुलांकडे पाहून सुख

पावणाऱ्यांपैकीं ग्यारीबाल्डी हा नव्हता. त्याचें खरें सुख स्वदेशसेवेंत होतें व तें मात्र त्यास सर्व आयुष्यभर यथेच्छ भोगावयास सांपडलें.

ग्यारीबाल्डीच्या पहिल्या लग्नाची हकीकत मागें एका ठिकाणीं आलीच आहे. त्याची पहिली बायको निवर्तल्यावर पुष्कळ वर्षेंपर्यंत त्यानें दुसरें लग्न केलें नाहीं. त्याचें दुसरें लग्न १८५९सालीं झालें. त्याची हकीकत चमत्कारिक व मनोरंजक आहे. १८५९सालीं ऑस्ट्रिया व इटली यांची लढाई जुंपली, त्या वेळीं आल्प्स पर्वताच्या पायथ्याशीं असणाऱ्या एका सरोवराचे आसपासच्या प्रदेशांत ग्यारीबाल्डी हा फौजेचा तळ देऊन राहिला असतां मार्किस रेमाँडी या नांवाच्या एका सरदाराच्या तरुण मुलीची प्रीति ग्यारीबाल्डीवर बसली. खुद्द सरदाराचीहि इच्छा ग्यारीबाल्डीसारखा जांवई आपणास मिळावा अशी होती. असें असतां एके दिवशीं ही तरुण मुलगी ग्यारीबाल्डीच्या छावणींत अकस्मात् प्रकट झाली व शत्रूंकडील कांहीं पत्रें आपण वाटेंत पकडून आणिलीं आहेत असें तिनें ग्यारीबाल्डीस कळविलें. हीं पत्रें ग्यारीबाल्डीनें घेतलीं व तिचे त्यानें फार फार आभार मानिले. दुसरे दिवशीं मार्किस रेमाँडी हा स्वतः ग्यारीबाल्डीचे छावणींत आला व माझ्या मुलीची तुमच्याशीं विवाह लावण्याची फार इच्छा आहे असें त्यानें ग्यारीबाल्डीस कळविलें. हें ऐकून ग्यारीबाल्डीस अत्यंत आश्चर्य वाटलें व तो एकदम म्हणाला, "छेः, तुम्ही भलतेंच कांहीं तरी बोलतां. माझ्या पहिल्या बायकोच्या मरणाच्या दुःखानें माझें काळीज करपून गेलेलें आहे व आमरणान्त मीं अविवाहित राहण्याचा निश्चय केलेला आहे. दुसरें असें कीं, तुमच्या कन्येनें मला फार तर एक वेळ पाहिलें असेल; असें असतां, मजविषयीं तिच्या मनांत इतकें प्रेम उत्पन्न व्हावें हें संभवतें तरी कसें ?" हें आपणांस नडविणारें उत्तर ऐकून मार्किस रेमाँडी हा निरुत्तर झाला. परंतु ग्यारीबाल्डीच्या भोळ्या अंतःकरणाची कळ कोठें दाबली असतां त्याचें हृदय खुलें होईल हें त्या सरदारास पूर्णपणें माहीत होतें. यामुळें तो लागलीच म्हणाला, " साहेब, माझ्या मुलीचें प्रेम व्यक्तिविषयक आहे असें समजूं नका; तर तें 'इटलीचें स्वातंत्र्य' या मोहक कल्पनेवर जडलेलें आहे व त्या कल्पनेचा आपण केवळ साक्षात् अवतार आहां ! या कारणाकरितांच तिला आपणांशीं विवाह लावावयाचा आहे." या भाषणाचा त्या सरदाराच्या अटकळीप्रमाणेंच परिणाम झाला. 'इटलीचें स्वातंत्र्य' या जादूनें भारलेल्या शब्दांचा उच्चार होतांच ग्यारीबाल्डीचें करारी मन तेव्हांच विरघळलें. स्वदेशा-

भिमान बाळगणारा कोणताहि मनुष्य त्याला देवदूताप्रमाणें प्रिय वाटत असे; त्यांतूनहि स्त्रीजातीमध्यें त्याचा इतका संचार झालेला पाहून तो त्या सरदाराचें म्हणण्यास एकदम कबूल झाला. असो. अशा रीतीनें केवळ एका शब्दाचे उच्चारानें हें लग्न जुळलें. रीतिप्रमाणें सर्व मंडळी लग्नाकरितां देवळांत जाऊन आली व या दोघांचें लग्नहि लागलें. इतक्यांत त्या तरुण स्त्रीचें कपट ग्यारीबाल्डीस कळून आलें. शत्रूकडील पकडून आणलेलीं पत्रें निवळ बनावट असून या व्यवहाराच्या मुळांत स्वार्थाशिवाय दुसरें कांहींहि नाहीं असें ग्यारीबाल्डीचे लक्षांत येतांच, त्यानें तिचें मुखावलोकनहि करावयाचें नाहीं अशी शपथ वाहिली!

असो. आतांपर्यंत घडलेल्या वृत्तान्तावरून एक गोष्ट ठळकपणानें दिसून येतें ती ही कीं, संपत्तीनें सुखी किंवा दारिद्र्यानें दुःखी करावें असा त्याच्या मनाचा पिंडच नव्हता. आपल्या आयुष्यांत ग्यारीबाल्डीनें जे जे अधिकार बजावले त्यांमध्यें द्रव्यदृष्टीचा दुसरा एखादा माणूस त्याचे जागीं असता तर त्यानें अपार संपत्ति मिळविली असती. परंतु ग्यारीबाल्डी मात्र अखेरपर्यंत कोरडा राहिला! द्रव्यलोभ हाच सर्वांत अति कठीण असतो. तो ज्यानें जिंकला त्यानें निःस्पृहपणाचा मुख्य पायाच रचिला असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु ग्यारीबाल्डीचा निःस्पृहपणा द्रव्याचेहि पलीकडे गेला होता. ज्या वयांत त्यानें देशकार्यार्थ जीवित घालविण्याचा निश्चय करून मॅझिनीचें शिष्यत्व पत्करिलें व फांशीच्या शिक्षेचें सुदर्शनचक्र डोक्यावर फिरतें घेऊन स्वदेश सोडून पृथ्वीचे पाठीवर वाटेल तिकडे जाण्यास तो प्रवृत्त झाला, त्या वयांत जगांतील बहुतेक लोक कोणत्या ना कोणत्या तरी आपमतलबी स्वार्थाच्या व्यवसायांत गुंतलेले असतात हें लक्षांत घेतलें असतां वरील गोष्टींतील मर्म कळून येणार आहे. ग्यारीबाल्डीच्याहि आयुष्याचे अनेक दिवस गृहस्थाश्रमी माणसाप्रमाणें प्रपंच करण्यांत गेले हें खरें. तथापि त्याचा प्रपंच व इतरांचा प्रपंच यांमध्यें एकच मोठा भेद होता. पण तोच अतिशय महत्त्वाचा होता. तो हा कीं, इतरांचें मन प्रपंच उपाधींत गुरफटलेलें असतें व त्यामुळें मनुष्यमात्राचें खरें हित व जीवितकर्तव्य साधण्यास त्यांना व्यत्यय येतो. परंतु ग्यारीबाल्डीनें ऐन तरुणपणीं जो कर्तव्यमार्ग आंखून ठेविला होता, तो सोडून बाहेर एक रतिभरसुद्धां प्रपंचउपाधीनें त्यास कधींहि ओढून नेलें नाहीं. भगवद्गीतेमध्यें कर्म करावयाचें तें करून अलिप्त राहण्याचा जो सात्त्विक मार्ग सांगितलेला आहे, त्याचेंच ग्यारीबाल्डीचें

चरित्र हें एक उत्तम उदाहरण आहे. ग्यारीबाल्डीचे अंगीं मानुषता सहज असे. म्हणजे सुखदुःखाचे भाव नव्हते असें नाहीं. उदाहरणार्थ, कोठें कामगिरी करून तो थकून परत घरीं आला असतां त्याचे प्रिय पत्नीनें प्रफुल्ल चित्तानें व हास्यवदन करून जर त्याचें प्रेमपूर्वक स्वागत केलें तर त्यापासून त्याला अनिर्वाच्य सुख होत नसेल असें नाहीं. किंवा त्याचीं मुलेंबाळें खेळत खेळत येऊन अंगावर पडलीं असतां—

अंकाश्रयप्रणयिनः तनयान् वहन्तो
धन्यास्तदंगरजसा मलिनी भवन्ति

या कालिदासाच्या मार्मिक वर्णनाप्रमाणें ग्यारीबाल्डीसहि धन्यता वाटली असेल, नाहीं असें नाहीं. परंतु संसारसुख भोगण्याची पात्रता व सामर्थ्य अंगीं असणें निराळें, व संसारसुख हेंच जीविताचें सार मानून आपल्या सर्व व्यवसायांचा ओघ तिकडे वळविणें निराळें.

जगामध्यें दोन तऱ्हेचे लोक असतात. पैकीं कांहीं लोकांच्या मोठेपणास नुसतें बुद्धिवैभव हें कारणीभूत होतें, व कांहींचा मोठेपणा त्यांचे कृत्यांवर अवलंबून असतो. ग्यारीबाल्डी हा दुसऱ्या वर्गांतील महात्मा होय. मॅझिनीची निशाणी जशी लेखणी ही होती तशी ग्यारीबाल्डीची निशाणी तलवार ही होय. तथापि ग्यारीबाल्डीचे अंगीं बुद्धिवैभव कमी होतें असें नाहीं. त्याचा पहिल्यापासून विद्येकडे विशेष कल असता किंवा त्याची परिस्थिति खरोखर होती त्याहून जर वेगळी असती तर तो विद्वत्तेचे बाजूनें प्रख्यातीस आला नसता असें म्हणणें कठीण आहे. त्याचें शिक्षण किती चुटपुटतें होतें व शाळेचा संस्कार तर त्याला केवळ नांवाचाच होता. असें असतांहि त्याचें भाषण व लेखन हें एखाद्या विद्वानास साजेल असेंच होतें. ग्यारीबाल्डी हा भाषापंडित नव्हता तरी त्यास तीन चार भाषा बोलतां येत असत. इटालियन भाषेच्या सर्व पोटभाषा तो अस्खलित बोलत असे. स्पॅनिश, इंग्लिश, पोली, फ्रेंच याहि फार न अडतां त्यास बोलतां येत असत. परंतु या निरनिराळ्या भाषा शिकण्याचें त्याचें कारण केवळ विद्येची लालसा हें नसून त्याहून अधिक स्तुत्य व उदात्त असें होतें. पृथ्वीवरील सर्व माणसें हीं वास्तविक सख्खीं भावंडें होत, असें असतां केवळ भाषेच्या विविधत्वामुळें त्यांचे व्यवहारास व प्रेमवर्धनास व्यत्यय येतो, असें त्यास वाटे. वास्तविक एकच भाषा बोलणाऱ्या

लोकांमध्यें परस्पर किती प्रेम असतें याचा बहुतेक सर्वांस अनुभव असतोच. यामुळें भाषाज्ञानानें प्रेमवृद्धि करण्याची ही कल्पना सर्वांस सारखीच पसंत पडेल असें नाहीं. तथापि ग्यारीबाल्डीसंबंधानें कोणतीहि गोष्ट घेतली असतां तिजमध्यें त्याच्या विश्वव्यापी प्रेमाचें प्रतिबिंब दिसतें एवढाच या ठिकाणीं सांगावयाचा मुद्दा आहे. सर्व मानवी प्राण्यांची एक भाषा करतां येईल असा त्याचा दृढ भरंवसा होता.

असो; शाळेंतील त्याचें शिक्षण पुरें झालें नव्हतें असें असतां त्यास पांच-चार भाषा येत होत्या. एवढेंच नव्हे तर तो आपल्यापरीनें ग्रंथकारहि बनला होता. त्यानें लिहिलेल्या दोनतीन कादंबऱ्या उपलब्ध आहेत. या कादंबऱ्यांत त्याची कल्पनाशक्ति जबर असल्याचें दिसून येतें. ही कल्पनाशक्ति त्यास उपजत होतीच. परंतु त्यांतूनहि दक्षिण अमेरिकेंत रानावनांत राहून व अनेक तऱ्हेचे चमत्कारिक अनुभव घेऊन त्या कल्पनाशक्तीस वैचित्र्य व परिपक्वता आली असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. ग्यारीबाल्डीचे कादंबऱ्यांत त्याच्या विचित्र कल्पना-शक्तीचा प्रभाव दिसून येतो. त्यांतील कथानकें, पात्रें, प्रसंग व तत्त्वबोध हीं सर्व त्याच्या स्वदेशप्रीतीचे रंगानें रंगविलीं गेलीं आहेत.

या पुस्तकाशिवाय ऐतिहासिक दृष्ट्या उपयुक्त असें एक पुस्तक त्यानें लिहिलें आहे. तें त्याचें आत्मचरित्र होय. या आत्मचरित्रांत त्यानें आपले अनुभव, आपलीं कृत्यें, आपलीं मतें, यांचें टिप्पण केलेलें आहे हें टिप्पण पहिल्यापासून अखेरपर्यंत संगतवार किंवा शिस्तवार आहे असें नाहीं, तथापि त्याची भाषा चटकदार व जोरदार असल्यामुळें सदरहू पुस्तक बरेंच मनोरंजक झालेलें आहे. परंतु त्यास जें एक विशेष महत्त्व आहे त्याचें कारण असें कीं, ग्यारी-बाल्डी हा सत्यप्रिय व स्पष्टवक्ता असल्यामुळें त्यानें आत्मचरित्रांत लिहिलेल्या गोष्टींबद्दल कोणास यत्किंचितहि शंका येत नाहीं. व अशा रीतीनें नेहमीं आत्मचरित्रें वाचण्यांत जो एक प्रकारचा आनंद असतो तो येथें दुणावतो. ग्यारीबाल्डीचीं भाषणें, त्यानें लिहिलेलीं पत्रें व त्यानें काढलेले जाहीरनामे यांमधूनहि त्याच्या स्वभावाची व अंतःकरणाची खूण ठिकठिकाणीं पटते. या सर्वांमध्यें भाषावैभव दाखविण्याचा प्रयत्न मुळींच नसून त्यांची सर्व गोडी, निःस्पृहता, उदात्त विचार, स्पष्टवक्तेपणा किंबहुना धाडस यांतच असून,

वाचणारास ते लेख नसून त्या ठिकाणीं चालता बोलता माणूसच उभा आहे कीं काय, असें वाटतें.

ग्यारीबाल्डी हा कोणी मोठा तत्त्वशोधक नव्हता हें सांगावयास नकोच. तथापि त्याचे ग्रंथांत, पत्रांत व भाषणांत निरनिराळ्या विषयांवर जे विचार नमूद झालेले आहेत त्यांवरून त्याचेविषयींची चांगली कल्पना करतां येते. उदाहरणार्थ, धर्म हा विषय घेतला तर असें दिसून येतें कीं, तो जरी पोपचा कट्टा वैरी होता, तरी ईश्वरावर त्याचा पूर्ण भरंवसा असून त्याचें मन श्रद्धाळु होतें. मात्र ईश्वर व मनुष्य याची ओळख करून देण्यास व मध्यस्थी करण्यास कोणी तिऱ्हाईत असणें अवश्यच आहे असें त्यास वाटत नव्हतें. ज्यानें त्यानें आपआपल्या बुद्धिसामर्थ्यानुरूप चिंतन, मनन व भक्ति केली असतां त्यास अवश्य तितकें ईश्वरज्ञान व शक्य तितकी ईश्वरप्राप्ति खास होईल, मग हें भटांचें बंड मध्यें उगीच कशाला असें तो म्हणे. भटांनीं व धर्मगुरूंनीं धर्माचें उदात्त स्वरूप लोपवून त्यास वाणसौद्याच्या जिनसाची योग्यता आणून ठेवली असा त्याचा आक्षेप असे व तो त्या कालमानानें पाहतां अगदीं बरोबर होता.

स्त्रियांसंबंधीं त्याचे विचार फार थोर होते. लग्न हा एक अतिशय पवित्र असा संस्कार आहे व तो संस्कार ज्यास झाला त्यानें आपल्या धर्मपत्नीचें व अपत्यांचें प्रेमयुक्त अंतःकरणानें पालनपोषण करणें हें त्याचें कर्तव्य आहे असें तो म्हणे. राष्ट्रांतील स्त्रिया सुशिक्षित असल्या तरच त्यांच्या मुलांचे हातून काय वाटेल तें देशकार्य करवून घेतां येईल असें तो वारंवार म्हणे. लढाईच्या कामांतून जेव्हां त्यास फुरसत सांपडे तेव्हां तो वेळ स्त्रियांस सुशिक्षण देऊन त्यांचा दर्जा वाढविण्याच्या उद्योगाकडे तो घालवी. त्यानें कित्येक ठिकाणीं मुलींच्या शाळा काढल्या होत्या, व कोठें मजूरदारांच्या बायकांस पीठ दळण्याच्या चक्क्या विकत घेऊन देऊन, तर कोठें इतर कांहीं करून गरीब स्त्रियांस सुखी करण्याचा तो प्रयत्न करीत असे. ग्यारीबाल्डीच्या सर्व जन्मांत त्यास शास्ता असा कोणीहि नव्हता म्हटलें तरी चालेल. तथापि त्यानें आपली नीति अखेरपर्यंत निर्मळ ठेविली होती. त्याचे हाताखालीं वागणारें सैन्य नेहमीं बिनपगारी व स्वच्छंदी असे. लष्करी कायद्याचा कडक अंमलहि त्याजवर नसे. तथापि हाताखालच्या शिपाईप्याद्यांकडून स्त्रीजातीचा अपमान झालेला त्यानें कधींहि सहन केला नाहीं. या व इतर कारणांकरितां इटालियन स्त्रियांची ग्यारीबाल्डीवर नेहमीं भक्ति असे.

भाग १७ वा

रोमवरील स्वारी

या वेळीं सर्व इटालियन लोकांस ध्यानीं-मनीं स्वप्नीं-रोम शहर दिसत होतें. इटलीचें गतकालचें सर्व वैभव एका रोमच्या नांवांत सांठविलें होतें. यामुळें रोम ही इटलीची फिरून एकवार राजधानी झाल्याशिवाय देश संयुक्त व स्वतंत्र झाला, तरी त्यांत कांहीं अर्थ नाहीं असें लोकांच्या मनानें घेतलें होतें. कॅव्हूर व व्हिक्टर-ए-मॅन्युएल यांच्याहि मनांत रोम काबीज करण्याची उत्सुकता फार होती. परंतु तसें करण्यास एक मोठी अडचण होती. ती ही कीं, रोम हें पोपच्या ताब्यांत होतें व त्यास फ्रेंच बादशहाचा आश्रय होता. यामुळें रोमवर स्वारी करावयाची म्हणजे, प्रथम फ्रान्सबरोबर युद्ध करण्यास तयार होण्यासारखें होतें. या विचारानें वरील मुत्सद्द्यांचे विचार जागच्या जागींच राहात. परंतु ग्यारीबाल्डीला रोमच्या मार्गांतील अडथळे दिसत असले तरी त्यांस तो जुमानणारा नव्हता. त्याचें धैर्य हें डोंगराच्या पायथ्यावर तुटून पडून आदळणाऱ्या लाटेप्रमाणें होतें. वरील विचारी मुत्सद्द्यांपेक्षां त्याजमध्यें एक गुण विशेष होता. तो हा कीं, वरील मुत्सद्द्यांपेक्षां लोकांच्या मनाचा कयास त्यास अधिक बरोबर रीतीनें कळत असे. ग्यारीबाल्डीचें पुढारीपण व रोम काबीज करण्याची लोकसमाजाची उत्कट इच्छा, या दोन गोष्टींपुढें मुत्सद्द्यांच्यानें लवकरच निभाव लागेनासा झाला.

इ. स. १८६० सालीं इटालियन पार्लमेंटाची नवीन निवडणूक झाली; त्यांत ग्यारीबाल्डीस लोकांचेतर्फे प्रतिनिधि निवडून देण्यांत आलें होतें. त्याप्रमाणें ता. १८ एप्रिल रोजीं तो पहिल्यानें सभासद या नात्यानें पार्लमेंट सभेस गेला. पार्लमेंटांत त्याचा पोषाख नेहमींप्रमाणेंच तऱ्हेवाईक होता व त्याजकडे सर्व लोक टकमक टकमक पाहात होते. या वेळीं पार्लमेंटपुढें ग्यारीबाल्डीच्या बिनपगारी शिपाईलोकांसंबंधानें प्रश्न होता. ग्यारीबाल्डीनें व्हिक्टर-ए-मॅन्युएल राजास आपल्या विश्वासू शिपायांबद्दल एक मागणी केल्याचें मागें सांगितलेंच आहे. ही मागणी राजानें अद्यापि मान्य केली नव्हती. ग्यारीबाल्डी व त्याचे शिपाई यांजबद्दल सरकारी लष्करी अधिकाऱ्यांस एक प्रकारचा मत्सर वाटत

असल्यामुळें, ते त्यासंबंधानें कोणतीहि गोष्ट निघाली असतां राजाचें मन दूषित करण्यास सदोदित तयार असत. ही गोष्ट ग्यारीबाल्डीचे मनास नेहमी लागून राहिलेली असे. यामुळें वर सांगितलेला विषय पार्लमेंटपुढें निघाला तेव्हां उभय पक्षांचीं मनें क्षुब्ध झालेलीं होतीं. बराच वादविवाद होऊन कॅव्हूर यास वर्मीं लागतील असे शब्द भर सभेंत बोलून ग्यारीबाल्डी उठून गेला. परंतु तेथें तेवढ्यावरच संपलें. पुढें लवकरच ग्यारीबाल्डीच्या सूचने प्रमाणें देशांतील सैन्याची संख्या वाढविण्याचें पार्लमेंटनें बहुमतानें कबूल केल्यामुळें ग्यारीबाल्डीचा राग बराच निवाला. व्हिक्टर-ए-मॅन्युएल राजानें मध्यस्थी करून कॅव्हूर व ग्यारीबाल्डी यांची मुलाखत खाजगी रीतीनें घडवून आणून त्यांचें सख्य होण्याचे कामीं खटपट केली; व तीस यश येऊन ग्यारीबाल्डीचें मन कॅव्हूरविषयीं बरेंच निवळलें. परंतु या दोन देशभक्तांच्या दिलजमाईचा फायदा राष्ट्रास फार वेळ मिळाला नाहीं. कारण एक महिन्याचे आंतच कॅव्हूर मरण पावला. कॅव्हूर यानें आजपर्यंत केलेली देशसेवा यापुढें होणाऱ्या देशसेवेहून फारच अधिक महत्त्वाची होती हें खरें; तथापि त्याच्या मृत्यूमुळें इटलीची पुष्कळच हानि झाली यांत कांहीं संशय नाहीं.

कॅव्हूर याचे जागीं मुख्य प्रधान रॅटेझी याची नेमणूक झाली. रोमवर स्वारी करण्याबद्दल कांहीं तरी हालचाल झालीच पाहिजे, नाहीं तर लोक दंगा केल्याशिवाय खास सोडीत नाहींत, असें पाहून रॅटेझी यानें एक युक्ति काढली. व्हिक्टर-ए-मॅन्युएल रोमवर स्वारी करण्यास तयार आहे व त्या कामावर ग्यारीबाल्डीची योजना करावयाची आहे, असा बहाणा करून त्यानें ग्यारीबाल्डीची भेट घेतली. या भेटीमध्यें असें ठरलें कीं, ग्यारीबाल्डीनें आपलें वजन खर्च करून, रॅटेझीच्या पक्षास मदत करावी व तिचा मोबदला म्हणून रॅटेझी यानें उलट ग्यारीबाल्डीस रोमवर स्वारी करण्यास साह्य करावें. अर्थात् रॅटेझीचे पोटांत कपट होतें; परंतु तें ग्यारीबाल्डीस उमजून आलें नाहीं व तो स्वारीचे तयारीस एकदम लागला.

याच सुमारास खुद्द व्हिक्टर-ए-मॅन्युएल याचें स्वदस्तूरचें पत्र ग्यारीबाल्डीस आलें. त्यांतील आशयहि ग्यारीबाल्डीनें रोमवर स्वारी करावी असाच होता असें म्हणतात. कसेंहि असलें तरी, आपण स्वारीचें काम हातीं घेतल्यास आपणांस राजाकडून व प्रधानाकडून गुप्त रीतीनें का होईना परंतु मदत खास होणार, अशी ग्यारीबाल्डीची पक्की खात्री होती. लवकरच ग्यारीबाल्डीस

इटलीच्या राजपुत्रांस बरोबर घेऊन पालेर्मो येथें जाणें भाग पडलें. त्या वेळीं तेथील लोकांनीं ग्यारीबाल्डीचा जयजयकार केला. लष्करी अधिकाऱ्यांनीं त्यास मेजवान्या दिल्या. नागरिकांनीं त्यास मानपत्र दिलें. आतां ग्यारीबाल्डी हा रोमवर लवकरच चालून जाणार याबद्दल कोणासहि शंका उरली नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांचीहि अशी खात्री झाली होती कीं, जरी उघड हुकूम सुटलेले नाहींत तरी ग्यारीबाल्डीनें आरंभिलेल्या कार्यांत राजाचें गुप्तपणें अंग खास आहे. या सर्व गोष्टींमुळें या वेळीं थोडेंसें साहस करणें हें आपलें कर्तव्य आहे असें ग्यारीबाल्डीस वाटूं लागलें.

पार्लमेंट सोडल्यावर ग्यारीबाल्डी थेट रोमच्याच वाटेला लागला. त्याचे-भोंवतीं तरुण, उत्साही व शूर असे बरेच लढाऊ लोक येऊन मिळाले. मार्सोला येथें तो जातो, तोंच गांवचे अधिकारी व इतर नागरिक रणवाद्यें वाजवीत त्यास सामोरे आले व मोठ्या थाटानें त्यास गांवांत घेऊन गेले. ही सर्व बातमी हां हां म्हणतां जिकडे तिकडे पसरली. फ्रेंच बादशहा नेपोलियन यानें ताबडतोब आपला वकील व्हिक्टर-ए-मॅन्युएलच्या दरबारीं पाठविला व तुम्ही ग्यारीबाल्डीस कैद करून आणण्याचे हुकूम एकदम सोडा असें त्यानें सक्तीचें बोलणें चालविलें. रॅटेझी याच्या कपटी कारस्थानाचे सिद्धीस ही गोष्ट इष्टच होती; तो फ्रेंच बादशहाचे म्हणण्यास एकदम कबूल झाला. परंतु खुद्द राजाचे मध्यस्थीमुळें ग्यारीबाल्डीस कैद करण्याचा बेत कांहीं वेळ तहकूब झाला. मात्र त्या शहाण्या राजानें येवढें केलें कीं, गुप्तपणें ग्यारीबाल्डीस एक पत्र लिहून त्यास असें कळविलें कीं, पालेर्मो येथें केलेल्या भाषणाप्रमाणें उघड भाषणें करणें चांगलें नाहीं, व पुन्हा तशीं भाषणें कानांवर आलीं तर फ्रेंच बादशहाचे आग्रहावरून तुम्हांस कैद करणें भाग पडेल!

परंतु ग्यारीबाल्डीनें ही सूचना मनावर न घेतल्यासारखेंच केलें. त्यानें लवकरच जाहीरनामा काढून असें प्रसिद्ध केलें कीं, १८४९ सालीं रोम येथें जी राज्यक्रांति झाली होती त्या वेळीं सर्व नागरिकांच्या मतानें आपणांस जो गव्हर्नरचा अधिकार देण्यांत आला होता, तो अधिकार बजावण्यास आपण जात आहों, व अशा रीतीनें आपल्या रोमवरील स्वारींत गैरकायदा असें कांहीं नाहीं. ही सबब पोकळ होती हें सांगावयास नकोच. परंतु कांहींहि सबब किंवा कुरापत काढिली तरी ती चालण्याइतकें लोकमत ग्यारीबाल्डीस या वेळीं अनुकूल झालें होतें येवढें मात्र वरील जाहीरनाम्यावरून स्पष्ट सिद्ध होतें.

लोकमत अनुकूल होतें तसेंच अधिकारीवर्गाचें मतहि त्यास गुप्तपणें अनुकूल होतें. परंतु फ्रेंच बादशहाचें जेव्हां फारच टुमणें लागलें, तेव्हां राजास ठिकठिकाणच्या लोकांना ग्यारीबाल्डीस मदत न करण्याविषयींचे हुकूम सोडणें भाग पडलें. परंतु ते हुकूम निर्जीव होते हें तेव्हांच दिसून आलें. कॅटेनिया या गांवीं ग्यारीबाल्डी येण्यापूर्वींच वरील प्रकारचा एक हुकूम येऊन पोंचला होता, परंतु तो बाजूस ठेवून लोकांनीं ग्यारीबाल्डी येतांच हौसेनें त्याचें आगतस्वागत केलें व त्यास उघड मानपत्रहि दिलें. त्यामध्यें ज्या कार्यास ग्यारीबाल्डी हा निघाला होता तें लवकरच सफळ होवो अशी आशा व्यक्त केली होती. या ठिकाणीं सरकारी लष्करांतील कित्येक शिपाईहि आपापल्या जागांचे राजीनामे देऊन ग्यारीबाल्डीच्या स्वयंसेवकांत येऊन मिसळले.

या सुमारास त्याचेजवळ कामापुरतें सैन्य जमा झालें होतें. कॅटेनिया येथून पुढें जाण्यास सामुद्रधुनी उतरावी लागते. परंतु ग्यारीबाल्डीस इटालियन आरमाराची मदत मिळणें शक्य नव्हतें. तेव्हां त्यानें एक अजब युक्ति लढविली. एके दिवशीं एका लहानशा जहाजांत बसून त्याच बंदरांत नांगरलेल्या फ्रेंच व इटालियन जहाजांवर ग्यारीबाल्डीनें अवचित हल्ला केला. त्या जहाजांच्या कप्तानांस कैद केलें व त्यांत त्यानें आपलें सैन्य भरलें. ही गोष्ट संध्याकाळीं घडून आली व लगेच मध्यरात्रीं त्यानें जहाजें हाकारलीं आणि सकाळपर्यंत प्रवास करून तो मोलटो येथें किनाऱ्यास लागला. दुसरे दिवशीं त्यानें एक जाहीरनामा काढून लोकांस असें फर्माविलें कीं, राजाज्ञा मला नेहमीं शिरसावंद्य आहे परंतु राजाच्या मंत्रिमंडळास मात्र मी मुळींच जुमानणार नाहीं. हें मंत्रिमंडळ स्वदेशभक्तिपराङ्मुख झालेलें आहे, व फ्रेंच बादशहाचें दासानुदास बनलेलें आहे. यास्तव मंत्रिमंडळाचे कांहींहि न ऐकतां रोमवरील स्वारीस सर्वांनीं मदत करावी.

इकडे हेंच मंत्रिमंडळ आपल्यास पकडण्याकरितां कारस्थानांचें जाळें विणीत बसलेलें असून लवकरच आपणास त्यांत अडकून पडावयाचें आहे हें ग्यारीबाल्डीच्या स्वप्नींहि आलें नसेल. त्याचें पाऊल जसजसें पुढें पडत चाललें तसतसें फ्रेंच बादशहाचें टुमणें अधिकच लागूं लागलें. शेवटीं ग्यारीबाल्डीस प्रतिबंध करण्याकरितां सैन्य पाठविणें हें कांहीं केल्या टळत नाहीं असें पाहून व्हिक्टर-ए-मॅन्युएल यानें हुकूम सोडले. या सैन्याची ॲसप्रोमॉंटी या ठिकाणीं गांठ पडली. ग्यारीबाल्डीचे सैन्यास चारहि बाजूंनीं वेढा पडला होता.

राजाचे सैन्यास चुकवून जातां आलें तर जावें, पण लढाई करूं नये असं ग्यारीबाल्डीनें मनानें ठरविलें होतें. पण हुकूम अमान्य करून त्याचे सैन्यांतील तरुण शिपायांनीं गोळीबारास सुरुवातहि केली. हें पाहून तो दोन्ही सैन्यांचे मध्यें झाला. त्याचे दोहों बाजूस असणारे शिपायांस जखमा लागल्या. उभयपक्षांकडून परपस्परांवर गोळ्यांचा पाऊस पडत होता. अशा स्थितींत ग्यारीबाल्डी हा आपल्या घोड्यावर ताठ उभा राहून हात वर करून गोळीबार बंद करा, बंद करा, असें ओरडून सांगूं लागला. त्याप्रमाणें गोळीबार लवकरच बंद झाला. परंतु तेवढ्या अवधींत त्याला स्वतःला दोन तीन गोळ्या लागल्या. तथापि तो तसाच थोडा वेळ उभा राहून डोक्यावरील टोपी हातांत घेऊन व ती फिरवून 'गोळीबार बंद करा' असें ओरडून सैन्यास सांगत होता. कांहीं वेळानें त्याच्या लोकांनीं त्यास उचलून एका झाडाखालीं नेलें. लवकरच सरकारी सैन्याचा मुख्य अधिकारी त्याला येऊन भेटला व राजाकडून आलेला हुकूम त्यानें ग्यारीबाल्डीस फर्माविला.

या हुकुमाप्रमाणें त्याच्या सर्व सैन्याचीं हत्यारें काढून घेण्यांत येऊन त्यांना घरोघर जाण्याची आज्ञा मिळाली! खुद्द ग्यारीबाल्डीस कॅप्रेरा बेटांत नेऊन सोडण्याचा हुकूम झाला होता त्याप्रमाणें संध्याकाळच्या थंड वेळीं एक डोली करून वर गार गवत व झाडपाला बांधून तींत ग्यारीबाल्डीस निजविलें व त्याचे लोकांनी ती डोली सिला नांवाच्या बंदरापर्यंत मोठ्या प्रेमानें आपल्या खांद्यांवरून नेली. तेथें त्यांनीं त्यास जहाजांत घातलें. जहाज चालूं झालें तेव्हां ग्यारीबाल्डीच्यानें राहवेना. अंग ठणकत होतें तरी तशा स्थितींत तो ताडकन उभा राहिला व मोठ्यानें ओरडून म्हणाला, "चला, रोमला चला." परंतु इतके शब्द बोलल्याबरोबर त्यास झीट येऊन तो खालीं पडला.

ग्यारीबाल्डी जखमी झाल्याची बातमी तेव्हांच युरोपभर पसरून हाहाःकार उडाला व जिकडे तिकडे सभा भरून दुःखप्रदर्शक ठरावहि झाले. इंग्लंडमध्यें तर १००० पौंड वर्गणी एकदम जमा झाली व लोकांनीं सुप्रसिद्ध डॉक्टर पारट्रिज यास ग्यारीबाल्डीला औषधोपचार करण्याकरितां पाठविलें. ग्यारीबाल्डीचें जहाज व्हॅरिगनॅन्टे येथील बंदरांत पोंचल्यावर जो देखावा दिसला तो तर हृदयद्रावक होता. कोणी त्याकरितां फळफळावळ, कोणी फुलें, कोणी कांहीं, कोणी कांहीं असें आणिलें होतें. बायकामुलें तर त्याजभोंवतीं जमून त्याच्या वस्त्राच्या टोकांचीं चुंबनें घेऊं लागलीं. तेव्हां

त्याला व लोकांना दोघांनाहि रडूं आलें. मग त्यांचें समाधान करण्याकरितां ग्यारीबाल्डी त्यांस धीर देऊन म्हणाला, " माझ्या प्रिय मित्रांनो, धीर धरा. असे रडतां कां ? अद्यापि ग्यारीबाल्डी जिवंत आहे ना ? झालें तर." थोड्याच दिवसांत इटली, फ्रान्स व इंग्लंड येथून ग्यारीबाल्डीला औषधोपचार करण्याकरितां आलेले डॉक्टरलोक एकत्र जमले. त्या सर्वांनीं मिळून आपली शिकस्त केली तरी बरेच दिवसपर्यंत त्याच्या जखमा भरून निघाल्या नाहींत किंवा त्यांचें दुःखहि राहिलें नाहीं. त्याच्या प्रकृतीची खबर दररोज जिकडे तिकडे तारेनें कळविण्यांत येई. तो चांगला बरा होईपर्यंत सर्व युरोप खंडभर एक प्रकारची उदासीनता व अस्वस्थता येऊन पसरली होती. त्याच्या दुखण्याइतका दुसऱ्या कोणाच्याहि दुखण्याबद्दल लोकांत इतका गवगवा झाला नसेल.

प्रधान रॅटेझी यास तर या प्रकरणास आपण कोठून हात घातला असें झालें ! ॲसप्रोमॉंटीच्या लढाईनंतर इटालियन पार्लमेंटाची जी पहिली सभा भरली, तिजमध्यें फारच मोठा कडाक्याचा वाद झाला. ग्यारीबाल्डीस यःकश्चित् गुन्हेगाराप्रमाणें वागविण्यांत आलें, त्याची अनास्था झाली, वगैरे दोषारोप करून प्रजापक्षीय सभासदांनीं मंत्रिमंडळावर खूपच तडाखा उडविला परंतु सरकारी अधिकाऱ्यांकडून जरी त्याची कितीहि अनास्था झाली, तरी लोकांनीं त्याजबद्दल जी कळकळ दाखविली तिच्या योगानें ती सर्व भरून निघाली असेल यांत शंका नाहीं. त्याच्या उशापायथ्याशीं बसून त्याची शुश्रूषा करण्यास मिळावी अशाबद्दल शेंकडों स्त्रियांचे श्रम फुकट गेले असतील. कोण ती गर्दी ! एका गरीब भोळ्या इंग्रज बाईनें असें ऐकलें होतें कीं, इंग्लिश मनुष्याचा शब्द ऐकल्यापासून ग्यारीबाल्डीस बरें वाटतें. तेव्हां आपला शब्द ग्यारीबाल्डीस ऐकवावा या हेतूनें ती आपला कामधंदा सोडून, बरोबर आपल्या मुलीला घेऊन, कित्येक कोसांवरून ग्यारीबाल्डी होता तेथें आली होती. कित्येक खासगी डॉक्टर आपापले धंदे टाकून ग्यारीबाल्डीला औषध देण्यास सांपडावें म्हणून आले होते. या व इतर लोकांची मिळून इतकी विलक्षण गर्दी झाली कीं, हजारों निरनिराळ्या सबबी सांगून लोकांस माघारी लावून देतां देतां पुरेवाट झाली. ॲसप्रोमॉंटीच्या लढाईनंतर पहिले कांहीं दिवस ग्यारीबाल्डी हा बंडखोर या नात्यानें तुरुंगांत असल्यासारखा होता. परंतु लवकरच व्हिक्टर-ए-मॅन्युएल यानें त्यास व त्याजबरोबरच्या बहुतेक लोकांस माफी दिली तेव्हां लोक आपापल्या घरीं गेले.

ग्यारीबाल्डी हाहि स्वेच्छेनें स्पेझिया येथें व तेथून पुढें पिझा येथें गेला. या ठिकाणीं त्याचे जखमेंतील गोळी काढण्यांत आली, व तेथून तो बरा होण्याचे मार्गास लागला. या आनंददायक गोष्टीचे स्मरणार्थ पिझा येथील लोकांनीं एक बैठा मनोरा बांधविला व त्यावर खालील अक्षरें खोदविलीं. "ॲसप्रोमॉटी येथील लढाईत जखमी झालेला ग्यारीबाल्डी येथें येऊन बरा झाला." दुसरे दिवशीं सकाळीं पिझा येथील गव्हर्नरानें हत्यारबंद लोकांकडून तो मनोरा पाडविला, पण लागलाच लोकांनीं फिरून दुसरा उभारला. मात्र त्याजवरून ॲसप्रोमॉटी हे उद्वेगजनक शब्द वगळले होते. पुढें गव्हर्नरानेंहि त्याजविरुद्ध कांहीं उचल केली नाहीं.

त्या दिवशीं रात्रीं पिझा येथील नाटकगृहांत एक प्रयोग व्हावयाचा होता; परंतु जाहीर केलेला प्रयोग करण्याचे ऐवजीं प्रेक्षकजनांचे इच्छेनें सर्वांनीं ग्यारीबाल्डीचें स्तोत्रच वरचेवर म्हणून प्रयोगाची सर्व वेळ घालविली. पायांतील गोळी निघाल्यामुळें ग्यारीबाल्डी बरा होण्याचे पंथास लागला होता. त्यास पाहण्याला येणाऱ्या लोकांकडून त्याला त्रास होऊं नये म्हणून त्याच्या निजावयाच्या खोलीच्या दाराला एक भोंक पाडून ठेविलें होतें, व सिंहास ज्याप्रमाणें पिंजऱ्याचे फटींतून पाहतात, त्याप्रमाणें या पुरुषसिंहास पाहून लोकांनीं परस्पर निघून जावें अशी व्यवस्था करण्यांत आली होती. तथापि लोकांची गर्दी इतकी कांहीं विलक्षण होती कीं, नुसत्या गलबल्यानें त्याचें दुखणें उलटेल कीं काय, अशी भीति वाटूं लागली. यामुळें डॉक्टरांच्या सल्ल्यानें त्यानें आपल्या कॅप्रेरा बेटास परत जाण्याचें ठरविलें. तो जाण्याचे वेळीं लोकांनीं मोठी रोषनाई केली व त्याला पोंचविण्यास बायामुलेंसुद्धां समुद्रांत आंतपर्यंत गेलीं होतीं.

इटालियन प्रधान रॅटेझी याचे कपटामुळें ग्यारीबाल्डीचा रोमवर जाण्याचा बेत फसला ही गोष्ट खरी; तथापि या कपटाचा परिणाम खुद्द रॅटेझी यासहि भोगावा लागला. प्रधानमंडळाचें वर्तन ग्यारीबाल्डीशीं लबाडीचें होतें असें जो तो उघड बोलूं लागला. यामुळें लवकरच रॅटेझीसहवर्तमान प्रधानमंडळास राजीनामा द्यावा लागला. पुढील वर्षीं रशियानें पोलंडची बरीच दुर्दशा केली यामुळें पोलंडबद्दल चहूंकडे सहानुभूति उत्पन्न झाली होती. याहि वेळीं ग्यारीबाल्डीचे मनांत आपण पोलंडांत जावें व तेथील लोकांस बंड करण्यास मदत करावी असें एक वेळ आलें होतें; परंतु कांहीं कारणांमुळें तो त्याचा बेत मनचा मनांतच राहिला.

भाग १८ वा

इंग्लंडची सफर

" To be the guest of England after having been the liberator of Italy—is beautiful and grand."

—*Victor Hugo.*

ग्यारीबाल्डीला इंग्लिश लोक फार आवडत. त्यांची स्वातंत्र्यप्रियता, त्यांचा उद्योग, त्यांची सुव्यवस्थित राज्यपद्धति इत्यादि गोष्टींमुळें सर्व युरोप खंडांत अधिक सुधारलेले लोक कोण, तर इंग्लिश असें त्याचें मत झालें होतें व तें तो बोलूनहि दाखवीत असे. यामुळें म्हणा किंवा इतर कारणांमुळें म्हणा, इंग्लंडच्या लोकांसहि ग्यारीबाल्डी विशेष आवडत असे. इंग्लंडच्या अशिक्षित लोकांस त्याच्या पराक्रमांचें मोठें कौतुक वाटे; व नेपल्समधील अनन्वित जुलूम त्यानें मोडला यामुळें सुशिक्षित लोकांचेंहि प्रेम त्याजवर बसलें होतें. कधीं काळीं पोपमहाराजांचें बंड जर कोणी मोडील तर तो ग्यारीबाल्डीच मोडील असेंहि त्यांस वाटूं लागलें होतें. याशिवाय वेळोवेळीं त्यानें इंग्लिश लोकांशीं आपला स्नेहभाव अनेक मार्गांनीं व्यक्त केलेला होता. इ. स. १८५७ ते ६० या तीन वर्षांत ग्यारीबाल्डीचे सिसिलींतील पराक्रम घडून येण्यापूर्वीं त्याच्या अद्‌भुत कृत्यांचीं नाटकेंहि इंग्लिश रंगभूमीवर होत असत.

कॅप्रेरा बेटांत निवांतपणें कांहीं दिवस गेल्यावर ग्यारीबाल्डीनें एक वेळ इंग्लंडची सफर करून यावें अशी त्याच्या मित्रांनीं गोष्ट काढली. या मित्रांचा हेतु, कदाचित् इंग्लंडला गेल्यानें परदेशांत जयजयकार व्हावा, व ॲसप्रोमॉंटी येथें घडून आलेल्या गोष्टीचा जगास विसर पडावा असा असेल, नाहीं असें नाहीं; विशेषतः आपल्या स्नेह्यांच्या आग्रहानेंच त्यानें इंग्लंडची सफर करण्याचा निश्चय केला. तथापि त्याच्या स्वतःच्या मनांतील अंतस्थ हेतु मात्र असा होता कीं, इंग्लंडांतील मुत्सद्द्यांच्या भेटी घेऊन स्वदेशकार्यास कांहीं मदत झाली तर पाहावी.

इंग्लंडांतील प्रत्येक मनुष्याच्या मनांत ग्यारीबाल्डी हा इंग्लंडास येणार याबद्दल फार आनंद झाला. परंतु राजकीय दृष्टीनें पाहतां त्याचा आदरसत्कार करण्यास एक दोन प्रतिकूल गोष्टी होत्या. ग्यारीबाल्डी हा लोकपक्षाचा कट्टा अभिमानी; तेव्हां त्याचा जयजयकार झाला असतां आधींच बेभान असलेल्या लोकपक्षाचे डोक्यांत वारें शिरून बड्या लोकांविरुद्ध बंडाळी होईल अशी कांहींजणांस भीति वाटत होती. कांहींचें म्हणणें असें होतें कीं, ग्यारीबाल्डी कसाहि असला तरी त्यानें आपल्या राजाचा हुकूम तोडला होता, अर्थात् तो बंडखोर ठरला होता व हल्लीं जरी त्यास क्षमा करण्यांत आली होती, तरी त्याचा उघडपणें सत्कार करणें हें एकंदरीनें बेकायदेशीरपणास उत्तेजन देण्यासारखें होय. सर्वांत मोठी नड होती ती अशी कीं, ग्यारीबाल्डी हा रोमवर स्वारी करण्यास निघाल्यामुळें फ्रान्सचा बादशहा नेपोलियन याचा तो उघड शत्रु बनला होता; व प्रस्तुत प्रसंगीं फ्रान्सचें मन दुखविण्याची इंग्लंडास सोय नव्हती. या व अशा अनेक कारणांमुळें ग्यारीबाल्डीनें इंग्लंडास यावें अशाबद्दल इंग्लंडच्या प्रधानमंडळाकडून मन मोकळें करून संमति मिळेना. तथापि कांहीं असलें तरी ग्यारीबाल्डीस आणावयाचाच असा त्याच्या कांहीं इंग्लिश मित्र मंडळीनें निश्चय केला. मात्र ही बातमी इटालियन सरकारापासून अगदीं गुप्त ठेवण्यांत आली होती.

मार्च महिन्यांत एके दिवशीं सकाळीं ग्यारीबाल्डी हा गुप्तपणें उठून माल्टा येथें निघून गेला व तेथें रिपन नांवाच्या इंग्लिश आगबोटीवर चढला. इंग्लंडचे किनाऱ्यास लागण्याचे आदले दिवशीं आगबोटीवरील सर्व लोकांनीं मिळून या लोकोत्तर पाहुण्यास बडी मेजवानी दिली; साउथॅमटन येथें आगबोट धक्क्याला लागतांच, प्रथमतः इंग्लंडांतील इटालियन लोकांचे प्रतिनिधींनीं त्यास सामोरें येऊन त्याचा सन्मान केला. नंतर साउथॅमटनचा लॉर्ड मेयर सामोरा येऊन त्यानेंहि त्याचें स्वागत केले. दुसरें दिवशीं सकाळीं ग्यारीबाल्डीनें ठिकठिकाणाहून आलेल्या लोकनियुक्त प्रतिनिधींची भेट घेतली. संध्याकाळीं साउथॅमटन टाउनमहालांत त्यास मेजवानी देण्यांत आली व त्या दिवशीं लोकांनीं जिकडे तिकडे दीपोत्सव केला. यानंतर लॉर्ड हेनिसन, मि. सीली वगैरे खासगी गृहस्थांच्या भेटी-परतभेटी वगैरे झाल्यावर ग्यारीबाल्डी लंडनला जाण्यास निघाला. स्टेशनावर तांबड्या रंगाचा पोषाख केलेल्या स्त्री-पुरुषांची जिकडेतिकडे गर्दी झाली होती. रेल्वे कंपनीनें त्याजकरितां एक

स्वतंत्र सुंदर डबा दिला होता व त्यावर तोरणें लाविलीं होतीं. लंडनला पोंचण्यापूर्वी वाटेंतील स्टेशनांवरून ठिकठिकाणचे लॉर्ड मेयर येऊन त्याचा आदरसत्कार करून गेले. जेथें जेथें गाडी उभी राहण्याची होती. तेथें तेथें हजारों लोक सांपडेल त्या उंच ठिकाणावर दिपमाळीसारखे ओथंबले होते. मुख्य स्टेशनाला गाडी पोंचण्याचे सुमारास शेंकडों संस्थांचे व सभांचे प्रतिनिधी प्लॅटफार्मवर तयार होतेच, व गाडीखालीं पाय ठेवल्यापासून स्वागतपर मानपत्रांस व हारतुऱ्यांच्या गर्दीस जी सुरुवात झाली ती तो मुख्य ठिकाणास जाऊन पोंचेपर्यंत पुरली होती. तात्पर्य, ग्यारीबाल्डीनें खुद्द इंग्लंडला स्वातंत्र्याची जोड मिळवून दिली असती तरी यापेक्षां त्याचा अधिक आदरसत्कार होणें शक्य नव्हतें. त्या दिवशीं इटली स्वतंत्र होण्यास इंग्लंडची मनांतून सोळा आणे अनुकूलता आहे ही गोष्ट सर्व युरोपास कळून आली.

दुसरे दिवशीं ग्यारीबाल्डीनें राणी सरकारचे प्रधान लॉर्ड पामर्स्टन, लॉर्ड रसेल व इतर कांहीं सरदारांच्या भेटी घेतल्या. लंडनतर्फे मानपत्र दिल्यावर नागरिकत्वाचे हक्क त्याला देण्यांत आले. बिलोरी राजवाड्यामध्यें लोकांनीं त्यास एक तरवार नजर केली. लंडनचे पाहण्यासारखे देखावे त्यानें पाहिले व अशा रीतीनें १५ दिवस मोठ्या गडबडींत व मानसन्मानाच्या गर्दीत गेले. इंग्लंडांतील व स्कॉटलंडांतील सर्व मुख्य शहरांतून त्याला आमंत्रणें आलीं होतीं, व तिकडे प्रवास करण्याचे ग्यारीबाल्डीचे दिवस वगैरे ठरून गेले होते. परंतु इतक्यांत एकदम बातमी पसरली कीं, 'डॉक्टर लोकांच्या सल्ल्यानें' ग्यारीबाल्डीस इंग्लंडांतून लवकरच परत जावें लागणार आहे. डॉक्टरांचा सल्ला हें अर्थातच ढोंग होतें. खरें कारण असें होतें कीं, फ्रान्सच्या बादशहास इंग्लंडनें आपल्या शत्रूचा आदरसत्कार केल्याबद्दल संताप आला होता; व तो शमविण्यास इंग्लिश प्रधानमंडळानें ग्यारीबाल्डीची लवकर उचलबांगडी करून देण्याचें कबूल केलें होतें. यामुळें लवकरच ग्यारीबाल्डीस इंग्लंडाहून परत फिरावें लागलें.

निघण्याचे पूर्वी त्याची व ग्लाडस्टनसाहेबांची मुलाखत झाली. निघतांना त्यानें एक जाहीरपत्रक प्रसिद्ध करून त्याचे द्वारें सर्व इंग्लिश लोकांचे फार फार आभार मानिले. इंग्लंडला गेल्यानें, म्हणजे तेथील लोकांनीं त्याचा जयजयकार केल्यानें, ग्यारीबाल्डीच्या स्नेह्यांचा हेतु बराच सिद्धीस गेला. त्याची सर्व युरोप खंडांत पूर्वीहून अधिक मान्यता झाली. परंतु खुद्द ग्यारीबाल्डीचा

अंतस्थ हेतु फारसा सफळ झाला नाहीं. इंग्लिश लोकांची एकंदरीनें इटलीशीं असलेली सहानुभूति दृढ झाली हें खरें; तथापि इंग्लिश मुत्सद्द्यांनीं त्यास पुढें मदत करण्याचें कांहींच स्पष्ट आश्वासन दिलें नाहीं!

भाग १९ वा

ऑस्ट्रियाशीं तिसरी लढाई

पंके निमग्ने करिणि भेको भवति मूर्धगः ॥

ता. १९ जून १८६४ रोजीं ग्यारीबाल्डी आपल्या मुलांसह व स्नेह्यांसह कॅप्रेरा बेटास विश्रांति घेण्यास परत आला. परंतु प्रथम कांहीं दिवस त्याची प्रकृति दुरुस्त न होतां खालावतच चालली. कालांतरानें तो बरा झाला. कॅप्रेरा बेटाची शुद्ध हवा, तेथील शांततेचे उद्योग, प्रेमळ स्नेही व गोड मुलें यांजकडून होणारी शुश्रूषा, व सर्वांत मुख्य म्हटलें म्हणजे मनाची स्वस्थता, यांचे योगानें त्याचे प्रकृतीस हळूहळू गुण पडत चालला. तो बरा होतो न होतो तोंच ऑस्ट्रिया व हंगेरी यांमध्यें लढाई उपस्थित होऊन त्याची स्वस्थता भंग पावण्याचा एक प्रसंग आला होता. परंतु त्याचे स्नेह्यांनीं त्यास हालचाल न करूं दिल्यानें तो टळला. इकडे त्याचा शेतकीचा उद्योग सतत चालू होताच व त्याचे योगानें वर्षअखेरीचे पूर्वींच ग्यारीबाल्डीचे अंगीं पूर्वींची ताकद आली.

येथपर्यंत वर्णिलेला ग्यारीबाल्डीच्या चरित्राचा भाग हाच विशेष महत्त्वाचा होय. यापुढें ग्यारीबाल्डी एक दोन प्रसंगीं सैन्याचें आधिपत्य स्वीकारून रणांगणांत गेला व नेहमींप्रमाणें त्याला यशहि आलें, नाहीं असें नाहीं. परंतु आजपर्यंतच्या इटलीच्या स्थितींत व यापुढील स्थितींत एक मुख्य फरक पडला तो असा कीं, पूर्वीं जिकडे तिकडे सामसूम असून योजिलेल्या स्वदेशकार्यास उपयोगी पडणाऱ्या प्रत्येक साहसी कृत्याची उठावणी ग्यारीबाल्डीस आपल्या शिरावर जबाबदारी घेऊन किंबहुना शिर देण्यास तयार होऊन करावी लागे. परंतु आजपर्यंत त्यानें अविश्रांत श्रम घेऊन केलेल्या मेहनतीमुळें खरें देशकार्य कोणतें व्हावयास पाहिजे याबद्दल इटलींतील राजाच्या, मंत्रिमंडळाच्या व प्रजाजनांच्या--सर्वांच्याच मनांत चांगला प्रकाश पडला होता, व त्या कार्याची बऱ्याच अंशांनीं सिद्धीहि झाली

होती. ऑस्ट्रियाचे जुलुमापासून इटली सोडवून संयुक्त व स्वतंत्र केला पाहिजे, अशा विचाराचें राजकीय धोरण आतां इटलीच्या दरबारीं ठरून गेलें होतें. शिवाय आजपर्यंत ग्यारीबाल्डीनें केलेल्या स्वार्थत्यागानें, त्याचे सुयशानें व निःसीम भक्तीनें संतुष्ट होऊनच कीं काय, इटलीच्या भवितव्याची—किंबहुना सर्व जगांतील घडामोडीचें नियमन करणारी अधिष्ठात्री देवता संतुष्ट होऊन तिनें इटलीच्या स्वातंत्र्यास अनुकूल अशा अनेक गोष्टी युरोप खंडांत घडवून आणण्याचें योजिलें. यामुळें ग्यारीबाल्डीस यापुढें जातीनें फारशी खटपट करण्याचें कारण पडलें नाहीं. निर्वाणीचा मित्र एवढेंच ग्यारीबाल्डीचें इटलीच्या दरबाराशीं नातें राहिलेलें असल्यामुळें प्रसंग पडल्याखेरीज तो राजकीय गोष्टींत मन घालीत नसे.

ग्यारीबाल्डी इंग्लंडहून परत कॅप्रेरा बेटास आल्यावर थोड्याच दिवसांनीं खुद्द इटलीचा ऑस्ट्रियाशीं वादाचा एक प्रश्न उपस्थित झाला. मागें १८६० सालीं इटलीनें ऑस्ट्रियाशीं तहनामा करून लॉंबर्डी प्रांत घेतला होता व त्याऐवजीं व्हेनेशिया प्रांत ऑस्ट्रियास देऊन टाकला होता. या बाबतींत ग्यारीबाल्डीसच राग आला होता असें नव्हे तर सर्व लोकांनाहि वर सांगितलेली देवघेव पसंत नव्हती. यामुळें १८६० सालीं झालेली चूक दुरुस्त करण्याच्या संधीकरितां इटली टपून बसला होता. ती संधि १८६६ सालीं ऑस्ट्रिया व प्रशिया यांच्यामध्यें उपस्थित झालेल्या लढाईनें आयतीच मिळाली. आज कित्येक दिवस ऑस्ट्रियाचें तेज कमी कमी होत चाललें होतें, व जर्मनीमध्यें वर्चस्व राखण्याचे बाबतींत प्रशियासारख्या तरुण व होतकरू राष्ट्राशीं हट्टाला पडल्यामुळें ऑस्ट्रिया मोठ्या संकटांत सांपडला होता. असें पाहून व्हेनेशिया सोडवून घेण्याचा इटलीनें विचार केला व प्रशियाशीं आंतून सख्य केलें. १८६६ त इकडे ऑस्ट्रिया व प्रशियाचें युद्ध सुरू होतांच इटलीनेंहि आपला हात साधून घेतला व लढाई सुरू केली.

लढाई सुरू करण्याचे पूर्वीं व्हिक्टर-ए-मॅन्युएल यानें ग्यारीबाल्डीस आदरानें पाचारण केलें व त्यास आपल्या स्वयंसेवकांची वीस पलटणें एक वर्ष लढण्याच्या कबुलीनें उभारण्यास सांगितलें. त्याप्रमाणें सैन्य जमविण्याच्या तयारीस तो एकदम लागला. लढाईला निघावयाचें एवढी गोष्ट त्यानें जाहीर करण्याचा अवकाश, त्याचे भक्त भराभरा देशाच्या चारहि कोपऱ्यांतून धांवून आले, व हां हां म्हणतां हजारों फौज तयार झाली. ऑस्ट्रियावर जाणाऱ्या

सैन्याचें आधिपत्य जनरल लामार्मोरा यांजकडे सोपविण्यांत आलें होतें. तथापि लोकांचे विशेष विनंतीवरून सरकारांतून ग्यारीबाल्डीकडे स्वतंत्र अधिकार सोपविण्यांत आलेला होता. लामार्मोरा हा ग्यारीबाल्डी व त्याचे स्वयंसेवक यांचा मनांतून द्वेष करीत असे; व त्यांना चांगलीं हत्यारेंपात्यारें व पोषाख वगैरे देण्याचे कामीं त्यानें फार अडथळे घेतले. तथापि या कामीं ग्यारीबाल्डीनें आपलें म्हणणें खरें केलें. त्याच्या लोकप्रियतेमुळें त्याला या वेळीं नाखूष करण्याची कोणाचीहि सोय नव्हती.

ता. १९ जून १८६६ रोजीं इटलीनें लढाई सुरू केली. ऑस्ट्रियाशीं लढाई सुरू करावयाची ती हंगेरीचे बाजूस करावी असें ग्यारीबाल्डीचे मनांत फार होतें. परंतु लामार्मोरा याच्या हुकुमावरून त्यास टायरोल प्रांताकडे स्वारी करणें भाग पडलें व तिकडे आपलें सैन्य घेऊन ग्यारीबाल्डी निघाला.

ग्यारीबाल्डीचे सैन्याचा पहिला महत्त्वाचा मुक्काम कोमो या बंदरावर झाला. या ठिकाणीं त्याचें सैन्य बंदरांत उतरत असतां येथील लोकांनीं त्याजवर फुलें उधळिलीं व दीपोत्सव केला. मध्यंतरीं ठिकठिकाणीं स्वयंसेवक येऊन त्याचे सैन्यांत भरतच होते. एके ठिकाणीं ग्युलिएनिया नांवाची एक १७ वर्षांची मुलगी ऍंटोनिओ डेलफिओरे या नांवानें व शिपायाचा पोषाख घालून ग्यारीबाल्डीचे सैन्यास जाऊन मिळाली! आपल्या सैन्यांत कोणाहि बदमाषास थारा मिळूं नये या हेतूनें ग्यारीबाल्डीनें सुमारें ३०० लोक परत पाठविले. परंतु थोड्याच वेळांत त्याचे स्वयंसेवकांची संख्या १८ हजार झाली.

लवकरच ऑस्ट्रियन सैन्य व ग्यारीबाल्डीचें सैन्य यांची या स्वारींतील पहिली चकमक झाली तींत ग्यारीबाल्डीनें ऑस्ट्रियन सैन्यास मागें हटवून आसपासचा डोंगराळ प्रदेश हस्तगत केला. नंतर रॉकाडी आफनो या बळकट पहाडी किल्ल्यावर त्याचे शिपायांनीं निकरानें हल्ला करून तो सर केला. या हल्ल्यांत ग्यारीबाल्डीचे बरेच लोक पडले व खुद्द त्याचे पायास गोळी लागून जखम झाली. यापुढें त्याला गाडींत बसूनच रणांगणांतून फिरावें लागलें. रॉकोडी आफनोचा किल्ला हस्तगत झाल्यामुळें ग्यारीबाल्डीस आसपासच्या सर्व मुलखांतून शत्रूचा निःपात झाला असें वाटलें. परंतु एके दिवशीं स्टोरो या गांवीं दिवसाची टेहळणी करून संध्याकाळीं मुक्कामास परत येऊन पाहतो तों ऑस्ट्रियन सैन्य गांवांत शिरलेलें. ग्यारीबाल्डी येतांच दबा धरून बसलेल्या त्या सैन्यानें बंदुकांचा एकदम मारा केला. या प्रसंगीं ग्यारीबाल्डीच्या आसपास कित्येक गोळ्या

येऊन पडल्या. मोठ्या शर्थीनें तो बचावला. शत्रूचें सैन्य थोडकेंच असल्यामुळें त्यास हुसकून लावण्यास फारसा प्रयास पडला नाहीं. परंतु नजीक असलेला अँपोला किल्ला सर न करतां तसाच सोडून दिल्यामुळें शत्रूस दबा धरून बसण्यास स्थळ सांपडलें असें दिसून आल्यावर ग्यारीबाल्डीनें त्या किल्ल्याकडे मोर्चा वळविला. या किल्ल्यांतील अधिकाऱ्यांस निदान सहा दिवस तरी किल्ला लढवावा असा हुकूम होता. ग्यारीबाल्डीनें तोफांचा भडिमार करून एका दिवसांत दोन हजार गोळे किल्ल्यांत टाकले, तेव्हां किल्लेदाराचा नाइलाज झाला. या किल्ल्यावर १३० कैदी व कांहीं तोफखान्याचें सामान ग्यारीबाल्डीच्या हातीं लागलें. हें घेऊन व आसपासच्या मुलखांतून घोडे पकडून आणून त्यानें एक तात्पुरत्या घोडेस्वारांच्या तोफखान्याची तुकडी सजविली.

यानंतर बिझेका ह्या ठिकाणीं लढाई झाली तींत ग्यारीबाल्डीचे लोकांनीं फारच शौर्य दाखविलें. ही लढाई बारा तासपर्यंत एकसारखी चालू होती व जय मिळण्यास ग्यारीबाल्डीला जवळ जवळ एक हजार सैन्य खर्चीं घालावें लागलें. लढाईत त्याचे दोनहि मुलगे व एकुलता एक जांवई आपापलीं पथकें घेऊन लढत होते. जांवयास तर भारी जखमहि झाली. या लढाईचे योगानें आसपासचा मोठा प्रांत सर्व ग्यारीबाल्डीचे हातीं येण्यासारखा होता; परंतु कर्मधर्मसंयोगानें याच सुमारास ऑस्ट्रिया व इटली यांचे मुख्य सैन्यांतील लढाई संपून तहहि करण्यांत आला होता; त्या तहानुरूप आल्प्स पर्वताचे पायथ्याशीं लढाई थांबविण्याचा ग्यारीबाल्डीस हुकूम येऊन पोंचला. त्यामुळें त्यास ऐन रंगाला आलेलें लढाईचें काम सोडून द्यावें लागलें.

वास्तविक पाहतां लढाई बंद करणें हेंच या वेळीं इटलीस श्रेयस्कर होतें. कारण ऑस्ट्रियन बादशहानें फ्रेंच बादशहा नेपोलियन याचे मध्यस्थीनें वादाचें मूळ जो व्हेनेशिया प्रांत तो इटलीस देण्याचें कबूल केलें. लढाई बंद पडली व व्हेनिस परत मिळालें. तरी एकंदरीनें तहाच्या अटी ग्यारीबाल्डीस फारशा पसंत नव्हत्या. तथापि आपल्या सैन्यास एकदम रजा देऊन व पार्लमेंटांत जाऊन तहाच्या अटींवरील वादविवादांत भाषणहि न करतां तो कॅप्रेरा बेटास परत आला. झालेल्या लढाईत एकंदरीनें इटलीला फारसें भूषण आलें असें त्यास वाटत नव्हतें. यामुळें तो मनांतून बराच खिन्न व उदासवाणा झाला होता.

भाग २० वा

रोमवर अखेरचा धाडसी प्रयत्न

" यत्ने कृते यदि न सिद्ध्यति कोऽत्र दोषः ? "

ग्यारीबाल्डीस तह न आवडण्याचें मुख्य कारण असें होतें कीं, त्या तहान्वयें रोम येथील पोपची सत्ता आहे तशीच अबाधित ठेवण्याबद्दल इटलीच्या राजानें फ्रान्सच्या बादशहाशीं करार करून आपणांस बांधून घेतलें होतें; व रोम काबीज करून पोपच्या भव्य राजवाड्यावर व्हिक्टर–ए–मॅन्युएलचें निशाण उभारावयाचें ही कल्पना तर ग्यारीबाल्डीचे डोक्यांत एकसारखी भरून राहिली होती. वास्तविक पाहतां एकदां तह झाल्यानंतर रोम काबीज करण्याची उचल करणें हें लोकनियुक्त पार्लमेंट व खुद्द राजा यांचा हुकूम जाणूनबुजून तोडण्यासारखें होतें; किंबहुना फ्रान्स देशाशीं लढाई उपस्थित करून इटलीस धोक्यांत घालण्यासारखें होतें. परंतु ग्यारीबाल्डीच्या मनाची घटना अशीच कांहीं चमत्कारिक होती कीं, त्याच्या निस्सीम स्वदेशभक्तीनें बहुधा त्याची सर्व विचारशक्ति ग्रासून टाकिली होती. व धाडसी मनःप्रवृत्तीला जें म्हणून श्रेयस्कर दिसेल तें एकदम कोणाची भीडमुरवत न धरतां किंबहुना बलाबलाचा विवेकहि न करितां घडवून आणण्याचा प्रयत्न करणें हाच काय तो मुत्सद्दीपणा असें त्यास वाटे. अशी स्थिति असल्यामुळें ग्यारीबाल्डीस कॅप्रेरा येथें लवकरच चैन पडेनासें झालें.

१८६७ सालीं एके दिवशीं अवचित उठून ग्यारीबाल्डी फ्लॉरेन्स येथें येऊन उतरला. या वेळीं पार्लमेंटचे सभासद निवडण्याची धामधूम चालू होती. त्याचबरोबर रोमवर स्वारी करावी असें म्हणणाऱ्यांची खटपटहि जोरांत सुरू होती. चार निरनिराळ्या ठिकाणच्या लोकांकडून ग्यारीबाल्डीची पार्लमेंटांत निवडणूक झाली. लवकरच फ्लॉरेन्स येथें रोमवर स्वारी करावयाची तयारी करण्याकरितां एक सभा स्थापन होऊन तिनें ग्यारीबाल्डीस 'रोम येथील प्रजासत्ताक संस्थानाचा सेनापति' असें नांव दिलें. व्हिला कॅरोली या

नांवाच्या गांवीं त्यानें फारच आवेशयुक्त असें भाषण केलें. रोम हें सापाचें बीळ आहे; तें फोडून आंतील विषारी घाण धुऊन टाकून इटलीवरील हा मोठा डाग काढला पाहिजे, पोप व उपाध्याय वर्ग हे जरीमरीच्या कृमीसारखे घातक आहेत, वगैरे विलक्षण विशेषणें देऊन त्यानें सर्व लोक चिथावून सोडले.

दुसरे दिवशीं त्याचा मोर्चा एकदम रोमकडे वळला; व नेहमींप्रमाणें त्याच्याभोंवतीं भराभर सैन्य जमूं लागलें. ही हकीकत प्रधानमंडळास कळतांच बरीच चळवळ उडाली. फिरून एकवार ग्यारीबाल्डीस कैद केल्याशिवाय गत्यंतर नाहीं असा निश्चय करून मुख्य प्रधान रॅटेझी यानें एकदम गुप्त हुकूम सोडले. हुकमाची बजावणी मोठ्या चमत्कारिक रीतीनें घडून आली! ग्यारीबाल्डीस कैद करण्याचे आदले रात्रीं त्यास सिनॅलेंगा या नांवाच्या म्युनिसिपालिटीनें मेजवानी दिली. ही मेजवानी चालू असतां तेथें हजर असणाऱ्या अधिकाऱ्यांचे खिशांतच रॅटेझीचा गुप्त हुकूम होता. तथापि सर्व मेजवानी यथास्थित पार पडली व ग्यारीबाल्डी घरीं जाऊन खुशाल निजला. पहांटेस चार वाजण्याचे सुमारास एकदम गडबड झाली व सरकारी अधिकारी घरांत शिरून त्यांनीं ग्यारीबाल्डीस बिछान्यांतच कैद केलें. त्याला नीट कपडेहि घालूं न देतां त्यांनीं थेट आगगाडींत नेऊन त्यास बसविलें. ही बातमी फ्लॉरेन्समध्यें कळतांच जिकडे तिकडे गडबड उडाली. वाटेंत ग्यारीबाल्डीनें शिपायांस न कळतां पेन्सिलीनें एक चिठ्ठी खरडून ती गुप्तपणें लोकांचे अंगावर टाकून दिली. या चिठ्ठींत असा मजकूर होताः "रोमन लोकांस पोपनें गुलाम करून सोडलें आहे, व स्वातंत्र्यप्राप्तीकरितां गुलामांना बंड करण्याचा हक्क निसर्गसिद्ध आहे, रोमन लोक बंड करतील तर इटालियन लोकांस त्यांना मदत करणें जरूर आहे, मग एक सोडून पन्नास ग्यारीबाल्डी तुरुंगांत पडले तरी फिकीर नाहीं."

ही चिठी वर्तमानपत्रकारांचे हातीं येतांच त्यांनीं ती जिकडे तिकडे प्रसिद्ध केली; अर्थात् रॅटेझीविरुद्ध फार गवगवा झाला व लोकांचे तडाख्यांतून वांचण्यास त्याला बऱ्याच युक्त्या योजाव्या लागल्या. आगगाडीचा प्रवास संपल्यावर ग्यारीबाल्डीस अलेक्झँड्रिया येथील किल्ल्यावर नेलें व तेथून आरमाराच्या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीं सरकारी जहाजांतूनच त्याला कॅप्रेरा येथें नेऊन सोडून देण्यांत आलें.

अशा रीतीनें ग्यारीबाल्डी हें एक मोठें अवजड प्रकरण होऊन बसलें होतें. त्याला धरावा तरी पंचाईत, मोकळा सोडावा तरी पंचाईत. मनांतून त्यावर सर्वांचें प्रेम; परंतु तें बाहेरून दाखवून सोय नाहीं. तेव्हां सर्वांत उत्तम युक्ति म्हटली म्हणजे मोकळा सुटलेला हत्ती जसा न मारतां, न दुखवितां युक्तीनें चुचकारून ठाणावर नेऊन सोडतात, किंवा सर्कसमधील वाघ कसा तरी एकदांचा पिंजऱ्याचे दारांतून आंत गेला म्हणजे जसा मोकळा सोडून देतात, तसेंच ग्यारीबाल्डी अनावर झाला म्हणजे त्याला निरुपाय म्हणून कैद करून परत कॅप्रेरा बेटांत नेऊन सोडून देण्यांत येत असे.

ग्यारीबाल्डी इकडे अटकेंत असतां त्याच्या सोबत्यांनीं अनेक तऱ्हांनीं पोपच्या राज्यास धोका आणण्याची खटपट चालू ठेविली होती. कैरोली नांवाच्या दोघां शूर व साहसी बंधूंनीं केलेलें धाडसी कृत्य तर इतिहासांत नांवाजण्यासारखें होतें. त्यांनीं टायबर नदीवर बोटींतून गुप्तपणें हत्यारें नेऊन तीं रोमच्या लोकांस पोंचविण्याचा प्रयत्न केला. ते किनाऱ्यावर तर उतरलेच, परंतु रोमन लोकांची त्यांस कुमक न झाल्यामुळें पोपच्या शिपायांनीं त्या बंधूंपैकीं एकास किनाऱ्यावरील द्राक्षवेलींच्या बनांतच ठार केलें व दुसऱ्यास पोपच्या भयंकर तुरुंगांत नेऊन टाकलें. हें कैरोली कुटुंब अतिशय शूर म्हणून प्रख्यात आहे. या दोन बंधूंपैकीं धाकटा भाऊ बेनेडेटो यानें १८७८ सालीं आपला जीव धोक्यांत घालून हंबर्ट राजाचा जीव मारेकऱ्यांचे हातून वांचविला होता. पुढें तो राजकारणांत प्रधानकीचें काम करून विशेष प्रख्यातीस आला.

याच सुमारास पोपच्या शिपायांची एक बराकच्या बराक कांहीं अत्याचारी लोकांनीं डायनामाइटनें उडवून दिली व त्या अपघातांत पन्नास लोक मरण पावले. इकडे १२ हजार रोमन लोकांनीं पोपला अर्ज करून व्हिक्टर-ए-मॅन्युएलचें सैन्य रोममध्यें आणवावें म्हणून विनंति केली. या सर्व गोष्टींमुळें पोप भ्याला व स्वसंरक्षणार्थ फ्रान्सच्या सैन्याची मदत घेण्याचा त्यानें विचार केला.

इकडे हें सर्व चाललें असतां कॅप्रेरा बेटांतून आपली सुटका कशी करावी या विचारांत ग्यारीबाल्डीचें मन गढून गेलें होतें. बेटाचे सभोंवतीं पहाऱ्याकरितां चार सरकारी गलबतें ठेवून दिलीं होतीं. भोंवतीचे पहारेकरी बहुधा सावध असत. एके दिवशीं आपल्या मुलीला घेऊन होडींत बसून तो नित्य-

क्रमापेक्षां जरा लांब जात आहे असें पाहतांच सरकारी जहाजांतील लोकांनीं त्या दिशेकडे बार काढले. तेव्हां अद्यापि पहारा सक्त आहे असें तो उमजला. परंतु सुटका करून घेण्याचा त्याचा प्रयत्न शिथिल न होतां, फक्त युक्ति योजावयाची ती फार कुशल योजिली पाहिजे एवढें मात्र तो वरील गोष्टीवरून शिकला. त्या दिवसापासून त्यानें आजारीपणाच्या बहाण्यास सुरुवात केली. तो घरच्या माणसांच्या सुद्धां भेटी घेईनासा झाला. ऑक्टोबरचे १४ वे तारखेस संध्याकाळीं दाट धुकें पडलें होतें व रात्रहि फारच काळोखी पडेल असा अदमास पाहून एकदोन विश्वासू नोकर बरोबर घेऊन खासगी होडींत बसून तो स्टॅगनेरेलोच्या बंदराकडे निघाला. या बंदरांत दुसरी एक होडी आगाऊच तयार करून ठेवलेली होती. यास्तव बरोबरच्या नोकरांस निरोप देऊन तो एकटाच हातांत वल्हें घेऊन होडीवर चढला व भर समुद्रांत निघाला. त्या दिवशीं समुद्र थोडासा उचंबळलेला होता. परंतु मोठ्या धैर्यानें व कुशलतेनें तो मॉंटिआचे भुशिराजवळ ला-मॅडेलेना नांवाच्या बेटास सुरक्षित जाऊन पोंचला.

या बेटावर ग्यारीबाल्डी मिसेस कॉलिन्स नांवाच्या बाईच्या घरीं छपून राहिला; व रात्र पडतांच एक तट्टू मिळवून सहा तासांची मजल मारून सार्डिनिया येथें गेला; किनाऱ्यावरील झाडींत फिरून एक दिवसभर लपून राहिल्यावर दुसरें एक तट्टू घेऊन दाढी व अंगावरील तांबडा डगला काढून टाकून पोर्टोप्रूडेंझा येथें आपला जांवई कॅंझिओ यास जाऊन मिळाला. मग दोघेहि एक होडी काढून इटलीच्या किनाऱ्याकडे निघाले. रात्रीची वेळ व त्यांतून वारा जोराचा सुटलेला असल्यामुळें होडी बोरूच्या एका ताटव्याला अडकली. तेव्हां तींतून उतरून व दलदलींतून कशी तरी वाट काढून कित्येक तासपर्यंत मजल मारल्यावर त्यांस एक खेडें लागलें. तेथून एक गाडी घेऊन ते लेगहॉर्न येथें गेले. तेथें मात्र त्यांचा त्रास संपला. लेगहॉर्नहून फ्लॉरेन्सपर्यंत जाण्यास त्यांस कांहींच पंचाईत पडली नाहीं.

सर्व लोक ग्यारीबाल्डी कॅप्रेरा बेटांत नजरकैदेंत आहे असें मानीत असतां एके दिवशीं ग्यारीबाल्डी हा फ्लॉरेन्सच्या राजरस्त्याच्या चौकांतील एका घरांत अचानक प्रकट झाला व आपल्या गच्चीवरून खालीं जमणाऱ्या हजारों लोकांस उद्देशून भाषणें करूं लागला. ही बातमी इटलीभर हां हां म्हणतां एकदम

पसरली. फिरून या वेळीं ग्यारीबाल्डीस पकडण्याचा हुकूम द्यावा तर लोक खास बंड करितात अशी त्यांची खात्री होऊन चुकली होती. तेव्हां तिकडे तो ग्यारीबाल्डी आणि रोमचें व फ्रान्सचें सैन्य परस्पर वाटेल तें एकमेकांचें करोत, आपण स्वस्थ रहावें असें त्यांनीं ठरविलें.

इकडे ग्यारीबाल्डीनें पोपविरुद्ध मनसोक्त भाषणें करून जें काय मिळालें तें लढाऊ सामान व सैन्य घेऊन तो फ्लॉरेन्स सोडून निघाला. त्याचे सात हजार सैन्यास ना पोषाख ना कांहीं, ज्याला हातीं जे लागतील ते कपडे त्यानें अंगावर घातलेले; अधिकारी कोण हें ओळखण्याकरितां त्याजजवळ झाडांच्या टाहाळ्या तोडून दिलेल्या, अशा थाटानें हें सैन्य रोमवर स्वारी करण्यास निघालें. कांहीं मुक्काम गेल्यावर ग्यारीबाल्डीनें या सैन्याच्या दोन टोळ्या केल्या. पैकीं एक हमरस्त्यानें चालली व दुसरी डोंगरी वाटेनें गेली. मॉंटी रोटोंडो या गांवाजवळ रोमला दोहों बाजूंनीं जाऊन पोंचणारे दोन रस्ते फुटतात. त्या ठिकाणीं पोंचल्यावर एका टोळीनें पूर्वेकडील दरवाजास आग लावून देऊन आगींतून आंत प्रवेश केला व रात्रभर लढून तें शहर घेतलें. दुसरे दिवशीं सकाळीं ग्यारीबाल्डीहि तेथें येऊन पोंचला. ही लढाई सुरुवातीपासून सुमारें सत्तावीस तास चालू होती. पोपच्या पक्षाचे लोक अतिशय निकरानें लढले. कित्येक धर्माधिकाऱ्यांनीं आपलें धर्मपुस्तक बायबल टाकून देऊन ग्यारीबाल्डीरूप सैतानाचा शहरांत प्रवेश होऊं नये म्हणून हातांत शस्त्र धरलें होतें; पण शेवटीं ग्यारीबाल्डीचाच विजय झाला.

शहर हस्तगत झाल्यावर त्याचे लोकांनीं रोमन क्याथोलिक देवळें, मूर्ति वगैरेंचा फार उच्छेद केला. या गोष्टीला आपली नापसंती दर्शवावी व जरब बसावी म्हणून त्यानें अत्याचारी व दुष्ट अशा सात उच्छेदकांस चवाठ्यावर गोळ्या घालून मारविलें. यानंतर तीन दिवसांनीं ग्यारीबाल्डीजवळ पंधरा हजारांवर सैन्य जुळलें व शस्त्रसामुग्रीहि बरीच जमली; तेव्हां त्यानें पुढें चाल केली व रोमपासून साडेचार मैलांजवळ तो जाऊन पोंचला. तो येतांच पोपच्या सैन्याच्या आघाडीचे लोक मागें परतले व त्यांनीं वाटेंतले पूल सुरुंग लावून उडवून दिले. रोम शहरामध्यें खुद्द पोपची फारच धांदल उडून गेली. त्यानें आपल्या तुरुंगाचे दरवाजे उघडून अल्पस्वल्प संशयावरून शेंकडों लोक आंत कोंबले, व आमच्या रक्षणास कसेंहि करून धांवून या, नाहीं तर सैतानाच्या हातीं पोपची गादी खास जाणार, असा तांतडीचा निरोप फ्रेंच सैन्यास पाठविला.

ही बातमी युरोपांत पसरतांच रोमच्या पक्षाभिमानी लोकांत एकच हाहाःकार उडाला. व्हिक्टर-ए-मॅन्युएल यानें असें प्रसिद्ध केलें कीं, इटलीचें धोरण सर्व युरोप खंडास विदित आहेच. ग्यारीबाल्डी हा केवळ आपल्या जबाबदारींत पुंडावा करीत असून त्यास संस्थानचें अंग नाहीं. या गोष्टीची खात्री करण्याकरितां म्हणून त्यानें सिअलिडनी नामक सेनापतीचे हाताखालीं सैन्य देऊन पाठविलें. मात्र ग्यारीबाल्डीवर चालून जावें असा त्यास हुकूम नसून फक्त ग्यारीबाल्डी, फ्रेंच व पोपिश सैन्य, यांचे युद्धप्रसंगांत इटलीचें नुकसान होऊं देऊं नये असा मोघम व धरसोडीचा हुकूम त्यास दिला होता.

फ्रेंच सैन्याची कुमक येण्यास एक दिवस अवकाश लागतांच रोममधील प्रमुख लोकांनीं व धर्माधिकाऱ्यांनीं रोम सोडून जाण्याचा निश्चय केला, व त्याप्रमाणें भराभर आपआपलें सामानसुमान घेऊन सिव्हिटा व्हेकिया नांवाच्या मजबूत ठिकाणीं जाण्यास ते निघाले. परंतु पूल पडल्यानें ग्यारीबाल्डीस पुढील साडेचार मैलांची मजल करण्यास बराच वेळ लागला. पोपविरुद्ध असलेल्या रोमच्या नागरिकांस ग्यारीबाल्डी आतां येणार, घटकेनें येणार, व व्हॅटिकन येथील पोपच्या बादशाही गादीवर आरूढ होणार असें वाटत होतें. म्हणून तो येण्यास विलंब लागलेला पाहून त्यांना काळजी वाटूं लागली.

हा विलंब लागण्यास पूल पडला हें तर एक कारण होतेंच; परंतु ग्यारीबाल्डीचा विचार रोम शहर फितुरी करून सर करण्याचा होता असेंहि म्हणतात. रोमचा गव्हर्नर चार हजार पौंड घेऊन शहराचा किल्ला ग्यारीबाल्डीचे स्वाधीन करण्यास तयार झालेला होता. ही रक्कम इंग्लिश मित्रांच्या मदतीनें उभारली गेली होती. पण ज्या दिवशीं हा फितूर सिद्ध व्हावयाचा त्याच दिवशीं सकाळीं गव्हर्नरास कामावरून काढण्यांत आलें. यामुळें म्हणा, अगर इतर कारणांमुळें म्हणा, रोम ग्यारीबाल्डीच्या हातीं येण्यास अदमासापेक्षां दोन दिवस उशीर झाला; व तेवढ्या अवधींत पोपिश व फ्रेंच सैन्य त्याजवर चालून आलें. यामुळें त्यास मागें वळून मॉंटीरोटोंडोचा आश्रय घ्यावा लागला. कदाचित् धीर धरून त्यानें शत्रूस तोंड दिलें असतें तर फायदा झालाहि असता परंतु मागून इटालियन सैन्य व पुढून फ्रेंच सैन्य अशा कचाट्यांत सांपडल्यानें व प्रतिक्षणीं फ्रान्समधून निघालेलें एक प्रचंड सैन्य येऊन पोंचणार अशी आवई उठल्यानें, त्याचे लोकांचा धीर किंचित् दबला, व रोमवर चालून जाऊन लढाईस तोंड देण्याचा बेत बदलून त्यानें मागचा रस्ता धरला.

परंतु तोंड वळतांच, वळसा घालून आलेल्या शत्रूचे सैन्याची व त्याची मेंटाना गांवाजवळ गांठ पडली. चालून आलेल्या पोपच्या सैन्यास तर त्यानें मागें हटविलेंच; परंतु त्याचे मदतीस फ्रेंच सैन्य टेकड्यांमागें दडून बसलें होतें तें पुढें आल्यामुळें त्यांचें कांहीं चालेना. फ्रेंच सैन्यावरहि ग्यारीबाल्डी चार पांच वेळां तुटून पडला, व त्याचे स्वयंसेवक अगदीं हातघाईवर येऊन मोठ्या निकरानें लढले. परंतु शेवटीं त्यांस मागें हटावें लागलें. तेव्हां कोरेझीचे घाटांत त्यानें आपले लोक एकत्र केले व त्यांस जिकडे वाट फुटेल तिकडे जाण्याविषयीं मोठ्या कष्टानें सांगितलें. जखमी झालेल्या लोकांची नीट व्यवस्था करून, रात्रीं रोमचे दिवे व शत्रूचें सैन्यानें पेटविलेल्या आगट्या दुरून दिसत होत्या तिकडे दुःखयुक्त अंतःकरणानें एकवार नजर फेकून तो निघाला. फ्लॉरेन्सला जाण्याकरितां त्यानें स्पेशल ट्रेन काढली.

स्पेशल ट्रेन फिजलाईन स्टेशनवर येतांच इटालियन पोलीसची एक तुकडी स्टेशनांत शिरून तिनें आगगाडी थांबवून धरण्याचा हुकूम दिला. पोलिसांचा पुढारी लेफ्टेनंट कर्नल कॅमोझी हा ग्यारीबाल्डीच्या डब्यापाशीं गेला व आपली मला एकांतीं भेट घ्यावयाची आहे असें म्हणाला. 'कशाकरितां' असें म्हणून ग्यारीबाल्डीनें आपला कान पुढें केला असतां, त्यानें हळूच उत्तर केलें:— "आपणांस कैद करण्याकरितां!" ग्यारीबाल्डी रागावून म्हणालाः–"मला कैद करण्याचा तुम्हाला कांहीं अधिकार नाहीं. मी पार्लमेंटचा सभासद असून अमेरिकन नागरिकप्रजेचे मला हक्क आहेत. शिवाय मीं कोणताहि गुन्हा केलेला नसून रोमन रिपब्लिकचा सेनापति या नात्यानें माझ्या अधिकारांत मीं लढाई केली, व इटलीच्या सरहद्दीवर येतांच मीं हत्यार खालीं ठेविलें आहे. मला बलात्कारानें जागेवरून ओढून काढल्याशिवाय मी तुमचा कैदी होणार नाहीं." परंतु कॅमोझी हा हुकुमाचा बंदा. त्याजवळ ही कायदेशीर तक्रार काय चालणार? तथापि त्यानें इटलीच्या प्रधानास तार करून, पुढें काय करूं म्हणून विचारलें. त्या तारेचा 'कैद करा' असा जबाब आला. तेव्हां निरुपाय होऊन ग्यारीबाल्डीस कैद करणें त्यास भाग पडलें. हें पाहतांच ग्यारीबाल्डीचे सोबती आगगाडीचे डब्यांत होते त्यांनीं आपलीं हत्यारें सरसावलीं. लवकरच खूनहि पडले; परंतु ग्यारीबाल्डीनें त्यांस हत्यार खालीं ठेवण्यास सांगितलें व आपण कॅमोझीचे स्वाधीन झाला. शिपायांनीं

त्यास नेऊन आगाऊ तयार ठेवलेल्या गाडींत घातलें. अशा रीतीनें पुन्हा एकवार रोम हस्तगत करण्याचा त्याचा धाडसी प्रयत्न व्यर्थ गेला.

वॅरिगनो या ठिकाणीं ग्यारीबाल्डीस कांहीं दिवस अटकेंत ठेविल्यावर राजानें त्यास कॅप्रेरा येथें परत जाण्याची परवानगी दिली. वास्तविक पाहतां या वेळीं रोम काबीज करण्याचा त्याचा बेत फसला हें इटलीच्या हितास एकंदरीनें पाहतां पथ्यकरच होतें. कारण फ्रान्सबरोबर युद्ध करणें एकट्या इटलीस शक्य नव्हतें. ही गोष्ट खुद्द ग्यारीबाल्डी यासहि विचारांतीं कळली असती. परंतु दैव अनुकूल असलें म्हणजे तें इष्टार्थ अगदीं अकल्पित रीतीनें घडवून आणतें. ज्या रोमकरितां ग्यारीबाल्डी साऱ्या जन्मभर तळमळ करीत होता व ज्याचे पायीं आपला प्राण अनेक वेळां धोक्यांत घालून, शेंकडों देशभक्तांचें रक्त रणांगणीं वाहविण्यास तो कारणीभूत झाला, तेंच रोम पुढें लवकरच दोघांचें भांडण व तिसऱ्याचा लाभ या म्हणीप्रमाणें कांहीं एक प्रयास न करितां व्हिक्टर-ए-मॅन्युएलच्या स्वाधीन झालें!

भाग २१ वा

ग्यारीबाल्डीची फ्रान्सला मदत

परोपकाराय सतां विभूतयः॥

इ० स० १८७० सालीं फ्रान्स व जर्मनी यांजमध्यें कांहीं क्षुल्लक कारणावरून एकदम जंगी लढाई सुरू झाली. ती चारच महिने चालली. पण सेडन येथील प्रचंड युद्धामध्यें फ्रेंच बादशहा तिसरा नेपोलियन याचा पूर्ण पराभव होऊन जर्मन सैन्य पारिसवर चाल करून निघालें. पारिस येथें प्रजासत्ताक राज्य स्थापित होऊन जर्मन लोकांनीं नेपोलियन यास पदच्युत केलें, व पारिस लढविण्याचा विचार करून एम्. गॅंबेटा वगैरे फ्रेंच वीरांनीं व मुत्सद्द्यांनीं बरेच दिवस भगीरथ प्रयत्न केले. या सर्व प्रसंगाची हकीकत अत्यंत मनोवेधक आहे पण ती येथें देतां येत नाहीं. ग्यारीबाल्डीचेसंबंधानें सांगावयाचें तें एवढेंच कीं, फ्रेंच देशभक्तांची विपन्नस्थिति पाहून त्याचे मनांत त्यांजविषयीं सहानुभूति उत्पन्न झाली, व त्यानें एक दिवस उठून फ्रेंच प्रेसिडेंटास पत्र लिहून

फ्रान्सच्या वतीनें लढावयास आपण तयार आहों असें कळविलें. परंतु त्याचें उत्तर येण्याचेपूर्वींच तो मार्सेलिस येथें जाऊन उतरला.

पारीसमध्यें नवीन स्थापित झालेल्या अधिकारीवर्गास मनांतून ग्यारीबाल्डी हा नको होता. परंतु कांहीं अगदीं एककल्ली प्रजापक्षीय लोकांस तो प्रिय होता यामुळें, व तो पुढें येऊन दत्त म्हणून उभा राहिल्यावर त्याचा अव्हेर करणें उचित नव्हतें. यामुळें, प्रेसिडेंट एम्. गॅंबेटा यानें त्याचे स्वाधीन दोनतीनशें स्वयंसेवक करून त्यास एक क्षुल्लक कामगिरी सांगितली. त्याचा त्यास व त्याचे पक्षपाती लोकांस फार राग आला; तेव्हां गॅंबेटा यानें भिऊन 'ग्रँड पेट्रिओटे' नांवाच्या स्वयंसेवकांचा त्यास अधिपति करून स्ट्रेसबर्ग व पारिस यांचे दरम्यानच्या मुलखांत जर्मन सैन्याशीं लढाई करण्याचा त्यास अधिकार दिला. त्याचे हाताखालीं १२ । १३ हजार सैन्य तयार झालें.

परंतु नेहमींप्रमाणें या सैन्यासहि पोषाख किंवा हत्यारेंपात्यारें यांची सामुग्री बेताचीच मिळाल्यामुळें प्रथम बरेच दिवस त्यांचे हातून म्हणण्यासारखें कांहीं झालें नाहीं. परंतु लवकरच त्याचा मुलगा रिसिऑटी यानें जर्मन सैन्याच्या एका तुकडीवर छापा घालून यश संपादन केलें. खुद्द ग्यारीबाल्डीनेंहि डिजॉन नांवाच्या ठिकाणीं सुमारें १५ हजार जर्मन सैन्याचा पराभव केला. फ्रेंच व जर्मन यांच्या लढाईंत फक्त एकच जर्मन निशाण काबीज करण्यांत आलें, तेंहि ग्यारीबाल्डीच्याच सैन्यानें केलें असें म्हणतात. तथापि एकंदरीनें त्यानें केलेल्या कार्यभागाचें फ्रेंच सेनापतींनीं कौतुक न करतां उलट आपल्या रिपोर्टां-तून त्यास दोषच दिला आहे. जेथें मनास मन मिळत नाहीं, तेथें निःस्पृहतेनें जरी कार्य केलेलें असलें तरी त्याचें चीज होत नाहीं. परंतु हें आगाऊच कळण्यास लागणारी व्यवहारचतुरता ग्यारीबाल्डीचे अंगीं नव्हती.

असो. तथापि नाईस, डिजॉन व पारिस या तीन शहरांच्या लोकांनीं मात्र त्याची खरी परीक्षा केली व त्याजबद्दल कृतज्ञताबुद्धि वागवून त्यास आपल्या वतीनें पार्लमेंटचा सभासद निवडून दिलें. तसेंच बोर्डो येथील प्रधानमंडळानें त्यास फ्रान्सच्या वतीनें कृतज्ञतादर्शक पत्र पाठविलें. कांहीं दिवसांनीं पार्लमेंट भरलें तेव्हां एम्. लॉकरॉय या मुत्सद्द्यानें असें बोलून दाखविलें कीं, "रणां-गणावरच ग्यारीबाल्डीला फ्रेंच प्रजाजनाचे हक्क मिळून चुकले आहेत; आम्हीं त्याला नवीन काय देणार ?" व्हिक्टर ह्यूगो तर याहि पलीकडे गेला. तो

म्हणाला, "फ्रान्सवर आलेल्या बिकट प्रसंगांत युरोपांतील कोणीहि राजा किंवा कोणतेंहि संस्थान आमच्या मदतीला आलें नाहीं. फक्त एकाच मनुष्याला आम्हांविषयीं खरें प्रेम वाटलें. पण हा एकटा मनुष्यच एका राजा-इतका अगर संस्थानाइतका शक्तिमान् होता ! व फ्रान्सच्या वतीनें लढून ज्याचा एकवारहि जर्मन सैन्याचे हातून पराभव झाला नाहीं, असाहि तोच एक वीर होता ! !" हा वीर म्हणजे ग्यारीबाल्डी होय हें निराळें सांगावयास नकोच.

भाग २२ वा

अखेरचे दिवस

देह त्यागितां कीर्ति मागें उरावी
मना सज्जना हेचि क्रीया धरावी ॥

—रामदास

व्हॉसजेस प्रांतांत ग्यारीबाल्डीनें केलेले पराक्रम हेच त्याच्या जन्मांतील शेवटचे होत. यानंतर त्यानें हातांत शस्त्र धरलें नाहीं. तें धरण्याचें कारणच मुळीं उरलें नव्हतें. ज्याकरितां त्याचा सर्व खटाटोप होता तें रोम शहर यापूर्वीच इटलीचे राजाचे आपोआप स्वाधीन झालें होतें. व रोम हातीं आल्यानें सर्व इटली देश संयुक्त व स्वदेशीय राजछत्राखालीं स्वतंत्र झाला होता. अर्थात् यापलीकडे ग्यारीबाल्डीचें इतिकर्तव्य जगांत कोणतेंच नव्हतें. लोकांच्या भांडणांत पडून खऱ्याची कड धरून का होईना, पण हवी म्हणून लढाईची कामगिरी उकरून काढण्यास यापुढें ग्यारीबाल्डीचे मनांत धमक असली, तरी अंगांत शक्ति उरली नव्हती. यामुळें मरेपर्यंत सुमारें दहा वर्षें त्याचे हातून झालेलीं देशकृत्यें सात्त्विक अशींच होतीं.

इ० स० १८७४ सालीं रोमनें त्यास आपला प्रतिनिधि म्हणून पार्लमेंटांत निवडून दिलें. रोमचा प्रतिनिधि म्हणून पार्लमेंटांत जाण्यास त्याला फार हौस वाटली. तो येणार अशी बातमी पसरतांच रोमचे नजीक सिव्हिटा व्हेकिया

नांवाच्या बंदरांत त्याला सामोरे जाण्याकरितां लोकांची खूप गर्दी जमली, व रोमला येऊन पोंचेपर्यंत त्याच्या भोंवतालची गर्दी म्हणून कमी होईना. घोड्यावरील लोक आगगाडीच्या बाजूनें चालले होते व कांहीं कांहीं खप्पी तर आगगाडीवर चढून दिव्याच्या झरोक्यांतून त्याच्या टोपीचा एखादा कोपरा दिसला तरी तेवढा पाहून धन्यता मानून घेत होते. रोममध्यें पोंचल्यावर लोकांनीं त्यास डोळे भरून पाहिलें तेव्हां त्यांचें समाधान झालें. परंतु त्याची वार्धक्यामुळें झालेली दुर्दशा पाहून कोणाच्याहि डोळ्यांतून पाणी आल्याखेरीज राहिलें नाहीं. संधिवातानें त्याचें शरीर ठिकठिकाणीं दुखत होतें. बोटें ताठलीं होतीं, चेहऱ्यावर सुरकुत्या पडल्या होत्या, दाढींत पांढऱ्या-काळ्या केसांची सरमिसळ होऊन गेली होती; व एखाद्या आजारी मनुष्याप्रमाणें एका खाकेंत कुबडी धरून व एक हात आपला मुलगा मेनॉट्टी याचे खांद्यावर ठेवून तो चालत असे. तथापि, अंगावरील नेहमींचा तो तांबडा सदरा व काळा लांब झगा कायमच होता; पूर्वींचें तें लोकांच्या ओळखीचें स्मित हास्य ओठांवर अद्यापि तसेंच खेळत होतें. आहार नियमित व जठराग्नि प्रदीप्त असल्यामुळें त्याचे शिंपाप्रमाणें पांढरे शुभ्र दांत ओठांतून झळकत. लोकांनीं त्यास कॉस्टॉंझी नांवाच्या सरदारगृहापर्यंत आणून पोंचविलें. नेहमींच्या क्रमाप्रमाणें गच्चीवर उभें राहून लोकांना उद्देशून त्यानें भाषण करावें असा लोकांचा फार आग्रह पडला. परंतु भाषण करण्याची त्याचे अंगांत शक्ति उरली नव्हती. तेव्हां "मी भाषण करूं म्हणतां काय? ठीक आहे. तुम्हांला भेटल्यानें मला परमावधीचा आनंद झाला आहे. तर आतां घरोघर जा कसे? पूर्वींच्या प्रख्यात रोमन लोकांच्या वंशजांस सर्वांशीं साजेल अशा रीतीनें वागा" एवढेच चटकदार चार शब्द बोलून त्यानें त्यांस निरोप दिला.

रोममध्यें त्याचे कांहीं दिवस सुखाचे गेले. त्याचे स्नेही प्रधानमंडळांत होते ते त्यास समाधानांत ठेवण्याचा प्रयत्न करीत. खुद्द राजाहि त्याची वरचेवर गांठ घेत असे. राजाला पाहतांच ग्यारीबाल्डीच्या मनांत, जन्मभर अंगांत खिळलेल्या स्वाभिभक्तीचा उमाळा येत असे. ज्या दिवशीं नवीन पार्लमेंट उघडलें तो दिवस रोममध्यें मोठ्या उत्सवाचा होता. सभा भरल्यावर कांहीं वेळानें ग्यारीबाल्डीनें सभागृहांत प्रवेश केला. उजवे हाताकडे राजपक्षीय व डाव्या हाताकडे प्रजापक्षीय अशी सभासद मंडळी दुतर्फा थाटून बसली होती. ग्यारीबाल्डीनें प्रवेश करतांच प्रथम प्रजापक्षीय मंडळीनें त्यास

खडी ताजीम दिली व टाळ्यांचा एकच गजर केला. राजपक्षीय मंडळीला अशी भीति वाटत होती कीं, ग्यारीबाल्डी हा शिरस्त्याप्रमाणें कदाचित् शपथ घेण्याचेंच नाकारील. परंतु जेव्हां त्यानें शपथ घेतली व इटलीचे कायदे व इटलीचा राजा यांबद्दल आदरभाव प्रकट केला, तेव्हां राजपक्षीय मंडळीचे आढ्यतेची आढी मोडून तेहि उठून उभे राहिले. तेव्हां सर्व सभागृहानें एकदिलानें टाळ्यांचा कडकडाट करून त्याच्या नांवाचा जयघोष केला.

रोममध्यें ग्यारीबाल्डीचा मुक्काम पडला होता, तेवढ्या अवधींत त्याची करमणूक होण्यास बरींच कामें निघालीं. त्यांतील मुख्य म्हटलें म्हणजे, टायबर नदीचा कालवा हें होय. हा कालवा सुएझचे कालव्याचे धर्तीवर योजिला असून त्यास खर्च सुमारें ८ लक्ष रुपये व्हावयाचा होता. या कामास खुद्द व्हिक्टर-ए-मॅन्युएल, ग्यारीबाल्डी व राजघराण्यांतील एक श्रीमान् पेढीवाला अशा त्रिवर्गाची एक कमिटी नेमिली होती, व केवळ ग्यारीबाल्डीस ती गोष्ट प्रिय आहे एवढ्याचकरितां पार्लमेंट सभेनें पुरेसे पैसे मिळतील तेव्हां कालव्याचें काम हातीं घ्यावें असा ठराव पास करून ठेविला होता. या कामांत त्याचें मनहि बरेंच गढून गेलें होतें. प्रतिदिवशीं इंजिनिअर लोक बरोबर घेऊन तो टायबर नदीच्या किनाऱ्याची पाहणी करण्यास जात असे; राज्यकारभारांत त्याचें मन फारसें शिरूं नये या हेतूनें प्रधानमंडळी त्यास होईल त्या रीतीनें या रिकामटेकड्या कामीं प्रोत्साहन देत असे. कालव्याशिवाय इतर कामेंहि त्यास हळूहळू सुचविण्यांत आलीं. रोमच्या आसपासच्या दलदलींतून पाणी काढून द्यावयाचें होतें. टायबर नदीला पूर येऊन आसपासचे मुलुखाची नासाडी होत असे. याकरितां एके ठिकाणीं बांध घालणें अवश्य होतें. नदीचें पात्रहि कोठें कोठें वळणें देऊन फिरवावयास पाहिजे होतें. पूर्वी ज्यूलियस सीझर यानें रोम शहराकरितां जेथें बंदर बांधण्याचें योजिलें होतें त्याच जागीं बंदर बांधण्याचें काम सुरू करावयाचें होतें. हीं सर्व कामें सकृद्दर्शनीं रोमच्या हिताचीं व भावी वैभवास कारणीभूत होण्यासारखीं असल्यामुळें रोमच्या या भक्ताचें मन यांत अर्थातच गढून गेलें.

परंतु हीं सर्व कामें कालावधीचीं व पैशाचीं असल्यामुळें त्याचा नाद त्यास लवकरच सोडावा लागला. पुढें रोमची हवाच मानवेना म्हणून त्यास कॅप्रेरा येथें परत जावें लागलें. यानंतरहि एक दोन वेळां तो आपलें बेट सोडून

इटलीस गेला होता. परंतु या खेपा केवळ विशेष निमित्तानें असल्यामुळें तो फिरून लागलाच परतून घरीं येत असे.

यापुढें त्याच्या आयुष्यक्रमांत म्हणण्यासारख्या फारशा गोष्टी घडून आल्या नाहींत. १८७८ सालीं राजा व्हिक्टर-ए-मॅन्युएल मरण पावला. सर्व इटली देश एकछत्राखालीं आणून राजाचें ऐश्वर्य वाढविण्याकरितां ग्यारीबाल्डीनें सर्व आयुष्यभर कष्ट केले, अर्थात् त्याच्या मरणाचें वर्तमान ऐकून ग्यारीबाल्डीस अत्यंत दुःख झालें असेल यांत आश्चर्य नाहीं. व्हिक्टर-ए-मॅन्युएलवर त्याची अतिशय भक्ति होती व पुढें जरी एखादे वेळीं एकंदरीनें राजकीय अमला-विरुद्ध तो कडकपणानें उद्‌गार काढीत असे, तरी पण त्याची स्वामिभक्ति कधींहि ढळली नाहीं.

मॅझिनीचे लेख वाचून ग्यारीबाल्डीच्या मनाचा कल बरेच वेळां प्रजासत्ताक राज्य स्थापित करण्याकडे वळला होता. फ्रान्स व जर्मनी यांचे लढाईंत फ्रान्सला जी त्यानें मदत केली ती केवळ प्रजासत्ताक संस्थानाला म्हणून केली हें खरें आहे. तरी पण मॅझिनीइतका तो राजाधिकारद्वेष्टा कधींच नव्हता. इटली स्वतंत्र करावयाचा तो प्रथम राजछत्राखालीं आणून करावयाचा हें त्याचें मत नेहमीं कायम होतें हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. येवढेंच नव्हे तर सिसिली जिंकून त्यानें राजाचे स्वाधीन केली व रोम हस्तगत झाल्यावर तेथें पार्लमेंटची स्थापना झाली. या दोनहि प्रसंगीं ग्यारीबाल्डी हा लोकांस खुद्द राजापेक्षां शतपट अधिक प्रिय झाला होता. त्यानें आपली नुसती संमति दर्शविली असतां तरी देखील राजसत्तेला धक्का बसून प्रजासत्ता प्रचालित होण्याचा संभव होता. परंतु केवळ त्याचे स्वामिभक्तीमुळें हे प्रसंग टळले व इटली संयुक्त व स्वतंत्र होण्याचें काम सुकर झालें.

इ० स० १८८२ चे एप्रिल महिन्यांत ग्यारीबाल्डी हा इटली सोडून घरीं परत आला तो फिरून इटलीस परत गेला नाहीं. वार्धक्याचा अंमल त्याचे शरीरावर होऊन अखेरीस ता. २ जून १८८२ रोजीं त्याला सुखानें मृत्यु आला. त्या दिवशीं सर्व युरोप खंडांतील तारायंत्रांवर बहुधा एकच विषय खेळत होता व तो ग्यारीबाल्डीचा मृत्यु हा होय. ज्यानें जिवंतपणीं आपल्या पराक्रमानें जग हलविलें त्याच्या मृत्यूनेंहि जग हलावें हें योग्यच आहे !

एका विभूतीची शतसांवत्सरिक जयंती

[१]

गेल्या गुरुवारीं* युरोप खंडांतील इटली देशांत प्रत्येक शहरीं, विख्यात राष्ट्रभक्त ग्यारीबाल्डी याच्या शतसांवत्सरिक जन्मतिथीचा महोत्सव मोठ्या थाटानें व आनंदानें करण्यांत आला. अशा समारंभाचे प्रसंगीं अर्थातच गुप्तपोलीसरूपी भटभिक्षुकांची पोळी पिकली असेल, व अधिकारीवर्ग पितृमरणप्राय दुःख होऊन, लोकांनीं चालविलेल्या या राष्ट्रीय उत्सवाचा जयघोष ऐकूंहि येऊं नये म्हणून कानांत बोटें घालून दिवाभीताप्रमाणें बसला असेल, असा तर्क आमचे कित्येक वाचक, हिंदुस्थानांतील आपल्या अनुभवावरून, कदाचित् करितील. परंतु वस्तुस्थिति तशी नसून राज्यारोहणाचे किंवा पुत्रजन्माचे प्रसंगीं आनंद व्यक्त करण्याकरितां राजानें जशा प्रकारच्या गोष्टी कराव्या तशाच गोष्टी इटलीचा राजा व्हिक्टर-ए-मॅन्युएल यानें या महोत्सव प्रसंगीं केल्या. राजा व प्रजा उभयतांनीं मिळून एक दिलानें हा उत्सव साजरा केला; सर्व तऱ्हेच्या राजकीय गुन्हेगारांस व बंदिवानांस या वेळीं मुक्त करण्यांत आलें होतें. आमच्या इकडे शिवाजी-उत्सवासारखे उत्सव फार तर 'पार' पडतात; इटलीसारख्या राष्ट्रांत असल्या उत्सवांत विभूतिप्रेम अधिक कोण दाखवितें—राजा कीं प्रजा—अशी अहमहमिका सुरू असते.

परंतु या विलक्षण प्रकारची मीमांसा करीत बसण्याचा आज आमचा हेतु नाहीं. तर या महोत्सवप्रसंगानें इटलीसारखा निराशासमुद्रांत गटंगळ्या खाऊन अर्धमेला झालेला देश फिरून स्वतंत्र कसा झाला, व ग्यारीबाल्डीसारख्या दरिद्री व अविद्वान् अशा एकट्या व्यक्तीला आपल्या राष्ट्रास स्वातंत्र्य मिळवून देण्याचे बाबतींत यशस्वी कसें होतां आलें या विषयाकडे आमच्या वाचकांचें थोडेंसें लक्ष गेलें तर बरें, अशी आमची समजूत आहे; यास्तव त्याच विषयासंबंधानें दोन शब्द लिहिण्याचें आम्हीं आज योजिलें आहे.

ग्यारीबाल्डीनें केलेल्या कृतीची योग्यता पूर्णपणें लक्षांत येण्यास प्रथमतः त्याचे वेळीं इटली देशाची स्थिति कशी होती हें सांगणें जरूर आहे. ओळखीच्या शब्दांनींच सांगायचें म्हटलें म्हणजे इटली हा देश चतुःसीमेच्या

---

* केसरी ९ जुलै १९०७.

दृष्टीनें थेट हिंदुस्थानसारखाच आहे; अर्थात् तीनहि बाजूंनीं समुद्र व उत्तरेस फक्त एक अंगास प्रचंड व दुर्लंघ्य असा पर्वत. इटलीचें व हिंदुस्थानचें हवा-पाणी जवळ जवळ सारखेंच आहे. हवा किंचित् उष्ण, पाऊस बेताचा, ऋतुमान सौम्य, नीलवर्ण अशा खुल्या आभाळाचे मेघडंबरींत चांदण्या ढळढळीत दिसल्या नाहींत असें सबंध वर्षांत क्वचितच घडावयाचें. यामुळें लोक स्वभावानें प्रेमळ, हौशी व उल्हासी; जमीन सुपीक व धनसंपन्न; अर्थात् या कारणांनीं हा देश रहिवाशांच्या अभिमानाचें पण परकीयांच्या लोभी वासनेचें सदैव अधिष्ठान होऊन राहिलेला होता.

हिंदुस्थानाप्रमाणें इटलीची इतिहासपरंपराहि अत्यंत वैभवपूर्ण अशी होती. अर्वाचीन इटालियन राष्ट्र म्हणजे पूर्वींचें रोमचें साम्राज्य; आणि उज्जयिनी, अवंती, दिल्ली वगैरे नांवें उच्चारलीं असतां हिंदुस्थानवासीयांच्या मनांत अनिर्वचनीय सानंदाभिमान थरारून उभा राहतो, त्याप्रमाणेंच रोम हें नांव घेतांच इटालियन लोकांचे मनांत सर्व प्रकारच्या ऐहिक ऐश्वर्याचें किंबहुना चतुर्विध पुरुषार्थांचें माहेरघर अशा प्रकारची भावना उत्पन्न होते. सिपीओ, सीझर यांसारखे शूर वीर; आगस्टस व मार्क्स ऑरेलिअस यांसारखे न्यायी उदार राजे; व सिसरोसारखे वक्ते एके काळीं रोममध्यें होऊन गेले.

हल्लींच्या इंग्रजी साम्राज्याप्रमाणें रोमचें साम्राज्य जगाच्या बहुतेक भागावर पसरलेलें होतें. खुद्द इंग्लंड देशहि रोमच्या राजसत्तेखालीं लाथा खात सुमारें दीडशें वर्षें गुलाम होऊन राहिला होता. पण

> “ सा रम्या नगरी महान् स नृपतिः सामंतचक्रं च तत्
> सर्वं यस्य वशादगात् स्मृतिपथं कालाय तस्मै नमः ”

असें म्हणण्याची पाळी उज्जयिनीसंबंधानें हिंदुस्थानांत आली ! तशीच सर्वभक्षक कालाच्या तडाख्यांत सांपडल्यानें रोमसंबंधानेंहि आली. प्रथम रोमचें प्रजा-सत्ताक राज्य मोडून साम्राज्य झालें. मग एका बादशाहीचीं दोन तख्तें झालीं. पुढें रानटी लोकांनीं पश्चिमचें रोमचें तख्त बुडवून टाकलें व पूर्वेचें तख्त कॉन्स्टँटिनोपल येथें होतें तेंहि बुडून जाऊन तेथें मुसलमानी राज्य झालें; यानंतरचीं हजार वर्षें इटालियन लोकांनीं अत्यंत विपन्न स्थितींत काढलीं. तीं अशीं कीं, ‘यांचे पूर्वज फार चांगले होते’ असें म्हणवून घेण्यापलीकडे त्यांचें कोणतेंच वैभवचिन्ह शिल्लक राहिलें नाहीं !

एकोणिसाव्या शतकाचे प्रारंभीं, जेव्हां मॅझिनी व ग्यारीबाल्डी जन्मास आले त्या वेळची इटलीची स्थिति व हिंदुस्थानची आजची स्थिति यांत अगदीं तंतोतंत साम्य आहे. उलट हिंदुस्थानापेक्षां इटलीची स्थिति कांकणभर वाईटच होती म्हटलें तरी चालेल. या वेळचा इटली विस्ताराचे मानानें सुमारें दक्षिणेंतील मोंगलाईएवढा व लोकसंख्येचे मानानें पंजाबएवढा, इतका लहान असतां एवढ्यांत दहा निरनिराळीं संस्थानें होतीं. प्रत्येक संस्थान दुसऱ्यापासून स्वतंत्र परंतु सर्व मिळून ऑस्ट्रियाचे साम्राज्याचे अमलाखालीं मांडलिकत्वाचे नात्यानें वागणारीं. बरें, संस्थानिक तरी चांगले असावयाचे, तर तेंहि नाहीं. स्वतः कुंपणानेंच शेत खावें त्याप्रमाणें हे संस्थानिकच परकी ऑस्ट्रियन राजाधिकाऱ्यांपेक्षां प्रजेस अधिक जुलुमानें व निर्दयतेनें वागवीत. ते स्वतः अदूरदृष्टि, स्वार्थपरायण, उद्दाम व दुराचारी असे असून, प्रजेस हजारों प्रकारांनीं लुबाडीत व गांजीत. यांस सरकारकडून ज्या लाथा मिळत त्यांचा प्रतिकार करण्याची अंगीं धमक नसल्यानें ते त्याच लाथा आपल्या प्रजेस सव्याज देत. व्यक्तिस्वातंत्र्य कसें तें ठाऊक नव्हतें. शिक्षणाचे नांवानें शून्य. जें काय मिळेल तें धर्मोपदेशकांकडून मिळावयाचें; हे धर्मोपदेशकहि आपला गुरु जो रोमचा शंकराचार्य त्याचेप्रमाणेंच दुराचारी, कलहप्रिय व सुखलोलुप बनलेले. कायदा व न्याय कशाशीं खातात याची प्रजेस ओळखहि नव्हती असें म्हटलें तरी चालेल. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नव्हता. या सर्व संस्थानिकांनीं व प्रजेनें एकमेकांस रेटून ऑस्ट्रियाचे लष्करास व कर गोळा करणाऱ्या कुळकर्ण्यांस मात्र निर्भयपणें वावरण्याला मोकळी जागा करून दिली होती. धर्मतेज किंवा समाजतेज म्हणावें तर या बाबतींतहि फक्त पूर्वजांचें कीर्तीकडे बोट दाखविण्याची पाळी. अशा रीतीनें स्वातंत्र्यवल्लीस मारक असें खत सर्व देशभर पसरून राहिलेलें होतें; व त्यांत नित्य फक्त नवीन दुर्गुणांचे मात्र अंकुर फुटत.

याहून निराशाजनक अशी दुसरी स्थिति ती कोणती असणार? पण ईश्वराचे कनवाळुत्वाची खरी साक्ष अशाच वेळीं पटते. त्यास करुणा येतांच अशा स्थितींतच इटलीचे दैवानें उलट खाल्ली व पुढें फक्त पन्नास वर्षांतच इटलीच्या कांहीं सुपुत्रांचे उद्योगानें तिला स्वातंत्र्याची जोड फिरून प्राप्त झाली. या सुपुत्रांत मॅझिनी, ग्यारीबाल्डी, कौंट कॅव्हूर व खुद्द राजा व्हिक्टर-ए-मॅन्युएल या चौकडीची मुख्यतः गणना आहे. एखाद्या राष्ट्राचे ऐश्वर्याच

प्रभातकाल समीप आला असतां, पूर्वेकडे दिशा उजळलेल्या आहेत हें इतरांचे आधीं कल्पनादृष्टीनें जाणण्याची शक्ति मॅझिनीसारख्या राष्ट्रभक्त अशा कवींच्या प्रतिभेस ईश्वर देतो; ज्यांनीं आपल्या काजव्यासारख्या चुटपुटत्या प्रकाशावर रात्रभर दिमाख मिरविला त्या नक्षत्रांचें तेज फिक्कें पडत चाललें आहे हें कॅव्हूरसारखे राष्ट्रभक्त मुत्सद्दी आपल्या तीक्ष्ण धोरणानें ओळखून, सुप्रभातीं होणाऱ्या रणयज्ञाच्या सामुग्रीची जुळवाजुळव करण्यास लागतात; मग ग्यारीबाल्डीसारखे राष्ट्रभक्त वीर तरवारीनें तोडलेली आपल्या स्वार्थाची पहिली समिध राष्ट्रीय होमकुंडांतील पवित्र अग्नीस अर्पण करून ज्वाळा पेटवितात; आणि शेवटीं—

"संग्रामाध्वरदीक्षितो नरपतिः पत्नी गृहीतव्रता
राजन्योपनिमंत्रणाय रसते स्फीतं यशोदुंदुभिः"

असें वेणीसंहारांतील भीमसेनानें भारती युद्धाच्या प्रारंभाचें वर्णन दिलें आहे, त्याप्रमाणेंच व्हिक्टर-ए-मॅन्युएलसारखे राष्ट्रभक्त संस्थानिक रणयज्ञ-दीक्षा घेण्यास सज्ज होऊन यशोदुंदुभि वाजविण्याचा हुकूम फर्मावितात. इटलीचे उद्धाराचा इतिहास हें अत्यंत सुरस असें एक महाकाव्य आहे. तें वाचीत असतां खऱ्या 'अद्‌भुत रसाचे प्याल्यावर प्याले'च आपण झोकीत आहों कीं काय असें वाचकांस वाटतें. त्याचें वर्णन केसरीचे अवघ्या दोन रकान्यांत आम्ही किती देणार? तथापि आजचा चरित्रनायक जो ग्यारीबाल्डी त्याचे संबंधानें दोन शब्द मुद्दाम सांगणें जरूर आहे.

याचा जन्म नाईस नामक खेडेगांवीं गरीब अशा मच्छीमार व्यापाऱ्याचे एका कुटुंबांत इ. स. १८०७ चे जुलई महिन्याचे चौथे तारखेस झाला. ग्यारीबाल्डी हा जन्मतः धीट, सशक्त, साहसप्रिय, उल्हासी, प्रेमळ व प्रामाणिक असा होता. त्यास शिक्षण फारसें मिळालें नाहीं, परंतु रोमच्या गतवैभवाची ज्योति मनांत पेटत राहण्याइतकें पुस्तकी ज्ञान त्यास झालें होतें; मॅझिनीसारख्या राष्ट्रभक्ताचे गुरूपदेशामुळें या ज्योतीनें अधिकच पेट घेतला. देशोद्धाराची एकट्याचे हातून होईल ती खटपट करावयाची या निश्चयानें प्रथम तो 'तरुण इटली' या नांवाच्या गुप्त मंडळींत सामील झाला; व सरकारी नोकरी पत्करून, लष्करांतील लोकांस खरा राष्ट्रधर्म शिकवून त्यांचेकडून बंड

करविण्याचा त्यानें व मॅझिनीनें मिळून प्रयत्न केला, परंतु तो फसला. मॅझिनीस हद्दपार करण्यांत आलें; ग्यारीबाल्डी पळून गेला, परंतु त्यास फांशीची शिक्षा फर्माविण्यांत आली. आपलें नांव जन्मांत प्रथमतः छापून आलेलें असें त्यानें पाहिलें तें यासंबंधांत !

पुढील बारा वर्षें त्यानें दक्षिण अमेरिकेंत स्वतंत्रतादेवीच्या उपासनेंत व केवळ परोपकारार्थ लढाया करण्यांत घालविलीं. बारा वर्षांच्या हद्दपारीनेंहि त्याच्या तरवारीवर निराशेचा गंज चढला नाहीं. स्वदेशांत राजकीय उलाढाली चालल्या आहेत व कांहीं संस्थानिक आणि त्यांची प्रजा यांच्या मनांत स्वदेशाकरितां परकीय राजाशीं लढण्याची प्रेरणा झाली आहे, असें समजतांच तो आपण जमविलेले शंभर लोक घेऊन इटलीस परत आला. त्याचे डोकीवर फांशीची शिक्षा अद्याप कायमच होती. तथापि ती आतां रद्द झाली, व दक्षिण अमेरिकेंत त्यानें केलेल्या अचाट पराक्रमांचे कीर्तीमुळें त्याचा इटलीच्या लष्करी राजकारणांत शिरकाव झाला. इ. स. १८४८ सालीं सर्व युरोप खंडभर बंडाची धामधूम झाली, त्यांत इटलींतहि पुंडावा झाला. या प्रसंगीं मॅझिनी व ग्यारीबाल्डी यांनीं रोममध्यें बंड करून प्रजासत्ताक राज्य स्थापित केलें. पण तें औट घटकेचें झालें. फ्रेंच सैन्याचे प्रचंड ओघापुढें या देशभक्तांनीं मांडलेलें राज्य वाळूच्या घरकुलाप्रमाणें वाहून गेलें व फिरून ग्यारीबाल्डीस पळून जाणें भाग पडलें.

या अज्ञातवासप्रसंगीं तो न्यूयॉर्क शहरीं अठरा महिनेपर्यंत हातानें मेणबत्त्या करून विकीत असे. पण तो एकटाचसा काय, १८४८ सालची बंडाची वावटळ उपशम पावल्यावर, युरोपांतील प्रजापक्षीय व उपद्यापी अशा प्रत्येक राष्ट्रभक्तास देशत्याग करणेंच भाग पडलें. ज्या वेळीं ग्यारीबाल्डी हा मेणबत्त्या करीत होता त्या वेळीं खुद्द न्यूयॉर्क शहरांतच लुई ब्लॅक हा बृहन्नडेप्रमाणें नृत्यगायनाच्या तालमी देत होता. लॅमेरटाईन यानें हजामती करण्याचें दुकान काढलें होतें, लेड्र रालिन यानें बंदरावरील हमालीचा धंदा पत्करला होता, व दुसरा एकजण रस्त्यांतून फळभाजी विकीत हिंडे ! तात्पर्य, प्रसंग येऊन पडल्यावर मोठमोठ्यांस सुद्धां उपजीविकेकरितां वाटेल तो धंदा करावा लागतो. परंतु हरिश्चंद्रानें ज्याप्रमाणें केवळ ऋणविमोचन व सत्त्वपरिपालन यांकरितां डोंबाच्या घरीं पाणी भरण्याची व स्मशान राखण्याची नोकरी पत्करली, त्याचप्रमाणें वरील महात्म्यांनींहि देशत्याग करून असले धंदे पत्करले. त्याचें कारण झालें तरी

देशमातेचें ऋण फेडण्याची त्यांची बुद्धि जागृत होती हेंच. एरवीं केवळ स्वार्थाकडेच त्यांनीं नजर पुरविली असती तर तेहि आपल्या देशांत राजमान्यतेस पावण्यास आणि पदव्या व पगार यांचा उपभोग घेण्यास कांहीं कमी पात्र होते असें नाहीं.

असो. ग्यारीबाल्डी दीड वर्षपर्यंत भेणांत हात बुडवून बसला होता; तथापि त्याची मूठ तरवारीवर पडल्याबरोबर राष्ट्रभक्तीच्या प्रखर उष्णतेनें सर्व बुळबुळीतपणा वितळून जाऊन तिची मगरमिठीच बसली. अनुकूल असा काळ पाहून तो स्वदेशांत परत आला, त्या वेळीं राष्ट्रीय चळवळीची आग अधिकच पेटली होती. पिड्मॉटच्या राजा व्हिक्टर-ए-मॅन्युएल यानें ऑस्ट्रियन साम्राज्याशीं उघड वैर मांडलें होतें, आणि ग्यारीबाल्डीस व स्वयंसैनिकांस राष्ट्रीय रणसंग्रामाच्या पहिल्या पुराचें पाणी चाखावयास मिळालें. परंतु राजास व प्रधानास सर्व बाजूंचीं राष्ट्रीय धोरणें संभाळावीं लागत असल्यानें, लवकरच व विशेष फायदा नव्हता तरी तह करावा लागला. यामुळें ग्यारीबाल्डीस यापुढें आपल्या जबाबदारीवरच बंडाळ्या व युद्धें करावीं लागलीं. प्रथमतः राष्ट्रद्रोही संस्थानिकांचीं पाळेंमुळें खणून काढण्याचे उद्योगास तो लागला. त्यानें सिसिलीवर स्वारी करून तेथील संस्थानिकाचा पराभव करून राजधानीचें शहर नेपल्स हें हस्तगत केलें; व पिड्मॉटचे राजास निमंत्रण करून सिसिलीचा राजमुकुट त्यानें आपल्या हातानें राजाचे मस्तकावर घातला.

यापुढील ग्यारीबाल्डीचे प्रयत्न, जें रोम शहर त्याच्या राष्ट्रीय महत्त्वाकांक्षेच्या आकाशांत ध्रुवाप्रमाणें अढळ होऊन राहिलें होतें त्या रोमवर स्वाऱ्या करण्यासंबंधाचे होते. या प्रयत्नांत त्यास प्रत्यक्ष असें यश आलें नाहीं. कारण त्यास रोमवर स्वारी करूं देणें म्हणजे ऑस्ट्रिया व त्याचप्रमाणें पोपचा मित्र व पाठीराखा फ्रेंच बादशहा या दोघांसहि नाखूष करून त्यांस एकदम युद्धास निमंत्रण देण्यासारखें होतें. कॅव्हूर काय किंवा व्हिक्टर-ए-मॅन्युएल काय, यांस रोम हस्तगत करावयाची ग्यारीबाल्डीइतकीच उत्कंठा होती. परंतु ते मुत्सद्देगिरीचा डाव खेळत होते; व मुत्सद्देगिरीचा डाव खेळणारास कित्येक वेळां फार दूरवर पहावें लागतें. निवळ शिपाईगिरीच्या धोरणाच्या मनुष्याप्रमाणें त्यांस 'घे सुरी कीं घाल उरीं' असें करतां येत नाहीं. या प्रयत्नांत दुही झाल्यासारखी होऊन ग्यारीबाल्डीनें फिरून फिरून रोमवर

उडी घ्यावी व राजाचे सैन्यानें तोंड देऊन त्यास माघारें हटवावें असें होऊं लागलें.

एके प्रसंगीं तर दोघांत लढाई होऊन ग्यारीबाल्डी जखमीहि झाला. मात्र या सर्व प्रसंगीं राजधर्माचा एक विलक्षण देखावा दृष्टीस पडत होता. ग्यारीबाल्डी हा वरचेवर राजाचे हुकूम तोडी व लढाईस प्रवृत्त होई; तथापि कायद्याचें उल्लंघन किंवा राजाच्या हुकुमाची अवज्ञा आणि खरा राजद्रोह यांमध्यें स्वरा-ज्यांत असणारें जमीनअस्मानचें अंतर तेव्हां जगास दिसून आलें. दुसरे पक्षीं राजानें जरी वरचेवर ग्यारीबाल्डीस कैद केलें व एक वेळ कॅप्रेरा बेटाभोंवतीं सरकारी लढाऊ गलबतांनीं वेढा देऊन त्यास घरचा कैदी करून सोडलें होतें; तरी राजाचे मनांत ग्यारीबाल्डीविषयींची भावना सख्ख्या भावाप्रमाणेंच होती. प्रधान कौंट कॅव्हूर व ग्यारीबाल्डी यांचाहि भर पार्लमेंटांत खडाजंगी वाद होत असे, व आपली जन्मभूमि जें नाईस शहर तें कॅव्हूर यानें ऑस्ट्रियास देऊन टाकल्याबद्दल तो कॅव्हूर यास शत्रु असें मानी. तथापि ऑस्ट्रियाशीं लढाई म्हटली म्हणजे हे त्रिवर्ग खांद्याला खांदा देऊन उभे असावयाचे. असो.

ग्यारीबाल्डीस ज्या गोष्टीचा निदिध्यास लागून राहिला होता ती गोष्ट १८७२ सालीं आपोआपच घडून आली. मुत्सद्देगिरीचा डावच अखेर साधला व रोमचा बचाव करणें पोपला अशक्य होऊन राजा व्हिक्टर-ए-मॅन्युएल यानें रोममध्यें प्रवेश केला; आणि जी इटलीची गादी रोम सोडून आज हजार वर्षें बाहेर भटक्या मारीत होती तिची पूर्ववत् त्या इतिहासप्रसिद्ध नगरांत त्यानें स्थापना केली. अशा रीतीनें ग्यारीबाल्डी याचे मनोरथ पूर्ण झाले. यानंतर आपल्या आयुष्याचीं शेवटचीं दहा वर्षें ग्यारीबाल्डीनें शांततेंत व निव्वळ शेतशेतकी करून घालविलीं.

ग्यारीबाल्डीचे चरित्रावरून व इटलीचे उद्धाराचे इतिहासावरून एक दोन गोष्टी विशेष ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत, तेवढ्या सांगून आम्ही हा लेख पुरा करितों. ग्यारीबाल्डीचे तारुण्याचीं कळी उमलण्याचे वेळीं त्याचे देशाची स्थिति किती निकृष्ट झालेली होती हें मागें सांगितलेलेंच आहे. अशा वेळीं त्याचेबरोबरीच्या इतर हजारों तरुणांनीं जे स्वार्थसाधनाचे मार्ग पत्करिले, किंवा कोणत्याहि राष्ट्रांत, कोणत्याहि काळीं, निदान शेंकडा नव्वद लोक तरीं जे मार्ग स्वाभाविकपणें पत्करतात, त्यांचा वीट ग्यारीबाल्डीस विशेष शिक्षण नसतांना स्वयंस्फूर्तीनें आला; व त्यानें आपण होऊन आपला गुरु शोधून

काढून त्याचा उपदेश पुढें आमरणान्त पाळला. देशसेवेखेरीज दुसरें काडी-इतकेंहि काम त्यानें अवघ्या आयुष्यांत केलें नाहीं ही गोष्ट प्रथमतः ध्यानांत ठेविली पाहिजे. स्वदेशप्रीतीचा अंकुर ग्यारीबाल्डीचेच हृदयांत इतक्या जोरानें कां उगवावा व तो इतरांचे हृदयांत कां उगवूं नये, याचें उत्तर कर्मवादाचा अनुवाद केल्याशिवाय देणें कदाचित् कठीण जाईल. परंतु या बाबतींत ईश्वर-कृपा व पूर्वपुण्याईचा संस्कार हे गृहीत घेऊन चालले तरी त्यापुढें त्याच्या हातच्या अशा ज्या गोष्टी राहिल्या व त्यानें केल्या त्या तरी आपण प्रत्येकजण आपल्या देशाकरितां करतों काय असा प्रश्न ज्याचा त्यानें आपल्या मनास करून पाहावा. नुसती देशाबद्दलची कोरडी कळकळ बाळगणें फार सोपें आहे.

ग्यारीबाल्डीच्या चरित्राचें सार म्हणून जर कांहीं सांगावयाचें असेल तर तें फक्त दोनच शब्दांत सांगतां येईल- **साहसप्रियता व स्वार्थत्याग.** स्वदेशाच्या भावी सुस्थितीचें चित्र नुसत्या कल्पनाशलाकेनें हृत्पटावर रेखाटून तो स्वस्थ बसला नाहीं. 'शिर सलामत तर पगडी पचास' हा स्वार्थसाधनप्रिय मनुष्यांचा प्रवृत्तिमार्गांतला महामंत्र ग्यारीबाल्डीच्या कानांवरून गेला नसेल असें नाहीं; फार काय पण याच मंत्राचा जप त्याचे काळीं स्वतःस विद्वान्, विचारी दूरदर्शी व नेमस्त म्हणवून घेणारे हजारों लोक रात्रंदिवस करीत होते. मागें एका अग्रलेखांत रशियासंबंधानें सांगतांना एकोणिसाव्या शतकाचे प्रारंभीं त्या देशांत जहाल व नेमस्त असे तट माजले असल्याचें आम्ही सांगितलेंच आहे. तीच स्थिति ह्या काळीं इटलीमध्येंहि होती. मॅझिनी व ग्यारीबाल्डी यांस 'जहाल' असें दूषण देऊन मूर्खशिरोमणींच्या मालिकेंत ओढणारी शहाणी-सुर्ती 'नेमस्त' मंडळी तेव्हांहि होती. परंतु ग्यारीबाल्डीनें ज्या मंत्राचा जप घेतला होता तो- मृच्छकटिकांतील शर्विलकानें मदनिकेस सांगितला तोच- म्हणजे 'अयि भीरु, साहसे श्रीःप्रतिवसति' हा होता. वेळ आली म्हणजे सर्व गोष्टी घडून येतात, नियतिचक्र सदोदित फिरत असतें, 'नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण' या वचनाप्रमाणें राष्ट्रांच्या घडामोडींत अपकर्षानंतर उत्कर्ष हा केव्हां ना केव्हां तरी यावयाचाच आहे- या कोरड्या तात्त्विक वचनांनीं ग्यारीबाल्डीच्या मनास कधींहि शांति मिळाली नाहीं. तर एखाद्या वाफेच्या किंवा विजेच्या शक्तीनें चालणाऱ्या मोठ्या चाकाला झालें तर प्रथम कोणी तरी एकदां गति द्यावीच लागते, त्याचप्रमाणें नियति-चक्रालाहि कलाटणी

देण्यास आपण अंशतः तरी कारणीभूत व्हावें ही महत्त्वाकांक्षा त्यानें धरली होती व यामुळेंच त्याच्या स्वदेशप्रीतीला कर्तृत्वाचें स्वरूप आलें.

दुसरें असें कीं, साहसकर्में केल्यानें त्याला जो खासगी फायदा होण्याचा संभव होता त्या फायद्यावरहि त्यानें राष्ट्रदेवतेच्या नांवानें उदक सोडलें. दक्षिण अमेरिकेंत लढाया मारून मॉंटीव्हिडो या राजसत्ताक संस्थानच्या मुख्य सेनापतीचे अधिकारावर तो होता त्या वेळीं चारुदत्ता-प्रमाणेंच 'कथं तैलेनविना दीपाः प्रज्वाल्यंते' असें घरांतून सांगण्याची त्याच्या बायकोस पाळी येत असे. एकदां तर मेणबत्त्या विकत घेण्याइतके जवळ पैसे नसल्यामुळें फ्रेंच आरमारावरील अधिकाऱ्यांची भेट त्याला अंधारांत घ्यावी लागली ! १८५९ सालीं ऑस्ट्रियाशीं झालेल्या लढाईत स्वयंसैनिकांचा सेना-पति या नात्यानें लढल्यानंतर पळून जाण्याचा प्रसंग आला, तेव्हां त्याला वाटखर्चीकरितां खिशांतलें घड्याळ विकावें लागलें. सिसिलीचें संस्थान खालसा करून, राजमुकुट व्हिक्टर-ए-मॅन्युएलच्या डोक्यावर घालून तो घरीं जातांना पोटगीस त्याला लोकांचे पैसे उसने घ्यावे लागले ! लढाईचा शेवट झाल्यावर त्यास लष्करी हुद्द्याची मोठी जागा, लाखों रुपयांची देणगी व कायमचें पेन्शन देण्याचा सरकारी ठराव झाला असतांहि त्या सर्व गोष्टी त्यानें साफ नाकारल्या. राष्ट्रभक्ताचा स्वार्थत्याग कोठवर जाऊं शकतो, याचें ग्यारीबाल्डी हें एक उदाहरण आहे. तात्पर्य, तो साहसाला कचरता किंवा साहसकर्म करून मिळणाऱ्या स्वार्थाची हाव धरता, तर त्याचे हातून देशकार्य झालें असतें कीं नाहीं, याची शंकाच आहे !

इटलीच्या उद्धारावरून बोध घ्यावयाचा तोहि उघड आहे. कोणतेंहि राष्ट्र कितीहि खालावलें तरी त्यानें निराश होतां कामा नये. राष्ट्रांत कोठें तरी महत्त्वाकांक्षेची ठिणगी जर शिल्लक उरली असली, तर तीं अनुकूल स्थिति येतांच पेट घेतल्याशिवाय राहणार नाहीं. ग्यारीबाल्डीचे बाळपणीं, आल्प्स पर्वत एक वेळ इकडला तिकडे उचलून ठेवतां येईल, पण ऑस्ट्रियाची शक्ति रतिभरहि कमी होणार नाहीं, असा सार्वत्रिक समज होता. परंतु शेवटीं 'प्रजापीडनसंतापात् समुद्भूतो हुताशनः । राज्ञः कुलं श्रियं प्राणान् अदग्ध्वा न निवर्तते' हेंच नीतिवचन खरें ठरलें.

[२]

इटालियन देशभक्त मॅझिनी

इटालियन वीर ग्यारीबाल्डी याच्या महोत्सवासंबंधानें दोन आठवड्यांपूर्वी आम्हीं जें लिहिलें तें वाचकांचे लक्षांत असेलच. तोच विषय पुरा करण्याकरितां आणखी दोन शब्द लिहिण्याचें आज आम्हीं योजिलें आहे. शंभर वर्षांपूर्वी इटलीचें राष्ट्र अगदीं हताश होण्याच्या स्थितींत होतें. अशा वेळीं ग्यारीबाल्डीसारखा लढवय्या राष्ट्रभक्त उत्पन्न झाला; आणि राज्यक्रांतीच्या आणीबाणीच्या वेळीं साहसी, स्वार्थत्यागी असा लोकनायक निपजून त्याच्या हातून ईश्वर जें कार्य घडवून आणतो तें त्यानें केलें, परंतु त्याला तसाच एक गुरु भेटला होता. या गुरूचें नांव मॅझिनी हें मागील लेखांत सांगितलेंच आहे. या गुरु-शिष्यांची जोडी युरोपांत खरोखर अद्वितीय होय. आपल्या इकडील श्रीरामदास व शिवाजीमहाराज यांची जोडी प्रसिद्धच आहे. मात्र या जोडी-जोडींत थोडासा फरक आहे. तो असा कीं, रामदास हे शिवाजीमहाराजांचे जसे राजगुरु तसे धर्मगुरुहि होते. त्यांना महाराष्ट्रांत साधुसंतांमध्यें गणतात. मॅझिनीची योग्यता राष्ट्रभक्त या नात्यानें आहे; त्याचीं धर्ममतें त्या वेळच्या लोकांस मान्य अशीं नव्हतीं व ग्यारीबाल्डीला तर धर्मलंड असेंच मानीत. तसेंच मॅझिनी व ग्यारीबाल्डी हे दोघे वयानें जवळ जवळ सारखेच असून लढाईच्या एका प्रसंगीं ग्यारीबाल्डीकडे सेनापतीचा अधिकार असतां मॅझिनी हा त्याचे हाताखालीं साधा शिपाई या नात्यानें लढत होता. तथापि ग्यारीबाल्डीचे पराक्रम हें मॅझिनीच्या प्रेरणेचें व गुरूपदेशाचेंच फळ होय; आणि अखेरपर्यंत हा शिष्य आपल्या या गुरूला गुरुपणाचाच मान देत असे.

गुरुपरंपरा व गुरूपदेश यांचें महत्त्व आमच्या या हिंदु राष्ट्रांत फार मानलेलें आहे; अलौकिक अशा गुरु-शिष्यांच्या ज्या दोन जोड्या वर सांगितल्या त्यांचें महत्त्व आजचे मितीस राष्ट्रीय दृष्टीनें विचार करणारास अत्यंत वाटेल यांत शंका नाहीं; आणि तसें तें वाटत असल्याबद्दल अलीकडील मराठी वाङ्मयामध्यें पुरावाहि मिळत आहे. कोणत्याहि देशांतील वाङ्मयाचा इतिहास हा त्या राष्ट्राच्या राजकीय इतिहासाला बहुधा धरूनच असतो; व परदेशी विभूतीसंबंधानें गेल्या दहा पांच वर्षांत देशी भाषांमध्यें जीं पुस्तकें

झालीं त्यांत मॅझिनी व ग्यारीबाल्डीचीं चरित्रें प्रमुखत्वानें आढळतात यावरून निघणारें अनुमान उघड आहे. हिंदुस्थानच्या राजकीय स्थितीला परदेशाच्या इतिहासांत उपमान हुडकावयाचें झालें तर इटलीइतकें समर्पक उदाहरण दुसरें मिळणार नाहीं. त्यांतूनहि आजच्या स्थितींत, म्हणजे जेव्हां तरुण पिढीचे खरे गुरु कोण, याबद्दल उघड वाद माजला आहे अशा वेळीं, तर अशा गुरु-शिष्यासंबंधानें लोकांस शक्य तितकी माहिती मिळणें इष्ट आहे; व तिचीं साधनें हिंदुस्थानांतील प्रत्येक देशी भाषेंत उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न यापूर्वीच सुरू झाला आहे, ही आमच्या मतें फार आनंदाची गोष्ट आहे.

ग्यारीबाल्डीचें चरित्र चार भाषांमध्यें झालेलें आढळतें. मराठींत रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर; हिंदींत लाला लजपतराय; गुजराथींत रा. रा. नरसिंह ईश्वरभाई पटेल व बंगालींत बाबू जोग्रेंद्रनाथ शर्मा अशा चौघा गृहस्थांनीं हीं चरित्रें लिहिलेलीं आहेत. मॅझिनीचीं चरित्रें आमचे माहितीप्रमाणें हिंदींत एक आणि मराठींत दोन झालेलीं आहेत. हिंदी चरित्र लाला लजपतराय यांनींच लिहिलें आहे. मराठीपैकीं एक रा. रा. ल. गो. घाणेकर यांचें व दुसरें नुकतेंच प्रसिद्ध झालेलें रा. रा. विनायक दामोदर सावरकर, बी. ए. यांचें. केळकर व घाणेकर यांचीं पुस्तकें मुख्यतः चरित्रवर्णनात्मक आहेत व सावरकर यांचे पुस्तकांत खुद्द मॅझिनीनें लिहिलेलें आत्मचरित्र व त्याचे कांहीं कांहीं राजकीय विषयांवरील लेख यांतील निवडक उताऱ्यांचें भाषांतर आहे. या सर्व ग्रंथांवरून सुमारें शंभर वर्षांपूर्वीं इटली देशाची स्थिति कशी होती व आपलें राष्ट्र उदयास यावें अशी महत्त्वाकांक्षा धरणाऱ्या इटालियन राष्ट्रभक्तांनीं कसे भगीरथ प्रयत्न केले याची वाचकांस कल्पना येण्यासारखी आहे. व्यक्तिदृष्ट्या खऱ्या राष्ट्रभक्तांचें चरित्र कसें असावें याची कल्पना रा. केळकर व रा. घाणेकर यांनीं लिहिलेल्या या इटालियन गुरु-शिष्याचे जोडीचे चरित्रावरून होते; आणि रा. विनायक दामोदर सावरकर यांचें ग्रंथांत मॅझिनीचे स्वदेशाविषयीं निरनिराळ्या वेळीं काढलेले उद्गार, त्याच्या मानसिक परिणतीचा इतिहास आणि राष्ट्रसंघ बनविण्याचे कामीं त्याच्या वेळीं इतरांनीं व स्वतः त्यानें केलेल्या गुप्त व उघड खटपटींच्या हकीकतीचें चित्र डोळ्यांपुढें चांगलें उभें राहून, राष्ट्रोद्धाराची तयारी कशी करावी लागते याची तपशिलवार व विश्वसनीय अशी माहिती मिळते.

मॅझिनी हा ग्यारीबाल्डीचे पूर्वी सुमारें दोन वर्षें म्हणजे इ० स० १८०५ सालीं जन्मास आला. लहानपणापासूनच त्याचा स्वभाव अत्यंत प्रेमळ व परोपकारी असा होता. तो केवळ सोळा वर्षांचा असतांच त्याच्या अंतःकरणांत राष्ट्रभक्तीची ज्योत पेटली. या वेळीं पिड्मॉंट संस्थानामध्यें एक लहानसें बंड झालें होतें; परंतु तें फसून बंडवाले लोकांची वाताहत झाली, आणि ते प्राणसंरक्षणाकरितां गुप्तवेषानें भिक्षा मागत हिंडूं लागले. यांपैकीं कांहीं बंडवाल्यांची व त्याची गांठ पडून त्यांजकडून त्याला त्याच्या राष्ट्राची खरी स्थिति कळली. तेव्हां म्हणजे वयाचे फक्त सोळाव्या वर्षी "स्वदेशाला स्वातंत्र्यप्राप्ति करून देण्याकरितां कोणालाहि लढतां येणें शक्य आहे; म्हणून लढणें हें त्याचें कर्तव्यहि आहे" अशी स्फूर्ति झाल्याचें त्यानें आपल्या आत्मचरित्रांत स्पष्ट लिहिलें आहे. विद्यालयांत शिकत असतां त्याचे स्नेही-सोबती निष्काळजीपणानें हसून खेळून चैनीनें काळ काढीत असतां हा मात्र देशाची स्थिति मनांत आल्यानें उदास होऊन स्वराज्यनिधनाचे सुतकाबद्दल अंगांत काळे कपडे घालून विचार करीत बसे! तो इतका एकलकोंडा झाला होता कीं, हा आतां आत्महत्या करितो कीं काय अशी भीति त्याच्या आईबापांस पडली.

वयाचे २१ वे वर्षी वकिलीची परीक्षा देऊन चार-पांच वर्षें त्यानें वकिलीहि केली; परंतु धंद्यांत त्याचें लक्ष पैशाकडे नव्हतें, तर केवळ परोपकाराकडे होतें. ज्या कोणाजवळ द्रव्य नसेल त्याचा वकील मॅझिनी हा ठरलेला. या चारपांच वर्षांत त्यानें आपल्या आवडीचे असे शेंकडों ग्रंथ वाचले. पुढें लेखक या नात्यानें सर्व जगभर त्याची जी प्रसिद्धि झाली तिची मूळ तयारी याच वेळीं झाली. स्वदेशाच्या स्थितीकडे मन अहोरात्र गुंतल्यामुळें त्याला वकिलीचा वीट आला व कारबोनेरी नामक गुप्त मंडळींत शिरून त्यानें आपल्या सार्वजनिक चरित्राचा ओनामा लिहिला.

या गुप्त मंडळींत विद्वत्तेमुळें व कळकळीमुळें तो एकदम पुढारी बनला. परंतु त्या मंडळीचे कांहीं कांहीं धार्मिक विधि व जुलमाचे कायदे यांचा त्याला तिटकारा येऊन राजकीय व धार्मिक सुधारणा करण्याच्या उद्देशानें स्वतःची एक नवीनच गुप्त मंडळी काढण्याचे त्यानें ठरविलें. इतक्यांत १८३० सालीं एका बंडांत सामील असल्याचे संशयावरून त्याला पकडून हद्दपार करण्यांत आलें. फ्रान्समध्यें एकांतवासांत राहून त्यानें पुढील सर्व कार्यांची रचना

मनांत करून ठेविली व मार्सेलीस येथें 'तरुण इटली' या नांवाची गुप्त मंडळी स्थापन करून त्याच नांवाचें वर्तमानपत्र सुरू केलें.

या वर्तमानपत्राच्या हजारों प्रती सरहद्दीवरील अधिकाऱ्यांची नजर चुकवून इटलींत गुप्त मंडळीच्या लोकांचे हातून या कानाचें त्या कानास न कळतां वांटल्या जात; व ज्या द्वारानें या लेखांचा गुप्त प्रसार होई त्याच द्वारांनीं, हे लेख वाचून ज्यांचीं मनें तयार झालीं अशा तरुण देशभक्तांचीं हजारों नांवें या गुप्त मंडळीचे सभासद होण्याकरितां मॅझिनीचे हातीं येत. या लेखांचें अधिकाऱ्यांस अर्थातच वैषम्य वाटूं लागलें. ते लेख वाचणें, वाचून दाखविणें, जवळ ठेवणें अगर त्यांच्या प्रसारास कोणत्याहि रीतीनें मदत करणें हा अपराध ठरविला जाऊन त्याची चौकशी करण्याकरितां लष्करी अधिकाऱ्यांची एक न्यायसभा नेमण्यांत आली. तिनें तांत्रिक चौकशी करून अशा अपराध्यांस गोळ्या घालून ठार मारण्याचा सपाटा चालविला.

इतकें झालें तरी मॅझिनीच्या लेखांचा प्रसार थांबला नाहीं. फ्रान्स, ऑस्ट्रिया व इटाली या तिन्ही देशांचे पोलीस त्याचे मागें हात धुऊन लागले असतां त्यांस झुकांडी देऊन मॅझिनी स्वित्झर्लंडमध्यें गुप्तपणानें जाऊन राहिला, व तेथून आपल्या वर्तमानपत्राचें काम त्यानें पूर्ववत् चालविलें. एवढेंच नव्हे, तर 'तरुण इटली'च्या धर्तीवर 'तरुण युरोप' या नांवाची आणखी एक अधिक व्यापक अशी गुप्त मंडळी त्यानें काढली. या नवीन मंडळींत युरोपांतील सर्व देशाचे तरुण लोक सामील होऊं लागले व स्वराज्य, स्वातंत्र्य, मनुष्याचें कर्तव्य, जगांतील मानवी कुटुंबांचें तात्त्विक ऐक्य, वगैरे मॅझिनीच्या ज्या अत्युच्च कल्पना त्यांचा फैलाव त्यांचे द्वारें सर्व युरोप खंडभर होऊं लागला.

या सर्व कृत्यांबद्दल त्याला फांशीची शिक्षा देऊन ठेवण्यांत आलेली होती. शेवटीं स्वित्झर्लंडमधूनहि त्यास हाकून देण्यांत आलें तेव्हां तो इंग्लंडमध्यें जाऊन राहिला. सन १८४८ सालीं रोम येथें औट घटकेचें प्रजासत्ताक राज्य स्थापित झालें त्या वेळीं तो रोममध्यें हजर होता व सर्व कारभार त्याच्याच हुकुमानें चालत असे. परंतु फ्रेंच सैन्यानें रोम काबीज केल्यामुळें त्यास पळून जावें लागलें. यानंतर फिरून दहाबारा वर्षांनीं इटलींतील राजकारणांत त्याचा प्रवेश झाला. ऑस्ट्रियाशीं युद्ध सुरू होऊन देशामध्यें अस्वस्थता माजली; त्या वेळीं राज्यक्रांति घडवून आणून प्रजासत्ताक राज्य संस्थापित करावें असा त्यानें फार आग्रह धरिला. परंतु कॅव्हूर व ग्यारीबाल्डी यांची

राजनिष्ठा फार. त्यांना फक्त परराज्य नाहींसें व्हावयास पाहिजे होतें. राजघराणें नाहींसें व्हावयास नको होतें. यामुळें मॅझिनी व ग्यारीबाल्डी यांचा बेबनाव होऊन मॅझिनी इटली सोडून गेला तो फिरून परत आला नाहीं. राजा व्हिक्टर-ए-मॅन्युएल याची गादी रोम शहरांत स्थापित झाल्यावर त्याला संयुक्त इटलीच्या पार्लमेंटचा सभासद नेमण्यांत आलें; परंतु राजनिष्ठेची शपथ घेणें हें त्याच्या तत्त्वाचे विरुद्ध असल्यामुळें त्यानें तो मान नाकारला. तथापि अशा रीतीनें मॅझिनीचा मुख्य हेतु जो परकीय राजसत्ता झुगारून देणें, तो त्याचे डोळ्यांदेखत सिद्धीस गेला.

मॅझिनीसारखे पुरुष खरोखरच अलौकिक होत. युरोप खंडांतील प्रजापक्षीय राजनीतीमधील जीं अत्यंत उदात्त तत्त्वें त्यांची ओळख मॅझिनीच्या ग्रंथांप्रमाणें दुसऱ्या कोठें क्वचितच पटते. त्याचे चरित्रांत ग्यारीबाल्डीसारखे पराक्रम दिसून येत नाहींत; परंतु ज्या आद्यतत्त्वामुळें ग्यारीबाल्डीस तीं पराक्रमाचीं कृत्यें करण्यास उडी घेण्याची स्फूर्ति झाली तें त्याच्याचप्रमाणें मॅझिनीमध्येंहि नेहमीं प्रदीप्त असे. हें तत्त्व म्हणजे स्वार्थशून्यता व स्वतःचा जीव देण्याची तयारी. अशा तऱ्हेची तयारी झाल्यानंतर राष्ट्रभक्ताचे हातून प्रत्यक्ष अशीं जीं कृत्यें घडून यावयाचीं त्यांचें स्वरूप परिस्थितीप्रमाणें निरनिराळें होतें. जे शरीरगुण मॅझिनीच्या वांटणीला आले होते, त्यांमध्यें प्रत्यक्ष रणसंग्रामाला अनुकूल असे गुण फारसे नव्हते. यामुळें ज्या लष्करी उलाढालींची योजना त्याच्या बुद्धीनें होई त्यांची अंमलबजावणी त्याला दुसऱ्यांवर सोंपवावी लागे. एक वेळ तर प्रत्यक्ष रणसंग्रामांत सांपडला असतां तो मनःक्षोभामुळें बेशुद्ध पडला व त्यास डोलींत घालून मागें न्यावें लागलें! तथापि मॅझिनीमध्यें मानसिक धैर्य व करारीपणा किती होता याविषयीं त्याचें सर्व चरित्र साक्ष देतें. कोणास राजकीय जुलमाचें व अन्यायाचें खंडन फक्त लेखणीनें करण्याची पात्रता असते, तर कोणास दुसऱ्यांनीं लेखणीनें लिहिलेल्या कल्पनांचा अंमल तरवारीनें करण्याची पात्रता असते. परंतु प्रसंग पडल्यास स्वतःचा जीव खर्ची घालण्याची तयारी दोघांमध्येंहि सारखीच असावी लागते. ग्यारीबाल्डीप्रमाणेंच मॅझिनीलाहि इटालिअन अधिकाऱ्यांकडून दोन वेळां फांशीची शिक्षा फर्माविण्यांत आली होती, परंतु त्यानें त्या शिक्षेची दिक्कत न बाळगतां इटलींत अनेक वेळां प्रवेश केला.

करारीपणासंबंधानें पाहतां त्यानें तर सर्व जन्म हालअपेष्टेंत व दारिद्र्यांत काढला हें प्रसिद्धच आहे. 'तरुण इटली' या नांवाच्या वर्तमानपत्राच्या हजारों प्रती इटलींत प्रवेश करून देशभर पसरत म्हणून मागें सांगितलेंच आहे; त्या वेळीं त्याला इतके श्रम पडत कीं, त्यांची कल्पनाहि सामान्य मनुष्यास करतां येणार नाहीं. या वेळीं मॅझिनीला जातीनें अहोरात्र काम करावें लागे. वर्तमानपत्राला हपीस नाहीं, लिहिण्यास मदतनीस नाहीं, पत्र काढण्यास हाताखालीं नोकर नाहींत ! अशा स्थितींत वर्तमानपत्रांतील लेख लिहिणें, पत्रव्यवहार करणें, पत्र छापून निघालें म्हणजे त्याच्या घड्या घालून गठ्ठे बांधणें वगैरे सर्व कामें केव्हां केव्हां त्याला स्वतःला जातीनें करावीं लागत असें सांगतात. तसेंच इतर प्रकारचा त्रासहि त्याला थोडा होत असे असें नाहीं; म्हणजे कृतघ्न व शंकेखोर माणसें, निंदक लोक, आपल्या पक्षांतील अदूरदर्शी व कलहप्रिय मित्र तसेंच पूर्वींचा मित्रभाव सोडून बनलेले नवीन शत्रु या सर्वांपासून त्याला अत्यंत उपाधि होत असे. ग्यारीबाल्डीनें दोन वेळा विवाह केला होता व त्याला प्रपंचसुख तरी थोडेंबहुत होतें, परंतु मॅझिनीला तेंहि नव्हतें. 'वसुधैव कुटुंबकं' हें जें साधुवृत्तीचें आद्यतत्त्व तें मॅझिनीचें अंगीं पुरें बाणलेलें होतें; व त्याच तत्त्वाच्या अतिरेकामुळें त्याचा व इतर इटालियन राष्ट्रभक्तांचा बेबनाव झाला होता. मॅझिनी हा जहालांतला जहाल होता. त्याच्या तुलनेनें पाहतां ग्यारीबाल्डी हा नेमस्त म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु या ठिकाणीं मात्र हा जो नेमस्त व जहाल यांतील मतभेद त्याचें कारण कमी अधिक स्वार्थत्यागबुद्धि हें नसून शक्याशक्यतेच्या प्रश्नासंबंधानें निरनिराळीं मतें हेंच होतें. मॅझिनीची कल्पना अशी कीं, मनुष्यमात्रास कांहीं कांहीं हक्क निसर्गसिद्धच आहेत; त्यांपैकीं स्वराज्य व स्वातंत्र्य यांचे हक्क होत. तसेंच मनुष्यामनुष्यामधील सर्व हक्क समसमान असावे व त्यांचा समाजांतील व्यवहार श्रेष्ठ व कनिष्ठ अगर जित व जेते अशा प्रकारचा नसावा. अर्थात् प्रजासत्ताक राज्य येवढीच संस्था काय ती न्याय्य होय, बाकी सर्व संस्था जुलमाच्या होत; असें त्याचें मत होतें व याच दृष्टीनें त्याचे सर्व प्रयत्न आमरणान्त चाललेले होते. युरोप खंडांत किंबहुना पृथ्वीचे पाठीवरील प्रत्येक देशांत प्रजासत्ताक राज्यें असावीं, त्या सर्व राज्यांनीं परस्परांशीं स्नेहभाव ठेवून एखाद्या कुटुंबांतील माणसें ज्याप्रमाणें एकमेकांचें हित पाहतात त्याप्रमाणेंच वागावें, असें त्याचें मत होतें. परंतु जुलमी व अनियंत्रित राजसत्तेच्या एका

टोकापासून तों सर्वांगपरिपूर्ण अशा कल्पनारम्य प्रजासत्ताक राज्याच्या दुसऱ्या टोकापर्यंत एकदम जाणें अर्थातच शक्य नव्हतें. इटलींत पूर्वी एक वेळ प्रजासत्ताक राज्य होतें किंवा प्रजासत्ताक राज्य हीच काय ती एक न्याय्य अशी संस्था आहे, येवढ्याच कारणाकरितां लोकांची तयारी नसतां त्या कार्यास हात घालावयाचा हा अविचार होईल; देशी संस्थानिक हेच पूर्वीच्या 'स्वराज्यां'-तील राजसत्तेचे आजचे मुख्य वारस असल्यामुळें त्यांनाच पुढें करून व लोकमताचा त्यांना पाठिंबा देऊन त्यांच्या हातून परकीय राजसत्तेचें जूं झुगारून देण्याचें काम प्रथम करणें योग्य आहे, असें कॅव्हूर व ग्यारीबाल्डी यांस वाटत होतें. सर्व राष्ट्राचेंहि मत या दुसऱ्या पक्षाच्या बाजूचें असल्यामुळें शेवटीं त्याप्रमाणेंच घडून आलें. परंतु मॅझिनीच्या चरित्राचें पर्यालोचन करीत असतां हा मतभेद लक्षांत घेण्याचें कारण नाहीं. कोणत्याहि देशांत, कोणत्याहि कालांत शक्याशक्यतेविषयीं इतका सूक्ष्म मतभेद राहणारच. परंतु ज्या गोष्टींत या दोन्ही पक्षांत मतभेद नव्हता त्या कोणत्या हें आम्हीं आज ध्यानांत ठेवणें जरूर आहे. या गोष्टी म्हटल्या म्हणजे स्वार्थत्यागाचे बाबतींत जीव खर्ची घालण्यापर्यंत तयारी आणि राष्ट्रोद्धार करण्याचा दृढनिश्चय ठेवून त्याकरितां सर्वांनीं एकदिलानें झटणें या होत.

---

[३]

'तरुण इटली'च्या सभासदांची शपथ

" मी अमुक अमुक इसम, ईश्वर व स्वदेश यांना स्मरून, स्वदेशाच्या पवित्र कार्यांमध्यें ज्या देशभक्तांनीं परकीय जुलुमास आपले प्राण बळी दिले त्यांचें स्मरण करून, ईश्वरानें ज्या भूमींत मला निर्माण केलें आहे तिच्याशीं ज्या कर्तव्यानें मी बांधला गेलों आहें, व ईश्वरानें जे देशबांधव मला दिले आहेत त्यांना स्मरून, ज्या देशामध्यें मला जन्म देणारी माझी आई जन्मास आली व जिच्यामध्यें माझीं मुलेंबाळें घरांतल्याप्रमाणें पुढें सुखानें नांदतील, त्या देशावर जन्मसिद्ध अशी जी प्रीति माझ्या हृदयांत आहे तिला स्मरून, अन्याय, जुलूम वगैरे सर्व वाईट गोष्टींविषयीं माझ्या मनामध्यें जो द्वेषभाव आहे त्याला स्मरून, परदेशांतील स्वतंत्र प्रजाजनापुढें उभा राहिलों असतां मला स्वतःला स्वतंत्र प्रजेचे हक्क नाहींत, मला नांव घ्यावयाला स्वदेश नाहीं व मी जें माझें म्हणूं शकेन असें राष्ट्रीय निशाण नाहीं, हें पाहून व त्यामुळें शरम वाटून, तसेंच माझा आत्मा ईश्वरानें स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याकरितां निर्माण केला असून स्वातंत्र्य व जनपदहित साधण्याविषयीं, परदास्य व असहायता यामुळें आपण दुबळे आहोंत असें मनांत भासत असतांहि, ती स्वतंत्रता व तें जनपदहित साधण्यास सदाशेच्या प्रेरणेमुळें मनांत जी उल्हासाची ऊर्मि येते ती ध्यानांत आणून, स्वदेशाचें पूर्वीचें वैभव व हल्लींची स्थिति मनांत आणून, तसेंच फांशीं जाऊन तुरुंगवासाच्या यातनेनें किंवा हद्दपारीचे शिक्षेनें होणाऱ्या दुःखामुळें आजपर्यंत जे इटलीचे सुपुत्र मरण पावले, त्यांच्या प्रेमळ आयांनीं जे दुःखाश्रु ढाळले ते दृष्टीसमोर वागवून, आणि आजमितीस लाखों लोक जी यातना भोगीत आहेत तिचें स्मरण करून, मी शपथ घेतों कीं– इटली देशाकडे ईश्वरानें एक महत्कार्य सोपविलें आहे तें साध्य करणें प्रत्येक इटालियन मनुष्याचें कर्तव्यकर्म आहे असा माझा दृढ विश्वास आहे. ईश्वरानें माझें राष्ट्र पुन्हा अस्तित्वांत येईल असा ज्या अर्थीं हुकूम दिला आहे त्या अर्थीं तें राष्ट्र उत्पन्न करण्यास अवश्य अशी जी शक्ति तीहि त्यानें आम्हां लोकांस दिली आहे. त्या शक्तीचा समाजाकरितां योग्य उपयोग करणें हीच

आमच्या कार्यसिद्धीची गुरुकिल्ली आहे. मनःपूत कृत्य करणें व तें करण्यास लागणारा स्वार्थत्यागहि करणें हाच काय तो श्रेष्ठ सद्गुण. एकी व दृढनिश्चय यांमध्येंच सर्व शक्तींचें मूळ बीज आहे, इत्यादि गोष्टींबद्दल माझ्या मनाची पक्की खात्री झाल्यामुळें, माझ्याप्रमाणेंच विश्वास असणाऱ्या या 'तरुण इटली' नांवाच्या मंडळीमध्यें मी आपलें नांव दाखल करीत आहें. मी आजपासून अशी शपथ घेतों कीं, या मंडळीच्या साहाय्यानें इटली देशाचें स्वतंत्र व लोकसत्ताक राष्ट्र करण्याकरितां मी जिवाभावानें अक्षय्य खटपट करीन. या मंडळीचे हेतु लोकांस समजण्याकरितां कायावाचामनेंकरून त्यांना शिक्षण देईन. सद्गुणाशिवाय कोणतीहि वस्तु मिळाली तरी टिकत नाहीं! याकरितां मीं नेहमीं सद्गुणानेंच वागेन. यापुढें मी दुसऱ्या कोणत्याहि मंडळीचा सभासद होणार नाहीं. या मंडळीचे सर्व हुकूम मी शब्दशः पाळीन व प्राण गेला तरी ते बाहेर फोडणार नाहीं. या मंडळींतील इतर बांधवांना सल्लामसलत व साहाय्य देऊन मदत करीन. ही सर्व शपथ किंवा त्यातील अंशहि जर मीं मोडला तर ईश्वराचा पुरा क्षोभ मजवर होईल व मनुष्यमात्र मला निंद्य मानूं लागेल, आणि असत्यवादी म्हणून माझ्या तोंडाला काळोखी लागेल."

— समाप्त —